30
म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
सं. क्र. 20

[illegible]

[illegible] निबंध

लेखक

[illegible]

REFBK-0004122

ग्रं. सं. ८१२८

पृ. सं. २०

२०

महाराष्ट्र कॅप फॅक्टरी
कोल्हापूर
प्रो. वसंत एस्. ए. कुलकर्णी

# गोपाळ गणेश आगरकर

## चरित्रात्मक निबंध

झाले बहु, होतिल बहु,
आहेतहि बहु, परंतु यासम हा ॥
मोरोपंत

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प ८७ वें.

# गोपाळ गणेश आगरकर

## चरित्रात्मक निबंध



"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
—भगवान् श्रीकृष्ण.

माधव दामोदर अळतेकर, एम्. ए.
विल्सन कॉलेज, मुंबई, येथील मराठीचे अध्यापक;
"अपराध कोणाचा," "ललिता," "शांताराम,"
"मुक्तबंध" या कादंबऱ्यांचे आणि "हिंदी
अर्थशास्त्र" या ग्रंथाचे कर्ते
यांनीं लिहिला.

प्रस्तावनालेखक
डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

फेब्रुवारी १९३०. माघ शके १८५१

किंमत कापडी रु. ३-८-०

प्रकाशक
मंगेश नारायण कुळकर्णी,
मालक,
भारत-गौरव-ग्रंथमाला,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

[ या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेविले आहेत. ]

मुद्रक
मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस,
३१८ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

कोल्हापूर
प्रो. एजंट एम्. ए. कुलकर्णी.

विवेक, न्याय आणि दया
यांचें सर्वत्र साम्राज्य व्हावें
म्हणून ज्यांचे प्रयत्न चालले आहेत
त्या सर्व स्त्रीपुरुषांना

**हा ग्रंथ**

सादर अर्पण केला आहे.

REFBK-0004122

# प्रस्तावना

—:०:—

गुरुवर्य गोपाळ गणेश आगरकर परलोकवासी झाल्यास आज चौतीस वर्षें होऊन गेलीं आहेत. त्यांची आयुष्ययात्रा जरी एकोणचाळीसच वर्षें झाली तरी तेवढया वेळांत त्यांनीं महाराष्ट्रामध्यें जी खळबळ उत्पन्न केली ती अजून शांत झाली नाहीं इतकेंच नाहीं तर तिच्या लाटा अधिक जोरानें हल्लीं महाराष्ट्रसमाजावर आदळत आहेत. त्या चळवळीचा परिणाम चिरस्थायी असल्यामुळें आमच्या समाजाच्या उत्क्रांतीच्या इतिहासांत आगरकरांचें नांव सर्व काळ विशेष महत्वाचें समजलें जाईल यांत शंका नाहीं. एखाद्या पर्वताचें यथार्थ गौरव समजण्यास ज्याप्रमाणें त्याकडे कांहीं अंतरावरून पहावें लागतें त्याप्रमाणेंच आगरकरांसारख्या थोर विभूतींच्या कार्याचें मर्म पूर्णपणें कळण्यास व व्यक्तिविषयक वाद थोडे बहुत तरी विसरून जाण्यास थोडा काळ जावा लागतो; म्हणून आज चौतीस वर्षांनंतर आगरकरांचें चरित्र लिहून लोकांपुढें मांडणें म्हणजे एक विशेष प्रकारचें उपयुक्त काम करणें होय. आणि हें काम माझे मित्र प्रो. माधवराव अळतेकर यांच्यासारख्या कसलेल्या लेखकानें करण्याचें मनावर घेतलें व तें इतक्या उत्तम प्रकारें पार पाडलें हें पाहून त्यांचें व आमच्या समाजाचें अभिनंदन करणें योग्य होय. आगरकरांस अति प्रिय अशी जी आमच्या देशाची सर्वांगीण व विशेषतः सामाजिक सुधारणा तिचें पाऊल थोडें तरी पुढें पडण्यास या ग्रंथाची जर मदत झाली तर ग्रंथकर्त्यास आपल्या श्रमाचें चीज झालें असें वाटेल.

आगरकरांच्या पिढींतले व त्यांच्या बरोबरीचे लोक आतां फारसे हयात नाहींत; परंतु त्यांतील कित्येकांशीं बोलण्याचा मला पुष्कळ वेळां प्रसंग आलेला आहे. फर्ग्युसन कॉलेजांत असतांना माझ्या पहिल्याच वर्षांत ( १८९२ ) प्रि. वामनराव आपटे वारले व आगरकर त्यांच्या जागेवर आले. आपट्यांच्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शित करण्याकरितां सर्व शिक्षकांची व विद्यार्थ्यांची जी सभा झाली

त्या वेळीं झालेलें आगरकरांचें भाषण मला अजून आठवतें. " व्यक्ति दिवंगत होतात पण संस्था चिरकालिन असतात " हें त्यांचें वाक्य माझ्या कानांत अजून गुणगुणत आहे. ते प्रिन्सिपल तीनच वर्षें होते आणि तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या त्यांच्या विषयांचा मी अभ्यास करीत नसल्यामुळें आगरकर शिक्षक कसे होते हें मला खुद्द स्वतःच्या माहितीवरून सांगतां येत नाहीं. परंतु माझ्या सहाध्यायांच्या सांगण्यावरून त्यांच्या शिकविण्यांत विद्यार्थ्यांशीं मुख्य विषयांबरोबर ओघानें अवांतर पुष्कळ बाबींची चर्चा करणें व त्यांस बहुश्रुत करून स्वतंत्र विचार करण्याची संवय लावण्याचा प्रयत्न करणें या गोष्टी विशेष असत. म्हणजे सुधारक व केसरी वर्तमानपत्रांच्या साह्यानें जें त्यांनीं काम केलें तेंच ते वर्गांत करीत असत. मी १८९५ सालीं कालेजांत गेलों असतांना त्यांची वेळोवेळीं गांठ पडत असे, पण ते लवकरच फार आजारी पडून अंत पावल्यामुळें त्यांची निकट ओळख होण्याचा प्रसंग मला आला नाहीं याबद्दल मला फार वाईट वाटतें.

त्यांचें **सुधारक** पत्र पहिल्या अंकापासून, मी त्या वेळीं दहा अकरा वर्षांचा होतों, तरी नियमित वाचीत असें व त्यांच्या विचारांचा पुष्कळ परिणाम माझ्या मनावर झालेला आहे. शाळेमध्यें असतांना आम्हां मुलांमध्यें संमतिवयाच्या कायद्याबद्दल नेहमीं वाद व्हावयाचे व त्यांत आगरकरांच्या मतांचें मंडण मीं नेहमीं करावयाचा. टिळक श्रेष्ठ कीं आगरकर श्रेष्ठ याबद्दल आमच्यांत नेहमीं भांडण. पुढें पहिल्यानें कालेजांतील विद्यार्थी व मग त्यांतील शिक्षक या नात्यानें त्यांच्याबद्दलची माझी पूज्य बुद्धि जास्त जास्त दृढ झाली. माझे मित्र कै. शिवराम हरि ऊर्फ आबा साठे यांचा आगरकरांशीं फार जिव्हाळ्याचा स्नेह होता. ते व गु. कै. गोपाळराव गोखले हे नेहमीं आगरकरांबद्दल मजजवळ बोलत असत. त्यावरून आगरकरांच्या खासगी वर्तनांतहि ते फार सरळ, स्पष्ट, स्वतंत्र विचाराचे परंतु मृदु मनाचे गृहस्थ होते यांत शंका नाहीं. त्यांची आर्थिक स्थिति गरिबीची; परंतु दुसऱ्या कोणाचेंहि उसनें घेणें त्यांस खपत नसे. अगदीं अनपेक्षित अडीअडचणीकरितां म्हणून ते आपल्या पेटींत दहा रुपये व एक रुपयाची मोड हात न लावतां ठेवीत असत. त्यांचीं धार्मिक मतें जरी अज्ञेयवादी असलीं तरी विरुद्धपक्ष ऐकण्यास ते नेहमीं तयार असत. एकदां ते एके ठिकाणीं कीर्तनास गेले होते तेव्हां हे नास्तिक म्हणून पुष्कळांस अचंबा वाटला. पण तें संपल्यावर एक पुण्याचे प्रसिद्ध धर्ममार्तंड-जे आगरकरांचें नांव शिवीशिवाय कधीं घेत नसत— म्हणाले, "सर्व लोकांत हा महार काय तो कीर्तन संपेपर्यंत मन लावून ऐकत होता!"

डेक्कन एज्युकेशन सोसायटींत जे तंटे उपस्थित झाले, त्यांच्याबद्दल साहजिकपणेंच पुष्कळ माहिती मला ऐकून झाली आहे. परंतु त्यांत आगरकरांकडे कोणच्याही तऱ्हेचा दोष येतो असें दिसत नाहीं. आपली बाजू जोरदार करण्याकरितां व प्रतिपक्षाचा पाडाव करण्याकरितां कोणकोणत्या युक्त्या त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं लढविल्या वगैरे गोष्टींविषयीं लिहिण्याचें ही प्रस्तावना हें स्थळ नव्हे. परंतु या सर्व गोष्टींमुळें आगरकरांस आपल्या आयुष्याच्या उत्तर भागांत पुष्कळ लोकनिंदा सहन करावी लागली. जिवंतपणीं त्यांची प्रेतयात्राहि लोकांनीं काढली ! परंतु या सगळ्यास न जुमानतां त्यांचा धीर कायम राहिला. जणुं काय तेव्हांही त्यांची बालंबाल खात्री होती कीं, भविष्यकाल त्यांचा वाली होऊन त्यांचेंच म्हणणें अखेर खरें ठरवील, आणि असें घडून आलेंहि आहे. जीं मतें "अब्रह्मण्यम्" म्हणून त्यांच्या वेळचे लोक मानीत तींच आतां सर्वमान्य झालीं आहेत किंवा होत आहेत. आपल्या लोकांमध्यें पुष्कळ व्यंगें आहेत, समाजामध्यें पुष्कळ दुष्ट चाली रूढ आहेत. आपणांमध्यें स्वतंत्र आचार व विचार करण्याची संवय कमी आहे. या सर्व कारणांमुळें आपल्या देशाची स्थिति खालावलेली आहे. **राजकीय परिस्थिति हीच काय ती आपल्या अवनतीचें कारण नसून उलट ती बहुतांशीं या दोषांचाच परिणाम आहे ही शिकवणूक आगरकरांचें मुख्य कार्य होय.** तें कार्य करतांना त्यांस लोकांनीं नांवें ठेविलीं तरी त्यांनीं दाखविलेला मार्गच अखेर फलदायी होणार ही त्यांची खात्री. राजकीय परिस्थिति बदलणें हें राष्ट्रसुधारणेचें फक्त एक अंग आहे. सामाजिक, नैतिक व बौद्धिक परिस्थिति बदलणें हें जास्त महत्वाचें परंतु जास्त कठीण अंग आहे. यास आगरकरांनीं हात घातला व आपल्या प्रतापशाली लेखणीनें लोकांमध्यें जागृति उत्पन्न केली. दुष्ट मृत्यूनें त्यांना ती एकोणचाळीसाव्या वर्षांत खालीं ठेवावयास लावली हें आमच्या महाराष्ट्राचें दुर्दैव होय. तरीहि महाराष्ट्र कांहीं सदा सर्वदा त्यांच्या संबंधीं कृतघ्नता दाखविणार नाहीं. आणि गोपाळ गणेश आगरकर हें नांव महाराष्ट्रांतील थोर विभूतींच्या नामावळींत नेहमीं प्रमुख राहील यांत काडीमात्र संदेह नाहीं. अंध विभूतिपूजा आगरकरांना अगदीं नको असे. त्यांची योग्य पूजा म्हणजे त्यांनीं दाखविलेल्या सुधारणांचा अवलंब करणें, त्यांच्या विचारांचें परिशीलन करणें, त्यांच्याप्रमाणें योग्य असेल तस निर्भीडपणें बोलणें, लिहिणें व करणें, त्यांच्याप्रमाणें स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा करणें, व त्यांची साधी रहाणी व उच्च विचारसरणी यांचें अनुकरण करणें हेंच होय.

**रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे.**

# दोन शब्द

१९१६ सालीं जुलच्या २ ऱ्या तारखेला पहिला **आगरकर दिन** मुंबई शहरांत मोठ्या थाटानें साजरा झाला. त्या वेळीं माझे पूज्य गुरु प्रिन्सिपल **रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे** यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें; मुंबईचे थोर रहिवाशी प. वा. न्यायमूर्ती सर **नारायण गणेश चंदावरकर** हे स्थानिक कार्यकारी मंडळाचे प्रमुख होते. आगरकरांचे सुप्रसिद्ध सहकारी आणि प्रतिपक्षी रा. रा. **बाळ गंगाधर टिळक** हे सभेला हजर होते. त्या वेळीं मनोरंजनाच्या खास अंकासाठीं आगरकरांच्यासंबंधीं लहानसा चरित्रलेख मीं लिहिला व पुढेंमागें त्यांचें विस्तृत विवेचनपर चरित्र लिहावें असा संकल्प केला.

आगरकर दिनाची कल्पना माझे प. वा. मित्र रा. रा. **आत्माराम सिताराम वाघ** यांनीं काढिली व ती मूर्तावस्थेंत आणण्यासाठीं त्यांनीं फार मेहनत घेतली. आत्मारामपंत वाघ गाजावाजा न करतां सुधारणेचें काम करीत होते. त्यांच्या-सारखे सक्रिय सुधारक जेवढे अधिक निघतील तितके सुधारणेचें पाऊल पुढें पड-णार आहे.

आगरकर दिनाच्या कल्पनेची चर्चा १९१६ च्या सुरवातीला झाली. त्यानंतर चौदा वर्षानीं हा ग्रंथ बाहेर पडत आहे. तो वाचण्याला रा. वाघ, सर नारायण चंदावरकर आणि रा. रा. बाळ गंगाधर टिळक हे हयात नाहींत हें माझें दुर्भाग्य आहे.

हा ग्रंथ वाचून त्याला प्रस्तावना लिहिण्याचें काम करतों असें अभिवचन प्रिन्सिपल ( आतां डॉक्टर ) **रघुनाथराव परांजपे** यांनीं ग्रंथलेखनाला सुरवात झाल्यावर दिलें; आणि आतां इतक्या दूर विलायतेंत असून सुद्धां प्रस्तावना लिहून पाठविली हे त्यांचे माझ्यावर फार उपकार आहेत.

हा ग्रंथ तयार होण्याला ज्यांचें विशेष साहाय्य झालें त्या सर्वांचा निर्देश करतां येणें शक्य नाहीं. तथापि एक दोन नांवांचा उल्लेख करणें जरूर आहे. आगरकरांचे

मामा आणि बालमित्र रावबहादुर **दत्तोपंत भागवत,** अकोला, यांनीं त्यांच्या-संबंधीं पुष्कळ माहिती दिली. प्रो. **गोविंद चिमणाजी भाटे** यांनीं ग्रंथाचा बहुतेक भाग वाचून त्यासंबंधीं सूचना केल्या. टिळकांच्या राजीनाम्याची इंग्रजी प्रत मला प्रो. भाटे यांनींच दिली. रा. रा. **न. र. फाटक** यांनीं सुधारकाचे बरेचसे अंक (१८९० च्या पुढचे) व दुसरे कांहीं कागद आणि कित्येक पुस्तकें दिलीं. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चिटणीसांनीं आपल्या संस्थेंतील पुस्तकांचा व वर्तमान-पत्रांचा पूर्ण उपयोग करण्याची मुभा दिली. सूची तयार करण्याचे कामांत रा. रा. **सदाशिव रावजी खांदेवाले,** मुंबई उपनगर जिल्हा साहित्यसभेचे चिटणीस, यांची फार मदत झाली. या सर्वांचे मी आभार मानितों. अर्थात्, पुस्तकांतील मतांबद्दल किंवा दोषांबद्दल यांपैकीं कोणावरही कसल्याही प्रकारची जबाबदारी नाहीं.

या निबंधांत वादात्मक स्थलें पुष्कळ आहेत. माझ्या समजुतीनें खरें तें स्पष्ट-पणें मीं लिहिलें आहे. माहितीची चुकी असल्यास ती, किंवा तिच्यावर उभारलेलीं विधानें, दुरुस्त करण्याला किंवा तशी आवश्यकता असल्यास परत घेण्याला माझी केव्हांही तयारी आहे. मुद्दाम कोणाचें मन दुखवावें अशी माझी इच्छा नाहीं; एखाद्याचें मन दुखावेल म्हणून सत्य झांकून ठेवणें किंवा त्याला निःसत्व स्वरूप देणें हा मार्ग मीं अवलंबिला नाहीं. तात्त्विक मुद्यांचा किंवा ऐतिहासिक सत्या-सत्याचा विचार करतांना व्यक्तींवर टीका करावी लागते, ती करण्यांत वैयक्तिक टीका करण्याचा माझा हेतु नव्हता येवढें वाचकांना नम्रपणानें कळविण्याची मी परवानगी घेतों.

कर्नाटक छापखान्याचे मालक रा. रा. **मंगेश नारायण कुळकर्णी** यांनीं आपल्या भारत गौरव ग्रंथमालेंत प्रसिद्ध करण्यासाठीं या ग्रंथाची पहिली आवृत्ति घेतली त्यामुळें त्याचें प्रकाशन येवढ्या चांगल्या प्रकारें व जलद झालें हें येथें नमूद केलें पाहिजे. या ग्रंथाच्या प्रकाशनाला रा. रा. कुळकर्णी यांना उभे करण्याचें सर्व श्रेय रा. रा. **अनंतराव सोहिरोबा तेलंग** यांना आहे. या ग्रंथाची पहिली आवृत्ति प्रसिद्ध करण्याचें मान्य करून रा. कुळकर्णी यांनीं समाजसुधारणेची व आमच्या राष्ट्रीय चळवळीची मोठी सेवा केलेली आहे असें मला वाटतें.

ज्या ज्या पुस्तकांचा वगैरे मला उपयोग झाला त्यांचा उल्लेख ग्रंथांत योग्य ठिकाणीं झाला आहे. त्या पुस्तकांच्या लेखकांचे व प्रकाशकांचे मी या

ठिकाणीं आभार मानावेत हें उचित आहे. ग्रंथ बराच मोठा झाल्यामुळें आगरकरांच्या वाङ्मयात्मक कामगिरीची चर्चा संक्षिप्त करावी लागली; पण तिच्यामुळें त्या कामगिरीचें स्वरूप लक्षांत येण्याला व तिची विस्तृतपणें चर्चा होण्याला थोडेसें साहाय्य झालें तरी मला आनंद होईल. कांहीं अशुद्धें राहून गेलीं आहेत. पण निराळें शुद्धिपत्र देण्याइतकें त्यांचें रूप भयंकर आहे असें मला वाटलें नाहीं. त्यांतील दोन अशुद्धांचा उल्लेख मात्र केल्यावांचून राहवत नाहीं. पृष्ठ ५१, अवतरणाच्या श्लोकांतील तिसरी ओळ, आरंभीं "इष्पूरोदरपूरणाय" पडली आहे तेथें "दुष्पूरोदरपूरणाय" वाचावें; पृष्ठ १९०, ८ व्या परिच्छेदाच्या शेवटल्या ओळींत "सत्याचा अपव्यय" आहे तेथें "सत्याचा विपर्यास" असें वाचावें. अर्थात् अशीं अशुद्ध राहिलीं याबद्दल वाचकांची मी क्षमा याचितों; जे वाचक ग्रंथांतील अशुद्धें माझ्या नजरेला आणतील त्यांचा मी उपकृत होईन.

व्हिले-पार्ले ( मुंबई )
ता. १० फेब्रुवारी १९३० }

**माधव दामोदर अळतेकर**

# प्रकाशकांचे दोन शब्द.

आधुनिक महाराष्ट्राला नवीन वळण देऊन त्याला अखिल हिंदुस्थानाच्या मार्गदर्शकत्वाचा मान प्राप्त करून देण्यास रानडे, चिपळूणकर, आगरकर, टिळक आणि गोखले या पांच थोर पुरुषांचे परिश्रम कारणीभूत झाले ही गोष्ट सुविख्यात आहे. यांपैकीं प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रांत 'या सम हा' असाच आहे. त्यांपैकीं पहिले दोन अल्पायुषी झाल्याकारणानें त्यांच्या कर्तृत्वाचा विकास पूर्णपणें होण्यास अवकाशच मिळाला नाहीं. एरवीं त्यांचींहि नांवें इतर तिघांप्रमाणेंच सर्वत्र गाजलीं असतीं यांत संदेह नाहीं.

चिपळूणकर, टिळक, आगरकर वगैरेंनीं पहिली स्वावलंबन पाठशाळा महाराष्ट्रांत स्थापिली. परकीयांच्या अनुरोधानें आपलें वाङ्मयिक, शैक्षणिक, सामाजिक किंवा राजकीय कार्य न चालवितां स्वतःच्या पायावर उभें राहून आपल्या अक्कलहुषारीनें तें चालवावयाचें असा या सर्वांचा बाणा होता. आपलें शिक्षण आपणास राष्ट्रीय दृष्ट्या फायदेशीर होण्यासारखें आपलें आपण केलें पाहिजे, आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे, आपलें राजकारण व समाजकारण दुसऱ्यांवर अवलंबून न ठेवतां आपण त्यास इष्ट तें वळण दिलें पाहिजे, ही गोष्ट प्रथम चिपळूणकरांच्या मनांत बाणून त्यांनीं त्या दृष्टीनें कार्यास आरंभ केला. पण त्यांचें कार्य फक्त एकाच बाबतींत पूर्णत्वास गेलें व इतर कार्यें अपुरीं राहिलीं. मराठी भाषेला तिचें सध्यांचें स्वरूप प्राप्त करून देण्यांत चिपळूणकरांची कामगिरी अव्वल दर्जाची होती, याबद्दल द्विधा मत होणें शक्य नाहीं. त्यांच्या लिखाणांतील प्रतिपाद्य विषयांच्या व मतांच्या कोणीं चिंधड्या चिंधड्या उडवल्या तरी त्यांचे टीकाकार त्यांच्याच भाषेंत लिहीत असतात. विशिष्ट गोष्टींवरील त्यांचीं मतें कितीहि चूक ठरविलीं तरी त्यांतील स्वावलंबनाचे धडे कोणासहि काढून टाकतां येणार नाहींत.

आगरकर व टिळक यांच्या कार्याचें क्षेत्र चिपळूणकरांच्या मानानें फार विस्तृत होतें. पण असें दिसतें कीं, आगरकरांच्या मतें समाजदोष नाहींसे करणें हा उन्नतीचा आरंभ होता, व टिळकांच्या डोळ्यांपुढें परकीयांचीं कारस्थानें प्रामुख्यानें दिसत होतीं. त्याचाच परिणाम नऊ वर्षें एकत्र काम केल्यानंतर

दोघांच्या कार्यांच्या दोन दिशा ठरण्यांत झाला. आगरकरांचें मत समाज सुधारल्याखेरीज राजकारणाचा पाया तयार होत नाहीं अशा स्वरूपाचें होतें व तें शुद्ध शास्त्रीय दृष्ट्या बरोबरहि आहे. पण जेव्हां एखादें राष्ट्र परक्यांच्या राजकीय सत्तेखालीं सर्व बाजूंनीं चिरडिलें जात असतें व परकी संस्कृतीच्या दडपणामुळें आपली संस्कृति बुडण्याचा संभव उत्पन्न होतो तेव्हां सामाजिक सुधारणांचें स्वरूप काय असावें असा प्रश्न उपस्थित होतो. राजकीय सत्तेच्या बळावर परक्यांची प्रसंगीं हीन अशी संस्कृतीहि एखाद्या राष्ट्रावर लादली जाणें शक्य असतें. अर्थातच ज्यांना स्वतःच्या संस्कृतीचा अभिमान वाटतो त्यांस स्वत्वरक्षणाखालीं सामाजिक सुधारणा जरा मागें ठेवून, राजकीय सत्तेची सामाजिक सुधारणांनाहि बाधणारी सावट आधीं काढून टाकावी असें भावनाभेदामुळें वाटणें अस्वाभाविक नाहीं.

जेव्हां एखाद्या राष्ट्राला आपली संस्कृति कायम राखून योग्य सुधारणा घडवून आणावयाच्या असतील तेव्हां त्याला उत्तम अशी परिस्थिति स्वदेशस्वातंत्र्याचीच होय. एरवीं खऱ्या सुधारणा बाजूस राहून परक्यांचें अनुकरण हाच सुधारणेचा मार्ग ठरण्याची भीति रहाते. अशी स्थिति हिंदुस्थानांत थोडीफार आजच झालेली दिसते. आगरकरांनीं असें अंधानुकरण केव्हांही शिकविलें नाहीं तसेंच ज्या सुधारणा येथील समाजाच्या गळीं उतरण्यास एक पिढी लोटावी लागली त्यांचा एक पिढीपूर्वी समाजानें एकदम स्वीकार केला नाहीं म्हणून समाजावर रागावण्यांत कांहीं अर्थ नाहीं, व खुद्द आगरकर अज्ञ समाजावर केव्हांही रागावले नाहींत. त्यांनीं जाणत्या अशा लोकांवरच टीका केली. टिळकांनीं तत्कालीन लोकमताचें प्रतिनिधित्व स्वीकारल्यामुळें त्यांस आपल्या अशिलांच्या समजुतींची घोषणा करणें भाग होतें. तेथें खऱ्याखोट्यापेक्षां किंवा बऱ्यावाईटापेक्षां समाजाचें मन चवाट्यावर ठेवण्याचा प्रश्न होता. आपलें वकिलीचें काम त्यांनीं त्यांच्या सर्वच कार्याप्रमाणें तनमनधन वेंचून शक्य तितक्या जोरानें केलें यांत त्यांचा अदूरदर्शीपणा दिसत नसून या प्रश्नाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोण मात्र प्रतिबिंबित झालेला दृष्टीस पडतो. तसेंच त्यांस हिंदु संस्कृतीचा गाढ अभिमान वाटत असल्याकारणानें ती वाहून जाऊं देण्याचा धोका जेणेंकरून उत्पन्न होईल अशी गोष्ट उकरून काढण्यास ते नाखुष असावे. आजहि हिंदी राजकरणांत अशीच स्थिति आहे. अस्पृश्यतानिवरण, ज्ञातिनिष्ठाउच्चाटण, अन्यधर्मीयांशीं संघटन, स्त्रीपुरुषसंबंधानुशासन, मालक व मजूर यांच्या संबंधांचें

नियमन, राष्ट्रीय संपत्तीचें यथाभाग योग्य विसर्जन, वगैरे वगैरे घरगुती सामाजिक प्रश्न आधीं सोडवावयाचे कीं हे प्रश्न योग्य रीतीनें सुटण्यास अनुरूप असें वातावरण निर्माण होण्यासाठीं आधीं परक्यांचें बाधक व अनिष्ट दडपण नाहींसें करावयाचें हा मोठा गूढ प्रश्न होऊन बसला आहे. कित्येकांचें मत हे प्रश्न आज पुढें न आले तर उत्तम असें आहे. त्यांच्या अस्तित्वाच्या सबबीमुळें राजकीय प्रश्न सुटणें बिकट झालें आहे हेंहि स्पष्ट आहे. आज असले सामाजिक प्रश्न न्यायदृष्ट्या किंवा शास्त्रशुद्ध समाजहितदृष्ट्या सोडविले जाणें अशक्य झालें असून केवळ परिस्थितीच्या अनुरोधानें ते सोडविले जात आहेत हेंही उघड दिसतें.

आगरकर व टिळक यांच्यांतील आतां इतिहासविषय झालेल्या चुरशीच्या सामन्याचें तत्त्वज्ञान हें असें आहे. वादविवादांत प्रत्येक कर्तृत्ववान् माणूस आपली बाजू शक्य तितकी सजवण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यांतील आवेश व वेळीं प्रसंगीं झालेली अतिशयोक्ति बाजूला ठेवून तत्त्वनिर्णय काय होतो हें सध्यांच्या पिढीनें लक्षांत घ्यावयाचें आहे. प्रस्तुत पुस्तकांत तोच प्रयत्न झाला असल्याचें दिसून येईल.

चिपळूणकर, आगरकर व टिळक या त्रिमूर्तींपैकीं दोघांचीं चरित्रें उपलब्ध असून आगरकरांचें मात्र नाहीं अशी आजवर स्थिति होती. ही गोष्ट आगरकरांच्या भक्तांना केव्हांही अभिमानास्पद नव्हती. जशी वरील दोघांची बाजू चरित्रदृष्ट्या पुढें आली आहे तशीच ती तिसऱ्याचीहि येणें इतिहासदृष्ट्या इष्ट असल्यानें आगरकरांचें चरित्र प्रसिद्ध करण्याची आमची फार इच्छा होती. कोणतेंहि कार्य त्याची आवड असणाऱ्याकडूनच उत्तम सिद्धीस जाण्याचा संभव असतो. या दृष्टीनें योग्य इसमांच्या तलासांत असतां ज्यांनीं मुंबईत आगरकर दिन आपल्या कित्येक मित्रांच्या साहाय्यानें सुरू केला अशा प्रो. अळतेकरांनीं त्यांचें चरित्र बरेंचसें लिहिलें आहे असें समजलें. तेव्हां त्यांच्याकडे तें काम पुरें करून आम्हांस देण्याचा आम्हीं लकडा लाविला. प्रो. अळतेकर यांनीं हें काम आपल्या अंगावर घेऊन अनेक कार्यांचा व्याप संभाळूनहि पुरें केलें, याबद्दल आम्ही प्रोफेसरमजकुरांचे आभारी आहों.

पहिल्यानें आगरकरांचें केवळ चरित्र प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार होता. पण अनेकांचें मत शुद्धव्यक्तिविषयक चरित्रापेक्षां त्यांच्या कार्यावर प्रकाश पाडणारें निबंधरूप चरित्र असणें बरें असें पडलें. प्रो. अळतेकर यांनीं लिहिलेल्या ग्रंथाचें स्वरूप तसें असल्यामुळें तो त्या स्वरूपांत प्रसिद्ध करणें शक्य झालें.

आगरकर किंवा टिळक यांतील चुरशीच्या सामन्याचा कडूपणा वाटून घेण्याचें आतां कोणासच कारण नाहीं. दोघांचीहि कीर्ति त्यांच्या कार्यानें अढळ केली आहे. एका परमेश्वराखेरीज इतर सर्व अपूर्ण हें लक्षांत ठेवून मोठ्या माणसांच्या चरित्राकडे पहाणें जरूर आहे. प्रस्तुत पुस्तकांतील उच्चनीचत्वाच्या मीमांसेकडे या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. मोठ्या विभूतींचीं अंगीकृत कार्यें पुढें चालविणें हेंच आपलें काम आहे. तें आपलें कर्तव्य करण्याची बुद्धि पुढील चरित्र वाचून वाचकांस होईल अशी आम्ही आशा करतों व तूर्त त्यांची रजा घेतों.

---

# अनुक्रमणिका

—:०:—


| भाग | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | विषयप्रवेश | १ |
| २ | बालपण व विद्यार्थिदशा | २१ |
| ३ | लोकसेवेचा आरंभ | ५१ |
| ४ | कोल्हापूर प्रकरण | ७८ |
| ५ | शाळेंतून कॉलेज | १०४ |
| ६ | सुधारकाचा जन्म | १२१ |
| ७ | कॉलेजमध्यें फूट | १६४ |
| | सातव्या भागाचें परिशिष्ट— | |
| | रा. रा. टिळकांचा राजीनामा ( मूळ इंग्रजीचें मराठी भाषांतर ) | २०८ |
| ८ | सुधारणेच्या लढाया | २५१ |
| ९ | मतें व विचार | |
| | ( अ ) प्रास्ताविक चर्चा | ३०३ |
| | ( आ ) राजकीय विचार | ३४५ |
| | ( इ ) आर्थिक विचार | ३६४ |
| | ( ई ) शिक्षणविषयक विचार | ३८६ |
| | ( उ ) सामाजिक विषयांवरील विचार | ४०५ |
| | ( ऊ ) इतर विषयांवरील विचार | ४१० |
| १० | अखेरचे दिवस आणि मृत्यु | ४१२ |
| ११ | भाषासरणी आणि वाङ्मयसेवा | ४६४ |
| १२ | समारोप | ४८९ |

# मुक्तबंध

## प्रो. माधव दामोदर अळतेकर यांची सर्व लोकांना अतिशय आवडलेली कादंबरी

केसरी, ज्ञानप्रकाश, महाराष्ट्र वगैरे वृत्तपत्रांनीं आणि प्रो. वामन मल्हार जोशी, रा. रा. ना. गो. चापेकर वगैरे ग्रंथकारांनीं वाखाणलेली आणि मुंबई सरकारी विद्याखात्यानें दुय्यम शाळा, ट्रेनिंग कॉलेजें, आणि वाचनालयें यांसाठीं मंजूर केलेली.

समाजस्थितीचें आविष्करण, ओजस्वी ध्येयांचीं हृदयंगम वर्णनें, तात्त्विक आणि विनोदपूर्ण संवाद व नायकनायिकांचीं कुशलतेनें रेखाटलेलीं चित्रें आणि सरळ, सुंदर मराठी भाषा यांमुळें ही कादंबरी फार वाचनीय व मननीय झाली आहे.

### किंमत रुपये दोन

ग्रंथकर्त्याकडे, टिळकमंदिर रस्ता, व्हिलेपार्ले ( मुंबई उपनगर जिल्हा ) येथें मिळेल.

ता. ३० एप्रील १९३० पर्यंत मागणी करणारांना १२॥ टक्के कमिशन मिळेल. टपालखर्च निराळा.



प्रिन्सिपल गोपाळ गणेश आगरकर

जन्म १८५६ ] [ मृत्यु १८९५

# गोपाळ गणेश आगरकर

## चरित्रात्मक निबंध

### भाग पहिला.

#### विषयप्रवेश

काय वानूं आतां न पुरे ही वाणी, । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥
थोरीव सांडिली आपुली परीसें । नेणें शिवों कैसें लोखंडासी ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टवीती उपकारें ॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥
तुका म्हणे सुख पराचिया सुखें । अमृत हें मुखें स्त्रवतसे ॥

तुकाराम.

गेल्या पाऊणशें वर्षांत महाराष्ट्रांत जे थोर पुरुष होऊन गेले त्यांत न्यू इंग्लिश स्कूलचे एक संस्थापक, केसरीचे पहिले संपादक, फर्ग्युसन कॉलेजचे दुसरे मुख्याध्यापक आणि सुधारकाचे जनक गोपाळ गणेश आगरकर यांचें स्थान अतिशय उन्नत आहे. या काळांत राष्ट्रीय संसाराच्या निरनिराळ्या भागांत ज्यांनीं प्रमुखता संपादिली अशीं पुष्कळ माणसें झालीं. त्यांतील बहुतेकांच्या मानानें आगरकर अल्पायुषी होते. १८५६ सालीं, म्हणजे कंपनीसरकारविरुद्ध झालेल्या बंडाचा सर्व देशांत वणवा पेटला त्याच्या आदले वर्षीं, सातारा जिल्ह्यांतील एका लहानशा खेडेगांवांत त्यांचा जन्म झाला. १८९५ सालच्या जून महिन्याच्या १७ व्या तारखेला, म्हणजे सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत

भरूं द्यावयाची नाहीं हा पुण्यांतील पुराणमतवादी मंडळीचा संकल्प फलद्रूप झाला त्याच्यापूर्वी सहा महिने, पुणें मुक्कामीं फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांत आगरकरांचा भौतिक देह पंचमहाभूतांत विलीन झाला. ज्या कर्तृत्वशाली पिढीचे ते अलौकिक प्रतिनिधि होते त्या पिढीचीं बहुतेक सर्व माणसें आतां कालवश झालेलीं आहेत. केसरी पत्राच्या जन्मानंतर थोड्या दिवसांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकर आकस्मिक रीतीनें वारले. आपल्या विद्वत्तेनें आणि शिस्तीनें सर्वांना आदरणीय झालेले फर्ग्युसन कॉलेजचे पहिले प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे आणि आपल्या इंग्रजी भाषाप्रभुत्वाबद्दल ज्यांनीं अपूर्व कीर्ति मिळविली ते त्राटिका नाटकाचे कर्ते वासुदेव बाळकृष्ण केळकर यांचे मृत्युलेख तर आगरकरांना आपल्या हयातींत लिहावे लागले. अखिल भरतखंडाच्या राजकारणांत उघड पुढारीपण न घेतांही आदिस्थानाचा मान ज्यांना अखंड लाभला ते महादेव गोविंद रानडे विसाव्या शतकाच्या जन्मानंतर मृत्यूनें हस्तगत केले. आपल्या निःस्वार्थी देशसेवेनें सर्व दुनियेंत महाराष्ट्राचें किंबहुना हिंदुस्थानाचें नांव गाजविणारे गोपाळ कृष्ण गोखले १९१५ सालीं कीर्तिरूपानें अमर झाले. आणि शेवटीं ज्यांचा जन्म आगरकरांच्या जन्मसंवत्सरीं झाला; ज्यांची आणि आगरकरांची विद्यार्थिदशेंत गांठ पडून तिचें रूपांतर पुढें परम स्नेहांत झालें; ज्यांनीं आगरकरांप्रमाणें सरकारी नोकरीची पर्वा न धरतां देशसेवेचें असिधाराव्रत जन्मभर पाळण्याचा निश्चय केला; ज्यांच्या आणि आगरकरांच्या सहकारितेमुळें महाराष्ट्रांत नवीन चैतन्य फोफावलें, आणि पुढें समाजसुधारणेसंबंधीं वैमत्य होऊन ज्यांची आणि आगरकरांची कार्यदिशा पृथक् झाली, ज्यांनीं निधड्या छातीनें सरकारच्या बलिष्ठपणाबरोबर झुंज खेळून आपलें नांव हिंदुस्थान देशभर आबालवृद्धांच्या तोंडीं खेळविलें ते बाळ गंगाधर टिळक, त्या अद्वितीय कालाचे शेवटचे प्रतिनिधि, ता. १ आगष्ट १९२० रोजीं मृत्यु पावले. अशा प्रकारें या काळांतील कोणत्याही व्यक्तीच्या चरित्राचा विचार अधिक व्यापक बुद्धीनें, विशेष निःपक्षपातपणानें, आणि वैयक्तिक हृदयभेद होईल कीं काय अशा प्रकारची भीति न बाळगतां, करण्याची वेळ आली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या व्यक्तींचा संबंध अत्यंत निकट होता त्यांपैकीं एकीचें चरित्र दुसऱ्यांच्या हयातींत लिहणें हें काम कांहींसें अवघड आणि पुष्कळसें नाजूक असतें. पण वर नांवें दिलेल्या व्यक्तींपैकीं ज्यांचा सार्वजनिक संसाराशीं विशेष संबंध आला त्यांच्या कार्यांचा विचार करण्याचें काम आणखी लांबणी-

वर टाकणें म्हणजे इतिहासाची अवहेलना करण्यासारखें होतें. शिवाय रानडे आणि गोखले, टिळक आणि आगरकर हीं माणसें महाराष्ट्रीयांच्या प्रवरांत समाविष्ट झालेलीं आहेत. त्यांच्या कीर्तिमंदिराचा पाया इतका भक्कम आहे कीं पक्षाभिमानमूलक वृथा निंदेनें जसा तो हलणारा नाहीं त्याप्रमाणें ऐतिहासिक सत्यान्वेषणानें त्या मंदिराचें यथार्थ स्वरूप कळल्यामुळें त्याच्या सौंदर्याला बाधा येण्याचा संभव नाहीं. कोणत्याही बगीच्यांतील सुगंध एका पुष्पाचा नसतो आणि निरनिराळ्या पुष्पांच्या विशिष्ट परिमलाच्या संकीर्तनानें इतरांना कमी-पणा येतो असें सुज्ञांना वाटत नाहीं.

२ आगरकरांच्या सार्वजनिक आयुष्याचा उत्तरभाग हा मतभेदाच्या वावट-ळीनें इतका धूलिव्याप्त झाला होता कीं सामान्य माणसांच्या दृष्टीला त्यामुळें यथार्थ निरीक्षणाचें कार्य कठीण झालें यांत नवल नाहीं. संमतिवयाच्या प्रत्यक्ष बिलाचा वाद उपस्थित होण्यापूर्वीं सुधारकाचा जन्म झाला होता आणि सुधा-रकाच्या जन्मानंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील फूट प्रसिद्धपणें अशी जरी कांहीं काळानें उपस्थित झाली तरी महाराष्ट्र नियतकालिकांच्या सृष्टींत सुधार-काचें आगमन म्हणजे टिळक–आगरकर या दोन राष्ट्रकार्यधुरीणांच्या मार्ग-भिन्नत्वाचें जाहीर पर्यवसान यांत शंका नाहीं. पण संमतिवयोवाद उपस्थित होण्यापूर्वीं टिळक हे पुराणमताभिमानी लोकांचे सर्वथा पक्षपाती होणार असें सामान्य जनतेंतही कोणाला वाटलें नव्हतें. त्या वेळपर्यंत टिळकांची गणना बहुतेक सुधारकांत होती. पण पुढें मतभिन्नतेचें स्वरूप निकरावर गेलें व संमति-वादाच्या धडाक्यांत पुण्यपत्तनांत ज्या दुहीचा प्रादुर्भाव झाला ती अद्यापही केवळ स्मृतिमात्र झाली असें म्हणतां येत नाहीं. तथापि प्रस्तुत लेखकासारख्या नवीन पिढीच्या माणसांनीं तेव्हांच्या विवादांतील लौकिक क्रूर स्वरूपापेक्षां तात्विक स्वरूपाकडे नजर देऊन गेल्या पन्नास वर्षांच्या एकंदर अनुभवामुळें तत्वाच्या आणि मार्गांच्या ग्राह्याग्राह्यतेविषयीं, इष्टानिष्टतेविषयीं आणि सत्या-सत्यतेविषयीं निर्णय करण्याकडे लक्ष्य देणें आवश्यक आहे. तत्कालीन सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे आगरकरांच्या कार्यांत एक प्रकारची विशिष्टता होती हें पटल्याशिवाय रहात नाहीं. आगरकर हे सामाजिक सुधारक म्हणून प्रसिद्ध आहेत व त्याचें कारण उघड आहे. पण आगरकरांनीं देशस्थितीचा सर्व दृष्टींनीं विचार केला होता. हिंदुस्थानाच्या अथपासून आजपर्यंतच्या इतिहासाचें उत्कृष्ट

पर्यालोचन करून, आज जवळ जवळ दोन हजार वर्षें परकीयांना या देशावर स्वाऱ्या करितां याव्यात व येथें निरनिराळीं राज्यें व साम्राज्यें स्थापन करतां यावींत या दुःस्थितीला कारणीभूत अशा हिंदु लोकांच्या मानसिक किंवा शारीरिक दोषांचें त्यांनीं सूक्ष्म निरीक्षण केलें होतें, व दुःस्थितीच्या प्रत्येक कारणाच्या थेट मुळांशीं जाऊन तीं कारणें अस्तित्वांत आल्यामुळें परकीय सत्ता या देशांत रुतली आणि त्या कारणांचा बीमोड करणें हा परकीय सत्तेच्या ठिकाणीं स्वकीय सत्ता आणण्याचा केवळ उत्तम नव्हे तर एकच उपाय आहे अशी त्यांची खातरजमा झाली, आणि म्हणून आपली स्वतःची परिस्थिति व मनोवृत्ति यांच्यांत बदल झाला पाहिजे व तो केवळ सामाजिक किंवा राजकीय किंवा आर्थिक अशा एकाच बाबींत नसून सर्व बाजूंनीं झाला पाहिजे असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला. म्हणूनच केवळ राजकीय परिस्थितीचें तुणतुणें बारान् बारा चोवीस तास वाजवून ज्या कारणांमुळें राजकीय परिस्थिति उत्पन्न झाली त्यांच्याकडे डोळेझांक करण्याची आचरट मुत्सद्देगिरी त्यांनीं कधीं केली नाहीं. राजकीय, सामाजिक, आर्थिक वगैरे सर्व बाबतींत त्यांचें धोरण स्वच्छ रेखलेलें होतें. राजकारण, समाजसुधारणा, आर्थिक उन्नति, शैक्षणिक प्रगति, देशांतील निरनिराळ्या जातींतील व धर्मांतील राष्ट्रीय कार्यासाठीं करावयाचें ऐक्य इत्यादि सर्व विषयांवर दूरवर विचार करून त्यांनीं आपल्या सुंदर आणि समर्पक भाषासरणीनें हे सर्व विषय जनतेपुढें मांडलेले होते; आणि ज्या कित्येक प्रश्नांची चर्चा राजकीय परिस्थिति बदलावयाची असेल तर आतां केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें केवळ " राजकीय " चळवळीच्या म्हणजे परकी सत्तेला खुसखुशीत शिव्या देण्याच्या अफीणीचें पाणी लोकांना पाजून देशोद्धार होईल अशी जबरदस्त भूल पडलेल्यांनासुद्धां वाटूं लागलें आहे, त्या सर्व प्रश्नांचें सांगोपांग व राष्ट्रहितकर विवेचन आगरकरांनीं केलेलें आहे. तसेंच अनेक प्रसंगीं त्यांच्या तीव्र लेखणीचे खडतर प्रहार राज्यकर्त्यांकडून घडलेल्या अन्यायावर व त्यांच्या प्रतिगामी धोरणावर झालेले आहेत. या सर्व गोष्टी त्यांच्या आजकालच्या अनुयायांना माहीत आहेत. अर्थात् आगरकरांचें जे नांव घेतात ते केवळ टिळकविरोधानें घेतात अशा तऱ्हेची समजूत केवळ गैरसमजूत होय. राष्ट्राच्या प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर मारण्याचा शिपाईबाणा ज्यांनीं पत्करला त्यांत आगरकर आणि टिळक हे दोघेही पुढारीपण पावले होते. त्यांच्या युद्धनीतीवर अभिप्राय देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांच्या शिपाईगिरीच्या बाण्यावर, कर्तव्यनिष्ठतेवर

किंवा राष्ट्रोद्धार करण्याच्या महत्कार्यांत स्वदेह धारातीर्थी ठेवण्याच्या तत्परते-वर शिंतोडा उडविणें असें जे समजतात त्यांना मोठ्या माणसांच्या मोठेपणाचा खरा निकष माहीत नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे. रावसाहेब रानड्यांचें वैशिष्ट्य त्यांच्या मुत्सद्देगिरींत आणि निरनिराळ्या लोकांना हाताशीं धरून त्यांच्या-करवीं राष्ट्रकार्याचें क्षेत्र विस्तृत करण्यांत होतें. राजकर्त्यांच्या अंतरंगांत शिरून लोकहिताच्या उपायांना आणि राजकीय स्वातंत्र्याच्या मार्गांच्या पायऱ्यांना व्यावहारिक स्वरूप देण्याची शिकस्त करणें यांत गोपाळराव गोखल्यांचें वैशिष्ट्य होतें. सत्ताबलानें धुंद झालेल्या राजकर्त्यांच्या अजस्र सामर्थ्याविरुद्ध निधडे-पणानें टक्कर देऊन परकीय सत्तेचा वचक कमी करावयाचा आणि जाणून बुजून तुफानांत पाऊल टाकून आपल्या उदाहरणानें लोकांत कणखरपणा उत्पन्न करावयाचा यांत बळवंतराव टिळकांचें वैशिष्ट्य होतें. आगरकरांचें वैशिष्ट्य राष्ट्रस्थितीच्या मूळकारणाचें यथायोग्य निदान करून रोगबीजावर शस्त्रवैद्या-प्रमाणें हल्ला करण्यांत होतें. रोगबीज जर तसेंच राहूं दिलें तर रोग्याच्या शुश्रूषेसाठीं पुष्कळशीं माणसें जमविणें, अथवा रोग्याला ज्या ज्या गोष्टी हक्कानें मिळाल्या पाहिजेत त्या मिळवून देण्याची खटपट करणें, किंवा रोग्याच्या आजारी-पणांत त्याच्या संपत्तीचा ज्यांनीं अपहार केला असेल अगर ज्या एखाद्या वैद्यानें त्यावर दुरुपचार केला असेल त्यांचा समाचार घेणें या सर्व आवश्यक केल्या पाहिजेत अशा गोष्टी निरुपयोगी ठरतात. आणि त्यांत तो रोग जर पुष्कळ दिवसांचा असेल तर त्याच्या बीजाचा नाश करण्याचा खडतर उद्योग करणें हें त्याच्या आप्तेष्टांचें, विशेषतः वैद्याचें आद्यकर्तव्य होतें. याचा अर्थ वरील तीन चार गोष्टी करणाऱ्यांचें प्रेम त्या रोग्यावर कमी आहे किंवा त्याला रोगमुक्त करण्याची त्यांची इच्छा फारशी तीव्र नाहीं असा मुळींच होत नाहीं. रोगबीजाला हात लावणारा वैद्य पुष्कळ वेळां रोग्यालाहि आवडत नाहीं, पण दुर्दैवानें औषधाची योजना रोग्याच्या आवडीनिवडीची सोय पाहून करतां येत नाहीं आणि पुष्कळ वेळां अप्रिय पण पथ्यकर असे उपाय अमलांत आणावे लागतात. आणि तसें करण्याचें धैर्य हें मानवी धैर्याचें अत्यंत खडतर आणि अत्यंत अवघड स्वरूप होय. हें धैर्य लोकमान्यतेच्या जोरावर राजसत्तेला शाब्दिक टीकेनें दुखविणें किंवा राजकृपेच्या जोरावर लोकांची पर्वा न धरणें या दोहोंहून अत्यंत भिन्न व उच्च स्वरूपाचें होय. कारण प्रथम निर्दिष्ट केलेल्या दोन प्रकारांत स्वार्थाचा भाग पुष्कळ असतो पण या धैर्याचें स्वरूप अत्यंत

निःस्वार्थ म्हणूनच अत्यंत उज्ज्वल असतें. अशा अत्युच्च धैर्याचें वास्तव्य आगरकरांच्या ठिकाणीं होतें म्हणूनच त्यांच्या चरित्राला आणि शिकवणीला विशेष महत्व आलेलें आहे.

३ या धैर्यासंबधीं विशेष विचार केला म्हणजे असें दिसून येतें कीं तें सत्य-प्रतिपादन आणि सत्याचरण यांच्या पायांवर उभारलेलें असतें. असलें धैर्य आचरणांत आणणें म्हणजे ऐहिक संपत्तीवर सर्व प्रकारें पाणी सोडणें होय. पांडवांसंबंधीं केलेला अन्याय दुर्योधनाला स्पष्टपणें सांगणारा विदुर एखादे वेळीं आपल्यावर प्राणसंकट येईल हें ओळखून नव्हता असें नाहीं. पण त्या संकटाला भिऊन योग्य तें बोलण्याला मात्र तो कचरला नाहीं आणि म्हणून कोणत्याही सबबीवर असत्पक्षाच्या बाजूनें लढणाऱ्या भीष्म-द्रोणादिकांपेक्षां तो अधिक कौतुकार्ह ठरतो. दुष्यंतराजाच्या दरबारांत त्याला शठ असें सडेतोडपणानें म्हणून, तुझे वागण्यामुळें तुला नरकप्राप्ति होईल असें बेधडक सांगणारा कण्वशिष्य हाही अशा प्रकारच्या धैर्याचें उदाहरण होय. अशा तऱ्हेचें धैर्य आगरकरांनीं सामाजिक बाबतींत म्हणजे केवळ स्वजनांचे दोष दाखविण्यांत प्रकट केलें, राजकीय अन्याय दाखविण्यांत केलें नाहीं असें त्यांचीं मतें सर्वस्वी अप्रिय असणाऱ्याची सुद्धां म्हणण्याची छाती होणार नाहीं. ज्यानें सामाजिक अन्यायाचें आविष्करण करतांना स्वजनाची मुर्वत ठेविली नाहीं, त्याला हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधीं लिहितांना, “ राज्यकर्त्यांनों, लक्ष्यांत ठेवा, लोभमूलानि पापानि ” अशी खडखडीत सूचना देतांना कसलीही क्षिति वाटली नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सामाजिक सुधारणेंत थंडे आणि राजकीय सुधारणेंत गरम, किंवा सामाजिक सुधारणेंत गरम आणि राजकीय सुधारणेंत थंडे हे पंथ कोणाचे असतील त्यांचे असोत, त्यांचा संबंध आगरकरांच्याकडे लावतां येणें शक्य नाहीं. देशाची सुधारणा योग्य प्रकारें झाली पाहिजे व ती कोणत्याही स्वरूपाची असली तरी तिच्या संबंधीं भावना सारखी तीव्र असली पाहिजे अशा स्थितीचें निदर्शन आगरकरांच्या चरित्रांत आढळतें. अंतःस्थितीची सुधारणा झाल्याशिवाय परकीयांच्या सत्तेविरुद्ध केवळ बाष्कळ ओरडा करण्यापासून फायदा नाहीं असें जें त्यांचें मत होतें त्याचें कारण उघड आहे. परकीय सत्ता, हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याचा हजारों वर्षें चाललेला खेळखंडोबा, ही गोष्ट या देशांतील अंतःस्थितीचा परिणाम आहे हें त्यांनीं इतिहासाच्या सूक्ष्म अध्ययनानें ठरविलें. ज्याला क्षय झाला आहे त्याच्या केवळ तापावर किंवा खोकल्यावर दवाई करून चालत

नसतें; त्याला थोडेंसें बरें वाटण्यासाठीं बाह्योपचारांचा उपयोग होतो व त्याप्रमाणें ते करण्यास हरकत नाहीं; पण केवळ बाह्योपचारानें त्याची रोगमुक्तता होत नाहीं, हें तत्व त्यांना पटलें होतें. हिंदुस्थानची अखिल दु:स्थिति इंग्रजांच्या आगमनापासून उत्पन्न झाली असें समजणें म्हणजे दीडशें दोनशें वर्षांपूर्वीं हिंदुस्थानची स्थिति अत्युत्तम होती असें समजलें पाहिजे. दुर्दैवानें, इतिहासाचा कोणत्याही बाजूनें विचार केला तरी तसें समजण्याला थोडा सुद्धां आधार मिळत नाहीं. शिकंदर बादशहाच्या स्वारीपासून तों इंग्रजांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत सर्व इतिहासाचें जें रूप आहे तें या समजुतीच्या अगदीं उलट आहे. त्यावरून असें सिद्ध होतें कीं, परकीय अमलाखालीं राहण्याचा रोग या देशाला शतकानुशतकें लागला आहे.' आणि ज्या अर्थी तो इतका दीर्घकाल राहिला आहे त्या अर्थी त्याचीं कारणें बाह्य नसून आंतर आहेत. हें विधान कितीही कटु असलें तरी, भौतिक सुधारणेपेक्षां

१. Taking a broad comprehensive view, it is not possible to make any unqualified statement on the achievements of the Hindu state. It must be admitted that the despotism could occasionally lead to oppression, sometimes severe, even diabolical........The personal expenditure of princes, the heavy bill of the palace, the pomp and pageantry of the court, the frequent wars, are likely to have told grievously on the taxpayer, on the poor peasant, artisan or labourer. The Hindu state sanctioned too many tolls and petty dues and too much forced labour. It failed signally to reclaim the tribes on frontiers or in the centre of India. It fell a victim to caste and deliberately refused to bring the lower classes into line with the rest of Hindu society, or to encourage their higher life. It allied itself with priest-craft and conservatism and helped to perpetuate the distinctions beween man and man. *Lastly, the Hindu State, parochial, shortsighted and isolated from the rest of the world, failed to keep abreast of the times and to organise the resources of the country against successive foreign invasions. At last in the thirteenth century it shipwrecked in the storms it was incapable of weathering.* Dr. Beni Prasad—The State in Ancient India. Pp. 512—13.

पारमार्थिक कल्याण श्रेष्ठ आहे अशा अर्थाचीं भाष्यें मोठ्या हुपारीनें लिहूनसुद्धां त्याच्या सत्यतेला आमच्या दुर्दैवानें बाध येत नाहीं. देशाची स्थिति पाहून आगरकरांचें अंतःकरण किती तिळतिळ तुटत होतें याला त्यांचें चरित्र साक्ष आहे. राजकृपेची पर्वा ज्यानें स्वप्नांतही केली नाहीं त्यानें स्वजनद्वेषाची संपादणी केवळ मौजेखातर केली असें आगरकरांच्या बाबतींत म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें राजकीय उन्नतावस्था एका क्षणांत प्राप्त व्हावी या आकांक्षेला उतावळेपणा असें नांव दिलेलें ज्यांना खपत नाहीं त्यांनीं सामाजिक अन्यायाचें निर्मूलन व्हावें म्हणून ज्यानें धडाडीचे प्रयत्न केले त्याला दोष द्यावा हें रास्त नाहीं. राजा आणि प्रजा यांची मान्यता संपादणारा महात्मा कधीं कधीं मिळेल; राजकृपेच्या जोरावर लोकांना कःपदार्थ मानणाऱ्यांचा दुष्काळ नाहीं. लोकप्रेमाच्या जोरावर राजविरोध करणें शक्य आहे, पण राजकृपा व लोकप्रेम यांचा त्याग देशकल्याणास्तव करणें ही गोष्ट मात्र अत्यंत कठीण आहे याबद्दल दोन मतें असूं शकणार नाहींत.

४. आगरकरांची आयुर्मर्यादा अवघी एकूणचाळीस वर्षांची होती. येवढ्या अल्प काळांत त्यांनीं शिक्षणद्वारा आणि लेखनद्वारा स्वजनांची जी अपूर्व सेवा केली, तीमुळें त्यांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरस्थाई झालेलें आहे. ज्या वेळीं शिक्षणप्रसाराचा नुकता कोठें आरंभ झाला होता त्या वेळीं, त्या कार्याचा विस्तार त्वरित व्हावा, या स्तुत्य बुद्धीनें कांहीं विद्याविभूषित तरुणांनीं आजन्म दारिद्र्याचें लेणें अंगिकारून ज्ञानयज्ञ करण्यांत आपलें आयुष्य वेचण्याचें निश्चित केलें आणि अशाप्रकारें मातृभूमीचा उद्धार करण्याचा मार्ग तत्कालिन लोकांना व पुढील पिढ्यांना आंखून दिला. लोकशिक्षण हें निरनिराळ्या उपायांनीं दिलें पाहिजे, या बाबतींत सदर तरुण मंडळीचें पूर्ण मतैक्य होतें याबद्दल शंका नाहीं, व त्याचीं चिपळूणकरांनीं वर्णिलेली रसना व लेखणी हीं जीं दोन उत्कृष्ट साधनें त्यांचा पूर्ण उपयोग करण्यासाठीं त्यांनीं कंबर बांधली होती. ज्या देशांत रामचंद्राच्या पदस्पर्शानें शिळेला मानवदेह प्राप्त झाला, त्या देशांत माणसासारखीं माणसें अज्ञानपंकांत रुतल्यामुळें फत्तरापेक्षां फत्तर बनलीं असतां त्यांना सज्ञान करण्याची स्फूर्ति ज्यांना या प्रकारें झाली, त्यांचें कौतुक करावें तितकें थोडें आहे. शिवाय ज्ञानप्रसार आणि लोकजागृति या कार्याचें महत्व आजपेक्षां तेव्हां फार होतें हें सांगावयास नको. आगरकरांच्या जन्मापासून तों त्यांच्या शिक्षणाची परिसमाप्ति होईपर्यंत जो जवळ जवळ पंचवीस

वर्षांचा काळ लोटला, तो व त्याच्याही पूर्वींचा काळ यांतील परिस्थिति कोणत्या प्रकारची होती, हें त्यांच्या कार्याचें रहस्य जाणण्यासाठीं लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. कारण त्या परिस्थितीच्या अवलोकनानें आणि अनुभवानें तत्कालिन कार्यकर्त्या पुरुषांची कर्तृत्वरेखा कांहीं अंशीं निश्चित व्हावी हें अपरिहार्य होतें. १८१८ सालीं पेशवाईचा लय झाल्यानंतर महाराष्ट्रांतील लोकांचीं मनें कित्येक वर्षें विस्मयानें आणि उद्वेगानें भांबावून गेलीं व ज्यांनीं आपली सत्ता हिरावून घेतली त्यांबद्दल तीं साशंक झालीं असावींत हें स्वाभाविक आहे. पण पुढें पेशवाईच्या शेवटच्या भागांतील अंदाधुंदीच्या मानानें इंग्रजी राज्याच्या व्यवस्थितपणाचें व टापटिपीचें सुख त्यांपैकीं ज्यांच्या अनुभवास आलें, त्यांच्या विचारांत प्रथम सावकाश पण पुढें झपाट्यानें क्रांति होऊं लागली. शांततेमुळें एक प्रकारचें सुख मिळतें ही गोष्ट जशी खरी, त्याप्रमाणें राज्यपद्धतीच्या टापटिपीनेंहि तिच्या नौकरचाकरांना समाधान होतें, ही गोष्ट उघड आहे. पगार वेळच्या वेळीं मिळण्याची लहानशी गोष्ट “ स्वराज्य ” नांवाखालीं मोडणाऱ्या कांहीं रियासतींत इतकी दुर्मिळ झाली होती आणि अंमलदारी भोगावयास निघतांना घोड्याच्या शेपटीकडे तोंड करून बसण्याची आवश्यकता इतकी वरचेवर भासत असे कीं पहिल्या तारखेला पगार मिळण्याचा विलायती थाट अमलांत येतांच आणि सरकारी नोकर म्हणजे त्याच्यामागें गव्हर्नरपासून तों पोलीस शिपायापर्यंत संपूर्ण राजसत्ता उभी आहे हें नोकरशाहीचें अस्सल धोरण लक्षांत येतांच लोक प्रथम आश्चर्यानें आणि नंतर आनंदानें थक्क झाले. स्त्रियांवरचा जुलूम हा लोकांना पटकीच्या रोगाइतका कायमचा परिचयाचा झाला होता. मुसलमानी अमदानींतील या बाबतींतील प्रकार किंवा पुढें स्वराज्यांत अनुभवास आलेली घाशीरामशाही यांच्या मानानें स्त्रियांना इंग्रजी राज्यांत जी एकंदरींत सुरक्षितता प्राप्त झाली, त्या राज्याचें लोकांना हळू हळू कौतुक वाटूं लागलें. त्याबरोबर इंग्रजांची विद्या, सुधारणा, ऐहिक सुखसामग्री वगैरे गोष्टींचा त्यांच्यासंबंधीं अनुकूल ग्रह उत्पन्न करण्यांत परिणाम होण्यास सुरवात झाली. तरी नवीन राज्याच्या स्थापनेमुळें ज्यांचें सर्वस्व गमावलें होतें, जे रावाचे रंक झाले होते, त्यांच्या अंतःकरणांना झालेल्या जखमा सहजासहजीं आणि लौकर भरून येण्यासारख्या नव्हत्या. त्यांच्या धुमसत असलेल्या क्रोधाचें पर्यवसान इ. स. १८५७ च्या बंडांत झालें. त्या बंडानंतर इंग्रजी राजसत्तेचीं मुळें या देशांत अधिक दृढ झालीं. सदर

बंडाचा प्रादुर्भाव होण्याच्या आदल्या वर्षी, म्हणजे जेव्हां कित्येक व्यक्तींच्या अंतःकरणांत मानसिक बंडाचा अतिरेक झाला असेल त्या वर्षी, आगरकर आणि टिळक हे जन्माला आले. दोघांची ही जन्मवेळा बंडखोरीच्या वर्षाच्या अमलांतील होती हा योगायोग विलक्षण होय. त्याचा आणि या दोन्ही पुरुषांच्या चरित्राचा कांहीं संबंध होता किंवा काय, याचा निर्णय वाटल्यास ज्योतिषी मंडळींनीं करण्यासारखा आहे.

५. महाराष्ट्रांत इंग्रजी राज्याची सुरवात झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं आपली शोचनीय स्थिति आणि राज्यकर्त्यांचें विलक्षण कर्तृत्व यांतील तफावत ही कांहीं लोकांच्या मनांत इतकी बिंबली कीं आपलें जें जें आहे तें दुष्ट किंवा निरुपयोगी, अतएव त्याज्य, आणि परकीयांचें सर्व कांहीं उत्तम म्हणून अनुकरणीय ही भावना प्रसृत करण्यांत ते आपल्या वाणीचा व लेखणीचा उपयोग करूं लागले. दरिद्री कुटुंबांत कांहीं वर्षें हाल काढल्यावर एखाद्या माणसाला श्रीमंतीचें दर्शन व्हावें, आणि द्रव्याच्या विपुलतेमुळें बारीक सारीक गोष्टींपासून तों मोठमोठाल्या गोष्टींपर्यंत सुख कसें मिळतें हें समजण्यास लागावें, म्हणजे त्याला प्रथम त्या आपल्या दारिद्र्याची लाज वाटून नंतर त्याबद्दल द्वेष उत्पन्न व्हावा व लक्ष्मीच्या कृपाप्रसादाचें प्रथम कौतुक वाटून नंतर त्याबद्दल अभिलाष व प्रेम हीं उत्पन्न व्हावींत, आणि त्याच भावनांचा अनुक्रमें विकास दारिद्र्यस्थान जें आपलें कुटुंब आणि वैपुल्यस्थान जें परकीय कुटुंब यांच्यासंबंधीं व्हावा, तसा प्रकार या मंडळींचा झाला. आमच्या देशाची लांबी अठराशें मैल आणि रुंदी अठराशें मैल; आमची लोकसंख्या पंचवीस तीस कोट; आमच्या देशाची नैसर्गिक संपत्ति कुबेराला लोभ उत्पन्न करणारी; आमच्या संस्कृतीची मुळें कालाच्या सहस्रावधि वर्षांपूर्वींच्या विभागांत दडून बसलेलीं—आणि अशा आमची सत्ता इंग्रजांनीं लीलेनें हिरावून घेतली—इंग्रजांनीं, ज्यांच्या खडकाळ देशांत सुपीकतेचें वास्तव्य नाहीं, ज्यांची लोकसंख्या चार पांच कोटींहून अधिक नाहीं, ज्यांची संस्कृति आमच्या मानानें कालची किंवा त्याहूनही अलीकडची म्हणण्यास हरकत नाहीं—अशा लोकांनीं हजारों कोसांवरून इकडे यावें आणि दुकानदारीचा विस्तार राज्यसंपादनांत करावा हें पाहून नशीबवादाच्या रोगजंतूंनीं अत्यंत ग्रासून गेलेल्या आमच्या देशांत विस्मय फैलावलें आणि निराशेचें धुकें सर्वत्र पडलें यांत नवल नाहीं. अज्ञान व भाविक लोकांनीं कपाळाला हात लावून रामावतारीं वानरांना सीतेनें दिलेल्या वरदानामुळें

आज इंग्रजांना राज्यवैभव प्राप्त झालें असावें असा तर्क बांधला तर नवीन विद्येचा संस्कार झालेल्या अपक्क पंडितांनीं आपण सर्वथा मूर्खतेचे कांदे व परकी लोक हे पूर्णतेचे गड्डे असा शोध लावला. या दोन्ही गोष्टी तत्कालीन भांबावलेल्या मनोवृत्तीच्या द्योतक होत्या, असें आतां शें पाऊणशें वर्षें लोटल्यावर लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं.

६. अशा भांबावलेल्या स्थितींत मनुष्याच्या मनाचीं प्रथम प्रायः दोन प्रकारचीं अवस्थांतरें होत असतात. पहिली अवस्था म्हणजे स्वाभिमानशून्यता आणि दुसरी अवस्था म्हणजे स्वाभिमानातिरेक. यालाच दुरभिमान असें दुसरें नांव आहे. या दोनीही अवस्था विकारवशतेपासून उत्पन्न होत असल्यामुळें त्यांपैकीं कोणत्याही एकीचें किंवा दोहोंच्या मिश्रणाचें पर्यवसान सामाजिक प्रगतींत किंवा कल्याणांत होत नाहीं. दोहोंच्या कठोर झगड्यांत पुष्कळ वेळां तत्वबोधाचा प्रादुर्भाव न होतां दुराग्रह अधिकाधिक बळावतो व असें झालें म्हणजे समाजाच्या अधोगतीला प्रत्यवाय न होतां उलट साहाय्य होतें. यासाठीं विचारी माणसें जेव्हां उन्नतीचा खरा मार्ग हुडकावयास लागतात, तेव्हां स्वाभिमानशून्यता आणि दुरभिमान या दोन्ही राहूकेतूंना एकीकडे सारून ते सदभिमानाची प्रवृत्ति उत्पन्न करण्याच्या सत्कार्याला लागतात. "मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा आणि त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों तरच आमचा निभाव लागणार आहे," या शिकवणीचा आरंभ सुधारकाच्या अगदीं पहिल्या अंकापासून झाला. यांतील बीज तरी हेंच होय. वर अवतरण केलेल्या वाक्यांतील विशेष्य-विशेषणसंबंध लक्षांत ठेवला म्हणजे अभिमानशून्यता व दुरभिमान यांना गाळून सदभिमानप्रवृत्ति हा सुवर्णमध्य संपादण्याची आगरकरांची इच्छा किती तीव्र होती हें समजून येतें. पण या प्रशस्त मार्गाला उपरोक्त दोन्ही पंथांच्या मंडळींनीं तृतीयपंथ असें नांव द्यावें हें अपरिहार्य आहे. एकानें म्हणावें कीं रोगी जगण्याची मुळीं आशाच नाहीं, त्याचें दुखणें बरें होणारें नाहीं, दुखण्याबरोबर टक्कर मारण्याची त्याच्या शरीरांत ताकद उरली नाहीं; तर दुसऱ्यानें म्हणावें कीं, रोग्याला मुळीं कसलाही रोग झालेला नाहीं, तो अद्याप मेला नाहीं यावरून तो कधींही मरणार नाहीं हें सहज सिद्ध होतें; अशा प्रसंगीं योग्य चिकित्सा कोणी ग्रहण करीत नाहीं आणि वैद्याच्या पदरीं वेडेपणा येतो. तसा

कांहींसा प्रकार समाजदोष निवारण्याच्या किंवा सुधारणेच्या बाबतींत होत असतो. ज्यांचा स्वाभिमान नष्ट झाला, ज्यांना आपल्या देशाच्या कथानकांत उज्वल असा एकही भाग दिसत नाहीं, आपल्या आंगीं यत्किंचित्‌ही योग्यता नाहीं व आपण कसल्याही कर्तृत्वाचरणाला असमर्थ आहों ही ज्यांची ठाम समजूत झाली, आणि ज्यांच्या कृपाकटाक्षाच्या बळावर महिन्याच्या पहिल्या तारखेला आपल्या उदरपूर्तीची विवंचना दूर होते, त्यांची बरोबरी करण्याचा विचारसुद्धां पापमय, अशी ज्यांची भावना झाली, त्यांना ज्याप्रमाणें आगरकरांचा मार्ग अग्राह्य वाटला; प्रत्यक्ष किंवा प्रच्छन्न धर्मांतराखेरीज तरणोपाय नाहीं अशी ज्यांची वृत्ति झाली, त्यांना जसा आगरकरांचा भूतदयेनें प्रेरित सडेतोड मार्ग दूषणीय वाटला; त्याचप्रमाणें शिमग्याचा सण हा आर्यांचा उत्तमोत्तम सण हें मानण्यापर्यंत ज्यांची मजल गेली, लोकाराधन करण्याच्या भरांत आपल्यास रामचंद्राची पदवी प्राप्त झाली असें कल्पून ज्यांना लोकवंचन करण्याची दिक्कत वाटेनाशी झाली, जेवढें कांहीं होतें तेवढें चांगलें म्हणून सामाजिक दोषांना झांकण्याकडे किंबहुना त्यांचें मंडण करण्याकडे ज्यांच्या बुद्धिसर्वस्वाचा विनियोग होऊं लागला, परकीयांना दूषण देण्याच्या धांदलींत ज्यांना स्वतःच्या आंगचे दुर्गुण बिलकुल दिसेनासे झाले, आणि पाश्चिमात्य राष्ट्रांचें भौतिक म्हणून समजलें जाणारें वैभव आणि कर्तृत्व हीं तिरस्करणीय आहेत, आपलें पारलौकिक म्हणून जें अदृष्ट आणि अदृश्य वैभव आहे तेंच खरें मोठें आहे म्हणून ज्यांनीं डांगोरा पिटण्यास सुरवात केली, त्यांना, भारत-वृक्षाला नवीन कल्पनांचें पाणी घालून त्यास नवजीवन उत्पन्न करण्याची आगरकरांची कल्पना स्वाभिमानशून्य आणि स्वदेशाभिमानशून्य वाटली, या दोन्हींहि गोष्टींसंबंधानें आश्चर्य वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. वास्तविक या दोन्ही पक्षांची दृष्टि केवळ एकमार्गी होती, आणि त्यांनीं दिलेले अभिप्राय हे विचाराचें फळ नसून विकारवशतेचें फळ होतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या प्रबळ लेखणीच्या जोरानें स्वाभिमानशून्यतेच्या पंथाला रसातळाला नेण्याच्या बाबतींत जी कामगिरी केली ती अत्यंत महत्वाची व उपयुक्त होती, याबद्दल द्विमत होण्याचा संभव नाहीं. त्याबरोबर दुरभिमान उत्पन्न करण्याच्या पंथाला त्यांनीं कदाचित् नकळत जी सुरवात केली त्यामुळेंच त्या कामगिरीचें महत्व कमी होतें ही गोष्टही निर्विवाद आहे. तथापि त्यांच्या नवीन प्रकारच्या लेखांनीं महाराष्ट्रीय सुशिक्षितांत विशेष प्रकारचें पाणी खेळूं लागलें यांत शंका नाहीं. शास्त्रीबोवांचे लेख सामान्य जनतेसाठीं लिहिलेले नव्हते

व ते कळण्याची ज्यांना योग्यता प्राप्त झाली होती त्यांच्यावर त्यांचा परिणाम होण्यासारखा होता. वास्तविक अशा मंडळींना त्यांतील दोष कळण्यास हरकत नव्हती; पण स्वाभिमानाचा अतिरेक ही इतकी मधुर भावना आहे कीं, तिचा एकदां प्रादुर्भाव झाल्यावर तिला आटोक्यांत ठेवणें ही गोष्ट फार कठीण आहे. त्यामुळें शास्त्रीबोवांच्या विचारसरणींतील दोषांना गुण कल्पून त्यांचा फैलाव करण्याचें दुष्कार्य कांहीं लोकांनीं स्वीकारलें यांत विशेष आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नसलें तरी खेद मानण्यासारखें पुष्कळ आहे. चिपळूणकरांच्या ठसठशीत आणि चुणचुणीत लेखांमुळें टिळक व आगरकरांसारख्या तरुणांना त्यांचें कौतुक वाटलें व आपल्या स्वदेशसेवेच्या कार्यक्रमाला त्यांच्यासारख्यांचें सक्रिय साहाय्य असावें असें त्यांच्या मनानें घेतलें हें युक्तच होतें. चिपळूणकरांची डौलदार भाषा, खोंचदार व्याजोक्ति आणि जोरदार विषयप्रतिपादन यांमुळें मराठी वाचकवर्ग आनंदानें डुलूं लागला; पण कोणत्याहि बाबतींतील तात्त्विक वादाची आणि विस्तृत विवेचनाची बहुजनसमाजाला समजेल अशा प्रकारची सुरवात केसरीच्या जन्मापासून झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. दुर्दैवानें या सुमाराला चिपळूणकरांचें अकालिक निधन झालें व पुढें त्यांच्या आयुष्याची दिशा कोणीकडे झुकली असती हें ठरविण्याचें बहुतेक निरर्थक कार्य कल्पनाशक्तीच्या अनिश्चित अनुमानावर सोंपवावें लागलें.

७. शास्त्रीबोवांचा जन्म १८५० सालचा म्हणजे त्यांनीं धूळपाटीवर श्रीगणेशा काढण्याची सुरवात आणि आगरकर व टिळक यांचा इहलोकांतील प्रवेश हीं एकाच काळीं झालीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८६५ साल अखेर म्हणजे आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी शास्त्रीबोवांची प्रवेशपरीक्षा पास होऊन पुढील सालीं त्यांनीं डेक्कन कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें. शास्त्रीबोवांची प्रवेशपरीक्षा याप्रमाणें लौकर पसार झाली; पण त्या मानानें त्यांची पदवीची परीक्षा उशीरां म्हणजे १८७२ सालीं पास झाली. त्याच वर्षीं टिळकांची प्रवेशपरीक्षा पसार होऊन पुढील वर्षीं ते डेक्कन कॉलेजांत दाखल झाले. आगरकरांची प्रवेशपरीक्षा पुढें तीन वर्षांनीं म्हणजे १८७५ सालीं पास झाली. टिळक १८७६ सालीं बी. ए. झाले व आगरकर १८७८ सालीं बी. ए. झाले. टिळक एफ्. ए. ची परीक्षा एक वेळ नापास झाले होते त्यामुळें बी. ए. ची परीक्षा उतरण्यास त्यांना एक वर्ष अधिक लागलें. या तारखांवरून टिळकांच्या मागून आगरकर बरेच दिवसांनीं कॉलेजांत गेले हें स्पष्ट

होतें. १८७४ सालापासून निबंधमालारूप धनुष्याचा टणत्कार सुरू होऊन शास्त्रीबोवांच्या लेखणीरूप भात्यांतून तीक्ष्ण आणि " सूं सूं सणणण सणणण " अशा बाणांचा वर्षाव होऊं लागला. त्या वेळीं टिळक कॉलेजांत होते आणि आगरकर प्रवेशपरीक्षेपर्यंत तरी आपलें दारिद्य आपल्याला धाव मारूं देतें कीं नाहीं या चिंतेंत गुरफटून, कोठें गेलों असतां आपल्या शिक्षणाला तोंड लागेल या विवंचनेंत होते. या सर्व पुढील तिथि थोड्याशा अगोदर देण्याचें कारण असें आहे कीं, विष्णुशास्त्री यांच्या लेखणीच्या जोरावर जें वातावरण महाराष्ट्रांत उत्पन्न झालें, त्याच्या पूर्वींच्या वातावरणांत आगरकरांचा आणि अर्थात् टिळकांचा बराचसा विद्यार्थिदशेंतील काळ गेला, हें लक्षांत यावें. त्याचप्रमाणें खुद्द कॉलेजांत जरी टिळक आणि आगरकर हे कांहीं दिवस एके वेळीं होते, तरी कॉलेजांत ते तीन चार वर्षें एकत्र नव्हते आणि म्हणून त्यांच्या कॉलेजांतील मैत्रीसंबंधीं आणि निरनिराळ्या विषयांवरील लांबलचक चर्चेविषयीं ज्या अतिशयोक्तिमूलक आणि अतिव्याप्तिपरिपूर्ण अशा कांहीं गोष्टी कित्येक आचरट व अर्धवट लोकांनीं प्रसिद्ध केल्या आहेत त्यांवर विश्वास किती ठेवावयाचा, याचाही या तारखांकडे नजर फेकल्यास अंदाज बांधतां येतो. आगरकरांच्या चरित्रांत चिपळूणकर आणि टिळक यांचा फार महत्वाचा संबंध आहे आणि त्यासंबंधाचें जितकें यथार्थ स्वरूप प्रकट होणें शक्य आहे तितकें प्रकट होणें इष्ट आहे, या गोष्टीबद्दल फारसा मतभेद असूं शकणार नाहीं. १८५७ सालच्या बंडानंतर अभिमानशून्यतेचें युग बोकाळलें. या युगाची सुरवात त्यापूर्वीं तीस चाळीस वर्षें म्हणजे जवळ जवळ पेशवाईच्या अखेरीपासून झालेली होती हें वर सांगण्यांत आलेलें आहे. शास्त्रीबोवांनीं लेखणी उचलली आणि यद्यपि त्यांच्या कित्येक लेखांत दुरभिमानाचा विध्वंस करण्याचा प्रयत्न आहे, तरी त्यांच्या एकंदर लेखनाचा परिणाम अभिमानशून्यतेच्या आत्यंतिक प्रतिक्रियेंत म्हणजे दुरभिमानसंवर्धनाचें युग उत्पन्न करण्यांत झाला आणि या क्रिया-प्रतिक्रियांचें मंथन करून सत्यान्वेषणाच्या बुद्धीनें आगरकरांच्या सुधारकाचा अवतार झाला. केसरीच्या जन्माच्या वेळीं टिळक आणि आगरकर दोघेही शास्त्रीबोवांच्या अभिमान्यांपैकीं होते, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल काढण्याच्या संबंधांत शास्त्रीबुवांना पुढारीपण देण्यांत आलें यावरून ही गोष्ट सहज सिद्ध होते. परंतु तो अभिमान तारुण्याच्या पूर्वकालांतील होता. त्यामुळें कांहीं दिवस जरी या तीन व्यक्तींच्या विचारांत व क्रियाप्रकारांत पुष्कळ

अंतर होतें, तरी त्या अभिमानाच्या जोरांत तें अंतर विशेष परिणामकारक होण्यासारखी स्थिति नव्हती. शास्त्रीबोवांच्या निधनानंतर कांहीं वर्षें टिळक आणि आगरकर यांच्यांतही मतवैचित्र्यापेक्षां मतसादृश्य अधिक होतें. विशेषतः मतांपेक्षां स्वातंत्र्यप्रेम व धडाडी या गुणांच्या वास्तव्यानें दोघांचीं उदाहरणें सामान्य जनतेला इतर पुढें आलेल्या माणसांहून निराळ्या प्रकारचीं दिसलीं आणि तशीं होतीं. या दोन महंतांत कितीही मतभेद झाला व आतां महाराष्ट्राच्या इतिहासांत दोघांनीं उपस्थित केलेले पंथ कितीही भिन्नमार्गी असले, तरी त्या वेळच्या परिस्थितींत " सुखं च मे शयनं च मे " या सर्वमान्य मार्गाकडे ढुंकूनही न पाहतां या दोघांनीं लोकसेवेचा झेंडा हातीं घेतला आणि त्यामुळें त्यांच्या चरित्राचें हें वैशिष्ट्य त्यांचीं नांवें कोणाच्याही मनांत एकदम आणल्याशिवाय रहात नाहीं, यांत नवल नाहीं.

८. आगरकरांच्या चरित्रविवेचनाची ते आमच्या देशांतील एक थोर पुरुष या नात्यानें केव्हांही आवश्यकता आहे. पण सद्यःकालीं त्याची आवश्यकता केवळ त्या एकाच कारणामुळें नाहीं, ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत ठेविली पाहिजे. आगरकरांचा मृत्यु होऊन तीस वर वर्षें लोटलीं म्हणजे एक पिढी होऊन गेली. आगरकरांनीं जाणून बुजून अप्रिय परंतु हितकर तत्वांचें मंडण करण्यांत व तदनुसार शक्य होतें तेवढें स्वतःचें आचरण ठेवण्यांत आपलें आयुष्य खर्च केलें व त्यामुळें त्यांच्या जिवंतपणीं त्या तत्वांच्या विरोध्यांकडून आणि तत्व कळण्याची ज्यांना ताकद नव्हती अशा अज्ञान लोकांकडून त्यांना अनन्वित शिव्याशाप सोसावे लागले. त्यांच्या बुद्धिमान् व लोकसंग्रहोत्सुक प्रतिवाद्यांनीं तर त्यांचीं मतें चुकीचीं म्हणून वर्षानुवर्षें आक्रोश चालविला होता. आगरकरांनीं स्वजनद्वेषसुद्धां पतकरला तो कांहीं लेचीं पेचीं मतें बनवून पतकरला नव्हता. त्यांची प्रचंड स्वदेशभक्ति बावनकशी होती आणि आतां खरें बोलल्याशिवाय तरणोपाय नाहीं, तेव्हां कांहींही होवो मी खरें बोलणार हा निश्चय करून त्यांनीं आपली लेखणी अप्रतिहतपणें चालविली होती. देशस्थितीचें आपण केलेलें निदान हेंच बरोबर आहे, याबद्दल त्यांना तिलप्रायही संदेह नव्हता आणि आपण सुचविलेल्या सुधारणा अमलांत आल्याखेरीज आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची व सौभाग्याची खरी सुरवात होणार नाहीं, याबद्दल त्यांची बालंबाल खात्री होती. राज्यकर्त्यांवर त्यांनीं ओढलेले कोरडे त्यांच्या सामाजिक लेखांप्रमाणेंच अत्यंत तीव्र आहेत; पण हिंदुस्थानाची राजकीय सुधारणा होण्याला केवळ

राज्यकर्त्यांना शिव्याशाप देऊन साहाय्य होणार नाहीं, तर ज्या दोषांमुळें परकी राज्यकर्ते घरांत शिरले, त्या दोषांचा नायनाट झाल्याशिवाय तरणोपाय नाहीं, याबद्दल त्यांना शंका उरली नाहीं. सध्यांचे राज्यकर्ते अशक्त झाले तर हिंदुस्थानचा कबजा त्यांचे काका दुसरे कोणी तरी घेतील, पण हिंदुस्थान हिंदुस्थानी लोकांच्या कबजांत येण्यास व राहण्यास हिंदुस्थानी लोक मनानें व शरीरानें आणि क्रियेनें सुदृढ झाले पाहिजेत व त्या सुदृढतेला जे विचार, ज्या रूढि, आणि ज्या संस्था प्रतिबंध करीत असतील त्या सर्वांचा बींमोड केलाच पाहिजे; त्याखेरीज मातृभूमीला सौभाग्याची प्राप्ति होणार नाहीं हें त्यांच्या अंतःकरणाला पूर्ण पटलें, आणि म्हणून अंतःकरणाच्या अंतर्भागांतून पुढील जळजळीत शब्द त्यांची लेखणी प्रसवली. "हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांहीं खरोखर निर्दोष व हितावह आहे त्याला कशाचीही भीति नाहीं. मनु आणि पाराशर यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे. पण जें कांहीं सदोष व अहितकारक आहे, निदान सध्यांचे स्थितींत ज्याच्या अपकारित्वाबद्दल शंका नाहीं, तें सारें पाश्चिमात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार! एखाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची कथा काय? आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेकडों मनूचे व सहस्रावधि पाराशारांचे आधार दाखविलेत, व त्यांचा (अर्वाचीन विचारांचा) प्रसार न व्हावा म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान, आणि उठावणीचे आरडे यांचे अडथळे आणून घातलेत तरी ज्याप्रमाणें पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगानें कड्यावरून पडूं लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतींस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळींच संभव नाहीं. उलट हेच त्यांत होरपळले जाण्याचा संभव आहे." हे दणकट शब्द लेखणींतून बाहेर पडले त्या वेळीं पुष्कळांना शल्याप्रमाणें झोंबले. ते कठोर होते यांत शंका नाहीं. पण स्वदेशप्रेमाचा वणवा पोटांत पेटून, स्वातंत्र्यलालसेची आग शरीरभर भडकून आणि मातृभूमीला सौभाग्य प्राप्त व्हावें या तळमळीनें अंतःकरणाचें पाणी पाणी होऊन ते बाहेर पडलेले होते आणि ते आज खरे झाले आहेत. आगरकरांनीं प्रतिपादिलेल्या सुधारणांचे वाचिक शत्रु अद्यापही आहेत व दुष्ट रूढींचें

विष पाजून स्वदेशांत चैतन्य आणूं पाहणारे भोंदू वैद्य अद्यापही नाहींसे झाले नाहींत. पण सुधारणा जर त्या वेळीं होण्यास सुरवात झाली असती, तर राजकीय स्वातंत्र्याची प्रगति आतां खुंटली आहे तशी खुंटली नसती, अशी सर्व विचारी लोकांची खात्री पटत चालली आहे. जातिभेदाच्या विषाची बाधा नसती तर जातिद्वेषाचें गलिच्छ स्वरूप जें आज आमच्या राजकारणांत आडवें येऊन पडलें आहे तें तसें पडलें नसतें. सुदैवानें हळू हळू कां होईना सर्व महत्वाच्या सुधारणांची सुरवात झालेली आहे व आगरकरांनीं लिहिलेला प्रत्येक शब्द जितक्या प्रामाणिक कळकळीनें लिहिला होता तितका तो सत्यपूर्ण होता याची प्रचीति आतां सर्वांना आली आहे. त्यांनीं प्रतिपादिलेल्या सुधारणा, जातिभेदविध्वंस, स्त्रीदास्यविमोचन, शिक्षणप्रसार, व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तिमाहात्म्य या सर्वांचें पाऊल या तीस वर्षांत पुढें पडलेलें आहे. या दृष्टीनें या सुधारणांच्या प्रणेत्याचें चरित्र व तत्वमीमांसा यांची ओळख करून घेणें ही राष्ट्रहित व स्वहित या दोहोंना आवश्यक व उपकारक गोष्ट आहे.

९. आगरकरांच्या मृत्यूपासून आजपर्यंत तीस वर्षांवर काळ लोटला व तेवढ्या अवधींत सर्व बाबतींत अनेक स्थित्यंतरें घडून आलेलीं आहेत. त्यावरून आगरकरांनीं प्रतिपादिलेल्या तत्वांची सार्थकता सिद्ध झाल्याशिवाय रहात नाहीं व सद्यःस्थितींत ज्या अडचणींमुळें प्रगतीची गति खुंटते त्या अडचणी नाहींशा करण्यासाठीं त्या तत्वांची जाणून बुजून आणि एकनिष्ठपणानें कास धरली पाहिजे हेंही लक्ष्यांत आल्याशिवाय रहात नाहीं. राजकीय आधीं का सामाजिक आधीं, या वादानें डोकें भांवावून जाऊन राजकीय स्वातंत्र्य मिळल्यावर सामाजिक स्वातंत्र्याचा विचार करूं असें म्हणणारीं माणसें अद्यापही आहेत. पण आतांची राजकीय चळवळ निम्याहून अधिक सामाजिक स्वरूपाची उघड उघड झालेली आहे. अस्पृश्यांचा उद्धार झाल्याशिवाय राष्ट्राचें पाऊल पुढें पडणार नाहीं, हा शोध रा. मोहनलाल करमचंद गांधी यांनीं विसाव्या शतकाचीं वीस वर्षें झाल्यावर लावला अशी कल्पना करणाऱ्यांनीं त्या पूर्वींचा इतिहास पाहिलेला नाहीं याहून दुसरें काय म्हणावयाचें ? जातिभेदविध्वंस, अस्पृश्योद्धार, समानता इत्यादि तत्वांचा पुरस्कार आगरकरांसारख्या महंतांनीं गांधीचा सांसारिक जन्म होण्यापूर्वीं चालविला होता ही गोष्ट विसरण्यांत अर्थ नाहीं. त्या तत्वाचा पुनरुच्चार आपल्याला कांहीं काळ प्रिय झालेल्या पुढाऱ्यांच्या तोंडून झाला तेव्हां तीं तत्वें खरीं असें म्हणणाऱ्या शिष्टांनासुद्धां तीं

तत्वें खरीं हें आतां नाकबूल करून चालत नाहीं! संमतिवयोवादाच्या वेळीं कायदा होऊन हिंदुसमाज रसातळाला जाणार असा कोलाहल ज्या पढतमूर्खांनीं केला होता, त्यांना आतां एक पिढीनंतर पांढरपेशा जातींत बारा वर्षांखालची मुलगी विवाहासाठीं मिळत नाहीं हें समजलें आहे; त्याचप्रमाणें हिंदुसमाज त्यामुळें रसातळाला गेला नाहीं हेंही माहीत आहे. शिक्षणाच्या प्रसाराबद्दल आतां देशांत द्विधा मत राहिलें नाहीं, ही गोष्ट गोपाळराव गोखल्यांनीं जुन्या वरिष्ठ कायदे मंडळांत प्राथमिक शिक्षणाचें बिल आणलें त्या वेळीं त्यांना लोकमतानें दिलेल्या पुरस्कारावरून सिद्ध झालेली आहे. आगरकर आपल्या काळीं प्रत्येक गोष्टींत दूरवर विचार करून लिहीत होते. संमतीचें वय बारावर न थांबवितां सोळावर न्यावें हें त्यांनीं त्या वेळीं प्रतिपादिलेलें होतें. आतां, १९२८ सालीं, रायबहादुर शारदा यांनीं लेजिस्लेटिव्ह ॲसेम्ब्लींत विवाहाचें बिल आणून त्यांत चौदा वर्षांखालीं लग्नाची मोकळीक नसावी म्हणून तत्व गोविलें तर चौदाच्या ऐवजीं सोळा ही मर्यादा घालावी म्हणून सहस्रावधि सभांनीं त्यांच्याकडे ठराव पाठवून दिले. यांतील शेंकडों सभा निव्वळ स्त्रियांच्या होत्या. ज्या लोकांनीं आगरकरांच्या वेळीं बारा वर्षांपर्यंत संमतिवय नेण्याच्या बाबतींत एवढें अकांड तांडव केलें त्यांना काळाचा ओघ समजला नव्हता आणि म्हणून लोकांच्या नेतृत्वाची पात्रता नव्हती हें यावरून आपोआप सिद्ध होतें. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व मोफत झालें पाहिजे या तत्वाची मुहूर्तमेढ त्यांनीं तेव्हां रोविली. स्त्रीशिक्षणाचा प्रसार अप्रतिहतपणें झाला पाहिजे आणि पुरुषांप्रमाणें स्त्रियांना चरितार्थसंपादनाचें शिक्षण मिळालें पाहिजे ही गोष्ट समाजाच्या निदर्शनाला त्यांनीं आपल्या सोज्वळ वाणीनें आणून दिली होती. ज्या पुण्यांत महादेव गोविंद रानड्यांसारख्या थंड्या सुधारकांना मुलींची शाळा काढल्याबद्दल लोकनिंदेच्या महापुरांत गटंकळ्या खातां खातां पुरेवाट झाली होती, त्याच पुण्यांत सेवासदन, महिला पाठशाळा, स्त्रियांची युनिव्हर्सिटी यांसारख्या संस्था जोमानें चाललेल्या आहेत; फर्ग्युसन कॉलेजमध्यें पन्नास साठ मुली उच्च शिक्षणाचा आस्वाद घेत आहेत; युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या परीक्षांत मुली उच्च स्थान पटकावून बक्षिसें व शिष्यवृत्त्या आपल्या बंधुजनांबरोबर टक्कर मारून हस्तगत करीत आहेत. हा सर्व देखावा आगरकरांसारख्यांनीं प्रतिपादिलेल्या तत्वांच्या विजयाचा नव्हे काय? बायकांचें काम चुलीपुरतें म्हणणाऱ्यांच्या तोंडाला हिंदुस्थानांतील प्रत्येक विश्वविद्यालयांत

आमच्या मुलींच्या बुद्धिमत्तेचा विजय होत आहे हें पाहून तरी आतां खीळ बसणार नाहीं काय? आगरकरांचें लिहिणें तेव्हां पुष्कळांना कटु लागलें; पण खऱ्या मार्गाचें निर्भीकपणें निदर्शन हीच प्रेमाची खरी खूण आहे आणि आगरकरांचें मातृभूमीवरील प्रेम इतकें उज्ज्वल आणि बावनकशी होतें म्हणून रागालोभाची पर्वा न करतां "इष्ट असेल तें बोलणार आणि शक्य असेल तें करणार" या व्रताचें अवलंबन त्यांनीं आमरण केलें. त्यांची वाणी सत्यमय होती म्हणून तिचें मनन व चिंतन स्फूर्तिदायक व्हावें यांत नवल नाहीं.

१०. प्रेमाची, भक्तीची खरी खूण म्हणजे त्यांत ममत्वापेक्षां प्रेमविषयाची कल्याणेच्छा जबरदस्त असते. स्वदेशसेवेच्या अत्यंत कठीण योगसाधनांत आत्मप्रतिष्ठेच्या रूपानें ऋद्धिसिद्धि आडव्या येतात. त्यांना जिंकून जो पुढें पाऊल टाकतो त्यानेंच राष्ट्रसेवायोगांत मोक्ष मिळविला. "माझी कीर्ति होईल पण माझ्या देशाचें हित होणार नाहीं. माझी प्रतिष्ठा वाढवूं का राष्ट्राचें खरें हित साधूं?" या प्रश्नाला निर्धोकपणें जो स्वप्रतिष्ठेच्या संन्यासानें उत्तर देतो, तोच खरा संन्यासी होय आणि म्हणून गोपाळ गणेश आगरकर हे खरे संन्यासी होते. आपल्या तीव्र आणि कौशल्यशाली लेखणीच्या जोरावर लोकप्रियतेचें संपादन करणें त्यांना काय दुष्कर होतें? पण तुकारामानें वर्णन केल्याप्रमाणें संताची विभूति ही जगाचें कल्याण करण्यांतच रत असते आणि ती आपला देह नेहमीं परोपकारांत कष्टविते; स्वतःविषयींचा सर्व विचार दूर फेंकून अशी विभूति भूतदयेनें प्रेरित होऊन सर्व व्यवहार चालविते. लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर त्यांना बसविण्याला आगरकरांची लेखणी इतर कोणाहीपेक्षां पूर्ण समर्थ होती. पण असल्या क्षुल्लक कामासाठीं ती लेखणी उत्पन्न झाली नव्हती. स्वदेशाची कष्टमय स्थिति पाहून आणि स्वजनांचें सौभाग्यहीन जीवन पाहून आगरकरांच्या अंतःकरणांतील दया फोफावली. टक्के टोणपे खाऊन ते पुढें आले होते. लोखंडी चणे खाल्ल्यावर त्यांना देवकळा प्राप्त झाली होती. विपत्तीच्या महासागरांतून मार्ग काढून त्यांना मोठेपणाचें परतीर गांठावें लागलें होतें. परदेशांशीं तुलना करतांना आपल्या देशाच्या कपाळीं चिकटलेला दीनपणा त्यांच्या अंतःकरणाला शल्यासारखा बोंचत होता. एवढा मोठा देश आणि त्याची ही विपन्नावस्था हा प्रकार पाहून या देशाचें भाग्य ऊर्जितदशेला येणार नसेल, तर एखाद्या दुसऱ्या व्यक्तीचा जयजयकार होण्यांत काय मातब्बरी आहे, ही भावना प्रबळ होऊन त्यांची तेजस्वी लेखणी पुढें सरसावली. त्या लेखणीरूप धनुष्याचा टणत्कार होतांच

दुष्टांचें धाबें दणाणलें; दांभिकांची पांचावर धारण बसली; बलिष्ठपणाच्या जोरावर कनिष्ठांचें सारसर्वस्व हरण करणाऱ्यांच्या शरीराला कंप सुटला; उक्तीप्रमाणें आचरण न करणाऱ्या भोंदूंची गाळण उडाली; त्या लेखणीच्या प्रभावानें हजारों वर्षें दास्यपंकांत रुतलेल्या स्त्रीजातीला आशेचा हुरूप आला आणि जातीच्या निमित्तानें ज्यांच्या पदरीं नीचपणा बांधण्यांत आला होता, त्या कोट्यवधि लोकांच्या आंगांत नवीन चैतन्याचा संचार झाला. ती लेखणीरूप जादूची कांडी फिरतांच दुष्ट रूढींचें सिंहासन डळमळलें आणि धर्माच्या नांवाखालीं जुलमाचा बाजार मांडणाऱ्यांच्या दुकानदारीवर गंडांतर आलें. त्या लेखणीच्या प्रभावामुळें त्रस्त झालेल्या मूढांनीं आगरकर मेले असें त्यांच्या मरणापूर्वींच सोंग आणून त्यांचें खोटें प्रेत पुण्यपत्तनाच्या रस्त्यांतून फिरविलें. त्या वेड्यांना काय माहीत कीं आगरकरांच्या खऱ्या प्रेतयात्रेनंतरसुद्धां आगरकर अमरच राहणार होते. ज्या लेखणीला हे एवढे पराक्रम करण्याची शक्ति होती, तिनें आपलें सर्व बळ केवळ आपल्या पित्याला क्षणिक लोकप्रियता आणून देण्यांत खर्चिलें नाहीं हें मराठी वाचकांचें मोठें भाग्य होय. आज तीस पस्तीस वर्षांनींही आगरकरांच्या लेखणींतलें तेज पूर्वींप्रमाणेंच कायम आहे. त्यांचें चरित्र हें त्यांच्या लेखांत समाविष्ट झालेलें आहे. भूतदयेनें प्रेरित होऊन ज्ञानेश्वरांनीं ममत्वाचा संन्यास केला आणि संस्कृताचें कुलुप लागलेलें ज्ञानभांडार मराठींत आणून तें सर्वांना खुलें केलें. तें भूतदयेचें दुकान एकनाथांनीं पुढें चालविलें व त्यांनीं आपल्या रमणीय वाणीनें अंधाऱ्या जागेंतून प्रकाशाचीं किरणें खेळविलीं. त्यानंतर आपल्या अभंगवाणीनें श्रेयाचें विवरण तुकारामांनीं करून महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरएकनाथांचें व्रत चालविलें. सत्य भाषण आणि सत्य वर्तन व ममत्वाचा यज्ञ अशा प्रकारच्या खऱ्या भूतदयेच्या खऱ्याखुऱ्या धर्माचें सक्रिय प्रतिपादन आगरकरांनीं आपल्या कालीं केलें. आगरकर अल्पायुषी झाले, पण त्यांचें कार्य चिरंतन रहावयाचें आहे.

# भाग दुसरा.

## बालपण व विद्यार्थिदशा

आपद्गतः खलु महाशय चक्रवर्ती
विस्तारयत्यकृतपूर्वमुदारभावम् ।
कालागरुर्दहनमध्यगतः समंता-
ल्लोकोत्तरं परिमलं प्रकटीकरोति ॥

जगन्नाथ पंडित

गोपाळरावांचा जन्म १८५६ सालीं सातारा जिल्ह्यांत टेंभू या गांवीं झाला. हें गांव कऱ्हाडपासून कृष्णानदी ओलांडून तीन चार मैल गेल्यावर लागतें. आगरकरांचें घर अद्यापि या गांवीं दाखविण्यांत येतें व तेथें त्यांचे कांहीं भाऊबंद राहतात. या गांवांत आगरकरांच्या बऱ्याच पिढ्या गेल्या. प्रत्यक्ष माहिती मिळते ती त्यांचे पणजे बच्चाजीपंत यांच्या वेळेपासून. बच्चाजीपंत टेंभूला अब्रूनें दिवस काढीत व खाऊन पिऊन चांगले सुखी होते असें दिसतें. त्यांच्या मागें त्यांचे चिरंजीव विष्णुपंत हे घरसंसार पाहूं लागले. विष्णुपंतांनीं विशेष कांहीं कमाविलें नाहीं पण विशेष कांहीं गमावलेंही नाहीं आणि त्यांच्या अमदानींत त्यांनीं घरसंसार एकंदरींत ठीकपणें चालविला. त्यांचे कनिष्ठ चिरंजीव गणेशपंत अथवा गणूअप्पा हे गोपाळरावांचे वडील. गणेशपंतांना कऱ्हाडचे विष्णुपंत भागवत यांची थोरली मुलगी ठकूबाई ही दिली होती. कऱ्हाडचे भागवत साधारणपणें सुखवस्तूंत मोडत; तेव्हां त्यांची मुलगी सून मिळण्याइतकी विष्णुपंत आगरकरांची सुस्थिति होती हें स्पष्ट दिसतें. ठकूबाईंना सासरीं सरस्वतीबाई हें नांव मिळालें. "( गोपाळरावांच्या ) पूर्वजांनीं कोणाच्या राज्यकारकीर्दींत नांवलौकिक संपादन केला, किंवा कोणत्या मूळपुरुषानें बहादुरी केली हें समजण्याला आज आमच्यापाशीं कांहीं साधन नाहीं. किंवा पेशवाईच्या इतिहासांतही आगरकर नांवाचे कोणी गृहस्थ प्रसिद्धीस आल्याचें कोठें आढळत नाहीं. तथापि आगरकर हे मूळचे मोठे श्रीमंत, चांगले लक्षाधीश असावेत असें अनुमान करण्याला दोन सबळ पुरावे आहेत. एक

त्यांचा राहता वाडा. हा सद्यःस्थितीला जरी अगदीं मोडकळीस आला आहे तरी त्याचा विस्तार, आकार, व तट हीं पाहिलीं म्हणजे तो एखाद्या मोठ्या जहागीरदाराचाच वाडा असावा असें वाटतें. दुसरें ह्याच गांवांत त्यांच्या पूर्वजांनीं बांधलेलें श्रीलक्ष्मीनारायणाचें फारच सुंदर मंदिर आहे. ह्याचा सभामंडप मोठा भव्य असून सभोंवार चुनेगच्ची फार मोठा तट आहे. महाद्वारावर उंच नगारखाना आहे. शिखर अतिशय उंच असून घडणावळ फार अप्रतिम आहे. प्रत्येक मजल्यांत अनेक कमानी असून प्रत्येकामध्यें निरनिराळ्या पौराणिक मूर्ती करून बसविलेल्या आहेत. त्या पाहतांच मन केवळ तल्लीन होऊन जातें. श्रीलक्ष्मीनारायणाची भव्य मूर्ति काळ्या पाषाणाची असून ती गरुडावर आरूढ झालेली आहे. ह्या देवाची पूजाअर्चा अद्यापि ह्याच आगरकर घराण्यांतून चालते. इतकें जरी पूर्वींचें वैभव होतें, तरी तें प्रस्तुतकाळांत केवळ नामशेष होऊन राहिलें होतें. गोपाळरावांस तर काय, पण त्यांच्या वडिलांसही त्यांतील लेश भोगावयास मिळाला नाहीं. जिकडे तिकडे पडझड आणि जीर्णदशाच त्यांच्या दृष्टीचा विषय झाला होता.' ” सरस्वतीबाई ही आमच्या चरित्रनायकाची आई. विष्णुपंतांबरोबर आगरकर घराण्याची स्थिति खालावली. “ह्या बाई मोठ्या धर्मशील असून कवयित्री होत्या. ह्यांनीं अनेक रसभरित कविता व गाणीं रचलेलीं त्या प्रांतांतील पुष्कळ स्त्रियांच्या तोंडीं आहेत. गणूअप्पा हे अंगानें अगदीं कृश असून नेहमीं अशक्तपणांतच असत.” गणेशपंत किंवा गणूअप्पा हे जुन्या पद्धतीचे, साधारणपणें विरक्त वृत्तीचे, स्वभावानें सालस आणि वर्तनानें फार स्वच्छ असे गृहस्थ होते. पण द्रव्यार्जनार्थ लागणारा उद्योग आणि चातुर्य यांचा त्यांच्याकडे पूर्ण अभाव होता. त्यामुळें जरी त्यांच्या घरीं ‘सरस्वतीचें’ आगमन झालें तरी लक्ष्मीनें तेथून पाय काढला. सरस्वतीबाई साधारण मानानें श्रीमंताची मुलगी, पण स्वभावानें फार उत्कृष्ट होती. माहेरच्या माणसांनीं तिला प्रेमानें वागविलें व घरीं अठराविश्वे दारिद्र्य व निरुद्योगी नवरा अशी दुःस्थिति प्राप्त झाली असतां घरसंसार तिनें चालविला. सुस्थितींतील नवरा असता तर तिचें तेज अधिक पडलें असतें, पण कवीची सहृदयता व कल्पनाशक्ति हे गुण कदाचित् आईच्या दुधांतून गोपाळरावांत उतरले

१-२. केरळकोकिळ (सप्टेंबर, १८९५).

नसतील असें नाहीं. गणेशपंत व सरस्वतीबाई यांना तीन लेकी व दोन मुलगे अशीं अपत्यें झालीं. त्यांत गोपाळराव हे कनिष्ठ चिरंजीव. घरच्या गरिबीमुळें सरस्वतीबाईंचें माहेरीं जाणें येणें बरेंच असे. त्यामुळें त्यांच्या मुलांनाही कऱ्हाडला त्या पुष्कळ वेळां नेत. सरस्वतीबाईंचे धाकटे बंधु दत्तोपंत भागवत हे वयानें गोपाळरावांच्या इतकेच होते. लहानपणापासून मामाभाच्यांत जो स्नेह-संबंध जडला तो कायम राहिला. दत्तोपंत भागवतांनीं पुढें वऱ्हाडांत वकिली करून पैका मिळविला व नंतर तिकडे अकोल्यास तेलाची वगैरे गिरणी काढून ती ऊर्जितावस्थेला आणली. त्यांचे चिरंजीव व नातू दोघेही दत्तोपंतांनीं काढलेल्या उद्योगधंद्याच्या कार्यांत आहेत. आगरकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला व पोरक्या मुलांना दत्तोपंतांनीं आश्रय दिला व ती सर्व मंडळी सध्यां अकोल्याला राहतात. दत्तोपंत व गोपाळराव यांचा स्नेह अगदीं जीवश्चकंठश्च होता. टेंभूला शाळा नव्हती त्यामुळें प्राथमिक शिक्षणाला गोपाळराव आजोळीं येऊन राहिले. तेथें ते आणि दत्तोपंत मिळून शाळेला जात. गोपाळरावांच्या लहानपणा-संबंधीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं. पण एकंदरींत स्वभाव हूड होता व दांडगाईचे खेळ खेळण्याची आवड होती असें दिसतें. कृष्णानदीच्या कांठीं वास्तव्य असल्यामुळें पोहण्याच्या कलेंत ते लहानपणापासून तरबेज झाले. कऱ्हाडला तरी शाळेची सोय इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतच होती. त्यांची बुद्धि तीव्र होती व एवढ्या अल्पवयांतसुद्धां निबंध लिहिण्याकडे त्यांचें मन धांवत होतें. सभाधीटपणाही त्यांच्यांत बराच होता. "गोपाळरावजींचा स्वभाव लहानपणीं मोठा हूड व विनोदी असे. आणि रोंघे मास्तर (हे त्यांच्या शिक्षकांपैकीं मुख्य होते) ह्यांचाही स्वभाव कांहींसा विनोदी होता. ते गोपाळरावांना कांहींना कांहींतरी थट्टेचा प्रश्न विचारीत, आणि त्यांवर त्यांचेंही तसेंच कांहींतरी मजेचें उत्तर आपलें ठेवलेलें असे तेथील वर्गांत हे प्रसंग वारंवार येत असत. रावसाहेब अमृत श्रीपत नागपूरकर हे त्या वेळीं कऱ्हाडास मुनसफ होते. त्यांना वक्तृत्वाची व लेखनाची फार आवड असे. ते प्रत्येक रविवारीं एक सभा भरवून तींत जे कोणी मुलगे निबंध लिहून आणतील त्यांतील चांगल्या चांगल्या निबंधांस रुपया, दोन रुपयांचीं बक्षिसें देत असत. तेव्हां वर सांगितलेली विद्यार्थी मंडळी तेथें निबंध लिहून बक्षिसें मिळवीत. त्याच वेळीं तेथें रावसाहेब आबासाहेब जोशी म्हणून मामलेदार असत. हे जुन्या पद्धतीचे असून तापट स्वभावाचे होते. ते केव्हांहि पाहिले तरी मुनसफांच्या विरुद्ध पक्षानें बोलत. त्याप्रमाणें

एके दिवशीं गोपाळरावजींचें निबंधवाचन होऊन त्यांची फार वाहवा झाली! ती आबासाहेबांना आवडली नाहीं. त्यावर त्यांनीं बरेंच पाल्हाळिक भाषण केलें. त्यांतील मतलब इतकाच होता कीं, "असला निबंध लिहिण्याचें मुलांच्या अंगीं कसलें सामर्थ्य? तीं दुसऱ्या कोणाकडून तरी लिहून आणतात. अशानें कशाचें ज्ञान वाढणार? तर ही सभा म्हणजे पोरखेळ आहे." हें भाषण खरोखर मामलेदारसाहेबांचें होतें. परंतु तें गोपाळरावजींस खपलें नाहीं. त्यांनीं त्या वेळच्या शक्तीप्रमाणेंच परंतु सणसणून जबाब दिला, व आतांच्या आतां सांगितलेल्या विषयावर मीं येथच्या येथेंच निबंध लिहिण्यास तयार आहें, म्हणून सांगितलें. अशी त्यांची तेजस्विता होती. व ह्याच वेळेपासून त्यांना मराठी लेखनाविषयीं अत्यंत गोडी लागून राहिली.'" कऱ्हाडला तीन इयत्तांपर्यंत मिळणारें शिक्षण त्यांनीं वयाचीं बारातेरा वर्षें पुरीं होण्यापूर्वीं हस्तगत करून टाकिलें. या ठिकाणीं गोपाळरावांचें बाल्य अकालीं अस्तंगत झालें. कारण पुढचें शिक्षण करण्यासाठीं बाहेरगांवीं जाण्यास त्यांच्या वडिलांच्याजवळ पैसा तर नव्हताच पण थोरल्या मामांनीं आपल्या धाकट्या भावंडांना पुढील शिक्षणाला बाहेरगांवीं पाठविलें; त्यांचा खर्च चालवून पुनः भाच्याचा खर्च चालविण्याची त्यांचीही ऐपत नव्हती. याप्रमाणें वयाला बारा तेरा वर्षें लोटलीं नाहींत तोंच जीवनसंग्रामाच्या रणांगणावर गोपाळरावांना प्रविष्ट व्हावें लागलें व विकट परिस्थितीशीं टक्कर देण्याकरितां त्यांना कंबर बांधावी लागली.

२. बालवयांत अंतःकरणाच्या वृत्ति अतिशय कोमल असतात. त्या वेळीं पाहिलेल्या, ऐकिलेल्या आणि विशेषेंकरून अनुभविलेल्या गोष्टींचा ठसा मनुष्याच्या अंतःकरणावर कायमचा उमटतो. त्या वेळीं होणाऱ्या सुखदुःखांची जाणीव विशेष तीव्र असते. गोपाळरावांना शिकण्याची मनापासून इच्छा होती पण दारिद्र्यामुळें शिक्षण सोडून दहा पांच रुपड्या मिळविण्यासाठीं त्यांना वयाच्या तेराव्या वर्षीं मुनसफ कचेरींत उमेदवारी करून खर्डे घाशीत दिवस घालवावे लागले. बरोबरचे सोबती कोणी पुण्याला कोणी कोठें असे पुढच्या अभ्यासासाठीं निघून गेले आणि आपल्याला पुण्याला जावयास मिळत नाहीं ही त्यांची खात्री झाली. शैशवाच्या निरभ्र वातावरणांत लहान मुलें

१. केरळकोकिळ (सप्टेंबर, १८९५).

केवढाले मानसिक मनोरे बांधतात आणि पत्त्यांच्या घरांप्रमाणें जेव्हां ते ढांसळतात तेव्हां त्यांना केवढें दुःख होतें ! परिस्थितीच्या द्वाडपणामुळें चेपून जाण्याचा हा जो प्रसंग आमच्या चरित्रनायकावर इतक्या लहानपणीं आला त्यामुळें त्याचें अंतःकरण खचलें मात्र नाहीं. उलट त्या परिस्थितीशीं टक्कर मारावयाची, तिला दडपून तिच्यावर विजय मिळवावयाचा अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. कऱ्हाडला मामाचें घर जरी त्यांना आपल्या घरासारखें होतें तरी कऱ्हाडला शिकण्यासाठीं ते आले तेव्हांपासूनच माता-पितरांच्या वियोगाची सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि ज्या घरांत कसल्याही तऱ्हेचें सुख नव्हतें, जेथें अठराविश्वे दारिद्र्य ओतप्रोत भरलें होतें त्या घराकडे परत जाऊन तरी गोपाळराव काय करणार होते ? उमेदवारीच्या नोकरीला ते लौकरच कंटाळले आणि या स्थितींतून कांहीं तरी मार्ग काढून पुढच्या शिक्षणाच्या तजवीजीला लागलें पाहिजे हा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला. सुखवस्तु आईबापांकडून शेंपन्नास रुपयांच्या मनीआर्डरी कॉलेजच्या पत्त्यावर महिन्याच्या महिन्याला येत आहेत आणि पुढें सासऱ्याकडून उकळलेल्या अगडबंब हुंड्यामुळें विलायती विद्येच्या खर्चाची दामदुप्पट अनायासें पदरांत पडते आहे अशा भाग्यशील आणि कर्तृत्वशून्य मंडळींना गोपाळरावांनीं एवढ्या लहानपणीं एवढ्या बिकट परिस्थितीशीं टक्कर मारण्याचा विचार तरी कसा केला याचेंच आश्चर्य वाटल्यास त्यांत नवल नाहीं. हिमनगाच्या शिखरावर अनुभवावयास मिळणाऱ्या निर्मळ हवेची कल्पना गिरणीच्या धुरानें व्यास झालेल्या शहरांतील गल्लीकुचींतील चाळींत राहणाऱ्याला होणें कठीण आहे. कोठें गेलें असतां आपली सोय लागेल याचा गोपाळराव विचार करीत होते. शेवटीं त्यांना रत्नागिरी आठविली. तेथें वामनराव आगरकर डेपुटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर रहात असत व तेथें हायस्कूलही होतें. हे त्यांचे चुलते सुखवस्तु होते. आपलें ओझें त्यांना होणार नाहीं असें गोपाळरावांच्या बालस्वभावाला वाटलें.

रत्नागिरी कऱ्हाडाहून जवळ जवळ दीडशें मैल दूर. त्यावेळीं आगगाडी झालेली नव्हती. प्रवास अत्यंत कुचंबणेचा होता आणि हा प्रवास गोपाळरावांनीं पायानें केला असें म्हणतात व त्यांच्या द्रव्यदैन्याकडे पाहिलें म्हणजे तें असंभवनीय दिसत नाहीं. विद्येच्या अभिलाषानें एवढ्या पोरवयांत आईबापांना रजा देऊन गोपाळराव आपल्या पायानें रत्नागिरीला चालत गेले ! विद्या-

देवीच्या क्षेत्रासाठीं निघालेला हा यात्रिक वीर मजल दर मजल करीत कोकणच्या राजधानीला येऊन पोंहोंचला. ज्या आप्ताच्या भरंवशावर गोपाळराव बसले होते त्याच्या मुखावर त्यांना पाहून स्वागताचें हास्य उमटलें नाहीं. त्यांत त्या बिचाऱ्याचाही अपराध नसेल. उगीच एकाएकीं एखाद्या आप्तानें यावें—तो निराधार आणि विद्योत्सुक असला म्हणून काय झालें ?—आणि आपल्या घरीं बिऱ्हाड ठोकावें ही गोष्ट त्याला मानवली नाहीं यांत अपूर्व असें कांहींच नव्हतें. त्याच्या घरीं राहून पडेल तें काम करण्याची गोपाळरावांची तयारी होती. ते रत्नागिरीला अगदीं रिक्त हस्तानें गेले होते असें दिसत नाहीं. कऱ्हाडला रावसाहेब नागपूरकर म्हणून मुनसफ होते हें वर सांगितलें आहे. त्यांनीं आपल्या कचेरींतील या उमेदवाराचा हिय्या पाहून त्याच्या हातांत पाउणशें रुपयांची पुंजी ठेविली होती. पण पाउणशें रुपये पुरणार किती दिवस ? रत्नागिरींतील चुलत्यानें त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्यावर गोपाळरावांनीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला. खरोखर दुसरा मार्गच नव्हता. अगदीं परक्या ठिकाणीं हा लहान मुलगा येऊन पडलेला. अंतःकरणाला आलेला ऊत हलका करण्याला कोणी लंगोटीयारसुद्धां तेथें नव्हता. परत जाण्याची गोष्ट सोपी नव्हती आणि एवढा खटाटोप करून आणि बहुधा घरच्या मंडळीच्या मर्जीविरुद्ध इतक्या दूर आल्यावर आपली फजिती आपल्या डोक्यावर बांधून परत जाणें ही गोष्ट त्यांच्या मानी स्वभावाला सोसण्यासारखी नव्हती. त्यांनीं रत्नागिरींत मिळाले तेव्हां वार लावले. लोकांच्या घरीं शार्गिदी केली. नडलेल्या विद्यार्थ्यांनाच काय, पण जवळच्या आप्तांनासुद्धां योग्य प्रकारें वागविण्याची संवय अद्यापि आपल्यांत पुष्कळांना लागावयाची आहे. वाराच्या मुलांना घरीं राबवून घेतांना त्या वेळीं काय पण आतांसुद्धां कित्येकांना कांहीं वाटत नाहीं. हिंदु संसाराच्या अंतरंगाचा खडतर अनुभव गोपाळरावांना रत्नागिरीपासून येऊं लागला व सामाजिक अन्यायाचें व अव्यवस्थेचें वर्णन करण्यांत पुढें त्यांच्या लेखणींत जो सडेतोडपणा व बिनचूकपणा आला, याचें कारण बाळवयापासून त्यांना मिळालेला कटु अनुभव व पहावयास मिळालेल्या गोष्टी हेंच होय असें म्हटलें तर फारसें चुकणार नाहीं.

३. रत्नागिरीला याप्रमाणें कांहीं दिवस गोपाळरावांनीं काढले पण पोटाच्या विवंचनेसाठीं परसेवा करण्यांत बहुतेक काळ जाऊं लागला त्यामुळें विद्याभ्यास करण्यास वेळ मिळेना आणि अशा प्रकारें ज्या उमेदीनें त्यांनीं एवढा लांबचा

पल्ला मारला व वाटेल ती खस्त सोसण्याची तयारी केली तो उद्देश सफल होईल असें चिन्ह दिसेना. तेव्हां मोठ्या दुःखानें व निराशेनें ते कऱ्हाडला परत आले. त्या वेळीं आपला सर्व अवतार संपला असें त्यांना वाटलें असल्यास त्यांत नवल नाहीं. कऱ्हाडला परत आल्यावर तरी कांहींतरी मिळवण्याची जबाबदारी त्यांच्यावर होतीच. त्यासाठीं त्यांनीं एका दवाखान्यांत कंपौंडरची नौकरी पतकरली. अर्थात् आपणांला पुढें विद्याभ्यास करावयाचा आहे ही गोष्ट त्यांच्या मनांत घोळत होतीच व त्याची संधि कोठें उत्पन्न होईल इकडे त्यांचे डोळे लागले होते. रत्नागिरीहून त्यांनीं निघून येण्याला दुसरेंही कारण घडलें तें असें कीं त्यांचे चुलते एकाएकीं निवर्तले. रा. ब. द. वि. भागवत लिहितातः—"गोपाळरावांचे चुलते वामनराव आगरकर हे रत्नागिरीस डेपुटी एजुकेशनल् इन्स्पेक्टर होते. त्यांजकडे गोपाळराव गेले. तेथें त्यांस पुष्कळ काम करावें लागत असे; अभ्यास विशेष झाला नाहीं. सबब गोपाळराव परत कऱ्हाडास आले." कऱ्हाडला कंपौंडरची नौकरी करीत असतांना एक दिवस प्रेत फाडण्याचा विधि दवाखान्यांत चालला असतां गोपाळरावांना हजर राहावें लागलें. त्या दिवशीं पाहिलेल्या चिरफाडीचा त्यांच्या कोमल मनावर—त्यावेळीं त्यांचें वय सोळाच्या आंत होतें हेंही येथें लक्षांत ठेविलें पाहिजे—इतका झाला कीं कांहीं दिवस त्यांना अन्न नकोसें झालें व स्वप्नांतसुद्धां त्यांना प्रेत डोळ्यांपुढें दिसूं लागलें व दवाखान्यांत काम करण्याला जाण्याचीसुद्धां त्यांना शिसारी बसली. त्यामुळें त्यांनीं ही नोकरी सोडली. पुढें असा योगायोग जमून आला कीं त्यांचे थोरले मामा सदाशिव-राव हे वऱ्हाडांत अकोल्याला जाऊन स्थाईक झाले. त्यांनीं आपले धाकटे बंधु दत्तोपंत यांनाही पुण्याहून अकोल्याला नेलें व सदाशिवरावांच्या विऱ्हाड-खटल्याला बरोबर घेऊन गोपाळरावांनीं जावें असें ठरलें व अकोल्याला हाय-स्कूल होतें व तेथें आपल्याला जायाला मिळेल व मॅट्रीकच्या परीक्षेपर्यंत अभ्यासाची तरतूद लागेल या आशेनें गोपाळरावही तिकडे जाण्यास ताबडतोब कबूल झाले. वर आलेल्या कांहीं गोष्टींची व गोपाळराव अकोल्याला कसे गेले व तेथें मॅट्रीकच्या परीक्षेपर्यंत त्यांचा अभ्यास कसा झाला यासंबंधीं माहिती प. वा. रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं जून १९१६त प्रसिद्ध झालेल्या मासिक मनोरंजनाच्या खास आगरकर अंकांत दिली आहे. ती येथें जशीच्या तशी द्यावी हें ठीक दिसतें. या हकीकतीच्या पहिल्या म्हणजे रत्नागिरीहून परत येईपर्यंतच्या भागांत व वर दिलेल्या माहितींत थोडीशी तफावत आढळून येते.

त्यासंबंधीं विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं; कारण ही तफावत चरित्राच्या दृष्टीनें कांहीं विशेष फेरबदल करण्याला कारणीभूत होण्यासारखी नाहीं. रा ब. महाजनी सदर लेखांत लिहितातः—"गोपाळराव अकोल्यास प्रथम सन १८७२ सालीं आपल्या दुसऱ्या मामाचें खटलें घेऊन आले व येथेंच शिकण्याकरितां राहिले. त्यांचें प्राथमिक शिक्षण कऱ्हाडच्या शाळेंत झालें होतें. कऱ्हाडांत त्यांचे आजे व मामा रहात असत, व घरची गरिबी असल्यामुळें गोपाळराव व त्यांचे बंधु आजोळींच वाढले. आजोबा कर्मठ खरे, पण तापट असत. वडील मामा गरिबींतून स्वकष्टानें कर्तेसवरते झाले होते, व वकिलीच्या परीक्षेंत पास होऊन कऱ्हाडालाच वकिली करीत असत. त्यांनीं संस्कृताचें अध्ययन चांगलें केलें होतें, व तीर्थरूपांच्या करड्या अमलाखालीं ते वाढले होते, तरी तीर्थरूपांच्या आंगीं नसलेली सहनशीलता त्यांच्यांत विशेष होती. कुटुंब मोठें, दोन बहिणी घरीं आलेल्या, तिसरी अगदीं गरिब, तिचीं सर्व मुलें आंगावर पडलेलीं, धाकटे तीन भाऊ पैकीं दोन विवाहित, वृद्ध तीर्थरूप व मातुःश्री, एवढें कुटुंब विनबोभाट आवरण्याला केवढा मनाचा थोरपणा लागतो, किती परिश्रम करावे लागतात, व तेही लौकिक सांभाळून, याची खरी कल्पना अशा कुटुंबांत वाढलेल्या स्त्रीपुरुषांनाच करितां येईल. भाऊंची ( वडील मामांची ) सांपत्तिक स्थिति आतां बरी झाली होती, तरी गोपाळरावांना इंग्रजी शिकण्याकरितां सातारा, पुणें वगैरे ठिकाणीं स्वतंत्रतेनें ठेवण्याची ऐपत त्यांना नव्हती. म्हणून गोपाळराव हे अकोल्यास येण्यापूर्वीं त्यांचे चुलते सोलापुरास आणि रत्नागिरीला डेप्युटी इन्स्पेक्टर होते, त्यांकडे राहण्याला गेले होते. त्यांच्याकडे असतांना त्यांनीं इंग्रजीच्या तीन इयत्ता संपविल्या होत्या. शिक्षणार्थ काय काय कष्ट करावे लागतात व किती हाल सोसावे लागतात, याचा पूर्ण अनुभव गोपाळरावांना लहानपणींच आला होता. पण दैवदुर्विपाकानें इतके कष्ट सोशीत असतांही त्यांच्या शिक्षणाला विघ्न आलें. त्यांचे चुलते एकाएकीं निवर्तले, व अशांत गोपाळराव कऱ्हाडला आले. तेथें मुन्सफाच्या कोर्टांत त्यांनीं नक्कलनवीसाचें कांहीं दिवस काम केलें. पुढें दवाखान्यांत कंपौंडरची नोकरी पत्करिली. पण तेथें एकदां प्रेत फाडण्याच्या प्रसंगीं हजर राहण्याचा त्यांना प्रसंग आला, व त्या चीरफाडीची त्यांच्या कोमल मनाला इतकी शिसारी बसली कीं कांहीं दिवस त्यांना अन्न नकोसें झालें, व स्वप्नांतही तें प्रेत डोळयांपुढें उभें राही; तेव्हां त्यांनीं ही नोकरी सोडली." रा. ब. द. वि. भागवत

लिहितातः—"कऱ्हाडच्या शाळेंत आम्ही इंग्रजी तिसरें बूक शिकलों. आमचे मास्तर रा. रा. नारायण मनोहर रोंघे होते. गोपाळरावांच्या इंग्रजी तीन इयत्ता कऱ्हाडलाच झाल्या" नंतर नक्कलनवीसाचें काम कांहीं दिवस करून ते रत्नागिरीला गेले व तेथून परत आल्यावर त्यांनीं कंपौंडरची नोकरी कांहीं दिवस केली व पुढें ते आपले मधले मामा यांचें बिऱ्हाड घेऊन अकोल्याला गेले असें दिसतें. तेव्हां त्यांना सोळावें वर्ष होतें. रावबहादुर महाजनींनीं पुष्कळ वर्षांनीं लिहिलेल्या आठवणींत अशा प्रकारची थोडीशी चूकभूल झाली तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

४. वरील आठवणी रावबहादुरांनीं ऐकींव माहितीवरून दिल्या हें उघड आहे. पुढें दिलेल्या गोष्टी त्यांच्या प्रत्यक्ष माहितींतील आहेत, तेव्हां त्यांत लहानशीसुद्धां चूक असण्याचा प्रायः संभव नाहीं. रा. ब. महाजनी पुढें लिहितात—"या अवधींत गोपाळरावांचे दुसरे मामा ( सदाशिवराव तात्या ) यांना अकोल्याला लोकल फंड ओव्हरसीयरची जागा मिळालेली होती. येथें स्थिरस्थावर झाल्यावर त्यांनीं आपलें खटलें घरून बोलाविलें. खटल्याबरोबर कोणी जावें असा विचार झाला, तेव्हां गोपाळराव त्याबरोबर जाण्याला एका पायावर तयार झाले. कारण, अकोल्याला हायस्कूल आहे, हें त्यांना कळलें होतें. गोपाळराव अकोलें हायस्कूलांत सन १८७२ च्या जून महिन्यांत प्रविष्ट झाले असावे. गोपाळरावांचे मामा हे माझ्या शेजारीं एका चाळींत दाराला दार लागून रहात असत. तेव्हां गोपाळरावांवर माझी देखरेख घरीं व शाळेंतही असे. मीं अकोलें हायस्कूलांत या वेळीं फर्स्ट असिस्टंट होतों. गोपाळराव दाखल झाले त्या वेळीं मि. स्कार्जी हे हेडमास्तर होते. हे मनाचे फार थोर, सहनशील —एतद्देशीयांना प्रेमानें व बरोबरीच्या नात्यानें वागविणारे होते. सर्व गुरुवर्गाला तसेच शिष्यांनाहि ते प्रिय होते. पुढें त्यांची बदली थोड्याच महिन्यांनीं जयपुरला झाल्यावर त्यांच्या जागीं उमरावती हायस्कूलचे हेडमास्तर मि. एटकिन् हे आले. हे अत्यंत कडक असत त्यामुळें कोणाला फारसे प्रिय नसत. गोपाळराव यांचा प्रत्यक्ष संबंध त्यांच्याशीं या वेळीं नव्हता; परंतु याच सुमाराला त्यांच्या मामीची आई आजारी पडल्यानें तिनें आपल्या मुलीला शेवटली भेट घेण्याकरितां बोलाविलें, व तिच्याबरोबर गोपाळरावांना जाणें भाग पडलें. आई जवळ मामी किती दिवस राहणार याचा नेम नसल्यानें व तात्यांना फिरतीचें काम असल्यानें, व अकोल्यास घरीं गोपाळरावांच्या सोईकरितां

ब्राह्मण वगैरे स्वतंत्र व्यवस्था करण्याची अडचण असल्याकारणानें, तात्यांनीं गोपाळरावांना जातांना सांगितलें, "तूं आतां कऱ्हाडासच रहा." तेथें राहाणें म्हणजे इंग्रजी विद्याभ्यासाला कायमचा रामराम ठोकणें! हें अर्थात् गोपाळरावांना मानवलें नाहीं. तेव्हां त्यांनीं मजजवळून शिफारसपत्रें घेऊन पुण्याला राहण्याचें जमेल तर पहावें म्हणून बेत केला. गोपाळरावांचें वय या वेळीं पंधरा सोळा वर्षांचें होतें. अंगयष्टि उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार होते. भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें होतें. स्वभाव मनमिळाऊ, लोकांच्या उपयोगीं पडणारा असा होता. बुद्धि चपळ व ग्राहक होती. स्मृति मध्यमावर. शब्दापेक्षां अर्थाकडे लक्ष्य विशेष होतें. अभ्यासावर लक्ष्य फार. वेळ फुकट दवडावयाचा नाहीं, असा निश्चय. तेव्हां गोपाळराव पुढें नांव काढितील, अशी माझी खातरी झाली होती. म्हणून कांहीं उदारधी पुरुषांना मीं पत्रें दिलीं. पण या वेळीं माझें स्वतःचें वय लहान, २२ वर्षांचें. अजून माझा जम अकोल्यास बसला नव्हता! गुरु म्हणून लौकिक झाला नव्हता. एम्. ए. परीक्षा पुढेंच द्यावयाची होती. तेव्हां माझ्या पत्रांना कोण पुसतो? एका सहाध्यायी मित्रानें मला लिहिलें—"पुण्यासारख्या अफाट शहरांत गरीब विद्यार्थ्यांचा निर्वाह आज आहे उद्यां नाहीं अशा चंचल धर्मबुद्धीवर होणें नाहीं. तेव्हां तुम्ही अकोल्यासच त्यांची सोय लावा." ज्या पुण्यांत गोपाळरावांनीं इंग्लिश शिक्षण सवंग देण्याची सोय काढण्यांत मोठें अंग घेतलें, जे पुढें फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले, त्यांची इंग्लिश शिक्षणाची सोय पुण्यांत झाली नाहीं, हें पुणेंकरांना आज कळलें तर काय वाटेल? कोलंबस आपलें पोर खांद्यावर टाकून माड्रिड शहरांत पूर्ववयांत याचना करीत हिंडला, तोच अमेरिकेचा शोध लावून आल्यावर केवढ्या गौरवाला पात्र झाला, याची या प्रसंगीं आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. पुण्याला राहण्याचा बेत अशा रीतीनें फसला, तेव्हां गोपाळरावांबद्दल मीं तात्यांकडे रदबदली केली. गोपाळरावांचा हूड स्वभाव, व वडिलांचा मान ठेवण्यांत ढिलाई पाहून तात्या त्यांवर रागावले होते,[1] व ते स्वतः लोकांच्या कामीं पडणारे असत,

---

१. "ह्या समयास मामांची गोपाळरावजींवर थोडीशी गैरमर्जी होण्यास किंवा दुर्लक्ष होण्यास कारण झालें होतें. पण त्याचें निमित्त गोपाळराव नव्हत. गोपाळरावांचे वडिल बंधु, ह्यांचें नांव गोविंदराव असें होतें. हे मोठे बुद्धिवान् व मेह-

तरी गोपाळरावांना या वेळीं मदत करण्याला नाराज होते. पण गोपाळरावांना मीं बोध केला, नम्रपणानें वाग असें म्हटलें. घरीं ब्राह्मण नसला तरी तात्या बाहेर फिरावयाला गेल्यावर हातानें स्वयंपाक करण्याला राजी हो—कारण मामा घरीं एकटे असतांना स्वतःच चुलीची आराधना मोठ्या हौसेनें करीत. या अटी मीं तात्यांच्या सल्ल्यानें गोपाळरावांना कळविल्या, त्या त्यांनीं पत्करिल्या व गोपाळराव पुनः अकोल्याला दाखल झाले, आणि हायस्कुलांत अभ्यास करूं लागले. तेव्हांपासून ते तीन वर्षें माझ्या वर्गांत होते. दिवसानुदिवस माझें भाकीत खरें होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. हूड स्वभावांत अंतर पडूं लागलें. पात्रापात्रतेचा विचार वाढूं लागला. चांगल्या कळकळ घेणाऱ्या गुरूंवर व आप्तांवर प्रेम जास्त वाढत चाललें, तसतशी पूज्यबुद्धीही सरसावली. पण स्पष्ट स्पष्ट मनाला खरें वाटे तें बोलण्याची संवय गुरुगौरवार्थही कमी झाली नाहीं. यामुळें कधीं कधीं त्यांचा व हेडमास्तरांचा खटकाही उडत असे, व मला मध्यस्थी करण्याचा प्रसंग येई. पुढें एक दीड वर्षानें अकोलें हायस्कूलची स्थिति सुधारली. मी एम्. ए. झालों, तेव्हां तात्यांचा मजवर भाव बसून त्यांनीं आपल्या दोन भावांना अकोल्यास आणिलें. एक भाऊ मॅट्रिकच्या वर्गांत बसले. दुसरे वकिली करूं लागले. यांची सोबत गोपाळरावांना फायदेशीर झाली.” वरील हकीगतीवरून गोपाळराव अकोल्याला प्रथम एकटेच गेले व त्यांचे धाकटे मामा दत्तोपंत हे पुण्यांत होते ते मॅट्रिकच्या अभ्यासाला अकोल्यास गेले हें उघड होतें. गोपाळराव आणि

---

नती असत. ह्यांचा इंग्रजी, मराठी व संस्कृत अभ्यास फार चांगला झाला होता व त्याबद्दलचा सर्व खर्च त्यांच्या मामांनींच सोसला होता. परंतु त्यांची अखेर फार चमत्कारिक झाली. म्हणजे रा. गोविंदरावांनीं पुढचा अभ्यास सोडून दिला; लग्न करण्याचें नाकारलें; आणि ब्रह्मचर्यव्रत धारण करून जटा वाढवून ते विरक्त बनले. ते हल्लीं गोविंदबुवा या नांवानें त्या प्रांतीं प्रसिद्ध आहेत. हातातोंडास आलेला असा मुलगा अकस्मात् प्रपंचाचे निरुपयोगी झाला म्हणून आईबापांस किती वाईट वाटलें असेल हें सांगणें नकोच. व त्याप्रमाणें मामांचाही हिरमोड होण्यास कारण झालें. तेव्हां एकाचें आजपर्यंत पालनपोषण केलें, खर्चास पुरविलें, त्यानें ही असी ध्वजा लावली, आतां दुसऱ्यास देऊन तरी काय करावयाचें आहे ? असा मनाचा ग्रह होणें हेंही साहजिकच आहे.” केरळकोकिळ, सप्टंबर १८९५.

दत्तोपंत यांची लहानपणापासून जुळलेली गट्टी मध्यंतरीं गोपाळरावांच्या दुर्दै-वानें मोडली होती ती याप्रमाणें अकोल्याच्या हायस्कुलांत पुनः जमली. या मामाभाच्यांचें परस्पर प्रेम महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत मोठें संस्मरणीय आहे यांत शंका नाहीं. रावबहादुरांनीं केलेल्या वर्णनांत गोपाळरावांची हायस्कुलांत असतांनाच्या दिवसांची काढलेली तसबीर मोठी मनोवेधक आहे; तिच्यावरून "इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार" या तत्त्वाचें निरूपण करणाऱ्या महाविभूतीची थोडीशी कल्पना आल्याशिवाय रहात नाहीं.

५. "पण स्पष्ट स्पष्ट मनाला खरें वाटे तें बोलण्याची संवय गुरुगौरवार्थही कमी झाली नाहीं." आगरकरांच्या सार्वजनिक वर्तनक्रमांतील अपूर्व सत्य-निष्ठा लहानपणापासून त्यांच्यांत मुरलेली होती हें वरील वाक्यावरून सिद्ध होतें. ही त्यांना कोणी शिकविली असेल म्हणावें तर त्यांच्या परिस्थितीवरून तसें संभवनीय दिसत नाहीं. परिस्थितीशीं टक्कर मारून ते प्रत्येक गोष्ट शिकले आणि तसें करतांना त्यांच्या नजरेखालून पुष्कळ बऱ्या वाईट गोष्टी गेल्या; पण त्यांची सत्यनिष्ठा कोणत्याही कारणानें जशी बालवयांत तशी पुढेंही थोडीसुद्धां ढळली नाहीं. गोपाळराव महाजनींच्या शेजारीं रहात तेव्हां अभ्या-सांत त्यांना साहजिकच त्यांचें सहाय्य होई "त्यामुळें गोपाळरावांच्या वर्गांत पांचसहा विद्यार्थी त्यांच्या इतकेच चलाख असतांही, त्यांवर नंबर ठेवण्याला त्यांना सहज सांपडत असे. परंतु त्यांच्यामध्यें कधीं हेवा उत्पन्न झाला नाहीं. त्यांचें परस्परांवरचें प्रेम आमरण कायम राहिलें." गोपाळरावांचा स्वभाव सत्यनिष्ठ तसा अत्यंत दिलदार होता. ते कोणाचा हेवा करीत नसत. आणि म्हणूनच त्यांचे जे सरळ स्वभावाचे लोक मित्र झाले ते कायमचे मित्र झाले. या जगांत आपण दुसऱ्यांचा हेवा केला नाहीं तरी दुसरे आपला हेवा कर-ण्याला मागेंपुढें पहात नाहींत या गोष्टीचा अनुभव गोपाळरावांना पुढें याव-याचा होता आणि जरी आपण कोणाचें वाईट चिंतिलें नाहीं तरी आपलें वाईट झालें नाहीं म्हणून दुःखी होणारे लोक जगांत असूं शकतात ही गोष्टही त्यांना कळून यावयाची होती. परंतु अकोल्याच्या शाळेंत समानवयस्क मित्रांबरोबर विद्यादेवीची आराधना करितांना अशा तऱ्हेचें कटु वातावरण त्यांच्या अनुभ-वाला आलें नाहीं. त्या वेळच्या शाळेंतील वर्गाचें व अभ्यासक्रमाचें वर्णन रा. ब. महाजनी यांनीं केलेलें आहे तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. "वर्गांत थोडीं मुलें असत. दहावर कधीं गेलीं नाहींत......वर्ग लहान असल्याकारणानें

पुष्कळ सोयी होत. रोजच्या एक्सरसाईज बुकांची तपासणी वेळच्या वेळीं होत असे. लांबलचक एक्सरसाईज देतां येत असे. आठवड्याचीं उत्तरें तपासण्यांत दिरंगाई होत नसे. तपासणी सर्वांसमक्ष प्रायः होत असल्यानें एकमेकांच्या चुका एकमेकांना कळत, व चुका काढण्यांतही एकमेक दक्ष होत. गुरूच्या भोंवतीं आठदहांचा हा घोळका दृष्टीस पडल्यानें वर्गांत शिस्तीचा अत्यंत अभाव आहे, असें वरवर पाहणाऱ्या इसमाला वाटण्याचा संभव होता; परंतु प्रश्नोत्तरें, शंका यांना सवड दिल्यावांचून विद्यार्थ्यांच्या मानसिक व नैतिक गुणांचा पूर्ण विकास होणार नाहीं, अशी शिक्षणपटु ग्रंथकारांची एकवाक्यता आहे, हें विसरतां कामा नये. अभ्यासक्रमांत वरच्या वर्गांत इंग्लिशमधून मराठींत भाषांतर करणें हा विषय नव्हता, तरी इंग्रजीचें खरें ज्ञान भाषांतर केल्याखेरीज होणें नाहीं, असा आमचा समज असल्यानें आम्ही इंग्रजीचें भाषांतर पुष्कळ करवून घेत असूं. हें भाषांतर करीत असतां गोपाळरावांच्या मराठी लेखनाच्या हातोटीला पहिलें वळण लागलें. त्यांत वऱ्हाडांतील हायस्कुलांत व्हर्नाक्युलर स्कॉलर्शिपची परीक्षा असल्यानें नवनीत, नाटकें, गद्य ग्रंथ इत्यादि ग्रंथांचें अध्ययन सहज होई. गोपाळरावांनीं दोन वर्षें ही शिष्यवृत्ति (स्कॉलर्शिप) मिळविली होती. संस्कृत व्याकरणांतील विषय पाठ करण्याचा त्यांना कंटाळा असे; पण काव्यें व नाटकें वाचण्याचा व त्यांतील श्लोक पाठ करण्याचा नाद असल्यानें त्यांनीं कमीपणा वाटूं दिला नाहीं. इतिहास त्यांना या वेळेपासून प्रिय असे. इतर विषयांतही गति बरीच असे." शिक्षणाच्या सुधारणेच्या नांवाखालीं दुय्यम व उच्च शिक्षणाचा धुरळा अलीकडच्या कित्येक अर्धवट पंडितांनीं उडवून दिला आहे त्याचा गोपाळरावांच्या वेळीं सुदैवानें अभाव होता आणि म्हणून त्यांची हायस्कुलांतील तयारी इतकी चांगली झाली. दुय्यम शिक्षणाचा अभ्यासक्रम म्हणजे ग्रंथकारांचे अर्धवट उतारे काढून उमेदवारांना त्यांचा अभ्यास करावयास लावून उतारे काढणाऱ्या बुभुक्षितांची पोळी पिकविणें असा अर्थ त्या वेळीं कोणी करीत नसे. म्हणून मॅट्रिकचे परीक्षेस बसण्यापूर्वी संस्कृत नाटकें व ग्रंथ वाचण्याची संधि गोपाळरावांच्या वेळीं मिळे. त्याचप्रमाणें ग्रंथावर नोटा लिहून चलनी नोटा मिळवण्याची घाणेरडी व निर्लज्जपणाची संवय तेव्हांच्या शिक्षकांना लागली नसल्यानें शिक्षक नेहेमीं तयारी चांगली ठेवीत व अभ्यास करण्याची मुलांना खटपट करावी लागे व खटपट झाल्यामुळें केलेला अभ्यास त्यांच्या रक्तांत मुरत असे. पुष्कळसा त्रास सोसून अकोल्याला गोपाळरावांचीं जीं तीन

वर्षे हायस्कुलांत अभ्यास करण्यांत गेलीं त्यांत त्यांना विष्णु मोरेश्वर महाजनीसारखा गुरु लाधला हें त्यांचें भाग्य होतें यांत शंका नाहीं. प्रवेशपरीक्षा होण्यापूर्वी त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें संस्कृत, मराठी व इंग्रजी या तीन भाषांशीं गोपाळरावांचा चांगला परिचय झाला होता. भाषांतर करणें या सारखें भाषाविज्ञानाला दुसरें उत्तम साधन नाहीं हें खरें आहे. निबंधलेखनही त्या वेळीं शाळांतून विशेष काळजीपूर्वक होत असे व व्याकरणाची हेळसांड बिलकुल खपत नसे. मराठी व्याकरणांत अव्यवस्था उत्पन्न करण्याची शास्त्रीय स्फूर्ति त्या काळीं कोणाला झाली नव्हती. ग्रंथ चांगला लिहितां येत नाहीं ही गोष्ट झाकण्याकरितां तो अशुद्ध मराठींत लिहून आपण व्याकरणांत क्रांति केली आहे अशी प्रौढी मिरवण्याची जुगत त्या वेळच्या साध्या भोळ्या लेखकांना सुचली नव्हती. अशा प्रकारें तीन वर्षे उत्तम अभ्यास करून व पुढील विद्याभ्यासाला लागणाऱ्या साधनांना उत्कृष्टपणें पचनीं पाडून गोपाळराव १८७५ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या प्रवेशपरीक्षेला बसले व तींत पसार झाले.

६. दत्तोपंत भागवतांची प्रवेशपरीक्षा त्याच्या आदले वर्षी म्हणजे १८७४ सालीं पसार झाली होती आणि रा. बाळ गंगाधर टिळक हे त्याच्याही पूर्वी दोन वर्षे म्हणजे १८७२ सालीं प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. आगरकरांना मध्यंतरीं अनंत विघ्नें न येतीं तर तेही दोन वर्षे अगोदर कॉलेजांत गेले असते. पण प्रवेशपरीक्षा उतरली म्हणून त्यांची संकटपरंपरा संपली असें मात्र नाहीं. रा. ब. महाजनी हे आपल्या निबंधांत लिहितातः—“परीक्षा पास झाल्यावर गोपाळरावांची पैशासंबंधीं अडचण दत्त म्हणून उभी राहिली. कारण, गोपाळरावांचे धाकटे मामा–दत्तोपंत–आदल्या वर्षी अकोल्याला येऊन मॅट्रिकमध्यें पास होऊन डेक्कन कॉलेजमध्यें गेले होते, त्यांना दरमहा २०।२५ रुपये तात्या पाठवीत असत, तेव्हां गोपाळरावांच्या कॉलेजांतील शिक्षणाचा खर्च अंगावर घेण्याची ताकद त्यांना नव्हती; कऱ्हाडच्या भाऊंचीही नव्हती; तेव्हां गोपाळरावांचे आप्त त्यांना म्हणाले “कॉलेजचा नाद सोडून द्या.” गोपाळराव म्हणाले “मी डिग्री घेतल्यावांचून राहणार नाहीं.” त्यांचा निग्रह पाहून गोपाळरावांच्या गुरुमंडळीनें आपापसांत वर्गणी करून त्यांच्या हवालीं साठ रुपये केले. एवढ्यावर कॉलेजांतील पहिल्या तीन महिन्यांचा खर्च भागेल व पुढें ते ज्यूनियर स्कॉलर्शिप मिळवतील अशी त्यांची खातरी होती. अकोल्याच्या “वऱ्हाड समाचार” कर्त्यांनींही त्यांना आपल्या वर्तमानपत्राकरितां लेख लिहिण्यास सांगितलें, व त्याबद्दल

दरमहा पांच रुपये देण्याचें अभिवचन दिलें. वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याची ही शागिर्दी त्यांनीं सुमारें सहा महिने केली. पुढें पैशाचा झरा आटला, त्याबरोबर लेखांचाही प्रवाह बंद झाला. गुरूनीं भाकीत केल्याप्रमाणें गोपाळरावांनीं ज्यूनियर स्कॉलरशिप मिळविली खरी, पण तेवढ्यावर त्यांचा निर्वाह होत नसे. गुरूनीं केलेली मदत केव्हांच संपली होती. त्यांत डेक्कन कॉलेज ग्यादरिंगनें एका निबंधाबद्दल बक्षीस लावलें होतें, तें गोपाळरावांना मिळून थोडी भर पडली होती, तीही सरून गेली होती. या वेळीं दत्तोपंत भागवत—यांचे कनिष्ठ मामा—कॉलेजांतच होते. ते, तात्या रक्कम पाठवीत तीपैकीं कांहीं गोपाळरावांना देत असावे. पण कितीहि झालें तरी गोपाळरावांचे हाल फारसे कमी झाले नाहींत. सारांश ( क्रूकनें लिहिलेल्या, संकटांना न जुमानतां ज्ञानप्राप्ति कशी करावी ) या ग्रंथांतील हृदयद्रावक उदाहरणांत गोपाळरावांचें उदाहरण साजण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. दत्तोपंत सांगतात, कधीं कधीं गोपाळरावांना एकाच सद्र्यावर निर्वाह करावा लागे. तो सद्रा पहांटेस स्नान करून धूत व वाळवीत आणि दुपारीं आंगांत घालून शाळेंत जात. विद्यादेवी प्रसन्न करण्याकरितां केवढी ही कडकडीत तपश्चर्या ! पुणें शहराजवळ गोपाळराव आणि त्यांचे थोर मित्र यांच्या पुण्याईनें फर्ग्युसन कॉलेज सुरू झाल्यानंतर विद्याभिलाषी मुलांचे वर वर्णन केलेले हाल पुष्कळसे चुकले आणि गरीबगुरिबांच्या आटोक्यांत कॉलेजांतील शिक्षण आणण्याचें कार्य फर्ग्युसन कॉलेजनें केलें यांत शंका नाहीं. गांवांत एकदोन शिकवण्या मिळवून बी. ए., एम्. ए. पर्यंत अभ्यास करणें गोपाळरावांच्या वेळीं शक्य नव्हतें. पुण्यापासून डेक्कन कॉलेज पांच मैल दूर. तेव्हां शहरांत राहून तेथें जाणें हें जमलें नसतें. गोपाळरावांचा निर्धार जबरदस्त म्हणून त्यांनीं आल्या प्रसंगाला आनंदानें टक्कर दिली. " गुरुजनांनीं दिलेल्या " साठ रुपयांत खुद्द रा. ब. विष्णुपंत महाजनी यांचा बराच मोठा भाग होता आणि त्यांच्याच प्रोत्साहनानें आणि रदबदलीनें दुसऱ्यांनीं साहाय्य केलें. त्या वेळीं साधारण मानानें गरीब मुलें कॉलेजांत जाण्याच्या फंदांत पडत नसत. डेक्कन कॉलेजांत फी व राहणी मिळवून तेव्हां पंचवीसाहून कमी खर्च येत नसे. कपडालत्ता, पुस्तकें या बाबी निराळ्या. कॉलेजांत निबंध लिहून गोपाळरावांनीं बक्षीस मिळविलें त्याप्रमाणेंच शहरांत झालेल्या वक्तृत्वसमारंभांतही त्यांनीं एक भाषण करून पन्नास रुपये मिळविले. आणि अशा प्रकारें अत्यंत हाल सोसून सरस्वतीची उपासना

करण्याच्या भरांत गोपाळरावांच्या हातून शरीरप्रकृतीची अवहेलना झाली यांत नवल नाहीं. लहानपणापासून ते हूड व खेळाडू होते. दिवसभर दांडगाई करावी, कृष्णानदींत तासचे तास डुंबावें असे अजाणतेपणाचे दिवस गेल्यामुळें त्यांची प्रकृति मूळची खरोखर निकोप होती, पण संसारसमुद्रांत वाऱ्याच्या उलट दिशेनें पोहत पडण्याचा प्रसंग आल्यामुळें ती निकोप प्रकृति कॉलेजमध्यें असतांनाच त्यांना न कळत खालावूं लागली. आजकाल कॉलेजच्या रेसिडेन्सींत राहून मस्तकस्थित केशकलापाच्या नेपथ्यविधानांसाठीं दरमहा दहापांच रुपये उडवणाऱ्या विद्यार्थ्यांना गोपाळरावांनीं कोणत्या प्रकारें दिवस काढले, याची कल्पना येणें मुष्किलीचें आहे. सुदैवानें त्या वेळीं कपड्यांचें अवडंबर फार माजलें नव्हतें व पोषाखावरून सभ्यपणा मापण्याची शिस्तही पण अमलांत आली नव्हती. रा. मोहनचंद गांधी यांच्या खादीचळवळीबाबद कोणाचा दुसरा कांहींही मतभेद असला तरी पोशाखाचें विलक्षण माजलेलें अवडंबर मोडण्याला तिचा जो उत्कृष्ट उपयोग झाला आहे त्याबद्दल त्यांना श्रेय देणें रास्त आहे. गोपाळरावांच्या वेळीं कपडालत्त्याला खर्च सध्यांपेक्षां पुष्कळ कमी लागे. तोही करण्याइतका पैसा त्यांच्याकडे नव्हता ही गोष्ट निराळी. स्कॉलर्शिप मिळाली होती ती अपुरी होती. पहिल्या वर्षाच्या परीक्षेला बसण्याला फीचे पैसे त्यांकडे नव्हते. ते कसे तरी मिळवावे म्हणून ते एक नाटक लिहूं लागले. सुदैवानें प्रो. केरूनाना छत्रे यांना ही गोष्ट कळली व त्यांनीं तावडतोब फीचे पैसे भरण्याची व्यवस्था करून गोपाळरावांना नाटक लिहिण्याच्या दगदगींतून मुक्त केलें व अशा प्रकारें त्यांना अभ्यासाला वेळ मिळाला.

७. पहिल्या वर्षाची परीक्षा उतरल्यावर कॉलेजमध्यें गोपाळरावांना थोडीबहुत स्वस्थता आली. स्कॉलर्शिप तर मिळाली व ती अधिक रकमेची होती. शिवाय त्यांच्या कर्तृत्वासंबंधीं त्यांच्या गुरुजनांची व आप्तेष्टांची खात्री झाली आणि त्यामुळें त्यांच्याकडून होणारी टीका मावळूं लागली. गोपाळरावांच्या स्वभावांत मानीपणा व तुसडपणा हे दोष लहानपणीं असावेत असें दिसतें. तुसडपणाचें व हूडपणाचें रूपांतर स्पष्टवक्तृत्वांत झालें आणि मानीपणाचें रूपांतर आत्मविश्वासांत झालें. आत्मविश्वास हा फार महत्त्वाचा सद्गुण आहे; पण तो लोकांना आवडत नाहीं आणि म्हणून आत्मविश्वास असणारा मनुष्य उद्धट आहे, किंवा बेपर्वा आहे अशी त्यासंबंधीं टीका होते, आणि जर त्याच्या हातून विश्वासाप्रमाणें कृति घडली नाहीं—ती न घडण्यांत त्याचा कांहीं

जरी दोष नसला—तर मग त्याच्या फजितीला पारावार उरत नाहीं. गोपाळराव उलट्या परिस्थितीशीं टक्कर मारून कॉलेजमध्यें गेले ते आत्मविश्वासाच्या जोरावर. जर का कॉलेजमध्यें ते थोडेबहुत अभ्यासांत घसरले असते तर कांहीं कुत्सित लोकांनीं त्यांचे वाभाडे काढण्यास कमी केलें नसतें. पण पहिल्या वर्षाचे हाल काढूनसुद्धां त्यांनीं स्कॉलरशिप मिळविली आणि पुढें एम्. ए. ची परीक्षा होईपर्यंत त्यांची गणना कनिष्ट प्रतीच्या विद्यार्थ्यांत कधीं झाली नाहीं. पहिल्या वर्षाच्या परीक्षेपर्यंत जे हाल त्यांनीं सोसले त्यामुळें त्यांच्या अर्ध्या आयुष्याचा बळी पडला असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. वयाची पंचविशी—निदान विशी लोटण्यापूर्वीं तारुण्याच्या तयारीचा काळ असतो. त्या वेळेपर्यंत सुखासमाधानानें दिवस निघाले तर माणसाची शरीरप्रकृति पुढच्या आयुष्यांत कसल्याही प्रसंगाशीं टक्कर मारण्याला टिकण्यासारखी राहते. महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत डॉ. भांडारकरांचें उदाहरण वगळल्यास आयुष्याच्या दीर्घपणांत पहिला नंबर बळवंतराव टिळकांचा लागतो व दुसरा माधवराव रानड्यांचा लागतो. दोघांचीही लहानपणीं सुस्थिति होती. जेवणाखाणाची किंवा वस्त्रप्रावरणाची काळजी करण्याचें सुदैवानें त्यांना कारण नव्हतें. गोपाळराव आगरकरांचें सगळें लहानपण निराळ्या प्रकारें गेलेलें आणि ज्या दारिद्र्याशीं झगडतां झगडतां त्यांना पुरेवाट झाली तेंच दारिद्र्य, ज्या वेळीं लक्ष्मीच्या राज्यांत त्यांना जाण्याला आडकाठी राहिली नाहीं अशा वेळीं, त्यांनीं कायमचें लेणें म्हणून अंगीकृत केलें. बी. ए. च्या परीक्षेपर्यंत त्यांच्या विचारांची दिशा कोणती होती यासंबंधीं तर्क करीत बसण्यांत फारसा अर्थ नाहीं. अभ्यास करणें व वर्षाकांठीं दोन्ही तोंडांची मिळवणी कशी करावी याचा विचार करणें यांत त्यांचा बहुतेक वेळ जाई. उरल्या वेळांत भावी आयुष्याची दिशा काय असावी याचा विचार त्यांनीं कधीं कधीं केला असला तरी त्याची विशेष वाच्यता त्या वेळीं त्यांनीं केलेली ऐकिवांत नाहीं. बळवंतराव टिळक आणि वामनराव आपटे हे दोघेही त्यांच्यापुढें दोन वर्षें होते आणि डेक्कन कॉलेजांत त्या वेळीं आणि परवा परवापर्यंत वरिष्ठ आणि कनिष्ठ वर्गांतील विद्यार्थी यांचा परस्परांशीं जो संबंध असे त्यावरून दोन वर्षांचें अंतर असणाऱ्या विद्यार्थ्यांत निकट स्नेहसंबंध उत्पन्न होणें ही गोष्ट केवळ सोपी होती असें म्हणवत नाहीं. या मंडळीचा थोडासा परिचय गोपाळरावांशीं झालेला होता. पण सर्वांचाच बहुतेक वेळ परीक्षेंत वर कसें यावें या तरतुदींत जात होता. डेक्कन कॉलेजच्या वातावर-

णांत एकांतपणा हा गुण बऱ्याच अंशांनीं आहे पण त्याच्या आजूबाजूला पसरलेल्या हडेलहप्पी लोकवस्तींत किंवा वृक्षहीन टेकड्यांत अंतःकरण उचंबळण्याचा प्रसंग क्वचित्च यावयाचा. तेव्हां सूर्यास्तसमयाला विद्यालयांतील अभ्यासाचें ओझें वसतिगृहांत ठेवून जेव्हां ही विद्यार्थिमंडळी सहल करावयास जात तेव्हां त्या अभ्यासाव्यतिरिक्त दुसरे विषय त्यांच्या संवादांत फारसे प्रादुर्भूत होत असतीलच असें म्हणवत नाहीं. अर्थात् गोपाळरावांना जगाचा पुष्कळसा खडतर अनुभव आला होता आणि त्यांनीं समाजाचें जें स्वरूप रत्नागिरीपासून अकोल्यापर्यंत पाहिलें होतें तें त्यांच्या हृत्पटलावर चित्राप्रमाणें उमटलेलें होतें. त्या चित्राची चर्चा त्यांनीं बी. ए. झाल्यावर केली हीच गोष्ट अधिक संभवनीय दिसते. तथापि त्यांच्या अंतःकरणाचा ओढा कोणीकडे होता याचें पुढें दिलेलें रा. रा. कृ. आ. गुरुजी यांनीं केलेलें वर्णन फार मनोवेधक आहे. “ कृष्णेच्या पैलतीरीं सजून कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमाजवळ वाढलेला पण अनेक प्रकारच्या दृश्यादृश्य वादळानें हेलपाटत व टक्के टोणपे खात आलेला रोपा म्हणून मागें म्हटलें आहे ते कैलासवासी गोपाळ गणेश आगरकर हे होत. यांचें व बळवंतरावजींचें स्वभावऐक्य जितकें निकट आहे तितकाच व्यवसायसंबंधही निकट आहे...त्यास वेळेवर साहाय्य ( कोणीतरी ) दिलें असतें तर दोन वर्षें अगोदर ते उदयास आले असते...... आपले सहाध्यायी...पुढें चालले व आपणांस पुढें जाण्याचें साधन नाहीं, तरी निराश न होतां ‘ काशीस जावें नित्य वदावें ’ या म्हणीप्रमाणें यांनीं अभ्यासाचा ध्यास घेतला. एकीकडे नाहीं दुसरीकडे, दुसरीकडे नाहीं तिसरीकडे असे प्रयत्न करतां करतां अखेर मॅट्रिक्युलेशन पार पडली......हा एक हप्ता झाला. असेच पुढील हप्तेही पार पाडावयाचे अशा निश्चयानें कंबर कसली, ती बी. ए. ची परीक्षा दिली तरीहि सोडली नाहीं. या सर्वांवरून यांच्या अनेक गुणांचें दर्शन होतें. त्यांतही ‘ सत्य संकल्पाचा दाता भगवान् । सर्व करी पूर्ण मनोरथ ’ या वाक्याचें स्पष्टीकरण अधिक होतें......गोपाळराव एक स्वयंप्रकाश रत्न होय. इतकीं संकटें, इतकें साहस, व इतके आयास सोसून यांनीं इतकी मजल मारली असतांही त्यांचें लक्ष स्वसुखाकडे वळलें नाहीं. त्यांचें सारें लक्ष लोकोपयोगी कृत्यांकडे लागलें होतें. यांच्या बोलण्यांत, चर्चेंत आणि वादविवादांत मुख्य विषय हाच असे. हे एम्. ए. चा अभ्यास करीत असतांना कऱ्हाडास आले होते. त्या वेळीं त्यांचे व माझे बोलण्याचे अनेक प्रसंग आले.

त्यांत असेच विषय निघत असत. ज्यांना स्वाभिमान शब्दाची किंमत माहीत नाहीं, अर्थ समजत नाहीं, 'पिछे आई सो आगे चली' अशा धोरणानें जे आहेत, ज्यांची वागणूक हाच काय तो धर्म, इतकीच ज्यांची धर्मकल्पना, इतकेंच ज्यांचें धर्मसंबंधाचें ज्ञान, अशा भटभिक्षुक लोकांत, अथवा आमच्या गृहांतील स्त्रियांत जो स्वाभिमान, जी करारी वृत्ति, जी तत्परता आणि जें औदार्य आढळतें त्यांचे सहस्रांशानेंही आमच्या आधुनिक शिकलेल्या लोकांत सांपडत नाहीं. त्यांचें पहांटे उठणें, स्तोत्रें म्हणणें, स्नानें करणें, उपोषणें करणें, भांडण झाल्यास अबोला धरणें, संकटसमयींही न डगमगणें, प्राण द्यावयाचा पण बोल सहन करावयाचा नाहीं, प्राण द्यावयाचा पण धरलेलें व्रत सोडावयाचें नाहीं, इत्यादि अनेक प्रकारें सर्व काळ रेखल्याप्रमाणें चालावें आणि आमच्या टाईमटेबलाची आणि वागणुकीची कपिलाषष्ठी कधींच येऊं नये याचा अर्थ काय ? याचा विचार करून सुधारणा करणें जरूर आहे, व या सुधारणेस प्रारंभ आपणच कां करूं नये असें ते म्हणत.

"त्या वेळीं त्यांचा पक्का निश्चय झालेला नव्हता तरी त्यांच्या मनाचा ओढा लोकोपयोगार्थ आयुष्य खर्चण्याकडे विशेष असे हें उघड होत आहे. यांच्या घरच्या एका प्रसंगाचें मला चांगलें स्मरण आहे...यांचे मामा रामभाऊ भागवत........त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणी भाषण केल्यास ते तात्काळ संतापत; ते इतके कीं त्यांचा क्रोध त्यांना आवरत नसे. एके दिवशीं गोपाळराव, कोंडो केशव मास्तर, मी व आणखी कांहीं मंडळी भाऊंचे वाड्यांत फराळ करीत बसलों असतां कोंडो केशवांनीं गोपाळरावांस विचारलें, आपण पुढें काय करण्याचा विचार ठरविला आहे ? रामभाऊ म्हणाले, सबजज्जाची जागा याला योग्य आहे. कारण याला लिहिण्याची तशीच बोलण्याची हौस आहे. या साऱ्या हौशी या जाग्यावर आल्यानें साधणार आहेत. मामलेदारींत साधणार नाहींत. शाळाखात्यांत कोठें प्रोफेसर अथवा हेडमास्तर झाल्यास मात्र साधतील, पण तें काय रडवें खातें. त्यास विचारतो कोण ? रामभाऊंचें अखेरचें वाक्य गोपाळरावांस रुचलें नाहीं तथापि तसें ( न ) दाखवितां ते हांसत हांसत म्हणाले, " कर्णाला छपरावर ठेवून कर्णाचें दातृत्व वर्णन करण्यासारखेंच भाऊ म्हणत आहेत. ज्यांच्यापासून चांगले चांगले मुन्सीफ, मामलेदार, वकील, ब्यारिस्टर निपजावयाचे तेंच जर रडवें खातें, तर मग मालावर

ऊंस लावण्यास काय हरकत आहे ? जातिवंत व जिवंत झरा आणि पर्जन्यानें सांठलेलें डबकें कधींही एक व्हावयाचें नाहीं. भाऊंना हें खातें रडवें दिसत आहे, पण तें खातें रडवें नाहीं. त्यांतील व्यवस्था आम्हांस जितकी अनुकूल आहे तितकी नाहीं व ती परकीयांकडून अनुकूल होणें शक्य नाहीं इतकेंच काय तें. ती अनुकूलता स्वतः करून घेतली पाहिजे. माझी शिक्षक होण्याची इच्छा आहे. पण ती हल्लीं चालू असलेल्या रमण्यांत शिरून दक्षिणा उपटण्याकरितां होण्याची नाहीं. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसूं लागतील अशा प्रकारच्या शिक्षकाचें काम करावयाचें आहे." भाऊसाहेब म्हणाले, " हें मनीं मांडे खाण्यासारखेंच शुष्क आहे. ज्याचे जवळ अडका नाहीं, दांतही धडका नाहीं, त्यानें बाजारांत जाऊन करावयाचें काय ? याचा विचार या तरुण मंडळीच्या मनांत येत नाहीं. 'कहां राजा भोज व कहां गंगा तेली' अशांतील व्यवस्था आहे झालें." असें म्हणत भाऊसाहेब उठले. तेव्हां गोपाळराव म्हणाले, माझें म्हणणें भाऊंना पसंत पडलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. औरंगजेबाचे कारकीर्दींत शिवाजीस लोक प्रथम असेंच म्हणत असत. बाळाजी विश्वनाथ पडशी खांद्यावर टाकून कोंकणांतून घाटावर आले त्या वेळीं त्यांच्या हातून अशा गोष्टी घडतील असें कोणास वाटलें होतें काय ? त्यांच्याच वेळीं इंग्रज आमचे राजे होतील, आम्हांस आवळा दाखवून आमचा कोहळा उपटतील, आमच्या घरांतील सुतळीच्या तोड्यापर्यंत आपली मालकी स्थापन करतील, आम्हांस पाळीव कुत्र्याप्रमाणें तुकडा टाकतील तो खाऊन आम्ही वांकडें शेंपूट करून त्यांच्यापुढें गोंडा घोळूं असें तरी कोणास वाटलें असेल काय ? मीं ज्या वेळीं मुन्सीफ कोर्टांत उमेदवार होतों किंवा हॉस्पिटलमध्यें औषधें ढवळीत होतों, त्या वेळीं एम. ए. होण्याच्या गोष्टी काढल्या असत्या तर भाऊप्रमाणेंच त्या ऐकणाऱ्यांसहि असंभाव्य वाटल्या असत्या. माझे विचार असंभवनीय आहेत असें मला वाटत नाहीं. जर योगायोग तसा आला तर मीं करून दाखवीन." गोपाळरावांची ही उमेद लक्षांत घेण्यासारखी आहे. मीं गोपाळरावांच्या अंगच्या गुणांत जें विशेष आहे म्हणतों तें हेंच. नाहीं अभ्यासाला पैसा, नाहीं पोटास अन्न, अशा स्थितींत असलें महागाईचें शिक्षण शिकून तयार व्हावयाचें, आणि या शिक्षणाची फलश्रुति करणारीं साधनें जवळ आलीं असतां आजपर्यंत केलेल्या कष्टांचें व भोगलेल्या तापत्रयांचें पार निरसन करून "सुखं च मे शयनं च मे" करण्याची आयती तयारी असतां, ती झुगारून

देऊन आपली कष्टमय स्थिति मागील अंकावरून पुढें चालू ठेवावयाची, व प्रस्तुतचे शिक्षणांतील केरकचरा काढीत बसावयाचें आणि निर्मळ ज्ञानार्जन लोकांस मिळावें म्हणून आपल्या स्वतःच्या पोटास चिमटा बसला तरी तो सोसून, तें स्वस्ताईनें मिळवून द्यावयाचें, हें साहस सामान्य मनुष्याकडून होईल काय ? या आंतबट्याचे व्यापारास प्रस्तुतच्या मन्वंतराप्रमाणें अव्यापारेषु व्यापार कोणी म्हटलें तर त्यांत दोष कोणाचा ? बळवंतरावांपेक्षां गोपाळरावांत कांहीं विशेष असलें तर तें हेंच होय हें दाखविण्याकरितांच ही गोष्ट येथें देणें योग्य वाटल्यावरून दिली आहे.'' गोपाळरावांच्या या विशेषाचा निर्देश करण्याचा प्रसंग पुढें बरेच वेळां येणार आहे. टिळकांच्या एका अतिशय अभिमान्यानें आणि टिळक आगरकरांना प्रत्यक्ष पाहिलेल्या एका सद्गृहस्थानें गोपाळरावांचें हें अंतःकरणपूर्वक वर्णन दिलें आहे व त्यांत त्यांचा निस्सीम भक्तसुद्धां भर घालूं शकेल असें वाटत नाहीं. विशेषतः गोपाळरावांचा विशेष, जो टिळकांत नव्हता, तो अचूक हुडकून काढण्यांत रा. गुरुजी यांनीं मोठी मार्मिकता दाखविली आहे यांत शंका नाहीं. विद्यार्थिदशेपासून गोपाळरावांच्या अंतःकरणांत लोकसेवेची प्रेरणा झाली होती. तिचे मार्ग जसजसा त्यांचा विचार परिणत झाला तसतसे निश्चित झाले. पण त्या प्रेरणाबळावर त्यांनीं जी सुरवात केली व राष्ट्रसेवायोगांतील ज्या अत्यंत खडतर व्रताची दीक्षा घेतली त्यांपासून ते केव्हांही अणुरेणुमात्र ढळले नाहींत.

गोपाळरावांच्या वेळीं कॉलेजांतील राहणी सध्यांच्या मानानें बरीच जुन्या पद्धतीची होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्रांत त्या राहणीचें जें वर्णन आलें आहे त्यापेक्षां तिच्यांत थोडीशी आधुनिकता आली होती. गोपाळरावांनीं कॉलेज सोडण्यापूर्वीं मि. सेल्बी हे कॉलेजचे मुख्याधिकारी झाले व त्यांची कडक शिस्त अमलांत येऊं लागली. डॉ. सेल्बी यांच्यांत विशेष बुद्धिमत्ता किंवा अगाध वाचन अशा प्रकारचा विशिष्ट वरच्या प्रतीचा कोणताहि गुण नव्हता किंबहुना स्वतःच्या विषयांसंबंधीं फाजील अभिमान व इतर सर्व विषयांसंबंधीं बेपर्वाई असा प्रकार त्यांच्याकडे होता. पण तात्या पंतोजी या दृष्टीनें ते मोठे पटाईत होते ही गोष्ट खरी. शिकवावयाच्या पुस्तकाचीं जेवढीं पानें असतील त्यांना वर्षाच्या ३६५ दिवसांतून सर्व सुट्टीचे दिवस वजा करून

१ बळवंतराव म्हणजे रा. बाळ गंगाधर टिळक.

उरलेल्या दिवसांनीं भागावयाचें व भागाकारांत जी संख्या येईल तितकीं पानें रोज शिकवावयाचीं. अशा तऱ्हेचा विचित्र हिशेबीपणा त्यांच्यांत भरपूर होता असें दिसतें. मग एखादे वेळीं एका तासांत पंचवीस पानें वाचून होतील तर दुसरे वेळीं पांच वाक्यांचें विवरण करण्याला पंचवीस तास घालवावे लागतील अशा प्रकारच्या गोष्टी त्यांच्या हडेलहप्पी डोक्यांत शिरत नसत असें म्हणतात. डेक्कन कॉलेजांत त्यांनीं शिस्त आणली यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांवर ते प्रसन्न झाले किंवा ज्यांनीं त्यांना प्रसन्न करून घेतलें अशा आपल्या कित्येक विद्यार्थ्यांची जन्माची तरतूद करण्यास ते सहसा विसरले नाहींत. सुदैवानें त्यांचा आवडता विषय हाच गोपाळरावांचा ऐच्छिक विषय असल्यामुळें व त्यांत गोपाळरावांची उत्कृष्ट गति असल्यामुळें बी. ए. झाल्यावर सेल्बीसाहेबांनीं त्यांना फेलो नेमिले. त्या वेळीं फेलोंची नेमणूक परीक्षेच्या निकालावरून होत नसे तर प्रिन्सिपालच्या मर्जीप्रमाणें होत असे व तत्वज्ञानाहून अन्यतर विषय घेणारे विद्यार्थी फेलोशिपला नालायक आहेत असें प्रिन्सिपॉल सेल्बी यांचें मत असल्याबद्दल त्या वेळीं बोलवा होती असें म्हणतात.

८. पुढें कॉलेजांत विद्यार्थ्यांचें कर्तृत्व केवळ गुर्वायत्त असतें असें मुळींच नाहीं तरी पण वरिष्ठ दर्जाचे गुरु असणें हें विद्यार्थ्यांचें मोठें भाग्य होय यांत शंका नाहीं. सेल्बीसाहेबांना पुढें मुंबई विश्वविद्यालयानें एल्एल्. डी. ची पदवी दिली त्या वेळीं रा. टिळकांच्या केसरींत साहेबमजकूरांचें जें चेष्टेच्या प्रकारानें वर्णन आलें होतें त्यावरून त्यांची छाप विद्यार्थ्यांवर किती पडली होती याचें अनुमान करितां येतें. पण त्यांच्या शिस्तीचा परिणाम चांगला होत असे व त्यामुळें विद्यार्थ्यांना टापटीप चांगली लागत असे हें खरें आहे. वरील गोष्टी खऱ्या असल्या तरी स्वतःच्या विद्यार्थ्यांबद्दल अभिमान हा मोठा गुण साहेबमजकुरांच्या आंगीं होता आणि त्याचा उपयोग आगरकर, आपटे, टिळक या मंडळीनीं न्यू इंग्लिश स्कूल व पुढें कॉलेज काढलें त्या वेळीं फार झाला. सेल्बी साहेबांचें फर्ग्युसन कॉलेजला फार साहाय्य झालें आहे. सरकारदरबारांत त्यांचें वजन विशेष असे व आगरकरांसंबंधीं त्यांना जो आदरभाव होता त्यामुळें आगरकरांच्या संस्थांना त्यांचा मोठा पाठिंबा असे. फर्ग्युसनकॉलेजकडे त्यांचें हिंदुस्थानांत असेपर्यंत लक्ष होतें व कॉलेजचे पुढें प्रमुख सभासद झालेले गोपाळराव गोखले हे त्यांची नेहमीं सल्ला मसलत घेत. मात्र १९०४ सालीं नामदार गोखल्यांनीं कर्झन साहेबांच्या युनिव्हर्सिटी बिलावर जो धडाका

उडविला त्यामुळें मात्र त्यांच्यावर सेल्बीसाहेबांचा रोष झाला असें म्हणतात. असो. गोपाळरावांच्या वेळचे बुद्धीनें व विद्वत्तेनें अत्यंत श्रेष्ठ आणि विद्यार्थिजनांत अत्यंत पूज्य आणि प्रिय असे गुरु म्हणजे प्रो. केरूनाना छत्रे हे होत. गोपाळरावांना हायस्कुलांत जसे रावबहादुर अण्णासाहेब महाजनी उत्कृष्ट गुरु लाधले त्याप्रमाणें कॉलेजांत त्यांना केरूनाना छत्रे मिळाले. केरूनानांचें वर्णन गोपाळरावांच्याच शब्दांत येथें दिलें म्हणजे त्या अलौकिक विद्वान् गुरूच्या अंगीं काय गुण होते हें जसें कळून येईल त्याप्रमाणेंच गुरुशिष्यसंबंधाविषयीं व विद्यार्थी व गुरु यांचें वर्तन कसें असावें यासंबंधीं गोपाळरावांचे विचारही कळून येतात. केसरींत प्रसिद्ध झालेल्या केरूनानासंबंधीं मृत्युलेखांत गोपाळराव लिहितात:—" पूर्वी या देशांत इंग्लंडाहून जे प्रोफेसर येत ते आतांच्या प्रोफेसरांहून अगदीं निराळया तऱ्हेचे असत. त्यांच्या तोडीचा नाहीं म्हणण्यास या इलाख्यांत काय तो एकच प्रोफेसर आहे. प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ यांच्याप्रमाणें विद्याव्यासंगांत सतत गढून असणारे व आपल्याप्रमाणें आपल्या शिष्यांचीं मनें विद्योपार्जनाकडे लावण्यासाठीं अंतःकरणपूर्वक रात्रंदिवस झटणारे त्या काळचे प्रोफेसर असत. अशा प्रकारच्या आरलेबार नांवाच्या एका प्रोफेसरापाशीं केरोपंतांनीं गणितशास्त्राच्या मूळतत्वांचा अभ्यास केला. त्यांची बुद्धि जात्या पराकाष्ठेची तीव्र असल्यामुळें व तिचा विकास होण्यास आरलेबारसारख्या गुरूचें साहाय्य मिळाल्यामुळें थोड्या दिवसांत शुद्ध व मिश्र गणितांत केरोपंतांस चांगली प्रवीणता आली व ज्योतिषादि पदार्थविज्ञानाच्या अवघड शाखांत पुढें त्यांनीं जी असाधारण कीर्ति संपादिली, तिचा आरलेबारच्या हाताखालीं बळकट पाया घातला गेला. या खंबीर पायावर टोलेजंग इमारत चढवितां येण्याजोगी केरोपंतांची नैसर्गिक बुद्धिमत्ता असल्यामुळें व तिला अनुकूल अशा बाह्य गोष्टींचें साहाय्य होत गेल्यामुळें, हा अमोलिक हिरा अज्ञातस्थानीं पडून वायां गेला नाहीं हें आम्हां महाराष्ट्रीयांचें महत्भाग्य होय...आमच्या मतें केरोपंताच्या ठायीं सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखे व अनुकरण करण्यासारखे दोन गुण होते. ते कोणते म्हणाल तर अनुपमेय विद्याव्यासंग व स्वभावसौजन्य हे होत. कदाचित् दुसरा गुण पहिल्याचा परिणामही असेल. तें कसेंही असो; आम्हांला केरोपंतांविषयीं जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली तिचें कारण त्यांच्या आंगचे हे दोन गुण होत...मानसिक श्रमापेक्षां शारीरश्रम लक्षपटीनें सोपे असल्यामुळें (व म्हणून) विद्यानंदापेक्षां विषयोपभोगाकडे शेंकडा नव्व्याण्णव लोकांच्या मनाची स्वाभाविक

प्रवृत्ति असल्यामुळें केवळ निरपेक्ष बुद्धीनें सारा जन्म विद्याभ्यासंगांत घालविणारा व विद्यानंदांत पूर्ण समाधान मानून विषयसुखांत लुब्ध न होणारा ऋषि कोटी दोन कोटी मनुष्यांत एखादाच निपजतो. केरोपंतांप्रमाणें ज्यांना विद्येचें वेड लागलेलें असतें, त्यांचा इंद्रियसुखाचा मोह तुटलेला असतो इतकेंच नव्हे तर त्यांना लौकिकाचीही पर्वा नसते. ते जे परिश्रम करीत असतात त्याबद्दल लोकांनीं आपणांस मान द्यावा किंवा त्यापासून आपणांस द्रव्यप्राप्ति व्हावी ही गोष्ट त्यांच्या मनांत कधींच वागत नाहीं. प्लेटो, आरिस्टाटल, आर्कीमेडीस, केप्लर, ग्यालिलिओ, कोपर्निकस, न्यूटन, टिंडाल, ज्यूल, पाणिनी, कणाद, भास्कराचार्य यांसारख्या जगद्हितकर्त्या विद्याव्यसनी पुरुषांस आपापल्या विषयांत गर्क होऊन राहणें व ( आपल्या ) शोधांनीं मनुष्यमात्राच्या सुखवृद्धीचा अभिलाष धरणें याहून कांहींही इष्ट नसतें. असे पुरुष ज्या विषयांच्या मागें लागलेले असतात त्यांत गुंग होऊन गेले म्हणजे त्यांस कशाचेंही भान रहात नाहीं या गोष्टीची प्रतीति केरोपंतांच्या आचरणांत आम्हांस अनेक वेळां आली होती......केरोपंतांनीं आरंभिलेले शोध पुढें चालविण्यासारखा चालू पिढींत एक मनुष्यसुद्धां आमच्या डोळ्यांपुढें दिसत नाहीं. जिकडे पहावें तिकडे पोकळ विद्येला, मिथ्या देशाभिमानाला व लज्जास्पद अधिकारवर्गाला पूर आल्यासारखा दिसतो. अधिकारमदानें बेफाम होऊन नानाप्रकारें लोकांस पीडा देणारे, किंवा स्वोन्नतीसाठीं श्वानःप्रमाणें श्रेष्ठ युरोपीयन अधिकाऱ्यांचे हात पाय चाटणारे, आमच्यांतील मोठमोठ्या हुद्यावरचे जुने सरकारी नौकर, नवीन छोटेखानी हपापलेले विद्वान्, पोटाला मिळविण्यांत, व दोन पैसे मिळाल्यास कॉलेजचे विद्येसाठीं केलेलें कर्जपाणी फेडून बाकीची माया ठ्यांकेंत टाकण्यांत, किंवा बायको बाहेर पडली म्हणजे ती अक्कडबाज दिसावी म्हणून तिला दोन दागिने करून देण्यासाठीं ती तिकडे लावण्यांत सदा दंग ! राहतां राहिलीं कांहीं म्हातारीं खोडें; त्यांना तुमच्या विद्यावृद्धीची आणि देशोन्नतीची कल्पनासुद्धां नाहीं......केरोपंतांसारखा दुसरा विद्याव्यसनी पुरुष होण्यास निदान शेंपन्नास वर्षें तरी लोटलीं पाहिजेत यांत बिलकुल शंका नाहीं...... आपलें जें ज्ञान आहे तें ज्ञानोदधींतील एका अंबुकणाइतकेंसुद्धां नाहीं अशी त्यांची समजूत असल्यामुळें, साक्रेतीसाप्रमाणें त्यांच्या वृत्तींत पराकाष्ठेची लीनता असे. चार वर्षांच्या मुलापासून एम्. ए. च्या विद्यार्थ्यांपर्यंत कोणी कसलीही शंका काढिली तरी ते तिचें समाधान करण्यास नेहमीं तत्पर असत. विद्या-

र्थ्यांस धमकावणी दाखवून अथवा अळंटळं करून वेळ मारून नेणें हें काम ज्ञानाची वृथा घमेंडी बाळगणाऱ्या गांवठी पंतोजीरावांचें, व युनिव्हर्सिटीचा छाप मिळाल्याबरोबर पुस्तकास सोडचिठ्ठी देऊन इस्पीट व सोंगट्या यांस उदार आश्रय देणाऱ्या ग्राजुएटांचें होय. केरोपंतांच्या शिकवण्यांत लटपट म्हणून कधीं असावयाची नाहीं.......सर्व विद्यार्थ्यांवर पोटच्या मुलांप्रमाणें त्यांची ममता असे, व ते वर्गांत बसले म्हणजे त्यांना आपण आपल्या मुलाबाळांत बसलों आहों असें वाटे. सत्य भाषण व सत्य आचरण हें त्यांना फार प्रिय असे. गरीबांगुरिबांस मदत करण्याविषयीं त्यांना मागें सारणारा अलीकडील विद्वानांत तर आम्हांस कोणी दिसत नाहीं. अनाथ विद्यार्थी त्यांच्या घरून पराङ्मुख कधींच गेला नाहीं. क्षमा हा त्यांच्या अंगीं अलीकडील मंडळींत न सांपडणारा गुण पूर्णपणें वास करीत होता. स्वार्थासाठीं लोकांपुढें तोंड वेंगाडण्याचा त्यांना मोठा तिरस्कार असे. कांहीं विशेष कारणाशिवाय त्यांच्या मनाची आनंदवृत्ति कधींही ढळत नसे. वाचकहो, या महात्म्याचें खरें स्वरूप शब्दांनीं व्यक्त करणें दुरापास्त आहे. नाना पेन्शन घेऊन कॉलेजांतून बाहेर पडले त्या दिवशीं त्यांच्या पायांवर डोकीं ठेवून त्यांना कडकडून भेटतांना गहिंवर न सांवरल्यामुळें, ज्या आम्हांस विलक्षण रडूं कोसळलें, त्या आम्हांस व त्या दिवशीं कॉलेजांत येण्यास घर सोडल्यापासून रडून रडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते त्या नानांस, गुरुशिष्यांमधील खऱ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव आला.'' गुरुशिष्यांच्या परस्पर प्रेमाचें हें वर्णन आजकाल कविकल्पनेच्या भरारीप्रमाणें जरी वाटलें तरी केरूनाना छत्र्यांच्या बाबतींत तें अक्षरशः खरें होतें.

९. गोपाळरावांच्या वेळीं दुसरी प्रोफेसर मंडळी डॉ० (पुढें सर) रामकृष्णपंत भांडारकर, मि. आक्सनहॅम, मि. चॅटफील्ड, मि. पील वगैरे होती. प्रो. सेल्बी हे पुढें पुढें आले हें वर सांगितलेंच आहे. या सर्व मंडळींत केरूनाना छत्रे हे विद्यार्थ्यांत अत्यंत प्रिय होते हें वर दिलेल्या उताऱ्यावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. गोपाळराव फेलो झाल्यावर दोन वर्षें कॉलेजांतच रहात होते व त्या वेळीं रा. रा. बाळ गंगाधर टिळक हे एल्एल्. बी. च्या शेवटच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं म्हणून कॉलेजांत राहिले होते आणि या दोघांचा विशेष स्नेह जमला तो या वेळीं. त्यासंबंधीं विशेष हकीगत व विवरण पुढील भागांत येईल. कॉलेजमध्यें गोपाळरावांचा अत्यंत ऋणानुबंध म्हणजे त्यांचे मामा दत्तोपंत भागवत यांच्याशीं. कॉलेजांत असतांना वामन शिवराम आपटे यांना

व गोविंद वासुदेव कानिटकर यांना गोपाळराव ओळखूं लागले. पैकीं आपटे तर पुढें गोपाळरावांचे सहकारी झाले व गोविंदराव कानिटकर हे एल्एल्. बी. ची परीक्षा पास होऊन मुन्सफीच्या नौकरींत शिरले. गोपाळरावांचा व गोविंदराव कानिटकरांचा पुढें पुष्कळ स्नेह जमला व गोविंदरावांच्या विद्याविभूषित कुटुंबिनी काशीताई कानिटकर यांच्याबद्दल गोपाळरावांना त्या वेळीं साहजिक मोठें कौतुक वाटे. त्याशिवाय रा. ब. श्री. बा. उपासनी वगैरे मंडळी याच वेळीं कॉलेजमध्यें होती. गोपाळरावांचा ऐच्छिक विषय इतिहास, तर्कशास्त्र व तत्वज्ञान हा होता आणि त्या निमित्तानें ग्रीक कालापासून तों तहत हर्बर्ट स्पेन्सर व जॉन स्टुअर्ट मिल्लपर्यंत पाश्चिमात्य तत्वज्ञांचा परिचय होण्याची त्यांना संधि मिळाली. इतिहास या विषयाची त्यांना लहानपणापासूनच गोडी होती व ऐतिहासिक कथांच्या अंतरंगांतील तात्पर्य व सिद्धांत विनचूकपणें काढण्यांत ते पुढें चांगले पटाईत झाले होते हें त्यांच्या पुढील लेखनकर्तृत्वा-वरून सिद्ध होतें. बी. ए. ची परीक्षा होण्याच्या सुमाराला गोपाळरावांचा विवाह झाला. कऱ्हाडजवळ उंब्रज म्हणून गांव आहे. तेथें राहणारे मोरभट फडके यांची कन्या अंबूताई ही आगरकरांना पत्नी मिळाली. त्यांचें सासरचें नांव यशोदाबाई. हा विवाह बी. ए. ची परीक्षा पास होण्याच्यापूर्वीं थोडे दिवस झाला. यशोदाबाई पतिनिधनानंतर दत्तोपंत भागवतांच्या आसऱ्यानें आपल्या तीन मुलांना घेऊन अकोल्यास राहिल्या. त्यांना लग्नापूर्वीं लिहितां वाचतां येत नव्हतें तें थोडेंसें गोपाळरावांनीं शिकविलें असा रा. ब. महाजनींनीं उल्लेख केला आहे. यशोदाबाई जुन्या काळच्या जुन्या चालीच्या होत्या आणि आहेत; तथापि गोपाळरावांचें आपल्या पत्नीवर फार प्रेम असे आणि त्यांच्या धार्मिक समजुतींचा त्यांनीं कधीं अवमान केला नाहीं. गोपाळ-रावांचा विवाह त्या वेळेच्या मानानें बराच उशीरां झाला याचें कारण बहुधा त्यांची दरिद्रावस्था हें असावें. बी. ए. होण्याच्या पूर्वींची आणखी एक नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे कॉलेजांत असतांना पहिल्या वर्षींच त्यांची व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची झालेली मुलाखत होय. लक्ष्मण शास्त्री चिपळूणकरकृत विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत यासंबंधीं उल्लेख आहे तो असाः—" रा. गोपाळ गणेश आगरकर...हे गृहस्थ मूळ अकोला हायस्कुलां-तील विद्यार्थी असून त्यांचा बराच अभ्यास रा. रा. महाजनी यांच्या हाताखालीं झाला होता. शिवाय गोपाळराव हे आपल्या गुरूंच्या शेजारींच रहात

असल्याकारणानें घरींदारीं मि. महाजनीसारख्या विद्वान्, बहुश्रुत व शिष्य-वर्गाविषयीं विलक्षण कळकळ बाळगणाऱ्या सद्गृहस्थांचा समागम त्यांस पुष्कळ दिवस घडला. यामुळें गोपाळराव यांचे विचार इतर विद्यार्थ्यांप्रमाणें एकमार्गी न होऊन त्यांस देशोन्नतीच्या कामीं जे अनेक उद्योग चालू आहेत त्यांत कांहींकांत तरी आपला हात असावा असा त्यांच्या मनाचा कल ते कॉलेजांत येण्यापूर्वींच झालेला दिसून येण्यासारखा होता. विष्णुशास्त्री यांची व गोपाळरावांची पहिली मुलाखत म्हटली म्हणजे दोघांची राजकीय विषयासंबंधानें मतें बहुतेक अंशीं सारखींच असल्यामुळें गोपाळरावांनीं अशाच विषयावर लिहिलेला एक निबंध विष्णुशास्त्री यांस वाचून दाखविण्याकरितां ते १८७६ साल अखेर विष्णुशास्त्री यांच्याकडे आले होते." म्हणजे पहिल्या वर्षाची परीक्षा उतरल्या-वर व दुसऱ्या वर्षाची सुरवात होण्यापूर्वीं गोपाळरावांनीं आपण लिहिलेला एक निबंध विष्णुशास्त्री यांना नेऊन दाखविला होता. गोपाळरावांच्या राजकीय मतांचें विवरण यथास्थान येईलच; पण विष्णुशास्त्री यांना राजकीय मतें म्हणून कांहीं होतीं असा तर्क करण्याला फारशी जागा दिसत नाहीं. "आमच्या देशाची स्थिति" या निबंधांत त्यांचे राजकीय परिस्थितिविषयीं विचार प्रकट झाले आहेत असें म्हणतां येईल पण ज्याप्रमाणें रानडे, टिळक अथवा गोखले यांचीं राजकीय मतें विशिष्ट होतीं तशीं शास्त्रीबुवांचीं होतीं अशांतला प्रकार दिसत नाहीं. शास्त्रीबुवा हे आपल्या कालचे प्रसिद्ध व जोरदार आणि ठसकेबाज लेखक होते आणि त्यांच्या लेखांमुळें त्यांजबद्दल तरुण पिढींत त्याच-प्रमाणें जुन्या मताच्या वृद्ध पिढींत प्रेम वसत होतें हें प्रसिद्ध आहे. आपण लिहिलेला लेख अशा प्रख्यात लेखकाला दाखवावा असें गोपाळरावांना वाटणें स्वाभाविक होतें. या पहिल्या भेटींत मुखस्तंभ आणि आंतल्या गांठीचे शास्त्री-बुवा व तडफदार गोपाळराव यांचा संवाद काय झाला व गोपाळरावांच्या निबंधाबद्दल शास्त्रीबुवांनीं काय अभिप्राय प्रकट केला हें कळण्याचा मार्ग असता तर बरें झालें असतें. कांहीं झालें तरी शास्त्रीबुवांची पहिली भेट म्हणून या प्रसंगाला गोपाळरावांच्या चरित्रांत महत्त्व आहे हें उघड आहे. वामनराव आपट्यांच्याबद्दल शास्त्रीबुवांनीं काढलेले जे उद्गार त्यांच्या चरित्रांत दिले आहेत त्यांवरून आपल्या सहकाऱ्यांबद्दलसुद्धां खासगी रीतीनें अनुदार बोल-ण्याची त्यांना संवय होती हें उघड होतें. पण मोकळ्या मनाच्या गोपाळरावांना त्या वेळीं शास्त्रीबुवांबद्दल आदराव्यतिरिक्त कांहीं इतर भावना वाटली असेल

असें म्हणवत नाहीं. पुढें केसरीपत्र सुरू झाल्यावर आगरकरांनीं शास्त्रीबुवांच्या एका लेखांत खोडाखोड केली अशा प्रकारची गोष्ट लक्ष्मणशास्त्र्यांनीं दिलेली आहे त्यावरून त्यांच्या व शास्त्रीबुवांच्या अल्प सहकारित्वांत वैमत्यप्रसंग बिलकुल आला नाहीं असें दिसत नाहीं.

१०. गोपाळरावांचा आत्मविश्वास जबर होता हें वर आलेंच आहे. त्याचप्रमाणें आपण जगांत आल्यासारखें कांहींतरी केलें पाहिजे ही जाणीव त्यांच्या मनांत सारखी होती हें स्पष्ट दिसतें. जसजसें संकटामागून संकटांतून ते तावून सुलाखून बाहेर पडले, तसतशी ही जाणीव प्रबळ झाली व तिला रूपरेखांकित स्वरूप येण्याला ते एम्. ए च्या अभ्यासाला लागल्यावर सुरवात झाली. पण एक दोन गोष्टींबद्दल यांचा कृतनिश्चय त्यापूर्वीं झाला असावा असें दिसतें. त्यापैकीं एक गोष्ट म्हणजे केवळ उदरभरणाची सोय पाहून चार दिवस मजा उडविणें हें कांहीं आयुष्याचें इतिकर्तव्य नव्हे, तर माणसानें कांहीं तरी जनसेवा केली पाहिजे. यासंबंधीं रा. गुरुजी यांनीं लिहिलेला उतारा यापूर्वीं दिलेला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे लोकांची सुधारणा करण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे शिक्षणप्रसार या तत्त्वाबद्दल अधिकाधिक खात्री पटण्याची सुरवात. कॉलेजांत असतांना गोपाळरावांनीं वाचनांत कसूर केली नाहीं ही गोष्ट त्यांच्या पुढील लिखाणावरून सिद्ध होते. स्कॉलरशिप मिळाली नाहीं तर अभ्यास थांबणार अशी त्यांची स्थिति असल्यामुळें नेमलेल्या ग्रंथांचा अभ्यास तर त्यांना उत्कृष्ट करावा लागला व त्या वेळची शिक्षणपद्धति सध्यांसारखी यांत्रिक स्थितीला पोंचली नव्हती म्हणून हा अभ्यास विद्वत्तेचा परिपोष करण्याला साहाय्यभूत होत असे. त्याचप्रमाणें गोपाळरावांची जिज्ञासा विशेष जागरूक असल्यामुळें अभ्यासाच्या ग्रंथांव्यतिरिक्त अनेक पुस्तकें त्यांनीं वाचलीं. "प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें" हें तत्व त्या वेळच्या पुढें आलेल्या सर्व मंडळींच्या मनावर पूर्णपणें बिंबलेलें होतें; आणि मिल्लसारख्या ग्रंथकारांनीं उपदेशिलेलीं सजीव तत्वें जसजशीं गोपाळरावांच्या गळीं उतरलीं तसतशी त्यांची स्वजनसेवेची इच्छा बलवत्तर होत चालली यांत नवल नाहीं. "अज्ञान हा सर्व अधोगतीचा पाया आहे" ही गोष्ट "अज्ञानामुळें लोक गुन्हेगार होतात" हें प्रतिपादन करणाऱ्या गोपाळरावांच्या रक्तांत फार पहिल्यापासून मुरली होती हें अगदीं उघड आहे. यासंबंधीं रा. ब. महाजनी यांनीं दिलेली गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. रावबहादुर लिहितातः—"लोकांत

ज्ञानाचा प्रसार करावा हा गोपाळरावांचा विचार क्षणांत झाला नाहीं. त्यांचे तिसरे मामा अनंतराव मला म्हणाले—" मीं, दत्तोपंत व गोपाळराव, त्यांच्या आजांनीं टॅवूस कृष्णेला घांट बांधला आहे, त्यावर एके दिवशीं संध्याकाळीं बसलों असतां, गोपाळराव आम्हांला म्हणाले, " तुम्ही वयांत आल्यावर काय करणार आहां ?" अनंतराव म्हणाले " आमचा कांहींच बेत ठरलेला नाहीं." गोपाळराव म्हणाले " मला असें वाटतें, कीं, आपले लोक अज्ञान आहेत, तेव्हां त्यांना शहाणे करून सोडण्याचा प्रयत्न करावा." अशी जागृति पुष्कळांना मधून मधून होते, पण व्यवहाररूपी स्वप्नांत पडल्यावर तिचा अनुभव फार थोड्यांना होतो. गोपाळरावांचें निश्चयाचें बळ हें समजावें कीं, ते ही जागृति आमरण विसरले नाहींत." या गोष्टीवरून[1] भोंवतालीं पसरलेल्या कठिण परिस्थितीबद्दल चिरड न येतां अनुकंपा वाटण्याची सुरवात गोपाळरावांच्या बाबतींत लहानपणापासून झाली होती असें दिसतें. न जाणो कदाचित् वयांत आल्यावर करावयाच्या महत्कार्यांच्या प्रकाशाचीं अंधुक किरणें अल्पवयांतसुद्धां दिसूं लागल्यामुळें कृष्णेच्या तीरावर हूडपणानें पुंडाई करणाऱ्या गोपाळरावांना विद्याभिलाषाची एवढी जबर आस्था उत्पन्न झाली व तिच्या नादानें त्यांनीं एकीकडे परप्रांतांतील अकोला व दुसरीकडे समुद्राच्या तीरावर वसलेली रत्नागिरी येथपर्यंत मजल मारून उच्च शिक्षणाच्या पाठशाळेंत प्रवेश करण्याइतकी योग्यता अनेक संकटांशीं टक्कर देऊन संपादन केली व पुनः संकटपरंपरा प्राप्त झाली असतांना निश्चयाच्या बळानें त्या पाठशाळेचीं द्वारें आपल्यासाठीं खुलीं होणें भाग पाडलें. १८७८ सालीं गोपाळराव बी. ए. ची परीक्षा पास झाले. त्या वेळीं त्यांचें वय बावीस वर्षांचें होतें. प्रपंचसंग्रामांत पडून अज्ञान व दुराग्रह या असुरांचा उच्छेद करण्यासाठीं गोपाळरावांचें उरलेलें आयुष्य जावयाचें होतें. त्याची सुरवात होण्यापूर्वीं एम्. ए. च्या अभ्यासांत जीं दोन वर्षें त्यांना घालवावीं लागलीं तीं त्यांच्या आयुष्यांत फार आनंदाचीं गेलीं. १८७९ साल हें टिळक व आगरकर यांच्या कॉलेजांतील विशेष परिचयाचें साल होय. त्या दोन वर्षांत आगरकरांचा टिळक वगैरे समानशील मित्रांशीं स्नेह वृद्धिंगत झाला, आणि फेलोशिपच्या

---

१ ही गोष्ट आणि **केरळ कोकिळांतील** दिलेली गोष्ट एकाच प्रसंगाची आहे याबद्दल शंका घेण्याचें कारण दिसत नाहीं.

उत्पन्नामुळें पैशांची ददात नसल्यानें सर्व काळ वाचन व विचार यांजकडे त्यांना देतां आला. एक दिवस अकोल्याच्या शाळेंत असतांना त्यांना घरच्या कामामुळें वर्गांत जाण्यास उशीर झाला तेव्हां विष्णुपंत महाजनी, त्यांचे शिक्षक, चेष्टेनें म्हणाले—" तुमचा काय अभ्यास होणार ! तुम्ही असेच रखडत पडणार. " तो टोला गोपाळरावांना सहन झाला नाहीं. ते लागलीच म्हणाले, "मीं आपल्यासारखा एम्. ए. झालों तरच नांवाचा आगरकर !" त्या गोपाळरावांना, एम्. ए. च्या अभ्यासाला सुरवात केल्यावर, क्षणभर धन्यता वाटली असल्यास त्यांत नवल नाहीं.

१९.८.
३६०९

# भाग तिसरा

## लोकसेवेचा आरंभ

क्षुद्राः संति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः
स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतामग्रणीः ।
दुष्पूरोदर पूरणाय पिबति स्रोतःपतिं वाडवो—
जीमूतस्तु निदाघसंभृतजगत्संतापविच्छित्तये ॥

सुभाषित

गोपाळरावांच्या फेलोशिपला व एम्. ए. च्या अभ्यासाला १८७९ सालाच्या जानेवारीपासून सुरवात झाली. दक्षिणा फेलोशिपचें उत्पन्न त्या वेळीं दरमहा ७५ रुपयांचें असे. पेशवाईच्या काळीं विद्वान् ब्राह्मणांना दक्षिणेची खैरात होत असे. तो प्रकार पेशवाई गेल्यावर इंग्रज सरकारनें कांहीं काळ चालू ठेवला. पुढें डेक्कन कॉलेज निघाल्यावर दक्षिणा बंद होऊन या फेलोशिपा म्हणजे पदवीधरांसाठीं शिष्यवृत्त्या सुरू झाल्या. कॉलेजच्या चार वर्षांच्या अभ्यासक्रमांत बी. ए. ला दोन वर्षें लागतात. त्यामुळें बी. ए. चें पहिलें वर्ष बहुतेक विद्यार्थी खेळण्यांत घालवितात, आणि या वर्षांतील सुखाची आठवण त्यांना फार दिवस राहते. त्याहीपेक्षां सुखाचा काळ म्हणजे फेलोशिपचीं दोन वर्षें होत. अर्थात् फेलो होण्याचें भाग्य प्रत्येक विद्यार्थ्याला लाधत नाहीं. पण ज्याला तें लाधतें त्याला विद्यालयीन अभ्यासक्रमाचा शेवट होण्यापूर्वी दोन वर्षें विशेष सुखानें काढतां येतात यांत शंका नाहीं. जेवढे फेलो झाले तेवढ्यांनीं अशा प्रकारें मिळालेल्या संधीचा सदुपयोग केला असता तर आमचें बौद्धिक वातावरण फारच निराळें बनलें असतें. असो. दुसऱ्या कोणीही हीं दोन वर्षें कोणत्याही प्रकारें खर्चिलीं असलीं तरी आमच्या चरित्रनायकानें त्यांचा अत्यंत उत्कृष्ट उपयोग केला यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें छळ व संकटें आणि कष्ट यांनीं खचून भरलेल्या त्याच्या आयुष्यांत हीं दोन वर्षें म्हणजे सुखाचा, निश्चिंतपणाचा आणि स्वस्थपणाचा काळ होता असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. हीं

दोन वर्षें त्यांनीं स्वस्थपणानें अभ्यास करण्यांत, वाचनांत आणि कर्तव्यचिंतनांत घालविलीं. गोपाळराव जबर वाचणारे होते व मोकळी वेळ मिळतांच तिचा उपयोग ते वाचनाकडे करीत. मिळालेल्या वेळाचा दुरुपयोग करण्याची ख्याशन आतांच्या विद्यार्थ्यांत आहे तशीच तेव्हांच्या विद्यार्थ्यांतही होती आणि रिकामटेकडेपणाचा मोह आवरून वाचन व विचार यांची कास धरणारे विद्यार्थी तेव्हांही विरळाच असत. " वाचन " या गोपाळरावांनीं लिहिलेल्या निबंधांतील पुढील उतारा प्रस्तुत विषयासंबंधीं बराच प्रकाश पाडणारा आहे. " गुरुमुखापासून होणारा फायदा विद्यार्थ्यांस फार झालें तर शाळेंत किंवा विद्यालयांत करून घेतां येतो. एकदा शाळा सुटली किंवा विद्यालयीन पदवी प्राप्त झाली म्हणजे गुरूला सोडून व्यवहारांत पडावें लागतें. व्यवहार पाठीमागें लागला म्हणजे ज्ञानसंपादनास पुस्तकांशिवाय दुसरें साधन रहात नाहीं. शिकलेल्या लोकांपैकीं शेंकडा पंचाण्णवांना नोकरींत किंवा उद्योगांत पडल्यावर वाचनाची इच्छा मुळींच रहात नाहीं, असें आमच्या सध्यांच्या स्थितीवरून दिसतें. शाळेंत किंवा विद्यालयांत जे मानसिक श्रम करावयाचे ते नौकरी किंवा धंदा मिळण्यासाठीं. तो मिळाला म्हणजे अभ्यासाची सार्थकता झाली व पुढें तो करण्याची गरज राहिली नाहीं, अशी पुष्कळांची समजूत असते. शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या भांडवलावर जन्मभर व्यापार करणारे असे अनेक लोक आहेत. त्यांना मानसिक श्रमाचा स्वाभाविकपणें फार कंटाळा असतो. धंद्यांत जाणाऱ्या वेळाशिवाय जर त्यांना थोडीबहुत फुरसत सांपडत असली तर ते ती सोंगट्या, गंजिफा किंवा बुद्धिबळें खेळण्यांत, पुनः पुनः तंबाखू चोळण्यांत किंवा विड्या फुंकण्यांत, वेडे वांकडे हेल काढीत बसण्यांत किंवा एखाद्या वाद्यावर उगीच गुणगुण करण्यांत घालवितात. कित्येकांची मजल याच्यापुढेंही जाते. कोणी गांजाचे शौकी बनतात; कोणी बाहेरख्याली निघतात; कोणाला बाटलीच्या अमलांत गुंग होऊन पडण्याचा व आपलें हंसें करून घेण्याचा नाद लागतो. असल्या दुर्व्यसनांनीं आपल्या अब्रूची, पैशाची व शरीराची खराबी करून घेऊन शेवटीं अकालिक मृत्यूच्या जबड्यांत पडणारे व बायकापोरांस उघडीं पाडणारे विचारशून्य पढतमूर्ख प्रत्येक देशांत असतात. दुर्दैवानें तशांची संख्या या देशांत वाढत चालली आहे ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय. या लोकांस असें कळत नाहीं कीं, व्यसनापासून होणाऱ्या यत्किंचित् सुखासाठीं त्यांना आपलें अतोनात नुकसान करून घ्यावें लागतें. ज्यांना सुदैवानें लहानपणा-

पासून वाचनाची गोडी लागलेली असते व जे प्रपंचांत पडले तरी फुरसत सांपडेल तेव्हां कांहींतरी वाचीत असतात, अशांची स्थिति वरील व्यसनी लोकांच्या स्थितीहून फार निराळी असते. विषयी लोकांप्रमाणें यांनाही आपल्या विषयापासून सुखप्राप्ति होते. भेद इतकाच कीं, यांचें सुख दुर्व्यसनाच्या सुखाप्रमाणें अब्रूची, शरीराची व पैशाची माती करणारें नसतें......'' आपल्या काळच्या पढतमूर्खांचें आगरकरांनीं केलेलें हें यथातथ्य वर्णन सर्व ठिकाणच्या व सर्व काळच्या पढतमूर्खांना लागू पडतें. गोपाळरावांना लहानपणापासूनच वाचनाची गोडी लागलेली होती. प्रतिकूळ परिस्थितीशीं टक्कर मारतां मारतांही ती संवय कमी झाली नाहीं किंबहुना वाढली. एम्. ए. च्या अभ्यासाच्या निमित्तानें तत्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादि विषयांवरील अनेक ग्रंथ त्यांनीं तर वाचलेच, पण त्याबरोबर त्या ग्रंथांतील प्रमेयांचा उपयोग आपल्या समाजांतील परिस्थितीसंबंधीं कसा करतां येईल याचाही ते विचार करावयास लागले. हिंदुस्थानच्या इतिहासाचा त्यांनीं फार बारकाईनें अभ्यास केला होता व आपल्या देशाच्या अवनतीचीं कारणें कोणतीं यासंबंधीं त्यांनीं विचारपूर्वक कयास बांधला होता. त्या विचारांची सुरवात या एम्. ए. च्या दोन वर्षांत होऊन ती साधारणपणें दृढावस्थेंत पर्यवसान पावली असें स्पष्ट दिसतें.

२. एम्. ए. च्या पहिल्या वर्षीं म्हणजे १८७९ सालीं घडून आलेली विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे गोपाळरावांचा रा. बाळ गंगाधर टिळक यांच्याशीं विशेष स्नेहसंबंध या वर्षीं घडला. बळवंतराव या वर्षीं कायद्याच्या शेवटच्या परीक्षेस बसावयाचे होते आणि निवांतपणें अभ्यास करण्यास मिळावा म्हणून डेक्कन कॉलेजांत येऊन राहिले होते. गोपाळराव आणि बळवंतराव यांचा जन्म एकाच सालीं झालेला; पण घरीं साधारण सुस्थिति असल्यामुळें लहानपणीं हाल वनवास काढण्याचा प्रसंग बळवंतरावांवर कधींच आला नाहीं. आणि म्हणून त्यांचा अभ्यासक्रम अव्याहतपणें चालला व गोपाळरावांच्या पूर्वीं ते तीन वर्षें प्रवेश परीक्षा उतरले. टिळकांना प्रीव्हीयसच्या परीक्षेंत एक गोता मिळाल्यामुळें त्यांच्यामधील हें तीन वर्षांचें अंतर पुढें दोन वर्षांचें झालें. कॉलेजमध्यें असतांना या दोघांची थोडीशी ओळख झालेली होती पण तिचें रूपांतर विशेष परिचयांत होणें शक्य नव्हतें. १८७९ सालीं मात्र दोघेही पदवीधर झालेले; कॉलेजच्या आवारांत वरिष्ठ विद्यार्थी म्हणूनच दोघांचाही दर्जा निराळा. अशा प्रकारें दोघांच्या स्नेहाला सुरवात होण्यास संधि मिळाली आणि बाल-

स्वभावाला अनुसरून स्वभावविरोधापेक्षां स्वभावसादृश्याचा परिणाम एक-मेकांवर अधिक होऊन त्यांची चांगली गट्टी जमली. पदवीधर झाल्यावर करा-वयाचें काय हा प्रश्न दोघांच्याही पुढें होता. टिळक बोलून चालून कायद्याच्या मागें लागले होते तेव्हां वकील किंवा मुन्सफ होण्याकडे त्यांचा कल होता असें म्हणतां येईल. परंतु निव्वळ पैशाचा धंदा किंवा नोकरी करण्यापेक्षां स्वतंत्र बाण्यानें देशसेवा करावी अशा तऱ्हेचे विचार दोघांच्याही डोक्यांत आले होते. कॉलेजमध्यें गेल्यापासूनच अशा तऱ्हेच्या विचारांची सुरवात आगरकरांच्या डोक्यांत आली होती. महाजनींनीं लिहिल्याप्रमाणें "लोकांत ज्ञानाचा प्रसार करावा हा गोपाळरावांचा विचार क्षणांत झाला नाहीं." लहानपणच्या खस्ता खाऊन शिक्षणांत थोडी बहुत प्रगति झाल्यावेळेपासूनच लोकांतील अज्ञानाचा निरास करण्याकडे आपलें आयुष्य घालवावयाचें अशा तऱ्हेची कल्पना त्यांच्यांत प्रादुर्भूत झाली होती, व त्यासाठीं आपण स्वतंत्र शाळा काढावी असें त्यांच्या मनांत पुष्कळ दिवस घोळत होतें. त्याच सुमाराला चिपळूणकरांनीं शाळा काढण्याचा बेत चालवला होता म्हणून तेही तिला मिळाले. परंतु शाळा काढ-ण्याचा विचार चिपळूणकरांनीं शाळा काढण्याचें ठरविण्यापूर्वीं कितीतरी दिवस त्यांच्या डोक्यांत होता. अज्ञाननिरास म्हणजे साक्षरतेचें दान किंवा विद्यालयीन शिक्षण असा आकुंचित अर्थ गोपाळरावांनीं कधींही केला नाहीं. तर अज्ञानाचा निरास याचा अत्यंत व्यापक अर्थ घेतल्यामुळें पंतोजीपणाचें रूपांतर सुधारकींत झालें हें साहजिक होतें. शिक्षणासंबंधीं व देशाच्या एकंदर परिस्थितिसंबंधीं जे विचार त्यांच्या मनांत घोळत होते, त्यांबद्दलची चर्चा करण्याला बळवंतरावा-सारखा स्नेही मिळाला हें त्या दोघांचेंही भाग्य होय. दोघांनाही स्वदेशाची परतंत्र व अवनत अवस्था शल्याप्रमाणें टोंचत होती. कांहींतरी स्वदेशसेवा करावी ही बलवत्तर प्रेरणा दोघांच्याही मनांत झाली होती. दोघांनाही आपापला अभ्यास करून गप्पा मारण्याला व विचारविनिमय करण्याला कॉले-जच्या वसतिगृहांत मुबलक वेळ होता व त्यांनीं ती संधि वाया घालविली नाहीं. गोपाळराव आणि बळवंतराव यांतील महत्त्वाचें साम्य म्हणजे दोघेही स्वतंत्र वृत्तीचे, आत्मविश्वासानें मुसमुसलेले, कोणाची पर्वा न करणारे, निर्भय आणि निर्भीड असे होते. अंतःकरण खुलें असतांना व मन मानेल तें बोल-ण्याची संधि मिळाल्यावर बुद्धिमान्, तेजस्वी आणि विवादपटु तरुणांचे झालेले संवाद मोठे चित्तवेधक झाले असतील यांत नवल नाहीं. स्वतंत्रपणें देशसेवा

करणें म्हणजे लक्ष्मीची अवकृपा आपल्यावर ओढून घेण्यासारखें होतें ही गोष्ट गोपाळराव जाणून होते. सार्वजनिक आयुष्यक्रमाच्या जोरावर योगक्षेम उत्तम प्रकारें चालविणारे पुढारी आधुनिक कालांत सांपडतात व गेल्या दहा पंधरा वर्षांत अशांची संख्या आपल्या देशांत वाढत्या प्रमाणांत आहे हें सर्वश्रुत आहे. गोपाळरावांच्या वेळची परिस्थिति तशी नव्हती हें एक आणि योगक्षेम अशा-प्रकारें चालविणें त्यांच्या वृत्तीला खपलें नसतें हें दुसरें. त्यामुळें देशसेवेंत पडणें म्हणजे स्वार्थाचा सर्वथा होम करणें हाच त्यांच्या बाबतींत अर्थ होता. वीस बावीस वर्षें खडतर दारिद्र्यांत घालवून आतां कोठें ते उभें झाले होते व चार पैसे कमावण्याची पात्रता त्यांच्या अंगीं आली होती. अशा वेळीं पुढील सर्व आयुष्य जाणून बुजून दारिद्र्यांत काढण्याचा निश्चय करणें ही गोष्ट सोपी नव्हती आणि सामान्य तर नव्हतीच नव्हती. असा निश्चय करण्याला अंतःकर-णाची तळमळ आणि खळबळ जबरदस्त असली पाहिजे आणि ती गोपाळरा-वांची तशी होती. त्या काळीं वकिलींत प्राप्ति मोठी होत असे. सध्यांप्रमाणें वकीलांच्या लोकसंख्येचें नियमन करण्याबद्दल चिंता करण्याचें तेव्हां कारण नव्हतें. टिळकांच्या मनांत वकील होऊन मंडलिकांप्रमाणें कमाई करावी किंवा मुन्सफी पत्करून रावसाहेब रानड्यांचा कित्ता गिरवावा असे विचार आले नव्हते असें नाहीं. असे विचार मनांत आले म्हणून त्यांच्या वास्तविक मोठेपणाला कांहीं बाधा येते अशांतला प्रकार नाहीं. टिळकांच्या चरित्रकारांनीं दिलेल्या माहितीवरून टिळकांचा वकिली करण्याचा विचार होता हें स्पष्ट दिसतें. टिळकांनीं मुन्सफाच्या नौकरीसाठीं अर्ज केला होता व तो दप्तरीं दाखल झाल्याबद्दल त्यांना सरकारकडून लिहूनही आलें होतें. आगरकरांच्या वृत्तीचा एवढासुद्धां भेद बिलकूल झाला नाहीं. असे विचारसुद्धां गोपाळ-रावांच्या डोक्यांत कधीं आले नाहींत. स्वार्थ शब्दाचा सामान्य अर्थ त्यांच्यावर केव्हांही अंमल करूं शकला नाहीं. या दोघां स्नेह्यांच्या विचारविनिमयाचा परिणाम दोघांनींही स्वतंत्रपणें देशसेवा करण्यांत आयुष्य घालवावयाचें असा निश्चय करण्यांत झाला. आगरकरांनीं हा निश्चय पहिल्यापासून केला होता. त्यांच्या विचारसरणीचा बराचसा परिणाम टिळकांच्यावर झाला याबद्दल कांहीं शंका दिसत नाहीं. टिळकांचे वडील व कै. विश्वनाथ नारायण मंडलीक हे स्नेही होते आणि आगरकरांची गांठ न पडती तर टिळक हे दाजी आबाजी खऱ्यांप्रमाणें हायकोर्ट वकील बनले असते असें मानण्याला पुष्कळ जागा

आहे. टिळक व आगरकर यांनीं स्वतंत्र शाळा काढण्याचा बेत मनांत आणला व त्यासंबंधीं काय जुळवाजुळव करावी या विचारांत ते होते. इतक्यांत याच वर्षीं नवीन शाळा काढण्याचे बाबतींत विष्णुशास्त्र्यांनीं प्रयत्न सुरू केले. शास्त्रीबुवा व ही तरुण मंडळी यांच्या गांठी पडल्या व शास्त्रीबुवांच्या स्वतंत्र शाळेची कल्पना, दोघांनाही ती आपल्या कल्पनेप्रमाणें थोडी फार होती म्हणून, आवडली. शाळा नवीन वर्षाच्या आरंभाला सुरू करण्याचें ठरलें. बळवंतराव त्या वेळीं एल. एल. बी.तून मोकळे झाले होते तेव्हां शाळेच्या सुरवातीच्या दिवशीं ते शिक्षक म्हणून हजर होते पण शाळेला एम्. ए. झाल्याबरोबर येऊन मिळण्याचें अभिवचन गोपाळरावांनीं अगोदरच देऊन टाकलें होतें व एम्. ए. ची परीक्षा पसार होतांच म्हणजे १८८० च्या शेवटच्या महिन्यांत ते शाळेला जाऊन मिळाले.

एम्. ए. ची परीक्षा पसार झाल्यानंतर त्यांनीं आपल्या मातुःश्रींना पत्र लिहिलें त्यांत या गोष्टीचा उल्लेख केला होता व "एम्. ए. झाल्यावर आपला मुलगा श्रीमंत होईल" अशी अपेक्षा न करण्याबद्दल तिला विनंति केली होती. विचारपूर्वक मनाचा निश्चय झाल्यावर मग कोणाचीही पर्वा न करितां संकल्पित कार्याच्या सिद्धतेला लागावयाचें या महात्मस्वभावाचें प्रतिबिंब या त्यांच्या पत्रांत दिसून येतें. आगरकरांनीं जी गोष्ट करण्याचें ठरविलें तें विचारपूर्वक जाणून बुजून ठरविलें. विचारांना अप्रतिहतपणें संचार करण्यास मुभा देऊन त्यांचा अभिप्राय काय येतो हें त्यांनीं पाहिलें व त्याप्रमाणें वर्तन करण्याचें ठरविलें. "गुलामांचें राष्ट्र" या निबंधांत गोपाळराव लिहितात:—"कोणतीहि गोष्ट आचारांत आणण्यापूर्वीं किंवा तिजविषयीं लोकांत चर्चा सुरू करण्यापूर्वीं ती चांगली आहे अशी ज्याच्या त्याच्या मनांत पक्की खात्री झाली पाहिजे. एकांतांत बसला आहे; स्वच्छ उदकाप्रमाणें किंवा आरशाप्रमाणें मनाचें दर्पण पुढें मांडलें आहे; आणि त्यांत प्रतिबिंबित झालेल्या विचारांचें व कल्पनांचें हुबेहूब स्वरूप अवलोकन करीत आहे; अशा स्थितींत आगंतुक विचारांचें प्रतिबिंब त्या दर्पणांत पडूं देऊन त्याच्या रूपाची व आकाराची इतरांच्या रूपांशीं व आकाराशीं तुलना करण्यास भीति कशासाठीं वाटावी? अभ्यासाच्या खोलीचें दार लावून घेऊन मनाच्या कपाटाचीं दारें खुलीं टाकण्यास व त्यांतून पाहिजे त्या विचारांस बाहेर पडूं देण्यास व पाहिजे त्यांस आंत शिरूं देण्यास ज्याची छाती होत नाहीं, तो

मनुष्य कुचक्या कसपटापेक्षांहि नादान होय असें म्हणावयास हरकत नाहीं... स्वतंत्रपणें विचार करतां करतां ते बोलून दाखविण्याचें धैर्य येतें व बोलतां बोलतां क्रिया करण्याचीही इच्छा उत्पन्न होते. मननाच्या देवडींतून जी कल्पना जोरानें निसटते ती वाचेच्या किंवा कायेच्या देवडीवरील रखवालदारांस फारशी डगणारी नसते." विचाराच्या उद्भवापासून मननाच्या मार्गानें उक्ति व कृति कशीं उत्पन्न होतात याचें हें सुंदर वर्णन लक्षांत ठेवण्यासारखें आहेच पण त्यावरून गोपाळरावांनीं "विचार" कसा केला याचीही कल्पना येते. असा पायाशुद्ध विचार झाल्यावर त्याचें पर्यवसान निःसंदेह निश्चयांत झालें पाहिजे. अर्थात् असा निःसंदेह निश्चय होण्याचें भाग्य खरोखर जे बावनकशी थोर त्यांनाच लाधतें. आगरकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर वृत्ति आनंदमय होऊन एका प्रकारें ज्यांचें देहावसान सुटतें असा एकादा महात्माच आईबापांची, गणगोताची, धनद्रव्याची, जातीची, देशाची किंबहुना सर्व मनुष्यतेची पर्वा न ठेवतां अंतरोत्थित अमर्याद प्रेरणाबलाच्या भरंवशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तें तडीला नेतो." गोपाळरावांनीं अंतरोत्थित प्रेरणाबलाच्या जोरावर लोकांतील अज्ञानाचा निरास करण्यांत आयुष्य घालवावयाचें असा याप्रमाणें निःसंदेह निश्चय केला व त्याची कृतिरूपानें सुरवात म्हणून नव्या शाळेंत शिक्षक होण्याचें ठरविलें. हा निश्चय टिळकांनींही केला व दोघांचाही निश्चय परस्परांच्या विचारविनिमयामुळें दृढतर झाला असला पाहिजे हें उघड आहे.

३. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सरकारी शाळेंतील शिक्षकाची नोकरी सोडली त्यासंबंधीं कारणांची मीमांसा येथें करण्याचें कारण नाहीं. लक्ष्मण शास्त्रीकृत त्यांच्या चरित्रांत (पृष्ठ १८४) पुढील मजकूर आहे:—"विष्णुशास्त्री हे सहा महिन्यांची रजा घेऊन घरीं होते, त्या वेळांत सरकारी नोकरी सोडल्यावर आतां पुढें काय उद्योग हातीं घ्यावयाचे ह्या विचारांतच ते होते. त्यांच्या मनांत प्रथम एक खाजगी इंग्रजी शाळा काढून तींत विद्यार्थ्यांस कमी खर्चानें व सरकारी शाळांपेक्षां कांहीं निराळ्या तऱ्हेनें शिक्षण द्यावयाचा संकल्प होता. परंतु राजीनामा पाठवून देईपर्यंत त्यांनीं हा आपला बेत कोणासही कळविला नव्हता. तो पाठवून दिल्यानंतर त्याची बातमी जेव्हां गांवांत पसरली व यापुढें विष्णुशास्त्री यांचा बेत एक नवीन धर्तीवर खाजगी इंग्रजी शाळा घालण्याचा आहे, असें डेक्कन कॉलेजांतून नुकतेंच बाहेर पडलेल्या कांहीं होत-

करू मंडळीस समजलें, तेव्हां त्यांच्या मनासही विष्णुशास्त्री यांच्या उदाहरणाचा संसर्ग लागून त्यांनाही या नवीन शिक्षणक्रांतींत आपण हात लावावा अशी सहजच स्फूर्ति झाली. हे गृहस्थ रा. टिळक, रा. आगरकर, रा. भागवत व रा. करंदीकर हे होत." या शाळेला टिळक व आगरकर यांनीं जाऊन मिळण्याचें ठरविलें; त्यासंबंधीं लो. टिळक यांचे चरित्रांत (न. चिं. केळकर, खंड १ ला, भाग ४ था, पृष्ठ १०१) पुढील मजकूर आहे:—"शास्त्रीबुवांच्या दीपज्योतीनें टिळकांच्या स्फूर्तीची ज्योत पेटलेली नसून, शास्त्रीबुवा व टिळक या दोघांच्याही ज्योति परिस्थितीच्या विद्युत्प्रवाहावर स्वतंत्रपणें पेटल्या गेल्या होत्या. टिळकांची (ना?) स्फूर्ति शास्त्रीबुवांपासून न मिळतां ती आगरकरांपासून मिळालेली होती असें एक विधान कित्येकांनीं केलेलें आमचे पाहण्यांत आहे, पण यालाहि फारसा आधार आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कसेंहि असो, शास्त्रीबुवा राजीनामा देऊन पुण्यास येण्याच्या पूर्वींच टिळक, आगरकर यांचें भावी आयुष्य सार्वजनिक कार्यांत, विशेषतः शिक्षणविषयक कार्यांत, घालविण्याचें ठरलें होतें. यामुळें शास्त्रीबुवा नवीन इंग्रजी शाळा काढणार अशी बातमी समजतांच, या उभयतांनीं शास्त्रीबुवांना भेटून आपलें मनोगत कळविलें; आणि तुम्ही शाळा काढीत असाल तर आम्हींही येऊन तुम्हांस मिळतों असें सांगितलें यांत नवल नाहीं." कोणाच्या स्फूर्तीची ज्योत कोणाच्या दीपज्योतीवर पेटली या वादांत फारसें महत्व नाहीं. शास्त्रीबुवांची कल्पना ही टिळक–आगरकरांचे संकल्प कार्यक्षेत्रांत आणण्याला निमित्तमात्र झाली ही गोष्ट निर्विवाद आहे. ही मंडळी आपल्याला मिळणार याबद्दल शास्त्रीबुवा खूप तर झालेच, पण त्यांची खुषी नवीन प्रकारची शिक्षणसंस्था आपण काढणार या विचारापेक्षां पुण्याचें हायस्कूल आपल्या शाळेमुळें रिकामें पडेल या विचारामुळें उद्भूत झाली होती असें स्पष्ट दिसतें. कारण या वेळीं लिहिलेल्या एका खासगी पत्रांत शास्त्रीबुवा लिहितात:—(मूळ इंग्रजी) "(वर लिहिलेली) मंडळी आपखुपीनें मला मिळण्यास तयार झाली आहे. आमचें निशाण उभारण्याला ता. १ जानेवारीचा मुहुर्त आम्ही मुक्रर केला आहे. या असल्या तोफखान्याच्या सरबत्तीपुढें हायस्कूल केव्हांच धुळीला मिळून जाईल." ज्या हायस्कुलांतील नोकरी आपण सोडली किंवा आपल्याला सोडावी

१ विष्णुशास्त्रीचरित्र, पृष्ठ १८५.

लागली त्या हायस्कुलांतील वर्ग रिकामे पडावेत ही इच्छा जरी सात्विक गुणांची निदर्शक नसली तरी मनुष्यस्वभावाची खास निदर्शक आहे. शास्त्रीबुवांनीं नवीन शाळा कां काढली याचें मोठें भपकेदार वर्णन त्यांच्या चरित्रकारांनीं केलें आहे तें येथें दिलें असतां बरें होईल. " विष्णुशास्त्री यांनीं यापुढें जे नवीन उद्योग सुरू केले त्या सर्वांमध्यें मोठा उद्योग म्हटला म्हणजे न्यू इंग्लीश स्कूल ह्याची स्थापना हा होय. सरकारी शाळांतून जें शिक्षण मिळतें त्याची मर्यादा अर्थात्च सरकारच्या हुकमांनीं नियमित केलेली आहे. डायरेक्टर काय, हेडमास्तर काय आणि असिस्टंट मास्तर काय, सर्वांसच त्यांस योग्य वाटेल त्या पद्धतीनें शिक्षण देण्याची मुळींच मोकळीक नाहीं. हिंदुस्थान सरकारनें जी एकंदर शिक्षणपद्धति १८३५ सालीं घालून दिली तीच सर्व देशभर चालू आहे. ती युरोपांतील चांगल्या चांगल्या सुधारलेल्या देशांतील शिक्षण-पद्धतीच्याच धर्तीवर बनविलेली असून ती पुष्कळ अंशीं चांगली आहे यांत संशय नाहीं; परंतु या पद्धतींत जे दोष आहेत त्यांतील मुख्य हे होते कीं, या पद्धतीनें विद्यार्थ्यांचें ज्ञान मात्र वाढतें व तेवढ्यावरून त्यांच्या हातून नेहमींच्या व्यवहारांतील साधारण भाग बऱ्याच रीतीनें पार पडतो; परंतु स्वाभिमान, स्वदेशप्रीति, आपल्या ऐतिहासिक पुरुषांविषयीं आदर वगैरे उच्च मनोवृत्ति या सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होणें म्हणजे कठीणच खरें ! असले विद्यार्थी कॉलेजांतून बाहेर पडले म्हणजे ते स्वदेशाविषयीं बहुतेक उदासीनच असतात. स्वतःच्या देशाच्या इतिहासाचें अज्ञान असल्यामुळें त्यांमध्यें स्वदेशाभिमान जो जागृत व्हावयाचा तो केवळ ह्याम्डन्, वाशिंगटन वगैरे परदेशस्थ थोर पुरुषांच्या चरित्रांपासून व्हावयाचा. आपल्या देशांत पूर्वींचें अभिमान धरण्यासारखें फारसें कांहीं नाहीं असा त्यांचा ग्रह होऊन, इंग्लिश लोकांच्या अलौकिक ज्ञानानें, त्यांच्या अपरंपार राजसत्तेनें, त्यांच्या अचाट उद्योगांनीं, त्यांच्या आंगच्या साहसादि अनेक गुणांनीं आपले तरुण विद्वान् लोक अगदीं दिपून जाऊन आपण कोणत्या कोपऱ्यांतील चिटोरा अशी आपणां स्वतःविषयीं, व आपल्या पूर्वजांविषयीं त्यांची कल्पना होऊन जाऊन व आपल्या पुढील प्रजेच्या अभ्युदयाविषयीं निरुत्साह होऊन सध्यां जी आपणांस अर्धी चतकोर भाकरी मिळत आहे, त्यांतच सुख मानून घ्यावें, अशा त्यांच्या समजुती होतात, हें साहजिकच आहे. याशिवाय मेकॉले, मिल्ल वगैरेंच्या ग्रंथांच्या वाचनापासून या समजुती अर्थात्च दृढ होण्यासारख्या आहेत. सरकारी हायस्कुलांतून

मेकॉले याचें वारन् हेस्टिंग्ज किंवा क्लाईव्ह हे निबंध शिकवितांना त्यांतील प्राचीन आर्यविद्या, बंगाली लोक, हिंदुस्थानची दरिद्रावस्था वगैरे संबंधानें साहेब मजकुरांच्या चुकीच्या समजुती होत्या हें विद्यार्थ्यांस सिद्ध करून देण्यास सरकारी हायस्कुलांतील किती शिक्षकांचें धैर्य होत असेल कोण जाणे. तेव्हां निबंधमालेंतील स्वतंत्र मतांचा शिक्षणद्वाराहि प्रसार करून इंग्रजी ग्रंथकारांच्या व वर्तमानपत्रकारांच्या एकतर्फी मजकुरानें होतकरू विद्यार्थ्यांच्या मनावर होणारे दुष्ट संस्कार हे काढून टाकतां यावे, त्यांचे मनांत स्वदेशाभिमान जागृत व्हावा, सरकारावर सर्वथैव भिस्त टाकून सर्व जन्म आळसांत व ख्यालीखुशालींत न काढतां त्यांच्या आंगीं स्वावलंबन, सतत उद्योग, साहस वगैरे गोष्टींविषयीं प्रीति उत्पन्न व्हावी व त्याचप्रमाणें स्वतःच्या प्रत्यक्ष उदाहरणावरून आपल्या विद्यार्थ्यांस नवीन ग्रंथरचना करून देशभाषा उर्जितदशेस आणण्याची इच्छा व्हावी, व आपण जो उपक्रम केला आहे त्याचाच त्यांनीं अधिकाधिक प्रसार आपल्यामागें करावा, असा विष्णुशास्त्री यांचा न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करण्यांत मुख्य उद्देश होता[१]." त्याबरोबरच या शाळेंतून आपल्याला सरकारी नोकरीपासून मिळणाऱ्या पगाराइतकी तरी बरकत येईल कीं नाहीं हा व्यावहारिक विचार करण्याला स्वदेशाभिमानाच्या या भरांत देखील शास्त्रीबुवा विसरले नाहींत. राष्ट्रीय शिक्षण या संज्ञेबद्दल गेल्या वीस पंचवीस वर्षांत ज्या कल्पना महाराष्ट्रांत उद्भूत झाल्या किंवा वावरल्या त्याहून अधिक असंदिग्ध कल्पना शास्त्रीबुवांच्या डोक्यांत होत्या असें दिसत नाहीं. कांहींही असो, या नवीन शाळेच्या द्वारें शिक्षणप्रसार करतां येईल, म्हणून आगरकर वगैरे मंडळींनीं शाळेला मिळण्याचें ठरविलें. खुद्द आगरकरांच्या अंतःकरणांतील हेतूबद्दल मुळींच शंका नाहीं. "गोपाळराव आगरकरांनीं......विद्यार्थिदशेंत गरीबीशीं सतत झुंज करून यश संपादिलें होतें व आमरण गरिबींतच आयुष्य कंठून अध्यापक वृत्तीनें पुराण ऋषींचें अनुकरण करून तीस उज्ज्वल करावयाचें असें व्रत घेतलें होतें" अशा प्रकारचे स्पष्ट उद्गार रा. ब. विष्णुपंत महाजनींनीं काढले आहेत व त्यांच्या यथार्थतेबद्दल शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं. शाळा स्थापन करण्यापूर्वी उत्पन्नाच्या बाबीचे हिशेब करीत बसणारे शास्त्रीबुवा "शिक्षणक्रांति" करण्याच्या कामांत गुंतले होते हें म्हणणें अतिशयोक्ति

१ विष्णुशास्त्रीचरित्र, पृष्ठ १८७.

अलंकारामार्गेसुद्धां खपण्यासारखें जरी नसलें तरी त्यांना जाऊन मिळालेली तरुण मंडळी केवळ स्वदेशप्रेमानें प्रेरित होऊन व तारुण्याच्या उषःकालांतील उत्साहातिरेकानें व्याप्त होऊन त्यांना मिळाली याबद्दल वैमत्य होणार नाहीं. सरकारी शाळा व ज्यानें आपल्याला कःपदार्थाप्रमाणें वागविलें तो तिचा मुख्याध्यापक यांची फटफजीती उडवावी असल्या बाष्कळ व पोरकट आणि आचरट मनोवृत्तीचा टिळक-आगरकरांना संपर्कही नव्हता. आपण निर्मळ तसें जग निर्मळ असें तरुणपणीं प्रत्येकाला वाटतें आणि अशा मनःस्थितींतच शास्त्रीबुवांना थोर समजणारे हे उभयतां पदवीधर त्यांच्या शाळेंत शिक्षक होण्यास कबूल झाले. या सुरवातीच्या दिवसांचें वर्णन टिळकांनीं केलेलें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ( पहा, टिळकांचा राजीनामा, परिच्छेद ५. ) यावरून एक महत्वाची गोष्ट लक्षांत येते ती अशी कीं, केवळ शास्त्रीबुवा व टिळक यांना पहिल्या वर्षीं देखील शाळा चालविण्याचें काम फार कठीण गेलें व वा. शि. आपट्यांसारख्या पंडितावांचून ती चालणार नाहीं ही टिळकांची बालंबाल खात्री झाली. आपटे प्रथम नोकर म्हणून आले पण पुढें आगरकरांच्यामुळें ते शाळेला कायमचे येऊन मिळाले. केवळ टिळकांच्यावर विसंबून येण्याचें त्यांनीं नाकारलें होतें आणि शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेबद्दल फारसा आदर नसल्यामुळें त्यांच्या हाताखालीं काम करण्याला ते नाखूप होते. पण त्यांची तर शाळेला फार जरुरी होती म्हणून त्यांना सुपरिंटेन्डन्ट हा नवीन हुद्दा देण्यांत आला. शाळेच्या पुढें झालेल्या उत्कर्षाचें शिक्षणाच्या व शिस्तीच्या बाबतींतील श्रेय आपट्यांकडे गेलें याचें हा उतारा वाचणाऱ्यांना आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. टिळक त्यांत लिहितात; "पण (ती वेळ जवळ येत चालली तशी) रा. भागवत व रा. करंदीकर यांना ही योजना यशस्वी होण्याबद्दल शंका वाटूं लागली व या धंद्यांत पडून सुखानें पोटापुरतें मिळेल हें त्यांना शक्य वाटेना. अशा स्थितींत ता. १५ डिसेंबर १८७९ रोजीं विष्णुशास्त्री यांनीं स्वतः व आपले सहकारी यांचेतर्फे जी उद्देश पत्रिका म्हणून प्रसिद्ध केली त्यांत कोणाचींही नांवें घातलीं नाहींत.......ता. १ जानेवारी १८८० रोजीं शाळा उघडण्याचे वेळीं विष्णुशास्त्री आणि मी असे आम्ही दोघेच होतों. या सुमाराला रा. नामजोशी हे आम्हांला येऊन मिळाले.........१८८० च्या पहिल्या टर्ममध्यें त्यांनीं आमच्या बरोबर काम केलें. काम आमच्या शक्तीबाहेरचें होतें. मी पुष्कळांना........आम्हांला येऊन मिळण्याबद्दल सांगितलें, पण कोणीच कबूल

होईना. तेव्हां तें अम्हांला कसेंबसें रेटावें लागलें. दुसऱ्या टर्मच्या सुरवातीला आमच्या कार्याला अधिक माणसें मिळतील याबद्दल मी तर बहुतेक निराश झालों होतों, पण आपट्यांनीं प्रथम नाकारलें होतें तरी परिस्थितिमुळें त्यांनीं येण्याचें कबूल केलें; पण आम्हांला पगार फार थोडा मिळत असे म्हणून कांहीं महिने जास्ती पगारावर आपटे नोकर म्हणून राहिले. पुढें आगरकरांनीं जेव्हां त्यांना खात्रीपूर्वक सांगितलें कीं मी शाळेला मिळण्याचें ठरविलें आहे तेव्हांच ते संस्थेला कायमचे येऊन मिळाले."

४. तात्विक विषयासंबंधीं दिवसभर ज्याबरोबर आपण गप्पा मारतों व ज्या वेळीं त्याचें व आपलें पुष्कळ बाबतींत मतैक्य होत असतें त्यावेळीं त्या माणसाच्या स्वभावाची ओळख आपल्याला घडण्याचा प्रायः संभव नसतो. शास्त्रीबुवांच्या स्वभावाची प्रत्यक्ष माहिती गोपाळरावांना त्यांच्या सहकारितेनें काम करण्याचा प्रसंग येईपर्यंत होण्याचें कांहीं कारण नव्हतें. त्यांच्या लेखांबद्दल कौतुकबुद्धि व कदाचित् त्यांच्या नोकरी सोडण्याबद्दल ( त्या बाबीची इत्थंभूत हकीकत माहीत नसल्यामुळें ) वाटणारा आदर यामुळें त्यांच्याशीं सहकारिता करावी अशी बुद्धि गोपाळरावांना झाली. एखादी शाळा काढावी व तेथें विद्यार्थ्यांना कमी खर्च लागावा असे विचार गोपाळरावांच्या मनांत आले होते व त्या विचारांना टिळकांकडून दुजोरा मिळाला होता. इतक्यांत शास्त्रीबुवांची शाळा निघणार असें ऐकल्यावर आपण निराळी शाळा काढण्यापेक्षां सुरू होत आहे त्या शाळेंत जावें असें त्यांनीं ठरविलें. या व असल्या विषयांची चर्चा करीत असतांना सरळ अंतःकरणाच्या गोपाळरावांना टिळकांच्या अंतरंगाची पूर्ण कल्पना यावी हें सुलभ नव्हतें. टिळकांच्या स्वभावाचा पुढें पुढें जो विकास होत गेला व बरोबरीच्या माणसांत वागतां येण्याची त्यांची अशक्यता जी कांहीं काळानें सर्वांच्या लक्षांत आली त्या स्वभावाचीं बीजें त्यांच्या निकटवर्ती विद्यालयीन बंधूंना माहीत नव्हतीं असें दिसत नाहीं. कारण "सैतान" या नामाभिधानानें त्यांचा निर्देश त्यांचे मित्र करीत असें त्यांच्या चरित्रकारानेंच नमूद करून ठेविलें आहे.[२] त्याचप्रमाणें वामनराव आपट्यांबरोबर अभ्यासाच्या बाबतींत त्यांची असलेली चुरस कधीं

१ केळकरकृत टिळकचरित्र, खंड पहिला, पृष्ट १९३. २ टिळकचरित्र, खंड पहिला, पृष्ठ ३०.

कधीं केवळ विद्यालयांत हुषार मुलांत दिसून येणाऱ्या चुरसीपेक्षां अधिक व्यापक स्वरूपाची होती हें गोपाळरावांना या वेळीं माहीत असण्याचें कारण नव्हतें. अपरंपार अहंकार, परमावधीची परोत्कर्षासहिष्णुता आणि जें जें उत्तम किंवा स्तुत्य आहे त्याबद्दल अतोनात हेवा आणि उभ्या जगाचा कारभार केवळ आपल्या मर्जीप्रमाणें चालावा अशी महत्त्वाकांक्षा आणि या सर्वांना सतत उजळा देणारी कुत्सितबुद्धि इत्यादि गुणांचा टिळकांच्या ठिकाणीं पुढें पुढें जो उत्कर्ष होऊं लागला त्यांची सुरवातीला बीजरूपानें आगरकरांना आपल्या सालस स्वभावामुळें कल्पना येणें जसें शक्य नव्हतें; त्याचप्रमाणें या गुणांचा अभ्युदय टिळक जसजसे मोठे होऊं लागले तसतसा त्यांच्या ठिकाणीं होऊं लागला असेंही म्हणतां येईल व त्यांच्यासंबंधीं चांगली कल्पना करून तसेंच गृहीत धरणें प्रशस्त दिसतें. कांहींही कारणामुळें गांवांतील छिद्रान्वेषी आणि गावगुंड कुटाळांचा वेढा हळू हळू टिळकांभोंवतीं पडूं लागला व त्यांच्या आंगच्या गुणांची सावली त्यांच्यावर पडूं लागली. स्वतःची स्तुति ऐकण्याची हाव असलेल्या माणसाला ती स्तुति करणाऱ्याकडून होणारी परनिंदा प्रथम निमूटपणें ऐकावी लागते व पुढें ती परनिंदा सत्यावर उभारलेली आहे असें समजण्याची संवय त्यांना साहजिकपणें लागते. तसाच कांहींसा प्रकार टिळकांच्या बाबतींत झाला असावा असें मानणें प्राप्त आहे. कांहींही असलें तरी सुरवातीला या परस्परांची जी गट्टी जमली ती विचारसाम्यामुळें हें उघड आहे. आगरकर आणि टिळक यांच्याप्रमाणेंच वामन शिवराम आपटे हेही नव्या शाळेला येऊन मिळाले. सरकारी नोकरी मिळण्याबद्दल निराशा झाल्यामुळें कंटाळून ते आपल्या शाळेला मिळाले असें शास्त्रीबुवांनीं एका खासगी संभाषणांत म्हटलें आहे.[1] सरकारी नोकरी सोडावी लागल्यामुळें आणि सरकारी शाळा ओस पाडण्याच्या उदार बुद्धीमुळें नवीन शाळा काढण्याचा खटाटोप ज्या गृहस्थानें केला त्यानें तरी असले कुत्सितपणाचे उद्गार आपल्या शाळेस येऊन मिळालेल्या व विद्वत्तेनें आपले गुरू शोभले असते अशा आपट्यांबद्दल काढण्याची जरुरी नव्हती. परंतु एवढी विद्वान् मंडळी शाळेंत सामील झाली त्यामुळें सरकारी शाळेची आपण भंबेरी उडवूं असा एकाप्रकारें संतोष झालेले क्षुद्रमनस्क शास्त्रीबुवा हीं मिळालेलीं मोतीं नाकापेक्षां जड तर होणार नाहींत

१ विष्णुशास्त्रीचरित्र, पृष्ठ १९६.

ना अशा भयानें थोडे फार गांगरून गेले असतील हेंही संभवनीय आहे. याच वेळीं शाळेंत आलेले आणखी एक गृहस्थ म्हणजे माधवराव नामजोशी हे होत. नामजोशी हे चांगले खटपटे होते व ते किरण म्हणून वर्तमानपत्र चालवीत असत. औद्योगिक बाबतींतही त्यांचें लक्ष असे व पुढें त्यांनीं पेन्सिलीचा कारखाना काढण्याचा यत्न केला होता. शाळेचीं कामें करण्यांत ते तरबेज होते. त्यांचा शाळेला व पुढें कॉलेजला चांगला उपयोग झाला ही गोष्ट जितकी खरी तितकीच त्यांची योग्यता खटपट्या माणसाहून अधिक नव्हती हीही गोष्ट खरी दिसते. यांची आणि टिळकांची गट्टी फार लौकर जुळली व अखेरपर्यंत ते टिळकांना चिकटून राहिले. बरोबरीच्या माणसांबरोबर टिळकांचें सूत जमत नसे हा सामान्य सिद्धांत सर्वमान्य झालेला आहे. त्यावरून सहजच निष्कर्ष निघतो कीं, नामजोशी यांची योग्यता या सर्वांच्या मानानें फार कमी होती. पण कोणत्याही कारखान्याला कांहीं खटपटे लागतात आणि त्या दृष्टीनें शाळेला पहिल्यापासून नामजोशांसारखे व्यवहार जाणणारे खटपटे मिळाले ही गोष्ट अर्थात् उपकारकच झाली. शाळा निघाल्यावर शास्त्रीबुवांनीं लौकरच पुस्तकें विकण्याचें दुकान काढलें. अर्थात् या दुकानांत बहुतेक शालोपयोगी पुस्तकांचा भरणा असे व शाळेंतील मुलें गिऱ्हाईक असल्यामुळें तें चांगलें चालण्यास हरकत नव्हती. यावरून शाळा काढण्यांत शास्त्रीबुवांची दृष्टि "राष्ट्रीय" कितपत होती याचें संशोधन करण्यास मदत होते. १८८० साल संपतां संपतां आगरकरांची विद्यार्थिदशा संपून त्यांचा शिक्षकाचा व्यवसाय सुरू झाला व तो मरेपर्यंत राहिला. असो. केवळ शाळा चालवून हायस्कूल ओस पाडावयाचें एवढीच इच्छा शाळेला येऊन मिळालेल्या मंडळींची नव्हती. एक दोन वर्तमानपत्रें काढून आपल्या मतांच्या प्रसाराचें काम केलें पाहिजे, व शाळेचें काम करून तें करतां येईल, अशा तऱ्हेचें म्हणणें विशेषेंकरून गोपाळराव आगरकर आणि वामनराव आपटे यांचें होतें. आणि दोघांच्याच आग्रहावरून केसरी व मराठा या अनुक्रमें मराठी व इंग्रजी पत्रांचा जन्म झाला. अर्थात् या पत्रांना जन्म देण्याचें श्रेय विष्णुशास्त्री आणि टिळक यांच्याकडे जात नाहीं. आगरकर आणि आपटे यांच्या मनोदयाला मूर्त स्वरूप देण्यांत त्यांचें साहाय्य झालें ही गोष्ट निर्विवाद आहे व ती त्या वेळीं सर्वांत जो एकोपा होता त्याची निदर्शक होती हें उघड आहे. वरील हकीकतीवरून शाळेंत शिकविण्याखेरीज बाहेरचीं कामें घेण्याचा परिपाठ या मंडळींत पहिल्यापासून पडला हें स्पष्ट होतें. आणि शास्त्री-

बुवांचीं बाहेरचीं कामें म्हणजे बहुधा आपल्या उत्पन्नांत भर घालणारीं असत. या मुद्यासंबंधीं पुढें—टिळकांच्या राजीनाम्याच्या प्रकरणाची चर्चा करतांना—विशेष विचार करावा लागेल.

५. आपटे आणि केळकर यांच्या विशेष आग्रहामुळें मंडळींनीं एक इंग्रजी व एक मराठी अशीं दोन साप्ताहिक वर्तमानपत्रें काढण्याचें ठरविलें. त्यासंबंधीं छापखान्याची वगैरे पैदास करण्यांत माधवराव नामजोशी यांचें पुष्कळ साहाय्य झालें. नामजोशी "किरण" म्हणून पत्र चालवीत. अर्थात् कोणत्या कां दर्जाचे असेनात ते लेखक होते. त्यांनाही या नवीन जोमदार मंडळीच्या साहाय्यानें वर्तमानपत्र निघावें असें वाटणें स्वाभाविक होतें आणि त्यामुळें त्यांनीं नवीन योजनेला पाठिंबा दिला. केसरी आणि मराठा हीं पत्रें जानेवारी १८८१ सालीं सुरू झालीं. मराठ्यानें रविवारीं म्हणजे केसरीच्या पूर्वीं दोन दिवस आपल्या जीवितयात्रेला सुरवात केली. अमुक पत्राचा अमुक संपादक अशी अगदीं निश्चित स्वरूपाची व्यवस्था त्यावेळीं झाली होती असें दिसत नाहीं. तथापि सुरवातीपासून केसरीचें संपादकत्व आगरकरांच्याकडे आलें व १८८७ सालापर्यंत तें त्यांकडे होतें. मराठी वर्तमानपत्रांना ऊर्जित स्थिति येण्यास आगरकरांचे परिश्रम पुष्कळसे कारणीभूत झाले ही गोष्ट खुद्द टिळकांनीं आगरकरांच्या मृत्युलेखांत नमूद करून ठेविलेली आहे. आगरकर केसरीचे केवळ जनक उत्पादक नव्हते, तर केसरीच्या जन्मापासून तो सात वर्षांचा होईपर्यंत त्यांनीं त्याची जोपासना फार उत्कृष्ट प्रकारें केली आणि त्यांच्या लेखनकौशल्यामुळें केसरी पत्राची इभ्रत सर्वत्र वाढून त्याचा खपही अधिकाधिक होऊं लागला. सुरवातीच्या पांचसहा वर्षांत केसरींत आगरकरांच्या सहकाऱ्यांचे लेख पुष्कळ वेळां आले; पण लहान मुलाचे लाड करणारीं कितीही माणसें असलीं तरी त्याची जोपासना त्याच्या आईच्या प्रयत्नामुळें होत असते त्याप्रमाणें यद्यपि केसरीवर चिपळूणकर, टिळक, आपटे, केळकर, गोळे वगैरे सर्वांचें प्रेम होतें तरी तो जो वाढीला लागून त्याला बाळसें धरलें व त्याची प्रभा शुक्लेंदुप्रमाणें वाढत चालली याचें कारण आगरकरांची लेखणी हेंच मुख्यत्वेंकरून होय. आगरकरांच्या अंगीं लेखनकलेचा प्रादुर्भाव त्यांच्या बाळपणांतच झालेला होता. कऱ्हाडला शाळेंत शिकत असतांना म्हणजे वय बारा तेरा वर्षांच्या आंत बाहेर असतांना त्यांनीं कांहीं निबंध लिहून तेथें नागपूरकर म्हणून मुन्सीफ असत त्यांच्या घरीं सभा भरत, त्यांत वाचले होते व तेथें जमलेल्या मंडळींनीं त्या निबंधांची तारीफ केली ही माहिती पूर्वीं दिलेली आहेच.

कऱ्हाडच्या सभेंत जमणारीं माणसें हीं मोठीं विद्वद्रत्नें होतीं असें समजण्याचें कारण नाहीं व गोपाळरावांनीं बाराव्या तेराव्या वर्षीं लिहिलेल्या निबंधांत कांहीं अपूर्व असेल असेंही समजण्याचें कारण नाहीं; परंतु लेखणीचा लेख लिहिण्यांत उपयोग करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत बाळपणापासून होती व पुढें तिला अभ्यास व अनुभव यांची जोड मिळून तिचें पर्यवसान उत्कृष्ट लेखनकौशल्यांत झालें. केसरीच्या पूर्वी मराठींत वर्तमानपत्रें नव्हतीं अशांतला भाग नाहीं. पण केसरीचा जन्म म्हणजे मराठी वर्तमानपत्रांच्या इतिहासांत क्रांतिचिन्ह यांत शंका नाहीं. केसरींत बातम्या येत, पण केसरींतील मुख्य लेखांत जो विचारांचा स्वतंत्रपणा आणि नवीनपणा असे त्यांचें त्यापूर्वीच्या पत्रांत अनास्तित्व होतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं निबंधमालेच्या द्वारें उत्कृष्ट लेखक म्हणून लौकिक मिळविला होता आणि त्या लौकिकाचा ते केसरी काढणाऱ्या मंडळींत प्रमुखस्थानीं असल्यामुळें नवीन वर्तमानपत्राला साहजिक उपयोग झाला. पण वर्तमानपत्रांतील एक दीड रकान्याच्या लांबीचे आणि तेही प्रचलित विषयांवर लेख लिहिण्याची शास्त्रीबुवांना विशेष आवड नव्हती. ते जगते वाचते तर वर्तमानपत्रांतही उत्कृष्ट लेख लिहिण्याची लकब त्यांना साधली असती किंवा नाहीं या प्रश्नाचें निश्चित उत्तर देणें शक्य नाहीं. निबंधमाला आणि केसरी यांच्या स्वरूपांत जें अंतर तेंच शास्त्रीबुवांच्या आणि त्यांच्या नवीन सहकाऱ्यांच्या लेखनसरणींतील अंतर. केसरी पत्रांत या नवीन पदवीविभूषितांचे चुणचुणीत आणि कधीं कधीं सणसणीत लेख येऊं लागल्यामुळें मराठी वाचकांच्या वाचनांत ताबडतोब थारेपालट झाला. कांहीं झालें तरी निबंधमाला वाचणाऱ्यांचा वर्ग फार मर्यादित होता. निबंधमालारूप धनुष्याचे टणत्कार फारसे दूर ऐकूं जात नसत, पण केसरीची घनगंभीर गर्जना हळू हळू महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत ऐकूं जाऊं लागली व भाषेच्या अवघडपणामुळें ज्यांनीं निबंधमालेचें कधीं पानही उलटलें नाहीं असे अर्धशिक्षित लोकही केसरी प्रेमानें वाचूं लागले. शिवाय निबंधमालेचें दर्शन शास्त्राप्रमाणें महिन्यांतून एकदां व्हावयाचें; पण अनियमितपणामुळें तें दर्शन ठरलेल्या वेळेनंतर कधीं कधीं सहा सहा महिन्यांनीं सुद्धां होत असे. आंतील विषयांना प्रचलितपणा नसल्यामुळें त्याबद्दल कोणाला फिकीरही वाटत नसे. पण केसरीचें दर्शन दर मंगळवारीं सकाळीं पुण्यांतील लोकांना व्हावयाचेंच आणि त्याची गर्जना पुढील एक दोन दिवसांत सर्व प्रांतभर ऐकूं जावयाची. शिवाय सुरवातीला केसरींत विविधता बरीच असे.

प्रथम प्रथम पत्राचें धोरण यांत्रिक पद्धतीनें आखलेलें असें नव्हतें. सर्व लेखक उत्तम प्रतीचे. अशा सर्व कारणामुळें आणि केसरींतील, विशेषेंकरून प्रमुख लेखांत, दिसून येणाऱ्या मराठी भाषेच्या तेजस्वी व मोहक स्वरूपामुळें केसरी वाचण्याबद्दल लोकांची उत्कंठा वाढली. केसरी, मराठा चालविणाऱ्या सर्व मंडळींत कायदेपंडित काय ते टिळक होते. अर्थात् कायद्याच्या बाबतींत येणाऱ्या अडचणींचा निर्णय करण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविलेलें असे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. टिळक त्या वेळीं नुकतेच एल्एल्. बी. झालेले होते व कायद्याचें पुस्तकी ज्ञान जरी त्यांनीं उत्कृष्टपणें संपादिलें होतें तरी तें कोर्टांत कामें चालवून पारखून पाहण्याची संधि त्यांना ते कोर्टांत जातच नव्हते म्हणून येण्याचें कारण नव्हतें. पण व्यवहारांत पुस्तकी ज्ञानावर भिस्त ठेवून चालत नसतें याचा अनुभव आमच्या तरुण वीरांना येण्याचा काळ फार दूर नव्हता.

६. केसरीमध्यें नवीनपणा पुष्कळ होता आणि त्यांतील विषयांची विविधता ही जशी त्याच्या तत्कालीन लोकप्रियतेला कारणीभूत झाली त्याचप्रमाणें सर्व विषयांचा थोडाबहुत परामर्ष घेण्याची तेव्हांच्या वृत्तपत्रांची जी पद्धति होती तिचीही ती निदर्शक होती. केसरीच्या पहिल्या वर्षांतच " अनुकरण " म्हणून एक निबंध आठ अंकांत मिळून आला होता तो चिपळूणकरांच्या अगदीं निबंध-मालेंतील निबंधांच्या प्रकाराचा आहे. असले क्रमांकयुक्त लेख देण्याची पद्धत आतां नाहींशी झालेली आहे. केसरीच्या पहिल्या अंकांत आलेला महत्वाचा लेख म्हणजे " वर्तमानपत्रें " हा होय. तो लहानसाच असल्यामुळें येथें संपूर्ण उतरून घेण्यास हरकत नाहीं. या लेखावरून तत्कालीन वर्तमानपत्रांची स्थिति व केसरीचें धोरण हीं दोन्ही लक्षांत येतात. " वर्तमानपत्रांचा प्रघात पडल्यास आज वीस पंचवीस वर्षें जरी होऊन गेलीं, व गेल्या दहा पंधरा वर्षांत तर त्यांच्यांत जरी पुष्कळ सुधारणा झाली, तरी अद्याप वर्तमानपत्रकर्त्यांस आपणां-वरची जबाबदारी पुरतेपणीं कळूं लागली आहे, किंवा लोकसुधारणेस आपल्या परिश्रमांनीं केवढें साहाय्य होणारें आहे याविषयीं त्यांचा पक्का समज झाला आहे, असें सामान्यतः पाहतां आढळणार नाहीं. दोन चार नामांकित वर्तमान-पत्रांखेरीज बाकीच्यांची जर स्थिति पाहिली, तर वर्तमानपत्र म्हणजे जागोजा-गच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचें साधन—याच्या पलीकडे वरील शब्दाचा अर्थ पत्रकर्त्यांच्या मनांत कधींही येत असेलसें वाटत नाहीं. अलीकडे तर लहान-सहान गांवांतून सुद्धां वर्तमानपत्रें निघूं लागलीं आहेत. छापखाना घालणें व

पत्र काढणें हा एक व्यापारच बनल्यानें ज्यास्त विद्येचा विशेष संस्कार नाहीं अशा मंडळींच्या हातींच वरील दोन अमोलिक साधनें पडलेलीं बहुधा आढळतात. आतां एवढें खरें आहे कीं, कोणत्याही तऱ्हेनें कां होईना, वरील दोन साधनांची वृद्धि ही एकंदर देशास श्रेयस्करच आहे. निदानपक्षीं लोकांत वाचण्याचा प्रघात तरी होण्यास वरील साधनांचा उपयोग आहे. पण याच उद्योगांत वरच्यापेक्षां चांगली मंडळी पडली असतां लोककल्याणाचा मार्ग ज्यास्त खुला होणार आहे हें उघड आहे.

" वर्तमानपत्रांचा मुख्यतः दोन प्रकारांनीं मोठा उपयोग आहे. एक हा कीं, त्यांनीं आपलें काम निःपक्षपातानें व निर्भीडपणानें बजावलें असतां सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा राहतो. रस्तोरस्तीं रात्रीं दिवे लागलेले असल्यानें व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्यानें जो उपयोग होतो, तोच ज्या त्या जागीं वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सदोदित चालू असल्यानें होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें चोख रीतीनें चालविलीं असतां त्यांत प्रजेचें किती कल्याण असतें हें कोणास सांगावयास नकोच. पण वरील चोखपणा राहण्यास त्यांचा सर्व कारभार जेव्हां लोकांच्या नजरेसमोर वरचेवर येत जाईल तेव्हां राहणार. सर्व गोष्टी सर्वांच्या समक्ष होत असल्या म्हणजे अर्थातच लांचलुचपत वगैरे जे अन्यायाचे प्रकार एरव्हीं होण्याचा संभव असतो तो पुष्कळ अंशीं नाहींसा होतो. जुन्या एतद्देशीय संस्थानांतून वरील प्रकार किती चालत असे व अद्याप किती चालतो, हें क्षणभर लक्षांत आणलें असतां पत्रकर्त्यांची गस्त लोकांस किती हितावह आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. विलायतेंत खुद्द महाराणी साहेबांपासून व मुख्य प्रधानापासून तों अगदीं छोट्या सरकारी कामगारापर्यंत सर्वांच्या कारभाराकडे लोकांची नजर वर्तमानपत्रांच्या द्वारें सारखी लागून राहिलेली असते; त्यामुळें कोणताही अन्याय प्रायः छपला जात नाहीं, व यामुळें तेथील लोक युरोपांतील इतर राष्ट्रांहून सुखी आहेत ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे.

" वर्तमानपत्रांचा दुसरा मोठा उपयोग लोकस्थितीच्या संबंधानें आहे. तिची सुधारणा होण्यास वर्तमानपत्रासारखें दुसरें साधन नाहीं. कोणकोणत्या गोष्टी लोकांस हितकारक आहेत व कोणकोणत्या अहितकारक आहेत, जुन्या चाली टाकून देण्यासारख्या कोणत्या आहेत व नव्या घेण्यासारख्या कोणत्या आहेत,

वगैरे गोष्टींचा वर्तमानपत्रांच्या द्वारें ऊहापोह चालला असतां किती फायदा होणार आहे! पण या गोष्टींकडे आजपर्यंत हवें तसें लक्ष कोणीच दिलें नाहीं म्हटलें असतां चालेल. विलायतेचीं कारस्थानें कुटण्याखालीं व नवे धर्म तयार करण्याच्या खटपटीखालींच आजपर्यंत मंडळी बेजार झाली. लोकांचे वास्तविक हक्क काय आहेत, ते संपादन करण्यास काय काय केलें पाहिजे, लोकांचा चरितार्थ चालण्यास पुढें मार्ग कोणता, आजपर्यंत लोककल्याणार्थ उभारलेल्या कामांची काय वाट झाली, व ती कशानें झाली, लोकांत कोणकोणते गुण येणें अवश्य होय, ते कसे यावेत, वगैरे विषयांवर लिहूं गेलें असतां मोठमोठे ग्रंथ सुद्धां होतील. पण आजपर्यंतची आमच्या पुढारी मंडळीची प्रवृत्ति पाहिली तर कांहीं निराळ्याच तऱ्हेची. पार्लमेंट सभेंत एतद्देशीयांना रिघाव होण्यासाठीं तजवीज करणें, सर्व धर्मांचें सार काढून नवे धर्म बनविणें, ज्ञातिभेदाचा एका तडाक्यासरसा विध्वंस करून टाकणें, शेरअलीकडे जाऊन त्यास नीतिशास्त्राचा उपदेश करणें, असल्या अकटोविकट कृत्यांत पडल्यामुळें आजपर्यंत आमचा पुष्कळ अमोलिक वेळ व्यर्थ गेला, तर वरील चुकीची दुरुस्ती करण्याचाही आमचा विचार आहे.

"वर्तमानपत्रकर्त्यांनीं आजपर्यंत बहुधा मुळींच वगळलेला तिसरा मोठा विषय म्हटला म्हणजे विद्याखातें व देशभाषेंतील ग्रंथ हा होय. विद्याखात्याची स्थिति दिवसेंदिवस किती विलक्षण होत चालली आहे हें बहुधा सर्वांस माहीत आहेच व प्रस्तुतचे अधिकारी या कामावर आल्यापासून तर या खात्याची किती खराबी झाली आहे हेंही कोणास सांगावयाला पाहिजे असें नाहीं. पण ही मोठी चमत्काराची गोष्ट आहे कीं, लोकशिक्षण हा विषय देशस्थितीच्या संबंधानें पाहतां एवढ्या महत्वाचा असतां व विद्याखात्याकडे देशांतील उत्पन्नाची एवढी मोठी रक्कम दरवर्षीं खर्ची पडत असतां, तिचा विनियोग कसा काय होत असतो या गोष्टीकडे कोणी फारसें लक्षही देत नाहीं. जें आंधळें गारूड आज कित्येक वर्षें चाललें आहे तेंच पुढेंहि चालू आहे. पहिली लोकस्थिति आज बिलकुल राहिली नाहीं. गेल्या दहा वीस वर्षांत विद्येचा प्रसार इकडे पुष्कळ झाल्यानें लोकांच्या समजुती आज पुष्कळ बदलल्या आहेत. पण लिहिण्यास अत्यंत खेद होतो कीं, लोकशिक्षणाची जी पद्धति एकदां कधीं काळीं घालून ठेवलेली आहे, व ग्रंथकारांचीहि स्थिति गेल्या वीस वर्षांत जी होती, तीच अद्याप कायम आहे. आम्हीं मोठे झालों तरी आमचें

जुनें आंगडें टोपडें आम्हांस अद्याप सुटत नाहीं. असो; तर या दोन विषयांच्या संबंधानेंही आमच्या केसरीची गर्जना वरचेवर होत जाईल."

केसरीच्या पहिल्या लेखाचें संपूर्ण अवतरण घेतलें याचें कारण उघड आहे. या लेखांत केसरीचें धोरण निःशंकपणें सांठवलेलें आहे. लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून देऊन ते मिळविण्याचे उपाय कथन करणें आणि तदनुषंगानें सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर नजर ठेऊन राज्यव्यवस्था ठीक चालावी असा उद्योग करणें आणि जुन्या त्याज्य गोष्टी कोणत्या व नव्या ग्राह्य गोष्टी कोणत्या हें लोकांना सांगणें हे मुख्य दोन हेतु. यांतच विद्याखातें व मराठींतील ग्रंथरचना यांचा वास्तविक अंतर्भाव होतो आणि लेखांतील शेवटचा परिच्छेद लेखाच्या सबंध थाटाला अवरोहासारखा वाटतो. पण विष्णुशास्त्री हे या नवीन तरुण मंडळींचे पुढारी होते एवढें लक्षांत ठेवलें म्हणजे या अंतिम परिच्छेदाचा स्पष्ट खुलासा होतो. विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांवरील शास्त्रीबुवांचा राग ताजा होता आणि त्यामुळें विद्याखात्यावर आपण झोड उठविणार हें विशेषपणानें या लेखांत सांगितलें आहे. वर दिलेल्या लेखाचा तत्कालीन पुरुषांच्यासंबंधीं चर्चा करतांना चांगला विचार होणें आवश्यक आहे. वरील लेख एकाच्या हातचा असो किंवा सर्वांनीं मिळून लिहिलेला असो, तो लिहिला त्यावेळीं शास्त्रीबुवा, टिळक, आगरकर, नामजोशी आणि आपटे यांचें अगदीं एक दिल होतें याबद्दल शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं. म्हणून त्यांत आखलेलें धोरण सर्वांना मान्य होतें हें अगदीं स्पष्ट आहे. सरकारवर टीका करणें व लोकांत हक्कांची व त्यांच्या प्राप्तीच्या उपायांची जाणीव उत्पन्न करणें हा जसा केसरीचा अढळ हेतु होता तसाच जुन्या त्याज्य गोष्टी कोणत्या व नव्या ग्राह्य गोष्टी कोणत्या यांची जाणीव उत्पन्न करणें हाही हेतु होता. आणि त्या हेतुला अनुरूप असे पुष्कळ लेख पहिल्या चार पांच वर्षांत केसरींत येऊन गेले. हें विशेषेंकरून सांगण्याचें कारण असें कीं, सामाजिक सुधारणेसंबंधीं आगरकरांनीं पुढें जो चंग बांधला तो त्यांच्या "एकांतिक" मतांचा परिणाम आणि या एकांतिकपणामुळें भांडण सुरू करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते अशा प्रकारची मल्लिनाथी कित्येक पंडितांनीं केलेली आहे. ही मल्लीनाथी व्यर्थ आहे हें उपरोक्त लेखामुळें सिद्ध होतें इतकेंच नव्हे तर "सर्व धर्मांचें सार काढून नवे धर्म बनविणाऱ्यांना" जो टोला देण्यांत आलेला आहे त्यावरून या तरुण मंडळींच्या मनावर लौकिक धर्मप्रवृत्तीपेक्षां मिल्ल, स्पेन्सर वगैरेंनीं अनुवाद-

लेल्या बुद्धिवादाचा दाब अधिक होता हेंही दिसतें. वरील लेख हा या मंडळींची १८८१ सालच्या सुरवातीची मनःस्थिति निःसंशयपणें दाखवितो व त्या मनःस्थितींत लोकच्छंदानुवर्तित्वाला मान्यता दिली होती असें केव्हांही म्हणतां यावयाचें नाहीं. हा लेख कोणाचाही असो, शेवटचा परिच्छेद चिपळूणकरांनीं लिहून चिकटवलेला खात्रीनें वाटतो.

७. केसरी सुरू झाल्यापासून निदान चार वर्षें टिळक व आगरकर यांच्यांत सामाजिक बाबतींत बहुतेक मतैक्य होतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. केसरी निघाला १८८१ च्या सुरवातीला व पुढील वर्षाच्या मार्च महिन्यांत शास्त्रीबुवा दिवंगत झाले. निबंधमालेंतील विचारांवरून शास्त्रीबुवांचीं सामाजिक मतें पुराणमताभिमानी लोकांसारखीं आहेत असा समज आतां आहेच पण तो त्यांच्यावेळींही होता. परंतु १८८१ सालीं खुद्द शास्त्रीबुवांचेंदेखील बाळगोपाळांशीं सामाजिक बाबतींत मतैक्य होतें ही गोष्ट सिद्ध करणें फारसें कठीण नाहीं. अर्थात् तें मतैक्य होण्याला या उभयतांच्या बुद्धिवादाचा परिणाम त्यांच्या मनावर झाला असावा असेंही म्हणतां येईल. केसरींत शास्त्रीबुवांच्यासंबंधींचा आलेला मृत्युलेख आगरकरांच्या हातून उतरलेला आहे. त्या वेळीं कोल्हापूर प्रकरण सुरू झालें होतें आणि न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींत तेव्हां अंतःकरणांची एकतानता कमाल प्रमाणांत नांदत होती. अर्थात् त्या मृत्युलेखांतील प्रत्येक शब्द केवळ लेखकाच्या मनाचें आविष्करण करणारा नसून टिळकप्रभृति त्याच्या सहकाऱ्यांच्याही विचारांचा निदर्शक होता. शिवाय त्या वेळीं आगरकरांचीं सामाजिक मतें फार पुढें गेलीं असें टिळकांना मुळींच वाटत नव्हतें व त्यांच्यांत कसल्याही प्रकारचा बेबनाव नव्हता. या मृत्युलेखांत आगरकर लिहितातः—" एखाद्या वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे. पुनर्विवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, धर्मसंस्थापना, जातिभेद यांसंबंधानें त्यांचे विचार जुन्या मताचे दिसत, परंतु ते वास्तविक रीतीनें अगदीं पुढें सरसावलेल्या सुधारकाप्रमाणें होते. फार कशाला; गेल्या केसरींतील "देशोन्नति" या सदराखालचा निबंध जो कोणी लक्ष लावून वाचील त्याला शास्त्रीबोवांचे जातिभेदासंबंधानें काय विचार होते हें सहज लक्षांत येईल. इतकें खरें आहे कीं, ते या विषयासंबंधानें फारसें कधीं लिहीत

नसत. पण लिहूं लागल्यास वृद्ध पिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास ते कधींही भीत नसत." देशोन्नति हा शास्त्रीबुवांचा शेवटचा लेख होय व तो केसरींत १८८२ सालीं तीन अंकांत मिळून प्रसिद्ध झाला होता. त्यांतील शेवटच्या लेखांत पुढील मजकूर आहेः—"आमच्या देशांत जन्मभूमीचा अभिमान शिथिल होण्यास या राष्ट्राचें विस्तीर्णत्व व जातिभेद हीं दोन मोठीं कारणें झालीं आहेत. सिंधुनदीकडचा मुलूख व त्रावणकोर किंवा कोंकण आणि बंगाल हे प्रांत परस्परांच्या संबंधानें म्हटले म्हणजे आम्ही व आमचे पाताळवासी अमेरिकन यांच्यासारखेच होत. दोघांची बहुधा अगदींच फुटाफूट म्हटली तरी चालेल. विद्या, देशाचार, रीतरिवाज, वगैरेच्या संबंधानें पाहतां, असले परस्पर विप्रकृष्ट प्रांत म्हटले म्हणजे दोन भिन्न भिन्न देशच होत! मग अशांच्या मध्यें ऐक्य तें कितीसें उत्पन्न होणार? ही एक गोष्ट झाली. दुसरा प्रकार जातिभेदाचा. यानें तर या राष्ट्राची फूट अतिशयितच पाडली आहे. अठरापगड जातींस अठरा टोपकारांनीं गुंडाळून टाकलें, व साऱ्यांच्या हातीं सारखीच करवंटी दिली. पण लोकांचे अजून डोळे उघडत नाहींत. शेणवी म्हणतात आम्ही पट्कर्मी, ब्राह्मण म्हणतात तुम्ही निकर्मी, आणि वस्तुतः पहातां या भांडणारांमध्यें असे शेंकडों सांपडतील कीं, ज्यांस एकाही कर्माची ओळख नाहीं. येऊन जाऊन कलहकर्मांत मात्र दोघे पटाईत! पट्कर्मांच्या व निकर्मांच्या वादास कंटाळून विचारें ब्राह्मण्य परद्वीपस्थ झालें व टेम्स आणि रेणा यांच्या तीरांच्या आश्रयानें जाऊन राहिलें आहे, या गोष्टीची दोघांही पक्षकारांस शुद्ध नाहीं......यास... पहिली तोड ही कीं, ज्या पाश्चात्य लोकांनीं हा देश इतका काळपावेतों पादाक्रांत करून टाकला आहे, त्यांच्यापासूनच ही गुरुकिल्ली आपणांस घेतली पाहिजे. त्यांचा इतिहास वाचून, त्यांचा सहवास करून, व त्यांच्या उलाढालीकडे सतत लक्ष पुरवून आम्ही किती गचाळ लोक झालों आहों, याची प्रचीति आपल्या ठिकाणीं बाणली पाहिजे. ती बाणली असतां, लोहपरिसाच्या न्यायानें आमचे नादान लोकही काळेंकरून बाणेदार होतील असा संभव आहे. त्याप्रमाणेंच अलीकडे सारें भरतखंड एक राष्ट्र बनलें आहे, यास्तव काळयोगेंकरून या अठरा धातूंची ही चांगली मूस बनून सर्वांस साधारण जो देश त्याविषयीं अभिमानवृत्ति स्फुरूं लागणें हेंही संभवनीय आहे. त्याचप्रमाणें आतां केवळ हास्यास्पद होऊन राहिलेला जो जातिभेद त्याच्या संबंधाचा वेडगळपणाचा

पीळही कमी कमी होत जाऊन, या देशांतील जाति, देशबंधुत्वाच्या थोरल्या नात्यांत बारीकसारीक क्षुद्र भेदांची मातब्बरी तादृश धरणार नाहींत, व एकोप्यापासून सर्वांचें किती हित आहे हें समजूं लागतील, अशीही दिवसेंदिवस दृढतर आशा आहे." हा वाक्यसमूह म्हणजे शास्त्रीबुवांचा आपल्या देशबंधूंना शेवटचा उपदेश होय. या उपदेशाची परिस्फुटता करण्यासंबंधांत, पुढें चार वर्षांनीं आगरकर व टिळक यांच्यांत वैमत्य उपस्थित झालें ही गोष्ट जितकी खरी तितकीच केसरी काढला त्या वेळीं व पुढें निदान तीन चार वर्षेंपर्यंत त्यांच्यांत व शास्त्रीबुवांत एकदिल होतें हीही गोष्ट खरी आहे. ज्या सामाजिक मतांचे टिळक पुढें कैवारी होते तीं मतें त्यांचीं कॉलेजमध्यें विद्यार्थी असतांनाच होतीं, अशा तऱ्हेची थाप ठोकतां यावी म्हणून कांहीं पुराणमताभिमानी आर्य पंडितांनीं आपल्या कल्पनेला ताण देऊन टिळकांच्या कॉलेजांतील मतांसंबंधीं आख्यायिका प्रसिद्ध केलेल्या आहेत. पण टिळकांचें पूर्व चरित्र हेंच तें आख्यायिकांना विरुद्ध असल्यामुळें त्यांना कोणीही महत्व देण्याला तयार नसावें हें साहजिक आहे. तत्कालीन रावसाहेब–रावबहादुर–रेवरंडादिकांची पगडी किंवा टोपी शास्त्रीबोवांनीं जशी उडविली तशी टिळक आणि आगरकर या दोघांनींही उडविल्याचीं उदाहरणें आहेत. पण त्यामुळें जसे आगरकर सुधारणाशत्रु असे कोणी म्हणत नाहींत, त्याप्रमाणेंच टिळकांनाहि त्या वेळीं ते सुधारणाशत्रु होते असें कोणीही म्हणत नव्हतें; व सध्यां जे तसे म्हणतात ते, टिळकांनीं पुढें सार्वजनिक रीतीनें अंगिकारलेल्या मतांचा त्याच्या प्राक्कालीन मतांवर—आपलीं तशीं मतें आहेत म्हणून—आरोप करतात असें म्हणणें प्राप्त आहे. त्याचप्रमाणें आगरकरांचीं राजकीय मतें तीव्र स्वरूपाचीं होतीं हें सर्वांना माहीत आहे. पण तो तीव्रपणा म्हणजे नुसता हुच्चेपणा नव्हता, येन केन प्रकारेण देशांत कांहीं तरी घोटाळा माजून रहावा, त्यांतून कांहीं तरी निष्पन्न होईल अशा स्वरूपाचा नव्हता हीही गोष्ट विसरून चालणार नाहीं. परवशतेसंबंधीं काळजाला सारखी टोंचणी आणि स्वातंत्र्याचा जबरदस्त हव्यास हे दोन्ही गुण चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांच्यांत सारखेच होते या गोष्टीबद्दल मतभेद होण्याचें कारण नाहीं. आगरकरांचीं राजकीय मतें तीव्र होतीं हें ज्यांना १९१६ सालीं आठवले त्यांनीं त्याच्या पूर्वीं पंचवीस वर्षें आगरकरांना

१ केसरींतील 'आगरकर डे' वरील ४ जुलै १९१६ तील लेख पहा.

" देशद्रोही " म्हणण्यासाठीं आकाशपाताळ एक केलें होतें हीही गोष्ट कोणी विसरणें शक्य नाहीं. या सर्व गोष्टी सांगण्याचें कारण हेंच कीं, पुढें मतभेद झाले म्हणून टिळक–आगरकर हे कॉलेजांतून बाहेर पडले ते एकमेकांविरुद्ध कोटिक्रम लढवीत बाहेर पडले असा जो बाष्कळपणाचा प्रकार कित्येकांनीं चालविला आहे त्यांतील आचरटपणा पूर्णपणें प्रकट व्हावा. मतांत जर एवढी भिन्नता असती तर एवढा स्वार्थत्याग करून या दोघांची गट्टी जमली असती का ? गट्टी जमली याचाच अर्थ बहुतेक गोष्टींत दोघांचें जुळलें होतें. एकमेकांच्या स्वभावाचा परिचय एकमेकांना झालेला नव्हता, कारण ही मैत्री विशेषेंकरून आगरकर एम्. ए. साठीं व टिळक एल्एल्. बी. साठीं डेक्कन कॉलेजांत होते तेव्हां झालेली. पुढें दोघे मिळून न्यू इंग्लिश स्कूलला मिळाले व केसरींतील पहिल्या वर्षाचे लेख निःसंशय दोघांचा किंबहुना शाळेशीं संबंध असलेल्या सर्व मंडळीचा एकोपा दाखवितात. पुढें कोल्हापूर प्रकरणामुळें त्या एकोप्याचें परिमाण शिखराला पोंचलें व त्यामुळें कदाचित् शिखरस्थित पदार्थ खालीं गडगडल्याशिवाय रहात नाहीं या नैसर्गिक न्यायाला अनुसरून दोघांनाही न कळत त्यांच्यामधील एकदिलपणाला सूक्ष्म धक्का बसला असेल. पण डेक्कन एज्युकेशन सोसायटी निघेपर्यंत आणि निघाल्यावर कांहीं थोडे दिवस तरी वैमत्याचें स्वरूप अतिसूक्ष्म—इतकें सूक्ष्म कीं जवळ जवळ शून्यप्रमाण होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां कॉलजमध्यें झालेले म्हणून कल्पित संवाद प्रसिद्ध करून टिळकांच्या त्या वेळच्या मतांचा व मनःस्थितीचा समन्वय पुढील काळांतील त्यांच्या मतांशीं व मनःस्थितीशीं करण्याचा प्रयत्न हा जसा हास्यास्पद आहे तसाच तो अत्यंत गैरशिस्तही आहे. टिळकांच्या मतांचा विकास कसकसा व कोणत्या कारणांमुळें होत गेला याचा विचार करणें ही गोष्ट निराळी आणि स्वतःच्या पूर्वग्रहावरून व स्वतःला प्रिय असलेल्या मतांच्या अभिमानामुळें टिळक जन्माला आले तेव्हांच पुराणमताभिमानी म्हणवणाऱ्यांना प्रिय असलेलीं मतें घेऊन आले असें म्हणणें निराळें. संमतिवयाच्या वादाला तोंड लागेपर्यंत टिळक हे सुधारक म्हणून प्रसिद्ध होते. ही गोष्ट टिळकांचें चरित्र लिहिण्याऐवजीं त्यांच्यावर कादंबरी लिहिण्याचा ज्यांचा मानस आहे अशा कांहीं थोड्या विचित्र लोकांखेरीज सर्वांना माहीत आहे. पुढें ज्यांच्याशीं वैयक्तिक कारणांमुळें टिळक भांडले त्यांच्या मतांचे ते सार्वजनिक वैरी बनले ही गोष्ट मनुष्यस्वभावाला फारशी सोडून झाली असें म्हणण्याचें कारण नाहीं.

८. पहिल्या वर्षांतच केसरीचा चांगला लौकिक झाला व त्याला पुष्कळ अंशांनीं आगरकरांचे परिश्रम व भाषाशैली हीं कारणीभूत झालीं हें वर सांगितलें आहे, त्याप्रमाणें इतर मंडळींच्या साहाय्यामुळेंही तो लौकिक होण्याला मदत मिळाली यांत शंका नाहीं. चिपळूणकर तर नांवाजलेले खंदे लेखक होते. नामजोशांनीं एक दोन वर्तमानपत्रांच्या घडामोडी केल्या होत्या व पत्रांतील कांहीं मजकूर ते भरीत. टिळक हे मराठींतील एक चांगले लेखक होऊन गेले ही गोष्ट सर्वमान्य आहे. शिवाय टिळक आणि आपटे व आगरकर हीं सर्व पहिल्या प्रतीचीं माणसें होतीं. त्यांनीं जो उद्योग जिवाभावानें केला तो निष्फळ होणें शक्य नव्हतें. पहिल्या वर्षीं केसरींत आलेल्या लेखांत "हिंदुस्थानपासून इंग्लंडास फायदे," "अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार," "शेक्स्पिअर, भवभूति व कालिदास," "नाटकें करावीं कीं करूं नये?," "अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन," "बहिष्कार," "आमच्या देशांतील सभा व मंडळ्या," "राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि," "नेटीव्ह लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल?," "बालविवाहापेक्षां सतीच बरी," कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे," "व्यायाम," "परभाषेंतील शब्दांची योजना," "देशी भाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता," "कराविषयीं प्रथम संक्षिप्त विचार," "पाऊस," "ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष," "भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन," इत्यादि निरनिराळ्या विषयांवर लेख आले. त्यांतील बरेच लेख आगरकरांच्या हातचे आहेत. पण न्यू इंग्लिश स्कूल काढलेल्या मंडळींच्या पंथाचे ते एकंदर निदर्शक होते हें अगदीं स्पष्ट आहे. "बालविवाहापेक्षां सतीच बरी" हा लेख आगरकरांचा आहे हें कोणासही सांगतां येईल. यांतील विचारसरणी पुढील वाक्यांवरून स्पष्ट होते. "बालविवाहापासून होणाऱ्या अनंत विपत्तींचा विचार करतां, आपणांमध्यें पूर्वीं सती जाण्याचा जो दुष्ट व अमानुष प्रघात प्रचारांत असे, तोच एकपरी बरा होता असें म्हणण्यास फारशी हरकत येईल असें वाटत नाहीं. आतां या एकूणिसाव्या शतकांत जिकडे तिकडे सुधारणेचें पीक माजलें असतां, अशा प्रकारच्या घोर चालीस बरें म्हणणें म्हणजे लिहिणाऱ्यावर असमंजसपणाचा, अडाणीपणाचा व मूर्खत्वाचा कांहीं अंशीं आक्षेप येतो खरा, तथापि बालविवाहापासून होणाऱ्या अनर्थांची, व सहगमनापासून होणाऱ्या अनर्थांची बेरीज करून ती विचाराच्या ताजव्यांत तोलली, तर पहिल्या बेरजेचें पारडें खचीत

खालीं बसेल असें वाटतें. एकदां जबरदस्त वायु होऊन, किंवा अपघात होऊन तत्काल प्राण जावा, तशी सतीची गोष्ट असे. पण बालविवाहापासून होणाऱ्या विपत्तींची तशी गोष्ट नाहीं. ज्याप्रमाणें एकाद्या वृक्षाला कीड लागून त्यांतील सत्वगुणांचा हळू हळू लोप होतो, व वरून दिसण्यांत जरी त्यांत विशेष फेरफार झाला आहे असें दिसत नाहीं, तरी वेळ येऊन ठेपली म्हणजे अकस्मात् धाडकन् तो कोसळून पडतो, त्याप्रमाणें या बालविवाहाची स्थिति होय. हा आमच्या देशास तीव्र क्षयरोग लागलेला आहे. यानें आमच्या स्वातंत्र्याचा, शरीरशक्तीचा, उमेदीचा, धाडसाचा व अभिमानाचा अगदीं उच्छेद करून टाकिला आहे, आणि हें आम्हांस कळत असून, पूर्वापार चालत आलेल्या लोकाचाररूपी बागुलबोवाची आम्हांस अशी बळकट धास्ती पडून गेली आहे कीं, त्याचा मात्र उच्छेद करण्याची आमची छाती होत नाहीं." "देशांत वाईट चालीचें अस्तित्व असणें हें त्या देशाच्या रानटीपणाचें मोठें दर्शक होय." "दुसरें असें सिद्ध होतें कीं पुरुषांच्या पोकळ भुलथापांला भुलून ज्या स्त्रिया आनंदानें आपणास जाळून घेत, त्यांच्यांतून विचारानें अगदीं पळ काढला असावा, व नाकांत वेसण घालून ज्याप्रमाणें बुद्धिहीन जनावरास पाहिजे तसें फिरवितां येतें, त्याप्रमाणें त्या आपली पुरुषाकडून पाहिजे तशी वागणूक करून घेत असाव्या, व अद्यापिही स्त्रीपुरुषांतील या प्रकारच्या संबंधांत फारसा फरक पडला आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणखी अशी गोष्ट लक्षांत येते कीं, स्त्रियांविषयीं पुरुषांची मत्सरबुद्धि इतकी तीव्र असावी कीं नवरा जिवंत असतां त्याच्याशीं तिनें दगलबाजी न करावी यासाठीं योजिलेले उपाय कांहीं बस नाहींत, तर त्याच्या पाठीमागें त्या दगलबाजीचा मुळींच संभव राहूं नये म्हणून तिचा या जगांतून मुळींच मागमूस नाहींसा करून टाकावा असें त्या काळच्या नीतिशास्त्रवाल्यांनीं ठरवून टाकलेलें असावें. याला म्हणावें शास्त्रकार आणि धर्माधिकारी!!! तांत्रिक नीतीचें संगोपन करण्यासाठीं, जिचा वृत्तांत ऐकला असतां सदयहृदयाच्या अंतःकरणाचें विदारण होणार अशा अनीतीचा प्रघात घालणाऱ्या आपलपोट्या व दीर्घमत्सरी शास्त्रकारांस, आज आम्हांत वास करणारी भूतदया, शुद्ध राक्षस म्हणविण्यास भाग पाडते." "समंजस, वाचकहो! हा बालविवाह नव्हे, हा आमच्या देशाला महाक्षयरोग लागला आहे. या भरतभूमीच्या तोंडाला काळीमा देणारा हा अपकीर्तीचा कज्जलकरंडक

आहे. या आर्यांच्या वीर्यांच्या, आवेशाच्या, अभिमानाच्या, भारदस्तपणाच्या झऱ्याचा शोष करणारा हा अतिप्रखर आणि दुष्ट दावानल आहे." ज्या लेखणीं-तून हीं वाक्यें बाहेर पडलीं तिनेंच पुढें सहा सात वर्षांनीं रूढिराक्षसीचीं शकलें शकलें उडविलीं यांत नवल नाहीं. पण ज्या भूतदयेची प्रेरणा होऊन १८८१ सालीं टिळक आणि आगरकर असल्या लेखांना आपलीं मतें म्हणत होते त्याच भूतदयेचा आगरकरांच्यावर हळूहळू पुरा अम्मल बसला, पण टिळकांच्यावर दुसऱ्या भावना वरचढपणा गाजवूं लागल्या, हा दैवदुर्विलास तर खराच, पण त्यामुळें या बाळगोपाळांच्या प्राथमिक स्वरूपाच्या रमणीयतेची कांहींच हानि होत नाहीं. केसरीचें पहिलें वर्ष पुरें होतें न होतें तोंच एकाएकीं वादळ होऊन आगरकर व टिळक यांना सार्वजनिक संसारसंग्रामांतील पहिली चकमक खेळ-ण्याचा प्रसंग आला. आगरकरांचें बाल्य अकालीं लय पावलें होतें. आतां ते स्वदेशाचे व कर्तव्याचे शिपाई झाले होते व परप्रेषित शस्त्राघात त्यांच्यावर वरचे-वर व्हावेत हें साहजिकच होतें.

# भाग चौथा

## कोल्हापूर प्रकरण

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
प्रारभ्य विघ्नविहता विरमंति मध्याः ।
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥

वर्तमानपत्राचा धंदा—स्वच्छ आणि चांगल्या प्रकारें जे करतात त्यांना—हें एक असिधाराव्रत आहे. त्यांत पदोपदीं अनेक विघ्नें उपस्थित होतात. एखादा शब्द चुकून भलता गेला तर मोठा अनर्थ होण्याचें भय असतें. एखादी गोष्ट प्रत्यक्ष डोळयांनीं पाहिलेली असूनसुद्धां जर पुराव्याच्या कायद्याप्रमाणें सिद्ध होणारी नसेल तर तिचा उच्चार कसा करावा हें मोठें कोडें होऊन बसतें. कधीं कधीं कायद्याच्यामुळें आपल्याला उत्पन्न होणाऱ्या भयापेक्षां किंवा हानीपेक्षां लोकहिताचें महत्व अधिक असतें आणि अशा वेळीं वर्तमानपत्रकाराला आपलें काय होईल हा विचार मनांत न आणतां धडाडीनें एखादी गोष्ट लिहावी लागते. हे सर्व प्रकार या धंद्यांत पडलेल्यांना अनुभवावे लागतात. व्यक्तिगत अब्रूनुकसानीसंबंधीं कायदे सर्व जगभर आहेत पण त्यांत कैदेची किंवा फौजदारी शिक्षा सांगण्याचा मान हिंदुस्थाननेंच मिळविलेला आहे. त्यांत राजद्रोहाच्या अतिव्यापी गुन्ह्याचें शस्त्र पीनल कोडानें तयार ठेविलें असल्यामुळें या देशांतील वर्तमानपत्रकर्त्यांची परिस्थिति इतर कोणत्याही देशापेक्षां अधिक बिकट आहे. या सर्वांचा असा निष्कर्ष साहजिक निघतो कीं हा धंदा करणाऱ्याला कायदा—निदान त्यांतील कांहीं कलमें—पूर्णपणें माहित पाहिजेत.

कायद्याचें ज्ञान तर नाहींच पण कसलेंच ज्ञान नसलेलीं माणसें या धंद्यांत पडलेलीं उदाहरणें पुष्कळ होतीं व आहेत व अशांच्या हातून हा धंदा निघून तो सुशिक्षितांनीं चालवावा हा केसरी पत्र काढण्याचा एक हेतु होताच. हें पत्र काढणाऱ्या मंडळींत शास्त्रीबुवा, आगरकर, नामजोशी आणि आपटे यांना कायद्याचें ज्ञान मुळींच नव्हतें. टिळक मात्र एल्एल्. बी. ची परीक्षा वरच्या वर्गांत उतरलेले. तेव्हां कायद्याच्या ज्ञानाच्या बाबतींत त्यांच्या मित्रमंडळींची बहुतेक सर्व भिस्त त्यांच्यावरच होती. केसरीमध्यें पुष्कळांच्यावर टीका येत असे व एखादे वेळीं या टीकेच्या सुतानें तुरुंगवासाची स्वर्गप्राप्ति होईल हें या मंडळींना माहीत नव्हतें असें नाहीं. पण चिपळूणकर आणि नामजोशी यांना काय तो धंद्याचा प्रत्यक्ष अनुभव. बाकीची तीन मंडळी हुषार आणि कर्तृत्ववान् पण त्यांच्या बाबतींत अनुभवाची ही केवळ सुरवात होती.

केसरीची या वेळीं नुकतीच सुरवात झालेली. त्याची संपादक मंडळी तरुण, ताज्या दमाची आणि सळसळणाऱ्या रक्ताची. आपल्या लेखणीच्या प्रभावानें जगाचें नंदनवन करूं, केसरीच्या गर्जनेनें अन्यायरूप श्वापदांची दाणादाण उडवूं अशा प्रकारच्या आकांक्षा त्यांच्या डोक्यांत खेळत होत्या. आगरकर, आपटे आणि टिळक या तिघांपैकीं कोल्हापुराशीं प्रत्यक्ष संबंध आगरकरांचा मुळींच नव्हता. वामनराव आपट्यांनीं कोल्हापुरांत वार लावून आपलें शिक्षण केलेलें. त्यांना कोल्हापुरची खडानूखडा माहिती होती. बळवंतराव टिळकांचे परम स्नेही रा. रा. बळवंतराव जोशी हे कोल्हापुरास न्यायखात्यांत चांगल्या हुद्यावर लागले होते; आणि अशा प्रसंगीं कोल्हापुरचे कारभारी रावबहादुर महादेव वासुदेव बर्वे आणि तेथील छत्रपति यांच्यांत तेढ आलेली. त्यांत कोल्हापुरांत काय आणि बाहेर काय सर्वांचा ओढा छत्रपतीकडे होता. तेव्हांच्या संस्थानिकांबद्दल लोकांत प्रेम होतें. संस्थानें म्हणजे आपल्या अकालगत झालेल्या ऐश्वर्याचीं स्मारकें असें सर्वांना वाटत होतें. देशी संस्थानांबद्दल आज जी जनतेची दृष्टि झाली आहे ती तेव्हां झाली नव्हती याचें कारण उघड आहे. इंग्रजसरकारच्या पोलिटिकल खात्याला खूप ठेवल्यावर आपल्या संस्थानांत आणि कधीं कधीं बाहेरसुद्धां वाटेल तशा आचरटपणानें किंबहुना दुष्टपणानें वागावें ही जी आज कित्येक संस्थानिकांची दुर्दैवानें प्रवृत्ति दिसून येते त्याच्या अगदीं विरुद्ध तेव्हांची स्थिति होती. लॉर्ड डलहौसीच्या तडाक्यांतून जीं संस्थानें वांचलीं त्यांपैकीं बऱ्याच संस्थानांच्या अधिपतींना इंग्रजसरकानें नेमलेल्या दिवाणाच्या किंवा कारभा-

ऱ्याच्या कदरीनें वागावें लागे. यांपैकीं कित्येक दिवाण, त्यांच्या मागें असलेल्या ब्रिटीश सत्तेची धुंदी चढल्यामुळें, आपण संस्थानिकांचे नौकर ही साधी गोष्ट विसरून ज्यांचा पगार ते खात त्या मालकांवर मालकी गाजवूं लागले होते असें दिसतें. कोल्हापुरासही हाच प्रकार असावा असें त्या वेळच्या परिस्थितीवरून अनुमान बांधतां येतें. कांहीं असो, लोकांना वाटत होतें कीं, रा. ब. बर्वे यांच्या राजकारणामुळें छत्रपतीवर वेडाची तोहमत येऊन त्यांचे हाल चालले आहेत. या दुर्दैवी राजाच्या चरित्राचें स्मरण अद्यापि अंगावर शहारे आणतें. त्याचा कैवार केसरी मराठ्याच्या संपादकांनीं घेतला यांत नवल नाहीं. कारण पुण्यांतील तेव्हांचें अगदीं थंड ज्ञानप्रकाश पत्र त्यांतसुद्धां रा० ब० बर्व्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला. कोल्हापुरचा राजा म्हणजे शिवछत्रपतीच्या वंशांतला आणि त्याची दुर्दशा चालली आहे, त्याला आपल्या नोकरांकडून चाबकाचा मार खावा लागतो, त्याला आपल्या पत्नीला भेटण्याची चोरी, अशा प्रकारच्या बातम्या महाराष्ट्रांत या वेळीं पसरून सर्वांचीं मनें हवालदील झालीं होतीं; आणि महाराजांच्यासंबंधीं व कोल्हापुरच्या कारभारासंबंधीं पत्रें केसरींत, तो निघून चार सहा महिने झाले नाहींत तेव्हांपासूनच, प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं. पुढें संपादकीय टीकाही येऊं लागली. कोल्हापुरासंबंधीं कांहीं पत्रें ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालीं व केसरीनेंही कांहीं अस्सल पत्रें म्हणून छापलीं. अर्थात् या सर्व प्रकरणाचा मोठा गवगवा होऊन रा. ब. बर्वे यांना आपली अब्रू साफ करून घेण्याची जरूरी वाटली. त्याप्रमाणें त्यांनीं मुंबईसरकारची केसरी व मराठा या पत्रांवर फिर्याद करण्यासाठीं परवानगी मागितली व ती त्यांना मिळाली; आणि अशा प्रकारें केसरीचे संपादक आगरकर आणि मराठ्याचे संपादक टिळक हे दोघेही वयाच्या चोविसाव्या वर्षीं न्यायासनासमोर गुन्हेगार म्हणून उभे राहिले आणि या खटल्याकडे उभ्या महाराष्ट्राचे डोळे लागून राहिले.

२. ता० २४ जानेवारी १८८२ रोजीं मुंबई येथील चीफ् प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि० वेब यांचेपुढें सॉलिसिटर लिटिल् यांनीं कोल्हापुरचे दिवाण रावबहादुर महादेव वासुदेव बर्वे यांची फिर्याद दाखल केली. आरोपी मंडळींत सदाशिव पांडुरंग ऊर्फ नाना भिडे, केशव नारायण बखले, बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांचीं नांवें होतीं. फिर्यादीचें मूळ स्वरूप लक्षांत यावें म्हणून रावबहादुर बर्व्यांच्या प्राथमिक कैफीयतींतील

महत्वाचा भाग येथें दिला आहे. "मीं धारवाडला डेपुटी कलेक्टर आणि मॅजिस्ट्रेट होतों. तेथून मुंबई सरकारनें मला कोल्हापूर संस्थानचा कारभारी किंवा दिवाण होण्यास १८७० सालीं पाठविलें. मीं अद्यापि या हुद्यावर आहें. १८७१ सालीं प० वा० राजाराम महाराज छत्रपति यांच्या विधवेनें सध्यांच्या महाराजांना दत्तक घेतलें. १८७९ च्या आक्टोबरांत महाराज राजकोटहून मुंबईला आले. ( राजकोटला महाराजांना शिक्षणासाठीं ठेविलें होतें. ) महाराज मुंबईंत असतांना त्यांची जनक आई राधाबाई ही पोलिटिकल एजंटची परवानगी घेतल्याशिवाय मुंबईला आली, आणि महाराजांना आपल्या-बरोबर घेऊन जाण्याबद्दल तिनें हट्ट धरला. तिला तसें करूं देण्याला मला पोलिटिकल एजंटचा हुकूम नव्हता म्हणून तिची विनंति मला मान्य करतां आली नाहीं. तेव्हांपासून राधाबाईच्या मनांत मजसंबंधीं अढी बसली. सदाशिव पांडुरंग उर्फ नाना भिडे हे गेलीं तीन वर्षें राधाबाईच्या भावाचे मुखत्यार आहेत, व कांहीं वडिलोपार्जित इस्टेट मिळण्याच्या बाबतींत त्यांनीं त्या नात्यानें कामही चालविलें होतें. सदर मुकदम्याचा निकाल देण्याच्या संबंधांत पोलिटिकल एजंटला सल्ला देणें हें दिवाण या नात्यानें माझें काम होतें. या मुकदम्याचा निकाल शेवटीं नाना भिडे यांच्या पक्षकाराविरुद्ध झाला. तेव्हांपासून सदरहू नाना भिडे यांचा मजवर दांत आहे. शिवाय आपल्याला कोल्हापुरांत मुखत्यार वकिलीची सनद मिळावी म्हणून नाना भिड्यांनीं अर्ज केला होता. तो मंजूर झाला नाहीं म्हणूनही त्यांचा माझ्यावर राग आहे. केशव नारायण बखले हा माझ्या हाताखालीं काम केलेल्या एका मामलत-दाराचा मुलगा आहे. त्याचा बाप काम बरोबर करीत नसे म्हणून त्याला बोल-ण्याचा प्रसंग मजवर वरचेवर येई आणि या कारणामुळें सदर बखले याचा माझ्यावर राग आहे. बखले आणि भिडे हे स्नेही आहेत. १८७९ सालच्या सप्टेंबरपासून शिवाजीमहाराजांचें डोकें ठिकाणावर नाहीं. नाना भिडे व बखले हे आज कित्येक दिवस माझ्याविरुद्ध तक्रार करण्याला संधि पहात आहेत. नाना भिडे सध्यां पुण्यांत राहतात. त्यांनीं मुंबईच्या गव्हर्नर साहेबांना ( मजसंबंधीं तक्रार असलेली ) तार पुण्याहून पाठविली. ती तार ता० १६ डिसेंबर १८८१ या सुमारास पोंचली. कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट मेजर रीव्ह्ज् यांनीं सदर तार मजकडे पाठवून दिली ती मला ता. ४ जानेवारी १८८२ रोजीं मिळाली. ( त्याचप्रमाणें गव्हर्नर साहेबांकडे ) मजविरुद्ध

एक अर्जही गेला होता. त्यावर बखले व भिडे यांच्या सह्या असून तो सर जेम्स फर्ग्युसन, गव्हर्नर व कौन्सिलचे प्रेसिडेंट, यांच्या नांवें धाडण्यांत आला होता. त्यावर तारीख २७ डिसेंबर १८८१ अशी होती. तोही (पोलिटिकल एजंटकडून) मजकडे आला. (पुनः) ता. ४ जानेवारी १८८२ ही तारीख असलेला बखले व भिडे (वगैरेंच्या) सह्या असलेला दुसरा अर्ज गव्हर्नरकडे गेला तो मला ता. १८ जानेवारीला मिळाला. या तारेंत व अर्जांत (माझे कारकून) रामभाऊ ऐनापुरे यांच्याकडून मीं लिहवलेलीं किंवा माझ्या हुकूमावरून त्यांनीं लिहिलेलीं अशीं पत्रें नमूद करण्यांत आलीं होतीं. मूळचीं पत्रें मला पहावयास मिळालेलीं नाहींत. पण १४ आक्टोबर १८८० तारीख असलेलें पत्र मीं किंवा माझ्या हुकुमावरून लिहिलेलें नाहीं. या पत्रांत पुढील मजकूर आहेः—"मेहेरबान नानासाहेब कागलकरांनीं शिंग्यांना रुपये दिलेच पाहिजेत. ते हरकत घेतील तर तुमचें वाटोळें होईल असें त्यांना बजावावें. श्रीमंत महाराजांचें वर्तन बरोबर नाहीं. बडोद्याला झालें त्याप्रमाणें (कोल्हापुरांतही) सर्व गोष्टींचा निकाल एका दिवसांत होणार नाहीं असें नाहीं. धाकट्या राणीसाहेबांना (महाराजांच्या कुंटुंबाला) हें कळवावें." २८ आक्टोबर १८८१ तारीख असलेलें पत्रही मीं किंवा माझ्या हुकुमावरून लिहिलेलें नाहीं. सदर पत्रांत पुढील मजकूर आहेः—"सदाशिव पांडुरंग उर्फ नाना भिडे यांच्यावर सक्त नजर ठेविली पाहिजे. महाराजांचा (घात करण्याच्या) कामांत जर (आमची) फत्ते झाली तर एक अडचण उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून धाकट्या विधवा राणीनें यासंबंधीं उपाययोजना त्वरित केली पाहिजे. दुसरा दत्तक घेण्यासंबंधीं व्यवस्था करतां येईल." १७ नव्हेंबर १८८१ तारीख असलेलें पत्रही मीं किंवा माझ्या हुकुमावरून लिहिलेलें नाहीं. या पत्रांत पुढील मजकूर आहेः—"महाराजांच्या बद्दल ग्रीन व काक्स यांनीं काय करावयाचें तें त्यांना खुलासेवार सांगितलेलें आहे, आणि (महाराजांचा) शेवट लौकरच होईल असें धाकट्या राणीसाहेबांना कळवावें." वरील पत्रांतून ध्वनित होणाऱ्या, महाराजांच्या विरुद्ध व्यूह रचण्याच्या कामांत मीं होतों, अशा अर्थाचा, आरोप व सूचना अगदीं खोट्या आहेत. वरील तार व अर्ज हीं भिडे व बखले यांनीं बेकायदेशीरपणें, दुष्टपणानें आणि खोडसाळपणानें पाठविलीं व प्रसिद्ध केलीं. त्यांत त्यांचा हेतु असा कीं, माझी बदनामी व्हावी; आणि त्यामुळें माझें नुकसान व्हावें, माझी नोकरी जावी, माझ्या नांवाला,

सचोटीला व कीर्तीला कालिमा लागावा, आणि लोकांनीं माझी छी थू करावी. म्हणून भिडे व बखले यांविरुद्ध त्यांनीं माझी बेअब्रू केली असा माझा आरोप आहे व कायद्याप्रमाणें त्यांना शासन व्हावें असा माझा अर्ज आहे." जी फिर्याद बखले व भिडे यांजविरुद्ध तीच उपरोक्त पत्रें मराठ्यांत प्रसिद्ध झालीं म्हणून टिळकांविरुद्ध जाणि केसरींत प्रसिद्ध झालीं म्हणून आगरकरांविरुद्ध झाली. त्याज-शिवाय बर्व्यांनीं रा. वामन गोविंद रानडे, वकील आणि ज्ञानप्रकाशचे संपादक, यांजवरही सदर पत्रें ज्ञानप्रकाशांत छापल्याबद्दल खटला भरला. रानडे हे राधाबाईंचे वकील असून तिजकडून त्यांना दरमहा शंभर रुपये मिळत असत. तेव्हां वखले व भिडे यांच्याप्रमाणेंच बर्व्यांचीं बिंगें बाहेर काढण्याच्या कामांत त्यांचा वैयक्तिक हेतु होता असें म्हणण्याला जागा होती. खटल्याचें काम मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत जानेवारी अखेरीस सुरू झालें (१८८२); तेथून पुढें दर आठवड्यास बुधवारीं खटल्याची तारीख लागत असे. ता. १५ मार्च रोजीं सर्व आरोपींचा खटला हायकोर्टाकडे रवाना करण्यांत आला. बर्व्यांनीं नामांकित ब्यारिस्टर इन्व्हेरॅरिटी यांना आपले वकील दिले होते व आगरकर, टिळक वगैरेंनीं मि. (पुढें सर) फेरोजशहा मेहता यांना वकील दिले होते. मेहता हे त्या वेळीं तरुण होते पण उत्तम ब्यारिस्टर म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक झाला होता व खटल्याची संपूर्ण हकीगत वाचली म्हणजे मेहतांनीं आपलें काम फार कसोशीनें बजावलें याबद्दल शंका रहात नाहीं. खटल्याची सर्व हकीकत येथें देण्याचें कारण अर्थात् कांहीं नाहीं. पण त्यांतील महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख करणें जसें आवश्यक आहे त्याचप्रमाणें ह्या खटल्याशीं आमच्या या तरुण वीरांचा संबंध कोणत्या परिस्थितींत व कोणत्या प्रकारें आला याचीही निःशंक परिस्फुटता होणें फार महत्वाचें आहे. भिड्यांनीं हीं पत्रें टिळकांना दाखविलीं. टिळक हे न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीचे कायदेपंडित. त्यांची कायद्याची परीक्षा पहिल्या वर्गांत नसली तरी दुसऱ्या वर्गांत उतरली होती. कोल्हापूरच्या दुर्दैवी महाराजांची कींव येऊन त्यांना बर्व्यांची चीड आली हें त्यांच्या तरुण वयाला व तेजस्वितेला अनुरूप होतें व हीं पत्रें प्रसिद्ध करून बर्व्यांचें कारस्थान बाहेर काढावें असा त्यांनीं आपल्या मित्रमंडळींना सल्ला दिला व आगरकरांना वगैरे तो तत्काळ मानवला. गव्हर्नरसाहबांकडे गेलेला अर्ज टिळकांच्या हस्ताक्षरांत असून तो त्यांनींच तयार केलेला होता. त्या अर्जावर भिडे, बखले, रानडे यांच्याप्रमाणेंच आगरकर व वामनराव आपटे

व टिळक यांच्याही सह्या होत्या. तेव्हां कोल्हापूरची मंडळी व न्यू इंग्लिश स्कूलची मंडळी यांना जोडणारा दुवा म्हणजे खुद्द टिळक होते ही गोष्ट अगदीं उघड आहे.

३. पत्रें छापण्याला कारण टिळकांचा सल्ला झाला ही गोष्ट जशी उघड आहे, त्याचप्रमाणें तीं छापून त्यासंबंधीं वर्तमानपत्रांत काय मजकूर लिहावयाचा यासंबंधीं त्यांचें आणि आगरकरांचें मतैक्य होतें ही गोष्टही निर्विवाद आहे. वर्तमानपत्राच्या धंद्यांत जे पडतात त्यांत शक्य तितक्या थोड्या माणसांवर कायद्याचे प्रतिकूल परिणाम भोगण्याचा प्रसंग यावा अशी व्यवस्था ते कर-तात ही गोष्ट निदान सदर धंद्यांत असणाऱ्यांना तरी सांगावयास नको. प्रत्येक गोष्टीची संपादक पूर्ण जबाबदारी घेत असतो आणि म्हणून ती दुसऱ्या कोणी घेतली नाहीं अशाप्रकारची तक्रार हास्यास्पद ठरते. वामनराव आपटे मराठ्यांत लिहीत असत, पण संपादकीय जबाबदारी टिळकांनीं पतकरली असल्यामुळें त्यांना खटल्याच्या बाहेर सर्वांनुमतें ठेवण्यांत आले; यासाठीं आपट्यांना दोष देणें म्हणजे आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. खटल्यांत आपट्यांची साक्ष आरोपीतर्फें झाली ती अर्थात् आरोपींच्या व त्यांच्या वकिलांच्या सल्ल्यानें झाली होती हें सांगावयास नकोच. सदर साक्षींतील कांहीं गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. आपटे आपल्या साक्षींत म्हणाले:—" मीं मराठ्याचा संपादक नाहीं. त्याचा फक्त एक लेखक आहें व मीं त्यांत मधून मधून लिहितों. सरकारला पाठविलेल्या अर्जावर टिळकांची, आगरकरांची व माझी सही आहे. छापलेलीं पत्रें टिळकांनीं आपल्या घरीं आणलीं होतीं तीं मीं तेथें पाहिलीं. मीं, टिळक आणि आगरकर एकाच घरांत राहतों. त्यांनीं तीं पत्रें कोठून आणलीं हें मीं त्यांना विचारलें नाहीं. त्यांनीं तीं कशीं मिळविलीं हें मला माहीत नाहीं. बर्व्यांचें हस्ताक्षर मीं ओळखतों. पत्रें वाचून पाहिल्यावर त्यांतील माहिती देऊन सरकारला अर्ज पाठविण्याचें आम्ही ठरविलें. अर्ज टिळकांनीं तयार केला व त्यांच्या हस्ताक्षरांत तो लिहिलेला आहे. नाना भिडे यांची माझी तोंडओळख आहे. त्यांनीं टिळकांना हीं पत्रें दिलीं कीं काय हें मला माहीत नाहीं. टिळकांनीं मला व ( आगरकरांना ) अर्जावर सही कर-ण्यास सांगितलें. मूळचीं अस्सल पत्रें कोठें आहेत हें मला माहीत नाहीं. टिळक हे मराठ्याचे जबाबदार संपादक आहेत. ता. १५ जानेवारीचा अग्रलेख मीं लिहिलेला नाहीं. कोणी लिहिला तें मला माहीत नाहीं. अग्रलेखाचे हस्तलेख

नाहींसे केले आहेत. या प्रकरणांत आम्ही सर्वांनीं काय काय करावयाचें हें ठरविलें आणि त्याप्रमाणें अर्जावर सर्वांनीं सह्या केल्या. पत्रांतील मजकूर विशेष स्वरूपाचा होता आणि तो सरकारच्या कानांवर घालून सरकारकडून त्यासंबंधीं चौकशी झाली पाहिजे असें माझें मत झालें ( म्हणून मीं या बाबतींत पत्रें छापण्यासंबंधीं वगैरे अनुमति दिली. )" सदर जबानी ही अर्थात् आरोपी व त्यांचे वकील यांच्या सल्ल्याप्रमाणें दिलेली होती हें उघड आहे. टिळकांना कायद्याच्या प्रत्यक्ष कामाचा अनुभव नव्हता व भावना तीव्र असल्यामुळें वामनराव रानडे, नाना भिडे, व बखले या माणसांचा बर्व्यां-बद्दल ग्रह बरा नसण्याला कारणें आहेत या गोष्टीला त्यांनीं कमी महत्व दिलें व कदाचित् कोल्हापुराहून बळवंतराव जोशी वगैरेनीं दिलेल्या माहितीप्रमाणें बर्वे हे अपराधी आहेत या मताला पुष्टि मिळाली असावी. ज्या पत्रांच्या पायावर हा खटला उभारला होता त्या पत्रांच्या अस्सल प्रती आरोपींनीं आणि त्यांच्या वकिलांनीं शेवटपर्यंत कोर्टांत दाखल करण्याचें नाकारलें. हीं पत्रें छाप-ण्यापूर्वीं कित्येक लोकांना दाखविलीं होतीं त्यांत रावबहादुर माधवराव रानडे यांचें नांव कित्येकांनीं घेतलें आहे व रानड्यांनीं पत्रें वाचून त्यांच्या जोरावर बर्व्यांची फजिती करतां येईल असा प्रथम सल्ला दिला व नंतर प्रत्यक्ष खटला सुरू झाल्यावर पाय माघारा घेतला अशी त्यावर मल्लीनाथी करण्यांत आली आहे. रानडे हे महाराष्ट्रांत एकुणिसाव्या शतकांत अद्वितीय पुरुष होऊन गेले तरी मनुष्यमात्राप्रमाणें त्यांच्यांतही कांहीं दोष होते. परंतु तरुण मंडळींना भलताच सल्ला देऊन पुढें प्रसंग आल्यावर त्यांचा घात करावयाचा हा दुर्गुण त्यांच्या आंगीं केव्हांही नव्हता हें त्यांच्या निंदकांनासुद्धां कबूल केलें पाहिजे. पण यासंबंधांत तर्क करीत बसण्याची जरुरी नाहीं. खटल्यांत अत्यंत मह-त्वाचे आरोपी नाना भिडे हे या प्रकरणांत जिवावर उदार होऊन लढत होते. आपण पत्रें कोणा कोणाला दाखविलीं किंवा पत्रें कोणी कोणी पाहिलीं हें त्यांनीं कोर्टांत सांगितलें व त्यांत माधवराव रानड्यांचें नांव सांगण्याला ते मुळींच कचरले नसते. ते आपल्या जबानींत म्हणालेः—" पत्रें मी टिळकांना दिलीं. हीं पत्रें मी प्रथम ९ डिसेंबर १८८१ रोजीं पाहिलीं. ज्ञानप्रकाशचे संपादक वामनराव रानडे वकील यांनीं तीं मला दिलीं. तीं पत्रें मी विनायक लक्ष्मण काळे, हरि अनंत गबाळे ( कोल्हापुर शहर फौजदार ) व गोपाळ गोविंद फाटक, फर्स्ट क्लास सबजज्ज, पुणें, यांना दाखविलीं होतीं. आपण साक्ष

देण्याचा प्रसंग आल्यास पुढें येणार नाहीं असें त्यापैकीं कित्येकांनीं मला सांगितलें होतें. हीं पत्रें मी टिळकांनाही दाखविलीं, व तीं मला वामनराव रानडे यांजकडून मिळालीं आहेत असें टिळकांना मी सांगितलें. तीं आपल्याला (कोल्हापुरच्या) खासगी खात्यांतील एका कारकुनानें दिलीं असें वामनराव रानड्यांनीं मला सांगितलें. पत्रें पाहून तीं बरोबर (बऱ्यांचीं पत्रें) आहेत अशी माझी खात्री झाली. (कारण) महाराजांवर विषप्रयोग करण्यांत आला होता हें मला माहीत आहे व महाराजांविरुद्ध कटांत बर्वे होते." या जबानींत माधवराव रानड्यासारख्यांचें नांव घालतां आलें असतें तर नाना भिड्यासारखा जिवावर उदार झालेला मनुष्य तसें करण्याला कोणत्याही कारणामुळें डरला नसता. यावरून या बाबतींत माधवराव रानड्यांचें नांव निष्कारण ओढलें असावें असें दिसतें; शिवाय टिळक आणि आगरकर हे दोघेही जसे तेजस्वी तसे अहंमन्य होते. अमुक गोष्ट बरी किंवा वाईट आहे ही स्वतःची खात्री होऊन चुकल्यावर ते त्यासंबंधीं गांवांतील शिष्टांची मसलत घेण्याला जातील हें बहुतकरून संभवनीय नव्हतें. आणि शिवाय या वेळीं टिळक-आगरकर यांचा आणि रानड्यांचा संबंध फारसा आलेला नव्हता. स्पेन्सर वाचून टिळक आगरकरांसारखी मंडळी बिघडली असें * म्हणणारे रानडे १८८१ सालीं यांना ओळखत नव्हते. म्हणजे टिळक आगरकर यांनीं रावसाहेबांच्या घरीं जाऊन त्यांचा सल्ला घ्यावा असा त्यांचा संबंध नव्हता हें स्पष्ट दिसतें. ‡ आणि पुढें देखील संबंध आला तो विशेष जिव्हाळयाचा येण्याला बराच काळ लोटावा लागला. आगरकर व रानडे यांचा स्नेहसंबंध पुढें पुढें दृढ झाला व रानड्यांबद्दल आगरकरांना पुढें आदर वाटूं लागला; पण सुरवातीला त्यांच्याबद्दल दोघांनाहि फारसा आदर होता असें दिसत नाहीं. अशा स्थितींत राव-

---

* मे १८८५ सालीं भरलेल्या डेक्कन कॉलेजच्या ग्यादरिंगमध्यें.

‡ न्यू इंग्लिश स्कूल काढण्यापूर्वी नवीन स्वतंत्र शाळा काढण्याच्यासंबंधीं टिळक व आगरकर यांनीं पुण्यांतील एका मोठ्या गृहस्थांना पत्र लिहिलें होतें व त्यांचा सल्ला विचारला होता. हे मोठे गृहस्थ म्हणजे रानडे होते असें म्हणतात. हें पत्र लिहिलें होतें यावरून रानड्यांची न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींशीं निकट दोस्ती होती किंवा रानड्यांच्या स्फूर्तीमुळें टिळक आगरकरांनीं नवीन शाळा काढली अशा प्रकारच्या निष्कर्षांत दूरान्वयाचा अतिरेक झालेला आहे हें स्पष्ट आहे.

साहेबांच्या माथ्यावर भलताच आरोप घालण्याचें धारिष्ट जें करण्यांत आलेलें आहे त्याला आधार मुळींच दिसत नाहीं. असो. या प्रकरणांत कोल्हापुरच्या कित्येक मंडळींनीं अवसानघात केला याबद्दल मात्र शंका वाटत नाहीं. आणि हा अवसानघात करण्यांत खुद्द टिळकांचे कोल्हापुरांतील स्नेही असावेत असें दिसतें. कोल्हापुरांतील कित्येक मंडळींचा उल्लेख देखील खटल्यांत होतां उपयोगी नाहीं, असा हट्ट ज्यांनीं प्रथम टिळकांना हीं पत्रें छापण्याबद्दल चिथविलें, त्यांचा होता असें त्या वेळच्या हकीकतीवरून दिसतें. संस्थानच्या राजकारणाला किती फांद्या असतात याची माहिती टिळकांना होण्याचा प्रसंग पुढें आला. पण या वेळीं त्यांना कसलाच अनुभव नव्हता व ऐकलेल्या गोष्टी किती प्रकारें जोखून पाहिल्या पाहिजेत याची त्यांना अर्थात् जाणीव नव्हती. अन्याय दिसेल तेथें घाव घालावयाचा हा त्यांचा व आगरकरांचा कृतनिश्चय. तेव्हां त्यांना गळ घालून आपलीं कामें करून घ्यावयाचीं व पाहुण्याकडून साप मारवावयाचा, साप न मरतां पाहुणा मेला तरी आपलें नुकसान नाहीं अशा प्रकारची लटपट ह्या प्रकरणांत कोल्हापुरच्या मंडळीकडून झाली किंवा नाहीं याची विशेष शहानिशा करण्याचें टिळक आगरकरांचें तेव्हां वयच नव्हतें. कायद्याच्या कचाट्यांत त्यामुळें ते सांपडले; पण कायद्याच्या कचाट्यांत आलों तरी बेहेत्तर पण कोल्हापुरचा अन्याय चव्हाट्यावर आणूं या हिमतीनें ते जाणून बुजून या प्रकरणांत पडले ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

पत्रें केसरींत व मराठ्यांत आलीं तीं सर्वथा टिळकांच्या प्रेरणेमुळें व जबाबदारीवर. त्यांची जबाबदारी आगरकरांसारख्या त्यांच्या मित्रांना मान्य होती, तेव्हां त्याबद्दल आतां चर्चा करण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें टिळकांनीं शक्य तेवढी शहानिशा करून पत्रें छापलीं असें त्यांचे चरित्रकार म्हणतात तेंही खोटें मानण्याचें कारण नाहीं. पण नुकत्याच वर केलेल्या विवेचनाविरूद्ध पुढील मजकूर अविश्वसनीय ठरतो. “या सर्व गोष्टींची पक्की चौकशी टिळकांनीं पूर्वीं केली होती एवढेंच नव्हे तर त्याहूनही एक विशेष गोष्ट त्यांनीं केली ती ही कीं, तीं पत्रें त्यांचे स्नेही गोपाळराव फाटक सबजज्ज व खुद्द रावबहादुर रानडे यांना दाखविलीं; व या उभयतांनींही या पत्रांवर आपला विश्वास बसतो असें टिळकांस सांगितलें होतें. हीं पत्रें रावबहादुर रानड्यांच्या जवळ एक महिनाभर ठेवण्यांत आलीं होतीं. कारण पुण्यांतील सुशिक्षित तरुण लोकांचे पुढारी रानडे हेच होते; शिवाय ते विवेकी व शांत डोक्याचे कायदेपंडित असा त्यांचा योग्य

लौकिक होता. रानड्यांनीं हीं पत्रें पाहून त्यांवर विश्वास टाकला ही गोष्ट नाना भिडे यांचे तोंडून शपथेवर कोर्टांत सांगितली गेली होती हें वर आलेंच आहे. व टिळकांना स्वतः आरोपी झाल्यानें साक्षीदार होतां आलें नाहीं पण तें होतां आलें असतें तर त्यांनींही ती गोष्ट शपथेवर सांगितली असती. कारण ही गोष्ट आम्ही स्वतः खुद्द टिळकांचे तोंडून अनेक वेळां ऐकिली आहे."+ शेवटच्या वाक्या-संबंधीं विशेष चर्चा करण्यांत हंशील नाहीं. कारण त्यांत कथन केलेल्या गोष्टीला लिहिणाऱ्याखेरीज साक्षी पुरावा नाहीं. पण ज्याप्रमाणें वाठारच्या स्टेशनावर टिळकांनीं बटलरच्या हातचें जेवण खाल्लें किंवा नाहीं या गोष्टीसंबंधीं आगर-करांचें म्हणणें साक्षी पुराव्याच्या अभावीं फोल ठरलें तसाच प्रकार वरील शेव-टच्या वाक्याचा होय. टिळकांना आपल्या प्रतिपक्ष्यांवर खोटे आरोप करण्याची संवय होती. ते आरोप "आम्ही स्वतः खुद्द टिळकांचे तोंडून अनेक वेळां" ऐकिले असले तरी खरे होत नाहींत. आम्ही वर नाना भिड्यांच्या साक्षींतील या बाबतींत वाक्यें दिलीं आहेत त्यांत रावसाहेब रानड्यांचें नांव नाहीं.* त्याच साक्षींत भिडे म्हणतातः—"हीं पत्रें मी प्रथम ९ डिसेंबर १८८१ रोजीं पाहिलीं. हीं पत्रें टिळकांनाही मीं दाखविलीं." बर्वे आपल्या फिर्यादींत म्हण-तात कीं, पहिली तार गव्हर्नरसाहेबांकडे ता. १६ डिसेंबरच्या सुमारास पोंचली व अर्जावर २७ डिसेंबर ही तारीख होती. बर्व्यांनीं फिर्याद दाखल केली ता. २४ जानेवारी १८८२ रोजीं. या तारखा लक्षांत ठेवल्या म्हणजे वरील अवतरणांतील मजकुराच्या सत्यपणाविषयीं शंका आलीच पाहिजे. ता० ९ डिसेंबरनंतर टिळकांनीं पत्रें पाहिलीं. त्यांचा उल्लेख ता० २७ डिसेंब-रच्या अर्जांत ( हा अर्ज टिळकांनीं आपल्या हातानें लिहिला होता ) टिळकांनीं केला. तर मग हीं पत्रें रावबहादुर रानड्यांच्या जवळ एक महिनाभर असणें

---

+ टिळकचरित्र. खंड पहिला. पृष्ठ १३९.

* रावबहादुर रानड्यांचें नांव टिळकचरित्रांत ( खंड पहिला. पृष्ठ १३६ ) भिड्यांची साक्ष दिली आहे तींत आलें आहे. आम्ही या खटल्याची हकीकत तेव्हांच्या टाइम्स ऑफ इंडियांत साग्र येत असे ती अथपासून इतिपर्यंत वाचली त्यांत रानड्यांचें नांव भिड्यांच्या साक्षींत नाहीं. रानड्यांचें नांव असल्या भान-गडींत सांपडतें तर तें ठळक अक्षरांत छापण्याइतके रानडे अँग्लो-इंडियन पत्रांचे नावडते होते.

कसें शक्य होतें ? तेव्हां ही सर्व हकीकत अगदीं अविश्वसनीय असावी असें स्पष्ट दिसतें आणि रानड्यांच्यावर आडून गोळी मारण्याचा हा जो निंद्य प्रयत्न करण्यांत आला आहे त्याचा कोणीही समंजस मनुष्य निषेधच करील. टिळक-चरित्रकारांनीं उठविलेली ही इमारत बिनपायावर रचलेली आहे असें त्यांच्या-कडून या बाबतींत विश्वसनीय पुरावा येईंपर्यंत मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

४. ता० २४ जानेवारी १८८२ रोजीं खटला सुरू झाला. मॅजिस्ट्रेटनें सर्व पुरावा ऐकून घेऊन ता० १५ मार्च रोजीं सर्व आरोपींना सेशन कमिट केलें म्हणजे हायकोर्टाकडे त्यांचा खटला पाठविण्यांत आला. पुढें उन्हाळ्याची सुटी असल्यामुळें जून महिना संपतां संपतां हायकोर्टांत खटल्यास सुरवात झाली. ता० ६ जुलै रोजीं भिडे व बखले यांना जूरीनें एकमतानें दोषी ठरविलें. आपलें समर्थन करण्यासाठीं भिडे व बखले यांनीं जो पुरावा कोर्टापुढें मांडला त्या पुराव्याच्या जोरावरच आगरकर व टिळक अवलंबून राहिले होते. अर्थात् हा पुरावा कुचकामाचा ही गोष्ट भिडे व बखले हे दोषी ठरल्यानें सिद्ध झाली. पुढें ता० १३ जुलै रोजीं त्याच जूरीनें वामनराव रानडे यांना दोषी ठरविलें. अर्थात् ज्या पुराव्यावर आमच्या या मंडळीची सर्व भिस्त, तो पुरावा अगदीं व्यर्थ होता याबद्दल आतां मुळींच शंका राहिली नाहीं आणि पुरावा जर निरुपयोगी ठरला तर त्याच्या जोरावर केसरी आणि मराठ्यांत आलेले लेख भलत्या समजुतीखालीं लिहिण्यांत आले ही गोष्ट उघड उघड स्पष्ट झाली. तेव्हां आगरकर व टिळक यांनीं वरील परिस्थिति लक्षांत घेऊन सभ्य माण-सांच्या शिष्टाचाराला अनुसरून जीं विधानें सिद्ध करतां येत नाहींत तीं केल्याबद्दल रावबहादुर बर्वे यांची माफी मागावी असा सल्ला त्यांच्या कायदे-पंडितांनीं तर दिलाच, पण टिळकांच्या कोल्हापुरच्या मित्रांनींही दिला. या खटल्यांत टिळक पडले आणि त्यांचा पाठपुरावा करण्यासाठीं आगरकर पडले. कायद्याच्या कामांत आगरकरांची भिस्त टिळकांवर. टिळकांच्या कांहीं मित्र म्हणविणाऱ्यांनीं आम्ही तुम्हाला अगदीं राजवाड्यांतून पुरावा आणून देतों अशा थापा उडविल्या होत्या आणि व्यवहारज्ञ टिळकांनीं त्यांवर विश्वास ठेविला. आणि टिळकांना सर्व प्रकारें साहाय्य करावयाचें हा आगरकरांचा निश्चय. पण भिडे, बखले व रानडे यांचे जूरीनें बारा वाजविलेले पाहतांच टिळकांचें हें करवीरस्थ मित्रमंडळ गडबडलें व त्यांनीं आतां तुम्ही रावबहादुर बर्व्यांची माफी मागा व प्रकरण संपवा असा टिळकांच्या मागें लकडा लावला. हा

लकडा स्वार्थबुद्धिपर व भित्रेपणाचा होता हें उघड आहे. पण जेव्हां फेरोजशाह मेहता आणि काशीनाथ त्रिंबक तेलंग यांनीं माफी मागणें योग्य आहे असा सल्ला दिला तेव्हां त्याचा विचार करणें टिळकांना प्राप्त झालें. मेहता व तेलंग हे पहिल्या प्रतीचे कायदेपंडित होते. आपल्या अशीलांना निष्कारण अधिक शिक्षा होऊं नये म्हणून हा सल्ला त्यांनीं दिला व टिळकांना तो पटला व टिळकांना पटला म्हणून आगरकरांनीं पटवून घेतला. जूरीनें सर्व पुरावा ऐकून भिडे, वखले व रानडे यांना दोषी ठरविलें होतें. तोच पुरावा ऐकून आगरकर व टिळक यांच्या बाबतींत तीच जूरी निराळा निकाल देईल हें शक्य नव्हतें. शिवाय पुरावा कुचकामाचा हें अगदीं सिद्ध झालें होतें. तेव्हां बर्व्यांची माफी मागावी व कोर्टांत आपण कांहीं आरोपाच्या बाबतींत दोषी आहोंत हें कबूल करावें हा सल्ला त्या परिस्थितींत अगदीं रास्त होता आणि तो देण्यांत वकिलांचा हेतु अत्यंत शुद्ध होता हें समजण्याला वकिलीची परीक्षा उतरलेली असण्याचीसुद्धां आवश्यकता नाहीं. हा सल्ला कटु होता पण योग्य होता व तो गळीं उतरतांना टिळकांनीं तोंड वेडें वांकडें केलें नसेल असें नाहीं. पण १८८२ सालीं टिळक राजकारणांतील गनिमी काव्याचे डावपेच शिकलेले नव्हते आणि निराधार विधानें करून हीं निराधार ठरल्यावर सुद्धां परत घ्यावयाचीं नाहींत, परत घेतलीं तरी संदिग्ध भाषेंत घ्यावयाचीं ही युद्धनीति त्या वेळीं त्यांनीं अंगिकारलेली नव्हती. टिळकांच्या अर्वाचीन भगतकंपूला चकित करून सोडणारीं पुढील वाक्यें त्यांनीं आपल्या माफीपत्रांत घातलीं:—"ज्या वेळीं आम्ही वर्तमानपत्रांत विधानें केलीं त्या वेळीं तीं साधार आहेत असेंच प्रामाणिकपणानें आम्हांस वाटत होतें व म्हणूनच तीं आम्ही केलीं; व ज्यांनीं आम्हांस माहिती पुरविली त्यांजवर आमचा तेव्हां अविश्वास नव्हता, विश्वासच होता. पण ती माहिती व तीं पत्रें आतां भिडे यांच्या खटल्यांत खोटीं ठरल्यामुळें आमचीं विधानेंही निराधार ठरतात.* व आम्ही अशा माहितीवर इतका विश्वास टाकला याबद्दल आम्हाला अत्यंत वाईट वाटतें."

हा मजकूर टिळकांच्या प्रामाणिकपणाला खुलवून दाखवितो. १८८२ सालचे टिळक आणखी १८९७ सालचे गोखले यांची मनोवृत्ति सारखीच प्रामाणिक आणि सभ्य होती. या माफीमुळें टिळक व आगरकर यांना

* टिळकचरित्र खंड पहिला. पृ. १४१ यांत दिलेली "माफी" पहा.

कमीपणा आला असें ज्यांना वाटत असेल त्यांच्या नीतिविषयक कल्पनांची तारीफ करावी तेवढी थोडी आहे. कायद्याच्या कचाट्यांत सांपडल्यावर त्यांतून आंग निभावून बाहेर पडण्यासाठीं लोकाग्रहासाठीं माफी मागतों म्हणून वर नाक करून सांगावयाचें असल्या क्षुद्र मार्गाचें अवलंबन करण्याचें हीनपण टिळकांना खपणें शक्य नव्हतें; आणि म्हणून चूक पदरांत पडल्यावर त्यांनीं त्यासंबंधीं सडेतोड कबुली दिली व ती देतांना आगरकरांत व त्यांच्यांत पूर्ण मतैक्य होतें; यामुळें त्यांनीं जें केलें त्यावर शिष्टपणानें शिंतोडे उडविणाऱ्या शेंदाड शिपायांची शूर पुरुषांत गणना होणें शक्य नाहीं. शिवाय त्यांचे वकील सामान्य नव्हते.* मेहतांची स्वतंत्र वृत्ति किती जाज्वल्य होती, याचा अनुभव खटल्यांतच एक दोन वेळां आला. कांहीं आचरट लोकांनीं तर ही माफी आगरकरांनीं मागितली, त्यांत टिळकांचा कांहीं संबंध नव्हता म्हणून भासविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या माहितीसाठीं एवढें सांगितलें पाहिजे कीं, हा कोल्हापुरचा खटला अथपासून इतिपर्यंत टिळकांचा होता. त्यांतील प्रत्येक गोष्टीचा निर्णय टिळक करीत व मित्रधर्माला अनुसरून आगरकर टिळकांचा पाठपुरावा करीत. माफी मागितली यांत गैर कांहींच नव्हतें असें आमचें स्पष्ट मत आहे. पण ज्यांना ही माफी गैर वाटते त्यांनीं तिचें सर्व श्रेय टिळकांना आहे, आगरकरांनीं फक्त टिळकांना मोडून काढलें नाहीं, हें विसरूं नये. माफीचें पत्र बर्व्यांकडे पाठविण्यांत आलें व कोर्टांत आगरकर आणि टिळक यांनीं दोन आरोपांसंबंधांत आपण दोषी असल्याचें कबूल केलें आणि हें त्यांनीं योग्य केलें हें त्यांना शिक्षा देतांना न्यायाधीशांनीं काढलेल्या उद्गारांवरून सिद्ध होतें. न्यायमूर्ति लॅथॅम खटल्याचा निकाल देतांना पुढें लिहिल्याप्रमाणें बोलले:—"अब्रुनुकसानीचा गुन्हा तुम्ही कबूल केला आहे. वास्तविक तुमचा खटला गेले दोन दिवस जूरीपुढें आहेच आणि आलेल्या पुराव्यावरून जूरीनें जो निकाल यापूर्वीं दिलेला आहे त्याला मान्यता दर्शविण्यांत तुम्ही शहाणपणाच्या मार्गाचें अवलंबन केलें आहे. या

* मेहता व तेलंग हे दोघेही त्या वेळीं मोठ्या माणसांत गणले जात. पुढे राष्ट्रीयसभेंत टिळक व मेहता यांचा १९०७ सालीं बेबनाव झाला; पण १८८२ सालीं टिळक हे तरुण व अप्रसिद्ध होते व त्या वेळीं त्यांच्याबद्दल मेहतांना हेवा वाटण्याचें कारण नव्हतें; आणि पुढेंही टिळकांचा हेवा मेहतांनीं केला नव्हता तर वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट होती.

खटल्यांत तुमच्या स्वतःच्या मनांत फिर्यादीबद्दल द्वेष नव्हता हें मला मान्य आहे, परंतु वर्तमानपत्राचे संपादक या नात्यानें आपलें कर्तव्य बजाविण्यांत तुमचेकडून अविचारीपणाचें वर्तन झालें हा अपराध तुमच्या हातून घडला. तुमचे मनांत फिर्यादीबद्दल द्वेषबुद्धि नाहीं व तो आरोप तुमच्यावर लागू होत नाहीं; पण ( हीं पत्रें वगैरे छापण्यांत ) तुमच्या हातून बेसावधपणा घडला असें मानलेंच पाहिजे." जज्जानें उच्चारलेल्या या वाक्यांवरूनही टिळक व आगरकर यांनीं "माफी" मागितली हें चुकलें हा ध्वनि निघत नाहीं. पुढें खटल्याचा जो निकाल झाला त्यांतही न्यायाधिशानें भिडे व रानडे यांना प्रत्येकीं दोन दोन वर्षांची सजा व १००० रुपये दंड अशा शिक्षा दिल्या; पण टिळक व आगरकर यांना प्रत्येकीं चार महिन्यांची शिक्षा दिली. यावरूनही जज्जाच्या मतें यांचा गुन्हा विशेष मोठ्या स्वरूपाचा नव्हता असेंच दिसतें. आतां कायद्याच्या कोर्टांत सिद्ध झालेल्या गोष्टी शुद्ध नैतिक दृष्टीनें सिद्ध असतात किंवा नाहीं हा भाग निराळा. तेव्हां टिळक आगरकरांना जी शिक्षा झाली ती योग्य का अयोग्य यासंबंधीं प्रत्येकानें आपापल्या मताप्रमाणें कांहींही म्हणावें, पण ही शिक्षा देतांना यांचा गुन्हा भिडे व रानडे यांच्या मानानें फार अल्प आहे ही गोष्ट न्यायाधिशानें लक्षांत घेतली होती हें उघड आहे. टिळक आगरकर दोघेही मोठे झाले तेव्हां त्यांची लहान शिक्षा लोकांच्या स्मरणांत राहिली व भिडे व रानडे यांना जरी जबर शिक्षा झाली होती तरी लोकांना त्यांचें विस्मरण पडलें हेंही साहजिक होतें. भिडे व रानडे यांचा खटल्यांतील संबंध अगदीं निरपेक्ष नव्हता आणि आगरकर व टिळक यांचा संबंध पूर्ण निरपेक्ष होता हा दोघां-मधील मोठा महत्वाचा भेद होय. खटल्याचा निकाल ऐकून आणि ही दोन तरुण विद्वान् मंडळी, मोठ्या सद्बुद्धीनें कोल्हापुर प्रकरणावर टीका करण्यास उद्युक्त झालेली, आतां तुरुंगांत जाणार ही बातमी कळून महाराष्ट्रभर लोक हळहळले. बऱ्यांची अब्रू कायद्याच्या कोर्टांत कायदेशीर रीतीनें साफ झाली. पण त्यांच्या दुर्दैवानें कोर्टाचा निकाल लोकांना पटला नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे. कोल्हापुरच्या दुर्दैवी महाराजाचा अंत अत्यंत हृदयद्रावक तऱ्हेनें झाला व त्यामुळें महाराष्ट्राच्या अंतःकरणाला झालेली जखम इतकी तीव्र होती कीं कायद्याच्या दृष्टीनें जरी माधवराव बर्वे सच्चे ठरले होते तरी त्या जखमेच्या वेदनेमुळें महाराष्ट्राच्या मनानें त्यांना जें गुन्हेगार ठरविलें होतें त्यांत फेरबदल झाला नाहीं. कांहीं झालें तरी आमच्या तरुण वीरांना त्यांच्या मार्गांत ही

पहिली ठोकर बसली व रणांगणावर वावरणाऱ्या शिपायांप्रमाणें त्यांनीं ती हंसत खेळत सहन केली. पण त्याबरोबर त्यांचें नांव महाराष्ट्रभर दुमदुमलें आणि न्यू स्कुलांतील हे दोन मास्तर खटल्याचा निकाल जाहीर होतांच सर्वांच्या गळ्यांतील ताईत बनले.

५. तुरुंगाची शिक्षा झाली व पुढें या दोन तरुण आरोपींची काय व्यवस्था झाली, त्यासंबंधीं मनोरंजक वर्णन खुद्द आगरकरांच्या विनोदपूर्ण लेखणींतून उतरलें आहे. त्यावरून लिहिणाऱ्याचें अंतःकरण किती द्वेषरहित व सरळ होतें हेंही अनायासें लक्षांत येतें. "डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस" या छोट्या पुस्तकांत सुरवातीला पुढील मजकूर आहेः—"कोल्हापुर प्रकरणाच्या संबंधानें लोकांच्या अटकळीचा जसा फजिता उडाला असा दुसऱ्यासंबंधानें कधींच उडाला नसेल. लोकांना वाटत होतें कीं, पत्रकर्ते निदान दंडावर तरी सुटतील, पण जज्जानें आणि जूरीनें त्यांची पच्चीच उडविली. पत्रकर्त्यांना मात्र अशा प्रकारची भुरळ पडली नव्हती. कोल्हापुरास काढलेल्या कमिशनाचें "ओंफस्" होऊन टाळ्या वाजवीत मंडळी परत आली, त्याचवेळीं आपल्या खटल्याचा काय निकाल होणार हें पत्रकर्त्यांच्या लक्षांत चांगलें येऊन चुकलें होतें. न्यायासनापुढें खटला शाबीत होण्यास कशा प्रकारचा पुरावा लागतो, याची ज्यांना बरोबर कल्पना नसते, त्यांची अशीच निराशा होते. [खटल्याच्या निकालासंबंधीं आगरकरांचे हे उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.] न्यायाधीश आणि पंच पुराव्याच्या आधारानें आपले फैसल करतात; लोकांचें फैसल त्यांच्या मनोविकारानें चालतात. [यावरून आपल्या बाजूचा पुरावा लंगडा पडला ही गोष्ट आगरकरांना व म्हणून अर्थात् टिळकांना मान्य होती हें उघड होतें. त्यांच्यासारख्या जाणत्या माणसांना हें मान्य झालें यांत नवल नाहीं हें सांगावयास नकोच. स्वतःला झालेल्या शिक्षेचा विचार एवढ्या त्रयस्थपणें करण्याची आगरकरांच्या मनाची समता अपूर्व होती यांत शंका नाहीं.] कैद्यांना "द्वेषाच्या" चार्जातुन मुक्त करून अविचाराचे लेख लिहिल्याबद्दल शिक्षेची सुनावणी केल्यानंतर हायकोर्ट उठलें, व मंडळी खालीं तोंडें करून आपापल्या घरीं चालती झाली. नंतर आम्हांला (हायकोर्टाच्या) माडीवरून खालीं आणून एका कोठडींत ठेविलें. सहा वाजण्याच्या सुमारास घोड्याच्या दोन गाड्या आणवून त्यांत आम्हांला व्यवस्थेनें बसविलें, व आमच्या बंदोबस्ताकरितां बरोबर शिपाई लोकांचा पहारा देऊन बिनभाड्याच्या

घराकडे आमची रवानगी केली. आमच्या समजुतीप्रमाणें देशाच्या बऱ्यासाठीं आम्ही आरंभिलेले उद्योग, करवीरस्थ प्रभूचें चांगलें व्हावें म्हणून आम्ही लिहिलेले लेख, खटला उभा राहिल्यावर आम्हांस व आमच्या मित्रमंडळीस पडलेली दीर्घ यातायात, लोकांची आमच्यावर वसलेली प्रीति आणि त्यांच्याशीं आमचें वर्तन, आमच्या देशाची स्थिति आणि जगांतील न्यायपद्धति वगैरे अनेक विषय झपाट्यानें आमच्या डोक्यांतून जात आहेत तों आमच्या गाड्या तुरुंगाच्या दारापाशीं येऊन ठेपल्या. त्यांतून खालीं उतरून दिंडींतून आंत शिरतांना आमच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. आंत गेल्यावर आम्ही थोडा वेळ स्वस्थ बसलों. नंतर घरचे कपडे उतरून टाकल्यावर सरकारी वार्डरानें खालपासून वरपर्यंत आमची झडती घेतली व आम्हांस तुरुंगाचे पोषाख दिले. या पोषाखांत तीन डाग असतात; (१) तुमान किंवा गुडघ्याइतका सईल चोळणा; (२) कोपऱ्यांइतक्या अस्तन्यांचा सदरा; (३) आणि वाटोळी टोपी. हीं वस्त्रें खादीचीं केलेलीं असून मजबूत, व थंडीवाऱ्याला सहसा दाद देणारीं नसतात. हीं दर आठवड्यास एकदां धुवून मिळतात. या खेरीज स्नान करावयाचें असलें म्हणजे त्या वेळेपुरती रुंद लंगोटी मिळते. ही लंगोटी घालतांना करगोट्याची गरज न लागावी अशी तिच्यांत खुबीची सुधारणा केलेली आहे. माझी प्रकृति जात्या शैत्यखोर असल्यामुळें मला वारंवार पडसें होई; तेव्हां जमादाराच्या परवानगीनें शिंप्यापासून—तो तरी एक कैदीच होता—नाक पुसण्यासाठीं मी एक वीत दीड वीत फडकें मिळविलें, तें माझ्यापाशीं आम्ही सुटेतोंपर्यंत होतें. वस्त्रपरिधान झाल्यावर आमचीं नांवें रजिस्टर झालीं व लत्ताकपड्यांचीं टिपणें होऊन आमच्या सह्या घेतल्यावर आम्हांस तुरुंगांत ( Trial yard cells ) नेलें. तेथें एका दगडी फरशीच्या पण बिनढेकणी खोलींत आम्हां सगळ्यांना कोंडून घालून व आमच्या आंगावर दहा बारा फाटकीं तुटकीं घोंगड्यांचीं रखटीं फेंकून देऊन कोंडण्यास आलेला शिपाई दाराला जंगी कुलूप लावून चालता झाला. त्या रात्रीं पोटांत थंडी, बाहेर थंडी व थंड प्रकृति असल्यामुळें मीं उजाडेपर्यंत सगळे तास मोजिले व माझ्या स्वतःप्रमाणेंच सरासरी बाकीच्यांची स्थिति होती. सुमारें सात आठ वाजण्याच्या सुमारास आम्हांस तेथून काढून क्लार्कच्या ऑफिसांत आणिलें. तेथला विधि आटपण्यास पक्के दोन तास लागले. प्रथम आमचें वजन करून नंतर शरीराची उंची, डोक्याचा परीघ व

पावलांची लांबी घेतली, व आंगावरील ठळक ठळक निशाण्या टिपल्या. पुढें तुरुंगाच्या नेटिव्ह मेडिकल असिस्टनानें कोणास कांहीं स्पर्शरोग आहे किंवा नाहीं याचा तपास करून देवी काढल्या न काढल्याची चौकशी केली व आपल्या बुकांत सर्व माहिती लिहून घेतली. इतक्यांत गोरा डाक्टर आला. त्याबरोबर क्लार्कच्या ऑफिसांतून डाक्टराच्या ऑफिसांत आम्हांला नेलें. तेथें त्यानें सदरे काढवून देवी वगैरे काढल्या आहेत कीं नाहीं हें पाहिलें. तेथून क्लार्कच्या ऑफिसांत आम्ही पुनः परत आलों. पुढें हेड क्लार्कच्या ऑफिसांत थोडी बहुत चौकशी झाल्यावर आम्हांस तुरुंगाच्या गोऱ्या सुपरिंटेंडंटापुढें नेऊन उभें केलें व आमच्या लख्या कपड्यांची यादी पहिल्या क्लार्कनें वाचिली. ती बरोबर आहे असें आम्ही सांगितल्यावर आम्हांला तेथून काढून हाटलीवर ( Hard labour yard ) नेलें. इतका प्रकार होईपर्यंत सुमारें अकरा वाजण्याचा बेत आला. नंतर सर्वांस परसाकडणें, तोंड धुणें घालून जेवायला नेलें. प्रत्येक कैद्याला अन्न घेण्यासाठीं एक लोखंडी टकोरें दिलेलें असतें. या पात्राची आकृति कशी असते म्हणाल तर आपल्या कढईसारखी असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. भेद इतकाच कीं, कढईला कड्या असतात त्या टकोऱ्याला नसतात. पहिल्या दिवशीं अन्न पुढें आल्याबरोबर त्याचा अमंगळ दर्प आम्हांस दुःसह वाटला, व तोंडांत दोन तीन शितें जाण्याबरोबर ओकारी आली. मग थोडेंसें पाणी पिऊन घेतल्यावर शिपायांनीं आम्हांस एका बराकींत कोंडून घातलें. तेथें आम्ही संध्याकाळचे चार वाजेपर्यंत पडून होतों. तुरुंगांतल्या बराकी सरासरीनें लोखंडी गज मारलेल्या धर्मशाळेसारख्या असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. चार वाजल्यावर बाहेर काढून आम्हांस संध्याकाळचें जेवण दिलें, व सहा वाजण्याच्या सुमारास बराकीच्या दुसऱ्या मजल्यावर निजण्याच्या कोठड्या आहेत, त्यांत कोंडून घातलें. ही पहिल्या दिवसाची हकीकत झाली व हीच सगळ्या दिवसांची होय असें म्हटलें तरी चालेल. बिनमजुरी कैद्यास तुरुंगांत जेऊन बसण्याखेरीज दुसरें कांहीं एक काम नसतें. उद्योगांत गढलेल्या मनुष्यास दोन घटका स्वस्थ बसण्यास फुरसत केव्हां सांपडेल असें झालेलें असतें, पण आम्हांला तेथें कांहींच उद्योग नसल्यामुळें दोन दिवसांत बसण्याचा कंटाळा आला. बाहेर असतां कामकाज आटोपून फिरावयास निघण्याची वेळ ती तुरुंगांत निजण्यासाठीं कोंडून घालण्याची वेळ असते. संध्याकाळचे पांच साडेपांच वाजल्यापासून दुसऱ्या दिवशीं सकाळीं

सहा साडेसहा वाजेपर्यंत तेरा फुटांच्या चौरस खोलींत दोवां चौघांनीं निजून राहणें बरेंच कठीण आहे. प्रत्येक खोलींत रात्रीं लघवीस व शौचास जाण्यासाठीं एकेक लोखंडी कुंडी ठेवलेली असते. बराकी आणि खोल्या लोटून पुसून दररोज साफ केल्या जातात व कुंड्या उचलून नेऊन त्या साफ करण्याचें व साफ झाल्यावर त्या जागच्याजागीं परत आणून ठेवण्याचें काम भंग्याकडेस असतें. हे भंगीही कैदीच असतात. तुरुंगांत गेल्याबरोबर शेंडी काढून टाकितात त्यामुळें उवा वगैरेंचा त्रास होत नाहीं. पहिले पंचवीस दिवस आम्हांस पराकाष्टेचे जड गेले. तुरुंगांतील अन्नाची रुचि येऊन तें अंगवळणीं पडेपर्यंत फार त्रास झाला." वरील वर्णनावरून आमच्या पत्रकर्त्यांनीं तुरुंगाशीं कशी टक्कर मारली हें कळतें. पुढें पुढें त्यांना पुस्तकें वाचण्याची परवानगी मिळाली. आणि गप्पा मारण्यांत तर टिळक आगरकरांनीं तासचे तास किंबहुना रात्रीच्या रात्रीं घालविल्या. या सर्व वर्णनांत "आम्ही" या सर्वनामाचा प्रयोग टिळक-आगरकर-द्वय-वाचक आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. ज्यांच्यांत एवढा एकत्वभाव होता त्यांच्यांत पुढें "यूयं यूयं वयं वयं" अशी स्थिति झाली, पण दोघांच्याही स्मृतींत मतभेदाच्या भयंकर वादळांतही हे दिवस कायमचे राहिले, हें त्या दोघांच्याही निरनिराळ्या वेळीं बाहेर पडलेल्या उद्गारांवरून लक्षांत येतें.

६. तुरुंगांतील स्थितीचें वर्णन या पुस्तकांत मोठ्या बारकाईनें व मनोरंजक तऱ्हेनें केलें आहे. "जेवायला डोंगरीच्या तुरुंगांत सकाळीं भात आणि डाळ (आमटी) असतात व संध्याकाळीं गव्हाची रोटी किंवा बाजरीची भाकरी आणि कसली तरी भाजी असते." "कांदा, लसूण खण्याची ज्यांना संवय नाहीं, त्यांची तुरुंगांत फार उपासमार होते व त्यामुळें १०१ दिवसांत टिळकांचें २४ पौंड व माझें १६ पौंड मांस नाहींसें झालें." "सकाळच्या डाळीपैकीं कांहीं डाळ एका मडक्यांत राखून ठेवून त्याबरोबर संध्याकाळच्या भाकऱ्या किंवा रोट्या (आम्ही) खात असूं. तुरुंगांत गेल्याबद्दल आम्हांस कधींच वाईट वाटलें नाहीं. पण तेथलें अन्न पुढें आलें म्हणजे मात्र वाईट वाटे." "आमचे आंथरण्यापांघरण्याचे हाल होते असें नाहीं. तसेंच खोल्यांतून वाराही चांगला खेळत असे; पण उजेड नसल्यामुळें फार त्रास होई. सगळ्या तीन महिन्यांत आम्ही चांदोबास एकदां किंवा दोनदां मोठ्या खटपटीनें गजांतून पाहिलें. आठ दहा दिवस सुरवंटांमुळें फार बेजार झालों होतों. निजण्याच्या

घोंगड्यांच्या पट्ट्यांत सुरवंट चिरडले म्हणजे कशी मजा होते हें सर्वांना ठाऊक आहेच." तुरुंगांत साध्या शिक्षावाल्यांना वेळ जाण्याची पंचाईत फार होते तशी ती टिळक आगरकरांचीही झाली. पण वर लिहिल्याप्रमाणें त्यांनीं अर्ज केल्यावर त्यांना लिहिण्यावाचण्याची परवानगी मिळाली. "जनरल सुपरिंटेन्डन्ट ऑफ जेलस, डॉ. क्रूकशांक, यांनीं आम्हांवर जे उपकार केले ते आमच्यानें कधींही फिटणार नाहींत. अर्ज येऊन पोहोंचल्याबरोबर त्यांनीं सदय होऊन आम्हांस पुस्तकें वाचण्याची, व कागद शाई वगैरे घेऊन भाषांतरें वगैरे करण्याची परवानगी दिली. त्यामुळें कारागृहवास म्हणून आम्हांला पहिल्या पंचवीस दिवसांनंतर फारसा भोंवला नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाचण्यांत किंवा लिहिण्यांत वेळ जाई; व दिवसा मानसिक श्रम झाल्यामुळें रात्रीं चार पांच तास तरी चांगली झोंप लागे. पण पुढें जसजशी मेंदूची व शरीराची शक्ति क्षीण होत चालली तसतसें वाचण्यावर देखील मन लागेनासें झालें, व शेवटच्या आठ दिवसांत हवीं तितकीं पुस्तकें आणि हवे तितके कागद जवळ असतांही मीं एक ओळदेखील वाचिली नाहीं किंवा एक टांकदेखील ओढिला नाहीं." तुरुंगांत रात्रीं वाचन वगैरे दुसरा व्यवसाय दिवाबत्तीच्या अभावीं करणें शक्य नव्हतें त्या वेळीं हे मित्र प्रथम हळूहळू व मग आवेशांत आल्यावर मोठमोठ्यानें गप्पा मारीत. "कित्येकदां तर आम्हीं रात्रीच्या रात्री बोलत घालविल्याचें मला आठवतें. मी एम्. ए. करितां व टिळक एल्एल्. बी. करितां अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों असतां सरकारी नौकरी न पतकरतां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला त्या दिवसापासून आम्ही जें जें बोललों चाललों होतों त्याची पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अमुक गृहस्थाला क्यांपमध्यें भेटायाला गेलों असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां बंडावर कसे येऊन ठेपलों; शाळेच्या संबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गांवांत गेलों असतां कॉलेजाला परत येतांना थंडीनें किती तरी कुडकुडलों; वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें; असल्या फंदांत न पडणारे कोण कोण मनुष्य त्यांस (?) घेरतां आलें; आपले मूळचे हेतु कोणते आणि ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्रीबुवांच्या अकालीं मृत्यूनें आपल्या उद्योगास केवढा धक्का बसला; आम्ही आरंभिलेलीं कार्यें आमच्या हयातींत व

आमच्या पाठीमागें कित्येक वर्षें अप्रतिहत चालली तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोण-कोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटीव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी; शाळा आणि कॉलेज काढण्यास पैसे कसे गोळा करावे; कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती आणि आपणांस भोगावी लागत असलेली शिक्षा किती न्याय्य आहे; आपण या तऱ्हेनें येथें अडकून राहिल्यानें लोकांच्या मनावर काय परिणाम होईल व आपल्या शाळेचें आणि छापखान्याचें किती नुकसान होईल; आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस कोण कोण मित्र उप-योगी पडले व पुढें कोणा कोणाच्या मदतीवर आणि शब्दावर अवलंबून राहतां येईल; आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत न येण्यासाठीं कोणत्या गोष्टीची खबरदारी ठेविली पाहिजे, फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या, वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या जोरानें वाद चाले कीं आसपासचे शिपाई "हळू बोला, हळू बोला" असा इशारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई." या वर्ण-नांत उठलेलें आगरकरांचें चित्र अंतःकरणाला चटका लावून सोडल्याशिवाय रहात नाहीं व पंचविशी उलटण्यापूर्वीं त्यांनीं व टिळकांनीं देशस्थितीसंबंधीं निरनिराळ्या प्रकारें किती विचार केला होता हें समजून त्यांचें कौतुक वाटतें. मुद्दाम होऊन तुरुंगांत जाण्याची त्यांची इच्छा नव्हती; पण कांहीं तत्वाच्या गोष्टी अशा आहेत कीं त्या करतांना तुरुंगवास मिळाला तरी फिकीर नाहीं अशी त्यांची वृत्ति होती. कॉलेजांत असतांना वाट चुकून पहांटे दोन वाजतां बंड गार्डनवर एकदांचें येऊन पोहोंचणें—तेथून डेक्कन कॉलेज मैल दीड मैल आहे—व अपरात्रीं विष्णुशास्त्र्यांना भेटण्यास गांवांत गेल्यामुळें परत येतांना थंडीनें कुडकुडणें, हें टिळक आगरकरांच्या स्नेहाचें रमणीय चित्र कितीतरी मनोवेधक वाटतें. "तुरुंगांत जाण्याचें कधीं दुःख झालें नाहीं पण तेथील अन्न पुढें आलें म्हणजे वाईट वाटे" हें वर्णन वस्तुस्थितिनिदर्शक असल्यामुळें तें वाचतांना उदात्त व करुणरस यांचा संगम होऊन क्षणभर डोळे ओलावल्या-शिवाय रहात नाहींत. आणि सर्व वर्णनांत स्वभावाचा दिलदारपणा आणि आनंदीपणा जो दिसून येतो त्यामुळें आगरकरांच्या उदात्त अंतःकरणाची कल्पना सहृदय वाचकाला पटतेच पटते.

७. तुरुंगांत असणाऱ्या कैद्यांबद्दल आगरकरांनीं काढलेले उद्गार मनुष्याच्या सुधारणेसंबंधीं अलीकडे परिणत झालेल्या विचारांचे निदर्शक आहेत. "तुरुंगांत येणारे सर्वच कैदी चोरी, खून, खोटे कागद, विश्वासघात यांसारखे वाईट गुन्हे करून आलेले असतात असें नाहीं. एकादे वेळेस निरपराधी मनुष्याला शुष्क कारणावरून किंवा गुन्ह्याच्या संशयावरून तुरुंगांत जावें लागतें. वास्तविक पाहिलें तर शेंकडा तीस कैदी मात्र खरोखर गुन्हेगार सांपडतील." "तुरुंग म्हणजे लोकांस असें वाटतें कीं, एकत्र केलेल्या दुष्ट लोकांचें वसतिस्थान होय. त्याच्या भिंताडावरून आलेला वारा लागला तरी अपाय होण्याची भीति असते. पण ही भीति अगदीं निराधार आहे. लोकांनीं तुरुंगाचा विनाकारण एवढा बागुलबोवा करून ठेविला आहे. शिवाय लोक समजतात त्याप्रमाणें त्यांत मनुष्यजातीचा अत्यंत निंद्य भाग असतो असें मानिलें तरी त्याचा तिरस्कार करणें आपणास योग्य नाहीं. लोक अपराध करितात याचें कारण त्यांना शिक्षण मिळत नाहीं हें होय. श्रीमंत व सुशिक्षित घराण्यांतील लोकांकडून फारसा गुन्हा होत नाहीं, हें निरनिराळ्या देशांतल्या तुरुंगांच्या रिपोर्टावरून सिद्ध होतें. कोणत्याही देशांतील एकंदर तुरुंगांची आणि त्यांतील लोकांची संख्या कमी होत जाणें हें त्या देशाच्या वाढत्या सुधारणेचें चिन्ह होय. लोकांनीं सुशिक्षित व सदाचरणी होऊन स्वतःचीं व सार्वजनिक कामें नेकीनें करावीं, आणि संसारवृक्षाच्या स्वादु फलांचा उपभोग घ्यावा हाच ऐहिक सुधारणेचा मुख्य उद्देश होय. उच्च कुलांत जन्मास येणें हें कोणाच्या स्वाधीन नाहीं. अभिजनत्व ही बाह्योपाधीवर अवलंबून राहणारी साहजिक गोष्ट होय. ती ज्यांस परिश्रमाशिवाय प्राप्त झाली त्यांनीं फुशारकी मारण्याचें कांहीं कारण नाहीं. मनुष्यतेला कलंक आणणारे अपराध ज्या देशांत घडून येत असतात, त्या देशांतील सुधारणा कितीही प्रबल झाली तरी तींत कांहीं हंशील नाहीं. सबब सर्व सदय, देशाभिमानी, सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांनीं अपराधी मनुष्यतेचा कंटाळा न करितां ती सद्गुणी करण्यासाठीं रात्रंदिवस झटलें पाहिजे." या वाक्यांतील विचारपरंपरा आगरकरांची खरी सुधारकी उत्कृष्ट तऱ्हेनें दाखविते व या विचारांचें पर्यवसानच त्यांच्या व टिळकांच्या वैमत्याला कारणीभूत झालें या गोष्टीचें आश्चर्य वाटतें. तुरुंगांत भेटलेल्या कांहीं कैद्यांची त्यांनीं माहिती दिलेली आहे, व तेथें झडती कशी कसोशीनें घेण्यांत येते याचें त्यांनीं वर्णन केलेलें आहे. तें सर्व मनोबोधक आहे. तुरुंगांतील लोकांनीं

आपल्याला फार चांगल्या प्रकारें वागविलें असें वर्णन करितांना ते लिहितातः– "नियमांअन्वयें वर्तन करणें हें सर्व नौकरांचें कर्तव्य कर्म होय. रागाच्या झपाट्यांत, अधिकाराच्या तोऱ्यांत, किंवा जात्या दुष्ट स्वभावामुळें त्यांचें उल्लंघन करणें हा मोठा अपराध होय. मागें एके ठिकाणीं निर्दिष्ट केलेल्या कारणावरून असें दिसतें कीं, तुरुंगांतील कैदी कितीही आडदांड किंवा आडमूठ असले तरी कर्तव्य संभाळून त्यांना जितक्या ममतेनें वागवितां येईल तसें वागविणें हेंच मनुष्याच्या मनुष्यपणाला योग्य होय. अशा प्रकारचे नोकर लोक डोंगरीच्या तुरुंगांत आहेत, व त्यांनीं आपलें कर्तव्य सांभाळून आम्हांस आमच्या स्थिति-बद्दल वाईट वाटूं न देण्याविषयीं वेळोवेळीं दोन गोड शब्द बोलून होईल तितकी खटपट केली, हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. शिपायापासून सुपरिंटेन्डन्टच्या खालच्या नोकरापर्यंत आम्हांस कधीं कोणी एका अपशब्दानें दुखविलें नाहीं. आम्ही उचललेला पक्ष, त्यांत आम्हांस अपयश येण्याचीं कारणें, आमचे उद्देश व आमची स्थिति, आणि आम्हांस भोगण्यास लावलेल्या शिक्षेची न्याय्यता वगैरे गोष्टींचें ज्ञान महाराष्ट्रदेशांतील सगळ्या लोकांस खडानूखडा झालें असल्यामुळें प्रत्यक्ष आमचे शत्रु जरी तुरुंगांतील नोकर असते तरी त्यांना देखील आम्हांला त्रास देववला नसता. मग ज्यांना आमच्याकडे वक्र दृष्टि करण्याचें कांहीं एक कारण नव्हतें, अशा उदा-सीन तिऱ्हाईत नोकरांना आम्हांस विनाकारण त्रास देण्याची बुद्धि कोठून होणार ? सरकारी नेटीव्ह नोकरांसच काय, कैदी लोकांना देखील आमची दुर्दशा पाहून वाईट वाटे व ते फार हळहळत." तुरुंगांत आमच्या चरित्रनाय-काला व त्याच्या मित्राला शक्य तितक्या चांगल्या प्रकारें वागविण्यांत आलें हें जसें वरील वाक्यावरून उघड होतें तसेंच आगरकरांची इतर सर्वांविषयीं अंतः-करणप्रवृत्ति दयापूर्ण कशी होती हेंही त्यावरून लक्षांत येतें. तुरुंगांत व्यवस्था कशी असावी यासंबंधीं आपले विचार आगरकरांनीं या पुस्तकांत दिले आहेत. त्यांचा उल्लेख आगरकरांच्या सामाजिक सुधारणेसंबंधीं विचारांची चर्चा करतांना करणें यथास्थल होईल. पुस्तकाच्या शेवटच्या भागांत आगरकर लिहितातः—"कोल्हापूर प्रकरणाच्या संबंधानें अनेक लोकांचे अनेक तर्क झाले आहेत. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, हा खटला पुण्यास चालता तर याचा निराळाच परिणाम झाला असता. दुसऱ्या कांहीं लोकांचें असें मत आहे कीं या खटल्यांतील जूरींत सगळे किंवा निम्मेपेक्षां अधिक नेटिव्ह लोक

असते तर त्यांनीं वर्तमानपत्रकर्त्यांस निरपराधी ठरविलें असतें. तिसऱ्या एका पंथाचे लोक आहेत त्यांना असें वाटत आहे कीं पत्रकर्त्यांस पैशाचें पाठबळ नव्हतें म्हणून ते बुडाले. कोणाची अशी कल्पना आहे कीं आम्हांला सरकारच प्रतिकूळ असल्यामुळें आम्हांला अपयश आलें. कोणाची समजूत अशी आहे कीं आम्ही अखेरीस क्षमा मागितली ही फार वाईट गोष्ट झाली व कित्येकांस तर आम्हांस शिक्षा झाली ती ठीक झाली असें वाटत असेल." "आमचें म्हणणें असें होतें कीं हें कोल्हापूरप्रकरण कोणत्यातरी न्यायासनापुढें यावें, तें आमच्या इच्छे-प्रमाणें एकदांचें आलें. तसें झाल्यावर त्या ठिकाणीं न्याय करण्यास बसलेल्या न्यायाधीशाच्या आणि जूरीच्या नजरेला जी गोष्ट आली तीच योग्य व मान्य असें घेतलें पाहिजे. कारण असें न केलें तर कोणत्याही कज्जाचा कोठेंच निकाल लागावयाचा नाहीं. आतां जज्जानें आणि जूरीनें केलेला निकाल सर्वांसच संमत पडेल असें नाहीं. थोडाबहुत मतभेद हा होणारच व तो होणें हें स्वाभा-विक आहे. तथापि सरकारनें ज्यांच्याकडे कोणत्याही गोष्टीचा निवाडा करण्याचा पूर्ण अखत्यार दिला, त्यांच्या विचाराला जें आलें तेंच आनंदानें मान्य करणें हेंच प्रत्येक सुशिक्षित, सुजाण व धर्मतत्वज्ञाचें कर्तव्य कर्म आहे." तुरुंगांत तत्वासाठीं प्रसंग पडल्यास जावयास तयार असलेल्या आगरकरांची सनदशीर मार्गानें जाण्याची ही प्रवृत्ति लक्षांत ठेवण्यासारखी आहे व उतार वय झालें असतांही विलायतेच्या प्रवासाचा भार शिरावर घेऊन तेथें जाऊन चिरोलसाहेबांवर फिर्याद करणाऱ्या टिळकांच्या मनाची तीच प्रवृत्ति होती हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. "अधिकाऱ्यांना आड येणारानें हातांत शिर घेऊन मरण्यास तयार असलें पाहिजे." "सरकारला विरोध करणाऱ्यानेंही आपल्या संसारसुखावर तिलांजलि सोडावी. कारण सरकार म्हणजे अधिकारसमुच्चय यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं." "सरकारनें अमक्याला चांगलें म्हटलें आणि तमक्याला वाईट म्हटलें म्हणून तो तसा होतो हें थोडेंच आहे. अनेकदां असें होतें कीं, सरकार आणि प्रजा यांच्या नफानुकसानीचा परस्परांशीं अत्यंत विरोध असल्यामुळें अति नीच पुरुषाला हातीं धरून सरकारला त्याचा बडेजाव करावा लागतो." "ज्याप्रमाणें प्रासादिक कवि आपल्या कल्पनावैचि-त्र्यामुळें शुष्क पदार्थाला देखील नसतें माहात्म्य आणून देतात, त्याप्रमाणें सर-कारही अगदीं हलकट मनुष्याला नसता थोरपणा देऊं शकतें." सरकार व प्रजा या विषयासंबंधीं या पुस्तकांत आगरकरांनीं बरेंच मार्मिक विवेचन केलें आहे.

त्यांचें विवरण त्यांच्या राजकीय विचारांच्या चर्चेच्या वेळीं करणें अधिक सोईचें होईल. आगरकर शेवटीं लिहितात कीं सरकारसारख्या जबरदस्त प्रतिपक्ष्याबरोबर ज्याला लढायचें असेल त्याच्याजवळ पैसा भरपूर पाहिजे. त्याचप्रमाणें पुराव्याचे कागद अगदीं चोख पाहिजेत. जबान्या सहीसाक्षीनिशी कायदेशीर अशा लेखी घेऊन ठेविल्या पाहिजेत. वकील फार चांगला पाहिला पाहिजे. लेचेपेचे वकील धरल्यानें खटल्याचें वाटोळें होतें हें वरचेवर दृष्टीस पडतें. पुस्तकांतील शेवटचीं शेवटचीं वाक्यें फार हृदयस्पर्शी आहेत. "पोलीसकोर्टांत फिर्याद लागल्याबरोबर मराठा केसरीचे दिवस भरले असें कित्येकांस वाटूं लागलें. पुढें शास्त्रीबुवांचा अकालीं मृत्यु झाला मग तर कांहीं पुसूंच नका. त्या दोन दुःखाच्या आणि आणीबाणीच्या प्रसंगीं जिकडे तिकडे सर्वजण असें म्हणूं लागले कीं आतां ही मंडळी रसातळास गेली म्हणून समजा ! असो; आम्ही असें समजतों कीं येवढ्या थोड्या काळांत आम्हांवर जीं दोन तीन संकटें येऊन गेलीं व ज्यांतून आम्ही फुटाफूट झाल्याशिवाय जसेच्या तसे बाहेर पडलों, त्यावरून आमच्या देशबंधूंची एवढी तरी खात्री होईल कीं देशसेवेचें दंभ ( करून ) चार पैसे मिळविण्यांत गुंतलेले हे लोक नाहींत; तर यापेक्षां थोडेंसें कठीण काम आंगावर घेऊन तें निश्चयानें तडीस नेण्याचा यांचा निर्धार झालेला आहे." आगरकर आणि टिळक यांच्यासंबंधीं अनेक लोकांचे अनेक ग्रह झाले पण त्यांचे उद्योग म्हणजे फक्त देशसेवेचें दंभ होतें असें मानण्याचें महत्पातक त्यांच्या कोणत्याही देशबंधूनें केलेलें नाहीं. त्यांची जोडी फुटली नसती तर काय चमत्कार झाला असता हें आतां कल्पनेनें जाणण्यांत फारसें तात्पर्य नाहीं; पण त्यांची पहिली सोबत ही महाराष्ट्रांतील नवजीवनाची जननी होय हें सर्व कृतज्ञतापूर्वक मान्य करितात. असो. याप्रमाणें चार महिने बंदिवासाची तपश्चर्या करून हे तरुण पत्रकर्ते बाहेर पडले. त्या वेळीं अवघ्या महाराष्ट्रानें त्यांचें कौतुकानें व कृतज्ञतेनें स्वागत केलें व देशसेवा करण्याचा टिळक-आगरकरांचा दुरूप साहजिकच अधिक वृद्धिंगत झाला.

८. या भागांत उल्लेख करण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे आगरकरांनीं बंदिवासांत असतांना शेक्स्पियरच्या हॅमलेट नाटकाचें मराठींत भाषांतर "विकारविलसित" या नांवानें पुरें केलें ही होय. नाटक लिहिण्याची सुरवात एप्रिल महिन्यांत म्हणजे खटला सुरू झाल्यावर झाली. विकारविलसित या नाटकाच्या प्रस्तावनेंत पुढील मजकूर आहे:—"गतवर्षीं कोल्हापूर प्रकरणास सुरवात होऊन

पैशाची चणचण झाली, त्या वेळेस आपलें आपल्यास कांहीं साहाय्य करतां आलें तर पहावें व तें करण्यास एखादें नाटक लिहिण्याखेरीज सुलभतर उपाय दिसेना म्हणून १८८२ च्या एप्रिल महिन्यांत प्रतुस्त पुस्तकास मी आरंभ केला व आगष्ट महिन्यांत डोंगरीवर असतां तें तडीस नेलें. पुस्तककर्त्यांच्या मनाला जी शांतता असावी ती गेल्या वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत आमच्या मनाला न मिळाल्यामुळें हें पुस्तक माझ्या हातून जितकें वठेल असें मला वाटत होतें तितकें वठलें नाहीं हें माझें मीच कबूल करतों. शिवाय हें भाषांतर अशा अडचणींत करण्यांत असा हेतु नव्हता कीं तें ताबडतोब छापून त्यापासून पैसा उत्पन्न करावा; तर आर्योद्धारक मंडळीकडून त्याचे चार दोन प्रयोग करून त्याचें जें उत्पन्न येईल तें केसरी फंडाकडे लावावें असा होता......" या नाटकासंबंधीं आगरकरांच्या वाङ्मयाची चर्चा करतांना उल्लेख करावा लागणार आहे. येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, खटला चालू असतांना व पुढें तुरुंगांत गेल्यावर हें भाषांतर आगरकरांनीं तयार केलें. आणि त्यांत हेतु काय तर खटल्याला जो खर्च लागला त्याला आपल्या हातून पैशाची कांहीं तरी मदत व्हावी. या दोन्ही गोष्टींवरून आगरकरांच्या स्थितप्रज्ञ व स्वाभिमानी स्वभावाची चांगली ओळख पटते. खटल्याच्या दगदगींत नाटक लिहावयास सुरवात करणें ही गोष्ट सामान्य नव्हती. पण त्याहीपेक्षां आपला बोजा दुसऱ्यावर पडूं नये याबद्दल आगरकरांना वाटत असलेली काळजी आजकालच्या "फंडगुंडां" नीं चिंतन करण्यासारखी आहे. हॅमलेट किंवा विकारविलसित हें नाटक मराठी रंगभूमीवर अत्यंत लोकप्रिय झालें हें सर्वश्रुत आहे.

# भाग पांचवा.

## शाळेंतून कॉलेज

आश्वास्य पर्वतकुलं तपनोष्मतप्तं
दुर्दाववन्हिविधुराणि च काननानि ।
नानानदीनदशतानि च पूरयित्वा
रिक्तोऽसि यज्जलद सैव तवोत्तमा श्रीः ॥

आगरकर व टिळक हे तुरुंगांत असतांना त्यांच्या शाळेची व वर्तमानपत्रांची व्यवस्था त्यांच्या मित्रमंडळानें उत्तम प्रकारें चालवून त्यांत कांहीं न्यून पडूं दिलें नाहीं. खटला सुरू झाल्यानंतर विष्णुशास्त्री दोन दिवसांचें दुखणें येऊन एकाएकीं मरण पावले आणि अशा प्रकारें शाळेचा एक प्रमुख शिक्षक किंबहुना प्रमुख उत्पादक व संस्थापक शाळा सुरू होऊन पंधरा सोळा महिने झाले नाहींत तोंच इहलोकांतून नाहींसा झाला. इकडे खटला चाललेला; तो कोणत्या थरा-वर जातो यासंबंधीं प्रत्येकजण काळजींत. त्यांतच शास्त्रीबुवांच्या मृत्यूची भर; अशा प्रकारें संकटांचा सर्व बाजूंचा मारा झाला तरी न्यू इंग्लीश स्कूलची तरुण मंडळी डगमगली नाहींत, येवढेंच नव्हे तर या सर्व संकटपरंपरेंतून तावून सुला-खून बाहेर आली. शाळेच्या व्यवस्थेला वामनराव आपट्यांसारखे कार्यक्षम शिक्षक होते. त्यामुळें शाळेसंबंधीं काळजी करण्याचें कारण नव्हतें. त्याचप्रमाणें वर्तमानपत्रांची व्यवस्था पाहण्याला पुष्कळ मित्रमंडळींनीं हातभार लावला. सर्व मंडळींत या वेळीं पूर्ण एकोपा होता व आगरकर-टिळकांचे जे विद्यालय मित्र शाळेला किंवा वर्तमानपत्रांना येऊन मिळाले नव्हते ते या संकटप्रसंगीं आपल्या सोबत्यांच्या साहाय्याला धांवले. त्यामुळें या तरुण देशभक्तांना फार संतोष झाला व पुढें अधिक काम करण्याला धैर्य आलें हें स्वाभाविकच होतें. न्यू इंग्लीश स्कूलची मंडळी म्हणजे थोडेसे वरच्या दरज्याचे पंतोजी, आणि केसरी मराठ्याचे संपादक म्हणजे थोडेसे चुणचुणीत लेखक अशी कल्पना यापुढें अस्तित्वांत राहणें शक्यच नव्हतें. तर ही सर्व

मंडळी देशसेवेच्या भावनेनें मुसमुसलेली, व ती सेवा करतांना कारागृहवासा-सारख्या संकटांनाही न जुमानणारी, असा त्यांचा लौकिक झाला. ज्या दिवशीं टिळक-आगरकर तुरुंगांतून बाहेर पडले त्या दिवशीं तुरुंगाच्या दारांत त्यांचें स्वागत करण्यास मुंबईंतील अठरा पगड जातीची मंडळी गेली. तारीख २६ आक्टोबर १८८२ ह्या दिवशीं आगरकर व टिळक हे आपला कारागृहवास संप-वून बाहेर आले. त्यानंतर त्यांना निरनिराळ्या लोकांकडून पानसुपाऱ्या झाल्या. त्यांतील एकीचा उल्लेख विशेष केला पाहिजे. टिळक व आगरकर यांच्यावर खटला झालेला कोल्हापुर छत्रपतीच्या प्रकरणांत. बरवे कोल्हापुरला लोकप्रिय कधींच झाले नव्हते व त्यांनीं ज्या प्रकारें छत्रपतींना वागविलें अशी लोकांची समजूत झाली होती त्या प्रकारामुळें तर कोल्हापुरच्या लोकांना त्यांचा अगदीं वीट आला होता. कोल्हापुरला ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणांचा भरणा विशेष आणि बरवे येईपर्यंत चित्पावन ब्राह्मण तिकडे फारसे गेले नव्हते. किंबहुना पेशवे व कोल्हापूर छत्रपति यांचें वैर असल्यामुळें चित्पावन ब्राह्मणांसंबंधीं कोल्हापूर प्रांतांत त्या काळीं प्रेमभाव फारसा नव्हता. रावबहा-दुर बर्व्यांनीं कांहीं चित्पावन कोल्हापुरांत आणून नोकरीला लावले हें तेथील लोकमत त्यांच्यावर क्षुब्ध होण्याला एक कारण झालें असावेंसें वाटतें. अर्थात् टिळक—आगरकर दोघेही चित्पावन ब्राह्मण; त्यांनीं छत्रपतींचा कैवार घेतला तो केवळ दयार्द्र बुद्धीनें; आणि बर्व्यांची त्यांच्यामुळें फटफजीती उडालेली, तेव्हां त्यांचीं नांवें कोल्हापुरांत तत्काळ प्रिय झालीं. बर्व्यांच्या विरुद्ध असलेल्या मंडळींतील भिडे व रानडे हे तर चित्पावनच आणि बखले कऱ्हाडे म्हणजे देशस्थ नव्हत. अशा प्रकारें केसरीवरील खटल्याच्या निमित्तानें कोल्हापुरांतील चित्पावन व देशस्थ यांमधील रावबहादुर बर्वे यांच्या कारकीर्दींत विशेष स्वरू-पाला आलेलें वैषम्य बरेंचसें नाहींसें झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि रावबहादुर बरवे यांचा जो बदलौकिक एकदां झाला तो कायमचा राहिला. कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजांत तेव्हां आणि पुढेंही परवा-परवापर्यंत पहिल्या दोन वर्षांचेच वर्ग असत. पण प्रिन्सिपॉल युरोपीयन व तोही विद्यार्थ्यां-चा अभिमानी यामुळें या कॉलेजचा बोलबाला होता. शिवाय वामन शिवराम आपट्यांसारखें विद्वद्रत्न या कॉलेजांतून बाहेर पडलेलें होतें आणि वामनराव आतां आगरकर—टिळकांचे सहकारी होते. त्यामुळें या दोघांच्याबद्दल कॉले-जांतील विद्यार्थ्यांच्या मनांत आदर वाटण्याला वामनराव आपटे हे एक मह-

त्याचें कारण होतें. आगरकर–टिळकांवर बऱ्यांनीं खटला भरला तेव्हां त्यांच्या मदतीसाठीं फंड गोळा करण्याची खटपट कांहीं ठिकाणीं अर्थात् झाली. कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं एक नाटक बसविलें होतें. तें करून जें उत्पन्न येईल तें आगरकर–टिळकांना द्यावयाचें असें त्यांनीं ठरविलें व तसें करण्याबद्दल कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. कँडी यांची त्यांनीं प्रथम परवानगी मिळविली; पण आगरकर–टिळकांना मदत म्हणजे संस्थानच्या कारभाऱ्याला विरोध ही अडचण साहेबमजकुरांच्या ध्यानांत येण्यास फारसा वेळ लागला नाहीं; तेव्हां त्यांनीं ही मदत कॉलेजच्या मार्फत पाठविण्याची परवानगी देण्याचें नाकारलें. आक्टोबर महिन्यांत आगरकर–टिळक सुटले. नोवेंबर महिन्यांत युनिव्हर्सिटीच्या परीक्षेसाठीं कोल्हापुरचे विद्यार्थी मुंबईस आले होते. त्यांत प. वा. नामदार गोपाळ कृष्ण गोखले होते. या मंडळींनीं परीक्षेची यातायात आवरल्यावर योग्य संधि पाहून आगरकर–टिळकांना पानसुपारीस बोलावलें आणि या समारंभाच्या वेळीं भाषण करण्याचा मान गोपाळराव गोखल्यांना मिळाला. गोपाळरावांचें वय या वेळीं सोळा सतरा वर्षांचें होतें आणि इंटर-मीजिएटची परीक्षा देण्यासाठीं त्या सालीं ते मुंबईस आले होते. त्यांचें सार्व-जनिक भाषण या प्रसंगीं झालेलें पहिलेंच असें म्हणण्यास हरकत नाहीं. या भाषणांत अर्थात् आगरकर-टिळकांचा अत्यंत आदरपूर्वक गौरव करण्यांत आला होता. गोखल्यांचें पहिलें भाषण आगरकरांच्या आणि टिळांच्या स्तुतीनें भरलेलें असावें हा तरी एक मोठा योगायोग होय. या भाषणांत गोखले काय बोलले हें प्रसिद्ध नाहीं. कदाचित् ते फारसें कांहीं बोललेही नसतील. पण त्यांचें बाल वय, तरतरीत चेहरा, आणि सभाधीटपणा यांचा परिणाम त्या दिवशींच्या पाहुण्यांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं व पुढें दोन तीन वर्षांनीं म्हणजे फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाल्यावर गोखल्यांना डेक्कन एज्युकेशन सोसाय-टींत ओढण्याला टिळकच विशेषंकरून कारणीभूत झाले ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्या दिवशीं पाहिलेल्या गोखल्यांना टिळकांनीं पक्कें ध्यानांत ठेवलें होतें असें वाटल्यावांचून रहात नाहीं. गोखले यांचे पूर्ववयांतील गुरु आगरकर असें महाजनींनीं म्हटल्याचा उल्लेख मागें एकदां आलेला आहे. फर्ग्युसन कॉलेजांत टिळकांनीं गोखल्यांना आणलें, पण गोखले हळु हळू आगरकरांचे पक्षपाती झाले व फर्ग्युसन कॉलेजांतून जातांना टिळकांनीं जो लांबरुंद राजीनामा खरडला आहे त्यांतील कित्येक वाक्यांचा रोख स्पष्ट स्पष्ट गोखल्यांच्यावर आहे हें सहज लक्षांत

येतें. * ज्यांचा संबंध प्रथम परस्परांबद्दल आदर वाटून आला ते पुढें राजकारणांत परस्परांचे प्रतिपक्षी बनले व टिळकांचा पूर्वेतिहास म्हणजे त्यांचें आगरकरांबरोबर भांडण हा प्रकार जसा झाला त्याचप्रमाणें टिळकांच्या उत्तरभागांतील बरींच वर्षे गोखल्यांशीं भांडण्यांत गेलीं. असो. काळाच्या गाभाऱ्यांतील हे देखावे १८८२ सालीं विद्यार्थिदशेंतील गोखल्यांनीं टिळकांच्यासंबंधीं स्तुतिपर भाषण केलें त्या वेळीं त्यांनांही दिसले नाहींत किंवा त्या भाषणानें खूष झालेले टिळक १८८५ सालीं जेव्हां गोखल्यांना "तुम्ही आमच्या सोसायटींत या" म्हणून आग्रह करूं लागले त्या वेळीं त्यांनाही दिसले नाहींत. आणि या-

---

* विविधज्ञानविस्तार—महाराष्ट्रसाहित्यपत्रिका, मार्च १९१६. अभ्यंकरकृत गोखलेचरित्र-परीक्षण करितांना रा. ब. वि. मो. महाजनी लिहितातः—

कोल्हापूर प्रकरणामुळें गोपाळरावां (गोखले) च्या मनांत नवें वारें शिरलें असा अभ्यंकरांचा समज आहे तो चुकीचा असावा. कारण बी. ए. झाल्यावर एकदा एंजिनीयरिंग कॉलेज, मग लॉ क्लास अशी त्यांनीं धरसोड केली नसती. सन १८८६ सालीं ते "न्यू इंग्लिश स्कूल" च्या मंडळींत सामील झाल्यापासून गोपाळराव आगरकर यांच्या आकर्षक शक्तीच्या आटोक्यांत येऊं लागले, असा माझा समज आहे. कारण गोपाळराव आगरकरांनीं गोखल्यांप्रमाणेंच विद्यार्थिदशेंत गरीबीशीं सतत झुंज करून यश संपादिलें होतें, व आमरण गरीबींतच आयुष्य कंठून अध्यापक वृत्तीनें पुराण ऋषींचें अनुकरण करून तीस उज्वल करावयाचें असें व्रत घेतलें होतें. गुरूचें निष्कपट वर्तन, कुटिल विचारांचा अत्यंत तिटकारा, पतित व अज्ञान दशेंत खितपत पडलेल्यांचा उद्धार करण्याविषयींची तळमळ, मनोधैर्य, व पत्करलेल्या मार्गानें कोणाची पर्वा न करितां, शिव्याशापांस न जुमानतां जाण्याचा दृढ निश्चय, यांची छाप गोखल्यांच्या मनावर बसून त्या गुणांचें अनुकरण करण्याची बुद्धि बळावली. नवीन इंडियाचा जन्म अभ्यंकरांच्या मतें सन १८७२ व सन १८८२ यांच्या दरम्यान झाला. मला वाटतें, दृश्य गोष्टीपासूनच काळ ठरवायाचा असेल, तर महाराष्ट्रापुरता, ज्या दिवशीं डेक्कन कॉलेज नवीन इमारतींत भरूं लागलें व ठिकठिकाणचे विद्यार्थी आहार, विहार, शय्यासन एकत्र करूं लागून (देशाच्या) भावी दशेविषयीं चर्चा करूं लागले तो दिवसच नवीन इंडियाच्या जयंतीचा गणिला पाहिजे. खुद्द विष्णु कृष्ण चिपळूणकर यांच्या लेखक-गर्भस्थितींतील काल हाच होय.

वरून भविष्यज्ञान माणसाला नसतें हीच गोष्ट हितकर आहे असें म्हणावें लागतें. आगरकर आणि टिळक पुढें भांडले तर भांडले असतील; पण त्यांची प्रथम जी सोबत झाली तिचा परिणाम महाराष्ट्रांत नवीन चैतन्य उत्पन्न करण्यांत झाला हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें टिळक आणि गोखले राजकारणांत पुढें झुंजले ही गोष्ट खरी, पण १८८२ सालच्या कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांनीं आगरकर टिळकांना दिलेल्या पानसुपारीच्या प्रसंगामुळें गोखल्यांसारखा मोहरा राष्ट्राच्या लढाया खेळण्यास मिळाला ही गोष्टही निर्विवाद आहे. राष्ट्राची इमारत उभी करण्याच्या कार्यांत तिघांचेंही कार्य अपूर्व आहे व तें होण्याला तिघांची गांठ पडली ही गोष्ट त्यांचीं पुढें भांडणें झालीं यापेक्षां अधिक महत्वाची आहे.

आगरकर व टिळक परत पुण्यास येऊन शाळा व वर्तमानपत्रें चालवूं लागले. डिसेंबर महिन्यांत ( १८८३ ) कोल्हापुरचे दुर्दैवी छत्रपति हुजऱ्याच्या हातून चाबूक खाण्याच्या यातायातींतून मृत्यूच्या कृपेमुळें कायमचे मुक्त झाले. या वेळीं महाराज अहमदनगरला होते. त्यांच्या एका युरोपियन संरक्षकाची व त्यांची मारामारी होऊन त्यांत त्यांचा अंत झाला. ज्या आगरकरांनीं महाराजांची कड घेऊन त्यांचें बरें व्हावें या बुद्धीनें तुरुंगवास पत्करला त्यांना महाराजांचा शेवट अशा भयंकर प्रकारें झालेला ऐकून केवढा संताप वाटला असेल हें काम कल्पनेवर ठेवणें बरें व त्या संतापाच्या भरांत आपण कोल्हापूर प्रकरणासंबंधीं जें जें लिहिलें तें न्यायाच्या कोर्टांत जरी अग्राह्य ठरलें तरी पूर्णपणें सत्याला धरून होतें असें त्यांस वाटलें असल्यास त्यांत नवल नाहीं. महाराजांच्या मृत्यूनंतर ता. २२–१–८४ च्या केसरींत लिहिलेल्या लेखांत आगरकर लिहितातः—

"आतां झाल्या गोष्टीचा काथ्याकूट करून कांहीं फायदा नाहीं. पुढें काय करावें याचा आतां नीट विचार केला पाहिजे. आतां जो दत्तक घ्यावयाचा तो बराच मोठा झालेला मुलगा घेतला म्हणजे तो वेडा आहे कीं नाहीं, पुरुष आहे किंवा नाहीं, आई पाहिल्याबरोबर चवताळतो किंवा नाहीं, वगैरे गोष्टींची चिकित्सा करण्यास नीट होईल. थोडासा निबर असा मुलगा पाहून घेतल्यास कांहींसा खाष्ट व अडाणी मिळेल खरा, पण मग त्याला घोड्याचे चाबूक खाण्याची किंवा वाढलेल्या प्लीहेवर दाब बसल्यानें डोळे पांढरे होऊन प्राणोत्क्रमण होऊं लागलें असतां तीर्थोदकाच्या ऐवजीं ग्रीनच्या हातची व्हिस्की पिण्याची पाळी येणार नाहीं. तें कसेंही असो, परंतु ता. २५ डिसेंबरची ती काळरात्र, अहमदनगरच्या किल्ल्यांतील करवीरकर महाराजांचा तुरुंगवास,

जवळ मायाममतेचें कोणी नाहीं अशा स्थितींत निराशेनें बेफाम झालेल्या अर्धवेड्या महाराजांचा संताप, व त्यांचा ग्रीनसारख्या आडदांड धटिंगण सोजिरांशीं मारामारीचा प्रसंग, हा सर्व देखावा डोळयांपुढें आणिला असतां मन अजूनही कावरें बावरें व उदास होऊन जातें......" आगरकरांनीं काढलेलें हें शब्दचित्र अद्यापिही सहृदयाच्या नेत्रांत अश्रु आणील. पण जवळ जवळ पन्नास वर्षांपूर्वीं देशी संस्थानिकांविषयीं लोकांत अपरंपार प्रेम होतें व संस्थानें म्हणजे आपल्या गत वैभवाचीं स्मारकें असें त्यांना वाटे. त्या वेळची लोकांची मनःस्थिति, आणि आतां हिंदी जनता व ब्रिटिश सरकार यांच्या राजकीय झगड्यांत बरेचसे संस्थानिक हे लोकपक्षाचें पारडें हलकें करण्याकरतां कामाला आलेले पाहून व कित्येक संस्थानिकांच्या वैयक्तिक आचरणामुळें कंटाळून किंबहुना क्रोधाविष्ट होऊन उत्पन्न झालेली मनःस्थिति यांत इतकें अंतर पडलें आहे कीं, आजकालच्या सामान्य माणसाला संस्थानिकांचें भांडण घेऊन तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आगरकर–टिळकांनीं कां ओढवून घेतला असा प्रश्न विचारावासा वाटतो. पण त्या वेळची परिस्थिति निराळी होती आणि कोल्हापुरच्या छत्रपतीबद्दल कळकळ तेव्हां जितकी खरी होती तितकीच रावबहादूर बर्व्यांविषयीं धिःकार बुद्धीही अंतःकरणपूर्वक होती. रावबहादुरांचा एकुलता एक मुलगा वारला तेव्हां "चांगलें प्रायश्चित्त मिळालें" असेच उद्गार महाराष्ट्रभर निघाले असें त्या वेळच्या माणसांकडून पुष्कळांनीं ऐकिलेलें आहे

२. कारागृहवासांतून परत आल्यावर आगरकर-टिळक हे महाराष्ट्रांतील प्रसिद्ध व कर्त्या पुरुषांच्या मालिकेंत लोकदृष्टीनें जाऊन बसले, त्यांच्या ओळखी वाढल्या, व ते हातीं घेतील त्या कार्याला लोकांचें साहाय्य मिळणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. शाळेचें काम चांगल्या प्रकारें चाललें होतें. नवीन नवीन मंडळी शाळेला येऊन मिळत होती. विद्यार्थ्यांची संख्या तर वाढतच होती, आणि प्रवेशपरीक्षेंतील शिष्यवृत्त्या व बक्षिसें यांचा बराचसा भाग न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांकडे जाऊं लागला. त्यामुळें राजकीय किंवा सार्वजनिक बाबतींत लक्ष न घालणाऱ्या मंडळीचें लक्षसुद्धां शाळेनें अर्थात् शाळा चालविणाऱ्या मंडळीनें ओढून घेतलें, व हळू हळू शाळेच्या पुढें कॉलेज काढण्याची कल्पना मंडळीच्या मनांत अधिकाधिक बद्धमूल झाली. केसरीची गर्जना जोरानें चालत होती आणि आगरकरांची कुशल लेखणी महाराष्ट्रवाचकांना नाचवीत होती. आगरकरांचीं मतें एकांतिक बनल्यामुळें आगरकर

व टिळक यांच्यांत तंटा झाला अशा तऱ्हेचीं विधानें कित्येक आचरट लोकांनीं केलेलीं आहेत. त्यांनीं केसरींतील पहिल्या तीन चार वर्षांतील सामाजिक विषयांवरील लेख वाचले असते तर अशीं विधानें करण्याचा आर्षपणा त्यांच्या हातून घडला नसता असें वाटतें. पण जीं मतें केसरीनें तीन चार वर्षें जोरानें पुरस्कारिलीं त्याच मतांचा संमतिवयाच्या वादांत व्यावहारिक उपयोग करण्याचा प्रसंग आल्यावर कांहीं मंडळींची धांदल उडाली व या धांदल्या बारगिरांचें नशीब सवाई शिकंदर म्हणून त्यांना पुढें टिळकांसारखा म्होरक्या मिळाला. पूर्वीं, तिसऱ्या भागांत, केसरीचें सामाजिक धोरण काय होतें याची आम्ही एकदां चर्चा केली आहे. पुढें सुधारकांत आगरकरांनीं सामाजिक दोषांना कोनाकोपऱ्यांतून हुडकून काढून त्यांचें आविष्करण केलें; पण हा क्रम त्यांनीं केसरींतही सुरू केला होता. १८८४ सालापर्यंत तरी आगरकर आणि टिळक यांचा "शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः" असा संबंध होता. पुढें क्रमाक्रमानें टिळकांची पगडी फिरली तेव्हां हींच मतें त्यांच्या चरित्रकारांनीं एकांतिक होतीं म्हणून विधान ठोकून आपल्या आराध्यदेवतेची महापूजा केली; परंतु या महापूजेच्या समारंभांत खुद्द त्या दैवतांविषयीं मात्र गैरसमज पसरविण्याचें पाप घडून आलें आहे. १८८२ च्या शेवटच्या अंकांत केसरींत "सासुरवास" या विषयावर एक लेख आलेला आहे. हा लेख आगरकरांच्या हातचा असावा असें दिसतें व तो त्यांनीं तुरुंगांतून परत आल्यावर लिहिलेला आहे. हा लेख पुढच्या सुधारकांत जशाचा तसा छापला असता तरी त्या पत्रांतील "सुधारकी" व "एकांतिक" लेखांत तो सुंदर शोभला असता. या लेखांतील कांहीं वाक्यें येथें देतों:--"पूर्व वयांत ज्याचे दिवस पारतंत्र्यांतच जातात, दुसऱ्यापुढें केविलवाण्या मुद्रेनें तोंड वेंगाडल्यावांचून ज्यास एकही दिवस उजाडत नाहीं, फुकाचे दोन गोड शब्द कानीं पडून होणाऱ्या सुखास जो सर्वथैव आंचवलेला असतो, न्याय्य प्रत्युत्तर करण्यासही ज्यास आपले ओठ हालवितां येत नाहींत, व अत्यंत दुःसह अन्यायाच्या वर्तनानें येणारा राग निमूटपणें गिळून टाकण्यावांचून ज्यास या जगतीतलावर दुसरा मार्गच नसतो अशा मनुष्यास ईशकृपेनें धनदौलत व अधिकार प्राप्त झाला असतां, त्यानें धनमदांध होऊन अधिकाराच्या बळावर माणुसकीस विसंगत असें आचरण करावें व 'मनुष्यरूपेण मृगाश्चरंति' या कोटींत आपली गणना करून घ्यावी यासारखी सखेदाश्चर्याची दुसरी कोणतीही गोष्ट

नाहीं; व यासारखी दुसरी कोणती सत्यही गोष्ट नाहीं कीं बहुतेक सासवा, नणंदा व जावा यांस सासरच्या जाचाची स्वानुभावानें चांगली ओळख असूनही सासुरवासिणींशीं त्यांपैकीं बहुतेकांचें वर्तन अत्यंत निंद्य प्रकारचें असतें." "जिची बाळपणची नैसर्गिक अल्लड वृत्ति अजून नाहींशीं झाली नाहीं अशी मुग्ध बाला आपल्या समवयस्क व जन्मापासूनच्या मैत्रिणीस सोडून, आपल्या आप्तगणगोतांच्या लडिवाळ वर्तनास पारखी होऊन, व मातापितरांच्या अनुपम ममतेच्या सावलीस मुकून ज्या वेळीं आपल्या पतिगृहाचा उंबरठा चढत असेल त्या वेळेस तिच्या मनाची स्थिति काय होत असेल हें शब्दांनीं व्यक्त करण्यास आमच्या लेखणींत सामर्थ्य नाहीं." "सून घरांत येऊन फार दिवस झाले नाहींत तोंच सासूबाई आपल्या सासूपणाचा अम्मल तिच्यावर गाजवूं लागतात. वडील जाऊबाई असल्या तर त्यांनाही आपली अंकित वृत्ति सोडून जरा अधिकारारूढ होण्याची हौस फेडून घेतां येते. नणंद असली तर अधिकार ज्यास्तच, व ती वेळ सांपडेल तेव्हां आपल्या अधिकारांतील शिक्षा चोपायला मागें पुढें पहात नाहीं, व त्यांतून ही नणंद जर का आपल्या दुर्दैवानें घरजांवईण होऊन बसली असली तर बनली लागलीच ती प्रतिसासू! किंबहुना सख्खी सासू बरी पण ही प्रतिसासू फार कठीण! शिवाय फावल्या वेळेस मामंजी, भाऊजी आणि पतिराज हेही तिचा थोडासा समाचार घेण्यास तत्पर असतातच. अशा प्रकारें वर सांगितलेले व्याघ्र चोहोंकडून त्या बाळकुरंगीच्या राशीस लागल्यावर तिचा छळवाद होतो हें सुप्रसिद्धच आहे." "आमच्या अनाथ गतभर्तृका सुनांची स्थिति तर अत्यंत हृदयभेदक असते. आपल्या मातापितरांचा दुःसह वियोग व सासरच्या सर्व माणसांचा जाच हीं ज्या पुढें होणाऱ्या पतिसुखाच्या आशेवर सहन करून ती आपले बंदिखान्यांतील दिवस कंठीत असते, त्या सर्वांचें मूळच दुष्ट कालानें हिरावून नेल्यावर तिचे हाल कुत्राही खाईनासा होतो. पतिशोकानलानें दग्ध झालेल्या त्या विचाऱ्या अनाथ अबलेच्या दुःखावर डाग दिल्याप्रमाणें रात्रंदिवस तिजवर अपशब्दांचा भडिमार होऊं लागतो." "तिची नुसती तोंडपूजाच होऊन राहते असें नाहीं. घरांतील सर्व कामाचा रेट तिजवरच पडतो. जात्याची घरघर तर कर्णरंध्रांत खिळूनच जाते. धुण्याच्या गंगाळाची खूण कमरेवर दृष्टीस पडण्यास फारसें कठीण पडत नाहीं." "नेत्रमांद्यामुळें ज्यांच्या नेत्रांस चाळीशी लागली आहे व दंतभ्रष्ट होऊन ज्यांच्या तोंडाचें बोळकें बनलें आहे अशा

नव्याण्णव वर्षांच्या थेरड्यासही दुसरें लग्न करण्याची परवानगी असून व ते करीतही असून, अत्यंत मुग्धावस्थेंत असणाऱ्या, व पति म्हणजे काय हें जीस पुरतें माहीत नाहीं अशा अनाथ बालेस तिचा कांहीं अपराध नसतां दुसरें लग्न करण्याची परवानगी नसावी, व तिचें एखादें वांकडें पाऊल पडेल, या भीतीनें ज्या केशकलापावरून हस्तिदंती फणीचा संस्कार झाला त्यावरच नापिताची पोलादी फणी फिरावी, यासारखी अश्लाघ्य व लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणती आहे ?" "आतां असें केल्यानें म्हणजे आजच्या लेखांत दिग्दर्शित केलेल्या सर्व अनर्थांचा समूळ परिहार होईल असें नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या अफाट विस्ताराच्या वृक्षापासून अडचण होऊं लागली असतां त्याच्या तात्कालिक शाखावच्छेदनापासून थोडासा गैरसोईचा त्रास चुकतो त्याप्रमाणें हा केवळ तूर्तातूर्ततेचा उपाय आहे. समूळ गैरसोय दूर करण्यास " मूले कुठारः " या न्यायाचेंच अवलंबन केलें पाहिजे. घराच्या मजबुदीस पायाची बळकटी जशी अत्यावश्य असते, त्याप्रमाणें कुटुंब सुखी राहण्यास त्यांतील सर्व इसमांस चांगलें शिक्षण मिळालें पाहिजे, व त्यांस योग्य स्वतंत्रताही असली पाहिजे. व या दोहोंचा अभाव हेंच आमच्या गृहस्थितींतील प्रस्तुतच्या दोषांचें मूळ बीज होय." "बालविवाहाची चाल मोडून टाकल्यानेंही सासवांचा अधिकार नियमित होईल व सुनांची ठेप बरीच कमी करतां येईल असें आम्हांस वाटतें. पुनर्विवाहाचा प्रघात प्रस्तुतहून ज्यास्त फैलावल्यास अनेक अनाथ सुना सासुरवासांतून सुटतील इतकेंच नाहीं तर त्यांची वैधव्यदुःखांतून सुटका केल्याचेंही श्रेय आमच्या देशबांधवांस मिळेल व परदेशस्थांसही आमच्या नाकांत काड्या घालतां येणार नाहींत." हे सर्व विचार १८८२ सालीं जितके आगरकरांचे होते तितकेच टिळकांचे होते. खुद्द आगरकरांच्या बाबतींत या विचारांचीं मूलतत्वें ठरून गेलीं होतीं. "चांगलें शिक्षण" व "योग्य स्वतंत्रता" या शब्दांवरून आगरकरांचे विचार या वेळेपासूनच भक्कम पायावर उभारलेले होते हें उघड दिसतें. कोल्हापूर खटल्यांतून सुटून आल्यावर टिळकांच्याभोंवतीं भक्तमंडळ जमा होण्याला सुरवात झाली. खटला कोणामुळें यशस्वी झाला नाहीं याची चर्चा करतांना खटल्यांतील चांगल्या गोष्टींचें श्रेय टिळकांना देण्यासाठीं व अयशस्वी गोष्टींचें खापर दुसऱ्यांच्या डोक्यावर फोडण्यासाठीं ही मंडळी जमून चर्चा करूं लागली असावी असें दिसतें. आगरकरांचा स्वभावच असा होता कीं लुब्रीं माणसें

त्यांच्यापुढें टिकणें शक्य नव्हतें. खुलें अंतःकरण, सरळपणा, इतरांविषयीं सद्बुद्धि वगैरे गुणांचें वास्तव्य असल्यावर "आत्मस्तुति" आणि "परनिंदा" यांचें प्राबल्य होणें कठीण जातें. टिळकांना "आत्मस्तुति" व तिची बहीण "परनिंदा" या दोघीही हळूहळू प्रिय होण्यास सुरवात झाली आणि त्यामुळें भोंवतीं जमणाऱ्या गणाला खूष ठेवणें त्यांना आवश्यक वाटूं लागलें व त्यांतच त्यांच्या वृत्तींत जो थारेपालट झाला त्याचें बीज आहे, असें म्हणावें लागतें. एरवीं टिळकासारखा बुद्धिवान् पुरुष अंतःकरणाला पटलेल्या तत्वांना कडी-कुलपांत घालून ठेवून बहुजनसमाजाच्या दोषांचें वकीलपत्र घेण्यास पुढें सरसावला नसता. टिळकांच्याभोंवतीं जे गण जमूं लागले त्यांत अर्थात् बरीच मंडळी त्यांच्यापेक्षां फार कमी योग्यतेची होती. त्यांची स्तुति कानाला गोड लागूं लागल्यामुळें टिळकांना बरोबरीचीं माणसें अप्रिय वाटूं लागलीं. आगरकरांच्या बाबतींत हा "चित्ताचा पालट" होणेंच शक्य नव्हतें; कारण मूर्खांनीं देव म्हटल्यापेक्षां शहाण्या माणसांनीं माणूस म्हटलें तरी त्यांना संतोष होता, किंबहुना एकदां अंतःकरणाला एखादी गोष्ट पटली म्हणजे तिचा उच्चार कर-तांना सारें जग उलटलें तरी त्याची पर्वा न करण्याइतका कणखरपणा त्यांच्या ठिकाणीं होता; आणि त्यामुळें त्यांच्या सरळ व निष्कपट स्वभावाचें व टिळकांच्या वकीली स्वभावाचें सूत फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. त्यांच्यांत बेबनावाला जी सुरवात झाली त्याला कारण आगरकरांचा एकांतिकपणा नसून टिळकांच्या चित्तांत जो पालट होऊं लागला, व टिळकांनीं आपल्यापुढें जमावयास लाग-लेल्या गणाला खूष करण्यासाठीं अंतःकरणाला पटलेलीं तत्वें झुगारण्याचा जो क्रम सुरू केला तें आहे.

दुसऱ्या एका दृष्टीनें विचार केल्यास टिळकांनीं लोकांना आपल्याबरोबर घेऊन जाण्याचें ठरविलें असें म्हणतां येईल. असें म्हणणें सकृत्दर्शनीं फार चांगलें दिसतें. लोकांच्या साहाय्याशिवाय आपलें देशकार्य व्हावयाचें नाहीं, तेव्हां लोकांच्यासारखें चार दिवस वागून त्यांना आपले कराव-याचे आणि एकदां ते आपले झाले म्हणजे मग त्यांना आपल्या सांग-ण्याप्रमाणें वागावयाला लावावयाचें असा या दृष्टिसुंदर तत्वाचा किंवा तत्वाभासाचा अर्थ आहे. थोडासा विचार केला असतां त्यांतील पोकळपणा उघड होतो व टिळक लोकांना बरोबर घेऊन न जातां लोकांबरोबर वाहवले असें म्हणावें लागतें. सामाजिक सुधारणेला हाणून पाडणें हा केसरींत टिळक

त्याचे संपादक झाल्यावर एक महत्वाचा भाग होता. तेव्हां टिळक हे सामाजिक सुधारणेचे शत्रु नव्हते असें म्हणणें फोल आहे. हें शत्रुत्व त्यांनीं किती तद्रूपतेनें व कसून केलें याचा अनुभव टिळकचरित्रकारांच्या वैधव्यमग्न कन्येला पुण्याच्या एका सार्वजनिक सभेंत आला होता हें सर्वश्रुत आहे. बरें, लोकांच्या बरोबर जाण्यासाठीं एवढा तत्वसंन्यास करून पुढें लोकांनीं टिळकांचें कोणतें कार्य केलें ? त्यांना त्यांनीं मानपत्रें दिलीं व त्यांचा वाचिक जयजयकार केला याबद्दल वैमत्य नाहीं. पण पळसे प्रकरण आणि पंचांग प्रकरण असल्या वादांत—ज्यांत टिळकांची मागणी अत्यंत योग्य होती—लोकमतानें टिळकांचें नेतृत्व साफ नाकारलें. म्हणजे टिळकांचा उपयोग लोकांनीं करून घेतला, पण टिळकांनीं थोडीशीसुद्धां लोकांना मान्य नसलेली रास्त गोष्ट सांगितली तर लोकांनीं ती केव्हांही ऐकिली नाहीं. यावरून उपरोक्त तत्वांतील प्रमादपूर्णता स्पष्ट होते. लोकांबरोबर मूर्ख बनलें म्हणजे लोक शहाणे होतील या समजुतीनें जर दुराग्रहाचा पक्ष टिळकांनीं स्वीकारला असें गृहीत धरलें तर इच्छित हेतु साध्य झाल्याचें भाग्य टिळकांना लाभलें नाहीं असें कबूल केलें पाहिजे. उलट पक्षीं लौकिक मूर्खपणाला टिळकांसारखा उमदा वकील लाभल्यामुळें त्याची हकालपट्टी होण्याचा दिवस मात्र लांबणीवर गेला. ती हकालपट्टी केव्हांतरी होणार हें भाकीत आगरकरांनीं वर्तविलें होतें आणि टिळकांसारखा मोहरा दुराग्रहपंथाला मिळूनसुद्धां त्याची वाताहात होण्याची राहिली नाहीं यावरून जो बोध घ्यावयाचा तो सुज्ञांच्या लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं.

३. ही गोष्ट अर्थात् तत्वाच्या बाबतींत झाली. पण टिळकांचे कित्येक स्वभाव-दोष शाळेच्या रोजच्या कारभारांत हळू हळू आडवे येऊं लागले. शाळा उत्तम प्रकारें चालली होती व त्याचें बरेंचसें श्रेय वामन शिवराम आपटे यांची शिस्त व विद्वत्ता यांना होतें हें कोणालाही कबूल केलें पाहिजे आणि या शिस्तीबद्दल व विद्वत्तेबद्दल त्यांचा लौकिक वाढूं लागला तेव्हां त्याबद्दल कौतुक वाटावयाचें त्याऐवजीं टिळकांना थोडें फार वैषम्य वाटावयास लागलें हें स्पष्ट दिसतें. आगरकरांच्या ठिकाणीं मित्रप्रेम केवढें होतें याची उत्तम खूण म्हणजे कोल्हापूर प्रकरणांत पडावयाचें असें टिळकांनीं ठरविल्यावर ते लागलीच त्याला कबूल झाले व पुढें बर्व्यांची माफी मागण्याचें टिळकांनीं मुक्रर केल्यावर त्या गोष्टी-लाही त्यांनीं डोळे झांकून पाठिंबा दिला. त्याचप्रमाणें वामनराव आपट्यांशींही ते कडेपर्यंत वागले. पण टिळकांच्या या बारीक धुसफुसीला प्रथम प्रथम कोणी

महत्व दिलें नाहीं. त्यांचे आगरकरासारखे मित्र थोर मनाचे असल्यामुळें जोंपर्यंत शक्य होतें तोंपर्यंत आपल्या स्नेह्याचे शंभर अपराध पोटांत घातले व त्यांचें उणेंपुरें सोसून घेतलें. तुरुंगांतून आगरकर—टिळक परत आल्यावर मंडळींच्या मनांत जो प्रथमपासून हेतु होता कीं आपण कॉलेज काढावें त्यासंबंधीं चर्चा सुरू झाली व कार्य उभें करण्याच्या वाटावाटींत आणि व्यग्रतेंत लहानसहान मतभेदामुळें विशेष दुष्परिणाम होणें शक्य नव्हतें. ही तरुण पदवीधर मंडळी जरी शाळेंत शिक्षकाचें काम करीत होती तरी विद्वत्तेच्या दृष्टीनें कॉलेजांतील अध्यापक होण्याची त्यांची योग्यता होती व आतां आपटे यांचा शैक्षणिक लौकिक व आगरकर टिळक यांचा सार्वजनिक लौकिक यामुळें नवीन उद्योगाला लोकांचें साहाय्य तावडतोब मिळण्याचा संभव होता. परंतु कॉलेज काढणें व शाळा काढणें यांत महदंतर होतें. शास्त्रीबुवांची शाळा काढण्याच्या बाबतींतील दृष्टि कितीही उदारपणानें विचार केला तरी फार आकुंचित होती असें म्हणावें लागतें. आगरकरांच्या अंतःकरणांत ज्ञानदानाचा जो उमाळा होता, "शहाणे करूनि सोडावे सकळ जन" ही जी स्फूर्ति होती, शिक्षण व स्वतंत्रता यांचा अभाव हें आपल्या दुर्दैवी देशाच्या परवशतेचें व दुःस्थितीचें मूळ आहे हा जो त्यांच्या अंतःकरणाला पटलेला सिद्धांत होता, त्या सर्व गोष्टींचा संस्कार शास्त्रीबुवांच्या अंतःकरणाला विशेपसा नव्हता म्हटला तरी चालेल. किंबहुना मुनसफीच्या नोकरीसाठीं अर्ज करणाऱ्या टिळकांच्या अंतःकरणावरही आगरकरांच्या विचारसरणीचें प्राबल्य झालें आणि म्हणून त्यांनीं स्वतंत्रपणें देशसेवेला स्वतःला वाहून घेण्याचें ठरविलें असें म्हणावें लागतें. समाजाच्या आणि देशाच्या दुःस्थितीचें शल्य आगरकरांच्या अंतःकरणांत लहानपणापासून जसें रुतून राहिलें होतें तसें रुतण्याचा लहानपणीं शास्त्रीबुवा किंवा टिळक यांना प्रसंग नव्हता. बाल्यावस्थेच्या सुरवातीपासून प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून तिच्यावर विजय मिळविण्यांत आगरकरांचें पूर्व वय गेलें होतें आणि प्रतिकूल परिस्थितीशीं झगडतांना, तिच्या निबिड अंधकारांतून, पलीकडे असणाऱ्या पण सामान्य दृष्टीला अदृश्य अशा विजयाचे रविकिरण त्यांनीं पाहिले होते. अर्थात् शाळा काढून पोरें हाकणें, पगार मिळविणें व फार झालें तर हायस्कूल ओस पाडणें असल्या गोष्टींवर त्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें. शाळेचा बस बसल्यावर कॉलेज काढण्याच्या कल्पनेला जोर चढला. दरम्यान् आणखी होतकरू तरुण शाळेला येऊन मिळाले होते. गोळे, केळकर,

धारप वगैरे मंडळी आल्यामुळें शिक्षकांच्या बाबतींत शाळेनें सरकारी हायस्कुलांना मागें टाकलें यांत शंका नाहीं. १८८२ सालीं एजुकेशन कमिशन समोर वामनराव आपट्यांची न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीतर्फे साक्ष झाली व त्यांची खणखणीत साक्ष श्रवण करून कमिशनच्या सभासदांच्या मनावर अनुकूल परिणाम झाला. आगरकर—टिळक यांच्या कारागृहवासामुळें लोकांत जशी न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीची मान्यता वाढली त्याप्रमाणेंच आपट्यांच्या एजुकेशन कमिटीपुढें झालेल्या साक्षीमुळें विद्वान् व अधिकारी मंडळींत शाळेच्या लोकांचें तेज पडलें. शिक्षणाला वाहून घेण्यांत आपला हेतु काय हें न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींनीं शाळा तीन चार वर्षें चालल्यावर स्पष्ट शब्दांत जाहीर केलें होतें आणि त्यांत आलेले विचार म्हणजे आगरकरांनीं आपल्या मित्रमंडळीवर बिंबवलेले विचार होत याबद्दल मुळींच शंका वाटत नाहीं. १८८३ सालच्या शाळेच्या अहवालांत म्हटलें आहेः—“ अवनत राष्ट्रांचें भौतिक, नैतिक आणि धार्मिक पुनरुज्जीवन करून धिमेपणानें आणि शांततायुक्त क्रांतीच्या मार्गानें त्यांना बहुतेक पुढारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीला आणून बसविणें हें कार्य मानवजातीय संस्कृतीच्या अखिल साधनांपैकीं केवळ शिक्षणानेंच घडून येत असतें असें आम्हांस पूर्णपणें पटलेलें आहे आणि म्हणून सार्वजनिक शिक्षणाचें हें कार्य आम्हीं अंगावर घेतलेलें आहे. ” ज्ञानाच्या बलावर राष्ट्रांत शांततायुक्त क्रांति घडवून आणणें हें या मंडळींचें ध्येय होतें आणि हें ध्येय मंडळींना त्या काळीं प्रसिद्ध असलेल्या विलायतेंतील व युरोपांतील कित्येक तत्ववेत्त्यांच्या अध्ययनानें पटलेलें होतें. रोग झाल्यावर तो नाहींसा करण्यासाठीं औषधपाण्याची योजना करावी लागते; पण मुळीं रोगबीज नाहींसें व्हावें यासाठीं स्वच्छतेची परिस्थिति हें सामान्य कारण असतें आणि तें कारण अस्तित्वांत आलें म्हणजे रोगांचा प्रादुर्भावच होत नाहीं; त्याप्रमाणें आमच्या देशाला झालेल्या रोगांचें बीजकारण जें अज्ञान त्याचा उच्छेद करणें हें ध्येय मिल्ल या तत्ववेत्त्यापासून या मंडळींनीं घेतलें होतें हें उघड आहे. वर आगरकरांच्या लेखांतील अवतरणें दिलीं आहेत त्यांत स्पष्ट म्हटलेलें आहे कीं “ कुटुंब सुखी राहण्यास त्यांतील सर्व इसमांस चांगलें शिक्षण मिळालें पाहिजे व त्यांस योग्य स्वतंत्रताही असली पाहिजे व या दोहोंचा अभाव हेंच आमच्या गृहस्थितींतील प्रस्तुतच्या दोषांचें मूळ बीज होय. ” यापैकीं शिक्षणाचा विषय या मंडळीनें हातीं घेतला व शाळेच्या पुढें पाऊल टाकण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. अर्थात्

तसें करण्यापूर्वी महाराष्ट्रांतील जाणत्या व कर्त्या पुरुषांची त्यांनीं मदत घेतली, त्यांचा सल्ला विचारला व विशेषेंकरून कॉलेजांत असतांना ज्या गुरूंच्या हाताखालीं त्यांनीं अभ्यास केला होता त्यांना आपला मनोदय कळविला. महाराष्ट्रांत त्या वेळीं रानडे हे मोठे दक्ष आणि विचारी म्हणून प्रसिद्ध होते व ते पुण्याचे असल्यामुळें त्यांच्याकडे ही मंडळी गेली व त्यांनीं कोणत्याही देश-कार्याला उत्तेजन द्यावयाचें या व्रताला अनुसरून मंडळीचा गौरव केला. आगरकर, टिळक व आपटे हीं शाळेचीं प्रमुख माणसें; तिघेही मानी होते आणि धार्मिक बाबतींत बुद्धिप्रामाण्यवादी होते. रानड्यांचीं धर्मविषयक मतें त्यांना पसंत नव्हतीं व त्यांच्या बुद्धिवादांत रानड्यांना नास्तिकपणा दिसत होता. पण रानडे थोर आहेत हें या मंडळींना पटलें होतें व ही मंडळी कर्तृत्व-वान् आहे आणि स्वदेशसेवेसाठीं आत्मसमर्पण करण्यास तयार झाली आहे याबद्दल रानड्यांची बालंबाल खात्री होती. कोल्हापूर प्रकरणांत रानड्यांनीं टिळकचरित्रकार म्हणतात त्याप्रमाणें टिळक-आगरकरांचा विश्वासघात केला असता तर ही तेजस्वी मंडळी त्यांचा उंबरा चढली नसती हें अगदीं उघड आहे. तिघांच्याहि आंगांत रग नुसती मुसमुसत होती आणि अमुक एक दुङ्खा-चार्य आहेत म्हणून त्यांच्यापुढें मान वाकवावी ही गोष्ट त्यांच्या बाबतींत अशक्य होती. ते रानड्यांना देव किंवा अप्रमादशील समजत नव्हते, कारण देवाच्या अस्तित्वाबद्दल जसे ते साशंक होते, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या प्रमादशीलते-बद्दल त्यांना शंका नव्हती. रानड्यांच्या गुणांनीं त्यांना आकर्षिलें व त्यांच्या गुणांनीं रानड्यांना आकर्षिलें व अशा प्रकारें कॉलेजसंबंधीं चर्चा करण्याच्या निमित्तानें परस्परांना अधिक परिचय होण्याची संधी मिळाली. रानड्यांप्रमाणें प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ, प्रिन्सिपाल सेल्बी, डाक्टर भांडारकर, रावसाहेब मंडलीक, काशीनाथपंत तेलंग वगैरे तत्कालीन प्रसिद्ध पुरुष व शिक्षणपंडित यांचाहि त्यांनीं सल्ला घेतला आणि अशा प्रकारें कॉलेज काढण्याच्या या वाटाघाटीला सार्वजनिक आणि राष्ट्रीय अशा प्रकारचें स्वरूप आलें.

४. या कॉलेज काढण्याच्या वाटाघाटीला आगरकर व टिळक परत आल्यावर थोडे दिवसांनीं म्हणजे १८८३ सालीं सुरवात झाली असें दिसतें. कॉलेज काढावयाचें तर त्याची व्यवस्था कांहीं संघटित स्वरूपाची असावी व त्यासाठीं एक मंडळी काढावी अशा तऱ्हेची कल्पना सुरवातीपासूनच होती. मात्र ही मंडळी जेसूट लोकांच्या धोरणाप्रमाणें असावी अशी कल्पना सुरवातीलाही

नव्हती व पुढेंही नव्हती. फार पगाराचा लोभ न धरतां विद्यार्थ्यांना शिक्षण स्वस्त खर्चांत द्यावयाचें हा हेतु या मंडळीपुढें होता; पण ही मंडळी संन्याशांची संस्था काढण्यास उद्युक्त झाली असें गृहीत धरण्यास कांहींच आधार दिसत नाहीं. या प्रकरणांत मंडळींनीं पुष्कळांचा सल्ला विचारला व प्रत्येकानें तो आपापल्या शक्तीप्रमाणें किंवा इच्छेप्रमाणें दिला. रावसाहेब रानडे यांचें या बाबतींत साहाय्य झालें. अर्थात् मूळ कल्पना शाळा काढणाऱ्यांच्याच होत्या हें सांगावयास नको. रानड्यांनीं देशस्थितीचा सर्व बाजूंनीं विचार केलेला होता व अमुक अमुक गोष्टीसंबंधीं प्रस्तुत स्थितींत काय केलें पाहिजे अशा प्रश्नांचीं उत्तरें काढून ठेविलीं होतीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. कृतीच्या क्षेत्रांत रानडे कधीं फारसे चमकले नाहींत, पण कृति करण्याला जीं माणसें तयार असत अथवा जीं माणसें कृति करण्यासारखीं असत, त्यांना रानड्यांच्या विचारांचा बराच फायदा होत असे आणि म्हणूनच त्यांची गणना कर्त्या पुरुषांपेक्षां करविता पुरुषांत केली पाहिजे. न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींत कार्य करण्याची, त्यासाठीं पडेल तो स्वार्थत्याग करण्याची व येतील त्या अडचणींशीं टक्कर मारण्याची धमक होती. आगरकरांनीं कॉलेजांतील शेवटचीं वर्षें पुष्कळ विचार करण्यांत घालविलीं होतीं आणि त्यामुळेंच त्यांच्या पुढील वागणुकींत व मतप्रतिपादनांत जो निःसंदेहपणा होता तो परिणत झाला. शिक्षण व स्वातंत्र्य या देशोन्नतीच्या दोन गुरुकिल्ल्या आहेत ही गोष्ट आगरकरांच्या अंतःकरणांत पूर्णपणें ठसलेली होती आणि त्यांच्या अंतःकरणांत पटलेल्या तत्त्वांचा जोर एवढा होता आणि तीं तत्त्वें प्रतिपादन करण्यांत त्यांची कळकळ व तळमळ एवढी होती कीं त्यांचा प्रतिध्वनि त्यांच्या मित्रमंडळीच्या अंतःकरणांत निघूं लागला. अशी ही कार्याची भूमिका उत्कृष्टपणें तयार झाली होती. तिला रावसाहेब रानड्यांच्या परिणत विचारांचें साहाय्य मिळून तिचें संघटनात्मक कृतींत रूपांतर होणें सुलभ झालें. कॉलेज काढण्याची जबाबदारी जर आंगावर घ्यावयाची तर त्यांत पडणाऱ्या मंडळींनीं कांहीं नियमांनीं आपणांस बांधून घेतलें पाहिजे तरच तें कार्य चांगल्या प्रकारें उरकेल हें मंडळींना माहीत होतें. शिवाय जाणून बुजून अल्प वेतनावर काम करावयाचें ही संकल्पित कार्यक्रमांतील गोष्ट असल्याकारणानें त्यासंबंधीं कांहीं नियमबद्धता असणें आवश्यक होतेंच. रानड्यांनीं आपल्या विचारांचा फायदा या मंडळींना दिला. त्याचप्रमाणें प्रो. सेल्बी यांचें साहाय्य मंडळींना अतिशय झालें. या उद्योगांत

पडलेली सर्व मंडळी डेक्कन कॉलेजमधून बाहेर पडलेली म्हणून सेल्बीसाहेबांना अभिमान वाटत असेच, पण त्यांतल्या त्यांत आगरकरांवर त्यांची विशेष भक्ति होती. आगरकर डेक्कन कॉलेजांत फेलो झाले व सेल्बीसाहेबांच्या आवडत्या विषयांत ते पारंगत होते, हें एक कारण. शिवाय आगरकरांनीं विद्यार्जनासाठीं केलेल्या आटोकाट प्रयत्नांचीही त्यांना माहिती होती, त्यामुळें त्यांची त्यांबद्दल विशेष आदरबुद्धि होती. आगरकरांच्यामुळें सेल्बीसाहेबांचा फर्ग्युसन कॉलेजशीं जडलेला ऋणानुबंध पुष्कळ वर्षें टिकला व सेल्बीसाहेबांनीं कॉलेजला वेळोवेळीं केलेलें साहाय्य अत्यंत महत्वाचें आहे. सेल्बीसाहेबांमुळें युरोपीयन मंडळींत व सरकारी नोकरांत कॉलेज स्थापन करणाऱ्यांना आडकाठी राहिली नाहीं. सेल्बीसाहेबांप्रमाणेंच या बाबतींत मि. (पुढें सर विल्यम) वेडर्बर्न यांच्या नांवाचा उल्लेख केला पाहिजे. हिंदुस्थानचें मीठ खाऊन, ती गोष्ट जे विसरले नाहींत, असे जे थोडेसे इंग्रज होऊन गेले त्यांत सर विल्यम वेडर्बर्न यांची गणना प्रमुखत्वानें केली पाहिजे. हिंदी लोकांच्या आकांक्षाबद्दल त्यांना अतिशय सहानुभूति असे व हिंदुस्थानांतील लोकांना उपयोगी अशा चळवळींना मदत करण्यास ते केव्हांही तयार असत. हिंदुस्थानावरचें त्यांचें हें प्रेम आमरण टिकलें व तें प्रेम किती निर्हेतुक व रमणीय स्वरूपाचें होतें याचा अनुभव गोपाळराव गोखले वगैरेंना पुढें वेळोवेळीं आला. असो.

याप्रमाणें या सर्व मंडळीची सल्लामसलत घेऊन न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींनीं कॉलेज काढण्याच्या पूर्वीं डेक्कन एजुकेशन सोसायटी ही संस्था काढण्याचें ठरविलें व या संस्थेनें शाळा व कॉलेज चालवावें, जरूर पडल्यास आणखी शाळा वगैरे काढाव्यात, असें ठरविलें. या नवीन सोसायटीची मुहूर्तमेढ ता. २४ आक्टोबर सन १८८४ रोजीं पुणें शहरांत रोंवण्यांत आली. त्या दिवशीं गद्र्यांच्या वाड्यांत (जेथें सध्यां न्यू इंग्लिश स्कूलचें वसतिगृह आहे) यासंबंधीं सभा झाली. अध्यक्षस्थान सर विल्यम वेडर्बर्न यांनीं मंडित केलें होतें व सभेला पुण्यांतील पुष्कळ प्रमुख नागरिक हजर होते. डेक्कन एजुकेशन सोसायटी ही संस्था रीतसर स्थापन करण्यांत यावी असा ठराव रा. वामन शिवराम आपटे यांनीं पुढें मांडला व तो मांडतांना लोकांची द्रव्याची मदत मिळवून कॉलेज काढण्याचा आपला विचार असल्याचें जाहीर केलें. विद्वत्तेच्या दृष्टीनें वामनराव आपटे हे न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीचे पुढारी होते आणि म्हणून सोसायटी स्थापन करण्यांत गणपतिपूजनाचें काम त्यांच्याकडे आलें हें साहजिक

होतें. या प्रसंगीं दुसऱ्याही कित्येक मंडळींचीं भाषणें झालीं तीं अर्थात् समयोचित होतीं हें सांगावयास नकोच. सोसायटीचे पहिले ट्रस्टी रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक व प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ यांना नेमण्यांत आले व सोसायटीचे पहिले तहाहयात सभासद झाले ते वामन शिवराम आपटे, गोपाळराव आगरकर, बाळ गंगाधर टिळक, माधवराव नामजोशी, वासुदेवराव केळकर, माधवराव गोळे व धारप असे होते. सभेला जमलेली सर्वच मंडळी न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीबद्दल प्रेमातिरेक झाला म्हणून आली होती असें म्हणवत नाहीं. सेल्बीसाहेबांसारखीं धेंडें हजर तेव्हां आपण गैरहजर असणें बरें नव्हे म्हणूनही कित्येक आले होते. जे कोणी आले त्यांपैकीं कांहीं गृहस्थांनीं त्या दिवशीं हजर राहण्यापलीकडे सोसायटीसाठीं पुढें कांहींही केलें नाहीं. आलेल्या सर्व मंडळींनीं सोसायटीसाठीं खिशांत हात घातला असेंही नाहीं. पण एवढ्या बड्या धेंडांची सभा झाली त्यामुळें या तरुण ससकाला मोठा धीर आला. कॉलेजच्या योजनेला सरकारकडून मिळाल्यास पाठिंबा मिळेल अशी तयारी पहिल्यापासून झाली होती असें दिसतें व टिळक हे या सरकारी साहाय्याविरुद्ध या वेळीं नव्हते; कारण सोसायटी स्थापन होण्यापूर्वीं आठ महिनेच मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे शाळा पाहण्यास गेले होते व शाळेची व्यवस्था पाहून त्यांनीं संतोष प्रदर्शित केला होता. पुढें डिसेंबर महिन्यांत कॉलेज काढण्याला युनिव्हर्सिटीनें मंजूरी दिली. दरम्यान् कॉलेजसाठीं पैसा जमा करण्याचा प्रश्न निघाला. सरकारी मंडळींत व श्रीमंत लोकांत जाऊन पैसे गोळा करण्याची हातोटी माधवराव नामजोशांना साधलेली होती. या कलेंत सदर मंडळीची प्रसंगोचित खुशामत करण्याचेंही चातुर्य त्यांच्या आंगीं होतें, असें पुढें आलेल्या हकीकतीवरून म्हणावें लागतें. त्यांनीं कांहीं श्रीमंत मंडळीकडे भिक्षापात्र दाखवितां ती मंडळी म्हणाली कीं "आमच्या सारख्यांकडून साहाय्य पाहिजे असेल तर गव्हर्नरसाहेबांची चिठी आणा म्हणजे आम्हांला बरें, तुम्हांला बरें. तुमच्यांत ताज्या रक्ताचीं माणसें आहेत. तीं केव्हां काय करतील याचा नियम नाहीं. एखादे वेळीं तुम्हांला मदत केल्यामुळें आमच्यावर गोता येण्याचा संभव; तेव्हां वरूनच किल्ली फिरली म्हणजे आम्हांला भय नाहीं व तुम्हांला पैसे मिळतील." माधवराव नामजोशांनीं नंतर गव्हर्नरसाहेबांची गांठ घेऊन त्यांच्याशीं घटकाभर गोष्टी केल्या व त्यांची प्रसन्नता संपादन केली व गव्हर्नरसाहेबांनीं खूष होऊन संस्थेला

सर्वांनीं साहाय्य करावें अशी आपली इच्छा असल्याची पत्रिका नामजोशांकडे देण्याचें आपल्या चिटणीसांना फर्माविलें. या सर्व लटपटींत फर्ग्युसन साहेबांचें नांव कॉलेजला देण्याचें अभिवचन नामजोशांनीं देऊन टाकलें होतें व तसें करतांना त्यांनीं आपल्या सर्व मित्रांचा विचार घेतला नव्हता असें स्पष्ट दिसतें. कारण कॉलेजला साहेबाचें नांव देणें हा विचार सोसायटींतील सर्व मंडळींना मान्य नव्हता व त्यांच्या बहुतेक हितचिंतकांना मान्य नव्हता. आगरकरांनाही तो मान्य नव्हता. पण नामजोशांच्या सुदैवानें त्यांचे पाठीराखे टिळक झाले व नांवाची बाब विशेष महत्वाची नव्हे असें समजून इतर मंडळींनीं विशेष आग्रह धरला नाहीं. १८८५ सालीं फर्ग्युसन कॉलेजचा प्रीव्हीयस वर्ग गद्र्यांच्या वाड्यांत सुरू झाला व कॉलेजचे पहिले प्रिन्सिपाल सोसायटींतील विद्वन्मणि वामनराव आपटे यांना करण्यांत आलें.

५. याप्रमाणें न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाल्यानंतर पांच वर्षांनीं फर्ग्युसन कॉलेजचा जन्म झाला. कॉलेज सुरू झाल्यावर थोडे दिवसांनीं गोपाळराव गोखले हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीला येऊन मिळाले व न्यू इंग्लिश स्कूल मध्यें दोन वर्षें काम केल्यावर पुढें ते १८८७ सालापासून कॉलेजांत शिकवूं लागले. गोपाळरावांचा सोसायटींत प्रवेश होण्याला टिळक हे निमित्तकारण झाले याचा उल्लेख यापूर्वीं केलेला आहे. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक या नात्यानें आगरकरांनीं फार उत्कृष्ट लौकिक संपादन केला व त्यांच्या मतांला मान्यता न देणारी अशी त्यांची शिष्यमंडळी अद्यापि त्यांची आठवण मोठ्या प्रेमानें व पूज्यबुद्धीनें काढीत असतात. मुलांना शिकवितांना त्यांच्याशीं अगदीं प्रेमानें वागावयाचें, त्यांना संकोच म्हणून वाटूं द्यावयाचा नाहीं, ही हातोटी आगरकरांनीं केरूनाना छत्र्यांपासून घेतली असावी असें दिसतें. इतिहासासारखा विषय शिकविण्याचें काम असल्यानें आगरकरांना समाजस्थितीची कारणमीमांसा करण्याचा प्रसंग वरचेवर येई व तसें करतांना कोणत्याही विद्यार्थ्यानें कांहींही प्रश्न केला तरी त्याचा त्यांना राग येत नसे. सर्व प्रश्नांचीं शांतपणें उत्तरें ते देत. पुढें पुढें मतभेद होऊन कॉलेजमध्यें शिकवितांना त्यांना भलभलते प्रश्नही विचारण्याला कांहीं विद्यार्थ्यांनीं कमी केलें नाहीं, पण त्यामुळें सुद्धां आगरकरांची शांति कधीं ढळली नाहीं किंवा त्यांच्या विनोदी स्वभावांत कधीं फरक पडला नाहीं.

१८८४ सालीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊन पुढें फर्ग्युसन कॉलेज सुरू झालें व अशा प्रकारें जाहीर दृष्टीनें हें साल न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीच्या ऐक्याचें निदर्शक म्हणून समजण्यास हरकत नाहीं. पण या वेळीं वैयक्तिक कारणांमुळें अंतःकलहाला सुरवात झाली होती असें दिसतें. तसेंच याच वेळीं मुंबईच्या मि. मलबारी नांवाच्या पार्शी वर्तमानपत्रकर्त्यानें बालविवाहाला आळा घालण्यासाठीं म्हणून सरकारनें कांहीं उपाय योजावेत अशी वाटाघाट सुरू केली आणि या वाटाघाटींत आगरकर व टिळक यांच्यांत वैमत्य होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. अशा प्रकारें या मंडळीच्या जुटीचें कर्तृत्वपूर्ण स्वरूप ज्या सालीं लोकांच्या नजरेला विशेषें-करून आलें, त्याच सालीं त्यांच्यांत फूट पडण्याचें बीजारोपण झालें. त्याचा साद्यंत इतिहास यापुढें द्यावयाचा आहे. तत्पूर्वी आगरकरांच्या शाळेंतील शिक्षक नात्यानें ज्या दोन तीन गोष्टी प्रसिद्ध झालेल्या आहेत, त्या येथें नमूद करण्यास हरकत नाहीं. त्यावरून आगरकर हे जसे उत्तम शिक्षक होते तसेच फार मोकळ्या व थोर दिलाचे गृहस्थ होते हें स्पष्ट दिसून येतें. शितावरून भाताची परीक्षा होते या नात्यानें विद्यार्थ्यांशीं इतक्या उत्कृष्टपणानें वागणारा पुरुष एकंदर व्यवहारांत कसा वागत असेल याचीही कल्पना करतां येते. आगर-करांच्या शिकवण्यांतील मुख्य गुण म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनांत कोणत्याही गोष्टीचा अर्थ निःसंदेहपणानें भरविण्याची कला. सामान्य व्यवहारांतील उदाहरणें तींही विनोदी पद्धतीनें देऊन ते अवघड गोष्टी सुलभ करून सांगत व उत्तम शिक्षकाची ही एक महत्त्वाची खूण आहे. त्यांचें बोलणें स्पष्ट व शिष्टाचाराच्या बागुलबावोला न जुमानणारें असल्यामुळें त्याच्यावर ग्राम्य किंबहुना अश्लीलपणाचा आरोप कित्येक अर्धवट टीकाकारांनीं केलेला आहे. परंतु बरेच वेळां सदर टीकाकारांनाच ग्राम्य व अश्लील म्हणजे काय हें माहीत नसतें. कधीं कधीं समर्पक अर्थ सांगतांना संभावितपणाच्या फाजील चोचल्यांना रजा द्यावी लागते, पण त्यामुळें अश्लीलता उत्पन्न होते असें म्हणणें हें मोठें धाडस होय. आगरकरांना एकदा Zigzag या इंग्रजी शब्दाचा अर्थ शाळेंत समजावून देण्याचा प्रसंग आला. ( ही गोष्ट रा. गोपाळ कृष्ण देवधर यांनीं एका व्याख्यानांत सांगितली. ) त्याचा भाषांतराच्या पुस्तकांत "नागमोडी-सारखा" असा अर्थ दिलेला आहे. पण प्रथम प्रथम नागमोडी या शब्दाचा अर्थ तरी कोठें कळतो? संस्कृतांतील "लुट्" व इंग्रजींतील Wallow या दोन्ही

शब्दांचे अर्थ जसे कळतांना मारामार पडते तोच प्रकार याही शब्दाचा आहे. आगरकरांच्या वर्गांत भिडस्तपणाची आवश्यकता नसल्यानें एका विद्यार्थ्यानें गुरुजींना शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याबद्दल विनंति केली; तेव्हां आगरकर म्हणाले—"बैल रस्त्यानें चालतांना कधीं कधीं मुतत जातो; तेव्हां जमीनीवर जी आकृति पडते तिला नागमोडी किंवा Zigzag म्हणावयाचें." या अर्थामुळें विद्यार्थ्यांत हंशाही उडाला व अर्थही त्यांना बरोबर कळला. आगरकर प्रसंगोपात्त सुधारणेचीं तत्त्वें वर्गांत प्रतिपादन करीत व त्यांच्या व टिळकांच्या नास्तिकपणाबद्दल तर सर्वत्र ओरडा झाला होता. एक दिवस एक विद्यार्थी म्हणाला—"सर, काल मी तुळशीबागेंत गेलों होतों. तेथें मिसिस् आगरकर आल्या होत्या. त्यांनीं देवापुढें नमस्कार घातला." आगरकरांनीं विचारलें—"मग त्यांत काय नवल झालें?" विद्यार्थी म्हणाला—"आपण आहां नास्तिक. देवावर तुमची श्रद्धा नाहीं. साऱ्या जगाला नास्तिकपणाचा तुम्ही उपदेश करतां, मग मिसिस् आगरकरांना देवळांत कां जाऊं देतां?" त्यावर आगरकर म्हणाले:—"मी, देवळांत जाण्यांत अर्थ नाहीं असें कुटुंबाला वरचेवर सांगतों; पण तिची श्रद्धा आहे. मला जसा माझीं मतें बनविण्याचा हक्क आहे तसा तिलाही आहे. तिचीं मतें बदलण्याची मी खटपट करतों पण तीं बदलण्यासाठीं तिचेवर जुलूम करण्याचा (ती जाणती असल्याकारणें) मला हक्क नाहीं." हें समर्पक उत्तर ऐकून विद्यार्थी चूप झाले. (ही गोष्ट रा. रा. ल. रा. पांगारकर यांनीं प्रसिद्ध केली आहे.) आगरकरांचें मन किती निर्मळ होतें व मतभेदाची आंच आपल्या सामाजिक संबंधाला लागू नये व तिच्यामुळें कोणाचेंही नुकसान होऊं नये याबद्दल ते किती जपत यासंबंधीं पडताळा त्यांच्या एका विद्यार्थ्यानें प्रसिद्ध केलेल्या दुसऱ्या गोष्टीवरून येतो. ही गोष्ट कॉलेज सुरू झाल्यावरच्या पुढच्या कालांतील आहे आहे. हा विद्यार्थी तेव्हां फर्ग्युसन कॉलेजांत होता व तो कॉलेजांतील शिक्षकांत जे तट पडले होते त्यांतील टिळकपक्षाचा पुरस्कर्ता होता. त्याची स्थिति गरीबीची होती व कॉलेजांत त्यानें फ्रीशिप मिळविली होती. तो एका परीक्षेंत नापास झाला तेव्हां त्याची फ्रीशिप बंद करावी

१ या किंवा अशा प्रकारच्या गोष्टींवरून व आगरकरांच्या लिखाणांतील कित्येक उपमारूपकांवरून त्यांच्यावर अश्लीलतेचा आरोप करण्यांत आला आहे. तो जितका हास्यास्पद तितका अज्ञाननिदर्शकही आहे. अश्लीलता व ग्राम्यता यासंबंधानें थोडेंसें विवेचन पुढें आगरकरांच्या वाङ्मयसेवेचें वर्णन केलें आहे त्यांत केलेलें आहे.

असा ठराव कॉलेजच्या शिक्षकमंडळीपुढें आला. त्यांत असेंही सांगण्यांत आलें (त्यावरून ही गोष्ट टिळक कॉलेज सोडून गेल्यानंतरची असावी) कीं आम्ही याला फ्रीशिप देतों व हा गांवांत आम्हांला शिव्या देत सुटतो; त्यांतूनही हा नापास झालेला तेव्हां याला आतां फीची सूट देण्याचें मुळींच कारण नाहीं. या विचारसरणींत पुष्कळ तथ्यांश होता हें उघड आहे. पण आगरकर म्हणाले:—"मुलगा आम्हांला आमच्या मतांसाठीं शिव्या देतो तर देवो बिचारा. पण होतकरू मुलगा आहे. फीची सूट मिळाली नाहीं तर त्याचें शिक्षण थांबेल. तेव्हां आपण त्याला सूट द्यावी." आगरकरांचें म्हणणें सर्वांनीं ऐकलें व त्या विद्यार्थ्याला फ्रीशिप मिळाली. यावरून मतभेद असला म्हणून अंतःकरणांत किल्मिष ठेवावयाचें ही नीच वृत्ति आगरकरांचे ठिकाणीं बिलकुल नव्हती. ज्यांची शांतपणा या गुणाबद्दल विशेष प्रसिद्धी झाली आहे, ते रावसाहेब रानडेसुद्धां "नास्तिक म्हणजे नीतिभ्रष्ट" असें म्हणण्यापर्यंत शांतिभ्रष्ट व बुद्धिभ्रष्ट झाले होते हें लक्षांत घेतलें म्हणजे परमतसहिष्णुता हा गुण आगरकरांच्या ठिकाणीं किती अस्सल स्वरूपांत वास करीत होता हें वरील दोन्ही उदाहरणांवरून सिद्ध होतें व त्याचें कारण उघड आहे; व्यक्तिस्वातंत्र्य हा आगरकरांच्या सुधारणेचा एक पाया होता.

[illegible] संवयी लागूं नयेत याबद्दल ते फार दक्ष असत [illegible]ांच्या नजरेला कांहीं आगळीक आल्यास ते फार शांतपणानें पण खंबीरपणानें ती नाहींशी होण्याची खटपट करीत. त्यांच्या वेळीं शाळेंतील विद्यार्थी वयानें बरेच मोठे असत व कांहीं जण तर प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण होण्यापूर्वीं दोन तीन मुलांबाळांच्या पितृत्वांत प्रविष्ट झालेले असत. अर्थात् तंमाखू ओढण्यासारखीं व्यसनें तेव्हां शाळेंतदेखील असत. न्यू इंग्लिश स्कूलमधल्या दोन चार बाप्या विद्यार्थ्यांनीं यापुढेंही मजल हाणली व शाळेंतील अंधाऱ्या जिन्यावरच्या एका कोनाड्यांत गांजाच्या चिलमीचें साहित्य भरून ठेविलें. मधली सुट्टी झाली कीं हे विद्यार्थी त्या जिन्यावर जाऊन चिलमीवर छापी चढवून गांजाचे झुरके मारीत. एके दिवशीं आगरकरांच्या प्रश्नांच्या तडक्यापुढें सर्व बेंड बाहेर फुटलें व कोनाड्यांतील चिलीम, छापी वगैरे साहित्य चव्हाट्यावर

१ मुमुक्षुपत्रांतील १९१६ सालच्या जुलै महिन्यांत आलेला आगरकरांसंबंधीं अग्रलेख पहा.

आलें. आगरकरांनीं सदर विद्यार्थ्यांना गांजाचे दुष्परिणाम समजावून सांगितले व असली घाणेरडी संवय ताबडतोब सोडून देण्याबद्दल बजाविलें व विद्यार्थ्यांनींही झालेली चुकी कबूल करून पुढें असें करणार नाहीं, म्हणून गुरुजीसमोर निश्चय केला व तो पाळला. या सर्व हकीकतींवरून आगरकर हा किती सरळ अंतःकरणाचा पुरुष होता हें कळतें व यापुढें त्यांचीं जीं अतिशय कठोर वादविवादांत दहा वर्षें गेलीं त्यांचा विचार करतांना हा गुण लक्षांत ठेवणें जरूर आहे म्हणून या दोन गोष्टी या ठिकाणीं मुद्दाम दिल्या आहेत. त्यांचे विद्यार्थी होण्याचें भाग्य लाधल्यापैकीं ज्या मंडळीची प्रस्तुत लेखकांशीं गांठ पडली त्या सर्वांनीं शिक्षक व सज्जन पुरुष या नात्यानें आगरकरांबद्दल अत्यंत प्रेमपूर्ण असे उद्गार त्याच्याजवळ काढले.

६. फर्ग्युसन कॉलेज १८८५ सालीं सुरू झालें व आगरकर आणि टिळक यांच्यामध्यें केसरी पत्रांतील मजकुरासंबंधीं वासाधीस, होण्यालाही तेव्हांपासून सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रथम प्रथम ज्यांचें न्यू इंग्लिश स्कूल त्यांचींच वर्तमानपत्रें असा प्रकार होता व तो खराही होता. पुढें जेव्हां डेक्कन एज्युकेशन सोसायटी काढली, तेव्हां सोसायटीच्या प्रगतीला अडथळा येऊं नये म्हणून वर्तमापत्रांचा सोसायटीशीं संबंध बिलकुल ठेवण्यांत आला नाहीं आणि असेंच करणें इष्ट होतें. आणि अशाप्रकारें केसरी व मराठा हीं वैयक्तिक मालकीचीं निदान शास्त्रार्थानें झालीं. प्रत्यक्ष पाहिलें तर त्यांत सोसायटींतील मंडळी पूर्वींप्रमाणें मधून मधून लिहीत असत; पण मुख्य लेखणीचा जोर आगरकरांचा होता. पुढें त्यांनीं हळू हळू लिहावें व इतरांनीं टीका करावी असा प्रकार होऊन त्यांतूनच दुफळीची सुरवात झाली. टिळक आणि आगरकर यांच्यांत जो मतभेद झाला व ज्याचें पर्यवसान टिळकांनीं आगरकरांचीं मतें केसरींत प्रसिद्ध होणें अशक्य करण्यांत म्हणून सुधारकाच्या जन्मांत झालें, त्याची सर्व हकीकत पुढील भागांत यावयाची आहे. ती देण्यापूर्वीं आगरकरांच्या मतांच्या वैशिष्ट्यासंबंधीं चार शब्द या ठिकाणीं लिहिल्यास पुढील वादविवादाचें रहस्य समजण्यास मदत होईल.

---

१ यासंबंधीं सविस्तर विवेचन आगरकरांच्या विचारासंबंधीं पुस्तकाच्या पुढील भागांत चर्चा केली आहे तेथें सांपडेल; येथें फक्त विषयाच्या अनुषंगानें त्यासंबंधीं अगदीं थोडक्यांत उल्लेख केला आहे.

आगरकरांची सुधारणा व्यावहारिक स्वरूपांत ज्याप्रमाणें शिक्षण व स्वातंत्र्य या तत्वांवर उभारलेली होती, त्याप्रमाणें तिच्या तात्विक स्वरूपांत ती बुद्धिप्रामाण्यावर उभारलेली होती. अमुक एका गोष्टीला शास्त्राधार आहे म्हणून ती ग्राह्य किंवा अग्राह्य समजावयाची असें नव्हे तर ती गोष्ट बुद्धीला पटते, विचाराला मानवते, कोणत्याही लौकिक व बौद्धिक निकषानें पारखून पाहिल्यास उत्तम वाटते म्हणून ग्राह्य समजावयाची, हें आगरकरांच्या विचारसरणींतील मूळतत्व होतें. टिळकांच्या विचारसरणींतही मूळतत्व सुरवातीला हेंच होतें. पण पुढें बहुजनसमाजाला जें पसंत तेंच ग्राह्य या तत्वाचें अवलंबन केल्यामुळें त्यांच्या विचारसरणींत बुद्धिप्रामाण्य व शास्त्रप्रामाण्य या दोहोंचाही लोप झाला. आगरकर आणि टिळक यांच्या वादांतील तात्विक बीज हेंच आहे. या तात्विक वादांत वैयक्तिक गोष्टींची भेसळ होऊन वादाचें स्वरूप अधिक भेसुर झालें व तें भेसुर होण्याला प्रतिपक्षाशीं लढतांना नीतीची जरूरी नाहीं हीच खरी युद्धनीति या टिळकांच्या तत्वाचें फार सहाय्य झालें, ही गोष्ट निराळी; परंतु वादाची सुरवात वैयक्तिक आणि टिळक-तात्विक स्वरूपांत वर लिहिल्याप्रमाणें झाली. महाराष्ट्रांत सुधारणेचा प्रचार करण्यासाठीं उभे राहिलेल्या मंडळींत बुद्धिप्रामाण्यावर सर्वथा भिस्त ठेवणारे आगरकर हे पहिले असल्यानें त्यांच्या मतांचा केवल जुन्या पुराण्या मंडळींनाच बाऊ वाटला असें नाहीं तर रानडे भांडारकरासारख्यांनाही कसेंसेंच झालें. १८८५ सालीं डेक्कन कॉलेजांत विद्यार्थ्यांचें संमेलन झालें तेव्हां रानडे पाहुणे म्हणून हजर होते व त्यांनीं मिल्ल स्पेन्सरबद्दल अनादरयुक्त उद्गार काढून नास्तिक्य व नीतिभ्रष्टता यांचा संबंध जोडण्यापर्यंत आपल्या अनुदारतेची मजल नेली व त्यामुळें चिडून जाऊन टिळकांनीं त्यांना कठोर प्रत्युत्तर दिलें. टिळक म्हणाले त्या वाक्यांचें तात्पर्य पुढीलप्रमाणें होतें:—" आपण (रावसाहेब रानडे) थोर आहांत आणि आम्हां सर्वांच्या मानानें आपल्या योग्यतेबद्दल मुळींच वाद नाहीं. पण मिल्ल व स्पेन्सर यांच्या मानानें आपली योग्यता कांहींच नव्हे. त्यांच्यासंबंधीं उचलली जीभ लावली टाळ्याला असा प्रकार आपण

---

१ शठं प्रति शाठ्यम् हें टिळकांचें सूत्र वाक्य १९१६ सालानंतर सर्व हिंदुस्थानभर गाजलें. दुर्दैवानें ज्याचा आपल्याशीं मतभेद झाला त्या प्रत्येकाला शठ समजण्याची संवय टिळकांना लागली होती असें म्हणावें लागतें.

करूं नये; कारण तसा केल्यास त्याला कोणी किंमत देणार नाहीं." हा वाद कदाचित् पुढें वाढला असता, पण विष्णुपंत महाजनींनीं मध्यें पडून दोघांनाही शांत केलें. वास्तविक जुन्या मताला सोडून चालणारा माणूस मग तो कोणीही असो व कसलाही असो—तो नास्तिक असें पुराणमतवादी समजत होते, व त्यांच्या मतें आर्यसमाज, प्रार्थनासमाज, ब्राह्मसमाज वगैरे सर्वांची, म्हणून रानडे भांडारकरांदिकांची, गणना सुधारकांत अतएव नास्तिकांत होत होती. रानड्यांच्या अनुदारतेच्या वर दिलेल्या उदाहरणावरून ते सदा सर्वदा अनुदार वृत्तीचे होते असें समजूं नये. किंबहुना रानडे हे सुधारक नसून उदार वृत्तीचे जुन्या पद्धतीचे गृहस्थ होते असाच त्यांच्या एकंदर चरित्रावरून निष्कर्ष काढल्यावांचून गत्यंतर नाहीं. त्यांच्या गळीं आगरकरांची तेजस्वी, ओजस्वी आणि स्वतंत्र वृत्तीची सुधारणा उतरणें कठिण होतें व संमतिवयाच्या वादाच्या पहिल्या भरांत रानड्यांच्या आकुंचित सुधारणेवर सुधारकांत आगरकरांनीं सणसणीत कोरडे ओढलेले आहेत. पण जेव्हां मोठा वाद होतो तेव्हां तीन पक्ष नांदूं शकत नाहींत. कितीही पक्ष असले तरी त्यांचें तात्कालिक पर्यवसान दोन पक्षांत होतें, या न्यायाला अनुसरून पुढें रानड्यांचें आणि टिळकांचें जमणें केवळ अशक्य झाल्यामुळें व्यावहारिक बाबतींत आगरकरांचें आणि त्यांचें सख्य झालें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. परंतु टिळक हे सुधारणाद्वेषी बनले तर रानड्यांना "थंडे सुधारक" ही मोठी यथार्थ पदवी मिळाली. आणि या "थंड्या" सुधारणेनें खऱ्या व तेजस्वी सुधारणेचे पाय अतिशय मागें ओढले यांतही कांहीं शंका नाहीं. टिळकांनीं जर आपली पगडी फिरविली नसती तर महाराष्ट्राचा इतिहास निराळा झाला असता ही गोष्ट जितकी खरी आहे, तितकीच रानडे हे जर कर्ते व धडाडीचे सुधारक असते तर महाराष्ट्रांतील समाजसुधारणेचा इतिहास बराच निराळा झाला हीही गोष्ट खरी आहे. रानड्यांचें अंतःकरण परंपराभिमानाचें, पुराणवृत्तीचें होतें, पण वाचनानें आणि विचारानें त्यांची बुद्धि उदार झाली होती. प्रत्यक्ष आचरणांत त्यांनीं बुद्धीचें अंतःकरणावर वर्चस्व कधीं चालूं दिलें नाहीं त्यामुळें त्यांची सुधारणा "थंडी" झाली; पण त्यांची गणना प्रमुख सुधारकांत असल्यामुळें त्यांचें आचरण खऱ्या सुधारणेच्या प्रगतीला विघातक झालें. टिळक जरी बुद्धीनें आणि अंतःकरणानें सुधारणावादी होते, तरी त्यांनीं जाणून बुजून सुधारणेला हाणून पाडणाऱ्यांचा पक्ष स्वीकारला. त्यांच्या सुधारणाद्वेषावर उघड हल्ले चढविणें शक्य होतें व ते

आगरकरांनीं चढविले. रानड्यांनीं तत्वतः सुधारणेला विरोध केला नाहीं त्यामुळें व त्यांच्या इतर गुणांमुळें, व त्यांच्या बुद्धीच्या उदारतेमुळें सुधारणा-पक्षाला जें साहाय्य होई त्यामुळें त्यांना सुधारणेच्या शत्रुमंडळांत लेखणें शक्य नव्हतें. हें सगळें जरी खरें होतें तरी जेथें बुद्धिप्रामाण्य व आधारप्रामाण्य किंवा शब्दप्रामाण्य असा वाद येई तेथें रानडे आधारप्रामाण्याच्या पक्षाचे होते असें बहुतेक समजण्यास हरकत नाहीं.[1] बहुतेक म्हणण्याचें कारण १८९७ सालीं "सुधारणा का पुनरुज्जीवन ?" (Revival or Reform ?) या भाषणांत त्यांनीं सुधारणेचा स्पष्टपणें पुरस्कार केलेला आहे. या एका प्रसंगीं त्यांनीं आपल्या बुद्धीचा अंमल आपल्या अंतःकरणावर सर्वस्वीं चालूं दिलेला दृष्टोत्पत्तीस येतो. कांहीं झालें तरी—आणि रानड्यांच्या आचरणाचा सुधारणेच्या प्रगतीवर फार प्रतिकूल परिणाम झाला असला तरी—त्यांच्या उदार विचारामुळें सामाजिक सुधारणेचीं तत्वें रास्त आहेत हें लोकांना पटण्याला साहाय्य झालें ही गोष्ट निर्विवाद आहे आणि म्हणून समाजसुधारणेच्या इतिहासांत जरी कर्ते सुधारक म्हणून त्यांची गणना होणें शक्य नसलें, तरी सद्विचारप्रवर्तक म्हणून त्यांचें श्रेय फार मोठें आहे. रानड्यांचा मोठेपणा त्यांच्या सुधारकीपणापेक्षां त्यांच्या राजकीय मुत्सद्दीपणांत विशेषेंकरून आहे; ही गोष्ट त्यांच्या चरित्राचें नीटपणें अव-लोकन केल्यास लक्षांत येते.

आगरकरांनीं केसरींत चारपांच वर्षें जीं सामाजिक सुधारणेचीं तत्वें प्रतिपादन केलीं, त्यांचा व्यवहारांत पडताळा पाहण्याचा प्रसंग मलबारी शेटच्या बालविवाहासंबंधीं चळवळीमुळें आला. या चळवळीच्या विरुद्ध जेव्हां प्रचंड लोकमत दिसलें तेव्हां टिळकांनीं (एकदम असो किंवा हळूहळू असो) या वेळपर्यंत आपलीं म्हटलेलीं तत्वें फेकून देऊन जेथें बहुमत तेथें सत्य ह्या पंथाचा आश्रय केला व त्यांत त्यांची आणि आगरकरांची ताटातूट झाली. जेथें बहुमत किंवा जेथें बहुशक्ति तेथें सत्ता हें तत्व निराळें आणि तें व्यावहारिक स्थितींत अनुभवाला येतें. पण जेथें बहुमत तेथें सत्य हें

---

१ अर्थात् हें आधारप्रामाण्य अगदीं कर्मठ लोकांच्याप्रमाणें नव्हतें. परंतु बुद्धिप्रामाण्यावर ज्यांचा विश्वास नाहीं ते जरी पुराणमताच्या बाजूचे नसले तरी आधारप्रामाण्याचे जरा अधिक उदार अर्थानें पुरस्कर्ते असतात हें उघड आहे.

तत्व आगरकरांना अर्थात् पसंत नव्हतें व आतांही ब्राह्मणेतरांचें बहुमत सत्य म्हणून मान्य करण्याला टिळकांचे अनुयायी म्हणविणारे तयार नाहींत. अज्ञान लोकांच्या बहुमतांत बळ असलें तरी सत्य नाहीं ही गोष्ट टिळकांना चांगली माहीत होती; पण त्यांनीं जाणून बुजून बहुमताची वकिली अंगिकारिली. रानड्यांनाही बहुमत म्हणजे सत्य हा सिद्धांत मान्य नव्हता पण बहुमताला सोडून जावें व त्याच्याशीं डोकें फुटलें तरी हरकत नाहीं एवढी टक्कर द्यावी एवढी त्यांची तयारी नव्हती. आगरकर हे ढोंगाचे वैरी होते; मग तें ढोंग कितीही संभावित स्वरूपांत असलें तरी त्याची त्यांना पर्वा नव्हती. किंबहुना पुष्कळ वेळां संभावित ढोंग हें उघड ढोंगापेक्षां अधिक घातुक असतें हें त्यांना पटलेलें होतें. त्याचप्रमाणें जें असत्य, जें अन्याय्य, जें निष्ठुर त्याच्याशीं टक्कर ही मारलीच पाहिजे, मग डोकें फुटलें तरी हरकत नाहीं ही त्यांची वृत्ति होती. त्या वृत्तीला, वैयक्तिक परिस्थिती-प्रमाणें हें टक्कर मारण्याचें काम कमजास्त प्रमाणांत होईल, हें मान्य होतें. त्याचें विवरण यथास्थळ पुढें येईलच. पण कोणत्याही कारणासाठीं ढोंगाची तरफदारी करण्यास ते तयार नव्हते. अशाप्रकारें या तीन पुरुषांच्या वृत्ति-भेदाप्रमाणें तेव्हांचा वाद म्हणजे साधारण मानानें एक तिरंगी सामना निदान प्रथम प्रथम तरी होता; पण पुढें लढाईंत नेहमीं दोन पक्ष राहतात या नुकत्याच सांगितलेल्या न्यायाला अनुसरून रानडे व आगरकर हे संमतिवयोवादा-पुरते एका बाजूला उभे राहिले. या तीन वृत्तींतील कोणती कोणाला पसंत पडेल व त्यांच्या तारतम्याविषयीं मतभेद होईल. पण प्रवृत्तींतील भिन्नता पुरी व निदान स्पष्टपणें लक्ष्यांत ठेविल्याशिवाय ज्या वादाला यापुढें सुरवात होणार होती, ज्या वादामुळें टिळक—आगरकर यांची जोडी फुटून महाराष्ट्रांत दुही माजली आणि ज्या वादाच्या रखरखीत ज्वाळा अद्यापि शांत झाल्या आहेत असें म्हणतां येत नाहीं, त्या वादाचें खरें स्वरूप समजणार नाहीं.

वादाची सुरवात टिळकांनीं केली हें वर एक दोन ठिकाणीं विस्तृतपणें सांगितलेलें आहे. टिळकांना बहुमताच्या कृपेचा जो लोभ सुटला त्याच्या भरांत त्यांनीं अभ्यासानें व विचारानें अंतःकरणाला पटलेलीं तत्वें कःपदार्थ म्हणून सोडून दिलीं व ज्याच्या सोबतीनें टिळक सार्वजनिक कार्यांत प्रविष्ट झाले, ज्याच्या संगतींत त्यांनीं कारागृहवास भोगला, ज्यानें दारिद्र्यावर केलेल्या

मोहिमेचें कौतुक वाटून मुन्सफीचा नाद सोडून आपलें आयुष्य शिक्षणप्रसार व देशसेवा यांकडे लावण्याचें त्यांनीं ठरविलें त्या उदार अंतःकरणाच्या, निर्मळ वृत्तीच्या व अत्यंत शुद्ध आचरणाच्या मित्राचाही त्यांनीं त्याग केला येवढेंच नव्हे तर लोकगंगेची पंडेगिरी मिळविण्यासाठीं त्यांनीं त्या थोर मित्रांशीं सार्वजनिक वैर करण्याचा निश्चय केला, व त्याच्या भरांत त्यावर भलभलते आरोप करण्यास व अश्लाघ्य विशेषणांचा भडिमार करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांत हा अत्यंत उद्वेगजनक प्रकार घडला यांत शंका नाहीं. पण ज्या तत्वासाठीं आगरकरांनीं एवढा छळ सोसला तीं टिळकांसारखा प्रतिपक्षी मिळाल्यामुळें विवाद आणि द्वेष यांच्या अग्नींतून तावून सुलाखून बाहेर पडलीं व त्यांचा झालेला विजय त्यामुळें विशेष तेजस्वी दिसतो आणि अधिक टिकाऊ स्वरूपाचा झाला आहे हेंही विसरतां कामा नये. पण या वादाला जोरानें सुरवात होण्यापूर्वीं फर्ग्युसन कॉलेज काढण्याची विधायक कामगिरी आगरकर, टिळक, आपटे व त्यांचे सहकारी यांनीं केली, आणि अशा प्रकारें ज्या पुण्यांत आगरकरांना आपलें शिक्षण होईल कां नाहीं अशी चिंता लागून राहिली होती त्याच पुण्यांत हजारों गरीब विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय लागली. फर्ग्युसन कॉलेजची स्थापना म्हणजे महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांतील एक मोठ्या महत्वाचा प्रसंग होय यांत शंका नाहीं.

# भाग सहावा

## सुधारकाचा जन्म

परार्थव्यासंगादुपजहदपि स्वार्थपरता-
मभेदैकत्वं यो वदति गुरु भूतेषु सततम्।
स्वभावादस्यान्तः स्फुरति ललितोदात्तमहिमा
समर्थो यो नित्यं सजयतितरां कोपि पुरुषः ॥

१८८४ सालच्या दिवाळीच्या मुहूर्तावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली व १८८५ च्या सुरवातीपासून फर्ग्युसन कॉलेज सुरू झालें. याप्रमाणें महाराष्ट्राच्या सार्वजनिक आयुष्याच्या क्षितिजावर एक प्रकारचें नवीन तेज चमकूं लागलें. त्याच क्षितिजावर सामान्य दृष्टीला दिसण्यालासुद्धां कठीण अशीं अगदीं बारीक अभ्रें कोठें कोठें होतीं. तीं एक दोन वर्षांत सर्व आकाश-भर पसरून त्यांतून कटुतर वादविवादाची झोड उठेल ही कल्पनाही तेव्हां कोणाला खरी वाटली नसती. परंतु मुंबईचे मि. मलबारी या पार्शी वृत्तपत्र-कारांनीं कायद्याच्या साहाय्यानें बालविवाहाला प्रतिबंध करावा अशाबद्दल खटपट सुरू केली होती. हिंदी वर्तमानपत्रकारांत मलबारीशेटची वास्तविक योग्यता कोणती हा प्रश्न अलाहिदा आहे. वर्तमानपत्र चालविण्याला लागणारे कांहीं गुण व वर्तमानपत्राच्या बळावर हातीं येणाऱ्या सत्तेचा स्वतःच्या बडेजावा-साठीं उपयोग करण्याचें कर्तृत्व या व्यतिरिक्त ज्यांमुळें मोठेपणा येईल असे गुण सदर गृहस्थांत होते असें दिसत नाहीं. पण सरकारी दरबारीं त्यांचें वजन आहे अशी कांहीं बावळट संस्थानिकांची आणि त्यामुळें सामान्य लोकांची समजूत झाली होती. त्याचा परिणाम सहजच असा झाला कीं मलबारीशेट हें मोठें बडें प्रस्थ आहे असा पुण्यांतील लोकांचा ग्रह झाला. त्यांनीं उपस्थित केलेल्या खटपटीमुळें सामाजिक बाबतींत सरकारकडून कायदा करून घ्याव-याचा हें योग्य कां अयोग्य ही चर्चा सुरू झाली. सनातन चालींचीं अभि-मानी मंडळी होती त्यांना अर्थात् आपल्या धर्मांत सरकारनें हात घालतां कामा नये असें अंतःकरणपूर्वक वाटत होतें. धर्म व समाजव्यवस्था आणि

वैयक्तिक वर्तन यांची मोट बांधण्याचा धर्माचा जो प्रकार आहे त्याला अर्थात् हिंदुधर्म अपवाद नाहीं किंबहुना हिंदु व्यक्तीचा कोणताही व्यवहार धर्मबद्ध नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. प्रातर्विधीला तोंड कोणत्या बाजूला असावें येथपासून निजण्याच्या वेळीं बिछान्यावर पाय कोणत्या दिशेकडे वळवावेत येथपर्यंत धर्म किंवा धर्माहून बलवत्तर अशी रूढि यांनीं बंधनें घालून दिलेलीं आहेत. अशा बंधनांत विवाहबंधन तर मोठें भरभक्कम. स्त्रीपुरुषांच्या विवाहाची गांठ प्रत्यक्ष ब्रह्मदेव बांधणारा, आणि रजोदर्शनापूर्वीं जर स्त्रीला या गांठीची गांठ पडली नसेल तर तिच्या बेचाळीस मागच्या व बेचाळीस पुढच्या पिढ्या रौरव नरकांत जाणार अशा समजुतीनें शतकानुशतकें लोकांचीं अंतःकरणें गढूळ झालेलीं. रावसाहेब रानड्यांसारख्या पदवीधरमुकुटमणीचा तिसाव्या बत्तिसाव्या वर्षीं झालेला दुसरा विवाह अकरा बारा वर्षांच्या पोरीशीं झाला ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे अज्ञान लोकांत व निरक्षर मंडळींत रांगणारा मुलगा आणि पोटावर सरकणारी मुलगी यांचे विवाह होत यांत नवल नाहीं; किंवा चाळीस वर्षांचा घोडनवरा व पांच वर्षांचें स्त्रीलिंगी अपत्य यांना एका दावणींत चतुर्भुज कसें करण्यांत येत असे याचीही उपपत्ति कळणें कठीण नाहीं. असल्या चालींचा आचरटपणा सुशिक्षित व बुद्धिमान् लोकांना कळत नव्हता असें म्हणणें म्हणजे हे लोक अक्कलशून्य होते असें गृहीत धरावें लागेल. परंतु परंपरेचा अम्मल मोठा दुस्तर आहे व आपल्या देशाचें स्वातंत्र्य गमावलें तरी आपल्या घरांतील मोरी स्वच्छ करण्याची ताकद आपल्यावर अंमल करणाऱ्यांची नाहीं हा अभिमान वाहणें पुष्कळांना इतकें गोड वाटतें कीं अशा प्रश्नांची चर्चा करतांना ते आपली बुद्धि व विचारशक्ति यांना कोंडून ठेवितात.

न्यू इंग्लिश स्कूलच्या ताज्या दमाच्या तरतरीत मंडळींत मलबारी शेटनीं काढलेल्या प्रश्नावर चर्चा झाली हें सांगावयास नकोच, पण या चर्चेंत आतांपर्यंत सामाजिक किंबहुना सर्व बाबतींत टिळकआगरकरांची जी गट्टी होती ती फुटणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. दोघेही मिल्लचे अनुयायी होते. त्या वेळच्या मताप्रमाणें सरकारनें प्रजेचें संरक्षण करण्यापलीकडे सामान्यतः कोणत्याही बाबतींत हात घालूं नये या मताचे दोघेही पुरस्कर्ते होते. पण या मताचा अंमल जेथें प्रत्येक नागरिक सुबुद्ध व स्वतःचे हितसंबंध कळण्याला पात्र असतो तेथेंच व्हावयाचा ही साधी गोष्ट टिळक विसरले. वकिलीच्या डावपेचानें स्वर्ग साधतो किंवा स्वराज्य मिळतें अशी आगरकरांची बुद्धि नसल्यामुळें ते जाणून बुजून आडमार्गानें गेले

नाहींत व स्त्रियांचें संरक्षण करण्याला सरकारी कायद्याची मदत हिंदुस्थानांत घेण्याला हरकत नाहीं हें त्यांना पटण्याला वेळ लागला नाहीं. जेथें स्त्रियांना मनुष्यत्वाचीसुद्धां पात्रता आहे असें समजत नाहींत, जेथें 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सिद्धांताचें प्रतिपादन करणारा मेधावी तत्ववेत्ता "स्त्रीपशुभृत्यवत्" अशीं वाक्यें लिहून राष्ट्राच्या मातांची संभावना करतो, जेथें स्त्रियासंबंधी सर्व रूढि, स्त्री ही पुरुषाची "जिनगानी" आहे, या भावनेनें अस्तित्वांत आलेल्या आहेत तेथें "जिनगानी" चा दुरुपयोग होत असेल तर कायद्याची मदत घेण्याची कां हरकत असावी ? या बाबतींत केसरीच्या हपीसांत किंवा फर्ग्युसन कॉलेजच्या "कॉमन" रूम मध्यें पहिले वाद स्नेहभावानें झाले पण वादाला उभे राहिल्यावर "स्नेह" हा शब्द आपल्या कोपांत ठेवावयाचा नाहीं असा टिळकांचा स्वभाव असल्यामुळें वादाच्या स्वरूपाला निराळें वळण लागलें. मागील भागांत सांगितल्याप्रमाणें टिळकांच्या भोंवतीं "गण" गोळा होऊं लागले होते व गांवगुंड नागनरसोबांच्या मिथ्या स्तुतीच्या सोमरसाचें पान करण्याची संवय जडल्यामुळें टिळकांची बुद्धि चळूं लागली. या वादाला सुरवात होण्याच्या सुमाराला पुण्यांतील कांहीं प्रमुख मंडळींनीं बालविवाहाचा प्रतिषेध करणारें एक जाहीरपत्रक काढलें होतें. त्यावर टिळक आगरकरांच्या सह्या एकीखालीं दुसरी अशा प्रसिद्ध झाल्या होत्या. तेच टिळक हळू हळू "सरकारनें सामाजिक बाबतींत हात घालतां उपयोगी नाहीं" या तत्वाचें पांघरूण घेऊन बालविवाहाचें समर्थन करण्यास तयार झाले. टिळकांच्या विवादपटुतेला भांडखोरपणाची आणि दुराग्रहाची भक्कम जोड असे. त्यामुळें खासगी संभाषणांत त्यांना कधीं कधीं यश येई. पण आगरकर हे सरळपणें वादविवाद करण्यांत कांहीं कमी नव्हते; आणि टिळकांच्या किंवा कोणाच्याही आरड्या ओरडण्याला भिऊन चूप बसण्याची व्यवहारदक्षता ( जी व्यवहारज्ञता रावसाहेब रानड्यांच्या ठिकाणीं होती असें दिसतें ती) अर्थात् त्यांच्या ठिकाणीं नव्हती. शिवाय आपल्याशीं वाद करणारा आपला जीवश्च कंठश्च मित्र लोकरंजनाच्या लालसेनें वादाचें स्वरूप हीन करील असेंही त्यांच्या थोर मनाला वाटणें प्रथम शक्य नव्हतें. केसरी पत्राची उभारणी आणि लौकिक ही आगरकरांच्या तेजस्वी आणि ओजस्वी लेखणीनें झाली होती; तथापि केसरी पत्रांतील विचार हे केवळ आगरकरांचे नसून त्यांच्या सर्व मित्रमंडळांच्याही मतांचे निदर्शक आहेत अशी लौकिक समजूत होती व ती खोटी नव्हती. आणि आतांपर्यंत जीं मतें प्रतिपा-

दन केलीं त्यांच्यामुळें निघणाऱ्या तत्वांचें आणि सिद्धांतांचें समर्थन करतांना हीं मतें " एकांतिक " आहेत असें त्यांना वाटण्याचें कारण नव्हतें. परंतु टिळकांनीं जेव्हां " बुद्धिप्रामाण्याचें " खडतर व्रत सोडून लोकमतप्रामाण्याचें ग्रहण करण्याचें ठरविलें त्या वेळीं केसरींतील चार पांच वर्षें प्रसिद्ध झालेलीं मतें त्यांना गैरसोईचीं वाटूं लागलीं आणि त्यांचें प्रतिपादन आगरकरांनीं केल्यास आपले " गण " आपल्याला सोडून दुसऱ्या एखाद्या दगडोबाला धरून त्याला शेंदूर फांसून देव बनवितील या भीतीमुळें, आगरकरांनीं " आपलीं " स्वतःचीं मतें मंडळीच्या मताला सोडून असलीं तर तीं प्रसिद्ध करण्याच्या व्यापांत पडूं नये, असा त्यांनीं आग्रह धरला. लोकशिक्षक म्हणून वर्तमानपत्राच्या धंद्यांत पडलेल्या आगरकरांना " बाजारांत खपेल तो माल तयार करण्याचें दुकान " घालण्याची ही जुगत पटली नाहीं व केसरीचे जबाबदार संपादक ते असल्यामुळें ते स्वतःचीं ( आणि या वेळपर्यंत टिळकानांही मान्य असलेलीं ) मतें पूर्वींच्याच निधडेपणानें प्रतिपादन करूं लागले, आणि अशाप्रकारें टिळकांच्या तोंडाचा आंबटपणा वाढण्याला मदत झाली.

२. याप्रमाणें वादाची लौकिक सुरवात मलबारी प्रकरणांत झाली; पण ज्या मतभेदाचा परिणाम आगरकरांनीं १८८७ सालीं केसरी सोडण्यांत व १८८८ सालीं सुधारक काढण्यांत झाला आणि पुढें दोन वर्षांनीं ज्यामुळें टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीला रामराम ठोकला, त्याचा खरा उगम वैयक्तिक प्रकृतिभेदांत झाला होता हें स्पष्टपणें सांगणें आवश्यक आहे. सोसायटी निघाल्यावर थोड्याच दिवसांत टिळकांनीं सोसायटीचे हेतु कोणते हें केवळ नवीन मिळालेल्या सभासदांनाच नव्हे तर आगरकरांनाही शिकविण्यास सुरवात केली, आणि सोसायटीच्या व्यवस्थेसाठीं आगरकरांनीं दोन तीन अत्यंत महत्वाच्या गोष्टी करण्याबद्दल पुढाकार घेतला त्यांत त्यांना हाणून पाडण्याचा टिळकांनीं चंग बांधला. त्याचें वर्णन सुदैवानें टिळकांच्या शब्दांत देतां येण्यासारखें आहे व तें तसें पुढें लौकर देण्यांत येईल. त्याबरोबर टिळकांनीं आगरकरांच्या मतांवरही शिंतोडे उडविण्याचा उपक्रम केला व पूर्वीं एक दोन ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें जीं मतें त्यांचीं व आगरकरांचीं कित्येक दिवस निःसंशय होतीं त्यांतून, आगरकरांचा त्यांना सोसायटींतील कारभारासंबंधीं राग आला होता त्यामुळें आपलें आंग काढून घेऊन, तद्विरुद्ध मतांचा गौरव करण्याचा त्यांनीं निश्चय केला असें दिसतें. ज्या बालविवाह आणि संमति या प्रश्नाबद्दल हें रण

टिळक आणि आगरकर यांच्या दरम्यान् माजलें आणि ज्या रणांत टिळकांनीं, ऋतुप्राप्ति होतांच पहिल्या खेपेच्या चतुर्थ दिनीं पतीनें पत्नीला स्वकार्यमग्न केली नाहीं तर भ्रूणहत्येचें पातक त्याच्या माथ्यावर बसतें, असा शास्त्रार्थ काढला, त्या प्रश्नासंबंधीं १८८५ सालापूर्वीं केसरींत चर्चा झाली नव्हती असें नाहीं आणि १८८४ सालाच्या निदान मध्यापर्यंत तरी टिळक आणि आगरकर यांच्यांत सामाजिक बाबतींत मतभेद बिलकुल नव्हता. तो कॉलेजच्या दिवसापासून होता, असा साक्षात्कार कांहीं वृद्धांना अलीकडे झाला आहे. पण सोसायटीच्या व्यवस्थेंत परस्परांचा बेबनाव होईपर्यंत या मतभेदाची वार्ता खुद्द टिळकांनाही नव्हती, इतकेंच नव्हे तर १८९० सालीं टिळकांनीं जो राजीनामा खरडला आहे त्यांत या सामाजिक मतभेदांचा प्रामुख्यानें उल्लेख तर नाहींच नाहीं पण जो उल्लेख आहे तो अत्यंत पुसट आहे. तेव्हां टिळकांच्या वेळीं तरुण असणाऱ्यांना म्हातारपणीं जे साक्षात्कार होऊं लागले त्यांची गणना म्हातारचळांत केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. केसरीच्या अगदीं पहिल्या वर्षांत (अंक १४ आणि १९) "अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार" म्हणून लेख आला होता. त्यांतील विचार टिळकांना नापसंत असते आणि "झटपट गर्भाधाना" चा शास्त्रार्थ जर त्या वेळीं त्यांना संमत असता तर आगरकरांच्या बरोबर भांडण्याला त्यांनीं पांच सहा वर्षें वाट पाहिली नसती. या लेखांतील कित्येक वाक्यें येथें उतरून घेतों. "फार दिवसांचा काळजाला आणि बरगड्यांला भिनून गेलेला रोग ज्याप्रमाणें पुष्कळ वर्षेंपर्यंत तीक्ष्ण औषधोपचार केल्याशिवाय निघावयाचा नाहीं, त्याप्रमाणें फार दिवस चालत आलेल्या दुष्ट चालींचें जूं लोकांस सहज झुगारून देतांच येत नाहीं. बालविवाहाचा विषय पराकाष्ठेचा शिळा झाला आहे; पण त्याच्या शिळेपणाला कंटाळून उपयोग काय? शरीरांत जोंपर्यंत रोग आहे तोंपर्यंत औषध चालविलेंच पाहिजे, व त्याच्या कडूपणामुळें रोग्यास तें न घ्यावेंसें वाटलें तरी त्याच्या घशांत कोंबलें पाहिजे; त्याप्रमाणें आमच्या वाचकांना जरी हा विषय न आवडला तरी जोंपर्यंत ही बालविवाहाची दुष्ट चाल आमच्या लोकांतून समूळ निघून गेली नाहीं, तोंपर्यंत आमची ही उपदेशाची किरकीर चालावयाचीच. टाकीपासून दगड झिजविणें देखील सोपें, पण उपदेशानें लोकांचे दुराग्रह काढणें फार दुस्तर. आमच्या देशांतील मोठे शहाणे लोक, दुसऱ्यास लांब लांब उपदेश करणारे, आपल्या विद्वत्तेची ज्यांस मोठी ऐट, ज्यांच्या शहाणपणाचा तोरा केवढा,

असे शिकलेले, विद्वान् म्हणवून घेणारे लोक, प्रसंग आला कीं शेंपूट घालून मागें सरतात आणि इतर लोकांप्रमाणें वर्तन करितात, हें मोठें शोचनीय होय. यांत कोणाही व्यक्तिमात्रास उद्देशून लिहिण्याचा हेतु नाहीं. जी खरोखर स्थिति आहे ती आम्हीं प्रांजळपणें सांगत आहों[1] व या अविचाराच्या चालीनें आमचें केवढें नुकसान होत आहे हें आमच्या वाचकांपैकीं एकाच्या जरी नजरेस आलें, व ती चाल मोडून टाकण्याचा निश्चय करण्याचें मनांत आलें, तरी आमच्या लिहिण्याच्या श्रमाचें सार्थक झालें असें आम्ही समजूं......शक्तिहीन संतति, उद्योगप्रत्यवाय, शक्तिहानि वगैरे अनेक प्रकारचीं दुःखें बालविवाहामुळें आम्हांस भोगावीं लागत आहेत"........."कोणी आडपता दडपता नसला म्हणजे मूर्ख लोकांच्या खुळेपणाचें पीक चांगलें समजतें (पिकतें ?). नाहाण आल्याशिवाय मुलींचीं लग्नें करूं नयेत असा अकबर बादशहानें केलेला कायदा मान खालीं घालून चट साऱ्या लोकांनीं ऐकिला. पेनाच्या सपाट्यासरशीं दयावंत बेंटिकसाहेबांनीं पतिमरणान्त स्त्रीहत्या बंद केली. जर्मनी वगैरे देशांत अमुक एक वय झाल्याशिवाय लग्नेंच होऊं देत नाहींत. सारांश, आमच्या देशांत मूर्खपणाचा जो प्रसार होत चालला आहे त्याला कारण कोणी आटपता नाहीं म्हणून. वर्तमानपत्रकर्त्यांनीं कितीही रड गाइली म्हणून हट्टी व मूर्ख लोकांची कशी समजूत पडणार ? पण स्वतःची राजसत्ता नाहीं, व जें सरकार आहे तें अशा कामांत मन घालीत नाहीं. तेव्हां दादापुता करूनच लोकांचीं मनें वळविलीं पाहिजेत. ज्या कोणास चांगल्या मतांचा प्रसार करणें असेल त्यांनीं आपला सर्व राग आपल्यापाशींच गिळून टाकून लोकांचा तिरस्कार न करितां त्यांच्यापुढें त्या मतांचें नित्य प्रतिपादन केलें पाहिजे. लोकांस सोडून देऊन अरण्यांत तर रडत बसावयाचें नाहींना ? सत्ता हातीं नसल्यामुळें पुष्कळ काळ लागेल; एखादे वेळेस फार मेहनत, करूनही ती अगदीं व्यर्थ जाईल; पण याला काय उपाय ? ज्यांच्या हातांत सत्ता नाहीं पण शहाणपण आहे, आणि लोकांचें चांगलें व्हावें याबद्दल खरी कळकळ आहे, त्यांनीं धिमेपणाचा अंगीकार करून

---

१ हा टोला रावसाहेब रानड्यांना तर नाहींना ? त्यांचा द्वितीय विवाह यापूर्वी सुमारें सात आठ वर्षें म्हणजे डिसेंबर १८७३ सालीं त्यांच्याहून वयानें वीस वर्षांनें लहान असलेल्या अशा बालिकेबरोबर झाला होता.

हातून होईल तितकी खटपट करावी. " या वाक्यांवरून वादाविवादाच्या बाबतींत शहाणपणाला सत्तेची जोड देण्याला केसरीकर्त्यांची १८८१ सालीं मुळींच हरकत नव्हती हें अगदीं सिद्ध होतें. अर्थात् सामाजिक कायदे करण्याचा १८८१ सालीं याप्रमाणें आगरकर-मुखानें किंवा केसरीद्वारा पुरस्कार करणारे टिळक पुढें बहकले का केसरीचीं " सर्वमान्य " मतें " एकांतिक " करण्याचा हट्ट आगरकरांनीं धरला या प्रश्नाचाही वरील उताऱ्यावरून निकाल लागतो. वरील उताऱ्यासारखे आणखी हवे तितके उतारे केसरीच्या पहिल्या तीन वर्षांच्या अंकांतून काढून देतां येतील. म्हातारपणीं लहानपणच्या दिवसांचे साक्षात्कार होऊं लागलेले आणि आपल्या मतलबासाठीं अशा म्हातारचळाचा फायदा घेणारे कांहींही म्हणोत, त्यांच्या साक्षात्कारांना आणि त्यांच्या म्हणण्यांना वरीलसारख्या प्रत्यक्ष पुराव्यापुढें कवडीची किंमत कोणी देणार नाहीं. टिळकांचीं पुढचीं मतें आणि पहिलीं मतें यांचा समन्वय करण्यासाठीं त्यांच्या पूर्वमतांबद्दल आख्यायिका आणि आठवणी प्रसिद्ध करण्याच्या आर्षपणानें टिळकांच्या चारित्र्यावर आपण शिंतोडे उडवतों हें समजण्याची अक्कल आयत्या बिळांत नागोबा होऊन टिळकांच्या नांवावर आपला सार्वजनिक संसार चालविणाऱ्यांना नाहीं ही गोष्ट उघड असल्यामुळें त्यांच्या खोटेपणाची अधिक चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. येथें मुद्याची गोष्ट ही आहे कीं सामाजिक मतें बदललीं म्हणून टिळकांनीं तंटे सुरू केले नाहींत तर टिळकांनीं तंटे सुरू केले व त्यामुळें आगरकरांना विरोध करावयाचा म्हणूनही त्यांना सामाजिक मतें बदलण्याला लोकप्रियतेच्या इच्छेशिवाय आणखी एक कारण मिळालें.

३. वैयक्तिक तंट्याला कशी सुरवात झाली याचें एकतर्फी कां होईना पण ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचें वर्णन टिळकांच्या राजीनाम्यांत आहे. या राजीनाम्याचें शब्दशः भाषांतर पुढें परिशिष्टांत दिलें आहे व त्या राजीनाम्यासंबंधीं सविस्तर चर्चा पुढील भागांत येईल. येथें सोसायटी निघाल्यानंतरच्या एकदोन वर्षांतील इतिहासाचा उल्लेख त्या राजीनाम्यांत झालेला आहे त्याचा विचार करावयाचा आहे. टिळकांनीं सामाजिक मतभेद हें तंट्याचें बीज असें कोठेंही म्हटलें नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें तंटा होण्याला सुरवात झाली याचें कारण " आम्ही सर्व किंवा आमच्यापैकीं बहुतेक सारख्याच शैक्षणिक योग्यतेचे असल्यामुळें आमच्यांत समतेचें तत्व आलें. " एका संस्थेंत बरोबरीनें काम करण्यांत समता उपयोगी नाहीं, विषमता पाहिजे असें टिळ-

कांना वाटत होतें व निदान संस्थेंत आलेल्या नवीन मंडळींनीं जुन्या मंडळी-पुढें नमून वागलें पाहिजे असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय होता. बरोबरीच्या मंडळीशीं न वागतां येणें हा दुर्गुण टिळकांत होता हें त्यांच्या चरित्रकारांनींही कबूल केलें आहे. टिळकांनीं निराळा संसार थाटल्यावर जी मंडळी भोंवतीं गोळा केली त्यांची उंची टिळकांच्या उंचीच्या मानानें समुद्रसपाटीहून खालीं होती ही गोष्ट टिळकचरित्रकारांनीं स्वतः पाहिलेली आणि अनुभवलेली असल्यामुळें वरील कबुली त्यांनीं येवढ्या मोकळया मनानें व निःशंकपणें दिली असावी असा तर्क होतो. असो. टिळक पुढें लिहितातः—“ पण ‘ सर्वांनीं उद्योग करावा, ( आपापसांत ) तंटा होण्याचें मुळींच कारण नाहीं ’ ही स्थिति लौकरच बदलली; व्यक्तींचे स्वभावविशेप अधिकाधिक स्पष्ट होऊं लागले; आणि ज्या मर्यादांना अनुसरून वागण्याचें आम्ही ठरविलें होतें त्यांचा आम्हांपैकीं कित्येकांना कंटाळा येऊं लागला. एकाग्रता मागें पडून निरनिराळे उद्योग व हितसंबंध यांनीं त्यांची जागा घेतली आणि त्यामुळें जेथें प्रथम ऐक्य नांदत होतें तेथें विचार आणि हेतु यांची भिन्नता उत्पन्न झाली.” “परस्परविरुद्ध वासना व हितसंबंध यामुळें आमच्यांतील प्रेम नष्ट झालें.” या एकदोन वाक्यांवरून मतभेदाची सुरवात सामाजिक वादांत न होतां टिळकांच्या बाजूनें तरी वैयक्तिक वादांत झाली हें उघड होतें. आगरकरांचीं मतें आणि केसरीचें धोरण हीं पहिल्यापासून अगदीं एक होतीं हें वर अनेकवेळां दाखविलें आहे. तेव्हां ज्यांचा लौकिक परिणाम सामाजिक प्रश्नांबद्दल वैमत्यांत झाला त्या वैयक्तिक कारणांनाच विशेप महत्व दिलें पाहिजे हें उघड आहे. सोसायटी स्थापन होतेवेळीं एक दोन नवी मंडळी आली व पुढें आणखी कांहीं मंडळी आली. या नव्या मंडळीला आपल्या बरोबरीनें वागविलें पाहिजे असें आगरकरांचें स्पष्ट मत होतें व तें पायाशुद्ध होतें याबद्दल दोन अभिप्राय पडतील असें वाटत नाहीं. आणि या बरोबरीच्या नात्याला अंतर्गत व्यवस्थेंत ज्या ज्या गोष्टी बाधक होत्या त्या नाहींतशा करावयाच्या म्हणजे पुढें आपापसांत द्वेष उत्पन्न होण्याचें कारण नाहीं असा विचार आगरकरांनीं काढला. समतेचें तत्व आगरकर नुसतें बोलून दाखविणारे नव्हते तर तें त्यांच्या आचरणांतही दिसून येई. टिळकांच्या मतें जुन्या सभासदांची योग्यता विशेप होती. ती तशी होती याबद्दल इतरांचा वाद नाहीं; पण केवळ “ जुने ” म्हणून आम्हांला ढुड्ढाचार्य समजा हा न्याय शुद्ध आचरटपणाचा व हास्यास्पद होता. टिळकांचा

पहिला कटाक्ष वामनराव आपट्यांवर होता. ते न्यू इंग्लीश स्कूलला थोडे मागाहून मिळाले. टिळकांनीं या म्हणून विनवण्या केल्या तेव्हां आले नाहींत, पण आगरकरांनीं आश्वासन देतांच आले ही गोष्ट बळवंतरावांना लागली असावी असा संशय येतो. पुढें संस्थेची भरभराट झाली त्या यशाचा पुष्कळसा वाटा साहजिकपणें वामनरावांकडे जाऊं लागला. तीही गोष्ट टिळकांना फारशी मानवली नव्हती असें दिसतें. पण आपटे कांहीं झाले तरी त्यांच्याबरोबरीचे व कॉलेजांत त्यांच्या वरचा नंबर प्रत्येक वेळीं प्रतिज्ञेनें पटकावणारे आणि त्यांच्याशिवाय केवळ माझ्या आणि चिपळूणकरांच्या हातून शाळा चालणें शक्य नव्हतें हें टिळकांनीं स्वतःच कबूल केलें. पण गोष्ट कबूल करूनही ती डाचत नसेल असें नाहीं. पुढें आणखी नवीन मंडळी आली ती वयानें चार वर्षांनीं लहान पण त्यांनाही समान हक्क दिले पाहिजेत हें आगरकरांचें म्हणणें संस्था जर सुरळीत चालावयाची असेल तर एकानें फार दादागिरी करतां उपयोगी नव्हे, सर्वांनीं मिळून मिसळून वागलें पाहिजे, कोणी कोणाला कमी लेखतां उपयोगीं नाहीं हें आगरकरांचें धोरण योग्यच होतें. टिळकांची मनोवृत्ति काय होती हें खालील उताऱ्यावरून लक्षांत येतें. "संस्थेंत आजन्म सेवक घेतेवेळीं जर अधिक खबरदारी आणि दृढता दाखविली असती, अथवा जर आमच्या संस्थेची घटना आहे त्याहून कमी उदार स्वरूपाची किंवा कमी प्रातिनिधिक स्वरूपाची असती, अथवा जर आमच्या संस्थेचीं तत्वें धर्म सिद्धांत म्हणून सांगून प्रत्येक सभासदानें तीं पाळलींच पाहिजेत किंवा संस्था सोडली पाहिजे अशी जर सक्ती केली असती, अथवा आमच्यांत जर असा एखादा पुरुष असता कीं जो आपल्या वैयक्तिक शीलाच्या जोरावर सर्वांना आदरणीय आणि कौतुकास्पद झाला असता आणि त्यामुळें ज्याचा सर्वांवर अमोघ अधिकार चालला असता तर काय झालें असतें यासंबंधीं आतां तर्क वितर्क करीत बसणें व्यर्थ आहे.*" म्हणजे संस्थेंत प्रातिनिधिक तत्व असावें हें टिळकांना मान्य नव्हतें. एखाद्या माणसाची अप्रतिहत "अमोघ" सत्ता सर्वांवर चालली पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें आणि जेव्हां त्यांना "असा एखादा पुरुष" असें मानण्याचें त्यांच्या सहकाऱ्यांनीं नाकारलें तेव्हां ते रागावले आणि या त्यांच्या रागांत फर्ग्युसन कॉलेजांतील तंट्यांचें आदिकारण भरलें

* राजीनामा, परिच्छेद ३

आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. "हम् करे सो कायदा" आणि प्रातिनिधिक तत्वाबद्दल नावड आणि "असा एखादा पुरुष" होण्याची बलवत्तर इच्छा या मनोवृत्तिसंबंधीं वाटेल त्यानें वाटेल तसा अभिप्राय द्यावा; पण टिळकांची ही मनोवृत्ति, त्यांची ही प्रवृत्ति जी हळूहळू दृगोचर होऊं लागली ती समतेचें तत्व रोमरोमीं भरलेल्या आगरकरांना पटण्यासारखी नव्हती यांत आश्चर्य नाहीं व या प्रवृत्तीचा परिणाम संस्थेवर होणार अशीं चिन्हें दिसूं लागतांच आगरकरांनीं तिला आळा घालण्याचा प्रयत्न केला आणि या प्रयत्नामुळें टिळकांच्या अंतःकरणांत जो क्षोभ उत्पन्न झाला त्यानेंच त्या ठिकाणीं आगरकरांच्याबद्दल क्रोध व द्वेप उत्पन्न केला असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. संस्थेचीं तत्वें अमुक आहेत व त्यांचा अर्थ अमकाच समजला पाहिजे ही आचार्यगिरी किंवा महंतगिरी आगरकरांच्यापुढें किंवा वामनराव आपट्यांच्यापुढें चालणें शक्य नव्हतें. त्यांनींही आपलें सारसर्वस्व संस्थेला अर्पण केलें होतें व संस्थेच्या विजयाला त्यांचा उद्योग निदान टिळकांच्या उद्योगाइतकाच कारणीभूत होता. संस्था चांगल्या प्रकारें चालावयाची असेल तर तिला "महंताची मठी" किंवा "गुरूचा आश्रम" करून चालणार नाहीं, अशानें नवी मंडळी येणार नाहींत, हें आगरकरांना जसें पटलें होतें तसें टिळकांना पटेना; कारण त्यांचे चरित्रकार म्हणतात त्याप्रमाणें "त्यांचें बरोबरीच्या माणसांबरोबर जमतच नसे." पण अशी प्रवृत्ति सहकारितेनें करावयाच्या उद्योगाला विघ्नभूत आहे हेंही कबूल करणें प्राप्त आहे.

४. या समतेच्या पोटांतून अर्थात् अनेक प्रश्न निघाले व त्या प्रत्येक प्रश्नांत टिळकांचीं वर दिलेल्या कारणांमुळें कुरकूर व दंडेली सुरू झाली. त्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "पगाराच्या बाबतींत प्रत्येकाचा पगार अगदीं बिनचूक सारखा असला पाहिजे या तत्वाची अद्याप प्राणप्रतिष्ठा झाली नव्हती. ज्याप्रमाणें ज्याला जें काम उत्तम करतां येई तें त्याकडे सोंपविलें जात असें, त्याचप्रमाणें प्रत्येकाला निर्वाहासाठीं जितकें आवश्यक लागे व बोर्डाला जेवढें देण्याची ताकद होती त्या मानानें त्याला पगार दिला जाई." ही व्यवस्था सुरवातीला कदाचित् अपरिहार्य होती; पण हळू हळू शाळेला सरकारी ग्रांट मिळाली, कॉलेज सुरू झालें, द्रव्यनिधि जमूं लागला आणि संस्थेला स्थिरता आली तेव्हां मग पगाराचें वगैरे निश्चित मान ठरविणें आवश्यक होतें आणि त्याप्रमाणें तरतूद करण्याला आगरकर लागले. पगाराच्या रकमेची शाश्वती नसल्यामुळें नडी

अडचणीच्या प्रसंगीं सभासदाला संस्थेकडून कर्जवाम मिळे किंवा देणगीही मिळे. पण ती द्या म्हणून सभासदाला तोंड वेंगाडावें लागत असे आणि मग ती कां द्यावी म्हणून चर्चा होण्याला अवसर मिळे. हा जहागीरदारी अशुद्ध कारभार आगरकरांच्या हिशेबी व शुद्ध मनाला नापसंत होता व संस्थेची स्थिति थोडीशी सुधारतांच तो काढून टाकण्याचें त्यांनीं ठरविलें. या ठिकाणीं टिळक आडवे आले; " व देणग्या द्या पण भरपूर पगार देऊं नका " अशा मताचें ते प्रतिपादन करूं लागले. प्रत्येकानें आपली खासगी अडचण चव्हाट्यावर आणावी, मग तिचा आपण तर्ककुतर्क काढून साद्यंत विचार करावा, मग खुदावंतांनीं मेहेरबान होऊन पांच पन्नास रुपयांची देणगी मंजूर करावी, हा मार्ग टिळकांना पसंत होता असें त्यांच्याच लिहिण्यावरून दिसतें. या मनोलाघवाला त्यांनीं जाड्या जाड्या तत्वांचें आवरण देऊन तें गोंडस दिसावें असा अर्थात् त्यांच्या राजीनाम्यांत प्रयत्न केलेला आहे, पण त्यामुळें हा असला कारभार अशुद्ध होता व तो बदलून तेथें चोख हिशेबीपणा आणणें आवश्यक होतें यासंबंधीं शंका उरत नाहीं. त्यांत कांहीं जुन्या सभासदांनीं " आम्ही संस्थेसाठीं अमुक केलें आहे. तमुक केलें आहे" असें म्हणून नव्या सभासदांवर आपलें श्रेष्ठत्व संस्थापित करण्याचा प्रयत्न केला. दानाचें किंवा त्यागाचें पुण्य व स्वारस्य हें जाहिरात दिल्यानें किंवा त्याचा उच्चारही केल्यानें जातें, ही गोष्ट तेव्हां टिळकांना कळली नसेल असें नाहीं. पण स्वतःच्या मोठेपणाची बाधा ही दुस्तर व्याधि आहे, ती झाली कीं सगळा विचार लटपटतो व शहाणपण मागें सरतें. ता. २० आक्टोबर १८८५ रोजीं सोसायटीनें ही देण्याघेण्याची विषमता काढून टाकण्याचा अत्यंत प्रशस्त असा ठराव केला; त्यासंबंधीं टिळक लिहितातः—" त्या वेळपर्यंत ज्याला त्याला आपापल्या नडीप्रमाणें वेतन देण्याचा नियम (?) आम्ही पाळीत होतों...... स्थूलमानानें प्रत्येकाला वेतन सारखेंच मिळे; पण ज्याला नड लागेल त्याच्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करून त्याला कांहीं देणगी द्यावी अशा प्रकारचें तत्व (?) आमची प्राप्ति बेताची असल्यामुळें घालून ठेवण्यांत आलें होतें. शिवाय ज्याप्रमाणें कित्येक सभासदांनीं शाळेच्या पहिल्या वर्षीं कांहीं घेतलें नव्हतें, त्याचप्रमाणें कित्येकांना त्या पुढील वर्षांतसुद्धां त्यांच्या विशेष नडी अडचणी लक्षांत घेऊन अधिक पैसे उचलूं दिले होते. अशा तऱ्हेची विषमता केवळ भविष्यकाळापुरतीच नव्हे तर १८८० सालापासून पूर्वींच्या हिशेबाच्या

बाबतींतही नाहींशी करावी असा आतां विचार निघाला." हा विचार टिळकांना पूर्ण अमान्य होता; कारण त्यांच्या मतें "स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे जुन्या सभासदांनीं सुरवातीच्या वर्षांत जो स्वार्थत्याग केला होता तो विकत घेण्यासाठीं हा बेत होता." सगळीं माणसें आपल्या विरुद्ध बेत करण्याच्याच एका उद्योगांत निमग्न आहेत हा भ्रम एव्हांपासून टिळकांना होऊं लागला असें दिसतें. जुन्या सभासदांनीं जर जेथें तेथें आपल्या "जुनेपणाचें" आणि स्वार्थत्यागाचें तुणतुणें वाजविण्याला सुरवात केली व नव्या सभासदांना त्या जोरावर ठपका देण्याला आरंभ केला तर त्याचें निराकरण करण्याचा एकच मार्ग म्हणजे सुरवातीपासून सर्व देण्याघेण्याची वजावाट करून प्रत्येकाला समान पातळींत आणून ठेवणें हा होता. त्याबद्दल टिळकांना एवढा राग कां आला याचें आज आश्चर्य वाटतें. पण "माझें ऐका नाहींतर मी तुम्हांला शत्रु समजणार" ही वृत्ति उद्भूत झाली म्हणजे रास्त गोष्टीही गैरशिस्त वाटूं लागतात. या अशा परिस्थितींत मलबारीशेटनें संमतिवयाची भानगड काढली आणि वैयक्तिक कारणामुळें सुरू झालेल्या धुसफूसीला हें सार्वजनिक स्वरूपाचें खाद्य मिळालें. चांगल्या खणखणीत तंट्याला कांहींतरी कारण हवें होतें तें टिळकांना त्यामुळें मिळालें व त्याचा उपयोग त्यांनीं आगरकरांना केसरींतून काढून लावण्यांत केला व त्याबरोबर स्वतःचीं मतें बदलून ते लौकिक मतांचे पुरस्कर्ते बनले.

५. १८८४ सालच्या शेवटीं शेवटीं हें बालविवाह प्रकरण केसरीच्या संपादक मंडळींत वैमत्य उपस्थित करणार असें स्पष्ट दिसूं लागलें व डिसेंबर १६ च्या अंकांत आगरकरांनीं स्वतः सही घालून केसरींत या विषयावर लेख लिहिला. यावरून मुख्य संपादक या नात्यानें आगरकरांची कुचंबणा होऊं लागली होती हें उघड होतें. १८८५ सालभर आगरकरांच्या मतांना वेसण घालण्याचा टिळकांनीं शक्य तितका प्रयत्न केला व आपली पगडी फिरली तशीच आगरकरांची फिरवावी म्हणून जंग जंग पछाडले. मंडळींत फूट पडावी, संस्थेचें कांहीं झालें तरी आपल्या म्हणण्याचा वर्चष्मा असावा, इतका पल्ला अगदीं निर्वाणीचा वेळ आल्याशिवाय पोहोंचण्याला अंतःकरणाचा तो बेसुमार कठीणपणा व अहंमन्यता लागतात तीं आगरकरांच्यांत नव्हतीं. टिळक चळले तरी कायमचे चळतील, विचारानें अंगीकृत केलेलीं तत्वें ते केवळ लोकगंगेच्या पंडेगिरीसाठीं टाकून देतील हें त्यांच्या निर्मळ व स्निग्ध मनाला पटण्याला बराच काळ जावा

लागला. तूर्त भांडण विकोपाला न जावें म्हणून त्यांनीं कांहीं दिवस सामाजिक विषयांकडे आपली लेखणी वळविली नाहीं. राजकीय, औद्योगिक वगैरे विषयांपलीकडे कांहीं दिवस ते जाणून बुजून गेले नाहींत. पण त्यांनीं शांतपणा अंगीकारला म्हणून टिळक थोडेच स्वस्थ बसणार होते. " पारतंत्र्यामुळें आमच्या लोकांची स्थितिच अशी झाली आहे कीं राजकीय बाबतींत सुधारणा झाल्याखेरीज आमची सामाजिक स्थिति सुधारावयाचीच नाहीं, " अशा तऱ्हेचीं टिळकांचीं नवीन अवतारचिन्हें केसरींत फडकूं लागलीं. सुरवातीला डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील कांहीं मंडळींना टिळकांची बाजू सांवरून धरण्याचा मोह झाला. पुढें भांडणें निकरावर येऊं लागलीं व टिकळांच्या वादातील वांकडेपणा त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षांत जसजसा अधिक येऊं लागला तसतशीं त्यांचीं मनें विटलीं व आगरकरांच्या पक्षाला ते मिळूं लागले. १८८५ सालीं डिसेंबर महिन्यांत राष्ट्रीय सभेची पहिली बैठक मुंबईस झाली. या सभेची कल्पना रावसाहेब रानड्यांच्या डोक्यांत गुप्तपणें उत्पन्न होऊन ती जाहीरपणें ह्यूमसाहेबांच्या डोक्यांतून बाहेर पडली. रानडे या पहिल्या सभेला हजर होते. रानड्यांच्या विचारसरणीबरोबर कोणाचा कांहींही मतभेद असला तरी निव्वळ राजकीय सुधारणेचें थोतांड उभें करून सामाजिक सुधारणेला आंगाबाहेर टाकण्याच्या विचित्र पंथाचा त्यांनीं केव्हांही पुरस्कार केला नाहीं. किंबहुना देशाची सर्व बाजूंनीं सुधारणा झाली पाहिजे या अत्यंत विवेकयुक्त तत्वाचा प्रसार करण्याचें पुष्कळसें श्रेय त्यांना देणें रास्त आहे. राष्ट्रीय सभेच्या अवतारांत त्यांचें प्रमुख अंग होतें व राष्ट्रीय सभेंत राजकीय व सामाजिक अशा सर्व प्रश्नांचा ऊहापोह करावयाचा असा ती सभा मुंबईला सुरू करणाऱ्यांचा संकल्प होता यांत शंका नाहीं. पण पहिल्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष बाबू रमेशचंद्र बानर्जी यांचें मत राष्ट्रीय सभेंत सामाजिक प्रश्न आणण्याच्या विरुद्ध पडलें आणि पुढें निरनिराळ्या धर्मांचीं माणसें जेथें एकत्र यावयाचीं अशा संस्थेंत सामान्यपणें हिंदु जातीला लागू अशा सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याचें काम मागें पडलें आणि म्हणूनच रावसाहेब रानडे यांनीं पुढें सामाजिक परिषद् उभी केली. असो. संमतिवयाची मर्यादा कायद्यानें वाढवावी अशी मलबारीशेटची सूचना होती तिला रावसाहेब रानडे हे अनुकूल होते. पण सुरवातीला केवळ तात्विक दृष्ट्या, म्हणजे सामाजिक बाबतींत परधर्मीय सरकारनें हात घालूं नये या सबबीवर काशीनाथ त्रिंबक

तेलंग हे कायदा करण्याच्या विरुद्ध होते. सरकारनें कायदा करावा का न करावा हा तत्वाचा प्रश्न होता व त्यासंबंधीं मतभेद होणें साहजिक होतें व या बाबतींत टिळकांनीं स्वीकारलेलें धोरण केवळ तत्वासाठीं होतें असें सिद्ध करण्याचे प्रयत्न आजपर्यंत पुष्कळ झाले आहेत. कायद्याला विरुद्ध असणारी मंडळी बालविवाहाला विरुद्ध असती तर वरील सोंग खपलें असतें. सार्वजनिक कार्यांत सहसा न पडणारे व घड्याळाबरहुकूम वागणारे म्हणून ज्यांची लोकांत प्रसिद्धी आहे, ते विश्वनाथ नारायण मंडलीक कायदा करण्याच्याविरुद्ध असणाऱ्या मंडळींचे या धामधुमींत म्होरक्ये बनले. मंडलीकांच्या हाताखालीं वकीलीची दीक्षा घेऊन त्यांच्याप्रमाणें लक्ष्मीला प्रसन्न करून घ्यावी ही इच्छा टिळकांच्या मनांत सुरवातीला होती व त्यांचे मित्र दाजी आबाजी खरे यांनीं ती स्वतःपुरती अमलांत आणली होती. तेव्हां जरी मंडलिकांना मतें म्हणून होतीं असें दिसत नाहीं तरी जर एखाद्या मताची त्यांनीं तळी उचलली तर त्याचा उदो उदो करण्याला त्यांच्या साहाय्यानें वकीलींत विजय मिळविण्याला उत्सुक असलेलीं पुष्कळ माणसें त्यांच्यामागें उभीं राहणें साहजिक होतें. टिळकांवर मंडलिकांचें लक्ष्य पहिल्यापासून होतें व संमतिवयाच्या वादांत लोकगंगेच्या ओघाबरोबर आपल्या सार्वजनिक आयुष्याची नाव हाकारण्याचा सल्ला या प्रसंगीं मंडलीकांच्या पिकलेल्या डोक्यांतून मिळालेला असावा व त्याला दाजी आबाजी खरे यांच्यासारख्या मित्रांचें प्रोत्साहन मिळून टिळकांनीं आगरकरांना मित्रत्वाची रजा देण्याचें निश्चित केलें असावें असें अनुमान काढतां येतें.

कायद्याला विरोध या तात्विक स्वरूपांत संमतिवयाचा वाद होता तेथपर्यंत काशीनाथपंत तेलंग हे मंडलीकांच्या बाजूला होते ही गोष्ट लक्ष्यांत घेतली म्हणजे त्या वेळेपर्यंत टिळकांची आशा आगरकरांनीं कां सोडली नव्हती हें समजतें. टिळक जरी कायद्याच्या विरुद्ध असले तरी बालविवाह त्यांना संमत नाहीं आणि म्हणून बालविवाहाच्या पक्षाला ते पाठिंबा देणार नाहींत असें त्यांना वाटत होतें आणि म्हणूनच केसरी ऑफिसांत त्यांची रोज जाचणूक चालली असतां मोठ्या धिम्मेपणानें त्यांनीं आपण होऊन टिळकांबरोबर तंटा केला नाहीं. पुढें लौकरच मुंबईत माधवबागेंत कायदा करणाऱ्यांविरुद्ध अर्ज सरकारला पाठविण्यासाठीं मोठी सभा झाली त्यांत ही चळवळ "कायदा नसावा" या तत्वासाठीं आहे का बालविवाहासारखी सनातन चाल आपण कायम ठेवणार यासाठीं आहे या प्रश्नाचा निकाल लागला व तत्वरूपी सिंहाचें

कातडें पांघरून आपण तत्वसिंह म्हणून मिरवूं लागलेल्या प्राण्यांचें खरें स्वरूप बाहेर पडलें. या सभेला तेलंग हजर होते. त्यांनीं मूळ ठरावाला अशी उपसूचना आणिली कीं "बालविवाह व असंमत वैधव्य यासंबंधानें कायदा करण्याचा सरकारचा जो हेतु त्याविरुद्ध हिंदुस्थानसरकारकडे अर्ज पाठवावा पण त्या अर्जांत असें लिहावें कीं बालविवाह व असंमत वैधव्य या दोहोंपासून होणारे वाईट परिणाम आम्हांस पूर्णपणें ठाऊक आहेत; पण ते आमचे आम्हीच सुधारले पाहिजेत; सरकारनें त्यांत हात घातल्यास उलट नुकसान होईल." सरकारनें सामाजिक बाबतींत हात घालूं नये या तत्वासाठीं आम्ही भांडतों, एरवीं आम्हांला बालविवाह नको आहे, म्हणून गप्पा मारणाऱ्यांची या उपसूचनेमुळें धांदल उडाली. पुण्यांत टिळक आणि सोसायटींतील कांहीं मंडळी यांनीं या सभेच्या अध्यक्षांना म्हणजे मंडलिकांना सहानुभूतीपर पत्र पाठविलें होतें. आगरकरांना सभेचा हेतुच मान्य नव्हता. पण सभेंत तेलंगांची उपसूचना बहुमतानें नामंजूर झाली. सत्तेचाळीस लोकांनीं तिच्यातर्फे मत दिलें. त्यांत तेलंगांखेरीज, नारायणराव चंदावरकर, गोपाळराव हरि देशमुख (लोकहितवादी), गोकुळदास पारख, वामनराव मोडक वगैरेचीं नांवें आढळतात. ही उपसूचना ज्यांना नापसंत होती त्यांना बालविवाह संमत होता, ते सामाजिक सुधारणा करण्याला विरुद्ध होते, हें साहजिक सिद्ध झालें. अर्थात् टिळकांचें म्हणणें कीं, आम्ही तत्वासाठीं भांडतों, हें केवळ ढोंग होतें असें म्हणणें क्रमप्राप्त झालें. कारण केसरींत या बाबतींत जो अग्रलेख आला तो तेलंगांच्या उपसूचनेविरुद्ध होता.

मंडलिकांच्या पुरस्काराखालीं टिळक व दाजी आबाजी खरे हे जाणून बुजून सामाजिक सुधारणेच्या शत्रूंच्या गोटांत सामील झाले व टिळकांनीं आपल्या यापूर्वींच्या मतांचा त्याग करून जाहीरपणें "यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नोकरणीयं नाचरणीयम्" या नेभळट, आचरट, खुळसट, दांभिक आणि राष्ट्रघातकी तत्वाचा स्वीकार केला. आणि अर्थात् केसरींत प्रसिद्ध होणारे विचार तसे दांभिक यावेत म्हणून त्यांची खटपट सुरू झाली. सोसायटींतील बरीच मंडळी या वादांत टिळकांच्या पक्षाला होती. माधवराव नामजोशी हे तर टिळकांचे हस्तकच होते. पाटणकर, गोळे, धारप, व केळकर हे या वेळीं तरी टिळकांची तळी उचलून होते. वामनराव आपट्यांना रानड्यांच्याबद्दल आदर नव्हता यामुळें असो किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें असे

ते या वादांत रानड्यांच्यावर तुटून पडत होते. अशा प्रकारें आगरकरांच्यावर हा मोठा बिकट प्रसंग गुदरला यांत शंका नाहीं. आपलीं मतें खरीं आहेत हा त्यांचा दृढ विश्वास होता व केवळ बहुसंख्येच्या प्रेमामुळें किंवा जुलुमामुळें मतांतर करण्याइतकें ते लेचेपेचे नव्हते. या वेळीं सोसायटीच्या मंडळींत या प्रश्नासंबंधांत धडाक्याचे वाद होत व वादाचे परिणाम पुढें वैयक्तिक वैमनस्यांत होतील अशी भीति वाटूं लागली. टिळकांची भिस्त बहुमतावर विशेष. मरणाच्यापूर्वीं किर्लोस्कर नाटकगृहांत तोंडावर अंड्यांचा वर्षाव झाला त्या वेळीं पुष्कळांचें मत म्हणजे योग्य मत हें आपण पुरस्कारिलेलें मत चुकीचें ही गोष्ट तेव्हां "लोकमान्य" पदवीनें प्रसिद्ध झालेल्या टिळकांना पटली असें म्हणतात. पण आम्ही लिहितों त्या काळीं पांढऱ्यापेशा व विशेषेंकरून ब्राह्मण जातींतील पुरुषांखेरीज इतरांना तोंड फारसें फुटलें नव्हतें; त्यामुळें पुढें पंचवीस तीस वर्षांनीं लोकगंगेंतील चिखलाचे गोळे येऊन आपल्या तोंडावर पडतील ही कल्पना त्या वेळीं टिळकांना येणें शक्य नव्हतें. पण सोसायटींत आपल्या बाजूला बहुमत असतांनासुद्धां हा आगरकर आपल्या मागून येत नाहीं हें पाहून टिळकांनीं आगरकरांच्या मतांना जमीनदोस्त करण्याचें ठरविलें व त्याला उत्तम उपाय म्हणजे केसरी पत्रांत त्यांची मुस्कटदाबी करण्याचा त्यांनीं निश्चय केला. या आपापसांतील तंट्यामुळें कॉलेजच्या वगैरे कामाला व्यत्यय येऊं नये म्हणून आगरकरांनीं ही मुस्कटदाबी सोसली. ज्या केसरी पत्रांतून आगरकर व टिळक यांनीं मिळून समाजसुधारणेचा डांगोरा पिटला त्याच केसरींत समाजसुधारणेच्या वैऱ्यांचा डांगोरा पिटूं लागला. समाजांत समाजसुधारणेचे वैरी हे केव्हांही अधिक असणारच. तेव्हां केसरीच्या गर्जनेनें आपणांस भिण्याचें कारण नाहीं अशी समाजकंटकांची खात्री होतांच केसरीच्या या नवीन होऊं घातलेल्या अवताराचें त्यांना कौतुक वाटूं लागलें व या अवताराला कारणीभूत जे टिळक यांचा त्यांजकडून गौरव होऊं लागला. आणि लोकप्रियतेच्या वारुणीनें बेफाम झाल्यामुळें आपण काय करीत होतों व काय करीत आहों हा विचार सुटून लोकगंगेला मिळणाऱ्या निसरड्या मार्गानें टिळक अधिकाधिक घसरूं लागले.

६. आपल्या स्नेहीमंडळीची भीड राखावी तर एक तर हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार जन्मभर खावा, आणि आपलीं खरीं मतें लपवावीं किंवा जीं मतें आपल्याला स्पष्ट अग्राह्य वाटतात त्यांचा स्वीकार करावा अशी स्थिति आगरकरांना दिसूं लागली. आपल्या आयुष्यांत आपण कांहीं तरी सत्कार्य करणार

ही भावना ज्याच्या अंतःकरणांत रात्रंदिवस तळपत होती त्या पुरुषाला केवळ स्नेह्याच्या भिडेखातर आपलीं मतें दाबून ठेवावींत किंवा लोकांच्या शाबासकी-साठीं जीं मतें अमान्य आहेत तीं मान्य असल्याचा बहाणा करावा हें पसंत पडलें नाहीं यांत नवल नाहीं. या वृत्तीला "एकांतिक" हें विशेषण देऊन तिची अवहेलना करण्याचा प्रयत्न कांहीं अर्धवट आणि आचरट लेखकांनीं केलेला आहे. अंतःकरणाला पटलेलें सत्य प्राणांतींही सोडावयाचें नाहीं या सत्वस्थ वृत्तीची कल्पना जन्मभर भाडोत्रीपणानें दुसऱ्यावर चवऱ्या ढाळण्याचें काम कर-णाऱ्याला येत नसतें. मनस्वितेला आणि सत्यप्रियतेला व तत्वनिष्ठेला एकांतिक म्हणावयाचें तर जगांतील झाडून सारीं मोठीं माणसें "एकांतिक" मताच्याच दावणींत बांधावीं लागतील; लुंगीं सुंगीं अशक्त माणसें कायतीं एकांतिक होणार नाहींत. कारण प्रसंग पडल्यास अवघ्या जगाविरुद्ध छातीठोकपणानें "एकटे" उभें राहण्याची धमकच त्यांच्यांत नसते. टिळक उभे होते तोंपर्यंत त्यांच्या नांवानें नाचावें; पुढें गांधी उभे झाले तेव्हां टिळकांना विसरून गांधीचें पांढरें धडुतें आपल्या विशाळ उदराला गुंडाळून लोकक्षोभाचें भय दूर करावें; आणि सरकारनें गांधीना तुरुंग दाखविल्यावर गांधींचीं तत्वें हाणून पाडण्यासाठीं इकडचे तिकडचे चार अलबते गलबते गोळा करून नवीन पक्ष स्थापन कर-ण्याचा आव आणावा आणि मग आपणांला धुरीण म्हणून कोणी विचारित नाहीं हें पाहिल्यावर एखाद्या मद्रासी अय्याच्या किंवा बनारसी पंडिताच्या पुच्छांत शिरून त्यांच्या जिवावर आपला पुढारीपणा चालवून गुरगुरत राहावें हा ज्यांचा सार्वजनिक संसार अशा अर्धवट माणसांना घोर व्रतें घेऊन आणि प्रतिज्ञा करून त्यांच्या पालनार्थ सर्वस्वाची—स्वार्थाची आणि लौकिकाची—आहुति देणाऱ्या आगरकरासारख्या आधुनिक भीष्माचार्यांच्या वृत्तीचें रहस्य कळूं नये यांत कांहींच आश्चर्य नाहीं. असो. भित्रट माणसांना शूर माणसें नेहमींच "एकांतिक" वाटतात. मागील भाषांतरांत वर्णन केल्याप्रमाणें आगरकरां-च्यापुढें या वेळीं मोठा बिकट प्रश्न होता. ज्यांच्या साह्यानें दोन उद्योग उभे केले त्यांच्याशीं कांहीं कार्यांत कां होईना ताटातूट करून घेणें ही गोष्ट त्यांच्या प्रेमळ अंतःकरणाला सोपी वाटली नाहीं. टिळकांच्यांत झालेला पालट हा क्षणिक आहे का कायमचा आहे याची त्यांनीं जवळ जवळ तीन वर्षें वाट पाहिली. अनेक प्रश्नांचा त्यांनीं व टिळकांनीं मिळून विचार केला होता व त्या विचारांत एक मत झाल्यामुळें सार्वजनिक आयुष्याच्या महासागरांत त्यांनीं

सोबतीनें उडी ठोकली. "मिल्ल स्पेन्सरला दोष देण्याची पात्रता तुमच्या आंगीं नाहीं" म्हणून रानड्यांना सांगणारे टिळक, खुळचट धर्मकल्पना आणि आत्मघातकी रूढि यांचे पुरस्कर्ते होतील, ही कल्पना आगरकरांच्या अंतःकरणावर पुरी बिंबण्याला तीन वर्षे लागलीं यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. त्या दोघांनीं मिळून संस्थांची उभारणी केली होती, शत्रूशीं टक्कर दिली होती, अडचणीचे डोंगर ओलांडले होते. त्यांच्या परस्पर स्नेहाचा रज्जू एखाद्या दुसऱ्या हिसड्यानें तुटण्यासारखा हलका नव्हता. टिळकांखेरीज सोसायटींतील इतर माणसांची आगरकरांना पर्वा करण्याचें कारण नव्हतें. त्यांपैकीं कोणीही सामाजिक प्रश्नांचा खोलवर विचार केलेला नव्हता. साधारणपणें चार लोकांना बरें वाटतें तें बरें म्हणण्याची प्रवृत्ति सर्वांची असते तशीच त्यांची होती, आणि त्यांपैकीं विशेष विद्वान् व हुषार माणसें हीं सोसायटींत पुनः आगरकरांच्याच बाजूला येऊन मिळालीं व टिळकांना सोसायटी सोडून लावण्याला कारणीभूत झालीं. तात्त्विक व सामाजिक बाबतींत तर्क जाईल तितकी मतांची धाव नेण्याचें धारिष्ट आगरकरांसारख्या एखाद्याच अद्वितीय म्हणजे "एकांतिक" पुरुषांत असतें. त्याच्या विचारगतीचा वेग सोसायटींतील सभासदांना झेपला नाहीं तर त्यांत नवल करण्यासारखें कांहीं नव्हतें. आपटे आणि केळकर आपापल्या विषयांत प्रवीण होते पण ते दुसऱ्या प्रपंचांत पडत नसत. त्यामुळें कोणत्याही दुसऱ्या विषयांवर विशेष विचारपूर्वक मतें बनविण्याला त्यांना वेळ नव्हता व फारसें कारण नव्हतें. तेव्हां त्यांना कांहीं वेळ टिळकांचें बहुजनसमाजाला अनुसरणारें धोरण पसंत पडलें. टिळकांचें मात्र तसें नव्हतें. तात्त्विक विचारांत आगरकरांच्या बरोबर उंच उंच भराऱ्या मारूनच त्या परस्परांचा स्नेह जमला. तेव्हां हिमालयाचीं शिखरें चढण्याला समर्थ असलेला आपला मित्र प्रतिष्ठेच्या नादाला लागून समुद्रसपाटीला कायमची वस्ती करून राहणार हें वाटून आगरकर चकित झाले. डेक्कन कॉलेजच्या शेवटच्या वर्षांत आपण काय चर्चा केल्या, कोणतीं तत्त्वें ग्राह्य म्हणून ठरविलीं, कोणता मार्ग आखला आणि आतां कोणत्या रस्त्यानें आपला मित्र जाणार हा सर्व प्रकार पाहून त्यांना उद्वेग झाला. पण त्या उद्वेगाच्या भरांत आपल्यापुढचें कर्तव्य काय हें ते विसरले नाहींत. केसरी त्यांनीं लहानाचा मोठा केला होता. केसरीच्या द्वारें मराठी भाषेच्या मुखावर त्यांनीं बाळसें चढविलें होतें. केसरीच्या गर्जना म्हणजे त्यांच्या धीरोदात्त अंतःकरणाचा निनाद होता. पण त्या केसरीचीं नखें

आणि दांत काढून टाकून त्याला लोकांना जें जें मान्य त्याचें स्तुतिस्तोत्र गाणारा भाट बनविणें हें तर त्यांना पसंत नव्हतेंच; पण त्याशिवाय जीं मतें आपण प्रतिपादन करीत आलों, जीं मतें आपल्याला प्रतिपादन करावींशीं वाटतात, त्यांच्या प्रसारांत खरें लोकशिक्षण आहे आणि त्यांना अनुसरून सामाजिक आचरण होण्यांत खरें लोकहित आहे याबद्दल त्यांची बालंबाल खात्री होती. त्या मतांमुळें त्यांना स्वार्थ साधावयाचा नव्हता. त्या मतांचें प्रतिपादन करून त्यांना जाडी नोकरी मिळवावयाची नव्हती, एखाद्या प्रचंड कायदेपंडिताची कृपा संपादन करून त्याचें "प्रॅक्टीस" त्यांना मिळवावयाचें नव्हतें, किंवा एखाद्या सभेंत जाऊन टाळयांच्या कडकडाटानें त्यांना आपले कान तृप्त करून घ्यावयाचे नव्हते. राष्ट्रसेवेच्या दुर्धर योगांत स्वार्थ आणि प्रतिष्ठा आणि लौकिक इत्यादि ऋद्धिसिद्धींच्या तडाक्यांत सांपडावयाचें नाहीं हा त्यांचा केव्हांच निश्चय झाला होता. आपल्या जिवाचा जिवलग दोस्त लोकप्रियतेच्या ऋद्धिसिद्धीला बळी पडून आपण अंगीकारिलेल्या योगापासून भ्रष्ट झाला याबद्दल जरी त्यांना उद्वेग झाला तरी त्याच्या प्रेमासाठीं आपण स्वतः योगभ्रष्ट होण्याला ते तयार नव्हते. केसरींत केवळ बालविवाहाच्या संबंधींच सुधारणाद्वेषी लेख येऊं लागले असें नाहीं. प्रत्येक प्रश्नांत केसरीचें धोरण बदलूं लागलें व तत्वप्रतिपादनापेक्षां बहुजनसमाजाला अप्रिय असलेल्या रानडे भांडारकर वगैरे मंडळीवर वेळीं अवेळीं शिव्यांचा भडिमार होऊं लागला; आणि अशा प्रकारें केसरी शास्त्रीबुवांच्या वळणावर जाऊं लागला. आपल्या मतांचें प्रकाशन होण्याला केसरींत जागा मिळावी म्हणून आगरकरांनीं खटपट केली. फूट पडूं नये म्हणून पुष्कळ अपमान सोसले. परंतु आपल्याला अगदीं अमान्य अशा तत्वांचा पुरस्कार केसरीच्या संपादकीय रकान्यांत होऊं लागला व त्या प्रकाराला आळा बसणें शक्य नाहीं हें पाहून आगरकरांनीं मोठ्या कष्टानें पण निरुपाय म्हणून केसरी पत्राचें संपादकत्व सोडलें व ता. २५ आक्टोबर १८८७ च्या अंकापासून केसरीचे संपादक टिळक झाले. हाच परिणाम घडून यावा अशी टिळकांची इच्छा व खटपट होती याबद्दल शंका दिसत नाहीं व आगरकरांना केसरींतून काढलें म्हणून टिळकांची पाठ थोपटण्याचा त्यांच्या कांहीं पुजाऱ्यांनीं प्रयत्न केला आहे त्यावरून त्यांच्या तत्कालीन "गणां"नाही ही गोष्ट मानवली होती याबद्दल शंका उरत नाहीं. आगरकरांच्या लेखणीमुळें केसरीला सामर्थ्य आलें ही गोष्ट टिळकांनींही खुल्या दिलानें जाहीर केलेली आहे हें प्रसिद्धच आहे.

आगरकर केसरी सोडून जाण्यापूर्वीं कांहीं दिवस सोसायटी व वर्तमानपत्रें यांची फारखत करण्यांत आली होती आणि म्हणून या प्रसंगाला कारणीभूत झालेले तंटे सोसायटीच्या सामान्य व्यवहाराला कांहीं वेळ तरी बाधले नाहींत. केसरी व मराठा हीं दोनीही पत्रें टिळकांच्या मालकीचीं झालीं. हीं दोन्ही पत्रें आगरकरांना काबीज करितां आलीं असतीं असें कित्येकांचें म्हणणें आहे व तीं तशीं त्यांनीं काबीज केलीं नाहींत म्हणून आगरकरांच्यावर त्यांनीं व्यवहारज्ञान नसल्याचा आरोप केला आहे. आगरकरांनीं केसरी सोडण्याच्यापूर्वीं सोसायटीनें केसरीला कर्ज द्यावें अशा तऱ्हेची टिळकांची खटपट होती. परंतु वर्तमानपत्रांशीं सोसायटीचा संबंध तुटल्यावर त्यांच्याबाबद पैसे खर्च करण्याच्या भानगडींत तिनें पडूं नये असें आगरकरांचें स्पष्ट मत असल्यामुळें व तें मत त्यांच्या इतर सहकाऱ्यांना पटल्यामुळें ती खटपट फुकट गेली. केसरी व मराठा पत्रें अंगावर घेणें म्हणजे पैशाची फार मोठी जबाबदारी अंगावर घ्यावी लागली असती. आगरकर स्वतः वाटेल तेवढी झीज सोसण्यास तयार होते, पण कर्जाचा बोजा अंगावर घेण्याला त्यांची प्रकृतीच विरुद्ध होती. त्याबद्दल त्यांना व्यवहारशून्य ज्यांना म्हणावयाचें असेल ते म्हणोत. परंतु कर्ज म्हणजे मोठें भय आहे असें आगरकरांना वाटत होतें. आजकालच्या व्यवहारांत कर्ज काढणें व मग तें फेडण्याची तसदी पडूं नये म्हणून दिवाळें वाजविणें, सार्वजनिक कामासाठीं म्हणून फंड उभा करणें व तो वैयक्तिक खर्चासाठीं गिळंकृत करणें या गोष्टी इतक्या सर्रास चाललेल्या आहेत कीं पैशाच्या व्यवहारासंबंधीं ही त्रेतायुगांतील आगरकरांचीं मतें कित्येकांना व्यवहारज्ञानशून्यतेचीं द्योतक वाटल्यास त्यांत नवल नाहीं. पैशाचा बोजा असलेलें वर्तमानपत्र केवळ आपला हट्ट चालविण्यासाठीं घ्यावयाचें आणि मग पैशाच्या बोजाखालीं आपण चिरडून जाऊन तें वर्तमानपत्र बंद व्हावयाचें असल्या फंदांत आगरकर पडले नाहींत यांतच त्यांचें व्यवहारज्ञान दिसून येतें.

७. केसरींतून निघण्यापूर्वीं चाललेल्या तंट्यांत सोसायटींतील बरीच मंडळी संमतिवयासंबंधीं प्रश्नांत टिळकांच्या बाजूला झाली होती हें वर आलेंच आहे. पण या वादविवादांत फर्ग्युसन कॉलेज निघाल्यावर सोसायटीला येऊन मिळालेले गोपाळराव गोखले मात्र आगरकरांच्या बाजूला झाले. गोखल्यांना सोसायटींत आपण आणले असें टिळक नेहमीं म्हणत व तें कांहींसें खरें होतें. सुरवातीला गोखलेही टिळकांच्या बाजूनें असत. पण परिचय जसा वाढला

व दोघांच्याही स्वभावाची जशी त्यांना अधिक पारख झाली तसे गोखले टिळकांच्या बाजूला सोडून आगरकरांकडे वळले व त्यांच्या मृत्यूपर्यंत ते त्यांचा उजवा हात होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. गोखले आणि रावसाहेब रानडे यांचा जो जिव्हाळ्याचा संबंध घडून आला तोही त्यांचें आणि टिळकांचें रहस्य कायम राखण्याच्या बाबतींत पुढें मागें आडवा आलाच असता; पण त्यापूर्वीं गोखले हे आगरकरांचे साहाय्यक झाले या गोष्टीमुळें टिळकांना जी त्यांची चिरड आली ती दीर्घ काळ टिकली. केसरीचा संबंध तुटला तरी आगरकरांची लेखणी विराम पावेल अशी टिळकांना खात्री नव्हती आणि आगरकरांनीं नवीन वर्तमानपत्र काढल्यास आपल्यावर—आपल्या पक्षावर–मोठा प्रसंग गुदरेल असें भय त्यांना वाटत होतें. लिहून आलेला मजकूर या सदराखालीं आगरकरांचे लेख छापण्याला टिळक तयार होते असें त्यांचे चरित्रकार म्हणतात. आम्हांला मिळालेल्या माहितीप्रमाणें अशी टिळकांची तयारी मुळींच नव्हती. आगरकरांनीं नवीन वर्तमानपत्र काढूं नये अशी त्यांची इच्छा होती व त्याबद्दल त्यांना दोष देण्याचें कारण नाहीं. केसरीची बहुतेक सर्व योग्यता आगरकरांच्या लेखणीमुळें उत्पन्न झालेली होती व ती लेखणी प्रतिस्पर्धी म्हणून चालू झाल्यास केसरीला कठीण जाईल हें ते ओळखून होते. पण त्याशिवाय आगरकरांचें केसरींतून एवढ्या खटपटीनें उच्चाटण केलें त्याचें कारण आगरकरांची "एकांतिक" म्हणजे स्वतंत्र बाण्याचीं व कोणालाही न जुमानणारीं मतें बाहेर पडूं नयेत म्हणून. नवीन पत्र निघालें कीं त्या मतांना तोंड फुटणार व आगरकर वादाच्या रणांगणांत उतरले कीं त्यांच्या बुद्धिवादाच्या गोलंदाजीपुढें मोडक्या तुटक्या शास्त्रांचे आणि आचरट रूढींचे फुटके तट क्षणभरही टिकणार नाहींत हें त्यांना माहीत होतें. तेव्हां असा सर्व बाजूंनीं विचार केल्यास आगरकरांनीं नवीन वर्तमानपत्र काढूं नये असें टिळकांना वाटावें हें साहजिक होतें. पण आगरकर "हरि हरि" करीत स्वस्थ बसणारा "जें जें होईल तें तें पहावें" या वृत्तीचा माणूस नाहीं हेंही ते समजूत होते. हा वेळपर्यंत टिळक आणि आगरकर यांचें स्नेहीमंडळ दोघांनाही सामान्य होतें. त्या सर्वांना आगरकर केसरींतून बाहेर पडले याबद्दल फार खेद झाला. पण या दोघां मित्रांचा तंटा आटोक्याबाहेर गेला आहे असें त्यावेळीं सुरवातीला तरी त्यांना वाटलें नाहीं. त्यांतील कांहीं जणांनीं समेट व्हावा म्हणून खटपट केली. समेटाची कांहीं जरी आशा असती तरी आगरकरांसारखा थोर अंतःकरणाचा पुरुष केसरींतून बाहेर पडताना. परंतु

आपल्या मताला केसरींतून प्रसिद्धि मिळणें शक्य नाहीं अशी खात्री झाल्यावरच त्यांनीं त्याचा निरोप घेतला.

त्यापुढें त्यांच्यापुढें उभा राहिलेला प्रश्न म्हणजे आपल्या विचारांचा प्रसार कसा करावयाचा? रोगट बनलेल्या स्वदेशाची स्थिति सुधारण्याला आपण म्हणतों त्या विचारांचें औषध मिळाल्याखेरीज दुसरा उपाय नाहीं अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. तेव्हां नवीन वर्तमानपत्र काढणें हाच एक उपाय होता. पण तो अंमलांत आणणें सोपें नव्हतें. आगरकर स्वतः दरिद्री. पैशासाठीं कोणाकडे याचना करावयाची हें तर त्यांच्या स्वभावाला माहीत नाहीं. त्यांचीं मतें सुधारकी म्हणून बहुजनसमाजाला अमान्य आणि त्यांवर व खुद्द त्यांच्यावर तुटून पडण्याला त्यांनींच वाढवून मोठा केलेला केसरी सर्वदा सज्ज. परिस्थिति अशी होती तरी आपलीं न्याय्य व प्रमाणशुद्ध मतें जरी लोकांना प्रथम आवडलीं नाहींत तरी आपल्या ओजस्वी लेखणीच्या करामतीला भुलून लोक तीं वाचल्याशिवाय रहावयाचे नाहींत अशी आगरकरांची खात्री होती. तेव्हां आपल्या मतांच्या प्रकाशनासाठीं निराळें पत्र काढण्याचा विचार त्यांच्या मनांत येऊं लागला व तो हळू हळू बद्धमूल होऊं लागला. या कार्यांत सोसायटींतील एक सभासद गोपाळराव गोखले यांनीं त्यांना साहाय्य करण्याचें कबूल केलें होतें. आगरकर वर्तमानपत्र काढणार ही कुजबुज सुरू होतांच प्रतिपक्षानें आपल्या मोहिमेला सुरवात केली. किती तरी लोकांनीं जाऊन आगरकरांना सांगितलें, "लोकमत तुमच्या विरुद्ध फार आहे. तुमच्या पत्राच्या दहा प्रतीसुद्धां खपतील कीं नाहीं याची शंका आहे. तुम्ही नसत्या फदांत पडूं नका." दुसरे कित्येक म्हणाले:—"हे पुण्यांतले लोक; तुम्ही त्यांच्या फार वाटेस जाऊं नका; एखादे वेळीं प्राणावरही बेतावयाची." कित्येक खरे जिव्हाळ्याचे स्नेही होते ते म्हणाले:—"आम्ही टिळकांकडे जाऊन तुमचा तंटा मिटवितों. पण एका केसरीचे दोन केसरी होणें आम्हांला बरें वाटत नाहीं. आम्हांला तुम्ही आणि टिळक सारखे आहां. तुम्ही दोघेही मोठे. तुमची तेढ एवढ्या थराला जाऊं नये." या मित्रांना आगरकरांनीं सांगितलें:—"माझीं मतें तुम्हांला माहीत आहेत. तीं लक्षांत ठेवून समेटाचा प्रयत्न करा. माझी हरकत नाहीं. हे प्रयत्न केल्यानंतर तुम्ही मला जर सांगितलें कीं नवीन पत्र काढण्याची आवश्यकता नाहीं तर मी दुसरें पत्र काढणार नाहीं. पण जर तुमची खात्री झाली कीं मला दुसरें पत्र काढल्या-

शिवाय गत्यंतर नाहीं तर मात्र माझ्या आड येऊं नका." सदर मित्रांची खटपट फुकट गेली आणि त्यांनीं "तुम्ही दुसरें पत्र काढल्याशिवाय तुमच्या विचारांना प्रसिद्धि मिळणार नाहीं" असें आगरकरांना येऊन सांगितलें. तेव्हां त्यांनीं नवें पत्र काढण्याचा निश्चय केला व त्याला नांवही लोकांत अत्यंत अप्रिय असलेला शब्द "सुधारक" हें देण्याचें ठरविलें. नांव तरी निराळें ठेवा म्हणून कित्येकांनीं त्यांना आग्रह केला. पण याच नांवाची द्वाही आपण चोहोंकडे फिरविणार असें त्यांनीं निक्षून सांगितलें. आणि अशा प्रकारें सुधारणेच्या प्रगतीचा रथ आतांपर्यंत शिळोप्याच्यावेळीं क्षणभर गप्पा मारणाऱ्या शांतप्रकृति व भित्रट अशा अर्धवटांच्या हातीं होता त्याचें सारथ्य करण्याचें कार्य या निर्भय आणि पराक्रमी वीरानें आपल्याकडे घेतलें. आगरकर "सुधारक" पत्र काढणार ही नक्की बातमी कळल्यावर सुधारणेचें तोंड वर निघणार नाहीं अशी टिळकांच्या परावर्तनानें ज्यांना आशा वाटूं लागली होती त्यांचीं धाबीं धडाडलीं व खुद्द टिळकांनाही आपलीं वादविवादाचीं शस्त्रास्त्रें घासून पुसून जय्यत ठेवण्याच्या उद्योगाला लागावें लागलें.

८. परलोकवासी प्रो. सीताराम गणेश देवधर यांनीं आगरकरांनीं निराळा सुधारक कां काढला याची हकीगत दिली आहे (मनोरंजन, आगरकर अंक, १९१६) ती अशीः—"केसरी पत्राच्या पहिल्या अमदानींत सामाजिक सुधारणेच्या पाठीराख्यांपैकीं तें एक होतें हें वर दर्शित झालेलेंच आहे. असें असून त्याचें संपादकत्व सोडून "सुधारक" पत्र काढण्याला आगरकर यांना काय कारण झालें ही कित्येकांना जिज्ञासा असेल. तेव्हां त्यासंबंधाची आगरकरांकडून मला समजलेली हकीगत येथें थोडक्यांत देणें अप्रासंगिक होणार नाहीं.

"आगरकर यांनीं केसरी पत्राकरितां आपल्या मनांत आंखलेलें धोरण त्यांना तसेंच पुढें चालवितां आलें असतें तर 'नवी विटी नवें राज्य' करण्याचा त्यांना प्रसंगच पडला नसता; परंतु केसरी मराठा पत्रांच्या चालकांपैकीं कित्येकांचा त्या पत्राच्या धोरणाची दिशा बदलण्याचा निश्चय ठरून त्यांच्या कडून "लोकांना अप्रिय होतील असे लेख तुम्ही स्वतः सहीनें पाहिजे तर प्रसिद्ध करावे, पण ते संपादकीय लेख म्हणून केसरींत येतां कामा नयेत" अशी आगरकर यांस नोटिस मिळाली. याच्या पूर्वींच न्यू इंग्लिश स्कूलची चालक मंडळी 'डेक्कन एजुकेशन सोसायटी' या नांवानें नोंदली जाऊन न्यू इंग्लिश स्कूलचें फर्ग्युसन

कॉलेजांत रूपांतर होऊं लागलें होतें. सोसायटीला पी० ई० चा वर्ग चालविण्याची मुंबई युनिव्हर्सिटीकडून परवानगी मिळाली होती, व कॉलेजच्या पुढील वर्गांकरितांही ती मिळावी म्हणून सोसायटीची खटपट चालू होती. सोसायटीचे लाईफ मेंबर व केसरी मराठा पत्रांचे चालक हे एकच असल्यामुळें त्या पत्रांच्या प्रतिगामी धोरणाचा त्या खटपटीवर प्रतिकूल परिणाम होऊं लागून ती परवानगी मिळते कीं नाहीं, अशी कांहीं वेळपर्यंत भीति उत्पन्न झाली होती व लोकमताला प्रगतिपर वळण लावण्याच्या आपल्या मनोरथाच्या मार्गांत अचानक येऊन पडलेली धोंडही दूर व्हावी, या हेतूनें 'केसरी'चें असलेलें धोरण क्रमाक्रमानें पूर्वपदावर आणण्यास आपल्याला फिरून परवानगी मिळावी म्हणून आगरकर यांनीं आपली पराकाष्टा करून पाहिली, परंतु त्या कामीं त्यांना यश आलें नाहीं. तेव्हां कॉलेजच्या पूर्ण वाढीला व्यत्यय येऊं नये म्हणून सोसायटीचा केसरी–मराठा पत्रांशीं इतउत्तर कोणताही संबंध नाहीं असें जाहीर करावें लागलें.

"या रीतीनें कॉलेजला पूर्णावस्था प्राप्त होण्याच्या मार्गांतील विघ्न कसें-बसें टळलें; परंतु लोकमत सुशिक्षित करण्याचा आपला हेतु तडीला नेण्याला काय करावें, हा प्रश्न आगरकर यांच्यापुढें अजूनही तसाच होता; तथापि

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः।

या कोटींतील आगरकर हे नसून

विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमाना
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति।

या कोटीपैकीं ते असल्यामुळें

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें।

या न्यायानें आपला उद्दिष्ट मनोरथ तडीला नेण्याची त्यांची इच्छा अधिकच उत्कट होऊन सुधारकाच्या प्राणप्रतिष्ठेंत तिचें पर्यवसान झालें.

"अशा प्रकारें आपल्या पत्राला आगरकरांसारखा प्रतिस्पर्धी उत्पन्न व्हावा हें त्यांच्या प्रतिपक्षीयांना अर्थात्च इष्ट नव्हतें, व आगरकरांनीं नवीन वर्तमानपत्र न काढतां आपल्या इष्ट हेतूच्या प्रीत्यर्थ पाहिजे तर एखादें मासिक पुस्तक सुरू करावें, अशी शिष्टाईही करून पाहण्यांत आली. पण ती साधत नाहीं असें दिसून आलें तेव्हां "तुम्ही आमचें न ऐकाल तर आम्ही तुम्हांला सळो

का पळो करावयाला लावूं !" (प्रतिपक्षीयांच्या तोंडून निघालेले शब्द:—We will make it too hot for you !") अशी धमकीही देण्यांत आली होती. पण असल्या धमकावणीनें आगरकरांसारखे गृहस्थ आपल्या कृतनिश्चयापासून थोडेच ढळणार होते ! त्यांनीं लागलीच "कोण कुणाला सळो का पळो करायला लावतो तें लवकरच दिसेल !" ( We shall soon see who makes it too hot for whom ! ) असें प्रत्युत्तर करून स्वतः मनाशीं ठरविल्याप्रमाणें 'सुधारक' पत्र सुरू करावयाचें तें केलेंच."

देवधरांनीं दिलेली हकीगत त्या वेळची परिस्थिति उत्कृष्टपणें दर्शविते. सोसायटींत आलेल्या नवीन मंडळींना प्रोफेसर ही किताबत मिळून मोठेपणा येण्यापेक्षां फर्ग्युसन कॉलेज न निघालेलें बरें असे आसुरी विचारही टिळकांच्या मनांत वावरत होते हें त्यांच्या राजीनाम्यांतील मजकुरावरून सिद्ध होतें. आगरकरांनीं स्वतःच्या सहीनें लेख लिहिले असते तर केसरीचे "लिहून आलेला मजकूर" या भागाचे रकाने कांहीं तक्रार करीत नव्हते ही गोष्ट अजीबात खोटी आहे. आगरकरांची केसरींत तर सपशेल मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न झालाच पण त्यांची लेखणी बिलकुल चालूं नये याबद्दल सर्व प्रकारचे उपाय करून पहाण्यालाही त्यांच्या जिवलग प्रतिपक्षीयांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. आगरकरांसारख्या दरिद्री व असहाय माणसाला चिरडून टाकण्याला काय वेळ लागणार अशा तऱ्हेची गुर्मी त्यांच्या प्रतिपक्षीयांच्या मनांत होती असें स्पष्ट दिसतें. तेव्हां सुधारकाचा अवतार होणार हें ऐकून त्यांना मनस्वी चिरड आली आणि त्यांची गाळण उडाली यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं.

९. सुधारकाचा अवतार १८८८ सालीं दसऱ्याच्या मुहूर्तानें झाला. म्हणजे केसरी पत्र सोडल्यानंतर एका वर्षानंतर आगरकरांनीं आपलें नवीन पत्र सुरू केलें. हा वर्षाचा काळ दरम्यान् लोटला यावरून आगरकरांनीं हें नवीन पत्र रागाच्या आवेशांत काढलें नाहीं हें तर उघड होतेंच पण या कालांत त्यांनीं समेटाच्या म्हणण्याला आपल्याकडून आडकाठी येऊं नये म्हणून वाट पाहिली. तत्वाला हरताळ लावून समेट करणारे आगरकरही नव्हते आणि टिळकही नव्हते. दोघांची दृष्टि आतां भिन्न झाली होती. दोघांच्या कार्यांचे मार्ग पृथक् झाले होते. दोघांच्या मूलतत्वांत पराकाष्टेचा विरोध उत्पन्न झाला होता. समाजाची अंतःशुद्धि नाहीं तोंपर्यंत त्याला बाह्य वैभव यावयाचें नाहीं; ती अंतःशुद्धि नाहींशी झाल्यामुळें बाह्य वैभव गेलें हा आगरकरांचा सिद्धांत तर बाह्य वैभव

आल्यावर अंतःशुद्धि आपोआप होईल हा टिळकांचा सिद्धांत. त्यांची नांदणूक एकत्र होणें शक्य नव्हतें. तेव्हां आगरकरांच्या लेखणीला अप्रतिहतपणें संचार करण्याला सुधारकासारखें नवें पत्र पाहिजे होतें व परिस्थिति सर्व प्रकारें विरुद्ध असतां त्यांनीं तें निर्माण केलें व आपल्या मनांतील खरे विचार स्पष्टपणें लोकांपुढें मांडण्याची सुरवात केली यावरून त्यांची धडाडी, तत्वप्रियता आणि स्वदेशप्रेम हीं सोज्वळपणानें दिसून येतात. सुधारक निघाल्याचें वर्णन "एका प्रिय वयस्या" नें सुधारक पत्रांत प्रसिद्ध झालेल्या आगरकरांच्या मृत्युलेखांत केलें आहे तें अद्यापिही वाचनीय आहे. "प्रिय वयस्य" म्हणतो:—"केसरीच्या व शाळेच्या संवर्धनांत रात्रंदिवस खटपट करण्यांत गोपाळरावजी एकदिलानें व निस्पृहतेनें झटत असतां पुनः काहूर आलें. केसरीचा व त्यांचा वियोग झाला. आपण स्वतः वाढविलेल्या, स्वतः लालन पालन केलेल्या, स्वतः सर्व तऱ्हांनीं जोपासलेल्या बाणेदार अर्भकास दुसऱ्याच्या स्वाधीन करण्याची वेळ ज्या बापावर आली असेल त्यांनाच त्या वेळींच्या गोपाळरावजींच्या शोकाकुल स्थितीची कल्पना करतां येईल. ज्याच्याकरतां तुरुंगांत पडून १०१ दिवस डोंगरीची हवा पतकरली त्या प्राणाहून प्रिय लाडक्याला हातचा सोडावयाचा म्हणजे त्यांच्या पराकाष्ठेचें जिवावर आलें. पण परिस्थितीच्या असह्य तडाक्यामुळें त्यांस केसरीस शेवटचा नमस्कार करावा लागला! त्यांच्या सहकारी मंडळींचे व त्यांचे विचार भिन्न, निदान ते लोकांपुढें मांडण्याचे व ते अमलांत आणण्याचे मार्ग भिन्न असल्यामुळें १८८८ सालापासून त्यांना आपल्या नांवावरच जगापुढें यावें लागलें. जिकडे तिकडे निंद्य, तिरस्करणीय झालेल्या सुधारणेचे हे कट्टे भक्त. तिचा पक्ष खरा आहे व तिचाच शेवटीं विजय व्हावयाचा आहे असें जगास—वेडावलेल्या जगास स्पष्टपणें सांगावयाचें काम व इच्छा त्यांची; "सर्वतोमुखीं निंदा होत असलेल्या सुधारणेचा व सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं इतकेंच नाहीं तर त्याचेंच सर्वत्र साम्राज्य होणार असें युक्तिवादानें सिद्ध-करून देण्यासाठीं" आगरकरांची सारी खटपट. ती खटपट सफळ व्हावी म्हणून १८८८ सालीं त्यांच्या हातून सुधारकाचा अवतार झाला; व तेव्हांपासून त्यांचा खरा प्रांत, त्यांचें खरें रण, त्यांचें खरें काम, त्यांना मिळालें म्हणावयाचें. हिंदुधर्माच्या ज्या रोगांना, हिंदु समाजाला खाऊन टाकणाऱ्या ज्या चिकट कृमींना, लोक मायावशानें कवटाळित होते व आहेत ते रोग व ते कृमि झाडून पार व्हावे याकरितां समाजाच्या प्रत्येक नाडीचें परीक्षण करणें; अमिष्ट

झालेल्या, गोंधळून गेलेल्या व म्हणूनच चंदन म्हणून सापाला पोटाशीं धरणाऱ्या समाजाला प्रसंगीं पलीस्तरें मारणें तर कधीं मोरवळ्यांत गोड औषधें देणें; जाणून बुजून आड रस्त्यानें जाणाऱ्या जनतेस व तिच्या प्रिय पुढाऱ्यांस वाटेवर आणण्याकरितां कळकळीनें पण जोरानें त्यांवर सणसणीत कोरडे ओढणें; आपल्याला रास्त वाटतात त्या मतांच्या प्रतिपादनार्थ सारें जग उलटलें तरी—प्रत्यक्ष काळ आ पसरून पुढें आला तरी—लेखणी सरसावून उभें ठाकणें व प्रतिपक्षाच्या धमकावण्यांना न भितां "कोण स्वस्थ बसणार? सुधारक अं! टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल व तीं वाचण्यास एक इसम तरी तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैण कर्म सुधारकास स्पर्श करूं शकणार नाहीं" असा बाणा बाळगणें, हेंच त्यांचें खरें कर्तव्य व तें चोखपणें बजावण्यास या वर्षीं मोठ्या अभिमानानें त्यांनीं सुरवात केली. सुधारक पत्राचा जन्म झाल्यापासून गोपाळरावजींचा उघड उघड छळ होऊं लागला; लोकांनीं आपल्याकडून त्यांचा हवा तेवढा उच्छद मांडला; आम्ही तुम्हांस ठार मारूं अशीं पत्रें पाठविलीं" आणि असें व्हावें यांतही नवल नव्हतें. सुधारकाचा अवतार म्हणजे नव्या युगाची सुरवात ही गोष्ट त्यांतील पहिला लेख वाचतांच लोकांच्या लक्षांत आली. आतांपर्यंत सुधारक झाले होते. त्यांतले कांहीं कृतिशून्य होते तर कांहीं अनाचारी होते. त्यांना पुराणमताभिमानी समाज भीत नव्हता. जे दुराचारी किंवा अनाचारी लोक आपणांला "सुधारक!' म्हणवीत त्यांच्या संसर्गानें सुधारणेला समाजांत हीनपण आलें होतें. त्यामुळें अनाचारी लोकांनीं आपणाला "सुधारक" म्हणून घ्यावें यांत पुराणमतवाद्यांना उल्हास होता. कृतिशून्य सुधारकांकडे पाहून "पहा हे तुमचे सुधारक! पुनर्विवाहावर व्याख्यानें देऊन स्वतःवर प्रसंग आला म्हणजे दहा वर्षांच्या पोरीशीं लग्न लावतात!" असें समाजाला म्हणतां येत असे या दोन्ही प्रकारच्या लोकांना पुराणमतवादी उघडपणें शिव्या देत पण ते सुधारणेचे खरोखर विध्वंसक असल्यामुळें व तिची बदनामी करण्याला त्यांचा उपयोग होत असल्यामुळें पुराणमतप्रतिपादकांना त्यांच्याबद्दल मनांतून भय मुळींच वाटत नसे. पण आगरकरांचें आचरण गंगाजळाप्रमाणें शुद्ध; त्यांचें धैर्य आणि धडाडी हीं अपूर्व; मनांत एक, वाणींत एक आणि कृतींत एक ही लटपट त्यांच्याकडे नव्हती. त्यामुळें असा शुद्धशील आणि सत्वशील पुरुष आतां सुधारणेचा ध्वज घेऊन मिरवणार यामुळें लोक भयानें गांगरले आणि चिरडीला येऊन अद्वातद्वा बरळूं

लागले हें क्रमप्राप्त होतें. आणि त्यांतून आगरकरांच्या लेखणीचा पराक्रम उभ्या महाराष्ट्राला कळून चुकलेला होता. त्या तेजस्वी लेखणीपुढें टिकाव लागणें कठीण असें टिळकासारखा मोहरा हस्तगत केल्यावरही पुराणमतवाद्यांना वाटावें असाच वचक आगरकरांच्या लेखणीनें बसविला होता. आगरकरांचा सुधारकांतील पहिला लेख वाचतांच लोकांना कळून चुकलें कीं केसरींत जरी आगरकरांनीं सामाजिक विषयावर लेख लिहिले होते तरी केवळ समाजसुधारणेसंबंधीं त्या वेळीं विशेष चळवळी नसल्यामुळें त्या लेखांचें स्वरूप तात्विक म्हणून अधिक सौम्य होतें. पण संमतिवयासारखा वाद उपस्थित होऊन त्यांत पुढें रखमाबाई प्रकरण, स्त्रियांची स्थिति व दर्जा, स्त्रीशिक्षण वगैरे विषयांना व्यावहारिक स्वरूप आलें व सामाजिक सुधारणा ही सर्व चळवळच व्यावहारिक स्वरूपाची होऊन तिची चर्चा प्रत्येकाच्या हितसंबंधांत थोडी फार येऊं लागली. केसरींत आगरकरांनीं वर्षांतून फार तर पंधरा वीस सामाजिक लेख लिहिले असले, व ते जरी किती कडक असले तरी इतर विषयांत खपून जात. सुधारक पत्रांत "सुधारणे" चा विषय इतर विषयांत खपता तर पत्राचें नांवच निरर्थक झालें असतें. शिवाय केसरींत आगरकरांनीं आणि त्यांच्या टिळकप्रभृति मित्रांनीं जरी निरनिराळ्या वेळीं सुधारणांचा निरनिराळ्या प्रकारें पुरस्कार केला होता तरी सुधारणांची मूलतत्वात्मक चर्चा त्यांत होण्याचा योग आला नव्हता आणि म्हणून समाजसुधारणेनें समाजांत मोठें स्थित्यंतर होणार ही भयप्रद कल्पना लोकांच्या पुढें ठळकपणें उभी राहिली नव्हती. सुधारक पत्राच्या पहिल्याच अंकावरून ती कल्पना लोकांच्यापुढें उभी राहिली. आगरकरांचें नवें वर्तमानपत्र म्हटल्याबरोबर मराठी वाचक तें उत्सुकतेनें वाचूं लागले व त्यांची विचारसरणी जरी पुष्कळ लोकांना झोंबे तरी त्यांच्या भाषासरणीची लोकांना जी चटक लागली होती तीमुळें ती विचारसरणी त्यांना वाचावीशी वाटे आणि ती विचारसरणी अशी होती कीं जरी ती अंतःकरणांत कालवाकालव करी तरी ती विचाराला पटे आणि विचार करण्याची ज्यांना थोडी बहुत तरी संवय होती किंवा आवश्यकता वाटे त्यांना ती आपलेंसें करून सोडी. "सुधारक काढण्याचा हेतु" या सुधारकांतील पहिल्या अग्रलेखांतील महत्वाचा भाग पुढें दिला आहे त्यावरून या नवीन पत्रांत कोणत्या विषयांचें कोणत्या प्रकारें प्रतिपादन येणार होतें हें लक्षांत येतें. त्यांतील प्रत्येक शब्दांत दिसणारा जोर व जिवंतपणा हे लिहिणाऱ्यांच्या अंतःकरणांतील तळमळीचे द्योतक होते. आणि त्यामुळें ते शब्द

वाचकांच्या अंतःकरणांत जाऊन भिनले. त्यांतील निःसंदेहपणानें पुराणमतवाद्यांची तर त्रेधा उडून गेली आणि "हिंदुधर्मावर मोठें अरिष्ट कोसळलें" असा आरडा ते करूं लागले. त्या आरड्यानें आगरकर कचरतील अशी त्यांची अपेक्षा होती ती मात्र खरी ठरणें शक्य नव्हतें म्हणून खरी ठरली नाहीं.

१०. "सुधारक काढण्याचा हेतु" या लेखांत आगरकर म्हणतातः—"(आमचें) स्पष्ट म्हणणें असें आहे कीं हिंदू लोक रानटी अवस्थेंतून निघाल्यावर कांहीं शतकेंपर्यंत राज्य, धर्म, नीति वगैरे कांहीं शास्त्रें; वेदांत, न्याय, गणितादि कांहीं विद्या; व काव्य, गीत, नर्तन, वादनादि कांहीं कला यांत त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडल्यावर त्यांच्या सुधारणेची वाढ खुंटली व तेव्हांपासून इंग्रजी होईपर्यंत ते कसे तरी राष्ट्रत्व संभाळून राहिले. त्यामुळें त्यांचा इतिहासपट इतर देशांच्या इतिहासपटाहून फारच कमी मनोवेधक झाला आहे. आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या चाली, आमच्या रीती,—सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें, किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें कठीण झालेल्या लांकडासारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

"ही आमची शिलावस्था आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे. आज मितीस या शिक्षणाच्या टांकीचे आघात फारच थोड्यांवर घडत आहे. पण दिवसेंदिवस ते अधिकांवर घडूं लागतील असा अजमास दिसत आहे. ज्यांना या टांकीपासून बराच संस्कार आला आहे, ते समुदायापासून अगदीं विभक्त झाल्यासारखे होऊन उभयतांत सांप्रतकालीं एक प्रकारचें वैषम्य उत्पन्न झालें आहे. या वैषम्यास विशेष कारण कोण होत हें येथें सांगण्याची गरज नाहीं. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं, मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आपल्या राज्यकर्त्यांकडून येत आहेत म्हणून त्या आम्ही स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाहीं. त्यांचें अभिनंदन करून त्यांचा आपण स्वीकार केला पाहिजे असें जें आम्ही म्हणतों तें

अशासाठीं कीं त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यावश्यक तत्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनीं त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास ( पुरुषास व स्त्रीस ) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्व आहे व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थळें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि यूरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे तें पुनः पुनः दाखवावें यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे. कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाविषयीं जें लोकमत असेल तें पुढें आणणें हेंच काय तें पत्रकर्त्यांचें कर्तव्य असें जे मानीत असतील ते तसें खुशाल मानोत. लोकमत अमुक टप्प्यापर्यंत येऊन पोंचलें आहे, सबब कोणत्याही व्यक्तीनें किंवा सरकारनें त्यापुढें जाऊं नये असें म्हणणें म्हणजे झाली आहे तेवढी सुधारणा बस आहे, पुढें जाण्याची गरज नाहीं असेंच म्हणण्यासारखें होय. व्यक्तीनें किंवा सरकारानें साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें किंवा कायदे करणें हें सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगीं लोकांच्या गाढ अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें व्यक्तीस लोकांची पर्वा न करितां स्वतंत्रपणें वर्तावें लागतें व सरकारास लोकमताविरुद्ध कायदे करावे लागतात. बारकाईचा विचार केला-तर असें दिसून येईल कीं प्रजासत्ताक राज्यांत सुद्धां अनेकदां बहुमताविरुद्ध अधिकृत लोकांचें म्हणजे सरकाराचें वर्तन होत असतें. तथापि सामान्यतः सर-कारचें वर्तन लोकमतास धरून असेल तितकें बरें. पण जे लोक हा सिद्धांत कबूल करितात ते लोकमत दिवसें दिवस सुधारत चाललें आहे असें समजतात. तेव्हां आतां असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, लोकमताची सुधारणा व्हावी तरी कशी ? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत फरक व्हावा कसा ? लोकाग्रणींनीं हें काम पत्करलें नाहीं तर तें कोणी पतक-रावयाचें ? जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं, तर त्याची चालू स्थितिसुद्धां कायम न राहतां उलट त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल.

म्हणून कोणीतरी, अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें व समाजांतील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्याच्यापुढें आणण्याचें, अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तींच्यासुद्धां अंगीं नसेल त्या समाजांनीं वर डोकें काढण्याची आशा कधींही करूं नये.

हे विचार बरोबर असतील तर त्यांवरून असें दिसून येईल, कीं जे कोणी कोणत्याही मिषानें किंवा रूपानें लोकांपुढें लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील त्यांनीं लोकांची मर्जी संपादण्यासाठीं, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठीं त्यांच्या दोषांचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी त्यांस सुमार्ग न दाखवितां केव्हां एखाद्या खड्यांत नेऊन घालतील हें सांगवत नाहीं. प्रस्तुत स्थितींत अशा लोकाग्रणींचें वर्तन आमच्या देशास फारच विघातक होणार आहे. ज्यांना समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व लयांचीं कारणें ठाऊक नाहींत; कदाचित् पितृतर्पणापुढें ज्यांचें ज्ञान गेलेलें नाहीं; विषयोपभोगाशिवाय अन्य व्यवसाय ज्यांना अवगत नाहीं; वरिष्ठांची प्रशंसा आणि कनिष्ठांशीं गर्वोक्ति याहून अन्य प्रकारचें भाषण ज्यांस फारसें माहीत नाहीं; अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनीं अहर्निश परिश्रम करून पदार्थधर्मांचें केवढें ज्ञान संपादिलें आहे, विपद्विनाशक व सुखवर्धक किती साधनें शोधून काढिलीं आहेत व राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत हें ज्यांना ऐकूनसुद्धां ठाऊक नाहीं अशा गृहस्थांनीं आम्ही हिंदु लोक नेहमीं परतंत्रच असलों पाहिजे; आम्ही कांहीं केलें तरी अधिक राज्याधिकार उपभोगण्याची पात्रता आमच्या आंगीं यावयाची नाहीं; राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्ही कधीं स्वप्नांतसुद्धां आणूं नये; स्थानिक स्वराज्य, राष्ट्रीय परिषद्, कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद, स्वसंतोषानें शिपाईगिरी करण्याची इच्छा धरणें—या व या तऱ्हेच्या दुसऱ्या उठाठेवींत आम्ही पडणें हें शुद्ध मूर्खपण होय, अशा प्रकारचें प्रतिपादन करणाऱ्या लोकांस लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रु म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. तसेंच जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढीं सारीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें हें घोर पातक अशी ज्यांची समजूत; जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयीं कल्पना; पंचामृ-

तानें व धूपदीपानें केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा विशेष प्रशस्त मार्ग नाहीं, असे ज्यांचे धर्मविचार; आहे ही सामाजिक स्थिति अत्युत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेंही अवकाश नाहीं; सध्यां येथें स्त्रियांचे पुरुषांशीं, मुलांचे आईबापांशीं, जे संबंध चालत आले आहेत तेच उत्तम आहेत व अनंतकाळ तेच चालले पाहिजेत; ज्ञान संपादणें हें पुरुषांचें कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य; पुरुष स्वामी, स्त्री दासी; स्वातंत्र्य पुरुषांकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे; विवाहाशिवाय स्त्रीस गति नाहीं, व गृहाशिवाय तिला विश्व नाहीं; वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण; अशा प्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजविषयक कल्पना—असे लोकाग्रणी काय कामाचे ? अशांच्या उपदेशानें व उदाहरणानें आम्हांस चांगलें वळण कसें लागणार व इतर सुधारलेल्या राष्ट्रांस होत असलेल्या सुखाचा लाभ आम्हांस कशानें होणार ? निदान सुधारकास तरी असले लोकाग्रणी व त्यांचें वर्तन मान्य नाहीं. ज्या तत्त्वांचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्ही आनंदानें तयार झालें पाहिजे. तीं तत्त्वें हा सुधारक महाराष्ट्र लोकांपुढें वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज ज्याचा जारीनें अंमल चालला आहे त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार असल्यामुळें, फार त्रास पडणार आहे. पण त्याची तो पर्वा करीत नाहीं; कारण ज्या लोकमताचा पुष्कळसा बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षां अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय. कोट्यवधि अक्षरशत्रु व विचारशून्य मनुष्यांनीं आपल्या अडाणी समजुतीप्रमाणें चांगलें म्हटलें किंवा वाईट म्हटलें; अज्ञान व धर्मभोळ्या लोकांच्या आचरट धर्मकल्पनांची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून, त्यापासून निघेल तेवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण उदरंभरू हजारों टवाळांनीं शिव्यांचा वर्षाव केला किंवा छीः थूः करण्याचा प्रयत्न केला; शेंकडों अविचारी व हेकड लोकांनीं नाकें मुरडलीं किंवा तिरस्कार केला—सारांश ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचें रूप बिलकुल समजलेलें नाहीं किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हें ठाऊक नाहीं—अशांच्या पर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पडल्या तरी—जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे—अशानें

वरच्यासारख्या क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें हेंच त्यांस उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे."

११. मेघांनीं भरलेल्या अंधाऱ्या रात्रीं विजांचा कडकडाट होऊन तिच्या दीप्तीनें क्षणभर सर्वत्र प्रकाश दृष्टीस पडावा आणि वस्तुमात्राचें यथातथ्य ज्ञान व्हावें त्याप्रमाणें सुधारकाची ही पहिली आरोळी ऐकून आणि या लेखांतील ज्ञानदीप्तीनें चकित होऊन महाराष्ट्रीय जनता कावरी बावरी झाली यांत नवल नाहीं. वरील लेख प्रसिद्ध होऊन आज चाळीस वर्षें झालीं, पण अद्यापही त्यांतील जोर, त्यांतील तळमळ, त्यांतील स्वदेशाभिमान, त्यांतील पूर्णावस्थेची जबरदस्त आकांक्षा, त्यांतील जळजळीत जिवंतपणा हीं कायम आहेत. हा लेख दोन, चार, दहा वेळां वाचला म्हणजे आगरकरांच्या कार्याची महती लक्षांत येते, सत्यस्वरूप व दयास्वरूप परमेश्वराच्या आराधनेसाठीं "देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी" ह्या व्रताचें त्यांनीं कसें अवलंबन केलें हें अंतःकरणाला पटतें आणि "सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें" हेंच ज्याचें समाधान, यापरती स्वार्थ किंवा कीर्ति यांची ज्याला पर्वा नाहीं त्या पुरुषाचें कौतुक वाटतें. ज्या तत्त्वांमुळें दुसरीं राष्ट्रें सुधारलीं त्या तत्त्वांचा अवलंब करण्याची तयारी हा सुधारकाचा बाणा होता आणि त्यावरून आगरकरांची सुधारणेची कल्पना कशी व्यापक, उदात्त आणि राष्ट्रीय स्वरूपाची होती हें कळतें. कोणाची भीडभाड धरली, क्षुद्र स्वार्थाचा किंवा कीर्तीचा लोभ धरला, तर स्वदेशाची मोठी हानि होईल ही जाणीव अंतःकरणाला होऊन आगरकरांनीं सुधारणेचा जरीपटका उभा केला आणि मृत्यूचे पाश प्राणांना घेऊन जाईपर्यंत त्यांच्या हातून तो ढळला नाहीं. आज त्या जरीपटक्याखालीं जमलेली सेना फार प्रचंड आहे; त्याची एके कालीं अवहेलना करणारीं माणसेंसुद्धां आज त्याच्या नांवाचा जयघोष करीत आहेत; पण आगरकरांनीं जेव्हां तो हातीं धरला त्या वेळीं त्याचे आपण सैनिक आहों हें उघडपणें म्हणणारींसुद्धां माणसें थोडीं होतीं. आगरकरांच्या शिकवणीचें विवेचन करतांना उपरोक्त लेखांतील त्यांच्या विचारांची चर्चा करावी लागणार आहे. तूर्त सुधारकाचा जन्म म्हणजे महाराष्ट्रांत नवीन युगाची सुरवात एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे.

# भाग सातवा

## कॉलेजमध्यें फूट

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्
  भास्वानुदेष्यति हसिष्यति चक्रवालम् ।
इत्थं विचिंतयति कोषगते द्विरेफे
  हा हंत दंत नलिनीं गज उज्जहार ॥

१८८८ सालीं आगरकरांनीं "सुधारक" काढला व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कारभारांत टिळकांकडे बहुमत आहे असें लोकांना वाटूं लागलें. आगरकरांनीं निराळें पत्र काढलें त्यामुळें त्यांच्या प्रतिपक्ष्यांच्या पायाची आग मस्तकाला पोंचली व हें नवें वर्तमानपत्र बरें वाईट सर्व प्रयत्न करून हाणून पाडावयाचें असा त्यांनीं निश्चय केला. सुधारकांत बोलून चालून लोकांना अप्रिय असलेलीं मतें येणार होतीं तेव्हां त्या मतांना शिव्या देऊन आगरकरांची बदनामी होण्याचा संभव नव्हता. तेव्हां त्यांची त्या मतांखेरीज इतर अनेक प्रकारें सिद्ध झालेली योग्यता हाणून पाडून, प्रसंग विशेषीं त्यांच्या नीतीबद्दल कुत्सित शंका प्रदर्शित करून, त्यांच्या स्नेह्यांसोबत्यांवर शिंतोडे उडवून वगैरे निरनिराळ्या उपायांनीं त्यांचा पाडाव करावा असा निश्चय त्यांना चांगल्या प्रकारें ओळखणाऱ्या कांहीं पूर्वींच्या स्नेह्यांनीं आणि त्यांच्यावर चिखल उडविणें म्हणजे त्यांचीं मतें खोटीं ठरविणें असें समजणाऱ्या कांहीं बाष्कळ गांवगुंडांनीं सुरू केला. अशा गांवगुंडांना उत्तेजन देऊन त्यांची तळी उचलून धरणें हें आगरकरांनीं सोडलेल्या केसरीचें एक व्रतच बनून राहिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुधारकाच्या पहिल्या वर्षीं आगरकरांना फार अडचणी सोसाव्या लागल्या. सुरवातीच्या अडचणीसंबंधीं दोन व पहिलें वर्ष पुरें झाल्यानंतर त्याच्या हकीकतीसंबंधीं एक अशीं तीन पत्रें गोपाळरावांनीं

रा. सीताराम गणेश देवधर यांना इंग्रजींत लिहिलीं होतीं. तीं मराठी भाषांतरासहित रा. देवधर यांनीं छापलेलीं पुढें मराठींत दिलेलीं आहेत. तसें करण्यापूर्वी रा. देवधरांचा गोपाळरावांशीं संबंध आला त्यासंबंधीं थोडीशी हकीकत दिली पाहिजे. सुदैवानें ती देवधरांच्याच शब्दांत देणें शक्य आहे.

सुधारकाच्या जन्मापासून देवधर त्याचे सहायक होते व गोपाळरावांच्या मृत्यूनंतर त्यांनींच सुधारक चालविण्याचें काम अंगावर घेतलें. ही गोष्ट लक्षांत घेतां देवधरांची माहिती आगरकरांच्या चरित्रांत येणें आवश्यक आहे हें उघड आहे. रा. देवधर हेही मोठ्या खटपटीनें मॅट्रिकपर्यंत पल्ला पोंचवून मोठ्या यातायातीनें कॉलेजांत प्रविष्ट झाले होते. त्याच वेळीं (म्हणजे १८८० सालीं) गोपाळराव डेक्कन कॉलेजांत फेलो होते. त्यांचा व आपला परिचय कसा झाला त्याचें वर्णन देवधरांनीं केलें आहे. "मी कॉलेजांत गेलों त्याच वर्षी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व टिळक या उभयतांनीं पुण्यांत न्यू इंग्लिश स्कूल या नांवाची नवीनच संस्था अस्तित्वांत आणिली होती. कै. गोपाळराव आगरकर हे त्या वेळीं कॉलजांत दक्षिणा फेलो असून आपली एम्. ए. ची परीक्षा होतांच त्या संस्थेस जाऊन मिळण्याचें त्यांनीं ठरविलें होतें व आपल्या त्या निश्चयानुरूप ते त्या संस्थेंत कामही करूं लागले होते. कॉलेजांत फेलो असतांना त्यांचा माझा विशेष परिचय घडून येऊन माझी बी. ए. ची परीक्षा झाल्यावर मीही त्या संस्थेस जाऊन मिळणें शक्य आहे असें वाटून त्यांचें त्यासंबंधानें माझ्याजवळ एक दोनदां बोलणेंही झालेलें होतें. त्याला माझ्याकडून अनुकूळ उत्तर मिळाल्यामुळें, व पुढें ते केसरीचे संपादक असतां त्या पत्रांत मधून मधून मी लेख लिहीत असें त्यामुळें, त्यांचा माझा झालेला परिचय कालक्रमानें वृद्धिंगत होत चाललेला होता. अशा स्थितींत पुढें केव्हां शक्य होईल तेव्हां सदर संस्थेचा लाईफ मेंबर होण्याचा विचार माझ्या मनांत घोळत असल्यामुळें, जमल्यास न्यू इंग्लिश स्कुलांतच तूर्त नोकरी पहावी, असें वाटून मी त्यांच्याजवळ त्या संबंधानें गोष्ट काढली. शाळेंतले वर्ग पालटण्याची तीच वेळ असल्यामुळें फारशी वाट पहावी न लागतां लवकरच मला तेथें नोकरी मिळून मी आपलें काम करूं लागलों." ¶ "ते केसरीचे संपादक असतांना आरंभीं तरी तें पत्र सामाजिक सुधारणेच्या पाठीराख्यां-

¶ सी. ग. देवधर; माझा जीवनवृत्तांत, पृष्ठ ८५.

पैकीं एक होतें, हेंही आतां नव्यानें सांगावयास नको. मी कॉलेजांत गेल्यावर मिल्लप्रभृतींचे ग्रंथ वाचण्याची सुसंधि मला मिळाल्यापासून माझ्याही मनाचा सामाजिक सुधारणेकडे विशेष ओढा होऊं लागला होता. त्यामुळें त्यांच्या अमदार्नीत माझे कित्येक लेख केसरींत प्रसिद्ध झाले आहेत........ या लेखांवरून सामाजिक सुधारणेसंबंधाचे माझे विचार त्यांच्या विचाराशीं जुळण्यासारखे आहेत, ही गोष्ट त्यांना आधींच कळून चुकली होती. आणि म्हणून सुधारक पत्र काढण्याचा त्यांचा विचार ठरला, तेव्हां त्या कामीं त्यांना माझ्याकडून यथाशक्ति साहाय्य होईल अशी त्यांची खात्री असल्यामुळें त्यांनीं तें सुरू होण्यापूर्वींच त्यासंबंधानें मला लिहिलें होतें व सुधारकाच्या पहिल्या अंकापासूनच मी बहुतेक नियमानें त्या पत्राकरतां नगराहून लेख लिहून पाठ-वीत असें............नगरांतील माझ्या शाळेबाहेरील व्यवसायांत सुधार-काच्या सुरवातीपासूनच मी त्या पत्राकरितां जे लेख लिहीत असें त्यांचा जसा समावेश करतां येईल, त्याप्रमाणेंच त्या पत्राकरतां वर्गणीदार मिळविणें हेंही त्या व्यवसायांतील थोड्या खटपटीचें काम नव्हतें. हें काम मी त्या पत्राचा नगरचा एजंट या नात्यानें करीत नसून सामाजिक सुधारणेबद्दल मला जें मनापासून प्रेम वाटत असे त्या प्रेमानें प्रेरित होऊनच मी तें करीत होतों, हें उघड आहे. आणि असें होतें म्हणूनच नगरसारख्या मागसलेल्या गांवां-तही सुधारकासारख्या पथ्यकर परंतु अप्रिय पत्राला मला तेथें पन्नासावर वर्गणीदार मिळवितां आले."* या हकीकतीवरून खुद्द देवधरांच्याबद्दलही वाचकांना थोडीबहुत कल्पना येईल. गोपाळरावांचे साहाय्यक जसे गोखले तसेच देवधर पहिल्यापासून होते व ते पुढें पुण्यास कायमचे आल्यावर सुधारकाचे सहसंपादक झाले. अंगीकृत कार्याविषयीं अत्यंत कळकळ, पूर्ण सचोटी, कामाबद्दल जीवापाड मेहनत, निर्भयपणा, शांतवृत्ति इत्यादि उत्तम गुणांचें वास्तव्य देवधरांच्या ठिकाणीं होतें आणि त्यांच्यासारखा माणूस गोपाळरावांना काम करण्याला मिळाला यावरून कोणत्या प्रकारचीं माणसें गोपाळरावांकडे आकर्पिलीं जात असत व कोणत्या प्रकारचीं माणसें गोपाळराव जवळ करीत हें लक्षांत येतें. गोपाळरावांचीं उपरोक्त पत्रें आतां येथें जशींच्या तशीं ( रा. देवधरांनीं दिलेल्या मराठी तर्जुम्याप्रमाणें ) उतरून

---

* माझा जीवनवृत्तांत, पृष्ठ १०६-७.

घेतलीं आहेत. त्यावरून सुधारकाची सुरवात व त्याच्या पहिल्या वर्षाची हकीकत हीं कळून येतात.

२. सुधारक सुरू झाल्यानंतर पंधरा वीस दिवसांत पुढील पत्र लिहिलेलें आहे हें सहज लक्षांत येईल.

"पुणें, ३० आक्टोबर १८८८.

"सुधारकाचा खप वाढविण्यासंबंधानें तुम्ही केलेल्या सूचना बहुमोल आहेत. 'केसरी' पत्र सुरू केलें तेव्हां अंशतः त्यांचा अवलंब केलाही होता. मोठमोठ्या जाहिराती छापून जिल्ह्यांतील कांहीं शहरांतून त्या भिंतीवर चिकटवण्यांत आल्या होत्या. त्याचीच पुनरावृत्ति "सुधारका" संबंधानेंही करतां येईल. आमच्या मुंबईच्या एजंटांनीं या दिशेनें यापूर्वींच तेथें उपक्रम केलेला आहे. परंतु त्याचा उपयोग मात्र फारसा समाधानकारक झाल्याचें दिसून येत नाहीं. पत्राकरतां वर्गणीदार मिळविण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे तुम्हीं तेथें जशी खटपट केली, तशी खटपट करणें हाच होय. पण या कामाकरितां प्रत्येक जिल्ह्यांतील मोठमोठ्या शहरीं झटणारे खरे मित्र मिळणार कसे? बहुतेक लोक नुसती तोंडपाटीलकी करणारे असतात. चांगलीशी दलाली दिल्यास कांहीं काम होईल, व तें करून पहाण्याचाही माझा विचार आहे. माझी शरीरप्रकृति चांगली असती, व मला फुरसत मिळती, तर मी स्वतः जिल्ह्यांच्या बहुतेक मुख्य ठिकाणीं जाऊन व्याख्यानें दिलीं असतीं; व प्रत्येक शहरीं कांहीं वर्गणीदार मिळविण्याची खटपट केली असती; परंतु माझ्या दम्यामुळें वेळोवेळीं वैद्यांचा सल्ला घ्यावा लागत असल्याकारणानें मला पुणें सोडून अन्यत्र जाणें अशक्य होऊन बसलें आहे, व माझ्या फुफ्फुसाच्या क्षीणतेमुळें व्याख्यानें देण्यालाही मी अगदीं नालायक होऊन गेलों आहें, हें तुम्हांला माहीतच आहे.

"मीं सुरू केलेल्या पत्राला सुस्थिति यावी, व ज्या हेतूनें तें सुरू केलें आहे तो हेतु सिद्धीला जावा म्हणून नाना प्रकारच्या योजना मी आपल्या मनांत घोळवीत आहें; पण त्या अद्यापि अनिश्चित स्वरूपांतच आहेत. त्यांना मूर्त स्वरूप येतांच त्या तुमच्यापुढें मांडाव्या, असें माझ्या मनांतून फार आहे. तुमच्या पत्रावरून तुम्ही दिवाळींत तेथें येणार कीं नाहीं याचा नीटसा उमज पडत नाहीं. तुम्ही येणार नसल्यास, माझ्या योजनांना तुम्हांला त्यांचा विचार करितां येण्यासारखें निश्चित स्वरूप येतांच, मी नगराला येऊन त्या तुम्हांला

कळवीन. त्यापूर्वीं पुण्याचे कायमचे रहिवासी होऊन सुधारकाशीं व त्याच्या बऱ्यावाईटाशीं कायमचे संलग्न होण्याचा तुमचा मानस आहे कीं कसें, हें मला कळवावें."

या पत्रावरून एक दोन गोष्टी उघड होतात. एकतर आगरकरांची प्रकृति या वेळीं पुष्कळशी ढांसळलेली होती. तिला एके काळीं प्रिय असलेल्या परम मित्रांकडून व त्यांच्या अनुयायांकडून होत असलेल्या शिव्याशापांच्या भडिमारामुळें उपकारक साहाय्य होण्याचा संभव नव्हता. कॉलेजमध्यें काम भरपूर होतेंच. अशा परिस्थितींत केवळ आपल्याला रास्त वाटतात त्या विचारांचा प्रसार करण्याकरितां त्यांनीं सुधारक काढला यावरून त्यांची धडाडी व स्वदेशाभिमान हीं दिसून येतात. तसेंच ज्या मंडळीबरोबर काम करावयाचें आहे त्यांच्याशीं अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याला ते किती तयार असत हेंही या पत्रांतील शेवटच्या मजकुरावरून सिद्ध होतें. सुधारक दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरू झाला होता व वरील पत्र दिवाळीच्या पूर्वीं लिहिलेलें आहे. दुसरें पत्र त्यानंतर अडीच महिन्यांनीं लिहिलेलें आहे.

"पुणें, ता. २१ जानेवारी १८८९

"तुमच्या कामगिरीबद्दल तुमचे पुरेसे आभार कसे मानावे हें समजेनासें होऊन मी आणि माझे मित्र श्रीयुत गोखले हे अगदीं वैतागून जातों; व आम्हांला असें वाटूं लागतें कीं आम्हांला तुमचे आभार मानण्याची मुळीं जरूरीच नाहीं; कारण तुम्ही आपणांकरितां म्हणून कांहीं एक करीत नाहीं. तुमच्या हातून पुष्कळ सेवा होत आहे, व पुढेंहि होईल; परंतु तुम्ही आमच्याकरितां ती करीत नसून आपल्या प्रिय पण सांप्रत हतभागी अशा देशबांधवांसाठीं व देशासाठीं करीत आहां! आपण या बाबतींत सहकार्यकारी आहोंत. आणि आम्ही जें कांहीं करीत आहों त्याच्या बुडाशीं स्वार्थसाधनाचा हेतु आहे अशी तुमची समजूत होण्याला जोंपर्यंत तुम्हांला कारण सांपडलेलें नाहीं, तोंपर्यंत आम्हांला तुमचे आभार मानीत बसण्याचें प्रयोजन नाहीं. पण हा निव्वळ खोट्या पांडित्याचा एक मासला झाला. आणि ज्या जोखमीच्या कामाचा आम्ही नुसता उपन्यास केलेला आहे, व ज्याची सिद्धि तुमच्यासारख्या निष्काम मित्रांच्या सहानुभूतीवर व साहाय्यावरच सर्वस्वी अवलंबून आहे, त्या कामीं तुमच्याकडून होत असलेल्या बहुमोल कामगिरीबद्दल आमची कृतज्ञता व्यक्त केल्यावांचून आम्हांला रहावत नाहीं."

या पत्रासंबंधीं रा. देवधर म्हणतातः—" चरित्रनायकाच्या थोर मनाची वाचकांना ओळख व्हावी व

परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसंतः संति संतः कियंतः ।

म्हणजे 'दुसऱ्याच्या राळयाएवढ्या गुणांचा पर्वत बनवून ज्यांचें अंतःकरण आनंदानें प्रफुल्ल होऊन जातें, असे सज्जन या जगांत किती सांपडतील?' ह्या कव्युक्तीचें प. वा. आगरकर हे एक उदाहरण कसे होते हें वाचकांना दिसून यावें, याच हेतूनें वरील उतारा वाचकांना सादर केला आहे." या लहानशा उताऱ्यावरूनही गोपाळरावांच्या सरळ व गोड स्वभावाची कल्पना आल्यावांचून रहात नाहीं. गोपाळरावांना आपली मूर्तिपूजा करून घ्यावयाची नव्हती तर बरोबरीचीं माणसें मिळवून त्यांच्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागून स्वदेशासाठीं कार्य करावयाचें होतें. आतां जगांत कित्येक माणसें अशीं असतात कीं कोठल्या तरी म्हसोबापुढें आपलें नाक घांसावयाचें आणि मग त्याच्या जोरावर जगानें आपले पाय धरावे अशी अपेक्षा करावयाची. वरिष्ठापुढें लांगूलचालन करावयाचें व कनिष्ठांशीं उद्दामपणानें वागावयाचें; अशा माणसांना या स्वभावांतील माधुर्य कळण्याची पात्रताच नाहीं तेव्हां त्यांना ती कळत नसे व आवडत नसे. आपल्या साहाय्यकांना बरोबरीनें वागविण्याच्या स्वभावामुळें तर डेक्कन एज्युकेशन सोसायटींत गोपाळरावांच्या अहंमन्य मित्रांनीं त्यांच्यावर ठपका ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्याला यश येणें शक्य नव्हतें व त्याप्रमाणें तो फसला ही गोष्ट निराळी.

३ या पुढील पत्र सुधारक निघाल्यानंतर बरोबर एक वर्षानें लिहलेलें आहे व तें अत्यंत महत्वाचें आहे. दुसऱ्या वर्षापासून सुधारकाची वर्गणी वर्षाची दोन रुपये होती ती बारा आणे करण्यांत आली या गोष्टीबद्दल रा. देवधर यांनीं चिंता प्रकट केली होती तिला उत्तर म्हणून हें पत्र आहे.

" पुणें ता. २ आक्टोबर १८८९

" आतां सुधारकाची वर्गणी कमी कां केली, या तुमच्या प्रश्नाचें उत्तर हें कीं, पुढील विचार मनांत आणून आम्ही हा धोक्याचा उपाय योजण्यास प्रवृत्त झालों:—

( अ ) गेल्या वर्षाचें उत्पन्न त्या सालचा खर्च भागेल इतकेंच होतें, शिल्लक बहुतेक मुळींच नव्हती, हें पुढील हिशेबावरून दिसून येईल:—

| उत्पन्न | खर्च |
| --- | --- |
| (१) वर्गणी रु० १३०० ( १८८८–८९ सालीं ज्यांची वर्गणी आली अशांची एकंदर संख्या ६५० होती. पोष्टेज हिशोबांत धरलेलें नाहीं. कारण तें येतें तसें जातें. त्याचा आमच्या नफानुकसानीशीं मुळींच संबंध नसतो. ) | रु० ७२० छपाई व इतर कामकाज<br>रु० ५०६ कागद<br>रु० १०० पत्ते, पावती बुकें वगैरेंकरतां झालेला किरकोळ खर्च<br>रु० १५० सुधारक पत्र लोकांना जाहीर व्हावें म्हणून प्रारंभीं करावा लागलेला खर्च<br>रु० ४० सामान |
| (२) जाहीराती रु० ३०० | रु० ३० शिल्लक |
| एकूण बेरीज रु० १६०० | एकूण बेरीज रु० १६०० |

( ब ) वरील हिशेबावरून हें उघड आहे कीं, या कामांत गेल्या सालीं आम्हांला फायदा झालेला नाहीं, व पुढेंही कधीं तो होण्याची आशा नाहीं. आमच्या चरितार्थाकरतां आम्ही आपल्या शाळेंतील वेतनावरच अवलंबून राहिलें पाहिजे.

( क ) चालू सालीं म्हणजे १८८९–९० मध्यें वर्गणीदार कदाचित् आणखीहि कमी होण्याची म्हणजे नुकसान सोसून पत्र चालवावें लागण्याची भीति होती.

( ड ) गेलीं पांच वर्षें मी एक ना दुसऱ्या वर्तमानपत्रासाठीं ( मराठा, केसरी व आतां सुधारक ) लेख लिहीत आहें, आणि त्याबद्दल त्या पत्रांच्या उत्पन्नांतून मला एका पैचीहि प्राप्ति झालेली नाहीं. आतांपर्यंत मी हें काम निष्कामबुद्धीनें करीत आलों आहें. तेव्हां तें तसेंच पुढेंही कां करीत राहूं नये असा आम्ही आपल्या मनाला प्रश्न केला. आणि मी व माझे प्रिय मित्र श्रीयुत गोखले यांनीं असें ठरविलें कीं, सुधारकांत लेख लिहिण्याचें काम केवळ प्रेमाखातर म्हणून करावयाचें. हा निश्चय केल्यावर, सुधारकाची वर्गणी कमी करून तो स्वावलंबी करतां येईल कीं नाहीं, हें आम्ही पाहूं लागलों.

तेव्हां आम्हांला दिसून आलें, कीं, वर्गणी कमी करण्यावांचून गत्यंतर नाहीं. कदाचित् ती इतकी कमी करण्याची आवश्यकता नव्हती, असें म्हणतां येईल; पण आम्ही असा विचार केला कीं, वर्गणी थोडीशी कमी केल्यानें त्याचा लोकांवर म्हणण्यासारखा परिणाम घडणें शक्य नाहीं. तसें केल्यानें वर्गणी कमी व्हावयाची ती होऊन, वर्गणीदारांची संख्या पुष्कळ व्हावी हा जो मुख्य हेतु तो जागच्या जागींच राहील; आणि म्हणून वर्गणी कमी करण्याच्या बाबतींत सर्वांवर ताण करण्याचा आम्हीं निश्चय केला. चालू वर्षाच्या अखेरीला वर्गणी-दारांची संख्या तीन हजारांपर्यंत जाईल, असा आमचा अजमास आहे. तसें झाल्यास आम्हांला जाहिरातीहि अधिक मिळूं लागतील, व वर्गणी आणि जाहिराती यांच्या उत्पन्नावर पत्राचा खर्च भागवतां येईल. प्रत्यक्ष अनुभव काय येतो हें लवकरच दिसेल. तुम्हांला हें माहीतच आहे कीं, आपण पत्रा-करतां मजकूर लिहितों तो अगदीं खऱ्या अंत:प्रेरणेनें लिहीत असतों. तेव्हां तो वाचणारांची संख्या हातांच्या बोटांनीं मोजतां येणाऱ्या शेंकड्यांहून अधिक नसावी, हें अत्यंत उद्वेगजनक होतें, व तुम्हांलाही तें तसें होत असलें पाहिजे, यांत संशय नाहीं. शिवाय, आपल्या मतांचा समाजावर थोडा तरी परिणाम होऊं लागण्यास देशाच्या अगदीं दूरच्या कोनाकोपऱ्यापर्यंत त्यांचा रिघाव होणें आवश्यक आहे. सारांश, आपल्या मतांच्या प्रियाप्रियतेचा विचार बाजूला ठेवून, निदान वर्गणीच्या दृष्टीनें तरी इतर सर्व पत्रांच्या आधीं आपलें पत्र घेण्यास लोकांचें मन वळेल, इतकी ती कमी असणें जरूर आहे.

आपल्या पत्राकडे इलाख्यांतील बहुतेक सर्व वाचकवर्गाचें लक्ष्य वेधेल अशाकरतां इष्ट ते उपाय योजले जात आहेत. शाळाखात्याचे डायरेक्टर व इन्स्पेक्टर यांच्या यादींत ज्यांचीं नांवें दाखल झालीं आहेत अशा सर्व शाळा-मास्तरांकडे नमुन्यादाखल सुधारकाच्या प्रती रवाना झाल्या आहेत. तसेंच जी. आय्. पी. व एस्. एम्. रेल्वे वरील स्टेशनमास्तर व सिग्नलर यांजकडेही पत्रें व सुधारकाच्या नमुन्याच्या प्रती पाठविल्या आहेत. पुण्यांत दोन हजार जाहिराती वांटल्या असून मुंबईस तीन हजार वांटण्याचें काम चालू आहे. इतर उपायही योजले जात आहेत, व आमचें हें साहस यशस्वी होण्यास जे जे मार्ग सुचतील ते ते सर्व करून पाहिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीं."

पुढील पत्र आणखी एक महिन्यानें लिहिलें आहे. त्यावरून वर्गणी कमी करण्याचा सदुपयोग झालेला दिसून येतो.

" पुणें, ता. १ नोव्हेंबर १८८९

" सुधारकाला जितके अधिक वर्गणीदार मिळतील तितके मिळवावे या उद्देशानें सुधारक पत्र करतां येईल तितकें मनोरंजक व बोधप्रद करण्याची आम्ही आपल्याकडून पराकाष्ठा करीत आहों. तथापि वर्गणीदारांच्या वाढीचें सध्यांचें प्रमाण पहातां आम्हांला निराश होण्याचें कारण नाहीं. आमच्याकडे प्रति आठवड्याला येणाऱ्या पुष्कळ पत्रांवरून पहातां असें दिसतें कीं सुधारकाची लोकप्रियता समाजाच्या मध्यम वर्गांतून झपाट्यानें वाढत आहे.

पत्राच्या आकारासंबंधानें अथवा त्यांतील मजकुरासंबंधानें तुम्हांला कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या अगदीं बिनदिक्कत कराव्या. त्यांचा आम्हांकडून काळजीपूर्वक विचार होईल याबद्दल खात्री असूं द्यावी. "

४. विशेषतः तिसऱ्या पत्रांत सुधारकाच्या पहिल्या वर्षाचा इतिहास भरलेला आहे तेव्हां त्यासंबंधीं थोडेंसें विस्तरशः विवेचन केलें पाहिजे असें वाटतें.

सुधारक निघाल्याबरोबर त्याला हाणून पाडण्याचे पुष्कळ प्रयत्न सुरू झाले व हे प्रयत्न करणाऱ्यांची पुष्कळशी भिस्त आगरकरांच्या दारिद्र्यावर व त्यांच्या निग्रही स्वभावावर होती. पत्राचा खप व्हावा या हेतूनें आगरकर आपलीं मतें निदान संदिग्ध भाषेंत मांडतील हेंसुद्धां शक्य नव्हतें हें त्यांचे प्रतिपक्षी पूर्णपणें ओळखून होते. तेव्हां त्यांच्यासंबंधीं जेवढे म्हणून गैरसमज लोकांत पसरवतां येतील तितके पसरवण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला. सुरवाती सुरवातीला वर्तमानपत्र कसें काय चालतें याबद्दल आगरकरांना चिंता वाटत होती. त्यांची चिकाटी आणि निर्भयता मात्र अचल होती. कांहीं माणसांनीं प्रत्यक्ष खटपट केली तर पत्राचे वर्गणीदार वाढले असते. सुधारक काढला तेव्हांच त्यांची स्वतःची प्रकृति पुष्कळशी खालावलेली होती. ज्या आगरकरांनीं कॉलेजच्या पहिल्या वर्षांत पुण्याच्या वक्तृत्वसभेंत भाषण करून बक्षीस मिळविलें ते आतां " फुफ्फुसांच्या क्षीणतेमुळें व्याख्यानें देण्यासही अगदीं नालायक होऊन" गेले होते. आणि लहानपणापासून नदींत तासचे तास डुंबणारे आणि विद्येच्या प्राप्तीसाठीं कऱ्हाडहून रत्नागिरीला पायीं मजल मारणारे आगरकर त्यांना आतां "दम्यामुळें वेळोवेळीं वैद्यांचा सल्ला घ्यावा लागत असल्याकारणानें पुणें सोडून अन्यत्र जाणें अशक्य होऊन बसलें" होतें. प्रकृतीची ही अवस्था असतांना आणि कॉलेजमध्यें पुष्कळ काम असतांना—तें काम केवळ

शिकविण्याचें नव्हतें—त्यांनीं हें नवें पत्र काढलें यावरून जे विचार आपल्याला योग्य वाटतात ते लोकांना कळविण्याची त्यांना केवढी तळमळ लागली होती हें स्पष्ट होतें. "सुरू केलेल्या पत्राला सुस्थिति यावी, व ज्या हेतूनें तें सुरू केलें आहे तो हेतु सिद्धीला जावा म्हणून नानाप्रकारच्या योजना" त्यांच्या मनांत घोळत होत्या. या हेतूंत स्वतःला कांहीं प्राप्ति करणें या भावनेचा गंधसुद्धां नव्हता. "गेलीं पांच वर्षें मी एक ना दुसऱ्या वर्तमानपत्रासाठीं लेख लिहीत आहें आणि त्याबद्दल त्या पत्रांच्या उत्पन्नांतून मला एका पैचीही प्राप्ति झालेली नाहीं...... मी व माझे प्रिय मित्र श्रीयुत गोखले यांनीं अखेर असें ठरविलें कीं सुधारकांत लेख लिहिण्याचें काम केवळ प्रेमाखातर म्हणून करावयाचें." जें काम करावयाचें तें निष्काम बुद्धीनें करावयाचें हा बाणा आगरकरांच्या आंगीं पहिल्यापासून होता व तो शेवटपर्यंत ढळला नाहीं. कर्म कर्तव्य म्हणून करावयाचें, कर्मफळाचा अभिलाष धरावयाचा नाहीं या भगवद्गीतेंत प्रतिपादलेल्या अत्युच्च ज्ञानतत्वाचे आगरकर हे मूर्तिमंत उदाहरण होते. किंबहुना त्यांच्या चरित्राकडे पाहूनच हें तत्व व्यवहारांत आणणारी एखादी दुसरी तरी विभूति कधीं कधीं मिळेल असें वाटण्याला कारण होई. सुधारकाच्या पहिल्या वर्षीं पत्राला वर्गणीदार ज्यांनीं वर्गणी दिली असे साडेसाहाशें होते. पत्र वाचण्याची लोकांत उत्कंठा होती पण पत्र विकत घेणें म्हणजे पाप करणें आहे अशा प्रकारची समजूत सामान्य जनांत पसरली होती. पत्र खपत नाहीं व सर्व खर्च अंगावर बसणार हें पाहिलें म्हणजे आगरकर हात आंखडतील, सुधारक बंद होईल, आणि समाजविध्वंसाचें काम आपल्याला अप्रतिहतपणें करतां येईल असें त्यांच्या प्रतिपक्षीयांना वाटत होतें. "लेखणी हातांत धरून तिच्यांतून अर्थबोधक शब्द काढण्याचें सामर्थ्य असेपर्यंत आणि ते वाचण्याला एक तरी वाचक असेपर्यंत असलें स्रैण कर्म सुधारकाच्या हातून होणार नाहीं" ही भीमगर्जना पुढें त्यांच्या प्रतिपक्ष्यांनीं ऐकिली व हा मनुष्य जिवंत असेपर्यंत सुधारक चालणार व समाजविध्वंसकांना आणि ढोंगी लोकांना थोबाडांत खाव्या लागणार याबद्दल त्यांची बालंबाल खात्री होऊन चुकली; परंतु सुधारकाच्या पहिल्या वर्षांत जेव्हां छपाईचा वगैरे खर्चवेंच जाऊन निव्वळ तीस रुपये उरले तेव्हां आगरकरांचें पत्र आतां फार दिवस उभें रहात नाहीं असें त्यांच्या शत्रूंना वाटत होतें. पण त्या बिचाऱ्यांना आगरकरांच्या अर्थशास्त्राच्या ज्ञानाची अटकळ नव्हती.

स्वतःला या पत्रांतून छदामही मिळवावयाचा नाहीं एवढें ठरल्यावर फक्त वर्तमान पत्राचा खप वाढून अधिक लोकांनीं तें वाचावें व त्याचा खर्च भागेल एवढी प्राप्ति त्याला व्हावी अशा उपाययोजनेला आगरकर लागले. तसें करण्यांत गोपाळराव गोखल्यांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता आणि याप्रमाणें तडाक्यासरशी दुसऱ्या वर्षाच्या सुरवातीला सुधारकाची वर्गणी दोन रुपयांपासून बारा आण्यांवर आली. यावरून वर्तमानपत्राच्या खपाची गुरुकिल्ली केवळ वाचकांना खूष करणें या एकाच गोष्टींत नाहीं, तर ती थोड्या पैशांत त्यांना वाचनीय वर्तमानपत्र देणें यांतही आहे हें तत्व त्यांना माहीत होतें व त्याचा अवलंब त्यांनीं केला. केवळ अग्रलेखांतील विचार जरी कोणाला आवडले नाहींत तरी सुधारक सर्व बाजूंनीं वाचनीय होता आणि लोकांचीं गाऱ्हाणीं प्रसिद्ध करून तीं योग्य अधिकाऱ्यांचे कानावर घालण्याला तो नेहमीं सज्ज असे. आगगाड्यांवर काम करणाऱ्या लोकांच्या तक्रारी सुधारकानें सरकारपुढें व लोकांपुढें फार उत्कृष्टपणें मांडल्या हें एक या गोष्टीचें ठळक उदाहरण आहे. या सर्व योजनेचा परिणाम ताबडतोब झाला व दुसऱ्या वर्षापासून सुधारकाचा खप वाढूं लागला. "आपल्या पत्राचा समाजावर थोडातरी परिणाम होऊं लागण्यास देशाच्या अगदीं दूरच्या कोनाकोपऱ्यापर्यंत त्याचा रिघाव होणें आवश्यक आहे" आणि सुधारकाची वर्गणी कमी होतांच तो तसा होऊं लागला. अर्थात् ही वर्गणी एवढी थोडी होती कीं छपाईचा वगैरे खर्च भागून लेखकवर्गाला त्यांतून कांहीं मिळेल ही आशाच नव्हती. मग संपादकाला त्यांतून पुढें मागें एखादी अवजड इष्टेट निष्पन्न होण्याची गोष्ट तर दूर राहिली. सुधारकाचा खप तर वाढलाच पण त्याच्या वाचकांची संख्या तर अतिशय वाढली. पण त्याहून मौजेची गोष्ट म्हणजे ही कीं जीं समाजकंटकें किंवा धर्ममार्तंडें आगरकरांना बेंबीच्या देंठापासून शिव्याशाप देत होतीं आणि सुधारक वाचूं नका म्हणून लोकांना उपदेश करीत होतीं त्यांनासुद्धां सुधारक वाचण्याचा मोह आवरला नाहीं. सुधारकाचा अंक आला कीं त्यांच्याही त्यावर उड्या पडत व कोणाला नकळत खोलीचीं दारें लावून ते आगरकरांचे लेख दांत ओंठ चावत कां होईना पण वाचल्याशिवाय रहात नसत. अशा प्रकारें सुधारकाची कळी उमलण्यापूर्वीं ती चिरडून टाकूं अशी ऐट ज्या कित्येक अहंमन्यांना वाटत होती त्यांची पुरी निराशा झाली व त्यांना 'आलीया भोगासीं' सादर व्हावें लागलें.

५. इकडे आगरकरांना केसरींतून काढून लावल्यामुळें आपला एक प्रकारें

विजय झाला असें टिळकांना वाटलें असल्यास सुधारक निघाल्यामुळें व त्याची घडी एक वर्षा सव्वा वर्षांत चांगली बसल्यामुळें त्या विजयाच्या समाधानांत फारशी गोडी उरली नाहीं. पण ज्या मंडळीच्या साहायानें आगरकरांची लेखणी बंद—वर्षभर कां होईना—केली त्यांच्याशीं तरी टिळकांचें कोठें जुळत होतें ? कॉलेजचे प्रिन्सिपाल वामनराव आपटे होते व शिस्तीच्या कामांत त्यांच्याशीं बळवंतरावांची घासाघीस नेहमीं चाले. आपट्यांनीं संस्कृत कोष केला व दुसरीं विद्यार्थ्यांना व विद्वानांना उपयोगी पुस्तकें लिहिण्याचें ठरविलें तेव्हां आपटे पुस्तकें लिहून पैसा कमावतात हें सोसायटीच्या तत्वाविरुद्ध आहे अशी कुरकुर टिळकांनीं सुरू केली. कॉलेजमधील अध्यापकांनीं कोषासारखे ग्रंथ लिहावयाचे नाहींत तर ते कोणी लिहावयाचे या प्रश्नाचें योग्य उत्तर टिळकांना माहीत नव्हतें असें नाहीं; पण एकदां कोणाशींही पटेनासें झालें कीं त्याच्यावर वाटेल ते आरोप करण्याला ते मागें पुढें पहात नव्हते असें दिसतें. परंतु या सुमाराला आगरकरांत व त्यांच्यांत सोसायटीच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधीं एक महत्वाचा मतभेद आला. या बाबतींत आगरकरांची बाजू अत्यंत सबळ होती व तिच्याविरुद्ध टिळकांसारख्या बुद्धिमान् माणसानें एवढें अकांड तांडव कां केलें याचा चमत्कार वाटतो. या वादाचें स्वरूप टिळकांच्या शब्दांत दिल्यानें आगरकरांची बाजू अधिकच न्याय्य दिसते. राजीनाम्यांत टिळक लिहितातः—" ..........स्वार्थत्याग आणि स्वावलंबन हीं त्यावेळीं आमचीं अगदीं ब्रीद वाक्यें झालीं होतीं, हींच तत्वें आमच्या कार्याला आधारभूत होतीं आणि या नैतिक कारणामुळेंच आमच्या कार्याला एवढें महत्व आलें. पुढें लौकरच डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. तिची संघटना अर्थात् मुख्यत्वेंकरून या तत्वांना अनुसरून करण्यांत आली; आणि व्यवस्थापक मंडळाचे म्हणून जे उपनियम करण्यांत आले ते मिशनरी संस्थांच्या नियमांच्या धर्तीवर केले. सर्व तहाहयात सभासदांना पगार समान मिळावयाचा व सर्वांना सारखे हक्क असावयाचे असें ठरलें. परंतु महिन्याचा पगार वेताचाच ठरवलेला होता म्हणून असा नियम घालण्यांत आला कीं विशेष प्रसंगीं तहहयात सभासदांना त्यांच्या मासिक वेतनाशिवाय देणगी म्हणून द्यावी; ती महिन्या महिन्याला पोंचवावी किंवा एकदम एकाच रकमेनें द्यावी. अकालमृत्यु किंवा अशा आपत्तीबाबद प्रत्येक सभासदाच्या आयुष्याचा ३००० रुपयांचा विमा उतरण्याचीही व्यवस्था करण्यांत आली होती. जिवंतपणीं अब्रूनें

प्रपंच करतां येण्यासारखें वेतन, वेळीं प्रसंगीं खास देणग्या, आणि मृत्यूनंतर विम्याचे तीन हजार रुपये अशा तऱ्हेची व्यवस्था प्रत्येक तहाहयात सभासदासाठीं करण्याची हमी व्यवस्थापक मंडळानें घेतली आणि अशा प्रकारें संस्थेच्या बाहेर काम पहाण्याचें आणि तिसऱ्याच उद्योगांत शक्ति खर्चण्याचें आम्हांला आतां कांहीं कारण उरलें नाहीं असें आम्ही आपापसांत ठरविलें होतें.[1]"

या शेवटच्या वाक्यांत या प्रसंगीं वाद उपस्थित झाला त्याचें एक बीज आहे आणि पूर्व भागांत तंट्याचें मुख्य बीज आहे. त्यासंबंधीं सांगण्यापूर्वीं तहाहयात सभासदांचें वेतन व हक्क हे सारखे होते असें नियमानें ठरलें होतें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. त्याचप्रमाणें "वेताचाच पगार" होता म्हणून देणगीची व्यवस्था करण्यांत आली होती हेंही स्पष्ट होतें. गरजेप्रमाणें देणग्या देणें म्हणजे 'समान वेतन व समान हक्क' या तत्वाचा भंग होऊन सभासदांत तंटा होण्याला जबरदस्त कारण होतें ही गोष्ट एखाद्या लहान पोरालाही समजण्यासारखी आहे. ही व्यवस्था सुरवातीला शाळेजवळ जेव्हां पैसे नव्हते व कांहीं मंडळी आपखुषीनें वाटेल तेवढी गैरसोय सोसण्याला तयार होती त्यावेळीं निरुपाय म्हणून करावी लागली होती. परंतु ती कायम चालू ठेवणें म्हणजे संस्थेंत नवीं माणसें येण्याला मोठी आडकाठी होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारखी संस्था "समान वेतन व समान हक्क" या समतेच्या तत्वावरच उभी राहणें शक्य होतें व सांपत्तिक स्थिति अनुकूल होतांच या तत्वाचें पूर्ण अवलंबन व्हावें अशी सूचना आगरकरांनीं आणिली. आगरकर जर द्रव्यलोभी असते किंवा कांहीं तरी युक्ति करून संस्थेंतून पगार अधिक उपटावा अशी त्यांची इच्छा होती असें थोडेंसें तरी गृहीत धरणें शक्य असतें तर वरील सूचना त्यांनीं कांहीं तरी स्वार्थबुद्धीनें केली असें म्हणण्याला जागा होती. पण आगरकरांची निःस्वार्थबुद्धि ही त्यांच्या सर्व आयुष्यांत केव्हांही ढळली नाहीं आणि डावें उजवेंच करावयाचें असेल तर या गुणांत खुद्द टिळकांची जागा आगरकरांच्या खालची आहे असें म्हणावें लागतें; असें असतांना ही सूचना करतांच आगरकर हे संस्थेच्या तत्वांच्या मूळावर घाव घालण्याला उभे राहिले आहेत हा भयंकर आरोप त्यांच्यावर करण्याला टिळक उद्युक्त झाले. राजीनाम्यांत ते लिहितातः—"घडण्याची वेळ व महत्व या दोहों दृष्टींनीं या कालांतील पहिला वृत्तांत जो मला सांगावासा वाटतो ते म्हणजे कोणी पैसे

१. राजीनामा, परिच्छेद ८.

कमी घेतले होते कोणी अधिक उचलले होते त्या बाबत ता. २० आक्टोबर १८८५ सालीं झालेली वजावाट होय. त्या वेळेपर्यंत ज्याला त्याला आपापल्या नडीप्रमाणें वेतन देण्याचा नियम आम्ही पाळीत होतों हें वर आलेंच आहे. स्थूल मानानें प्रत्येकाला वेतन सारखेंच मिळे. पण प्रत्येक वेळीं ज्याला ( नड लागेल ) त्याच्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करून त्याला कांहीं देणगी द्यावी अशा प्रकारचें तत्व, आमची प्राप्ति बेताची असल्यामुळें, घालून ठेवण्यांत आलें होतें. शिवाय ज्याप्रमाणें कित्येक सभासदांनीं शाळेच्या पहिल्या वर्षी कांहींहीं घेतलें नव्हतें त्याचप्रमाणें कित्येकांना त्या पुढील वर्षांतसुद्धां त्यांच्या विशेष नडी अडचणी लक्षांत घेऊन अधिक पैसे उचलूं दिले होते. अशा तऱ्हेची विषमता केवळ भविष्य कालापुरतीच नव्हे तर १८८० सालापासून पूर्वींच्या हिशेबाच्या बाबतींतही नाहींशी करावी असा आतां विचार निघाला. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे जुन्या सभासदांनीं सुरवातीच्या वर्षांत जो स्वार्थ-त्याग केला होता तो विकत घेण्यासाठीं हा बेत होता. पण या तत्वाला तोंड फुटण्याचा हा पहिलाच प्रसंग होता त्यामुळें या वेळीं या बाबतींत विशेष पुढें पाऊल पडलें नाहीं. १८८० सालापासून प्रत्येक सभासदाचा हिशेब करण्यांत आला आणि ज्याला ज्याला खास देणग्या म्हणून दिल्या होत्या त्या वगळून हिशेब अशा तऱ्हेनें बसविण्यांत आला कीं प्रत्येकाला मिळालेली रक्कम ही त्यानें केलेल्या नोकरीच्या मुदतीच्या प्रमाणांत असावी. ज्यांनीं पैसा अधिक घेतला होता त्यांना अधिक घेतलेला पैसा परत करण्याबद्दल हुकूम झाला व त्या ( आलेल्या ) पैशांतून ज्यांना कमी मिळाला होता त्यांना द्यावयाचा ( असें ठरलें ). या तत्वाचें संशोधक व पुरस्कर्ते आगरकर हे आहेत. ते त्याला समतेचें तत्व असें म्हणतात. आणि तत्वामुळेंच पुढें एवढ्या परि-णामाला गोष्टी आल्या."*

टिळकांच्या हातचें हें वर्णन वाचून या समतेच्या तत्वांत चूक कोठें होती व या तत्वाची एवढी चिरड त्यांना कां आली हें समजत नाहीं. तत्व अगदीं पायाशुद्ध होतें. जुन्या सभासदांनीं ( हे आगरकर नव्हते, आपटे नव्हते ) आपल्या आरंभींच्या स्वार्थत्यागाची ऐट उठल्या बसल्या नव्या सभासदांना सांगावयाची व त्यांना हिणवावयाचें असा प्रकार सुरू झाला. तो सुरू करणाऱ्या जुन्या सभासदांच्या पोरकटपणाचें

* राजीनामा, परिच्छेद १२.

कोणासही हंसूं येईल. पण या पोरकटपणामुळें नव्या सभासदांना पदोपदीं त्रास होऊं लागला व वाढत्या संस्थेला आणखी सभासद मिळण्याची त्यामुळें अडचण होईल या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊनच आगरकरांनीं या समतेच्या तत्वाची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें. हिशेबाच्या दृष्टीनेंही तें तत्व अगदीं रास्त होतें. या तत्वाप्रमाणें जी वजावाट झाली व जुन्या सभासदांना आपल्या स्वार्थत्यागाची जी 'किंमत' मिळाली ती आपण घेतली नाहीं असा उल्लेख खुद्द टिळकांनीं राजिनाम्यांत कोठेंही केला नाहीं व त्यांच्या चरित्रकारांनीं तर या बाबतींत मौन स्वीकारलें आहे. त्यावरून ती "किंमत" टिळकांच्या पदरांत पडली होती याबद्दल शंका रहात नाहीं. मग बिचाऱ्या आगरकरांवर टिळकांनीं एवढी आग कां पाखडली? सोसायटींतील टिळकांच्या एखाद्या बगलबच्चावर रकम परत देण्याचा प्रसंग आला व त्यामुळें त्यांना एवढी चिरड आली कीं काय? वेतन गरजांवरून ठरविणें व संस्थेच्या सांपत्तिक स्थितीवरून ठरविणें यापैकीं पहिला मार्ग सुरवातीला जरी अपरिहार्य असला तरी दुसराच मार्ग शास्त्रशुद्ध आहे व शाळेला ग्रँट मिळूं लागली आणि फंड मिळूं लागला तेव्हां आगरकरांनीं पहिल्या गैरहिशेबी मार्गाला रजा देऊन दुसऱ्या मार्गाची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें यांत त्यांचें शहाणपण दिसून येतें. गरजेप्रमाणें पगार हें तत्व समतेच्या पायावर उभारलेल्या संस्थेंत चालणें शक्य नाहीं. एक सभासद म्हणणार मला दरमहा पांचशें रुपयांची जरूरी आहे आणि त्यानें जर संस्थेंत बहुमत करून घेतलें तर त्याला तें मिळावयाचें व जो गरीब, भानगडी न करणारा माणूस त्यानें पन्नास रुपयांवर रखडावयाचें ही गोष्ट सर्वांना सारखें व नियमित वेतन मिळण्यापेक्षां चांगली, अधिक स्वार्थत्यागाची आणि स्वावलंबनाला पोषक हा टिळकांचा हिशेब कोणत्या अंकगणितांतून निघाला होता हें त्यांचें त्यांना ठाऊक. आगरकरांनीं सुचविलेली गोष्ट उघड उघड रास्त होती. पण यावेळीं आगरकर करतील तें चुकीचें म्हणावयाचें अशी स्थिति टिळकांची झाली होती असें दिसतें. त्याप्रमाणें संस्थेच्या सर्व सभासदांना बरोबरीनें वागविणें हें त्यांच्या अरेरावी स्वभावाला खपत नव्हतें आणि तीही चिरड त्यांना आली होती हें स्पष्ट होतें. टिळक राजीनाम्यांत लिहितातः—"शाळेच्या प्रारंभाच्या दिवसांत सर्वांना निर्वाहापुरतेंसुद्धां मिळणें शक्य नव्हतें. कांहीं व्यक्तींच्या बाबतींत आम्ही सढळ हात केला परंतु तसा नियम घालावयाचा अशी मात्र केव्हांही कल्पना

नव्हती. आमचें वेतन आमच्या गरजांप्रमाणें न ठरवितां ( शाळेच्या ) सांपत्तिक स्थितीवरून ठरवावें अशी जेव्हां रा. आगरकरांनीं सूचना आणिली तेव्हां मी आश्चर्यचकित झालों.........हें धोरण तेव्हां बाल्यावस्थेंत होतें. पण पुढें दोन वर्षांत त्याचा चांगलाच विकास झाला ( आणि म्हणून ) ता. ५ फेब्रुवारी १८८७ हा दिवस आमच्या अंतस्थ संबंधांच्या इतिहासांत संस्मरणीय होईल"* तसा तो संस्मरणीय होता यांत मुळींच शंका नाहीं. कारण या दिवशीं आगरकरांच्या प्रयत्नानें संस्थेंतील विषमतेचा आणि अरेरावीचा कायमचा शेवट झाला. राजीनाम्याच्या विसाव्या कलमांत या प्रश्नाची टिळकांनीं आणखी चर्चा केली आहे. तिचा फोलपणा त्यांनीं लिहिलेली हकीकत वाचूनच लक्षांत येतो. तेव्हां त्यावर येथें आणखी लिहिण्याचें कारण नाहीं. पण आपल्या दादागिरीवर गंडांतर आलें असें पाहतांच या प्रश्नाला टिळकांनीं विकृत स्वरूप देऊन आगरकर हे संस्थेच्या मूळ तत्वावर घाव घालीत आहेत असा त्यांच्यावर आरोप केला. पण आगरकर संस्थेंत प्रथमपासून होते. संस्थेचीं तत्वें त्यांना टिळकांइतकीं किंबहुना त्यांहून अधिक माहीत होतीं आणि त्यांनीं जें केलें तें मूळ तत्वांना धरून व संस्था चांगली चालावी या हेतूनें केलें होतें. आणि तें त्यांना करतां आलें याचें कारण इतर बहुतेक सभासदांना त्यांच्या सूचनेचा रास्तपणा पटला. सोसायटीच्या सभासदांनीं, संस्थेची स्थिति कितीही सुधारली तरी, जन्मोजन्म अति दारिद्र्यांतच राहिलें पाहिजे हें वडिलांकडून पांच हजारांची पुंजी मिळालेल्या टिळकांचें आग्रहानें म्हणणें होतें. आणि संस्थेची सांपत्तिक स्थिति सुधारल्यामुळें प्रत्येक सभासदाच्या पगारांत दरमहा पांच रुपयांची कायम वाढ करून देणगीचा अशुद्ध कारभार बंद करावा हें आगरकरांचें म्हणणें होतें. हे पांच रुपये पगारांत वाढले म्हणजे संस्थेच्या मूळ हेतूवर घाव घातला आणि सभासद चैन करूं लागले हें टिळकांचें आकांडतांडव त्यांच्या हट्टीपणाचें व मत्सरी स्वभावाचें द्योतक होतें असें म्हणणें दुर्दैवानें प्राप्त आहे. १८८७ च्या सुरवातीला वरील ठराव पास झाला, सगळे सभासद सारख्या योग्यतेचे व पगाराचे ठरले आणि टिळकांच्या अंतःकरणांत आगरकरांबद्दल अगोदरच उत्पन्न झालेल्या अप्रीतीला हिडिस अशा द्वेषाचें स्वरूप आलें. याच सालांत पुढें आगरकरांना केसरी सोडावा लागला. या सर्व गोष्टी लक्षांत

* राजीनामा, परिच्छेद १८.

घेतल्या म्हणजे टिळकांनीं आगरकरांना जो केसरी सोडावयास लावला तो तत्वभेदासाठीं नव्हे, तर आगरकरांच्यापुढें आपलें संस्थेंत चालत नाहीं, आगरकरांच्यामुळें आपल्याला कोणी दादा समजत नाहीं या चिरडीमुळें, याबद्दल शंका उरत नाहीं. ही हकीकत पूर्वीं न देतां आतां विस्तरशः दिली याचें कारण केसरींतून आगरकर निघाल्यावर व टिळकांचें त्यामुळें समाधान झाल्यावर त्यांनीं इतर सभासदांशीं तंटे सुरू केले त्याचें स्वरूप कळण्याला ही हकीकत कळणें आवश्यक आहे हें होय.

६. देणग्या देण्याची पद्धत बंद करून पगारांत थोडीशी कायमची वाढ करण्यांत आली व ही गोष्ट आगरकरांनीं घडवून आणिली. सभासदांच्या समतेला देणग्यांची पद्धत विरुद्ध होती हें एक. शिवाय दुसरें असें कीं वर सांगितल्याप्रमाणें संस्थेची सांपत्तिक स्थिति आतां सुधारलेली होती. म्हणून संस्थेचें पाऊल पुढें पडावें, कॉलेजच्या कामाचा विस्तार व्हावा वगैरे गोष्टी सभासदांच्या मनांत याव्या यांत नवल नव्हतें. सरकारी ग्रँट घेण्याविषयीं कॉलेजांत असेपर्यंत टिळक केव्हांही विरुद्ध नव्हते. किंबहुना ज्याप्रमाणें कॉलेजला फर्ग्युसन साहेबांचें नांव देण्याच्या बाबतींत त्यांनीं नामजोशांचें समर्थन केलें त्याचप्रमाणें ग्रँटच्या बाबतींतही ती मिळविण्यासाठीं ज्यांचा विशेष आग्रह होता त्यांत ते प्रमुख होते. अर्थात् सोसायटीनें सरकारी ग्रँट घेतली म्हणून त्यांनीं संस्थेला रामराम ठोकला नाहीं हें स्पष्ट होतें. त्यांच्या राजीनाम्यांत ग्रँट घेतली म्हणून आपण कॉलेज सोडीत आहों असें त्यांनीं कोठेंही म्हटलें नाहीं. तेव्हां या बाबतींत ज्या गोष्टी, दंतकथा, नवलकथा, काव्यें, पुराणें वगैरे प्रसिद्ध आहेत तीं सर्व सपशेल खोटीं आहेत, तीं सत्याच्या आधारानें लिहिलेलीं नाहींत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सोसायटींत नवे सभासद आले. प्रत्येकाची निरनिराळी उमेद होती. त्या सर्व उमेदीच्या जोरावर कॉलेजचें पाऊल पुढें पडावयाचें होतें. सुदैवानें कित्येक सभासद बुद्धीनें, कर्तृत्वानें, योग्यतेनें श्रेष्ठ होते. त्यांचें कौतुक आगरकरांना वाटे. त्यांच्या हातून मोठमोठीं कार्यें होऊन त्यांचा वैयक्तिक नावलौकिक वाढला म्हणजे संस्थेचा नावलौकिक होईल व संस्थेच्या हातून अधिकाधिक कार्य होईल हें त्यांना मान्य होतें. शिवाय आगरकरांच्या स्वभावांतच कोणाच्याही कर्तृत्वासंबंधीं आनंद व कौतुक हीं असत. पण दुर्दैवानें टिळकांना प्रत्येक सभासदाच्या वैयक्तिक उत्कर्षाबद्दल हेवा वाटूं लागला. या सभासदांत टिळकांच्या योग्यतेचे कोणी नव्हते, टिळकांना हेवा

फार तर रानडे तेलंगांविषयीं वाटला असता, अशा तऱ्हेची एक उपपत्ति अलीकडे कांहीं अर्धवट आणि पोरकट लेखकांनीं काढलेली आहे. या लेखकांना वस्तुस्थितीचें ज्ञान नसल्यामुळें व तें समजावून घेण्याची इच्छा नसल्यामुळें त्यांच्या बरळण्याकडे कोणी लक्ष देत नाहीं व म्हणून या उपपत्तीची चर्चा करण्याचेंही कारण नाहीं. वामनराव आपटे हे बुद्धिमत्ता, विद्वत्ता, शिक्षण, कुशलता, उद्योग वगैरे सर्व बाबतींत टिळकांच्याहून असले तर कांकणभर अधिकच होते. त्यांचा अकाल मृत्यु न होता तर अर्वाचीन कालांतील संस्कृत पंडितांत मुकुटमणि म्हणून त्यांचें नांव राहिलें असतें याबद्दल शंका नाहीं. आगरकरांना हजारों अडचणी सोसून अभ्यास करावा लागला आणि त्यांत ते कडेपर्यंत गेले. त्यांची बुद्धिमत्ता कमी कुशाग्र होती हा त्यांच्यावर किंवा पुढें गोखल्यांवर आरोप करणें म्हणजे बालिशपणाची कमाल होय. यावेळीं जें होऊं लागलें तें हें कीं कोणत्याही सभासदाला आपल्यासारखी लोकांत प्रसिद्धी मिळूं नये असें टिळकांना वाटूं लागलें व आगरकरांना तसें वाटत नव्हतें म्हणून त्यांना आगरकरांचा राग आला. आपट्यांनीं संस्कृत कोष लिहिला त्यासंबंधीं टिळकांनीं जे राजीनाम्यांत तारे तोडले आहेत व "माझ्या मनांत असतें तर मीसुद्धां असला कोष केला असता" म्हणून जी स्वतःची जी शेखी मिरविली आहे ती विशाल बुद्धिमत्तेची निदर्शक नसून त्यांच्या त्या वेळच्या पोरकटपणाची निदर्शक आहे. अशी शेखी प्रत्येक गोष्टीबाबद प्रत्येक सभासदाकडे जाऊन ते मिरवीत होते व मी तुमच्यापेक्षां फार श्रेष्ठ आहें असें त्यांना समजावून सांगत होते असें त्यांच्या राजीनाम्यांतील मजकुरावरून दिसतें. अर्थात् अशा गोष्टीचा परिणाम व्हावयाचा तो झाला. पगाराच्या वगैरे बाबतींत सभासदांच्या समान योग्यतेच्यासंबंधीं सोसायटीनें ठराव केला. पण टिळकांनीं दुसरी युक्ति काढली. "कोणत्याही सभासदानें ग्रंथ लिहितां उपयोगी नाहीं, कोणत्याही संस्थेंत कसलेंही काम करतां उपयोगी नाहीं, त्यांच्या पगाराव्यतिरिक्त एक दिडकीही ग्रंथकर्तृत्वामुळें त्यांना मिळतां उपयोगी नाहीं, हें असें करणें म्हणजे संस्थेच्या मूळ तत्वावर घाव घालणें आहे, असें करण्यानें शिक्षणाचें काम चांगलें होत नाहीं" असा आरडा त्यांनीं सुरू केला व आपट्यांसारख्या महापंडिताला 'शिकवावें कसें' याचा उपदेश करण्याच्या भानगडींत पडले. आपट्यांनीं कोष लिहिला, गोखल्यांनीं अंकगणित लिहिलें, गोखले सार्वजनिक सभेचें काम पहाण्यांत कांहीं वेळ घालवूं लागले (त्यांत त्यांना दिडकीचीही

किफायत नव्हती ) वगैरे ज्या तक्रारी टिळकांनीं त्या वेळीं केल्या त्याच टिळकांनीं पुढें १९०६–७ सालीं कॉलेजांतील शिक्षकांनीं सार्वजनिक कामांत पडलें पाहिजे इतकेंच नव्हे तर विद्यार्थ्यांनींही पडलें पाहिजे अशा अर्थाचे किती तरी लेख लिहिले आहेत. यावरून निष्पन्न एवढेंच होतें कीं १८९० सालापूर्वीं टिळकांनीं जीं "तत्वें" म्हणून उभीं करण्याचा अट्टाहास केला तीं तत्वें नव्हतीं तर त्यांच्या अंतःकरणाचा कबजा ज्या घाणेरड्या मत्सरानें घेतला होता त्याचीं तीं हिडिस अपत्यें होतीं. संस्थेचीं तत्वें काय होतीं हें निदान आगरकर आणि आपटे यांना माहीत होतें व त्या तत्वांची हानि होऊं नये म्हणून निदान टिळकांइतकी त्यांना काळजी होती. आपट्यांच्या दुसऱ्या कोपाला प्रतिस्पर्धी म्हणून आणखी एक कोप उत्पन्न करण्याचा उद्योग टिळकांनीं केला; व तसें करण्यांत आपण आपल्या संस्थेंतील सभासदांच्यासंबंधीं अश्लाघ्यपणें वागत आहोंत ही कल्पनासुद्धां त्यांच्या मनांत नव्हती असें स्पष्ट दिसतें. टिळकांची एकदां ज्यावर खप्पा मर्जी झाली त्याची अब्रू काढण्यासाठीं, त्याचें वाटोळें करण्यासाठीं, टिळक सद्सद्विवेक करीत होते असें दिसत नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे. अशा मनोवृत्तीमुळें सोसायटींतील प्रत्येक सभासदाशीं टिळकांच्याच करणीमुळें एकदोन वर्षांत त्यांचें अगदीं वांकडें आलें.

७. टिळकांच्या या तंटेखोरीच्या मोहिमेशीं आगरकरांचा प्रत्यक्ष संबंध कांहीं नव्हता. पण टिळकांना वाटे कीं यांत आगरकरांनीं आपली बाजू घेतली असती तर आपला विजय झाला असता आणि पुढें त्यांना वाटूं लागलें कीं आगरकर नसते तर सोसायटीच्या इतर सभासदांना आपण सहज खिशांत घातलें असतें. ही त्यांची कल्पना अर्थात् बरोबर नव्हती. कॉलेजचें व शाळेचें काम सर्व प्रकारें सुरळीत चाललें होतें याचें पुष्कळसें श्रेय वामनराव आपट्यांच्या कर्तबगारीला व शिस्तीला होतें आणि त्यांचें या बाबतींतील नेतृत्व त्यांच्या टिळकांखेरीज इतर सर्व सहकाऱ्यांनीं आनंदानें व अभिमानानें मान्य केलें होतें. शिस्तीच्या क्षुल्लक बाबतींतसुद्धां टिळक आपट्यांना त्रास देऊं लागले. आपटे पुढें कंटाळून टिळकांना म्हणाले, "तुम्ही प्रिन्सिपाल व्हा. तुम्ही घालाल ती शिस्त पाळण्याला मी तयार आहें. पण तुम्हांलासुद्धां शिस्त म्हणून कांहींतरी पाळावी लागेल." पण जबाबदारी अंगावर घेणें हें धोरण तेव्हांही टिळकांचें नव्हतें. आपण कसलीही जबाबदारी अंगावर न घेतां केवळ लोकांची कुचेष्टा करावयाची हें त्यांचें धोरण अथपासून इतिपर्यंत अबाधित राहिलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

वास्तविक आपल्यांसारख्या विद्वानानें कोष लिहिला यांत योग्य अशीच गोष्ट घडली नाहीं काय ? आणि त्याचा मोबदला म्हणून शें दोनशें रुपये आपल्यांना मिळाले म्हणून एवढें अकांडतांडव टिळकांनीं केलें यांत त्यांचें मनोलाघव अत्यंत हिडिस स्वरूपांत दिसून येतें. त्या मनोलाघवावर तत्वांचा मुलामा चढविण्याची त्यांनीं शिकस्त केली व सोसायटीच्या सभासदांना आतां चैन करण्याची इच्छा झाली आहे असेही आरोप करण्यास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. सोसायटीच्या सभासदांनीं केव्हांही कसल्याही परिस्थितींत पाउणशें रुपयांत प्रपंच चालविला पाहिजे असें म्हणणारे टिळक स्वतः किती खर्च तेव्हां करीत होते हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांच्या मनोवृत्तीचें आश्चर्य वाटतें. परंतु कोणालाही सढळ हातानें पगार द्यावयाचा नाहीं हा त्यांचा स्वभाव होता असें म्हटलें पाहिजे; कारण केसरीच्या संपादकवर्गाला त्यांच्या मृत्यूपर्यंत जो पगार मिळत असे त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. त्यांच्या मृत्यूनंतर तीच संपादक मंडळी केसरीची जवळ जवळ मालक नसली तरी मुखत्यार व्यवस्थापक झाली व या पगाराची वाढ शेंकडों टक्क्यांनीं करण्याला त्यांनीं फारसा विलंब लाविला नाहीं यावरूनही वरील विधानाला बळकटी येते. बाहेरचें काम कोणीही कसलेंही करतां कामा नये असें म्हणणारे टिळक भांडणाच्या भरांत त्यांच्या मतानें न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक जे शास्त्रीबुवा ते बाहेरचे उद्योग किती करीत व त्यापासून पैसा कसा मिळवीत हें विसरले असें दिसतें. नामजोशांचे तर इतके बाहेरचे धंदे असत कीं त्यांचा शाब्दिक कां होईना पण टिळकांना अनेक वेळां निषेध करावा लागला. खुद्द टिळक म्युनिसिपालटी, कांग्रेस वगैरे प्रकरणांत पुष्कळ वेळ घालवीत. असें असूनही गोखले सार्वजनिक सभेचे चिटणीस झाले म्हणून त्यांनीं छाती बडविण्यास व कॉलेजचें काम चांगलें होणार नाहीं म्हणून ओरडा करण्यास सुरवात केली. गोखल्यांनीं अंकगणित लिहिलें याचीही त्यांना चिरड आली. गोखले गणित शिकवीत. त्यांनीं अंकगणित लिहिलें यांत काय बिघडलें ? पण कोणालाही शाळेचें काम चोख करून उरलेल्या वेळांतसुद्धां कीर्ति व पैसा बिलकुल मिळतां कामा नये हा टिळकांचा कटाक्ष होता. त्यावेळीं त्यांचें वय लहान होतें तेव्हां या सर्व गोष्टी संतापीपणामुळें व पोरकटपणामुळें घडल्या असें म्हणून या किळसवाण्या प्रकरणावर पडदा ओढावा हें बरें दिसतें. पण त्यांना असला कोणताही आरोप आगरकरांवर घालतां येईना. आगरकर वर्तमानपत्र चालवीत होते तर टिळकही

चालवीत होते. कोष लिहून किंवा अंकगणित लिहून जर कॉलेजच्या कामाची आबाळ होते असें समजलें (आम्ही तसें बिलकुल समजत नाहीं) तर आठवड्याचें वर्तमानपत्र काढल्यामुळें ती त्याच्या शतपटीनें झाली पाहिजे. पण या सर्व वादांत टिळक वर्तमानपत्रांचें नांवही काढीत नाहींत; कारण स्वतः ते वर्तमान-पत्र चालवीत होते. यावरूनच या कामांत त्यांची दृष्टि कशी सदोष व पक्ष-पाती होती हें दिसतें.

८. कॉलेजच्या कॉमनरूममध्यें बहुतेक बहुमतानें निकाल लागे त्यामुळें टिळकांची स्थिति अगदीं करुणास्पद झाली होती असें त्यांच्याच शब्दांवरून दिसतें. त्यांनीं केलेल्या आरोपाकडे वेड्या किंवा माथेफिरू माणसाच्या बरळण्याप्रमाणें कोणी लक्ष देईनासें झालें हें साहजिक होतें. तेव्हां त्यांची मजल याहीपुढें गेली. त्यांनीं नैतिक बाबतींत आपल्या सहकाऱ्यांवर आरोप करण्याचा गलिच्छ प्रयत्न आरंभला. ज्या गांवगुंडांचे ते पुढारी बनले होते व ज्यांच्या स्तुतीला भाळून आपल्या ध्येयापासून व तत्वापासून ते भ्रष्ट झाले होते त्यांना अर्थात् या गोष्टी पसंत पडत. तरीसुद्धां या वेळीं आगरकरांच्यावर पैसे खाल्ल्याचा जो आरोप त्यांनीं आणला तो टिळकांच्या चरित्रांतसुद्धां अपूर्व समजला पाहिजे आणि त्यामुळें त्या चरित्राला लागलेला कलंक केव्हांही पुसला जाणें शक्य नाहीं. या बाबतींत पुढील उतारा वाचला म्हणजे या आरोपाच्या भयंकर गलिच्छतेचें स्वरूप लक्षांत येतें. रा. रा. बा. मा. आंबेकर यांनीं आपल्या "टिळक-जीवन-रहस्य"या लहानशा पुस्तकांत यासंबंधीं सविस्तरपणें लिहिलें आहे. त्यांना अद्यापि योग्य उत्तर मिळालें नाहीं यावरून त्यांच्या लिहिण्याची समर्प-कता दिसून येते. तेव्हां रा. आंबेकरांनीं केलेलें या किळसवाण्या प्रकारासंबंधीं विवेचन येथें उतरून घेणें इष्ट दिसतें. रा. आंबेकर लिहितातः—" राजीनामा देऊन स्वतः सोसायटी सोडून जातांना सोसायटींत शिल्लक राहिलेल्या माण-सांच्यामागें जन्मभर कांहींतरी शुष्ककाष्ठ लागावें या हेतूनें टिळकांनीं जेजुइट तत्वाचें नसतेंच लचांड आपल्या राजीनाम्यांत घुसडवून दिलें. त्याचप्रमाणें सोसायटीसंबंधानें लोकांच्या मनांत अप्रियता उत्पन्न व्हावी या हेतूनें न्यू इंग्लिश स्कूलच्या आद्य संस्थापकांपैकीं सोसायटींत अवशिष्ट राहिलेले रा. गोपाळ गणेश आगरकर यांच्याहीवर एका गलिच्छ आरोपाचे शिंतोडे उडविण्याचा त्यांनीं

१ टिळकजीवनरहस्य; लेख ९ वा.

अश्लाघ्य प्रयत्न केला. तो प्रयत्न होळकरांच्या देणगीसंबंधानें होय. या देणगी-संबंधांत राजीनाम्यांतील मजकुराच्या आधारानें (टिळक) चरित्रकारांनीं दोन विधानें केलीं आहेत.

(१) होळकरांनीं दिलेल्या सातशें रुपयांपैकीं टिळकांनीं आपल्या वांट्याची रक्कम संस्थेस दिली व (२) आगरकरांनीं आपली रक्कम खाजगीकडे घेतली, हींच तीं दोन विधानें होत आणि तीं दोन्ही विधानें निखालस खोटीं आहेत. एक तर, ही रक्कम टिळक व आगरकर या दोघांना मिळून दिली अशी मुळींच वस्तुस्थिति नव्हती. अर्थातच सदरील रकमेंत टिळकांचा वांटाच नव्हता, तर ते तो संस्थेस जमा करतील कसे? या देणगीसंबंधांत टिळकांनीं नसतेंच भांडण उपस्थित केल्यामुळें "असला मत्सरानें विटाळलेला पैसा मी विष्टेसमान मानतों; मी त्याला स्पर्शही करणार नाहीं" अशी आगरकरांनीं प्रतिज्ञा केली आणि ती आगरकरांची प्रतिज्ञा असल्यामुळें शब्दशः पाळण्यांत आली हें सांगावयास नकोच. यावरून वरील दोन्ही विधानें सर्वस्वीं कशीं असत्य आहेत याबद्दल वाचकांची खात्री होईल.

सातशें रुपयांच्या देणगीपैकीं आगरकरांना त्यांच्या 'वाक्यमीमांसा' या पुस्तकाबद्दल बक्षिसादाखल चारशें रुपये द्यावे व बाकीची रक्कम दहा सभासदांत वांटून द्यावी असें श्री. महाराज शिवाजीराव होळकर यांजकडून सोसायटीस कळविण्यांत आलें होतें. (टिळक) चरित्रकार टिळकांच्या राजीनाम्यांतील वाक्यें उद्धृत करून म्हणतातः—"प्रथम ही रक्कम सोसायटीस मदत म्हणून देण्यांत आली असून मागाहून त्यांतील चारशें रुपये आगरकरांना वाक्यमीमांसा या पुस्तकाबद्दल बक्षिस द्यावे व फक्त तीनशें सोसायटीच्या इतर सभासदांनीं घ्यावे असा हुकूम आणविण्यांत आला." रुपयांची वांटणी अमुक प्रकारें करावी अशाबद्दल आमच्या माहितीची व टिळकांनीं राजीनाम्यांत घातलेल्या वरील उताऱ्यांतील वाक्यांची एकवाक्यता आहे. पण "असा हुकूम आणविण्यांत आला" अशी यांत टिळकांनीं जी हिकमत लढविली आहे तीच वस्तुस्थितीचा विपर्यास व लोकांचा गैरसमज करणारी आहे. 'हुकूम आणविण्यांत आला, या राजीनाम्यांतील वाक्यावरून जमल्यास सबंध रक्कम नाहीं तर निदान यांतला कांहीं भाग आपल्या पदरांत पडावा असाच आगरकरांचा हेतु असल्याचें ध्वनित करण्याचा टिळकांचा स्पष्ट हेतु दिसतो. होळकरांकडून रक्कम मिळाल्याची तारीख व या रकमेची विल्हेवाट कशी लावावयाची या

संबंधानें त्यांचें आलेलें पत्र यांत जर अनेक दिवसांचें अंतर असतें तर 'हुकूम आणविण्यांत आला' हें विधान सकृद्दर्शनीं तरी खरें वाटण्याचा संभव होता. हुकूम आणावयाचा म्हटल्यास रक्कम हातीं आल्यानंतर व तिजबद्दल टिळकांनीं वाद उपस्थित केल्यानंतर खुद्द आगरकरांनीं किंवा सोसायटीच्या सेक्रेटरींनीं होळकरांकडे पत्र पाठवावयाचें व होळकरांकडून त्याला उत्तर यावयाचें असा विधि व्हावयास पाहिजे होता. पण वस्तुतः हें पत्र रकमेच्या पाठोपाठ आलेलें आहे असें आम्ही खात्रीलायक आधारावरून म्हणतों. आपल्या बाजूचें मंडन होईल अशा रीतीनें या प्रकरणाची निरनिराळया दोन ठिकाणीं हकीकत देऊन (टिळक) चरित्रकार म्हणतातः—" केवळ आगरकरांना कमीपणा देण्याकरितां आपली निम्मी रक्कम सोसायटीकडे जमा करण्याचा डाव कपटानें खेळून टिळकांनीं आगरकरांना तोंडघशीं पाडलें असें मानण्यास आधार नाहीं. " *

या वाक्यावरून एकंदर तीन 'इशूज' म्हणजे मुद्दे निघतात. (१) आगरकरांना कमीपणा देण्याचा टिळकांचा हेतु नव्हता काय? (२) टिळकांनीं आपली निम्मी रक्कम सोसायटीकडे जमा केली आहे काय? (३) कपटाचे डाव खेळणें हें टिळकांच्या स्वभावास अपरिचित होतें काय?

यांतील दुसऱ्या मुद्यावर उत्तरच देण्याचें कारण नाहीं. कारण टिळकांची निम्मी रक्कम नव्हतीच तेव्हां ते ती कोठली जमा करणार? होळकरांनीं सातशें रुपयांची रक्कम टिळक व आगरकर यांनीं निम्में निम्में वांटून घ्यावी असा संकल्प आरंभींच दर्शविला असता तर तो मागाहून फिरणें शक्य होतें का? याचाही विचार या ठिकाणीं करणें अवश्य आहे. रकमेची वांटणी व्हावी या संबंधानें सोसायटींतील टिळकेतर सभासदांनीं होळकरांकडून हुकूम आणविला असें गृहीत धरल्यास होळकर हे या सभासदांच्या हातचें बाहुलें होतें असें मानावें लागेल. शिवाय आगरकरांसारखा जाज्वल्य स्वार्थत्यागाचा, विलक्षण मानी पण सरळ स्वभावाचा माणूस, आपल्याला रक्कम मिळावी या क्षुद्र हेतूनें

---

* चरित्रकारांना आधार सांपडला असो किंवा नसो, खुद्द त्यांच्या डोक्यांत टिळक या बाबतींत कपटानें डाव खेळले अशी जबरदस्त शंका आल्याचें वरील वाक्यावरून स्पष्ट दिसतें. त्या डावानें आगरकर तोंडघशीं पडले नाहींत हा आगरकरांच्या पुण्याईचा परिणाम होता. तिच्यापुढें टिळकांचें चाललें नाहीं ही बाब निराळी आहे.

महाराजांकडून हुकूम आणविण्यासारख्या क्लृप्तीस मान्यता देईल हें केव्हांही शक्य नव्हतें. तात्पर्य काय कीं, कै. शिवाजीराव होळकर यांचा एककली स्वभाव व आगरकरांचें उज्वल चारित्र्य यांचा विचार करतां हुकूम आणवि-ल्याची ही कल्पित गोष्ट कोणीही समंजस माणूस क्षणभरही खरी मानील असें आम्हांस वाटत नाहीं. अर्थात्, टिळकांनीं वस्तुतः जी आपली नव्हती त्या निम्मे रकमेचें 'आपली' असें नांव ठेवून ती सोसायटीकडे जमा केली असेल तर तो आगरकरांना तोंडघशीं पाडण्याकरितां कपटानें खेळलेला डावच होता हें सिद्ध होतें. टिळकांनीं आपल्या आयुष्यांत कपटाचे असे डाव अनेक प्रसंगीं खेळलेले आहेत ही गोष्ट त्यांच्या भक्तांसही नाकबूल करतां येणें शक्य नाहीं. फार कशाला, त्यांच्या एका भक्तनायकानें हें जें सातशें पानांचें चरित्र लिहि-लेलें आहे त्यांतही हे कपटांचे डाव येथून तेथून पसरलेले दिसतील. टिळकांचें चरित्र म्हणजे कपटाच्या डावांचा चित्रविचित्र गालिचाच आहे, याबद्दल टिळ-कांच्या भक्तांत व आमच्यांत द्विधा मत नाहीं. द्विधा मत आहे तें त्यांचे भक्त टिळकांच्या या 'हिकमतबहादुरीचें' भाविकपणानें कौतुक करतात आणि आम्ही त्याचा निर्भेळ निषेध करतों यांतच आहे !

आगरकरांना कमीपणा आणण्याचा टिळकांचा हेतु नव्हता का? याचेंही उत्तर अस्तिपक्षीं म्हणजे 'होय, होता' असेंच दिलें पाहिजे. सोसायटी सोडून जावें असें टिळकांना वाटूं लागलें तेव्हांपासूनच सोसायटींत शिल्लक राहणाऱ्या प्रमुख सभासदांवर व्यक्तिशः व समूहशः कांहींतरी नवीनच बिनतोड तोहमत ठेवण्याचे कामीं त्यांच्या कल्पक डोक्यांत धडपड सुरू झाली आणि होळकरांच्या देणगीसंबंधांतील क्लृप्ति हें त्याच धडपडीचें नामांकित अपत्य होय. पण हें अपत्य अगदींच अल्पजीवी ठरलें. कारण आपली मुळींच नसलेली निम्मी रक्कम सोसायटीकडे जमा करण्याचा त्यांचा डाव, रक्कम हातीं येणें व होळकरांचें पत्र येणें, या सर्व व्यवहाराच्या दरम्यानचा काळ म्हणजे सुमारें पंधरा सोळा तासच होता. टिळकांच्या कल्पनेचें व मायावीपणाचें हें अपत्य फक्त कांहीं तासाच्या गर्भावस्थेनंतरच जन्मावस्थेस आलें आहे. पण त्यानें एका थोर व असामान्य पुरुषाच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचें काम, कांहीं काळपर्यंत कां होईना, पण बिनतोड रीतीनें केलें. असो. या खुलाशानें तरी हें गुणी अपत्य कोणत्या जातीचें आहे, व त्याच्या जनकत्वाचा मान कोणाकडे येतो याचा खरा इतिहास जनतेस पटेल असा आम्हांस पूर्ण भरंवसा वाटतो.

........महाराज संभावनेदाखल उभयतांना कांहीं रक्कम देणार अशी टिळकांना आधींच कल्पना झाली होती........कल्पनेप्रमाणें संभावनेदाखल कांहीं रक्कम मिळाल्यास ती सोसायटीला द्यावयाची हें टिळकांच्या वैराग्यशील मनानें ठरविणें व तें त्यांनीं आगरकरांना कळवून त्यांचेकडून त्याबद्दल मान्यता घेणें हें क्रमप्राप्तच होतें आणि त्याप्रमाणें तें सर्व घडूनही आलें! पण महाराज टिळकांच्या बारशाला जेवलेले! टिळकांचें दर्शन होतांच या सर्व कल्पना व त्यांवर टिळकांनीं रचिलेला व्यूह हें त्यांच्या अचूक ध्यानांत येऊनच कीं काय त्यांनीं आपल्या देणगींतून नेमकें टिळकांना खड्यासारखें वगळलें......दोघांना पाहिल्याबरोबरच आगरकर हे सच्चे आहेत अशी त्यांची भावना झाली व या गृहस्थाला कांहीं रक्कम द्यावी असें साहजिकच त्यांच्या मनांत आलें. रोकड रक्कम द्यावी तर ते घेणार नाहींत असें त्यांच्या समीपवर्ती माणसांनीं त्यांना सांगितल्यावरून "वाक्यमीमांसा" या पुस्तकाच्या पांच सहाशें प्रती घेऊन त्यांना ही रक्कम पोंहोंचवावी असें त्यांनीं ठरविलें आणि त्याप्रमाणें रकमेच्या पाठोपाठ पत्रही पाठविलें. टिळकही कांहीं कमी नव्हते. कोणतेंही काम हातीं घेतलें म्हणजे ते एका क्षणाचाही आळस करणारे नव्हते. रक्कम आली रे आली कीं त्यांतल्या निम्यावर आपले "गोमागणेशी" शिक्कामोर्तब करून ती त्यांनीं सोसायटीस देऊनही टाकली! त्यांनीं कोणालाही न कळवितां सवरतां गुप्त दान करण्याकरितां हा जो परस्पर स्वार्थत्याग करण्याचा उदात्त हेतु अमलांत आणण्याचा घाट घातला होता तो होळकरांच्या पत्रानें समूळ फसला! कारण टिळकांनीं जमा केलेल्या रकमेची शाई वाळते न वाळते तोंच होळकरांचें पत्र येऊन त्यानें टिळकांना सबंध रकमेच्या तीन सप्तमांशाच्या (तीनशेंच्या) एक दशांशाचें म्हणजे अवघ्या तीस रुपयांचे मालक ठरविलें! होळकरांची रक्कम आणि पत्र यांजमधील कांहीं थोड्याच तासांच्या अवधींत टिळकांनीं या प्रकरणीं जी उलाढाल केली तिचा विचार करतां "आगरकरांना तोंडघशीं पाडण्याचा हा टिळकांचा डाव होता" असें म्हणण्याशिवाय गत्यंतर रहात नाहीं आणि वस्तुस्थितीही तशीच होती. तरीसुद्धां ज्या पैशाकरितां, होळकरांचें पत्र आलें असतांही, टिळकांनीं इतका वाद माजविला त्यांतील एक पैही घ्यावयाची नाहीं हा आपला बाणा आगरकरांनीं आचरणांत आणला हीच यांतील मुद्याची गोष्ट होय.

होळकरांकडून आपल्याला रक्कम मिळाल्यास ती सोसायटीला द्यावयाची

असें टिळक व आगरकर यांचें खरोखरच ठरलें असतें तर त्यांतून आगरकर माघार घेतील अशी त्यांच्या कट्टया शत्रूंचीही कल्पना होणार नाहीं. ज्यानें आपलें सर्वस्व शिक्षणकार्यास अर्पण करून आजन्म निस्सीम स्वार्थत्याग केला तो गृहस्थ, एका चारशें रुपयांकरितां एवढी घासाघीस घालीत बसेल कीं काय, याचा निवाडा कोणासही सहज करतां येण्यासारखा आहे. आपण दोघेही महाराजांना भेटावयास गेलों, आपला दोघांचाही दर्जा सारखा, असें असून महाराजांनीं आगरकरांचाच गौरव करावा आणि आपल्याकडे दुर्लक्ष्य करावें ही गोष्ट टिळकांच्या आत्मैकनिष्ठ व महत्त्वाकांक्षी मनास दुःसह वाटावी हें स्वाभाविक आहे आणि पुढें जें या गोष्टीचें एवढें कल्पित कथानक त्यांनीं रचिलें त्याचें मूळ टिळकांच्या या मनोवृत्तींतच खोल गेलेलें सांपडेल.

होळकरप्रकरणाची बोर्डापुढें चर्चा झाली त्या वेळीं टिळकांचा विरोधी पक्षच नव्हे तर त्यांचे जिवलग स्नेही म्हणविणारे सभासदही आगरकरांच्या बाजूस होते ही या संबंधांतील स्थिति सत्य कोणत्या बाजूस होतें, याचें निःसंशय प्रदर्शन करणारी आहे. या संबंधांत आगरकरांवर टिळकांनीं तोंडी व लेखी जे गलिच्छ आरोप केले त्याबद्दल त्यांच्यावर फिर्याद करावी असाही कित्येक सभासदांनीं सल्ला दिला. पण आपसांतील ही यादवी चव्हाट्यावर आणणें हें विशेषतः लोकशिक्षणाचें काम करणारास कमीपणा आणणारें आहे, याच युक्तिवादाचा अखेर जय होऊन या प्रकरणाची कोर्टापर्यंत मजल गेली नाहीं.

“होळकरांना आगरकरांच्याबद्दल विशेष आदर वाटत होता, त्याला दुसराही एक प्रत्यंतर पुरावा आहे. आगरकरांच्या निधनोत्तर त्यांच्या मुलाला होळकरांनीं शिष्यवृत्ति दिली होती ही गोष्ट सर्वांना महशूरच आहे. या सर्व गोष्टींचा समवायानें विचार केला म्हणजे होळकरांच्या देणगीसंबंधानें वस्तुस्थिति काय असली पाहिजे, याचा कोणासही आपल्या मनाशीं उलगडा करतां येण्यासारखा आहे. होळकरांच्या पैशासंबंधांत आपली बाजू सर्वथा सत्य आहे; या कामीं टिळकांव्यतिरिक्त आपले सर्व व्यवसायबंधु आपल्या बाजूचे आहेत, अशी अनुकूल स्थिति असतांही कलहानें कलंकित झालेल्या या पैशावर आगरकरांनीं अखेर उदकच सोडलें, यावरून निष्कलंक चारित्र्य खरोखर कोणाचें होतें, टिळकांचें कीं आगरकरांचें, याचाही आपोआप निर्णय लागतो.”

रा. आंबेकर यांनीं दिलेल्या माहितींत आणखी एक गोष्ट सांगितली म्हणजे त्यांनीं सिद्ध केलेल्या मुद्याला आणखी जोर येतो. होळकर हे आगरकरांना

देणगी देऊनच स्वस्थ राहिले नाहींत तर त्यांना पांचशें रुपयांची नोकरी त्यांनीं देऊं केली होती. आगरकरांनीं दारिद्र्याचें आजन्म लेणें अंगीकारलें होतें. त्यांनीं अर्थात् ती नोकरी पतकरली नाहीं. त्यामुळें महाराजांचा आगरकरांविषयीं आदर शतगुणित झाला यांत नवल नाहीं. रा. आंबेकर यांनीं प्रस्तुत प्रकरणा-विषयीं लिहिलेला मजकूर इतका पूर्ण आहे कीं त्यांत कांहींही भर टाकण्याची जरूरी नाहीं. टिळकांसारख्या एक वेळ प्रिय असलेल्या मित्रानें आपल्यावर असे भयंकर आरोप करावेत यामुळें आगरकरांना अत्यंत दुःख झालें. प्रतिपक्षाशीं धर्मयुद्ध खेळण्यांत ते महारथी होते. पण घाणेरड्या उपायांनीं प्रतिपक्षाला चीत करण्याचे कपटी डाव ते कधींही खेळले नाहींत. टिळकांच्या राजीनाम्यांतील मजकूर, आणि त्यावर त्यांच्या चरित्रकारांनीं आणि चरित्राच्या नांवाखालीं गोष्टी, कादंबऱ्या, आख्यायिका व काव्यें आणि पुराणें लिहिणारांनीं आगरकरांच्या अत्यंत शुद्ध अशा चारित्र्यावर जो निष्कारण शिंतोडा उडविला आहे त्याची योग्य छाननी होणें इतिहासाच्या दृष्टीनें जरूर होतें. तसें करतांना टिळकांचें स्वरूप गर्हणीय दिसतें याला आमचा इलाज नाहीं. टिळकांच्या या असल्या हिकमतीची कोणीच वाच्यता केली नसती तर आपले दांत आणि आपले ओंठ या न्यायानें आम्हीही यासंबंधीं मुग्धता स्वीकारिली असती. पण टिळकांच्यामुळें जर तत्कालीन मोठ्या माणसावर भलभलते आरोप झाले असले व त्यांचीं भपके-दार वर्णनें जर टिळकांचे चरित्रकार देऊं लागले तर स्वस्थ बसणें म्हणजे खोटा इतिहास लिहिणें व सत्याचा अपव्यय करणें असें होईल.

९ होळकर देणगीसंबंधीं नुकत्याच दिलेल्या हकीकतीवरून केसरींतून व खाजगी तऱ्हेनें टिळक कोणत्या प्रकारें आगरकरांवर आग पाखडीत होते हें लक्षांत येतें. १८८९ सालीं टिळकांनीं सोसायटींतून रजा घेतली व पुढें एका वर्षानें म्हणजे १८९० च्या डिसेंबर महिन्यांत त्यांनीं आपला राजीनामा लिहून पाठविला. राजीनाम्यांतील ज्या गोष्टींचा आगरकरांशीं संबंध येतो त्याची चर्चा यापूर्वीं केलेली आहे. इतर मुद्यांचा फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. हम करेसो कायदा ही टिळकांची वृत्ति सोसायटींत फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. प्रत्येक सभासदावर ते कांहीं ना कांहीं तरी उचापत घालूं लागले व त्यांच्या बुद्धिमत्तेविषयीं, विद्वत्तेविषयीं शंका प्रदर्शित करूं लागले. इतर मंड-ळीही कांहीं झाली तरी टिळकांच्या बरोबरची होती. टिळकांनीं जेव्हां त्यांच्या-वर कुत्सित टीका करण्यास सुरवात झाली तेव्हां त्याच शस्त्राचा प्रयोग त्यांपैकीं कांहींनीं टिळकांच्यावर केला असावा असें टिळक लिहितात त्यावरून दिसतें.

सोसायटींत सभासद जमले व टिळक आले कीं लट्टालट्टीस सुरवात होत असे. आगरकरांना व आपट्यांना टिळक हे जावेसें वाटत नव्हते. कसेंही असले तरी एके काळीं त्यांचा स्नेह होता व ते एक संस्थापक सभासद होते. शिवाय कॉलेजचें पाऊल आतां पुढें पडत होतें. नवे वर्ग सुरू होऊन निराळी इमारत बांधण्याचा विचार चालला होता. अशा वेळीं आपापसांत तंटे होऊन ते चव्हाट्यावर यावेत ही गोष्ट त्यांना आवडत नव्हती. पण त्या बाबतींत त्यांनीं जितका चांगुलपणा दाखवावा तितका टिळकांचा हट्ट आणि कुत्सितपणा हीं वाढीला लागलीं. पुनः आगरकर टिळकांचे हजार अपराध पोटांत घालण्याला तयार होते पण दुसरी प्रोफेसर मंडळी टिळकांच्या बोलण्याला व कारवाईला अगदीं कंटाळली. खुद्द टिळक आपल्या राजीनाम्यांत लिहितातः—" जें जें कांहीं चांगलें आणि निर्दोष आहे त्याचा सर्व मक्ता माझ्याकडे आहे असें मीं म्हणतों असें मात्र समजूं नये. मला माझ्या दोषांची पूर्ण जाणीव आहे आणि त्यामुळें कधीं कधीं माझ्या सहकाऱ्यांना माझा राग येण्याला कारण झालें आहे हें मला माहीत आहे. मला माहीत असलेला माझ्यांतील मुख्य दोष म्हणजे कडक आणि लागणाऱ्या भाषेंत विचार प्रदर्शित करण्याची माझी खोड ही होय. मला वाटतें आरंभाआरंभाला मी कांहीं रागीट नसतों पण माझ्या भावना अत्यंत तीव्र असल्यामुळें जेव्हां त्या जागृत होतात तेव्हां कडक लागणारीं उत्तरें देण्याची व टीका करतांना मागेंपुढें न पाहण्याची चुकी माझ्या हातून होते आणि लागणाऱ्या शब्दांमुळें पुष्कळ अनर्थ होतो. "* टिळकांना जरी या दोषाची जाणीव होती असें ते म्हणतात तरी ती सुधारण्याचा त्यांनीं केव्हांही प्रयत्न केला नाहीं आणि जी जाणीव होती तीही फारशी तीव्र होती असें म्हणतां येत नाहीं. आगरकरांवर होळकरांकडून मिळालेले पैसे खाल्याचा आरोप करणें, बोर्डिंगावर नेमावयाच्या मनुष्याचें नैतिक वर्तन चांगलें पाहिजे असें म्हणून आपल्या सहकाऱ्यांच्या नीतिमत्तेबद्दल साशंकता प्रदर्शित करणें, आपट्यांसारख्या माणसाला तो पैशाच्या पाठीमागें लागून संस्थेचें नुकसान करीत आहे असें म्हणणें, या सर्वांचें वर्णन " लागून बोलण्याची खोड " असें टिळक स्वतः करतात. शिवाय वावदूकपणांत त्यांचें तोंड धरणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखेंच होतें. त्यांच्या या वर्तनामुळें सोसायटीच्या

* राजीनामा; परिच्छेद २८.

सभासदांनीं अनेक वेळां त्यांच्याबद्दल निंदाव्यंजक ठराव पसार केले व पुढें पुढें तर त्यांच्याकडे लक्षच द्यावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. इतकें झालें तेव्हां त्यांनीं प्रथम रजा घेतली व नंतर राजीनामा खरडला. त्याचें शब्दशः मराठी भाषांतर पुढें दिलें आहे त्यावरून या सर्व तंट्यांत दोष कोणाचा होता याचा निर्णय दुसऱ्या पक्षाची कैफियत ऐकल्याशिवाय-सुद्धां सुज्ञ वाचकांना करतां येण्यासारखा आहे. राजीनाम्याच्या शेवटीं टिळक म्हणतातः—"आपण काढलेल्या संस्थेचें कल्याण आणि शाश्वतता यांचें मला (फार) मोल वाटतें आणि म्हणून आतां माझ्यापुढें दोन पक्ष आहेत त्यांपैकीं कोणता तरी एक मी उचलला पाहिजे. मी जर तुमच्यांत राहिलों तर अधिक एकोपा कधींही होणार नाहीं व आपण सर्व काळ भांडत बसूं अशी माझी खातरी आहे. अशी स्थिति झाली तर आपल्या शाळेला आणि कॉलेजला केव्हांही शाश्वतता येणार नाहीं. उलटपक्षीं जर मी गेलों तर संस्थेच्या मूळ तत्वांना धक्का बसेल हें मी जाणून आहें. परंतु निदान एकोपा अधिक होईल व तंटेबखेडे कमी होतील." यावरून टिळक कसल्याही तडजोडीला तयार नव्हते हें स्पष्ट होतें. आपण गेल्यास संस्थेच्या मूळ तत्वांना धक्का बसेल हे उद्गार आगरकरांसारखा खंदा वीर संस्थेंत उभा असतांना त्यांनीं काढले यावरून त्यांची अहंमन्यता केवढ्या विस्तृत प्रमाणांत होती एवढेंच सिद्ध होतें. पुढें टिळक लिहितातः—"संस्था काढण्याच्या कार्याला मिळालों ती इच्छा आणि ती संस्था शाश्वत स्थितींत असावी ही तळमळ हे दोन पक्ष जेव्हां मी मज-समोर ठेवतों तेव्हां, मला स्वतःला तसें करणें किती जरी अप्रिय असलें तरी, निघून जाण्याबद्दल तुमची परवानगी मागणें याहून रास्त गोष्ट मला करतां येणार नाहीं असें मला वाटतें. माझ्या भावनांबरोबर फार तुंबळ असें युद्ध मला करावें लागलें आणि नंतर असें करण्याचा मीं निश्चय केला हें मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतों. खरोखर माझ्या जीविताचें ध्येय आज मी टाकून देत आहें. परंतु मला स्वतःला दूर करूनच माझ्या हातून त्याची उत्तम सेवा होईल हाच विचार मला समाधानभूत आहे. जोंपर्यंत मी तुमच्यांत होतों तोंपर्यंत संस्थेचें हित पहाण्यांत मी बिलकुल कसूर केली नाहीं आणि आतां यापुढें तुमच्यांत राहून तिच्या अस्तित्वाला धोका आणण्याची माझी इच्छा नाहीं. आतांपर्यंत तुमच्यांत राहून मी जशी तिची सेवा केली त्याप्रमाणें आतां तुमच्यापासून वेगळा होऊन मी तिची सेवा करीन." टिळकांनीं येवढींच

वाक्यें लिहून राजीनामा लिहिला असता तर बरें झालें असतें व त्यांच्याच शब्दांनीं त्यांच्या भेसुर मनोवृत्तीचें चित्र काढण्याचें अप्रिय काम इतिहासकारांच्या कपाळीं आलें नसतें. "मीच कायतो शहाणा, मी करीन तें सर्वांनीं मानलेंच पाहिजे" ही सुलतानशाही डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या प्रातिनिधिक तत्वावर उभारलेल्या संस्थेंत जेव्हां चालेना व संस्थेंतील प्रत्येक मनुष्य आपल्या विरुद्ध आहे हें जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां टिळकांनीं राजीनामा दिला. तो त्यांनीं दिला नसता तर आणखी थोड्याच अवकाशांत संस्थेंतून एकमतानें त्यांना कायमची रजा मिळाली असती असें तेव्हां संस्थेंत त्यांच्याबद्दल जे वरचेवर ठराव पास झाले होते त्यांवरून दिसतें.

टिळकांच्या सबंद राजीनाम्यांत अंतःकरणाचा भास किंवा आभास काय तो नुकत्याच दिलेल्या शेवटच्या वाक्यांत आहे. राजीनामा दिल्यापासून तों शेवटपर्यंत फर्ग्युसन कॉलेजवर आग पाखडण्याची संधि त्यांनीं केव्हांही दवडली नाहीं. असें असलें तरी वर लिहिलेल्या वाक्यांत लिहिण्याचा भरांत लिहिण्याच्या वेळेला तरी अगदीं प्रामाणिकपणा होता असें आम्हांला वाटतें. राजीनाम्यांत सोसायटीवर व तिच्या सभासदांवर वाटेल ते आरोप केले आहेत ते निराधार आहेत असा ठराव सोसायटीनें पास केला. हा ठराव एकमतानें पास झाला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या आरोपाबद्दल टिळकांच्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद लावावी अशा तऱ्हेचा अभिप्राय गव्हर्निंग बॉडींतील मोठमोठ्या माणसांनीं दिला होता पण टिळकांना कोर्टांत खेंचण्याला आगरकर तयार नव्हते व त्यांच्या चांगुलपणामुळें तो अभिप्राय प्रत्यक्ष सृष्टींत आणण्याबद्दल कोणी आग्रह धरला नाहीं. टिळकांचें म्हणणें कीं संस्थेचे सभासद मूळ तत्वें विसरत आहेत हें अजीबाद खोटें होतें. अर्थात् बहुमताला मान देऊन तीं तत्वें सोडण्याला आगरकर राजी झाले असें एका शहाण्यानें लिहिलेलें वाक्य केवळ खोटें नाहीं तर खोडसाळपणाचें व निर्लज्जपणाचें आहे. बहुमताला खूप करण्यासाठीं आगरकर तत्व सोडतील ही गोष्ट सूर्याची उष्णता नाहींशी होईल असें म्हणण्यासारखें आहे. बहुमताची एवढी चट आगरकरांना असती तर केसरीचें संपादकत्व त्यांनीं कशाला सोडलें असतें? आणि ज्या माणसानें जन्मभर बहुमताशीं रणकंदन करून आपल्या सद्विचारांचें साम्राज्य होण्यासाठीं वाटेल ते हाल सोसले तो मनुष्य सोसायटींत बहुमत झालें म्हणून तत्वत्याग करील ही गोष्ट संभवते तरी काय? खरी गोष्टच अशी

भावना असाव्यात इतकेंच नव्हे तर त्या अतिरेकाच्या स्वरूपांत असाव्यात याचें त्यांना अत्यंत दुःख होई. टीकेला, शिव्याशापाला ते भीत नव्हते. विचार-कलह हा समाजस्वास्थ्याला आवश्यक आहे हें त्यांचें मत होतें आणि धर्म-युद्धानें दोन्ही पक्षांनीं परस्परांवर तुटून पडल्याबद्दल त्यांना वैषम्य नव्हतें. केसरीचा युद्धाचा प्रकार सर्वच निराळा ! आगरकरांच्यावर टीका करणें हें निराळें आणि "माळावरचा महारोगी" असें त्यांचें वर्णन करणें हें निराळें. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व मोठ्या लोकांबाबद टिळकांनीं अशाच प्रकारची भाषापद्धति वापरली होती हें लक्षांत ठेवलें म्हणजे आगरकरांबद्दल त्यांनीं ती वापरली यांत त्यांचा दुरतिक्रम स्वभाव प्रकट झाला याहून अधिक कांहीं म्हणण्याची जरूरी नाहीं. सुधारक निघाल्यापासून आगरकरांच्या मृत्यूपर्यंत टिळकांनीं आगरकरांबद्दल सरळ शब्द असा केसरींत लिहिला नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. जो लिहिला तो त्यांच्या मृत्युलेखांत. उलट आगरकरांच्या लेखांत टिळकांच्याबद्दल जेव्हां जेव्हां नामनिर्देश आहे तेव्हां तो प्रेमळपणाचा आहे हें सहृदय वाचकांच्या लक्षांत आल्यांवाचून रहात नाहीं. सोसायटीला इमारत झाली त्यासंबंधीं सुधारकांत लेख आला आहे त्यांत इमारतीमुळें टिळकांनासुद्धां आनंद होईल असें म्हटलें आहे आणि त्यांच्या कोणत्याही लेखांत टिळकांविषयीं द्वेषमूलक किंवा कुत्सित विधान मिळणार नाहीं. कडक टीका मुबलक मिळेल व ती अपरिहार्य होती. टिळकांनीं सोसा-यटी सोडली तेव्हां आगरकर हेच काय ते अगदीं पहिले (न्यू इंग्लिश स्कूलच्या वेळेपासून) सभासद राहिले. आपटे प्रिन्सिपाल होते पण ते आगर-करानंतर शाळेला मिळाले व त्यांचा शाळेच्या संस्थापकांत अंतर्भाव होत नव्हता. असो. या वेळीं संमतिवयाचा वाद अगदीं भरांत आला होता आणि केसरी व सुधारक यांदरम्यान् कडाक्याचें शब्दयुद्ध चाललें होतें. गांवांतील कांहीं गुंड लोकांनीं तर आगरकरांना तुमचा जीव घेऊं अशी धमकी दिली होती. त्या धमक्यांमुळें गोपाळराव गोखलेसुद्धां थोडेसे घाबरले; पण आगरकर बिलकुल डगमगले नाहींत. ते नित्याप्रमाणें एकटे फिरावयास जात व रात्र पड-ल्यावर घरीं येत. लोकनिंदेची त्यांना पर्वा नव्हती. पण खुद्द टिळकांनीं जेव्हां त्यांच्यावर नाहक व भलभलते आरोप करण्याला सुरवात केली तेव्हां मात्र त्यांना अत्यंत खेद झाला. टिळकांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं "सार्वजनिक विषयांवर वादविवाद करण्याच्या मिषानें खासगी

द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि क्वचित्‌च मिळते" असें वाक्य केसरींत आलें. आपल्यावर खासगी द्वेषाचा आरोप आणि तोही एक वेळ आपला जीवश्च कंठश्च मित्र असणाऱ्यानें केला हें पाहून लोकनिंदेच्या झंझावातानें न हलणारें आणि गांवगुंडांच्या धमकावण्यांना भीक न घालणारें असें आगरकरांचें खंबीर पण प्रेमळ अंतःकरण दुःखानें भरून गेलें व "महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र" म्हणून त्यांनीं एक मनोरम लेख सुधारकांत लिहिला. तो लेख अत्यंत मधुर आणि अत्यंत वाचनीय व मननीय आहे. त्यावरून आगरकरांचें मन किती थोर होतें व जरी टिळकांनीं त्यांना इतक्या कठोरपणानें व दुष्टपणानें वागविलें तरी त्यांच्याबद्दलसुद्धां तें किती उदार राहिलें हें कळून येतें आणि त्याचप्रमाणें आगरकरांचें ध्येय व तें संपादण्याचा मार्ग याचाही त्यामुळें चांगला खुलासा होतो. हा लेख साधारणपणें आत्मचरित्रपर असल्यामुळें व तो लहानसाच आहे म्हणून येथें साद्यंत देणें रास्त वाटतें.

महाराष्ट्रीयांस लिहिलेल्या या अनावृत पत्रांत आगरकर लिहितातः— "प्रिय देशबांधवहो, संमतीच्या बिलाच्या संबंधानें सुधारकांत अलीकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचीं मनें त्यावर रुष्ट झालीं असतील यांत संशय नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थांची स्थापना व उत्कर्ष, त्याचप्रमाणें मराठा आणि केसरी पत्रांचा अवतार, प्रसार आणि करवीर प्रकरण, या गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध त्यांना ठाऊक आहे, व हे दोघे इसम बरींच वर्षें एकमेकांशीं कसे वागत होते हें ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना सुधारकासारख्या नवीन पत्राचें जनन, रा. टिळक व पाटणकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विश्लेप, व प्रस्तुत वादांत सुधारक आणि केसरी पत्राच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडिमार पाहून त्या उभयतांच्या बेबनावास व फुटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें, विषाद वाटणें हें फार स्वाभाविक आहे. पण रा. टिळकांस तीं कारणें अवगत असतां, ज्या पत्राचें आधिपत्य त्यांचेकडे आहे त्याच्या गेल्या अंकांत "ज्यांना वादांत स्वपक्षाची उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर आणि विशेषतः त्यांतील एकदोन व्यक्तींवर, अपशब्दरूपी गोळीबार करणें हीनपणाचें वाटत नाहीं त्यांची कानउघाडणी करण्याच्या

नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजनिक विषयांवर वादविवाद करण्याच्या मिषानें खासगी द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि क्वचित्च मिळते" अशीं दोन वाक्यें आहेत. हीं वाक्यें जेव्हां आमच्या नजरेस पडलीं तेव्हां मात्र आम्हांस मोठा विस्मय वाटला! टिळक आणि आगरकर यांचा खासगी द्वेष! आणि तो कशासाठीं? टिळक आगरकरांचें किंवा आगरकर टिळकांचें कांहीं एक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा "खासगी द्वेष" करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्यापैकीं निदान एकाच्या मतें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघांचा बेबनाव व फूटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते त्या संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनांविषयीं कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला, व याच मतभेदामुळें प्रस्तुत वादांत ते एकमेकांची मुर्वत न ठेवतां, आपापल्या मतांचा आणि पक्षाचा विजय होण्यासाठीं अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं! अशा रीतीनें आपापल्या देशविषयक विचारांचें प्राबल्य स्थापण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झुंजणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पहात राहून व कौतुक करावयाचें तें विसरून जाऊन, अशा युद्धप्रसंगीं केवळ कर्णकटु टणत्कारांच्या श्रवणावरूनच प्रेक्षकांनीं "एकाला दुसऱ्याचा मत्सर उत्पन्न झाला आहे" किंवा कोणीकोणाचें "खासगी द्वेषाचें उट्टें काढून घेत आहे" असा कुतर्क करणें अत्यंत अनुदार होय. एका जननीच्या उदरांतून अवतरलेल्या सहोदरांत देखील जर भांडण किंवा मतभेद झाल्याशिवाय रहात नाहीं, तर ज्यांचा एकमेकांशीं कोणत्याही प्रकारचा कुलसंबंध नाहीं, व ज्यांनीं राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीनें आपल्या हयातींत आपल्या हातून होईल तेवढें देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्यांचे विचार सर्वांशीं न जुळणें व ज्याला त्याला प्रसंगविशेषीं आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतांनीं आरंभिलेल्या सामान्य गोष्टीस आमरण चिकटून राहणें स्वतःस किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणार नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें ज्याच्या मनास जी दिशा अत्यंत आक्रमणीय वाटेल त्यानें ती धरणें, यांत नवल वाटण्यासारखें काय आहे, हें आम्हांस समजत नाहीं. बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठीं भितां? दुष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन

व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचार-कलहाखेरीज होत नाहींत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें व बहुधा आमचे लोक गतानुगतिकच असल्यामुळें, हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे. हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेविली पाहिजे. नाहीं तर त्यापासून पुढें खऱ्या लढाया आणि रक्तस्राव होण्याचा संभव असतो. सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक आणि मंद सुधारक, थंड सुधारक आणि गरम सुधारक, अथवा नानाप्रकारच्या मतांचे नवे आणि जुने लोक यांमध्यें सांप्रतकाळीं जी दुही माजून राहिली आहे ती पाहून घाबरून जाण्याचें किंवा देशावर कांहीं तरी प्रचंड संकट गुदरणार आहे, असें मानण्याचें बिलकुल कारण नाहीं. पाश्चिमात्य शिक्षणामुळें ज्या दिवशीं या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल. त्या दिवशीं अनेक शतकें गाढ निद्रेंत घोरत पडलेला हिंदुस्थान देश किंचित् जागा होऊन चाळवूं लागला, किंवा प्रेतावस्थ झालेल्या त्याच्या विस्तीर्ण देहांत ईशकृपेनें पुनः एकवार चैतन्यावतार झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवशीं त्याचें स्थाणुत्व नाहींसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली ती प्रतिवर्षीं अगदीं यवप्रमाणानें कां होईना पण सारखी वाढत आहे, व जों जों हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तों तों ती झपाट्यानें होऊं लागणार आहे. आतां किती झालें तरी कलह तो कलह! तो कशाही प्रकारचा आणि कितीही सौम्य असला तरी त्यांत अप्रिय असें कांहींच नाहीं, असें कोठून होणार? ज्या दोन मनुष्यांचा परस्परांशीं संबंध आहे, त्यांपैकीं एक दुसऱ्याच्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे कधीं त्या दोघांस एकमेकांशीं वर्दळीस यावें लागेल; कधीं एकमेकांवर शब्दप्रहार करावे लागतील; कधीं उभयतांनीं आरंभिलेल्या कामांतून अंग काढून घेऊन विलग व्हावें लागेल; कधीं पदराला बराच खार लावून घ्यावा लागेल किंवा जीवाकडे न पाहतां अहोरात्र मानसिक व शारीरिक कष्ट करावे लागतील; पण जोंपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठीं व प्रसारासाठीं भांडत आहों असें प्रत्येकाच्या मनांत वागत राहील तोंपर्यंत न्यायसभेंत पक्षकाराचें भांडण भांडणाऱ्या वकिलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप पाहून भयं-

कर नाहीं असें निदान त्यांपैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जें अंतर पडलें आहे तें कमी न होतां कदाचित् अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे, तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळयांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हां आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळयास पाणी येईल व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल !

"धर्म, राज्य व समाज यासंबंधानें अलीकडे जे औपपत्तिक सिद्धांत सर्वमान्य होऊन बसले आहेत त्यांविषयीं आम्हां उभयतांत म्हणण्यासारखा मतभेद नाहीं. मनुष्याच्या बुद्धीचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीनें ब्रह्मांडाच्या आदिकारणांचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं हें धर्मतत्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याहि देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि इंग्लिश लोकांचें साहाय्य असल्याशिवाय आमचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं. याकरितां राजनिष्ठा किंचित् ढळूं न देतां राजकीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आम्ही केलें पाहिजे. नीतिप्रसार, संपत्युत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें लोकशिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्यानें चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे; स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यांत जेवढें अंतर राहूं देणें अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, म्हणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे—वगैरे धार्मिक, राजकीय व सामाजिक विषयांसंबंधानें स्थूल औपपत्तिक सिद्धांत जसे एकाला तसे दुसऱ्यालाही संमत आहेत. दोघांचा जो मतभेद पडतो तो आज तारखेस हे सिद्धांत अमलांत आणण्यासाठीं काय करतां येईल व तें कोणत्या साधनानें करतां येईल, यासंबंधानें पडतो. या घटकेस साध्य असलेल्या सुधारणेची इयत्ता व तिचीं साधनें यांविषयीं टिळकांचे बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे

असल्यामुळें, किंवा त्यांस मान्य असलेल्या विचारांबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें, त्यांचें वर्तन भवभूतीनें रामचंद्राकडून वदविलेल्या—

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा।

(अर्थः—स्नेह, दया, सौख्य फार तर काय लोकांच्या संतोपासाठीं मला जानकीचा देखील त्याग करावा लागला, तरी त्याबद्दल खेद वाटणार नाहीं.) या श्लोकार्थाप्रमाणें होत आहे, व या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें, लोकछंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे; इतकेंच नाहीं, तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुनः त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक्य अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन पोंहोंचलें आहे, व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान त्या कामांत सरकारचें किंवा कायद्याचें साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या श्रद्धाळू, पंडितंमन्य व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोपाचें स्थान त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूळता नसतां, श्री. शिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पांचशें रुपयांची नोकरी ज्यानें 'मला नको' म्हणून सांगितलें; विशेप बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां आज दहा अकरा वर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां ज्यानें सात आठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरी पत्राचे बऱ्यावाईट रीतीनें 'रकाने' भरून काढले इतकेंच नाहीं तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी एवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधीशास अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा ज्यानें आनंदानें सोशिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध वाटेल तें लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर त्यांच्या धमकावण्यांकडे बिलकुल लक्ष न देतां समान शीलांच्या व विचारांच्या मित्रांचें प्रोत्साहन व साहाय्य मिळतांच सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या सुधारणेचा आणि सुधा-

रकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याचेंच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां व लोकमत धडधडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणून बुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेल्या शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यासाठीं आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाचसा काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर व खांद्यावर खेळवून ज्यांनीं लहानाचे थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आप्तांचाही दीर्घ रोप ज्यानें आपणावर करून घेतला आहे—अशा मनुष्याच्या लेखांत कितीही प्रमाद होत असले व केवढीही कटुता असली तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजे. ‘ हा वेडापीर इतके हाल, संकटें व लोकापवाद सोसून ज्या अर्थीं इतकी धडपड करीत आहे त्याअर्थीं ती लोकांस अंतीं हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री असावी ’ असा विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं त्याच्या दोषांबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलें तर ठीकच आहे; पण नाहीं केलें तरी त्यास विशेषसें वाईट वाटण्याचा संभव नाहीं; कारण सारें जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें—

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां
जानंति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

अर्थ—खरोखरीच जे या गोष्टींत आमची निर्भर्त्सना करतात त्यांना कांहींच समजत नाहीं व त्यांच्याकरितां हा आमचा प्रयत्नही नाहीं. माझ्या शीलाचा एखादा इसम कोठें तरी असेल किंवा निपजेल; पृथ्वी अफाट आहे व काळ अनंत आहे ! ”

महाराष्ट्रीयांस लिहिलेलें हें अनावृत्त पत्र वाचतां वाचतां अद्यापही डोळे ओलावतात व अंतःकरण भरून येतें. या पत्रांत आगरकरांचा सर्व इतिहास व त्यांच्या कार्याचें सर्व रहस्य सांठवून ठेवलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सार्वजनिक वादविवादपद्धतीविषयीं त्यांची उच्च व शुद्ध कल्पना, ज्या टिळकांनीं त्यांच्याविषयीं लिहितांना स्नेह, दया किंबहुना सदभिरुचि यांना फांटा दिला होता त्या टिळकांविषयीं त्यांच्या अंतःकरणांत वसणारी प्रेमबुद्धि व कौतुकबुद्धि, त्यांचा विनय व निरभिमान, स्वकार्याविषयीं वाटत असलेला पूर्ण विश्वास, वाटेल ते हाल सोसण्याची तयारी, आपल्यामुळें आपल्या पत्नीला सोसाव्या लागणाऱ्या नाहक छळामुळें त्यांना वाटणारी तळमळ आणि शेवटीं प्रसंग आल्यास सगळ्या जगाच्या विरुद्ध उभें ठाकण्याची त्यांची वीरवृत्ति या सर्व गोष्टी या पत्रांत इतक्या उत्कृष्ट तऱ्हेनें एकवटल्या आहेत कीं टिळकांच्या राजीनाम्यांतील ओळी ओळींतून निघालेले विषाचे फवारे आंगावर घेतल्यानंतर त्याला उतार म्हणून हा लेख फार उपयोगी आहे असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. असला उदार अंतःकरणाचा, निर्मळ वृत्तीचा, सात्विक आचरणाचा, प्रेमळ मनाचा, अतुल धैर्याचा, अपूर्व कर्तृत्वाचा महात्मा प्रिय मित्र म्हणून कोणाला कवटाळावासा वाटणार नाहीं ? अशा मैत्रीचें हातीं असलेलें भाग्य लोकछंदानुवर्तित्वासाठीं टिळकांनीं जाणून बुजून सोडलें. १८९० सालचा टिळकांचा राजीनामा म्हणजे त्यांचा आगरकरांशीं सहकारित्वाचा शेवट होय. १८७९ सालीं ज्या स्नेहाची सुरवात झाली, ज्या स्नेहाच्या जोरावर महाराष्ट्रांत नवीन चैतन्य फोफावलें व नवीन संस्था उत्पन्न झाल्या त्याचें याप्रमाणें रूपांतर लौकिक वैरांत झालें. त्या वैराचें स्वरूप आगरकरांनीं वर्णिलेल्या प्रकारें लक्षांत घेतलें म्हणजे त्याबद्दल कोणासही खेद वाटण्याचें कारण नाहीं. दुर्दैवानें सार्वजनिक वैरासंबंधीं टिळकांची दृष्टि आगरकरांसारखी नव्हती. ती तशी असती तर महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांतील कांहीं हिडिस प्रकरणें गळलीं असतीं. असो. १८९१ च्या सुरवातीला टिळकांचा राजीनामा मंजूर झाला व पुढें थोड्याच दिवसांत केसरी व मराठा या पत्रांची पूर्ण मालकी एकट्या टिळकांकडे आली.

११. आतांपर्यंत दिलेल्या हकीकतीवरून शारीरिक व्याधीबरोबर आगरकरांना मानसिक ताप होण्याला किती कारणें होतीं हें दिसून येतें. आणि त्यांची वृत्ति जर स्वभावतः आनंदी, विनोदी, सहिष्णु आणि प्रेमळ नसती तर या दोन

प्रकारच्या त्रासांतून ते निभावले नसते. "महाराष्ट्रियांस अनावृत पत्र" या लेखांत आगरकरांच्या मनांत कोणाविषयींही द्वेष नव्हता व कसल्याही तऱ्हेचा संताप नव्हता हें स्पष्ट होतें. त्यांच्या भावना तीव्र होत्या पण त्यांची प्रखर टीका सहृदय अंतःकरणांतून बाहेर पडत असे. आणि म्हणूनच मत किंवा मार्ग यांतून उत्पन्न झालेल्या भिन्नतेला टिळकांनीं जें स्वरूप दिलें त्यामुळें त्यांना अत्यंत दुःख झालें. टिळक तर कधीं कधीं त्यांना इतकें टोंचून बोलत कीं कडेपर्यंत आगरकरांनीं त्यांच्याविषयीं एवढी सहिष्णुता कशी राखली याचें नवल वाटतें. बहुधा ज्याप्रमाणें बेसुमार टोंचून बोलणें हा टिळकांचा जन्मस्वभाव होता त्याप्रमाणें कोणाचेंही बोलणें मनांत न ठेवणें हा आगरकरांचा स्वभाव होता. कॉलेजमधील मंडळींत वासुदेवराव केळकर यांच्याशीं टिळकांचें इतरांपेक्षां अधिक काळ जमलें पण पुढें त्यांच्यांतही बेबनाव झाला व त्याचाच परिणाम केसरी व मराठा पत्रांशीं केळकरांनीं आपला संबंध सर्वथा तोडण्यांत झाला. वामनराव आपटे कॉलेजच्या प्रत्यक्ष व्यवहाराचें व शिस्तीचें काम पहात पण कॉलेजचें धोरण व पुढील करावयाच्या गोष्टी यासंबंधीं आगरकर हे संस्थापक सभासद असल्यामुळें त्यांना विचारल्याशिवाय कांहीं होत नसे. सर्वांशीं मिळून मिसळून वागणें ही गोष्ट आगरकरांच्या स्वभावांतच होती त्यामुळें सोसायटीचें काम यापुढें बिनबोभाट चालूं लागलें. कॉलेजसाठीं वर्गणी गोळा करण्याचें काम आतां वामनराव आपट्यांनीं आपल्या अंगावर विशेष जोरानें घेतलें. शिक्षक म्हणून कॉलेजांतील मंडळीचा लौकिक वाढत चालला होता. आगरकरांचें शिक्षक या नात्यानें वर्णन यापूर्वीं एकदां आलेलें आहे. आणि कॉलेजमध्येंही शाळेप्रमाणेंच शिक्षक म्हणून त्यांनीं मोठें नांव कमावलें. ज्या ज्या विद्यार्थ्यांचा त्यांच्याशीं संबंध आला त्या प्रत्येकाला त्यांचीं मतें पसंत पडलीं असें होणें अर्थात् शक्य नव्हतें. पण मतें आवडोत किंवा न आवडोत त्याला आगरकरांच्याबद्दल अत्यंत प्रेम आणि आदर वाटत व त्यांच्या धैर्याविषयीं, स्वार्थत्यागाविषयीं आणि साधेपणाविषयीं अत्यंत कौतुक वाटे. परंतु ज्यांचा त्यांच्याशीं कधीं संबंध आला नाहीं व जे कोणी केवळ विरुद्ध वर्तमानपत्रांतून त्यांच्याबद्दल वाचीत किंवा सुधारणेच्या द्वेष्ट्यांकडून त्यांजबद्दल ऐकत त्यांचा ग्रह कधीं कधीं भलता होई. पण प्रत्यक्ष दर्शनानें असला भलता ग्रह वितळून जाण्याला मुळींच वेळ लागत नसे. त्यासंबंधीं

८ मनोरंजन, आगरकर अंक, पृष्ठ ८६

एका मनोरम प्रसंगाची हकीकत कै. ती. ग. देवधर यांनीं लिहून ठेविली आहे. त्या हकीकतीवरून आगरकरांची राहणीही लक्षांत येते. देवधर लिहितातः—" लोकांच्या विचारांत विलक्षण क्रांति करून सोडणाऱ्या 'सुधारक' पत्राचे संपादक आगरकर हे आहेत तरी कसे हें पाहण्याची पुष्कळांना साहजिकच लालसा होत असे. अशा इच्छेनें प्रेरित होऊन एकदां एक गृहस्थ त्यांना भेटावयाला आले होते. त्या वेळीं आगरकर हे फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांत त्यांनीं आपल्या स्वतःकरतां मुद्दाम बांधलेल्या घरांत रहात असत. या घराच्या अंगणांतील फाटकाजवळ त्यांनीं आपल्याला लिहिण्या बसण्याकरितां म्हणून घरापासून स्वतंत्र अशी एक लहानशी खोली बांधविली होती. सदर गृहस्थ त्यांना भेटावयाला आले, तेव्हां ते या खोलींत बसले होते. त्यांनीं नेहमींप्रमाणें आपल्या अंगांत धाबळीची बाराबंदी घातली असून सकाळची वेळ असल्यामुळें ते पंचा नेसले होते, व वारा लागूं नये म्हणून दुसरा एक पंचा त्यांनीं डोकी भोंवतीं गुंडाळला होता. त्यांना दम्याची व्यथा असल्यामुळें छाती मोकळी होण्यासाठीं तंबाखूंत वैद्यांनीं सांगितलेल्या औषधि मिसळून त्यांना मधून मधून चिलीम ओढावी लागत असे. कर्मधर्मसंयोगानें वरील गृहस्थ आले त्याच वेळीं ते चिलीम ओढीत बसले होते. ते बसले होते ती खोली फाटकाजवळच असल्यामुळें आगरकरांकडे येणारा नवखा मनुष्य प्रथम या खोलींत शिरून " आगरकर कोठें आहेत ?" म्हणून त्यांनाच पृच्छा करीत असे ! त्याप्रमाणें त्यांच्याकडे आलेल्या वरील गृहस्थांनींही 'सुधारकाचे संपादक आगरकर कोठें आहेत ?' म्हणून त्यांच्या जवळच वास्तपुस्त केली.

" आपलें त्यांच्याशीं काय काम आहे ?" आगरकरांनीं त्यांना विचारलें.

ते म्हणाले, " काम कांहीं विशेष नाहीं. त्यांची कीर्ति कानीं पडून त्यांना एकदां भेटावें असें वाटून मी येथें आलों आहें."

आगरकरांनीं चिलीम बाजूला ठेवून उत्तर केलें, " मीच तो सुधारकाचा संपादक आगरकर."

हें उत्तर कानीं पडतांच त्या गृहस्थाच्या चेहऱ्यांत एकदम बदल होऊन विस्मय आणि विरस या दोन मनोविकारांच्या मिश्रणाची त्याच्यावर स्पष्ट छटा दिसूं लागली. अंगांत धाबळीची बाराबंदी घातलेली, डोक्याला पंचा गुंडाळलेली व चिलीम ओढीत खोकत बसलेली ती आगरकरांची प्रत्यक्ष मूर्ति

आणि सदर गृहस्थांनीं आपल्या मनांत कल्पिलेली ती बूट पाटलोण घातलेली, सबंध डोकें राखून पोम्याटम लावून केंस नीट विंचरून भांग काढलेली, गळ्यांत नेकटाय बांधलेली वगैरे नखशिखांत फ्याशननें भरून गेलेली मूर्ति, यांच्यांतील विलक्षण विसंवादित्व पाहून हा गृहस्थ आपली थट्टा करीत असला पाहिजे, अशी शंका येऊन ते म्हणाले, " उगीच अशी थट्टा कां करितां ? सांगा कीं मला आगरकर कोठें आहेत ते ?"

आगरकरांनीं फिरून उत्तर केलें—"मी आपली थट्टा करीत नाहीं; खरोखर मीच तो आगरकर."

तेव्हां ते गृहस्थ मनांत खजील होऊन म्हणाले—"खरें पुसाल तर ' स्त्रियांनीं जाकिटेंच घातलीं पाहिजेत,' असें प्रतिपादणारे सुधारकाचे संपादक आपण असाल, अशी मला कल्पनाच होईना. किती तरी साधी रहाणी ही आपली !"

असो. मग थोडा वेळ उभयतांचें आणखी कांहीं संभाषण होऊन त्यांनीं आगरकरांचा निरोप घेतला. आगरकर स्वतः या प्रकाराची नक्कल करीत, ती ऐकणें म्हणजे एक मौजच असे.

ही गोष्ट प्रस्तुत भागांत वर्णन केलेल्या काळाच्या पुढची आहे, पण त्यांतील वर्णन या काळालाही लागू होण्यासारखें होतें म्हणून येथें दिली आहे. आगरकर सुधारक तत्वाचे होते, करणीचे होते, पोषाखी नव्हते. परंतु सुधारक होते म्हणून कांहीं लोकांना त्यांची जी चीड येई तिच्यामुळें त्यांचे सर्व सद्गुण ते लोक विसरत. यावेळीं म्हणजे १८९०–९१च्या सुमारास आगरकर पुण्यांत शनी-वारपेठेंत ओंकारेश्वराच्या रस्त्यावर महेंदळे एंजीनीयर यांच्या बागेंतील बंगल्यांत रहात. तेथून ते रोज संध्याकाळीं हिंडावयास जात व पुष्कळ वेळां एकटे जात. त्यांचें कुटुंब जुन्या पद्धतीचें व देवधर्म करणारें असल्यामुळें त्या तुळशीबागेंत प्रत्यहीं जात. पुण्यांतल्या गांवगुंडांनीं या सालस व थोर दंपत्याची हेटाळणी कर-ण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. मेहेंदळयाच्या घरावरूनच ओंकारेश्वराच्या घाटा-वर प्रेतें नेण्याचा रस्ता आहे. आणि याच रस्त्यानें पुण्याच्या सुधारणाद्वेष्ट्यांनीं— किंवा सुधारणाद्वेष्टे तरी कसले ? ज्या बिचाऱ्यांना सुधारणा म्हणजे काय हें कळ-ण्याची मारामार त्यांना " जानंति ते किमपि " याच वर्गांत ढकललें पाहिजे— आगरकरांचें खोटें प्रेत मिरविलें. आपल्या बंगल्याच्या माडीवरील खिडकींतून

हा जिवंतपणीं आपल्या प्रेतयात्रेचा झालेला सोहळा आगरकरांनीं पाहिला. तो पाहून त्यांना हंसूं आलें, राग आला नाहीं. त्यांच्या खासगी वर्तनाबद्दलही कांहीं हलकट आणि बेशरम पाजी लोकांनीं कंड्या उठवण्याचा प्रयत्न केला. पण आगरकरांचें वर्तन इतकें उज्वल होतें कीं तो अर्थात् फसला. मनुष्य सुधारक आहे तेव्हां त्याच्या नीतिमत्तेसंबंधीं वाटेल त्या कंड्या पिकविणें, मग तो किती कां उज्वल आचरणाचा असेना, आणि मनुष्य जर जुन्या पंथाचा आहे—मग तो कितीही नीच वर्तनाचा असो—तो तेहतीस कोटी देवांपैकीं एकाद्याचा अवतार आहे असें जाहीर करणें ही कांहीं विशिष्टप्रकृति लोकांना खोड लागली आहे व खोड वाढविण्याला कित्येक लोकछंदानुवर्ति पंडितंमन्यांची फूस कारणीभूत झालेली आहे. सत्य इतिहासाच्या प्रखर प्रकाशांत सोनें तें सोनें व हीण तें हीण हें दिसल्याशिवाय रहात नाहीं हें खरें, तरी या असल्या खोडसाळपणामुळें त्या त्या काळीं एखाद्या सच्छील माणसाला निष्कारण छळ सोसावा लागतो व एखाद्या हलकट माणसाचें स्तोम माजतें यांत शंका नाहीं. आगरकरांवर वाटेल ते आरोप आणण्याला कांहीं लोकांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं; पण त्या आरोपांचें निरसन होण्यालाही वेळ लागला नाहीं. पुणेकरांना एके काळीं चांगले परिचित असलेले व रानड्यांपासून टिळकांपर्यंत सर्वांची पगडी सारख्याच हौसेनें उडविणारे गोपाळराव जोशी यांनीं एकदां आगरकरांवर "तुम्ही अपेयपान व अभक्ष्यभक्षण करतां" असा आरोप केला. आगरकर या दोहोंपासून पूर्ण अलिप्त होते. त्यांनीं त्यासंबंधीं सरळ पण सणसणीत उत्तर दिलें व मी जर असा एक गोष्ट प्रतिपादणारा व दुसरी गोष्ट आचरणारा मनुष्य असेन तर शिक्षक व वर्तमानपत्रकार होण्याला नालायक आहे; तेव्हां माझ्यावरच्या आरोपाला अणुरेणूइतका पुरावा असेल तर तें दाखवा; नाहीं तर हा नाहक आरोप परत घ्या" असें त्यांनीं जोशांना सांगितलें. आणि त्या पत्रांतील सरळपणा, व वकिलीचा अभाव यामुळें आणि प्रत्यक्ष मिळालेल्या माहितीमुळें एवढा टारगटशिरोमणि गोपाळराव जोशी पण त्यानें प्रांजळपणें तो आरोप परत घेतला व "या साधु पुरुषाची काय हो मी ही विटंबना केली" म्हणून ज्ञानप्रकाशांत पत्र लिहून आपला पश्चात्ताप व्यक्त केला. सत्यप्रतिपादनासाठीं आगरकरांनीं सर्वस्व सोडलें होतें. १८९०–९१ सालीं आयुष्याच्या कर्तबगारीची सुरवात करतेवेळीं मिळालेला स्नेही त्यांना सोडून गेला आणि भवभूतीचे निराशेचे उद्गार त्यांना काढावे लागले. पण ते डरले मात्र नाहींत.

एवढा छळ चालला असतां "सगळें जग विरुद्ध उभें राहिलें तरी त्याची मला पर्वा नाहीं" हें म्हणण्याचें त्यांच्या ठिकाणीं धारिष्ट होतें. सुधारकाच्या आघातामुळें ठिकठिकाणीं प्रत्याघात होत होते व ते त्यांतील पुष्कळ आगरकरांवर वैयक्तिक रीतीनें होत; पण सुधारकाचा प्रसार सारखा वाढत चालला होता व महाराष्ट्रांत दोन अडीच वर्षांच्या अवकाशांत जेथें जेथें केसरी जाई तेथें तेथें सुधारक जाऊं लागला एवढी गोष्ट या बिकट परिस्थितींतही आगरकरांना उल्हास देणारी होती.

# सातव्या भागाचें परिशिष्ट.

## रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदत्वाचा दिलेला

## राजीनामा

### ( मूळ इंग्रजीचें मराठींत भाषांतर )

[ या लेखांत जे शब्द किंवा जीं वाक्यें ठळक खिळ्यांत छापलीं आहेत तीं मुळांत तशीं नाहींत तर वाचकांच्या लक्षांत तीं विशेषेंकरून यावींत म्हणून भाषांतरकर्त्यांनें ठळक खिळ्यांची योजना केली आहे. मधून मधून कंसांत घातलेले शब्द मूळ लेखांत नाहींत तर ते येथें अर्थाच्या कधीं पूरणासाठीं तर कधीं स्पष्टीकरणासाठीं घातलेले आहेत. ]

पुणें, ता. १५ डिसेंबर १८९०

माझ्या प्रिय सहकाऱ्यांनो,

ता. १४ आक्टोबर १८९० रोजीं लिहिलेल्या माझ्या पत्राला जोडून पुढील ( मजकूर ) आपल्यापुढें ठेवतांना मला अत्यंत दुःख होत आहे. संस्थेंतून निघून जाण्याबद्दल मला परवानगी द्यावी अशी त्या पत्रांत मी आपल्याला विनंति केली आहे. ( सर्वांना मान्य ) असा एक हेतु पुढें ठेवून आपण सर्व एकत्र आलों या गोष्टीला आतां उणीं पुरीं अकरा वर्षें झालीं. या अवधींत, निदान त्यांतील बऱ्याच मोठ्या काळांत, समोर निश्चित कार्य ठेवून आपण सर्वांनीं सारखीच ( संकटांशीं ) टक्कर दिली, उद्योग केला आणि हाल अपेष्टा सोसल्या. आपल्या आकांक्षांसाठीं आपण किती तरी विरोध सहन केला आणि किती तरी दुर्वचनें, अवमान, उपहासोक्ति आणि निराशेचे प्रसंग गिळून टाकले.

ध्येयासाठीं आपण मोठा स्वार्थत्याग केला आणि किती तरी वेळां आपली उपासमार करून घेतली. आणि अशा प्रकारें इतक्या दीर्घकाळपर्यंत समान हेतु व आकांक्षा सिद्ध व्हाव्यात म्हणून तुम्हां सर्वांबरोबर अप्रतिहत उद्योग केल्यावर, आणि समान उद्देश व समान दुःखानुभव यामुळें उत्पन्न होणाऱ्या भावना (अंतःकरणांत) खेळत असतांनासुद्धां, परिस्थितीच्या दुर्विलासामुळें तुमच्याशीं वियोगाची भाषा बोलण्याचा प्रसंग मजवर यावा, या दुर्दैवाची तीव्रता शब्दांनीं व्यक्त करण्यापेक्षां कल्पनेनेंच अधिक जाणतां येईल. किंबहुना ज्या संस्थांची जोपासना करण्यासाठीं तुम्ही आणि मी एवढे प्रयत्न केले, आपण सर्वांनीं मिळून ज्या संस्थांसाठीं निश्चयबुद्धीनें एवढा खटाटोप करून आपली बहुतेक धमक खर्चिली, आणि माझ्यापुरतेंच विचाराल तर ज्या संस्था माझ्या आयुष्यांतील सर्व आकांक्षेला मुख्य आधारभूत होत्या त्यांना सोडून जाणार असें तुम्हांला सांगतांना मला ज्या वेदना होत आहेत त्यांची कल्पना तसा प्रसंग ज्यांवर ओढवला असेल त्यांनाच होईल. पण अपरिहार्य गोष्टीशीं (परिस्थितीशीं) तंटा करून उपयोग नाहीं. तिच्याशीं टक्कर मारण्याचा उत्तम मार्ग म्हणजे तिच्या पुढें वांकविणें हाच होय आणि मला तेंच केलें पाहिजे.

२. ज्या तत्वांना अनुसरून वागावयाचें असें आपण आरंभीं ठरविलें होतें आणि ज्यामुळें आपल्याला येवढें यश मिळालें त्या तत्वांसंबंधीं धरसोडीची स्पष्ट प्रवृत्ति आमच्या संस्थेंत अलीकडे दिसूं लागली आहे. ज्या ज्या वेळीं ही प्रवृत्ति प्रकट झाली त्या त्या वेळीं मी तिचा निषेध केलेला आहे. पण (अशा निषेधाचा) परिणाम मात्र अंतःकरणाचा जळफळाट व दुरुत्तरें याहून दुसरा झालेला नाहीं. अशा परिस्थितींत संस्था सोडून जाणें हेंच मला माझें कर्तव्य वाटतें. पण तसें करण्यापूर्वीं हा निर्वाणीचा मार्ग मला पतकरावा लागला आहे. त्याच्या समर्थनासाठीं ज्या गोष्टींमुळें सध्यांचा संकट प्रसंग ओढवला आहे त्याची हकीगत आपल्यापुढें थोडक्यांत ठेवण्याची तुम्ही मला परवानगी द्याल अशी आशा आहे. तिचा दुसरा कांहीं उपयोग नसला तरी माझें समाधान होईल. घडलेल्या ज्या गोष्टींचा मी उल्लेख करणार आहें त्यांना कित्येक लोक फारसें महत्व देणार नाहींत; एवढेंच नव्हे तर त्या त्यांना चहाच्या पेल्यांतील वादळासारख्या क्षुल्लक (स्वरूपाच्या) वाटतील. पण संस्थेबाहेर या गोष्टींबद्दल कोणाला कांहींही वाटत असलें तरी आमच्या संस्थांच्या इतिहासांत त्या महत्वाच्या आहेत अशी माझी समजूत आहे व अशा समजुतीनेंच त्या येथें

विस्तारानें सांगण्याचें मी धारिष्ट केलें आहे. त्यांत माझी इच्छा हीच कीं असले प्रसंग यापुढें टाळण्याच्या कामांत त्यांच्या माहितीचा उपयोग होईल. ही हकीकत शक्य तेवढी यथाप्रमाण व पूर्ण करावी असा माझा विचार होता, परंतु (त्यासाठीं) ज्या प्रकाशित नसलेल्या कागदपत्रांची मला जरूरी आहे ते सर्व (सध्यां) मजपुढें नाहींत हें सांगतांना मला खेद होतो. म्हणून कांहीं बाबतींत मला माझ्या स्मरणशक्तीवर भिस्त टाकावी लागली आहे. तरीसुद्धां ज्या गोष्टींबद्दल वाद नाहीं अशाच गोष्टी येथें आणण्याबद्दल मी काळजी घेतली आहे, आणि त्यांचा खरेपणा बोर्डाच्या हकीकतीवरून व कागदपत्रांवरून सिद्ध होईल याबद्दल मला शंका नाहीं. एका संस्थेचे सभासद या नात्याशीं ज्या गोष्टींचा संबंध पोंहोंचतो तेवढ्याच गोष्टीसंबंधीं येथें उल्लेख करण्याबद्दलही मी खबरदारी घेतली आहे. याचें कारण उघड आहे. आमच्या परस्पर संबंधांवर ज्यांचा अप्रत्यक्ष परिणाम झाला अशा दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत, पण प्रस्तुत सारख्या लेखांत त्यांचा उल्लेख करणें हें रास्त नाहीं व शिष्टाचारालाही धरून नाहीं.

३ विचारांतील विरोध आणि त्यामुळें उत्पन्न झालेला बेसुमार असा मनोवृत्तीचा निष्ठुरपणा यांचा परिणाम प्रस्तुत तंट्याच्या रूपानें झाला आहे असें स्थूलमानानें म्हणतां येईल. संस्थेंत आजन्म सेवक घेतेवेळीं जर अधिक खबरदारी आणि दृढता दाखविली असती; अथवा जर आमच्या (संस्थेची) घटना आहे त्याहून कमी उदार स्वरूपाची किंवा कमी प्रातिनिधिक स्वरूपाची असती; अथवा जर आमच्या संस्थेचीं तत्वें धर्मसिद्धांत म्हणून सांगून प्रत्येक सभासदानें तीं पाळलींच पाहिजेत किंवा संस्था सोडली पाहिजे अशी जर सक्ती केली असती, अथवा आमच्यांत जर असा एखादा पुरुष असता कीं जो आपल्या वैयक्तिक शीलाच्या जोरावर सर्वांना आदरणीय आणि कौतुकास्पद झाला असता आणि त्यामुळें ज्याचा सर्वांवार अमोघ अधिकार चालला असता; तर काय झालें असतें यासंबंधीं आतां तर्कवितर्क करीत बसणें व्यर्थ आहे. तसेंच, एकाच परंपरेंत वाढलेले आणि समान आकांक्षा व हेतु यांनीं उद्युक्त झालेले असे सर्व स्नेही जर या संस्थेंत असते तर काय परिणाम झाला असता याचीही चर्चा करण्यापासून कांहीं फायदा नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं जेव्हां संस्था निघाली तेव्हां, आम्ही एकत्र येण्याचें ठरविलें तें प्रापंचिक तत्त्वांवर आणि आम्ही सर्व किंवा आमच्यापैकीं

बहुतेक सारख्याच शैक्षणिक योग्यतेचें असल्यामुळें, आमच्यांत समतेचें तत्व आलें. आमच्यांत स्वभावभिन्नता होती हेंही आम्हांला पहिल्यापासून माहीत होतें. पण सर्वांनीं एकच ध्येय मान्य केलें होतें तेव्हां निःस्वार्थ बुद्धीनें आयुष्य घालविण्याचा निश्चय आणि त्यासाठीं करावा लागणारा त्याग यांमुळें स्पर्धा किंवा मत्सर यांना अवसरच सांपडणार नाहीं असें आम्हांला वाटलें; आणि खरोखर प्रारंभीं (आमची) स्वभावभिन्नता आम्हांला विघ्नभूत झाली नाहीं. जें कार्य आम्ही आपल्यापुढें ठेविलें होतें तें कठीण होतें आणि त्या वेळीं आमचें ध्येय सिद्ध होण्याला फार अवकाश होता. आम्हांला जगांत कोणी विचारीत नव्हतें आणि उत्साह व एकनिष्ठा यांखेरीज यशसंपादनाचें साधन आमच्याजवळ नव्हतें. अमका मनुष्य बरा नाहीं किंवा अमक्यानें केलें तें ठीक नाहीं असा प्रश्न मधून मधून उपस्थित होई; परंतु एकंदरींत एक ध्येय समोर ठेवून आम्ही आमचा उद्योग चालविला आणि आमचे हेतु यशस्वी करण्यासाठीं आम्ही स्वार्थत्याग केला. त्यामुळें आमच्या कळकळीबद्दल लोकांचीं खातरजमा झाली आणि म्हणून आम्हांला नैतिक बळ प्राप्त झालें (लोकांत मान्यता मिळाली). आणि अशीं कार्यें द्रव्य बाहुल्याच्या अभावीं या नैतिक बलावरच तग धरतात. पण "सर्वांनीं उद्योग करावा, (आपापसांत) तंटा होण्याचें मुळीं कारणच नाहीं" ही स्थिति लौकरच बदलली; व्यक्तींचे स्वभाव विशेष अधिकाधिक स्पष्ट होऊं लागले; आणि ज्या मर्यादांना अनुसरून वागण्याचें आम्ही ठरविलें होतें त्यांचा आम्हांपैकीं कित्येकांना कंटाळा येऊं लागला. एकाग्रता मागें पडून निरनिराळे उद्योग व हितसंबंध यांनीं त्यांची जागा घेतली. आणि त्यामुळें जेथें प्रथम ऐक्य नांदत होतें तेथें विचार आणि हेतु यांची भिन्नता उत्पन्न झाली. तत्वांसंबंधीं सर्व प्रश्नांचा निकाल लागलेला असून आणि तो सर्वांना पटलेला असून जेव्हां त्यासंबंधींच मतभिन्नता होऊं लागली तेव्हां अर्थात् खडाजंगी वाद होऊं लागले आणि (आमच्यांत) तट पडले. पक्षाभिमानामुळें मत्सर उत्पन्न झाला आणि मत्सराचें पर्यवसान भयंकर द्वेषांत होऊन परस्परांची दिलसफाई ही गोष्ट व्यवहारांत अगदीं अशक्य झाली. आमच्यावर लोकांची श्रद्धा बसली ती केवळ आमच्या बौद्धिक पराक्रमामुळें फारशी नसून (खरोखर) स्वावलंबन, स्वार्थत्याग, आणि वागणुकीचा साधेपणा यामुळें मुख्यतः बसली; पण या गुणांचासुद्धां आम्ही धिःक्कार करूं लागलों आहोंत. आणि अशा प्रकारें पवित्र कार्यांच्या (जबाबदारीच्या

जाणिवेमुळें) विभिन्न स्वभावांचा उत्कर्ष दिलजमाईत होण्याच्या ऐवजीं हेतु आणि उद्योग यासंबंधीं आतां आमच्यांत दुफळी झाली आहे. परस्परांविरुद्ध वासना आणि हितसंबंध यामुळें आमच्यांतील प्रेम नष्ट झालें आणि साधेपणा व आचाराचा निष्ठुरपणा यांचा आम्हांला कंटाळा आला. आमची अवनति किती झाली आहे व किती होऊं शकते याचा नमुना म्हणून १८८९ च्या डिसेंबरांत होळकर महाराजांच्याकडून ७०० रुपयांची देणगी आली त्यासंबंधीं रा. आगरकरांच्या व माझ्या दरम्यान् झालेल्या पत्रव्यवहाराच्या नकला मी सोबत दिलेल्या आहेत. रा. आगरकरांच्या विचारांना रा. आपटे यांनीं पूर्ण संमति दिलेली आहे. जेथें ( परस्परांबद्दल ) अशा भावना झाल्या तेथें पूर्ण दिलसफाई व सहकारिता होणें अशक्य आहे असें मला वाटतें आणि असें वाटण्याचें विशेष कारण म्हणजे ज्या कारणांमुळें या भावना उत्पन्न झाल्या त्यांच्यांत फेरफार होणें शक्य नाहीं ( हें होय. )

४ आरंभीं ( एकमेकांत झालेल्या ) आणाभाकांबद्दल बरेच वेळां उल्लेख झालेला आहे तेव्हां कोणत्या समजुतीनें आम्ही १८८० सालीं शाळा काढली येथून (हकीकतीला) मी सुरवात करितों. १८७९ च्या जुलैंत किंवा आगष्टांत, मी डेक्कन कॉलेजांत राहून एलएल्. बी. च्या परीक्षेसाठीं अभ्यास करीत असतांना, रा. आगरकर, रा. बी. ए. भागवत, रा. व्ही. बी. करंदीकर आणि मी असे मिळून, मिशनरी संस्थांच्या धर्तीवर खासगी शाळा स्थापन करण्याची शक्यता आणि महत्त्व यासंबंधीं प्रथम चर्चा केली. एतद्देशीय लोकांनीं धडाडीनें खासगी शिक्षणसंस्था काढण्याच्या आवश्यकतेबद्दल मतभेद नव्हता पण त्या ( खासगी शाळा ) यशस्वी कशा करावयाच्या हा प्रश्न होता. आमच्या परिस्थितींतल्या माणसांना ( असा उद्योग यशस्वी करण्याला स्वार्थत्याग हेंच एक साधन होतें हें उघड आहे. त्याला आमची तयारी होती, तथापि इतर अनेक अडचणी येण्याचा संभव होता त्यांची आम्ही चर्चा केली. उदाहरणार्थ, कामाची सारखी विभागणी, खासगी मिळकत, वगैरे. आणि याच अडचणीमुळें शेवटीं संस्थेंत अनिष्ट अशी दुफळी माजली आहे हें नमूद करण्याला मला खेद होतो. अडचणींतून पार पडण्याच्या कोणत्या युक्त्या त्या वेळीं पुढें आल्या होत्या व त्यांची आम्ही चर्चा केली होती हा सगळा इतिहास मी येथें सांगत बसत नाहीं. एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, पुष्कळ वेळ आणि वरचेवर खाजगी वादविवाद करून

आम्ही जो निष्कर्ष काढला तो येणेंप्रमाणें. कितीही स्वार्थत्याग करावा लागला तरी आपली कल्पना तडीला न्यावयाची अशा निश्चयानें जर आपण कार्याला लागलों तर त्यांत दुर्घट असें कांहीं नाहीं, फार तर कार्याची सिद्धि होण्याला बराच विलंब लागेल (असें आम्ही ठरविलें). आमचा उत्साह तेव्हां एवढा मोठा होता कीं यानंतर लौकरच शहरांतील एका पुढारी गृहस्थाला आम्ही पत्र लिहून कळविलें कीं केवळ उदरपूर्तीसाठीं फार फार तर दरमहा ७५ रुपये पर्यंत पगार घेऊन शिक्षणाच्या कार्याला वाहून घेण्यास आम्ही तयार आहोंत आणि त्या वेतानें उत्पन्न येण्याजोगा निधि उभारणें शक्य असेल तर फुकट शिक्षण देण्याला देखील आमची ना नाहीं. सदर गृहस्थांनीं उत्तरीं आम्हांस कळविलें कीं तुमचा हेतु फार स्तुत्य आहे, परंतु प्रत्यक्ष कार्यांत पडून कांहींतरी करून दाखविल्याखेरीज लोक तुम्हांला साहाय्य करणार नाहींत. आमचा कार्यक्रम सिद्धीला नेण्यासाठीं वाटेल तो स्वार्थत्याग करण्याला आम्ही राजी होतों म्हणून या (उत्तरा) मुळें आमचा हिरमोड मुळींच झाला नाहीं. आमच्या चर्चेला हें स्वरूप आलें त्या वेळीं रा. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनीं नौकरी सोडली असून ते पुण्याला आले आहेत व एक नवीन शाळा काढण्याचा त्यांचा विचार आहे असें आम्हांस समजलें. त्यांना भेटून आपली योजना सांगावयाची व तुम्ही या कामांत पुढाकार घ्या अशी त्यांना विनंति करावयाची असें आम्हीं सर्वांनीं ठरविलें. त्यांनीं संमति दिली व १८८० च्या सुरवातीपासून शाळा काढावयाची असें नक्की ठरलें.

५ पण (ती वेळ जवळ येत चालली तशी) रा. भागवत व रा. करंदीकर यांना ही योजना यशस्वी होण्याबद्दल शंका वाटूं लागली व या धंद्यांत पडून सुखानें पोटापुरतें मिळेल हें त्यांना शक्य वाटेना. अशा स्थितींत ता. १५ डिसेंबर १८७९ रोजीं विष्णुशास्त्री यांनीं स्वतः व आपले सहकारी यांचे तर्फे जी उद्देशपत्रिका म्हणून प्रसिद्ध केली त्यांत कोणाचींही नांवें घातलीं नाहींत. अशाच दूरदर्शित्वामुळें संस्थेचे उद्देश भपकेदार शब्दांनीं वर्णन न करितां त्यांनीं फक्त एवढेंच लिहिलें कीं शिक्षण स्वस्त व सुलभ करणें हा आमचा हेतु आहे. पुढें घडून आलेल्या गोष्टीवरून शास्त्रीबुवांचा हा नेमस्तपणा अनाठायीं नव्हता हें सिद्ध झालेलें आहे. भागवत आणि करंदीकर यांनीं आपलें आंग काढून घेतलें व जरी त्यांनीं तें अगदीं (शाळा सुरू करण्याच्या) वेळीं केलें तरी बरें केलें असें मला आतां वाटतें. आगरकरांना डेक्कन कॉलेजांत

आणखी एक वर्ष फेलोशिप मिळाली तेव्हां शाळेला मिळण्याचा बेत त्यांनीं एक वर्ष पुढें ढकलला. ता. १ जानेवारी १८८० रोजीं शाळा उघडण्याचे वेळीं याप्रकारें विष्णुशास्त्री आणि मी असें आम्ही दोघेंच होतों. या सुमाराला रा. नामजोशी हे आम्हांला येऊन मिळाले. त्यांनीं आपला उद्योग सोडून दिला होता व दुसरें कांहीं तरी काम मिळविण्याच्या विवंचनेंत ते होते. जरी पुष्कळांनीं तुम्ही नामजोशांना घेऊं नका असा (आम्हांला) स्नेहभावानें इषारा दिला होता तरी विष्णुशास्त्र्यांनीं त्यांना घेण्याचें ठरविलें. ते म्हणाले कीं या मनुष्याचे दोष आम्हांला माहीत आहेत आणि त्यामुळें योग्य कामावर त्याची योजना करून त्याच्या खटपटीचा आम्हांला उपयोग करून घेतां येईल. कांहीं दिवस कोणत्या धोरणावर आम्ही काम चालविलें याचा या वाक्यानें विशेष खुलासा होतो म्हणून तें मी येथें दिलें आहें. नामजोशी यांनीं त्याप्रमाणें कबूल केलें व १८८० च्या पहिल्या टर्ममध्यें त्यांनीं आमच्याबरोबर काम केलें. काम आमच्या शक्तीबाहेरचें होतें. मी पुष्कळांना ( त्यांत रा. वा. शि. आपटे हेही होते ) आम्हांला येऊन मिळण्याबद्दल सांगितलें, पण कोणीच कबूल होईना तेव्हां तें आम्हांला कसेंबसें रेटावें लागलें. दुसऱ्या टर्मच्या सुरवातीला आमच्या कार्याला अधिक माणसें मिळतील याबद्दल मी तर बहुतेक निराश झालों होतों; पण आपट्यांनीं प्रथम नाकारलें होतें तरी परिस्थितीमुळें त्यांनीं येण्याचें कबूल केलें. परंतु आम्हांला पगार फार थोडा मिळत असे म्हणून कांहीं महिने ज्यास्ती पगारावर आपटे नौकर म्हणून राहिले. पुढें आगरकरांनीं जेव्हां त्यांना खात्रीपूर्वक सांगितलें कीं आपण शाळेला मिळण्याचें ठरविलें आहे तेव्हांच ते ( आपटे ) संस्थेला कायमचे येऊन मिळाले. परंतु दुसरें कांहीं काम करून आपल्या उत्पन्नांत भर टाकावी ही कल्पना त्यांच्या मनांत सारखी घोळत होती आणि त्यांच्याच आग्रहामुळें (?) नामजोशांच्या "स्टार" पत्राचें रूपांतर "मराठ्यां"त झालें व एक नवीन मराठी पत्र काढलें. आमच्या मूळच्या कार्यक्रमांत या गोष्टी नव्हत्या. कबूल केल्याप्रमाणें १८८१ च्या सुरवातीला आगरकर आम्हांला येऊन मिळाले. त्या वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकर, मी, नामजोशी, आपटे आणि आगरकर इतक्यांना मिळून शाळा व दोन वर्तमानपत्रें चालवावीं लागत. हेडमास्तराखेरीज शाळेचे सुपरिन्टेन्डेन्ट म्हणून नवी जागा आपट्यांना घेतल्यावर आम्हांला करावी लागली हें या ठिकाणीं सांगण्यास हरकत नाहीं. विष्णुशास्त्री हे पहिल्यापासून हेडमास्तर होते तसे राहिले व आपट्यांना शाळेचे सुपरिंटेंडन्ट नेमण्यांत आलें.

६. १८८१ च्या सुरवातीला आमची स्थिति याप्रमाणें होती. एक शाळा. एक छापखाना व दोन वर्तमानपत्रें चालविण्यासाठीं आम्ही पांच असामी एकत्र आलों हें खरें पण आमचे सर्वांचे हेतु कांहीं सारखे नव्हते. कार्य तर कठीण होतें, प्रत्येक गोष्ट नवी करावी लागे, आणि (अशाप्रकारें) प्रत्येकाच्या शक्तीला चांगलाच ताण बसे. काम करण्याची आमची पद्धत वर सांगितल्या-प्रमाणें होती. ज्याला जें काम विशेष चांगलें जमण्यासारखें होतें तेंच त्याला दिलें जाई. अद्याप बाहेरचे हितसंबंध उत्पन्न झाले नव्हते. आणि प्रत्येक सूचना करणारा शुद्ध मनानें करी व तिचा विचारही तसाच शुद्ध मनानें होत असे. वादविवाद किंबहुना कडक वादविवाद होत नव्हते असें नाहीं पण कांहीं झालें तरी प्रत्येकाला वाटे कीं आपण सर्व एकाच ध्येयासाठीं काम करणारीं माणसें आहों आणि अशा प्रकारें (वादाचा) शेवट नेहमीं समाधानकारक होत असे. पगाराच्या बाबतींत प्रत्येकाचा पगार अगदीं बिनचूक सारखा असला पाहिजे या तत्वाची अद्याप प्राणप्रतिष्ठा झाली नव्हती. ज्याप्रमाणें ज्याला जें काम उत्तम करितां येई तें त्याकडे सोंपविलें जात असे त्याचप्रमाणें प्रत्येकाला निर्वाहासाठीं जितकें आवश्यक लागे व बोर्डाला जेवढें देण्याची ताकद होती त्या मानानें त्याला पगार दिला जाई. उदाहरणार्थ, पहिल्या वर्षी शास्त्रीबुवा व मी यांनीं बहुतेक कांहीं घेतलें नाहीं पण नामजोशी आणि आपटे यांना मात्र आपल्या वाट्यापेक्षां अधिक मिळालें. याप्रमाणें प्रत्येक गोष्ट सुरळीतपणें चालली होती आणि पुढें कोल्हापूरचें प्रकरण जेव्हां उद्भवलें (मार्च १८८२) त्यामुळें कांहीं काळ आमचा मिलाफ दृढतर झाला. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठीं तेव्हां आमची धडपड चालू होती आणि (त्यासाठीं ?) खटल्याला उभें राहणें हें आपलें कर्तव्य आहे असें आम्हां सर्वांना वाटलें. या खटल्याच्या संबंधांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टी आहेत पण त्यांचा प्रस्तुत प्रश्नाशीं फारसा संबंध पोंहोंचत नाहीं म्हणून त्यांचा मी उल्लेख करीत नाहीं. मात्र एवढें सांगितलें पाहिजे कीं सारखा पगार आणि सारखें काम, बाहेरचे उद्योग आणि यथाप्रमाण जबाबदारी हे प्रश्न जर तेव्हां उपस्थित झाले असते तर संस्थेचें केव्हांच वाटोळें झालें असतें. सुदैवानें असले प्रश्न तेव्हां कोणीही काढले नाहींत आणि लोकांच्या उदार सहानुभूतीनें व साहाय्यानें आम्हांला जी गोष्ट रास्त वाटली तिचें समर्थन आम्ही निःस्वार्थ बुद्धीनें केलें याचाच तो मुख्यत्वें करून परिणाम होता म्हणून आम्हांला त्या प्रसंगाशीं टक्कर देतां आली. १८८२ सालीं

रा. केळकर आणि रा. गोळे हे दोन नवे सभासद संस्थेला मिळाले. यांतील केळकरांची माहिती आम्हांला या खटल्याचे वेळीं झाली होती आणि अशा प्रकारें शाळा, छापखाना व वर्तमानपत्रें यांचें ठीक चाललें. या वेळची आमच्या परस्पर संबंधांत महत्वाची एकच गोष्ट घडून आली. मी आणि आगरकर तुरुंगांतून परत आल्यावर ( आक्टोबर १८८२ ) व आम्ही स्वागतसमारंभांतून नुकतेंच बाहेर पडत होतों अशा वेळीं, मी अतःपर वर्तमानपत्रांच्या भानगडींत पडणार नाहीं, असें आपट्यांनीं आम्हांला सांगितलें आणि त्यापुढें लौकरच त्यांनीं आपल्याला ग्रंथरचनेकडे बहुतेक वाहून घेतलें. शाळेच्या १८८२ सालच्या वार्षिक अहवालांत केसरी व मराठा हीं पत्रें आणि त्यामुळें आमच्यावर आलेलीं संकटें यांचा उल्लेख करतांना ज्या मुख्य कार्यासाठीं आम्ही एकत्र होऊन ही संस्था काढली त्याला उपकारक अशीं दुसरीं कामें हातीं घेण्याचें आम्ही समर्थन केलें आहे हें येथें सांगण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं हें तत्व आम्हांला मान्य करतां आलें; कारण त्या वेळच्या हातीं घेतलेल्या इतर कामांत संस्थेंतील सर्व मंडळीचा म्हणजे सर्व संस्थेचाच हितसंबंध होता. पुढें ही स्थिति बदलली आणि जेव्हां स्वार्थबुद्धीनें बाहेरचीं कामें घेण्याला सुरवात झाली तेव्हां स्वाभाविकपणें मतभेद आणि तंटे सुरू झाले. त्यांचें सविस्तर वर्णन पुढें येईलच. या वेळची दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एज्युकेशन कमिशननें आमचे विचार लोकांपुढें व सरकारपुढें मांडण्याची आम्हांला दिलेली संधि ही होय (सप्टेंबर १८८२ ). आमच्यातर्फे जी योजना रा. आपटे यांनीं कमिशनपुढें वाचून दाखविली तिची रूपरेखा कोल्हापूर खटल्याचा निकाल लागण्यापूर्वीं आंखण्यांत आलेली होती. ही सर्व योजना शाळेच्या १८८२ च्या अहवालाच्या परिशिष्टांत दिलेली आहे. त्या योजनेचें संपूर्ण स्वरूप देण्याच्या भानगडींत मी पडूं इच्छित नाहीं. तिचा उल्लेख करण्यांत माझा मुख्य हेतु इतकाच कीं रा. आपट्यांनीं जी साक्ष दिली तिच्यावरून आमच्या संस्थेचा मुख्य हेतु एतद्देशीयांनीं शिक्षणाच्या कार्यासाठीं मिशन काढावें हा होता हें सिद्ध होतें हें दाखवावें. सर्व महाराष्ट्रभर शाळांचें जाळें पसरावयाचें आणि अशा प्रकारें शिक्षणाची राष्ट्रीय पद्धत सुरू करावयाची अशी आमची योजना होती व तिच्या सिद्धीसाठीं साहाय्य करण्याबद्दल आम्ही सरकारला विनंति केली. आपट्यांच्या साक्षींतील खरोखर निष्कर्ष काय तो हाच होता. या योजनेचें कित्येकांना भय वाटलें पण दुसऱ्या पुष्क-

ळांनीं तिच्याबद्दल संतोष व्यक्त केला आणि आम्ही प्रकट केलेल्या स्वावलंबनाच्या व स्वार्थत्यागाच्या धोरणाबद्दल आमची फार तारीफ केली. या दोहोंपैकीं कोणाचें म्हणणें खरें झालें आहे किंवा खरें होईल हें सांगण्याचें धाडस मी करीत नाहीं. तथापि पुढें दिलेल्या हकीकतीवरून, उपरोक्त धोरणाला आम्ही बरेच वेळां दूर सारलें आहे असें दिसून येईल.

७. शाळेचीं पहिलीं तीन चार वर्षें अशा प्रकारें आमचें अस्तित्व लोकांपुढें आणण्यासाठीं धडपड करण्यांत घालवावीं लागलीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. विष्णुशास्त्र्यांच्या जोरदार भाषेंत सांगावयाचें म्हणजे—दुर्दैवानें ही धडपड संपलेली पाहण्याला सुद्धां ते जगले नाहींत—वर्तमानपत्रें आणि शाळा या गोष्टी आम्ही घडवून आतां चांगल्या उभ्या झाल्या आणि त्या उभ्या करण्याच्या कामांत आम्ही शेंकडों संकटांना दाद दिली नाहीं; निराशामय मतांची पर्वा केली नाहीं; सरकारी अधिकाऱ्यांच्या रोषाला जुमानलें नाहीं; जे जे कोणी रुळलेला मार्ग सोडून जातात त्यांच्याप्रमाणें आम्हांवर मूर्ख, हताश, केवळ कल्पनासृष्टींत गुंग झालेले, विलक्षण नवी सृष्टी निर्माण करण्याचा हव्यास बाळगणारे—अशीं शेलकीं विशेषणें मिळालीं तीं आम्ही मनावर सुद्धां घेतलीं नाहींत; आणि जरी कांहीं लोक आम्हांला सोडून गेले, कित्येकांवर मृत्यूनें हल्ला केला, कित्येकांच्या कपाळीं तुरुंगवास आला, कित्येकांनीं निंदा केली, कित्येकांनीं वर्तमानपत्रांतून आचरटपणानें लिहिलें, हलकट माणसांनीं स्वार्थ साधण्यासाठीं कटकटी उपस्थित केल्या, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मत्सरग्रस्त आणि हताश अशा लोकांनीं पाजीपणाचे अनेक प्रयत्न केले; तरी या सर्वांना न जुमानतां आमच्या संस्था सर्वांवर जय मिळवून उभ्या राहिल्या याचें कारण केवळ एकच आणि तें म्हणजे आमचें स्वाभाविक सामर्थ्य व कशालाही न जुमानणारा दृढ निश्चय यांचा जोर हेंच होय. जे संस्थेंत अलीकडे सामील झाले आहेत त्यांना त्या संकटांची पूर्ण कल्पना येणें कठीण आहे; पण आम्हांला काय भगीरथ प्रयत्न करावे लागले याची मला चांगली आठवण आहे. त्या संकटांतून सुखरूपपणें बाहेर पडण्याला आम्हांला लागला त्याहून अधिक काळ कसा लागला नाहीं याचेंच मला राहून राहून आश्चर्य वाटतें. आम्ही स्थापन केलेल्या संस्था संघटित करण्यांत १८८३, १८८४, १८८५ हीं तीन वर्षें गेलीं आणि या कामाला दुसरा किंवा संघटणेचा काळ असें म्हणतां येईल. एवढ्या धडपडींतून आम्ही बाहेर पडलों होतों तरी आमचा उल्हास

आणि रग हीं बिलकुल कमी झालीं नव्हतीं हें खरें असलें तरी कोल्हापूरच्या खटल्यामुळें आमच्यावर कर्जाचा बोजा पुष्कळ झाला होता आणि या कर्जा-खेरीज आपापसांत तंटा होण्याला आम्हांला दुसरें कांहीं कारण नव्हतें. त्यामुळें आम्ही त्या वेळीं जी संघटना तयार केली तिच्यांत आत्मसंयमन आणि स्वार्थत्याग या तत्वांचा अंतर्भाव करणें मुळींच कठीण पडलें नाहीं. १८८४ सालाच्या अखेरीस शाळा आणि वर्तमानपत्रें यांना बाह्यतः तरी स्थिर व संघटित स्वरूप आलें होतें असें पुढील मजकुरावरून लक्षांत येईल.

८. या वेळीं महत्त्वाच्या घडलेल्या गोष्टी म्हणजे कै. वा. आबासाहेब घाटगे, कागल संस्थानचे अधिपति, यांनीं आम्हांला दिलेला आश्रय व पुढें आमच्या संस्थेला ( तेव्हांचे गव्हर्नर ) सर जेम्स फर्ग्युसन यांनीं भेट देण्याची केलेली कृपा ( १३ फेब्रुवारी १८८४ ) या होत. आमच्या संख्येच्या इतिहासांतील या संस्मरणीय प्रसंगाचें सविस्तर वर्णन शाळेच्या १८८३ च्या वार्षिक अहवालांत दिलेलें आहे. त्यांतील दुसऱ्या प्रसंगीं गव्हर्नरसाहेबांसमोर आमचे हेतु आणि ध्येय यांचा आम्ही उल्लेख केला होता त्याचाच फक्त निर्देश मी येथें प्रस्तुत वादांतील मुद्यासाठीं करितों. सर्व महाराष्ट्रभर शाळांचें जाळें पसरून तेथें थोड्याशा परंतु अब्रूनें राहतां येईल अशा प्रकारच्या पगारावर काम करण्याची आमची तयारी आहे आणि एक खासगी कॉलेज काढून त्यांतून आमच्या शिक्षकांप्रमाणेंच ( उदात्त ) हेतूंनीं प्रेरित अशा पदवीधरांची परंपरा निर्माण करावी अशी आमची आकांक्षा आहे असें त्या प्रसंगीं आम्ही अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितलें होतें. सर विल्यम वेडर्बर्न यांच्या शब्दांत थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे स्वार्थत्याग आणि स्वावलंबन हीं त्या वेळीं आमचीं अगदीं ब्रीदवाक्यें झालीं होतीं. हींच तत्वें आमच्या कार्याला आधारभूत होतीं आणि या नैतिक कारणांमुळेंच आमच्या कार्याला एवढें महत्व आलें. पुढें लौकरच डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. तिची संघटना अर्थात् मुख्यत्वेंकरून या तत्वांना अनुसरून करण्यांत आली आणि व्यवस्थापक मंडळाचे म्हणून जे उपनियम करण्यांत आले ते मिशनरी संस्थांच्या नियमांच्या धर्तीवर केले. सर्व तहाहयात सभासदांना पगार समान मिळावयाचा व सर्वांना सारखे हक्क असावयाचे असें ठरलें. परंतु महिन्याचा पगार बेताचाच ठरवलेला होता म्हणून असा नियम घालण्यांत आला कीं, विशेष प्रसंगीं तहाहयात सभासदांना त्यांच्या मासिक वेतनाशिवाय देणगी म्हणून द्यावी, ती महिन्या महिन्याला पोंचवावी किंवा एकदम एकाच रकमेनें

द्यावी. अकाल मृत्यु किंवा अशा आपत्तीबाबद प्रत्येक सभासदाच्या आयुष्याचा ३००० रुपयांचा विमा उतरण्याचीही व्यवस्था करण्यांत आली होती. (हें सर्व काम माझ्याच हातून झालें आहे हें येथें सांगण्यास हरकत नाहीं.) मी प्रथम रकम सुचविली होती ती ५००० रुपये होती पण आमच्याजवळ पैसे कमी असल्यामुळें ती ३००० वर आणली. जिवंतपणीं अब्रूनें प्रपंच करतां येण्यासारखें वेतन, वेळीं प्रसंगीं खास देणग्या, आणि मृत्यूनंतर विम्याचे ३००० रुपये अशा तऱ्हेची व्यवस्था प्रत्येक तहाहयात सभासदासाठीं करण्याची हमी व्यवस्थापक मंडळानें घेतली आणि अशा प्रकारें संस्थेच्या बाहेर काम पाहण्याची आणि तिसऱ्याच उद्योगांत शक्ति खर्चण्याचें आम्हांला आतां कांहीं कारण उरलें नाहीं असें आम्ही आपापसांत ठरविलें होतें.

९. आम्ही हिंदी जेसूईट आहोंत असें म्हणवून घेण्याचा आम्हांला अभिमान वाटतो तेव्हां मिशनरी संस्थांनीं केलेली तरतूद व आम्ही केलेली तरतूद यांची तुलना करणें बोधावह होणार नाहीं असें नाहीं. जेसूईट केव्हांही लग्न करीत नाहींत. आणि त्यांचे नियम आमच्याहून कडक आहेत यांत नवल नाहीं; परंतु अमेरिकन मिशननें आपल्या सभासदांसाठीं केलेली तरतूदसुद्धां आमच्यापेक्षां कमी सढळ हाताची आहे. या मिशनमध्यें सभासदांना केवळ निर्वाहापुरतें वेतन देतात, विवाहितांना अविवाहितांच्या दुप्पट वेतन देतात आणि मुलांसाठीं कांहीं खास देणगीची व्यवस्था आहे. आमच्या उपनियमांत या सर्व गोष्टींचा समावेश असून शिवाय विम्याची पॉलिसी केलेली आहे. तेव्हां अमेरिकन मिशनची मंडळी आपल्या संस्थेंत जेवढ्या एकनिष्ठेनें व कळकळीनें काम करितात त्याहून अधिक नसलें तरी तसें काम आमच्या सभासदांनीं केलें पाहिजे अशी (लोकांनीं) अपेक्षा करावी हें स्वाभाविक आहे. आमच्या दुर्दैवानें स्थिति मात्र याच्या अगदीं उलट आहे आणि एखादी पळवाट हुडकून काढून तिच्या साहाय्यानें मूळच्या करारांतून निसटतां यावें यासाठीं वाटेल ती सबब पुढें येण्याला सुरवात झाली आहे. व्यवस्थापक मंडळाच्या उपनियमांत बाहेरच्या कामाचा प्रश्न समाविष्ट झाला नव्हता ही गोष्ट खरी आहे, पण तो तसा अनिश्चित राहिला याचें कारण त्यासंबंधीं आमच्यांत जो ठराव झाला होता त्यांत कांहीं संदिग्धपणा होता असें मात्र नाहीं तर त्याच्यापायीं विशेष बखेडा कधीं उपस्थित होईल असें आम्हांस केव्हां वाटलेंच नव्हतें हें होय. आतां या काळाच्या हकीकतीकडे पुनः वळूं. १४ आक्टोबर १८८४ रोजीं डेक्कन एज्युके-

शन सोसायटीची स्थापना झाली आणि पुढें लौकरच ती १८६० च्या २१ व्या कानूप्रमाणें नोंदविण्यांत आली. स्वार्थत्याग व एतद्देशीयांनींच संस्था चालविणें हीं तत्वें उपनियमांत मान्य करण्यांत आलीं. १८८५ च्या आरंभाला कॉलेज सुरू झालें.

१०. शाळा आणि कॉलेज हीं दोन्ही ग्रँट-इन-एडसाठीं शिक्षणखात्यानें नोंदिलीं आणि अशा प्रकारें आमची स्थिति सर्व प्रकारें सुधारली. पण (आमची) सोसायटी निव्वळ शिक्षणाच्या कार्यासाठीं निघाली होती त्यामुळें शाळेपासून वर्तमानपत्राचें (काम) विभक्त करणें भाग पडलें. यद्यपि आम्ही सर्वजण छापखान्याचे व वर्तमानपत्रांचे मालक म्हणून होतोंच तरी सर्वांच्या कामाची ती एक अगदीं स्वतंत्र बाब आहे असें (आम्ही सर्व) समजत असूं. या स्थितींत आणखी फेरफार कोणत्या प्रकारें झाला याचें वर्णन पुढें येईल. ज्या काळाचा आपण विचार करीत आहों त्यासंबंधीं एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं या अवधींत दोन्ही संस्थांना व्यवस्थित रूप देण्यांत व त्यांचा विस्तार करण्यांत आम्ही आपली शक्ति खर्चीत होतों आणि अद्यापि तंट्याच्या बीजांना अंकुर फुटलें नव्हतें.

११. आतां शाळेच्या इतिहासांतील तिसऱ्या आणि माझ्या स्वतःपुरत्या शेवटच्या काळाकडे मी वळतों. हा काळ म्हणजे १८८५ शेवटापासून तों आतांपर्यंतचा होय. या वेळीं संस्था इतक्या बद्धमूल व सुव्यवस्थित झाल्या होत्या कीं शाळेंतील आणि कॉलेजांतील काम हें साधारणपणें ठराविक स्वरूपाचें झालें होतें आणि आमची प्रापंचिक परिस्थिति आमच्या अपेक्षेपेक्षांही फार चांगली झालेली होती. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, आम्हांला जी मोठी झटापट करावी लागत होती तिचें बहुतेक कारण उरलें नाहीं. संस्थेची सर्व व्यवस्था साधारणपणें लागली होती आणि सुरवातीला (व पुढें) संघटना करितांना ज्या जिकीरींत आम्ही होतों त्यांतून आमची मुक्तता झाली आणि आम्हांला जरा सभोंवार पहाण्यास आणि आमच्या मूळच्या हेतूंच्या सिद्धीसाठीं किंवा स्वतःच्या फायद्यासाठीं उद्योग करण्यास कांहींसा अवसर मिळाला. अशा प्रकारें ही वेळ शाळेच्या इतिहासांतील फार आणीबाणीची होती (कारण) या वेळीं नवीन संबंध व नवीन प्रश्न उपस्थित होऊं लागले. या प्रश्नांचा निर्णय हेंच आमच्यांतील तंट्यांचें कारण आहे. पुढील मजकुरावरून या विषयासंबंधीं माझे विचार काय आहेत हें दिसून येईल. परंतु संस्थेच्या (इतर) सभासदांविषयीं सांगावयाचें

म्हणजे हा निर्णय कोणत्या तरी बाजूनें लागावा यासंबंधीं त्यांना महत्वच वाटत नाहीं हें पाहून मला फार खेद होतो. आणि याचा परिणाम असा झाला आहे कीं अतिशय तंटे होतात, शिवीगाळ होते, आणि त्यामुळें कधींही न भरून येणाऱ्या जखमा ( अंतःकरणाला ) होतात. सुस्थिति एकदांची प्राप्त झाली त्यामुळें तिची आम्हांला एवढी भुरळ पडली आहे कीं आगरकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "१८८१-८२-८३ सालांतील स्वदेशाभिमानाच्या व स्वातंत्र्याच्या बाण्याबद्दल" कुचेष्टा होण्यास सुरवात झाली. ज्या वेळीं हें कार्य आम्ही हातीं घेतलें त्या वेळीं योग्य वेतनाची आमची कल्पना दरमहा ७५ रुपयांपलीकडे कधींही गेली नाहीं. आतां आम्हांला एवढें वेतन मिळूं लागलें शिवाय ( प्रत्येकाच्या आयुष्याचा ) ३००० रुपयांचा विमा उतरण्यांत आला. परंतु एका पुराण संस्कृत सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें आमची हांव अधिकच वाढली आणि त्यामुळें, विम्याचा कांहीं नियम नाहीं, किंवा कुटुंबाची वृद्धि झाली आहे, अशा तऱ्हेच्या सबबी आम्ही पुढें आणूं लागलों. अशा तऱ्हेची ओरड केव्हांही कोणाला पटणारच आणि विशेषेंकरून या काळांत जे नवीन सभासद झाले त्यांच्या तर ती पथ्यावर पडली. स्वार्थत्यागाच्या तत्वाचा स्वीकार आम्ही कशासाठीं व कोणत्या प्रकारें केला आणि कांहीं वडीलधाऱ्या मंडळींनीं पुढाकार घेतल्यामुळें आम्ही त्यांना जाऊन कसे मिळालों यासंबंधाची या नव्या सभासदांना फार तर अगदीं अंधुक कल्पना होती. या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्या म्हणजे जेसूईट म्हणवून घेण्याची अद्यापही आम्हांला हौस कशासाठीं राहिली होती याचेंच मला आश्चर्य वाटतें. जेसूइट लोकांच्या तत्वांला अनुकूलता संस्थेंत किती आहे हें अजमावण्याचा मी प्रत्यक्ष प्रयत्न केला आहे, आणि बहुमत त्याला अनुकूल नाहीं असें आढळून आल्याचें ( नमूद करतांना ) मला खेद होतो. ज्यामुळें एवढा मोठा मतभेद माजून राहिला अशा या काळांत उपस्थित झालेल्या महत्वाच्या कित्येक प्रश्नांची आतां मी माहिती देतों. यांतील बहुतेक प्रश्नांचा परिणाम कडाक्याचीं भांडणें होण्यांत झाला आणि त्याहीपेक्षां वाईट गोष्ट म्हणजे कधीं कधीं तर लज्जास्पद अशी हमरीतुमरी सुद्धां झाली. विकारवशतेमुळें झालेल्या या बोलाचालींचा पुढील हकीकत देतांना उल्लेखसुद्धां न करण्याची खबरदारी मी घेतलेली आहे, आणि मतभेदाचीं मुख्य कारणेंच तेवढीं दिलेलीं आहेत. तसेंच अनेक प्रसंगीं प्रत्येक पक्षांनीं काय काय उलट सुलट पेंच घातले, काय काय युक्त्या प्रतियुक्त्या

योजिल्या याचें बारकाईनें वर्णन देण्याला मला येथें अवकाशही नाहीं व वेळही नाहीं. काय पेंच लढवले आणि कोणाचा पेंच यशस्वी झाला हा कांहीं आपल्यापुढें मुद्दा नाहीं. बखेड्यांचें खरें कारण काय आहे आणि दुखण्याच्या अगदीं मुळाशीं जाऊन तें थांबविण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यांत आला होता काय हें आपणांस समजलें पाहिजे.

१२. घडण्याची वेळ व महत्त्व या दोहों दृष्टींनीं या काळांतील पहिला वृत्तांत जो मला सांगावासा वाटतो तो म्हणजे कोणी पैसे कमी घेतले होते कोणी अधिक उचलले होते त्याबाबद ता. २० आक्टोबर १८८५ सालीं झालेली वजावाट होय. त्यावेळेपर्यंत ज्याला त्याला आपापल्या नडीप्रमाणें वेतन देण्याचा नियम आम्ही पाळीत होतों हें वर आलेंच आहे. स्थूलमानानें प्रत्येकाला वेतन सारखेंच मिळे, पण प्रत्येक वेळीं ज्याला ( नड लागेल ) त्याच्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करून त्याला कांहीं देणगी द्यावी अशा प्रकारचें तत्व, आमची प्राप्ति बेताची असल्यामुळें, घालून ठेवण्यांत आलें होतें. शिवाय ज्याप्रमाणें कित्येक सभासदांनीं शाळेच्या पहिल्या वर्षीं कांहींही घेतलें नव्हतें त्याचप्रमाणें कित्येकांना त्या पुढील वर्षांतसुद्धां त्यांच्या विशेष नडी अडचणी लक्षांत घेऊन अधिक पैसे उचलूं दिले होते. अशा तऱ्हेची विषमता केवळ भविष्यकाळापुरतीच नव्हे तर १८८० सालापासून पूर्वींच्या हिशेबाच्या बाबतींतही नाहींशी करावी असा आतां विचार निघाला. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे जुन्या सभासदांनीं सुरवातीच्या वर्षांत जो स्वार्थत्याग केला होता तो विकत घेण्यासाठीं हा बेत होता. पण या तत्वाला तोंड फुटण्याचा हा पहिलाच प्रसंग होता त्यामुळें या वेळीं या बाबतींत विशेष पुढें पाऊल पडलें नाहीं. १८८० सालापासून प्रत्येक सभासदाचा हिशेब करण्यांत आला आणि ज्याला ज्याला खास देणग्या म्हणून दिल्या होत्या त्या वगळून हिशेब अशा तऱ्हेनें बसविण्यांत आला कीं प्रत्येकाला मिळालेली रक्कम ही त्यानें केलेल्या नोकरीच्या मुदतीच्या प्रमाणांत असावी. ज्यांनीं पैसा अधिक घेतला होता त्यांना अधिक घेतलेला पैसा परत करण्याबद्दल हुकूम झाला व त्या ( आलेल्या ) पैशांतून ज्यांना कमी मिळाला होता त्यांना द्यावयाचा (असें ठरलें). या तत्वाचे संशोधक व पुरस्कर्ते आगरकर हे आहेत. ते त्याला समतेचें तत्व असें म्हणतात आणि या तत्वामुळेंच पुढें एवढ्या परिणामाला गोष्टी आल्या. या तत्वासंबंधीं चर्चा मला पुढें करावयाची आहे. सध्यां मी प्रस्तुत काळच्या दुसऱ्या वृत्तांताकडे वळतों.

१३. छापखाना आणि वर्तमानपत्रें—१८८६ हें सबंध वर्ष छापखान्यासंबंधींच्या वादविवादांत गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. शाळेची सांपत्तिक स्थिति या वेळीं पुष्कळ सुधारलेली होती आणि तिच्यासंबंधीं आतां आमची काळजी पुष्कळ कमी झाली होती. पण छापखान्याची गोष्ट तशी नव्हती. त्याचा खर्च त्याच्या उत्पन्नांतून भागत असे व बरेंचसें कर्जही त्यांतून फिटलें; पण लेखकांना कांहीं मिळत नसे. ही स्थिति चालूं देण्यांत अर्थ नव्हता. आमच्यांतील कांहीं जणांनीं वर्तमानपत्रांत लिहिण्याचें अजिबात बंद करून अधिक फायदेशीर कामांकडे आपला सर्व वेळ खर्चण्याला सुरवात केली होती. कांहीं जण मात्र आपला सर्व वेळ छापखान्याच्या कामाकडे खर्चीत व त्याबद्दल त्यांना कांहीं मिळत नसे. शिवाय छापखाना आणि पत्रें हीं सर्वांच्या मालकीचीं होतीं त्यामुळें कोणत्याही व्यक्तीला आपलीं विशिष्ट मतें पत्रांच्या संपादकीय भागांत प्रकट करण्याची पूर्ण मुभा नव्हती. जे विचार सामान्यपणें सर्वसंमत आहेत व जे निदान अधिक सभासदांना मान्य आहेत तेच संपादकीय मजकुरांत यावेत या तत्वाला अनुसरून वर्तमानपत्रें सुरू झाल्यापासून कांहीं वर्षें आम्ही काम केलें. पण पुढें जेव्हां व्यक्ति तितक्या प्रकृति अधिक स्पष्ट दिसूं लागल्या तेव्हां ही व्यवस्था चालणें शक्य नाहीं असें दिसून आलें. या आणि अशाच इतर कारणांमुळें वर्तमानपत्रांपासून छापखाना विभक्त करणें इष्ट आहे असें पुष्कळ भवति न भवति होऊन ठरलें; पण ही योजना व्यवहार्य नव्हती म्हणून ती सोडून दिली व सर्व सभासदांचा व छापखाना आणि वर्तमानपत्रें यांचा संबंध पूर्णपणें तोडून टाकावा असा दुसरा ठराव मंजूर झाला. छापखान्याचे हिशेब करण्याचें काम मजकडे दिलें. छापखाना बिलकुल नीट चालत नाहीं ही समजूत इतकी खोल गेली होती कीं एकदां आमच्याच पैशांतून ५०० रुपयांचें कर्ज छापखान्याला देण्याचें आगरकरांनीं नाकारलें आणि वास्तविक या वेळीं शाळा व छापखाना या दोहोंचेही चालक तेच सभासद होते. या गोष्टीचा उल्लेख दुसरीकडे येणार आहे म्हणून त्याची हकीकत मी येथें देत नाहीं. १८८६ च्या मध्याच्या सुमारें सर्व हिशेब तयार झाले व १८८६ च्या आक्टोबरांत छापखाना व वर्तमानपत्रें व त्यासंबंधीं सर्व देणें घेणें ही सर्व कायदेशीर रीतीनें रा. केळकर यांच्या हवालीं करण्यांत आली. मला येथें हें सांगितलें पाहिजे कीं हें सर्व तुम्ही आंगावर घ्या म्हणून प्रथम आगरकरांना विचारलें होतें पण त्यांनीं आम्हांला सांगितलें कीं छापखाना

व वर्तमानपत्रें यांना देणें फार झालें आहे आणि संपादक म्हणून मिरविणें हें कांहीं माझ्या आयुष्याचें ध्येय नाहीं आणि या कारणासाठीं त्यांनीं त्याला नकार दिला. या पत्रांच्या भानगडींत आपण पडण्यापेक्षां तीं बंद झालीं तरी चालतील असें ते म्हणाले. आम्हीच सुरू केलेला एक धंदा बंद करावा ही गोष्ट मला पसंत नव्हती. मराठी वर्तमानपत्रांत पुष्कळ बरकत झाली होती व त्याचा लौकिकही पुष्कळ चांगला झाला होता. तेव्हां ही जबाबदारी घेण्यास दुसरा कोणी राजी नसेल तर वर्तमानपत्रें चालविण्याची मी हमी घेतों असें मी सांगितलें. परंतु दोन्ही धंदे चालविण्याचें केळकरांनीं कबूल केलें. तथापि व्यवस्थापकाचें काम रा. हरि नारायण गोखले यांचेकडे सोंपवावें असें ठरलें आणि टिळकांचें साहाय्य असेल तरच आपण हें काम पत्करूं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें तेव्हां छापखान्याचे दुसरे जोखीमदार सभासद म्हणून माझी नेमणूक व्हावी अशी रा. केळकरांनीं बोर्डाला विनंति केली व बोर्डानें तशा प्रकारचा ठराव ता. २२ आगष्ट १८८७ रोजीं केला. छापखाना आणि वर्तमानपत्रें याप्रमाणें औपचारिक रीत्या केळकरांना देण्यांत आलीं व रा. ह. ना. गोखले यांच्याशीं त्यांनीं वाटेल ते करार मदार करावेत असें ठरलें व सर्व सामान्य साहाय्य व सल्लामसलत देण्यासाठीं "दुसरे जोखीमदार सभासद" म्हणून माझें नांव घातलें. या व्यवहारासंबंधीं अधिक हकीकत मी देत नाहीं कारण तिचा प्रस्तुत वादाशीं संबंध नाहीं.

१४. छापखाना याप्रमाणें वेगळा केला तेव्हां मतभेदाचें व दुर्लक्ष होण्याचें एक कारण नाहींसें झालें व आतां आपल्या शाळा व कॉलेज यांकडे अव्यग्रतेनें लक्ष देतां येईल असें (आम्हांस) वाटलें. त्याप्रमाणें कांहीं वेळपर्यंत आम्हांला विसावा मिळालेंसें वाटलें पण तो कायम रहावा असा योगायोग नव्हता. आपलें चुकलें असें आमच्यापैकीं कित्येकांना वाटूं लागलें. कोणत्याही सभासदाला अथवा हितसंबंधाला धक्का पोंचूं नये अशा प्रकारें रा. केळकर वर्तमानपत्रें चालवीत होते. पण तेवढ्यानें (सर्वांचें) समाधान होईना. आपल्याला (वर्तमानपत्रद्वारें) मान्यता किंवा फायदा मिळवितां आला असता तो कित्येकांच्या दृष्टीनें (यामुळें) नाहींसा झाला. विशेषेंकरून संपादकीय भागांत आपलीं मतें प्रसिद्ध करण्याची आगरकरांना संधि मिळेनाशी झाली आणि पुढें वर्तमानपत्रांतून कांहीं सामाजिक विषयांची चर्चा सुरू झाली तेव्हां तर त्यांना (हातीं वर्तमानपत्र असण्याची) गरज अतिशयच भासूं लागली. पत्रव्यवहारासाठीं दिलेल्या रकान्यांत गोळ्यांच्याप्रमाणें आपली सही करून

तुम्हांला आपले विचार प्रदर्शित करितां येतील असें (आम्ही ?) त्यांना सांगितलें. पण तें त्यांना आवडलें नाहीं. शेवटीं हीं पत्रें तुम्हींच चालवा असेंही त्यांना सांगितलें पण आपल्यावर पैशाची जबाबदारी घेणें त्यांना पसंत पडलें नाहीं. तेव्हां मग त्यांना सांगावें लागलें कीं आपलीं तर्कटशाही मतें प्रसिद्ध करण्यासाठीं वर्तमानपत्राचा उपयोग करावयाचा व पैशाची जबाबदारी दुसऱ्याच्या आंगावर टाकावयाची हें कांहीं आम्ही चालूं देणार नाहीं. वर्तमानपत्रें हीं जाणून बुजून केळकरांच्या हवालीं फक्त त्यांच्या मालकीचीं म्हणून केलीं होतीं हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. छापखान्यांत हा तंटा चालला होता त्याच वेळीं शाळा आणि कॉलेज यांतील अंतर्व्यवस्थेसंबंधीं आगरकरांचे विचार बोर्डाला पसंत पडले नाहींत (बोर्डाचें मत काय होतें हें एकदां अनियमित प्रकारें अजमावण्यांत आलें होतें) त्यामुळें आगरकरांच्या निराशेचें रूपांतर हळू हळू द्वेषांत झालें. केसरींत प्रसिद्ध होणारीं मतें हीं (बोर्डांतील) बहुमताला सामान्यपणें पसंत असत हें त्यांना माहीत होतें, (बोर्डाचें म्हणणें अनियमितपणानें कळलेलें होतें,) परंतु सुधारक मंडळींना नाखूष करून केसरी संस्थेचें नुकसान करीत होता असें तरीसुद्धां त्यांना वाटूं लागलें. केसरींत माधवराव रानडे यांच्यावर टीका आली तेव्हां डॉ. भांडारकरांनीं आमच्यावर ताशेरा झाडला. ती संधि साधून आगरकर उठले आणि म्हणाले कीं निदान मी आणि माझे मित्र गोखले यांनीं तरी कांहींही आगळीक केलेली नाहीं. पूर्वीचे संबंध लक्षांत राहिले असते तर भांडारकरांनीं केलेल्या आरोपांचें निरसन आम्हांला पूर्णपणें करितां आलें असतें अशी माझी खात्री आहे. (कारण) सुरवातीला आमच्यावर जेव्हां उडाणटप्पूपणाचा व अविचाराचा आरोप झाला होता तेव्हां त्याचें (निरसन) आम्ही एकदिलानें वागत होतों म्हणून आम्हांला करतां आलें. शिवाय सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेण्याला व वर्तमानपत्रें आतां संस्थेचीं मुखपत्रें नाहींत हें जाहीर करण्याला पत्रांचे चालक तयार होते. पण आगरकरांचें म्हणणें पडलें कीं पत्रांतील मतें एकाच व्यक्तीचीं म्हणजे संपादकाचीं आहेत अशा प्रकारें जाहीर करा आणि अशा प्रकारें केसरींत प्रसिद्ध होणाऱ्या मतांचें महत्व नाहींसें करावयाचें असा त्यांचा बेत होता. पण अशा प्रकारची जाहिरात देणें इष्टही नव्हतें आणि बरोबरही नव्हतें म्हणून पत्राच्या नवीन चालकांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. आमच्या मंडळींत हा उघड तंटा चाललेला पाहून आमच्या निंदकांना

हुरूप चढला आणि त्यांच्या जोरावर आगरकर व गोखले यांना उत्तेजन मिळालें. त्यांना वाटूं लागलें कीं आपल्या पुरस्कर्त्यांत आतां वजनदार मंडळी आहेत. हे दोघे ( आगरकर आणि गोखले ) बहुतेक सभासदांना सामाजिक बाबतींत पुराणवादी व प्रतिगामी असें म्हणूं लागले. परस्पर असंतोष वाढला आणि प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाची नालस्ती करूं लागला. पुढें व्हावयाची सगळी प्रगति याप्रमाणें खुंटली आणि शेवटीं परिणाम असा झाला कीं १८८८ च्या आक्टोबरांत आगरकर आणि गोखले यांनीं एक नवीन पत्र काढलें. तंटा नको या मूळ हेतूनें छापखाना विभक्त केल्यापासून याप्रमाणें दोन वर्षांच्या आंत तिसरें पत्र निघालें.

१५. छापखाना वेगळा केल्यावर तंटा होण्याचें आणखी एक कारण म्हणजे रा. ल. रा. वैद्य यांनीं केलेला संस्कृत–इंग्रजी कोश हें होय. आपट्यांना आतांपर्यंत आपला ग्रंथकर्तृत्वाचा धंदा कोणत्याही अडचणीशिवाय चालू ठेवण्याची पूर्ण मुभा दिलेली होती आणि ( म्हणून ) ही चढाओढ उपस्थित झालेली पाहून ते अगदीं चकित झाले. या व्यवहाराचा इतिहास थोडक्यांत असा आहे:—छापखान्याचे म्यानेजर आतां कोणाच्या ताबेदारींत नव्हते तेव्हां कारखाना किफायतशीर होण्याबद्दल त्यांनीं खटपट करावी हें साहजिकच होतें. अशा विवंचनेंत, ज्याचा खप होईल असें एखादें पुस्तक छापावें असें त्यांच्या मनानें घेतलें. (तेव्हां) मोरोपंत, भारत, ऋग्वेद असें (कांहीं छापा) अशा सूचना ( त्यांना ) झाल्या. पण आपट्यांच्या इंग्रजी संस्कृत कोशाचे एजंट म्हणून त्यांनीं काम केलें होतें तेव्हां अशीच एक संस्कृत इंग्रजी डिक्शनरी छापावी असें त्यांचें म्हणणें पडलें. अगदीं सरळपणें त्यांनीं त्यासंबंधीं प्रथम रा. आपट्यांना तें काम घेण्याबद्दल विनंति केली. आपटे म्हणाले, मी सध्यां मोठा संस्कृत इंग्रजी कोश तयार करण्यांत गुंतलों आहें तेव्हां तो पुरा होईपर्यंत तसलेंच दुसरें काम घेण्याला मला सवड नाहीं; आणि यासाठीं त्यांनीं ती विनंति तर नाकारली पण तें काम करील असा माणूसही ते पाहून देईनात किंवा कोणी तें काम करण्याचें घेतल्यास त्याचें शुद्धाशुद्ध पहाण्याचेंही ते कबूल करीनात. म्यानेजरांनीं मग दुसऱ्या एका तहहयात सभासदाला विचारलें. त्याचा नकार आल्यावर त्यांनीं तें काम रा. वैद्य यांजकडे सोंपविलें व त्यांनीं तें करण्याचें कबूल केलें. आपण शाळांसाठीं ( लहान ) कोश केला तर आपल्या कोशाला कांहीं नुकसानी पोंचेल काय अशा प्रकारचें पत्र या बाबतींत वैद्यांनीं आपट्यांना लिहिलें होतें

असें दिसतें. त्याला नाहीं म्हणून आपट्यांचें उत्तर मिळालें. येथपर्यंत सर्व ठीक झालें. पण जेव्हां जाहिरात प्रसिद्ध झाली तेव्हां चढाओढीचा विचार सरसावला आणि लहान कोश तयार करण्याचें आपट्यांनीं ठरविलें. यापुढें ज्या भावितपणाला बऱ्या दिसत नाहींत अशा चढाओढी झाल्या त्यांचें वर्णन मी देत नाहीं; पण परस्परविरुद्ध वैयक्तिक हितसंबंध उत्पन्न झाले म्हणजे तंटे कसे उपस्थित होतात हें दाखवावें एवढाच माझा हेतु आहे. इतक्या थराला गोष्टी आल्या तेव्हां मी तडजोडीचा प्रयत्न केला. आपट्यांना सुचविलें कीं तुमचा पहिला बेत होता त्याप्रमाणें मोठा कोश प्रसिद्ध होईपर्यंत धाकटा कोश छापूं नका आणि आपल्या लहान कोशाच्या गिऱ्हाकांना (यांची संख्या या वेळीं १०० होती ) आपलें मोठें पुस्तक द्या. आणि दोहोंच्या किंमतींतील पडणारा फरक आर्यभूषण छापखान्याचे मालक ( तुम्हांला ) देतील. प्रथम ही तडजोड त्यांनीं मान्य केली पण पुढें मी असें ऐकतों कीं आगरकरांच्या सांगण्यावरून ती नाकारली. या कामांत मी आपट्यांच्या विरुद्ध प्रत्यक्ष खटपट केली असा मजवर आळ आलेला आहे. याला उत्तर म्हणून मी एवढेंच सांगतों कीं माझ्या मनांत असतें तर मलाही कोश तयार करतां आला असता. पण तो विचार माझ्या मनांत कधीं आलाच नाहीं. छापखान्यांत "दुसरा जोखीमदार मनुष्य" म्हणून माझी नेहमीं सल्ला घेत असत आणि तसेंच कोशाच्या बाबतींतही मला विचारण्यांत आलें होतें आणि छापखान्याच्या हिताच्या दृष्टीनें मीही अगदीं मोकळ्या मनानें सल्ला देत असें. आपटे आणि छापखाना यांच्या हितसंबंधांत विरोध आला तर तो माझा अपराध नव्हता. प्रथम काम द्या म्हणून सांगितलें तेव्हां तें त्यांनीं नाकारिलें. पुढचा परिणाम लक्षांत आला असता तर तसें त्यांनीं कदाचित् केलें नसतें. पण कोष करण्याला योग्य माणूस मिळेल अशी खात्री होईना. अशा स्थितींत रा. ह. ना. गोखले दुसरें काय करणार होते? पण या सर्व माहितीचा कांहीं उपयोग नाहीं. छापखाना वेगळा काढल्यामुळें हितसंबंध कसे विरुद्ध झाले याचीं मी दोन उदाहरणें दिलीं आहेत आणि सध्यां तोच मुद्दा मुख्य म्हणून आपल्यापुढें आहे.

१६. संस्थेच्या हितसंबंधाशीं बाहेरच्या हितसंबंधाचा विरोध चालू दिल्याची एवढींच उदाहरणें आहेत असें नाहीं. परिशिष्टांत खुलासा केल्याप्रमाणें होळकरांनीं दिलेल्या ७०० रुपयांच्या देणगीबाबत झालेला मतभेद याच विरोधामुळें झाला. नामजोशांच्या वर्तनाचा अर्थही अशाच धोरणाप्रमाणें लागतो.

शाळेबाहेर काम करण्याची त्यांना उघड उघड आकांक्षा आहे आणि शाळेपेक्षां बाहेरच त्यांच्या हुपारीला क्षेत्र आहे हें मला कबूल आहे. हें सर्व (आमच्या) पूर्णपणें लक्षांत आलें होतें आणि म्हणूनच बाहेरचें बहुतेक सर्व काम त्यांजवर सोंपविलें होतें. आणि ही व्यवस्था कांहीं वेळ समाधानकारक रीतीनें चालली. पण जसजशी बाहेरच्या कामांची ओढ अधिक झाली आणि नामजोशांची येथें स्थिति जसजशी अधिकाधिक (अ?) निश्चित होऊं लागली तसें त्यांना शाळेच्या कामांचें पूर्वींप्रमाणें महत्व वाटेना. कांहीं बाबतींत नामजोशांच्या धोरणाबद्दल मी निषेध प्रदर्शित केला आहे; त्यामुळें त्यांना रागही येण्याचें भय होतें. या माझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ मला हवीं तितकीं उदाहरणें देतां येतील. पण प्रस्तुत वादांत तसें करण्याची आवश्यकता नाहीं. नामजोशांच्यामागें शाळा किंवा सोसायटी या बाहेरच्या कामाचा लकडा नसता तर त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांची सल्लामसलत अधिक मोकळेपणानें घेतली असती आणि शाळेचें कामही त्यांनीं निराळ्या प्रकारें केलें असतें हें स्पष्ट आहे हें कबूल केलें पाहिजे असें मला वाटतें. परंतु जर बाहेरच्या कामापुढें शाळेच्या कामाचा ते हलगर्जीपणा करीत नसतील तर आपली शक्ति बाहेरच्या कामांत खर्च केल्याबद्दल नामजोशांना एक वेळ गय करतां येईल. पण ज्यांच्या शक्तीची सर्वथा कॉलेजच्या कामांत आवश्यकता आहे त्यांनीं मात्र असली सबब सांगूं नये व त्यांना ती सांगतांही येणार नाहीं. त्यांच्या एकनिष्ठेवर आमच्या संस्थेचा लौकिक अवलंबून आहे आणि या बाहेरच्या हितसंबंधामुळें आपल्या संस्थेंत भलभलते प्रश्न उपस्थित होऊं लागले आहेत हें त्यांना दिसत असतांनासुद्धां आमच्या मूळच्या हेतूंना व तत्वांना अनुसरून बाहेरच्या कामाच्या प्रश्नाचा निकाल लावण्याचें हे लोक मनावर घेत नाहींत ही माझ्या मतें दुःखाची गोष्ट आहे.

या सर्व अडचणींतून बाहे पडण्याचा एकच मार्ग म्हणजे बाहेरचें काम अगदीं बंद केलें पाहिजे किंवा मिशनरी संस्थांत आहे त्याप्रमाणें अशा कामापासून होणारी किफायत (संस्थेच्या) सामान्य निधींत जमा झाली पाहिजे असा नियम केला पाहिजे. शाळेंतील कामाला धोका न येतां उरलेल्या फुरसतींतून बाहेरचें काम करूं अशा प्रकारची भाषा मोठी चांगली आहे. (पण) असल्या गोष्टींवर माझा मुळींच विश्वास नाहीं आणि माझें म्हणणें सिद्ध करण्यासाठीं माझ्या स्वतःच्या अनुभवाशिवाय मिशनरी संस्थांच्या नियमांचा निर्देश केला म्हणजे पुरे.

१७. याच सामान्य विषयांत घालतां येईल असें मतभेदाचें आणखी एक कारण म्हणजे एकंदरींत पुस्तकें लिहिण्याचा ( धंदा ) हें होय. १८७९ सालांत सुद्धां आमच्या चर्चेंत हा विषय येऊन गेला होता, परंतु सुरवातीच्या काळांत त्याला विशेष चिंताजनक स्वरूप आलें नव्हतें. पण आजन्म सभासदांची संख्या जसजशी वाढूं लागली—आणि त्यांचे बाहेरचे उद्योग म्हणजे अर्थात्‌च वाङ्मयात्मक स्वरूपाचे असणें हें अनिवार्य होतें—तेव्हां परस्परांत या कारणामुळें स्पर्धा होऊं नये आणि तिच्या योगानें संस्थेंत वादविवादाला अवसर मिळूं नये यासाठीं तजवीज केली पाहिजे हें स्पष्ट होऊं लागलें. उदाहरणार्थ, ता. ३ फेब्रुवारी १८८८ रोजीं असा ठराव मंजूर झाला कीं जर शाळेसाठीं कांहीं विशेष पुस्तकाची जरूरी असली तर तें उघड चढाओढीनें तयार कर ( वा ) वें आणि त्याचा मालकी हक्क व्यवस्थापक मंडळानें खरेदी करावा. पण अशा प्रकारचा जो पहिलाच प्रश्न विचारांत घ्यावा लागला त्याचा निर्णय मात्र अगदीं विरुद्ध तत्वाप्रमाणें लावला. रा. गोखले यांना सातव्या इयत्तेला अंकगणित शिकविण्यास एक वर्षभर सांगितलें. तेव्हां हिंदी विद्यार्थ्यांसाठीं ( अंकगणिताचें ) एक ( नवें ) पुस्तक पाहिजे असें त्यांना आढळून आलें. ( आणि तें त्यांनीं लिहिलें व ) तें १८८९ सालासाठीं अभ्यासाचें पुस्तक लावलें आहे असा ठराव ता. २६ जून १८८८ रोजीं बोर्डानें केला. यावेळीं तें छापून प्रसिद्ध सुद्धां झालें नव्हतें. अशाच प्रकारचीं दुसरीं लहान सहान उदाहरणें आहेत पण त्यांचा संबंध तहाहयात सभासदांशीं येत नाहीं म्हणून त्यांची हकीकत देणाच्या भानगडींत मी पडत नाहीं.

१८. बाहेरच्या कामामुळें आणि हितसंबंधांमुळें शाळेंत मतभेद कसे उत्पन्न होतात हें मी येथपर्यंत दाखविलें. पण मतभेदाचीं एवढींच कारणें आहेत असें मात्र नाहीं. संस्थेच्या अंतर्गत व्यवस्थेशीं संबद्ध असल्यामुळें ज्यांचें महत्व अधिक आहे अशीं दुसरींही ( मतभेदाचीं ) कारणें आहेत. पगार आणि देणगी यासंबंधींचा प्रश्न हें त्यांतील मुख्य होय. सकृद्दर्शनीं हा प्रश्न अगदीं क्षुल्लक दिसतो पण ज्या संस्थेला आम्ही वाहून घेतलें आहे तिच्या अगदीं मूळावर त्यामुळें घाव पडतो हें थोड्याशा विचारानें दिसणारें आहे. विशेषेंकरून सध्यां आम्ही जो त्यासंबंधीं निर्णय केला आहे त्यामुळें सभासदांना बाहेरचीं कामें आंगावर घेण्याला कांहीं अंशीं फूस मिळाली आहे आणि त्यामुळें वर वर्णन केलेले दुष्परिणाम घडून आले आहेत. इंग्रजी शिक्षण स्वस्त करून तें देशांत अगदीं सर्वत्र पसर-

वावयाचें या कार्यासाठीं मिशनरी संस्थांच्या धर्तीवर पुण्याला शिक्षणसंस्था स्थापावयाची असें आमचें ध्येय होतें. या कार्याच्या ( सिद्धी ) साठीं आमचा सर्वांचा मिळून हिंदी जेसुइटांचा संघ व्हावा हें आवश्यक होतें आणि आपण सर्वांनीं तसें करण्याचें आपखुषीनें मान्य केलें होतें. केवळ निर्वाहापुरतें वेतन घेऊन या कार्याला आपणांला वाहून घ्यावयाचें असा आमचा निश्चय होता. " निर्वाहापुरतें वेतन " हे शब्द थोडेसे संदिग्ध आहेत तेव्हां आम्ही त्यांचा अर्थ काय समजत होतों हें मला सांगितलें पाहिजे. हें कार्य आम्ही अंगावर घेतलें त्यावेळीं " निर्वाहापुरतें वेतन " यासंबंधीं आमची कमाल कल्पना दरमहा पाऊणशें रुपयांपलीकडे कधीं गेली नाहीं. युनिव्हर्सिटींत फेलो नेमण्यासंबंधीं आम्ही ( आमचा अभिप्राय ) लिहिला त्या वेळीं त्यांचा पगार दरमहा शंभर रुपये असावा असें आम्ही सुचविलें होतें हें ( येथें ) सांगण्यास हरकत नाहीं. तेव्हां दरमहा शंभर रुपयांवर आपलें आयुष्य शिक्षणासाठीं वाहणारीं माणसें एकंदरींत मिळणें कठीण नाहीं असा ज्याअर्थीं आमचा विश्वास होता त्याअर्थीं दरमहा पाउणशें रुपये म्हणजे योग्य वेतन असें आम्ही समजावें हें स्वाभाविक होतें व १८७९ सालीं शहरांतील एका गृहस्थांना आम्ही पत्र लिहिलें होतें त्यांत असें म्हटलें होतें. पण आमची तयारी येवढीच होती असें नाहीं. उत्साहाच्या भरांत आम्ही याच्याही पुढें गेलों. सुरवातीला आम्हांला दरमहा चाळीस रुपयांहून अधिक मिळूं शकणार नाहीं हें आमच्या पुरें लक्षांत आलें. आम्हांला जें मिळेल तेवढ्यावर किती जणांचें समाधान होईल असा प्रश्न जेव्हां निघाला तेव्हां कित्येकांनीं या बेतांतून अंग काढून घेतलें. आगरकरांचा आणि माझा निश्चय मात्र ढळला नाहीं. एवढा स्वार्थत्याग करून जी शाळा काढली त्यांत आमचा हेतु काय होता हें स्पष्टपणें दाखवावें एवढ्यासाठीं ही हकीकत मी पुनः दिली आहे. केवळ निर्वाहापुरत्या वेतनावर समाधान मानणें आणि आमचीं सर्व साधनें, मिळकत आणि वेळ हीं संस्थेला अर्पण करावयाचीं हें आपलें अंगीकृत कर्तव्य आहे असा माझा सदैव विश्वास होता आणि अद्यापही आहे व तोच बरोबर आहे असें मला वाटतें. शाळेच्या प्रारंभाच्या दिवसांत सर्वांना निर्वाहापुरतें सुद्धां मिळणें शक्य नव्हतें. कांहीं व्यक्तींच्या बाबतींत आम्ही सढळ हात केला, परंतु तसा नियम घालावयाचा अशी मात्र केव्हांही कल्पना नव्हती. आमचें वेतन आमच्या गरजांप्रमाणें न ठरवितां ( शाळेच्या ) सांपत्तिक स्थितीवरून ठरवावें

अशी जेव्हां रा. आगरकरांनीं सूचना आणिली तेव्हां मी आश्चर्यचकित झालों. या धोरणाच्या एका भागाची चर्चा वर आलीच आहे. पण हें धोरण तेव्हां बाल्यावस्थेंत होतें. पण पुढें दोन वर्षांत त्याचा चांगलाच विकास झाला (आणि म्हणून) ता. ५ फेब्रुवारी १८८७ हा दिवस आमच्या अंतस्थ संबंधाच्या इतिहासांत संस्मरणीय होईल. या स्मरणीय वादविवादाची हकीकत देतांना त्यांतून उत्पन्न झालेला द्वेष आणि शिव्यागाळी यांच्या चिखलांत मी पूर्वीप्रमाणेंच खडा टाकलेला नाहीं. आमचीं अंतःकरणें (परस्परांबद्दल) विटण्याला तें एक कारण झालें आहे, नाहीं असें नाहीं. परंतु तें कारण परिणामरूप होतें आणि ज्याचा आपणांला येथें विचार करावयाचा तें खरें कारण याहून फार खोल आहे. या खोल कारणाची आणि विशेषेंकरून आमच्या शाळेचें पर्यवसान कॉलेजांत अधिक सुलभतेनें करतां यावें म्हणून एम्. ए. च्या परीक्षेची तयारी करणाऱ्या सभासदांना जेव्हां आम्ही मुद्दाम देणग्या दिल्या त्या आमच्या १८८४ सालच्या परस्पर विश्वासाच्या बुद्धींत झालेल्या फरकाची मी आतां हकीगत सांगणार आहें. ती बुद्धि आतां आम्हांला सोडून गेली होती आणि पुढें वर्णन केल्याप्रमाणें वेतन व काम यासंबंधीं समतेच्या गोड नांवाखालीं नवीन नवीन मतें उपस्थित होऊन जणूं काय संसर्गानें पसरूं लागलीं होतीं.

१९. 'या तत्वाचे उत्पादक व मुख्य पुरस्कर्ते रा. आगरकर हे आहेत हें मी सांगितलेंच आहे. या तत्वाचा उगम केव्हां व कसा झाला हें मला माहीत नाहीं. १८७९ सालीं आमची चर्चा होई तींत, अथवा जेव्हां आम्हांपैकीं प्रत्येकाला दरमहा तीस पसतीस रुपये मिळण्याचीही मारामारी पडत असे त्या शाळेच्या सुरवातीच्या वर्षांत (वादविवाद चालत) त्यांत (ही) त्याचा उल्लेख केव्हांही झाला नव्हता. एकादा तहाहयात सभासद अडचणींत असल्यास आणि संस्थेजवळ पैसे असल्यास त्याला देणगीच्या (रूपानें) साहाय्य करावें ही गोष्ट तेव्हां (सर्वांना) कबूल होती. अलीकडे म्हणजे १८८४–८५ सालांत जेव्हां सोसायटीचे नियम व पोटनियम तयार केले व ज्यांत या देणगीच्या तत्वाचा अंतर्भाव आहे, तेव्हां (सुद्धां) या (समतेच्या) तत्वाला कोणी पुढें आणलें नाहीं. कदाचित् तेव्हां तें पुढें आणण्याची वेळ आली नसावी व कदाचित् त्यावेळीं त्याची कल्पनाही कोणाला नसेल. कसेंही असो, १८८५ सालापूर्वीं हें तत्व एवढ्या जोरानें पूर्वीं कधींही पुढें आणण्यांत आलें नव्हतें. त्या वर्षीं संस्थेची सांपत्तिक स्थिति सुधारली आणि नंतर देणग्या व अधिक वेतन यांसंबंधीं

चर्चा सुरू झाली, तेव्हां 'समान काम, समान वेतन' हा ओरडा (प्रथम) झाला. कोणाला कांहीं विशेष अडचण आली तर त्यानें खाजगत उद्योग करून ती भागवावी; (पण) आपणां सर्वांना सारखा पगार मिळाला पाहिजे असा हा ओरडा होता. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे सर्व विशेष देणग्या अजीबाद रद्द तरी झाल्या पाहिजेत, किंवा एका आजन्म सभासदाला जर विशेष वेतन मिळत असेल तर तें सगळ्यांना मिळालें पाहिजे; मग त्यांना (त्याची) गरज असो किंवा नसो. याविरुद्ध असा आक्षेप आला कीं शाळेच्या सुरवातीच्या वर्षांत कित्येक सभासदांनीं आपल्या पदराला खार लावून शाळे-साठीं लांकडी सामान व दुसऱ्या वस्तू घेण्यासाठीं आपले पैसे खर्चिले होते (त्याचें काय ?). अशा प्रकारें जुन्या सभासदांनीं शाळेसाठीं जो जो खर्च केला असेल त्याची भरपाई करून त्यांनीं सोसलेली झीज विकत घ्यावी अशी योजना या आक्षेपाला उत्तर म्हणून पुढें आली. ही योजना म्हणजे आम्हांला आमची अब्रू विका म्हणून सांगण्यासारखें आहे असें म्हणून मी तिला जोराचा विरोध केला. मी सांगितलें कीं यासाठीं कांहीं आम्ही (एवढी) झीज सोसली नाहीं आणि अशा प्रकारें माझी अब्रू विकण्यासाठीं तयार होणारा माणूस मी नाहीं. देणगीच्या प्रश्नावर आगरकरांचे विचार मान्य करण्यानें काय अनर्थ होईल हेंही मी स्पष्ट केलें. तुम्ही बाहेरचें पाहिजे तें काम करा असा त्यांचा अर्थ होतो आणि त्यामुळें सोसायटीच्या मूळ हेतूच्या व्यतिरिक्त कार्याकडे तुम्ही आपली शक्ति वळवा असें सांगितल्यासारखें होतें. जुन्या सभासदांची झीज विकत घेण्याची योजना या विरोधामुळें थंडावली परंतु देणग्या आणि वेतन यांचा प्रश्न राहिलाच. आगर-करांच्या म्हणण्याला मान द्यावयाचा म्हणून असें ठरलें कीं प्रत्येक सभासदाला सध्यां दरमहा पाऊणशें रुपये मिळून शिवाय विम्याची पॉलिसी मिळते, तेव्हां यापुढें देणगी देण्याचा प्रसंग आलाच तर तो अगदीं क्वचित् येईल; आणि याप्रमाणें रा. गोळे यांना मिळत असलेली देणगी बंद करण्यांत आली. परंतु एवढ्यानें रा. आगरकरांचें समाधान झालें नाहीं व त्यांनीं आपलें लाडकें तत्व याच्याही पुढें दामटलें. या वेळीं आमचा महिन्याचा पगार चाळीस रुपये होता आणि वर्षाला ४०० रुपये बोनस म्हणून मिळत असे. विमा व उत्पन्नावरचा कर यांसाठीं रक्कम मिळे ती वेगळीच. कांहीं वेळ आगरकरांना दरमहा ४० रुपयां-हून अधिक रकमेची जरूर भासली असा प्रसंग आला. ही रक्कम त्यांना मागील वर्षाच्या बोनसमधून घेतां आली असती किंवा बोर्डाच्या परवानगीनें त्या

वर्षाच्या बोनसमधून त्यांना ती मिळाली असती, पण दोनी वर्षांच्या बोनसला हात बिलकुल लावावयाचा नाहीं अशी त्यांची इच्छा होती. अशा स्थितींत अधिक मासिक वेतन मिळविण्याचा एकच मार्ग म्हणजे देणगीसाठीं अर्ज करणें हा होता. पण (अशा) वैयक्तिक देणग्यांच्या तत्वाला आगरकर अनुकूल नव्हते. म्हणून त्यांनीं ता. ५ फेब्रुवारी १८८७ रोजीं बोर्डापुढें असा ठराव आणला कीं सर्व सभासदांचा पगार दरमहा पांच रुपयांनीं वाढवावा. आणि ही सूचना करतांना एवढेंच कारण दिलें कीं आतां शाळेच्या सांपत्तिक स्थितीला हें (अधिक ओझें) सहन करतां येण्यासारखें आहे. आगरकरांना जरी आमची सांपत्तिक स्थिति फार सुधारली आहे असें वाटत होतें तरी हिशेबाचें काम ज्याकडे होतें त्या गृहस्थाचें मत निराळें पडलें. या ठरावावर फारसा वादविवाद झाला नाहीं; कारण आपल्याला बहुमत मिळावें अशी खटपट (आगरकरांनीं) केलेली होती. पहिली चर्चा झाली तेव्हां मी सभेंत हजर नव्हतों पण प्रत्येक गोष्ट (शिजून) तयार झाली तेव्हां मला बोलावणें आलें. मी येतों न येतों इतक्यांत मला सांगितलें कीं सर्व जण सूचनेला अनुकूल असून फक्त माझेंच मत घेण्याचें राहिलें आहे. हें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें. मी सभासदांना सांगितलें कीं या ठरावाला अनुकूल मत देण्यांत माझें कांहींच नुकसान नाहीं; परंतु सांपत्तिक स्थिति सुधारली म्हणून पगार वाढवावा हें तत्वच मला मान्य नाहीं. मी सांगितलें कीं दरमहा पाऊणशें रुपये [ रु. ४० दरमहा आणि (सरकारी) ग्रांटपैकीं वर्षाचे ४०० रुपये ] एवढे आमच्या गरजांना पुरेसे आहेत हें मला माहीत आहे आणि जोंपर्यंत अब्रूनें संसार करण्याइतकें वेतन मिळत आहे तोंपर्यंत, निदान सोसायटीचा कायम निधि मोठा होईपर्यंत, सांपत्तिक स्थितीची सुधारणा ही कांहीं पगारवाढीला (योग्य) सबब नव्हे. नंतर तूर्त आगरकरांना जर विशेष खर्चाबाबद कांहीं नड असेल तर आपल्या नियमांप्रमाणें त्यांना देणगी द्यावी अशी मी सभासदांना सूचना केली. त्यानंतर वादविवाद झाला त्यांत वर लिहिल्याप्रमाणें मी सर्व परिस्थितीची फोड करून सांगितली. तेव्हां कांहीं सभासद दिलेल्या मताविरुद्ध जाणार असें दिसूं लागलें आणि आगरकरांना इतका राग आला कीं वादविवादाचा शेवट पराकाष्ठेच्या (Disgraceful) तंट्यांत होऊन प्रश्नाचा निकाल लावल्याशिवाय आम्ही उठून गेलों. यावरून आगरकरांना एवढें स्पष्ट कळून चुकलें कीं एक तर टिळक जोंपर्यंत संस्थेंत आहेत तोंपर्यंत

तेथें आपल्या विचारांचा जय होणार नाहीं आणि दुसरें, टिळक जर नसले तर सभासदांचें बहुमत आपल्याकडे येण्याचा संभव आहे. वर्तमानपत्रांत आपले विचार प्रदर्शित करण्याच्या बाबतींतही त्यांची अशीच निराशा झाली. निराशे-मुळें अंतःकरणांत निष्ठुरता उत्पन्न झाली, निष्ठुरतेचें रूपांतर मत्सरांत झालें आणि मत्सराचा द्वेष झाला. या वादविवादाच्या वेळीं आणि अलीकडे होळकरां-च्या देणगीसंबंधीं त्यांनीं मला लिहिलेल्या पत्रांवरून हें दिसून येईल. परंतु मी प्रस्तुत हकीकत पुढें सांगतों. आपलें बहुमत नाहींसें झालें हें आगरकरांच्या लक्षांत आलें. तुम्ही बहुमताच्या अधिकाराला धाब्यावर बसवितां आणि अकलेचा मक्ता आपल्याकडे घेतां असा त्यांनीं मजवर आरोप केला. आणि पुढें लौकरच आगरकर व गोखले यांनीं कित्येक पोटनियम बोर्डापुढें आणले. व्यवस्थापक मंडळीच्या सभांचें काम अधिक चांगल्या प्रकारें चालावें हा त्यांचा बाह्यतः उद्देश होता. परंतु नामजोशी यांनीं म्हटल्याप्रमाणें खरा उद्देश सभा-सदांच्या तोंडाला खीळ घालणें आणि बोर्डापुढें आलेल्या ठरावांचीं कारणें व उद्देश यांची स्पष्ट व निर्भीड चर्चा न होऊं देणें हा होता. शेवटचा बारावा पोटनियम आगरकरांनीं काढलेल्या समतेच्या तत्वाला कायदेशीरपणा देण्यासाठीं बनविला होता. मात्र त्यांतील शब्दरचना अशी होती कीं तीमुळें त्याचा खरा अर्थ लयाला जाई. मी या पोटनियमांचें पुनः आविष्करण केलें. म्यानेजिंग कमिटीच्या सभा अधिक नियमित व कमी ग्राम्य प्रकारच्या व्हाव्यात यासाठीं कोणताही पोटकायदा मान्य करण्याला माझी हरकत नाहीं असें मी लिहिलें. पण निर्भीड टीका करण्याचा हक्क काढून घेण्याच्या प्रयत्नाला माझी पसंति मिळणें बिलकूल शक्य नव्हतें; (अर्थात् अशी टीका करतांना) खाजगी वर्तनावर मात्र शिंतोडे उडवितां कामा नये हें मला कबूल होतें. त्याचप्रमाणें संस्थेचीं मूळ तत्वें बदलणें अगर औपचारिक नियमांच्या साहाय्यानें वादविवाद दडपून टाकणें अशा प्रयत्नांनाही माझी पसंति मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां ता. २३ फेब्रुवारी १८८७ रोजीं मी म्यानेजिंग बोर्डाच्या चिटणीसांना पत्र लिहून कळविलें कीं, सध्यां परस्परांचीं मनें परस्परांबद्दल साफ नाहींत आणि ( संस्थेचीं ) मूलतत्वें उलथून पाडण्याचे प्रयत्न चालले आहेत, अशा स्थितींत माझें चित्त कामाकडे लागणें शक्य नाहीं; तेव्हां बोर्डानें या प्रश्नांचा ताबडतोब निकाल लावावा. यानंतर बऱ्याच गुप्त सभा झाल्या परंतु त्यांत वादाच्या मुख्य मुद्याचा कांहींच निर्णय लागला नाहीं. अशा प्रकारें मतभेदाचें मुख्य कारण तसेंच भिजत पडलें

आणि त्यामुळें निष्ठुरपणा व द्वेष हीं मात्र वाढलीं. पगाराच्या प्रश्नासंबंधीं एक चांगली ग्राह्य अशी तडजोड बोर्डापुढें आली होती. तींत असें सुचविलें होतें कीं, ३५००० रुपये शिल्लक पडेपर्यंत दरमहा ७५ हून अधिक पगार वाढविण्याचा प्रश्न हातीं घेऊं नये; आणि पगाराची रक्कम दरमहा शंभराहून केव्हांही अधिक नसावी. पण ही तडजोडसुद्धां आम्हांला पटेना आणि तिची चर्चा करण्यासाठीं बोलाविलेली बोर्डाची सभा कोणताही निर्णय केल्याशिवाय बरखास्त झाली. माझ्या मतें या प्रकारें आपले हातपाय बांधून घेणें इष्ट नाहीं, असें म्हणण्यापर्यंतसुद्धां रा. गोखले यांची मजल गेली.

२०. संस्थेचीं आद्य तत्वें बहुमतानें बदलण्याची ज्यांची इच्छा होती तेच लोक आजन्म सभासदांना आणि इतरांना चालू शिलकींतून वेळीं प्रसंगीं कर्ज देण्याच्या लहानशा बाबतींत सर्वांचें एक मत झालें पाहिजे असा हट्ट कसा धरतात हें पाहून मौज वाटते. वर सांगितल्याप्रमाणें ३१ मार्च १८८६ रोजीं छापखान्याला रु. ३०० कर्जाऊ देण्याच्या वेळीं हा प्रश्न प्रथम उपस्थित झाला. या वेळीं तिजोरी आगरकरांच्या ताब्यांत होती. बहुमतानें कर्ज द्यावें असें मंजूर झालें होतें तरी त्यांनीं (तें) देण्याचें नाकारलें. त्या वेळीं पैसे दिले, पण आगरकरांचें समाधान करण्यासाठीं आम्ही ३ एप्रिल १८८६ रोजीं असा ठराव मंजूर केला कीं सभासदांचें एकमत झाल्याशिवाय यापुढें कोणालाही कर्जाऊ रकमा देऊं नयेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे देणग्या देऊन किंवा कर्ज देऊन आपल्या सहकाऱ्यांची सोय करण्याला या वेळीं आगरकर तयार नव्हते. त्यांत त्यांचा हेतु मला विरोध करण्याचा होता का पहिलीं तत्वें बदलण्याचा होता हें मला सांगतां येत नाहीं. पुढें एका वर्षानें गोखल्यांना कर्जाची नड वाटली आणि खरोखर चमत्कार हा कीं नामजोशांना कर्ज देण्याच्या विरुद्ध पूर्वीं मत देणाऱ्या आगरकरांनींच गोखल्यांना कर्ज द्यावें म्हणून ठराव स्वतः आणिला आणि त्याला विरोध होईल या भीतीनें ता. ३ एप्रिल १८८६ रोजीं मंजूर झालेल्या सर्वांच्या एकमताशिवाय कोणालाही कर्ज देऊं नये या नियमाला गोखल्यांचें उदाहरण अपवाद समजावें (आणि हा नियम खुद्द आगरकरांच्याच म्हणण्यावरून मंजूर झाला होता) या (उपसूचनात्मक) ठरावाला त्यांनीं दुजोरा दिला. मी पुनः या वेळीं देणगी विरुद्ध कर्ज हा प्रश्न पुढें आणला परंतु गोखल्यांनींच कर्जासाठीं केलेला अर्ज परत घेतला, त्यामुळें हा वाद तेथेंच थांबला व हा सर्व प्रश्न निर्णय लागल्याशिवाय भिजत पडला.

२१. मतभेदाच्या इतर कारणांकडे मी आतां वळतों. यांच्या बाबतींत तत्वाचा प्रश्न फारसा येत नाहीं पण तें कडकडीत पाळण्यासंबंधीं येतो. आमची संस्था आहे तशा संस्थेंत वागणूक व कारभार यांत निग्रहीपणा असणें हें अत्यंत आवश्यक आहे. आमच्या संस्थेंत बौद्धिक व शारीरिक भागांकडे व त्यांच्या परिणामांकडे जितकें लक्ष दिलें पाहिजे त्याहून अधिक नसलें तरी तितकें तरी लक्ष तिच्या नैतिक भागांकडे ( Side ) व परिणामांकडे दिलें पाहिजे. म्हणून वर्तनांत किंवा तत्वांत सैलपणा (Looseness) चालूं देणें आम्हांला शक्य नाहीं. आमचे हेतु आणि साधनें हीं काय आहेत हें स्पष्टपणें नमूद करण्यांत आलेलें आहे आणि जे जे नियम आम्ही करतों ते ते कडकडीतपणें पाळण्याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. थाटमाट, भपका किंवा चैन यासंबंधीं खोट्या कल्पनांमुळें आम्हांला योग्य मर्यादेबाहेर जाण्याचा मोह होऊं देतां उपयोगीं नाहीं. तत्वावर पूर्ण निष्ठा ठेऊन वागतांना कधीं कधीं सांपत्तिक नुकसान होण्याचा संभव आहे, पण अशाच प्रसंगीं आपण निर्धार केला पाहिजे आणि नुकसानीबद्दल बेपर्वा राहिलें पाहिजे असें मला वाटतें. व्यक्तीप्रमाणेंच संस्थेंतही वर्तनाचा दृढपणा अतिशय आवश्यक आहे आणि आमच्या संस्थांना मूलभूत असे जे प्रश्न आहेत त्यासंबंधीं तत्वासाठीं भांडण्याला आम्ही तयार आहोंत असें आम्ही दाखविलें पाहिजे. सरकारी ग्रांटच्या बाबतींत आपण सुरवातीला कसा झगडा केला हें तुम्हांला माहीत आहेच. पण आमच्यांतला तो जोर लौकरच नाहींसा झाला आणि ज्या वेळीं नवीन नियमाप्रमाणें ग्रांट कांहीं हजारांनीं कमी पडणार असें भय वाटूं लागलें तेव्हां नियमांला जमेल अशा प्रकारें हिशेब दाखविण्याला आम्ही तत्काळ तयार झालों[1]. त्या वेळीं असें करूं नये म्हणून रा. नामजोशी, केळकर,

---

१ रा. टिळक यांचा हा आरोप साफ खोटा होता व या व असल्या दुसऱ्या आरोपांबद्दल त्यांजवर सोसायटीनें अब्रूनुकसानीचा खटला भरावा अशी कायदेशीर सल्ला कित्येकांनीं दिली होती; पण, विशेषेंकरून, आगरकरांच्या आग्रहावरून सोसायटीनें तसें केलें नाहीं. रा. टिळक यांनीं ज्या वेळीं ते म्हणतात ती ही लबाडी घडली त्या वेळींच सोसायटींतून राजीनामा देऊन पाय बाहेर काढावयाचा होता पण तसें त्यांनीं केलें नाहीं; यावरून एक तर त्यांनीं केलेला आरोप मुळांत खोटा होता असें सिद्ध होतें, किंवा त्यांचा आरोप खरा धरल्यास त्यांनीं जाणून बुजून या

धारप आणि मी यांनीं तक्रार केली. धारपांनीं तर सुपरिंटेंडंटच्या जागेचा राजीनामा दिला; पण या सर्व हकीकतींत मी सध्यां शिरत नाहीं. अशा प्रकारें शिथिलपणा दाखविल्याचें हें कांहीं एकच उदाहरण घडलेलें नाहीं. शाळेला औद्योगिक शाखा जोडावी ही सूचना याच कारणामुळें पुढें आली. औद्योगिक शिक्षण आवश्यक नाहीं असें मी केव्हांही म्हटलें नव्हतें व म्हणत नाहीं. पण कोणताही हेतु साध्य करण्याचा एकच उपाय म्हणजे तोच हेतू सतत आपल्या नजरेसमोर ठेवला पाहिजे आणि परिस्थितीच्या जोरामुळें आपण दुसरीकडे कोठें तरी न बहकूं अशी काळजी घेतली पाहिजे. जर एखाद्याला वाटलें कीं आपल्याला दुसरें कार्य अधिक चांगल्या प्रकारें करतां येईल तर तें स्वतंत्रपणें करणें हा मार्ग उत्तम; पण तें कार्य आणि पहिलें कार्य यांना एकमेकांत घुसडून दोहोंचा बिघाड करणें हें बरें नव्हे, वाङ्मयात्मक * शिक्षण येथील लोकांकडून देवविणें हा आमचा हेतु आहे हें वारंवार सांगण्यांत आलें आहे. तेव्हां आपण सर्वांनीं हीच गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. आमच्या वागण्यांत आणखी एक शिथिलपणा झाला त्याचीही मला यावरून आठवण होते. ती गोष्ट म्हणजे युरोपीयन प्रोफेसराच्या साहाय्यानें कॉलेजची वाढ करण्यासंबंधीं आमची तयारी ही होय. १८८९ च्या जानेवारींत मी गेलों तेव्हां या प्रश्नाचा निकाल लागलेला नव्हता; पण पुढें एक आठवडा लोटला नाहीं तोंच नामजोशांनीं डॉ. मॅकीगन व मि. चॅटफील्ड यांना या बाबतींत पत्रें लिहिलीं हें ऐकून मला आश्चर्य वाटलें. पुढें जेव्हां मि. चॅटफील्ड यांनीं सदर कल्पना नापसंत केली आणि पूर्ण ग्रांट देऊं असें वचन देण्याचें नाकारलें तेव्हां या प्रश्नाचा नाद सुटला. या पत्रांसंबंधीं जेव्हां मी विचारपूस केली व तीं कोणाच्या हुकुमावरून पाठविलीं असें विचारलें तेव्हां तीं खासगी होतीं असें उत्तर मला मिळालें. पण याचा अर्थ इतकाच कीं हें प्रकरण बोर्डापुढें औपचारिक प्रकारें आलें नाहीं. (त्या पत्रांतील) विचार तुम्हांपैकीं बहुतेकांना मान्य असले पाहिजेत यांत शंका नाहीं, मग त्यांत तुमचा हेतु कांहींही करून कॉलेजमध्यें पुढचे वर्ग निघावेत हा असो किंवा दुसरा कांहीं असो. पहिल्या व दुसऱ्या बी. ए. चे वर्ग चालू झाले पाहिजेत

लबाडीला संमति दिली असें म्हणावें लागतें. यांतील कोणतीही गोष्ट त्यांना भूषणावह नव्हती.

* Liberal Education.

व कॉलेजची वाढ कोणत्याही मार्गानें झाली तरी मला चालेल असें एक सभासद म्हणत असतांना मी ऐकिलें आहे. शिवाय आमच्या बाहेरच्या उद्योगांमुळें आमच्या मतें सुद्धां आम्हांला आमचें ज्ञान किंवा बुद्धि वाढविण्याला सवड होत नाहीं. पण पूर्णावस्थेला पोंचलेल्या कॉलेजचे व्यवस्थापक होण्याची आमची आकांक्षा मात्र जबर आहे; त्यामुळें आपल्यापैकीं कित्येकांची या कामांत साहाय्यासाठीं युरोपीयन प्रोफेसर आणण्यापर्यंत तयारी झाली आहे. मग तसें केल्यामुळें खर्च किती येईल अगर तंटे किती होतील याचा ते विचार करीत नाहींत अथवा मूळ कोणत्या धोरणानें आम्ही संस्था काढली याचीही त्यांना फिकीर नाहीं. सर्व प्रकारच्या अडचणींशीं टक्कर मारून आमचीं तत्वें मान्य करावयास लावण्याचा आमचा पहिला निश्चय आम्ही सोडून दिला आहे असें माझ्या मतें वर निर्दिष्ट केलेल्या विचारामुळें स्पष्ट दिसून येतें. अशा कार्याला जो धिमेपणा लागतो तो तरी आमच्यांतून नाहींसा झाला आहे किंवा जें ध्येय आम्ही आपल्यापुढें ठेविलें होतें त्याची तरी आम्हांला दिक्कत वाटेनाशी झाली आहे. "कांहींही करून कॉलेजची पूर्ण वाढ करा नाहीं तर आम्हांला आमच्या शक्तीचा नियोग दुसरीकडे करावा लागेल" असा आरडा आपल्यापैकीं कांहीं जणांनीं करावा याच्या मुळाशीं दुसरें कांहीं कारण असावें असें मला दिसत नाहीं. आणि विशेष दुःखाची गोष्ट ही कीं कित्येकांनीं हे विचार प्रत्यक्ष वागणुकींत आणण्यासही कमी केलेलें नाहीं.

२२. करारीपणासंबंधीं* बोलणें चाललें आहे तेव्हां त्या कारणामुळें ज्यांत दुही उत्पन्न झाली आहे अशा आणखी एका गोष्टीचा उल्लेख करण्यास हरकत नाहीं. हा प्रश्न म्हणजे वसतिगृहाचा होय. अशा तऱ्हेची संस्था आवश्यक आहे याबद्दल मतभेद नाहीं. पण वसतिगृह कसें चालवावें यासंबंधीं आमचें

---

१ हा सगळा खेळ रा. नामजोशी यांचा होता असें दिसतें. नामजोशी हे टिळकांच्या बगलेंतले होते. त्यांना ही लटपट करण्याची प्रेरणा कशी झाली याचा इतिहास रा. टिळकांनीं दिलेला नाहीं. तथापि आपल्या बगलबच्चाच्या लटपटीचें खापर सोसायटींतील मंडळीवर फोडण्याची ही रा. टिळकांनीं दाखविलेली करामत मोठी अजब आहे यांत शंका नाहीं.

* Rigidity.

एकमत होत नाहीं म्हणून हा प्रश्न तसाच भिजत पडला आहे. वसतिगृह म्हणजे केवळ हॉटेल असूं नये असें माझें मत आहे. शाळेला वसतिगृह जोडण्याचा हेतु विद्यार्थ्यांना केवळ चांगलें जेवण देणें हा नसून दिवसभर त्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवणें हासुद्धां आहे. हा हेतु साध्य करावयाचा असेल तर ज्याची नैतिक वागणूक कडकडीत आहे व ज्याच्याबद्दल ( कोणालाही ) संशय घेतां येणार नाहीं अशा माणसाकडे बोर्डिंगची व्यवस्था सोंपविली पाहिजे. असें म्हणणें म्हणजे बोर्डिंगच्या मुख्य कल्पनेला विरोध करणें असा भलताच अर्थ करण्यांत आला आणि मी सुचविल्याप्रमाणें ही कल्पना रंगारूपाला आणण्याऐवजीं ती अजीबात टाकून दिली हें सांगतांना मला खेद होतो. आम्ही निश्चय आणि आत्मसंयमन यांचा जेवढा बहाणा करतों तेवढ्या प्रमाणांत त्या ( सद्गुणां ) च्या जोरावर आवश्यक अशा कडकडीत तत्त्वांवर हें कार्य करणें दुर्घट होतें असें मला वाटत नाहीं. हाताखालच्या नोकरांशीं फाजील लघळपणा करणें व संस्थेच्या व्यवस्थेच्या बाबतींत त्यांना आपल्या अंतरंगांत घेणें यासंबंधींही असेंच म्हटलें पाहिजे असें मला वाटतें. एका गोष्टींत ( अशामुळें ) फटफजिती होण्यापासून आपला कसा अगदीं पराकाष्ठेनें बचाव झाला व दुसऱ्या दोन प्रसंगीं आपण भलत्याच बाजूनें कसें वाहवलों हें आपल्या अनुभवाला आलेलें आहेच.

२३. आपल्यांत मतभेदाचीं मुख्य कारणें काय आहेत हें मी ( याप्रमाणें ) आतां सांगून टाकलें आहे. सुरवातीला जे हेतु व जीं ध्येयें आम्ही आपल्यापुढें ठेविलीं होतीं त्यांना पूर्णपणें धरून चालण्याची आमची तयारी नसल्यामुळें हीं कारणें उपस्थित होतात ( झालीं आहेत ) असें दिसून येईल. वर सांगितल्याप्रमाणें आतांपर्यंत यांतील बहुतेक प्रश्नांचा शेवट ज्या शिवीगाळींत व अश्लीलपणांत झालेला आहे त्यांच्या घाणींतून त्यांतील प्रत्येक प्रश्न काढून त्याचा

---

१ आधुनिक विद्यार्थ्यांना रा. टिळक हे वसतिगृहाचे व्यवस्थापक मानवले असते असें यावरून म्हणवत नाहीं.

२ या परिच्छेदांतील सर्व वाक्यें वाचून आपल्या सहकाऱ्यांबद्दल वाटेल तसलीं विधानें करण्याला रा. टिळक मागें पुढें कसें पहात नव्हते हें दिसतें. आणि अशा खोट्या आरोपांमुळें आणि मर्मभेदक बोलण्यामुळें सोसायटींतील प्रत्येक मनुष्य त्यांना अगदीं कंटाळला याचें नवल वाटत नाहीं.

(विचार करण्याचा) मी प्रयत्न केला आहे. पण आमच्या ज्या परस्परांबद्दल भावना झाल्या आहेत त्यांचा विचार करतांना मात्र वरील गोष्टी लक्षांत घेतल्याशिवाय चालणार नाहीं. मूळचा कार्यक्रम पार पाडण्याबद्दल तयारी नसणें एवढेंच नव्हे तर त्याच्या अगदीं विरुद्ध असलेल्या तत्वांना मान्यता देण्याची स्पष्ट इच्छा, या गोष्टीमुळें हा तंटा व वैर हीं उद्भवलीं आहेत आणि या प्रसंगांतून पार पडण्याचा खरा मार्ग म्हटला म्हणजे प्रत्येक प्रश्नाच्या अगदीं मुळाशीं गेलें पाहिजे व जरूर पडल्यास (कांहीं तरी) नवीन धोरणाप्रमाणें त्याचा निर्णय केला पाहिजे. पण अशा तऱ्हेचा प्रयत्न कधीं झाला असेल तर अगदीं क्वचित्च झालेला दिसतो. उलट तडजोडीचा प्रत्येक प्रयत्न निष्फळ झालेला आहे आणि सर्व प्रश्न जसेच्या तसे भिजत पडले आहेत त्यामुळें ज्या ज्या वेळीं ते निघतात त्या त्या वेळीं अधिक तंटा होऊन वैर अधिक वाढतें. वरील प्रश्नांचा निकाल लागावा म्हणून गेलीं चार वर्षे मी निकड लावली होती (फेब्रुवारी १८८७, ३ जुलै १८८७, १५ जुलै १८८८, २७ आक्टोबर १८८८, ३० जानेवारी १८८९, ५ जून १८८९ आणि २५ जुलै १८९० या दिवशीं भरलेल्या बोर्डाच्या सभांची हकीकत पहा) पण ज्या निरनिराळ्या तडजोडी (Solutions) सुचविण्यांत आल्या त्यांपैकीं एकही कांहीं थोडे महिनेसुद्धां अमलांत आली नाहीं. दोन्ही पक्षांनीं आळीपाळीनें कांहीं काळपर्यंत स्वस्थ बसतों असें म्हटलें. पण अशा तऱ्हेचा स्वस्थपणा फार दिवस टिकणें शक्य नव्हतें व तो तसा टिकला नाहीं. वादाचा प्रश्न त्यामुळें कांहीं काळ तहकूब झाला पण त्याचा निकाल लागला नाहीं. संस्थांचें मामुली काम पाहण्यासाठीं पक्षभेदापासून* अलिप्त अशी एक कार्यकारी कमिटी निर्माण केली तिचा हाच प्रकार. या कमिटीला तत्वाच्या प्रश्नासंबंधीं निर्णय देण्याचा अधिकार नाहीं. मामुली काम चालू राहण्याला ही युक्ति ठीक आहे परंतु तत्वांच्या प्रश्नांचा निश्चित निकाल होईपर्यंत सर्व प्रगति अगदीं थांबते. अंतर्गत व बाह्य (कामाची) अशा दोन कमिट्या नेमल्या त्यांतही हेच दोष निष्पन्न होतात; मार्ग आणि साधनें निश्चित होऊन दुसऱ्या प्रत्येक गोष्टीची स्थिरस्थावर झाली म्हणजे कामाची अशी विभागणी योग्य आहे. या सर्व मार्गांचा उपयोग करण्याचा प्रयत्न आम्ही केला. किंबहुना बाहेरचें काम कांहीं काळपर्यंत अगदीं थांबवावयाचें असा ठरावही केला. (२७ आक्टोबर १८८८).

---

* Indifferent.

परंतु मनाची एकदां झालेली चलबिचल पुनः उसळून वर कशी येऊं लागली हें तुम्हांला माहीत आहेच. या घडलेल्या गोष्टी व अनुभव यांवरून रा. नामजोशी यांनीं सभासदांत दिलसफाई व्हावी म्हणून ज्या सूचना केल्या त्यांत कोणती दुरुस्ती आणि फेरबदल करणें आवश्यक आहे हें समजणें अतिशय कठीण झालें. (नामजोशांच्या) सूचनेंत एतद्देशीयांची व्यवस्था याखेरीज तत्वांचे दुसरे सर्व प्रश्न काळजीपूर्वक वगळले होते आणि तो प्रश्न तरी आला ही मि. चॅटफील्ड यांच्यावरच मेहेरबानी असें त्यांकडून नामजोशांना उत्तर आलें त्यावरून म्हटलें पाहिजे. हा समेट म्हणजे अंतर्गत व बाह्य कमिट्या नेमण्याच्या शिळया युक्तीचें खरोखर पुनरुज्जीवन होय; पण त्यांतही एक अनिष्ट फरक झाला होता. म्हणजे एका कमिटीनें दुसऱ्या कमिटीच्या कामांत ढवळाढवळ करावयाची नव्हती. १८८९ च्या जूनमध्यें पुढें संस्था सोडून कायमचें जायाचें अशा हेतूनें (कारण या संस्थेंत यापुढें मला अब्रूनें राहणें शक्य नाहीं असें मला वाटलें) मी एका टर्मची रजा घेतल्यानंतर म्हणजे होळकरांची देणगी व त्यासंबंधींचा पत्रव्यवहार हे झाल्यानंतर नामजोशांनीं समेट व्हावा म्हणून ही सूचना आणली. मी (राजीनामा देण्याच्या) कारणासंबंधींचा हा लेख त्याच वेळीं तयार केला हें येथें सांगण्यास हरकत नाहीं; त्यावरून यांत उपस्थित केलेले प्रश्न नवीन नसून मी राजीनामा देत आहें तो रागाच्या आवेशांत एकाएकीं दिलेला नाहीं हें त्यावरून निःसंशयपणें सिद्ध होईल. नामजोशांनीं सुचविलेल्या समेटाला तेव्हां यश आलें नाहीं. परंतु १८८९ च्या मेच्या शेवटीं बाहेरचें काम, पगार व अंतर्गत संबंध या प्रश्नांचा बोर्डानें पुनः विचार करून कांहीं तडजोड करण्यांत आली (बोर्डाची हकीकत आणि चिटणीसांना मी लिहिलेलें ता. ७ जून १८८९ चें पत्र पहा). झालेली तडजोड कायमची झाली अशा समजुतीनें यानंतर मी पुनः शाळेचें काम पाहूं लागलों. पण पूर्वीं झालेल्या तजविजीप्रमाणेंच हीही तजवीज केवळ कागदी स्वरूपाची ठरली. प्रत्येकाला काय कारण असेल तें असो असें वाटूं लागलें कीं ही व्यवस्था आपल्यावर (नाहक) लादलेली आहे आणि त्यामुळें पूर्वींचा स्नेहसंबंध उत्पन्न होण्याऐवजीं आमचे संबंध अधिकच बखेड्याचे झाले. संस्थेच्या कोणत्याही सभासदानें बाहेरचें महत्वाचें व दीर्घकालिक काम घेऊं नये असें ठरलें होतें. परंतु या तत्वाची अंमलबजावणी कांहीं सभासदांवर करण्याचा प्रसंग आला तेव्हां कांहीं अपवाद केले पाहिजेत अशा गोष्टी निघाल्या आणि हे अपवाद इतके मान्य करण्यांत आले कीं हे अपवाद म्हणजेच नियम

होऊन बसले. अशा प्रकारें १८८९ च्या आक्टोबरपर्यंत एक टर्म आम्ही चालढकल केली. या वेळीं नवीन सुपरिंटेंडंट नेमण्याचा प्रश्न आला आणि तें काम घेण्याला कोणी तयार होईना. रा. गोळे यांनीं तें काम करण्याची खुषी दर्शविली पण त्यांनीं अशी अट घातली कीं आपल्याला अगदीं अप्रतिहत मुखत्यारी दिली पाहिजे आणि दुसरा उपायच नव्हता म्हणून त्यांची अट मान्य करावी लागली. मी मात्र स्पष्टपणें सांगितलें कीं अशा परिस्थितींत काम करण्याची माझी इच्छा नाहीं आणि मी राजीनामा देण्याच्या बेतांत होतों इतक्यांत १८९० च्या जानेवारींत पहिला बी. ए. चा वर्ग सुरू झाला आणि रा. आपट्यांनीं तो विचार सोडून देण्याबद्दल माझें मन वळविलें व अप्रतिहत सत्ताधीश सुपरिंटेन्डन्टाची जागा ( ही ) रद्द करण्यांत आली. कॉलेजमध्यें पडलेल्या नवीन जबाबदारीमुळें कांहीं काळ तरी आमच्यांत एकी राहील अशी आशा या वेळीं वाटत होती पण ही आशा भ्रांतिमूलक ठरली. रा. गोखले कांहीं दिवस सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचें काम पहात असत. त्यांच्या मनांत त्या सभेच्या चिटणीसाचें काम पतकरण्याचें आतां आलें. हें रोजचें दोन तीन तासांचें काम आहे. एखाद्यानें आपल्या शक्तीचा याप्रमाणें तिसरीकडेच उपयोग करण्याला मी पुनः हरकत घेतली. सरकारसुद्धां आपल्या नौकरांना दुसरें कांहीं करूं देत नाहीं आणि आमच्या सारख्या संस्थेंत याप्रमाणें बाहेरचें निश्चित स्वरूपाचें काम अंगावर घेण्याला परवानगी देणें म्हणजे खासगत कामाचें तत्व अतिरेकाला नेण्यासारखें आहे हें मी स्पष्ट केलें. मी सांगितलें कीं ही चिटणिशीची जागा मला पूर्वीं सांगून आली होती पण संस्थेशीं माझा संबंध आहे तोंपर्यंत ती पत्करण्याचें मी नाकारलें, आणि गोखल्यांना तसेंच सांगतां आलें असतें. मी आणखी असेंही सांगितलें कीं फर्ग्युसन कॉलेजांत इंग्रजी वाङ्मयाच्या अध्यापकाच्या कामांत आपली शक्ति खर्चिण्याला गोखल्यांना पाहिजे तेवढी जागा आहे आणि आम्हांला जर इतर कॉलेजाशीं बरोबरी करावयाची इच्छा आहे तर वाचनांत आणि उद्योगांत त्यांच्यापेक्षां आम्ही मागें नाहीं ( आणि तसें आम्ही निःसंशय मागें आहों ) एवढें तरी आम्ही दाखविलें पाहिजे.* परंतु माझ्या या म्हणण्याचा कांहीं परिणाम झाला

* आपल्या सहकाऱ्यांच्या शिक्षणपटुत्वाबद्दल रा. टिळकांनीं दिलेलें हें अनुदार सर्टिफिकेट त्यांनीं क्रोधामुळें बेभान होऊन दिलें असलें पाहिजे असें म्हणावें लागतें.

नाहीं. बोर्डांत या प्रश्नावर दोन्ही बाजूला सारखीं मतें पडलीं आणि (सार्व-जनिक) सभेच्या दिवाणखान्यांत मी आणि रा. आपटे यांच्या दरम्यान खेद-कारक बोलाचाली एक वेळां झाल्यावर जुलै १८९० त गोखल्यांची त्या संस्थेच्या चिटणिसांच्या जागेवर नेमणूक झाली. या प्रश्नाचा निकाल लावण्या-बद्दल मी पुनः निकड केली, त्याचा परिणाम असा झाला कीं ता. १४ आक्टोबर १८९० रोजीं माझ्याविरुद्ध निंदाव्यंजक ठराव मंजूर करण्यांत आला. या ठरावांत रास्तपणा किती आहे हें मला सांगतां येणार नाहीं. पण माझ्या राजीनाम्यानंतर रा. केळकरांनीं बोर्डाच्या चिटणिसाला पत्र लिहिलें आहे त्यावरून कांहीं सभासदांनीं माझ्याविरुद्ध क्षुल्लक कारणासाठीं मत दिलें असें दिसून येईल. पण या विषयाची जास्ती चर्चा करण्याची माझी इच्छा नाहीं. बाहेरचीं कामें आणि पगार हे प्रश्न मिटवण्यासंबंधीं सारखी जिकीर चाल-विल्यामुळें मी बहुतेक प्रत्येक सभासदाच्या प्रेमाला मुकलों आहें आणि माझें नांव निघालें कीं त्यांना त्रास होतो एवढें सांगितलें म्हणजे पुरे. ह्याचा परिणाम इतका झाला आहे कीं दुसऱ्यांच्या मार्गांत मी एक विघ्न आहें असें (सर्वांना) वाटलें आणि (त्यामुळें) माझ्या अगदीं क्षुल्लक दोषाबद्दल चर्चा होऊन त्याला विलक्षण असें मोठें स्वरूप देण्यांत येतें. याची (ही) मी पर्वा केली नसती. पण जेव्हां मला अक्कल* आहे कीं नाहीं असे प्रश्न निघूं लागले आणि मजविरुद्ध निंदाव्यंजक ठराव पास होऊं लागले तेव्हां आतां यापुढें (संस्थेंत) निभाव लागणें अशक्य झालें आणि मला राजीनामा देणें भाग पडलें. मी हट्टी आणि संतापी असेन (या आरोपांचा विचार मी पुढें केला आहे) परंतु तसा असून सुद्धां जर बोर्डानें वादाच्या महत्वाच्या प्रश्नांचा कांहीं तरी कायम निकाल लावला असता तर या आरोपांची मी मुळींच पर्वा केली नसती. परंतु सध्यां स्थिति अशी आहे कीं माझ्याविरुद्ध भलभलते आरोप आणून संस्थेला अगदीं आधारभूत अशा कित्येक तत्वांची गळेचेपी चालली आहे. ही अशी स्थिति किती दिवस राहणें शक्य आहे व या परिस्थितींत, सुरवातीला योजिल्याप्रमाणें संस्था यशस्वी होणें शक्य आहे काय हें मी तुमच्या निर्णयावर सोपवितों.

२४. सुरवातीपासून आमचे संबंध (कसे) होते याचा इतिहास अशा प्रकारचा आहे. आतां माझ्या स्वतःबद्दल व (उपरोक्त संबंधाच्या बाबतींत

---

* Capacity.

झालेल्या ) माझ्या वर्तणुकीबद्दल कांहीं विचार प्रदर्शित करितों. कांहीं निश्चित हेतु आणि उद्देश यांसाठीं आम्ही एकत्र आलों आणि त्याप्रीत्यर्थ आम्ही आपखुषीनें पुष्कळ स्वार्थत्याग केला हें ( कोणालाही ) नाकबूल नाहीं. परंतु, विशेषेंकरून एकाच व्यक्तीच्या हातून पार पडण्यासारखें हें कार्य नसल्यामुळें आरंभींच्या हेतूला एवढ्या हट्टानें चिकटून बसूं नये असें कित्येकांचें मत दिसतें. म्हणजे त्यांना वाटतें त्याप्रमाणें माझे विचार त्यांच्यावर लादण्याच्या ऐवजीं मी बहुमताला धरून चालावें असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ निघतो. दैविक निःस्वार्थबुद्धि आणि करारीपणा यांच्या नांवाखालीं तुमचा हेतु अथपासून इतिपर्यंत आपला हेका चालविणें आणि आपल्या नांवाचा उदो उदो करणें हा आहे असें आगरकर (मला) म्हणतात; त्यांत तरी शिवीगाळ सोडून दिल्यास हाच आरोप मजवर केलेला आहे. त्याला माझें उत्तर असें आहे कीं एक तर मी कांहीं केवळ माझ्या ( एकट्याच्या ) विचारांसाठीं भांडत बसलों नाहीं. हें खरें कीं जसे इतर कित्येक लोक आले तसाच मी एक आलों; पण हें कार्य सुरू केलें त्या वेळीं सर्वांना हे विचार मान्य होते. एज्युकेशन कमिशनपुढें दिलेल्या साक्षींत आणि शाळेच्या कित्येक अहवालांत व हकीकतींत जीं विधानें आहेत त्यांवरून आमचा हेतु ( काय होता हें ) लक्षांत येईल. ( तो असा कीं ) उच्च इंग्रजी शिक्षणासाठीं स्वदेशी शाळा काढणें आणि हा हेतु पुढें ठेवून केवळ निर्वाहापुरत्या वेतनावर संतुष्ट रहावयाचें आणि आपलें वाकीचें सर्व उत्पन्न व शक्ति हीं संस्थेच्या हितासाठीं खरचावयाचीं असा आम्ही निश्चय केला. आमचें ध्येय अशा प्रकारचें होतें आणि सुरवातीला जो मार्ग आम्ही आमच्यासाठीं आंखला होता त्यापासून आम्ही किती भ्रष्ट झालों हें वर दिलेल्या हकीकती-वरून लक्षांत येणें कठीण नाहीं. ज्या वेळीं आम्हांला दरमहा तीस पस्तीस रुपये मिळण्याची मारामार होती त्या सुरवातीच्या दिवसांत अशा प्रकारें मार्ग-च्युत होण्याला कांहीं तरी सबब असेल; पण मला वाटतें कीं आतां जी स्थिति आम्हांला प्राप्त झाली आहे तींत, सुरवातीच्या दिवसांत कित्येकांना आम्ही मोकळीक दिली ती आखडती घेणें आवश्यक आहे असें अनुभवानें आम्हांस समजलें पाहिजे, नाहीं तर सभासदांत जरी तूट पडली नाहीं तरी फूट पडल्याशिवाय राहणार नाहीं. आमच्यापैकीं बहुतेक प्रत्येकाचा संस्थेच्या बाहेर कांहीं ना कांहीं हितसंबंध आहे. किंबहुना आम्हांला असें वाटूं लागलें आहे कीं आमचें काम फक्त शाळेंत चार तास शिकविण्याचें,

त्याच्या बाहेर प्रत्येक मनुष्य वाटेल तें करण्यास मोकळा आहे. कित्येक नव्या सभासदांत ही मनःस्थिति विशेष जोरांत असलेली आढळते. त्यांना असें वाटतेंसें दिसतें कीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा तहाहयात सभासद होणें ही पुण्यांत आलेल्या नवीन माणसाला सुरवात करण्याला ठीक गोष्ट आहे आणि जर त्याला धमक आणि इच्छा असेल तर तिच्या साहाय्यानें त्याला वैयक्तिक मोठेपणा आणि फायदा हीं मिळवितां येतील. अशा प्रकारची अनर्थकारक विचारसरणी बोकाळली असतांना, सुरवातीला कोणते उद्देश आम्ही आपल्यापुढें ठेवले होते व ते सोडून आम्ही किती वाहवलों आहों हें सभासदांच्या नजरेला जोरानें आणून देणें हें माझें करणें बरोबर आहे असें मला वाटतें. माझा एक स्नेही सरकारी नोकरींत आहे. तो एकदा मला म्हणाला कीं मी दरमहा अमुक एका रकमेकरितां मी माझी स्वतंत्रता सरकारला विकली आहे आणि (त्यामुळें) मला माझीं कोणत्याही बाबतीसंबंधाचीं मतें स्पष्टपणें प्रकट करण्याची किंवा सरकारच्या हिताला विरोध होईल अशी कोणतीही गोष्ट करण्याची मुभा नाहीं. तो पुढें असें म्हणाला, "बरोबर किंमत घेऊन मी माझी स्वतंत्रता विकून टाकली आहे, आणि त्याबद्दल मी मला कांहीं श्रेय मिळावें असें म्हणत नाहीं. पण तुमची गोष्ट निराळी आहे. स्वार्थत्यागाचें श्रेय तुम्हांला पाहिजे म्हणजे त्याचा अर्थ असा कीं दुसरीकडे जें तुम्हांला मिळेल त्यापेक्षां कमी किंमतीला तुम्ही आपली स्वतंत्रता सोसायटीला विकण्याला तयार आहांत; तेव्हां दुसरीकडे कोठेंही आशा न ठेवतां केवळ पोटापुरत्या वेतनावर तुम्ही आपल्या कार्याला स्वतःला सर्वस्वीं वाहून घेतलें पाहिजे तरच तुम्ही स्वार्थत्याग केला आहे असें म्हणतां येईल." ह्या म्हणण्यांत पुष्कळ तथ्य आहे हें लागलीच दिसून येईल. सोसायटीकडून आम्हांला आतां बरा पगार मिळतो तर आतां आम्ही बाहेरच्या सर्व भानगडी बंद करून आपल्या कार्याकडे सर्वस्वीं वाहून घेतलें पाहिजे. जेसूईट म्हणवून घेण्यांत आम्हांला अभिमान वाटतो. पण त्यांच्या अनन्यतेचें अनुकरण करण्याची मात्र आमची तयारी नाहीं. ज्यांच्यामुळें संस्थेंत द्वेष आणि मत्सर यांचा प्रादुर्भाव होऊन आपल्या मूळ हेतूला विरोध येतो ते बाहेरचे उद्योग बंद करण्याला आपली खुषी नाहीं. पण याहीपेक्षां वाईट गोष्ट म्हणजे आमच्या मूळ हेतूकडे जर कोणी आमचें लक्ष वळविलें तर "तुम्ही हट्टवादी असे निस्पृह आहांत आणि प्रत्येक गोष्ट आपल्या लहरीप्रमाणें झाली पाहिजे अशी तुमची इच्छा आहे" अशा प्रकारचा भडिमार

सहन करण्याला त्यानें तयार असलें पाहिजे. आमच्यावर प्रसंग दुर्धर आला आहे यांत कांहीं शंका नाहीं.†

२५. माझ्या विरुद्ध आणलेल्या आरोपांतील दुसरी गोष्ट म्हणजे बहुमताच्या अधिकाराविषयीं अनादर ही होय. पण याचा अर्थ काय हेंच मला समजत नाहीं हें मला दुःखानें म्हटलें पाहिजे. एखाद्या संस्थेचे हेतु आणि उद्देश हे एकदा निश्चित झाल्यावर त्या संबंधांत फेरफार करून ते अल्पमतांवर लादण्याचा बहुमताला कसलाही हक्क आहे असें मला वाटत नाहीं. हेतु आणि उद्देश हे पाहिजे तर तुम्हांला बदलतां येतील, पण जे सभासद संस्थेचा अमुक एक हेतु आहे या समजुतीनें संस्थेला मिळाले असतील त्यांची त्या फेरफाराबद्दल नाखुषी असल्यास त्यांना आतां आपण संस्थेंत रहावें किंवा नाहीं यासंबंधीं विचार करण्याला संधि दिली पाहिजे असा त्याचा अर्थ होतो. केलेला फेरफार त्यांना पटला तर उत्तमच, पण जर पटला नाहीं तर संस्थेंतून निघून जाण्याबद्दल त्यांच्यावर थोडासुद्धां ठपका ठेवतां येणार नाहीं; कारण अशा नवीन हेतूप्रीत्यर्थ ते संस्थेला कधींच येऊन मिळाले नव्हते. आमच्यांत अनेक प्रश्नांबद्दल जो वाद पडला आहे त्यासंबंधीं तरी मी तुम्हांला जी विनंति करीत आहें ती अशाच प्रकारची आहे, पण तिचा उपयोग झालेला नाहीं. आपले हात बांधून घेण्याला (स्वातंत्र्य कमी करण्याला) तुम्ही तयार नाहीं आणि आपलीं तत्वें बदललीं असें उघडपणें कबूल करण्याचें धारिष्टही तुमच्याजवळ नाहीं. तुमच्यापैकीं कित्येकांनीं या बाबीसंबंधीं जें तटस्थपणाचें धोरण स्वीकारलें आहे त्याचा दुसरा काय अर्थ होतो हें मला समजत नाहीं. कांहीं तरी निश्चित निर्णय करून जो अनर्थ होईल त्याहून अधिक अनर्थ या धोरणामुळें झालेला आहे व होत आहे. मूळचे हेतु आणि उद्देश यांना कडकडीत अनुमति देण्याच्या बाबतींत माझें ऐकण्याला (माझ्या मताचा अंगीकार करण्याला) तुम्हांपैकीं बहुतेक कोणी तयार नाहींत हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं, परंतु काय असेल तें असो, परस्परविरुद्ध अशा या विचारांत निवड करण्याची जबाबदारीही आपल्यावर घेण्याची तुमची इच्छा दिसत नाहीं; तेव्हां अशा स्थितींत ज्याचा त्यानें स्वतःच काय तो निर्णय केला पाहिजे. तपशीलाच्या

† या परिच्छेदांतील कोणताही आरोप आगरकरांना यत्किंचित्‌ही लागत नसत्यामुळें त्याची विशेष चर्चा प्रस्तुत ग्रंथांत करण्याचें कारण दिसत नाहीं.

बाबतींत बहुमताचें ऐकण्याला मी तयार आहें हें मी वर सांगितलें आहे पण जेव्हां त्यांचा निर्णय तत्वासंबंधीं असेल आणि विशेषेंकरून तो निर्णय सुरवातीला आखून दिलेल्या व संमत झालेल्या तत्वांच्या विरुद्ध असेल तर मला मी येथें रहावें किंवा काय हा विचार करण्याचा हक्क आहे असें मला वाटतें. बहुमताच्या तत्वाबद्दल प्रेमाचा जे एवढा उमाळा दाखवितात त्यांनींसुद्धां जेव्हां त्यांच्या मतें तत्वाचे म्हणून प्रश्न वादाला पडले तेव्हां याच मताचें अवलंबन केलें आहे हें मी सांगण्यास हरकत नाहीं. खरोखर ( एवढें करून ते थांबले नाहींत तर ) याहीपेक्षां गैर गोष्ट त्यांनीं केली. तपशीलाच्या बाबतींत वरिष्ठ अधिकाऱ्यांना लिहून आणि बाहेरचें साहाय्य व कुमक मिळवून त्यांनीं आपले विचार संस्थेवर लादण्याचा प्रयत्न केला. असली तरी भानगड मी केलेली नाहीं.

२६. जरी बहुमताच्या अधिकाराबद्दल माझें मत अशा प्रकारचें आहे तरी कसल्याही योग्य तडजोडीला माझा विरोध होता असें मात्र समजूं नये. उलट पगार व बाहेरचें काम यासंबंधीं मी स्वतः तडजोडी सुचविलेल्या आहेत. परंतु कांहींना कांहीं कारणामुळें त्या मान्य झाल्या नाहींत आणि जेव्हां मान्य झाल्या तेव्हां ( त्यांतील अटी ) मोडण्याला आम्ही हरकत केली नाहीं. या तडजोडी फार मोठ्या नव्हत्या हें मी कबूल करतों, पण आमच्या संस्थेसारख्या संस्थेंत असेंच होणार. परिस्थिति ओढील तिकडे जाणें हा कांहीं आमचा हेतु नव्हता. असल्या हेतूसाठीं स्वार्थत्याग करावा लागत नाहीं व त्यासाठीं स्वार्थत्याग करावा अशी त्याची योग्यताही नाहीं. व्यक्ति आणि संस्था यांचे दोन प्रकार असतात. एक आहे तशा परिस्थितीशीं जमवून घेतात त्यांचा, आणि दुसरा प्रकार धीटपणानें आणि सततोद्योगानें पुढची वाट झगडा करून काढीत काढीत जे अनुकूल परिस्थिति उत्पन्न करितात आणि आपले विचारांना ( जगांत ) मान्यता मिळवून देतात त्यांचा. दुसऱ्या प्रकारांत त्यागाचें नैतिक बळ आवश्यक असतें तसें तें पहिल्यांत असत नाहीं; आणि या दुसऱ्या प्रकारांत जरी तडजोडी केल्या तरी त्या अगदीं स्वल्प प्रमाणांत पाहिजेत. नक्षत्रांच्या मार्गांत होणाऱ्या अतिक्रमणांप्रमाणें त्या असतात; म्हणजे हें अतिक्रमण किती जरी झालें तरी तें मध्य प्रेरणेला कधींही असह्य होत नाहीं. त्यांना नियम सिद्ध करणारे अपवाद म्हणतां येईल. अशा तऱ्हेच्या अतिक्रमणाला किंवा तडजोडीला मी केव्हांही विरोध केला नाहीं. पण सध्यां आपल्यापुढें जो प्रश्न आहे तो अल्प स्वल्प अति-

क्रमणाचा नाहीं तर मार्ग बदलण्याचा किंवा तो अगदीं अनिश्चित करण्याचा असा आहे. अशा स्थितींत मला तडजोड पटणें शक्य नाहीं हें अगदीं उघड आहे.

२७. जीं तत्वें मान्य व्हावींत म्हणून मी खटपट चालविली होती त्यांच्या विरुद्ध मी स्वतः वागलों आहें आणि मी बाहेरचें म्हणजे राष्ट्रीय सभेचें काम बरेंचसें केलें आहे असा माझ्यावर आणखी एक आरोप आहे. पण या आरोपाला कांहींच आधार नाहीं. मी रजेवर असतांना आणि संस्थेचा राजीनामा द्यावयाचा हा विचार माझ्या मनांत घोळत असतांना मी राष्ट्रीय सभेचें काम अंगावर घेतलें. मी १८८९ च्या जूनमध्यें परत (संस्थेंत) आलों आणि पूर्वीं घेतलेलें काम सोडलें नाहीं हें खरें; पण त्याचें कारण असें कीं, आमच्या वादाचा कायमचा निकाल लागला असें मला वाटत नव्हतें आणि शिवाय तें कामही कांहीं वेळापुरतें होतें. राष्ट्रीय सभेचें काम आज कित्येक वर्षें अस्तित्वांत आहे पण मी तें या पूर्वींच्या वर्षांत घेतलें नाहीं ही गोष्ट हा आरोप मजवर आणण्याचें धारिष्ट ज्यांनीं केलें आहे त्यांच्या स्मरणांत नाहीं. जेव्हां १८८० त शाळा काढली तेव्हां सकाळचा वेळ शाळेच्या कामासाठीं व दुपारचा वेळ वकीलीच्या कामासाठीं खर्च करावा असें ठरविणें हें अगदीं माझ्या हातांत होतें तरी सुद्धां शाळा निघाल्यावर पहिल्या नऊ वर्षांत मी बाहेरचें कोणतेंही काम केलें नाहीं. छापखान्याच्या कामाबद्दल म्हणाल तर सुरवातीला तें सर्वांचेंच काम होतें आणि ती स्थिति जेव्हां बदलली तेव्हां माझा त्या कामांत संबंध असावा अशी मला मुद्दाम परवानगी देण्यांत आली होती. पण तरीसुद्धां साधारण सल्लामसलत देण्यापलीकडे मी छापखान्याचें (दुसरें कांहीं) काम केलें नाहीं. मी रजेवर असतांना एका गृहस्थानें तुम्ही सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी व्हाल का हें माझ्यापासून काढून घेण्यासाठीं मात्र विचारलें होतें पण अद्यापि मी शाळेचा संबंध कायमचा सोडला नाहीं या कारणास्तव मी होय म्हटलें नाहीं हें येथें सांगण्यास हरकत नाहीं. मी त्याला असें मात्र सांगितलें कीं राष्ट्रीय सभेचें काम तात्पुरत्या स्वरूपाचें असल्यामुळें तें मला करण्याला हरकत नाहीं. माझे स्नेही म्हणजे नौकरींतून निघालेले मामलेदार यांच्यासाठीं जी मी खटपट केली तिच्यासंबंधीं असेंच म्हणतां येईल. या गोष्टी जशा मला तशा तुम्हांलाही माहीत आहेत. असें असूनसुद्धां हा आरोप माझ्यावर आणणें तुम्हांला ठीक वाटतें तर निःस्वार्थबुद्धीनें केलेल्या कामाबद्दल मला असें बक्षीस मिळावें आणि तेंसुद्धां जेव्हां मी संस्थेंतून निघून

जाण्याचा निश्चय बहुतेक केला होता अशा वेळीं; तर मीच अगदीं फुटक्या नशीबाचा आहें असेंच मी समजलें पाहिजे.

२८. जें जें कांहीं चांगलें आणि निर्दोष आहे त्याचा सर्व मक्ता माझ्याकडे आहे असें मी म्हणतों असें मात्र समजूं नये. मला माझ्या दोषांची पूर्ण जाणीव आहे आणि त्यांमुळें कधीं कधीं माझ्या कित्येक सहकाऱ्यांना माझा राग येण्याला कारण झालें आहे हें मला ठाऊक आहे. मला माहीत असलेला माझ्यांतील मुख्य दोष म्हणजे कडक आणि लागणाऱ्या भाषेंत विचार प्रदर्शित करण्याची माझी खोड हा होय. मला वाटतें आरंभा आरंभाला मी कांहीं रागीट नसतों; पण माझ्या भावना अत्यंत तीव्र असल्यामुळें जेव्हां त्या जाग्रत होतात तेव्हां कडक लागणारीं उत्तरें देण्याची व टीका करतांना मागेंपुढें न पाहण्याची चुकी माझ्या हातून होते. आणि लागणाऱ्या शब्दांमुळें पुष्कळ अनर्थ होतो. पण यापूर्वी मीं पुष्कळ वेळां सांगितलें आहे तसेंच पुनः सांगतों कीं, मी कडकपणानें बोलत असें याचें कारण संस्थेच्या हिताबद्दल मला अत्यंत कळकळ वाटे. आपल्या संस्थेच्या हिताव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या कारणामुळें मी बोलत असें असें तुम्हांला वाटण्याला मी एकदांसुद्धां कारणीभूत झालों नाहीं असें स्वतःचें शक्य तेवढें परीक्षण करून मला वाटतें. आपल्याला यश कसें येईल याबद्दल सदा सर्वदा मला जी तळमळ लागून राहिली आहे तिच्यामुळेंच जीं तत्त्वें अंगीकृत करून आपण (कामाला) सुरवात केली त्यापासून परावृत्त होण्याच्या अगदीं थोड्याशासुद्धां प्रवृत्तीकडे माझी अगदीं बारीक नजर असते. प्रसंगाला अनुरूप नव्हे अशी कडक भाषा वेळीं प्रसंगीं माझ्याकडून गेली असेल हें कबूल करण्याला मी अगदीं तयार आहें, पण एकाच ठाम मतामुळें हे सब प्रकार घडून आलेले आहेत. आमच्यासारख्या संस्थेला यश यावयाचें असेल तर स्वार्थत्याग आणि स्वार्थसंन्यास हीं आवश्यक आहेत, असें मला नेहमीं वाटतें. या एका निकषावर आमची (लोकांत) परीक्षा होईल व त्यामुळें आम्ही तरूं किंवा मरूं. आणि अर्थात् जी जी सूचना या नियमापासून थोडीशी सुद्धां परावृत्त होते असें मला वाटतें ती मला खपत नसे. आपण काढलेल्या संस्थांचें कल्याण आणि शाश्वतता यांचें मला (फार) मोल वाटतें; आणि म्हणून आतां माझ्यापुढें दोन पक्ष आहेत त्यांपैकीं कोणता तरी एक मीं उचलला पाहिजे. मी जर तुमच्यांत राहिलों तर अधिक एकोपा कधींही होणार नाहीं व आपण सर्व काळ भांडत बसूं अशी माझी खात्री आहे. अशी स्थिति झाली

तर आपल्या शाळेला आणि कॉलेजला केव्हांही शाश्वतता येणार नाहीं. उलट पक्षीं जर मी गेलों तर संस्थेच्या मूळ तत्त्वांना धक्का बसेल हें मी जाणून आहें. परंतु निदान एकोपा अधिक होईल व तंटे बखेडे कमी होतील या इच्छेनें प्रेरित होऊन, संस्था काढण्याच्या कार्याला मिळालों ती इच्छा आणि ती संस्था शाश्वत स्थितींत असावी ही तळमळ हे दोन पक्ष जेव्हां मी मजसमोर ठेवतों तेव्हां मला स्वतःला असें करणें किती जरी अप्रिय असलें तरी निघून जाण्याबद्दल तुमची परवानगी मागणें याहून रास्त गोष्ट मला करतां येणार नाहीं असें मला वाटतें. माझ्या भावनांबरोबर फार तुंबळ असें युद्ध मला करावें लागलें आणि नंतर असें करण्याचा मी निश्चय केला हें मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतों. खरोखर माझ्या जीविताचें ध्येय आज मी टाकून देत आहें; परंतु मला स्वतःला दूर करूनच माझ्या हातून त्याची उत्तम सेवा होईल हाच विचार मला समाधानभूत आहे. जोंपर्यंत मी तुमच्यांत होतों तोंपर्यंत संस्थेचें हित पहाण्यांत मीं बिलकुल कसूर केली नाहीं आणि आतां यापुढें तुमच्यांत राहून तिच्या अस्तित्वाला धोका आणण्याची माझी इच्छा नाहीं. आतांपर्यंत तुमच्यांत राहून मी जशी तिची सेवा केली त्याप्रमाणें आतां तुमच्यापासून वेगळा होऊन मी तिची सेवा करीन. मूळ तत्त्वांप्रमाणें आपण वागूं असें तुम्ही लिहून द्याल अशी मला थोडीशी जरी आशा असती तर आतांसुद्धां हा निर्वाणीचा मार्ग मी पतकरला नसता. यापूर्वीं अनेक वेळां अशी तडजोड व्हावी म्हणून मीं प्रयत्न केला पण त्याला यश आलें नाहीं. तेव्हां अशी तडजोड होणें अशक्य आहे असें म्हणणें आतां मला भाग आहे.

२९. दुःखाच्या भारानें जरी अंतःकरण जड झालें आहे तरी एकोपा तर आपल्या संस्थांच्या कल्याणाला फार आवश्यक आहे आणि त्या एकोप्यासाठींच मी हा आत्मयज्ञ करीत आहें. तो एकोपा तुमच्यांत राहण्याला तुमच्यापासून मी वेगळा झाल्यामुळें माझी मदत होण्याचा संभव आहे अशा आशेनें, मी शेवटीं तुमचा निरोप घेतों

३०. ज्या संस्थांशीं संबंध असण्याचें भाग्य गेलीं अकरा वर्षें मला लाभलें त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे.

माझ्या प्रिय सहकाऱ्यांनो, आपला,

( सही ) बाळ गंगाधर टिळक.

# भाग आठवा.

## सुधारणेच्या लढाया

तोयैरल्पैरपि करुणया भीमभानौ निदाघे
मालाकार व्यरचि भवता या तरोरस्य पुष्टिः ।
सा किं शक्या जनयितुमिह प्रावृषेण्येन वारां
धारासारानपि विकिरता विश्वतो वारिदेन ॥

पंडित जगन्नाथ

१८९१ सालीं म्हणजे टिळक सोसायटींतून राजीनामा देऊन बाहेर पडले त्या सालीं सुधारक पत्र बरेंच भरभराटीला आलें होतें व आगरकरांचे सहसंपादक म्हणून गोपाळराव गोखले आणि सितारामपंत देवधर हे काम करीत होते. यांपैकीं देवधरांना कांहीं थोडासा पगार देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. पुण्यांत याप्रमाणें केसरी व सुधारक हीं या वेळीं दोन प्रमुख पत्रें होतीं आणि या दोहों पत्रांच्या पूर्वी किती तरी वर्षे जन्माला आलेलें ज्ञानप्रकाश हेंही पत्र साधारण बऱ्या प्रकारें चाललें होतें. केसरी आणि सुधारक यांतील मतांचा विरोध अतिशय तीव्र झाला होता. ज्ञानप्रकाश या भांडणांत आपणांला त्रयस्थ समजून वागत असे व आज आगरकरांना उपदेश कर तर उद्यां टिळकांवर टीका कर याप्रमाणें संभावितपणानें दोघांनाही शहाणपण शिकविण्याचें व दोघांपेक्षांही आपण कमी विकारवश व शहाणे आहों असें दर्शविण्याचें काम त्याकडून चाललें होतें. लोकप्रवादाप्रमाणें हें पत्र या वेळीं रानड्यांच्या मतांचें व विचारांचें निदर्शन करीत असे. या वेळीं संमतिवयाच्या वादासंबंधानें, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, रानडे व आगरकर एका बाजूचे झाले होते आणि यद्यपि दोहोंत मतें आणि स्वभाव या बाबतींत बरेंच अंतर होतें तरी दोघांना परस्परांबद्दल अधिक आदर वाटूं लागला होता. रानडे साधारणपणें सुधारणेच्या बाजूचे, अर्थात् केसरीपेक्षां सुधारकांत प्रतिपादन ज्यांचें होत असे ते विचार त्यांना अधिक जवळचे होते; तरी सुधारकांतील विचारांइतकी पुढची

धांव मारण्याला ते तयार नव्हते, याचा उल्लेख या पूर्वी झालेला आहे. सुधारक पत्रापुरतें पाहिलें तर आगरकर आणि रानडे यांच्यांत वाढलेल्या स्नेहसंबंधाप्रमाणेंच गोखले व रानडे यांचा संबंधही अधिकाधिक वाढूं लागला व सार्वजनिक सभेंत गोखले काम करूं लागले त्याला कारण रानडे होते.

या सालीं ( १८९१ ) पुण्याच्या शाब्दिक वातावरणांत जरा खळबळ होण्यासारखी गोष्ट घडून आली ती म्हणजे चहा–ग्रामण्य–प्रकरण ही होय. पुण्यांतील कांहीं प्रमुख मंडळी—त्यांत रानडे व टिळक दोघेही होते—पंचहौद मिशनमध्यें गेली व तेथें त्यांनीं "चहा" घेतला. हा योग गोपाळराव जोशी या एका प्रकारें विक्षिप्त म्हणून गाजलेल्या गृहस्थानें घडवून आणला आणि त्यानेंच चहाला हजर असलेल्या सर्व इसमांचीं नांवें वर्तमानपत्रांतून जाहीर केलीं. त्याचा परिणाम सदर बेचाळीस इसमांवर पुण्याच्या धर्माभिमानी मंडळींनीं ग्रामण्य करण्यांत झाला व सदर प्रकरणाला "चहा ग्रामण्य प्रकरण" म्हणतात. आगरकरांचा या प्रकरणाशीं प्रत्यक्ष संबंध नव्हता. ते पंचहौद मिशननमध्यें गेले नव्हते आणि त्यांना तेथें नेऊन त्यांच्यावर मिशनऱ्यांच्या हातचा 'चहा' घेतल्याचा शिक्का मारण्याची गोपाळराव जोशांनासुद्धां आवश्यकता वाटली नाहीं. कारण तसा चहा घेणें यांत कांहीं पाप आहे असें ते समजत नव्हते व त्यांच्या मतांबद्दल व ढोंगापासून अलिप्ततेबद्दल कोणालाही शंका नव्हती, पण गोपाळराव जोशानें या समारंभाला बोलाविलेल्या मंडळींत गोपाळराव गोखले व सितारामपंत देवधर हे दोघेही होते त्यामुळें सुधारक पत्राच्या संपादकवर्गाचा सदर प्रकरणाशीं संबंध आला. आणखी सुधारकाच्या मुख्य संपादकाशीं स्नेहसंबंध असलेली मंडळीही "चहाला" गेलेली होती त्यांत रा. गोविंद वासुदेव कानिटकर आणि रा. हरि नारायण आपटे यांचीं नांवें होतीं. शिवाय एवढ्या महत्वाच्या गोष्टीवर चर्चा सुधारकांत होणें अपरिहार्य होतें. आणि रानड्यासारख्या सुधारक म्हणून प्रसिद्ध असलेल्या गृहस्थानें "प्रायश्चित्ता" चा पराक्रम केला त्यामुळें आगरकरांना त्यांच्या वर्तनाची फोड करणें आवश्यक पडलें व तसें करतांना रानड्यांबद्दल त्यांच्या मनांत आदर होता तो ते केव्हांही विसरले नाहींत. त्याचप्रमाणें आपण सुधारकाचे संपादक आहों आणि आपण जोरानें प्रतिपादन करीत असलेल्या तत्त्वांना रानड्यांच्या वर्तनामुळें हरताळ लागतो हीही गोष्ट ते विसरले नाहींत. आणि त्यांना त्यासंबंधीं या वेळीं ( १८९२ ) सुधारकांत दोन चार वेळां लिहिण्याचे प्रसंग आले.

आणि म्हणून या ग्रामण्यप्रकरणाचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत येणें आवश्यक आहे. अर्थात् त्यासंबंधीं साद्यंत हकीकत ज्यांना वाचावयाची असेल त्यांनीं रानडे व टिळक यांच्या चरित्रांत ती वाचली पाहिजे. टिळकही हा 'चहा' घेण्यास गेले होते व नांवें प्रसिद्ध करण्याची बहार गोपाळराव जोशी उडवितील ही रानड्यांना त्याचप्रमाणें त्यांनाही कल्पना नव्हती. नांवें प्रसिद्ध झाल्यावर टिळकांनीं आपण केलें ते शास्त्राला धरून केलें असें म्हणण्याला सुरवात केली व अशा प्रकारें ते व रानडे या दोघांवरही ग्रामण्याची आपत्ति ओढवली. तेव्हां कांहीं थोडा वेळ रानडे व टिळक हे दोघे या खटल्यापुरते आरोपी झाले व अशामुळें एका दावणींत बांधले गेले. या वेळीं टिळक ग्रामण्य करणाऱ्यांवर तुटून पडत होते आणि रानड्यांना तेंच हवें होतें. ही त्यांची परस्परावलंबिता फार दिवस टिकली नाहीं. पण जेवढी टिकली तेवढ्यांत आगरकरांवर प्रतिकूल परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. तो वृत्तांत पुढें येईल. सध्यां एवढें म्हटलें पाहिजे कीं गोपाळराव जोशी हा कितीही विक्षिप्त असला तरी जी मंडळी या "चहा" ला त्यानें गोळा केली त्यांत त्यानें मोठें चातुर्य दाखविलें होतें यांत शंका नाहीं. तसेंच 'चहा' घेण्याला जाऊन पुढें नांवें प्रसिद्ध झाल्यावर तारंबळ उडालेले हे झुंझाररावी सुधारक मिशनऱ्यांच्या येथें एकत्र आणून व नंतर लागलीच त्यांचीं नांवें प्रसिद्ध करून गोपाळराव जोशांनीं सुधारणेची व स्वदेशाची मोठी सेवा केली याबद्दल द्विधा मत होण्याचा संभव नाहीं. त्यांच्या युक्तीमुळें मोठमोठे धुरीण म्हणविणारे सुद्धां बोलण्याप्रमाणें कृति कसे करीत नाहींत व किती आचरटपणानें आपलें समर्थन करण्याचा यत्न करितात हें लोकांना कळलें.

२. या ग्रामण्य प्रकरणाची हकीकत रा. केळकर यांनीं लिहिलेल्या टिळक-चरित्रांतील पुढील उताऱ्यावरून चांगली लक्षांत येते[1]. "ग्रामण्य प्रकरणाला मूळ कारण पंचहौद मिशनमधील चहापान. पण त्यालाहि कारण गोपाळराव जोशी ही एकच व्यक्ति! गोपाळराव जोशी ही एक मोठी विचित्र वल्ली होती...... या लहरी मनुष्याच्या कल्पक डोक्याला १८९१ च्या आक्टोबरमध्यें अशी एक कुचेष्टेची कल्पना आली कीं, या भोंदू व भ्याड सुशिक्षित लोकांना फशीं पाडावें व फजीत करावें. ती कल्पना त्यांनीं मोठ्या चतुराईनें सिद्धीस नेली.

---

१ खंड १ ला, पृष्ठ २८७.

गोपाळरावांचा मिशनरी लोकांत येण्याजाण्याचा बराच प्रघात असे. त्याचा फायदा घेऊन त्यांनीं पुणें येथील वेताळ पेठेंतील पांच-हौद मिशनच्या शाळेंत, तेथील मुख्य शिक्षक रे. रिव्हिंगटन व तेथीलच एक सिस्टर यांजकडून, पुण्यांतील शेंपन्नास सुशिक्षित गृहस्थांना व्याख्यानासंबंधानें म्हणून निमंत्रणें केलीं. त्यांतील पांच पन्नास लोक गेले. निमंत्रणांतून बहुतेक कोणीही ठळक मनुष्य सुटला नव्हता. जे कोणी विशेष अडचणीमुळें गेले नाहींत असे प्रसिद्ध लोकही फारच थोडे. सुधारणेसंबंधाचा वाद पुण्यांत जोराचा सुरू असतां एकीकडे रा. ब. रानडे व दुसरीकडे बळवंतराव टिळक अशीं माणसें या निमंत्रणावरून गेलीं, यावरून तेथें कांहीं घोटाळा होणार आहे अशी कोणासही साधारण शंका देखील आली नाहीं. गोपाळरावांचें गुपित फारच सुरक्षित राहिलें होतें असें दिसतें. तथापि या कटांत एक दोन साक्षीदार होतेच, अशी गोष्ट मागाहून उघडकीस आली. जुन्या पक्षाच्या लोकांस आमंत्रणें मुळींच नव्हतीं; कारण ते यावयाचेच नाहींत हें माहीत. पुण्यांतील सुशिक्षित लोक मात्र व्याख्यानाला चटावलेले, व ते मिशनहौसमध्येंहि बोलावलें तरी यावयाचेच अशा समजुतीनें व अनुभवजन्य विश्वासानें जी गोळी गोपाळरावांनीं झाडली, ती त्यांतील बहुतेकांना बिनचूक लागली !

"पंचहौद मिशनमधील व्याख्यान यथातथाच झालें. पण ही उणीव भरून काढण्याकरितांच कीं काय म्हणून, मागाहून टेबलावर चहा बिस्किटें आणून ठेवण्यांत आलीं. या व्यवस्थेंत गोपाळराव जोशी हे होतेच. त्यांनीं मिशनरीसाहेबांना कटांत घेतलें होतें कीं नाहीं माहीत नाहीं. पण चहा देणें ही गोष्ट अगदीं आयते वेळीं घडून आलेली नसून, चहा द्यावयाचा संकल्प मात्र, भलेपणानें कां होईना, आधींच ठरलेला असावा. झालें ! प्रत्येकापुढें चहा व बिस्किटें येऊन बसलीं. त्यांचें सेवन करावें अशी जरी सर्वांनाच इच्छा नव्हती तरी आपणांपुढें हे पदार्थ मांडलेही जाऊं नयेत असें निक्षून सांगण्याचें धैर्य मात्र कोणास झालें नाहीं. ख्रिस्त्याच्या हातचा चहा घेतला तर आपले लोक जसे वाईट म्हणणार, तसेंच चहा आपल्यापुढें ठेवलाहि जाऊं नये इतका त्याचा विटाळ मानलेला दाखविला तर कदाचित् मिशनरीही हंसणार ! शिवाय इंग्रज लोकांत खाण्याचा पदार्थ पुढें आणून ठेवण्यापलीकडे आपल्यांतल्याप्रमाणें तो घ्याच असें म्हणून आग्रह करण्याची चाल नाहीं, यामुळें सहज बचाव करतां

येईल असेंहि पुष्कळांना वाटलें. गप्पा गोष्टी चालूच होत्या. तेव्हां कांहींनीं तो चहा पिऊन फस्त केला, कांहींनीं घोटभरच घेऊन त्याचा मान केला, कांहींनीं त्याला नुसता हात लावण्याचा देखावा करून तो दूर सारला, व कांहींना ही ब्याद आपल्या समोरून कोणी उचलून घेऊन जाईल तर बरें असेंही वाटत असावें. पण आपल्यासमोरच्या या (चहाच्या) पेल्यांत लवकरच संकटमय असें वादळ होणार अशी कोणासच शंका आली नाहीं;........पण इतक्या या लोकांना मिशनहौस-मध्यें नेऊन चहा प्रत्यक्ष पाजण्यापेक्षांही ते चहा प्याल्याचा बोभाटा होण्यांत अर्थात् अधिक स्वारस्य होतें; व लगेच गोपाळराव जोशांनीं "पुणें-वैभव" कचेरीकडे धांव घेऊन जीं कांहीं माणसें मिशनहौसमध्यें आलीं नव्हतीं त्यां-सुद्धां जीं आलीं होतीं त्यांचीं नांवें प्रसिद्ध केलीं........भरलेल्या जठरांत एखादा विषारी कण गेला म्हणजे जसें सगळें अन्न ढवळून निघतें अशी स्थिति पुणे-वैभवाच्या या अंकानें सगळ्या पुण्याची केली. गोपाळरावांच्या कटाचा यत्किंचित् मागमूस लागता तर स्वतः टिळक पंचहौद मिशनमध्यें न जाते, येवढेंच नव्हे, तर त्यांनीं हर प्रयत्नानें आपल्या मित्रांना तरी थांबवून वांचविलें असतें. पण दैवच गोपाळरावांचें साथीदार, कारण टिळकांचीहि सावधगिरी या चहाच्या पेल्यांत न बुडती तर ग्रामण्याला असा रंग कसा चढला असता? टिळक न जाऊन नुसते रानडेप्रभृति सुधारक गेले असते तर या प्रकरणाच्या बाबतींत टिळकांनीं कोणता पक्ष स्वीकारला असता हें अनुमानणें जरासें कठी-णच आहे. तसें होतें तर रानड्यांची मजा त्यांनीं अधिक मोकळ्या मनानें पाहिली असती. पण स्वतः ते या चहाच्या पुरांत सांपडल्यानें त्यांना स्वतःला तरून जाणें तर प्राप्त होतेंच, पण रानड्यांनाहि पाठीवर घेऊन त्यांच्याकरितां दोन हात अधिक नेटानें टाकणें टिळकांना जरूर झालें. प्रवासांत कोण कोणाच्या पंक्तीला येईल याचा नियम नसतो अशा अर्थाची एक म्हण इंग्र-जींत आहे; व सुधारणेच्या वादांत निखालस शत्रूप्रमाणें हमरीतुमरीनें भांड-णारे टिळक व रानडे हे समायिक प्रतिवादी होऊन ज्याच्या करणीमुळें एका दावणीस बसले, त्या गोपाळराव जोशांची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे......दरम्यान् पुणे-वैभवांत प्रसिद्ध झालेलीं कांहीं नांवें उगीच खोटीं असल्यामुळें पुणे-वैभवकर्त्यांवर पुणे मॅजिस्ट्रेट कोर्टांत बेअब्रूची फिर्याद होऊन त्यांना दोनशें रुपये दंड झाला. पण जे खरेच गेले होते व ज्यांनीं चहा घेतला होता त्यांचा निकाल शंकराचार्यांशिवाय दुसरा कोण लावणार? म्हणून

श्रीच्या दरबारांतून प्रतिवादींना नोटीसा निघून प्रकरण सुरू झालें........ ग्रामण्यांतील वादींना श्रींनीं कमिशन पाठविलें व आरोपींनीं त्यांचा अधिकार कबूल केला, या गोष्टींत धन्यता वाटून त्यांनीं हें प्रकरण होईल तेवढें लांबविलें ........कमिशनला मान वांकविणाऱ्या प्रतिवादींत रानडे व टिळक असलीं धेंडें असल्यावर ब्राह्मणांचा वास्तविक अधिक विजय तो काय व्हावयाचा होता?......कमिशननें खालीलप्रमाणें व्यक्तिशः निकाल दिला........ टिळकांनीं चहा घेतल्यानंतर श्रीक्षेत्र काशीस जाऊन सर्व प्रायश्चित्त घेतल्याचा खात्रीलायख दाखला दिला. शिवाय पुण्यासही दोन कृच्छ्रें प्रायश्चित्त केलें. म्हणून त्यांनीं आणखी प्रायश्चित्त घेण्याचें कारण नाहीं असें कमिशननें ठरविलें. आठ जणांनीं ज्ञाताज्ञातदोषनिवारणार्थ प्रायश्चित्त मिळण्याबद्दल अर्जच दिला होता. सबब त्यांना तो त्यांचा अर्ज बहाल करून सर्व-प्रायश्चित्त घेण्याचा हुकूम झाला. हे आठ इसम म्हणजे रा. ब. माधवराव रानडे, रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, रा. ब. चिंतामण नारायण भट, रावसाहेब गोविंदराव कानिटकर, सितारामपंत देवधर, वामनराव रानडे आणि वामनराव परांजपे... ......ज्यांनीं शंकराचार्यांचा अधिकार अमान्य करून कमिशनकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं ते सर्वांत सुखी ठरले......ज्यांनीं आपण होऊन प्रायश्चित्त मागितलें त्यांना तें मिळाल्याकारणानें लचांडांतून आपण सुटलों असें वाटलें, पण त्यांतील कांहीं बडे सुधारक असल्यामुळें सुधारकपक्षाकडून त्यांच्यावर मोठा गहजब झाला........"

३. या प्रकरणासंबंधीं ता. ३० मे १८९२ च्या सुधारकांत पुढील स्फुट आहे. "येथील चहाग्रामण्यप्रकरणाची आम्ही इतिश्री केली तेव्हांच यापासून होणाऱ्या प्रायश्चित्तप्रकरणाची आम्हांस अथश्री करावी लागणार हें आम्ही जाणून होतों. आतां ही अथश्री "झालेलीं प्रायश्चित्तें यथाशास्त्र झालीं नाहींत" म्हणून ज्या थोड्या हट्टवाद्यांचें अजून म्हणणें आहे त्यासंबंधाची नव्हे—कारण त्यांत विशेष मातब्बरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं—तर सुधारक वर्गांतच तीं घेण्याच्या युक्तायुक्ततेबद्दल जो सध्यां जिकडे तिकडे उहापोह सुरू आहे त्यासंबंधाची होय......आमच्या एका प्रिय सुधारक मित्राचें जें पत्र आजच्या अंकांत छापलें आहे त्यास उत्तर देण्याचा प्रथम आमचा विचार होता, परंतु या विषयासंबंधानें अजून उत्तरप्रत्युत्तरें होण्याचा संभव आहे, तेव्हां तीं होईपर्यंत वाट पहावी म्हणजे लोकमतही स्पष्टपणें प्रदर्शित होईल, व हल्लींची वादाची

कडकीही जराशी निवून या विषयाचा शांतपणें विचार करणें सोईचें होईल असें जाणून या वादांत शिरण्याची आमची इच्छा आम्ही तूर्त आवरून धरतों." हें जें सुधारक मित्राचें पत्र म्हटलें आहे त्या खालीं सही दा. ग. पा. अशी असून शोधाअंतीं हें पत्र रा. ब. ( त्या वेळीं रा. रा. ) दामोदर गणेश पाध्ये यांनीं लिहिलें होतें असें समजतें. या पत्रावरून सुधारक मंडळीला या वादाबद्दल काय वाटत होतें तें व रानड्यांच्यावर सुधारकानें सणसणून टीका केली नाहीं याबद्दलही त्यांना वाटत असलेला तीव्र असंतोष हीं व्यक्त होतात आणि प्रायश्चित्तप्रकरणावर बराच प्रकाश पडतो म्हणून तें पत्र येथें उतरून घेणें युक्त दिसतें:—

## सुधारणेस अशौचाचा प्रसंग.

रा. रा. सुधारककर्ते यांसः—

शि. सा. न. वि. वि. पुण्यांतील फार दिवस भिजत पडलेल्या चहाप्रकरणाचा एकदांचा निकाल लागला व " मंडळी प्रायश्चित्तें घेऊन मोकळी झाली हें एकंदरींत चांगलें झालें " इत्यादि आपल्या पत्राच्या गेल्या अंकांतील मजकूर वाचून मनाला फारच आश्चर्य वाटलें. तुम्ही व तुमचे बंधु 'केसरी'कार व त्याचप्रमाणें प्रायश्चित्तें घेऊन मोकळी झालेली मंडळी आपल्यासच जय मिळाला म्हणून वाटेल तशी फुशारकी मारोत, परंतु आम्हां बाहेरगांवच्या लोकांस या कामांत सुधारणेच्या पक्षास आनंद मानण्यासारखा लवलेशही जय मिळाला असें वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर सर्व प्रकारानें सुधारकांचें नाक टिचलें गेलें असेंच वाटत आहे; व त्याबद्दल तुम्ही म्हणत होतां त्याप्रमाणें " आमच्या मिशा कोठें गेल्या, आम्ही हिंदुत्वापासून कोठें पदच्युत झालों, " इत्यादि प्रलाप केवळ " राजा मला भ्याला, टोपी देऊन पळाला " याप्रमाणें पोरकट वाटत आहेत. तुमच्या प्रतिपक्षानें तुम्हांस अजीबात नाहींसे करण्याचा घातलेला आव वृथा झाला खरा; तथापि त्यांनीं रचलेला व्यूह सिद्धीस गेला व चालू हिंदुधर्मास सोडून तुम्ही जें थोडेंसें वांकडें पाऊल टाकिलें होतें त्याबद्दल तुम्हांस त्यांनीं यथेच्छ चोप दिला व तो तुम्हीं मुकाट्यानें सोसून घेतलात, चुकलों म्हणून ज्या प्रभूविरुद्ध बंड केलें होतें त्या प्रभूस शरण जाऊन त्यानें केलेल्या शासनाचें अभिनंदन केलेंत; यांत तुमची सरशी कशी झाली हें मला तर कळत नाहीं; आणि अशा रीतीनें हळू हळू " प्रायश्चित्ताचें घोडें

मागें हटेल " असें वाटत नाहीं. शूद्रस्पृष्ट चहा पिण्याच्या पातकास प्रायश्चित्त स्वल्पच आहे हें सिद्ध करण्यासाठीं खचित येवढा खटाटोप नको होता. हें तुम्हांस विलायतेहून जाऊन आलेल्या ज्या कित्येक गृहस्थांस प्रायश्चित्त दिलें आहे त्यांनीं, किंवा तुरुंगांतून सुटून आलेल्या अल्प प्रयासानें शुद्ध होणाऱ्या ब्राह्मणांनीं सांगितलें असतें. प्रायश्चित्तें घेऊन पुनः जर याचप्रमाणें प्रसिद्ध रीतीनें एकदां दंड भोगलेली मंडळी चहा घेईल तर अधिकाधिक दंडांस पात्र होईल यांत संशय नाहीं. बभ्रा न करतां खासगी रीतीनें हॉटेलमध्यें किंवा चव्हाट्यावरच्या एखाद्या आगाच्या दुकानामध्यें जाऊन चहा, कॉफी, सोडा वाटर इत्यादि वस्तूंचें सेवन करणाऱ्या ब्राह्मणांची संख्या पुण्यांत देखील यापुढें कमी होईल असें नाहीं; पण त्या प्रकारासही तुमच्या या चहाग्रामण्यानें काय मदत केली किंवा कोणतें संरक्षण दिलें तें दिसत नाहीं. तेव्हां झालेल्या प्रकरणानें सुधारणेचें पाऊल कोणत्या तऱ्हेनें पुढें गेलें किंवा जाईल हें जर आपण सांगाल तर मी व मजसारखे बाहेरगांवचे निराश झालेले सुधारणापक्षीय आपल्याबरोबर आनंदाच्या टाळ्या मारण्यास तयार होतील.

मला तर वाटतें कीं, ज्या दिवशीं, इतकें पुढें जाण्यांत कांहीं हरकत नाहीं असें समजून प्रसिद्धपणें शूद्रस्पृष्ट चहा घेणाऱ्या पुण्याच्या सुधारकांनीं जातीचा व शंकराचार्यांचा बंध मान्य केला तो दिवस सुधारणेस मोठा हानिकारक व अपशकुनी झाला; आणि ज्या दिवशीं त्या सुधारकांनीं प्रायश्चित्तें घेतलीं तो दिवस तर सर्व सुधारकांनीं अशौचाचा मानला पाहिजे. त्या दिवशीं ज्या गोष्टींत आमचें पाऊल बरेंच पुढें गेलें होतें त्या गोष्टींत आम्ही पुनः आपल्या पूर्व स्थळीं आलों व पुणें शहर तरी १५।२० वर्षें मागें गेलें. प्रायश्चित्तें न घेतां जीं चालू हिंदुधर्माचीं उल्लंघनें आम्हांस करतां येतील तींच सुधारणा नांवास योग्य होत, असें मला वाटतें, तुम्ही कबूल कराल. आणि ब्राह्मणांनीं शूद्रस्पृष्ट जलादि सेवन तरी स्वच्छपणें अमलांत आणण्याची वेळ सध्यां आली आहे असेंही आपण मान्य कराल असें वाटतें. मग ही सोन्यासारखी वेळ व्यर्थ दवडली असें कां म्हणूं नये ? " अशा ग्रामण्यास आतां कोण विचारतो " म्हणून म्हणणारे व ४६ चे १२५ झाले, १२५ चे २५० झाले, शेवटीं तर मुलें बाळें व बायका यांस बहिष्कारांतून मुक्तच केलें इत्यादि माहिती सांगून अशा क्षुल्लक गोष्टीबद्दल सध्यां ग्रामण्य चालू ठेवणें अशक्य असें प्रतिपादणारे आपण, या प्रकरणाच्या निकालांत समाधान मानून घेतां व प्रायश्चित्तें घेणाऱ्यांचें

अभिनंदन करतां यास काय म्हणावें बरें ? जातीस सोडतां कामा नये, जुन्या चालीच्या मंडळीस मारलेली मगरमिठी ढिली करतां कामा नये, सुधारकांनीं नवीन जात केल्यानें समाजसुधारणा होणार नाहीं, इत्यादि सर्व विधानें खरीं व विचारवंतास मान्य करण्याजोगीं आहेत. परंतु यासाठीं ज्ञातिबांधवांपासून कृतींत मुळीं देखील पुढें जाऊं नये असें सिद्ध होत नाहीं. सगळी जातच्या जात एकदम पुढें, ख्रिस्त, बुद्धासारखा धर्मसंस्थापक निपजून धर्मक्रांति झाली तरी, जाणार नाहीं. मग थोड्यांनीं कधींच पुढें जाऊं नये असा जर समाजसुधारकांनीं निश्चय केला तर सुधारणा होणार तरी कशी ? मला तर वाटतें या सर्व प्रकरणांत पुणेकर सुधारकांनीं अगदींच नेभळटपणा दाखविला. पहायाचें तर असतें हा चहा पिण्याबद्दलचा बहिष्कार किती जोरानें व किती दिवस चालतो तें; आणि मग जर असें दिसून येतें कीं, प्रायश्चित्त घेतल्याशिवाय कांहीं पुनः आपली छाप जातीवर बसत नाहीं व पुनः आपल्याशीं जात व्यवहारही ठेवीत नाहीं, तर मग प्रायश्चित्त घेतां आलें असतें. मला वाटतें अशी पाळी कधींच आली नसती व हा बहिष्कार थोडक्याच काळांत नाहींसा झाला असता. पण असें होतें कसें ? सुधारणेचें सुकाणूं पुण्यास सध्यां ज्यांच्या हातांत आहे ते आहेत केवळ वाक्पटुत्वाचे स्वामी व ज्यांत एक पक्ष सदा हार खात आहे अशा तडजोडीचे पूर्ण भक्त; त्यांच्या सेनानीत्वास झुगारून देणारे तेजस्वी सुधारक निपजतील तेव्हां कांहीं तरी होईल. सध्यां तर त्यांनीं "सुधारका"सारख्या खंद्या वीरासही हस्तगत करून घेतलें आहे. आमचें दुर्दैव म्हणावयाचें, दुसरें काय ?

आपला,

दा. ग. पा.

नागपूर, ता. १९ मे १८९२.

रावबहादुर रानडे यांनीं या चहाप्रकरणांत जो नेभळटपणा दाखविला तो जरी त्यांच्या धोरणास व चरित्रक्रमास सोडून नव्हता तरी त्यामुळें इतर मंडळींचेंही धैर्य पळालें व सुधारकांची फटफजिती उडाली ही गोष्ट निर्विवाद आहे. आगरकरांचा या चहाप्रकरणांत प्रत्यक्ष कांहीं संबंध नव्हता हें वर सांगितलेंच आहे. पण रानड्यांचा त्यांचा जो स्नेहसंबंध होता व प्रायश्चित्त प्रकरणांत पडलेल्या बहुतेक मंडळींचा व त्यांचा जो स्नेहसंबंध होता त्यामुळें या विषयावर लिहितांना त्यांनीं सौम्य भाषा वापरली. पण तीसुद्धां त्या वेळच्या

दा. ग. पा. सारख्या माणसांना आवडली नाहीं हें रास्तच होतें. रानडे हे मोठे गृहस्थ होते आणि त्यांच्या मोठेपणाच्या उज्वल प्रकाशामुळें डोळे दिपून जाऊन त्यांच्याबद्दल निदान कठोर भाषा लिहूं नये असें प्रत्येक समंजस माणसाला वाटावें हें साहजिक होतें. आगरकरांनींही त्यामुळें या प्रकरणासंबंधीं जें लिहिलें तें विशेष कठोर नसलेल्या भाषेंत लिहिलें. पण भाषेची पद्धत सोडून दिली तर झाल्या प्रकाराबद्दल त्यांनीं रानडे किंवा दुसरे प्रायश्चित्तवाले यांची बिलकुल तरफदारी केली नाहीं. दा. ग. पा. सारख्यांचीं सणसणीत भाषेंत लिहिलेलीं पत्रें त्यांनीं सुधारकांत बिनतक्रार छापलीं. इतकेंच नव्हे तर ता. १३ जून १८९२ च्या सुधारकांतील अग्रलेखांत त्यांनीं या प्रकरणासंबंधीं आपलें मत नेमस्त पण असंदिग्ध प्रकारें प्रसिद्ध केलें. त्यांतील जीं वाक्यें ठळकपणें घातलीं आहेत त्यांवरून रानड्यांचें वर्तन त्यांना मान्य नव्हतें याबद्दल शंका रहात नाहीं. फक्त त्या वर्तनाला असलेलीं कित्येक कारणें त्यांनीं उल्लेखिलीं आहेत. या कारणामुळेंही वर्तन प्रमादशील ठरत नाहीं असें त्यांना मुळींच वाटत नव्हतें. चहाप्रकरणाची प्रथम रा. केळकरांच्या भाषेंत दिलेली हकीकत, दा. ग. पा. ची टीका व आगरकरांचा अभिप्राय हीं तिन्ही एकदम वाचलीं म्हणजे या प्रकरणांत आगरकरांनीं लिहिलेला मजकूर जरी रानड्यांबद्दल आदरयुक्त भावनेनें लिहिला आहे तरी त्यांत सुधारकाचें धोरण अणुरेणूमात्रही सुटलेलें नाहीं हें कळून येतें. " हें गूढ कोडें आहे[1] " या लेखांत आगरकर लिहितातः—" **कोणत्याहि चांगल्या गुणामुळें ज्याचें नांव लोक वारंवार काढतात त्याचें सारें वर्तन निर्दोष असणें फार इष्ट आहे.** सत्कृत्याबरोबर दुष्कृत्याचें व सद्गुणाबरोबर दुर्गुणाचें स्मरण झाल्यानें मनाला वाईट वाटतें इतकेंच नाहीं, तर प्रशंसनीय वस्तूंत जेवढा अप्रशस्त भाग दिसत असतो तेवढ्यामुळें तिची वाजवीपेक्षां फार कमी किंमत करण्याकडे आपल्या मनाची सहज प्रवृत्ति होते. तेव्हां कोणत्याही गुणामुळें लोकांपुढें येणें हें एका दृष्टीनें फार संकटावह आहे. लौकिकाचें दान घेण्यासाठीं ज्यानें एकदां फांसा टाकला त्यानें आपल्या आचरणाच्या प्रत्येक भागावर लोकांची करडी नजर आहे हें कधींहि विसरतां कामा नये. हे विचार येथें सुचण्याचें कारण या आमच्या पुण्यांत बरेच दिवस घाटत असलेलें चहाप्रकरण आणि त्या संबंधानें

१ सुधारक, १३ जून १८९२.

रा. ब. रानडे यांच्या वर्तनावर अलीकडे होत असलेली टीका होय. रावबहादुर इतर सरकारी नोकरांप्रमाणें केवळ एक सरकारी नोकर आहेत, व अलीकडील सुशिक्षित लोकांनीं उघडपणें त्यांस आपलें अग्रणीत्व दिलेलें नाहीं हें जरी खरें आहे, तरी आपली नोकरी उत्तम रीतीनें बजावून सांपडेल तेवढ्या अवकाशांत राजकीय, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपल्या देशाचें पाऊल पुढें पडण्यासाठीं गेलीं पंचवीस वर्षें खासगी रीतीनें ते जी जिवापाड मेहनत करीत आहेत तीमुळें हे चालू पिढीचे पुढारी असा स्वाभाविक समज झाला आहे. अशा रीतीनें लोकाग्रणीत्वाप्रत पावलेल्या असामान्य पुरुषाच्या वर्तनाची प्रसंगविशेषीं बरीच चर्चा व्हावी यांत विशेष आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण ज्याची विद्वत्ता, ज्याचे विचार, ज्याचें आचरण, ज्याचें बुद्धिसामर्थ्य, ज्याचा स्वभाव वगैरे गोष्टी लोकांस चांगल्या माहीत झाल्या आहेत त्याचें अमुक प्रसंगीं अमुक प्रकारचें वर्तन होईल अशी अटकळ ते बांधतात. आणि त्या अटकळीविरुद्ध त्याचें वर्तन झालें म्हणजे त्यांची निराशा होऊन त्यास ते दोष देवूं लागतात. रा. ब. रानडे यांच्या आजपर्यंतच्या आचरणावरून चहाबद्दल ते प्रायश्चित्त घेतील असें पुष्कळांस वाटलें नव्हतें. तथापि तसें करणें त्यांना अवश्य वाटल्यामुळें ज्यांची यासंबंधानें अटकळ चुकली त्यांस वाईट वाटून ते त्यांना नाना तऱ्हेनें दोष देत आहेत, आणि यांत दोष देणारांकडे विशेष दोष नाहीं असें आम्हांस वाटतें, व खुद्द रावबहादुरांसही बहुधा तसेंच वाटत असेल !

"सांतपन, चांद्रायण, किंवा ज्ञाताज्ञातदोषपरिहारक—यांपैकीं कोणतेंही प्रायश्चित्त घेण्यास तयार होण्याचा माधवरावजींनीं जो निश्चय केला तो त्यांनीं अविचारानें किंवा घाईनें केला असेल अशी कल्पना करणेंसुद्धां अशक्य आहे. हें प्रकरण त्यांच्या मनांत कित्येक महिने घोळत राहून अखेरीस प्रायश्चित्त घेणें हाच प्रशस्त मार्ग होय, अशी त्यांची पक्की खात्री झाल्यावांचून त्यांनीं तसा निश्चय केला नसावा असेंच मानणें योग्य आहे. असल्या कामीं आपण प्रायश्चित्त घेतलें तर युरोपीअन लोक, अलीकडील बहुतेक शिकलेले लोक, व विशेषतः आपले संनिकट मित्र व आप्त आपणांस फार दोष देतील, सर्व इलाखाभर आपल्या वर्तनाची चर्चा होईल, आणि त्याविषयीं नाना तऱ्हेच्या कुकल्पना व कुतर्क निघतील हें त्यांच्या ध्यानांत पूर्णपणें आलें नसावें, असें समजणें म्हणजे ज्या बुद्धिमत्तेबद्दल व तारतम्यतेबद्दल त्यांची एवढी ख्याति झाली

आहे, त्या गुणांनीं त्यांना या प्रसंगीं अजीबाद दगा दिला असें मानावें लागणार आहे. पण बॉंबे गॅझेटास त्यांनीं जें उत्तर दिलें आहे त्यावरून तसें झालेलें नाहीं हें उघड आहे. सर्व प्रायश्चित्त घेण्याचा त्यांनीं जो निश्चय केला तो दूरवर विचार करून व त्याचे सारे परिणाम लक्षांत आणून केला असें त्यांचें म्हणणें आहे. तेव्हां त्यांनीं जें केलें आहे, किंवा जें त्यांस करावें लागलें आहे तें त्यांना त्यांच्या समजुतीप्रमाणें वावगें वाटत नसलेंच पाहिजे. तथापि लोकांना त्यांचें करणें बरोबर वाटत नाहीं. ते असा प्रश्न करतात कीं ज्यांनीं गेलीं वीस वर्षें सुधारणेच्या अभिमानानें एका प्रकारच्या बहिष्कारांत काढलीं, त्यांनीं या चहासारख्या शुष्क गोष्टीसाठीं सर्वप्रायश्चित्त घेऊन चहाच्या व पुनर्विवाहाच्या बहिष्कारांतून बाहेर पडण्याची काय आवश्यकता होती? यावर माधवरावजींचें व तत्पक्षीयांचें असें उत्तर दिसतें कीं, माधवरावजींनीं चहाकरतां कसलें तरी प्रायश्चित्त घेण्याचें कबूल केलें नसतें, तर इतर चहावाल्यांस त्या पापाच्या क्षालनाकरतां मिशादान करावें लागलें असतें. त्यांतल्या त्यांत दुसरी अशी एक नड होती कीं, पुनर्विवाहामुळें माधवरावजींवर पहिला वडा बहिष्कार असल्यामुळें, इतर चहावाल्यांप्रमाणें त्यांस श्री. आचार्यांच्या प्रतिनिधींना प्रायश्चित्त देतां येईना. ही नड दूर करण्याकरतां सर्वप्रायश्चित्त घेणें भाग पडलें. या प्रायश्चित्तामुळें माधवरावजींवरील पुनर्विवाहाचा बहिष्कार निघून ते इतरांप्रमाणें आचार्यांच्या अधिकारांत आले; आणि असें झाल्यावर इतर चहावाल्यांच्या मिशांचा बचाव त्यांस करतां आला. माधवरावजींनीं इतरांसाठीं हें प्रायश्चित्त घेतलें नसतें तर त्यांना सक्षौर प्रायश्चित्त घ्यावें लागलें असतें व तें त्यांनीं निमूटपणें घेतलें असतें कीं काय याबद्दल आम्हांस बरीच शंका आहे; तसेंच, या रीतीनें या तंट्याचा शेवट न होता तर तो अधिकाधिक माजत जाऊन ज्या सुधारणा आम्हां सर्वांस इष्ट आहेत त्यांस बराच व्यत्यय येता, हें म्हणणेंही आम्हांस बरोबर वाटत नाहीं. तथापि माधवरावजींनीं सर्वप्रायश्चित्त घेण्याचें कबूल केल्यामुळें कांहीं चहावाल्यांच्या मिशा बचावल्या यांत शंका नाहीं. प्रश्न एवढाच आहे कीं, कांहीं इसमांच्या मिशा वांचविण्यासाठीं चहाबद्दल व पुनर्विवाहाबद्दल सर्वप्रायश्चित्त घेण्याचा माधवरावजींनीं जो निश्चय केला तो बरोबर आहे किंवा नाहीं? आम्हांस तर असें वाटतें कीं, त्यांनीं येवढ्याच कारणाकरतां हा निश्चय केला असेल तर त्या कारणास त्यांनीं

द्यावें त्यापेक्षां अधिक महत्व दिलें. या कारणाहून आणखी कांहीं कारणें हा निश्चय करण्यास झालीं असतील तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. वीस वर्षें बहिष्कृत राहिल्यापासून कोणतीही खरी सुधारणा झाली नाहीं; उलट नव्या-जुन्याचें वैमनस्य वाढत चाललें; तेव्हां येथून पुढें उभयतांच्या सलोख्यानें कांहीं निष्पन्न झालें तर पहावें अशा विचारानें, किंवा चहाच्या बाबतींत शंकराचार्यांची इतकी आज्ञा पाळली तर इतर सुधारणांच्या संबंधानेंही त्यांचेकडून कांहीं सवलती मिळण्याची आशा दिसल्यानें जर त्यांनीं हें प्रायश्चित्त घेण्याचा निर्धार केला असेल तर त्यांच्या वर्तनांतील बरेंच वैरूप्य कमी होणार आहे. चहावाल्यांच्या बचावाहून अशा प्रकारचीं दुसरीं कांहीं कारणें आपल्या निश्चयास कारण झालीं असा त्यांच्या पत्रांत थोडासा ध्वनि आहे; पण तीं कारणें या प्रसंगीं गुप्तच ठेविलीं पाहिजेत असें त्यांचें म्हणणें असल्यामुळें, सामान्य लोक तीं मुळींच नाहींत असें घेऊन चालणार व जेवढ्यांचा त्यांनीं स्पष्ट उल्लेख केला आहे तेवढ्यांवरच त्यांचा निवाडा करणार, हें उघड आहे. माधवरावजींनीं हें प्रायश्चित्त घेतलें नसतें तर ब्राह्मणजातींत एकच कलह माजून राहता व सुधारणेस मोठा अडथळा येता, आणि त्यांनीं तें घेतलें आहे म्हणून सर्वत्र शांतता होऊन सुधारणेचें पाऊल बिनहरकत थोडें थोडें पुढें पडत जाईल ही दोन्हीही विधानें आम्हांस चुकीचीं दिसतात. तथापि हें प्रायश्चित्त घेण्यांत ब्राह्मणजातीचें वर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न करावा अशा इच्छेचा उद्भव त्यांच्या अंतःकरणांत झाला असला पाहिजे असें अनुमान जें बॉंबे ग्याझेटांतील रिफॉर्मेनें काढलें आहे, तें अगदीं निराधार आहे, व तसली गोष्ट त्या थोर पुरुषाच्या स्वप्नांत देखील यावयाची नाहीं, अशी आमची पक्की खात्री आहे. या एका अनुमानाशिवाय रिफॉर्मेच्या दोन पत्रांत माधवरावांच्या वर्तनाविरुद्ध आक्षेप घेतले आहेत ते सहसा खोडून काढतां येण्यासारखे नाहींत असें आम्हांस वाटतें. तथापि माधवरावजींनीं प्रायश्चित्त घेतलें म्हणून सुधारणा पंचवीस वर्षें मागें हटली, किंवा माधवराव प्रार्थनासमाजाचे सदस्य किंवा अनुयायी आहेत म्हणून त्यांनीं जातीचे सारे बंध अजीबात तोडून टाकण्यास तयार असलें पाहिजे, हें म्हणणें आम्हांस सयुक्तिक दिसत नाहीं. बोलण्याप्रमाणें वागणें हें एखाद्या ल्यूथराच्या किंवा बुद्धाच्या हातूनच घडतें. माधवराव ल्यूथर किंवा बुद्ध नाहींत आणि दुसऱ्या एखाद्या ल्यूथराशिवाय किंवा बुद्धाशिवाय जानवें तोडून न टाकण्याबद्दल किंवा अतिशूद्राच्या

पंक्तीस जेवायाला न बसण्याबद्दल त्यांना सामान्य मनुष्यानें दोष देणें योग्य नाहीं. तथापि जे आपणांस लोकांचे पुढारी म्हणतात, किंवा ज्यांना कोण-त्याहि कारणामुळें पुढारीपण आलें आहे त्यांच्या भाषणांत व वर्तनांत बराच मेळ असला पाहिजे हें उघड आहे. या मेळाची किंवा संगतीची बरोबर इयत्ता काढणें फार कठिण आहे. तरी विशिष्ट प्रसंगीं सारासार विचार केल्यानें अमुक वर्तन त्या इयत्तेंत येतें किंवा नाहीं हें सांगतां येण्यासारखें असतें. **सुधारकांच्या दृष्टीनें सांप्रत प्रसंगीं माधवरावजींचें वर्तन या इयत्तेंत उतरलें नाहीं !**......लोकांस उघडपणें सांगतां न येण्यासारख्या कांहीं कार-णामुळें लोकापवादाची पर्वा न करतां हें प्रायश्चित्त घेणें त्यांस जरूर वाटलें. ठीक आहे; त्यांना वाटत आहे त्याप्रमाणें या प्रायश्चित्तापासून चांगले परिणाम घडून आले आणि इष्ट सुधारणांचें पाऊल या "तोडजोडी" पासून अधिक झपाट्यानें पुढें पडत गेलें, तर सध्यां ज्या गोष्टींबद्दल त्यांना दोष देण्यांत येत आहे, तीच गोष्ट त्यांच्या चिरकालिक स्तुतीस कारण होईल; पण तसें न झालें तर त्यांच्या चरित्रलेखकास मोठ्या कष्टानें व दुःखानें या ग्रामण्यप्रकरणाचा उल्लेख करावा लागेल हें निर्विवाद आहे !

"जे कोणी वरील लेख थोड्या काळजीनें वाचतील त्यांस तो लिहिणें आम्हांस किती जड झालें असावें हें दिसून येणार आहे........राष्ट्रासंबंधानें ज्यांच्याकडे एवढी जबाबदारी आली आहे त्यांना कोणत्याही प्रसंगीं 'तुम्ही चुकलां' असें साफ म्हणणें फार कठीण आहे. तथापि प्रत्येकाला थोडी बहुत विचारशक्ति असते, आणि आपणांकडून होईल तितका तिचा चांगला उपयोग करणें हेंही त्याचें कर्तव्य आहे. या दोन गोष्टी नजरेपुढें एकसारख्या ठेऊन या अत्यंत खेदजनक ग्रामण्यप्रकरणाविषयीं आम्हांस जें शांत विचारांतीं उचित वाटलें तें आपणांकडून होईल तितक्या काळजीनें लिहिलें आहे. असें असूनही जर एखाद्या सन्मान्य पुरुषाविरुद्ध टाकांतून एखादा वेडा वांकडा शब्द गेला असेल तर त्याबद्दल आम्हांस फार वाईट वाटणार आहे, हें सांगावयास नकोच."

सदर लेखांत आगरकरांनीं रानड्यांच्याबद्दल अत्यंत सन्मानयुक्त भाषा वापरली आहे, त्याचप्रमाणें त्यांनीं केलेलें वर्तन योग्य नव्हतें असें स्पष्ट सांगि-तलें आहे. कोणाच्याहीवर छाप पडण्यासारखे मोठे गुण रानड्यांत होते तेव्हां त्याबद्दल अशी भाषा वापरण्यांत गैरशिस्त कांहीं नव्हतें. शिवाय हा लेख

आगरकरांनीं आपल्या सुधारक मित्रांकरितां लिहिला होता व त्यांतील बरीच मंडळी रानड्यांना फार थोर समजत होती. या तंट्यांत टिळक रानड्यांच्या बाजूला अडकले नसते तर केळकर म्हणतात त्याप्रमाणें त्यांनीं रानड्यांची मजा पाहिली असती व आगरकरांच्या या संमानयुक्त लेखाबद्दल त्यांच्यावर धडाका उडवला असता. पण सध्यां शेंपूट तुटलेल्या कोल्ह्याप्रमाणें टिळक व रानडे या दोघांचीही अवस्था होऊन ते एकमेकांच्या सावलीला चिकटून होते. हें प्रेम फार दिवस टिकणें शक्य नव्हतें व टिकलेंही नाहीं; पण जेवढा काळ टिकलें तेवढ्या काळांत टिळकांचा गनिमी कावा व रानड्यांचा गनिमी कावा यांच्या प्रीति-संगमांत आगरकरांना मात्र एक गटंगळी खावी लागली. असो. उपरोक्त लेखांत रानड्यांच्यावर पुनर्विवाहासाठीं बहिष्कार होता असें आलें आहे. अर्थात् दुसऱ्यांच्या पुनर्विवाहाला हजर राहिल्याबद्दल तो पडला होता हें सांगणें नकोच.

४. या भागाच्या सुरवातीला केळकरकृत टिळक चरित्रांतील जो उतारा दिला आहे त्याप्रमाणें असें दिसतें कीं टिळकांचा पाय या चहाप्रकरणांत जर अडकला नसता तर त्यांनीं रानडे प्रभृतींची हुर्रेवावडी उडविली असती. म्हणजे रा. केळकर यांच्या मतें यासंबंधीं टिळकांनीं जें जें कांहीं केलें तें, प्रकरण त्यांच्या गळ्यांत आलें म्हणून, केलें. म्हणजे या बाबतींत टिळक चहा पिणाऱ्यांच्या गोटांत अडकले म्हणून त्यांनीं त्यांच्यातर्फे वकिली केली; एरवीं केली नसती. अर्थात् ही वकिली होती; तिच्यांत खरेपणाचा भाग फारसा नव्हता. रानड्यांनीं मात्र टिळक आपल्या बाजूचे झाले अशी कल्पना करून घेतली. टिळकांचा स्वभाव माहीत असतां रानडे कसे चकले याचें कोणालाही आश्चर्य वाटेल. पण रानड्यांची अशी चूक भूल झाली होती हें खास व तिचा परिणाम त्यांनीं आगरकरांना भोंवावयास लावला. वर दिलेल्या लेखांत रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें तें अयोग्य झालें असें संमानपूर्वक पण स्पष्ट म्हटलें आहे. भलतीच तडजोड करणें ही गोष्ट आगरकरांना केव्हांही पसंत नव्हती. वरील लेख आला त्याच सुमारास "सुधारकां"त आगरकरांचा "गुलामांचें राष्ट्र" हा मोठा विचारपूर्ण व तेजस्वी लेख प्रसिद्ध झाला. त्या वेळीं चहाप्रकरणामुळें पुण्यांत उत्पन्न झालेल्या परिस्थितीवरून त्या लेखांतील कित्येक विचार सुचले असावेत असें स्पष्ट दिसतें. या सुंदर लेखाच्या शेवटच्या भागांत आगरकर लिहितात:—"आतां लोकांस असंमत पण स्वतःस पसंत वाटणाऱ्या गोष्टींच्या

संबंधानें काय करावें, एवढ्या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें राहिलें; व तें उत्तर इतकेंच आहे कीं, ज्या असंमत वर्तनाचा लोकांशीं प्रत्यक्ष संबंध नसेल, पण जें स्वतःच्या मनाला प्रशस्त वाटत असेल त्यांत त्यांच्या भीतीनें बिलकुल फेरफार करूं नये. मनःपूतं समाचरेत् या मंत्राच्या खऱ्या अर्थाच्या अनुरोधानें असलें वर्तन चालू द्यावें. राहतां राहिलें लोकांशीं प्रत्यक्ष संबंध येण्यासारखें पण त्यांस पसंत न पडणारें वर्तन. असें वर्तन परिणामीं लोकांस खरोखरी कल्याणावह होणार आहे अशी ज्याची पक्की खातरी झाली असेल त्यानें असा विचार केला पाहिजे कीं, जर आपण लोकांस न जुमानतां हवें तसें वागत सुटलों तर परिणामीं आपल्या वर्तनांतील चांगुलपणा त्यांच्या नजरेस येऊन ते आपलें अनुकरण करतील किंवा त्यांस आपला तिटकारा येऊन ते आपणांस मुळींच सोडून देतील. ज्याला आपण बहिष्कार म्हणतों तो अशाच प्रकारच्या लोकांच्या तिटकाऱ्याचा परिणाम होय. ज्या बहिष्कारामुळें लोकांशीं मुळींच संबंध तुटण्याचा संभव आहे म्हणजे ज्यामुळें बहिष्कृतांची कायमची निराळी जात होण्याचा संभव आहे, असा बहिष्कार होतां होईल तों टाळावा. कारण, लोकांची खरी सुधारणा व्हावी अशी ज्यांची खरी इच्छा असेल ते लोकांपासून अजीबाद तुटून निघाल्यामुळें ती कधींच होण्याचा संभव नाहीं. तथापि कांहीं वर्षें लोकांपासून निराळें राहिल्यानें, किंवा एखाद्या पिढीनें गैरसोय किंवा त्रास सोसल्यानें, ती होण्याची खात्री असेल, व त्या सुधारणेच्या चांगुलपणाचें उदाहरण त्यांस घालून देणें अवश्य असेल तर मनुष्यजातीचें हित चिंतणाऱ्या सत्यनिष्ठ धीरांनीं तसें करण्यास मागें पुढें पहातां कामा नये. तात्पर्य काय कीं, लोकांच्या कल्याणाचा जो हेतु मनांत धरला असेल तो कोणत्या उपायानें लौकर तडीस जाईल व कोणत्या साधनानें एकंदरींत आपल्याला किंवा दुसऱ्याला कमींत कमी त्रास होईल याचा शांतपणानें निश्चय ठरवून तदनुसार वर्तन करणें हेंच सत्पुरुषास योग्य आहे. हा निश्चय करतांना खरी सुधारणा कशांत आहे हें फारच काळजीनें ठरविलें पाहिजे. कारण वारंवार होतें काय कीं विशिष्ट वासनाधीन किंवा मताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशांत आहे हें नीट न समजून, जेवढें जुनें असेल तेवढें फेंकून देण्यांत व कसल्या तरी नवीन गोष्टींचा अंगीकार करण्यांत आपण सुधारणा करीत आहों असा भ्रम होतो! असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षां दुर्धारक म्हणणें हेंच बरें! उदाहर-

णार्थ, हिंदुधर्मांत बरींच व्यंगें आहेत म्हणून यहुदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देतां येणार नाहीं. तसेंच, आमचे कांहीं रीतिरिवाज मूर्खपणाचे आहेत म्हणून प्रत्येक गोष्टींत परकीयांचें अनुकरण करणें हेंही कोणत्याही दृष्टीनें ज्याचें त्याला किंवा इतरांला परिणामीं विशेष सुखावह होण्याचा संभव नाहीं असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ, कित्येक प्रसंगीं धोतर नेसणें सोईस्कर नाहीं म्हणून युरोपियन लोकांप्रमाणें दिवसभर पाटलोण घालून बसणें, किंवा ते लोक विशेष कामाकडे कागदाचा उपयोग करतात म्हणून आपणही तसें करणें हें केवढें मूर्खपण आहे बरें? ज्या देशांत आपले शेंकडों पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले; ज्या देशांतील हजारों पिढ्यांनीं अनेक गोष्टींत मोठ्या कष्टानें केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणांस आयतेंच प्राप्त झालें–अशा देशांतील धर्माचा, रीतिरिवाजांचा, व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी केव्हांही शोभणार नाहीं. स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत, आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडी गोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटाऊन त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहींत तर फक्त शृंखलांतर करतात. अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींही सुटावयाची नाहीं. भरतखंडांत अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षां तें आहे त्या प्रकारचेंच गुलामांचें राष्ट्र राहिलें तरी हरकत नाहीं. पण अलीकडील चिन्हांवरून आम्ही नवीन खोड्यांत आपले हातपाय अडकूं न देतां ते जुन्या खोड्यांतून बेताबातानें काढून घेण्यास समर्थ होऊं अशी आशा दिसत आहे ! याउप्पर भवितव्यता काय असेल कोण जाणे!"* या लेखावरून आगरकरांना "एकांतिक" विशेषण देणाऱ्यांच्या धारिष्टाची करावी तेवढी तारीफ थोडी होईल असें वाटतें. चहाप्रकरणासंबंधानें आगरकरांनीं दिलेला अभिप्राय जसा सुधारणेच्या तत्वांना अनुसरून होता तसा तो अत्यंत समतोलपणाचा होता याबद्दल शंका

* सुधारक, २७ जून १८९२.

राहात नाहीं. असो. या पुढें आठ पंधरा दिवसांत दादाभाई नौरोजी हे पार्लमेंटाचे सभासद निवडले ही शुभ वार्ता आली. त्या प्रसंगीं आगरकरांनीं त्यांचें जें मनःपूर्वक अभिनंदन केलें त्यावरून राष्ट्रीयसभेच्या राजकारणाबद्दल आगरकरांना केवढा जिव्हाळा वाटत असे हें लक्षांत येतें. प्रायश्चित्तप्रकरणाची धग अद्यापि विझली नव्हती व तिच्यामुळें आगरकरांचीं बोटें भाजून निघावयाचीं होतीं. पण त्यापूर्वीं आगरकरांवर आणि फर्ग्युसन कॉलेज व न्यू इंग्लिश स्कूल यांवर दुर्दैवाची आणखी वक्रगति झाली. टिळकांच्या भांडणांतून सोसायटी मुक्त होऊन एक वर्ष झालें होतें नव्हतें इतक्यांत मृत्यूची कठोर दृष्टि या संस्थेकडे वळली व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नभोमंडळांतील एक अत्यंत दैदीप्यमान तारा अकाळीं गळून पडला !

५. ता. ९ आगष्ट १८९२ रोजीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे मृत्यु पावले. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज या संस्था रंगारूपाला येण्याला वामनरावांची विद्वत्ता आणि श्रम हे पुष्कळच कारणीभूत झाले होते. आतां तर कॉलेजचा आणखी विस्तार होणार होता व चतुःशृंगीखालच्या मैदानावर फर्ग्युसन कॉलेजची स्वतःची इमारत बांधण्याची सुरवात झाली होती. अशा वेळीं वामनरावांचा मृत्यु म्हणजे सोसायटीवर अशनिपातच होता. आगरकरांचा आणि आपट्यांचा पहिल्यापासून अत्यंत जिव्हाळा होता आणि आगरकर न्यू इंग्लिश स्कूलमध्यें होते म्हणून वामनराव त्या संस्थेला येऊन मिळाले. फर्ग्युसन कॉलेजसारख्या नव्या कॉलेजांत आपट्यांनीं संस्कृत अध्यापकाचें काम इतक्या सुंदर प्रकारें केलें कीं त्यावेळींच त्रिखंडकीर्ति झालेला भांडारकरासारखा पंडित डेक्कन कॉलेजांत संस्कृतचा अध्यापक असतांही सदर विषयाच्या बाबतींत फर्ग्युसन कॉलेजला खालीं मान घालण्याचा केव्हांही प्रसंग आला नाहीं. वामनरावांसंबंधीं आगरकरांनीं लिहिलेला मृत्युलेख कारुण्यरसानें ओथंबलेला आहे व त्याचा शेवटचा भाग वाचतांना अद्यापि अंतःकरण सद्गदित होतें. आपट्यांच्या विद्वत्तेविषयीं व कर्तृत्वाविषयीं लिहितांना त्यांच्यावर कांहीं तरी शिंतोडे उडविण्याचा मोह केसरीकर्त्यांना आवरला नाहीं. पण केसरीनें तसें लिहिलें नसतें तरच लोकांना आश्चर्य वाटलें असतें. तरी सुद्धां त्या दुष्ट लिहिण्यामुळें आगरकरांसारख्यांना दुःख वाटलें यांत नवल नाहीं. सतत बारा वर्षें ज्याच्या सहकारितेनें आगरकरांनीं शाळेंत व कॉलेजांत काम केलें त्याच्यावर मृत्यूचा घाला पडल्यामुळें त्यांना मृत्यु अतिशय जवळ आहे असें

वाटलें. ते लिहितातः—"आज सहा सात वर्षें शाळेचें काम जरी दुसरे इसम पहात आहेत तरी वामनराव आपटे म्हणजे न्यू स्कूलचे हेड मास्तर ही लोकांच्या मनांतील कल्पना आजपर्यंत कायम आहे. कां नसावी? न्यू इं. स्कुलास सालोसाल जी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर्शिप मिळत गेली तीमुळें त्याचा उत्कर्ष मोठ्या झपाट्यानें होत गेला. ती स्कॉलर्शिप काबीज करण्याचें सारें श्रेय वामनरावांकडे होतें. तेव्हां या गोष्टीमुळें शाळेची जेवढी भरभराट झाली ती सारी त्यांच्यामुळें झाली, हें कोणीही कबूल करील. शिवाय ते मॅट्रिक्युलेशनच्या उमेदवारांस थोडें बहुत इंग्लिशही शिकवीत असत. विशेषतः ती परीक्षा अगदीं जवळ येऊन ठेपली म्हणजे ते जी महिना दीड महिना मेहनत करीत ती विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटींतील प्रश्नांचीं उत्तरें लिहितांना फार उपयोगी पडे. शिक्षणाचीं हीं दोन अंगें अशा उत्तम रीतीनें संभाळून, खेरीज ते शाळेची व्यवस्था फार दक्षतेनें पहात. सर्व शिक्षक लोकांस त्यांचा मोठा वचक असे, व ते खुद्द काल व काम यासंबंधानें फार नियमित व व्यवस्थित असल्यामुळें तसें करण्याबद्दल दुसऱ्यांवर त्यांना सक्ती करतां येत असे." पुढें म्हटलें आहेः— "......१८८५ च्या आरंभास फर्ग्युसन कॉलेज निघालें व तेव्हांपासून गेल्या मंगळवारपर्यंत रा. आपटे त्या संस्थेचे प्रिन्सिपॉल किंवा मुख्य व्यवस्थापक होते. या कॉलेजांत पदवीच्या बी. ए. चा अभ्यास शिकविण्याची परवानगी मिळण्यास पुरीं सात वर्षें लागलीं. सोसायटीच्या लाईफ मेंबरांत ऐक्य राहतें आणि वैमनस्य उत्पन्न न होतें तर या कामास इतकीं वर्षें न लागतीं. पण अनेक अपरिहार्य कारणांमुळें वैमनस्याचा प्रादुर्भाव होऊन दिवसें दिवस तें वाढत गेलें, व अखेरीस त्यामुळें फुटाफूट झाली. या अनिष्ट गोष्टीमुळें फर्ग्युसन कॉलेजाची वाढ अजीबाद खुंटेल असें पुष्कळांनीं भाकित केलें होतें; पण सुदैवानें तसें कांहीं झालें नाहीं. उलट बेताची खच्ची केली असतां झाडास इजा न होतां ज्याप्रमाणें तें अधिक जोरानें वाढूं लागतें त्याप्रमाणेंच कांहीं अंशीं या फुटाफुटीनंतर फर्ग्युसन कॉलेजाची स्थिति झाली. या सर्व कलहावर्धींत वामनरावांचें लक्ष एका कॉलेजाकडे किंवा हातीं असलेल्या दुसऱ्या एखाद्या उद्योगाकडे असे. कॉलेजाच्या उत्कर्षास सहायभूत अशी जेवढी म्हणून गोष्ट त्यांच्या हातून होण्यासारखी असे तेवढी ते उल्हासानें करीत आणि आपल्या कामाला लागत. राजकीय, धार्मिक अथवा सामाजिक प्रश्नांविषयीं निरर्थक वाद घालीत बसण्याचा त्यांना मनापासून कंटाळा होता......वामनरावासारख्या बुद्धिवान्,

अभ्यासी, नेमस्त, निर्व्यसनी, निराग्रही, सततोद्योगी व मनमिळाऊ गृहस्थानें आपल्या पतित देशभूमीच्या उन्नतीसाठीं निर्लोभ वृत्तीनें पूर्ण बारा वर्षें जे अश्रांत परिश्रम केले ते मनांत आणून त्यांस लोकांचा खरा हितकर्ता असें म्हटल्यावांचून ( लोक ) कधींही राहणार नाहींत. ''*

वामनरावांच्या मृत्यूनें फर्ग्युसन कॉलेजची केवढी हानि झाली त्यासंबंधानें लिहितांना त्याच लेखांत आगरकर म्हणतातः—

" अशा प्रकारचे होतकरू तरुण विद्वान् अल्पायुषी होणें यांत समाजाचें मोठें नुकसान आहे. पण त्यांतल्या त्यांत स्वहिताकडे बिलकुल दुर्लक्ष करून ज्यांनीं आपली सारी बुद्धि व हिंमत देशकार्याकडे लाविली आहे, व एखाद्या मोठ्या संस्थेचा बोजा आपल्या शिरावर घेतला आहे, अशांचा अकालिक वियोग फारच खेदजनक होतो. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं शास्त्रीबोवा परलोकवासी झाले; पाटणकर नोकरीवर निघून गेले; टिळक फुटून निघाले; नामजोशी रजेवर आहेत; वगैरे गोष्टीही डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या अभीष्टचिंतकांस एकंदरींत सोसायटीच्या नुकसानीच्याच वाटणार आहेत; पण वामनरावांच्या अकालिक मृत्यूनें सोसायटीचें व लोकांचें जें अपरिमित नुकसान झालें आहे तें सहसा भरून काढतां येण्यासारखें नाहीं. एक तर वामनरावांची अभ्यासपीठिका समग्र शिष्यवर्गानें नेहमीं नजरेपुढें ठेवण्यासारखी होती. ए. बी. शिकूं लागल्यापासून बी. ए. व एम्. ए. होईतोंपर्यंत त्यांस कोठें केव्हांही अपयश आलें नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यांच्या मार्गांत जेवढीं कांहीं इनामें व स्कॉलर्शिपा होत्या तेवढ्या त्यांनीं काबीज करून अखेरीस डेक्कन कॉलेजांतील फेलोशिप मिळविली व आपल्या ग्राहकतेनें व मेहनतीनें त्यांनीं आपल्या सर्व गुरूंस अत्यंत संतुष्ट केलें. अशा प्रकारच्या असामान्य विद्यार्थ्याकडे योग्य कालीं कॉलेजसारख्या संस्थेचें आधिपत्य यावें आणि तें क्रूर मृत्यूनें एकाएकीं काढून घ्यावें, यांत त्या संस्थेचें केवढें नुकसान झालें आहे हें कोणासही सांगण्याची जरूर नाहीं. अलीकडे आठ नऊ महिने तर कॉलेजासाठीं वामनरावांनीं जीवाउपरांत मेहनत केली, व ती करण्यास तेच अत्यंत योग्य होते. अनेक वर्षें युनिव्हर्सिटीचे परीक्षक व फेलो असल्यामुळें सिंडिकेट व सेनेट यांतील सभासदांशीं दळणवळण ठेवण्यास वामनरावांइतका दुसरा लायक इसम सोसाय-

* सुधारक, १५ आगष्ट १८९२.

टीच्या लाईफ मेंबरांत कोणी नव्हता; तसेंच, कॉलेजावांचून वामनरावांच्या पाठीमागें दुसरा कोणताही लढा ( ? ) नसल्यामुळें, आणि त्यांचीं मतें, स्वभाव व प्रकृति हीं कोणत्याही संस्थेच्या साह्यासाठीं मोठमोठ्या गृहस्थांस भीड घालण्यास जाणाऱ्या मनुष्याचीं असावीं तशीं असल्यामुळें, गेल्या आठ दहा महिन्यांत त्यांनीं कॉलेजाकरतां जें काम केलें तें दुसऱ्या कोणाच्यानेंही झालें नसतें; व कॉलेजाची इमारत पुरी होऊन त्याची सर्व प्रकारची स्थिरस्थावर होईतोंपर्यंत त्यांनीं तें त्याच उल्हासानें पुढें चालविलें असतें यांत शंका नाहीं. कारण, कोणत्याही रीतीनें कां होईना, मंडळींतले तंटे नाहींसे झाल्यापासून फर्ग्युसन कॉलेज रंगारूपास आणितां येईल अशी इतरांप्रमाणें त्यांसही आशा उत्पन्न झाली होती, व आपण त्या संस्थेचे प्रिन्सिपॉल आहों, तेव्हां इतरांपेक्षां आपणाकडे तिची फारच मोठी जबाबदारी आहे असें त्यांस वाटूं लागलें होतें हेंही निर्विवाद आहे. ”

परंतु लेखाच्या शेवटीं जे वैयत्तिक उद्गार आहेत ते वाचून आगरकरांचा व वामनरावांचा स्नेह केवढा होता हें लक्षांत येतें. आगरकर लिहितातः—

“ येथपर्यंत रा. आपटे यांच्या हातून सोसायटीची किती महत्वाची नोकरी होत होती व पुढें झाली असती याचें दिग्दर्शन केलें आहे व तेवढ्यावरून त्यांच्या अकालिक मृत्यूमुळें सोसायटीचें जें नुकसान झालें आहे त्याची थोडी-बहुत कल्पना आमच्या वाचकांस करतां येणार आहे. पण या नुकसानाशीं ज्याची तुलना देखील करतां येणार नाहीं अशा त्यांच्या वियोगापासून त्यांच्या सहकाऱ्यांस होणाऱ्या अनिर्वचनीय दुःखाची कोण कल्पना करील ? त्यांपैकीं ज्यांचे स्वभाव-सादृश्यामुळें किंवा विचारसादृश्यामुळें वामनरावांशीं विशेष संघटन होतें त्यांच्या डोळ्यांपुढून त्यांची ती वामनमूर्ति जात नसेल; घटकोघटकीं वामनराव आल्याचा व बोलल्याचा भास होत असेल; थोडा एकांत झाला व मनास फुरसत सांपडली कीं एका ठिकाणीं बसून केलेल्या मोठमोठ्या बेतांची आठवण होऊन पोटांत भडभडून येत असेल; व चतुःशृंगीच्या मैदानांत चालू असलेल्या इमारतीची कल्पना मनांत आली कीं पुढले सारे विचार डोळ्यांपुढें उभे रहात असतील; व ही इमारत पूर्ण होऊन मोठ्या थाटानें आपण तींत प्रवेश केला, विद्यार्थ्यांस व प्रोफेसरांस राहण्यासारख्या सोई झाल्या, ज्यांचें आज बीजारोपण होत आहे अशीं झाडें मूळ धरून छाया देऊं लागलीं, प्रतिवर्षीं या संस्थेंतून अनेक उमेदवार प्रत्येक परीक्षेंत पसार होऊं लागले, सारांश,

अभ्यासी, नेमस्त, निर्व्यसनी, निराग्रही, सततोद्योगी व मनमिळाऊ गृहस्थानें आपल्या पतित देशभूमीच्या उन्नतीसाठीं निर्लोभ वृत्तीनें पूर्ण बारा वर्षें जे अश्रांत परिश्रम केले ते मनांत आणून त्यांस लोकांचा खरा हितकर्ता असें म्हटल्यावांचून ( लोक ) कधींही राहणार नाहींत. ”*

वामनरावांच्या मृत्यूनें फर्ग्युसन कॉलेजची केवढी हानि झाली त्यासंबंधानें लिहितांना त्याच लेखांत आगरकर म्हणतात:—

“ अशा प्रकारचे होतकरू तरुण विद्वान् अल्पायुषी होणें यांत समाजाचें मोठें नुकसान आहे. पण त्यांतल्या त्यांत स्वहिताकडे बिलकुल दुर्लक्ष करून ज्यांनीं आपली सारी बुद्धि व हिंमत देशकार्याकडे लाविली आहे, व एखाद्या मोठ्या संस्थेचा बोजा आपल्या शिरावर घेतला आहे, अशांचा अकालिक वियोग फारच खेदजनक होतो. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं शास्त्रीबोवा परलोकवासी झाले; पाटणकर नोकरीवर निघून गेले; टिळक फुटून निघाले; नामजोशी रजेवर आहेत; वगैरे गोष्टीही डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या अभीष्टचिंतकांस एकंदरींत सोसायटीच्या नुकसानीच्याच वाटणार आहेत; पण वामनरावांच्या अकालिक मृत्यूनें सोसायटीचें व लोकांचें जें अपरिमित नुकसान झालें आहे तें सहसा भरून काढतां येण्यासारखें नाहीं. एक तर वामनरावांची अभ्यास-पीठिका समग्र शिष्यवर्गानें नेहमीं नजरेपुढें ठेवण्यासारखी होती. ए. बी. शिकूं लागल्यापासून बी. ए. व एम्. ए. होईतोंपर्यंत त्यांस कोठें केव्हांही अपयश आलें नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यांच्या मार्गांत जेवढीं कांहीं इनामें व स्कॉल-शिपा होत्या तेवढ्या त्यांनीं काबीज करून अखेरीस डेक्कन कॉलेजांतील फेलो-शिप मिळविली व आपल्या ग्राहकतेनें व मेहनतीनें त्यांनीं आपल्या सर्व गुरूंस अत्यंत संतुष्ट केलें. अशा प्रकारच्या असामान्य विद्यार्थ्याकडे योग्य कालीं कॉलेजसारख्या संस्थेचें आधिपत्य यावें आणि तें क्रूर मृत्यूनें एकाएकीं काढून घ्यावें, यांत त्या संस्थेचें केवढें नुकसान झालें आहे हें कोणासही सांगण्याची जरूर नाहीं. अलीकडे आठ नऊ महिने तर कॉलेजासाठीं वामनरावांनीं जीवा-उपरांत मेहनत केली, व ती करण्यास तेच अत्यंत योग्य होते. अनेक वर्षें युनिव्हर्सिटीचे परीक्षक व फेलो असल्यामुळें सिंडिकेट व सेनेट यांतील सभा-सदांशीं दळणवळण ठेवण्यास वामनरावांइतका दुसरा लायक इसम सोसाय-

* सुधारक, १५ आगष्ट १८९२.

टीच्या लाईफ मेंबरांत कोणी नव्हता; तसेंच, कॉलेजावांचून वामनरावांच्या पाठीमागें दुसरा कोणताही लढा (?) नसल्यामुळें, आणि त्यांचीं मतें, स्वभाव व प्रकृति हीं कोणत्याही संस्थेच्या साह्यासाठीं मोटमोठ्या गृहस्थांस भीड घालण्यास जाणाऱ्या मनुष्याचीं असावीं तशीं असल्यामुळें, गेल्या आठ दहा महिन्यांत त्यांनीं कॉलेजाकरतां जें काम केलें तें दुसऱ्या कोणाच्यानेंही झालें नसतें; व कॉलेजाची इमारत पुरी होऊन त्याची सर्व प्रकारची स्थिरस्थावर होईतोंपर्यंत त्यांनीं तें त्याच उल्हासानें पुढें चालविलें असतें यांत शंका नाहीं. कारण, कोणत्याही रीतीनें कां होईना, मंडळींतले तंटे नाहींसे झाल्यापासून फर्ग्युसन कॉलेज रंगारूपास आणितां येईल अशी इतरांप्रमाणें त्यांसही आशा उत्पन्न झाली होती, व आपण त्या संस्थेचे प्रिन्सिपॉल आहों, तेव्हां इतरांपेक्षां आपणाकडे तिची फारच मोठी जबाबदारी आहे असें त्यांस वाटूं लागलें होतें हेंही निर्विवाद आहे."

परंतु लेखाच्या शेवटीं जे वैयत्तिक उद्गार आहेत ते वाचून आगरकरांचा व वामनरावांचा स्नेह केवढा होता हें लक्षांत येतें. आगरकर लिहितातः—

"येथपर्यंत रा. आपटे यांच्या हातून सोसायटीची किती महत्वाची नोकरी होत होती व पुढें झाली असती याचें दिग्दर्शन केलें आहे व तेवढ्यावरून त्यांच्या अकालिक मृत्यूमुळें सोसायटीचें जें नुकसान झालें आहे त्याची थोडी-बहुत कल्पना आमच्या वाचकांस करतां येणार आहे. पण या नुकसानाशीं ज्याची तुलना देखील करतां येणार नाहीं अशा त्यांच्या वियोगापासून त्यांच्या सहकाऱ्यांस होणाऱ्या अनिर्वचनीय दुःखाची कोण कल्पना करील? त्यांपैकीं ज्यांचे स्वभाव-सादृश्यामुळें किंवा विचारसादृश्यामुळें वामनरावांशीं विशेष संघटन होतें त्यांच्या डोळ्यांपुढून त्यांची ती वामनमूर्ति जात नसेल; घटकोघटकीं वामनराव आल्याचा व बोलल्याचा भास होत असेल; थोडा एकांत झाला व मनास फुरसत सांपडली कीं एका ठिकाणीं बसून केलेल्या मोठमोठ्या बेतांची आठवण होऊन पोटांत भडभडून येत असेल; व चतुःशृंगीच्या मैदानांत चालू असलेल्या इमारतीची कल्पना मनांत आली कीं पुढले सारे विचार डोळ्यांपुढें उभे रहात असतील; व ही इमारत पूर्ण होऊन मोठ्या थाटानें आपण तींत प्रवेश केला, विद्यार्थ्यांस व प्रोफेसरांस राहण्यासारख्या सोई झाल्या, ज्यांचें आज बीजारोपण होत आहे अशीं झाडें मूळ धरून छाया देऊं लागलीं, प्रतिवर्षीं या संस्थेंतून अनेक उमेदवार प्रत्येक परीक्षेंत पसार होऊं लागले, सारांश,

येथून पुढें सर्व गोष्टींची अनुकूलता प्राप्त होऊन थोड्या वर्षांत अशा प्रकारच्या इतर संस्थांप्रमाणें ही संस्थाही भरभराटीस आली, तरी या साऱ्या आनंद-कारक गोष्टी पहाण्यास जो जगायला पाहिजे होता तो जगला नाहीं, असा विचार मनांत आल्याबरोबर त्यांच्या डोळयांतून अश्रुधारा खचित वाहूं लागत असतील! इतरांच्या संबंधानें हा प्रकार कसाही असो, त्यांपैकीं निदान एकाला वरील गोष्टी पहाण्याचा दिवस आला तर त्यापासून होणाऱ्या आनंदांत त्याला वामनरावांचें स्मरण होऊन पराकाष्ठेचें दुःख होणार आहे!" या उद्गारां-वरून आगरकरांच्या स्निग्ध अंतःकरणाचीही कल्पना आपोआप येते. वामन-रावांच्या अकाल निधनानंतर आगरकर कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले आणि अशा प्रकारें त्यांच्या क्षीण होत चाललेल्या प्रकृतीवर कामाचा आणखी बोजा पडला.

वामनराव आपट्यांनीं कॉलेजच्या कामाची शिस्त फार उत्कृष्ट बसवून दिली होती आणि त्या शिस्तीला अनुसरून सर्व कारभार चालत असे. १८९२ च्या उत्तरार्धांत सुधारकांत शिक्षणासंबंधीं फार महत्वाचे लेख आले. त्यांत सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे हा सिद्धांत त्याचप्रमाणें मुलांप्रमाणेंच मुलींनाही शिक्षण मिळणें आवश्यक आहे आणि स्त्रीपुरुषांना एकत्र शिक्षण द्यावें व तेंही एकच द्यावें हे सिद्धांत आगरकरांनीं फार मुद्देसूद रीतीनें मांडले. याप्रमाणें सार्वजनिक शिक्षणाचे पहिले पुरस्कर्ते आगरकर होत आणि पुढें ना. गोखले यांनीं प्राथमिक शिक्षणाचें जें बिल वरिष्ठ कायदेमंडळापुढें आणलें त्याची मूळ स्फूर्ति या वेळेला झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. आगरकरांनीं पुरस्कारिलेल्या या सिद्धांताची चर्चा दुसरीकडे केलेली आहे. स्त्रीशिक्षणाचें आगरकरांना केवढें कौतुक वाटे याचें प्रत्यंतर पुढील मजकुरावरून लक्षांत येतें. ता. ३ आक्टोबर १८९२ च्या सुधार-कांत हा मजकूर आहे:—"यंदाच्या सहाव्या इयत्तेच्या उमेदवारांत रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांची १२ वर्षांची कुमारिका कृष्णाबाई ही एक आहे हें कळविण्यास आम्हांस फार आनंद वाटतो. १२ वर्षांच्या वयांत सहाव्या इयत्तेचा अभ्यास पूर्ण व्हावा ही गोष्ट आधीं अभिनंदनीय खरीच, परंतु त्यांतही ब्राह्मणकन्या परीक्षेस बसल्याचें हेंच प्रथम ठळक उदाहरण आहे, म्हणून त्याबद्दल आम्हांस अधिकच आनंद वाटतो. असो. कुमारी कृष्णाबाई या परी-क्षेंत यशस्वी होवो असें आम्हीं मनापासून इच्छितों." ता. ७ नोव्हेंबर १८९२ च्या अंकांत पुढील मजकूर आहे:—"रा. टिळक यांची कन्या कुमारी

कृष्णाबाई ही सहावे इयत्तेच्या परीक्षेस बसली होती हें आम्हीं मागें कळविलेंच होतें. ती त्या परीक्षेंत पास झाली आहे हें कळविण्यास आम्हांस फार आनंद व अभिमान वाटतो. " याच सुमारास (ता. ९ आक्टोबर १८९२) लोकहितवादी (रा. ब. गोपाळराव देशमुख) मृत्यु पावले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं लोकहितवादीसंबंधीं टीका केली त्यासंबंधीं कोणाचें कांहीं म्हणणें नाहीं पण त्या टीकेच्या निमित्तानें त्यांच्याबद्दल भलभलते ग्रह उत्पन्न करून त्यांनीं केलेल्या स्वदेशाभिमानी कामगिरीची जाणीव लोकांतून नाहींशी करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न झाला. टिळकआगरकरांच्या प्रभावळींत शास्त्रीबुवा नसते तर त्यांच्या कामगिरीबद्दल लोकांत अवास्तव कल्पना झाली आहे ती होण्याचा संभव नव्हता. त्यांची सुंदर भाषाशैली सोडून दिल्यास इतर कोणत्या गुणांचें वास्तव्य त्यांच्या ठिकाणीं लोकोत्तर प्रमाणांत होतें याचा निर्णय करणें फारसें सोपें नाहीं. कामगिरीच्यासंबंधीं बोलावयाचें झालें तर लोकहितवादींना शास्त्रीबुवांच्या वरची प्रत निष्पक्षपाती माणसाला द्यावी लागेल. लोकहितवादीसंबंधीं आगरकरांनीं काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत:—"यांच्या मृत्यूनें सुधारकांचा एक प्रमुख अग्रेसर नाहींसा झाला इतकेंच नाहीं तर गेल्या व या पिढीमधील सांखळीही तुटली म्हणण्यास हरकत नाहीं......नुसतें इंग्रजी शिकण्याबद्दल सचैल स्नान केल्यावांचून आपणांस आई घरांत येऊं देत नसे हा त्यांनीं सांगितलेला स्वतःचा अनुभव व सध्यांची स्थिति पाहिली म्हणजे, 'तुम्ही घाबरूं नका; तुमचे प्रयत्न असेच चालूं द्या, थोड्याच काळानें लोकांचे दुराग्रह नाहींसे होतील;' असे यांच्या सारख्या अनुभवशीर पुढाऱ्याचे शब्द कोणास धीर आणणार नाहींत ? तेव्हां असा वृद्ध अनुभवी पुढारी नाहींसा झाल्यानें सुधारणा पक्षास दुःख व्हावें हें तर साहाजिकच आहे; परंतु त्यांचा सौम्य स्वभाव, त्यांची निर्व्यसनिता, त्यांचें औदार्य वगैरे अनेक गुणांमुळें त्यांच्या मृत्युपासून ज्यास दुःख होणार नाहीं असा एकही मनुष्य सांपडणार नाहीं."* लोकहितवादी यांच्यावर त्यांच्या सुधारकपणामुळें शास्त्रीबुवा एवढे गरम झाले होते हें वरील वाक्यांवरून लक्षांत येण्यास हरकत नाहीं. असो.

---

* सुधारक, १० आक्टोबर १८९२.

६. या वेळीं पुण्यांत उपस्थित झालेला महत्वाचा वादविवाद म्हणजे पंडिता रमाबाईच्या शारदासदनाविषयीं होय. त्यांत आगरकरांना प्रत्यक्ष व सुधारकद्वारां भाग घ्यावा लागला. पंडिता रमाबाई ही अलौकिक बुद्धिमती व मोठी कर्तृत्ववती स्त्री होऊन गेली यांत शंका नाहीं. हिंदु स्त्रियांच्या दुःस्थितीबद्दल तिला अंतःकरणपूर्वक खेद वाटे व ती स्थिति सुधारण्याकरितां तिनें शारदासदन ही संस्था काढली. या संस्थेला पुण्यांतील व महाराष्ट्रांतील लोकांनीं आर्थिक साहाय्य केलें असतें तर जो वाद उत्पन्न झाला तो झालाच नसता. पुढें रमाबाई खिस्ती झाली व तिच्या संस्थेला अमेरिकेंतील खिस्ती समाजाकडून लक्षावधि रुपयांचें साहाय्य मिळालें. पंडिताबाईला आपलें कार्य खिस्ती झाल्याशिवाय करतां आलें नाहीं याचा पुष्कळसा दोष हिंदुसमाजाच्या कर्तव्यपराङ्मुखतेकडे जातो. पुढें विधवा स्त्रियांना शिक्षण देण्याचा हा प्रयत्न यशस्वी होत चालला हें पाहून पुण्यांतील स्त्रीशिक्षणद्वेष्ट्या मंडळीच्या कपाळाला तिडिक उठली व त्यांनीं ही संस्था हिंदु मुलींना बाटविण्यासाठीं आहे म्हणून ओरडा सुरू केला. शारदासदन ही संस्था पुष्कळ दिवसपर्यंत केवळ शिक्षणाच्या कार्यासाठीं चालली होती ही गोष्ट निर्विवाद आहे व हें कार्य करून रमाबाईनें महाराष्ट्रावर फार मोठे उपकार केले आहेत. अर्थात् या कार्याला रानडे, भांडारकर, आगरकर अशा मंडळींचा पूर्ण पाठिंबा होता व संस्थेला लोकांनीं साहाय्य करण्याबद्दल आगरकरांनीं सुधारकांत अनेक वेळां लिहिलें होतें. यांतील कोणीही मंडळी खिस्तीधर्मप्रसाराला साहाय्य करणारी नव्हती. पुढें खिस्तीधर्माचा प्रसार हा सदनाचा विशिष्ट परिस्थितींत एक हेतु आहे असें रमाबाईनें म्हणतांच या सर्व मंडळींनीं या संस्थेपासून आपल्या समाजाला पुढें फायदा नाहीं असें लक्षांत आणून तिच्याशीं असलेला प्रत्यक्ष किंवा सहानुभूतीचा संबंध तोडला. या सर्व इतिहासाचा या ठिकाणीं पाल्हाळ करण्याचें प्रयोजन नाहीं म्हणून तो थोडक्यांत दिला आहे. पण त्यासंबंधीं आगरकरांचें मत काय होतें हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईलः—" ज्याअर्थीं डॉ. भांडारकर, रा. ब. रानडे व रा. ब. भट यांसारख्या विचारी व चौकस गृहस्थांस सदनाच्या साहाय्यकारिणी मंडळींतून आपलीं नांवें काढून घेणें अवश्य वाटलें आहे त्याअर्थीं सध्यां त्या संस्थेची असावी तशी स्थिति नसली पाहिजे असें अनुमान करणें अशक्य आहे. तथापि ती आजच केवळ असह्य झाली आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

तसेंच शारदासदन केव्हांही निवळ मिशनरी संस्था होईल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. हिंदुधर्माप्रमाणें आचरण करूं इच्छिणाऱ्या मुलींस तसें करण्याला रमाबाईकडून यत्किंचित्ही प्रतिबंध होत नाहीं असें आम्हांस पक्कें ठाऊक आहे. परंतु असल्या संस्थेंत एवढा नियम पाळल्यानेंच धर्मांतराची भीति नाहींशी होत नाहीं. ती होण्यास आईबापांच्या किंवा पालकांच्या स्पष्ट परवानगीशिवाय कोणत्याही मुलीस स्वधर्मांतून परावृत्त न होऊं देण्याचा अशा संस्थेच्या मुख्य चालकेचा दृढ संकल्प असला पाहिजे आणि तो असेल तरच ती लोकांच्या आदरास व विश्वासास पात्र होऊन तिच्या पासून होईल तितका फायदा करून घेण्यास त्यांच्या मनाची प्रवृत्ति होऊं शकणार आहे. सदनाच्या सांप्रत स्थितिविषयीं आम्हांस जी माहिती लागली आहे तीवरून असलें दृढ बंधन करून घेण्याची इच्छा किंवा शक्ति रमाबाईस आतां राहिली नाहीं असें वाटतें; तेव्हां अर्थात्च पूर्वी एकदां ज्या ईर्षेनें या शाळेचा पक्ष आम्हीं घेतला होता त्या ईर्षेनें तो आज घेण्याला आम्हीं असमर्थ आहों. धर्मासंबंधानें आमचीं मतें कशींही असलीं तरी हिंदु स्त्रियांनीं किंवा पुरुषांनीं कोणत्याही ऐहिक अथवा पारमार्थिक लाभासाठीं ख्रिस्ती व्हावें ही गोष्ट आम्हांस बिलकूल संमत नाहीं. मुमुक्षु मर्त्यांनीं धर्मावांचून मरूं नये हें खरोखरीच इष्ट असल्यास

स्वधर्में निधनं श्रेयः परधर्मो भयावहः

या गीतावचनांतील रहस्य आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. शारदासदनांत असणाऱ्या मुलींना स्वधर्मत्याग करण्याची बुद्धि न होऊं देण्यास्तव रमाबाई जितकी खबरदारी घेण्यास राजी आहेत असें आम्हांस आजपर्यंत वाटत होतें तितकी त्या घेत नाहींत अशी थोड्या दिवसांत आमच्या नजरेस आलेल्या कांहीं गोष्टींवरून आमची खातरी झाली आहे, आणि म्हणून आजपर्यंत या सदनाचा जितका अभिमान आम्हीं वाहिला तितका तो यापुढें वहाणें अशक्य आहे असें आम्हीं मोठ्या कष्टानें कबूल करतों !" * केसरीकर्त्यांनीं सुधारकांवर हा आलेला प्रसंग पाहून आनंदानें टाळ्या वाजविण्यास सुरवात केली. पण याच केसरीकर्त्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी "पंडिताबाईनीं धर्मांतर केलें हें आमचें दुर्दैव होय. तथापि तेवढ्याच कारणासाठीं आम्ही

* सुधारक, २१ आगष्ट १९९२.

त्यांस टाकून द्यावें हें उचित होणार नाहीं. धर्मांतराबरोबर त्यांनीं आपला देशाभिमान टाकला नाहीं हें त्यांस श्रेयस्कर आहे. ख्रिस्तीधर्मप्रसारार्थ त्यांनीं आपला प्रयत्न चालविला नाहीं असें आतांपर्यंतच्या त्यांच्या वर्तनावरून व लोकांपुढें त्यांनीं दर्शविलेल्या विचारांवरून उघड होत आहे. तेव्हां त्यांच्याविषयीं मनांत कांहीं किंतू धरून त्यांच्यापासून विलग रहाणें व त्यांनीं हातीं धरलेल्या कार्यास साहाय्य न करणें हें आत्मविघाताचें कारण होईल " असें स्पष्ट म्हटलें होतें. हा उतारा आगरकरांनीं सुधारकाच्या ११ सप्टेंबर १८९३ च्या अंकांत मुद्दाम छापला होता. अर्थात् रमाबाईमुळें कोणी चकले असें म्हणावयाचें असेल—तसें म्हणण्याचें आम्हांला कांहीं कारण दिसत नाहीं—तर त्यांत आगरकरांप्रमाणें टिळकही होते. तेव्हां शारदासदनांतून रानडे प्रभृति मंडळी निघाली व आगरकरांनीं अतःपर सदर संस्थेचा अभिमान बाळगणें शक्य नाहीं असें म्हटलें म्हणून निदान केसरीला तरी गर्दभनृत्य करण्याचें कांहीं कारण नव्हतें. याच अंकांत आगरकर म्हणतातः—"मधून मधून सदनावर अनेक कारणांनीं काहूर येत असे, परंतु तें बहुधा जागच्या जागींच जिरून जात असे व हळू हळू सदन लोकप्रिय होत चाललें होतें. परंतु मध्यंतरीं कोणाच्या पालकांच्या परवानगीमुळें म्हणा, कोणा प्रौढ विधवेच्या इच्छेमुळें म्हणा, मुलींच्या नैसर्गिक जिज्ञासेमुळें म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं अज्ञात कारणामुळें म्हणा, रमाबाईबरोबर प्रार्थना करूं इच्छिणाऱ्या मुलींची संख्या वाढत गेली. आतां ही संख्या वाढविण्याच्या कामीं पंडिताबाईकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें प्रयत्न झाला नाहीं हें आम्हांस माहीत आहे. परंतु कोणत्याही कारणामुळें म्हणा, प्रार्थनेस जाणाऱ्या मुलींची संख्या वाढली आहे व ही गोष्ट रमाबाईसही मान्य आहे. व या मुलींपैकीं कोणी ख्रिस्ती धर्माविषयीं अधिक ज्ञान मिळण्याची इच्छा दर्शविल्यास ती जागच्याजागीं दाबून टाकण्यास पंडिताबाई तयार नाहींत. अंधेरांत असलेलें मनुष्य आपण होऊन उजेडांत येण्याचा प्रयत्न करीत असतां त्यास मागें लोटण्याचें आपल्या हातून होणार नाहीं असें जें यावर रमाबाईचें म्हणणें आहे तेंही त्यांच्या समजुतीप्रमाणें वावगें नसल्यामुळें त्याची थट्टा करण्याचें आम्हांस प्रयोजन दिसत नाहीं; परंतु असें करण्यांत अल्पहित साधण्याकरितां मोठें हित गमवावें लागतें हें रमाबाईस दिसूं नये, किंबहुना दिसत असूनही त्यांनीं जाणून बुजून दुर्लक्ष करावें हें आमच्या स्त्रीवर्गाचें दुर्दैव होय. हल्लीं

शारदासदनांत जो प्रकार चालू आहे तेवढ्यावरून त्या सदनास मिशनरी संस्था म्हणतां येईल किंवा पुढें केव्हांही तें निवळ मिशनरी बनेल असें आम्हांस अद्याप वाटत नाहीं. परंतु सदन लोकप्रिय होऊन त्यापासून इच्छित हेतु सिद्धीस जाण्यास इतकेंच पुरेसें नाहीं. तसें होण्यास ख्रिस्तीधर्मप्रसारार्शी या सदनाचा संबंध आहे असा नुसता संशय घेण्यासही जागा रहातां कामा नये. हल्लीं तर ती झाली आहे. रमाबाईचा ख्रिस्तीधर्मावर पूर्ण विश्वास असल्यामुळें मुली आपण होऊन तिकडे वळूं लागल्यास त्यांस मागें परतविण्याचें त्यांस कठीण वाटावें हें साहाजिक आहे. परंतु याच्या पायीं हिंदु स्त्रियांची उन्नति करण्याचा जो आपला हेतु त्यास जबर धक्का बसूं देण्यासही त्या प्रवृत्त होतील असें आम्हांस वाटलें नव्हतें. रमाबाई अजूनही पोक्त विचार करून आपला मुख्य हेतु सिद्धीस नेण्यासाठीं आपला पूर्वक्रम स्वीकारतील तर त्यांचें सदन फिरूनही लोकप्रिय होईल असें आम्हांस वाटतें. परंतु रमाबाईस हें पटेल तेव्हां खरें ! ”

आगरकर अर्थात् कोरडी टीका करून थांबणारे नव्हते. प्रत्येक गोष्टीसंबंधीं विधायक विचार करण्याची त्यांना संवय असल्यामुळें हिंदु शारदासदन काढावें असें त्यांनीं सुचविलें. वरील लेखाच्या शेवटच्या भागांत ते म्हणतातः—

“ शारदासदनाचें झालेलें स्थित्यंतर नाहींसें होऊन त्यास पूर्वरूप प्राप्त झाल्यास तें सर्वांसच इष्ट आहे. परंतु त्याची वाट पहात बसण्यापेक्षां किंबहुना तें खात्रीनें घडवून आणण्यासाठीं हिंदु शारदासदनाची जी कल्पना हल्लीं निघाली आहे ती जागच्या जागींच जिरूं न देणें हें प्रत्येक हिंदूचें कर्तव्य आहे असें आम्हांस वाटतें. “ मी ख्रिस्ती नसतें तर मुळीं शारदासदनच अस्तित्वांत आलें नसतें ” हे रमाबाईचे उद्गार वास्तविक सर्व हिंदूंस झोंबण्यासारखे आहेत हें खरें, परंतु ते झोंबले असें नुसत्या शब्दांनीं सिद्ध होण्यासारखें नाहीं. तें होण्यास पुण्यास हिंदु शारदासदन स्थापलेलें लोकांस दिसलें पाहिजे. रमाबाईच्या सदनाची व्यवस्था पूर्वींप्रमाणें चालू झाली तरीही हें सदन अनवश्यक होईल असें नाहीं. फार तर काय, परंतु मोठाल्या शहरीं असें एकेक सदन स्थापतां आल्यास तेंही पाहिजे आहे. ही गोष्ट दूरची आहे, परंतु पुण्याकडून या बाबतींत उपक्रम झाल्यास त्याचें इतरत्र अनुकरण होणें दुरापास्त नाहीं. अमेरिकन लोकांनीं, कोणत्याही उद्देशानें असो, हिंदु विधवांसाठीं प्रतिवर्षीं हजारों रुपये खर्च करण्यास तयार व्हावें आणि आमच्या हातून त्यांच्याकरितां आजपर्यंत कांहींच

होऊं नये हें सर्व हिंदु लोकांस—मग ते सुधारक असोत वा जुन्या मताचे असोत—अत्यंत लांच्छनास्पद आहे. सुधारकांनीं स्त्रीसुधारणेच्या बाबतींत बोलण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं हा कित्येकांचा आक्षेप जरी आम्हांस मान्य नाहीं, तथापि त्यांच्या हातून या कामीं जितका स्वार्थत्याग व्हावयास पाहिजे त्याच्या एक शतांशही अद्याप झाला नाहीं असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होईल असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु जुन्या लोकांनीं मात्र या कामीं अगदीं हातपाय हलविले नाहींत; त्यांच्या हातून जर कांहीं झालें असेल तर सुधारणेस अडथळा आणण्याचें मात्र काम झालेलें आहे. आम्ही हें त्यांस चिडविण्याच्या बुद्धीनें म्हणत नाहीं व यांत त्यांचा दोष आहे असेंही आमच्यानें म्हणवत नाहीं; कारण त्यांच्या शिक्षणभेदामुळें त्यांस अशा गोष्टींचें आजपर्यंत मुळीं महत्वच दिसून येत नव्हतें. परंतु आम्ही अशी आशा करतों कीं आजपर्यंतच्या झालेल्या वाटाघाटीवरून अशा सदनाची आवश्यकता व त्यापासून होणारें हित हीं त्यांस पूर्णपणें दिसून आलीं आहेत. सर्वांकडून एकदिलानें व उत्साहानें खटपट झाल्यास ही गोष्ट अशक्य नाहीं, मात्र आम्हीं मी तूं करण्याचें सोडून दिलें पाहिजे. सुधारकांच्या कांहीं गोष्टी जुन्या लोकांस कबूल होणार नाहींत व जुन्या लोकांच्या कांहीं गोष्टी सुधारकांस कबूल होणार नाहींत. परंतु यावरून तडजोडीस मुळींच जागा नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. दोघेही दुजाभाव सोडून एके ठिकाणीं जमून सलोख्यानें विचार करूं लागल्यास दोघांसही मान्य असा मार्ग निघणें शक्य आहे. तात्पर्य जुन्यानव्यांच्या पुढाऱ्यांनीं एकत्र होऊन मनापासून खटपट केल्यास पुण्यास हिंदु शारदासदनाची स्थापना होणें अशक्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं."¶ आगरकरांची कल्पना पुढें थोड्या वर्षांनीं प्रो. कर्वे यांनीं अनाथबालिकाश्रम ही संस्था स्थापन करून प्रत्यक्ष सृष्टींत आणिली आणि रा. रा. गोपाळ कृष्ण देवधर यांच्या सेवासदनाच्या कार्याचीही स्फूर्ति आगरकरांच्या कल्पनेमुळें झाली असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. असो. शारदासदनाचा हिंदु सुधारकांच्या दृष्टीनें जरी असा शेवट झाला तरी आगरकरांना रमाबाईनें केलेल्या उद्योगाचें कौतुक वाटे यांत आश्चर्य नाहीं व एवढा मतभेद झाला होता तरीही त्या बाईसंबंधीं अपशब्द त्यांनीं केव्हांही वापरला

¶ सुधारक, ११–९–९३.

नाहीं हेंही त्यांच्या तत्वनिष्ठेस व शालीनतेस शोभण्यासारखें होतें. वर दिलेल्या उताऱ्यावरून त्यांचे विचार अगदीं स्पष्ट होतात. पण त्यांच्या द्वेषानें अंध झालेल्यांनीं असें असतांनाही आगरकर ख्रिस्तीधर्माच्या प्रसाराचे भोक्ते आहेत अशा कंड्या उठविल्या. त्यावर उत्तर देतांना आगरकर म्हणतात:*—

"ख्रिस्तीधर्माची आम्हांस खरोखरीच भक्ति असती तर त्या धर्माचा प्रसार आमच्या देशांत करण्याविषयीं आम्हीं डगलों नसतों. पण वास्तविक स्थिति तशी नाहीं हें आमच्या वाचकांस व इतरांस पक्कें ठाऊक असण्याचा संभव असून, त्यासंबंधानें आमच्याविषयीं लोकांचा गैरसमज व्हावा म्हणून येथील एका पत्रानें गेल्या आठवड्यांत जो गांवढळ प्रयत्न केला त्याचा गांवढळपणा ज्यांना चांगल्या रीतीनें समजून घ्यावयाचा असेल त्यांनीं त्या प्रत्रांत या लेखकाच्या हातचा म्हणून जो उतारा घेतला आहे, त्यांतील सर्व अव्ययांकडे नीट लक्ष देऊन तो वाचावा म्हणजे त्यांचें काम होणार आहे. रमाबाई ख्रिस्ती झाल्या हें ऐकून आम्हांस फार वाईट वाटलें; पुढें त्या इंग्लंडची व अमेरिकेची सफर करून येऊन शुद्ध व्यावहारिक शिक्षण देण्यासाठीं येथें शारदासदन स्थापण्यास प्रवृत्त झाल्या तेव्हां त्यांच्या निंदकाप्रमाणें आम्हींही त्यांचें गौरव केलें आणि त्या सदनांत धर्मांतर करविण्याची खटपट होत नाहीं असा विश्वास धरण्यास जोंपर्यंत आधार होता तोंपर्यंत त्या उत्कृष्ट संस्थेचा अभिमान वाहिला; पण तो आधार नाहींसा झाला असें नजरेस आल्याबरोबर त्याचा उघडपणें नाद सोडला—यांत कोठेंही यत्किंचित् वक्रता किंवा असंबद्धता ( असल्यास ) ती हवी त्यानें आम्हांस दाखविण्याची मेहरबानी करावी. ज्याला सत्याची थोडी बहुत चाड आहे तो ख्रिस्तीधर्म सर्वथैव त्याज्य आहे असें कदापि म्हणणार नाहीं; ज्याच्या अंगीं अणुमात्र भूतदया आहे तो आपल्या गतभर्तृका कन्या सदनांत पाठविण्यापेक्षां विहिरींत लोटणें बरें असें कधीं वदणार नाहीं; व ज्याच्या अंगीं केंसभर तरी संभावितपणा आहे तो पंडिता रमाबाईसारख्या स्त्रीच्या हातून उत्कट धर्मश्रद्धेमुळें एक वेळ दिलेल्या वचनापासून व्यभिचार झाल्यासारखा दिसला म्हणून "अनृतं साहसं माया" इत्यादि वाक्यांच्या अविचारी लेखकांनीं ओतलेल्या प्रचंड तोफा त्या अबलेवर चालू करून तिच्या आपण चिंधड्या उडविल्या अशा डुरकावण्या फोडण्यांत मोठीशी गोलंदाजी

* सुधारक, २५–९–९३.

किंवा शिलेदारी आहे असें कधींही मानणार नाहीं. तथापि या विलक्षण शहरांत असलेही चार दोन लोक सांपडण्यास पंचाईत पडावयाची नाहीं." या ठिकाणीं शारदासदन प्रकरणाची आपण रजा घेण्यास कांहीं हरकत नाहीं.

७. चहाप्रकरणांत टिळक नव्या पक्षाचे कसे झाले हें मागें आलेंच आहे व ते तसे झाले याचें कारण त्यांचा नव्या पक्षावरील असलेला प्रामाणिक विश्वास हें नसून ते स्वतः त्या प्रकरणांत अडकले म्हणून त्यांनीं स्वतःच्या वर्तनाची सशास्त्रता प्रतिपादन केली हा त्यांचे चरित्रकार रा. केळकर यांनीं काढलेला निष्कर्षही आमच्या वाचकांनीं पाहिला आहे. या प्रकरणांतील टिळकांचें वर्तन त्यांच्या चरित्रकारांनीं वर्णन केलें तसें असल्यास— आणि तसें तें होतें असें म्हणावें लागतें—त्यामुळें टिळकांच्या प्रामाणिकपणापेक्षां त्यांच्या गनिमी काव्याची साक्ष अधिक पटते असें म्हटल्याशिवाय सोय नाहीं. या गनिमी काव्याचा प्रयोग त्यांनीं होळकराच्या देणगी प्रकरणांत आगरकरां-वर केला होताच तो आतां आणखी करण्याची त्यांना संधि मिळाली व तो थोडाबहुत यशस्वी होण्यास या प्रसंगीं त्यांना रावसाहेब रानडे यांचें साहाय्य झालें. ता. १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकांत "वेळेवर सूचना" या अग्रलेखांत पुढील मजकूर आला:—"कांहीं दिवसांपूर्वी धर्मा-संबंधाचा कांहीं वाद वर्तमानपत्रांत चालला असतां, जुन्या लोकांस आम्हीं असें बजाविलें होतें कीं, रा. जिन्सीवाले किंवा रा. टिळक हे जुन्या लोकांचे खरे पुढारी नव्हत. संमतीच्या बिलासारखा एखादा वादग्रस्त प्रश्न निघाला असतां, त्यांच्या एकदेशीय विचारपद्धतीमुळें व आग्रही स्वभावामुळें ते क्षणभर देव-भोळे कर्मठ ब्राह्मण भासण्याचा संभव आहे; पण तेवढ्यावर हिंदु धर्माच्या साऱ्या कैवाऱ्यांनीं चकून जाऊन असल्या गृहस्थांस आपले खरे म्होरके म्हणून प्रेमानें कवटाळूं नये; मागें पुढें यांच्यापासून दगा होण्याचा संभव आहे...... (जिन्सीवाल्यांनीं) सुधारकांच्या गोटांतून साफ बाहेर पडण्यापूर्वी वैदिक धर्माभिमानी तरी आपणांस आपल्या गोटांत येऊं देतील किंवा नाहीं याचा पूर्णपणें विचार करून मग काय करणें असेल तें करावें; नाहींतर त्रिशंकूप्रमाणें स्वर्ग पृथ्वीच्या दरम्यान् किंवा प्रसिद्ध ऐतिहासिक द्रविडाप्रमाणें गडसाख-ळांच्या दरम्यान् (त्यांना) लडबडत रहावें लागणार आहे. रा. टिळकांसही आमचें तेंच सांगणें आहे. ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेस्मनच्या हातचा भात व बिसकुटें झोडून, श्रीशंकराचार्यांशीं

चर्दळ घालीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं." या सबंध अग्रलेखांत टिळकांना वडवाघुळ कोठेंही म्हटलें नाहीं. एवढें समर्पक विशेषण त्यांच्यासाठीं शोधून काढण्याचें अव्वल श्रेय त्यामुळें टिळकांच्या चरित्रकारांकडे जातें. असो. वर दिलेल्या वाक्यांतील खिस्त्याच्या हातचा चहा टिळक प्यालेले होते याबद्दल वादच नव्हता; कारण पुण्याच्या चहाग्रामण्यांतील ते एक नामांकित प्रतिवादी होते व खिस्त्याच्या हातच्या चहाला शास्त्र विरुद्ध नाहीं हें सिद्ध करून त्यांनीं रावसाहेब रानड्यासारख्या प्रचंड सुधारकालाही धीर दिला होता. पण मुसलमान किंवा पोर्तुगीज मेस्मनच्या हातचा भात बिकुसटें खाल्ल्याचा उल्लेख होतांच आपली अब्रू गेली असें टिळकांना वाटलें. टिळकांच्या अब्रूची जुन्या लोकांत वाढ चालली होती तिला थोडासा धक्का गोपाळराव जोशांच्या युक्तीमुळें बसला. त्यांतून ते कसे बसे निभावताहेत इतक्यांत चहाच्या आधणाबरोबर भात बिस्कुटांचें आलेलें गंडांतर पहातांच त्यांची त्या वेळीं नाजूक प्रकृतीची झालेली अब्रू जुन्या लोकांच्या दृष्टीनें अजीबात नाहींशी होण्याचा संभव होता हें उघड आहे. अर्थात् एवढ्या जिवाभावानें जुन्या लोकांत प्रतिष्ठा पावलेली अब्रू संकटांत आलेली पहातांच ती संकटांत आणणाऱ्या आगरकरांना कायद्याचा रट्टा देऊन ताळ्यावर आणण्याचें टिळकांनीं ठरविलें यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नव्हतें. ता. २२ च्या केसरींत टिळकांनीं हा आरोप खोटा असल्याचें जाहीर केलें व सुधारकानें तो परत घ्यावा असें सांगितलें. पण त्यावर ता. २८ च्या अंकांत सुधारकानें जें उत्तर दिलें त्यानें अर्थात् टिळकांचें समाधान झालें नाहीं. पुढें ता. ५ डिसेंबर १८९२ च्या सुधारकाच्या अंकांत पुढील मजकूर प्रसिद्ध झालाः—

## "बोलणें फोल झालें!"

"ता. १४ नवंबरच्या सुधारकांत रा. रा. टिळक यांजवर भात व बिस्कुटें झोडल्याचा आरोप केला असून २८ व्या तारखेच्या सुधारकांत रा. टिळकांच्या पत्रास उत्तर देतांना अप्रत्यक्ष घर्षणही केलें आहे; परंतु चमत्कार पहा! ज्या गृहस्थांच्या भरंवशावर आम्ही आंपल्या टांकास इतकें स्वेच्छाचारी होऊं दिलें, ते आतां आम्हांस असें सांगतात कीं, "आमचें बोलणेंच तुम्हांस नीट समजलें नाहीं. टिळकांनीं भात व बिस्कुटें झोडलीं असें आम्हीं म्हटलें नाहीं; तर भात व बिस्कुटें झोडणाऱ्या मित्रांच्या समागमें टिळक होते, एवढेंच काय तें

आम्हीं म्हटलें !" कोल्हापुरच्या खटल्याची अद्दल घडली असून नुसत्या तोंडी पुराव्यावर आम्ही इतके कसे विसंबलों, याजबद्दल आम्हांस मोठा विस्मय वाटतो, व ख्रिस्त्याच्या हातचा चहा घेणें व भात आणि बिस्कुटें खाणें यांत जरी आम्ही फारसें अंतर समजत नाहीं, तरी शेवटच्या दोन वस्तूंचा टिळकांनीं स्वीकार केला असें जें आम्ही म्हटलें आहे तें आनंदानें परत घेतों."

यांतील शेवटच्या वाक्यांतील पूर्वार्धावरून टिळकांनीं दिलेल्या फिर्यादीच्या धमकींत शहाणपणा फारसा नव्हता हें जसें स्पष्ट होतें त्याचप्रमाणें आगरकरांच्या या लिहिण्याला त्यांची माफी असें अगडबंब नांव देऊन ती मिळाल्याबद्दल टिळकांना किंवा त्यांच्या चरित्रलेखकांनाही टिऱ्या बडविण्याला फारसें कारण दिसत नाहीं. टिळकांनीं या बाबतींत खटला केला असता तर त्यांतून काय निष्पन्न झालें असतें हें आतां सांगतां येणें कठीण आहे. पण असा खटला केल्यानें टिळकांच्या कीर्तींत फारशी भर पडली नसती आणि खटल्याचा कसलाही निकाल झाला असता तरी त्यामुळें आगरकरांच्या कीर्तीला यत्किंचित्‌ही धोका नव्हता ही गोष्ट निश्चयानें सांगतां येते. आगरकर या खटल्याला भीत नव्हते व खटल्याला भिऊन त्यांनीं आपलें विधान परत घेतलें नाहीं या गोष्टी सिद्ध करण्याला सुदैवानें भरपूर पुरावा आहे. ख्रिस्त्याकडे चहा पिण्याला शास्त्रार्थ काढणारे टिळक आगगाडीच्या रस्त्यावर उपहारगृहांत भात बिस्कुटें खाण्यासाठीं शास्त्राधार काढण्याला असमर्थ झाले असते असें वाटत नाहीं व हा खटला कोर्टांत जाऊन त्यांच्या विरुद्ध निकाल झाला असता तर त्यांनीं हे नवे शास्त्रार्थ महाराष्ट्रीयांना समर्पण केले असते व त्यांच्या चरित्रकारांना आपल्या आराध्य दैवताच्या हिकमतबहादुरीचे पोवाडे गाण्याला आणखी संधि मिळाली असती. सुधारकांत उपरोक्त वाक्यें प्रसिद्ध झाल्यावर तें "बोलणें फोल झालें" हा मजकूर येईपर्यंत पडद्याआड बऱ्याच गोष्टी घडल्या होत्या त्या कळल्यावर या सबंध प्रकरणांत टिळकांचा पोरकटपणा आणि रावसाहेब रानड्यांचा अजागळपणा यांबद्दल खात्री होते; आणि आगरकरांच्या उज्वल चारित्र्यावर कोणत्याही प्रकारचा धक्का लागण्याचा संभव नाहीं हें पटतें. ती हकीकत आतां येथें देतों.

८. कै. रा. रा. सिताराम गणेश देवधर यांनीं टिळकचरित्र प्रसिद्ध झाल्यावर यासंबंधीं लेख लिहिले व ते रा. आंबेकर यांच्या टिळकजीवनरहस्य या पुस्तकाच्या शेवटीं दिलेले आहेत. या लेखांतील मजकूर किंचित् संक्षेप करून देव-

धरांच्या "माझा जीवनवृत्तांत" या आत्मचरित्रांतही प्रसिद्ध झालेला आहे. (पृष्ठ १३१) रा. देवधर लिहितातः—"वरील अवतरण रा. न. चिं. केळकर-कृत टिळकचरित्रांतून घेतलेलें आहे. यांत, स्वतः मोठ्या आढ्यतेनें इतरांस शिकविलेलें शहाणपण स्वतः आगरकरच पक्षांधतेमुळें विसरून गेले, व ज्यांच्या आधारावर त्यांनीं हें साहस केलें त्यांनीं ऐन प्रसंगीं दगा दिल्यामुळें फिरून शिक्षा भोगण्याचा दुर्धर प्रसंग टाळण्यासाठीं माफी मागण्याचा अपमानही सोसण्यास ते राजी झाले; तसेंच वरील अवतरणाच्या थोडेंसें पुढें "आरोप खोटा ही गोष्ट रानड्यांना खासगी चौकशींत कळून आली होती" असें अगदीं निराधार केलेलें विधान वगैरे ज्या गोष्टी रा. केळकरांनीं प्रतिपादिल्या आहेत त्यांपैकीं एकहि कशी खरी नाहीं, हें मी त्या वेळीं सुधारकाच्या संपादकांपैकीं एक असल्यामुळें मला इत्थंभूत माहीत आहे, म्हणून या माफीप्रकरणाची साद्यंत हकीगत जनतेपुढें मांडून रा. केळकरांच्या लेखामुळें आगरकरांच्या धवल कीर्तीवर उडणारा शिंतोडा पुसून टाकणें आपलें पवित्र कर्तव्य जाणून ती पुढें दिली आहे........टिळकांच्या विरुद्ध सुधारकांत आलेल्या ज्या ता. १४ नोवेंबर १८९२ च्या अंकाचा वर निर्देश केला आहे त्या अंकाच्या पुढच्या म्हणजे ता. २१ नोवेंबरच्या अंकाचीं प्रुफें तपासून मजकुराची मांडणी करण्याकरितां ता. २० रविवारीं रात्रीं छापखान्यांत जाऊन पहातों तों इतर प्रुफांबरोबर—

'मी मेस्मनच्या हातचा भात खाल्ल्याचें गेल्या सुधारकांतील विधान खोटें आहे. करितां तें परत तरी घ्यावें अथवा त्याच्या समर्थनार्थ तुमच्याजवळ असलेला पुरावा तरी प्रसिद्ध करावा; नाहीं तर बदनामी केल्याबद्दल तुमच्यावर कोर्टांत फिर्याद करणें भाग पडेल' अशा आशयाचें टिळकांचें धमकीवजा पत्र व त्याच्याच खालीं,

'आम्हीं सुधारकांत केलेलें विधान परतही घेत नाहीं, व तें ज्या पुराव्याच्या आधारावर केलेलें आहे, तो पुरावाही आम्ही प्रसिद्ध करीत नाहीं. तुम्हांस काय करणें असेल तें तुम्ही खुशाल करावें.'

अशा अर्थाचें, जशास तसें या न्यायानें आगरकरांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून त्या धमकीला साजेसें दिलेलें संपादकीय उत्तर, या दोहोंचेंही प्रूफ माझ्या नजरेस पडलें. टिळकांनीं आपलें पत्र परस्पर आगरकरांकडे पाठविलें असून त्यांनीं तें आपल्या संपादकीय उत्तराबरोबर परस्पर छापखान्यांत पाठ-

विलें असल्यामुळें, रात्रीं दहा वाजेतों मला त्याची वार्ताही कळली नव्हती. सदर उत्तरप्रत्युत्तराचें प्रूफ वाचल्याबरोबर, होतां होईतों हीं दोन्ही प्रसिद्ध न होतील तर बरें, असें माझ्या मनानें घेतलें. ज्या दोन देशभक्तांना निःस्वार्थबुद्धीनें लोकहितार्थ झगडत असतां, १०१ दिवस कारागृहवास भोगावा लागला, त्या दोघांनीं वादी प्रतिवादी होऊन कोर्टांत भांडणें भांडावीं, व हा देखावा पाहण्याची लोकांना पाळी येईंपर्यंत मजल जावी, व ही गोष्ट मला कशीशीच वाटली व साधल्यास तें टाळतां आलें तर पहावें, असें मनांत योजून, रात्रींच्या अकरा वाजतां मी कॉलेजांत जाऊन ( आगरकर हे फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांत त्या वेळीं रहात असत ) त्यांची गांठ घेतली, व त्यांना आपला मनोदय कळवून टिळकांनीं सुधारकास पाठविलेलें आपलें पत्रच परत घ्यावें अशाबद्दल मी प्रयत्न करून पहातों, व त्याचा निकाल लागेपर्यंत तरी तें पत्र व त्याला दिलेलें संपादकीय उत्तर हीं छापण्याचें तहकूब करण्याला त्यांनीं आपली संमति द्यावी अशी मी त्यांना विनंति केली. माझें बोलणें शांतपणें ऐकून घेऊन ते मला म्हणाले, "तुम्हीं या प्रश्नाकडे विकारवशतेच्या आकुंचित दृष्टीनें न पहातां व्यापक अशा दृष्टीनें पहाल, तर तुम्हीं करतां तसा या गोष्टीचा नसता बाऊ करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं, असें तुम्हांस दिसून येईल. अहो ! आगरकर काय अथवा टिळक काय, हे दोघेही कःपदार्थ होत. हा तंटा वास्तविक दोन व्यक्तींत आहे अशी तुम्ही आपली समजूत करून घेतां, हीच आधीं तुमची चूक आहे. खरें पहातां सुधारणाभिमुख व सुधारणाविमुख अशा दोन पक्षांतला हा तंटा आहे. सुधारणेचा गाडा पुढें ढकलतांना, त्याच्या मार्गांत माझ्या टिळकांमधील भांडणासारखे तुम्हांला अनिष्ट वाटतात असले खांच खळगे हे यावयाचेच. ते टाळूं म्हणून कसें चालणार?" यावर मी उत्तर केलें कीं, "तुमचें म्हणणें मला पटत नाहीं असें नाहीं. असल्या अनिष्ट गोष्टी अगदीं अपरिहार्यच असतील तर गोष्ट वेगळी; परंतु त्या टाळतां येण्याचा संभव असेल तर प्रयत्न करून पहाणें गैर आहे असें मला वाटत नाहीं. प्रयत्न फसलाच तर खांचखळग्यांतूनही सुधारणेचा गाडा पुढें ढकलण्यास माझी थोडीच ना आहे !" यावर आगरकर म्हणाले, "आपल्याला या कामीं यश येईल अशी तुमची समजूत दिसते, तिला मी तरी मोडा कशाला घालूं? मात्र या तुमच्या सद्हेतुप्रेरित प्रयत्नाचा परिणाम, आम्हीं सुधारकास पाठविलेलें पत्र मधल्या मध्येंच दाबून टाकल्याचा नसता ठपका सुधारकावर न

येवो म्हणजे मिळविली." असो, प्रयत्न करून तडजोड झाल्यास पहावें, हा माझा विचार जरी आगरकरांना सर्वस्वीं पटला नाहीं हें मी जाणून होतों, तरी 'पडल्या फळाची आज्ञा' या न्यायानें त्यांच्या त्या अर्धवट संमतीचा फायदा घेऊन, ता. २१ नोवेंबरचा सुधारकाचा अंक सदर उत्तरप्रत्युत्तराचा मजकूर न घालतां मी छापून काढला. परंतु याचें पर्यवसान आजचें मरण उद्यांवर ढकलण्यांतच शेवटीं कसें झालें, हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

"दुसरे दिवशीं म्हणजे सोमवारीं सकाळीं निजून उठल्याबरोबर मी टिळकांकडे जाऊन त्यांची गांठ घेतली व त्यांना म्हणालों कीं, "तुमचें पत्र व त्याला सुधारकाचें उत्तर हीं दोन्ही या पूर्वींच कंपोज होऊन राहिलीं आहेत. परंतु तीं सुधारकांत प्रसिद्ध न होतां, या प्रकरणाचा कांहीं तडजोडीनें निकाल लागल्यास पहावें, म्हणून तीं मी आजच्या अंकांत प्रसिद्ध होऊं न देतां, तुम्ही आपलें पत्र परत घेतां येईल तर पहा, अशी तुम्हांस विनंति करण्याकरितां आलों आहें." यावर टिळक म्हणाले, "अहो, तुमच्या सुधारकांतले माझ्यासंबंधाचें विधानच मुळीं खोटें आहे." त्यांना मध्येंच थांबवून मी म्हणालों—"सुधारकांतील मजकुराच्या खरेखोटेपणाबद्दल शहानिशा करण्याकरितां मी तुमच्याकडे आलों नाहीं. सुधारकाचा एक संपादक या नात्यानें त्यांत प्रसिद्ध झालेला मजकूर पूर्ण विचारपूर्वक प्रसिद्ध केला गेला आहे असेंच माझें मत असणार, व या बाबतींतही तें तसेंच आहे. आणि त्यासंबंधाची सर्व जबाबदारी आगरकरांबरोबर आपल्या शिरावर घेण्याला मी अगदीं तयार आहें. मी तुमच्याकडे आलों तो सुधारकाचा एक संपादक या नात्यानें आलों नाहीं. दहा वर्षांपूर्वीं वास्तविक तुमचा कांहींही दोष नसतां, तुमच्यावर व आगरकरांवर नाहक जो प्रसंग गुदरला होता, तो अजून ज्यांच्या स्मरणांतून गेलेला नाहीं, व ज्यांच्या मनांत तुम्हां उभयतांबद्दल सारखीच आदरबुद्धि वसत आहे, आणि म्हणूनच ज्यांना तुम्हीं दोघांनीं वादी प्रतिवादी बनून कोर्टांत आपला तंटा मांडावा हें कसेंसेंच वाटतें, अशांपैकीं एक या नात्यानें मी तुमच्याकडे आलों आहें." यावर टिळक म्हणाले, "माझें पत्र न छापतां माझ्यासंबंधानें सुधारकांत आलेलें विधान परत घेतलें जाईल असें कांहीं झालें तर पहा." मी म्हणालों, "माझ्यापेक्षांही तुम्ही आगरकरांना अधिक चांगलें जाणतां. तेव्हां सदर विधान परत घेण्यास ते कबूल होतील हें केवळ अशक्य कोटींतलें आहे हें मी तुम्हांस वेगळें सांगितलें पाहिजे असें

नाहीं." शेवटीं टिळकांनीं असें सुचविलें कीं, सदर विधान खरें नाहीं असें आम्ही केसरींत प्रसिद्ध करतों, पण सुधारकांत मात्र फिरून त्याच्या उलट मजकूर देतां उपयोगी नाहीं." मी म्हणालों, "कबूल, त्याची हमी मी घेतों." याप्रमाणें तडजोड ठरून दुसरे दिवशींच्या म्हणजे ता. २२ नोव्हेंबरच्या केसरींत "सुधारकांत आपण मेस्मनच्या हातचा भात खाल्ल्याचें विधान आलें आहे, तें अगदीं सत्याला सोडून आहे." अशा अर्थाचा मजकूर प्रसिद्ध झाला. परंतु आपण मनांत योजलें तसें झाल्याबद्दलचा माझा आनंद आगरकरांनीं आधींच केलेल्या भाकिताप्रमाणें शेवटीं अल्पजीवीच ठरला. कारण त्याच दिवशीं दुपारीं मला टिळकांनीं बोलावून सांगितलें कीं, "तुमच्या व माझ्यांत ठरलेली तडजोड आमच्या मंडळींना पसंत नाहीं. सुधारकांत केलें गेलेलें विधान खरें नसल्याचा उल्लेख सुधारकांतच आला पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे." मी म्हणालों, "ठीक आहे. माझ्याकडून झाली ती खटपट मी केली, एवढ्यांतच आतां मला समाधान मानून घेणें भाग आहे. सुधारकांतलें विधान परत घेतलें जाणें अशक्य असल्याचें मी तुम्हांस आधींच कळविलें आहे. तेव्हां तुमचें पत्र व त्याला सुधारकाचें उत्तर हीं पुढच्या सुधारकांत प्रसिद्ध करण्यावांचून गत्यंतर नाहीं हें ठरलेंच. आतां माझी शेवटची विनंति इतकीच कीं, तुमच्या पत्रावरची तारीख मागच्या आठवड्यांतली आहे ती चालू आठवड्यांतील घालण्यास मला परवानगी द्या म्हणजे झालें." ही माझी विनंति त्यांनीं मान्य केली व पुढच्या म्हणजे ता. २८ नोव्हेंबरच्या सुधारकांत मी एक आठवडाभर थांबवून धरलेलें टिळकांचें पत्र व त्याला दिलेलें संपादकीय उत्तर हीं प्रसिद्ध झालीं.

"मी या माफीप्रकरणांत कां व कशी मध्यस्ती केली, व ज्या गोष्टी उघडपणें करण्यास टिळक साहजिकच लाजले असते, परंतु त्यांचे कांहीं डाव साधण्यास ज्या गोष्टी केल्यावांचून त्यांना गत्यंतरच नसे, अशा गोष्टी बिनदिक्कत करण्यास क्षणभरही मागेंपुढें न पहाणारा असा जो भक्तांचा तांडा नेहमीं त्यांच्या भोंवतीं असे, व ज्या भक्तगणांच्या इच्छेविरुद्ध जाण्याचे त्यांना धैर्य न झाल्यामुळें आपल्या मनोदेवतेच्या सांगीविरुद्ध जाण्याचें त्यांच्या पुढच्या आयुष्यक्रमांत त्यांच्यावर अनेक वार प्रसंग आलेले आहेत, त्या मंडळीनें मोडता घातल्यामुळें टिळकांनीं सुचविलेली तडजोड शेवटीं व्यर्थ कशी ठरली, हें येथवर सांगितलें. आतां या माफी प्रकरणांत रानड्यांनीं मध्यस्ती कां केली या

हकीकतीकडे मी वळतों......श्रीशंकराचार्यांकडून सामाजिक सुधारणेच्या बाबतींत कांहीं साहाय्य मिळावें या हेतूनें रानड्यांनीं श्रीदरबारीं......खटपट चालविली (होती) त्या खटपटींत टिळकांसारख्या माणसाची आपल्याला मदत मिळेल तर ती रानड्यांना पाहिजेच होती, व गोपाळराव जोशांच्या अजब युक्तीनें टिळक....चहाग्रामण्यांत गोंवले गेल्यामुळें त्यांच्याकडून ती मिळण्याचा पुष्कळसा संभवही होता. खरें म्हटलें तर टिळकांसारखा धूर्त मनुष्य हा या प्रकरणांत सांपडावयाचाच नाहीं. पण शेरास सव्वा शेर भेटावा तसें होऊन गोपाळराव जोशांनीं टिळकांना चकविलें खरें....अशा प्रकारें अचानक रीतीनें श्रींच्या दरबारीं सुधारक पक्षाच्या वतीनें बोलणें चालणें करण्यास टिळकांसारखा वकील मिळण्याची आयती आलेली संधि न दवडतां साधल्यास तिचा उपयोग करून घ्यावा असें रानड्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. टिळकांनीं आपण ख्रिस्त्याच्या हातचा चहा घेतल्याचें कबूल केलें होतें, परंतु तसें करण्यास शास्त्राची मुभा आहे असें ते प्रतिपादित होते. बिस्किटें मात्र आपण खाल्लींच नाहींत असें त्यांचें म्हणणें होतें. अशा स्थितींत ख्रिस्ती अगर मुसलमान मेस्मनच्या हातचा भात त्यांनीं खाल्ल्याचें सुधारकांत प्रसिद्ध झालेलें विधान व त्यासंबंधाचें उत्तर प्रत्युत्तर हें रानड्यांनीं मनांत योजलेल्या धोरणास बाधक होतें. तेव्हां आपण योजीत आहोंत एक आणि होत आहे भलतेंच हें पाहून गोपाळराव गोखले व शिवरामपंत साठे या दोघांस बरोबर घेऊन ते लागलीच म्हणजे ता. २८ नोव्हेंबरचा सुधारकाचा अंक हातीं पडतांच आगरकरांकडे गेले व नाहीं होय करतां शेवटीं माधवरावांचा शब्द मोडवेना म्हणूनच केवळ नाइलाज होऊन आगरकरांनीं त्याच बैठकीस "बोलणें फोल झालें!" असा मथळा घालून टिळकांनीं मेस्मनच्या हातचा भात खाल्ल्याचें आपलें विधान परत घेतलें."

[रा. देवधर यांच्या ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या लेखांत पुढील आणखी मजकूर आहेः—आगरकरांनीं सदर विधान परत घ्यावें म्हणून रानड्यांनीं परोपरीनें त्यांना सांगून पाहिलें, परंतु आगरकर त्यास कबूल होईनात. ते म्हणाले, "मला अब्रू आहे कीं नाहीं? तुम्ही म्हणतां तसें मी केलें तर पुढें माझ्या शब्दावर लोकांचा विश्वास बसेल काय? तसें केल्यानें माझें नांव बद्दू झाल्यावांचून राहील काय? मी लिहिलेलें तें खोटें अशी का तुमची समजूत आहे?" रानडे म्हणाले, "तुमचें विधान खोटें आहे म्हणून तें परत घ्या असें माझें म्हणणें नाहीं. टिळकांसारखा व त्यांच्या परिस्थितींतला मनुष्य असल्या गोष्टींत

एखाद्या कर्मठ सोंवळ्या ब्राह्मणाप्रमाणें अगदीं अलिप्त राहूं शकेल हें मला संभवनीय वाटत नाहीं. परंतु त्यांच्यासंबंधानें वर्तमानपत्रांतून असलें विधान प्रसिद्ध होणें हें आम्ही मनांत योजिलेल्या हेतूंस विघातक आहे. एवढ्याकरितांच तुम्हीं तें परत घ्यावें असें माझें म्हणणें आहे. तुम्हीं तें परत घेतल्यानें लोकांचा तुमच्यावरचा विश्वास उडेल हें तुमचें म्हणणें मला मुळींच ग्राह्य वाटत नाहीं. सुधारकाचा संपादक हा अमूर्त व्यक्ति आहे. गोपाळ गणेश आगरकर ही मूर्त व्यक्ति आहे. तेव्हां सुधारकाच्या संपादकानें आपलें एखादें विधान परत घेतलें म्हणून तेवढ्यानें गोपाळ गणेश आगरकरांवरील लोकांचा विश्वास काडीभरही कमी होणें शक्य नाहीं.' पण हा कोटीक्रम आगरकरांना पटेना. तेव्हां आपलें निर्वाणीचें अस्त्र पुढें करून रानडे म्हणाले, "ठीक आहे. उद्यांपासून माझें कचेरींतील काम संपलें म्हणजे मीही खुशाल गाडींत बसून बंडावर हवा खाण्यास जात जाईन. सार्वजनिक हितवर्धनाच्या माझ्या साऱ्या उड्या तुमच्यासारख्या चार स्नेह्यांच्या बळावर. ते जर सार्वजनिक हिताला प्राधान्य देऊन अशा तडजोडीला कबूल नाहींत तर तें साधण्याचा हव्यास धरण्यांत तरी हंशील कोणतें ? तेव्हां उद्यांपासून सार्वजनिक कामांत पडण्याचेंच आपण सोडून द्यावें, झालें." रानड्यांच्या या निर्वाणीच्या अस्त्राचा आगरकरांच्या मनावर शेवटीं परिणाम होऊन ते म्हणाले, "सुधारक पत्र तुमचेंच आहे. तुम्हांला वाटेल तें तुम्ही त्यांत लिहा. माझी त्याला ना नाहीं." हें ऐकतांच शिवरामपंत साठे, तापल्या तव्यावरच भाकरी भाजून घेतलेली बरी असें मनांत आणून "तुम्ही याच बैठकीस काय लिहावयाचें तें लिहा" असें रानड्यांस म्हणाले. रानडे म्हणाले, "मी तें लिहिण्याची मुळींच जरूरी नाहीं. त्यांचे तेच तें करतील." शेवटीं त्याच बैठकीस "बोलणें फोल झालें" हा मथळा घालून आगरकरांनीं आपलें विधान परत घेतलें व न जाणो आगरकर मागाहून कदाचित् फिरतील या भीतीनें माफीच्या मजकुराचा कागद साठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला व तिघेही तेथून परत फिरले. वाटेत शिवरामपंत साठ्यांनीं माझी भेट घेतली व घडलेली सर्व हकीकत मला सांगून त्यांनीं तो माफीचा कागद माझ्या हवालीं केला.........]
येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं "आम्ही आपलें विधान परतही घेत नाहीं व ज्याच्या आधारावर तें केलें आहे तो पुरावाही आम्ही प्रसिद्ध करीत नाहीं; तुम्हांस काय करणें असेल तें तुम्ही खुशाल करावें" या आगरकरांच्या ता.

२८ नोवेंबरच्या सुधारकांत प्रसिद्ध झालेल्या प्रत्युत्तराची शाई वाळते न वाळते तोंच म्हणजे ता. २८ नोवेंबरच्या सकाळींच आगरकरांनीं 'बोलणें फोल झालें' या आपल्या माफीपत्राचा मसुदा लिहून तयार केला होता. यावरून पहातां आगरकरांनीं सुधारकांत केलेल्या विधानाच्या सत्यासत्यतेची शहानिशा करण्याचा मुळीं जर प्रसंगच आला नव्हता, इतकेंच नाहीं, तर तसें करण्यास आगरकरांस नुसता अवकाशही मिळालेला नव्हता ( तर ) आगरकरांनीं आपलें विधान परत घेतलें तें त्यांना त्यांच्या मित्रांनीं आयत्या वेळीं दगा दिल्यामुळें; ( किंवा ) आतां टिळक आपणांस तुरुंग दाखविणार, या भीतीनें नसून वर म्हटल्याप्रमाणें माधवरावांचा शब्द मोडवेना म्हणूनच केवळ नाइलाज म्हणून परत घेतलें हें निर्विवाद आहे. * "

९. वर दिलेल्या हकीकतीवरून आगरकरांनीं आपलें विधान परत कां घेतलें याचा उलगडा होतो व त्यांत आगरकरांना कमीपणा आणण्यासारखें कांहींही नाहीं. " आमच्या मंडळीच्या " भिडेसाठीं आगरकरांना तुरुंग दाखविण्याला सज्ज झालेले टिळक, व "आमच्या धोरणाचा" विजय होण्यासाठीं संपादक व व्यक्ति यांतील सूक्ष्म भेदाचा पत्ता लावून आगरकरांच्या कपाळीं माफीचा टिळा लावण्यासाठीं, सुधारक वाचतांच, आगरकरांकडे गोखल्यांना बरोबर घेऊन आगरकरांच्या घरीं धांवणारे रानडे, या दोघांचींही चित्रें या कथेमुळें विशेष सुंदर दिसतात असें मात्र वाटत नाहीं. शंकराचार्यांच्या मार्फत सामाजिक सुधारणा होईल ही आशा व त्या आशेला टिळकांच्या साहाय्यामुळें हुरूप चढेल ही कल्पना रावसाहेब रानड्यांच्या मुत्सद्देगिरीला फारशी भूषणावह आहेत असें म्हणवत नाहीं. रानडे हे या वेळीं पुण्यांतील शेपूट कापलेल्या कोल्ह्यांचे म्होरके बनले होते व टिळकांचीही शेपूट कापली होती म्हणून ते त्या वेळेपुरते रानड्यांच्या गोटांत शिरले. रानड्यांची योग्यता लक्षांत घेऊन व आपल्या माणसाची आपण फार शोभा करूं नये या बुद्धीनें आगरकरांनीं चहा-प्रकरणांत रानड्यांबद्दल आपली लेखणी अत्यंत नेमस्त ठेविली होती. तत्वापेक्षां व्यक्तीला महत्व देण्याची चूक जरी या बाबतींत आगरकरांनीं केली नाहीं तरी रानडे या व्यक्तीला या वेळेला तिच्या मोठेपणामुळें आगरकरांनीं वाजवीपेक्षां अधिक महत्व दिलें यांत आगरकरांच्या अंतःकरणाचा मोठेपणा दिसून

* माझा जीवनवृत्तांत, पृष्ठ १३०–१३८

येतो. परंतु याचें प्रायश्चित्त त्यांना मिळालें. तें त्यांना मिळालें यांतही टिळक आणि रानडे यांचीच कींव करावीशी वाटते. पण "रानड्यांचा शब्द मोडवेना" ही मनःस्थिति दूषणीय होती असें स्पष्टपणें म्हटलें पाहिजे. 'एको हि दोषो गुणसंनिपाते' या न्यायानें ही सर्व हकीकत आगरकरांच्या चरित्राला अधिक रमणीयता आणते, पण तिच्यामुळें पराचा कावळा करण्याची संधि आगरकरांच्या शत्रूंना मिळाली व ही संधि देण्याला रानड्यांचा बावळटपणा किंवा मुत्सद्दीपणा कारणीभूत झाला हें स्पष्टपणें सांगितल्याशिवाय चालणार नाहीं.

आपल्या बुद्धिबळाच्या डावांत आपला विजय व्हावा म्हणून रानड्यांनीं आगरकरांचा प्याद्यासारखा उपयोग करून घेतला ही गोष्ट, आपल्या भक्तगणांचा आग्रह मोडवेना म्हणून टिळकांनीं देवधरांशीं केलेली तडजोड मोडली, या गोष्टीइतकीच तिरस्करणीय होती. कचाट्यांत सांपडल्यामुळें टिळक प्रायश्चित्तवाल्यांचें मंडण करूं लागले तेव्हां ते आतां आपल्या कच्छपीं लागले अशी कल्पना रावसाहेब रानड्यांनीं करून घ्यावी ही गोष्ट त्यांच्या मुत्सद्देगिरीला फारशी भूषणावह नाहीं; आणि त्या टिळकांना खूष करण्यासाठीं रानड्यांनीं आगरकरांकडे जाऊन दुसरा उपाय चालेना तेव्हां आतां मी सार्वजनिक कामांतून अंग काढून घेतों अशी धमकी द्यावी या प्रकाराला काय म्हणावें हेंच समजत नाहीं. रानडे सार्वजनिक कामांत पडले ते कोणावर उपकार करण्यासाठीं पडले नव्हते. प्रतिपादिलेलीं तत्वें झुगारून दुसऱ्या विवाहाच्या वेळीं बारा वर्षांच्या पोरीचें पाणिग्रहण करतांना रानड्यांचा हात जसा कोणाला धरतां आला नाहीं, त्याचप्रमाणें गाडींत बसून बंडांत हवा खाण्याचें त्यांनीं ठरविलें असतें तर त्यांची गाडी कोणीही अडवीत नव्हता. पण रानड्यांनीं आपल्या वजनाचा अत्यंत गर्हणीय असा दुरुपयोग करून यावेळीं टिळकांची बाजू राखण्यासाठीं आगरकरांना तोफेच्या तोंडीं देण्याचें ठरविलें. आगरकर तुरुंगांत जाण्यास भितील ही गोष्ट शक्यच नव्हती व खुद्द टिळकांच्याही डोक्यांत ती कल्पना आली नसती. या कल्पनेला तोंड फोडणाऱ्यांचें तोंड ओंगळ दिसतें एवढेंच यासंबंधीं म्हटलें म्हणजे बस्स होईल. रानड्यांनीं या प्रकरणांत "बीचमें मेरा चांदभाई" असला आचरटपणा केला नसता तर महाराष्ट्राच्या इतिहासांत एका अपूर्व खटल्याची भर पडली असती; परंतु मग रानड्यांचें "धोरण" यशस्वी झालें नसतें. १८९३ सालीं टिळक आपण काबीज केले असें समजण्याइतके रानडे हुरळले होते; त्यांची पुढें

दोन वर्षांनीं सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरविण्याच्या बाबतींत त्याच टिळकांनीं कशी रेवडी उडविली व त्या वेळींसुद्धां रावबहादुरांनीं आपलें "धोरण" साधण्याकरितां मुत्सद्देगिरीनें मागचा पाय घेऊन सुधारकांना आणखी एकदां दगा कसा दिला या गोष्टी आगरकरांच्या चरित्रांत येत नाहींत. परंतु त्यांवरून रानड्यांच्या चपळ मेंदूला टिळकांची पारख बरोबर झाली नव्हती एवढें कबूल करणें भाग आहे. सुधारणेच्या बाबतींत क्रियेचा कसलाही प्रसंग आला तरी रावबहादुर स्वतः खालीं पडतच पण आपल्याबरोबर आणखी बऱ्याच मंडळींनाही ते खालीं पाडीत असें म्हणणें दुर्दैवानें प्राप्त आहे; व त्याचेंच निदर्शन या आगरकरांच्या माफीप्रकरणांत दिसून येतें. आगरकरांचें चरित्रच एवढें उज्वल होतें कीं रानड्यांचा हा "धोरणीपणा" त्यांना फारसा बाधला नाहीं व वरील हकीकत वाचल्यानंतर त्यांच्या या बाबतींतील वर्तनाबद्दल त्यांना कोणी दोष देईल असें वाटत नाहीं.

१०. आगरकरांना अब्रूच्या बाबतींत अतिशय नाजूक झालेल्या टिळकांच्या प्रकृतीचा या सुमारास हा एकच अनुभव आला असें नाहीं. दर आठवड्याला आजूबाजूच्या प्रत्येक मोठ्या माणसाला शिव्या देत सुटलेल्या टिळकांना आपल्याबद्दल कोणी ब्र काढल्यास खपत नसे; किंबहुना आपल्याबद्दल चांगल्या गोष्टी कोणी लिहिल्या व जर त्यामुळें त्यांच्या गणाची मर्जी त्यांच्यावर यत्किंचितही खप्पा होण्याचा संभव असेल तरी त्या लिहिणाऱ्याच्या म्हणण्याचा सोय होईल तसा विपर्यास करून त्याच्यावर तुटून पडल्याशिवाय ते रहात नसत. याचा थोडासा मनोरंजक दाखला पुढील हकीकतींत मिळण्यासारखा आहे. ता. १२ जून १८९३ च्या सुधारकांत पुढील संपादकीय मजकूर प्रसिद्ध झालाः—

## अनुकरणीय विवाह

" रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांची कन्या कृष्णाबाई व रा. रा. गंगाधर नरसिंह केतकर यांचे चिरंजीव विश्वनाथराव यांचा गेल्या गुरुवारीं विवाह झाला हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. या विवाहाचा विशेष निर्देश करण्याचें कारण या विवाहांतील वधूचें वय प्रौढ हें होय. आतां १६ वर्षांपर्यंत आम्हीं आपल्या कन्येचा विवाह करणार नाहीं अशा दुसऱ्या लोकांपासून सह्या मागणारे रा. टिळक यांनीं आपल्या कन्येचा त्या वयापूर्वी विवाह करावा,

व सर्व विवाह एकदम न करतां त्यापैकीं कांहीं भाग दिवसगतीवर टाकण्याचा नवीन प्रघात आपण पाडणार म्हणून उगाच वाच्यता करून शेवटीं ती जागच्या जागींच जिरावी ह्या गोष्टी आमचे बंधू केसरीकार यांस कदाचित् पसंत न पडोत व ते त्यांस त्यांच्या मानसिक धैर्याभावाबद्दल वाटेल तितकीं बरीं वाईट दूषणें देवोत; परंतु अशा गोष्टी सर्वथा एकाच व्यक्तीच्या हातीं नसतात. त्यांचा इतरांशीं पुष्कळ संबंध पोंचत असतो हें आम्हीं पूर्णपणें जाणून आहों. म्हणून रा. टिळकांनीं हर प्रयत्न करून निदान चौदावें वर्ष लागेपर्यंत तरी आपली कन्या अविवाहित ठेविली, याबद्दल आम्ही त्यांचें मनापासून अभिनंदन करतों व इतरांनींही यथाशक्ति यांचें अनुकरण करण्याची मनापासून इच्छा धरावी अशी सर्वांस शिफारस करतों. असो. सरते शेवटीं या नूतन दंपत्यास "दीर्घायुरस्तु, धनधान्यसमृद्धिरस्तु, इष्टकार्यसिद्धिरस्तु" असा आशीर्वाद देऊन आम्ही हा छोटा अभिनंदन लेख संपवितों."

या लहानशा लेखांत वाकडा शब्द आहे असें वाटणाऱ्याची दृष्टि विशेष वांकडी असली पाहिजे हें उघड आहे. टिळकांना जो थोडासा टोला दिला आहे तो इतक्या निर्दंश विनोदाच्या रूपांत आहे कीं त्यामुळें त्यांचें डोकें वास्तविक आनंदित व्हावें. पण या लेखांतही टिळकांना वस्तुविपर्यास दिसला व त्याप्रमाणें त्यांनीं लागलीच दुसरे दिवशीं केसरींत पुष्कळ अकांड तांडव केलें. त्याला आगरकरांनीं ता. १९ जूनच्या अंकांत उत्तर दिलें तें वाचलें म्हणजे सर्व प्रकार लक्षांत येऊन टिळकांच्या चिडखोरपणाचें मोठें नवल वाटल्यावांचून रहात नाहीं. स्वतःवर टीका होण्याच्या बाबतींत टिळकांची प्रकृति अत्यंत नाजूक होती हा अनुभव त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षांत पुष्कळांना आला. टिळकांनीं दुसऱ्यांना दिलेल्या शिव्या मिटक्या मारून वाचणारे त्यांचे भगतसुद्धां टिळकांवर कोणी कोरडे ओढले म्हणजे पिसाळलेल्या कुत्र्यांप्रमाणें वेडेचार करीत हें तर सुप्रसिद्ध होतें. टिळकांना व आपल्याला मात्र वाटेल त्याला वाटेल ती शिवी देण्याचा, वाटेल त्याबद्दल विपर्यास करण्याचा, वाटेल त्याच्यावर भयंकर आरोप करण्याचा, अधिकार आहे; पण टिळकांचें खरें उणेंसुद्धां कोणी अत्यंत सौम्य भाषेंतही काढतां उपयोगी नाहीं अशी या भगतमंडळीची व खुद्द टिळकांचीही अपेक्षा असे. टीकेबद्दल चिरडीस येण्याचा हा दुर्गुण टिळकांच्या आंगीं फार पहिल्यापासून होता असें प्रस्तुतच्या उदाहरणावरून सिद्ध होतें. विनोदाची सुंदर देणगी ब्रह्मदेवानें

टिळकांच्या भालप्रदेशावर लिहिली नव्हती. ती असती तर त्यांची ‘ कातडी ’ टीकेच्या बाबतींत येवढी नाजूक झाली नसती. विशेषें करून रोज उठून दुसऱ्याची नालस्ती करण्याचें व्रत ज्यांनीं बहुतेक आजन्म पाळलें व ज्याबद्दल विशिष्ट प्रकारच्या मंडळींत त्यांना मोठी मान्यता मिळाली, त्यांची ‘ कातडी ’ एवढी नाजूक होती हें मोठें आश्चर्य आहे. पण ती तशी होती याबद्दल शंका वाटत नाहीं. असो. केसरींत जेव्हां वरील लहानशा लेखाबद्दल चिरडीचें उत्तर आलें व त्या उत्तरांत सुधारकावर वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याचा आरोप आला त्यावर सुधारकांत आगरकरांनीं लिहिलेलें उत्तर पुढीलप्रमाणें आहे:—

## वस्तुस्थितीचा विपर्यास कोण करतो हें वाचकांनींच ठरवावें !

“ गेल्या खेपेस रा. टिळकांच्या कन्येच्या विवाहाचें अभिनंदन करतांना केसरीकारांचा आम्ही जो उल्लेख केला होता, त्यास उत्तर देण्याच्या भानगडींत बहुधा ते पडणार नाहींत अशी आमची अटकळ होती ! परंतु ती अटकळ चुकीची ठरून आमच्या बंधूंनीं, आमच्या आवडत्या विषयांकडे वळण्याची फिरून आम्हांस संधि दिली, याबद्दल आम्हीं त्यांचे आभार मानितों. आमचे बंधु म्हणतात त्याप्रमाणें ‘ वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याची खुबी ’ आम्हांस साधली नाहीं; इतकेंच नाहीं, पण ती साधावी अशीही आमची इच्छा नाहीं. बाकी कोणास ती शिकावयाची असल्यास त्यास आमच्या बंधूहून अधिक चांगला दुसरा वस्ताद मिळेल असें आम्हांस वाटत नाहीं. प्रो. कर्वे यांच्या विवाहानंतर होऊं घातलेल्या जंगी मेजवानीसंबंधानें नुकताच जो वादविवाद झाला त्यांत त्यांनीं ( केसरीकारांनीं ) ही खुबी कशी दाखविली होती हें वाचकांच्या लक्षांत असेलच. प्रस्तुत वादविषयक लेखांत तर त्यांनीं त्याच्यावरही ताण केली आहे ! आमचे बंधु आम्हांस विचारतात कीं “ १६ वर्षांपर्यंत ( कन्येचा ) विवाह करणार नाहीं अशा तऱ्हेच्या सह्या रा. टिळकांनीं कधीं केल्या होत्या हें सुधारककार निश्चयानें सांगतील तर बरें होईल.” पण जें विधान आम्ही मुळीं केलेंच नाहीं त्याचें समर्थन आम्ही कसें करावें हें आम्हांस समजत नाहीं ! अशा सह्या रा. टिळकांनीं केल्या होत्या असें आम्ही कधींही म्हटलें नाहीं; दुसऱ्या लोकांपासून ते अशा सह्या मागत होते इतकेंच काय तें गेल्या अंकांत म्हटलेलें आहे. वस्तुस्थितीचा असा विपर्यास करण्यास आमच्या बंधूचा काय उद्देश होता न कळे ! आतां आम्ही लिहिल्याप्रमाणें

रा. टिळकांनीं अशा सह्या कधीं मागितल्या होत्या हें जर आमच्या बंधूस निश्चयानें जाणून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनीं ता. २७ आक्टोबर १८९० चा ज्ञानप्रकाश पहावा; म्हणजे रा. टिळकांच्या सहीनिशीं प्रसिद्ध झालेलें जें विनंतिपत्र त्यांत उतरून घेतलें आहे त्यामध्यें पुढील मजकूर त्यांच्या वाचनांत येईल:—

"माझ्या मतें ज्या सुधारणा होणें अवश्य आहेत त्या खालीं नमूद केल्या आहेत. ( १ ) मुलीचें लग्न सोळा वर्षांच्या आंत करूं नये. ( २ ) वीस वर्षांच्या आंत मुलांचें लग्न करूं नये. ( ३ ) पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये. (४) चाळीस वर्षांपुढें लग्न करणें झाल्यास विधवेशीं विवाह करावा. ( ५ ) दारू पिणें बंद असावें. (६) हुंडा घेण्याची चाल अजिबात बंद करावी. ( ७ ) प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामांकडे द्यावा ( या मंडळाच्या कामीं ). ( ८ ) विधवेचें वपन करूं नये. सदर सुधारणा अमलांत आणल्या असत जातीबाहेर टाकण्याची भीति बाळगण्याचें बिलकुल कारण नाहीं."

सदर विनंतिपत्रांत सुचविलेल्या सुधारणा अमलांत आणण्याच्या हेतूनें पुढें ता. १ नोवेंबर १८९० रोजीं रा. टिळक व रावबहादुर भिडे या दोघांच्या आमंत्रणावरून जोशी हॉलमध्यें जी सभा भरविण्यांत आली होती, त्या वेळीं 'आपल्या विनंतिपत्रांत दाखल केलेली कन्याविवाहाची मर्यादा एक दोन वर्षांनीं कमी करण्यास आपली कांहीं हरकत नाहीं' अशा आशयाचे उद्गार रा. टिळकांनीं काढले होते हें आम्हांस माहीत आहे. परंतु त्यापूर्वीं आपल्या सोळा वर्षांच्या सूचनेस सह्या मिळ( वि ? )ण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें हेंही आम्हांस पाहिजे तर सिद्ध करून देतां येईल. यावरून सोळा वर्षांपर्यंत आम्ही आपल्या कन्येचा विवाह करणार नाहीं अशा दुसऱ्या लोकांपासून रा. टिळक सह्या मागत होते, हें आमचें विधान वस्तुस्थितीस धरून होतें किंवा त्यांत वस्तुस्थितीचा विपर्यास केला होता हें वाचकांनींच ठरवावें. आतां बाराचे चौदा केल्याचा जो आमच्यावर आरोप केला आहे, तो जरी अंशतः खरा आहे हें कबूल केलें पाहिजे तथापि त्यांतही केसरीकारांनीं वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याची आपली खुबी दाखविण्याची संधि गमाविली नाहीं. वस्तुस्थिति म्हटली तर वधूस १४ वें वर्ष लागण्यास अद्याप कांहीं महिने अवधि आहे व एवढ्यावरून केसरीकारांस फार तर १३ चे १४ केल्याचा आरोप आम्हांवर आणतां येईल. परंतु एवढ्यानें केसरीकारांची तृप्ति व्हावी कशी ?

तेव्हां त्यांनीं वकिली लढविली कीं तेरावें वर्ष लागून कितीही महिने झाले असले तरी तथापि पूर्ण वर्ष संख्या जर बाराच आहे तर म्हणाना बाराचे चौदा! असो. असल्या शब्दच्छलापासून वाचकांस काडीचाही फायदा होण्याचा संभव नाहीं हें आम्हांस माहीत आहे; परंतु जाणून बुजून वस्तुस्थितीचा विपर्यास केल्याचा जबरदस्त आरोप आमच्यावर केला गेला असल्यामुळें स्वसंरक्षणार्थ वरील मजकूर लिहिणें जरूर पडलें. तथापि कर्ते सुधारक म्हणून नेहमीं घमेंड मारणारांनीं १४ व्या वर्षापर्यंत आपल्या कन्येचा विवाह न करण्याची सही दिली असूनही १३ व्या वर्षींच तो उरकून घेतला ही जी कबुली या वादांतून बाहेर पडली, तीच काय थोड्या महत्त्वाची आहे ?"

या उत्तरानें टिळक वास्तविक चारी पुठ्यावर चीत झाले व त्यांचीं दोन चार वर्षांपूर्वींचीं सुधारकी मतें बाहेर पडल्यामुळें आणि तीं तशीं नव्हतीं असें म्हणणें शक्य नसल्यामुळें टिळकांच्या गणांत हलकल्लोळ झाला. अंगीं उत्तर देण्याची ताकत नाहीं तेव्हां उत्तरादाखल केसरीकर्त्यांनीं "रा. टिळकासंबंधीं हवीं तशीं खरीं खोटीं विधानें करण्याचा त्यांचे पूर्वाश्रमींचे बंधु गोपाळराव आगरकर यांनीं मक्ताच घेतला आहे" असे लब्धप्रतिष्ठितपणानें हुंदके देण्याला सुरवात केली. बाजू अंगावर आली तरी माझी मिशी वर असें म्हणणें यांत वीर-वृत्ति आहे व भगवान् श्रीकृष्णाच्या धोरणाचें रहस्य सांठविलें आहे असें समजणारे कांहीं अर्धवट लोक या भडभडून आलेल्या हुंदक्यामुळें त्या वेळीं फसले नसतील असें नाहीं. पण मेसमनच्या हातचा भात खाल्ला या विधानाबद्दल आगरकरांना कोर्टांत खेचूं पाहणारे कायदेबाज टिळक "खरीं खोटीं" विधानें ऐकून स्वस्थ बसले असते याच्यावर कोणाचाही विश्वास बसणें शक्य नाहीं. आगरकरांनीं या वेळीं नुसतीं विधानें केलीं नव्हतीं तर ज्यांवर तीं अवलंबून होतीं तो पुरावाही जगजाहीर केला. "विधवेचें वपन करूं नये," "सोळा वर्षांपूर्वीं मुलीचें लग्न करूं नये," "पुरुषानें चाळीस वर्षांनंतर विवाह करणेंच असल्यास तो विधवेशीं करावा," असलीं नास्तिक मतें आपल्या आराध्यदेवतेनें तीन वर्षांपूर्वींच प्रतिपादिलीं होतीं हें पुराव्यानिशीं बाहेर आलेलें पाहून त्यांच्या भक्तमंडळांत आकांत झाला असेल, त्यांना कृष्णाचे अवतार समजून त्यांच्यावर काव्य लिहावयास बसलेल्या, अल्प स्वल्प कविताशक्ति असलेल्या पण अक्कल नसलेल्या कवींची आचरट लेखणी जिथल्या तेथें थबकून राहिली असेल, त्यांच्या साहाय्यानें सुधारकीचें संकट हाणून पाडण्याबद्दल मनोराज्य

करीत असलेल्या जुन्या भटाभिक्षुकांची दांतखिळी बसली असेल, व या सर्व मोठमोठ्या मंडळींत आतां आपली "अब्रू" राहील कशी या विवंचनेनें बिचारे अब्रूदार टिळक हवालदील झाले असतील यांत कांहीं नवल नाहीं. पण करतां काय? गोपाळराव जोशांच्या खोड्यांत पाय अडकून त्या वात्रट मनुष्याच्या युक्तिबाजीपुढें यांची युक्तिबाजी हिणकस ठरल्यामुळें टिळक जसे एकदां गोत्यांत आले होते तसाच पण त्याहून जबरदस्त प्रसंग त्यांच्यावर ओढवला! आणि त्याला उत्तर देण्याची तर शक्यता नाहीं. तेव्हां खरनखरयुक्त केसरी धाड धाड रडूं लागला व आगरकरांना शिव्याशाप देऊं लागला व आपल्या अश्रूंच्या प्रवाहांत आपलें पूर्व चरित्र आपल्या भक्तांनीं विसरावें व आपल्या बेंबीच्या देठापासून निघणाऱ्या हुंदक्याला फसून लोकांनीं आपण अगदीं परटानें भट्टीला घालून आणलेल्या कपड्याप्रमाणें जुन्या मतांच्या बाबतींत शुभ्र आहोंत असा सर्वत्र समज व्हावा यासाठीं त्यानें वरीलसारखा 'खरीं खोटीं विधानें' करण्याचा आरोप आपल्या पूर्वाश्रमींच्या बंधूवर केला. या हुंदक्यामुळें कोणी फसले असतील असें दिसत नाहीं. पण या हुंदक्यांचें खरें स्वरूप सुधारकानें लागलेंच बाहेर काढलें. ता. २६ जून १८९३ च्या सुधारकांत पुढील लेख प्रसिद्ध झाला:—

## ही जुक्ति आतां शिळी झाली!

"डोंगरीच्या तुरुंगांत ज्यांनीं १०१ दिवस कंठिले, त्यांची हल्लीं झालेली फारखत होण्यास काय कारणें झालीं, याची ज्यांस इत्थंभूत माहिती नाहीं असे लोक, 'रा. टिळकांसंबंधानें हवीं तशीं खरीं खोटीं विधानें करण्याचा त्यांचे पूर्वाश्रमीचे बंधु गोपाळराव आगरकर यांनीं मक्ताच घेतला आहे' ही केसरीकारांची उक्ति ऐकून कदाचित् प्रथम फसले जाण्याचा संभव होता; परंतु हळु हळु या मक्त्यांत आगरकरांस वांटेकरी मिळत आहेत हें पाहून तो त्यांचा गैरसमज बहुधा नाहींसा झाल्यावांचून रहाणार नाहीं असा आमचा समज आहे. तेव्हां आपल्या पक्षास जोर आणण्याकरितां आमच्या बंधूंनीं ही जी शक्कल लढविण्याचा आज बरेच दिवस क्रम चालविला आहे तो आतां सोडून देऊन दुसरी कांहीं तरी 'जुक्ति' शोधण्याच्या खटपटीस लागावें अशी आमची त्यांस शिफारस आहे. असा हा वाद उपस्थित करण्यांत

# आमचा हेतु काय होता ?

हें केसरीकारांप्रमाणें गुपित ठेवून वाचकांची तर्कशक्ति शिणविण्याची आम्हांस आवश्यकता नसल्यामुळें तो आम्हीं स्पष्ट सांगून टाकतों; तो हाच कीं, बोलके सुधारक, बोलके सुधारक म्हणून दुसऱ्यांची निंदा करून कर्तृत्वाची घमेंडी मारणारे रा. टिळक हे बोलक्या सुधारकवर्गाच्या बाहेर जात नाहींत व 'बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें' या कोटींत यांची गणना होण्यासारखें यांचें वर्तन नाहीं, या गोष्टीची प्रसंगोपात्त त्यांस ओळख करून द्यावी. यावरून रा. टिळक हे सुधारणेबद्दल कांहीं करीत नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं. त्यांनीं १३ व्या वर्षापर्यंत आपली कन्या अविवाहित ठेविली हेंही कांहीं आजच्या स्थितीस कमी महत्त्वाचें नाहीं असें स्पष्ट सांगून त्याबद्दल आम्ही त्यांचें मनापासून अभिनंदन केलें होतें व त्यांचें अनुकरण करण्यासही इतरांस शिफारस केली होती. परंतु रा. टिळकांप्रमाणें सुधारक वर्गांतील इतर लोकही यथाशक्ति सुधारणेस हातभार लावीत असून, केवळ ते जितकें बोलतात तितकें त्यांच्या हातून होत नाहीं, एवढ्याच मुद्यावर जर त्यांची निव्वळ बोलक्या सुधारकांत गणना करावयाची तर रा. टिळकांचीही त्याच वर्गांत गणना केली पाहिजे, इतकेंच प्रतिपादन करण्याचा आमचा हेतु होता. दुसऱ्यांना केवळ बोलके ठरवून कर्तृत्वाचा साराच मक्ता आपल्याकडे घेण्याचा त्यांनीं जर कधीं प्रयत्न केला नसता तर अभिनंदनलेखांत मुद्दाम होऊन प्रस्तुत वादविवादविषयक गोष्टीचा आम्ही मुळींच उल्लेख केला नसता. आतां कित्येकांस असें वाटतें कीं, व्यक्तिविषयक प्रश्नांची चर्चा वर्तमानपत्रांतून होऊं नये; परंतु आम्हांस तसें वाटत नाहीं; व खुद्द केसरीकारांसही तसें वाटत नसलें पाहिजे. जे कोणी सार्वजनिक कामांत पुढाकार घेऊं इच्छितील त्यांच्या वर्तनावर टीका होणें हें अपरिहार्य आहे. वे. शा. नारायणशास्त्री गोडबोले व कृष्णशास्त्री राजवाडे वगैरे गृहस्थांची शालजोडी ज्या मुद्यावर वर्तमानपत्रांत येणें रास्त आहे, त्याच मुद्यावर रा. टिळकांच्या कन्येचें वय विवाहकालीं १३ वर्षांचें होतें किंवा १६ वर्षांचें होतें याचाही ऊहापोह करण्यास हरकत आहे असें आम्हांस वाटत नाहीं; व पहिली गोष्ट जर "उदात्त विद्येस, सुशिक्षित वर्गास, सभ्य रीतीस व पत्राच्या इभ्रतीस बट्टा आणणारी" नाहीं तर दुसरीच तेवढी कां असावी हें आम्हांस समजत नाहीं ! यावर असा एक आक्षेप

येण्यासारखा आहे कीं प्रसंगविशेषीं व्यक्तिविषयक लेख लिहिणें अवश्य असलें म्हणून वाटतील, तशा

## ढळढळीत खोट्या गोष्टी लिहाव्या कीं काय ?

याचें उत्तर अर्थात् कोणीं झालें तरी त्या कधींही लिहूं नयेत असेंच देईल; व ढळढळीत खोट्या गोष्टी लिहिल्याचा आम्हांवर कोणास आरोप आणतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. आतां आम्हीं म्हणजे कांहीं सर्वज्ञ नाहीं; तेव्हां प्रसंगविशेषीं गैरमाहितीमुळें एखादें चुकीचें विधान होण्याचा संभव आहे. परंतु आमची चूक आम्हांस कळून आल्याबरोबर ती प्रांजलपणानें कबूल करण्यांत आम्हांस कधींही कमीपणा वाटत नाहीं. उदाहरणार्थ '१४ वें वर्ष लागेपर्यंत' असें जें आम्ही लिहिलें होतें तें बरोबर नाहीं असें आम्हांस समजतांच आम्हीं लागलीच आपली चूक कबूल केली. यावरून ढळढळीत खोट्या गोष्टी लिहिल्याचा आरोप आमच्यावर लागू करतां येईल किंवा जाणून बुजून १३ चे बारा करणारावर व "१६ व्या वर्षांपूर्वीं आपल्या मुलीचें लग्न करणार नाहीं अशी रा. टिळकांनीं सही केली होती," असें सुधारकांत कधींही लिहिलें गेलें नसून तसें विधान केल्याचा मनःकल्पित आरोप आणणारावर तो लागू होतो हें वाचकांनींच ठरवावें.

## रा. टिळक सह्या मागत होते कीं नाहीं ?

आतां रा. टिळक सह्या मागत होते असें जें एक आमच्या लेखांत वाक्य होतें त्याची काय ती मीमांसा राहिली. परंतु आमची व केसरीकारांची वाक्यमीमांसा वेगळी असल्यामुळें या प्रश्नासंबंधीं आम्ही कितीही लिहिलें तथापि त्यांची समजूत पाडतां येईल अशी आम्हांस आशा नाहीं. तथापि या वादाचा शेवट करण्यापूर्वीं एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें आम्हांस अवश्य दिसतें. केसरीकारांचें आतां असें म्हणणें आहे कीं, आपण काढलेलें विनंतिपत्र खऱ्या उद्देशानें काढलेलें नसून तुळशीबागेच्या सभेस विघ्न आणूं पहाणाऱ्या सुधारकांची प्रतिसूचनारूप कोटी त्यांच्या गळ्यांत घालण्याकरितां आपण हा नुसता कावेबाजपणा केला होता. असेल कदाचित्; परंतु हा त्यांचा कावेबाजपणा जर त्यांनीं निदान लपवून ठेवण्याचा त्या वेळीं प्रयत्न केला नसता तर तुळशीबागेच्या सभेस विघ्न आणूं पहाणाऱ्यांपैकीं ज्या तीन गृहस्थांचीं नांवें

त्यांनीं गेल्या अंकीं दिलीं आहेत, त्यांपैकीं दोघांचा म्हणजे रा. रामचंद्र भिकाजी जोशी व सिताराम गणेश देवधर यांचा रा. टिळकांच्या 'कांहीं स्नेही' मंडळींत समावेश झाला नसता, व त्यांनीं काढलेल्या विनंतिपत्रावर त्या दोघांनीं सह्याही केल्या नसत्या, त्या वेळीं रा. टिळकांचें या दोघांशीं जें भाषण झालें त्यावरून त्यांनीं काढलेलें विनंतिपत्र तुळशीबागेच्या सभेपुरतेंच नसून तें कांहीं तरी रंगारूपास आणावें अशी त्यांची इच्छा असल्याचें स्पष्ट दिसून आलें होतें, व तसा त्यांचा उद्देश दिसून आल्यावरूनच वरील दोघां गृहस्थांनीं त्या विनंतिपत्रावर सह्या केल्या; नाहीं तर त्यांनीं त्या मुळींच केल्या नसत्या; व पुढें जी जोशी हॉलांत सभा झाली ती तरी त्याच उद्देशानें झाली असली पाहिजे. रा. टिळक आतां म्हणतात त्याप्रमाणें त्या विनंतिपत्राचा तुळशीबागेच्या सभेपुरताच संबंध असता व त्यांत दर्शविल्याप्रमाणें खरोखर कांहीं व्यवस्था घडून यावी असा जर त्यांचा मनापासून उद्देश नसता, तर स्वतां होऊन ती सभा निमंत्रित करण्याचें मुळींच प्रयोजन नव्हतें. असो; १६ व्या वर्षांपूर्वीं कन्येचें लग्न करणें इष्ट नाहीं, व इतकें पुढें गेल्यानें बहिष्काराचीही भीति नाहीं, असें रा. टिळक स्वतः म्हणत असून व या सुधारणेच्या इष्टानिष्टतेबद्दल व शास्त्राशास्त्रतेबद्दल पुनर्विवाहाप्रमाणें त्यांस यत्किंचितही संशय नसून, त्याप्रमाणें त्यांच्या हातून कृति झाली नाहीं, एवढी गोष्ट जोंपर्यंत निर्विवाद आहे तोंपर्यंत 'सह्या मागणारे' या शब्दांचा त्यांनीं कोणत्याही वाक्यमीमांसेच्या आधारावर कोणताही अर्थ केला, तथापि हेही बोलक्या सुधारकांपैकींच एक आहेत व कर्ते सुधारक म्हणून व्यर्थ शेखी मिरविण्याचा यांस कोणत्याही प्रकारें हक्क पोंचत नाहीं, हें जें मुख्यत्वेंकरून आम्हांस दाखवावयाचें होतें, त्यास कोणत्याही प्रकारें बाध येईल असें आम्हांस वाटत नाहीं."

आगरकरांनीं दिलेला पुरावा नाकारणें टिळकांना शक्य नव्हतें. तेव्हां तें पत्रक काढलें होतें ती आपली हिकमत होती असें ते म्हणूं लागले. तें म्हणणें खरें नव्हतें आणि खरें असलें तर असली हिकमत लढवणें यांत त्यांना भूषणीय कांहींही नव्हतें. पण या वेळीं जुन्या पंथाच्या लोकांना खुष ठेवणें व त्यासाठीं आगरकरांवर कारण असो नसो तुटून पडणें हेंच टिळकांचें इतिकर्तव्य झालें होतें. या मंडळींना "आपण हिकमत लढविली" असें सांगितलें तर बरें वाटेल व खरें वाटेल हें टिळकांना माहीत होतें, व कदाचित् टिळकांनीं सुधारकांना फसविण्यासाठीं कशी गंमत केली म्हणून या मंडळींनीं आनंदानें

टिच्याही बडविल्या असतील. त्या बडवितांना असें करण्यांत टिळक लबाडी करितात असें सिद्ध होतें हा विचारही त्यांच्या मनाला शिवण्याचें भय नव्हतें. आतां ही हिकमत पूर्ण खोटेपणावर उभारली होती, आणि म्हणून टिळकांना या प्रकरणाचा शेवट 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायानें आगरकरांना आणखी शिव्या देऊन करावा लागला. ही हकीकत आम्ही समग्र दिली आहे याचें कारण क्षुल्लक गोष्टीचें निमित्त करूनसुद्धां टिळक आगरकरांच्यावर केवढालीं कुभांडें रचण्यास प्रवृत्त होत असत हें अगदीं स्पष्टपणें दिसावें. आगरकरांच्या ठिकाणीं एवढी सहनशक्ति होती म्हणून ते शरीरप्रकृतीच्या अत्यंत अशक्त स्थितींतही असल्या शिवीगाळीला, विपर्यासाला पुरून उरले. मेसमन–भातप्रकरणांत टिळकांची कड घेतलेले रावबहादुर रानडे या विपर्यासप्रकरणानंतर अर्थात् त्याच मनःस्थितींत राहिले असतील हें संभवत नाहीं. पण हा वाद वाचून आपल्या 'धोरणा'साठीं कां होईना टिळकांच्या साहाय्याला आपण फाजील महत्व दिलें असें त्यांना वाटल्यावांचून राहिलें नसेल.

११. वामनराव आपट्यांच्या मृत्यूनंतर आगरकर प्रिन्सिपॉल झाले हें वर आलेंच आहे. वामनराव ९ आगष्ट १८९२ त वारले व सप्टेंबरअखेर कॉलेजची टर्म पुरी होऊन नोवेंबरांत परीक्षा झाल्या. या वेळीं फर्ग्युसन कॉलेजांतून दुसऱ्या बी. ए. च्या परीक्षेलाही विद्यार्थी गेले होते. १८९२ च्या परीक्षांचा निकाल फार चांगला झाला. याच वेळीं सरकार व सोसायटी यांच्या दरम्यान् कांहीं घासाघीस चालू झाली होती परंतु त्यांतून ती सुखरूपपणें पार पडली. ता. ९ जानेवारी १८९३ च्या सुधारकांत आगरकर लिहितातः—

"सरकारी अधिकारी आपणांस अनुकूल असावे अशी सोसायटीची इच्छा आहे, आणि त्यांना प्रतिकूल होऊं न देण्याविषयीं ती आपणांकडून होईल तितकी खबरदारी ठेवीत असते. पण याउप्पर त्यांची मर्जी खप्पा झालीच तर त्याबद्दल ती फारसा खेद करीत नाहीं. सरकारापेक्षां लोकांवर आणि त्यापेक्षांही स्वकष्टावर तिचें विशेष अवलंबून आहे. कितीही विघ्नें आलीं तरी मनापासून परिश्रम केल्यास केव्हां तरी आपले हेतु परिपूर्ण होतील असा तिच्या चालकांस पक्का भरंवसा आहे, आणि म्हणूनच ते आजपर्यंत टिकाव धरून राहिले आहेत. कोल्हापूर प्रकरण, विष्णुशास्त्र्यांचा अकाल मृत्यु, कॉलेज निघालें नाहीं तों सर जेम्स फर्ग्युसन यांचें विलायतेस प्रयाण, लॉर्ड रे यांनीं

चांगल्या हेतूनें केलेलें अप्रत्यक्ष नुकसान, लाईफ मेंबरांत जबरदस्त मतभेद माजल्यामुळें झालेली फाटाफूट व या सर्वांहून अत्यंत शोचनीय असा वामनराव आपटे यांचा मृत्यु अशा प्रचंड अरिष्टांस न डगमगतां जे गृहस्थ आस्थापूर्वक हातीं घेतलेलें देशकृत्य बजावीत आहेत ते एखाद्या गव्हर्नराच्या किंवा त्याच्या प्रिय किंकराच्या अवकृपारूप हिंवाळ्यांतील थंडीच्या कडाक्यानें करपून जातील अशी भीति कशाला पाहिजे ?" या उद्गारांवरून कांहीं सभासदांनीं सोसायटी सोडली म्हणून सोसायटीचा मूळचा स्वातंत्र्याचा व स्वावलंबनाचा बाणा मुळींच ढळला नव्हता हें उत्कृष्ट सिद्ध होतें. तो तसा ढळणें हें आगरकर तेथें असतांना शक्यच नव्हतें. कॉलेज पूर्ण होऊन म्हणजे त्यांत दुसऱ्या बी. ए. पर्यंत वर्ग सुरू होऊन १८९२ च्या सुरवातीला कॉलेजच्या मुख्य इमारतीचा पाया लॉर्ड हॅरीस यांनीं घातला व ती या वेळीं जवळ जवळ पुरी होत आली होती. १८९२ सालीं फर्ग्युसन कॉलेजच्या उमेदवारांनीं युनिव्हर्सिटीच्या परीक्षांत फार चांगलें यश मिळविलें. याच लेखांत आगरकर शेवटीं लिहितातः—" पी. ई. तलें संस्कृत प्राईझ, मॅट्रिक्युलेशनमधली पहिली संस्कृत स्कॉलरशिप, आणि सेकंड बी. ए. चा निकाल ऐकण्यास वामनराव आपटे जिवंत असते तर त्यांस पराकाष्ठेचा आनंद होऊन क्षणभर आपण कृतकृत्य झालों असें वाटलें असतें. पण तें आतां बोलून उपयोग काय ? सर्व गोष्टींस इलाज आहे. मृत्यूपुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. चांगला मनुष्य गेला म्हणजे मागें राहिलेल्यांनीं त्याबद्दल शोक करावा हें स्वाभाविकच आहे. पण तो केला म्हणजे आपलें कर्तव्य आटपलें असें समजणें हा प्रमाद होय. चांगल्याच्या चांगल्या गुणांचें अनुकरण करून लोकहित साधण्यांत त्याच्या पलीकडे जाणें यांतच खरें बंधुप्रेम व खरा पुरुषार्थ आहे. वामनरावांच्या हयातींत न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज या संस्थांचा जो लौकिक झाला व त्यांजकडून जी देशसेवा घडली त्याहून त्यांच्या पाठीमागें अधिक लौकिक संपादणें व अधिक देशसेवा करणें हें त्यांच्या मित्रांचें त्यांच्यासंबंधानें खरें कर्तव्य आहे; व आपलें हें कर्तव्य आहे हें त्यांच्या ध्यानांत वागत असावें असें गतवर्षांतील परीक्षांच्या निकालावरून व चालू वर्षाकरितां दोनही संस्थांत शिक्षणासाठीं व इतर गोष्टींसाठीं ज्या व्यवस्था केल्या आहेत त्यावरून अनुमान करण्यास आम्हांस हरकत दिसत नाहीं."

वामनरावांच्या मृत्यूपासून आगरकरांच्या मृत्यूपर्यंतचा काळ पुरा तीन वर्षांचाही नाहीं. या तीन वर्षांत आगरकरांनीं कॉलेजचे प्रिन्सिपॉल या नात्यानें काम केलें व सुधारक नेहमींप्रमाणें चालविला. मोठमोठ्या वादविवादांतून सुधारक आतां बाहेर पडला होता व त्याचें स्थान महाराष्ट्र वृत्तपत्रांत स्थिर झालें होतें. या शेवटच्या तीन वर्षांचा इतिहास वर्णन करण्यापूर्वीं सुधारक निघाल्यापासून ज्या मतांचें, विचारांचें आणि सुधारणांचें समर्थन आगरकरांनीं केलें त्यासंबंधीं थोडीशी विस्तृत चर्चा करणें इष्ट दिसतें. त्या चर्चेवरून महाराष्ट्रांत आगरकरांनीं जी विचारक्रांति घडवून आणली आणि जिच्या बळावर सुधारणायुगाला सुरवात झाली ती कोणत्या स्वरूपाची आहे हें लक्षांत येईल.

# भाग नववा

## मतें व विचार—(अ) प्रास्ताविक चर्चा

अप्रिय परि पथ्य असे वक्ता श्रोता हि दुर्लभ स्पष्ट,
बहु सुलभ प्रिय वदते, वाढविती, चुकविती न ते कष्ट ॥
स्पष्ट हित अहित कथिता जो होय, सहाय तोचि रायास;
प्रिय वाङ् नर कीं नरकीं भोगवितो भोगितो चिरयास ॥

मोरोपंत, महाभारत, सभापर्व.

सुधारक पत्राला सुरवात करून आगरकरांनीं आपलीं मतें व विचार हीं निःसंदिग्धपणें मराठी वाचकांपुढें मांडलीं व त्यांच्या लेखणीचें अपूर्व लालित्य त्या वेळेपासून विशेष दृष्टिगोचर झालें यांत शंका नाहीं. हीं मतें व विचार केसरी पत्रांतूनही प्रकट झालीं होतीं आणि केसरीचें पहिलें चार वर्षांचें धोरण त्यांना अनुसरून होतें ही गोष्ट प्रस्तुत ग्रंथाच्या सुरवातीच्या भागांतून पूर्णपणें सिद्ध करण्यांत आली आहे. आगरकरांचीं राजकीय मतें त्यांच्या "आधुनिक" भक्तांना पचण्यासारखीं नाहींत असें विधान प. वा. बळवंतराव टिळक कधीं कधीं करीत असत तें सदरहू "आधुनिक" भक्तांसंबंधीं कितीही विपर्यस्त असले तरी राजकीय विचारांत आगरकर बिलकुल मागसलेले नव्हते हें खुद्द टिळकांनाही कबूल होतें, एवढें त्या विधानामुळें सिद्ध झाल्याशिवाय रहात नाहीं. स्वदेशाच्या पारतंत्र्यानें हृदय होरपळून निघाल्यामुळें आणि त्या पारतंत्र्याचीं बलवत्तर कारणें शोधून काढून त्यांचा निरास करण्यांत आयुष्य खर्चावयाचें असा निश्चय झाल्यामुळें सरकारी नोकरीची रुपेरी शृंखला पायांत अडकवून न घेतां स्वतंत्रपणें स्वजनसेवा करावयाची, केवळ अब्रूनें संसार करण्यापलीकडे द्रव्याचा लोभ ठेवावयाचा नाहीं, जेथें स्वदेशाला विपन्न अवस्था आली तेथें स्वतःच्या बडेजावींत पडावयाचें नाहीं हा मार्ग आगरकरांनीं पतकरला

आणि त्या असिधाराव्रतापासून कायेनें, वाचेनें, मनानें, कृतीनें ते अणुरेणूमात्रही ढळले नाहींत ही गोष्ट त्यांचीं मतें मान्य असणाऱ्यांना किंवा अमान्य असणाऱ्यांना सारखीच मान्य आहे. अर्थात्, आगरकरांचे निरनिराळया विषयांसंबंधीं विचार हे कांहीं तरी मध्यवर्ती तत्वसमुदायापासून निघालेले होते हें उघड आहे आणि या मूलभूत तत्वांचा विचार प्रथम करणें अत्यंत आवश्यक आहे. त्या तत्वांचा उमज पडला म्हणजे आगरकरांचे कोणत्याही विषयांवरील विचार ध्यानांत येण्याला कठीण पडणार नाहीं. आणि म्हणून त्यासंबंधीं प्रास्ताविक चर्चा प्रथम करणें इष्ट दिसतें.

निराळी शाळा काढावयाची या गोष्टीवरून अज्ञाननिरास व ज्ञानप्रसार हें अगदीं पहिलें तत्व आगरकरांच्या विचारसरणीच्या व कार्यपीठिकेच्या मुळाशीं होतें हें ताबडतोब दिसून येतें. " शहाणे करूनि सोडावे सकळ जन " ही तळमळ त्यांना लागली होती. पण शहाणे करावयाचे म्हणजे काय ? तर विचार करून जीं तत्वें उन्नतिदायक आहेत त्यांचा सर्वांनीं अवलंब करावा आणि जीं अधोगतिकारक आहेत त्यांचा सर्वांनीं त्याग करावा असा प्रयत्न करावयाचा. हिंदुस्थान देशाचा कित्येक शतकांचा इतिहास अवलोकन केल्यावर सदरहू काळांत राष्ट्राचा संसार ज्या तत्वांना अनुसरून चालला होता त्यांत कांहीं तरी जबरदस्त दोष असला पाहिजे हें सिद्ध होतें आणि म्हणून " ज्या तत्वाचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या तत्वांचा स्वीकार करण्यास आम्ही आनंदानें तयार झालें पाहिजे. "* सामाजिक सुधारणा या शब्दाचा आगरकरांचा अर्थ संकुचित स्वरूपाचा केव्हांही नव्हता तर त्याची व्याप्ति इंग्लंडांत किंवा इतर देशांत सामाजिक सुधारणा ( Social Reform ) या शब्दानें प्रतीत होते त्याप्रमाणें विस्तृत होती. " राज्य, धर्म, व्यवहार इत्यादि सामाजिक गोष्टींच्या संबंधानें या देशांत ज्या पद्धति, जे पंथ, आणि जे आचार रूढ आहेत त्यांपैकीं कांहीं हळू हळू नाहींतसे व्हावे, कांहींत थोडाबहुत फेरफार व्हावा, व कांहीं अगदीं नवीन अस्तित्वांत यावे असें अलीकडे पुष्कळांस वाटूं लागलें आहे........ सामाजिक सुधारणेच्या ज्या तत्वांच्या अनुरोधानें आम्ही सध्यां येथें रूढ अस-

* निबंधसंग्रह, भाग १ ला, " सुधारक काढण्याचा हेतु. "

लेल्या राजकीय, धार्मिक किंवा व्यावहारिक संस्थांत फेरफार करावा, अथवा त्यांपैकीं कांहीं मुळींच नाहींशा करून त्यांच्या ठिकाणीं नवीनांची स्थापना करावी असें म्हणणार तीं तत्वें कोणतीं हें अगदीं थोडक्यांत कां होईना, पण प्रथम सांगितलें पाहिजे. तारवांस जसें सुकाणूं, समुद्रपर्यटन करणारास जसें दिङ्निर्णायक यंत्र, सुवर्णकारास जशी निकषशिला, अंधास जशी यष्टि व इमारतीस जसा पाया तशीं सामाजिक रचनेस, व्यवस्थेस व स्थित्यंतरास हीं तत्वें आहेत. *" याच परिच्छेदांत आगरकर पुढें लिहितातः—" आपणांस अमुक गोष्ट अमुक वळणावर न्यावयाची आहे किंवा नेली पाहिजे असें एकदां कळून आलें म्हणजे त्या वळणावर ती गोष्ट नेण्याचे बरे वाईट उपाय ठरविण्यांत म्हणण्यासारखा त्रास पडत नाहीं. आमची तर अशी समजूत आहे कीं आज ज्या कित्येक सामाजिक गोष्टींविषयीं आमच्या लोकांत विशेष मतांतर दिसत आहे तें अस्तित्वांत येण्यास पुष्कळ अंशीं सामाजिक सुधारणेच्या मूळ तत्वांचें अपूर्ण आकलन कारण होत आहे. कोणत्याही प्रयत्नानें जर त्यांस त्यांचें पूर्ण आकलन होईल तर सामाजिक सुधारणा अडथळा न होतां मोठ्या झपाट्यानें होऊं लागेल. रोगाचें निदान झाल्यावर औषधांची योजना करणें, अर्थ समजल्यावर त्याचें स्पष्टीकरण करणें व उत्तर समजल्यावर रीति बसविणें फार कठीण जात नाहीं ! " उपरोक्त वाक्यांपैकीं पहिल्यांत सामाजिक सुधारणेच्या अनुरोधानें ज्या संस्थांत फेरफार करावयाचा त्यांत अगदीं सुरवातीला राजकीय संस्थांचा उल्लेख झाला आहे त्यावरून आगरकरांचा सामाजिक सुधारणा हा शब्द राजकीय सुधारणेचा विरोधदर्शक नसून राष्ट्राची सर्वांगी सुधारणा या व्यापक अर्थानें वापरला होता हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. त्याचा विपरीत अर्थ करून त्यासंबंधीं गैरसमज उत्पन्न करण्याचें अकार्य, आगरकरांच्या रोख ठोक मतांमुळें ज्यांची सार्वजनिक संसारांत कुचंबणा होऊं लागली त्यांनीं केलें; त्याला आगरकरांचा किंवा त्यांच्या त्या वेळच्या भक्तांचा किंवा त्यांच्या आधुनिक भक्तांचा उपाय नाहीं. आपल्या निरनिराळ्या विषयांवरील मतांचीं मूळ तत्वें एकच आहेत हें आगरकरांनीं वरील वाक्यांत स्पष्ट सांगितलें आहे तेव्हां त्यांचीं राजकीय मतें ग्राह्य व सामाजिक मतें अग्राह्य असें म्हणणाऱ्यांच्या विचारांतच घोंटाळा झाला आहे हें स्पष्ट होतें.

---

* निबंध संग्रह, भाग १—आमचें काय होणार ? ( पान १० )

२. पहिल्या मूलभूत तत्वाला आशावादित्व असें नांव देतां येईल. उन्नति होणें शक्य आहे, आपल्याला आहे त्याहून चांगली स्थिति येणार आहे, अशी अंतःकरणाची प्रवृत्ति असल्याशिवाय मनुष्य ती चांगली स्थिति आणण्यासाठीं धडपड करणार नाहीं. या आशावादित्वाचें बीज अर्थात् जगाची स्थिति बदलत जाणार यांत म्हणजे गतितत्वांत आहे. स्थित्यंतर झाल्याशिवाय राहणार नाहीं हें एकदां बुद्धीला पटलें म्हणजे "आहे ती स्थिति अशीच राहणार" किंवा "आज शतकानुशतकें अशीच स्थिति होती" अथवा "सारे प्रयत्न फुकट आहेत, त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं" अशा तऱ्हेचे निराशामय विचार आपणांला व्यग्र करीत नाहींत व उद्योग करण्याला सबळ कारण मिळतें. या आशावादित्वाचें किंवा तदंतर्गत गतितत्वाचें निरूपण आगरकरांनीं फार सुंदर प्रकारें केलें आहे; "ज्यानें शास्त्राभ्यास केला आहे, ज्यानें इतिहास वाचला आहे, ज्यानें जगाचा पुष्कळ अनुभव घेतला आहे, व ज्यानें विचारांत दीर्घकाळ घालविला आहे, अशा तत्ववेत्त्यास मनुष्यप्रवृत्तीची दिशा जितकी नीट समजणार आहे, तितकी अशिक्षितास समजण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें अंधारांत सगळया रंगाचा लोप होतो त्याप्रमाणें फार दूरच्या भविष्यकाळाविषयीं विद्वान् आणि अविद्वान् यांचें सारखेंच अज्ञान असतें. तथापि ज्याप्रमाणें दुर्बिणवाल्यास त्या यंत्राच्या साहाय्यामुळें दूरस्थ तारकासमूहाविषयीं दुसरें कांहीं समजलें नाहीं, तरी त्याच्या अनंतत्वाविषयीं खात्री होते, त्याप्रमाणें विद्यारूप दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे त्याच्या ज्ञानचक्षूंस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीनें न्याहाळतां आली नाहीं, तरी तिच्या उन्नतीला सीमा नाहीं, एवढें पक्कें दिसून येतें. अशिक्षिताची तशी खात्री होत नाहीं. ज्याप्रमाणें साधारण मनुष्यास आकाश जसें दिसतें तसेंच तें असेल असें वाटतें, त्याप्रमाणें सामाजिक स्थित्यंतराविषयीं ज्यानें म्हणण्यासारखा विचार केलेला नाहीं, त्याला समाजाच्या स्थितींत विशेष बदल होईल असें वाटत नाहीं. या विश्वांतील कोणतीही सचेतन किंवा अचेतन वस्तु स्थिर नाहीं; प्रत्येक क्षणास प्रत्येकींत दृश्य किंवा अदृश्य फेरफार होत आहेत असें एकदां कळून येणें फार महत्वाचें आहे. कारण जग सारखें बदलत चाललें आहे अशी खात्री झाल्यानें विचारी मनुष्यास एवढाच विचार येतो कीं, ज्या अर्थीं स्थित्यंतराचें रहाटगाडगें सदां फिरत राहणार; त्याच्या गतीस कोणीही प्रत्यवाय करूं शकत नाहीं; त्या अर्थीं जेणेंकरून त्याची गति आपणांस सुखावह

होईल असें वर्तन करणें आपल्या ताब्यांत असल्यास निदान तसें तरी करावें, म्हणजे बरें सुख मिळेल. सध्यां पृथ्वीवर जे ज्ञानी पुरुष आहेत त्या सर्वांच्या अंतःकरणाची अलीकडे अशी खात्री होत चालली आहे कीं जगाचीं स्थित्यंतरें अनादि व अनंत आहेत. तस्मात् आपणास अनुकूल अशा स्थित्यंतरास आपण सहायभूत व्हावें हें आपणांस योग्य आहे."* याच्याच पुढें म्हटलें आहे—"मनुष्यसुधारणेचा ओघ कोणीकडे वहात आहे हें प्रथम दाखविण्यांत आमचा हेतु इतकाच आहे कीं त्या ओघापुढें जशी इतर देशांची, तशी आमच्या हिंदुस्थान देशाचीही प्रतिष्ठा बिलकुल चालणार नाहीं. त्यांच्या जुवांस ज्याप्रमाणें इतर देशांतील लोकांनीं आपले खांदे बिनतक्रार लाविले आहेत त्याप्रमाणें आज ना उद्यां आम्हांसही तसें केलें पाहिजे. जर आम्ही अगदीं नष्ट न झालों तर तो प्रवाह आम्हांस जिकडे घेऊन जाईल तिकडे जाण्याचा धीर केला पाहिजे, आणि याप्रमाणें बुद्धीची जर एकवार खात्री झाली, तर पुढला मार्ग फार सोपा आहे."† स्थित्यंतर जर होणारच, तर तें आपल्याला सुखावह होईल अशा प्रकारें आपण होऊन खटपट केली पाहिजे. "सुधारणा आपोआप होतील, त्यासाठीं उद्योग करण्याची जरूरी नाहीं" असल्या आचरट आणि नेभळट आणि भिन्नट तत्त्वावर भिस्त न ठेवतां प्रगतीची गति त्यांत आपली गति स्वखुषीनें मिळवून तीव्रतर केली पाहिजे असें सांगण्याचा वरील वाक्यांचा आशय आहे. आजपर्यंत चालू असलेल्या आपल्या गतिशून्य किंवा उद्योगशून्य स्थितीला आगरकरांनीं "शिलावस्था" हें मोठें समर्पक नांव दिलें आहे. "इंग्रजी होईपर्यंत आमचें सर्व व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठिण झालेल्या लाकडासारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं."¶ तेव्हां ही स्थिति, ही शिलावस्था तर बदललीच पाहिजे. ती आपण होऊन उद्योग करून बदलली पाहिजे. सुधारणा आपोआप होईल या आचरट व आर्ष वृत्तीला थारा देतां उपयोगी नाहीं. आणि ही शिलावस्था बदलण्याचा मार्ग अगदीं निःसंदिग्ध शब्दांत आगरकरांनीं सांगि-

---

* निबंधसंग्रह, भाग १ ला, पृष्ठ १२–१३. † नि. सं., भाग १, पृष्ठ १४.
¶ नि. सं. १, पृष्ठ ५.

तलेला आहे. त्याचा उल्लेख एकदां झालेला आहे तरी तो पुनः करणें प्रासंगिकच होणार आहे. " मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्हीं योग्य रीतीनें अंगिकार करीत गेलों तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आमच्या राज्यकर्त्यांकडून येत आहेत म्हणून त्या आम्ही स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाहीं. त्यांचें अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे असें जें आम्ही म्हणतों तें अशासाठीं कीं त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यवश्य तत्वाचा समावेश झाला आहे. म्हणून (ज्या) लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनीं त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाहीं "* वर दिलेले उतारे इतक्या स्पष्ट शब्दांत लिहिलेले आहेत कीं त्यांतील अर्थ अधिक उघड करण्याची वास्तविक आवश्यकता नसावी, पण कधीं कधीं सोप्या दिसणाऱ्या गोष्टीसुद्धां प्रतिकूळ वातावरणामुळें कठीण वाटतात. म्हणून तर आपल्या वेळीं आगरकरांनीं त्यांचें स्पष्टीकरण केलें व आज चाळीस वर्षांनीं त्यांचें स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं असें नाहीं.

२. आशावादित्वाप्रमाणें दुसरें मूलभूत तत्व जें वर दिलेल्या उताऱ्यांत स्पष्ट होतें तें विचारप्राधान्य म्हणजे बुद्धिप्राधान्य होय. आगरकर आशावादी होते त्याप्रमाणें त्यांच्या वेळीं महाराष्ट्रांत आणि हिंदुस्थानांत प्रसिद्धीला आलेले माधवराव रानडे हेही आशावादी होते. रानडे हे मोठे सद्विचारप्रवर्तक होऊन गेले आणि त्यांच्या लेखनभाषणादिकांमुळें कित्येक महत्वाच्या तत्त्वांची जाणीव वरिष्ठ जनतेला आली. तथापि त्यांचा किंवा त्या वेळेपर्यंत लोकांत पुढारपण घेतलेल्यांचा भार केवळ बुद्धीवर, विचारावर नव्हता. मनुष्याच्या बुद्धीला स्वातंत्र्य मिळून जगाच्या ज्ञानांत व कर्तृत्वांत जी भर पडली त्याचा विशेषेंकरून उपयोग करण्याची व बुद्धीला प्राधान्य देण्याची त्यांची तयारी नव्हती. परंपरा आणि रूढि यांचा त्यांवर अम्मल होता आणि परंपरेंतून सुटण्याचा केवळ विचारमय मार्ग त्यांना क्रांतिकारक वाटत होता. त्यांनीं सामाजिक सुधारणेला चालन दिलें पण तें देतांना डोळ्याला जी स्थूल क्रूरता दिसे, तिचें परिमार्जन अल्पांशानें करण्यापलीकडे त्यांचे प्रयत्न गेले नाहींत. याचें कारण त्या क्रूरतेच्या आधारभूत तत्वांना समूळ खणून काढण्याची त्यांची तयारी नव्हती असें म्हणावें

* नि. सं. १, पृष्ठ ६.

लागतें. पण आगरकरांनीं या बाबतींत सर्व प्रकारें विचार करून बुद्धिमंदिरांत प्रकाशित झालेल्या सत्याच्या दीपाच्या अनुरोधानें वाट चालण्याचें ठरविलें. त्या दीपप्रकाशांत त्यांना स्पष्ट दिसलें कीं "ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगाप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय."* आणि तसें करतांना लक्षांत ठेवण्याची मुख्य गोष्ट म्हणजे "जें म्हणून जुनें आहे त्यावर कंटाळा येण्यासारखी टीका करीत बसणें हें आम्हीं आपलें कर्तव्य समजत नाहीं. जुन्या आचारांवर जी टीका करावयाची ती त्यांचें अनुकरण करणारांस राग उत्पन्न करण्यासाठीं नव्हे, तर त्यांत जी असंबद्धता असेल ती त्यांच्या नजरेस आणून ती त्यांनीं दूर करण्याचा प्रयत्न करावा, व निर्दोष अशा नवीन आचारांचा स्वीकार करावा यासाठीं होय."|| केवळ परंपरेपेक्षां विचाराला जी गोष्ट शुद्ध म्हणून पटते तिचें आचरण कल्याणावह होतें हें आगरकरांच्या विचारसरणीला मूळभूत असलेलें तिसरें तत्व होय व तें तसें होतें याबद्दल त्यांच्या लेखांतून हवीं तितकीं वचनें व परिच्छेद पुरावा म्हणून देतां येतील. आणि बुद्धीच्या खटपटीनें व इतर उपायांनीं जें ज्ञान होईल तें आचरणांत आलें तरच त्याचा योग्य उपयोग झाला असें म्हणतां येईल. ज्ञान आणि आचरण यांची भिन्नता समाजहितदृष्टीनें इष्ट नाहीं. "कोणत्याही विषयाच्या संबंधानें कितीही ज्ञान वाढलें व लोकांत त्याचा कितीही प्रसार झाला, तरी जुन्या पद्धति सोडून देऊन तदनुसार नव्या पद्धतीनें वागण्याचें धैर्य आल्याशिवाय, ज्ञानाच्या वृद्धीपासून किंवा त्याच्या प्रसारापासून म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं."¶ यासंबंधीं पुढें आगरकर म्हणतात कीं "कोणत्याही विषयाच्या संबंधानें जोंपर्यंत आपली पक्की खात्री झाली नाहीं तोंपर्यंत सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें आचरण करणें दूष्य होणार नाहीं; कारण विनाकारण रूढ पद्धति सोडण्यांत कोणत्याही प्रकारचा फायदा नाहीं. परंतु अमुक गोष्ट अमुक रीतीनें घडत नाहीं, अमुक रीतीनें घडते असें ज्यास पक्कें समजून आलें आहे, तो जर लोकांचा गैरसमज दूर करण्याचें धैर्य न करील, तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार होऊन सुधारणा व सुखवृद्धि कशी व्हावी?"‡

---

* नि. सं. १, पृष्ठ ४८. || नि. सं. १, पृष्ठ ७६. ¶ नि. सं. १, पृष्ठ ८८.
‡ नि. सं. १, पृष्ठ ९०.

स्वतःची खात्री झाली पाहिजे; आपल्याला पक्कें समजून आलें पाहिजे वगैरे वाक्यांवरून बाबावाक्यावर आपली विचारसरणी उभारण्याला आगरकर बिलकुल तयार नव्हते हें स्पष्ट दिसतें. प्रत्येक गोष्टीचा स्वतंत्रपणें विचार करून ती ग्राह्य किंवा अग्राह्य हें ठरविणें या तत्वावर आगरकरांचें विचारमंदिर उभारलेलें आहे आणि त्यामुळें अर्थात् सर्वांना ज्ञान मिळावें व शक्य तितकी समता समाजांत नांदून बलात्काराच्या ऐवजीं सामान्यपणें संमतीचें तत्व प्रस्थापित व्हावें या गोष्टी ओघानेंच येतात. अर्थात् अंतःकरणाच्या सद्भावनांना त्यांनीं अत्यंत महत्व दिलें आहे; कारण या सद्भावनांचा उगम तरी बुद्धीमुळेंच होतो. असो. सज्ञानता, समता आणि संमति याबरोबरच समाजहिताला अत्यावश्यक तेवढें नियंत्रण वगळून मग उच्चाराचें पूर्ण आणि आचाराचें बहुतेक स्वातंत्र्य हेंही तत्व आपोआप येतें. त्या तत्वांत निर्भयपणाचा समावेश होतोच. किंबहुना निर्भयपणा नाहींसा होण्याला जीं जीं कारणें आहेत त्यांचें अनास्तित्व करणें हाच वरील तत्वांचा मुख्य हेतु आहे. "ज्यांना आपल्या जातीचा म्हणजे मनुष्यजातीचा उद्धार व्हावा असें मनापासून वाटत असेल त्यांनीं तो उद्धार होण्यासाठीं जीं साधनें आपणांस योग्य वाटत असतील त्यांचा निर्भीडपणें व निर्भयपणें रात्रंदिवस खल केला पाहिजे आणि होतां होईल तों मनास शुद्ध वाटलेल्या रीतीप्रमाणें वागवून दाखविलें पाहिजे."* "मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणास न भितां आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त, कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें हेंच त्यांस उचित आहे.‡" जीं साधनें आपणांस योग्य वाटत असतील, या वाक्यार्धावरूनही स्वतःच्या विवेकबुद्धीला अधिक प्राधान्य देण्याची आवश्यकता आगरकरांना किती वाटत होती हें स्पष्ट दिसतें. बुद्धि अद्यापि सर्वगामी नाहीं, तिच्यांत अपूर्णता पुष्कळ आहे; पण निःसंदेह ज्ञानाचें आणि म्हणून आचरणाच्या स्फूर्तीचें मनुष्याजवळ बुद्धीसारखें दुसरें साधन नाहीं. अर्थात् त्या साधनाला कोणत्याही प्रकारें हीनता येणें इष्ट नाहीं. बुद्धीचा अप्रतिहत संचार हें तर आधुनिक सुधारणेचें मुख्य तत्व आहे आणि या तत्वाचा उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावयाचा आहे. प्रख्यात आंग्ल निबंधकार लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या "तडजोड"

---

* नि. सं. १, पृष्ठ १४५. ‡ नि. सं. १, पृष्ठ १७८.

या ग्रंथाच्या सुरवातीला म्हटल्याप्रमाणें "निःशंकपणें विचार करतां येणें आणि स्वतंत्रपणें वागणें, अधिकाऱ्यांचें विशेष भय वाटूं न देतां आपल्या मनाचा व्यापार चालविणें, आणि रूढीला आंधळेपणानें मान न डोलावतां आपला आयुष्यक्रम ठरविणें, हा प्रत्येकाचा हक्क आहे हें तत्व आतां इतक्या कालानंतर कोणत्या ना कोणत्या तरी अर्थानें, पुढें येणाऱ्या काळांत ज्यांच्या मताला मान मिळण्याचा थोडासा तरी संभव आहे अशा प्रत्येक पंथाला मान्य झालेलें आहे."† मोर्लेचें हें म्हणणें युरोप खंडाला लागू होतें, पण या महातत्वाचा उच्चार महाराष्ट्रांत किंबहुना हिंदुस्थानांत आगरकरांनीं आधुनिक काळांत प्रथम केला यांत शंका नाहीं. याप्रमाणें बुद्धीला पटेल ती गोष्ट बोलणें व शक्य तितकी आचरणांत आणणें, मग त्याला इतरत्र पूज्य ग्रंथांत किंवा लोकरूढींत आधार असो अथवा नसो, हें आगरकरांचें अतिशय महत्वाचें तत्व होतें आणि त्यामुळें त्यांच्या शिकवणीला नवीनपणा आहे. ही शिकवण सांगतांना अन्याय, अनाचार आणि दुराचार यांवर आगरकरांनीं कठोर प्रहार केले आहेत; पण तसें करतांना आपल्याहून अन्यतर विचार ज्यांचे आहेत, त्यांच्या हेतूंविषयीं विपर्यास त्यांनीं केव्हांही केला नाहीं. लौकिक दृष्ट्या ज्याला धर्म म्हणतात त्यावर त्यांनीं कोरडे ओढलेले आहेत पण धर्मासंबंधीं लिहितांना अत्यंत समता ठेविली पाहिजे हें त्यांनीं अनेक प्रसंगीं स्पष्टपणें सांगितलें आहे. "अंतःकरणावर ज्या वृत्तीचा पक्का अंमल बसला असतां सिंहासनस्थ राजांना अधिकार व ऐश्वर्य यांचा त्याग करून, व आप्तमित्रांस सोडून देऊन अरण्यांत संचार करणें व फळमूळांवर आहार करणें यांत कांहींच कठिण वाटेनासें होतें; ज्या वृत्तीमुळें विवाहित स्त्रियांनीं आपले पति व विवाहित पुरुषांनीं आपल्या स्त्रिया याबद्दल पर्वा न करतां आपल्या मनास शुद्ध वाटलेलें वर्तन करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं; ज्या वृत्तीमुळें मातापितरांस अपत्यवात्सल्याचा घट्ट पाश तोडून त्याविषयीं उदासीन होण्यास, किंबहुना त्यांचा

† "The rignt of thinking freely and acting independently, of using our minds without excessive awe of authority and shaping our lives without unquestioning obedience to custom, is now a finally accepted princlple in some sense or other with every school of thought that has the smallest chance of commanding the future."

नाश करण्याविषयीं प्रवृत्त होण्यासही शंका वाटत नाहीं; जी वृत्ति प्रबळ झाली असतां नानातऱ्हेच्या यातना सोसण्यास, जाळून घेण्यास, बुडवून घेण्यास किंवा पुरून घेण्यास मनुष्य तयार होतो; ज्या वृत्तीचें एखाद्या राष्ट्रावर वर्चस्व झालें असतां तें दुसऱ्या राष्ट्रास जाळण्यास, कापण्यास, लुटण्यास किंवा पाहिजे तें करण्यास बिलकुल भीत नाहीं; सारांश ज्या वृत्तीमुळें कधीं कधीं लोकांच्या नीतिमत्तेस, विद्येस, भूतदयेस, व सदाचरणास पराकाष्ठेचें साहाय्य झालें आहे व कधीं कधीं जिच्यामुळें लोकांत साहस, क्रौर्य, अविचार व अमानुषपणा यांची परमावधि झाली आहे अशा वृत्तीविषयीं बोलतांना किंवा लिहितांना पराकाष्ठेची सरलता राखली पाहिजे हें उघड आहे."* धर्मवृत्तीचें याहून मनोवेधक वर्णन दुसऱ्या कोणास करतां आलें असतें असें वाटत नाहीं. आणि त्यावरून वादविवादाच्या बाबतींत आगरकरांच्या ठिकाणीं केवढी समीक्षता व सरळता होती हेंही सहज लक्षांत येतें.

४. यानंतर मोठें महत्वाचें तत्व म्हणजे—ज्याचा वर विषयानुषंगानें उल्लेख झालेला आहे—समता हें होय. सृष्टीमध्यें विषमता पुष्कळ आहे तेव्हां पूर्ण समता कोठून उत्पन्न होणार असा कित्येकांचा कोटिक्रम असतो. पण जे समतेचें प्रतिपादन करितात ते सृष्टींतील विषमता नाकबूल करीत नाहींत. त्यांचें म्हणणें असें असतें कीं, मनुष्यकृत विषमता शक्य तितकी कमी असावी किंबहुना मनुष्यप्रयत्नानें सृष्टींतील विषमतेची बाधासुद्धां कमी भासावी. श्रीमंतांच्या मुलांना स्वतःच्या खर्चानें वाटेल तेवढें शिक्षण घेतां येईल. पण मग गरीबांच्या मुलांना शिक्षणच मिळूं नये कीं काय ? तें मिळावें व सर्वांनां सुलभ व्हावें यासाठीं शिष्यवृत्तीसारख्या व शिक्षणाचा खर्च कमी करण्याच्या योजना निघतात. या समतेंतच वास्तविक संमतितत्वाचा समावेश करण्यास हरकत नाहीं. मनुष्यकृत विषमता जर शक्य तेवढी कमी करावयाची तर एका माणसानें दुसऱ्यावर बलात्कार काय म्हणून करावा ? आणि संमतीप्रमाणें स्वातंत्र्याचें तत्वही या समतेंत अंतर्भूत होतें हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. या समतेचें तत्व प्रधान धरल्यामुळें जातिभेदासारख्या संस्था अनर्थावह तात्विक दृष्ट्या ठरतात व त्या अनर्थावह आहेत हें इतिहासावरून व आपल्या प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध झालें असल्यामुळें समतेचें तत्व तात्विक दृष्ट्या तसेंच व्यवहार-

* नि. सं. १, पृष्ठ २१, २२.

दृष्टयाही ग्राह्य ठरतें. आणि हें समतेचें, संमतीचें, स्वातंत्र्याचें तत्व माणसा-माणसांत—माणसामाणसांच्या संबंधांत रूढ झालें म्हणजे निरनिराळीं कामें कर-णारे लोक, राजा व प्रजा, अधिकारी व जनता, पिता व पुत्र, गुरु व शिष्य, पतिपत्नी इत्यादि सर्व संबंधांना निराळें स्वरूप प्राप्त होतें; आणि आगरकरांच्या विचारांत या सर्व संबंधांना निराळें स्वरूप आणण्याचा जो प्रयत्न आहे त्यांतील बीज तरी हेंच आहे. समाज एकत्र नांदण्याला कांहीं शासन व कोणीतरी शास्ता पाहिजे पण समाजाच्या प्रगतीचें लक्षण म्हणजे हें शासन व हें शास्तृत्व उपरोक्त तत्वांना अनुसरून परिणत झालें पाहिजे. आणि अशा प्रकारें राजसंस्थेचें योग्य स्वरूप म्हणजे प्रजासत्ताक किंवा प्रजेच्या संमतीनें व मर्जीनें चालणारें हें होय. हें जसें राजकीय बावतींत तसेंच सामाजिक बाबतींत. तेथेंही समता, संमति व स्वातंत्र्य यांचें साम्राज्य होतां होईतों चाललें पाहिजे. बापाचा मुलावर किंवा मुलाचा बापावर, पतीचा पत्नीवर किंवा पत्नीचा पतीवर जुलूम चालतां उप-योगी नाहीं. आगरकरांच्या विचारसरणीचें हें मूळतत्व लक्षांत ठेवलें म्हणजे राजकीय व सामाजिक या दोहों बाबतींत ते सारखेच प्रगमनशील कां होते या कोड्याचा निकाल होतो. पण त्यांत आणखी एका तत्वाची भर टाकली म्हणजे त्यांची विचारपीठिका यथार्थ असल्याबद्दल खात्री पटते. तें तत्व म्हणजे उद्योग होय. मनुष्य हा उद्योगानें वाटेल तें होईल, वाटेल त्या उच्च पदवीप्रत पोंहोंचेल आणि तसेंच उद्योगशून्यतेमुळें त्याची अधोगतिही जबर-दस्त होईल. म्हणून मनुष्याची स्थिति परकृत विशेषशी नसून बऱ्याच मोठ्या प्रमाणांत स्वकृत आहे ही गोष्ट आगरकरांच्या पूर्ण गळीं उतरलेली होती. हिंदुस्थानावर परकी राज्य आलें याला कारण परकी लोकांचा पराक्रम आणि मुत्सद्देगिरी असें म्हटलें तरी या दोन्ही गुणांत आपण परकी लोकांपुढें फिके पडलों हें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हणून स्वदोषपरिमार्जन कर-ण्याचा उद्योग न करतां केवळ परक्यांना शिव्या देऊन आपला तरणोपाय नाहीं, हें आगरकरांचें ठाम मत होतें. आणि म्हणून जरी त्यांनीं राज्यक-र्त्यांच्या अन्यायाला आविष्कृत करण्यांत तेव्हांही बिलकुल कसूर केली नाहीं तरी आपल्यांतील दोष नाहींसे केले पाहिजेत, आपण दुसऱ्यांशीं टक्कर देण्याला लायख झालें पाहिजे ही त्यांची दृष्टि होती; आणि त्यामुळेंच केवळ परकी लोकांना शिव्याशाप देण्याइतकाच ज्यांचा सार्वजनिक संसार होता त्यांना आगरकर शत्रूसारखे वाटले. अर्थात् त्यामुळें आगरकरांच्या निर्मळ व जोर-

दार राजकीय विचारांना कांहींच कमीपणा येत नाहीं. या सर्व विषयांसंबंधीं आगरकरांच्या लेखांतून येथें जे उतारे पूर्वीं आले आहेत किंवा पुढें येतील त्यावरून वर म्हटलेल्या गोष्टीसंबंधीं खात्री पटण्यासारखी आहे. सुरवातीला सांगण्याचा मुद्दा हा कीं, आगरकरांचें राजकीय किंवा सामाजिक अगर धार्मिक अथवा नैतिक सर्व विचार उपरोक्त तत्वसमूहावर रचलेले होते. आगरकरांना तत्वें म्हणून कांहीं तरी होतीं आणि या कारणामुळें त्यांच्या शिकवणींत टिकाऊपणा विशेष आलेला आहे.

५. मागील परिच्छेदांत दिलेल्या तत्वांचें समर्थन करणारे पुढील उतारे आगरकरांच्या निरनिराळ्या लेखांतून घेतलेले आहेत. " अनियंत्रित राजांचा अंमल कमी होत जाणें, व सृष्टयंतर्गत सामर्थ्यांचे आपण गुलाम आहों, व त्यांच्या सर्व शक्तिमत्त्वापुढें आमचें कांहीं एक न चालतां त्यांच्या इच्छेनुरूप आम्हांस निरंतर वागलें पाहिजे, या चुकीच्या कल्पनेचा लय होत जाऊन मनुष्य प्रयत्न करील तर सृष्टयंतर्गत पदार्थांचें ज्ञान त्यास प्राप्त करून घेतां येऊन कालांतरानें त्या पदार्थांसच त्यास आपले दास करून घेतां येईल, असा विश्वास वाढत जाणें—या दोनच गोष्टींचा नीट विचार केला तरी बाकीच्या गोष्टीविषयीं बरीच समजूत पडणार आहे. सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशीं बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला, म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस आरंभ होतो. जोंपर्यंत त्याच्या मनांत या वृत्तीचा प्रादुर्भाव झाला नाहीं तोंपर्यंत त्याच्या हातून घडत असलेल्या क्रिया किंवा त्याचें वर्तन बलात्कारानें, जबरदस्तीनें किंवा सक्तीनें होत असतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें होत असलेलें वर्तन केवळ वाईटच असेल असा नियम नाहीं. पुष्कळदां तें चांगलेंही असण्याचा संभव आहे. पण तें परप्रेरित असल्यामुळें त्याच्या चांगुलपणाची किंवा वाईटपणाची जबाबदारी त्या वर्तन करणारावर असत नाहीं. शिवाय, असें वर्तन बळजोरीनें करविण्यांत तें करविणाऱ्याचें विशेष लक्ष स्वहिताकडे असल्यामुळें, अनेक प्रसंगीं तें करणाऱ्याचें हित मुळींच साधत नाहीं. यामुळें जोंपर्यंत कोणत्याही राष्ट्रांतील लोकसमूहांत स्थूल मानानें स्वामी आणि किंकर असे दोनच भाग होऊन राहिलेले असतात तोंपर्यंत त्यांत सुखावस्थेची परमावधि होण्याचा संभव नाहीं. स्वातंत्र्य हें स्वभावतः सुखावह व पारतंत्र्य हें स्वभावतः दुःखावह असें आहे.

पण मनुष्याच्या व कांहीं इतर प्राण्यांच्या शरीराची व मनाची घटना विशेष प्रकारची असल्यामुळें त्यांस आपलें स्वाभाविक स्वातंत्र्य मर्यादित करून घेण्यांत व समाजावस्थेंत अवश्य असणाऱ्या पारतंत्र्याचा अंगीकार करण्यांत दुःखाहून अधिक सुख प्राप्त होतें. आणि म्हणूनच तो कितीही त्रास सोसावा लागला तरी समाज सोडून जात नाहीं. पण यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, स्वभावतः सुखावह असें जें स्वातंत्र्य त्याचा आवश्यकतेबाहेर संकोच करून घेण्यांत कोणत्याही प्रकारचा फायदा आहे. पण चमत्कार असा आहे कीं, मनुष्य एकांतावस्था टाकून जसजसा समाजप्रिय होत जातो तसतशी त्याची स्वातंत्र्यासक्तीही थोडीशी क्षीण होत जाते, व अखेरीस त्यास ही शुद्ध दास्यावस्थाही असह्य वाटेनाशी होते. पण ही त्याची अंत्यावस्था नव्हे. आपणास जे स्वामी म्हणवीत असतात अशांचें दुष्ट वर्तन व त्यामुळें मनास व शरीरास वारंवार होणारी पीडा यामुळें अत्यंत सहनशील मनुष्यास आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची इच्छा उत्पन्न होते. एकदां या इच्छेनें त्याच्या अंतःकरणांत बळकट मूळ धरलें कीं, त्याच्या उन्नतावस्थेस आरंभ झाला असें समजावें. ज्यांना नेहमीं दुसऱ्यावर जुलूम करण्याची किंवा सत्तीनें अंमल बजावण्याची संवय असते, ते असें म्हणतात कीं, मनुष्य हा आप्पलपोटा प्राणी आहे; स्वहितासारखी त्याला दुसरी प्रिय वस्तु नाहीं; व कोणतीही गोष्ट करण्यांत स्वहितसाधनाहून त्याचा अन्य हेतु असत नाहीं. जुलमी लोकच अशा तत्वशास्त्राचे प्रतिपादक व प्रसारक असण्याचें कारण असें कीं, एक तर ज्या वृत्तीच्या धोरणानें त्यांचें वर्तन अहोरात्र होत असतें त्या वृत्तीशीं इतर वृत्तीपेक्षां त्यांचा विशेष सहवास असल्यामुळें त्यांच्या डोळ्यांपुढें सर्वत्र तीच दिसत असते, व आपल्या अंतःकरणाप्रमाणें इतरांच्या अंतःकरणांतही तिचेंच साम्राज्य असेल अशी त्यांची भावना होते. दुसरें असें कीं, त्यांच्या जुलमास कंटाळलेले व त्रासलेले लोक संतापून जाऊन स्वसंरक्षणासाठीं हवें तें धाडस करण्यास प्रवृत्त होत असतात; यामुळें त्यांना आसमंतांतील सर्व सचेतन जगत् स्वार्थपरायण होऊन आपल्या नाशास उद्युक्त झालें आहे असें वाटत असतें, व आपणच त्यांच्या संतापाचें व धाडसाचें आदिकारण आहों याचें भानही नाहींसें होतें! परंतु स्वातंत्र्याचा उपभोग प्राप्त होत असलेल्या मनुष्याचें वर्तन ज्यांनीं थोड्या काळजीनें पाहिलें असेल त्यांना असें दिसून आलें असेल कीं, स्वातंत्र्याचा नित्य अनुभव घेणारा मनुष्य स्वहितपरायण असत नाहीं इतकेंच नाहीं तर बराच परोपकारी, निदान परहित-

चिंतक तरी असतो. आपल्या श्रमाचें सारें फळ आपणासच उपभोगावयास सांपडावें, ही मनुष्याच्या अंतःकरणाची पूर्णावस्था नव्हे; त्या फलाची हवी तशी व्यवस्था लावण्याची मोकळीक आपणास असावी, ही त्याची आकांक्षा असते; व ही जसजशी परिपूर्ण होत जाते तसतशी त्याची स्वार्थबुद्धि क्षीण होत जाऊन तो पराकाष्ठेचा परहितैषी होत जातो. तात्पर्य काय कीं, बलात्कार, बळजोरी, सक्ति इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थाच्या व्यवहारापासून मनुष्याच्या सुखास पूर्णावस्था येण्याचा संभव नसल्यामुळें तसले व्यवहार नाहींसे होत जाऊन त्यांच्या जागीं समय, संमति, अनुरोध, रुकार, पसंती इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थांच्या व्यवहारांचा प्रचार सर्वत्र पडत आहे. तेव्हां येथून पुढें राजा व प्रजा, कुलेश व कुलावयव, पति आणि पत्नी, मातापितरें व अपत्यें, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्कारानें न होतां संमतिपूर्वक होत जाणार आहेत. ” *

या उताऱ्यांत आगरकरांच्या तात्विक विचारांचें सारसर्वस्व आलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वातंत्र्याची इच्छा म्हणजे अभ्युन्नतीची इच्छा आणि बलात्काराच्या ठिकाणीं संमतीची प्रस्थापना हें ध्येय अशा तऱ्हेचें त्यांचें म्हणणें सर्वांनीं अहर्निश अंतःकरणांत बाळगण्यासारखें आहे; आणि या ध्येयाचा अम्मल संसारांतील सर्व व्यवहारावर, राजाप्रजांच्या व्यवहारापासून तों विक्रेताग्राहक यांच्या व्यवहारापर्यंत व्हावयाचा आहे. यावरून आगरकरांची सुधारणा कशी सर्वांगीण आणि व्यापक स्वरूपाची होती हें पटतें. तसेंच आगरकर हे व्यक्तिवादाचे ( Individualism ) पुरस्कर्ते होते; समाजसत्तावाद ( Socialism ) आणि त्यापासून निघालेलीं दुसरीं अनेक तत्वें हीं त्यांना पसंत नव्हतीं हेंही सिद्ध होतें. त्यासंबंधीं विशेष स्पष्टीकरण पुढील उताऱ्यांत सांपडतें. “ तेव्हां व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं; समाजाचें हित साधलें म्हणजे झालें, असें बोलणें म्हणजे असंबद्ध प्रलाप करण्यासारखें होय; कारण व्यक्तींच्या हिताहून निराळें असें समाजाचें हित नाहीं. तथापि अशा अर्थाचीं वाक्यें नेहमीं उच्चारण्यांत येतात, व तीं चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडून येतात. तेव्हां वरील अर्थाहून त्यांचा कांहींतरी भिन्न अर्थ असला पाहिजे.

* नि० सं० भाग १, पृष्ठें ३६–३९.

सूक्ष्म विचारांतीं असें दिसून येईल कीं, जेव्हां अशा प्रकारचे लोक समाजाच्या हिताविषयीं कळकळ व व्यक्तींच्या हिताविषयीं उदासीनता दाखवितात, तेव्हां त्यांचा खरा भावार्थ असा असतो कीं, समाज म्हणजे त्यांतील बहुतेक किंवा निदान प्रमुख लोक. व्यक्तींच्या फायद्याची पर्वा करण्याची गरज नाहीं, म्हणजे कोणत्याही गोष्टीमुळें पुष्कळांचें कल्याण होत असून थोड्यांस पीडा होत असेल तर ती बेधडक करण्यास हरकत नाहीं. कित्येक जण हा स्थूल अर्थ संकुचित करून, राष्ट्राच्या राजाचें किंवा त्यांतील श्रेष्ठ लोकांचें जें कल्याण तें साऱ्या राष्ट्राचें किंवा समाजाचें कल्याण असा विशिष्ट अर्थ करितात. अशा अर्थानुरोधानें ज्या समाजांत वर्तन होत असतें, त्यांत एका पक्षाकडे संपत्ति आणि सत्ता, व दुसऱ्या पक्षाकडे दारिद्र्य आणि दास्य, अशी वांटणी झालेली असते. अशा समाजांतील सामान्य लोकांस शुद्ध वन्यावस्थेंतील सुखाहून अधिक सुख होत असेल असें जरी मानितां आलें, तरी त्यांत त्यांचें पूर्ण समाधान होण्यासारखें नसलेंच पाहिजे हें उघड आहे. प्रत्येकानें पशूप्रमाणें रानोमाळ फिरत असावें यापेक्षां ओबडधोबड समाजरचना होऊन कांहींनीं स्वामी व कांहींनीं किंकर व्हावें, ही स्थिति बरी. कारण कशा तरी रीतीनें समाज एकवार अस्तित्वांत आल्याशिवाय, त्यांतील अवयवास त्यापासून होणाऱ्या सुखाचा लाभ होऊं लागणें अशक्य आहे. पण मनुष्यें समाज स्थापूं लागल्याबरोबर त्यांत जीं शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्यानें इतरांहून श्रेष्ठ असतील त्यांच्या हातीं सत्ता असणें व दुर्बलांना दास्य करावें लागणें हें ज्या दिशेकडे उतार असेल त्या दिशेस पाण्याचा ओघ जाण्यासारखें होय. हा ओघ बंद करून, सर्वांस सारखें, निदान होईल तितकें सारखें, सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणें म्हणजे सुधारक होत जाणें असें म्हणण्यास हरकत नाहीं.*" ही सुधारक होण्याची बिनतोड व्याख्या पाहिली म्हणजे आगरकरांच्या व्यक्ति-वादांत समाजसत्तावादाच्या उत्तम तत्वांचा पूर्ण अंतर्भाव झालेला आहे हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें देशांत राजसत्ता कोणत्या प्रकारें असावी याचाही निर्णय वरील विवेचनावरून आपोआप लागतो. आणि ज्या तत्वामुळें आगरकरांना राजसत्ता अमुक प्रकारची असावी असें वाटत होतें त्याच तत्वामुळें निव्वळ सामाजिक बाबतींतही सुधारणा होणें त्यांना इष्ट वाटत होतें.

---

* नि. सं. भाग १, पृष्ठें ४१–४२.

स्वातंत्र्य, संमति आणि समता हीं त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक इत्यादि सर्व व्यवहारांत सारखीच पाहिजे होतीं आणि ही त्यांची विचारसरणी महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत अपूर्व आहे यांत शंका नाहीं.

६. उपरोक्त तत्त्वांवरून व्यवहारांत सुधारणेचे निरनिराळे सिद्धांत अस्तित्वांत येतात ते कधीं कधीं वरील तत्त्वें मान्य आहेत असें म्हणणाऱ्यांनाही क्रांतिकारक आणि भयप्रद वाटतात. पण ज्यांना वरील तत्त्वें मान्य असतील त्यांना ते सिद्धांत त्या तत्त्वांना अनुसरून आहेत व त्यामुळें ते ओघानेंच प्राप्त होतात हें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. " कारण ज्या देशांत किंवा जातींत खऱ्या स्वयंवराची किंवा संमतिपूर्वक विवाहाची चाल आहे किंवा होती असें म्हणतां येईल, त्या देशांत किंवा त्या जातींत बहुभार्यत्वाची चाल असण्याचा संभव नाहीं. तरुण वधूस संमत असेल तो वर वरण्याची परवानगी असेल तर जो पांच चार बायका आधींच करून बसला आहे, व सहावीचें पाणिग्रहण करूं पहात आहे अशास ती कधींही वरणार नाहीं, हें स्पष्ट आहे. बहुभर्तृकत्व आणि बहुभार्यत्व या विवाहपद्धति ज्या देशांत बायका चोरून आणण्याचा किंवा विकत घेण्याचा प्रघात असतो त्यांत विशेष दृष्टीस पडतात. संमतितत्त्वास अनुसरून विवाह होऊं लागले म्हणजे एकपत्नीकत्वच स्थापित झालें पाहिजे. बहुभर्तृकत्व आणि बहुभार्यत्व हीं स्त्रियांच्या निकृष्ट अवस्थेची व त्यांवर होत असलेल्या बलात्काराचीं उत्तम दर्शक आहेत!*" "बालविवाहावरून कन्येचा आणि मुलाचा विक्रय करण्याचा हक्क आईबापांस आहे असें अप्रत्यक्ष रीतीनें सिद्ध होतें. "¶ " ( बहुभार्यकत्वाची चाल ) नाहींशी होण्यास मुख्य कारण बलात्काराचा ऱ्हास आणि समताप्रस्थापक संमतितत्त्वाचा उदय. लढाया कमी होऊन स्त्रीपुरुषांची संख्या सारखी होऊं लागली, व उद्योगवृद्धि होऊन श्रमविभागाची आणि श्रमानें उत्पन्न केलेल्या जिन्नसांची अदलाबदल करण्याची पद्धत पडूं लागली, म्हणजे एकपत्नीक विवाह अधिकाधिक होत जाऊन स्त्रियांवर कमी बलात्कार होऊं लागतो. "‡ " सुखोपभोगासाठीं सर्व प्राणिमात्र धडपडत असतो व ज्यास जो प्राप्त होईल त्यानें त्यापासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे. पण ज्या सुखोपभोगामुळें निरं-

* नि. सं. १, पृष्ठ ४७. ¶ नि० सं० १, पृष्ठ ४९. ‡ नि० सं० १, पृष्ठ ५०.

तर तो घेतां येण्याची शक्यता नाहींशी होते; बुद्धीस मांद्य येतें, गात्रें निःसत्व होतात; उत्साह नाहींसा होतो; आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो, अशा सुखोपभोगांत निमग्न असण्यांत काय फायदा आहे बरें ? *" यावरून सुखाची कल्पना आगरकरांची भौतिक किंवा केवळ शारीरिक नसून आध्यात्मिक कशी होती हें ध्यानांत येतें. " विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते काय-मचे नव्हत. हळू हळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावीं लागून, साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे; व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येईल. येवढें खरें आहे कीं, कांहीं झालें तरी सर्वांच्या बुद्धि सारख्या तीव्र होतील व पाहिजे त्या कामांत पाहिजे त्याला पडतां येऊन तें उत्तम रीतीनें वठवितां येईल, असें पूर्णपणें होण्याचा संभव फार थोडा आहे. तथापि प्रस्तुत कालीं निरनिराळया वर्गांतील लोकांत व स्त्री-पुरुषांत जें विलक्षण अंतर दृष्टीस पडत आहे तें पुष्कळच संकुचित करतां येणार आहे; आणि ज्या देशांत तें तसें करण्याचा प्रयत्न झपाट्यानें चालत राहील तेच देश अखेरीस तगतील; बाकीचे, सर्वत्र जो जीवनार्थ कलह मोठ्या निकरानें चालला आहे त्यांत, भांडतां भांडतां नाहींसे होतील. यासाठीं ज्यांना हें अस्तित्वतत्व स्पष्टपणें कळून आलें असेल, व ज्यांच्या मनांत कर्तव्यबुद्धि व परोपकारबुद्धि पूर्णपणें जागृत झाली असेल त्यांनीं, आपापल्या देशाचा जीवनार्थ कलहांत टिकाव लागण्यासाठीं, रात्रंदिवस निरपेक्षबुद्धीनें झटलें पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून जे स्तब्ध राहतील त्यांच्या माथ्यावर देशास विपद्दशा आणिल्याची, आणि त्याचः नाश अपरिहार्य केल्याची, भयंकर जबाबदारी येणार आहे. म्हणून......जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरें म्हणून घ्यावयाचें असेल, व तुमची आज जी स्थिति आहे तीहून तुमच्या मुलांची व नातवंडांची स्थिति अधिक वाईट होऊं नये अशी तुम्हांस वास्तविक इच्छा असेल तर ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगाप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों

* नि. सं. १, पृष्ठ ५६.

वर्षे फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय."*

या ठिकाणीं आगरकरांनीं समतेची व्याख्या फार उत्कृष्ट प्रकारें देऊन समतेपासून समाजसुधारणेकडे जाणें हें कसें अपरिहार्य आहे याचें उत्कृष्ट निरूपण केलेलें आहे. पण असें करण्याला धैर्य लागतें, पुरुषार्थ लागतो आणि म्हणून आगरकर म्हणतातः—"आसमंतांतील वस्तुस्थितीच्या आधीन होऊन ती नेईल तिकडे जाणें यांत कोणताही पुरुषार्थ नाहीं." आणि हा पुरुषार्थ संपादन करणें, प्रतिकूल परिस्थितीशीं नेटानें टक्कर मारून तिला अनुकूल करून घेणें, निदान तसें करण्यासाठीं प्रयत्नाची पराकाष्ठा करणें हा तर त्यांच्या शिकवणीचा आधारभूत सिद्धांत आहे. आणि ही प्रयत्नांची परमावधि करणें, हा उद्योगयोग आचरणांत आणणें, याची मुख्य जबाबदारी तरुण मंडळीवर आहे हें वर्णन करतांना आगरकरांच्या अगोदरच सरस असलेल्या वाणींत स्फूर्तीचा प्रत्यक्ष संचार झाल्यासारखा वाटतो. त्यांची विज्ञापना, त्यांची हांक, तरुणांना आहे; तरुणांना—"ज्यांच्यावर अद्यापि संसाराचा भार पडलेला नाहीं; ज्यांच्याकडे पितृत्वाचा अधिकार अद्यापि आलेला नाहीं; नवीन ज्ञान संपादण्याचें व विचार कायम करण्याचें ज्यांचें वय अद्यापि गेलें नाहीं; ज्यांच्या ईर्षेला पराभव ठाऊक नाहीं; ज्यांची हिंमत कशानेंही खचलेली नाहीं, जगाच्या दुःखमय अनुभवामुळें ज्यांच्या अंतःकरणांत अनौदार्य, संशय, परदुःखपराङ्मुखता आणि परहितौदासिन्य यांचा प्रादुर्भाव झाला नाहीं—" अशा तरुणांना 'स्वहितकर व राष्ट्रहितकर' कार्यांत पुढारीपण घेण्याची आगरकरांनीं विनंति केली हें युक्तच होतें. उद्योगाची महती व आवश्यकता वर्णन करतांना आगरकर म्हणतातः—"मनुष्यांच्या आहारवस्तु कष्टसाध्य आहेत व त्यांची उपभोगेच्छा अमर्याद आहे येवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत आल्या म्हणजे त्यांस इतर प्राण्यापेक्षां शेंकडों पट अधिक उद्योग कां केला पाहिजे, हें सहज समजणार आहे. हें ज्यास पक्कें समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाहीं. याशिवाय, निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हें ज्यास कळलें असेल तो तर स्वतः उद्योगी होईल इतकेंच नव्हे तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील.

* नि. सं. १, पृष्ठ ५८.

विशेप उद्योगी मनुष्याचें सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य चालविणें शक्य आहे. पण कोणत्याही कारणानें उद्योगी मनुष्याशीं गांठ पड-ल्यास, एक तर त्याच्याप्रमाणें उद्योग करण्यास, किंवा त्याच्या अधीन होऊन तो ठेवील त्या स्थितींत राहण्यास, तयार झालें पाहिजे. सध्यां आम्हां निरुद्योगी हिंदु लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशीं गांठ पडली आहे. तेव्हां एक तर आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे, किंवा ते ज्या स्थितींत ठेवतील त्या स्थितींत राहण्यास सिद्ध असलें पाहिजे. आमचें भावी स्वातंत्र्य अथवा आमचें निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे. "* उद्योगयोगाचें हें वर्णन इतक्या निःसंदेह आणि अंतःकरणाची खात्री पटवि-णाऱ्या शब्दांत दुसऱ्या कोणी केलें आहे असें वाटत नाहीं. या वर्णनावरून आर्थिक सुधारणेच्या मुळाशीं आगरकरांच्या मतें कोणतें तत्व होतें हें लक्षांत येतें व सुधारणा शब्दाची व्याप्ति त्यांनीं व्यक्तीच्या व राष्ट्राच्या संसारांतील प्रत्येक व्यवहाराला कशी नेऊन भिडविली होती हें समजून येतें. उत्पादक उद्योग सर्वांनीं होतां होईल तों केला पाहिजे हें समतेच्या तत्वामुळें ओघानेंच येतें. "केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते तो विशेष सुखी असतो.‡" "अंमलदार वाजवीपेक्षां अधिक झाल्यानें उत्पादक रयतेचें दोन प्रकारांनीं नुकसान होतें. एक, त्यांच्या पगारासाठीं तिला आपल्या प्राप्तीचा बराच वांटा द्यावा लागतो. दुसरें, त्यांच्या जुलुमामुळें केलेलें उत्पन्न आपल्या हातीं लागेल किंवा नाहीं, अशाविषयीं तिला संशय येऊं लागतो, व या दोन कारणांमुळें उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसें झालें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होतें. हाच परिणाम सरकारी अंमलदाराशिवाय इतर प्रका-रचे अनुत्पादक लोक वाढल्यानेंही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीति-प्रसारक, फाजील शिक्षक, फाजील अडते, फाजील लेखक ( पत्रकर्ते, पुस्तककर्ते वगैरे) फाजील वकील, फाजील राज्यकारस्थानी, या सर्वांच्या फाजीलपणांत म्हणजे त्यांची वाजवीपेक्षां संख्या ज्यास्त होण्यांत कष्टाळू रयतेचा फार तोटा आहे. ¶" हे सिद्धांत किती पायाशुद्ध आहेत याचें उत्कृष्ट प्रत्यंतर म्हणजे ते सुधारलेल्या जगांतील सर्व अर्थशास्त्रज्ञांना व समाजसुधारकांना पूर्ण मान्य झालेले आहेत हेंच होय.

* नि. सं. १, पृष्ठ ८४. ‡ नि. सं. १, पृष्ठ ८५. ¶ नि. सं. १, पृष्ठ ८६.

आणि या सिद्धांतांच्या अनुराधानें आगरकर पुढें विचारतातः—"आमच्या इकडील अलीकडल्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेवल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे. बरें, हाडांचीं काडें करून, शेंकडों रुपये खर्च करून, बी. ए. पर्यंत अभ्यास करावा; आणि पुढें फळ काय ? तर रेव्हेन्यू खात्यांत किंवा शाळा खात्यांत ३०।३५ रुपये दरमहाची नोकरी ! चांगला सुतारसुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५। ३० रुपये सहज मिळवितो हें या ग्रॅज्युएटांस समजूं नये काय ?...... कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय ? विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे ? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आतां कोठें राहिली आहे !" * हे शब्द ज्यांचा बाणा आजन्म स्वतंत्रतेचा होता त्या आगरकरांच्या लेखणींतून उतरलेले असल्यामुळें अर्थात् "परोपदेशे पांडित्यं" या कोटींत जात नाहींत. औद्योगिक प्रगति स्वतःच्या उद्योगावर अवलंबून आहे हें तत्व विसरून किंवा जाणून बुजून दृष्टिआड करून अलीकडे कांहीं स्वार्थपरायण व उद्योगशून्य व्यापारी लोकांनीं व त्यांच्या कच्छपीं लागलेल्या कित्येक अक्कलशून्य धुरीणब्रुवांनीं सरकारच्या मदतीशिवाय कोणताही धंदा केव्हांही उदयाला येणार नाहीं असा आरडा चालविला आहे व या युक्तीनें ते आपली उद्योगहीनता व स्वार्थत्यागपराङ्मुखता झांकूं पहात आहेत. त्यांच्या रोगट विचारसरणीला आगरकरांच्या विचारासारखें गुणावह जालीम औषध मिळणार नाहीं. आगरकरांनीं स्वदेशी धंद्याला उत्तेजन द्या म्हणून सरकारचा कान धरण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. वेळीं प्रसंगीं सरकारी साहाय्य उद्योगधंद्याला मिळावें लागतें. पण औद्योगिक उन्नतीची गुरुकिल्ली लोकांच्या उद्योगांत मुख्यत्वेंकरून आहे. सरकारी मदत त्याला पोषक होईल, पण मूळ लोक उद्योगी असलेच पाहिजेत ही गोष्ट आगरकरांनीं अनेक वेळां प्रतिपादन केली याचें कारण त्यांची सर्वच सुधारणा आत्मनिष्ठ होती, अंतर्मुख होती, स्वाधीन होती, स्वतंत्र होती; परावलंबी आणि परवश नव्हती. कोणत्याही बाबतींत प्रसंगानुसार सरकारी साहाय्य घेण्याला आगरकर विरुद्ध नव्हते. पण

* नि. सं. १, पृष्ट ८६–८७.

त्या साहाय्याचें फाजील स्तोम त्यांनीं केव्हांही माजविलें नाहीं. संमतिवयाच्या कायद्यासंबंधीं रणें माजलीं होतीं त्या वेळीं सुद्धां हिंदुस्थानांत या बाबतींत कायद्याची आवश्यकता परिस्थितिमुळें प्राप्त झाली होती हें त्यांनीं वरचेवर स्पष्ट सांगितलें आहे व त्याच दृष्टीनें परदेशी कापडावर जकात बसविण्यासाठीं सरकारनें निश्चय केला पाहिजे व तसें न करणें म्हणजे हिंदुस्थानाचा कापडबाजार मँचेस्टरवाल्यांच्या कबजांत जाणून बुजून देण्यासारखें असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. पण सामाजिक बाबतींत जशी आचारशुद्धता त्याप्रमाणें औद्योगिक बाबतींत उद्योगपूर्णता अगदीं मूळभूत आहे या त्यांच्या सिद्धांताला त्यामुळें बाध येत नाहीं हें उघड आहे.

७. केवळ ज्ञान झालें, वस्तुस्थितीचा उमज पडला कीं कार्यभाग संपत नाहीं. त्या ज्ञानाचें पर्यवसान आचरणांत झालें पाहिजे. नाहीं तर ढोंग बळावतें व समाजांत प्रामाणिकपणापेक्षां ढोंगीपणाला मान्यता मिळावयास लागून ढोंगी लोक समाजाचे शास्ते बनतात आणि त्यामुळें समाज अधोगतीला जातो. "......प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें देतां येणें अशक्य असल्यामुळें, त्यांनीं ( अज्ञ लोकांनीं ) आश्चर्यजनक दृग्विषयाविषयीं हवे तसे तर्क लढवून, त्यासंबंधानें आपल्या शोधक मनाची हवी तशी समजूत घालून घ्यावी, आणि त्या समजुतीच्या अनुरोधानें आचरण करावें, हें त्यांच्यासंबंधानें अगदीं स्वाभाविक आहे, व त्याबद्दल त्यांस अणुमात्र दोष लावतां येणार नाहीं; कारण तसें केल्याखेरीज त्यांस गत्यंतरच नाहीं. पण ज्या लोकांस या विषयाचें खरें ज्ञान झालें आहे, त्यांनींही त्यांच्याप्रमाणेंच वर्तन करणें म्हणजे अमूढ असून मूढाप्रमाणें आचरण करणें होत नाहीं काय? कोणी असें म्हणतील कीं......ज्ञान अद्यापि जितकें पसरावें तितकें पसरलें नाहीं. त्यामुळें सध्यांचा वेडेपणाचा प्रकार दृष्टीस पडतो. या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, कोणत्याही विषयाच्या संबंधानें कितीही ज्ञान वाढलें व लोकांत त्याचा कितीही प्रसार झाला, तरी जुन्या पद्धति सोडून देऊन तदनुसार नव्या पद्धतीनें वागण्याचें धैर्य आल्याशिवाय, ज्ञानाच्या वृद्धीपासून किंवा त्याच्या प्रसारापासून म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं."* "अमुक गोष्ट अमुक रीतीनें घडत नाहीं, अमुक रीतीनें घडते, असें ज्यास पक्कें समजून आलें आहे तो जर लोकांचा

* नि. सं. १, पृष्ठ ८८.

गैरसमज दूर करण्याचें धैर्य न करील, तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार होऊन सुधारणा व सुखवृद्धि कशी व्हावी? आपल्या इकडील तत्ववेत्यांत आणि शास्त्रज्ञांत एक मोठा दोष दिसून येतो तो हा कीं, त्यांना आपल्या समजुतीप्रमाणें आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होत नाहीं. 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' अशा पद्धतीनें आमच्यांतील विद्वान् म्हणविणाऱ्यांचें वर्तन बहुधा होत असल्यामुळें दुर्मति, दुराग्रह आणि दुष्ट चाली यांचें ठाणें या देशांत कायम झाल्यासारखें झालें आहे. बाकी ज्या देशांत भास्कराचार्यांसारखे ज्योतिषी होऊन गेले, त्या देशांत अजूनपर्यंत चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण आलें असतां कांहीं वेळ थंड पाण्यांत निष्कारण बुड्या मारण्याची, उपवास करण्याची, भलभलत्या वस्तूंचीं दानें करण्याचीं, मूर्खपणाच्या मंत्राचा जप व सिद्धि करण्याच्या फंदांत पडण्याची, पापडलोणच्यावर व दहींदुधावर तुळशीपत्रें घालीत बसण्याची, आणि जणूं काय आपणांस सुतक्यानेंच स्पर्श केला आहे असें समजून, स्त्रीपुरुषांनीं धोत्रांपात्रांसकट डोक्यावरून पाणी घेण्याची चाल अजूनपर्यंत दृष्टीस पडावी काय? पण आमच्या भास्कराचार्यांसच हा प्रकार अप्रशस्त म्हणण्याची छाती कोठें होती? भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व फक्त वेधशाळेंत! आचार्य तिच्या बाहेर पडले कीं, 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नो करणीयम् नाचरणीयम्' या उपदेशाचे अनुयायी! ग्यालीलीओ कोपर्निकसादि यूरोपीय ज्योतिर्विदांनीं अशा प्रकारचेंच आचरण केलें असतें तर यूरोपांत ज्ञानरवीचा प्रकाश फांकून अज्ञानतिमिराचा विध्वंस झाला असता काय, व आज त्या खंडास जो सुदिन प्राप्त झाला आहे तो होता काय? तसें इकडे व्हावें अशी इच्छा असेल, तर लोकापवादाचें भय टाकून, आपल्या मनास शुद्ध दिसेल तें लोकांस सांगण्याचें, व तदनुसार वागण्याचें धैर्य केलें पाहिजे; आणि तसें पुष्कळांकडून होऊं लागलें तरच अज्ञानराहूनें ग्रासलेल्या या आमच्या हतभाग्य देशाचें ग्रहण लौकर सुटणार आहे!"*

यावरून वाणी आणि करणी यांच्या साहचर्याबद्दल आगरकरांचा कटाक्ष केवढा होता हें दिसून येतें. शिवाय त्यांच्या तीव्र टीकास्त्राचा ओघ भाविक, अज्ञान लोकावर नसून जाणत्या पण ढोंगी लोकांवर होता हें स्पष्ट होतें. अज्ञानांना आणि भाविकांना आगरकरांनीं आपल्या टीकेचें विषय केलें नाहीं हें रास्त होतें.

* नि. सं. १, पृष्ठ ९०.

त्याचप्रमाणें जाणत्या पण ढोंगी लोकांवर कोरडे ओढतांना त्यांनीं न्यायनिष्ठुरतेचें अवलंबन केलें हें अगदीं योग्य होतें. जाणून बुजून लबाडी करणाऱ्या ढोंगी लोकांसंबंधीं दया दाखविणें म्हणजे आपण त्यांच्यापैकीं एक आहोंत असें सिद्ध करणें होय. अशांची संख्या जगांत फार असते आणि त्यामुळें ढोंगाला, दुटप्पीपणाला, लबाडीला, शिष्टाचाराचें स्वरूप आलें आहे हें खरें. पण त्यासाठींच जो कोणी अशा शिष्टांचें खरें स्वरूप आविष्कृत करून त्यांच्यावर आपल्या टीकेचा भडिमार रोखून त्यांची दाणादाण करतो त्याच्या धैर्याची व सत्यप्रियतेची तारीफ करावी तेवढी थोडी होणार आहे. असल्या ढोंगी लोकांच्याबरोबर ढोंगी बनून लोकांत मान्यता संपादणें हें हलक्या माणसालाही साधतें. बुद्धिवान् माणसाला तर तें साधण्याला मुळींच अवधि लागत नाहीं. पण आगरकरांच्या कार्याचा मुख्य रोख ढोंगाचें उच्चाटण करून शुद्ध व सत्य आचरणाची द्वाही फिरवण्याचा होता आणि अर्थात् त्यांनीं ढोंगी लोकांना आपल्या टीकेच्या मारानें अगदीं जर्जर करून सोडलें व सामान्य जनतेचा त्यांवरील विश्वास उडविला. फार तर काय, सारें जग जरी ढोंगाच्या बाजूला झालें तरी आपण विवेकास पटलेल्या तत्वांचें समर्थन करणार असा त्यांनीं चंग बांधला होता; व एका विशिष्ट प्रकृतीच्या लोकांत ते अप्रिय झाले होते यांतील बीज तरी हेंच आहे. "सभ्यपणाची मर्यादा न सोडतां समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्यानें उघडपणें बोलून दाखविणें यांतच समाजाचें कल्याण आहे"* हें त्यांना पूर्णपणें पटलेलें होतें. "आम्हांस जें बरें दिसत आहे तें आम्हीं कां न बोलावें, हें आम्हांस समजत नाहीं. ज्या कारणांनीं आमच्या देशाच्या पाठीमागें आज कित्येक युगें दास्यचक्र लागलें आहे; ज्या कारणांनीं आमच्या आंगीं स्त्रैण्य आलें आहे; ज्या कारणांनीं आमची संसारयात्रा अत्यंत नीरस किंवा कष्टावह झाली आहे; ज्या कारणामुळें इतर राष्ट्रें आमची छीः थूः करीत आहेत, व ज्या कारणामुळें आम्ही बुद्धीनें, नीतीनें व शरीरसामर्थ्यानें अधिकाधिक क्षीण होत असून थोड्या वर्षांत आमचा मुळींच मागमूस नाहींसा होईल कीं काय अशी भीति वाटत आहे, तीं कारणें अल्प समजुतीच्या, कोत्या विचाराच्या, स्वार्थी, भेकड किंवा मत्सरी लोकांच्या दूषणाला भिऊन उघड सांगण्यास कचरणारे सारेच होतील तर या भारतीय समाजाचें किंवा

* नि. सं. १, पृष्ठ १०२.

त्यांतील कोणत्याही व्यक्तीचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं. पाण्याच्या धारेस लागलेली नाव झपाट्यानें खालीं जाऊं लागली असतां, तींतील एका व्यक्तीसच कोणत्याही तीरास कसें लागतां येणार? समाज सोडून दिल्या-खेरीज त्याच्या उन्नतीचे व अधोगतीचे वांटेकरी न होणें हें अशक्य आहे. तेव्हां केवळ स्वार्थदृष्टीनें जरी या गोष्टींचा विचार केला तरीही हें कबूल करावें लागतें कीं, ज्याच्या मनांत समाजांत राहून आपली उन्नति करून घ्यावी अशी उत्कट इच्छा झाली असेल, त्यानें अगोदर समाजाची उन्नति करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजच खालीं खालीं जात असेल तर हाच वर कोठून येणार?"*

लोकांना बरोबर घेऊन आम्हांला जावयाचें आहे म्हणून आम्ही सामाजिक सुधारणेला विरोध करतों असें म्हणणाऱ्यांना यापेक्षां चोख आणि सणसणीत उत्तर देतां येणें कठीण आहे. लोकांना बरोबर नेणाऱ्यांनीं तर सुधारणेचा हव्यास अधिक धरला पाहिजे. पण लोकांना बरोबर नेतों हें म्हणणें तरी एक जबरदस्त ढोंग आहे. जसे कांहीं सुधारक म्हणविणारे आपल्या धैर्यहीनतेचें खापर घरच्या म्हाताराम्हातारीच्या हठवादीपणावर फोडतात त्याप्रमाणें लोक-मान्यतेच्या मागें लागलेले लोकगंगेचे हे पंडे आपल्या पंडेगिरीचा धंदा लोकांना बरोबर नेण्याच्या मिषानें झांकण्याचा यत्न करतात. अशा लोकांच्या संबंधींच आगरकर म्हणतात, "पण आजपर्यंत जो विद्याप्रसार झाला आहे त्यामुळें म्हणण्यासारखा क्रियाप्रवृत्तीचा प्रादुर्भाव" आमच्यांत झाला नाहीं. "ज्याच्या त्याच्या तोंडावाटे स्वातंत्र्याच्या वृथा वल्गनांचा अहोरात्र घोष चालला आहे! सत्क्रियेच्या नांवानें मात्र आंवळ्याएवढें पूज्य!"‡ हे असले ढोंगी लोक सुधारणेच्या निंदेंत फार भाग घेतात. त्यांचें मोठें यथातथ्य वर्णन आगर-करांनीं सुधारणानिंदकांबद्दल लिहितांना केलें आहे. सुधारणानिंदकांचा पहिला वर्ग म्हणजे "ज्यांना नवीन गोष्टी कळण्याची अक्कलच नाहीं" अशांचा. "वयांत येईपर्यंत कसले बसले जे ग्रह झाले असतील ते यांची जन्माची पुंजी!........यांचें ज्ञान अत्यंत स्वल्प असतांही यांना सर्वज्ञतेची फारच मोठी घमेंड असते, व नवीन विचारांचा व ज्ञानाचा तिरस्कार करण्यांत हे कोणासही हार जाण्यासारखे नसतात." हे लोक दुराराध्य होत. दुसऱ्या प्रकारचे लोक म्हणजे "समंजस पण भेकड." यांच्याबद्दल आगरकरांना अनु-

* नि. सं १, पृष्ठ १०३. ‡ नि. सं. १, पृष्ठ १२०.

कंपा वाटे. "यांना चांगलें काय व वाईट काय, त्याज्य काय व संग्रहणीय काय, हें समजत असतें, पण जें योग्य वाटत असेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य यांच्या अंगीं बिलकुल नसतें. ते लोकापवादाच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले असतात. डोळे बांधलेला तेल्याचा बैल ज्याप्रमाणें घाण्यासभोंवतीं एकसारखा फेऱ्या घालीत असतो, त्याप्रमाणें हे पोटांत ज्ञान असूनही लोकलज्जेमुळें अंध होऊन पूर्वापार चालत आलेल्या रूढींचे व विचारांचें लोण पुढल्या पिढीपर्यंत पोंचवीत असतात! एकीकडे तुम्ही यांच्याशीं वाद करीत असलां तर ते असें कबूल करतील कीं, तुमचें म्हणणें बरोबर आहे, व तदनुसार लोकांचें वर्तन होऊं लागल्यास, त्यांत त्यांचें कल्याण होण्याचा संभव आहे. पण असलें काम करण्यास आम्ही प्रवृत्त होणार नाहीं, व असल्या गोष्टींचा उघडपणें स्वीकार करण्याचें धैर्य आमच्या अंगीं नाहीं असें ते तुम्हांस साफ सांगतील. असले लोक बहुशः दुसऱ्यांच्या आचारांविषयीं व विचारांविषयीं उदासीन असतात पण आणीबाणीचा प्रसंग आल्यास हे आपल्या विचारशक्तीस गुंडाळून ठेवून, पहिल्या प्रकारच्या अज्ञान, अविचारी व आग्रही लोकांचें अनुगमन करितात." × या भेकड लोकांवरही आगरकरांनीं एवढा धडाका उडविलेला नाहीं; कारण जो आपला भेकडपणा आपण होऊन कबूल करतो त्याच्या नाकांत काड्या घालण्यांत काय अर्थ? पण सुधारणानिंदकांचा तिसरा म्हणजे ढोंगी लोकांचा वर्ग यावर आगरकरांनीं जे कोरडे ओढले आहेत ते मोठे उत्कृष्ट व परिणामकारक आहेत. "सुधारणानिंदकांचा आणखी एक प्रकार आहे तो मात्र अतिशय खडतर आहे, असें म्हणणें भाग आहे. यांतील लोक पहिल्याप्रमाणें मूढ नसतात व दुसऱ्याप्रमाणें भेकड नसतात. बरें वाईट यांस कळत असतें, व उचित दिसेल तें करण्याचें किंवा बोलण्याचें धैर्य यांचे अंगीं असत नाहीं, असेंही मानतां येत नाहीं. असें असतां सुधारणेस या लोकांकडून जितका अडथळा होतो तितका दुसऱ्या कोणाकडूनही होत नाहीं. हा होण्याचें कारण यांची अमर्याद स्वार्थपरायणता. इला तृप्त करण्यासाठीं हे काय करतील आणि काय करणार नाहींत, हें ब्रह्मदेवाला देखील सांगवणार नाहीं! यांची स्वार्थपरायणता म्हणजे यांचा द्रव्याभिलाषच नव्हे. यांना नुसता पैशाचाच हव्यास असता व त्यांच्या आंगीं तेवढाच दुर्गुण असता तर त्यांचें वर्तन जितकें निंद्य

× नि. सं. १, पृष्ठ १२३

होत आहे तितकें कधींच होतें ना. त्यांची स्वार्थपरायणता पराकाष्ठेची व्यापक आहे. कोणतीही गोष्ट कितीही चांगली असली, तरी जर तीपासून त्यांचें कोणत्याही प्रकारचें यत्किंचित् नुकसान होण्याचा संभव असला, तर ते, ती हाणून पाडण्यासाठीं आकाशपाताळ एक करून सोडण्याचा प्रयत्न करतील! यांच्या वर्तनाचा बराच भाग लबाडीचा असतो. पूजा अर्चा वगैरे सारे धर्मविचार झूट आहेत अशी यांची पक्की खातरी झाली असून, हे प्रतिदिवशीं तास दोन तास संध्याब्रह्मयज्ञांत घालवतील; सर्वांगाला भस्म फांसून घेतील; श्रावणीचे दिवशीं शर दोन शेर पंचगव्य पितील व नखशिखांत शेणमाती चोपडतील! चौदा वर्षांच्या पोराचे गळयांत आठ वर्षांच्या पोरीचें लोढणें बांधणें म्हणजे त्याची सर्व प्रकारची पुढील गति खुंटविणें होय, हें यांस पक्कें समजत असून कर्ज काढून अल्पवयस्क पोरी विकतील व मनासारखी किंमत आल्यास आपले पोरगे विकत देतील! स्वतःच्या घेऱ्याचा किंवा मिशीचा एक केंस फाजील कापला गेला तर जे नित्याच्या न्हाव्यावर वाघासारखे चवताळून जावयास सोडावयाचे नाहींत, व मातापितरांपैकीं एखाद्याचा अंत होऊन, आपल्या मुखभूषणावर स्वल्पकालीन गदा आली, तर ज्यांस मरणप्राय दुःख झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं, अशा या लोकांना घरीं आलेल्या सुनेस किंवा मुलीस जवळचे पर्व साधून जबरीनें न्हाव्याच्या ताब्यांत देण्यास काडीएवढें देखील वाईट वाटावयाचें नाहीं. चोरटेपणानें हे पाहिजे तसलीं कुकर्मे करतील. एकांतांत किंवा ठरीव कंपूंत इंग्रजी भाषेंतील ब्रांडी या शब्दांतून निघणाऱ्या व्यंत त्रयीपैकीं कोणतीही वस्तू यांना कदाचित् वर्ज असणार नाहीं; पण समाजांत हे अपेयपानाचा, अगम्यगमनाचा व अभक्ष्यभक्षणाचा इतका तिटकारा दाखवितील कीं, तो पाहून एखाद्या भोळसटास हे शुद्धत्वाचे खंदकच आहेत कीं काय असा भास होईल! तात्पर्य, बहुजनसमाजाकडून 'शाबास' म्हणवून घेण्यासाठीं व आपल्या मिळकतीस धक्का पोंचूं न देण्यासाठीं दंभ, निष्ठुरता व अविचार यांचा हे किती अवलंब करतील, हें सांगतां येणें अशक्य आहे." *

दांभिक लोकांवर हा उडविलेला धडाका विकारवश नसलेल्या कोणत्याही वाचकाला तन्मय करून सोडल्याशिवाय रहात नाहीं व ज्यांच्यावर हा उड-

* नि. सं. १, पृष्ठ १२३-२४.

विला आहे ते दांभिकसुद्धां हें आपलें पूरेपूर काढलेलें चित्र पाहून क्षणभर चकित झाले असतील यांत नवल नाहीं. अशा लोकांना आगरकर विचारतातः—"दारू पिणारांस, मांस खाणारांस; पार्शी, मुसलमान किंवा ख्रिस्ती यांचे घरीं अन्नोदक सेवन करणारांस, प्रसिद्धपणें घरांत अंग-वस्त्रें बाळगणारांस व गटारांत पडणारांस, आणि उघडपणें हाटेलांत पुख्खे झोडणारांस अपंक्त कां करीत नाहीं? पण तुमची अशी समजूत झाली आहे कीं, कोणी प्रतिवर्षीं पळीभर पंचकव्य आनंदानें घेईल; अंडीं, ब्रँडी व गरज पडल्यास गोमांसाचा अर्कंदेखील केवळ औषधासाठीं घेतों म्हणून म्हणेल; वर्षांतून एकदां किंवा दोनदां दहा पांच भटांस पुडीला बोलावून चांगलीशी दक्षिणा देण्यास तयार असेल; विशिष्ट आप्त वारल्यास किंवा कोणत्याही कारणानें एखाद्या मोठ्या क्षेत्रीं गेल्यास क्षौर करून घेण्यास नाखूष नसेल; सारांश, जो धर्माचें ढोंग करण्यास आणि भिक्षुकांचीं तोंडें दाबण्यास कबूल असेल त्यानें हवे ते अनाचार खुशाल करावे; त्याला तुम्ही धर्मोल्लंघनाबद्दल दोष देणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर असल्या भोंदूस धर्मरक्षक समजून त्याच्या पायावर लोटांगणें घालाल, त्याचे स्तुतिपाठ व पवाडे सकाळ संध्याकाळ गाल, छबिना काढून त्याची मिरवणूक कराल, व त्याचा स्वार्थ बाहेर न पडेल तर धर्माच्या नांवावर त्याला पाहिजे तें करूं द्याल इतकेंच नाहीं तर आंधळ्याप्रमाणें त्याचा हात धरून तो नेईल तिकडे जाण्यास किंवा खाड्यांत लोटून घेण्यासही राजी व्हाल!"* हें वर्णन इतकें सत्य होतें कीं तें लोकांच्या मर्माला जाऊन भिडलें व ज्या 'कपटपटु' लोकांचें नाटक याप्रमाणें पडद्याबाहेर आलें त्यांना आगरकरांना खाऊं कां गिळूं असें झालें. आगरकरांची निंदा करण्यांत ज्यांनीं भाग घेतला ते हेच लोक किंवा या लोकांच्या मान्यतेनें मिंधे झालेले पुढारी! आगरकरांच्या शिकवणींत ढोंगाचा जो धिःकार केलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे आणि त्याचें परिशीलन जितकें अधिक करावें तितकें अधिक कल्याणदायक होणार आहे.

आगरकरांना ढोंग नको होतें तें केवळ सामाजिक बाबतींतच नव्हे तर राजकीय बाबतींतही नको होतें. सरकारच्या धोरणामुळें हिंदुस्थान देशास दारिद्र्य येत चाललें आहे व तें धोरण न बदलल्यास त्याचा परिणाम फार भयंकर

* नि. सं. १, पृष्ठ ५५.

होईल अशी स्पष्ट सूचना राज्यकर्त्यांस त्यांनीं अनेक वेळां दिली आहे. "हिंदुस्थानच्या कालीचें उत्पन्न सुमारें वीस कोटी रुपये आहे, व तेवढाच लष्करी खात्याचा खर्च आहे. हिंदुस्थानच्या सैन्याइतकें महागडें सैन्य दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं, व या सैन्यावर होणाऱ्या धिप्पाड खर्चांचा बराच भाग हिंदु(स्थानच्या) लोकांच्या खिशांत पडत नाहीं. जवळ जवळ याचप्रमाणें इतर खात्यांचीही व्यवस्था आहे. त्यामुळें हिंदुस्थानच्या पाऊणशें किंवा ऐशीं कोटी उत्पन्नापैकीं सुमारें दोन तृतियांश उत्पन्नापासून आम्हांस द्रव्यद्वारा कवडीचाही मोबदला मिळत नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असा प्रकार एक वर्ष नाहीं, दोन वर्षें नाहीं, सुमारें शंभर वर्षें चालला आहे. या शंभर वर्षांत हिंदुस्थानचें उत्पन्न सरासरीनें चाळीस कोटी पडलें असें धरिलें, आणि त्याचा फक्त अर्धा भाग प्रतिवर्षीं इंग्लिश लोकांच्या खिशांत अचानक पडला असें मानिलें, तरी एका शतकांत दोन निखर्व रुपये या देशांतून परदेशांत गेले, असा हिशेब होतो. ज्या देशाच्या द्रव्याला असा पाझर लागला आहे त्या देशांतील लोकांना अन्नान्न दशा प्राप्त होणें हें किती स्वाभाविक आहे ? इंग्रजी राज्यापासून या देशावर घडणाऱ्या या भयंकर परिणामाची पुरी कल्पना ज्यांच्या मनांत पक्की बिंबली असेल, त्यांना आणखी पांच पंचवीस वर्षें असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानांतील लोक एकमेकांस खाऊं लागतील, किंवा भुकेच्या दुःसह यातनांमुळें बेफाम होऊन जाऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचें जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील, असें डोळ्यांपुढें ढळढळीत दिसून आल्यावांचून राहील काय ? व ज्यांच्या अंतःकरणांत खऱ्या देशाभिमानाचा व खऱ्या मनुष्यपणाचा कांहीं अंश आहे, त्याला ही गोष्ट उघडपणें बोलल्यावांचून राहवेल काय ?" * तेव्हां देशाची स्थिति सर्व बाजूंनीं सुधारण्यासाठीं विचार, उच्चार व आचार हे सर्व स्वतंत्रपणें व शहाणपणानें होणें आवश्यक आहे हा त्यांच्या शिकवणीचा मुख्य रोख होता. "पृथ्वीवर आजपर्यंत जे स्वतंत्र व सुखी देश होऊन गेले आणि आजमितीस ज्या देशांत तीं सुखें नांदत आहेत, त्या देशांत मधून मधून स्वतंत्रपणें विचार करणारे अनेक पुरुष होऊन गेले व होत आहेत, हें स्पष्टपणें दाखवितां येणार आहे. अशा पुरुषांकडून वेळोवेळीं बऱ्यावाईटाची चर्चा झाल्याखेरीज कोणत्याही देशाची प्रगति होण्याचा संभव

* नि. सं. १, पृष्ठ १८५.

नाहीं. अपसर्गकारी कारणांचा लय आणि उत्सर्गकारी कारणांची उत्पत्ति व अभिवृद्धि झाल्याशिवाय जिला आपण सुधारणा म्हणतों ती होणार कशी? ज्या गोष्टींपासून त्रास किंवा अडचण होते त्या दूर करणें व ज्यांपासून सौख्य व सोय होते त्या जवळ आणणें याचेंच नांव सुधारणा. तेव्हां चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट कोणत्या, याचा विचार करण्यासच जर कोणी तयार नसेल, व यदा कदाचित् तसें करण्यास कोणी प्रवृत्त झाला असतां त्याची विटंबना होईल, तर चांगल्या वाईटाचें परीक्षण होणार कसें आणि जें चांगलें असेल तें लोकांपुढें येऊन तें त्यांच्या अंगीकारास प्राप्त होणार कसें?"*

मनाला विचार करून प्रशस्त वाटणाऱ्या गोष्टी लोक व राज्यकर्ते यांजपुढें आगरकरांनीं अगदीं निर्भीडपणें मांडल्या सुधारकाच्या या धोरणाचें वर्णन त्यांनीं अगदीं निःसंदेह शब्दांत केलेलें आहे. "या पत्रांत वारंवार येणारी इंग्रज लोकांच्या गुणांची प्रशंसा आणि हिंदु लोकांच्या दुर्गुणांची निंदा पुनः पुनः वाचून कित्येक सुशिक्षित लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं, या पत्राचे चालक पक्के देशाभिमान-शून्य असावे! बापडे असतील कदाचित्! स्वदोषगोपन आणि परदोषाविष्करण ज्याप्रमाणें व्यक्तीला त्याप्रमाणें समुदायालाही स्वभावतः फार प्रिय असतात; आणि म्हणून जो कोणी आपली कुटुंबस्थिति, आपली राज्यव्यवस्था, व आपली धर्मपद्धति यांतील चुका न दाखवितां उलट त्यांवर पांघरूण घालण्याचा किंवा त्यांचें मंडन करण्याचा प्रयत्न करतात आणि परक्यांच्या गुणांचा बहुधा अपलाप करून त्यांच्या दोषांचें अतिशयोक्तीनें वर्णन करतात ते देशाभिमानी म्हणून सामान्य लोकांत ख्याति पावतात. अज्ञ व अविचारी लोकांची अशा प्रकारची तोंडपूजा करून प्राप्त होणारा लौकिक हाच ज्यांचा अत्यानंद होऊन बसला असेल, व असलें नर्मसाचिव्य करणें यांतच खरा देशाभिमान आणि खरें देशहित आहे असें ज्यांस वाटूं लागलें असेल त्यांनीं तो धंदा खुशाल चालवावा. आम्हांस त्या धंद्याची आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या लौकिकाची बिलकुल पर्वा नाहीं. सत्यास जागृत राहून आपणांस जें बरें दिसेल त बरें म्हणणें आणि वाईट दिसेल तें वाईट म्हणणें यांतच खरें हित, खरें कर्तव्य व खरा देशाभिमान आहे अशी आमची पक्की समजूत होऊन गेली असल्यामुळें इंग्लिश लोकांचे गुण गाण्यांत ज्याप्रमाणें स्वदेशाभिमानास लाज आणणारी

* नि. सं. १, पृष्ठ १८७

अशी गोष्ट आमच्या हातून घडते असें आम्हांस वाटत नाहीं, त्याप्रमाणें प्रसंग-विशेषीं त्यांच्या हातून घडणारे प्रमाद उघडपणें बोलून दाखविणें यांतही आमच्याकडून कोणत्याही प्रकारचें अप्रशस्त आचरण होतें, अशी शंका आमच्या मनांत येत नाहीं. आजचा प्रसंग विचारी व माहितगार हिंदू (हिंदी) लोकाग्रणींनीं आमच्या राज्यकर्त्यांच्या हातून जी एक मोठी चूक कित्येक वर्षे घडत आहे व जिचे दुष्परिणाम आम्हांस अलीकडे फारच भोवूं लागले आहेत ती सन्मानपूर्वक पण निर्भीडपणें बोलून दाखविण्याचा आहे. आम्हीं असें केल्यानें ते आपली ती चूक दूर करतीलच असें कोणालाही खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. तथापि तसें करणें हें आमचें कर्तव्य आहे इतकेंच नाहीं, तर आमच्या सुदैवानें आम्हां हिंदूंच्या ( हिंदींच्या ) राजनिष्ठ प्रार्थनांवरून ती चूक त्यांच्या मनांत भरली आणि वेळींच ती दुरुस्त करण्याची बुद्धि त्यांना झाली तर त्यापासून उभयतांचा मोठा फायदा होणार आहे. ते तसें न करतील तर त्यापासून पुढें काय परिणाम घडतील याबद्दल आजच वेडीं वांकडीं अनुमानें करीत बसण्यांत जरी कांहीं अर्थ नाहीं, तरी प्रजेची दारुण दैन्यावस्था कोणत्याही राज्यकर्त्यांस केव्हांतरी विघातक झाल्यावांचून रहात नाहीं, एवढें स्पष्टपणें बोलून दाखविण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं."* यापुढील वाक्य राज्यकर्ते व लोक या दोघांसाठींही आहे. " ज्याप्रमाणें एखाद्या नादी मनुष्यास उंच इमला बांधण्याची बेताल हांव सुटावी, आणि त्यानें तळखांबाचा मगदूर न पहातां मजल्यावर मजला चढवीत न्यावा त्याप्रमाणें कांहीं अंशीं आपल्या राज्यकर्त्यांची सांप्रत स्थिति झाली आहे. इंग्लिश लोकांनीं आपल्या बहादूरीनें आणि आमच्या कमकुवतपणानें हिंदुस्थानचें राज्य आपलेंसें केलें. आमच्यांतील आपापसांतील तंट्यामुळें आणि त्यांच्या धूर्तपणामुळें तें दृढ झालें; त्यांचें राजकौशल्य आणि आमची राजनिष्ठा यांमुळें तें अव्याहत चालत आहे. पण जर कधीं काळीं त्यांचा लोभ अमर्याद झाला आणि आमचें दारिद्र्य असह्य झालें तर ही त्यांनीं इतक्या कष्टानें रचलेली इमारत ढांसळल्यावांचून रहाणार नाहीं हें त्यांच्या हितचिंतकांस व त्यांच्या राज्यवैभवाचें चिरस्थायित्व चिंतणाऱ्यांसही कबूल असलें पाहिजे."‡ यांत इंग्रजांची बहादुरी कबूल करण्यांत जितका मोकळेपणा दाखविला आहे तितकाच त्यांना अतिलोभाचे परिणाम सांगतांना दाख-

* नि. सं. २, पृष्ठ ५०२ ‡ नि. सं. २, पृष्ठ ५०३.

विला आहे आणि इंग्रजांचें राज्य येथें आलें कसें, वाढलें कसें आणि राहिलें कसें याचें केलेलें निदान अत्यंत यथार्थ आहे व तें करतांना स्वजनांतील दोष दाखविण्यांत बिलकुल अनमान झालेलें दिसून येत नाहीं. हिंदुस्थानांत येऊन राज्य चालवावें, बादशाही सत्ता व ऐषआराम भोगावेत आणि शेवटीं "पेन्सल" घेऊन विलायतेंत गेल्यावर त्या "पेन्सली"नें हिंदुस्थानला शिव्या देण्यांत व त्याला " काळें पाणी " म्हणण्यांत कालक्षेप करावा अशा वृत्तीच्या इंग्रजांवर आगरकरांनीं जे विनोदप्रचुर कोरडे ओढले आहेत ते अद्यापिही त्या वेळेइतकेच वाचनीय आहेत. " अनेक हाल सोशीत ज्यांनीं आपल्या रक्तानें एवढी पादशाही येथें स्थापिली, त्यांच्या वंशजांनीं किंवा अनुगाम्यांनीं अपरिहार्य कारणामुळें आपलें एक तृतियांश सुख कमी झालें म्हणून इतकें हवालदिल होऊन जावें हें त्यांच्या शौर्यास, पूर्वसंचित लौकिकास व उच्च पदवीस बिलकुल शोभत नाहीं. इंग्रज लोकांच्या अंगीं सांप्रत काळीं दृष्टीस पडूं लागलेला नामर्दपणा, आधिभौतिक सुखाची वांच्छा, व दुसऱ्याच्या सुखदुःखाचा यत्किंचित् विचार न करणारी स्वार्थपरायणता हीं मनांत आलीं असतां मलिका मा अझमाच्या पादशाहीचा सांभाळ करण्यास हे लोक अगदीं नालायक झाले आहेत असें तिऱ्हाईत मनुष्यास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदुस्थानांत नाना तऱ्हेचे राजविलास हवेतसे भोगीत असून त्याला काळ्या पाण्याची उपमा देणें आणि निष्कारण तळमळत सुटणें हें अत्यंत लांच्छनास्पद होय !* या सर्व उताऱ्यांवरून बरें दिसेल त्याला बरें म्हणणें व वाईट दिसेल त्याला वाईट म्हणणें हें व्रत प्रत्येक बाबतींत आगरकर अगदीं निःपक्षपातानें चालवीत होते हें स्पष्ट होतें. किंबहुना सत्यप्रतिपादन हा त्यांच्या सर्व विचारसरणीचा पाया होता. व्यावहारिक बाबतींत त्यामुळें त्यांच्याकडून जें विवेचन झालें त्याचें प्रतिपादन आतांपर्यंत झालें. तसें करण्यापूर्वीं त्यांच्या विचारसरणीला मूलभूत असलेलीं कित्येक तत्वें सांगितलीं. आतां त्यांशीं संलग्न असलेल्या एक दोन महत्वाच्या गोष्टींची—ज्यांचा व्यवहारावर फार परिणाम होतो—विचार कर्तव्य आहे.

९. आतांपर्यंत केलेल्या वर्णनावरून आणि विवेचनावरून आगरकरांची विचारसरणी बुद्धिवादप्रधान होती हें वाचकांच्या लक्षांत आलें असेल. या

* नि. सं. २, पृष्ठ ५२२

ठिकाणीं बुद्धि आणि भावना यांचा विरोध कल्पून बुद्धिवाद हा शब्द योजलेला नाहीं. आगरकरांचे लेख ज्यांनीं वाचलेले आहेत त्यांना ते लेख लिहिणाऱ्याच्या भावना महाराष्ट्रांत गेल्या शंभराऊणशें वर्षांत प्रसिद्धीस आलेल्या कोणत्याही पुरुषापेक्षां अत्यंत तीव्र होत्या हें पटल्याशिवाय राहणार नाहीं. तीव्र भावना बुद्धीला फार सहायक असतात किंबहुना बुद्धि व भावना यांमध्यें सामान्य जनदृष्टीनें होत असलेला भेद हा शास्त्रशुद्ध नाहीं. बुद्धिवादांतील बुद्धि—जाणण्याची शक्ति—इचा विरोध भावनेशीं नाहीं; कारण तिला भावनेचें साहाय्य होतें. तर तिचा विरोध "बाबावाक्यं प्रमाणम्" या तत्वाशीं किंवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रमाणवादाशीं आहे. कांहीं गोष्टी देवापासून किंवा त्यांच्या प्रेषितापासून किंवा पुत्रांपासून किंवा भक्तांपासून किंवा ऋषीपासून आल्या आहेत असें प्रथम कल्पून मग, म्हणून त्या अगदीं शुद्ध आहेत, अगदीं बिनचूक आहेत; शास्त्र, विचार, अनुमान यांचा कांहींही अभिप्राय पडला तरी त्यांचा खरेपणा कायम असा हट्ट धरण्याची जी प्रवृत्ति त्या प्रवृत्तीशीं बुद्धिवादाचा विरोध आहे. आपल्या वेदांतांत ज्याला "शब्दप्रामाण्य" म्हणतात, ज्याचा अर्थ श्रुतिप्रामाण्य असा आहे, त्याच्याशीं आणि तत्सदृश कोणत्याही धर्मांतील किंवा देशांतील किंवा पंथांतील कल्पनाशीं व प्रचाराशीं बुद्धिवादाचा विरोध आहे. अर्थात्, सत्यासत्यनिर्णयासाठीं, इष्टानिष्टनिर्णयासाठीं बुद्धीला, विचारशक्तीला प्राधान्य देणें, याचें नांव बुद्धिवाद. विचारशक्तीला प्राधान्य दिलें कीं शब्दप्रामाण्य मागें पडलें. आणि शब्दप्रामाण्य मागें पडलें म्हणजे शब्दाचा उदय जेथून झाला अशी समजूत आहे त्या शक्तीला सृष्टीचा केंद्र कल्पून सृष्टीची सर्व विवंचना व प्रपंच करणें हेंही मागें पडणार आणि असें जो कोणी करील त्याला शब्दप्रामाण्य मानणारे "नास्तिक" या वर्गांत काढणार. "देवतोत्पत्ति" कशी झाली हा प्रश्न चर्चेला घेणें म्हणजे खरोखर सामान्यजनदृष्टीनें नास्तिकपणांत शिरणें होय. अशा दृष्टीनें आगरकर व त्यांचे परम स्नेही बाळ गंगाधर टिळक यांची नास्तिकांत गणना होती. ती केवळ बहुजनदृष्टीनें होती असें नाहीं तर ज्यांना लोक "सुधारक" समजत अशाही कित्येकांच्या दृष्टीनें होती. यांना लोक सुधारक समजत याचें कारण बहुजनसमाजाच्या कित्येक समजुतींवर त्यांचा विश्वास नव्हता, त्यांचे कित्येक प्रचार त्यांना आवडत नव्हते, त्यांच्या कित्येक रूढि त्यांना सदोष वाटत होत्या. पण ज्या एका मूळ विचारसरणीनें म्हणजे विचाराची मुस्कटदाबी करण्याच्या विचारसरणीनें कालांतरानें अशा

समजुती, असे प्रचार आणि अशा रूढि प्रादुर्भूत व रूढ होणें अपरिहार्य होतें त्या मूळ कल्पनेवर मात्र त्यांची अश्रद्धा नव्हती; तिच्यासंबंधीं आपलें समूळ अज्ञान कबूल करण्याची त्यांची तयारी नव्हती; तिच्यावर बुद्धीचा प्रकाश पाडून तिचें खरें खरें स्वरूप समजाऊन घेण्याची त्यांची छाती नव्हती. अशीं माणसें मूर्तिपूजा किंवा विशिष्ट प्रकारची पूजा यांना नाकें मुरडतात, पण त्या तत्वामुळें पूजा अपरिहार्य झाली आहे किंवा केली आहे त्या तत्वावर मात्र आपली पूर्ण श्रद्धा आहे असें ते म्हणतात. अर्थात् देव-बाहुल्यापासून जे एकेश्वरी पंथाकडे वळले, मूर्तिपूजेपासून ज्यांनीं अमूर्त, अनंत, अदृश्य, अशा एकमेवाद्वितीयाकडे धांव घेतली त्यांनीं हा पल्ला केवळ आणि निव्वळ आणि सर्वथा आणि पूर्णपणें बुद्धीच्या साहाय्यानें मारलेला आहे ही गोष्ट त्यांचे जे ग्रंथ प्रचलित आहेत त्यांवरून आपोआप सिद्ध झाली आहे. पण बुद्धीची धांव त्याच्यापुढें नेण्याची त्यांची इच्छा नव्हती किंवा तशी नेण्याची त्यांची ताकद नव्हती. अशा लोकांनीं स्वतःची अशक्तता झांकण्यासाठीं “यापुढें बुद्धि जाणार नाहीं” असें वाक्य घालून ठेवलें. पण हा निर्णयसुद्धां बुद्धीच्या प्रभावानें उपस्थित झाला या गोष्टीची वाच्यता न करतां अशा निर्णयाला अंत-र्ज्ञान, साक्षात्कार, गुरुकृपा, परमेश्वरप्रसाद, महात्म्यांचा संदेश अशीं निर-निराळीं मोहक नांवें त्यांनीं दिलीं. यांतील पुष्कळसे लोक आपापल्या परीनें बहुजनसमाजाच्या मतें नास्तिकच होते. खुद्द आद्य शंकराचार्यांना प्रच्छन्नबुद्ध म्हणणारे टीकाकार झाले आणि ब्राम्ह-प्रार्थना-आर्यसमाजादिकांना सामान्य जनता धर्मभ्रष्ट अतएव नास्तिक समजते हें सुप्रसिद्ध आहे. पण त्यांना नास्तिक म्हणणें शास्त्रशुद्ध नाहीं. ईश्वर आहे अशी कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत पक्की समजूत असणें याचें नांव आस्तिक्य व तो बिलकुल नाहीं असें समजणें याचें नांव नास्तिक्य. आस्तिक्य ग्रहीत धरणारांच्या कोणत्याही कसल्याही समजुतीला केसभर जरी धक्का लागला तरी तो धक्का लावणाऱ्याला ते सर्व नास्तिक सम-जतात यांत शंका नाहीं. पण आस्तिक्य हें बुद्धीनें सिद्ध करतां येण्यासारखें नसल्यामुळें हा सर्व भाग श्रद्धेचा आहे असें सांगण्याची युक्ति निघाली. अर्थात् श्रद्धा ही भावना बरेच वेळां अज्ञान व अल्प ज्ञान यांतही शक्य अस-ल्यामुळें तिला जगांत फारशी अब्रू नाहीं. त्याचप्रमाणें जे अगदीं पूर्ण नास्तिक्य-वादी आहेत, ईश्वराचा अभाव जे ठामपणें सांगतात त्यांनाही तो अभाव बुद्धिनें सिद्ध करतां येण्यासारखा नाहीं. अर्थात् हा प्रांत “अज्ञेया” चा आहे

व या गोष्टीची कबुली "नेति नेति" म्हणणाऱ्या श्रुतींनीं दिलेली आहे. परंतु या श्रुतींना प्रमाण मानणाऱ्यांची मौज अशी आहे कीं या श्रुतीनें अज्ञेय म्हटलेल्या गोष्टीचें अट्टाहासानें अस्तित्व ते कल्पितात. जें माहीत नाहीं तें माहीत आहे असें म्हणणें हा मार्ग असत्यपणाचा आहे आणि या मार्गावर प्रपंचाची सर्व इमारत रचणें म्हणजे त्या इमारतीच्या मुळाशीं जाणून बुजून असत्याचा पाया घालण्यासारखें आहे. परंतु सृष्टीच्या प्रपंचाचें हजारों वर्षांचें स्वरूप सृष्टीच्या इतिहासावरून, परिणतीवरून, प्रगतीवरून निघण्यासारखें आहे व ज्यांना शास्त्रज्ञ म्हणतात त्यांनीं तो मार्ग पत्करला व विशेषेंकरून पाश्चिमात्य देशांत शास्त्राभ्यासामुळें—हा अभ्यास बुद्धीच्या साहाय्यानें शक्य झाला—धर्मानें सांगितलेल्या पुष्कळशा गोष्टी सत्य नाहींत असें प्रत्यक्ष प्रचीतीस आलें. ही प्रत्यक्ष प्रचीति आल्यामुळें शब्दप्रामाण्यावरची लोकांची श्रद्धा ढांसळली व अर्थात् ती बुद्धिवादावर बसूं लागली. अलीकडे धर्माचें राज्य पुनः वाढूं लागलें असून बुद्धीला गौणता येत आहे अशा कंड्या उठवण्याचें कार्य कित्येक लोकांनीं चालविलें आहे; पण त्यांतील खरें बीज असें आहे कीं, बहुतेक ठिकाणीं धर्मानें बुद्धिप्रधान शास्त्राशीं नमतें घेऊनच आपलें मरण आजचें उद्यांवर ढकललें आहे. यासंबंधीं अधिक चर्चा या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. येथें एवढेंच सांगावयाचें कीं आगरकरांच्या विचारसरणीच्या मुळाशीं हा बुद्धिवाद होता, म्हणजेच धर्मप्रणीत कल्पना अचल व पूर्णत्वयुक्त आहेत ही समजूत त्यांना मान्य नव्हती. जगाची सुधारणा ही अदृश्य तत्त्वांत गुंतवून टाकून मोकळे होण्याला ते तयार नव्हते. या त्यांच्या वृत्तीला नास्तिकपणा हें नांव दिलें होतें व तें सर्वथा शास्त्रशुद्ध नसलें तरी सामान्यजनतेचा अभिप्राय त्या शब्दामुळें प्रकट होतो असें वाटतें. वास्तविक स्थिति अशी आहे कीं ज्या कारणांमुळें परमेश्वराचें आस्तित्व ठामपणें गृहीत धरण्याला अडचणी येतात तशाच प्रकारच्या कारणांमुळें ठाम अनास्तित्वही गृहीत धरणें कठीण होतें. हे दोनीही प्रकार बुद्धीला संमत नाहींत. तेव्हां बुद्धिवादी लोक फक्त एवढेंच म्हणतात कीं, जी गोष्ट आम्हांस कळते ती कळते, जी कळत नाहीं ती कळते असें म्हणण्याला आम्ही तयार नाहीं. या वृत्तीला अज्ञेयवाद असें नांव आहे. पण अज्ञेयाचीं पटलें दूर करणें, ज्ञातापासून अज्ञाताकडे बुद्धीच्या बळानें जाणें आणि बुद्धीला गोष्ट पटेल ती मान्य करण्याची नेहमीं तयारी असणें या वृत्ती अज्ञेयवादांत अंतर्भूत झाल्या म्हणजे त्याला यथार्थ नांव बुद्धिवाद असें

मिळतें व अशा प्रकारें आगरकर हे खरोखर बुद्धिवादी होते. जो अंधश्रद्धेचा आस्तिक असेल तो कांहींही झालें तरी नास्तिक्य पत्करणार नाहीं. जो अंध-श्रद्धेचा नास्तिक असेल तो कांहींही झालें तरी आस्तिक्य पत्करणार नाहीं. पण जो बुद्धिवादी आहे तो असें म्हणतो—"माझ्या बुद्धीची खात्री पटण्याचे जे मार्ग आहेत त्यांपैकीं कोणत्या तरी मार्गानें माझी खात्री पटली म्हणजे मग तुमचें म्हणणें कबूल करण्यास मी तयार आहें." जो बुद्धिवादी आहे त्याचा हट्ट आस्तिक्याबद्दलही नाहीं व नास्तिक्याबद्दलही नाहीं. त्याच्या बुद्धीला आस्तिक्य सिद्ध झालें असें पटलें तर तो आस्तिकही होईल. त्याचें म्हणणें एवढेंच कीं मनुष्याजवळ ज्या शक्ति आहेत त्यांत बुद्धि—जाणण्याची शक्ति, हीच अत्यंत महत्वाची आहे. ती किती जरी पंगु असली तरी मनुष्याच्या दुसऱ्या कोणत्याही शक्तीपेक्षां ती शक्तिमती आहे आणि म्हणून मनुष्याच्या प्रपंचाला तिच्यासारखा दुसरा निकष कोणताही नाहीं.

१०. या विषयासंबंधीं आगरकरांचा एक उतारा दिला म्हणजे उपरोक्त विधानांची सत्यता पटेल. "एका अंगाला नास्तिक म्हणजे बेधडक परमेश्वर नाहीं असें म्हणणारे थोडेसे लोक, व दुसऱ्या अंगाला एकच परमेश्वर आहे, व त्याच्या स्वरूपाचें व गुणांचें ज्ञान मनुष्यमात्रास करून घेतां येतें, इतकेंच नाहीं, तर तें करून घेणें, त्याला शरण जाणें, त्याला भजणें, त्याला भिणें व त्याच्या इच्छेप्रमाणें वर्तन करणें हेंच मनुष्यास योग्य आहे, व असें करणारे मनुष्य जन्ममरणापासून मुक्त होऊन त्या ईश्वरस्वरूपांत जाऊन मिळतात किंवा मोक्षाप्रत पावतात, असें मानणारे दुसरे लोक यांच्या दरम्यान कांहीं लोक आहेत. ते असें म्हणतात कीं, जगत्कारण आहे हें आम्हांस कबूल आहे, पण आमच्या सध्यांच्या ज्ञानेंद्रियांनीं त्याच्या स्वरूपाचें खरें ज्ञान आम्हांस कधींही होण्याचा संभव नाहीं. येथील कित्येक तत्ववेत्यांचा विचार येथपर्यंत येऊन ठेपला असून इतर सुधारलेल्या देशांतही अलीकडे हेंच मत प्रबळ होत चाललें आहे. तेव्हां ईशस्वरूप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियांस अगम्य आहे हा धर्मसंबंधाचा शेवटचा सिद्धांत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं." * अर्थात् ज्याची मुळीं माहितीच नाहीं त्याच्या इच्छेवर प्रत्येक गोष्ट ठेवून स्वतः कर्तृत्वशून्य होणें हा मार्ग विचारप्रधान नव्हे व त्या मार्गानें सुधारणा होणार

* नि. सं., १—३४.

व या गोष्टीची कबुली "नेति नेति" म्हणणाऱ्या श्रुतींनीं दिलेली आहे. परंतु या श्रुतींना प्रमाण मानणाऱ्यांची मौज अशी आहे कीं या श्रुतींनें अज्ञेय म्हटलेल्या गोष्टीचें अट्टाहासानें अस्तित्व ते कल्पितात. जें माहीत नाहीं तें माहीत आहे असें म्हणणें हा मार्ग असत्यपणाचा आहे आणि या मार्गावर प्रपंचाची सर्व इमारत रचणें म्हणजे त्या इमारतीच्या मुळाशीं जाणून बुजून असत्याचा पाया घालण्यासारखें आहे. परंतु सृष्टीच्या प्रपंचाचें हजारों वर्षांचें स्वरूप सृष्टीच्या इतिहासावरून, परिणतीवरून, प्रगतीवरून निघण्यासारखें आहे व ज्यांना शास्त्रज्ञ म्हणतात त्यांनीं तो मार्ग पत्करला व विशेषेंकरून पाश्चिमात्य देशांत शास्त्राभ्यासामुळें—हा अभ्यास बुद्धीच्या साहाय्यानें शक्य झाला—धर्मानें सांगितलेल्या पुष्कळशा गोष्टी सत्य नाहींत असें प्रत्यक्ष प्रचीतीस आलें. ही प्रत्यक्ष प्रचीति आल्यामुळें शब्दप्रामाण्यावरची लोकांची श्रद्धा ढांसळली व अर्थात् ती बुद्धिवादावर बसूं लागली. अलीकडे धर्माचें राज्य पुनः वाढूं लागलें असून बुद्धीला गौणता येत आहे अशा कंड्या उठवण्याचें कार्य कित्येक लोकांनीं चालविलें आहे; पण त्यांतील खरें बीज असें आहे कीं, बहुतेक ठिकाणीं धर्मानें बुद्धिप्रधान शास्त्राशीं नमतें घेऊनच आपलें मरण आजचें उद्यांवर ढकललें आहे. यासंबंधीं अधिक चर्चा या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. येथें एवढेंच सांगावयाचें कीं आगरकरांच्या विचारसरणीच्या मुळाशीं हा बुद्धिवाद होता, म्हणजेच धर्मप्रणीत कल्पना अचल व पूर्णत्वयुक्त आहेत ही समजूत त्यांना मान्य नव्हती. जगाची सुधारणा ही अदृश्य तत्वांत गुंतवून टाकून मोकळे होण्याला ते तयार नव्हते. या त्यांच्या वृत्तीला नास्तिकपणा हें नांव दिलें होतें व तें सर्वथा शास्त्रशुद्ध नसलें तरी सामान्यजनतेचा अभिप्राय त्या शब्दामुळें प्रकट होतो असें वाटतें. वास्तविक स्थिति अशी आहे कीं ज्या कारणांमुळें परमेश्वराचें अस्तित्व ठामपणें गृहीत धरण्याला अडचणी येतात तशाच प्रकारच्या कारणांमुळें ठाम अनास्तित्वही गृहीत धरणें कठीण होतें. हे दोनीही प्रकार बुद्धीला संमत नाहींत. तेव्हां बुद्धिवादी लोक फक्त एवढेंच म्हणतात कीं, जी गोष्ट आम्हांस कळते ती कळते, जी कळत नाहीं ती कळते असें म्हणण्याला आम्ही तयार नाहीं. या वृत्तीला अज्ञेयवाद असें नांव आहे. पण अज्ञेयाचीं पटलें दूर करणें, ज्ञातापासून अज्ञाताकडे बुद्धीच्या बळानें जाणें आणि बुद्धीला गोष्ट पटेल ती मान्य करण्याची नेहमीं तयारी असणें या वृत्ती अज्ञेयवादांत अंतर्भूत झाल्या म्हणजे त्याला यथार्थ नांव बुद्धिवाद असें

मिळतें व अशा प्रकारें आगरकर हे खरोखर बुद्धिवादी होते. जो अंधश्रद्धेचा आस्तिक असेल तो कांहींही झालें तरी नास्तिक्य पत्करणार नाहीं. जो अंधश्रद्धेचा नास्तिक असेल तो कांहींही झालें तरी आस्तिक्य पत्करणार नाहीं. पण जो बुद्धिवादी आहे तो असें म्हणतो—"माझ्या बुद्धीची खात्री पटण्याचे जे मार्ग आहेत त्यांपैकीं कोणत्या तरी मार्गानें माझी खात्री पटली म्हणजे मग तुमचें म्हणणें कबूल करण्यास मी तयार आहें." जो बुद्धिवादी आहे त्याचा हट्ट आस्तिक्याबद्दलही नाहीं व नास्तिक्याबद्दलही नाहीं. त्याच्या बुद्धीला आस्तिक्य सिद्ध झालें असें पटलें तर तो आस्तिकही होईल. त्याचें म्हणणें एवढेंच कीं मनुष्याजवळ ज्या शक्ति आहेत त्यांत बुद्धि—जाणण्याची शक्ति, हीच अत्यंत महत्त्वाची आहे. ती किती जरी पंगु असली तरी मनुष्याच्या दुसऱ्या कोणत्याही शक्तीपेक्षां ती शक्तिमती आहे आणि म्हणून मनुष्याच्या प्रपंचाला तिच्यासारखा दुसरा निकष कोणताही नाहीं.

१०. या विषयासंबंधीं आगरकरांचा एक उतारा दिला म्हणजे उपरोक्त विधानांची सत्यता पटेल. "एका अंगाला नास्तिक म्हणजे बेधडक परमेश्वर नाहीं असें म्हणणारे थोडेसे लोक, व दुसऱ्या अंगाला एकच परमेश्वर आहे, व त्याच्या स्वरूपाचें व गुणांचें ज्ञान मनुष्यमात्रास करून घेतां येतें, इतकेंच नाहीं, तर तें करून घेणें, त्याला शरण जाणें, त्याला भजणें, त्याला भिणें व त्याच्या इच्छेप्रमाणें वर्तन करणें हेंच मनुष्यास योग्य आहे, व असें करणारे मनुष्य जन्ममरणापासून मुक्त होऊन त्या ईश्वरस्वरूपांत जाऊन मिळतात किंवा मोक्षाप्रत पावतात, असें मानणारे दुसरे लोक यांच्या दरम्यान कांहीं लोक आहेत. ते असें म्हणतात कीं, जगत्कारण आहे हें आम्हांस कबूल आहे, पण आमच्या सध्यांच्या ज्ञानेंद्रियांनीं त्याच्या स्वरूपाचें खरें ज्ञान आम्हांस कधींही होण्याचा संभव नाहीं. येथील कित्येक तत्त्ववेत्त्यांचा विचार येथपर्यंत येऊन ठेपला असून इतर सुधारलेल्या देशांतही अलीकडे हेंच मत प्रबळ होत चाललें आहे. तेव्हां ईशस्वरूप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियांस अगम्य आहे हा धर्मसंबंधाचा शेवटचा सिद्धांत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं."* अर्थात् ज्याची मुळीं माहितीच नाहीं त्याच्या इच्छेवर प्रत्येक गोष्ट ठेवून स्वतः कर्तृत्वशून्य होणें हा मार्ग विचारप्रधान नव्हे व त्या मार्गानें सुधारणा होणार

* नि. सं., १—३४.

नाहीं. तर " सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशीं बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला, म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस आरंभ होतो."* विश्वास आणि विचार या दरम्यान् चाललेल्या युद्धाचा शेवट विचाराच्या तर्फेचा होणें अपरिहार्य आहे, व हा न्याय धार्मिक बाबतींतही लागू होणार, त्याला इलाज नाहीं. आगरकरांनीं यासंबंधीं आपला निर्णय स्पष्टपणें नमूद केलेला आहे. " विचारी पुरुषांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, जे आचार चमत्कारिक धर्मकल्पनांवर बसविलेले असतात ते विवेकाच्या कसाला लावून पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जे लोक तसल्या आचारांचें अनुकरण करीत असतात त्यांच्या मनांत त्यांच्या औचित्याचा विचार कधींच येत नाहीं. पूर्वापार चालत आलेल्या गाढ विश्वासशृंखलांनीं निगडित होऊन गेल्यामुळें मागून आलेलें लोण डोळे मिटून पुढल्यास नेऊन पोंचविणें एवढेंच ते आपलें कर्तव्य समजतात. धर्ममंदिराची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे असें हिंदु धार्मिकांचेंच म्हणणें आहे असें नाहीं. पृथ्वीवरील कोणत्याही प्रकारच्या धार्मिकांस विश्वासाशिवाय त्राता नाहीं व थारा नाहीं. यासंबंधानें बुद्धिवादाचें नांव काढलें कीं त्यांच्या अंगावर कांटा उभा राहतो. एखाद्या दिवाळखोर कर्जबाजाऱ्यास ज्याप्रमाणें आपल्या प्राप्तीचा आंकडा आपल्या खर्चाच्या आंकड्याशीं ताडून पाहण्याचें धैर्य होत नाहीं, किंवा ज्यांची जीविताशा फार प्रबळ झाली आहे त्यांना आपल्या रोगाची चिकित्सा सुप्रसिद्ध भिषग्वर्यांकडून करवत नाहीं, त्याप्रमाणें श्रद्धाळु धार्मिकांस आपल्या धर्मसमजुती व त्यांवर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशींत घालण्याची छाती होत नाहीं. या तीव्र धगीचा खरपूस ताव देण्यास तयार होण्यांत त्यांची त्यांस धडगत दिसत नाहीं ! त्यांना अशी भीति वाटते कीं, तें हिणकस ठरल्यास पुढें काय करावें ? आम्हांस असें वाटतें कीं असलें भित्रेपण फार दिवस चालावयाचें नाहीं. विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोंपर्यंत विश्वासानें किंवा श्रद्धेनें प्रत्येक गोष्टींत आपला अंमल चालविला यांत कांहीं वावगें झालें नाहीं. जसा लोकांस तसा मनास कोणीतरी शास्ता पाहिजे; व ज्याप्रमाणें मुळींच राजा नसण्यापेक्षां

* नि. सं., १—३४.

कसला तरी राजा असणें बरें, त्याप्रमाणें वर्तनाचें नियमन करणारें असे कोणतेंच तत्व नसण्यापेक्षां विश्वासासारखें एखादें स्खलनशील तत्व असणें देखील इष्ट आहे. पण हें कोठपर्यंत ? अधिक चांगलें तत्व अस्तित्वांत आलें नाहीं तोंपर्यंत. तें आलें कीं जुन्या प्रमादी तत्वानें आपलीं राजचिन्हें श्रेष्ठ तत्वाच्या स्वाधीन केलीं पाहिजेत. हें सरळ अधिकारांतर येथून पुढें विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान् होणार आहे, व तसें होण्यांतच मनुष्यतेस प्राप्त होण्यासारखें ऐहिक व पारमार्थिक सुख लौकर प्राप्त होऊं लागणार आहे अशी आमची समजूत आहे, व ती तशी असल्यामुळें विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आंच देऊन झाळून पहाणें, हें सुधारकाच्या अनेक कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य होऊन बसतें......"* आगरकरांच्या बुद्धिवादाचें स्वरूप या उताऱ्यांत अगदीं स्पष्टपणें चित्रित झालेलें आहे आणि बुद्धिवादाची त्यांनीं ही घेतलेली दीक्षा आजन्म सोडली नाहीं असें त्यांच्या उपलब्ध असलेल्या लेखांचें पर्यालोचन करून व त्यांच्यासंबंधीं विश्वसनीय माहिती मिळते त्यावरून स्पष्टपणें सांगणें आवश्यक आहे. त्यांचीं धर्मविषयक मतें बदलत चाललीं होतीं अशा प्रकारचें विधान कित्येकांनीं केलेलें आहे त्याला बिलकुल आधार नाहीं. त्यांचीं धर्मविषयक मतें नापसंत असणारीं माणसें त्यांच्या वेळीं तर पुष्कळ होतीं आणि आतांही तीं कमी आहेत असें नाहीं. पण त्यांच्या धर्ममतांची ग्राह्यता सुधारलेल्या देशांत अधिकाधिक पटलेली आहे व महाराष्ट्रांतही किंबहुना हिंदुस्थानांत विवेकाचें साम्राज्य वाढत्या प्रमाणांत आहे. १८९५ सालीं विश्वासाच्या तत्वावर उभारलेल्या बालविवाहाच्या चालीचें मंडन रा. टिळक यांनीं केसरी पत्रांत केलें. त्याच बालविवाहाचें मंडन १९२८ सालीं म्हणजे चाळीस वर्षांनीं काशींत कांहीं अतिपक्व व अपक्व अशा कांहीं जुन्या पंडितांनीं केलें त्याबद्दल त्यांच्यावर कटुतर टीकेचा मारा त्याच केसरी पत्रांत टिळकांच्या नातवाच्या संपादकत्वांत झाला. आगरकरांच्या बुद्धिवादाचें महत्व ओळखण्याला याप्रमाणें महाराष्ट्राच्या कांहीं लोकांपुरता टिळकांचा नातू लिहता बोलता व्हावा लागला ही गोष्ट कितीही चिंतनीय असली तरी तीवरून आगरकरांचीं मतें किती भक्कम पायावर रचलीं होतीं हें समजून येतें व पुढें पुढें त्यांपैकीं कित्येक त्यांना बदलावींशीं वाटत होतें. अशा प्रकारच्या विधानां-

* नि. सं., १—७०.

तील फोलपणा नजरेला येतो. असो. ईश्वराच्या नांवाखालीं अप्रशस्त आचार व रूढि यांचें मंडन करणाऱ्यांचा अंतस्थ हेतु काय असतो याची फोड आगरकरांनीं फार उत्कृष्टपणें करून दाखविली आहे. "समाजाच्या विलक्षण रहाटीमुळें उच्चनीचत्व अस्तित्वांत येऊन तदनुसार जो व्यवसायविभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गांत जन्मास आलेल्या लोकांनीं नीच वर्गांत जन्मांत आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पर्श्य मानणें याहून मनुष्याच्या विचारीपणास लांच्छनास्पद अशी दुसरी गोष्ट नाहीं."* यावरून विशिष्ट चालीरीतींचें जें मंडन होत असतें व धर्माच्या बाजूला जी एवढी गर्दी जमा झालेली दिसते त्याचें कारण समाजांत जे सत्ताधीश होऊन बसलेले असतात त्यांची ती सत्ता निर्बाध राखण्यासाठीं चाललेली धडपड हेंच होय.

११. जगांतील प्रत्येक गोष्ट ईश्वरकृत आहे असा ठाम व स्थूल सिद्धांत ठोकून दिला म्हणजे जगांतील प्रत्येक अन्याय न्यायस्वरूप आहे असें म्हणावें लागतें. "हें असें कां?" हा प्रश्न विचारला कीं "देवाची इच्छा" असें उत्तर मिळतें; व अशा प्रकारें, बेधडक नास्तिक्यानें जशी अनवस्था प्राप्त होण्याचा संभव असतो तसेंच बेधडक आस्तिक्यानेंही तोच प्रसंग ओढवतो व मनुष्य हें केवळ नशीबाच्या हातांतील बाहुलें आहे असें मानावें लागतें. सत्ताधारी लोकांना सर्व माणसांची अशी स्थिति असावी असें वाटतें आणि म्हणूनच जगाच्या इतिहासांत सर्वत्र धर्म हा सत्तेचा गुलाम होऊन राहिलेला आहे असें आढळून येतें. तेव्हां प्रपंचाची उभारणी करावयाची ती अशा अज्ञात आणि कदाचित् अज्ञेय अशा तत्त्वावर करून मनुष्यकर्तृत्व हें अगदीं शून्यत्वावर आणून सोडणें हा मार्ग प्रगतीचा नव्हे. प्रगतीच्या मार्गाला प्रपंचाची गाडी लावावयाची असेल तर त्याची उभारणी आशा आणि प्रयत्न या तत्त्वांवर झाली पाहिजे व मनुष्यानें आपलें आचरणाचें ध्येय जगांत सुख अधिक करणें, आपली, आपल्या शेजाऱ्याची, आपल्या देशाची, किंबहुना सर्व जगताची स्थिति सर्वतोपरी सुधारणें, असें ठेवलें पाहिजे. या ध्येयाची परिपूर्ति करण्यांत त्याचें एक आयुष्य खरोखर अपुरें पडणार आहे. अर्थात् अज्ञात गोष्टीवर ज्ञानाच्या साहाय्यानें प्रकाश पाडून त्या ज्ञात करण्याचा उद्योग त्यानें नेहमीं चालू ठेविला पाहिजे.

* नि. सं., १–८०.

म्हणजे अज्ञात व दुर्ज्ञेय असे जे विचारप्रांत आहेत त्यांचें संशोधन त्यानें सारखें चालू ठेविलें पाहिजे. अशा संशोधनाला बुद्धिवादाची केव्हांही आडकाठी नाहीं. किंबहुना असें संशोधन हें बुद्धिवादाचें एक अत्यंत महत्वाचें अंग आहे. या संशोधनाच्या कार्यांत टिकाव धरील अशी ज्यांची बुद्धि आहे, उद्योगशक्ति आहे, त्यांनीं अवश्य त्या कार्याला आपणांला वाहून घ्यावें. पण सामान्य माणसांनीं आपले आचार व आपला उद्योग हीं विचारानें प्रशस्त ठरलेल्या मार्गांनीं ठेवावींत म्हणजे जगाचें अधिक कल्याण होणार आहे. जेथें परकीयांनीं हीन लेखल्याबरोबर संतापानें आंगाचा भडका होतो तेथें समाजांत उच्चनीचत्वाची गाढ कल्पना अत्यंत गर्हणीय आहे व तिच्यामुळें हिंदी राष्ट्रीयत्वाच्या मुळाला भयंकर सुरुंग लागलेला आहे हें कळण्याला वेळ काय म्हणून लागावा? जेथें एखाद्या परान्नपुष्ट परकीय लेखकानें किंवा लेखिकेनें हिंदी स्त्रियांची निर्भर्त्सना केली म्हणजे साहजिक क्रोधानें डोकें फिरून जातें व जेथें "आई" ला दिलली शिवी अंतःकरणाला तापलेल्या सळईच्या डागाप्रमाणें वेदना देते तेथें आमच्या "मातां" बद्दल आम्ही जी एकंदरींत मत्सरबुद्धि आजपर्यंत दाखवीत आलों व "स्त्रियांना पुरुषाहून आठपट काम" अशीं बेशरमपणाचीं विधानें आजपर्यंत जपत आलों ती मत्सर बुद्धि व तसलीं विधानें आतां आपण साफ टाकून देण्याला तयार असावयास नको काय? आणि हा बुद्धीचा पालट होण्याला बुद्धि ही विश्वासाची स्वामिनी होण्याची आवश्यकता नाहीं काय? तेव्हां जगांतील प्रपंचाची उभारणी ज्ञात तत्वावर केल्यामुळें व विश्वासाऐवजीं बुद्धीला आपली मार्गदर्शिका केल्यामुळेंच जगांत सर्वत्र सुधारणा व सुस्थिति यांना वाव मिळाला. तशा प्रकारचा परिणाम तशी कारणपरंपरा उत्पन्न झाल्यास हिंदुस्थानांतही झाल्याशिवाय राहणार नाहीं हें पूर्णपणें ओळखून आगरकरांनीं आपलीं मतें लोकांपुढें मांडलीं. त्यांतील मूळतत्वांचें विवेचन येथपर्यंत केलें. आगरकरांनीं व्यक्तीच्या व राष्ट्राच्या संसारांत ज्या ज्या सुधारणा सुचविल्या त्या सर्वांच्या मुळाशीं हीं तत्वें आहेत. त्या तत्वांचें त्यांच्याच शब्दांत थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हणजे स्वातंत्र्य—समता—उद्योग या तीन शब्दांनीं करतां येईल. आगरकरांनीं सुचविलेल्या व समर्थिलेल्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक व शैक्षणिक सुधारणा या सर्व या मूलतत्वांवरूनच निघालेल्या आहेत. त्यांतील कित्येक अशा आहेत कीं, त्यांचें स्वरूप अद्यापिसुद्धां कित्येकांना भयप्रद व शंकनीय भासतें. पण जशा दुसऱ्या आगरकरप्रणीत सुधारणा आतां लोकांना

पटल्या आहेत त्याप्रमाणें त्याही पटल्याशिवाय राहणार नाहींत. त्यापैकीं त्यांच्या-बद्दल यापूर्वीं या ग्रंथांत ठळकपणें चर्चा झाली नाहीं अशा कांहीं विषयांचें थोडक्यांत विवेचन यापुढें केलें आहे. येथें फक्त एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, धर्माचा बाजार ज्यांनीं मांडला आहे, ज्यांनीं धर्माला धंद्याचें स्वरूप दिलें आहे, ज्यांनीं धार्मिक आचारांची उभारणी क्रयविक्रयाच्या धोरणावर केली आहे त्यांच्या धर्माला झुगारल्यावर आगरकरांनीं ज्या धर्माची दीक्षा घेतली त्या धर्माला त्यांनींच "लोककल्याण" हें नांव दिलें आहे. याच धर्माचें वर्णन संतशिरोमणि तुकाराम यांनीं "भूतांची दया" असें केलें आहे. आगरकर म्हणतातः—"मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन ह्या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणास न भितां, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें हच त्यांस उचित आहे."* ऐहिक सुखवर्धन याचा अर्थ "सुखं च मे शयनं च मे" हा आगरकांनीं स्वतःच्या आचारांत त्याच-प्रमाणें उपदेशांत केव्हांही केलेला नाहीं आणि म्हणून सदर शब्दांचा तसा अर्थ जे काढतात त्यांना एक तर आपण काय बोलत आहों हें समजत नाहीं अथवा मत्सरग्रस्त होऊन ते कांहीं तरी बरळतात असें समजलें पाहिजे. कारण ऐहिक सुखवर्धनाच्या या धर्माचा पाया आगरकरांनीं स्वार्थाच्या होमावर रचलेला होता. मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन म्हणजे परोपकार. या विषयासंबंधीं एका आधुनिक लेखकानें केलेलें वर्णन आगरकरांना व त्यांनीं उपदेशिलेल्या मतांना उत्कृष्ट लागू पडतें. "धर्माचें अंतरंग प्रेम व बहिरंग परोपकार. हृदयांत प्रेमनिर्झर असल्याशिवाय धर्मवृक्ष वाढत नाहीं. धर्मवृक्षाचें जीवन शुद्ध प्रेम; त्याचें फळ पवित्र वीर्यकर्म व त्याचा अंगभूत सुवास म्हणजे निःश्रेयस व शांत सुख. परमेश्वरपूजा म्हणजे मूर्तिपूजा नव्हे, योगासन नव्हे किंवा तीर्थाटन नव्हे; तर परोपकारकर्म—पवित्रकर्म—प्रेमकर्म—वीर्यकर्म. धर्माचें बीज प्रेमांत आहे. प्रेम म्हणजे सर्व भूतांविषयीं आत्मभाव......प्रेम म्हणजे स्वाभिमानविस्मृति, स्वार्थत्याग, आत्मयज्ञ......प्रेमानें प्रेरित होऊन स्वार्थत्यागपूर्वक जगांतील दुःख, पाप, अज्ञान वगैरे कमी करणें याचें नांव परोपकार......जगांत जें गाढ अज्ञान आहे, जीं हृदयद्रावक दुःखें आहेत, जीं प्राणघातक संकटें आहेत, जीं

---

* नि. सं.. १-१७८.

घोर पापें आहेत, नयनशल्यभूत जी कुरूपता आहे, यांपैकीं एखादी तरी अनिष्ट गोष्ट स्वतःला त्रास सोसून जो जगांतून कमी करील तो आपल्या परीनें व आपल्या मानानें परोपकारी, पवित्राचरणी वीरच आहे" ‡ आगरकरांनीं प्रतिपादिलेल्या लोककल्याणधर्माची कल्पना वरील वाक्यावरून थोडीबहुत लक्षांत येण्यास हरकत नाहीं.

१२. मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन हाच धर्म असें पत्करलें म्हणजे प्रत्येक व्यक्तीला महत्व येतें. मनुष्यता ही सर्व मनुष्यांची मिळून झालेली आहे. तींत स्त्रिया आणि पुरुष, वृद्ध आणि तरुण, श्रीमंत आणि गरीब, भाग्यशील आणि भाग्यहीन, श्वेतवर्ण आणि कृष्णवर्ण, अशा सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश होतो. इहलोक हें विचाराचें केंद्र ठरलें व तेथून परलोकाला हालविलें म्हणजे व्यक्तीला महत्व आलें. इहलोकांतील सर्व हिशेबाची बाकी परलोकांत पूज्य होणार असें ठरलें म्हणजे इहलोकांतील घोंटाळा दूर होण्याची आशा नको, अन्यायाचें परिमार्जन होण्याचें नांव नको आणि कोणत्याही दुःखविमोचनाचा प्रयत्न नको. कारण इहलोकांत जें जें आहे त्याचें अस्तित्व पारलौकिक किंवा इतर जन्मसंबंधीं कारणामुळें सिद्ध झालेलें आहे असें म्हटलें म्हणजे अर्थात् त्याचें निराकरणही इहलोकीं होणें नाहीं. त्याला परलोकाचाच उंबरठा ओलांडला पाहिजे. अर्थात् श्रीमंतापुढें गरिबाची किंमत मानण्याचें कारण नाहीं. श्रीमंताला श्रीमंती पूर्व पुण्याईनें आली आणि गरीबाला गरिबी कृतकर्मानें आली. मग त्या गरीबाची कींव कशाला? बायका विधवा होतात त्या मागच्या जन्मांतल्या पापानें? त्यांच्या वैधव्याची एवढी खंती कशाला? जगांत आंधळे, पांगळे, लुले आपापल्या कर्मानें झाले आहेत त्याबद्दल एवढा आरडा कशाला? बलिष्ठ आपल्या सद्दीमुळें बलिष्ठ झाले, बलहीनांची सद्दी नाहीं म्हणून ते बलहीन आहेत, त्या बलहीनाबद्दल एवढी यातायात कां? या विचारसरणींत मनुष्याचें—व्यक्तीचें माहात्म्य शून्यावर येतें. जगाच्या प्रचंड चक्रांत (आणि त्याला फिरवणारा दांडा इहलोकीं नाहीं) व्यक्तीची किंमत काय? अशा प्रकारें व्यक्तीला कांहीं किंमत नाहीं हा जुना व्यवहार होता आणि सुधारणेचा मुख्य रोख प्रत्येक व्यक्तीची किंमत मान्य करण्याकडे आणि म्हणून प्रत्येक व्यक्तीला संधि देण्याकडे आहे. प्रत्येक व्यक्तीला किंमत आहे म्हणून तर जातिभेद दूषणीय ठरतो.

---

‡ वा. म. जोशी, रागिणी २–१५३.

प्रत्येक व्यक्तीला किंमत आहे म्हणून तर स्त्रियांची दुर्दशा कायम ठेवणें हें महापातक ठरतें. प्रत्येक व्यक्तीला किंमत आहे म्हणून तर हिंदुस्थानसारख्या देशांतील लोकांची स्वराज्याची आकांक्षा न्याय्य ठरते. आगरकरांच्या विचारसरणींत व्यक्तिमाहात्म्याचें माहात्म्य फार महत्वाचें आहे. या भागांत आतांपर्यंत जें विवेचन केलें आहे त्यावरून त्यांत वर्णन केलेल्या प्रत्येक मूळभूत तत्वाचा संबंध व्यक्तीच्या महत्वाशीं कसा जातो हें लक्ष्यांत येतें. कोणताही मनुष्य मनुष्यतेचा अंश असल्यामुळें त्याची हेळसांड करून चालणार नाहीं. त्याला सुख मिळावें ( येथें सुख शब्दाचा प्रशस्त अर्थच ग्राह्य आहे), त्याचें दुःख कमी व्हावें, त्यांची अपंगता नाहींशी व्हावी आणि त्याला आपल्या मनुष्यदेहाचें सार्थक करण्याची संधि पूर्णपणें मिळावी, म्हणजे त्याच्या उन्नतीच्या मार्गांत कसलेंही विघ्न असूं नये याचाच अर्थ मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन. आणि ज्याअर्थीं आपणांस परलोकासंबंधीं कांहीं माहिती नाहीं त्याअर्थीं जें माहीत आहे तें सुंदर असावें, भव्य असावें, निर्दोष असावें असा उद्योग करणें हाच मनुष्याचा कर्मयोग. येथपर्यंत सांगितलेल्या तत्त्वांनुरूप निरनिराळ्या विषयांत आगरकरांनीं ज्या सुधारणा सुचविल्या त्यांपैकीं कांहींकांचें आतां विवेचन करणें फारसें कठिण होणार नाहीं.

## ( आ ) राजकीय विचार

मागील कित्येक भागांत विषयांच्या अनुषंगानें आगरकरांच्या राजकीय मतांबद्दल चर्चा झालेली आहे त्यावरून इंग्रजी राज्य किंवा कोणतेंही परकीय राज्य हें कितीही अनिष्ट वाटलें तरी तें राज्य आहे व तें नाहींसें होईल ही फारशी शक्यता नसल्यामुळें तें नाहींसें करण्याची निरर्थक वाच्यता करण्यापेक्षां त्याचें स्वरूप हिंदुस्थान देशाला हितकारक होईल असा प्रयत्न करणें आवश्यक आहे असें ज्या मंडळीचें मत आहे त्यांत आगरकरांची किंबहुना ज्यांनीं "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" काढली त्यांची गणना होते हें उघड आहे. न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीतर्फे १८८३ सालीं एज्युकेशन कमिशनपुढें वामनराव आपटे यांची साक्ष झाली तींत लोकांत शिक्षणाचा प्रसार करून त्यांचें अज्ञान नाहींसें करणें आणि या उपायानें शान्ततामय अशी क्रान्ति अडवून आणणें हा आपला हेतु असल्याचें त्यांनीं सांगितलें होतें. यावरून राजकीय बाबतींत राज्यपद्धतीची (राज्याची नव्हे) क्रान्ति घडवून आणणें हा आपला हेतु असल्याचें त्यांनीं सांगितलें होतें व ती लोकांना शहाणे करून त्यांच्याकडून करवून आणणें हा या मंडळीच्या राजकीय विचारांचा पाया होता असें म्हटलें पाहिजे. आगरकरांनीं या बाबतींत आपले विचार अधिक स्पष्टपणें प्रकट केले आहेत.

"सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रत काल," या निबंधाच्या सुरवातीला ते म्हणतात; "सुमारें तीन पिढ्यांपूर्वीं म्हणजे ७५ पाऊणशें वर्षांपूर्वीं आम्ही राष्ट्रीय स्वातंत्र्यशैलाच्या शिखरावर होतों. तें स्थान तरी आम्हीं मुसलमानांपासून मोठ्या कष्टानें काबीज करून घेतलें होतें. आमच्या अंगांत राजकौशल्य असतें तर तें स्थान आम्हीं जाऊं दिलें नसतें. पण तसें कोठून होणार ? पूर्वींपासून खऱ्या देशाभिमानाची कल्पना या हिंदु लोकांस नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. ती असती तर मुसलमानांस देखील आम्हीं येथें पादशाही स्थापूं दिली नसती. पण तो "राम" आम्हांत केव्हांही

नव्हता. व्यक्तिशौर्य येथें आढळत नाहीं असें नाहीं. तें बरेंच आहे. तसेंच रजपूतासारख्या कांहीं जातीच्या जाती रणशूर आहेत. पण उपयोग काय? जेथें शौर्य आहे तेथें अक्कल नाहीं, व जेथें अक्कल आहे तेथें शौर्य नाहीं अशी आमची चिरकालीन स्थिति होऊन बसली आहे. कांहीं विशेष कारणामुळें या महाराष्ट्र-देशांतील लोकांत अक्कल आणि शौर्य यांचा स्वल्पकालीन संयोग झाल्यामुळें त्यांनीं मुसलमानांचें पारतंत्र्य जूं झुगारून दिलें, व कांहीं वेळ स्वराज्याचा उपभोग घेतला. पण मुसलमानांहून वरिष्ठ शत्रूशीं झगडण्याचा प्रसंग आल्याबरोबर तेही आपलें कष्टार्जित स्वातंत्र्य गमावून बसले! इंग्रजांसारख्यांशीं आमची गांठ पडून साऱ्या भारतीयांस परवशता आली ही गोष्ट तर फार वाईट झाली यांत संशय नाहीं. पण तीबद्दल विशेष खेद करणें आम्हांस बरोबर दिसत नाहीं. इंग्रजांपूर्वी आम्हीं मुसलमानांचे गुलाम कशासाठीं झालों? ज्या आम्हांला मुसलमानांसारख्या शुद्ध दांडग्या व धर्मवेड्या लोकांपासून आपल्या स्वातंत्र्याचा बचाव करतां आला नाहीं, ते आम्हीं बकऱ्यांसारखे—चतुर, शूर व कारस्थानी, आंग्लभौमांच्या—स्वाधीन झालों यांत नवल तें कोणतें? मुसलमानांनीं आम्हांस पादाक्रान्त केलें त्याच वेळेस असें सिद्ध झालें कीं, या भरतखंडांत राहणाऱ्या आर्य लोकांत स्वातंत्र्यरक्षणाचें सामर्थ्य राहिलें नाहीं. मुसलमानांच्या पाठीमागून आम्हांस इंग्रज न जिंकते तर त्यांचे काका दुसरे कोणीतरी जिंकते! इंग्रजांबरोबरच किंवा त्यांच्या पूर्वींपासूनही पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे युरोपीयन लोक आपलें राज्य येथें स्थापण्याची खटपट करीतच होते! आज आम्हीं इंग्रजांची प्रजा नसतों तर पोर्तुगीज, डच अगर फ्रेंच लोकांची असतों. आणि उद्यां इंग्रजांचें राज्य नाहींसें झालें तर आम्हीं स्वतंत्र होणार आहों कीं काय? त्याचें नांव कशाला? ही गोष्ट स्वप्नांतसुद्धां आणावयाची गरज नाहीं. इंग्रज गेले तर रूस आमच्या छातीवर पाय देण्यास तयार आहे-तच. तात्पर्य काय कीं, राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्यास लागणाऱ्या गुणांचा आम्हांत पूर्णपणें लोप झाला आहे; व त्यांचा फिरून आविर्भाव होऊं लागून त्यांची बरीच वृद्धि होईपर्यंत, ते फिरून प्राप्त होण्याची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे. राजकीय स्वातंत्र्य जाणें ही अत्यंत खेदजनक गोष्ट खरी. हें जाणें म्हणजे शरीरांतील सर्व इंद्रियें व त्याचे व्यापार यांचें पोषक जें चैतन्यसारतत्व तें नाहींसें होणें होय. पण तें गेलें म्हणून रुदन करीत बसण्यांत काय फायदा आहे? जगावयाचें असेल व जगणें तें चांगल्या प्रकारचें जगणें हवें असेल

तर तें चैतन्यसारतत्व फिरून आपल्या हातीं येण्याचा प्रयत्न केला पाहिजे व सांप्रत कालीं राष्ट्रसभादि साधनांच्या द्वारें तो जितका होण्यासारखा आहे तितका आम्हीं करीत आहों. ×"

या उताऱ्यांतील विचारसरणीवरून व विधानांवरून तीन गोष्टी सिद्ध होतात. पहिली गोष्ट अशी कीं राजकीय स्वातंत्र्याचें अनास्तित्व हें आगरकरांना अत्यंत दुःसह वाटत होतें. राजकीय स्वातंत्र्याला त्यांनीं राष्ट्राचें चैतन्यसारतत्व (Life Principle) असें नांव दिलें आहे. यावरून सदरहू बाबतींत त्यांची भावना केवढी तीव्र होती तें दिसून येतें. हें चैतन्यसारतत्व नाहींसें होणें म्हणजे राष्ट्राला प्रेतावस्था येणें होय, आणि प्रेताच्या सुबकपणाची किंवा रूपविशेषांची ज्याप्रमाणें कोणी पर्वा करीत नाहीं, त्याप्रमाणें ज्याला राजकीय स्वातंत्र्य नाहीं त्या राष्ट्रांत इतर कितीही मोठ्या गोष्टी असल्या तरी त्याबद्दल जगांत कोणालाही खरा आदर वाटत नाहीं. ज्याची आपल्या घरांत सत्ता नाहीं त्याच्या घरांतील दालनें कितीही प्रशस्त असलीं अथवा त्यांतील सामान-सुमान कितीही दिखाऊ असलें तरी त्याबद्दल त्याचे गोडवे गाण्याच्या कोणी भानगडींत पडणार नाहीं. तेव्हां राजकीय स्वातंत्र्य नसणें ही अतिशय दुर्भाग्याची गोष्ट आहे, हें मुख्य तत्त्व आगरकरांना पूर्णपणें मान्य होतें. दुसरी गोष्ट अशी कीं, हें स्वातंत्र्य नाहींसें होण्याला आमच्याच आंगचे कित्येक दुर्गुण किंवा आमच्या ठिकाणीं असणारा कित्येक सद्गुणांचा अभाव हीं कारणीभूत आहेत हें आगरकरांच्या मनांत नेहेमीं जागरूकतेनें नांदत होतें. राज्यांची देवघेव होते ती नीति-शास्त्राच्या तत्त्वांना अनुसरून होते, असें म्हणण्याचें धाडस अगदीं अनीतिमान् मुत्सद्दीसुद्धां करणार नाहीं. ज्याप्रमाणें नदीचें किंवा ऋषीचें त्याप्रमाणें राज्याचें मूळ शोधण्याच्या भानगडींत पडण्यांत अर्थ नाहीं. एकानें दुसऱ्याचें राज्य घेणें म्हणजे त्यानें त्या राज्याचा अपहार करणें ही गोष्ट उघड आहे. हा अपहार झाल्यानंतर तो ज्यांचें राज्य गेलें त्यांच्या कल्याणासाठीं झाला असें म्हणणें किंवा परमेश्वराच्या योजनेला अनुसरून झाला असें म्हणणें या दोन्हीही गोष्टी मुत्सद्देगिरीच्या दर्शक असल्या तरी वस्तुस्थितीच्या खास दर्शक नाहींत. तथापि ज्या वेळीं अ बचें राज्य घेतो त्या वेळीं अनें तें घेतांना नीति-शास्त्रदृष्ट्या अप्रशस्त असलेल्या साधनांचा

× निबंध संग्रह, भाग १, पृष्ठ १३१.

कितीही उपयोग केला असला तरी दोघांच्या झगड्यांत व जवळचीं साधनें व तीं उपयोगांत आणण्याचें त्याचें चातुर्य हीं अ जवळच्या साधनांहून व चातुर्याहून कमी प्रतीचीं होतीं म्हणजे तीं कमी प्रतीचीं असल्यामुळें अचा विजय झाला हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं आणि ही दृष्टि जर नसेल तर आंगांतील दोष नाहींसे करण्याची प्रवृत्ति माणसांत येणार नाहीं. या दोषांची जाणीव ही आगरकरांच्या विचारसरणींतील दुसरी महत्त्वाची गोष्ट होय. तिसरी गोष्ट म्हणजे हे दोष नाहींसे करून स्वातंत्र्य-संपादनाला व स्वातंत्र्य-रक्षणाला ज्या साधनांची आवश्यकता आहे तीं साधनें हस्तगत करून घेण्यासाठीं राष्ट्र-सभादिकांसारख्या संस्था योग्य प्रकारें चालविल्या पाहिजेत अशी आगरकांची खातरजमा झाली होती. म्हणजे दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बानर्जी, बद्रुद्दीन तय्यबजी वगैरे मंडळीचीं राज-कारणविषयक मतें आगरकरांना पूर्णपणें मान्य होतीं आणि देशाच्या प्रस्तुत परिस्थितींत राष्ट्रसभेनें अंगिकारिलेला सनदशीर चळवळीचा मार्ग हा त्यांना पसंत होता. या मार्गाचें अवलंबन करतांना सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्याय्य कृत्यांवर टीका करणें आणि लोकांना आपल्या हक्काची जाणीव करून देऊन ते हक्क त्यांना मिळावेत अशासाठीं रास्त प्रयत्न करणें या गोष्टी केल्याच पाहि-जेत हें त्यांचें स्पष्ट मत होतें व तें मत केसरीच्या अगदीं पहिल्या अंकांत जो लेख प्रसिद्ध झाला आहे त्यांतही प्रकट झालें आहे.

खुद्द राष्ट्रीय सभेसंबंधीं आगरकरांचे विचार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. त्या विचारांत त्यांच्या राजकीय ध्येयांचाही अंतर्भाव झाला आहे. "अद्यापि राष्ट्रीय सभेचें काम झालें नाहीं" या सुधारकांतील लेखांत (२८-१२-९१) आगरकर लिहितातः—

"आमच्या राष्ट्राला खरें राष्ट्रपण आणण्यासाठीं आमच्या राष्ट्रसभेची स्थापना झाली आहे असें आम्हीं समजतों. तेव्हां तें राष्ट्रपण येईतोंपर्यंत आमच्या राष्ट्र-सभेचें काम झालें असें कोणासही वाजवी रीतीनें म्हणतां येणार नाहीं. अली-कडील राजकीय विचारप्रद्धतीप्रमाणें कोणत्याही राष्ट्राला राष्ट्रपण येणें म्हणजे त्यावर अम्मल करणाऱ्या सरकाराचें नियंत्रण किंवा नियमन त्यांतील लोकांचे हातीं येणें होय. आमच्या सरकारचें अशा प्रकारचें कमी अधिक नियमन आमच्या हातीं आल्याखेरीज आमच्या राष्ट्रसभेचें कर्तव्य संपलें असें कसें

म्हणतां येईल ? "¶ या लेखाच्या शेवटीं म्हटलें आहे, "ज्याप्रमाणें हिंदुस्थानचें राज्य इंग्लंडातून होत राहील त्याप्रमाणें इंग्लंडाच्या धर्तीवर येथें स्थापिलेल्या राजकीय संस्थांत अधिकाराचा उणेपणा राहिलाच पाहिजे. पण जर या संबंधानें इंग्लंडाचें अनुकरण करणें इष्ट असेल तर तेथील हाऊस ऑफ कामन्स—सारखी राजसभा येथें स्थापण्यांत येईतोंपर्यंत राष्ट्रसभेचा कार्यभाग उरकला असें म्हणणें अप्रयोजक होणार आहे."|| या वाक्यावरून सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं आगरकरांचें राजकीय ध्येय विलायतसारखें स्वराज्य असें होतें हें स्पष्टपणें दिसून येतें. आणि हेंच ध्येय ज्यांनीं राष्ट्रसभा उत्पन्न केली त्यांचें होतें व १९२८ अखेर कलकत्ता येथें झालेल्या सर्वपक्षीय परिषदेनें तेंच मान्य केलें आहे.

२. वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानांत प्रस्तुत काळीं परकी लोकांचें राज्य कां आहे याची कारणमीमांसा केल्यानंतर त्या राज्याचें स्वरूप हिंदुस्थानांतील लोकांच्या हिताच्या दृष्टीनें कोणत्या प्रकारचें झालें पाहिजे याचें निःसंदेह चित्र आगरकरांनीं चाळीस वर्षांपूर्वीं काढलें होतें. हें चित्र स्वराज्य, वसाहतीसारखें स्वराज्य, जबाबदार स्वराज्य, साम्राज्यांतर्गत स्वराज्य वगैरे आजकाल प्रचलित झालेल्या कल्पनांना सदृश होतें आणि राजकीय बाबतींत राष्ट्रीय सभेच्या त्या वेळच्या पुढाऱ्यांशीं त्यांचें मतैक्य होतें. परंतु ध्येयाचें किंवा भावी इष्ट स्थितीचें चित्र रेखाटून व्यवहारांत काम भागत नाहीं. राज्यकारभाराचे कित्येक कायमचे व कित्येक निरनिराळ्या प्रसंगानें उपस्थित होणारे महत्त्वाचे प्रश्न असतात. आणि लोकस्थिति सुधारूं इच्छिणाऱ्या प्रत्येक मनुष्याला त्यांचा विचार करावा लागतो आणि त्यांच्या सोडवणुकीचे उपाय शोधून काढावे लागतात. असे प्रश्न आमच्या देशांत अनेक आहेत आणि त्यासंबंधीं आगरकरांचे प्रकट झालेले विचार त्या काळच्या मानानें पुरोगामी तर होतेच परंतु सध्यांच्या काळींसुद्धां ते विचारणीय आहेत. हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेसंबंधीं जे कायमचे प्रश्न आहेत ते आपण प्रथम विचारांत घेऊं. त्यांतील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे हिंदी राज्यव्यवस्थेचें हिंदीकरण ( Indianisation ) हा होय. अधिकाराच्या जागीं इंग्रज लोकांची संख्या सध्यांही पुष्कळ आहे आणि लष्करी खात्यांत अधिकाराची मुख्य किल्ली तात्त्विक दृष्ट्यासुद्धां इंग्रजी हपीसरांच्या हातांत आहे. चाळीस वर्षांपूर्वीं हिंदीकरण हा शब्द उच्चारणें म्हणजे चांदोबा मागणें असेंच

¶ निबंध सं., भा. ३, पृष्ठ १२७. || निबंध सं., भा. ३, पृष्ठ १२९.

बहुतेकांना वाटत असे. तरी सुद्धां दादाभाई नौरोजीसारख्या दूरदर्शी देश-भक्तांनीं त्याच्यापूर्वीं पंचवीस वर्षें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंतून अधिक हिंदी तरुण पास व्हावेत अशी खटपट चालविली होती आणि ती खटपट यशस्वी होण्याचा व्यवहार्य मार्ग म्हणजे सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांत व विलायतेंत एकेच काळीं घ्यावी असें त्यांचें म्हणणें होतें. त्यासंबंधीं लिहितांना "हिंदुस्थानचें राज्य कोणासाठीं?" या सुधारकांतील अग्रलेखांत आगरकर म्हणतात:—"नेटिव लोकांस सरकारी नोकरींत किती घ्यावे आणि किती घेऊं नये याविषयीं साहेब लोकांत जी चर्चा चालते तिचें बाह्य स्वरूप कसेंही असलें तरी तिच्या मुळाशीं हिंदुस्थानचें राज्य कोणासाठीं करावयाचें हा मुख्य प्रश्न असतो. हिंदु लोकांस स्थानिक स्वराज्याचे हक्क द्यावे; हिंदुस्थानांत यांत्रिक शिक्ष-णाचा व कारखान्यांचा प्रसार व्हावा; हिंदु लोकांत विद्याभिवृद्धि व्हावी; दिवाणी फौजदारी व लष्करी खात्यांत प्रतिवर्षीं अधिकाधिक नेटिव नेमीत जावे; हिंदु-स्थानांतील कायदे करणाऱ्या सभांत लोकनियुक्त सभासद असावेत;......... सारांश जेणेंकरून प्रतिवर्षीं नेटिव लोकांचें पाऊल पुढें पडत जाईल अशा रीतीनें हिंदुस्थानचें राज्य करावें असें प्रतिपादणारे जे इंग्रज लोक आहेत, त्यांच्या बुद्धीचा असा सिद्धान्त झालेला असतो कीं, एका देशानें दुसऱ्या देशाचें निरं-तर राज्य करणें अशक्य आहे इतकेंच नाहीं तर तसें होणें त्या दोनही देशांस किंवा साऱ्या जगास कोणत्याही प्रकारें परिणामीं हितावह होणार नाहीं. आज नाहीं उद्यां ज्यांचें राज्य त्यांच्या हातांत पडणें हेंच इष्ट आहे.............. उलट, लष्करी खात्यांतील मोठमोठ्या जागा नेटिव लोकांना कधींच देतां कामा नये; वरिष्ठ शिक्षणाचा प्रसार अपायकारक आहे; शेतकीची सुधारणा आणि तिला लागणाऱ्या यंत्रांचें ज्ञान या गोष्टी हिंदु लोकांस पुरे आहेत. इतर कार-खान्यांच्या नादांत त्यांनीं पडण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. सर्व खात्यांतील वरच्या जागा युरोपियन लोकांच्या हातीं असल्या तरच हिंदुस्थानचा राज्य-कारभार नीट चालून त्या देशांत शांतता राहील व तज्जन्य सुखही लोकांस मिळेल—याप्रमाणें म्हणत असणाऱ्या इंग्रज लोकांची अशी खातरी होऊन गेलेली असते कीं, राज्यापासून परिणामीं जगाचें अथवा हिंदुस्थानचें हित होवो अगर न होवो, तें राज्य खुद्द आपल्या देशास निरंतर फायद्याचें आहे, आणि म्हणून हरप्रयत्नानें त्याचें संगोपन करणें आपलें कर्तव्य आहे.......... हिंदुस्थानचे सेक्रेटरी लॉर्ड किंबर्ले.......आणि इंडिया कौन्सिलचे पांच सभा-

सद या साऱ्यांनीं हिंदुस्थानांत मोठमोठ्या जागा भरल्या असून त्याबद्दल आतां त्यांना जाडीं जाडीं पेन्शनें मिळत आहेत. हे सारे बुद्धिमान् व राजकारस्थान-कुशल असून त्यांना हिंदुस्थानच्या लोकस्थितीची पुष्कळ माहिती आहे असा त्यांचा लौकिक आहे. पण या सर्व गोष्टींचा त्यांच्या मनावर कसा परिणाम झाला आहे तो पहा! एकानें तरी समकालीन परीक्षा घेण योग्य आहे असें म्हणावयाचें होतें! कोठून म्हणणार? दुसऱ्यावर अम्मल गाजविण्यांत, दुसऱ्याच्या श्रमाचें फळ नाहींसें करण्यांत—ज्यांच्या आयुष्याचा उत्तम भाग गेला; ज्यांचा सांप्रत चरितार्थही अशा रीतीनें केलेल्या नोकरीच्या पेन्शनावर अवलंबून आहे; ज्यांना मनुष्यजातीचें स्थायिक कल्याण कशांत आहे व तें कशानें होईल याचा विचार करण्यास फुरसत सांपडली नाहीं, आणि कोणीं तें समजावून देण्याचा प्रयत्न केल्यास तें समजून घेण्याची बुद्धि किंवा इच्छा नाहीं; सारांश जे इंग्लंडच्या स्वतंत्र वातावरणांत जन्मास आले असून व सध्यां राहात असून परान्नसेवनामुळें व पराभूत लोकांच्या दीर्घ सानिध्यामुळें ज्यांच्या अंतःकरणांतील उदार विचारांचें बीज नष्ट झालें आहे त्यांना पतित लोकांनीं हळू हळू वर यावें आणि अखेरीला स्वतंत्र व्हावें असें वाटणें अशक्य आहे. हिंदू लोकांच्या अधिकारवृद्धीचा व त्यांच्या भावी स्वातंत्र्याचा विचार यांच्या डोळयांपुढें आल्याबरोबर आपला निभाव कसा लागेल; आपल्या पोरांबाळांस मुबलक द्रव्य संपादण्यास व अधिकार गाजविण्यास कसें सांपडेल; आपल्या देशाच्या राज्यविस्ताराची आणि त्याच्या व्यापाराची काय अवस्था होईल; आणि आपलें राज्यवैभव गेलें असतां आपणांस केवढी दुर्गति प्राप्त होईल; अशा विचारांनीं यांच्या वृत्ति वेडावून जाऊन, हिंदु लोकांवर हरप्रयत्नानें सतत अंमल चालविणें यांतच इंग्लंडचें हित आहे अशी कल्पना (करून तीसंबंधीं) देशबांधवांची खात्री करण्यासाठीं अगदीं मूर्ख मनुष्याच्या विचारासारखे विचार यांच्या डोक्यांतून निघतात आणि "तुम्ही आमचे गुलाम होऊन रहाण्यांतच तुमचें खरें कल्याण आहे" अशी आमची खात्री करण्यासाठीं अगदीं अजागळपणाचे बोल हे बोलतात यांत कांहीं नवल नाहीं.........." * या लेखावरून हिंदीकरणाला जो विलायती लोकांचा विरोध आहे त्याचें खरें निदान आगरकरांनीं केलें होतें असें आपणाला दिसून येतें आणि लेखाला

* नि. सं., भाग दुसरा, पृष्ठ ५६२–५६७.

दिलेल्या अभिधानावरूनच हिंदुस्थानचें राज्य हिंदी लोकांसाठीं अशी स्थिति प्राप्त होणें म्हणजे स्वराज्य मिळणें असें ते समजत होते. या लेखाच्या शेवटीं ते असेंही सुचवितात कीं “ ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर सर्वथैव अवलंबून असतें. ही सुप्रसिद्ध इंग्रजी म्हण ध्यानांत घेऊन इंग्लंडांत जे खरे उदार पुरुष आहेत त्यांच्या साहाय्यानें आम्ही आपल्या उन्नतीचा मार्ग अहर्निष आक्रमिला पाहिजे ” अर्थात् आगरकरांची राष्ट्रीय चळवळ एवढ्यावरच अवलंबून नव्हती; आणि ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर या तत्वाला अनुसरून राष्ट्रीय संसाराच्या प्रत्येक भागांत आपण सुदृढ व्हावें अशी त्यांची खटपट होती. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत पास होणें हिंदी उमेदवारांना सुलभ करणें याच्या विरुद्ध तेव्हां ज्या गोष्टी आणल्या जात असत त्याच अद्यापि हिंदीकरणाच्या विरुद्ध आणल्या जातात; म्हणून आगरकरांनीं लिहिलेल्या आणखी एका लहानशा पण समर्पक आणि सडेतोड लेखाचें येथें अवतरण घेणें इष्ट वाटतें. १८९३ सालीं सिव्हिल सार्व्हिसची परीक्षा विलायत व हिंदुस्थान या देशांत एकाच वेळीं घ्यावी म्हणून हौस आफ कॉमन्समध्यें ठरावसुद्धां पसार झाला, पण हिंदुस्थानसरकारच्या विनंतीवरून सदर ठराव अमलांत आणतां येत नाहीं अशा तऱ्हेचा हुकूम स्टेट सेक्रेटरींनीं काढला. त्या खलित्यावर या लेखांत फार समर्पक आणि निर्भीडपणाची टीका आहे.

३. “ वेळ मोठी आणीबाणीची आहे; या वेळीं स्तब्ध बसाल तर फसाल ” हा लेख ता. १८ जून १८९३ च्या सुधारकांत प्रसिद्ध झाला. त्यांत म्हटलें आहेः—“ ता. २ जून १८९३ रोजीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत एकसमयावच्छेदेंकरून घेतली जावी म्हणून पार्लमेंट सभेनें जो ठराव पास केला होता, तो अमलांत आणतां येत नाहीं अशा आशयाचा स्टेट सेक्रेटरीकडून हिंदुस्थान सरकारास खलिता आल्याचें यापूर्वीच वाचकांस माहीत झालें आहे; स्टेट सेक्रेटरीचें असें मत होण्यास माजी व्हाईसरॉय लॉर्ड लॅन्सडौन यांनीं अशीं काय बलवत्तर कारणें दिलीं आहेत हें त्या वेळीं सदरहू खलित्याचें प्रतीक आमचे पुढें नसल्यामुळें समजण्यास मार्ग नव्हता. हल्लीं हा सर्व खलिता प्रसिद्ध झाला आहे. व त्यांत हिंदुस्थान सरकारच्या बलवत्तर कारणांचाही समावेश झालेला आहे........त्यांतील कांहीं कारणांचा पुढें थोडक्यांत उल्लेख केला आहे. त्यांवरून त्यांची बलवत्तरता वाचकांस सहज ताडतां येईल.

"ही परीक्षा येथें न घेण्याचें पहिलें कारण असें दिलें आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांची लायकी पाहून त्यांस वाटेल त्या दर्जाच्या जागा देण्यांत येतील म्हणून वेळोवेळीं ब्रिटिश सरकाराकडून वचनें देण्यांत आलीं आहेत म्हणून जें प्रतिपादन करण्यांत येतें, त्याच्या पूर्ततेस हिंदुस्थानांत परीक्षा घेण्याचें मुळींच कारण नाहीं. बरें, घटकाभर कारण आहे असें मानलें, तथापि ती घेण्याच्या मार्गांत अनेक दुस्तर अडचणी आहेत, हें ती येथें न घेण्याचें दुसरें कारण होय. कदाचित् या अपरिहार्य अडचणींचा परिहार करितां आला, तथापि हिंदुस्थानची राज्यव्यवस्था सुयंत्र चालण्यास येथें युरोपीयन अधिकाऱ्यांची जी नियत संख्या राखणें अत्यंत अवश्य आहे, ती ही परीक्षा या देशीं सुरू केल्यानें, राखतां येणें शक्य नाहीं. दुसरें, एखादा नेटीव्ह ही परीक्षा पास झाला म्हणजे तेवढ्यावरूनच त्याची मोठ्या दर्जाचीं कामें करण्यास लायकी ठरते असें थोडेंच आहे. अशानें वाटेल तो गवत्या गोमाजी अधिकारावर यावयाचा व लोकांच्या मनांत अधिकाऱ्यांविषयीं जी सन्मानबुद्धि असणें अवश्य आहे, ती मुळींच राहूं शकणार नाहीं. परीक्षेवरच लायकी ठरविल्यानें दुसरा असा एक अन्याय होण्याचा संभव आहे कीं, ज्यांना अधिकार गाजविण्याची पूर्वापार संवय झालली आहे असे मुसलमान, शीख वगैरे लोक ही परीक्षेची कटकट त्यांच्यानें उरकत नसल्यानें मोठ्या जागांस नालायक ठरणार व त्यांच्या अनेक गुणांस सरकार आंचवणार. ही परीक्षा येथें न घेण्यास आणखीही एक जबरदस्त कारण आहे. तें हें कीं, ही परीक्षा येथें सुरू केली तर ती पास होणारांची सोय केली पाहिजे. हल्लीं देशांत असलेल्या युरोपीयन अधिकाऱ्यांची संख्या कमी करण्याचें तर नांवच काढावयास नको. ते आहेत तोंपर्यंतच राज्याची बळकटी. तेव्हां राहतां राहिले प्रोव्हिन्शियल सर्व्हिसमध्यें मोठ्या विचारानें घेतलेले नेटीव्ह लोक; व यांस काढावयाचें म्हणजे वचनभंग करून त्यांच्या सर्व भावी आशांवर त्यांस पाणी घालावयास लावलें पाहिजे. एवंच, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी मि. पॉल यांचा ठराव अमलांत आणतां येत नाहीं हें सिद्ध!

"लॉर्ड लॅन्सडौनसारख्या अनुदार प्रकृतीच्या मुत्सद्यास वरील कारणें बलवत्तर वाटलीं किंवा महाबलवत्तर वाटलीं तथापि त्याचें येथें कोणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. परंतु मि. फौलरसारख्या लिबरल पक्षाच्या मुत्सद्यास तीं तशीं वाटून त्यांच्या जोरावर त्यांनीं पार्लमेंटचा ठराव झुगारून दिला,

यावरून लिबरल व कॉन्सर्व्हेटिव्ह या दोन नांवाखालीं मोडल्या जाणाऱ्या लोकांच्या वृत्तींत इंग्लंडांत कितीहि भेद दिसून येत असला, तथापि हिंदुस्थानचा संबंध आला कीं हे सारे आपलें औदार्य खुशाल एका बाजूस गुंडाळून ठेऊन वाटेल ती लांछनास्पद गोष्ट करण्यास सहसा मागें सरणार नाहींत असें वाटून हिंदुस्थानचे लोक इंग्लिश राष्ट्राच्या बहुगर्वोच्चारित न्यायबुद्धीविषयीं साशंक झाल्यावांचून राहतील असें आम्हांस वाटत नाहीं.

" मुसलमान लोकांनीं येथें मोठाले दिग्विजय केले. आहेत म्हणून ते जर मोठ्या अधिकाराचीं कामें करण्यास लायक ठरतात, तर त्यांस त्राहि त्राहि करावयास लावून अटकेपर्यंत आपला झेंडा नेणारे मराठे त्या कामास नालायक कां ठरावेत ? मराठ्यांच्या पूर्वजांनींही बादशाही गाजविली नाहीं काय ? पण या गोष्टी आतां बोलून काय उपयोग ?

पंके निमग्ने करीणि भेको भवति मूर्धगः ।*

असो. अशा प्रकारें एका जातीस व्यर्थ महती देऊन दुसरीचा नाहक पाणउतारा करणें हें " दुही माजवा आणि राज्य करा " या मूर्ख तत्वाचा अवलंब करणारांस शोभो; परंतु लिबरल पक्षानुयायी म्हणविणाऱ्या फौलरसाहेबांनींही त्यापासून होणाऱ्या घातक परिणामांकडे यत्किंचितही लक्ष न देतां त्यांचीच री ओढावी हें इंग्लिश राष्ट्राच्या औदार्यबुद्धि-ऱ्हासाचें स्पष्ट निदर्शक होय असें मोठ्या दुःखानें आम्हांस म्हणावें लागतें !

" या खलित्यांत यापूर्वीं कधींही स्पष्टपणें बोलून न दाखविलेलें असें जें एक अत्यंत भयंकर तत्व निःशंकपणें प्रणीत करण्यांत आलें आहे तें वाचून तर प्रत्येक हिंदुस्थानवासीयाचें अंतःकरण निराशेनें व त्वेषानें द्विधा झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या बळकटीस युरोपिअन अधिकाऱ्यांची हल्लीं येथें आहे तितकी संख्या तरी अत्यंत आवश्यक आहे. हें महातत्व आजपर्यंत अनेक इंग्रजांच्या डोक्यांत भ्रमण करीत होतें याबद्दल आम्हांस संशय नाहीं. परंतु इतक्या स्पष्ट शब्दांनीं तें यापूर्वीं कधींही सरकारी खलित्यांत नमूद झालें नव्हतें. हिंदुस्थानांतील वरिष्ठ दर्जाच्या जागांवर कोणाचीही नेमणूक होण्यास त्यास इंग्लिश तऱ्हेचें शिक्षण

* हत्ती चिखलांत रुतला म्हणजे बेडूक त्याच्या डोक्यावर जाऊन बसतो.

मिळालें पाहिजे व इंग्रजी राज्यव्यवस्था व इंग्रजी परंपरा यांचा त्याच्या मनावर संस्कार झाला पाहिजे इतकीच कायती आजपर्यंत अट होती; परंतु यापुढें त्या जागांस लायकी प्रस्थापित करण्यास मनुष्य गोऱ्या वर्णांचा युरोपीअनच असला पाहिजे; काळ्या वर्णांचा नेटीव्ह, विद्यादि सर्व गुणांनीं त्या जागांस कितीही लायक ठरत असला तथापि, त्याचा रंग गोरा नाहीं इतक्याच महापातकामुळें तो बहिष्कृत होणार ! मोठ्या अधिकाऱ्यांपैकीं पांच षष्ठांश जागांचा युरोपियनांकडे कायमचा मक्ता राहिलाच पाहिजे म्हणून जर हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेतां येत नाहीं, तर त्या संख्येच्या पोटावर पाय आणण्याइतके नेटीव्ह इंग्लंडच्या परीक्षेस जाऊं लागले तर तेथेंही त्यांस मज्जाव होणार हें यावरून उघड झालेंच. तात्पर्य, ब्रिटिश सरकाराकडून वेळोवेळीं मिळालेल्या व राणी सरकारांनीं १८५८ च्या जाहीरनाम्यांत दृढीकरण केलेल्या सर्व वचनांस या एका खलित्यानें पूर्ण हरताळ लागला हें निर्विवाद आहे. यापुढें आपल्या स्वतःच्या देशाच्या राज्यकारभारांत मोठमोठे अधिकार आपणांस मिळतील ही खोटी आशा नेटिव्हांनीं सोडावी, व शूद्राप्रमाणें नीच सेवावृत्तीनेंच तृप्त असण्याची त्यांनीं आपणांस संवय लावून घ्यावी; नाहीं तर ते आपलें जीवित व्यर्थ कष्टमय करून घेतील, हें त्यांनीं पक्कें समजावें; आणि ही नीच सेवावृत्तीच पत्करण्यास जर ते कबूल नसतील तर खुद्द राणीच्या जागीं असणाऱ्या स्टेट-सेक्रेटरीकडून हिंदुस्थानच्या लोकांविषयीं जो बेभरंवसा दाखविण्यांत आला आहे व येथील सर्व लोकांची जी त्यांनीं बेअब्रू केली आहे त्याचा योग्य मार्गानें प्रतिकार करण्यास त्या सर्वांनीं तयार व्हावें......"

या लेखावरून आगरकरांची राजकीय विचारसरणी किती पायाशुद्ध होती व इंग्रजांच्या हिंदी राष्ट्राचा तेजोभंग करण्याच्या धोरणाची त्यांना किती स्पष्ट व तीव्र जाणीव होती हें उत्कृष्टपणें दिसून येतें. त्याचप्रमाणें "आज ना उद्या इंग्लंडास आपल्या हिंदुस्थानविषयक राज्यनीतींत फरक करावा लागणार याबद्दल आम्हांस मुळींच संदेह नाहीं. *" हेंही त्यांच्या मनांत वागत होतें व तें त्यांनीं वरचेवर स्पष्ट शब्दांनीं राज्यकर्त्यांना बजाविलें आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं आगरकर लिहितातः—" डॉ. हंटरसारख्या......सरकारी प्रमुख स्टॅटिस्टिक्स-वाल्याचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानांतील अर्ध्या लोकांस प्रतिदिवशीं

* सुधारक, ३०-७-९४.

अर्धपोटीं झोंपीं जावें लागतें! यावरून टापटीपीचा अंमल हटकून सुखावह असेलच, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. आगगाड्या, तारायंत्रें, गिरण्या, हायकोर्टें, तार ऑफिसें, पोस्ट ऑफिसें, वर्तमानपत्रें, कॉलेजें, प्रदर्शनें, टोलेजंग इमारती, प्रचंड बाजार, दरारा उत्पन्न करणारा फौजफांटा हे आणि अशा प्रकारचे सुधारणेचे दुसरे दागिने घालून हिंदुस्थानासारखा परकी अमलांतला देश कितीही नटला तरी तो अंतर्यामीं सुखी असेलच, असें खात्रीनें म्हणवणार नाहीं. एखादे प्रसंगीं मयासुरानें निर्माण केलेल्या मायावी बाजारांत खरेदी करून बनलेल्या गिऱ्हाइकाप्रमाणें आमची स्थिति होण्याचा संभव आहे!*" तेव्हां इंग्रजी राज्याबद्दल कसलाही भलता भ्रम आगरकरांच्या डोक्यांत नव्हता, आणि परकी राज्यामुळें होणारे तोटे ते पूर्ण जाणून होते. त्याचबरोबर इंग्रजांच्या आंगांतील गुणांचेंही त्यांना पूर्ण ज्ञान होतें आणि ते गुण आपल्या लोकांच्या आंगीं यावेत अशी त्यांना तळमळ होती. सरकारचे अन्याय दाखविण्याला ते केव्हांही भ्याले नाहींत. कारण जगांत अन्याय म्हणून जेथें जेथें असेल तेथून तो नाहींसा करण्याचा प्रयत्न करणें हें त्यांचं ब्रीद होतें. आणि म्हणून सामाजिक विचारांप्रमाणेंच त्यांच्या राजकीय विचारांतही निर्भयपणा व निःसंदिग्धपणा हे गुण दिसून येतात.

४. आगरकरांच्या राजकीय विचारांच्या मुळाशीं "राजसत्तेचा अंमल शक्य तितका कमी असावा, लोकांनीं होतां होईतों स्वायत्त असावें" हें तत्त्व निःसंशय होतें व तें व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाला अनुसरून होतें. अधिकारीवर्ग (Bureaucracy) कोणत्या कारणामुळें अधिकाधिक बलिष्ठ होतो याचें त्यांनीं केलेलें वर्णन फारच बहारीचें आहे. ते म्हणतातः—

"समाजांतील लोकांचे नियामक आणि नियत किंवा शास्ते आणि शासित असे मुख्य दोन भाग असतात......या भागांपैकीं नियामक (Rulers) भाग समाजाच्या परिणतीबरोबर विस्तृत होत गेला तर त्या मानानें नियत (Ruled) भाग क्षीण होत गेला पाहिजे हें उघड आहे. ज्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांची संख्या आणि सरकारनें चालविलेलीं खातीं वाढत जातात त्या देशांतील प्रजा अधिकाधिक दुर्बल व परतंत्र होत जाते. सरकारी अधिकारी कोणत्याही खात्यांतले असले तरी त्या सर्वांचा चरितार्थ प्रजेनें दिलेल्या

* नि. सं., भाग २, पृष्ठ १४१-४२.

करांवर होत असतो. त्यामुळें होईल तितकी जमाबंदी वाढविणें आणि सक्तीचा अंमल चालविणें वगैरे गोष्टींत त्या सर्वांचे विचार सामान्यपणें एकसारखे असतात. खात्याखात्याचा केवढाही विरोध असला तरी प्रजेशीं तंटा करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां तीं चटदिशीं एक होतात, आणि प्रजेशीं उद्भवलेल्या तंट्यांत यशस्वी होणें हें सर्वांसच हितकारक आहे, असें तेव्हांच लक्षांत आणून एकमेकांस सहाय्य करितात. शिवाय निरनिराळीं खातीं परस्परांस कितीही विरुद्ध असलीं तरी प्रत्येक खात्यांतील खालच्या अधिकाऱ्यांचे वरच्या अधिकाऱ्यांशीं व मुख्य सरकाराशीं जे संबंध येतात ते सारे एकसारखेच असतात, व त्या सरकारचा आणि त्याबरोबर आपला अंमल उत्कृष्ट रीतीनें चालावा, असेंही प्रत्येकास वाटत असतें; यामुळें साऱ्या प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वभावांत एक प्रकारचें साम्य तेव्हांच उत्पन्न होतें, आणि 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' या न्यायानें प्रजेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष न देतां, आपल्या वर्गाचें हित साधण्याविषयीं ते पराकाष्ठेचे तत्पर होऊन, त्या कामीं ते एकमेकांस अंतःकरणपूर्वक मदत करतात. ज्यानें सरकारी नोकरी धरली तो पूर्वीचा कितीही सज्जन असला तरी त्याच्या वृत्तींत जो एकदम एक प्रकारचा पालट होतो त्याचें हें गुह्य आहे. स्वसंरक्षणपरायणता व स्वहितसाधनरति यांनीं प्रत्येकास घेरलें आहे; आणि तसें होणें स्वाभाविक आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ व चैन प्रजेच्या श्रमाच्या फळावर अवलंबून असल्यामुळें, त्याचा होईल तितका अपहार करण्याकडे त्यांची प्रवृत्ति किती होत जाते, हें कधीं कधीं त्यांच्या ध्यानांतसुद्धां येत नाहीं." * नोकरशाहीचें हें चित्र मोठ्या मार्मिकतेनें काढलेलें असून तें अमुक एका देशाचें नसून सर्व देशांना लागू आहे हें उघड आहे.

नोकरशाहीच्या स्वभावाचें याप्रमाणें वर्णन करून तिच्या हातांतील सत्ता अधिकाधिक कां वाढते याचें याच लेखांत पुढें पर्यालोचन केलें आहे. "अधिकारी आणि प्रजा यांत उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वास केवळ अधिकारीच कारण होतात, असें नाहीं. प्रजेकडूनही त्या कामांत बरीच मदत होते. मनुष्यमात्राचा असा स्वभाव आहे कीं लहानपणापासून जी स्थिति (आहे ती) कितीही वाईट असली तरी (त्याला) तीच बरी वाटत

* नि. सं., भाग २ रा, पृष्ठ १४५–४६.

असते. ज्यांना जन्मापासून स्वातंत्र्याचा उपभोग मिळत आहे त्यांना पारतंत्र्याचा जसा कंटाळा असतो, त्याप्रमाणें जे जन्मापासून पारतंत्र्यांत वाढले असतात, त्यांना स्वातंत्र्य आपणांस उचित नाहीं, असें वाटूं लागतें.........
तात्पर्य, जन्मादारभ्य ज्या गोष्टींची आपणांस संवय लागलेली असते, त्या गोष्टी इतरांस कितीही वावग्या वाटत असल्या; व त्यांपासून अखेरीस आपलें केवढेंही नुकसान होण्याचा संभव असला, तरी त्या आपणांस बऱ्या वाटतात आणि त्या टाकणें आपणांस सहसा रुचत नाहींत. दूर कशाला, आपल्या लोकांच्या राजकीय विचारांकडेच क्षणभर पहा. आम्ही पहिल्यापासून अनियंत्रित एकसत्तात्मक राज्यपद्धतींत वाढलेलों असल्यामुळें 'राजा कालस्य कारणम्' अशी आमची पक्की समजूत, व ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पहाण्याची आम्हांस खोड ! लोकशिक्षण असो, व्यापारवृद्धि असो, यांत्रिक शोध असो, मादकद्रव्यसेवननिषेध असो, सामान्य नीतिप्रसार असो—काय पाहिजे तें असो; अगदीं शुष्क गोष्टींपासून मोठ्या महत्वाच्या गोष्टीपर्यंत सरकारापुढें तोंड वेंगाडल्याशिवाय व राज्यकर्त्यांची मदत मागितल्याशिवाय, आमचे हातून कांहीं एक होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. केशवपन किंवा बालविवाह कायद्यानें बंद करा, असें कोणी म्हटलें, कीं केवढा अनर्थ करून सोडावयाचा कीं जशी कांहीं स्वातंत्र्यवृक्षावर आकाशांतील कुऱ्हाडच पडत आहे ! म्हणजे काय कीं बायकांच्या व मुलांच्या पारतंत्र्याचा विच्छेद करणाऱ्या कायद्यास स्वातंत्र्यापहारक कुऱ्हाड म्हणावयाचें, आणि ज्या गोष्टींनीं खरोखर स्वातंत्र्यापहार होत आहे त्यांस स्वातंत्र्यसंरक्षक म्हणून प्रेमानें कवटाळावयाचें— अशी आमची शोचनीय अवस्था होऊन गेली आहे. पण कांहीं अंशीं ही अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत ज्यांचीं अनेक शतकें गेलीं आहेत त्यांना स्वातंत्र्यांत बाऊ वाटावयाचा व पारतंत्र्यच सुखावह वाटावयाचें !..........हाडांमांसास खिळलेले आचार सामान्य लोकांसच बरे वाटतात असें नाहीं तर त्यांतील दोष विचारी विद्वानांस देखील सहसा दिसत नाहींत, व दिसले तरी त्यांचा अव्हेर करणें हें त्यांच्यानेंही सहन होत नाहीं. यामुळें ज्या ठिकाणीं सरकारी अंमल मोठ्या जुलमाचा असतो त्या ठिकाणीं तो वाढत जाण्यास प्रजेचें वर्तनही बऱ्याच अंशीं कारण होतें. जों जों सरकारी अधिकारी अधिकाधिक सक्ति करितात तों तों प्रजेच्या आंगीं अधिकाधिक सहनशीलता येत जाते, व जों जों ही वाढत जाते तों तों अधिकाऱ्यांस अधिकाधिक जुलूम

करण्यास सवड होते. अशा रीतीनें एका बाजूनें औद्धत्य व दुसऱ्या बाजूनें नम्रता; एका बाजूनें स्वामित्व आणि दुसऱ्या बाजूनें गुलामगिरी यांची अधिकाधिक वाढ होत गेल्यास, उत्पादक लोकांची संख्या आणि त्यांनीं केलेलें उत्पन्न हीं दोनही संपुष्टांत येऊं लागतात. हळू हळू साऱ्यांसच कमी अधिक भिकारपण येऊन लोकसंख्येची वाढ खुंटते; आणि असाच प्रकार अधिकाधिक होत गेल्यास ती कमी होऊं लागून अखेरीस समूळ ऱ्हासाच्या पंथास लागते. तेव्हां लक्षांत काय गोष्ट ठेवावयाची कीं समाजाची उन्नति होण्यास एका प्रकारची नियामक व्यवस्था जरी अत्यावश्यक आहे, तरी ती फाजील होतां कामा नये. नियामक व्यवस्था अस्तित्वांत आली म्हणजे समाजाच्या आंगीं एका प्रकारचें दार्ढ्य येऊं लागतें. व जों जों ती व्यवस्था वाढत जाईल तों तों तें दार्ढ्य अधिकाधिक प्रबल होत जाऊन, समाजांतील लवचिकपणा अगदीं नाहींसा होतो, व ज्या मानानें हा लवचिकपणा नाहींसा होत जातो त्या मानानें समाजाच्या पुढील सुधारणेस प्रतिबंध होतो. म्हणून ज्यांच्या हातीं राज्यसूत्रें असतील त्यांनीं वरील विचार रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेऊन, सरकारी अंमल अगदीं बेतापुरता चालावयाचा असा निश्चय केला पाहिजे. ज्या देशांतले लोक चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणें हातपाय हालविण्यास अगदीं असमर्थ झाले असतील अशांस गांवांतून बाहेर पडून दोन पावलें टाकतां येण्यापुरती मदत सरकारनें अवश्य केली पाहिजे. पण त्यापुढें त्यांना आपल्या पायांनीं चालूं न देणें म्हणजे त्यास निरंतर पंगू करून ठेऊन त्यांचें आणि त्याबरोबर आपलेंही नुकसान करून घेणें होय, हें अंमलदारांनीं कधींही विसरतां कामा नये." *

राजकीय विषयांवर तात्त्विक दृष्ट्या मराठी भाषेंत या प्रकारचे विचार लिहिणारे आगरकर हे पहिले होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या उपरोक्त विचारांची विशेष फोड करावयाची म्हणजे निराळा ग्रंथ लिहावा लागेल. तेव्हां आणखी एक दोन विषयांसंबंधीं त्यांचे विचार येथें देऊन हें त्यांच्या राजकीय मतांचें संक्षिप्त अवलोकन आटोपतें घेतलें पाहिजे.

५. "फेर जमाबंदी आणि लष्करी खर्च" या अग्रलेखांत (सुधारक, ७–१२–९१) आगरकरांनीं प्रदर्शित केलेले विचार त्यांच्या लेखांचें वर वर अव-

* नि. सं., भाग २, पृष्ठ १४८–५०.

लोकन ज्यांनीं केलें आहे व त्यांचे " सामाजिक " म्हणून समजले जाणारे विचार ज्यांना मान्य नाहींत त्यांना तर अगदीं नवे वाटतील. आगरकर लिहितातः— " सरकारी अधिकारी रयतेच्या नांवानें रड गात असतात पण रयतेनें त्यांच्या विरुद्ध तक्रार केली तर ती त्यांना बरी वाटत नाहीं. आमचे परदेशस्थ प्रभु आमच्या सामाजिक आचारांतील गौणत्वें शोधून काढून तीं दूर करण्याविषयीं आम्हांस मोठीं प्रेमपुरस्सर व्याख्यानें देत असतात; पण त्यांच्या अमलांत ज्या चुका होत आहेत, व ज्यामुळें आमचें अतोनात नुकसान होत आहे, त्याबद्दल टाकानें व तोंडानें आम्ही वर्षांच्या वर्षें त्यांच्यापुढें किटकिट करीत असलों तरी ती त्यांना ऐकूं येत नाहीं व ऐकूं आली तरी चुका दूर करण्याचा धीर त्यांना होत नाहीं. जशा सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत तशा राजकीय सुधारणाही आवश्यक आहेत; किंबहुना मागें एका प्रसंगीं ऑ. मि. जस्टिस तेलंग यांनीं अत्युत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन केल्याप्रमाणें सामाजिक सुधारणेपेक्षांही राजकीय सुधारणा विशेष आवश्यक आहेत, आणि म्हणून राजकीय सुधारणा सामाजिक सुधारणांच्या अगोदर झाल्या पाहिजेत. सुधारणांचा वास्तविक पाहतां असा क्रम असून आमचें सरकार त्याचा व्युत्क्रम करूं पहातें हें आश्चर्य नव्हे काय ? अथवा हें आश्चर्य कसलें ? हा वर सांगितल्याप्रमाणें मनुष्यस्वभावच आहे. सरकार म्हणून कोणी अशरीरी बागुलबावा, पिशाच किंवा देवता आहे, असें ज्यांस वाटत असेल त्यांना या गोष्टीचें आश्चर्य वाटेल तर वाटो; पण सरकार म्हणजे मनुष्यांच्या इतर समुदायासारखाच एक समुदाय आहे, असें ज्याच्या मनांत नेहमीं वागत असेल, त्याला आमच्या सरकारची आमच्या सामाजिक सुधारणेविषयीं कळकळ आणि आमच्या राजकीय सुधारणेकडे दुर्लक्ष पाहून मोठेंसें नवल वाटणार नाहीं. तथापि सरकारी अधिकाऱ्यांनीं ही गोष्ट नेहमीं लक्षांत वागविली पाहिजे कीं स्थिति आणि प्रगति ( Order and Progress ) यांच्या अनोन्य संबंधासारखा राजकीय आणि सामाजिक सुधारणांचा परस्पर संबंध आहे. अगोदर जगणें आणि मग चांगल्या रीतीनें जगणें. चैतन्यरक्षण झाल्याशिवाय तें सुखानें घालवितां येणें शक्य नाहीं. मूळ द्रव्य असल्याशिवाय कारागिरी कोठून येणार ? विशिष्ट प्रकारच्या राजकीय व्यवस्था समाजाच्या अस्तित्वाला अत्यावश्यक आहेत; म्हणजे त्या नसल्या तर समाजाची वाताहत होते. सामाजिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. त्या समाजास शोभा देतात

किंवा विशेष प्रकारचा आनंद उत्पन्न करतात. तेव्हां त्या मागून झाल्या तरी चालतील. जातिभेद, बालविवाह, असंमत वैधव्य, केशवपन वगैरे दुष्ट चालीं-पासून आम्हांस पुष्कळ त्रास होत आहे. पण मिठावरील जबरदस्त कर, दर तीस वर्षांनीं आमच्या जमिनीच्या बोकांडीस बसणाऱ्या रेव्हेन्यू सर्व्हेचा फेरा, व यमोदराप्रमाणें प्रतिवर्षी कोट्यवधि रुपये भक्ष्यार्थी पडले तरी फिरून आपलें हपापल्यासारखें करणारें लष्करी खातें, इत्यादिकांपासून आम्हांस जो त्रास होत आहे, त्यापुढें सामाजिक शोचनीय दुराचारापासून होणारा त्रास कांहींच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. या घटकेस ज्या विधवा वैधव्यदुःख भोगीत आहेत, किंवा येथून पुढें आणखी शंपन्नास वर्षांत ज्यांना तें भोगावें लागेल त्या सर्वांचें दुःख एके ठिकाणीं केलं तरी तें १८७५–७६–७७ सालच्या दुष्काळांत जीं साठ लक्ष मनुष्यें अन्नान्न करून मेलीं त्यांच्या दुःखाबरोबर येणार नाहीं अशी आमची खातरी आहे. ज्या अर्थी पर्जन्यास्त्र फेंकून हटकून पाऊस पाडण्याची व दुष्काळ पडूं न देण्याची कला आमच्या सरकारास अद्यापि साधलेली नाहीं त्या अर्थी अवर्षणामुळें जनावरांच्या व मनुष्यांच्या प्राणहानीबद्दल सरकारास सर्वथैव जबाबदार धरणें न्याय्य नाहीं हें आम्हीं जाणून आहों. पण त्या नाशाच्या जेवढ्या भागास सरकारचें दुर्लक्ष किंवा हेळसांडीचें वर्तन कारण झालें आहे तेवढ्याबद्दल त्यास दोष देण्यास काय हरकत आहे ?" ×

सामाजिक सुधारणा आधीं का राजकीय सुधारणा आधीं, सामाजिक बाब-तींत गरम आणि राजकीय बाबतींत थंडे किंवा राजकीय बाबतींत गरम आणि सामाजिक बाबतींत थंडे, हे पंथ कोणाचे असतील त्यांचे असोत; त्यांचा आगरकरांशीं संबंध नाहीं असें आम्ही पहिल्या भागांत म्हटलें होतें व पुढें प्रसंगानुरोधानें सर्वांगी सुधारणेचे आगरकर पुरस्कर्ते होते असें वरचेवर दाख-विलें आहे त्याला वरील उताऱ्यानें मोठीच दृढता येते. हा लेख सरकारला उद्देशून लिहिला आहे आणि "तुम्ही समाज सुधारा, मग राजकीय सुधारणांची बात बोला" या कित्येक इंग्रजांच्या कोटिक्रमाला या लेखांत आगरकरांनीं फारच समर्पक उत्तर दिलेलें आहे. अर्थात् राजकीय बाबतींत सुधारणा करणें हें सर्वस्वी सरकारच्या हातांत असल्यामुळें आणि त्यावेळीं सरकार पूर्णपणें एक-तंत्री असल्यामुळें या लेखांतील प्रतिपादनाचा दृष्टिकोण लोकांना उद्देशून लिहिलेल्या लेखांहून निराळा आहे व तसा तो असणें आवश्यक व अपरिहार्य

× निबंध संग्रह, भाग तिसरा, पृष्ठ ११५-१६.

आहे हें चतुर वाचकांच्या लक्ष्यांत येईल. आगरकरांनीं सामाजिक सुधारणेचा पुरस्कार फार तीव्रतेनें केला पण त्यांची सामाजिक सुधारणा व्यापक अर्थाची होती हें एक; आणि ती सुधारणा करतांना दुसरीं सर्व कामें बंद ठेवावयाचीं असें त्यांचें म्हणणें मुळींच नव्हतें हें दुसरें. हें म्हणणें स्वतः कांहींही सुधारणा न करतां आणि आपल्या आंगांतील दोष घालविण्याचा प्रयत्न न करतां जे केवळ परक्यांना शिव्या शाप देण्यांत आपली शक्ति खर्च करीत होते व लोकांच्या दोषांची स्तुति करून त्यांची मान्यता संपादन करीत होते त्यांचें होतें; आगरकरांचें नव्हतें. नामदार गोपाळराव गोखले विलायतेंत आणि कौन्सिलांत सणसणीत भाषणें करीत. कारण साहेबाच्या देखत साहेबाचे कान पिरगळावयाचे हा त्यांचा बाणा होता. साहेब जवळ आसपास नाहीं असें पाहून त्याला अद्वातद्वा शिव्या देऊन घ्यावयाच्या व मग लोकांनीं "वाहवा" म्हणावयाचें एवढ्यानें साहेबावर जो परिणाम व्हावयास पाहिजे तो होत नसतो. गोखले ज्या कारणासाठीं विलायतेंत किंवा कौन्सिलांत सरकारवर यथायोग्य व तीव्र टीका करीत तशी लोकांपुढेंही करीत. परंतु लोकांपुढें बोलतांना त्यांच्यांत स्वदोषांची जाणीव उत्पन्न होऊन सुधारणा व्हावी ही दृष्टि ठेवून प्रत्येक देशहितकर्त्यानें बोललें पाहिजे हें जसें ते विसरले नव्हते तसेंच आगरकर विसरले नव्हते. आणि म्हणून लोकांना उद्देशून लिहिलेल्या लेखांत लोकांवर टीका व सरकारला उद्देशून लिहिलेल्या लेखांत सरकारावर टीका यावी हें साहजिक आहे. वरील उताऱ्यांत जी समीक्षता आहे, ती ज्या वाचकांत आहे, तो अर्थात् त्याचा भलताच अर्थ लावणार नाहीं. लोकांचे दोष सांगून ते सुधारणें हें कार्य लोकांसाठीं सर्वस्वाचा ज्यांनीं यज्ञ केला आहे अशा आगरकरांसारख्यांचें आहे. पण लोकांच्या बाबतींत जीं राजकीय कर्तव्यें आंगावर आहेत तीं जे बरोबर बजावीत नाहींत अशा सरकारला किंवा तें सरकार ज्यांचें आहे अशा कोणत्याही इंग्रजाला हिंदुस्थानांतील सामाजिक दोष दाखवून आपल्या हिंदुस्थानविषयक अहितकारक धोरणाचें मंडण करतां येणार नाहीं हें वरील लेखांत फारच मुद्देसूद रीतीनें सांगितलें होतें. आगरकरांची सामाजिक टीका लोकांना सुधारण्यासाठीं होती; सरकारी अधिकाऱ्यांची सामाजिक टीका स्वतःच्या बेजबाबदार कारभाराच्या समर्थनासाठीं असते हा भेद येथें लक्षांत ठेवला पाहिजे.

६. आगरकर जीवमान होते त्या वेळीं सध्यां प्रचलित असलेले भेद राजकीय बाबतींत नव्हते; परंतु राजकारणाच्या पुरोगामी तत्त्वांचा तेव्हां ते पुरस्कार करीत होते हें वर दिलेल्या उताऱ्यांवरून उघड होतें. हिंदुस्थानची राजकीय

स्थिति लोकांनीं बदलण्याला लोकांत सुधारणा झाली पाहिजे व राष्ट्राभिमान वाढण्यासाठीं, जीं जीं कारणें त्याच्या विरुद्ध असतील तीं नाहींशीं केलीं पाहिजेत असें त्यांचें स्पष्ट मत होतें आणि म्हणूनच सामाजिक सुधारणेच्या रास्त व व्यापक अर्थांत राजकीय सुधारणेचा अंतर्भाव होत होता आणि म्हणून राजकीय सुधारणेचीं व सामाजिक सुधारणेचीं अशीं दोन निराळीं कार्यक्षेत्रें ते केव्हांही मानीत नव्हते. जो खरा सुधारक आहे तो राजकीय स्वातंत्र्याला विरुद्ध असणें शक्य नाहीं. आगरकर तर तसे विरुद्ध नव्हतेच, पण त्यांचीं मतें ज्यांना खरोखर पटतात त्यांतही कोणी तसे नाहींत. सामाजिक सुधारणेचीं तत्त्वें मुळीं नाकबूल करणारे कांहीं दीड शहाणे राजकारणी तेव्हां झाले आणि त्यांच्या स्वरूपाचें यथार्थ आविष्करण करणें आगरकरांना भाग पडलें. ती चिरड पोटांत ठेवून या लोकांनीं आगरकरांच्यावर वाटेल तीं कुभांडें रचलीं. आगरकरांच्या लेखांचा सूक्ष्म अभ्यास केला म्हणजे हीं कुभांडें खरीं होतीं असें कोणीही म्हणणार नाहीं. किंबहुना राजकीय, सामाजिक, आर्थिक वगैरे सुधारणांच्या निरनिराळ्या बाबींचें योग्य परीक्षण व परिशीलन आगरकरांनीं मराठी भाषेंत फार उत्तम प्रकारें करून महाराष्ट्रीयांना उन्नतीचा खरा मार्ग दाखविला असेंच प्रत्येक सुज्ञ माणूस कबूल करील. आगरकर स्वातंत्र्याचे चहाते होते, सर्व बाबतींत त्यांना स्वातंत्र्य हवें होतें, अर्थात् राजकीय संसारांत तर त्यांना तें हवेंच होतें. त्यांच्या कित्येक टीकाकारांना मात्र राजकीय स्वातंत्र्याच्या भपकेदार नांवाखालीं इतर सर्व ठिकाणीं स्वातंत्र्याची गळचेपी करण्याची आसुरी महत्वाकांक्षा होती. आणि म्हणून त्यांना आगरकरांचा स्वातंत्र्यवादी पंथ नको होता. पण स्वातंत्र्य ही अशी अद्भुत शक्ति आहे कीं तिचा प्रादुर्भाव कोठेंही एका क्षेत्रांत झाला कीं तिचा प्रभाव सर्वत्र दृग्गोचर झाल्याशिवाय रहात नाहीं. आणि म्हणून अस्पृश्यांची गुलामगिरी धुवून काढण्यासाठीं ज्यांनीं आटोकाट प्रयत्न केले, स्त्रियांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठीं ज्यांनीं एवढे व्याप केले, त्यांना अर्थात् हिंदुस्थान हें "गुलामांचें राष्ट्र" रहाणें मुळींच पसंत नव्हतें. आणि म्हणून आगरकरांची भूमिका केवळ राजकीय स्वातंत्र्याचा आरडा करून बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीचें समर्थन व संवर्धन करणाराहून जशी अगदीं भिन्न होती तशी त्यांहून अतिशय श्रेष्ठ होती; आणि त्यांच्या गौरवाचें ती भूमिका हें एक प्रधान कारण आहे हें आतां सर्वांना पटलें आहे.

## ( इ ) आर्थिक विचार

आगरकर हे अर्थशास्त्रांत चांगले निष्णात होते आणि आर्थिक विषयांवर सोपपत्तिक व सुलभ प्रकारें लिहिणारे ते मराठींतील पहिले लेखक होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रास्ताविक चर्चेंत मूलभूत तत्वांचा उल्लेख केला आहे त्यांना अनुसरून आर्थिक बाबतींतही आगरकरांचे विचार होते. केसरी व सुधारक या दोन्ही पत्रांतून आर्थिक विषयासंबंधीं निरनिराळया वेळीं त्यांनीं विवेचन केलेलें आहे. केसरी निघाल्यावर चार महिने पुरे होण्यापूर्वींच "आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण "* या विषयावर त्यांचा लेख प्रसिद्ध झाला. त्यांत म्हटलें आहे; "नेहमीं लोकांची जी एकसारखी हाकाटी ऐकूं येते कीं, काय करावें आमचें राज्य गेलें, आम्ही पराधीन झालों, परकी लोक आम्हांस त्रास देतात, आमची सर्व संपत्ति परदेशांत चालली आहे, एवंच सर्व प्रकारें आम्हांस विपन्न दशा आली आहे! पण या सर्व विपत्तींचा विचार केला तर त्या आपणांस त्रासण्यास आपणच पुष्कळ अंशीं कारण आहों हें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. आमच्यापैकींच कित्येक आपमतलबी आणि आपलपोटे लोकांनीं आपल्या पोटाची भर करण्याकरितां बंड फितूर केलें, म्हणूनच विशेषतः आम्हांस परवशता प्राप्त झाली नाहीं काय? आपला देश भिकारी होण्याचें कारण तरी आमचेंच औदासिन्य आणि स्वदेशकल्याणा-विषयीं अनास्था हींच एका प्रकारें नव्हत काय? याचें एक ढळढळीत उदाहरण देशी कपड्याचें घ्या. परदेशांतून येणाऱ्या कापडावरील जकात सरकारनें माफ केली, यामुळें इकडील गिरणीवाल्यांचें नुकसान होत आहे. तें न होण्यास इकडील लोकांनीं स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय केला तर लाखों रुपये तन्निमित्त परदेशांत जात आहेत ते बंद होणार नाहींत काय? पण त्याविषयीं स्वदेशहितार्थ तन मन धन अर्पिणाऱ्या अशा कै. गणेश वासुदेव जोशांसारख्या पुरुषांनीं जंग जंग पछाडले, पण त्याचा कितपत उपयोग झाला?" यावरून स्वदेशी चळवळीची कल्पना महाराष्ट्रांत किती जुनी आहे हें तर लक्षांत येतेंच पण त्या कल्पनेसंबंधीं इकडील सर्व मोठ्या माणसांनीं पुष्कळ प्रयत्न केले हेंही समजतें.

* केसरी, वर्ष १, अंक १६.

इंग्रजी राज्याच्या हिंदुस्थानावर झालेल्या आर्थिक परिणामासंबंधीं आगरकरांना अगदीं सुरवातीपासून मुळींच शंका नव्हती. "हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे" या लेखमालेंत त्यांनीं त्यासंबंधीं चोख विवेचन केलेलें आहे. या लेखाच्या सुरवातीला म्हटलें आहे:—"हिंदुस्थानाचें राज्य ताब्यांत असल्यामुळें सगळ्या आशिया खंडाच्या व्यापाराचें नाक हातांत सांपडलें जाऊन इंग्लंडचा जो फायदा होत आहे, त्यामुळें हिंदुस्थानाशीं असलेल्या व्यापारापासून होणारा फायदा कांहींच नाहीं. जर हिंदुस्थान देश इंग्लंडाच्या ताब्यांत नसता, किंवा येथील राज्य फ्रेंच लोकांकडे असतें, तर अरबस्थान, इराण, ब्रह्मदेश, चीन, जपान, फिलिपी बेटें, यांशीं असलेल्या व्यापारांत यूरोपांतील इतर राष्ट्रांपेक्षां प्रस्तुत इंग्रजांचें जें अधिक वर्चस्व आहे तें तसेंच असतें कीं नाहीं याचा मोठा संशय आहे.........दुसरा विचार राष्ट्रीय आणि इतर कर्जाचा. इंग्लंडमध्यें विपुल पैसा आहे, व त्याबद्दल इंग्रज लोकांस जितकें व्याज पडावेंसें वाटतें तितकें पडत नाहीं म्हणून ते आपलीं भांडवलें दुसऱ्या देशास व्याजानें देतात. त्याप्रमाणें इंग्लंडांतील व्यापाऱ्यांनीं व इंग्लंडच्या सरकारी ब्यांकेनें देखील हिंदुस्थान सरकारला पुष्कळ पैसे दिले आहेत. हिंदुस्थान सरकारला येथलें व इंग्लंडांतलें मिळून १३७८६८०४३० रुपये राष्ट्रीय कर्ज आहे. याच्या व्याजाबद्दल आम्हांला प्रतिवर्षीं ४९५४०२१० रुपये द्यावे लागतात. आणि पांच पन्नास वर्षांचें व्याज एके ठिकाणीं केलें तर व्याजाची रक्कम मुद्दल भांडवलाएवढी होते, हें आमच्या समजंस वाचकांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं.........यावरून वाचकांच्या हें ध्यानांत येईल कीं, हिंदुस्थान देश इंग्लंडाच्या ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडांत जे पैसेवाले लोक आहेत, त्यांना हिंदुस्थानसरकारसारखें ऐपतदार कुळ कर्ज देण्यास सांपडतें; त्यामुळें मुद्दल बुडण्याची भीति न राहतां बिनबाकी व्याज प्रतिवर्षीं वेळच्या वेळीं पदरांत पडतें, हा व्यापारदृष्ट्या कांहीं हलका नफा नाहीं......इंग्लंडांतील व्यापार करणाऱ्या मंडळ्यांना येथें फायदेशीर कारखाने घालण्यास सांपडते, व पुष्कळ बाबतींत अमुक एक नफा पाडून देण्याची जबाबदारी सरकारानें आपल्याच आंगावर घेतली असल्यामुळें मंडळ्यांचें काम बिनबुड आणि निर्धास्त चालतें."×

× केसरी, वर्ष १, अंक २५ ते २८.

केसरीच्या तिसऱ्या वर्षांत म्हणजे १८८३ सालीं "व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं" म्हणून आगरकरांनीं लेख लिहिले होते व पुढें सुधारकांतही त्यांना "समाजोत्कर्षाचा मुख्य घटक—व्यापारवृद्धि" म्हणून एक सुंदर अग्रलेख लिहिला होता. हे दोन्ही लेख वाचले म्हणजे कोणत्याही विषयावर लिहिण्याला सुरवात करण्यापूर्वीं त्याविषयीं विचारपूर्वक मतें बनविण्यासाठीं आगरकरांनीं फार मेहनत घेतली होती असें स्पष्ट होतें. केसरींतील लेखमालेंत आगरकर पहिल्याच लेखांत लिहितात:—एके ठिकाणीं बसून कोणीही आपल्या सभोंवतीं नजर फेंकली असतां, त्याला असें दिसून येईल कीं, त्याच्या नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या शंभर जिनसांत सुमारें नव्वद जिनसा इंग्लंडहून आलेल्या असतात. कुलुपें, टांक, दवती, कागद, पुस्तकें, शाई, सुया, साबण, नेसावयाचीं धोतरें, व अंगांतील आंगरखे, सुताराचीं हत्यारें, तांबें, रुपें, सोनें, औषधांच्या बाटल्या, घड्याळें वगैरे साऱ्या परक्या देशांतून आलेल्या चिजा; आणि या सगळ्याबद्दल आम्ही परत काय देतों तर धान्य. या आणि असल्या अनेक वस्तु येथल्या येथें तयार करण्यास फारसें भांडवल पाहिजे आहे असें नाहीं. पण आमच्या लोकांस किरकोळ कारखाने काढण्याची चटच लागली नाहीं यामुळें आमचें पराकाष्ठेचें नुकसान होत आहे.........दहा पांच जणांनीं मिळून दहा पंधरा हजार रुपयांच्या निरनिराळ्या रकमा उभ्या केल्या, व साबण, काड्यांच्या पेट्या, मेणबत्त्या, जाड कागद, अर्क, तेल, साखर वगैरे जिनसा करण्याचे जागोजाग करखाने घातले, तर व्याजानें रुपये लावण्यापेक्षां त्यांस कमी फायदा पडणार आहे असें नाहीं. पण असल्या शुष्क कामास देखील लागणारें धाडस व माहिती आमच्या लोकांत आहेत कोठें? त्यांना वसल्या जागेहून हलायाला नको. घरच्या घरीं बसून फायदा होण्याची इच्छा मोठी. जे लोक आपले पैसे ब्यांकेंत टाकून शेंकडा चार रुपये व्याजांत समाधान मानून घेतात, त्यांनीं लहान लहान कंपन्या काढून, अशा प्रकारच्या कारखान्यांत आपले पैसे घातले तर त्यांना निदान बारा रुपये व्याज पडणार आहे. परकी राज्य असल्यामुळें आम्हांस प्रतिवर्षीं जी खंडणी द्यावी लागते, तीमुळें हा देश तर भिकार होत चाललाच आहे, पण तशांत आम्हींही हातपाय हालविण्याचें सोडलें, तर आम्हां सर्वांस लौकरच अन्नान्नदशा येईल. यासाठीं सर्व समंजस पैसेवाल्यांस आमची अशी विनंति आहे कीं..........त्यांनीं कारखाने काढण्याची सुरवात करावी.*

* केसरी, वर्ष ३, अंक ४४.

हा लेख १८८३ सालचा आहे. तेव्हांच्या परिस्थितींत आणि आतांच्या परिस्थितींत अंतर बरेंच पडलेलें आहे. तथापि उपरोक्त उताऱ्यांतील मूळभूत कल्पना सध्यांच्या काळींसुद्धां ग्राह्य आहेत, हें आगरकरांच्या भाषेंतच सांगावयाचें म्हणजे, समंजस वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

२. याच लेखांतील आणखी दोन उतारे येथें देण्यासारखे आहेत. "आमचा देश परकीय अंमलाखालीं असल्यामुळें त्याच्यापासून होणाऱ्या तोट्याखालीं चीत न होतां, कष्टानें आणि आयासानें आमचें डोकें वर काढावयाचें आहे. तेव्हां स्वतंत्र देशांतील लोकांपेक्षांही आमच्या लोकांनीं व्यापारवृद्धि, विद्यार्जन एकी वगैरे गोष्टी घडवून आणण्यासाठीं विशेष मेहनत केली पाहिजे, हें कांहीं सांगायला नको."* "मजुरी आणि कच्चा माल हीं व्यापारांचीं आवश्यक अंगें खरीं; तथापि अलीकडे युरोपखंडांत यांत्रिक कलेचा विलक्षण प्रसार झाल्यामुळें, या दोनच साधनांपासून आम्हांस व्हावा तितका फायदा होत नाहीं. आम्हांमध्यें हस्तकला शिखरास जाऊन पोहोंचली होती, याबद्दल कालाच्या फेऱ्यांतून चुकलेल्या जुन्या जिनसा अजून साक्ष देत आहेत. लांकूड आणि दगड यांवरील नकशीचें काम, सोन्यारुप्याच्या कलावतूंचे नाना तऱ्हेचे वेल, पारावताच्या रंगाप्रमाणें क्षणोक्षणीं रंगांतर भासविणारीं रेशमांचीं आणि लोकरीचीं वस्त्रें, स्पर्शानुकूल व दर्शनानंदकारी असे गजनीचे, मखमालीचे आणि किनखापाचे पट, जे पूर्वीं राजाश्रय मिळत असल्यामुळें त्यांचा पुष्कळ खप होऊन त्या त्या कारागिरांस उत्तेजन मिळे व ते धंदे मोठ्या भरभराटींत असत. तसेंच युरोपांतही हस्तकलेचा किंवा यांत्रिक कलेचा विशेष प्रसार झाला नसल्यामुळें, हिंदुस्थानच्या मालावर युरोपीय लोकांची प्रत्येक वर्षीं जबर मागणी असे. त्यामुळें इकडील कारागिरांस हवें तितकें काम मिळून त्या खंडांतून या देशांत द्रव्याचा पाट चाले......मुसलमान (लोकांस) ऐषआरामांचा विशेष नाद असल्यामुळें......त्यांची कारकीर्द येथील हस्तकौशल्याच्या लयास कारण न होतां तिच्या योगानें त्याची उन्नतीच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं... पेशवाईंत सारख्या लढाया चालल्या होत्या..............तरी स्वराज्य असल्यामुळें कारागीर लोकांस कामाची आणि अन्नाची वाण कधींच पडली नाहीं. पण खडकीची लढाई होतांच सर्व मनु बदलत गेला! आमच्या सर-

* केसरी, वर्ष ३, अंक ४५.

दारांच्या आपआपसांतील यादव्या आणि फुटाफुटी, व "अलिफ्टन" साहेबासारख्या कारस्थानी पुरुषांच्या कुटिल मसलती, यांच्यामुळें शनवारच्या वाड्यावर इंग्रजी निशाण फडकूं लागून सातारच्या छत्रपतींच्या सिंहासनावर पाटलूणवाल्या गोऱ्यांचे बूट चढले ?......या वेळेपासून दरएक नेटीव गोष्टीला उतरती कळा लागून परकीय गोष्टींचें प्रस्थ माजूं लागलें. होतां होतां अखेरीस एतद्देशीय सर्व कलांचा पूर्ण ऱ्हास होऊन, आतां आम्हांस ज्या त्या गोष्टीसाठीं इंग्लंडाकडे पाहण्याची पाळी आली आहे.........ते (इंग्रज लोक) आमच्या इतकेच अडाणी असते, किंवा आहेत तितके सुधारलेले असून आपलीं घरेंदारें येथें करून राहते, तर द्रव्यदृष्ट्या आमचें इतकें नुकसान होतें ना ! ते दुरून राज्य करीत असल्यामुळें, हिंदुस्थानच्या वार्षिक वसुलाच्या सुमारें तीन चतुर्थांश भाग देशाबाहेर जातो तो जातोच, पण यांत्रिक कलेंतही ते आम्हांपेक्षां शतपट पुढें असल्यामुळें, व्यापारासंबंधानेंही ते आम्हांस वर डोकें करूं देत नाहींत. इतक्या अडचणींतून आपली उन्नति करून घ्यावयाची आहे, तेव्हां आम्हांस कोण भगीरथ प्रयत्न केला पाहिजे, त्याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल......तिकडे (युरोपांत) यंत्रकलेच्या अचाट कार्यशक्तीपुढें हस्तकला अगदीं मागें पडून गेली व कांहीं वर्षांनीं तिचा समूळ अभाव होण्याचा संभव दिसत आहे. पूर्वीं एक माग चालविण्यास एक मनुष्य लागे; आतां पांच पंचवीस मनुष्यांच्या क्षुल्लक सहाय्यानें एकटें यंत्र पांच चारशें माग चालवूं शकतें !........ काम हाकणारे असले जबरदस्त ब्रह्मराक्षस तिकडे मनुष्यांनीं भारून टाकून आपल्या सेवेस लाविले असल्यामुळें, त्यांनीं ते देश संपत्तीनें आणि तज्जन्य सुखानें भरून टाकिले आहेत. असल्या राक्षसांशीं आमच्या इकडील साळी, कोष्टी किंवा सुतार, हातमागांनीं व हातकरवतांनीं कसली प्रतिस्पर्धा करणार ? दररोज खंड्याच्या खंड्या जंवस आणि तीळ चिरडून टाकणाऱ्या यंत्रापुढें आमच्या घाण्याच्या बैलांकडून आमचे तेलीबोवा किती घाणे उतरणार ? तर इंग्लंडसारख्या देशाशीं टिकाव धरतां येण्यास मजूर आणि कच्चा माल या दोन गोष्टींची अनुकूलता असली म्हणजे पुरे आहे असें नाहीं, तर यंत्रशक्तिही बऱ्याच उपयोगांत आली असली पाहिजे."* या उताऱ्यावरून यंत्रकलेचा निरोप

* केसरी, वर्ष ३, अंक ४६.

घेऊन पुनश्च प्राचीन आर्थिक परिस्थिति उभी करण्याच्या यातायातीला आगरकर अनुकूल नव्हते हें उघड आहे. याचें कारण त्यांनीं सुधारकांतील एका लेखांत सांगितलें आहे. "फलमूलाशन करून रहावें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वतांच्या गुहांत वास करावा, आणि संसाराच्या भानगडींत पडूं नये, असे निवृत्तिपंथाचे प्रचारक आज शेंकडों वर्षें सांगत असतां, व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिकाधिक जात चाललें आहे. तेव्हां सामान्य विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, अनेक उपभोग भोगल्यापासून मनुष्य इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी होवो किंवा न होवो, त्या गोष्टीचा निर्णय करण्याच्या भरीस मुळींच न पडतां, अनेक उपभोगांची वांच्छा करावी, ते प्राप्त होण्यासाठीं रात्रंदिवस झटावें, आणि त्यांपासून होईल तितकें सुख करून घ्यावें, असा मनुष्यांचा सामान्य स्वभाव आहे, व याच स्वभावामुळें मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या वर्तनांत इतकें अंतर पडलें आहे."† याच लेखांत आगरकर पुढें म्हणतातः—"सध्यां आम्हां निरुद्योगी हिंदु लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशीं गांठ पडली आहे. तेव्हां एक तर आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे, किंवा ते ज्या स्थितींत ठेवतील त्या स्थितींत राहण्यास सिद्ध असलें पाहिजे. आमचें भावी स्वातंत्र्य अथवा आमचें निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे." आर्थिक बाबतींत आगरकरांचा हा महासिद्धांत होता आणि म्हणून उत्पादक उद्योगाची महती त्यांनीं ठिकठिकाणीं वर्णन केली आहे. याच लेखांत ते पुढें म्हणतातः—"सगळ्याच देशांतील लोकांस सारखा उद्योग करण्याचीं स्वाभाविक व कृत्रिम साधनें असतील, व साऱ्यांस सारखें वैभव प्राप्त करून घेतां येईल, असें आमचें म्हणणें नाहीं. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक आहे कीं, कोणत्याही देशांतील लोकांस प्राप्त होण्यासारखें जें सुख असेल तें त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीनें उद्योग केल्याशिवाय कधींही प्राप्त होणार नाहीं. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व कांहीं हौस असली तर नियामक उद्योगाची, असे लोक मोठेपणास कधींही चढणार, नाहींत. पण सध्यां तर आमची तशी स्थिति होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हावयाला पाहिजे. सगळ्यांनींच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यावर

† निबंधसंग्रह, भाग १, पृष्ठ ८३.

चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ति व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करतां येणार? अंमलदार मुळींच नकोत असें आमचें म्हणणें नाहीं. पण शेर-भर मसाला आणि मूठभर तांदूळ अशी स्थिति काय कामाची?" हे विचार आज चाळीस वर्षांनींही विचारणीय आहेत. उत्पादक उद्योगाला थोडी बहुत अंगमेहनत लागते व तिची हौस लोकांत सार्वत्रिक असणें हें समाजाच्या सुस्थितीचें एक प्रधान लक्षण आहे. हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याचा ऐतिहासिक विचार केल्यानंतर आणि हिंदुस्थानचे उद्योगधंदे बुडविण्याबद्दल परकीयांना योग्य किंवा वाटेल तेवढा दोष दिल्यानंतर शेवटीं हा निर्णय निघतो कीं यापुढें आर्थिक स्थिति सुधारण्याला आमचा आम्ही जो उद्योग करूं तोच फलद्रूप होणार आहे. परकीयांना दोष यथाकाळ द्यावा, पण जी जी विचारसरणी लोकांत उद्योगाची प्रवृत्ति उत्पन्न करण्याला अडथळा करते ती राष्ट्रहितविनाशक होय हेंही विसरून चालणार नाहीं. "अंमलदारीची आवड" आणि "नोकरीची तळमळ" या गोष्टींचा आगरकरांनीं एवढा धिःकार लेखणीनें व प्रत्यक्ष कृतीनें केला; पण या बाबतींत आमच्यांत म्हणण्यासारखी सुधारणा अद्यापिही झालेली नाहीं.

२. आगरकर स्वतः उत्तम अर्थशास्त्रज्ञ होते आणि त्यांच्या वेळीं हिंदुस्थानाच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं संशोधनपूर्वक लिहिणारे पितामह दादाभाई नौरोजी, सर (तेव्हां मि.) दिनशा वाच्छा, मि. विल्यम डिग्बी वगैरे मंडळींचे लेख ते फार लक्षपूर्वक वाचीत. मि. दादाभाई नौरोजी यांनीं हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें जें यथातथ्य चित्र रेखाटलें त्याची कल्पना मराठींत आगरकरांनींच आणून देऊन, त्यासंबंधीं लोकांत जागृति उत्पन्न केली. इंग्रज लोक हिंदुस्थान श्रीमंत होत चालला आहे असें म्हणतात. इकडे तर सर्व देशांत दारिद्र्य अधिकाधिक पसरत असून रोगराईनें लक्षावधि माणसें पटापट मरत आहेत; तेव्हां हा श्रीमंतीचा, इंग्रज वर्णन करतात तो किंवा आम्हांला कधीं कधीं कलकत्ता, मुंबई वगैरे मोठ्या शहरीं भासतो तो, भपका खोटा आहे, त्यामुळें हिंदुस्थानचें खरें स्वरूप कळत नाहीं या गोष्टीबद्दल त्यांनीं सुधारकाच्या एका अंकांत फारच उठावदार वर्णन केलें आहे तें फार वाचनीय आहे. "इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचें घोर दारिद्र्य" या लेखांत सुरवातीला म्हटलें आहे:—"मुंबई शहराचा अफाट विस्तार; राजवाड्यांच्या

तोडीच्या तेथील मोठमोठ्या खासगी व सरकारी हवेल्या; चार सहा गाड्या एकीला एक लागून जाण्यासारखे टोलेजंग रस्ते; बग्यांची, शिग्रामांची व ट्रॅम-वेच्या गाड्यांची सारखी धुमश्चक्री; व्यापारांच्या गल्लयांत वाट मिळण्यासाठीं जाणारा येणारांची धक्काबुक्की; घटकोघटकीं उतारूंच्या व मालांच्या आगगाड्यांच्या शिळांचा व चाकांच्या खडखडाटाचा त्रासदायक आवाज; प्रत्येक मार्केटांत नाना प्रकारच्या जिनसांची खरेदी करण्याकरितां चांदी व नोटा खिशांत घालून, चौकशी करीत, या ठिकाणाहून त्या ठिकाणीं हिंडणाऱ्या गिऱ्हाइकांची जिकीरीची घासाघीस; बंदरांत येऊन दाखल झालेल्या हजारों पडावांची आणि मचव्यांची एकच गर्दी होऊन जाऊन समुद्राच्या पृष्टभागावर डोलकाठ्यांनीं झालेला अरण्यतुल्य देखावा; मोठमोठे सट्टे करण्यांत दंग झालेल्या अडत्यांची व व्यापाऱ्यांची होऊन गेलेली एकच धांदल; आपआपल्या कामावर जाणाऱ्या सरकारी व खासगी नोकरांची, घड्याळाकडे पहात, कमी अधिक होणारी घाईची चाल; जो तो आपापल्या उद्योगांत निमग्न असल्यामुळें इकडे तिकडे न पहातां नाकासमोर तडक चालत असल्यामुळें, देशांतून नुकत्याच आलेल्या लोकांस याला चकवा झाला असेल कीं काय, असा वारंवार होणारा भास; गिरण्यांच्या चिमण्यांतून निघणाऱ्या काळ्या धुरांचे लोळ आणि इमारतीच्या उदरांत चाललेली मोठमोठ्या यंत्रांची गडबड; न्याय-कचेऱ्या, शिक्षणालयें, तारहपिसें, पोस्टहपिसें, पेढ्या, टांकसाळ, गोद्या, वगैरे अनेक ठिकाणीं सर्व काळ दृष्टीस पडणारी ज्याची त्याची व्यासंगनिमग्नता; संध्याकाळच्या सुमारास विजेच्या दिव्यांचा, ग्यासच्या दिव्यांचा, व साध्या दिव्यांचा जिकडे तिकडे लखलखाट; सर्व दिवसभर नभाचें आक्रमण करून भागलेला रवि पश्चिम समुद्रांत स्नान करण्यासाठीं क्षितिजावर येऊन ठेपला असतां, समुद्राच्या कांठीं त्याच्या समांतर किरणांत हवा खाण्यास व सहल करण्यास गाड्यांतून, घोड्यावरून व पायांनीं जात येत असलेलीं हर एक जातीचीं व पदवीचीं सडीं किंवा सवत्स स्त्रीपुरुषें; अनेक कारणास्तव अनेक देशांतून आलेल्या, अनेक प्रकारचे पेहराव करणाऱ्या, अनेक पद्धतींच्या लोकांचे जागोजाग दृष्टीस पडणारे थवे; प्रिन्स ऑफ वेल्स, लार्ड रिपन किंवा झारतनय यांसारख्या एखाद्या मोठ्या पुरुषाच्या आगमनप्रसंगीं अथवा प्रयाणसमयीं ठळक रस्त्यांवर दृष्टीस पडणारा असामान्य थाट, लष्करी स्वारांच्या दौडी, प्रेक्षकांची अनावर दाटी, आणि पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त वगैरे मुंबईस

प्रतिदिवशीं दिसणाऱ्या गोष्टीच ज्यांस नित्य पाहण्याचा प्रसंग आहे त्यांस; किंवा या राजधानीच्या स्थितीवरून हिंदुस्थानच्या लोकांच्या स्थितीचें अनुमान करण्यास हरकत नाहीं, असें जे समजत असतील त्यांस, त्या स्थितीचें खरें स्वरूप कधींच (माहीत) व्हावयाचें नाहीं ! मुंबईची सदा दिवाळी पाहून या आधुनिक व ऐहिक कुबेरनगरींतील लोकांप्रमाणेंच या देशांतील इतर शहरांतले किंवा गांवांतले लोक धनाढ्य असतील असा तर्क करणें म्हणजे लग्नकार्यांत आमचे लोक जो शक्ती-बाहेर खर्च करितात त्यावरून आमच्या ऐपतीचा अंदाज करण्याइतकें वेडेपणाचें काम होणार आहे ! वास्तविक पहातां मुंबई किंवा कलकत्ता हीं आमचीं शहरें नव्हत; हीं इंग्रज लोकांचीं शहरें आहेत ! निदान मुंबईंतील संपत्तीच्या अर्ध्याहून अधिक संपत्तीचे मालक इंग्रज लोक आहेत असें सहज दाखवितां येणार आहे. तसेंच, या शहरांत कांहीं श्रीमान् नेटिव्ह व्यापारी दिसतात, व त्यांच्या हातून लाखों रुपयांच्या प्रतिदिवशीं घडामोडी होतात, एवढ्यावरून इतर ठिकाणींही अशाच प्रकारचे श्रीमंत लोक असतील, किंवा अशाच प्रकारच्या घडामोडी चालल्या असतील, असा तर्क करणें अगदीं चुकीचें होणार आहे. ज्याप्रमाणें जड वस्तूंत गुरुत्वाकर्षणाचा एक बिंदु× असतो, त्याप्रमाणें या इलाख्यांत किंबहुना या देशांत मुंबई शहर संपत्त्याकर्षणाचें आद्य स्थान होऊन बसलें आहे. या इलाख्यांतील बहुतेक संपत्ति, बहुतेक शहाणपण, बहुतेक कारखाने, बहुतेक व्यापार व व्यापारी, बहुतेक जातींचे व धर्मांचे लोक—सारे मुंबईंत भरले आहेत. इतर ठिकाणीं आळस, दारिद्र्य, व हरएक प्रकारचें गचाळपण हीं मात्र यथेच्छ नांदत आहेत. उद्यां जर मुंबईवर एखादें अरिष्ट गुदरलें तर कोणाच्याही टाळूवर जोराची बुक्की मारल्यानें त्याच्या इतर अवयवांची जी गति होईल ती इतर शहरांची होणार आहे. एका दिव-सांत त्या सर्वांस अर्धांग वायूचा झटका आल्यासारखें होऊन तीं सारीं लुलीं पडतील !"* या परिच्छेदांतील मुंबई शहराचें वर्णन इतकें हुबेहूब आहे कीं त्यावरून तें लिहिणाऱ्याच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीची व भाषेवरील स्वामि-त्वाची ओळख पटते.

---

* निबंधसंग्रह, भाग २, पृष्ठ ३१८. आगरकरांच्या वेळीं मोटार गाड्या नव्हत्या व विजेच्या आगगाड्या आणि विमानेंही नव्हतीं. तेव्हां त्यांचा उल्लेख या वर्णनांत नाहीं. × Centre of Gravity.

३ हिंदुस्थानांत एके काळीं कला कौशल्य, व्यापार उदीम यांची भरभराट होती. त्या सर्वांची पुढें अवनति झाली. पण आतां हिंदु लोकांत खटपट केल्यास ते गुण जागृत होतील याबद्दल त्यांना शंका नव्हती. स्वजनांचे दोष आगरकरांनीं दाखविले; त्याबरोबर गतकालाविषयीं योग्य अभिमान त्यांनीं उत्पन्न केला. मागची प्रत्येक गोष्ट चांगली असें म्हणणारे ते नव्हते. पण हिंदुस्थानच्या पूर्वेतिहासांतील प्रत्येक चांगल्या गोष्टीविषयीं त्यांना अत्यंत अभिमान होता व तो अभिमान लोकांत पसरविण्याचें कार्य त्यांनीं तितक्याच जोरानें केलें. "भारतीय कलांचें पुराणत्व" ही त्याची सुंदर व माहितीनें भरलेली लेखमाला या विधानाची सत्यता पटविते. या विषयावर ऐतिहासिक माहितीनें भरलेले व प्रमाणसूद असे चार लेख त्यांनीं लिहिले. ते निबंधसंग्रह, भाग २ रा, यांत प्रसिद्ध झालेले आहेत. (पृष्ठ १५०–१७८). या लेखमालेच्या सुरवातीला ते म्हणतात:—"अलीकडे आम्हांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली, तीमुळें आम्ही पूर्वींपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय असें परकीयांसच नव्हे, तर आमचें आम्हांस देखील वाटूं लागलें आहे." पुढें ते म्हणतात:—"अनेक गोष्टींत आम्ही आज मितीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आम्ही त्यापासून शिकण्यासारख्या अनेक वस्तु आहेत हें निर्विवाद आहे. पण एवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं ज्याचा आम्ही अभिमान मानावा, किंवा ज्याच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहवलंबन करावें, असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहकारक नाहीं हें प्रत्येक निःपक्षपाती हिंदूस कबूल केलें पाहिजे. पण यहुदी, मिसर, पारसीक, किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे असें मानण्याची गरज नाहीं, असें दाखविणें कठीण पडणार नाहीं. महमदीय लढवय्यांप्रमाणें धर्मवेडानें यूरोप व आशिया खंडांतील मोठमोठाले देश आम्ही उध्वस्त केले नाहींत व राज्यलोभानें लाखों लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूर निष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण, नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन, इत्यादि

ललित कलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं त्यासंबंधीं आज मित्तीस सुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पाहण्याची आवश्यकता नाहीं." प्राचीनकाळचें कौशल्य व अर्वाचीन काळची शास्त्रीय यंत्रसामग्री यांची सहकारिता झाल्यास हिंदुस्थानाला आर्थिक वैभव पुनः प्राप्त होईल असें आगरकरांचें ठाम मत होतें. याच लेखांत ते पुढें म्हणतातः—"अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपीयन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यांपासूनच आम्ही शिकली पाहिजे हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों, तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकलाप्रावीण्याची आवश्यकता असते, ती हस्तकलाही आम्हांस सर्वांशीं युरोपीयन लोकांपासून उचलली पाहिजे हें मत आम्हांस मान्य नाहीं. तथापि आम्ही लौकर जागे झालों नाहीं तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाहीं, इतकेंच नाहीं तर सुमारें तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें भव्य उदयास आलेली जी आमची हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदां तिचा लोप झाला म्हणजे अर्वाचीन यंत्रकलाही आम्हांस संपादितां येणार नाहीं हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकलाप्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करून तीं येथें आणून मांडलीं, आणि त्यांवर माल काढण्यास सुरवात केली म्हणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्राचे कारखाने स्थापणें तर जरूर आहेच, पण त्याबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत. त्या ह्या. आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खातरी केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्तत्वाला कारणीभूत होईल अशा उपायांची योजना केली पाहिजे. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वीं जीं चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं व ऐषआरामासाठीं करीत तींच कामें यंत्रांच्या साहाय्यानें, स्वल्प आयासानें, खर्चानें व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यापासून सुख व ऐषआराम प्राप्त होऊं लागेल तेव्हांच आमच्या जुन्या हस्तकलेचें रक्षण झालें व पाश्चिमात्य यंत्र-

कलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें, असें म्हणतां येणार आहे." वरील विवेचनांतील विचारसरणी किती पायाशुद्ध आहे हें सुज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येणार आहे. परदेशी यंत्रें आणून गिरण्या काढणारांनीं स्वदेशी हस्त-कलेच्या संरक्षणाचा विचार अद्यापिही केला नाहीं. तो केला असता तर त्यांच्या धंद्याची स्थिति आज कांहीं निराळी झाली असती. त्याप्रमाणेंच यंत्रकलेचा सर्वस्वी अनादर करून "पवित्र" कपडा काढण्याच्या नादाला लागलेल्या विचित्र लोकांकडून हिंदी उद्योगधंदे पुढें येणें शक्य नाहीं या दोनही गोष्टी आगरकरांनीं त्यावेळीं स्पष्टपणें दर्शविल्या आहेत.

मुसलमान व ग्रीक यांच्या संसर्गामुळेंच हिंदुस्थानांत कलाकौशल्य आलें, त्यापूर्वीं तेथें त्याचा मागमूसही नव्हता अशा तऱ्हेचीं मिथ्या विधानें हिंदुस्थानचा तेजोभंग करण्यासाठीं कित्येक इंग्रज इतिहासकारांनीं केलेलीं आहेत व अद्यापिही तीं निर्लज्जपणानें केलेलीं मधून मधून ऐकूं येतात. हीं विधानें कशीं असत्य आहेत, हें सदरहू लेखमालेंत आगरकरांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. हिंदुस्थानाची भौगोलिक परिस्थितीच अशी आहे कीं त्यामुळें सुधारणेची येथें सर्वांआधीं सुरवात होणें अपरिहार्य होतें. त्यासंबंधीं लिहितांना आगरकरांच्या अंतःकरणांत भारतभूमीविषयीं असलेल्या अपरंपार प्रेमाला जणों काय पूर आला आहे. ते लिहितातः—"ज्या कारणांमुळें मिसर देशांत सर्वांआधीं सुधारणेस आरंभ झाला असें म्हणतात, तींच कारणें हिंदुस्थानांत आलेल्या आर्यशाखेची सुधारणा प्रथम येथें होऊं लागण्यास पुरे होतीं, व त्याप्रमाणें ती येथें झाली, असें अंतर्बाह्य प्रमाणावरून समाधान होण्यासारखें सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. प्रथम हिंदुस्थानच्या बाह्य स्वरूपाकडे क्षणभर लक्ष द्या. येथें कशाची तरी वाण आहे काय? उष्ण, शीत, किंवा समशीतोष्ण कटिबंधांत पैदा होणारी प्रत्येक चीज येथें हवी तितकी सांपडते. थंड व डोंगरी प्रदेशांत होणाऱ्या जिनसा नगाधिराज हिमालय हव्या तितक्या देण्यास कालाच्या आरंभापासून एकसारखा उभा आहे! नैल नदीच्या सुपीक व रेताड मैदानांत लीलेनें होणारीं धान्यें पाहिजे असतील तर सिंधूच्या व गंगेच्या दोन्ही थड्यांत त्यांची हवी तितकी विपुलता आहे. तांबड्या व काळ्या जमिनींतील व खारट आणि खडकाळ अशा प्रदेशांतील उत्पन्नें हवीं असतील तर दक्षिण हिंदुस्थानास वेष्टणाऱ्या समुद्रमेखलेपासून घाटांपर्यंत पसरलेल्या पूर्वपश्चिम कोंकणपट्ट्यांकडे, व घांटावरील मोठमोठ्या नद्यांनीं चित्रविचित्र व

सुपीक करून सोडलेल्या सुखावह भूमिकांकडे अवलोकन केलें म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील उंच डोंगरी प्रदेश, वड, पिंपळ, खदीर, पळस, ताड, कळक वगैरे अत्यंत उपयोगी वृक्षांनीं आच्छादिलेले असून त्यांत व्याघ्र, सिंह, माकडें व मोर वगैरे हिंस्र आणि अहिंस्र प्राणी यथेच्छ संचार करतांना दृष्टीस पडतात. याहून सखल प्रदेशांत हत्ती, कृष्णसारंग, तांबडीं हरणें, रानडुकरें, साळुंक्या, ससे व चकोरादि पक्षी स्वेच्छेनें विहार करीत असतात. हे दोन प्रकारचे प्रदेश सोडून जेव्हां आपण सपाटांत मैदानांत येतों तेव्हां जिकडे तिकडे नाना तऱ्हेच्या धान्यांचीं शेतें, उंसाचे फड, भातांचीं खाचरें, व नाना प्रकारच्या फळझाडांनीं, वेलांनीं आणि फुलांनीं भरून गेलेल्या बागा दृष्टीस पडतात. अशा प्रकारच्या रम्य व संपन्न देशांतील लोकांस चरितार्थ चालविण्याची आरंभीं एवढी तरी पंचाईत पडली असेल काय? व जर पडली नसेल तर ज्ञानवृद्धि आणि कलावृद्धि करण्याकडे त्यांचें लक्ष सहज वेधलें नसेल काय?" आणि यावरून व इतर अनेक प्रमाणें देऊन आगरकर असा सिद्धांत सांगतात—" इजिप्त देशाप्रमाणें या देशांतही कलांचा अभ्युदय फार प्राचीन काळीं झाला असला पाहिजे असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. इंग्रज लोकांचा अंमल येथें स्थाईक होण्यापूर्वींच बाष्पशक्ति त्यांच्या हस्तगत होऊन गेल्यामुळें, व त्यांच्या अंमलानें येथील कलांच्या पुरस्कर्त्यांची व आश्रयदात्यांची संख्या अत्यंत संकुचित झाल्यामुळें येथील कारागिरी सांप्रत काळीं अगदीं लयास गेल्यासारखी झाली आहे, हें निर्विवाद आहे. तथापि ज्यांचें अवलोकन वस्तूच्या केवळ पृष्ठभागासच धरून रहात नाहीं, तर त्याच्या खालीं व पलीकडे जातें त्यांना अजूनही असें कबूल करावें लागेल कीं आज जें कलाचातुर्य हिंदुस्थानांत उपलब्ध आहे त्याची उत्पत्ति व अभिवृद्धि आजकालची नाहीं तर फार जुनी आहे."

४. आगरकरांनीं आपल्या वेळीं लोकांपुढें असलेल्या आर्थिक प्रश्नासंबंधीं केसरींत व विशेषेंकरून सुधारकांत वरचेवर चर्चा केलेली आहे. इंग्रजी राज्यपद्धति सांपत्तिक दृष्ट्या हिंदुस्थानाला फार भोंवली असें त्यांचें स्पष्ट मत होतें, आणि हिंदुस्थानच्या दारिद्र्याचे परिणाम इंग्लंडलाही सुखावह होणार नाहींत हें त्यांनीं पुनः पुनः राज्यकर्त्यांच्या नजरेस आणलें. " ब्रिटिश लोकांनीं जी राज्यपद्धति येथें घातली आहे ती नैतिक दृष्टीनें जरी अत्यंत निर्दोष आहे तरी द्रव्यदृष्टीनें ती पराकाष्ठेची एकदेशीय आहे. हें सत्यकथन पुष्कळ इंग्लिश

लोकांस रुचत नाहीं. पण त्यांना तें रुचत नाहीं, म्हणून तें अनुक्त राहूं देणें चांगलें नाहीं. तसें करण्यापासून अखेरीस आमच्यावर व त्यांच्यावर भयंकर प्रसंग गुदरणार आहे." * हिंदुस्थान किती दरिद्री झाला आहे यासंबंधीं त्या वेळीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून त्यांनीं आंकडे प्रसिद्ध केले होते. "हिंदुस्थानच्या प्रत्येक इसमा पाठीमागें वार्षिक उत्पन्न सारें २० रुपये आहे" हें सांगून हेंच उत्पन्न इंग्लंड ४२०, आस्ट्रेलिया ४३०, कॅनडा २६९, हालंड २६०, फ्रान्स २५८, डेनमार्क २३५, जर्मनी १८८, ग्रीस ११४, रशिया १००, असें असल्याचें त्यांनीं लिहिलें आहे. या आंकड्यांत गेल्या चाळीस वर्षांत पुष्कळ फरक पडलेला आहे, पण कोठें कसाही फरक झाला असला तरी तमाम दुनियेंत हिंदुस्थानांत दर माणशीं वार्षिक उत्पन्न सर्वांत कमी असून जगांतील दुसऱ्या अत्यंत गरीब देशाच्या दर माणशीं उत्पन्नाच्या पासंगालाही तें लागत नाहीं हा सिद्धांत अद्यापिही अक्षरशः खरा आहे. या प्रकारची माहिती लोकांना सर्वसाधारणपणें दिली पाहिजे असें आगरकरांचें म्हणणें होतें व तें कशासाठीं याचाही खुलासा त्यांनीं केलेला आहे. "कोणाला केवढाही राज्यलोभ असो, ज्या लोकांवर राज्य करावयाचें ते लोक संतुष्ट व सुखी असले तरच राज्य करणाऱ्या लोकांस फायदा होण्याचा व सुख लागण्याचा संभव आहे ही गोष्ट अगदीं सामान्य मनुष्यास समजण्यासारखी आहे. तेव्हां जे इंग्लिश लोक या देशांत नोकरीकरितां येतात, किंवा जे इंग्लंडांत असून येथील राज्यकारभाराचीं सूत्रें हालवितात, त्यांच्या अंतःकरणांत आम्हांविषयीं परोपकारबुद्धि असो किंवा नसो, त्यांना आपला स्वार्थ नीट समजत असेल तर आमच्या बऱ्याविषयीं त्यांना कधींही उदासीन होतां येणार नाहीं. आजपर्यंत त्यांच्याकडून आमच्या कल्याणाकडे जें दुर्लक्ष झालें आहे तें त्यांच्या नजरचुकीनें झालें आहे; त्यांना कळून वळून झालेलें नाहीं. म्हणून त्यांच्या नजरेस त्यांचे प्रमाद आणून ते दूर करण्याविषयीं त्यांची आग्रहपूर्वक प्रार्थना करणें हें आपलें कर्तव्य आहे. जर आपणच स्वसुखाविषयीं बेपर्वा झालों, किंवा नशीबावर हवाला देऊन स्वस्थ बसलों तर मग त्यांच्याकडे काय दोष आहे बरें ? आपल्या निर्धनतेस आपले आपण किती कारण आहों, व आपले राज्यकर्ते किती कारण आहेत, याचा नीटपणें विचार व निश्चय करून, ज्या

* नि. सं. भाग २ रा, पृष्ठ ३२९

चुका आपल्या हातून होत असतील त्या आपल्या आपण नाहींशा करण्यास झटलें पाहिजे, व ज्या आपल्या राजकर्त्यांकडून होत असतील त्या त्यांचेकडून दूर होण्यासाठीं त्यांचें मन वळविलें पाहिजे. अशा रीतीनें दोहोंकडून प्रयत्न झाल्यास पांच पंचवीस वर्षांत आम्हांस प्राप्त झालेली अन्नान्नदशा दूर होऊन जाडें भरडें कां होईना, पण निदान पोटभर अन्न आम्हांस मिळूं लागेल व एकादा दुष्काळ आला असतां मृत्युमुखांत क्षुधार्तांच्या केवळ लाखोल्याच समर्पण्याचा प्रसंग टाळतां येऊन, ज्यां संख्येचें सहस्रांनींच परिमापन करतां येईल, अशा संख्येनें त्याची समजूत काढतां येण्याचा संभव आहे. पण हें सर्व करतां येण्यास अगोदर आमच्या स्थितीचें आम्हांस चांगलें ज्ञान झालें पाहिजे. तें झाल्याखेरीज आमच्या हातून कांहींच होण्याची आशा नाहीं. तेव्हां ज्यांना अशा प्रकारची माहिती मिळण्याचीं साधनें असतील त्यांनीं ती त्यांच्या द्वारें संपादून लोकांत तिचा होईल तितका प्रसार करण्याविषयीं झटलें पाहिजे. *" साधार माहिती देणें हें आधुनिक राजकारणांतील एक महत्वाचें अंग आहे हें दादाभाई नौरोजी वगैरेप्रमाणें आगरकरांना पूर्णपणें मान्य होतें. आणि सरकारावर, लोकांवर किंवा कोणाहीवर करावयाची टीका अगदीं प्रमाणसूद असली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता मिठाच्या करावर त्यांनीं जे तडाखे लगावले आहेत ते या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. "शरीरांतील रक्ताची शुद्धि आणि निरोगीपणा प्रति दिवशीं त्यास जो मिठाचा पुरवठा होतो त्यावर अवलंबून असतो. इंग्लंडांत प्रत्येक मनुष्याला फक्त खाण्याकरितां ४० पौंड म्हणजे २० शेर मीठ लागतें, व शेतकीकरितां किंवा मासे, मांस वगैरे जिनसा टिकविण्याकरितां मिठाचा जो एकंदर व्यय होतो, त्याचा हिशेब केला असतां इंग्लंडांत प्रत्येक इसमाच्या मागें प्रतिवर्षीं ७० पौंड मीठ खर्च होतें. आम्ही हिंदु लोक शाकभाजी खाणारे; इकडे रोगराई विशेष; असें असून प्रत्येक हिंदूच्या पाठीमागें प्रतिवर्षीं दहा पौंडांपेक्षां म्हणजे ५ शेरांपेक्षां या देशांत अधिक मीठ खपत नाहीं. हा प्रभाव कशाचा बरें ? सन १८०० त मुंबई व मद्रास इलाख्यांत (मिठाच्या) मणाला फक्त आठ आणे पडत; सध्यां दोन रुपये अकरा आणे पडतात! हें मीठ तोडणें परिणामीं फार जाचणार आहे." ×

---

* नि. सं. २, पृष्ठ ३३२-३४ × नि. सं. २, पृष्ठ ३३६,

हिंदुस्थानच्या दारिद्यासंबंधीं आगरकरांच्या लेखांतून आणखी दोन उतारे येथें देतों. ही सर्व चर्चा करण्यांत त्यांचा हेतु सरकारकडे भिक्षांदेहि करण्याचा नसून " हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं जें आजपर्यंत लिहिण्यांत आलें आहे व पुढें येईल, त्याविषयीं आमच्या वाचकांनीं असें समजावें कीं, तसें करण्यांत आमच्या राज्यकर्त्यांस दोष दाखविण्यापेक्षां, किंवा त्यांच्या पुढें झोळी पसरून त्यांत एखादा तुकडा टाकण्याबद्दल त्यांची प्रार्थना करण्यापेक्षां, लोकांस आपल्या स्थितीचें खरें ज्ञान होऊन ती सुधारण्याविषयीं उत्साह उत्पन्न व्हावा हा आमचा प्रधान हेतु होता, आहे व असेल." † असो. आम्ही म्हणतों त्यांतील पहिला उतारा " इंग्लिश राज्यांत पोटभर अन्न मिळत नाहीं" या सुधारकांतील लेखांतला आहे. (निबंधसंग्रह, भाग २, पृष्ठ ३४३.) या लेखांत म्हटलें आहेः—" इंग्लंडांतील प्रत्येक मनुष्याच्या पाठीमागें जें सरासरीचें वार्षिक उत्पन्न पडतें, त्यांतून त्याचा वार्षिक खर्च वजा केला असतां, त्याचेपाशीं सुमारें ४२ रुपये फाजील किंवा शिल्लक राहतात. या शिलकेंतून त्यास चैन करतां येते, किंवा अडचणीच्या प्रसंगासाठीं ती राखून ठेवितां येते. हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति अगदीं निराळ्या तऱ्हेची आहे. आमचे फिन्यान्स मिनिस्टर अथवा फडणवीस सर डेव्हिड बार्बर यांच्या हिशेबाप्रमाणें या देशांतील प्रत्येक इसमाच्या पाठीमागें सरासरी वार्षिक उत्पन्न २७ रुपये पडतें, व त्याच्या खर्चास कमींत कमी प्रतिवर्षी ३० रुपये लागतात. म्हणजे केवळ प्राणरक्षण करण्यास जितक्या पैशाची त्यास आवश्यकता आहे तितके पैसेही त्यास मिळत नाहींत. त्यांत तीन रुपयांची तूट पडते. मि. दादाभाई नौरोजी यांचें असें म्हणणें आहे कीं सरकारी तुरुंगांतील कैद्यास प्रतिवर्षी सरासरीनें जितका खर्च लागतो, तितका हिंदुस्थानांतील प्रत्येक इसमाच्या पाठीमागें धरला तरी देखील त्याचेपाशीं दीड दोन रुपये शिल्लक राहतील किंवा नाहीं याची शंका आहे. साऱ्या गोष्टींचा विचार करतां असें दिसून येतें कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याच्या पाठीमागें सरासरीनें सुमारें दोन रुपयांचें उणें उत्पन्न आहे! उत्पन्नाच्या किंवा प्राप्तीच्या अशा स्थितींत हिंदु लोक जगतात तरी कसे, असा प्रश्न आहे. या खेदजनक प्रश्नाचें समर्पक व समाधानकारक उत्तर पुढील आकड्यांवरून वाच-

† नि. सं. २, पृष्ठ ३४६.

कांचें वाचकांस देतां येईल. परवा झालेल्या ( १८९१ ) मनुष्यगणतीचे ( खानेसुमारीचे ) आंकडे अद्यापि बाहेर पडले नाहींत. म्हणून १८८१ त केलेल्या मनुष्यगणतीचाच आधार घेऊन चालूं. या मोजणींत प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून असें दिसतें कीं इंग्लंडांतील मनुष्य सरासरीनें ३९.९१ वर्षें जगतो व हिंदु २३.५ वर्षें जगतो ! हे आंकडे पाहिल्यावर आमच्या ऋण-प्राप्तीवर आम्ही कसे राहतों, या प्रश्नाचें उत्तर देण्यास कोणास कठिण पडेल काय ? बरें, हीं तेवीस वर्षें तरी आम्ही सुखानें घालवितों काय ? सुखाचें नांव कशाला ? कोणाला पोटभर अन्न आहे तर ढुंगणाला चिरगुट नाहीं; कोणाला चिरगुट आहे तर आश्रयाला खोपट नाहीं; याप्रमाणें बहुतेक लोकांची प्राणयात्रा अत्यंत संकटावह झाली आहे. बहुतेक प्रांतांत मेघराजाची किंचित् वक्रदृष्टि झाली कीं, लहानापासून थोरांचीं व श्रीमंतापासून गरीबांचीं धाबीं गडबडून जातात ! काय ही आमची दशा ! पृथ्वीच्या साऱ्या लोकसंख्येचा सहावा भाग या देशांत रहातो; येथील जमीन सुपीक; येथें सर्व प्रकारच्या हवा; व्यापाराचीं जहाजें चालण्याजोग्या येथें मोठमोठ्या नद्या; येथील रानांत व डोंगरांत सांपडणार नाहीं अशा एका झाडाचें नांव घेण्याची मुष्कील; बहुतेक धातूंचा हवा तेवढा पुरवठा; तीन हजार वर्षांची आमची पुरातन सुधारणा; युरोपांतील राष्ट्रें अज्ञानतिमिरांत घोरत पडलीं असतां, नाना प्रकारच्या विद्यांत व कलांत आमच्या आम्ही संपादिलेल्या प्रावीण्यामुळें सर्व पृथ्वीवर अद्यापि गाजत असणारा आमचा लौकिक—अशा प्रकारचे आम्ही हिंदु लोक असून आज आम्हांस दुपारची नड कशी भागवावी, अशी प्रतिदिवशीं पंचाईत पडावी काय ? पंचवीस मनुष्यजंतूंपैकीं प्रत्येकास एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, वर्षेंच्या वर्षें अर्धपोटीं दुसऱ्या दिवसाची चिंता करीत व झोंपेची प्रार्थना करीत रात्रीच्या प्रहरीं जमिनीवर आंग टाकण्याचा प्रसंग यावा, आणि शरीरांत व मनांत उल्हासाचें पुनरुज्जीवन न होतां, आंथरूण सोडून हात पाय ओढीत रोज सकाळीं फिरून उद्योगास लागणें भाग पडावें, हें किती शोचनीय आहे बरें ? रात्रंदिवस दुष्काळाची धास्ती; अनेक प्रकारच्या रोगांनीं, विशेषतः अपुऱ्या अन्नामुळें, वस्त्रामुळें व रहाण्याच्या घाण जागेमुळें उत्पन्न होणाऱ्या तापानें ज्याच्या त्याच्या घरांत दृष्टीस पडणारी विपत्ति; गाल बसलेले; डोळे खोल गेलेले; साऱ्या आंगास वळ्या पडलेले, सारांश भुकेनें सर्व प्रकारें गांजून आयुष्यास कंटाळलेल्या लोकांचे गांवोगांवीं व शहरोशहरीं दिसणारे थवे—

हें पाहून अशा नीतिमान्, ज्ञानमान् व दयावान् राज्यकर्त्यांविषयीं स्वाभाविकपणें जितकी पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी तितकी होणें शक्य आहे काय ?"

५. दुसरा उतारा याच्याच पुढच्या लेखांतील आहे. (निबंधसंग्रह, भाग २, पृष्ठ ३४९ ). या लेखाचा मथळा "हिंदुस्थानांतील अन्नान्न दशेचे दुष्परिणाम" असा आहे. या लेखाच्या सुरवातीला म्हटलें आहेः—"पोटभर अन्न न मिळाल्यामुळें प्रकृतींत क्षीणता येते व क्षीण प्रकृतींत रोग सहज जडतात." आणि म्हणूनच केवळ कोट्यवधि डांस अगर लक्षावधि उंदीर मारल्यानें रोगराई नाहींशी होण्याचा फारसा संभव नाहीं, ती नाहींशी होण्याला माणसाच्या शरीराची प्रतिकारशक्ति वाढली पाहिजे, या तत्वाकडे आगरकरांच्या लिहिण्याचा रोख होता याबद्दल शंका उरत नाहीं. असो. प्रस्तुत लेखांत पुढें म्हटलें आहे—"हिंदु लोकांस ब्रिटिश अंमलापासून जीं अनेक सुखें प्राप्त झालीं आहेत, व ज्याबद्दल आपली आपण प्रशंसा करून घेण्याचा इंग्लिश लोकांस कधींही कंटाळा येत नाहीं, त्यांत त्यांनीं या देशांत सतत चालणाऱ्या लढाया बंद करून, त्यांच्या जागीं सर्व देशभर स्थापिलेल्या स्थाईक शांतीचा वारंवार उल्लेख करण्यांत येतो. लढाईपासून होणारा त्रास आणि नुकसान, व शांततेपासून होणारें सुख व फायदा हीं कोणाही मनुष्यास कबूल केलीं पाहिजेत. पण सर्वच स्थितींत किंवा सर्व काळीं लढाई अहितकारक आणि शांतता कल्याणप्रद असेल असें कोणाच्यानेंही निक्षून म्हणवणार नाहीं. देशी राजांच्या कारकीर्दींत किंवा मराठ्यांच्या अंमलांत सर्व हिंदुस्थानभर दंगेधोपे होत असत, व मारामाऱ्या होत असत हें खरें आहे. पण या सर्वांपासून जेवढी प्राणहानि किंवा वित्तनाश होत असे, त्याहून सांप्रतच्या शांत अंमलांत अधिक प्राणहानि व अधिक वित्तनाश होत आहे हें इंग्लिश दप्तरांतील सरकारी कागदपत्रांच्या आधारानें सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. इंग्लिश राज्यामुळें अखेरीस आमचें काय हित होईल हें सांगतां येणें कठिण आहे. तसेंच सध्यां आम्हांस ते लोक जें विद्यामृत पाजीत आहेत, व आमच्या राजकीय विचारांस व वर्तनास जें वळण लावीत आहेत, त्याची काय किंमत करावी कोण जाणे. एवढें मात्र खरें आहे कीं, सूक्ष्म दृष्टीनें विचार करतां त्यांच्या अंमलापासून शरीरसुखास अत्यंत अवश्य असें जें पोटभर अन्न तें आम्हांस त्यांच्या राज्यांत मिळत नाहीं, आणि त्या अन्नाभावामुळें वढून येणारे जे लाखों मृत्यु त्यांपासून त्यांस आमचा बचाव करतां येत नाहीं. १७९३ पासून १८९०

पर्यंत युरोपखंडांत एकसारख्या लढाया होत होत्या. या लढायांत एकंदर पंचेचाळीस लक्ष लोक पडले असावेत असा अजमास केला आहे. म्हणजे या ९७ वर्षांपैकीं प्रत्येक वर्षी सुमारें ५० हजार मनुष्यें धारातीर्थी पडलीं. हा प्रचंड आंकडा पाहून कोणाच्याही अंगावर कांटा उभा राहणार आहे, व युरोपांतील लोकांस सुधारलेले ख्रिस्ती लोक म्हणावें कीं रानटी म्लेंच्छ म्हणावें अशी शंका येणार आहे. तथापि जर कोणी हिंदुस्थानांतील मृत्युसंख्येचा विचार करील तर त्याला ती याहूनही भयप्रद दिसून येईल, याविषयीं आम्हांस बिलकुल संशय नाहीं. १८८० साल हिंदुस्थानास सर्व प्रकारें बरें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या वर्षी कोणत्याही कारणानें विशेष माणसें मेलीं नाहींत. तेव्हां हें वर्ष आधारभूत धरून, या वर्षापासून पुढल्या आठ वर्षांचा विचार केला तर असें दिसून येईल कीं १८८०–१८८९ यांच्या दरम्यान् फक्त तापाच्या साथींनीं ४३४९९२२ माणसें जाफा मेलीं. "जाफा मेलीं" याचा अर्थ एवढाच कीं १८८० हें वर्ष चांगलें मानून त्यांत जितकीं माणसें तापानें मेलीं तितकीं प्रतिवर्षी मरावयाचींच अशी कल्पना करून त्यांच्या आठपटी येवढा आंकडा वरील ४३४९९२२ हा आंकडा काढतांना तापानें मेलेल्या साऱ्या माणसांच्या आंकड्यांतून वजा केलेला आहे. अशा रीतीनें हा आंकडा काढण्याचें कारण एवढेंच कीं, ज्याप्रमाणें लढाई हें मृत्युसंख्या वाढविणारें आगंतुक कारण आहे, त्याप्रमाणें तापाच्या भलभलत्या सांथी उद्भवून, त्यामुळें नित्याहून फाजील माणसें मेलीं तर त्या सांथीस आगंतुक कारणें मानण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, **संग्रामरूप आगंतुक कारणानें युरोपखंडांत सत्याण्णव वर्षांत जितकीं मनुष्यें मेलीं तितकीं या हतभाग्य हिंदुस्थान देशांत फक्त आठ वर्षांच्या आंत तापाच्या आगंतुक सांथीस बळी पडलीं.** आठ वर्षांत ४३,४९,९२२ माणसें आगंतुक तापांनीं मरणें म्हणजे प्रतिवर्षी ५,४३,७४० माणसें मरणें होय. युरोपांत लढाईमुळें गेल्या सत्याण्णव वर्षांपैकीं प्रत्येक वर्षी सुमारें ५०,००० मनुष्यें मेलीं हें वर दाखविलेंच आहे. या संख्येनें तिच्या मागल्या संख्येस (५,४३,७४०) भागिलें असतां दहाचा किंवा अकराचा भाग लागेल. या भागावरून काय उघड होतें कीं गेल्या सत्याण्णव वर्षांपैकीं कोणत्याही एका वर्षी लढाईनें युरोपांत जितकी प्राणहानि केली, तिच्या दहापट किंवा अकरापट प्राणहानि १८८०–१८८८ यांच्या दरम्यान प्रत्येक वर्षी येथें झाली! हे

आंकडे जर निर्विवाद असतील, आणि ते निर्विवाद आहेत याविषयीं कोणासही शंका घेतां येणार नाहीं, कारण ते पार्लमेंटरी ब्ल्यूबुकांतून घेतलेले आहेत; तर सध्यांचा शांततेचा अंमल बरा आहे, किंवा पहिला दंग्याधोप्याचा व मारामाऱ्यांचा अंमल बरा होता याचा निश्चय करणें कठीण आहे. अन्न, वस्त्र आणि आच्छादन हीं तीन व कोणत्याही आगंतुक कारणापासून होणारी लोकसंख्येची हानि यांनीं कोणत्याही राज्याचा चांगुलपणा किंवा वाईटपणा ठरवावयाचा असेल, तर ब्रिटिश राज्याचा कैवार घेऊन भांडणाऱ्या खुद्द ब्रिटनांससुद्धां यासंबंधानें एतद्देशीय राज्यें ब्रिटिश राज्यापेक्षां हिंदुलोकांस अधिक हितकारक होतीं व झालीं पाहिजेत, असें कबूल करणें भाग पडेल. ”

सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करण्याची आगरकरांची घाटणी कोणत्या प्रकारची होती हेंही या उताऱ्यांवरून लक्षांत येतें. वरील उताऱ्यांतील विधानासंबंधीं येथें अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. फक्त मराठी वाचकांना आर्थिक प्रश्नांची अशी सोपपत्तिक व मुद्देसूद माहिती करून देण्याचें काम आगरकरांनीं किती उत्कृष्ट प्रकारें केलें हें वाचकांच्या लक्षांत आलें म्हणजे झालें.

६. असो. आगरकरांच्या आर्थिक निबंधांतून आणखी पुष्कळ उतारे घेऊन त्यांचें सद्यःकाळच्या परिस्थितीच्या दृष्टीनें विवेचन करतां येण्यासारखें आहे. पण तसें करण्यास येथें अवकाश नाहीं. त्यांनीं लिहिलेला “ तीन अर्थशास्त्रें ” हा निबंध (निबंधसंग्रह, भाग २, पृष्ठें ४२६—४४१) फार महत्वाचा आहे. नवीन धंदे उभे राहण्यासाठीं सरकारनें त्यांना योग्य तें संरक्षण देण्यास हरकत नाहीं असें आगरकरांचें मत होतें. मात्र ते संरक्षणवादी नव्हते व व्यापाऱ्यांची पोळी पिकण्यासाठीं गिऱ्हाइकांना पिळून काढणाऱ्या संरक्षणाचा त्यांनीं केव्हांही पुरस्कार केला नाहीं. इंग्रज सरकारचा हिंदुस्थानांतील “ खुला व्यापार ” हा फक्त नांवाचा आहे हेंही त्यांनीं प्रतिपादन केलें होतें आणि खुल्या व्यापाराच्या नावाखालीं मँचेस्टरवाल्यांनाच संरक्षण कसें मिळतें हेंही त्यांनीं प्रतिपादिलें होतें. हिंदी कापडावरील एक्साईज डयूटी उठविली पाहिजे असें त्यांनीं अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे. खुद्द जॉन स्टुअर्ट मिल्ल यानेंसुद्धां कांहीं प्रसंगीं उद्योगाला सरकारनें उत्तेजन दिलें पाहिजे असें सांगितलें आहे व तशाच प्रकारचें मत आगरकरांचें होतें. त्याचबरोबर परदेशी मालावर बहिष्कार घाल-

पर्यंत युरोपखंडांत एकसारख्या लढाया होत होत्या. या लढायांत एकंदर पंचेचाळीस लक्ष लोक पडले असावेत असा अजमास केला आहे. म्हणजे या ९७ वर्षांपैकीं प्रत्येक वर्षी सुमारें ५० हजार मनुष्यें धारातीर्थी पडलीं. हा प्रचंड आंकडा पाहून कोणाच्याही अंगावर कांटा उभा राहणार आहे, व युरोपांतील लोकांस सुधारलेले ख्रिस्ती लोक म्हणावें कीं रानटी म्लेंच्छ म्हणावें अशी शंका येणार आहे. तथापि जर कोणी हिंदुस्थानांतील मृत्युसंख्येचा विचार करील तर त्याला ती याहूनही भयप्रद दिसून येईल, याविषयीं आम्हांस बिलकुल संशय नाहीं. १८८० साल हिंदुस्थानास सर्व प्रकारें बरें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या वर्षी कोणत्याही कारणानें विशेष माणसें मेलीं नाहींत. तेव्हां हें वर्ष आधारभूत धरून, या वर्षापासून पुढल्या आठ वर्षांचा विचार केला तर असें दिसून येईल कीं १८८०–१८८९ यांच्या दरम्यान् फक्त तापाच्या साथींनीं ४३४९९२२ माणसें जाफा मेलीं. "जाफा मेलीं" याचा अर्थ एवढाच कीं १८८० हें वर्ष चांगलें मानून त्यांत जितकीं माणसें तापानें मेलीं तितकीं प्रतिवर्षी मरावयाचींच अशी कल्पना करून त्यांच्या आठपटी येवढा आंकडा वरील ४३४९९२२ हा आंकडा काढतांना तापानें मेलेल्या साऱ्या माणसांच्या आंकड्यांतून वजा केलेला आहे. अशा रीतीनें हा आंकडा काढण्याचें कारण एवढेंच कीं, ज्याप्रमाणें लढाई हें मृत्युसंख्या वाढविणारें आगंतुक कारण आहे, त्याप्रमाणें तापाच्या भलभलत्या सांथी उद्भवून, त्यामुळें नित्याहून फाजील माणसें मेलीं तर त्या सांथीस आगंतुक कारणें मानण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, **संग्रामरूप आगंतुक कारणानें युरोपखंडांत सत्याणव वर्षांत जितकीं मनुष्यें मेलीं तितकीं या हतभाग्य हिंदुस्थान देशांत फक्त आठ वर्षांच्या आंत तापाच्या आगंतुक सांथीस बळी पडलीं.** आठ वर्षांत ४३,४९,९२२ माणसें आगंतुक तापांनीं मरणें म्हणजे प्रतिवर्षी ५,४३,७४० माणसें मरणें होय. युरोपांत लढाईमुळें गेल्या सत्याण्णव वर्षांपैकीं प्रत्येक वर्षी सुमारें ५०,००० मनुष्यें मेलीं हें वर दाखविलेंच आहे. या संख्येनें तिच्या मागल्या संख्येस (५,४३,७४० ) भागिलें असतां दहाचा किंवा अकराचा भाग लागेल. या भागावरून काय उघड होतें कीं गेल्या सत्याण्णव वर्षांपैकीं कोणत्याही एका वर्षी लढाईनें युरोपांत जितकी प्राणहानि केली, तिच्या दहापट किंवा अकरापट प्राणहानि १८८०–१८८८ यांच्या दरम्यान प्रत्येक वर्षी येथें झाली ! हे

आंकडे जर निर्विवाद असतील, आणि ते निर्विवाद आहेत याविषयीं कोणासही शंका घेतां येणार नाहीं, कारण ते पार्लमेंटरी ब्ल्यूबुकांतून घेतलेले आहेत; तर सध्यांचा शांततेचा अंमल बरा आहे, किंवा पहिला दंग्याधोप्याचा व मारामाऱ्यांचा अंमल बरा होता याचा निश्चय करणें कठीण आहे. अन्न, वस्त्र आणि आच्छादन हीं तीन व कोणत्याही आगंतुक कारणापासून होणारी लोकसंख्येची हानि यांनीं कोणत्याही राज्याचा चांगुलपणा किंवा वाईटपणा ठरवावयाचा असेल, तर ब्रिटिश राज्याचा कैवार घेऊन भांडणाऱ्या खुद्द ब्रिटनांससुद्धां यासंबंधानें एतद्देशीय राज्यें ब्रिटिश राज्यापेक्षां हिंदुलोकांस अधिक हितकारक होतीं व झालीं पाहिजेत, असें कबूल करणें भाग पडेल."

सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करण्याची आगरकरांची धाटणी कोणत्या प्रकारची होती हेंही या उताऱ्यांवरून लक्षांत येतें. वरील उताऱ्यांतील विधानासंबंधीं येथें अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. फक्त मराठी वाचकांना आर्थिक प्रश्नांची अशी सोपपत्तिक व मुद्देसूद माहिती करून देण्याचें काम आगरकरांनीं किती उत्कृष्ट प्रकारें केलें हें वाचकांच्या लक्षांत आलें म्हणजे झालें.

६. असो. आगरकरांच्या आर्थिक निबंधांतून आणखी पुष्कळ उतारे घेऊन त्यांचें सद्यःकाळच्या परिस्थितीच्या दृष्टीनें विवेचन करतां येण्यासारखें आहे. पण तसें करण्यास येथें अवकाश नाहीं. त्यांनीं लिहिलेला "तीन अर्थशास्त्रें" हा निबंध (निबंधसंग्रह, भाग २, पृष्ठें ४२६—४४१) फार महत्वाचा आहे. नवीन धंदे उभे राहण्यासाठीं सरकारनें त्यांना योग्य तें संरक्षण देण्यास हरकत नाहीं असें आगरकरांचें मत होतें. मात्र ते संरक्षणवादी नव्हते व व्यापाऱ्यांची पोळी पिकण्यासाठीं गिऱ्हाइकांना पिळून काढणाऱ्या संरक्षणाचा त्यांनीं केव्हांही पुरस्कार केला नाहीं. इंग्रज सरकारचा हिंदुस्थानांतील "खुला व्यापार" हा फक्त नांवाचा आहे हेंही त्यांनीं प्रतिपादन केलें होतें आणि खुल्या व्यापाराच्या नावाखालीं मँचेस्टरवाल्यांनाच संरक्षण कसें मिळतें हेंही त्यांनीं प्रतिपादिलें होतें. हिंदी कापडावरील एक्साईज ड्यूटी उठविली पाहिजे असें त्यांनीं अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे. खुद्द जॉन स्टुअर्ट मिल्ल यानेंसुद्धां कांहीं प्रसंगीं उद्योगाला सरकारनें उत्तेजन दिलें पाहिजे असें सांगितलें आहे व तशाच प्रकारचें मत आगरकरांचें होतें. त्याचबरोबर परदेशी मालावर बहिष्कार घाल-

ण्याच्या व अशा प्रकारें हिंदी उद्योग ऊर्जित दशेला आणण्याच्या कल्पनेला त्यांनीं मिथ्या देशाभिमान व भ्रामक अर्थशास्त्र अशीं नांवें दिलीं आहेत. देशी माल वापरण्याचें आगरकरांचें पूर्ण व्रत होतें, पण त्यासंबंधीं कांहीं तरी भ्रामक कल्पना पसरविण्याला मात्र ते तयार नव्हते. "तीन अर्थशास्त्रें" या निबंधांत ते म्हणतात:—"देशी माल वापरण्याचा निश्चय सर्वांनीं करावा म्हणजे चार दोन वर्षांत इंग्लंडचे व्यापारी चीं चीं करीत बसून हिंदुस्थानांत जिकडे तिकडे उद्योगच उद्योग व कारखानेच कारखाने होऊन जातील! दुर्दैवानें ही निश्चयरूपी यक्षिणीची कांडी फिरवणार कोण, हें मात्र सांगणारा अद्यापि कोणी पुढें आला नाहीं. तसेंच देशी मालांत कोणत्या रीतीनें तयार केलेल्या वस्तूंचा समावेश करावयाचा हेंही या भ्रामक अर्थशास्त्रभक्तांस नीट समजत नाहीं. स्क्रू टाकून जेथें तेथें खिळे वापरणें; आगगाड्यांतून प्रवास न करतां पादचारी होणें; घड्याळें फेंकून देऊन घटिकापात्रें लावून बसणें; तारायंत्राकडे पाठ फिरवून सांडणीस्वारांची योजना करणें; टपालांत पत्र न टाकतां जासूद पाठविणें; इंग्लंडच्या यंत्रावर कापड न काढतां गांवमागावर अवलंबून राहणें; छापखाने रद्द करून लेखकांच्या पलटणी तयार करणें; हें केवढें अजागळपण होणार आहे हें या लोकांस बिलकुल समजत नाहीं. हें पोरकटपण, तोफखाना घेऊन युद्धास निघालेल्या सैन्याशीं लहान पोरांच्या कागदी केपांच्या पिस्तुलांनिशीं सामना करण्यास उभें राहण्यासारखें होय. हा मिथ्याभिमान आणि हें भ्रामक अर्थशास्त्र आतां आम्ही टाकून देण्यास तयार झालें पाहिजे. देशाकरितां जें नुकसान सोसण्याची ईर्षा तुमच्या आंगांत असेल ती लहान मोठे यांत्रिक कारखाने घालण्यांत व प्रथम प्रथम त्यांत जें नुकसान येतें तें योग्य मार्गानें भरून काढण्यांत दाखवा." हा उपदेश १९३० सालींसुद्धां लोकांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

शेतकऱ्यांच्यासाठीं शेतकी पेढ्या काढाव्यात असें मत आगरकरांनीं प्रतिपादिलेलें होतें व सरकारनें लष्करी खर्च कमी केल्याखेरीज हिंदुस्थानांतील आवश्यक खर्चाला पैसा मिळावयाचा नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें.त्यांच्या अर्थशास्त्रविषयक निबंधांचें परिशीलन केलें असतां तात्त्विक अर्थशास्त्रांत ते जसे उत्तम निष्णात होते त्याप्रमाणेंच व्यावहारिक प्रश्नासंबंधीं त्यांनीं फार दूरवर विचार केलेला होता हेंही सिद्ध होतें. मराठी भाषेंत सोप्या रीतीनें अवघड आर्थिक प्रश्नांची उत्तम माहिती देण्याचें श्रेय आगरकरांना आहे. मि. दादाभाई

नौरोजी वगैरे अर्थशास्त्रज्ञ मंडळींनीं बांधलेले सिद्धांत व हुडकून काढलेली माहिती त्यांनीं मराठींत आणली व ती अगदीं सामान्य लोकांनाही समजेल अशा प्रकारें त्यांच्यापुढें मांडली. हिंदुस्थानाची दरिद्रावस्था त्यांना शल्याप्रमाणें बोंचत होती; तिचीं दोन कारणें त्यांच्या मतें होतीं. एक राज्यकर्त्यांचें स्वदेशाला अनुकूल नसलेलें धोरण आणि दुसरी लोकांची उद्योगनिवृत्ति. आणि म्हणून त्यांनीं ज्याप्रमाणें आर्थिक प्रश्नांची चर्चा करतांना राज्यकर्त्यांच्या धोरणावर सणसणीत कोरडे ओढलेले आहेत त्याचप्रमाणें लोकांनाही उद्योगी बनण्याचा स्पष्ट उपदेश केला आहे. हा करतांना हिंदुस्थान देशाच्या सौंदर्याचें व सुपीकतेचें व नैसर्गिक संपत्तीचें त्यांनीं जें अंतःकरणाला हालवून सोडणारें वर्णन तीन चार ठिकाणीं केलें आहे, त्यावरून त्यांच्या डोक्यांत, पुढें त्यांचे मित्र गोपाळराव गोखले यांनीं म्हटल्याप्रमाणें ( India is a land well endowed by God but ill served by man ) हिंदुस्थानभूमीवर निसर्गाची पुष्कळ कृपा आहे पण मनुष्यांनीं मात्र तिचा योग्य उपयोग केलेला नाहीं हा विचार सारखा घोळत होता असें स्पष्ट दिसतें. उद्योग हा औद्योगिक उन्नतीचा पाया व तो उद्योग स्वावलंबी असला पाहिजे हें तत्व आगरकरांनीं वरचेवर कथन केलेलें आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग औद्योगिक प्रगतीसाठीं करून घेणें ही होय. आधिभौतिक सुधारणा म्हणजे नरकाचा मार्ग असें आगरकर समजत नव्हते, शास्त्रीय उन्नति त्यांना प्रिय होती व शास्त्रांच्या साहाय्यानें मनुष्यतेला अधिक सुख मिळावें व जन्माचें सार्थक करण्याला अधिक वेळ व शक्ति मिळावी ही त्यांची तात्विक व आर्थिक विचारांत भूमिका होती. अर्थशास्त्र हा आगरकरांचा विशेष अभ्यासाचा विषय होता पण इतर विषयांत काळ जात असल्यामुळें आणि आयुष्याची दोरी बळकट नसल्यामुळें यासंबंधीं झालें त्याहून अधिक कार्य त्यांच्याकडून झालें नाहीं. पण मराठी वर्तमानपत्रकर्त्यांत आर्थिक प्रश्नांसंबंधीं इतकी विस्तृत व इतकी उत्कृष्ट चर्चा आगरकरांप्रमाणें दुसऱ्या कोणीही केलेली नाहीं ही या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आगरकरांची सुधारणा शब्दाची व्याख्या एकांगी नव्हती या सिद्धांतालाही आर्थिक विषयासंबंधीं त्यांनीं जें लिहिलें आहे त्यामुळें बळकटी येते हें सांगावयास नकोच.

---

## ( ई ) शिक्षणविषयक विचार

आगरकरांनीं आपलें सर्व आयुष्य शिक्षणाला वाहिलेलें होतें, आणि साक्षरता सार्वत्रिक पाहिजे हें त्यांचें स्पष्ट मत होतें व ती सार्वत्रिक करण्याचा खर्च सरकारनें केला पाहिजे असेंही त्यांनीं प्रतिपादन केलें होतें. शिक्षणाचा उद्देश मनाला सुदृढ करून बौद्धिक पराक्रम होण्याची सुलभता करणें आणि ज्ञानाच्या जोरावर माणसाचें वर्तन सुधारणें हा होय. त्याचा यापूर्वीं दर्शविलेल्या विचारांत मधून मधून बराच ऊहापोह झालेला आहे. पुढील दोन उताऱ्यांतून यासंबंधीं त्यांचें मत विशेष स्पष्टपणें प्रकट झालेलें आहे. हे उतारे "लोकशिक्षणावर गदा" या सुधारकांतील एका लेखांतून घेतलेले आहेत. हा लेख निबंधसंग्रह, भाग २ रा, यांत अगदीं पहिला दिलेला आहेः—

"'तुमच्या हायस्कूलावर होत असलेल्या खर्चापैकीं दोन तृतियांश खर्च तुम्ही देण्यास तयार व्हा, नाहीं तर तुमचें हायस्कूल बंद केलें जाईल,' अशा अर्थाचीं पत्रें शाळाखात्यांचे डायरेक्टर यांजकडून प्रत्येक जिल्ह्याचे म्युनिसिपालिटीस गेलीं आहेत; तसेंच येथील डेक्कन कॉलेजची फी दहा रुपये केली आहे असें म्हणतात. हा सर्व प्रकार खरा असेल, व त्याप्रमाणें आचरण करावयाचें, असा सरकारचा निश्चय झाला असेल, तर येथील लोकशिक्षणाची काय अवस्था होईल हें सांगतां येत नाहीं. आजपर्यंत आमच्या सरकारचा गर्व काय असे कीं, आम्ही हिंदु लोकांसाठीं साऱ्या देशभर रस्ते केले, तारायंत्रें केलीं, आगगाड्या केल्या, न्यायाच्या कचेऱ्या स्थापिल्या, लोकांच्या मालमत्तेचें आणि जीवांचें उत्तम रीतीनें संरक्षण होईल अशा प्रकारचा पोलीसचा बंदोबस्त केला, सैन्याची उत्तम व्यवस्था ठेवून परचक्राची भीति दूर केली; व्यापारास उत्तेजन दिलें; नाना तऱ्हेच्या धंद्यांची लोकांस ओळख करून दिली; सारांश हिंदुस्थान[illegible]स

आजपर्यंत अनवगत अशी सुधारणा व शांतता दिली. पण या सर्वांपेक्षां सरकारास ज्या गोष्टीविषयीं अभिमान वाटत असे; जीमुळें आमचें पारतंत्र्य आम्हांस सह्य होऊन इंग्लिश लोकांचें प्रभुत्व येथें चिरकाल असावें असें वाटत असे, व जिच्या मदतीनें कधींतरी आम्हांस स्वातंत्र्याचा सुदिन प्राप्त होईल, अशी आशा आमच्या अंतःकरणांत कधीं कधीं उद्भवत असे, त्या गोष्टींतून सरकार आज आपलें अंग काढून घेऊं पहात आहे! लोकशिक्षणाच्या कामाचा बोजा ब्रिटिश सरकारनें झुगारून दिल्यास, ब्रिटिश लोकांस आपल्या अंमलांचे पवाडे गाण्यास काय राहिलें हें आम्हांस समजत नाहीं." याच लेखांत आगरकर पुढें लिहितातः—"राज्यविस्तार शक्तीबाहेर गेला; आणि उत्पन्नाचा बहुतेक भाग लष्करी खात्याकडे अडला जाऊन न्याय, लोकशिक्षण वगैरे अत्यावश्यक कामांकडे दुर्लक्ष होऊं लागलें म्हणजे राज्यास उतरती कळा लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं असें आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्ध झालें आहे. अलिकडे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाविषयीं पराकाष्ठेची आस्था दाखविली जाऊन, त्याच्यासाठीं अधिक अधिक खर्च करण्याची प्रवृत्ति पडूं लागली आहे. कनिष्ठ प्रतीचें शिक्षण तर सर्वांस फुकटच मिळावें, म्हणजे त्याचा सारा खर्च सरकारी उत्पन्नांतून व्हावा, असा वाद चालू आहे, आणि तो करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या देशांतील बहुतेक लोकांस लिहितां वाचतां येत आहे, त्या देशांत त्यासंबंधानें अशा हालचाली सुरू आहेत. आमच्या देशांत दाट अज्ञानतिमिर जिकडे तिकडे पसरलें आहे. कांग्रेस ही लोकांची प्रतिनिधिसभा नव्हे, असें प्रतिपादणाऱ्यांचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, ज्या देशांतील शेंकडा पंचाण्णव लोकांस लिहितां वाचतां येत नाहीं, त्यांना कांग्रेससारख्या सभांचें महत्व मुळींच समजण्याचा संभव नाहीं; म्हणून लोकांत शिक्षणाचा बराच प्रसार होईतोंपर्यंत असल्या कांग्रेसपासून फायदा न होतां नुकसान होण्याचा संभव आहे. तसेंच प्रांतिक कौन्सिलांत व गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असूं नयेत, असें ज्यांचें म्हणणें आहे, तेही तसें न करण्यास लोकांचें अज्ञान हेंच कारण दाखवितात; असें असून गरीब बिचाऱ्या शाळाखात्याचा खर्च अविचारानें कमी करणें हें अगदीं उचित नाहीं. या खात्याचा खर्च कमी करणें म्हणजे उत्पन्नाचा झरा बंद करण्यासारखें होय, याचा सरकारनें नीट विचार करावा. काटकसर करणें जरूर असेल तर ती दुसऱ्या खात्यांत करावी. ती शाळाखात्यांत केल्यानें लोकांचें आणि सरकारचें

पुढें पराकाष्टेचें नुकसान होणार आहे. यासंबंधाची ओरड थेट पार्लमेंटपर्यंत पोंचवून सरकारी उत्पन्नाचा विवक्षित भाग लोकशिक्षणाकडे अव्याहत लाविला जाईल, असें पार्लमेंटानें हिंदुस्थान सरकारकडून बंधन करून घेतलें पाहिजे."

सार्वत्रिक शिक्षणासंबंधानें वर्णन करितांना दुसऱ्या एका ठिकाणीं आगरकर म्हणतातः—"आमच्या सांप्रतच्या शोचनीय स्थितीचा जो कोणी शांतपणें विचार करील त्याला लोकशिक्षणाशिवाय ही आमची स्थिति सुधारण्याचा दुसरा उपाय नाहीं असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. सरकारपाशीं हें काम तडीस नेण्याइतके पैसे असोत किंवा नसोत, सरकारनें किंवा लोकांनीं हें काम मनापासून हातीं घेतल्याशिवाय आमची खरी, टिकाऊ व वाढत जाणारी सुधारणा होण्याचा बिलकुल संभव नाहीं.*" याच निबंधांत ते पुढें म्हणतातः— "लोकशिक्षणाविषयीं विचार करतांना गोंधळ होऊं न देण्याविषयीं ज्या दोन गोष्टी नेहमीं डोळ्यांपुढें ठेविल्या पाहिजेत त्या ह्याः—लोकशिक्षण म्हणजे उच्च प्रतीचें किंवा धंदेशिक्षण नव्हे. लहानापासून थोरास व गरीबापासून श्रीमंतास नित्याच्या व्यवहाराला घडोघडीं उपयोगी पडणारें असें जें बुद्धिविकासक अत्यंत स्वल्प प्राथमिक शिक्षण त्याचाच सक्तीच्या शिक्षणांत अंतर्भाव केला पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या धर्ममतांशीं या शिक्षणाचा बिलकुल संबंध नाहीं; तसेंच या शिक्षणापासून चरितार्थ चालविण्यास उपयोगी पडणाऱ्या कोणत्याही धंद्याचें ज्ञान प्राप्त होत नाहीं. तसेंच, अशा प्रकारच्या शिक्षणाविषयीं सक्ती करणें म्हणजे अमुक प्रकारच्या शाळांत, अमुक फी देऊन, अमुक वर्षें मुलें पाठविणें असाच केवळ अर्थ नाहीं; तर अमुक एक शिक्षण अमुक एक वयाच्या आंत प्रत्येक मुलीस व मुलास मिळण्याची खबरदारी त्यांच्या आईबापांनीं किंवा पालकांनीं घेतलीच पाहिजे, न घेतल्यास ते अमुक दंडास पात्र होतील असा अर्थ आहे. प्रजेचें हित चिंतणाऱ्या प्रत्येक सरकारनें असा नियम करून तो अमलांत आणावा, व त्याकरितां लागेल तेवढा खर्च आनंदानें करावा असें आमचें मत आहे."

या विवेचनांत मुलांमुलींना प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता असल्याचें सूत्ररूपानें सांगितलें आहे व प्राथमिक शिक्षण म्हणजे काय हें अगदीं विशद करून

* निबंधसंग्रह, भाग १, "शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय?"

सांगितलें आहे. प्राथमिक शिक्षण म्हणजे धंदेशिक्षण नव्हे, एखाद्या धर्ममताचें शिक्षण किंवा उपजीविकेचें शिक्षणही नव्हे. इंग्रजींत ज्याला तीन रकारी शिक्षण म्हणतात ( Three Rs ) म्हणजे ज्यांत लेखन, वाचन व साधें अंकगणित, अथवा शुद्ध मराठी भाषेंत सांगावयाचें म्हणजे लिहितां येणें, वाचतां येणें व हिशेब ठिशेब करतां येणें, यांचा अंतर्भाव होतो तें प्राथमिक शिक्षण होय. हें देशांतील प्रत्येक व्यक्तिमात्रास मिळावें, प्रत्येक मुलाला व मुलीला मिळावें व त्यासाठीं सरकारनें लागेल तो खर्च करावा असें आगरकरांचें स्पष्ट मत होतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थान देशाच्या परिस्थितींत "प्राथमिक शिक्षण सरकारचें अवश्य कर्तव्य आहे" ( वि. सं., भाग १, पृष्ठ २४३ ) याबद्दलही त्यांना शंका नव्हती. हिंदुस्थानांत 'राजा कालस्य कारणम्' अशी समजुत अद्यापिही आहे. शिवाय "युरोपीय लोकांनीं राजाच्या किंवा सरकारच्या व्याख्येची व्याप्ति कितीही संकुचित केली तरी प्राथमिक शिक्षण तींत आल्यावांचून रहात नाहीं; कारण कर्तव्याची मर्यादा ज्यांनीं अत्यंत सूक्ष्म केली आहे त्यांचें देखील असें म्हणणें आहे कीं, लोकांच्या मालमत्तेचें आणि जीविताचें संरक्षण करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य होय.........आणि ही गोष्ट घडवून आणण्यास लोकशिक्षणासारखें प्रशस्त साधन नाहीं; तेव्हां लोकशिक्षण हें सरकाराचें अवश्य कर्तव्य आहे हें सिद्ध झालें."

२. शिक्षणाच्या उपयुक्ततेसंबंधीं व त्याची सक्ती सरकारनें केलीच पाहिजे या मुद्यासंबंधीं चर्चा करतांना याच लेखांत म्हटलें आहे:—"लोकशिक्षण हें लोकांच्या मालमत्तेच्या आणि जीविताच्या संरक्षणाचें प्रशस्त साधन नसेल तर दुसरें कोणतें आहे? फटके मारणें, खोड्यांत घालणें, मुसक्या बांधणें, अंधेऱ्या कोठडींत कोंडून कांजी पाजणें, साध्या किंवा सक्तमजुरीची शिक्षा देणें, बिड्या ठोकणें, तोफेचे गोळे उचलावयास लावणें, काळ्या पाण्यावर धाडणें, फांशीं देणें, गोळ्या घालणें, हींच प्रशस्त साधनें आहेत कीं काय? रोग होऊं देऊन मग ते तीव्र उपायांनीं बरे करीत बसणें किंवा ते मुळींच न होऊं देणें हें प्रशस्त? रोगाविर्भाव झाल्यावर त्याचा प्रतिकार करणें एवढेंच प्रशस्त असेल तर देवी कशासाठीं काढूं देतां? महारोग्यांस इतरांप्रमाणें समाजांत हवेंतसें मिसळूं कां देत नाहीं? घरांत व घराबाहेर घाण करणारास शिक्षा देण्याचे अधिकार म्युनिसिपालट्यांस, लोकलबोर्डांस, पाटील कुळकरण्यास, मामलतदारास आणि इतरांस कशासाठीं दिले आहेत? वाघ्याच्या उपद्रवाचा

आरंभ झाला नाहीं तों पाण्याची स्वच्छता राखण्याबद्दल, एका गांवचे लोक दुसऱ्या गांवांत जाऊं न देण्याबद्दल, ठिकठिकाणीं डांबराच्या व गंधकाच्या भट्ट्या पेटवून फेनिलानें घाणीच्या जागा शिंपडण्याबद्दल इतकी धडपड कां करतां? कुजलेलें मांस, सडलेलीं फळें, व नासलेल्या भाज्या बाजारांत कां विकूं देत नाहीं? या सर्व गोष्टी झालेल्या रोगाच्या प्रतिकारार्थ आहेत, कीं ते न होऊं देण्याचे उपाय आहेत? तसेंच यासंबंधानें सरकारनें सक्ती करणें वाजवी आहे असें म्हणतां कीं गैरवाजवी आहे असें म्हणतां? जर या गोष्टी रोगांची होतां होईल तों उत्पत्ति किंवा त्याचा प्रसार न होऊं देण्यासाठीं करण्यांत येत असतील, आणि त्या सरकारनें करणें प्रशस्त व अवश्य असेल तर बाकी साऱ्या रोगांहून अतिशय भयंकर व दुष्ट जो अज्ञानरोग तो नाहींसा करण्याबद्दल किंवा त्याचे दुष्परिणाम न घडूं देण्याबद्दल जो प्रशस्त उपाय आहे तो सरकारनें न करावा असें तुम्ही कोणत्या आधारावर म्हणणार? हा अज्ञानरोग तुम्हांस क्षुद्र वाटतो काय? जर तो तुम्हांस तसा वाटत असेल तर तुमच्या विचारांत मोठी चूक होत आहे. हा अज्ञानरोग सर्व शारीरिक रोगांच्या मुळाशीं आहे आहे इतकेंच नाहीं, तर त्याहून साऱ्या मानुषीय विपत्तींचें हाच बीज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पारतंत्र्याच्या यातना कोण सोशीत आहेत? नित्याच्या चरितार्थाची कोणास पंचाईत पडते? दारिद्र्यानें कोण पीडिले आहेत? दुसऱ्याच्या लाथा बुक्या नित्यशः कोणास खाव्या लागतात? यत्‌किंचित कारणास्तव मारामाऱ्या करण्यास व खून पाडण्यास कोण तयार होतात? तुरुंग बहुधा कोणत्या प्रकारच्या लोकांनीं भरलेले असतात? वेडेपणाच्या धर्मसमजुतीनें नानाप्रकारचे देहदंड कोण सोसतात? व धर्मसंबंधीं तंटे कोण माजवितात? अल्प वस्त्र, अल्प अन्न, व अमंगल वसति यांच्या योगानें होणारे अनंत हाल कोणास भोगावे लागतात? या सर्व विपत्ति विशेषतः अज्ञान लोकांस छळीत नाहींत असें जर कोणी सिद्ध करून देईल तर लोकशिक्षणांत सरकारनें हात घालण्याची किंवा तें आपलें अवश्य कर्तव्य आहे असें मानण्याची गरज नाहीं, असें आम्ही खुशाल कबूल करूं! कोणत्याही मनुष्यावर चोरीचा किंवा खुनाचा आरोप शाबीद झाला असतां त्याच्या अपराधाच्या मानानें त्याला हवी ती शिक्षा ठोठावण्याचा अधिकार न्यायाधीशाकडे ठेवण्यांत जर तुम्हांला अवघड वाटत नाहीं, तर त्या मनुष्याला चोर किंवा खुनी न होऊं देणाऱ्या साधनांचा उपयोग करण्याचा अधिकार त्याकडे ठेवण्यास

तुम्ही इतके आढेवेढे कशासाठीं घ्यावे हें समजत नाहीं." * हे उद्गार आणि पुढें वीस वर्षांनीं गोखल्यांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत प्राथमिक शिक्षणासाठीं

* आगरकरांचे परम मित्र गोपाळराव गोखले यांनीं १९१० सालीं वरिष्ठ कायदेमंडळांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करावें असा ठराव आणला. त्यावरील भाषणांत ते म्हणतातः—

I think that this question of compulsory and free primary education is now in this country the question of questions. The well-being of millions upon millions of children who are waiting to be brought under the humanising influence of education depends upon it. The increased efficiency of the individual, the higher general level of intelligence, the stiffening of the moral backbone of large sections of the community, none of these things can come without such education. In fact, the whole of our future as a nation is inextricably bound up with it.

१९११ सालीं गोखल्यांनीं प्राथमिक शिक्षणाचें बिल वरिष्ठ कायदेमंडळापुढें आणलें. त्यावर केलेल्या भाषणांत ते म्हणालेः—

No one is so simple as to imagine that a system of universal education will necessarily mean an end to all'our.ills, or that it will open out to us a new heaven and a new earth. Men and women will still continue to struggle with their imperfections and life will still be a scene of injustice and suffering, of selfishness and strife. Poverty will not be vanished because illiteracy has been removed and the need for patriotic and philanthropic work will not grow any the less. But with the diffusion of universal education the mass of our countrymen will have a better chance in life. With universal education there will be hope of better success for all efforts, official or non-official, for the amelioration of the people—their social progress, their moral improvement, their economic well-being. I think, my Lord, with universal education the mass of the people will be better able to take care of themselves against the exactions of unscrupulous money lenders or against the abuses of official authority by petty men in power. My Lord, with 94 per cent. of our countrymen sunk in ignorance, how can the advantages of sanitation or thrift be properly

आटोकाट खटपट केली त्यावेळीं त्यांनीं केलेलीं भाषणें यांतील साम्य ऐतिहासिक दृष्ट्या जसें महत्वाचें आहे त्याचप्रमाणें सहृदय वाचकांनाही तें विशेष मनोरम वाटल्याशिवाय राहाणार नाहीं.

प्राथमिक शिक्षणासंबंधीं याच लेखांतला आणखी एक उतारा घेऊन दुसरीकडे वळण्यास हरकत नाहीं:—"........प्राथमिक शिक्षण अत्यंत उपयोगी आहे अशी साऱ्या लोकांची पक्की खातरी झाली तरी सरकारनें थोडी बहुत सक्ती केल्याशिवाय प्रत्येक मुलीस व मुलास वयांत येण्यापूर्वीं तें शिक्षण देण्याची व्यवस्था लोकांच्या हातून होईल असं आम्हांस वाटत नाहीं. मुलें घरच्या घरीं शिकोत; जर्मनीप्रमाणें स्थानिक कमेट्यांनीं किंवा खाजगी लोकांनीं घातलेल्या शाळांत शिकोत; किंवा इंग्लंडप्रमाण सरकारी किंवा मदतीच्या शाळांत शिकोत; सहा आणि चौदा किंवा आठ आणि चौदा वर्षांच्या दरम्यान् त्यांस अमुक एक शिक्षण मिळालेंच असलें पाहिजे, अशी सरकारनें सक्ती केल्याशिवाय प्रत्येक प्रौढ स्त्रीस किंवा पुरुषास आपलें पत्र आपण लिहितां किंवा वाचतां येण्याची व आपल्या निशाणीची रेघ काढण्याकरतां दुसऱ्यास न

---

appreciated, and how can the industrial efficiency of the worker be improved ? With 94 per cent. of the people unable to read or write, how can the evil of superstition be effectively combated and how can the general level of life in the country be raised ? My Lord, His Majesty the King-Emperor, in delivering his message of hope to the people of their country before he left Calcutta, was pleased to say:—" And it is my will too that the homes of my Indian subjects may be brightened and their labour sweetened by the spread of knowledge, with what follows in its train—a higher level of thought, of comfort and health." No nobler words were ever uttered. May we not hope that the servants of His Majesty in this country will keep these words constantly before their minds and will so discharge the responsibility which they impose that future generations in this country will be enabled to turn to his Majesty's declaration with the same fervant and reverent gratitude with which the people of Japan recall their Emperor's famous rescript of 1872 ?

गोखल्यांचें बिल यशस्वी झालें नाहीं हें प्रसिद्ध आहे.

बोलावण्याची वेळ कधींही येणार नाहीं. प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी कोणाहीवर पडो, तें दिलें आहे किंवा नाहीं, हें सरकारनें पाहिलेंच पाहिजे...... जो शिक्षण संपादित नाहीं तो स्वतः अशिक्षित राहतो एवढेंच नाहीं तर त्याच्या अशिक्षणापासून इतरांस फार त्रास होतो. एकापासून दुसऱ्यास निष्कारण त्रास न होऊं देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे, व ज्या अर्थी अशिक्षित मनुष्य इतरांस त्रासदायक होतो, त्याअर्थीं त्याला सुशिक्षित किंवा सज्ञान करून तो इतरांस त्रासदायक न होईल असा करणें हें सरकारचें प्रमुख कर्तव्य आहे.......मनुष्याचा व्यवहार सुरळीत चालण्यास व उत्तरोत्तर त्याचें पाऊल पुढें पडत जाण्यास ज्ञानवृद्धि आणि ज्ञानप्रसार यासारखें साधन नाहीं..... मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधानें वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारों पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध— इत्यादिकांनीं गांजून, पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे असें आम्हांस वाटत नाहीं."

३. शिक्षण प्रसारानें देशांत शांततामय क्रांति घडवून आणणें हें न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करणाऱ्या बालगोपालांचें व्रतच होतें; तेव्हां शिक्षणाच्या प्रसाराबद्दल आगरकरांची तळमळ अतिशय मोठी असावी हें साहजिक होतें. तथापि सार्वत्रिक शिक्षणाप्रमाणेंच त्यांच्या स्त्रीशिक्षणविषयक विचारांचा स्वतंत्र आणि विशेष उल्लेख करणें हें आवश्यक आहे. "मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता" ( निबंधसंग्रह, भाग १, पृष्ठ २४९ ) या सुंदर लेखांत ते म्हणतातः—" लहान मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकारनें जितकी सक्ती केली पाहिजे तितकी मुलींच्या शिक्षणाबद्दल केली पाहिजे किंबहुना मुलींच्या शिकण्याबद्दल थोडीशी अधिक केली पाहिजे !.......................... ( प्राथमिक ) शिक्षण वास्तविक पहातां मुलांपेक्षां मुलींस विशेष जरूरीचें आहे, असें विचाराअंतीं प्रत्येकास दिसून येणार आहे. अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते. आईच्या प्रकृतीचे, स्वभावाचे व आचरणाचे परिणाम मुली ( ला ? ) च्या प्रकृतीवर थेट गर्भाधानापासून होऊं लागतात. बायकोच्या व मुलांच्या चरितार्थास लागणारें द्रव्य बाप संपादितो; मुलें दुखणेकरी असलीं तर थोडी बहुत काळजी घेतो; बाहेर थकला भागलेला घरीं परत आला म्हणजे कदाचित् त्यांचे लाड करून आनंद पावतो. हें सारें बाप करतो, व त्यानें तें करणें जरूर आहे. पण मुलें स्वावलंबी होईतोंपर्यंत त्यांबद्दल जी अहोरात्र खस्त

खावी लागते ती आईला किंवा कारणपरत्वें तत्स्थानापन्न जी स्त्री झाली असेल तिलाच खावी लागते. पापणीला पापणी लागूं न देतां उभ्या रात्री जागत काढणें, मोटाच्या मोटा धुणीं धुणें, कोणत्याहि प्रकारच्या देहधर्मास कधींही कंटाळून न जाणें—तात्पर्य, आपल्या प्राणापेक्षां ज्याला आपण पोर म्हणतों त्यास जपणें, हें अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे. पुरुषाच्यानें तें दोन दिवस देखील निभावयाचें नाहीं. तेव्हां ज्या स्त्रीवर अपत्यसंगोपनाचें एवढें जबाबदारीचें काम आपण सोंपवितों तिला अक्षरशत्रु असूं देणें हें अत्यंत अहितकर आहे असें आम्हांस वाटतें."

प्रत्येकास मनुष्य या नात्यानें शिक्षण पाहिजे याचें वर्णन केल्यानंतर वरील उतारा घेतलेल्या लेखांत स्त्रियांवर विशेष कोणकोणती जबाबदारी पडते याचा उल्लेख करून आगरकरांनीं स्त्रिया साक्षर असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. पण स्त्रियांना केवळ र ट फ करण्याइतक्या शिकवाव्या व त्यापुढें त्यांना शिक्षण मिळूं नये, त्यांनीं फक्त हिशेब ठेवावा व शनीमहात्म्य किंवा व्यंकटेशस्तोत्र वाचावें, असा अर्थात् त्यांचा अभिप्राय नव्हता. ज्याप्रमाणें ज्यांना इच्छा व शक्यता असेल त्या मुलांना वरिष्ठ शिक्षण मिळावें हें मत सर्व ग्राह्य आहे त्याप्रमाणें ज्यांना इच्छा व शक्यता असेल त्या मुलींनाही वरिष्ठ शिक्षण मिळण्याची सुलभता असावी असें त्यांचें स्पष्ट मत होतें. पण मुलींना वरिष्ठ शिक्षण मिळण्यास त्यांचा विवाहकाल बदलावा लागेल हें जाणून यासंबंधीं त्यांनीं मार्मिक विवेचन केलें आहे. ( पहा, निबंधसंग्रह, भाग १ ला, स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाहीं ? ) त्यांच्या वेळीं मुलींचीं लग्नें फारच लौकर होत व त्यांच्यावर गर्भारपण, बाळंतपण यांचें ओझें तेराव्या चवदाव्या वर्षापासून पडे. असें असतांनासुद्धां " ज्याप्रमाणें प्रत्येक मुलास व मुलीस आईबापांनीं किंवा बापानें प्राथमिक शिक्षण दिलें पाहिजे, असें अलीकडे लोकमत सर्वत्र झालें आहे, त्याप्रमाणेंच स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या; आणि पाहिजे तेव्हां लग्नें करून हवा तसा संसार करावा —अशी मोकळीक कालांतरानें सर्वांस मिळणार आहे" याबद्दल त्यांना बिलकुल शंका नव्हती. आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणें आणि आशीर्वादानें या गोष्टी घडून आलेल्या आहेत याबद्दल प्रस्तुत काळीं तरी कोणालाही शंका उरलेली नाहीं.

४. स्त्रियांना सर्व प्रकारचें शिक्षण मिळावें हें तर आगरकरांचें मत होतेंच पण स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें याही मताचे ते निःशंक पुरस्कर्ते होते. अलीकडे कांहीं गृहस्थांनीं स्त्रियांच्या शिक्षणाच्या कामांत "सवता सुभा" उत्पन्न करण्याचे आटोकाट प्रयत्न चालविले आहेत व त्यांच्या समर्थनार्थ विलायत किंवा अमेरिका इकडील एकांगी माहिती प्रसिद्ध करून इकडील जनतेंत बुद्धिचांचल्य उत्पन्न करण्याचें अकार्य त्यांच्या हातून होत आहे. या प्रश्नासंबंधीं स्वतंत्र चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. पण आगरकरांचें या प्रश्नासंबंधीं विचार या "सवत्या सुभ्या" ला अगदीं विरुद्ध आहेत व ते देतांना त्यांनीं त्यांच्या समर्थनार्थ अत्यंत मननीय असे मुद्दे पुढें ठेवलेले आहेत एवढें लोकांच्या नजरेसमोर आगरकरांच्या चरित्रात्मक विवेचनांत आणणें हें आमचें कर्तव्य आहे. "स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें व तेंही एकत्र द्यावें!" या निबंधांत (निबंधसंग्रह, भाग १ ला) या प्रश्नाची उत्कृष्ट चर्चा त्यांनीं केली आहे व निबंधाचा मथळाच त्यांच्या अभिप्रायाचें उत्कृष्ट निदर्शन करतो. हा निबंध केवळ मुद्देसूद आहे असें नाहीं तर त्यांत मोठा हृदयंगम असा सूक्ष्म विनोदही ठिकठिकाणीं दिसून येतो. आगरकर म्हणतात:—

"आजच्या निबंधाचा मथळा दृष्टीस पडल्याबरोबर कित्येकांच्या चित्तवृत्तींत कल्होळ झाल्यावांचून रहाणार नाहीं. पण त्याला आमचा इलाज नाहीं. आम्हांस जें प्रशस्त वाटत आहे तेंच लिहिणें भाग आहे. स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण दिल्यामुळें कित्येक पुरुषांस घरीं बसून मुलें खेळविण्याचें, लुगडीं धुण्याचें, भांडीं घांसण्याचें, स्वयंपाक करण्याचें व दळण कांडण करण्याचें काम करावें लागलें तर त्याला आम्ही काय करणार? असलीं कामें स्त्रियांनींच करावीं हा कांहीं ईश्वरी नियम नाहीं. तसेंच मुलें जीं होतात तीं स्त्रियांना होतात, म्हणून त्यांनींच तीं कामें केलीं पाहिजेत असेंही कोणास सिद्ध करून देतां येणार नाहीं. श्रीमंतांच्या बायकांस कितीही मुलें झालीं तरी असलीं कामें करावीं लागत नाहींत, हें आपण नित्यशः पहातों........ तेव्हां मुलें फार होणें आणि प्रपंचांतील हलकीं कामें अवश्य करावीं लागणें यांचा अपरिहार्य संबंध आहे असें नाहीं. पण प्रत्येक स्त्रीला दहा किंवा बारा वेतें झालींच पाहिजेत असें तरी आपण कां घेऊन चालावें? सध्यां स्त्रियांना जीं इतकीं मुलें होतात तीं त्यांच्या संतोषानें होतात असें आम्हांस वाटत नाहीं. यासंबंधानें पुरुषांकडून स्त्रियांवर जुलूम होतो असा आमचा समज आहे

बाळंतपणाच्या क्लेशाची यत्किंचित् झांक पुरुषांच्या स्वप्रत्ययास येण्यासारखी असती तर त्यांनीं आपल्या मनोविकारांस इतकें सईल सोडलें नसतें ! 'पर-दुःख शीतल' या तत्वावर सध्यां त्यांचें वर्तन चाललें आहे. स्त्रियांप्रमाणेंच त्यांनाही कधीं कधीं प्रसूतिवैराग्य होण्याचा संभव असता तर उभयतांच्या संयमानें बराच भूभार कमी होता. तथापि हा सांप्रतचा अन्याय फार दिवस चालेल असें दिसत नाहीं. जसजसा पुरुषांत विद्येचा अधिकाधिक प्रसार होत जाईल तसतसा स्त्रियांतही त्याचा उपक्रम होऊन तो वाढत जाणार, तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांस आपलें खरें हित कशांत आहे आणि तें साधावें कसें हें समजूं लागणार, आणि तें समजूं लागलें कीं पुरुषांस हा आपला सांततिक जुलूम सोडून द्यावा लागणार. विवाहाच्या कामीं स्त्रीपुरुषांची संमति जितकी अवश्य आहे तितकीच संमति विवाहाच्या अमलांतही दृष्टीस पडूं लागली पाहिजे. तसें होऊं लागेल तेव्हांच स्त्रियांची पुष्कळ विपत्ति टळेल.* हें सारें घडून येण्यास एकच उपाय आहे तो हा कीं, सध्यां ज्या प्रकारचें शिक्षण पुरुषांस मिळत आहे त्याच प्रकारचें शिक्षण स्त्रियांस मुबलक मिळालें पाहिजे. स्त्रियांस शिक्षण देण्याचा विचार निघाल्यापासून प्रत्येक देशांत त्यांस कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. लिहिणें, वाचणें व हिशेब करणें या तीन गोष्टी साऱ्या मुलांप्रमाणें साऱ्या मुलींस शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं, असें सामान्य मत आहे. पण येथून पुढें मतभेदास आरंभ होतो; व वरिष्ठ शिक्षणाच्या संबंधानें त्याचा कळस होतो. प्राथमिक शिक्षण आटपलें

---

* मातापितरांना क्लेशदायक अशी संतानवृद्धि असण्याला आगरकर प्रतिकूल होते. त्याबरोबरच संततिनियमनाचा प्रशस्त मार्ग म्हणजे संयम होय असें त्याचें मत दिसतें. संयमानें संततिनियमन होतेंच असें नाहीं व अतिसंयमाचें आगरकर पुरस्कर्ते होते असेंही म्हणवत नाहीं. पण प्रसंग विशेषीं बाह्य उपाययोजना करावी लागली तरी स्त्रियांची आपत्ति कमी होण्याला व सर्वांच्याच सुखासाठीं संयम अवश्य आहे हें त्यांचें मत स्पष्ट दिसतें. वेळीं प्रसंगीं बाह्य उपायांची योजना करावी हें ग्राह्य धरणें म्हणजे स्त्रीपुरुषांनीं आपल्या वासनांना अप्रतिहत सोडून केवळ परिणामाचें भय नाहीं म्हणून वाटेल तें करणें याचें समर्थन करणें नव्हे; ही गोष्ट सुज्ञांना मान्य होईल. संयम म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधाचा अत्यंताभाव नव्हे एवढें समजल्यावर त्याची आवश्यकता कोणालाही वाटलीच पाहिजे.

म्हणजे मुलींना घरीं ठेऊन घेऊन प्रपंचव्यवस्था शिकवावी असें कित्येकांचें मत आहे. तसें नच करावयाचें असेल आणि त्यांना शाळेंत पाठवाव्या असा आग्रहच असेल तर निदान ज्या शाळेंत शिवणकाम, गायन, पाकसिद्धि, गृहव्यवस्था, रेशमाचीं, लोकरीचीं किंवा अशाच प्रकारच्या कसल्या तरी धाग्याचीं वस्त्रें विणण्याचें काम, वेत, गवत वगैरे तंत्वात्मक द्रव्यांनीं होणारीं करंड्या वगैरे नक्षीचीं व साधीं कामें; लहान मुलांचें संगोपन व रोगचिकित्सा; स्त्रियांचे रोग व त्यांवर औषधोपचार; इत्यादि विषय ज्या शाळांत शिकवितात अशांतच त्यांस पाठवाव्या. भूगोल, इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, ज्योतिष वगैरे मेंदूचा खराबा करणारे विषय त्यांच्यापुढें कधींही आणूं नयेत. त्यांत त्यांचा व जगाचा मुळींच फायदा नाहीं. कोणतेंही शिक्षण देतांना ज्याला तें द्यावयाचें त्याच्या मानसिक व शारीरिक शक्ति जात्या कशा आहेत याचा विचार केला पाहिजे; इतकेंच नाहीं, तर त्या त्या व्यक्तीस आपलें आयुष्य कोणत्या स्थितींत घालवावें लागणार याचाही विचार केला पाहिजे. पुरुषांच्या विचारशक्तीपेक्षां स्त्रियांची विचारशक्ति स्वाभाविकपणें कमकुवत आहे, व मुलें होण्याचें आणि त्यांना वाढविण्याचें काम विधात्यानें त्यांचेकडे ठेविलें असल्यामुळें त्यांना पुरुषांशीं स्पर्धा करूं न देतां, त्यांच्या नैसर्गिक क्षीण बुद्धिमत्तेस व त्यांच्या वाट्यांस आलेल्या स्वाभाविक कामास योग्य असेंच शिक्षण त्यांस दिलें पाहिजे. ज्याला जें करतां येणार आहे तेंच त्याला करूं देण्यांत कोणत्याही प्रकारचा अन्याय नाहीं; इतकेंच नाहीं, तर उलट त्याचें हित आहे. बायकांनीं विद्या शिकून बाहेरचीं कामें करावीं, आणि पुरुषांनीं अक्षरशून्य राहून घरचीं कामें करावीं, असा व्युत्क्रम करण्यांत दोघांचेंही नुकसान आहे. पुरुषांच्या सुदृढ हातांनीं व पायांनीं बाहेरचे धक्के बुक्के खावे; उन्हाचा, थंडीचा व वाऱ्याचा त्रास सोसावा; तात्पर्य, बायकांच्या, मुलांच्या व आपल्या चरितार्थाकरतां लागतील तिकडे मानसिक व शारीरिक कष्ट करून द्रव्य संपादावें हें जस त्यांना उचित आहे, त्याचप्रमाणें कोमलांगी स्त्रियांनीं सुखकर गृहछायेंत राहून पुरुषांनीं कमावून आणिलेल्या जिनसांची व्यवस्था लावावी; थकल्याभागलेल्या पतीस सुग्रास करून घालून त्यांचें पादसंवाहन करावें; मुलाबाळांची खस्त खाऊन त्यांस चांगल्या रीतीनें वाढवावें; आणि प्राणप्रियाच्या इच्छेनुरूप अष्ट, दश, किंवा द्वादशपुत्रा सौभाग्यवती म्हणवून घेण्यास एका पायावर उभें असावें, यांतच स्त्रियांचें खरें हित व सुख आहे. म्हणजे सध्यां जी रूढ रहाटी

आहे तीच उत्तम आहे; तींत फेरफार करणें इष्ट नाहीं असें पुष्कळांचें मत आहे. या मतास अनेक डॉक्टर लोकांची संमति पडली असल्यामुळें किल्येकांच्या समजुतीनें त्यास वेदवाक्याची प्रमाणता प्राप्त झाली आहे. परंतु असला आग्रह काय कामाचा? असल्या एकदेशीय तत्वज्ञानास कोण विचारतो? पाहिजे त्या पुरुषानें पाहिजे ती विद्या संपादावी, या मतास तरी साऱ्यांची अनुकूलता कोठें आहे? व जी आहे ती तरी त्यांस एकाएकीं थोडीच प्राप्त झाली आहे! स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देण्यास हरकत नाहीं, एवढा रुकार पुरुषांकडून मिळण्यास काय थोडें रण करावें लागलें? सत्ता× वापरण्याची अक्कल अंगीं असो अथवा नसो, ज्यांस ती प्राप्त झाली आहे, त्यांस ती सोडूं नये असें वाटतें. अनेक कारणांमुळें स्त्रियांवर पुरुषांचें वर्चस्व स्थापण्यांत आलें आहे, व त्यांना त्यांची गोडी समजून चुकली आहे, तेव्हां त्यांस तें आपल्या हातून जाऊं नये असें वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे........ पुरुषांच्या मेंदूपेक्षां स्त्रियांचा मेंदू सरासरीनें कमी वजनाचा आहे, आणि स्त्रीपुरुषांमधील कामाची वांटणी त्यांच्या मेंदूच्या वजनावर अवलंबून असावी हें योग्य आहे असें जरी मानिलें, तरी साऱ्या पुरुषांचे मेंदू साऱ्या स्त्रियांच्या मेंदूंपेक्षां अधिक जड आहेत, असें प्रतिपादण्याचें धारिष्टय अत्यंत अधिकारलोलुप पुरुषास देखील करतां येणार नाहीं. अनेक स्त्रियांचे मेंदू अनेक पुरुषांच्या मेंदूहून जड भरतील यांत संशय नाहीं. तेव्हां मेंदूच्या मुद्यावरच स्त्रियांनीं अमुक कामें करावीं, असा निर्बंध करणें शुद्ध अन्याय व क्रूरपणा आहे. ज्याला जें काम साधेल त्यानें तें करावें अशी प्रत्येकास मोकळीक देण्यांत तें करणाराचा अथवा करणारीचा आणि जगाचा फायदा आहे. सध्यां पुष्कळ स्त्रियांच्या बुद्धिसत्तेची विनाकारण नासाडी होत आहे. ज्या कामास जे पुरुष बुद्धिसामर्थ्यानें योग्य नाहींत त्यांच्याकडून तीं कामें होत असल्यामुळें एकंदरींत तीं कामें व्हावीं तशीं होत नाहींत, व तसें न झाल्यामुळें मनुष्यजातीच्या

---

× हिंदुस्थानांत स्त्रियांच्या उच्च शिक्षणाचा जो अनुभव आला आहे त्यावरूनहि ही गोष्ट सिद्ध झाली आहे. गणित किंवा रसायनशास्त्र व यंत्रशास्त्र अशा विषयांतसुद्धां स्त्रिया मोठें यश मिळवितात हें सर्वांना माहीत झालेलें आहे. त्याचप्रमाणें विश्वविद्यालयाच्या परीक्षांतून स्त्रियांनीं वरचा नंबर किंबहुना अगदीं पहिला नंबर पटकावल्याचें आजकाल पुष्कळ वेळां ऐकूं येतें.

सुखास चट्टा बसत आहे. हरएक शास्त्रांत, कलेंत व धंद्यांत स्त्रीपुरुषांची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरूप व्यवस्था लागली पाहिजे. शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यास स्त्रिया असमर्थ असतील तर त्या तशा ठरतील. पण अनुभवानें तसें ठरेतोंपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करणें हा शुद्ध सुलतानी दांडगेपणा होय. अमेरिकेंत मुलांप्रमाणें मुलींस वरिष्ठ शिक्षण देण्याचा उपक्रम केल्यापासून जे परिणाम घडून आले आहेत, त्यांचें अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं, जीं शास्त्रें व ज्या कला केवळ पुरुषांसच सुसाध्य आहेत असें आपणांस वाटत होतें, तीं शास्त्रें व त्या कला स्त्रियांसही तितक्याच सुसाध्य आहेत, व शास्त्रकलांच्या अभ्यासामुळें स्त्रियांचें नैसर्गिक चारुत्व कमी होऊन अपत्य-* संगोपनाचें काम त्यांच्यानें बरोबर वठेनासें होईल अशी जी आपणास भीति

---

* शिक्षणामुळें स्त्रिया अपत्यसंगोपनाला किंबहुना गर्भधारणेलासुद्धां असमर्थ होतात या बालिश मुद्याला आतां कोणी महत्व देत नाहीं हें सर्वांना माहीत झालें आहे. वरिष्ठ शिक्षण प्रत्येक पुरुषाला मिळत नाहीं त्याप्रमाणें प्रत्येक स्त्रीलाही तें मिळणार नाहीं, पण ज्यांना तें मिळेल त्यांच्या शरीरप्रकृतीवर त्यामुळें विपरीत परिणाम होतील ही समजूत केवळ चुकीची आहे. इंग्रजी शिक्षणामुळें पुरुषांची प्रकृति बिघडते अशीं विधानें पुष्कळांनीं केलेलीं आहेत. इतकेंच नव्हे तर त्या शिक्षणामुळें पुरुषांची निर्मितिशक्ति अल्पप्रमाण होते किंवा शून्यत्वाप्रत पावते अशा तऱ्हेचे कोटिक्रमही आजपर्यंत अनेक वेळां झालेले आहेत. "मोर, एल्. एल्. बी. प्रहसन" सारखीं घाणेरडीं व आचरट पण एके काळीं मूर्ख लोकांत आदरणीय झालेलीं पुस्तकें जर पाहिलीं तर त्यावरून आम्ही म्हणतों त्याची सत्यता कळून येईल. शिवाय जर कांहीं स्त्रिया आपल्या अत्यंत श्रेष्ठ बुद्धिमत्तेमुळें शास्त्राभ्यास करण्यास विशेष पात्र असल्या व त्यांच्या हातून ग्रंथकर्तृत्वामुळें किंवा शास्त्रीय शोधामुळें जगाचें विशेष हित होण्याचा संभव असला तर त्यांना चतुर्भुज करून त्यांच्यावर दहा पांच वेळां प्रसूतीचें भाग्य लाधलेंच पाहिजे हाही न्याय आतां कोणी ऐकणार नाहीं. निष्प्रतिबंध चढाओढ व व्यक्तिस्वातंत्र्य ह्या दोहों दृष्टीनें असलीं तत्वें त्याज्य ठरतात. संसाराच्या यातायातींत पाहिजे तेव्हां पडणें किंवा मुळींच न पडणें या गोष्टी पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांच्याही इच्छेवर ठेवल्या पाहिजेत या मतास आतां अधिक मान्यता आहे.

होती ती केवळ निराधार होती या दोनी गोष्टी उत्तम रीतीनें सिद्ध झाल्या आहेत. अमुक कामें स्त्रियांनीं करावीं आणि अमुक पुरुषांनीं करावीं, असा आपल्या बुद्धींत जो सध्यां आग्रह उत्पन्न होतो त्याचें बरेंच कारण कामाची वांटणी करण्याचें काम आमच्या हातीं आहे हें होय. ती बायकांच्या हातीं असती तर त्यांनींही अशीच एकदेशीय वांटणी करून आपणांकडे उंच कामें आणि आम्हांकडे हलकीं कामें ठेविलीं असतीं. ”

५. स्त्रियांना व पुरुषांना एकच प्रकारचें शिक्षण देण्यासंबंधीं वरील विस्तृत व मुद्देसूद विवेचन वाचल्यानंतर त्यासंबंधीं कोणीही जाणता मनुष्य साशंक राहील असें वाटत नाहीं. पण यापेक्षांही ज्यास्त अवघड प्रश्न म्हणजे मुलांमुलींना सर्व प्रकारचें शिक्षण एकत्र देण्याचा. यासंबंधीं ज्या निबंधांतून वरील उतारा घेतला आहे त्याच्या उत्तर भागांत आगरकरांनीं असेंच सडेतोड विवेचन केलें आहे. तें येथें जसेंच्या तसें देतों म्हणजे या प्रश्नासंबंधीं पूर्ण समाधान त्यांत केलेलें आहे असें वाचकांच्या आपोआप नजरेस येईलः—

“ ......युरोपांतील समाजघटना अथवा समाजरहाटी येथील समाजरहाटीहून अगदीं निराळी आहे. आम्ही आपल्या भाषणांत स्त्रियांना अर्धांगी म्हणतों, व धर्म, अर्थ, काम वगैरे गोष्टींत त्यांस सहचारिणीत्व देतों. पण हीं दोन अर्धांगें बहुधा पोकळ धर्माज्ञांपलीकडे कधींही जात नाहींत. बायकांनीं घराबाहेरच्या पंचायतींत पडणें योग्य नाहीं, हें जें विलक्षण मत आम्हां पूर्वेकडील लोकांच्या मनांत हजारों वर्षें खिळून राहिलें आहे, त्यामुळें व आणखी कांहीं कारणांमुळें, स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज आम्हांस अगदीं नापसंत वाटतो. स्त्रीपुरुषांस मोकळेपणीं एकत्र वागूं दिलें असतां समाजावर मोठा दुर्धर प्रसंग गुदरेल असा आमचा पक्का ग्रह होऊन गेला आहे. युरोपांत असा परिणाम घडत नाहीं ही गोष्ट प्रत्यक्ष आमच्यापुढें असून आम्ही इतके घाबरून जातों, हें तरी आमच्या अविचाराचें निदर्शनच आहे. पण त्यांतल्या त्यांत ध्यानांत ठेवण्यासारखी एक मौज अशी आहे कीं, ज्या युरोपखंडांत कोणताही ठळक सामाजिक समारंभ किंवा विधि स्त्रियांच्या सांनिध्यावांचून होत नाहीं त्या युरोपखंडांतही स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण द्यावें किंवा नाहीं याविषयीं मोठा मतभेद आहे. घोड्यांच्या शर्यती, चेंडूफळीचे खेळ, बक्षिसें वांटणें, पाये घालणें, इमारती उघडणें, व्याख्यानें देणें, लग्नसमारंभ, प्रेतसंस्कार, मोठमोठ्या मेज-

वान्या, प्रदर्शनें, नानाप्रकारच्या पार्ट्या व नाच—या व अशाच प्रकारच्या अनेक युरोपीय समारंभांस व विधींस स्त्रिया न येतील तर त्या लोकांस हे समारंभ व विधि मुळींच नकोसे वाटतील. युरोपीय समाजास जी एक प्रकारची उल्हासवृत्ति प्राप्त झाली आहे, ती त्यांच्या मिश्रणामुळें प्राप्त झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मिश्र समाजाचें नीतिसूत्र ढिलें पडतें असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण ज्यांना मिश्र समाजाचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं त्यांचें हें मत आहे एवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे. गोषाबाहेर किंवा झनान्याबाहेर नीति असण्याचा संभव नाहीं, हें बोलणें जितक्या शहाणपणाचें आहे तितक्याच शहाणपणाचें वरील मत आहे. स्त्रीपुरुषांचें पाऊल वांकडें न पडणें यांत समाजाचें हित आहे, हें आम्ही कबूल करतों. पण तें हित साधण्यासाठीं बायकांस मागल्या दारीं कोंडून घालण्याची आवश्यकता आहे, किंबहुना तसें केल्यानें तिचें रक्षण होणारच आहे, असें आमच्याचें म्हणवत नाहीं. जी वस्तु दुष्प्राप्य असते तीविषयीं आपल्या मनांत नसतें महत्व उत्पन्न होऊन आपण तिच्या प्राप्तीविषयीं फार उत्सुक होतों. तीच हवी तेव्हां मिळण्यासारखी असेल तर तिची तुम्हांस आठवण देखील होणार नाहीं. एखाद्याला जर असें सांगितलें कीं तुला महिनाभर अमुक ठिकाणीं जाण्याची मनाई केली आहे, तर त्याला त्या ठिकाणीं वर्षोगणती जाण्याचें कांहींएक कारण नसून, या मनाईमुळें आपलें स्वातंत्र्य गेलें व पराकाष्ठेचें नुकसान झालें, असें वाटूं लागणार आहे. निःपक्षपातदृष्टीनें विचार करतां कदाचित् असें कबूल करावें लागेल कीं, ज्या लोकांत स्त्रियांना झनान्यांत, पडद्यांत, किंवा गोषांत कोंडून ठेवण्याची चाल आहे, त्यांतच युरोपीयन लोकांपेक्षां कमी नीतिमत्ता असण्याचा संभव आहे. क्षणोक्षणीं, दर प्रसंगीं, सर्वत्र ठिकाणीं स्त्रीपुरुषें एकत्र भेटूं लागलीं म्हणजे विषयवासनेचा विचार त्यांच्या मनांत फार क्वचित् येण्याचा संभव आहे. चैत्रमासीं हळदी कुंकवास जाणाऱ्या येणाऱ्या बायका, अक्षतीस किंवा पाणघड्यास निघालेल्या बायका, स्टेशनावर गाड्यांतून जाणाऱ्या बायका किंवा शाळेंत येणाऱ्या मोठ्या मुली, यांकडे सभ्य म्हणविणारे लोक वांकड्या नजरेनें व निर्लज्ज लोक बेलाशक टक लावून पहातात त्याचें कारण एवढेंच आहे कीं, या खंडांतील इतर लोकांप्रमाणें आम्हां हिंदु लोकांस घडोघडीं स्त्रियांचा समागम घडत नाहीं. तसें होईल तर आमच्या या असभ्यपणाच्या खोडी जातील; इतकेंच नाहीं, तर आमच्या भाषणांत आणि वर्तनांत

आतांपेक्षां पुष्कळ सभ्यपणा येईल. अत्यंत सहनशील दहा पांच लोकांची गोष्ट सोडून द्या; शेंकडा नव्वद हिंदूंच्या-निदान महाराष्ट्रीयांच्या सामान्य भाषणांत बरीच अश्लीलता असते असें आम्हांस वाटतें. आमच्या समाजांत स्त्रीपुरुषांच्या गांठी वारंवार पडूं लागतील तर ही अश्लीलता नाहींशी होईल याविषयीं आम्हांस शंका नाहीं. यूरोपांत प्रवास करून आलेल्या अनेक लोकांशीं आम्ही यासंबंधानें बोललों आहों व त्या सर्वांचें असें म्हणणें आहे कीं, येथील अत्युच्च वर्णांतील पुरुषांच्या व स्त्रियांच्या बोलण्यांत जो अमर्याद विचकटपणा दिसून येतो, त्याचा एक शतांश विचकटपणाही युरोपांतील कनिष्ठ प्रतीच्या लोकांच्या भाषणांत असत नाहीं. तात्पर्य, मिश्र समाजपद्धति आम्हांस वाटतें त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या नीतिमत्तेस प्रतिकूल नसतां उलट अनुकूळ आहे यांत शंका नाहीं. तथापि मनुष्यांच्या शरीराप्रमाणेंच कांहीं अंशीं त्याच्या समाजाची स्थिति असते. शरीर वाढींत आहे तोंपर्यंत त्याला कसलेंही वळण लावणें कठीण पडत नाहीं. पण एकदां त्याची वाढ खुंटून त्याच्या आंगीं ताठपणा आला म्हणजे त्याला नवीन वळण लावण्याची आशा खुंटली असें समजावें. समाजाची तशीच गत आहे. मुसलमानांप्रमाणें कित्येक लोकांस स्त्रियांना पुरुषदर्शन देखील होऊं देण्याची भीति वाटते ! आम्हांस मिश्र समाजापासून घोर परिणाम घडतील अशी भीति आहे. स्त्री-पुरुषांस एकत्र शिक्षण दिलें असतां त्याचा चांगला परिणाम घडेलच अशी युरोपीयन लोकांची खात्री झालेली नाहीं, अमेरिकन लोकांनाही ही शंका बरींच वर्षें होती; पण अलीकडील प्रत्यक्ष अनुभवावरून तिचा परिहार होत चालला आहे. ज्या खेड्यांत मुलांकरतां व मुलींकरतां दोन स्वतंत्र शाळा घालण्याची सोय नाहीं, त्या खेड्यांतील लोक लहान मुलींस व मुलांस एकाच शाळेंत धाडण्याबद्दल युरोपांत व अमेरिकेंत फारशी हरकत घेत नाहींत; व आमचे लोकही बहुधा तसें करणार नाहींत असें वाटतें. आठ दहा वर्षांचीं मुलें एकत्र वागूं देण्यास कोणाच्याही मनांत विशेष शंका येत नाहीं, व ती येण्याचें कारणही नाहीं; आणि याच वयाचीं मुलें बहुधा प्राथमिक शाळेंत असावयाचीं. पण त्यांतही कित्येक दोष काढतात. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, ज्याअर्थीं स्त्री-पुरुषांचा आयुष्यक्रम अगदीं निराळा आहे, त्याअर्थीं त्यांना भिन्न शिक्षण भिन्न स्थलींच पहिल्यापासून दिलें पाहिजे. पण या दुराग्रहाच्या मताला अलीकडे कोणी जुमानीनासें झाल्यामुळें तें मंदगतीनें अस्ताचलास जात आहे !

ही प्राथमिक शिक्षणाची हालहवाल झाली. मध्यम व वरिष्ठ शिक्षण संपादणाऱ्या विद्यार्थिणी व विद्यार्थी एका ठिकाणीं असूंच नयेत, हें मत युरोप खंडातील बहुतेक देशांत व युनायटेड स्टेट्स्च्याही कांहीं भागांत कायम आहे. एकंदरीनें विचार करतां, या मताची रचना अनुभवावर न करतां तर्कावर लोक करतात असें आम्हांस वाटतें. तरुण स्त्रिया व तरुण पुरुष यांस एका वर्गांत बसवून त्यांना एकाच शिक्षकाकडून व्याख्यानें देवविण्याचा अनुभव प्रथम अमेरिकेंत घेऊन पाहिला व तो वाटला होता त्याहून अधिक फलप्रद दिसून आला. एकत्र शिक्षणाचे शत्रु बहुधा पुढील तीन मुद्यांवर भांडतातः—१ ला—स्त्री-पुरुषांत नैसर्गिक मोठा भेद आहे. तेव्हां त्यांस एकत्र शिक्षण दिल्यानें त्या भेदानुरूप त्या शिक्षणांत जो फरक करणें जरूर आहे तो कधींही करतां येणार नाहीं. २ रा—मुलांच्या दांडग्या वर्तनाचा मुलींच्या मर्यादशील वर्तनावर मात्र दुष्परिणाम होतो. मुलींच्या सहवासानें मुलांस कांहीं फायदा होत नाहीं. ३ रा—अल्पवयांत मुलगे व मुली वारंवार एकत्र येऊं लागतील तर त्यांच्या विषयवासना लौकर जागृत होऊन त्यांचे दुःखकारक परिणाम त्यांच्या वर्तनावर घडूं लागतील. वयांत आलेल्या मुली व मुलगे एकाच वर्गांत बसत असून जर त्या वर्गांची व्यवस्था नीट रीतीनें ठेवण्यांत येत नसेल तर कदाचित् वरच्यासारखे परिणाम क्वचित् प्रसंगीं घडून येण्याचा संभव आहे. पण उत्तम व्यवस्था असली कीं फारच चांगले परिणाम घडून येतात असें विस्तृत अनुभवावरून सिद्ध झालें आहे. जे या पद्धतीचे अनुभवावरून मोठे कट्टे भक्त बनले आहेत, ते असें म्हणतात कीं (१) मुलांस व मुलींस एक ठिकाणीं शिकविल्यानें मुलांना धाक लावणें फार सोपें जातें. मुलांचा हट्टीपणा, उद्धटपणा व दांडगेपणा हा मुलींच्या सान्निध्यामुळें बराच कमी होतो. (२) मुलगे आणि मुली यांस एकेच ठिकाणीं पढवावयाचें असलें म्हणजे उभयतांस समजेल अशा शिक्षणपद्धतीचा अंगिकार करणें अवश्य होऊन खुद्द मुलांकरतां शिक्षणाच्या ज्या विलक्षण पद्धति अस्तित्वांत आल्या आहेत त्यांची निःसत्वता व एकदेशीयता व्यक्त होते. मुलगे व मुली नेहमीं एकत्र वागल्यानें, त्यांच्या विषयवासनेवर अपायकारक परिणाम न घडतां उलट त्या शांत व गंभीर होतात, आणि उभयतांच्या मैत्रीचा पाया कोणत्याही बाह्यांगावर न घालतां अंतरंगाची चांगली परीक्षा करून त्यावर तो घालण्याचा त्यांचा कल होतो."

वरील उताऱ्यांतील मतें अगदीं असंदिग्ध प्रकारें प्रकट झालेलीं आहेत व जरी तीं चाळीस वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेलीं असलीं तर प्रस्तुत काळीं निघणाऱ्या बहुतेक आक्षेपांचा त्यांत परामर्ष घेतलेला आहे. त्याची येथें अधिक चर्चा करण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्रांत सर्व प्रतींच्या शिक्षणाचा प्रसार करण्यांच्या कार्यांत आगरकरांनीं जो भाग घेतला त्याची हकीकत या ग्रंथाच्या पूर्व भागांतून आलेली आहेच. पाश्चिमात्य शिक्षणानें या देशांतील लोकांचें हित होईल अशी त्यांची खात्री होती; अर्थात् योग्य फेरफार हा सुधारणेचा पाया असल्यामुळें तपशीलवार दुरुस्त्या करण्याला त्यांची केव्हांही हरकत नव्हती. विश्वविद्यालयांतून एतद्देशीय भाषांना चांगलें स्थान मिळावें हें त्यांचें मत इतकें जगजाहीर आहे कीं त्याचा फक्त निर्देश या ठिकाणीं केला तरी पुरे आहे.

# (उ) सामाजिक विषयांवरील विचार

आगरकरांच्या सामाजिक विषयांवरील मतांची चर्चा या ग्रंथांत ठिकठिकाणीं झालेली आहे व त्यांची परिणति होण्यास कोणतीं मूलभूत तत्त्वें कारणीभूत होतात यासंबंधीं विवेचन प्रस्तुत भागाच्या पहिल्या उपभागांत ( प्रास्ताविक चर्चेंत ) झालेलें आहे. आतां त्यांच्या कांहीं विचारांचा या भागाच्या परिपूर्ततेसाठीं येथें ठळकपणें निर्देश करणें आवश्यक आहे, व तसें करतांना आतां त्यासंबंधीं अधिक चर्चा करण्याचें कारण नाहीं. अस्पृश्यतेसंबंधीं ते लिहितातः— "अतिशूद्रादि लोक साहेब लोकांच्या नोकरीला राहतात; साहेब लोक आम्हांस अस्पर्श्य नाहींत; असें असूनही अतिशूद्राला स्पर्श करण्यास आमची छाती होत नाहीं हा कोण व्यामोह ? तसेंच, एका दृष्टीनें मुसलमान लोक हिंदूंतील कोणत्याही अति नीच वर्णापेक्षां विशेष अस्पर्श्य आहेत असें मानणें भाग आहे; कारण कोणताही हिंदु गोवध करून त्या मांसावर उपजीविका करीत नाहीं. मुसलमानांस व युरोपीयनांस तसें करण्यास प्रत्यवाय नसून म्हार, मांग, धेड, ढोर वगैरे हिंदूंपेक्षां ते आम्हांस पवित्र व स्पर्श्य वाटतात; त्यांच्याशीं आम्ही हरएक प्रकारचा बाह्य व्यवहार करतों; त्यांचीं व आमचीं मुलें एका शाळेंत व एका वर्गांत शिकतात; आणि ते व आम्ही सभांत, कौन्सिलांत व कांग्रेसांत "शेक ह्यांड" करतों, व एकत्र बसतों उठतों. असें असून कांहीं हिंदु जाति आम्हांस इतक्या अस्पर्श्य वाटाव्या हें नवल नाहीं काय ? या सर्व आचारांत विचाराचा भाग किती स्वल्प आहे बरें ? कोणी असें म्हणतील कीं म्हार, ढोर वगैरे जातींचे लोक जो निंद्य आहार व आचार करितात त्यामुळें त्यांस अस्पर्श्य मानणें स्वाभाविक आहे. असें असेल तर या आक्षेपावर फार सोपें उत्तर आहे. क्षणभर अशी कल्पना करा कीं, ढोर, भंगी, महार, धेड व चांभार यांनीं आपापले धंदे कांहीं वेळ न करण्याचा कट केला तर उच्च मानून घेणाऱ्यांची

काय अवस्था होईल? सारें उच्चनीचत्व एकीकडे ठेवून प्रत्येक कुटुंबाला आपल्या घरांतील घाण कशी तरी काढावी लागणार नाहीं काय? वासरूं किंवा रेडकूं मेलें असतां, तें आपण होऊन गांवाबाहेर ओढून नेऊन टाकावें लागणार नाहीं काय? समाजाच्या विलक्षण रहाटीमुळें उच्चनीचत्व अस्तित्वांत येऊन तदनुसार जो व्यवसायविभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गांत जन्मास आलेल्या लोकांनीं नीच वर्गांत जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पर्श्य मानणें याहून मनुष्यपणाच्या विचारीपणास लांच्छनास्पद अशी दुसरी गोष्ट नाहीं. "न वदेत् यावनीं भाषां प्राणैःकंठगतैरपि" एवढा ज्या महंमदीयांविषयीं आम्हांस तिरस्कार होता, त्या गोहत्या करणाऱ्या म्लेंच्छांचें व तत्समान युरोपीयनांचें, राज्याधिकारामुळें आम्हांस कांहींच वाटनासें होऊन, ज्यांना वैदिक धर्म शिरसावंद्य, ज्यांचा धर्म व आचार हिंदु, जे अनादि कालापासून हिंदुस्थानचे रहिवासी, ज्यांच्या हातून गोवध होत नाहीं, ज्यांना मदिरापानादि मनुष्यतेचा भ्रंश करणाऱ्या व्यसनांचा म्हणण्यासारखा नाद नाहीं, अशा हिंदूंचा आम्ही तिरस्कार करतों; त्यांना स्पर्श करण्यास भितों, व त्यांहून अनेक कारणांमुळें अस्पर्श्य अशा परकीयांस दृढालिंगन देतों, हा केवढा प्रमाद होय! यावरून कोणी असें समजूं नये कीं, हिंदूंतील श्रेष्ठ जातींनीं नीच हिंदूप्रमाणें परकीयांचाही तिरस्कार करूं लागावें असें आमचें म्हणणें आहे; आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, त्यांनीं वरच्याशीं निदान परकीयांप्रमाणें तरी वागण्यास मागें पाहूं नये." *

"सती" च्या चालीसंबंधानें ते म्हणतातः—

"आमची तर अशी समजूत आहे कीं, नवरा मेल्यामुळें आमच्यांतील ज्या स्त्रिया आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात त्या पराकाष्ठेच्या अविचारी, साहसी, भेकड, किंवा आम्ही निष्ठुरपणें पुढें त्यांची जी छलना करतों तिच्या भयंकर स्वरूपानें घाबरून जाणाऱ्या अधीर स्त्रिया असल्या पाहिजेत. जिचा नवरा मेला तिचें होईल तितक्या उत्तम रीतीनें संगोपन करण्याची उदार चाल आमच्या देशांत असती तर सहगमनाची रूढि येथें कधींच न पडती

* निबंधसंग्रह, भाग १, पृष्ठ ८०-८१. आगरकरांचा उपदेश त्यावेळीं उच्च वर्णाचे म्हणविणारे हिंदु ऐकते तर प्रस्तुत काळचा अस्पृश्य म्हणविले जाणाऱ्या हिंदूंचा सत्याग्रह उपस्थित झाला नसता.

इतकेंच नाहीं, तर पतिवियोगामुळें एकाएकीं प्राण सोडणारी स्त्रीदेखील येथें कधींही दृष्टीस न पडती. व्यक्तीसाठीं किंवा व्यक्तिसमुदायासाठीं मरणें श्लाघ्य आहे पण केव्हां ? त्या मरणानें व्यक्तिसमुदायाचें मरण टळत असेल, किंवा त्याला बऱ्याच चिरस्थायि सुखाचा लाभ होत असेल तर. असें नसतां ज्या ठिकाणीं सहज किंवा बुद्धिपुरस्सर एक इसम दुसऱ्याकरतां मरण्यास प्रवृत्त होत असेल त्या ठिकाणच्या रूढि अत्यंत अन्यायाच्या, दुष्टपणाच्या व पराकाष्ठेच्या कोत्या समजुतीच्या असल्या पाहिजेत हें उघड आहे. असलीं दुःखकारक उदाहरणें येथील खालच्या जातींतल्या स्त्रियांत किंवा कोणत्याही जातींतील पुरुषांत मुळींच सांपडत नाहीं. त्यांचा सारा भरणा......वरिष्ठ जातींतील स्त्रियांत आहे; व त्यांतच तो आहे याचें कारण त्यांचें परावलंबन व स्वचरितार्थ हटकून चालवितां येईल अशा प्रकारचा कोणताही प्रशस्त धंदा त्यांस न येणें हें होय. या जातींतील सुखवस्तु घराण्यांतल्या स्त्रियांस विद्यानंदांत काळ घालविण्यास शिकविण्याचा परिपाठ पडेल व गरीब लोकांच्या मुलींस थोडेंबहुत लिहिणें वाचणें शिकवून, त्याबरोबरच एखाद्या धंद्याचें ज्ञान करून देण्यांत येऊं लागेल, तर नवऱ्याच्या मृत्युवार्तेबरोबर आपोआप मरणारी किंवा मारून घेणारी स्त्री दिसेनाशी होईल इतकेंच नाहीं, तर ज्यांच्यावर दुर्दैवानें तो दुःखाचा डोंगर कोसळेल, त्या हळू हळू त्याचा भार विसरूं लागून आपलें आपल्या मुलांबाळांचें व इतरांचें अस्तित्व होईल तितकें सुखावह करण्यास झटूं लागतील."

२. " निराकारण अथवा घटस्फोट, " " घटस्फोट अथवा काडीमोड " " स्वयंवर " " प्रियाराधन " " वल्लभोपासना " हे सुधारकांतले पांच निबंध निबंधसंग्रहाच्या पहिल्या भागांत आलेले आहेत. आगरकरांना बालविवाह नको होता, त्यांना स्वयंवरपद्धति पाहिजे होती आणि संसार हा सुखाचा, आनंदाचा, प्रेमाचा व्हावयास पाहिजे होता. तेव्हां त्यांनीं स्वयंवराचें मंडन केलें व वेळीं प्रसंगीं घटस्फोटाची शक्यता असावी असें सुचविलें. या लेखांतील एक दोन उतारे त्या त्या मतांची परिस्फुटता होण्यासाठीं येथें देतों. हे विचार चाळीस वर्षांपूर्वीं लोकांना जितके क्रांतिकारक वाटले होते तितके आतां वाटत नाहींत व सध्यांची तरुण पिढी तर या विचारांना सर्वथा अनुकूल आहे.

---

* निबंधसंग्रह, भाग १, पृष्ठ ९५.

"......आमचें बरेंच विचारांतर होऊन मनांतल्या मनांत ज्या प्रकारच्या पाणिग्रहणाचा अभिलाष आम्हांस उत्पन्न झाला आहे तें पाणिग्रहण एका तऱ्हेचें आहे, व ज्याच्या पाशानें येथील अप्राप्तयौवन वधूवरें प्रतिवर्षी जखडलीं जात आहेत तें पाणिग्रहण निराळ्याच तऱ्हेचें आहे. तारुण्यवसंत प्राप्त होऊन शरीर-द्रुमावर पालवी, मोहर, व सूक्ष्म फलनिर्भर यांचा आविर्भाव झाला असतां तीं किती रमणीय दिसतात, हें कोणास सांगावयाला पाहिजे असें नाहीं. ही रमणीयता पराकाष्ठेची मोहक आहे व हिच्या भरांत पाणिग्रहण केल्यानें कधीं कधीं प्रमाद होण्याचा संभव आहे हेंही आम्हांस कबूल आहे. पण याच गोष्टी-बरोबर ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, विवाहापासून उत्पन्न होणाऱ्या अत्युत्कृष्ट सुखाचा उपभोग अशा ऋतूंत युवयुवतींस स्वेच्छेनुरूप पाणिग्रहण करूं दिल्यानेंच होण्याचा संभव आहे." "ज्या लोकांना कोणी तरी पसंत केलेल्या बायका चालतात; ज्या लोकांना रत्युपभोगासाठीं दुसऱ्यांनीं कोंडून घालावें लागतें; ज्या लोकांना ज्ञानसंपादन, द्रव्यसंपादन, लौकिकसंपादन, सामर्थ्यसंपादन, विषयसौख्यरसज्ञानसंपादन, यांपैकीं कोणतीही गोष्ट कमाविण्यापूर्वी "जबरीचा संभोग" करण्याची चटक लागली आहे व ज्यांच्या हातून या पापामुळें प्रतिदिवशीं प्रेमाचे हजारों खून पडत आहेत, शारीरिक व मानसिक अनंत यातना भोगाव्या लागत आहेत, विद्या व वित्त संपादण्याची बिलकुल कुवत राहिलेली नाहीं, खऱ्या जातिविशिष्ट सुखाची कल्पना ज्यांच्या स्वप्नांतसुद्धां कधीं येत नाहीं, ज्यांना संसार असार होऊन गेला आहे, व आयुष्य हें ज्यांना दुर्वह ओझ्यासारखें वाटत आहे, अशा लोकांनीं राष्ट्रीय सभांच्या फंदांत पडून आपल्या मनासारखे राज्यकर्ते वर-ण्याची इच्छा कशाला धरावी?" "ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे; ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागावर तारुण्याचें तेज चकाकत आहे; विषय-वासना जागृत झाल्यामुळें उल्हासानें व उत्कंठेनें अननुभूत सुखास्वादाच्या अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत, दृष्टींत व चर्चेत लज्जा, अधीरता, साशंकपणा वगैरे परस्परविरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्यांचें हरएक प्रयत्न चालले आहेत; विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनीं आपणास होईल तितकें अलंकृत करून, अन्योन्यांस मोह पाडण्याविषयीं जे अहोरात्र झटत आहेत; ज्यांना आपण रतिमन्मथाचे पुतळे आहों, व विधात्यानें आपली विवाहमैत्री व्हावी, असें

योजूनच त्यानें आपणास निर्माण केलें, आणि आपल्याहून सुखी असें दंपत्य कोठेंही असूं शकण्याचा संभव नाहीं असें ज्यांस वाटूं लागलें आहे; अन्योन्य-समागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यांस युगतुल्य झाला असून, जे सूर्याच्या अश्वास मंदगति त्याबद्दल निंदूं लागले आहेत व यामिनीस आपली समागम-कारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे जे डोळे लावून बसले आहेत; अशा स्त्रीपुरुषांच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणीकडे ? आणि पंतोजीचा मार खाणाऱ्या व अभ्यासाखालीं अर्धमेल्या झालेल्या दुर्बल, भेकड आणि लुस्कान अशा आमच्या सोळा सतरा वर्षांच्या बहुतेक पोरांच्या आणि बाऱ्हला बाऱ्ह-लीचा व भातुकलीचा ज्यांचा खेळ नुकताच सुटला आहे, व नवरा म्हणून ज्याच्याशीं आपला एक प्रकारें विशेष संबंध झाला आहे, असा पुरुष जातीपैकीं कोणी एक इसम आहे, असें कोठें नुकतेंच समजूं लागलें आहे अशा आमच्या बारा तेरा वर्षांच्या लाजाळू व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या महालाची बहार कोणीकडे ?" या शेवटच्या वाक्यांत दिलेली स्थिति आतां बरीच बदललेली आहे. हे उतारे फक्त आगरकरांच्या विचाराची धाव पुढें किती जात असे याची कल्पना यावी म्हणून दिले आहेत. त्यांच्या सामाजिक तत्वज्ञानाचा ऊहापोह या भागाच्या आरंभीं झालेलाच आहे, तेव्हां त्याची द्विरुक्ति येथें कर-ण्याची आवश्यकता नाहीं.

## ( ऊ ) इतर विषयांवरील विचार

—३०६—

या ग्रंथांत ठिकठिकाणीं आगरकरांच्या अनेक विषयांवरील विचारांचा उल्लेख व चर्चा हीं झालेलीं आहेत. त्यानंतर प्रस्तुत भागांत त्यांच्या मूलभूत व महत्वाच्या विचारांचीही विस्तृत चर्चा झाली. याशिवाय इतर अनेक विषयांवर त्यांचे विचार त्यांच्या लेखनांत इतस्ततः पसरलेले आहेत. त्यांचा विस्तरशः उल्लेख येथें करण्याचें कारण नाहीं. त्यांच्या सामाजिक विचारांची ओळख वाचकांना यापूर्वींच्या भागांतून झालेली आहे. आतां फक्त त्यांच्या वाङ्मयात्मक कामगिरीचा विचार उरला व त्यासाठीं एक स्वतंत्र भाग देणें आवश्यक आहे. त्यापूर्वीं आठव्या भागांत त्यांची चरित्रकथा जेथपर्यंत आणून सोडली आहे तेथून त्यांच्या मृत्यूपर्यंत ती आणून ठेविली पाहिजे. ती हकीकत या पुढील म्हणजे दहाव्या भागांत दिली आहे. वाङ्मयात्मक विषयाशीं आगरकरांचा चांगला परिचय होता व ते मोठे रसिक गृहस्थ होते. त्यांच्या वाङ्मयसंबंधक मतांचाही अकराव्या भागांत समावेश केलेला आहे. मराठी भाषेची आगरकरांनीं केलेली सेवा अत्यंत थोर पदवीची आहे. तिचें स्वरूप होतां होईल तों यथार्थ रेखण्याचा प्रयत्न त्या भागांत होईल. आणि शेवटच्या म्हणजे बाराव्या भागांत त्यांच्या चरित्राचा उपसंहार करतांना प्रसंगोपात्त त्यांच्या खासगत वागणुकीचा वगैरे उल्लेख होईल व त्यांच्या स्वभावाविषयीं थोडीशी चर्चा करून त्यांचें इतिहासांतील स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न होईल. आगरकरांचें वाचन व अवलोकन हीं फार विस्तृत होतीं व प्रत्येक गोष्टीबद्दल साधक बाधक प्रमाणें घेऊन त्यांचा सर्व बाजूंनीं विचार करून योग्य दिसेल तो निर्णय करावयाचा अशी त्यांची पद्धति होती. आणि त्या पद्धतीला अनुसरूनच त्यांनीं आपले निरनिराळ्या विषयावरील विचार प्रकट केलेले आहेत.

जो वर्तमानपत्र चालवितो त्याला प्रचलित सर्व विषयांसंबंधीं लिहावें लागतें व ज्यावेळीं तें वर्तमानपत्र केवळ पोटाचा धंदा किंवा पैसे मिळविण्याचें अथवा प्रतिष्ठा मिळविण्याचें साधन म्हणून नसतें तर स्वतंत्र विचारांचा फैलाव करण्याचें व लोकमताला इष्ट वळण लावण्याचें साधन म्हणून असतें, त्यावेळीं त्यांत लेखकाचे विचार जे बाहेर पडतात ते स्वतंत्र असतात. आगरकरांनीं जें वर्तमानपत्र काढलें होतें तें लोकशिक्षणासाठीं काढलें होतें, वर्गणीच्या व जाहिरातीच्या रूपानें "द्रव्यभक्षणा"साठीं किंवा लोकानुरंजनच करून प्रतिष्ठा-पोषणासाठीं काढलें नव्हतें. त्यामुळें केसरीच्या पहिल्या सहा सात वर्षांत काय व पुढें सुधारकांत काय त्यांनीं जें लिहिलें त्यांत स्वतंत्रपणा, नवीनपणा आणि निर्भीडपणा हे गुण उत्कृष्ट प्रकारें दिसून येतात. योग्य वाटेल तें बोलण्याचा त्यांचा बाणा होता त्यामुळें त्यांच्या विचारांत महत्व विशेष आहे. त्यांची सत्यप्रीति व निर्भयता हीं त्या विचारांच्या अढळ जिवंतपणाचीं व आकर्षक-पणाचीं मुख्य कारणें आहेत हें उघड आहे.

# भाग दहावा.

## अखेरचे दिवस आणि मृत्यु

अपेक्षन्ते न च स्नेह न पात्रं न दशांतरम् ।
सदा लोकहिते युक्ता रत्नदीपा इवोत्तमाः ॥

आठव्या भागांत कथानुषंगानें १८९२ सालीं सुरू झालेल्या कित्येक विवादांचा इतिहास त्यांचा शेवट होईपर्यंत वर्णन केला. अर्थात् १८९३ सालची कांहीं हकीकत त्या भागांत येऊन गेली. १८९० सालीं म्हणजे टिळक राजीनामा देऊन कॉलेज सोडून निघून गेले त्या सालीं पहिल्या बी. ए. चा वर्ग उघडण्याची फर्ग्युसन कॉलेजला युनिव्हर्सिटीकडून परवानगी मिळाली व पुढील म्हणजे १८९१ सालीं दुसऱ्या बी. ए. चा वर्ग काढण्याची परवानगी मिळाली. १८९२ च्या परीक्षा होण्यापूर्वी वामनराव आपटे अकालीं मृत्युमुखीं पडले आणि आपण तयार केलेले विद्यार्थी कॉलेजांतून बी. ए. ची परीक्षा पास झालेले पाहण्याचें भाग्य त्यांना लाधलें नाहीं. टिळक कॉलेजांतुन गेल्यावर सोसायटीच्या अंतर्गत कारभारांत कसल्याही तऱ्हेचा तंटा म्हणून राहिला नाहीं. वामयराव आपट्यांचा मृत्यु हें कॉलेजवर मोठेंच गंडांतर आलें. आगरकरांची प्रकृति यावेळीं मुळींच चांगली नव्हती पण प्रिन्सिपॉलची जागा कर्तव्य म्हणून त्यांनीं पतकरली. गोपाळराव गोखले सुधारकांत इंग्रजी लिहीत, सार्वजनिक सभेंत चिटणीसाचें काम पहात व रानड्यांच्या व आगरकरांच्या सहवासानें त्यांचें लक्ष आतां गणितापेक्षां अर्थशास्त्र, इतिहास या विषयाकडे वळलें व कॉलेजांत त्यांनीं ते विषय शिकविण्याची सुरवातही केली. टिळक कॉलेज सोडून गेले त्याच वेळीं नामजोशीही रजा घेऊन गेले. ते गेले ते पुनः परत आले नाहींत व सोसायटीच्या कागदोपत्रांत त्यांच्या रजेचें रूपांतर राजीनामा किंवा कायम रजा असेंही झालें नाहीं. टिळकांच्या प्रेमामुळें

त्यांना परत येणें बरें वाटलें नसावें किंवा टिळक नसतील तर बाकीच्या मंडळींत आपला निभाव लागणार नाहीं असें त्यांना वाटलें असावें. कांहीं झालें तरी ते गेल्यामुळें सुरवातीच्या मंडळीपैकीं कॉलेजांत आतां आगरकर आणि केळकर राहिले. केळकर हे उत्कृष्ट शिक्षक होते व उरलेला वेळ नाटकें लिहिण्यांत, तीं बसविलेलीं पहाण्यांत असा ते घालवूं लागले. सोसायटीच्या कारभारांत ते फारसें लक्ष घालीत होते असें दिसत नाहीं. त्यामुळें आपट्यांच्या मृत्युनंतर सोसायटीच्या कामाचा मुख्य भार आगरकरांवर पडूं लागला. राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषद् या दोहोंना आगरकरांचा पाठिंबा असे. राष्ट्रीय सभेच्या सुरवातीपासूनच्या पुढाऱ्यांचे राजकीय विचार आगरकरांना पूर्ण पसंत होते व सुधारकांत राष्ट्रीय सभेसंबंधीं लोकांत उत्साह वाढावा अशा धोरणाचे लेख ते वरचेवर लिहीत. १८९२ सालच्या परीक्षांत फर्ग्युसन कॉलेजला चांगलें यश मिळालें. या सालीं भरलेल्या सहाव्या सामाजिक परिषदेसंबंधीं आगरकरांनीं लिहिलेलें स्फुट वाचलें म्हणजे तिच्यासंबंधीं त्यांचे विचार कोणत्या प्रकारचे होते हें लक्षांत येण्यास हरकत नाहीं. आगरकर सुधारकांत लिहितातः—"अलाहाबाद येथें भरलेली राष्ट्रीय सभा जशी आमच्या अँग्लो इंडियन पत्रकर्त्यांस नीरस वाटली, त्याप्रमाणेंच सामाजिक परिषदही आमच्या कित्येक धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रकारांस वाटावी यांत नवल नाहीं. तसेंच रा. ब. रानडे यांस सभेच्या अखेरपर्यंत तेथें राहतां आलें नाहीं याचा फायदा घेऊन कित्येकांनीं सभेच्या कामास शैथिल्य आलें होतें, म्हणून खोटेंच सांगत फिरणें हें ह्यूमसाहेबांच्या मागें राष्ट्रसभा कसची चालते म्हणून भकणाऱ्यांहून अधिक किंमतीचें आहे, असें नाहीं. राष्ट्रसभा व ह्यूमसाहेब यांच्यासंबंधानें अध्यक्ष मि. बानर्जी यांनीं जे उद्गार काढले, तेच सामाजिक परिषद् व रा. ब. रानडे यांस लागू होतील. राष्ट्रसभा ही जशी इंग्रजी अंमलाचें फळ आहे, त्याप्रमाणें सामाजिक परिषदही त्याच अंमलाचें फळ आहे; व जोंपर्यंत इंग्रजी राज्य आहे, तोंपर्यंत कोणत्या तरी रूपानें या दोन्ही संस्था अनुक्रमें सरकारास व लोकसमूहास आपापलीं कर्तव्यें करण्यास लावल्यावांचून रहाणार नाहींत. असो. परिषदेंत जे अकरा ठराव पास झाले म्हणून सांगितलें, त्यांत राष्ट्रसभेच्या ठरावाप्रमाणेंच नवीन असें कांहीं नाहीं. परंतु राष्ट्रसभेचे ठराव सरकारकडून अंमलांत येईपयत त्यांची पुनरुक्ति करणें जसें अवश्य आहे, त्याप्रमाणेंच परिषदेचे ठराव

लोकांकडून अंमलांत येईपर्यंत त्यांचीही पुनरुक्ति अपरिहार्य आहे. ( १ ) लग्नांतील खर्चाची कांहीं इयत्ता ठरवून, ती अमलांत आणण्याचे त्या त्या समाजानें प्रयत्न करावे; ( २ ) नुसता समुद्रप्रवास केल्यानें किंवा अन्य देशीं बराच काळ राहिल्यानें जात मोडते ही खोटी समजूत लोकांनीं बहिष्कृत करावी; ( ३ ) स्त्रीशिक्षणप्रसारार्थ लोकांनीं एकजुटीनें सर्व देशभर एकसारखे परिश्रम केले पाहिजेत; ( ४ ) स्त्रीपुरुष विवाहमर्यादा अनुक्रमें १४ व २१ असावी; निदान १२ व १८ यांच्या तरी ती खालीं असूं नये, व लग्नसोहळा कदाचित् आधीं जाहल्यास सप्तपदीचा विधी तरी वधूस १४ वें वर्ष लागण्यापूर्वीं होऊं नये; ( ५ ) निदान एकाच जातीच्या पोटविभागांत तरी रोटीव्यवहार चालू व्हावा व रोटीव्यवहार होणाऱ्या जातींत तरी बेटीव्यवहारास हरकत नसावी; ( ६ ) पुष्कळ बायका करण्याची चाल मोडून टाकावी; ( ७ ) विधवेच्या १८ व्या वर्षांपूर्वीं तिचें केशवपन मुळींच होऊं नये व पुढेंही पंचांसमक्ष तिनें आपली संमति दर्शविल्याशिवाय जुलुमानें तिला न्हाव्यापुढें बसवूं नये व याविरुद्ध कोणी आचरण केल्यास सरकारची वाट न पाहतां जातीनेंच गुन्हेगारांचा समाचार घ्यावा; ( ८ ) सामाजिक संस्थांस वाटल्यास त्यांची नोंद करतां येईल अशा रीतीनें १८६० च्या २१ व्या कायद्यांत फेरफार करण्याबद्दल सरकारास विनंति करावी; ( ९ ) लग्न म्हणजे पैसे मिळविण्याचा एक धंदाच आहे, असा जो हल्लीं प्रकार दृष्टीस पडतो, तो बंद होणें अगत्याचें आहे; ( १० ) सामाजिक सुधारणेप्रीत्यर्थ प्रत्येक जिल्ह्यांत, निदान प्रत्येक इलाख्यांत, पोट परिषद् स्थापून तिच्या द्वारें लोकमत उत्पन्न करण्याकरितां निदान एकेका इसमाची तरी योजना व्हावी; ( ११ ) पुनर्विवाहास उत्तेजन मिळावें, व लग्नाच्या हक्काची अंमलबजावणी करण्याच्या कामीं कैदेची असलेली शिक्षा रद्द व्हावी; हे सर्व ठराव—नुसते सभेंतच कां होईना—सर्वानुमतें पास व्हावे हें कांहीं सध्याच्या काळीं थोडें नाहीं. हेच ठराव अमलांत आणण्यास लोक तयार आहेत असें दिसून आलें तर कायद्याचें नांवही न उच्चारण्यास सुधारक अगदीं एका पायावर तयार आहेत; परंतु कायद्याच्या दटावणीशिवाय आपण होऊन आपली सुधारणा करण्यास लोक तयार होतील असा आम्हांस तर अजून भरंवसा येत नाहीं. असो. केशवपनाच्या बाबतींत तरी लोकांनीं आपल्या सुबुद्धीचें साह्य घेऊन मनुष्यास साजेल असें आचरण ठेवण्याचा लवकर प्रयत्न केला नाहीं तर हरी मुकरजीसारखा एखादा अघोर खटला कोर्टापुढें येऊन ‘ सामाजिक

गोष्टींत हात घालण्याचा सरकारास अधिकार नाहीं' ही दर्पोक्ति जागच्याजागीं रहाणार, हें मात्र आमच्या स्वावलंबी म्हणविणाऱ्या सुधारकांनीं पक्कें लक्षांत ठेवावें."*

सामाजिक परिषदेनें मान्य केलेले बरेचसे ठराव आगरकरांनीं प्रतिपादिलेल्या सुधारणांच्या मानानें मागसलेले होते; पण हे मागसलेले ठरावसुद्धां पुराण-मताभिमान्यांना पसंत नव्हते. अर्थात् सामाजिक परिषदेचें कार्य जरी पुरेसें पुरोगामी नव्हतें तरी आगरकरांच्या पुरोगामी धोरणाला तें एकंदरींत साहाय्यभूत होतें आणि म्हणून त्यांनीं सामाजिक परिषदेचा पुरस्कार केला हें योग्य झालें. सामाजिक परिषद् ही साधारणपणें सुधारकी मतें असलेल्या लोकांच्या बहु-मताची निदर्शक होती व तिचे धुरीण रा. ब. रानडे यांच्यासारखे थंडे सुधारक होते. अर्थात् तिच्या विचारांची इयत्ता आगरकरांच्या विचारांच्या इयत्ते-इतकी असणें शक्य नव्हतें. पण त्या वेळचें लोकमत किंबहुना सुधारकी मत पाहतांही आगरकरांचे विचार पुष्कळ पुढें गेले होते आणि म्हणून सामाजिक परिषद् जरी त्यांच्या विचारांच्या मानानें मवाळ होती तरी सामान्य जनतेच्या दृष्टीनें ती पक्की जहाल होती हें सांगावयास नकोच. या वेळचें लोकमत किती मागसलेलें होतें याचे दाखले आगरकरांना ज्या निरनिराळ्या प्रसंगांशीं तोंड द्यावें लागलें त्यावरून मिळालेले आहेत. त्याचें आणखी एक प्रत्यंतर याच सुमारास आलें. पुण्याच्या नेटिव्ह इन्स्टिट्यूशनचे किंवा भावे स्कूलचे पहिले चालक व मुख्याध्यायक रा. रा. वामन प्रभाकर भावे यांचें पुण्यांतील प्राथमिक शाळांच्या बक्षिससमारंभाच्या प्रसंगीं ता. १४ डिसेंबर १८९२ रोजीं भाषण झालें. या भाषणांत शाळा मास्तरणींवर सदरहू भाव्यांनीं शिव्यांचा धडाका उडविला. सुधारकाचा एक बातमीदार त्या पत्रास लिहितोः—"मास्तरणींनीं पायांत जोडे घालून शाळेंत येणें हें वामनरावजींच्या मतानें महाघोर पापकर्म असून तेणेंकरून त्यांच्या स्कूलबोर्डाची अब्रू सफै जाते. तसेंच आंगांत पोल्का, वास्कूटें किंवा बंड्या घालणें म्हणजे स्त्रियांच्या कुलीनतेस बट्टा आणणें आहे. याचप्रमाणें छत्री घेणें. हाय ! हाय ! पुण्यांतल्या कन्याशाळेवरील अध्यापिकांनीं या तीन गोष्टी करणें म्हणजे वामनरावजींच्या मतानें स्त्रीशिक्षणाला कमीपणा आणणें आहे." या भाषणाला दुजोरा देणारें भाषण त्याच प्रसंगीं रा. नारायण बापूजी

---

* सुधारक, ९ जानेवारी १८९३.

कानिटकर यांनीं केलें. सुधारकांत यासंबंधीं संपादकीय मजकूर प्रथम कांहीं प्रसिद्ध झाला नाहीं. पण आपल्या भाषणाचा सारांश प्रसिद्ध झाला हें पाहून रा. भावे हे चपापले व कित्येक मास्तरमास्तरणींच्या मुखानें त्यांनीं सुधारकाला शिव्या देऊन घेतल्या असें दिसतें. इतर जुन्या मतांच्या पत्रांनींही भाव्यांच्या सुंदर उपदेशाची तारीफ करून सुधारकाला पुष्कळ शिव्या दिल्या. अर्थात् या प्रकरणाचा परामर्श सुधारकांच्या संपादकांना घ्यावा लागला. ते म्हणतातः—"रा. रा. भावे यांचा म्युनिसिपल शाळामास्तरणीशीं जो संबंध आहे तो मनांत आणतां त्यांनीं मास्तरणींस असा उपदेश करणें आम्हांस अयोग्य वाटतें. स्कूलबोर्डांचे मेंबर म्हणजे शाळामास्तरणींचे वरिष्ठ अधिकारी होत. तेव्हां त्यांच्या इच्छेला आज्ञेचें स्वरूप येत असतें हें आम्ही त्यांस सांगितलें पाहिजे असें नाहीं; याकरितां अशा स्थितींत तुम्ही जोडे घालूं नयेत, छत्र्या घेऊं नयेत व बंड्या घालूं नयेत असा मास्तरणींस उपदेश करणें म्हणजे त्यांचें स्वातंत्र्य हिरावणें होय व मास्तरणी म्युनिसिपालिटीच्या नोकर असल्या तथापि या गोष्टींतही त्यांनीं आपल्या धन्याची ताबेदारी पत्करिली पाहिजे असें आम्हांस वाटत नाहीं; व कोणी असा जुलूम चालविण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही तो हर उपायांनीं बंद करण्यास मार्गेपुढें पहाणार नाहीं..........रा. भावे यांचा मास्तरणीशीं वरिष्ठत्वाचा संबंध असल्यामुळें असले उपदेश करण्याच्या त्यांनीं भानगडींत पडणें योग्य नाहीं असें आम्ही वर म्हटलें आहे; परंतु तसा त्यांचा संबंध नसता तथापि त्यांनीं केलेला उपदेश आम्हांस संमत नाहीं हें त्यांस सांगण्याची आम्ही परवानगी घेतों. स्त्रियांची उन्नति व्हावी असें ज्यांस मनापासून वाटत असेल त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, या बाबतींत उतावळी सुधारणा होण्याची मुळींही भीति बाळगण्यास नको. आज पुरुषवर्गामध्यें आपल्या चालीरीतींतील व्यंगें ज्यांस स्पष्टपणें दिसून आलीं आहेत असे कर्ते सवर्ते स्वतंत्र पुरुषही "यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नोकरणीयं नाचरणीयम्" या मंत्राचा जप करतांना जर आपल्या दृष्टीस पडत आहेत तर स्त्रियांवर लोकमताचा कितीतरी दाब असला पाहिजे हें समजावून सांगितलं पाहिजे असें नाहीं. तेव्हां समाजास सोडून यत्किंचित्‌ही पुढं पाऊल टाकण्यास ज्यांना मनापासून कंटाळा अशा स्त्रीवर्गांत शरीररक्षणार्थ बंडी, जोडे, छत्र्या वगैरे वापरणाऱ्या मास्तरणींचीही संख्या मर्यादित असली पाहिजे हें उघड आहे. मग अशा प्रकारें मोठ्या मुष्किलीनें कोठें दोन

चार स्त्रिया मनाचा हिय्या करून आपले पाय पोळूं देत नसल्या, तर त्यापासून एकंदर समाजाचें हितच होण्याचा संभव आहे; व ज्यांच्या मनांत स्त्रियांची उन्नति व्हावी अशी खरोखर बुद्धि वास करीत असेल त्यांनीं अशा स्त्रियांस मोडा घालण्यापेक्षां उलटें त्यांस अधिक उत्तेजन द्यावें हेंच आम्हांस प्रशस्त वाटतें. ......"*

स्त्रियांच्या बाबतींत अशी केवळ अनुदारता लोकांत होती एवढेंच नाहीं तर यावेळीं स्त्रीशिक्षणाला लोकमतच अत्यंत प्रतिकूल होतें. आज स्त्रीशिक्षणाचा झालेला उत्कर्ष पाहून त्या बाबतींत अडचणी कधीं नव्हत्या असें सध्याच्या मंडळीस वाटण्याचा संभव आहे. परंतु स्त्रीशिक्षणाला आजचे दिवस दिसण्यासाठीं पहिल्या सुधारकांना अतिशय प्रयत्न करावे लागले व अनेक प्रकारचीं संकटें सोसावीं लागलीं. १८९२ सालीं स्त्रीशिक्षणाची स्थिति काय होती याचें वर्णन पुढील उताऱ्यांत दिलें आहे. "आमचे लोक स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध आहेत असं कोणी प्रतिपादन केल्यास तें आमच्या अगदीं अशिक्षित पत्रकारांसही सहन होत नाहीं हें आम्ही जाणून आहों, परंतु वस्तुस्थितीवरून पहातां आम्हांस स्त्रीशिक्षणाची आवश्यकता खरोखर भासूं लागली नाहीं, असें म्हणावें लागतें. वर जी वऱ्हाड शाळाखात्यासंबंधानें थोडीशी माहिती दिली आहे त्यामध्यें शिक्षणाकडे एकंदर ४॥ लक्ष रुपये खर्च झाले असें लिहिलें आहे. यापैकीं मुलामुलींच्या शाळेस साधारण असणारा एक लक्षावरील खर्च वजा करितां बाकी राहिलेल्या साडेतीन लक्षांपैकीं ३३७००० रु० मुलांच्या शिक्षणाकडे खर्च झाले व अवघे १३००० रु० मुलींच्या शिक्षणाकडे खर्च झाले असें रिपोर्टावरून दिसतें; म्हणजे मुलांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ मुलींच्या २४ पट पैसा खर्च केला जातो. आतां मुलांप्रमाणेंच मुलींसही शिक्षण देणें अवश्य आहे असें जर आम्हांस वाटतें, तर वर दाखविलेला प्रकार कां दृष्टीस पडावा? याबद्दल शाळाखात्यास जबाबदार धरावें असेंही कोणास म्हणतां येणार नाहीं. शाळेंत येणाऱ्या मुलींस मुलांप्रमाणेंच योग्य शिक्षण मिळतें कीं नाहीं हें पहाणें विद्याखात्याचें काम आहे; परंतु जर अधिक मुलीच शाळेंत येईनात तर त्यास विद्याखात्यानें काय करावें? तेव्हां मुलांमुलींच्या शिक्षणांत होणाऱ्या खर्चांत जी पक्षपातबुद्धि दृष्टीस पडते, तिचें खापर आईबापांच्याच डोकीवर फोडलें पाहिजे. स्त्रीपुरुषांच्या

* सुधारक, १६-१-९३

लोकसंख्येंत जर फारसा भेद नाहीं व मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच मुलींच्याही शिक्षणाकडे लक्ष देणें हें जर आईबापांचें कर्तव्य मानलें जातें, तर मग मुलांची संख्या ४९००० कां व मुलींची संख्या २ हजारच कां ? हे आंकडे वऱ्हाडचे आहेत, परंतु दुसरीकडेही याहून अधिक समाधानकारक स्थिति आहे असें मानण्यास आधार नाहीं. तेव्हां या २ हजारांचे ४९ हजार जोंपर्यंत झाले नाहींत, तोंपर्यंत आम्ही स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध नाहीं या प्रतिपादनास कोणी मान देईल असें आम्हांस वाटत नाहीं. वरिष्ठ शिक्षण एका बाजूस ठेवून नुसत्या कनिष्ठ शिक्षणाचा विचार केला तथापि शाळेंत जाणाऱ्या मुलींची संख्या २ हजारांपासून ४४ हजारांपर्यंत वाढली पाहिजे. हल्लीं विद्येचें महत्व जाणणाऱ्या लोकसंख्येमध्यें मुलांमुलींसंबंधानें ज्यांच्या मनांत पक्षपातबुद्धि वास करते असे शेंकडा ९५ आईबाप आहेत व ज्यांच्यांत ती वसत नाहीं असे शेंकडा पांचच आहेत असें वरील आंकड्यांवरून ठरतें. यावरून आमच्या स्त्रीशिक्षणप्रेमाची मजल कोठवर गेली आहे हें दिसतेंच आहे !" × याप्रमाणें आंकडे प्रसिद्ध करून स्त्रीशिक्षण किती मागसलें आहे याची कल्पना आगरकर लोकांना वरचेवर करून देत.

१८९३ सालीं पुण्यांत लक्षांत ठेवण्यासारखी झालेली गोष्ट म्हणजे मि. डिग्बी या हिंदुस्थानच्या निस्सीम भक्त असलेल्या आंग्ल गृहस्थाचें आगमन ही होय. मि. डिग्बी यांनीं हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधीं निर्भीडपणें लिहून ठेविलें आहे व त्यांच्या लिहिण्याशीं आगरकरांचें मतैक्य होतें. या आगमनप्रसंगीं पुण्याला एक टोलेजंग सभा झाली. या सभेंत मुख्य भाषण गोपाळराव गोखल्यांचें झालें व तें त्यांनीं पुढें मिळविलेल्या कीर्तीला अनुरूप असें झालें. परंतु यावेळीं पुण्यांत व महाराष्ट्रांत जनतेचें लक्ष म्हणा, कटाक्ष म्हणा राजकारणापेक्षां सामाजिक सुधारणेवर अधिक होता. टिळक झाले तरी सामाजिक सुधारणेला विरोध करून जुन्या लोकांत मान्यता पावले. डिग्बीसाहेबासारखा थोर पुरुष आला तरी तो रानडेप्रभृतींच्या बगलेंतून आला अशी सामान्य जनांची समजूत करून दिली जात असे. लोकांना यावेळीं जें मोठें भय वाटत होतें तें सामाजिक सुधारणेच्या प्रसाराचें. यावरूनच सुधारणेचा पक्ष आगरकरांच्या लेखणीच्या प्रभावानें किती बळकट झाला

× सुधारक, १६-१-९३

होता हें कळतें. एकीकडे आगरकर व्यक्तिस्वातंत्र्याचा महिमा गात होते तर दुसरीकडे जुन्या दादागिरीचे अध्वर्यु, प्रो. जिन्सीवाले " लहान मुलगी घरांत आणली म्हणजे तिला आपल्या ताटाखालचें मांजर करून ठेवतां येतें; मग नवरा दारू पिऊन मस्त झाला तरी ती त्याच्यापुढें हात जोडून उभी राहते. तीच मोठेपणीं सुशिक्षित होऊन लग्न करील तर दारूबाज नवऱ्याचे हे चार चाळूं देणार नाहीं. त्याला दोन गोष्टी सांगून वेळेस मार्गावर आणील. म्हणून मुलींचीं लग्नें लहानपणीं करून त्यांना पुरुषांच्या गुलाम करून ठेवाव्या! वर डोकें करून उलट बोलेल असें होऊं देऊं नये!" * असें कंठरवानें सांगत होते. सुधारणेला अशा प्रकारें विरोध करणाऱ्यांचें आगरकरांच्या सयुक्तिक प्रतिपादनापुढें कांहींही चाललें नाहीं यांत नवल नाहीं. उलट जुन्या मंडळीच्या या प्रलापामुळें बहुजनसमाजाला नाखुषीनें कां होईना आगरकरांचीं मतें व विचार रास्त आहेत असें कबूल करावें लागलें.

२. १८९३ च्या फेब्रुवारी महिन्यांत आगरकरांनीं सुधारकद्वारां केलेली महत्वाची कामगिरी म्हणजे सार्वजनिक हौदावर शूद्र म्हणविणाऱ्यांना पाणी भरूं देण्याबद्दल त्यांनीं केलेली खटपट होय. या प्रश्नामुळें अद्यापही ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यांत तंटे होतात व १९२८ सालीं झालेलें महाड अस्पृश्य-प्रकरण हें त्याचें निदर्शक आहे. या प्रश्नाचा खल १८९३ सालीं आगरकरांनीं किती उत्कृष्ट प्रकारें केला होता हें पुढें दिलेल्या उताऱ्यावरून दिसून येईल. त्याचप्रमाणें आगरकरांचे विचार आचरणांत आणण्याचें महाराष्ट्रानें त्यावेळीं ठरविलें असतें तर पुढें आठ दहा वर्षांनीं उपस्थित झालेला ब्राह्मण—ब्राह्मणेतरांचा लढा कदाचित् अस्तित्वांतही आला नसता. जातिभेदामुळें हिंदुसमाजाचें केवढें भयंकर नुकसान झालें आहे याची कल्पना आतां हिंदुमुसलमानांचे तंटे होऊं लागल्यावर व ब्राह्मणेतरांचें राजकारणांत सरकारला साहाय्य होऊं लागल्यावर ज्यांना येऊं लागली त्यांना किंवा त्यांच्या परात्पर गुरूंना आगरकरांनीं जातिभेदावर कोरडा उचलला कीं मरणप्राय दुःख होत असे. असो. "म्युनिसिपल हौद व ब्राह्मण्यावर गदा" या स्फुटांत आगरकर लिहितातः—
"येथील म्युनिसिपालिटीच्या हौदांवर "ब्राह्मणाकरितां" "शूद्राकरितां" म्हणून पाट्या मारल्या असून त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं, शूद्र मानलेली

---

* सुधारक, २३–१–९३

मंडळी ब्राह्मणांचें भूदेवत्व कबूल करीत नाहींत, व नाना कुशब्दांनीं त्यांस ताडन करतात; इतकेंच नाहीं, तर ब्राह्मणांच्या आंगावर बेलाशक शिंतोडेही उडवितात ! अब्रह्मण्यम्। अब्रह्मण्यम् ! असे ध्वनि येथील एका स्थानिक पत्रांतून येऊं लागले आहेत. रस्त्यांवर पाणी शिंपडण्याकरितां ठेवलेल्या गाड्यांवर ब्राह्मण हांकणारे असावेत व त्या रस्त्यावरून ब्राह्मणेतरांस जाण्याची बंदी करावी, अशी अद्याप या धर्माभिमान्यांकडून सूचना कशी झाली नाहीं कोण जाणें ! आमचें म्युनिसिपालिटीस असें सुचविणें आहे कीं आतां हा जाति-जातींतील तंटा मिटविण्याचा तिनें प्रयत्न केल्यास त्यांत सिद्धि मिळण्याची आशा दिसत नाहीं, तेव्हां या पाढ्याच अजीबात काढून टाकाव्यात म्हणजे सारा तंटाच मिटला. धर्माभिमान्यांसही आमचें एक सांगणें आहे. हौदांत किंवा तोटींत असणारें पाणी शूद्रस्पृष्ट आहे किंवा नाहीं याचा जसा ते कधीं विचार करीत नाहींत व कॉक फिरवून तांब्यांत पाणी आल्याबरोबर तें जसें सोवळें बनतें त्याप्रमाणेंच सार्वजनिक हौदावरची शिवाशिव मनांत न आणतां घरांत शिरल्याबरोबर आपण व आपलें पाणी सोवळें मानावें म्हणजे झालें" *

वरील स्फुटांतील मार्मिक विनोद ध्यानांत घेऊन तदनुसार वर्तन करण्याची उदारता अर्थात् त्या वेळच्या पुण्यपत्तनस्थ भूदेवांत नव्हती. आगरकरांच्या वरील दहा ओळी वाचून पुण्यांतील धर्माभिमान्यांचें व त्यांचे म्होरक्ये बनलेल्यांचें पित्त खवळलें व त्यांनीं आपल्या सांप्रदायाला अनुसरून आगरकरांच्यावर शिव्यांचा भडिमार केला. अर्थात् आगरकरांना या विषयाचें विवेचन अधिक विस्तारानें करावें लागलें. "शहाणे असाल तर आमचें ऐका" हें फारच अन्वर्थक अभिधान असलेल्या अग्रलेखांत आगरकर लिहितातः—"स्त्रियांस राजकारणांत शिरूं द्यावें किंवा नाहीं ? सरदार कुळांत जन्म पावल्यामुळें, किंवा सामान्य आईबापांच्या पोटीं आल्यानें मनुष्यांच्या योग्यतेंत अंतर पडतें कीं काय ? सर्व जगांतील लोकांचें परस्पर दळणवळण वाढण्यासाठीं आगगाड्या, गलबतें वगैरेहूनही सोयीचीं व शीघ्रतर अशीं प्रवाससाधनें अस्तित्वांत कशीं आणतां येतील ? वगैरे प्रश्नांच्या विचारांत सुधारलेलें जग मग्न होऊन गेलें असतां, बायकांनीं जोडे, बंड्या घालाव्यात कीं नाहीं; शूद्रांनीं ब्राह्मणांस शिवावें किंवा नाहीं; हिंदूंनीं समुद्रांतून प्रवास केल्यास ते पतित होतील कीं काय ? वगैरे

* सुधारक, ३०-१-९२

प्रश्नांची चर्चा आमच्या हिंदुस्थान देशांतील वर्तमानपत्रांतून होत असावी, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय हें कोणीही कबूल करील. परंतु अशा गोष्टींबद्दल कितीही खेद वाटला तथापि जोंपर्यंत हे प्रश्न आमच्या लोकसमुदायास महत्वाचे वाटतात तोंपर्यंत त्यांच्याविषयीं भवति न भवति करण्यावांचून गत्यंतर नाहीं. गेल्या अंकीं " म्युनिसिपल हौद व ब्राह्मण्यावर गदा " या सदराखालीं आम्ही जो लहानसा लेख लिहिला होता, त्याकडे फिरून वळण्याचा आम्हांस प्रसंग येईल असें आम्हांस वाटलें नव्हतें. त्या लेखांत आम्ही दाखविलेली दिशाच अनेक दृष्टींनीं आज हितावह होण्याचा संभव आहे असें प्रत्येक विचारी मनुष्यास दिसल्यावांचून रहाणार नाहीं. पण त्या लेखांत आमच्या एका बंधूंस अथपासून इतिपर्यंत सारा अविचार भरलेला दृष्टीस पडतो व तो लिहितांना आमचें डोकें ठिकाणावर नव्हतें अशी जर आमच्या बंधूंची खात्री झाली नसती तर 'जातिभेदासंबंधानें लोकांच्या मनास त्रास देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे' अशा आरोपावर आमच्या 'गळयांत एखादें लचांड अडकविण्याचाही' त्याचा विचार होता. असो. ही वरील पोरकट धमकावणी व याच्याच तोडीचें दुसरें तर्कट वजा केलें तर आमच्या बंधूनें आमचा अविचार आमच्या पदरीं घातल्याचें निदान आम्हांस तरी उमगलें नाहीं. म्युनिसिपालिटीच्या खजिन्यांत किंवा तोटींत पाणी असेंपर्यंत त्यास कोणाकोणाचा स्पर्श होतो इकडे अगदीं डोळेझांक करून, तेंच पाणी खजिन्यांतून हौदांत आलें, किंवा तोटींतून तांब्यांत आलें, कीं लागलेंच सोंवळें कसें बनतें, व मग मात्र त्यास शूद्राचा यत्किंचित् स्पर्श कसा सहन होत नाहीं, हें तर अजूनही गूढ कोडेंच आहे. बरें, नगरासारख्या इतर ठिकाणीं एकाच हौदावर ब्राह्मण व शूद्रच नव्हे तर मुसलमानही पाणी भरीत असून त्यांचें ब्राह्मण्य जर अद्याप सोळा आणे कायम आहे, तर मग शूद्राच्या शिंतोड्यानें पुण्याचे ब्राह्मण तेवढे हिणकस कां ठरावे ? सोडावॉटर पिणारे, ओंवळयानें जेवणारे, ब्राह्मणेतरांनीं केलेले पोहे, कुरमुरे व दुसरेही अनेक पदार्थ भक्षण करणारे, प्रत्यक्ष खिस्त्याच्या घरचा चहा पिणारे व या सर्वांशीं संसर्ग ठेवणारे सहस्रावधि लोक नुसत्या ब्राह्मण्य या नांवाखालीं जर ब्राह्मणाच्या हौदावर पाणी भरीत आहेत, व त्यांचा संसर्ग जर आमच्या धर्माभिमान्यांस खपतो तर शूद्रांनींच तेवढें काय पाप केलें आहे ? शिवाय हे वरील प्रकार ब्राह्मण लोक लपून छपून करीत नसून उघड चव्हाट्यावर करतांना जर सर्वांच्या दृष्टीस पडतात, तर त्यांचा संसर्ग तुम्हांस कसा खपतो ? व

आमचाच मात्र कां खपत नाहीं? असा शूद्रांनीं प्रश्न केल्यास त्यास उत्तर काय? ‘ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्’ ‘पद्भ्यां शूद्रोऽजायत,’ या श्रुतीच्या जोरावर ‘जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिहीं लोकीं श्रेष्ठ,’ हा न्याय आजमितीस शूद्रांपुढें केल्यास ते त्यास भिक्षा घालतील असें आम्हांस वाटत नाहीं. ब्राह्मण ईश्वराच्या मुखापासून झाला म्हणून तो श्रेष्ठ व आपण ईश्वराच्या पायांपासून उत्पन्न झालों तेव्हां आपण नीच, अशी जोंपर्यंत शूद्रादि वर्गांची समजूत होती तोंपर्यंत ते अज्ञानानें ब्राह्मणाची पूजा करीत असत; व ब्राह्मणास त्यांच्याविरुद्ध म्युनिसिपालिटीजवळ दाद मागण्याचाही प्रसंग आला नाहीं. हल्लीं ज्या अर्थीं तसा प्रसंग आलेला आहे, त्या अर्थीं ते पूर्वींप्रमाणें ब्राह्मणाची महती मानीत नाहींत हें उघड आहे. तेव्हां ब्राह्मण लोक आपलें जन्मसिद्ध वर्चस्व त्यांच्यावर स्थापूं पहातील तर हातपाय हलविल्याशिवाय ते खचित राहणार नाहींत. मागें नगर मुक्कामीं असाच एक तंटा झाला होता. ख्रिस्ती लोकांनीं ब्राह्मणाच्या हौदावर पाणी भरूं नये असें एका पक्षाचें म्हणणें होतें. दुसऱ्या पक्षाची तक्रार अशी होती कीं, मुसलमानांनीं ब्राह्मणाच्या हौदावर पाणी भरलेलें जर चालतें, तर ख्रिस्त्यासही तें भरण्यास हरकत असूं नये. याबद्दल बऱ्याच कोर्टांत प्रकरण चालून शेवटीं हायकोर्टानें ख्रिस्त्यासारखा निकाल दिला. तसाच कांहीं प्रयत्न हल्लीं शूद्रलोकही करणार नाहींत, व न्यायकोर्टेंही त्यांच्यासारखा निकाल करणार नाहींत, कशावरून? बरें, म्युनिसिपालिटीनें ब्राह्मणांचें सोंवळें राखण्याचा प्रयत्न करणें जर अवश्य आहे, तर शेणवी, प्रभू, गुजराथी वगैरे जातींचेंही सोंवळें कां राखूं नये? याशिवाय ज्या दुसऱ्या असंख्य जाति आज आम्हांत झालेल्या आहेत, त्या सर्वांचाही ब्राह्मणांइतकाच म्युनिसिपालिटीवर हक्क आहे; व या सर्वांची त्यांच्या त्यांच्या वेड्या समजुतीप्रमाणें व्यवस्था करावयाची म्हटली म्हणजे हौदावरील पाण्यांच्या पायींच म्युनिसिपालिटीस किती खर्च पडेल हें सहज सांगतां येण्यासारखें नाहीं. तेव्हां भोंवतालच्या स्थितीकडे नजर देतां म्युनिसिपालिटीनें या धर्मरक्षणाच्या कामापासून रहावेल तितकें दूर रहाणें हें सर्वस्वी श्रेयस्कर होय असें अजूनही आमचें मत आहे. हिंदुस्थानची सुधारणा व्हावी म्हणून अनेक दिशांनीं अनेक लोकांनीं जे प्रयत्न चालविले आहेत, त्यांस पुण्यासारख्या नांवाजलेल्या शहरानें मदत करावी कीं त्यांच्यावर थंड पाणी ओतावें? हिंदुस्थानची राजकीय स्थिति सुधारावयाची असेल तर कांग्रेसनें विलायतची सफर केली पाहिजे ही

गोष्ट आज प्रत्येक राष्ट्रहितचिंतकास स्पष्ट दिसत आहे व राष्ट्रीयसभेमध्यें सर्वानुमतें तसे ठराव पास होत आहेत. हिंदुस्थानचा व्यापारधंदा वाढवावयाचा असेल तर इतर देशांशीं आपणांस दळवळण ठेवलें पाहिजे म्हणून औद्योगिक परिषदे-सारख्या संस्था ठराव करीत आहेत व परदेशीं जाऊन राहिल्यानें जात वगैरे बाटत नाहीं म्हणून पुराणपंथानुयायी ब्राह्मण धैर्यानें प्रतिपादन करीत आहेत. शिकागोसारख्या प्रदर्शनापासून किती फायदे होणार आहेत हें मनांत आणून अनेक देशहितचिंतक ही संधि न दवडण्याविषयीं लोकांस हुशार करीत आहेत व व्यापारी लोक त्यांचा प्रवास सुखकर होण्याचीं साधनें शोधून काढीत आहेत. अशा प्रसंगीं ब्राह्मण व शूद्र यांच्या स्पर्शास्पर्शाबद्दल म्युनिसि-पालिटीपुढें गंभीरपणें प्रश्न आणण्याच्या आम्ही खटपटींत पडावें हें कोणाही राष्ट्रहितचिंतकास सयुक्तिक वाटणार नाहीं. शूद्राच्या स्पर्शात पाप दडून राहिलें आहे ही अत्यंत कोती समजूत जर आम्ही अद्याप झुगा-रून देणार नाहीं, तर आम्हीं इंग्लंडांत कांग्रेस भरविणार कशी? व्यापारा-करितां इतर देशीं पेढ्या स्थापणार कशा? व शिकागोस जाऊन येणार कसे? तेथील हौदांवरही अशा पाट्या मारविण्याची व्यवस्था होणार आहे असें निदान आमच्या तरी ऐकिवांत नाहीं! व अशी सूचना करण्याइतका वेडा पीर कोणी असेल असेंही आम्हांस वाटत नाहीं. धर्माविरुद्ध आचरण न करितां परदेशीं जाऊन येण्यास किंवा तेथें रहाण्यास हरकत नाहीं असें म्हण-णाऱ्यांच्या धर्मकल्पना शूद्रस्पृष्ट पाण्याच्या खचित पलीकडे गेल्या असल्या पाहिजेत. तात्पर्य, राष्ट्रीय सभा व औद्योगिक परिषद् यांच्यामधील आमचे ठराव जर आम्हांस दप्तराच्या बाहेर काढावयाचे असतील, तर आम्ही या शिवाशिवीच्या व सोंवळ्या ओंवळ्याच्या कल्पना हळू हळू संपुष्टांत आण-ण्यास शिकलें पाहिजे. व हें मनांत आणूनच आमच्या धर्माभिमान्यांनीं यापुढें उंबरठ्याच्या बाहेर आपल्या सोंवळ्या ओंवळ्याचें प्रदर्शन करीत बसण्याच्या भानगडींत पडूं नये असा आम्ही त्यांस सल्ला दिला होता. अजूनही आम्ही म्हणतों कीं, शहाणे असाल तर आमचें ऐका. याउपर तुमचें तें सोंवळें तुम्हांस खुंटीवरच अडकावून ठेवलें पाहिजे. दोन दिवस सासूचे, व दोन दिवस सुनेचे. सोंवळें ओंवळें व तद्विषयक मूढ कल्पना यांचें साम्राज्य होतें तेव्हां त्यांनीं वाटेल तसा जुलूम केला; ब्राह्मणांस श्रेष्ठ पद दिलें व शूद्रास नीच ठरविलें; खऱ्या ज्ञानाचा लोप केला व घोकंपट्टीस उत्तेजन दिलें; धर्मविचारांची व

मनाची फारकत करून टाकली; व त्यांचें सारें रहस्य शरीराच्या बाह्य कवायतींत आणून सोडलें. आतां यापुढें ही अविचाराची बेबंद पादशाही चालावयाची नाहीं. आतां अमक्याच्या पोटीं अमक्याचा जन्म झाला म्हणून तो श्रेष्ठ ही कल्पना आर्ष मानली जाणार व बुद्धिबलानें जो पुढें सरेल तोच श्रेष्ठ ठरेल. या जबरदस्त विचारओघाची गति अविचारबांधानें थांबू शकणारी नाहीं. नको नको म्हणतां हिचा तुमच्यावर परिणाम झाला आहे, होत आहे, व पुढेंही झाल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां आतां उगाच आढेवेढे घेण्यांत काय अर्थ आहे? म्हटलें आहे, 'आलिया भोगाशी असावें सादर मेंब्रावरी भार घालूं नये!'*"

उपरोक्त लेख हा आगरकरांच्या अत्युत्तम लेखांतील एक आहे हें सांगावयास नकोच. जातिभेदाच्या आचरटपणामुळें हिंदु समाजांत फाटाफूट झाली आहे ती नाहींशी करणें याचेंच नांव हिंदु संघटन. हें नांव जरी आगरकरांच्या वेळीं अस्तित्वांत आलें नव्हतें तरी त्याची अत्युच्च कल्पना त्यांच्या लेखांत आढळते. उपरोक्त लेखांतील प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळें त्याची पुनश्च चर्चा आगरकरांनीं केली. तो लेखही महत्वाचा असल्यामुळें येथें साद्यंत उतरून घेतला आहे.

## आणखी एक मुद्दा

सार्वजनिक हौद व त्यांवर पाणी भरणाऱ्या शेंकडों जाति यांचें अस्तित्व काय तें पुण्यासच आहे असा प्रकार नाहीं. शिवाशिवीचा भागही केवळ पुण्यासच असाधारण आहे असाही भाग नाहीं; व यासंबंधानें येथेंच काय ती कोनाकोंपऱ्यांतून कुजबुज ऐकूं येते अशीही गोष्ट नाहीं. आतां या गोष्टी बहुतेक सर्वसाधारण होऊन गेल्या आहेत, व येथें निघणाऱ्या अस्पष्ट ध्वनीचा इतरत्रही प्रतिध्वनि होण्यास वातावरणाची अनुकूल अशीच स्थिति आहे, तेव्हां अशा स्थितींत या विषयाकडे फिरून एकदा वळणें केवळ अनावश्यक होईल असें आम्हांस वाटत नाहीं. शिवाय सकृद्दर्शनीं ही बाब कोणास क्षुल्लकशी वाटली तथापि तिचा एका मोठ्या प्रश्नांशीं संबंध पोंचतो हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. सर्व मानव प्राणी जन्मतः सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे

* सुधारक, ६-२-२९

रहाणें न रहाणें हें केवळ त्यांच्या कमी अधिक बुद्धिविकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे, या श्रेष्ठ तत्वाची या जगांत प्रस्थापना करण्याच्या कामीं सर्वकालीन व सर्वदेशीय सुधारकांनीं आजपर्यंत अनेक दिशांनीं प्रयत्न केले आहेत व त्या प्रयत्नांस उत्तरोत्तर सिद्धीही मिळत चालली आहे. आतां ज्यांस आपण सुधारणेच्या शिखरास पोंचलेलीं म्हणून मानतों, त्या राष्ट्रांतही जर अद्याप या उदात्त तत्वाचा पूर्ण अंमल झालेला आपल्या दृष्टीस पडत नाहीं, तर आज शेंकडों वर्षें या अज्ञानमूलक किंवा अभिमानप्रेरित वैषम्यकल्पनांची पुटें घेत बसलेल्या या हिंदुस्थान देशांत तो एकदम होईल ही आशा व्यर्थ होय. कालगतीनें जातिभेदकल्पनावृक्षाचा आज येथें इतका कांहीं विलक्षण विस्तार होऊन गेला आहे, व त्याचीं मुळें इतकीं कांहीं खोल गेलीं आहेत कीं, त्याचें समूळ छेदन करणें एका सुधारकासच काय परंतु सुधारकसहस्राच्या कंपनीसही भारी जोखमीचें वाटलें तर त्यांत नवल नाहीं. तथापि सुधारणेची विजयपताका अव्याहत फडकत रहाण्यास वर निर्दिष्ट केलेल्या श्रेष्ठ नीतिप्रणीत तत्वाचेंच साम्राज्य झालें पाहिजे, अशी ज्यांची बालंबाल खात्री होऊन गेली आहे, त्यांनीं या वृक्षाच्या अफाट विस्तारानें यत्किंचित्ही डगमगून न जातां 'थेंबे थेंबे तळें साचे' या न्यायानें निदान जी जी फांदी त्यांच्या मार्गाआड येत असेल, तिच्यावर तरी आपली कुऱ्हाड चालवून साधेल तेवढी गुंतागुंत कमी करण्यास झटलें पाहिजे. समुद्रांतील यःकश्चित् कीटकांच्या सतत प्रयत्नानें मोठमोठ्या जहाजांचींही शकलें करून टाकणारे प्रचंड खडक जर उत्पन्न होतात, तर सदसद्विचारकुठारापुढें या अज्ञानमूलक जातिभेद कल्पनावृक्षाच्या अखंड जाळ्याचा पाड काय ?

"असो. मागील खेपेस असें दाखविलें कीं, हौदांत किंवा तोटींत पाणी येण्यापूर्वी त्यास होणाऱ्या शिवाशिवीचा जर तुम्ही बंदोबस्त करीत नाहीं; इतर ठिकाणीं नाना जाति एकाच हौदावर पाणी भरीत असून तेथील ब्राह्मणांशीं व्यवहार ठेवण्यास जर तुम्हांस हरकत वाटत नाहीं; सोडावाटर पिणें, ओंवळ्यानें जेवणें वगैरे शूद्रसदृश मानलेले प्रकार करणाऱ्या ब्राह्मणांचा संसर्ग जर तुम्हांस अपरिहार्य झाला आहे, व देशाची राजकीय व औद्योगिक स्थिति मनांत आणतां शूद्रांशींच नव्हे तर परदेशस्थ म्लेंच्छांशींही संसर्ग ठेवण्यास जर तुमची पूर्ण संमति आहे; तर मग शूद्राच्या शिंतोड्याबद्दल उगाच गिल्ला करीत बसणें हें केवळ असमंजसपणाचें होय. आज या शिवाशिवीच्या कल्पना

हळू हळू शिथिल करणें कां आवश्यक आहे यासंबंधानें आणखी एक मुद्दा सुचवावयाचा आहे.

"कित्येकांचें असें म्हणणें पडतें कीं, देशकालवर्तमानाकडे पाहून परदेशस्थ म्लेंच्छांशीं संसर्ग ठेवण्यास आमची मनाई नसली, म्हणून येथेंही आम्ही वाटेल तसा भ्रष्टाकार होऊं द्यावा कीं काय? यावर उत्तर इतकेंच कीं, आधीं आम्ही म्हणतों यांत भ्रष्टाकाराचा मुळींच भाग नाहीं. शिवाय यांत जर भ्रष्टाकार आहे तर याच्याच जोडीच्या इतर गोष्टींतही तो असलाच पाहिजे. तेव्हां जोंपर्यंत एक खपतें तोंपर्यंत दुसरीही खपली पाहिजे. धर्मसमजुतीमध्यें असला हा कोटिक्रम उपयोगी नाहीं, असें म्हणून कोणी आपल्या मनाची समजूत पाडो, परंतु असल्या लंगड्या समजुती आचारप्रदेश-संचारांत मागेंच पडल्या पाहिजेत, व त्या तशा पडतही आहेत असें आपल्या नजरेस येत आहे. असो. धर्मसंबंधीं गोष्टींत हेतुशास्त्राचा आश्रय करावा किंवा नाहीं याचा निर्णय करणें हें आम्हांस प्रस्तुत प्रसंगीं आवश्यक नसल्या-मुळें त्यासंबंधानें तूर्त अधिक लिहिण्याची आमची इच्छा नाहीं. देशकालवर्त-मानानुसार आपल्या आचारांत फरक करण्यास धर्माची आडकाठी नाहीं येवढी कबुलीही आम्हांस पुरेशी आहे; व आम्ही म्हणतों कीं, ज्या कारणाकरितां पर-देशस्थ म्लेंच्छांशीं व्यवहार करण्यास तुमची तयारी आहे त्या कारणाकरितां येथेंही शूद्रादिकांशीं हल्लीं चालू असलेल्या व्यवहारांत तुम्हांस फरक केला पाहिजे.

"कोणत्याही देशाचें कोणत्याही बाबतींत पुढें पाऊल पडण्यास त्या देशांतील लोकांमध्यें परस्पर प्रेमभाव असला पाहिजे व ते एकमतानें व एकदिलानें वागण्यास तयार असले पाहिजेत, याबद्दल कोणाचा मतभेद नाहीं; परंतु हा स्नेहभाव राहण्यास व एकमत उत्पन्न होण्यास जातिभेद आड येतो ही गोष्ट मात्र कबूल करण्याचें कित्येकांच्या जिवावर येतें. जातिभेद आपल्या अवनतीचें एक कारण आहे अशी त्यांची मनांतून खात्री झाली नसते असें नाहीं. परंतु ती झाली आहे असें कबूल केल्यास त्याबरोबरच आपल्या आचरणाची दिशा बदलण्याचें जें जोखीम त्यांच्यावर येऊन पडतें, तें त्यांस पूर्वसंस्कारामुळें अव-जड वाटूं लागतें. यामुळें जातिभेदाची संस्था घातक नाहीं असें सिद्ध कर-ण्याचा ते ओढून ताणून प्रयत्न करूं लागतात. पारशी, मुसलमान, खिस्ती

वगैरे वेगळाल्या धर्मांचे लोक हिंदु लोकांशीं स्नेहभावानें व एकमतानें वागतात तर हिंदुहिंदूंतील जातिभेद सुधारणेस व्यत्यय आणतो असें कसें म्हणतां येईल, असा ते एक प्रश्न करीत असतात. या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत आहे. एक तर पारशी, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे लोक राष्ट्रहिताच्या कामीं हिंदूंशीं एकदिलानें वागतात ही गोष्ट सर्वांशीं खरी नाहीं. ज्या कांहीं थोड्या लोकांच्या संबंधानें वरील विधान करतां येणें शक्य आहे ते, व ज्या हिंदूंशीं ते एकदिलानें वागतात ते हिंदु लोक, असे दोन्हीही उदार शिक्षणानें या क्षुद्र जातिभेदकल्पनांच्या फार पुढें गेलेले असतात. एक अमुक वंशांत जन्म पावला म्हणून मोठा व दुसरा अमुक वंशांत जन्म झाला म्हणून हलका ही कल्पना त्यांस कधीं शिवत नाहीं इतकेंच नाहीं, तर परस्परांशीं अन्नोदकव्यवहार करण्यांत दोषादोष आहे असेंही त्यांस वाटत नाहीं. मि. दादाभाई नवरोजी हे जातीनें पारशी असून फिन्सबरीच्या मतदारांनीं आपल्या तर्फे त्यांस निवडून दिलें ही गोष्ट जशी खोटी नाहीं, त्याप्रमाणेंच त्यांच्याशीं इंग्रज लोकांच्या नित्य होत असणाऱ्या व्यवहारांत त्यांचें पारशीपण कोणास भासत नसे हेंही कांहीं खोटें नाहीं. तात्पर्य, मनुष्यामनुष्यांत प्रेमवृद्धि होऊन त्यांनीं एकदिलानें वागूं लागण्यास त्यांचा धर्मभेद नित्य व्यवहारांत दृष्टीस पडतां उपयोगी नाहीं. मनुष्याचा व ईश्वराचा संबंध वेगळा व मनुष्यामनुष्यांचा संबंध वेगळा. त्या दोघांची सळमेसळ होतां कामा नये.

"वरील विचारसरणीवरून सहज असें लक्षांत येईल कीं, आमचा धर्ममूलक जातिभेद आमच्या नित्य व्यवहाराच्या जितका आड असेल तितका आमच्यांतील परस्पर स्नेहभाव कमी असला पाहिजे व तितकीच एकदिलानें वागण्याची शक्यता कमी असली पाहिजे. आमचा जातिभेद आमच्या नित्य व्यवहाराच्या आड येतो किंवा नाहीं हें सिद्ध करीत बसण्याची मुळींच आवश्यकता नाहीं; कारण तो येत नसता तर मुळीं हा प्रश्नच निघाला नसता; व तो येतो ही गोष्ट जर खरी आहे तर त्यामुळें आमच्यांतील एकीसही अडथळा आला पाहिजे हें वेगळें सिद्ध करण्यास नको. शिवाय हें अनुमान अनुभवास सोडून नाहीं हेंही सर्वांच्या दृष्टीस पडण्यासारखें आहे. कोणी म्हणेल कीं, हा जातिभेद कांहीं आजच अस्तित्वांत आला नाहीं; हा अनेक शतकें असाच चाललेला आहे; असें असून आजच शूद्र वर्गांत असंतोष कां उत्पन्न व्हावा? याचें कारण इतकेंच कीं, आजपर्यंत त्यांस अज्ञानावस्थेंत ठेवण्याची खबरदारी घेतली गेली

असल्यामुळें त्यांस आपल्या अवनतीचें मुळींच ज्ञान झालें नव्हतें व त्याबद्दल विषाद मानण्याचेंही त्यांस कारण नव्हतें. परंतु इंग्रजी अंमलानें त्यांस ज्ञानाचीं द्वारें खुलीं होऊन त्यांचे डोळे उघडले असल्यामुळें ब्राह्मणांस भूदेव मानून त्यांची सेवा करणें हाच तुमचा धर्म आहे, हा उपदेश यापुढें अर्थात्च त्यांस मानवणार नाहीं, व ते ब्राह्मणांच्या भूदेवत्वाविरुद्ध बंड केल्यावांचून कधींही रहाणार नाहींत. या बंडास यापूर्वींच सुरवात झालेली आहे. परंतु या वर्गांत अद्याप विद्येचा विशेष प्रसार झाला नसल्यामुळें त्याचें पूर्ण स्वरूप अजून भासूं लागलें नाहीं. विद्येचा जसजसा अधिक प्रसार होत जाईल तसतसें शूद्रादि वर्गांस हल्लींचें वैषम्य अधिकाधिक टोंचूं लागून तें नाहींसें करण्यास ते जारीनें प्रयत्न केल्यावांचून रहाणार नाहींत. हौदांवरून ब्राह्मणादिकांची जी आज अवहेलना होते ती या भावी बंडांचीच सूचक होय. राष्ट्रसभे-सारख्या हितकारी संस्थेविषयींही या लोकांच्या मनांत द्वैतभाव उत्पन्न होऊं लागला आहे, व ते कदाचित् कांहीं मुसलमान, पारशी वगैरे लोकांप्रमाणें विघ्नसंतोषीपणा करतात कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे; म्हणून देशकालवर्तमानाकडे नजर देऊन परदेशस्थ म्लेंच्छांशीं व्यवहार करण्यास जसे आमचे लोक नाखुषीनें कां होईना हळू हळू कबूल होत आहेत, त्याप्र-माणें त्याच कारणांकरितां येथेंही ब्राह्मणशूद्रांतील वैषम्य होईल तितकें कमी करण्यास त्यांनीं मनाचा हिय्या केला पाहिजे. आमच्या समजुतीप्रमाणें आम्ही त्यांस पापाचरण करण्यास सांगत नाहींच. परंतु त्यांत पाप आहे अशी त्यांची अद्याप समजूत असेल, तथापि 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या न्यायानें त्यांनीं आपलें आचरण ठेवलें पाहिजे. आमच्या या अतिकर्मठपणानें आमचा अतिशूद्रवर्ग तर आम्ही गमावल्यासारखाच आहे. त्यांपैकीं बहुतेक लोकांनीं यापूर्वींच आम्हांस राम राम ठोकला आहे व राहिलेल्यांसही हात देण्यास मिशनरीवर्ग तयार आहेच. हेच अतिशूद्र ख्रिस्ती होऊन आमच्या मांडीस मांडी लावून बसत असले, तथापि त्यांच्याशीं प्रत्यक्ष संसर्ग ठेवण्यास मात्र आमचे लोक कबूल होणार नाहींत; आगगाडीमधून त्यांचा आम्हांस विटाळ होत असला, तथापि शाळांतून मात्र आम्हीं त्यांस आपल्या बांकावर बसूं देणार नाहीं; वगैरे गोष्टी विचारास धरून आहेत, असें जरी कोणास म्हणतां येणार नाहीं, तथापि त्यांच्या मनांत आम्ही आपल्या आजपर्यंतच्या वर्तनानें जो परकीपणा उत्पन्न केला आहे, तो नाहींसा करून टाकण्याइतका आमचा

कर्मठपणा शिथिल होईल अशी मुळींच आशा दिसत नाहीं. तेव्हां ते तर आम्हांस परकी बनलेच, परंतु शूद्रवर्गाचीही आम्ही तीच वाट लावणार कीं काय हाच काय तो प्रश्न आहे. एक गोष्ट समाधानाची आहे कीं, शूद्रादि-संबंधानें आमचा कर्मठपणा बहुतेक यापूर्वींच चेपून गेलेला आहे. तोच जरा अधिक चेपण्यास आम्ही तयार झालों व हल्लीं असलेलें परस्परांतील वैषम्य आम्ही अंशतः तरी कमी करण्याचा निश्चय केला, तर या वर्गाकडून होणाऱ्या बंडाचे परिणाम आम्हांस फारसे भोंवणार नाहींत. तेव्हां सध्याच्या वस्तुस्थितीकडे लक्ष देऊन आमचे लोक हें वैषम्य वाढविण्याच्या घातक प्रयत्नास लागणार नाहींत अशी आम्ही आशा करतों." ×

हे दोन लेख वाचल्यानंतर जातिभेदाच्या घातकपणासंबंधीं कोणाचीही खात्री झाली पाहिजे. त्यांतील कोटिक्रम जसा मुद्देसूद तसाच वादप्रकारही अतिशय शांतपणाचा आहे. विशेषेंकरून पुढें उपस्थित होणाऱ्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादासंबंधीं आगरकरांनीं वर्तविलेलें भविष्य किती बिनचूक प्रत्ययाला आलें हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांची दृष्टि किती दूरवर जात असे हें समजतें. महाराष्ट्राच्या दुर्दैवानें आगरकरांचे हितावह शब्द त्यावेळीं त्याला पटले नाहींत. वरील दोन्ही लेख केसरीकर्त्यांच्या कोटीक्रमाला उत्तरादाखल होते; पण यावेळीं समाजांतील प्रत्येक प्रचलित अन्यायाला उचलून धरणें हें केसरीचें व्रत झालेलें असल्यामुळें त्याच्या प्रत्युत्तरांत शिव्याशापाहून कांहीं मिळत नव्हतें. किंबहुना लोकांच्या धार्मिक समजुतींना दुखावल्याबद्दल आगरकरांना पीनलकोडाखालीं कोर्टांत खेंचण्याच्या कल्पनाही, बहुजनसमाजाच्या मूर्खपणाला पुरेपूर विकलेल्या केसरीकर्त्यांच्या वकिली डोक्यांतून उसळून बाहेर येत होत्या हेंही उपरोक्त लेखांत आलेल्या उल्लेखावरून स्पष्ट होतें. उभ्या गांवाला कायद्याची धमकावणी देत बसण्याची यावेळीं केसरीकारांना मोठीच खोड लागून राहिली होती असें दिसतें व हे गृहस्थ जर एखाद्या इलाख्यांत होम मेंबर (अंतर्गत खात्याचे प्रमुख अधिकारी) झाले असते तर त्यांनीं रोज रोज असंख्य लोकांवर कांहींना कांहींतरी कारणांसाठीं खटले करण्याचा पोलीसला रोज हुकूम सोडला असता असें वाटावयास लागतें. आपल्या विरुद्ध जो ब्र काढील त्याला कायद्याची किंवा दुसरी कसली तरी धमकावणी देत सुटणें हें नोकरशाहीचें तत्व रा. टिळकांच्या अंगांत इतकें भिनलेलें होतें कीं, त्यावरून ते लोकपक्षांत पडल्यामुळें नोकरशाही

× सुधारक, १३-२-२९

एका अपूर्व मोहऱ्याला मुकली कीं काय असा प्रश्न डोळयांपुढें उभा राहतो. आगरकरांनीं केलेल्या जातिभेदाच्या मीमांसेवर उत्तर देण्याची ताकद नसल्यामुळें आगरकर हे धर्मद्रोही अर्थात् देशद्रोही आहेत अशी बतावणी करून त्यांच्या वकीलबाजींत मुरलेल्या प्रतिपक्ष्यांना वेळ मारून न्यावी लागली. परंतु ती मीमांसा अगदीं बिनचूक असल्यामुळें तिचा खरेपणा इतके दिवसांनीं लोकांना पटूं लागला आहे व आगरकरांचे प्रतिपक्षी अगदीं सपशेल घसरले ही गोष्ट नाखुषीनें कां होईना त्यांना कबूल करावी लागत आहे.

३ सामाजिक सुधारणेच्या एका सक्रिय उदाहरणाला साहाय्य करण्याचा सुप्रसंग आगरकरांवर १८९३ च्या मार्च महिन्यांत आला. हा प्रसंग म्हणजे प्रो. धोंडो केशव कर्वे यांचा पुनर्विवाह हा होय. १८९१ अखेर प्रो. कर्वे हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीला येऊन मिळाले व पुढें लौकरच फर्ग्युसन कॉलेजांत गणिताचे अध्यापक झाले. ते सोसायटींत आले तेव्हां त्याचें कुटुंब निवर्तलेलें होतें. प्रो. कर्वे यांनीं आपल्या आत्मवृत्तांतांत आपल्या पुनर्विवाहाची हकीकत दिलेली आहे. येथें एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, या विवाहाच्या आमंत्रणचिठ्या आगरकर व रा. रामचंद्र भिकाजी जोशी यांच्या सहीनें निघाल्या. या विवाहामुळें पुण्यांत बराच ओरडा झाला पण विवाहाला शेंदोनशें मंडळी आली होती आणि त्यांतील दहा वीस मंडळी वधूवरांबरोबर जेवली. या विवाहाचा संबंध फर्ग्युसन कॉलेजकडे लावून त्या संस्थेवर दुगाण्या झाडण्याचें काम करण्याला पुण्यांतील स्वदेशाभिमानी व स्वधर्माभिमानी पत्रें विसरलीं नाहींत. या विवाहाचें अभिनंदन करतांना आगरकर लिहितातः—“एकंदरींत हा विवाह उभयकुलास अत्यंत भूषणावह झाला असून उभय दंपत्यास सुखावह होईल यांत तिळमात्र संशय नाहीं. नैसर्गिक सौजन्य, सुशिक्षण, स्वावलंबन व निश्चय इत्यादि सद्गुण ज्याच्या अंगीं आहेत त्यावर विधुरतेचा दुःखकारक प्रसंग आला असतां त्यानें काय करावें याचें अत्युत्कृष्ट उदाहरण प्रोफेसर कर्वे यांनीं घालून दिलें आहे. बऱ्याच सुशिक्षित विधुर तरुणांकडून त्यांचें अनुकरण होईल तर आमच्या अप्रयोजक धर्मसमजुतीमुळें वरिष्ठ वर्गांतील शेंकडों तरुण गतभर्तृकांचा आज कित्येक शतकें जो अनिर्वाच्य छल होत आहे त्याचा बहुतेक लोप होऊन आमच्या मनुष्यपणास लागलेल्या या पुरातन कलंकाचें निरसन होईल !*”

या विवाहाचें केसरीकर्त्यांनीं प्रथम अभिनंदन केलें. पण “आमच्या

* सुधारक, १३-३-९३

मंडळींनीं" कान धरतांच, फक्त हा विवाह धर्मविधीप्रमाणें करण्यांत आला म्हणून आपण त्याचें अभिनंदन केलें, असें त्यांनीं जाहीर केलें. लोकरंजनासाठीं आपली शेंपटी पोटरीकडे वळविण्याचा केसरीवर या दिवसांत वरचेवर प्रसंग येई आणि हा "पशुपति"ही हें श्वानकर्म करण्याला मागें पुढें पहात नसे. प्रो. कर्वे हे कोंकणांतील मुरूड या गांवचे. त्याला अनुलक्षून आगरकर लिहितातः—"वर आम्ही मुरुडाला प्रसिद्ध गांव म्हटलें आहे. ही त्याची प्रसिद्धी कर्व्यांच्या पुरातन व धार्मिक घराण्याकडून बांधण्यांत आलेल्या देवालयासारख्या पुण्यकृत्यांनीं त्यास आली आहे इतकेंच नाहीं तर अगदीं अलीकडे खुद्द त्या खेड्यांत किंवा त्याच्या पंचक्रोशींत जन्मास आलेल्या गृहस्थांपैकीं कित्येकांनींही त्याच्या नांवास स्मरणीयता आणिली आहे. कै. विश्वनाथ नारायण मंडलीक हे मूळचे मुरूडचे राहणारे होते. रा. रा. वामन आबाजी मोडक हेही मुरूडकर असून त्यांनीं तेथें कांहीं जमीनजुमलाही केला आहे असें ऐकतों! वामनरावजींचे भाचे रा. रामचंद्र भिकाजी जोशी, ज्यांनीं गत वर्षी आपल्या भगिनीचा पुनर्विवाह केला, तेही या भाग्यशाली मुरुडांतच जन्मास आले! आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजर रा. हरि नारायण गोखले हे मुरूडकर असून त्या छापखान्यांत निघणाऱ्या केसरीपत्राचे सुबुद्ध पण आग्रही एडीटर रा. रा. बाळ गंगाधर टिळक हेही खुद्द मुरुडकर नसले तरी मुरूडच्या टप्यांतच झालेले आहेत! नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट ज्योतिर्ग्रंथाचे कर्ते रा. रा. शंकर बाळकृष्ण दीक्षितही मुरूडकरच! या नामावलीवरून असें दिसून येईल कीं, सह्याद्रीच्या खालचीं व वरचीं सर्व गांवें या मुरुडाचें अनुकरण करतील तर या महाराष्ट्रभूमींत सर्व प्रकारच्या, विशेषतः पुनर्विवाहासारख्या, सुधारणांसाठीं कायावाचामनेंकरून झटणाऱ्या निग्रही, खटपटी व सुशिक्षित पुरुषांची रेलचेल होऊन जाईल!"× मुरूडाचें हें माहात्म्य मोठें प्रसन्न उतरलें असून त्यांतील विनोदाची खोंच जितकी मार्मिक तितकीच मधुर आहे. मुरुडच्या नामावलींत केसरीच्या सुबुद्ध पण आग्रही एडीटरांचा जो उल्लेख आला आहे, त्यावरून आपल्यापासून दूर झालेल्या मित्राबद्दल गोपाळरावांना केवढा अभिमान वाटत होता हें दिसून येतें. असो. याच लेखांत एक ब्राह्मण वधू व सारस्वत ब्राह्मण वर यांच्यांत झालेल्या विवाहाचें अभिनंदन केलेलें आहे. यानंतर थोड्याच दिवसांनीं कै. रावबहादुर मुधोळकर या सुधार-

× सुधारक, १३-३-२९

कांत मोडणाऱ्या वऱ्हाडच्या सुप्रसिद्ध गृहस्थांनीं एका लहान बालिकेशीं विवाह केला त्याप्रसंगीं आगरकरांनीं त्यांच्यावर खरमरीत टीका केली व खासगी स्नेहापेक्षां तत्वाला आपण महत्व देतों हें सिद्ध केलें. पण लग्नाच्या बाबतींत तत्वाला, किंबहुना प्रत्येक बाबतींत तत्वाला ते फार महत्व देत. याची छाननी होण्याला आणखी एक विवाह कारणीभूत झाला. हा विवाह म्हणजे कै. रामचंद्र सखाराम किर्लोस्कर यांच्या विधवेनें वऱ्हाडकडील एका गृहस्थाशीं केलेला पुनर्विवाह होय. या पुनर्विवाहाचें सुधारकानें अभिनंदन कां केलें नाहीं अशी एकानें पृच्छा केली. त्याला आगरकरांनीं उत्तर दिलें कीं, या विवाहांतील वराचें पहिलें कुटुंब जिवंत आहे आणि त्यामुळें प्रस्तुत विवाहाला बहुपत्नीकत्वाचें रूप येतें म्हणून त्याचें आम्ही अभिनंदन करीत नाहीं. पुनर्विवाह इष्ट आहे पण तो करणाऱ्यांचें वर्तन सुधारणेच्या तत्वांना धरून असलें पाहिजे; तसें नसेल तर त्यांनीं केवळ पुनर्विवाह केला म्हणून ते अभिनंदनीय होऊं शकत नाहींत; हा विचाराचा निःसंदिग्धपणा लक्षांत ठेवणें आवश्यकता आहे. त्यावरून प्रत्येक सुधारणेचें स्वरूप अत्यंत निष्पाप व निरपवाद असलें पाहिजे याबद्दल आगरकरांचा केवढा कटाक्ष होता हें सिद्ध होतें. अलीकडे हिंदुसंघटण व शुद्धि यांच्या नांवाखालीं उडाणटप्पू नवऱ्यांना साहाय्य देणाऱ्यांचा एक पंथ निघाला आहे. या पंथांत कांहीं जळजळीत देशभक्त व कांहीं रखरखीत धर्ममार्तंड आहेत. आणि या पंथाचा उदो उदो करणारे लोक आगरकरांच्या विचारांच्या नांवानें बोटें मोडत असतात. यावरून आगरकरांचे विचार अशुद्ध वर्तनाच्या, किंवा अशुद्ध वर्तन करणाऱ्याला साहाय्य देणाऱ्या लोकांच्या प्रकृतीला मानवण्यासारखे नाहींत हें उघड होतें.

आगरकरांना कोणत्याही प्रकारचा अशुद्ध विवाह खपत नव्हता पण अपवादात्मक व्यक्ति सोडून विवाह हा सामान्यपणें सर्वांनीं करावा या मताचे ते होते. यासंबंधीं त्यांनीं १८९२ सालीं पुढील मजकूर लिहिला होता:—
"मानसिक सृष्टींत मनसोक्त विहार करणाऱ्या कविश्रेष्ठांनीं वर्णिलेलें विलक्षण प्रेम प्रत्येक नवराबायकोच्या जोड्यांत दृष्टीस पडत नसलें तरी, आयुष्याच्या प्रत्येक अवस्थेंत नवऱ्याला बायकोपासून व बायकोला नवऱ्यापासून जितकी मदत होण्याचा संभव आहे तितकी ती दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीपासून मिळण्याचा संभव नाहीं असें दिसतें; आणि हें खरें असेल तर स्त्रीपुरुषांना पाहिजे त्या वयांत फिरून लग्न करण्याची मोकळिक ठेवणें हें अत्यंत

उचित आहे. कांहीं अविचारी स्त्रिया व पुरुष या मोकळिकीचा दुरुपयोग करतील, पण एकंदरींत अशा प्रकारच्या वैवाहिक स्वातंत्र्यापासून समाजाचें हित झाल्यावांचून रहाणार नाहीं." मात्र "चाळीस वर्षांच्या विधुरांनीं पंचवीस किंवा तीस वर्षांच्या विधवांशीं व पन्नाशी उलटून गेलेल्या वरांनीं तिशीवरील वयाच्या वधूशीं लग्न लावावें हें फार उचित आहे." म्हणजे ज्याप्रमाणें वैवाहिक स्वातंत्र्य असावें त्याचप्रमाणें तें स्वातंत्र्य कल्याणकारक होण्यासाठीं त्याचा उपयोग विवाहाच्या विषमतेंत कोणी करणें शक्य असूं नयेत ही मर्यादा घालण्यालाही अर्थात् ते विसरले नाहींत हें रास्तच होतें. प्रो. कर्व्यांच्या विवाहांत आगरकरांनीं वरपक्षाकडील प्रमुख भाग घेतला ही संधि साधून प्रो. जिन्सीवाले या पुराणमताभिमानी गृहस्थांनीं, फर्ग्युसन कॉलेज व न्यू इंग्लिश स्कूल जरी उत्तम प्रकारें चाललीं आहेत व जरी तेथील विद्यार्थ्यांना संस्कृत व इतर विषयांत स्कॉलर्शिपा व बक्षिसें मिळत आहेत तरी शास्त्रीबोवांच्या चित्तांत जो देशाभिमान व धर्माभिमान वास करीत होता तो सध्यांच्या चालकांत नाहीं असें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या पुण्यतिथीसंबंधीं भरलेल्या सभेंत (मार्च १८९३) उद्गार काढले आणि पुढें असें सांगितलें कीं, धर्मावांचून मनुष्याचें जिणें व्यर्थ होय. हा टोला आगरकरांच्यासाठीं उघड उघड होता. पण आगरकरांच्या आचरणाची निर्दोषता इतकी सर्वमान्य होती कीं, नास्तिकपणाला शिव्या देतां देतां "कांहीं नास्तिक लोकांचा आयुष्यक्रमही निर्दोष असूं शकतो हें मला कबूल आहे" असें प्रो. जिन्सीवाल्यांना सांगावें लागलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, प्रो. जिन्सीवाल्यांच्या या धर्मपुराणाचें तुणतुणें केसरीनें वाजविलें. केसरीचे या वेळचे 'सुबुद्ध पण आग्रही' एडीटर हे त्यावेळीं तरी चांगले नास्तिकशिरोमणि म्हणून प्रसिद्ध होते. आणि जरी अनेक आंधळया धर्मकल्पनांना व आचरट लोकरूढीला त्यांनीं जन्मभर पाठिंबा दिला तरी त्यांच्या गीतेवरील भाष्यांतही वरील प्रसिद्ध गुणाला अपवाद येईल असें कांहीं दिसत नाहीं. असो. प्रो. जिन्सीवाले किंवा तत्तुल्य धर्ममार्तंड यांच्या टीकेला एकच उत्तर देणें शक्य होतें; तें म्हणजे तिकडे लक्ष न देणें; आणि तें उत्तर आगरकरांनीं दिलें.

४. यावेळीं फर्ग्युसन कॉलेजची होत चाललेली वाढ सरकारच्या डोळ्यांत खुपूं लागली होती असें दिसतें, व पुण्यांत दोन कॉलेजांची जरुरी नाहीं या सबबीवर फर्ग्युसन कॉलेजची ग्रांट बंद करण्याचा अश्लाघ्य प्रयत्नही झाला

होता. डेक्कन कॉलेज किंबहुना प्रांतांतील दुय्यम व वरिष्ठ शिक्षण डेक्कन एज्यु-केशन सोसायटीकडे देण्याचा एकदां बेत निघाला होता पण त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. प्राथमिक शिक्षणावर पैसा खर्च करण्यास हवा म्हणून वरिष्ठ शिक्षणावरचा खर्च कमी करावयाचा आणि प्राथमिक शिक्षणावर विशेष खर्च तर करावयाचा नाहीं हें धोरण या वेळींही अमलांत होतें; आणि त्यामुळें सोसायटीच्या कामाला अडथळा येतो कीं काय अशीही भीति वाटूं लागली होती. सरकारच्या भलत्या डुरकावणीला किंवा धमकावणीला भ्यावयाचें नाहीं व तसाच प्रसंग आल्यास ग्रांट नसली तरी थोडा पगार घेऊन संस्था चालवावयाच्या हा सभासदांचा निश्चय या प्रसंगींही ढळला नाहीं आणि या निग्रहाचा सरकारच्या वृत्तीवर योग्य तो परिणाम थोड्याशा वेळानें झाल्याशिवाय राहिला नाहीं. सरकारच्या या अश्लाघ्य धोरणाचा निषेध मि. ( पुढें सर ) फेरोजशहा मेहता यांनीं ता. ४ एप्रील १८९३ रोजीं मुंबई येथें ग्रॅजुएट्स् असोसिएशनपुढें केलेल्या भाषणांत तीव्र शब्दांनीं केला व तसें करतांना त्यांनीं फर्ग्युसन कॉलेज करीत असलेल्या कामगिरीचा आदरपूर्वक उल्लेख केला. आगरकरांची व फेरोजशहांची प्रत्यक्ष माहिती कोल्हापुरच्या खटल्यापासून होती आणि फेरोजशहांना आगरकरांबद्दल मोठा प्रेम व आदर वाटत असे. सर दिनशा ( त्यावेळीं मि. ) वाच्छा यांचा अर्थशास्त्राशीं असलेला व्यासंग त्यांचा आणि आगरकरांचा परिचय होण्याला कारणीभूत झाला. वाच्छांच्या कित्येक इंग्रजी लेखांचीं सटीक रूपांतरें आगरकरांनीं सुधारकांत छापलेलीं आहेत. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आगरकरांना बाहेर जातां येत नसे; तथापि प्रिन्सिपॉल झाल्यावर सीनेटच्या सभांना ते बहुधा जात व त्यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध येणाऱ्या सर्व माणसांना त्यांच्याबद्दल मोठा आदर वाटे. मुंबईच्या मेहता, तेलंग वगैरे सर्व मोठमोठ्या पुढाऱ्यांचा फर्ग्युसन कॉलेजच्या कामाला पाठिंबा होता आणि त्यामुळें कॉलेजची अडचणीच्या परिस्थितींतही प्रगति करणें शक्य झालें. १८९३ अखेर बी. एस् सी. च्या संपूर्ण अभ्यासाची फर्ग्युसन कॉलेजांत युनिव्हर्सिटीच्या परवानगीनें सोय झाली आणि अशा प्रकारें कॉलेजला वाङ्मयात्मक व शास्त्रीय या दोहों विषयांत पूर्णता प्राप्त झाली. याच सालअखेर न्यू इंग्लिश स्कूलसाठीं बोर्डिंग निघण्याची व्यवस्था होऊन पुढील सालच्या सुरवातीपासून त्यांत विद्यार्थी दाखल होऊं लागले. हें बोर्डिंग म्हणजे सोसायटीच्या प्रगतींतील एक विशेष महत्वाचें पुढचें पाऊल होतें. या बोर्डिंगा-

संबंधीं आगरकर म्हणतातः—"चार दोन रुपये अधिक खर्च लागेल; पण शिकण्याच्या सोई चांगल्या असल्यामुळें व स्थानांतर केल्यावांचून येथें बी. ए. पर्यंत शिकतां येत असल्यामुळें, मुलाला परक्या ठिकाणीं ठेवावयाचाच तर ( मुंबई व पुणें ) या दोन शहरांपैकीं एका शहरांत ठेवणें बरें असें पुष्कळांस वाटतें; परंतु पुणें आणि मुंबई हीं शहरें मुलांच्या अभ्यासास जितकीं सोईचीं आहेत तितक्याच मानानें तीं मुलें बिघडविणारींही आहेत अशी अनेक लोकांची समजूत आहे; कांहीं अंशीं ती गैरवाजवी नाहीं. असमंजस मुलांना भलत्याच नादास लावणाऱ्या मोहक वस्तूंची समृद्धि येथें व मुंबईस असल्यामुळें चांगल्या देखरेखीशिवाय त्यांना येथें ठेवणें मोठ्या धोक्याचें आहे. यामुळें कोणी लोक आपलीं मुलें या दोन ठिकाणीं ठेवीत नाहींत असें नाहीं; पुष्कळ ठेवतात. पण त्यांना तसें करण्याबद्दल रात्रंदिवस काळजी वहात राहून खर्चही वाजवीपेक्षां फाजील करावा लागतो; आणि इतकें करूनही मुलांची व्हावी तशी व्यवस्था अथवा देखरेख होत नाहीं. ही अडचण दूर व्हावी, आणि सर्व महाराष्ट्रांतील सुखवस्तु लोकांस माफक खर्चानें आपलीं मुलें या शहरांत ठेवतां येऊन त्यांच्या प्रकृतीबद्दल, वर्तणुकीबद्दल व अभ्यासाबद्दल अगदीं बेफिकीर राहतां यावें म्हणून चांगल्या तऱ्हेचें बोर्डिंग काढण्याचा न्यू इंग्लिश स्कूलच्या व्यवस्थापकांनीं जो बेत केला आहे तो ऐकून अनेक मातापितरांच्या अंतःकरणांतील आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाविषयीं उत्पन्न झालेल्या काळजीचा एक मोठा भाग दूर होईल असें आम्हांस वाटतें"* असो. या अवधींत दोन वैयक्तिक गोष्टी घडून आल्या. सप्टेंबरच्या सुरवातीला न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग यांचा अकाल मृत्यु झाला. तेलंग हे सोसायटीच्या हितचिंतकांपैकीं एक असून त्यांची सल्लामसलत सर्व नडीअडचणीच्या प्रसंगीं आगरकर व त्यांचे सहकारी यांना मिळत असे. तेलंगांच्या मृत्यूमुळें सीनेटमध्यें व इतर प्रकारें सोसायटीला साहाय्य करणारा एक मोठा मनुष्य नाहींसा झाला. तेलंगांच्या मृत्यूमुळें घडून आलेली महत्वाची गोष्ट म्हणजे रा. ब. रानडे यांची हायकोर्टांत जज्ज म्हणून नेमणूक होऊन त्यांचें पुण्याहून मुंबईला कायमचें प्रयाण या वर्षींच झालें. रानडे आणि आगरकर यांचा पुष्कळ स्नेह झालेला होता व सोसायटीच्या कामाला

* सुधारक, २०-११-९३.

रानड्यांचें मोठें साहाय्य असे. जज होण्यापूर्वी रानड्यांची नवीन झालेल्या मुंबई कायदेकौन्सिलांत सरकारनें नेमणूक केली होती. तेलंगांच्या पूर्वीच रानडे हायकोर्टांत जज व्हावयास पाहिजे होते पण 'पुण्याच्या ब्राह्मणावर' सरकारचें जें प्रेम आहे त्यामुळें बहुधा ते मागें राहिले असावेत असें दिसतें. तेलंगांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या नेमणुकीला मांजरें आडवीं जात नव्हतीं असें नाहीं; पण अखेर सरकारनें त्यांची नेमणूक केली. अर्थात् मुंबई हायकोर्टाच्या आजपर्यंतच्या इतिहासांत रानडे हे पहिले व शेवटचे न्यायस्थानीं विराजमान झालेले 'पुण्याचे ब्राह्मण' आहेत. रानड्यांचीच नेमणूक हायकोर्टांत व्हावी म्हणून सुधारकानें दोन तीन वेळां लिहिलें होतें. रानड्यांच्या नेमणुकीमुळें सर्व पुण्याला व महाराष्ट्राला आनंद झाला. आगरकरही त्या आनंदांत वांटेकरी होते. रानड्यांचें मुंबईला कायमचें प्रयाण ही गोष्ट पुण्याच्या इतिहासांत फार महत्वाची होती. डॉ. भांडारकरही या सुमारास डेक्कन कॉलेजांतून पेन्शन घेऊन घरीं आले. तेही सोसायटीच्या साहाय्यकर्त्यांत प्रमुख होते हें सांगावयास नकोच.

५. या वर्षाच्या (१८९३) आगष्ट महिन्यांत मुंबई मुक्कामीं हिंदु-मुसलमानांचा भयंकर दंगा झाला. त्याची सविस्तर हकीगत देण्याचें हें स्थळ नव्हे. पण या दंग्यासंबंधीं फार उत्कृष्ट व निर्भीडपणाचे लेख लिहून आगरकरांनीं यावेळीं लोकांची जी बहुमोल कामगिरी केली तिचा उल्लेख करणें आवश्यक आहे. आगरकरांचें यासंबंधाचें लिहिणें इतकें मुद्देसूद व देशहितकारक आहे कीं, त्यांचे लेख प्रस्तुत काळीं—जेव्हां दुर्दैवानें हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांत तेढी पडून मारामाऱ्या होत आहेत—फारच मननीय आहेत. त्यांतल्या त्यांत कित्येक अँग्लो-इंडियन पत्रकर्त्यांचें नेहेमीं मुसलमानांना फूस देऊन हिंदूंना खालीं ओढण्याचें जें धोरण आज दिसतें तेंच त्यावेळींही होतें व त्याबद्दल आगरकरांनीं त्यावेळीं प्रकट केलेले विचार तंतोतंत आजही लागू पडतात. "मुंबईचा दंगा आणि अँग्लो इंडियन पत्रकर्ते" या लेखांत आगरकर लिहितातः—"या दंग्याची विशेष हकीकत देत बसण्यापेक्षां त्याची शहानिशा करतांना त्याचा दोष हिंदूंच्या माथीं मारण्याचा जो कित्येक अँग्लो-इंडियन पत्रकारांनीं खोडसाळ प्रयत्न चालविला आहे त्यासंबंधानें दोन शब्द लिहिण्याचा आज आमचा मुख्य उद्देश आहे. विशेषेंकरून "टाईम्स ऑफ़ इंडिया" पत्रांत यासंबंधानें गेल्या आठवड्यांत जे लेख आले आहेत ते केवळ अप्रयोजक आहेत इतकेंच नाहीं, तर ते परिणामीं फारच घातक होण्याचा संभव आहे

असें आम्हांस वाटतें. सामान्य लोकांस इंग्रजी पत्रें व सरकार यांच्यांत भेद करण्याचें ज्ञान नसतें, व अशा प्रकारें इंग्रजी पत्रांनीं त्यांची तरफदारी केलेली त्यांच्या कानीं गेली म्हणजे सरकार आपली बाजू घेतें अशी त्यांची समजूत होऊन ते शिरजोर होऊं लागतात असा अनुभव आहे. प्रस्तुत दंग्यास सुरवात मुसलमान लोकांकडूनच झाली ही गोष्ट तर निर्विवादच आहे. आतां तो करण्यास त्यांची प्रवृत्ति कशानें झाली हें जरी आज निश्चयानें सांगतां येण्यासारखें नाहीं, तथापि अँग्लो इंडियन पत्रकारांकडून त्यांची जी नेहमीं पाठराखणी होत असते, त्यामुळें त्यांस अधिकच उत्तेजन आलें यांत संशय नाहीं.

"प्रभासपट्टणच्या दंग्यासंबंधानें हिंदु लोकांनीं मुंबईस जी सभा भरविली होती व आज अनेक वर्षें अनेक ठिकाणीं त्यांनीं गोरक्षणार्थ जी खटपट चालविली आहे, त्यामुळें या दंग्याचा उद्भव झाला असें 'टाईम्स' चें म्हणणें आहे. हें म्हणणें कितपत साधार आहे याचा विचार करण्याचें क्षणभर एका बाजूस ठेवून हिंदूंच्या सभेमुळें किंवा गोरक्षणाच्या खटपटीमुळेंच मुसलमानांस चीड येऊन त्यांनीं दंगा केला असें जरी गृहीत धरलें, तथापि त्यांत हिंदु दोषी कसे होतात हें समजणें आमच्या कल्पनेबाहेर आहे. आपल्या जातभाईंच्या रक्षणाकरितां झटण्याची बुद्धि कायती हिंदूंमध्येंच वास करते असें नाहीं. त्यांच्याप्रमाणें ती मुसलमानांतही आढळून येते. त्यांनींही हिंदूंप्रमाणेंच आपल्या जातभाईंना मदत करण्याकरितां सभा भरवून वर्गणी गोळा केली आहे. व त्याच्या योगानें जर हिंदूंस चीड आली नाहीं तर हिंदूंच्या सभेनेंच मुसलमानांचें काय घोडें मारलें होतें न कळे! टाईम्सचे कर्ते सांगतात कीं, आम्ही पुष्कळ मुसलमानांजवळ यासंबंधानें बोललों आहों, व त्यांचें असेंच म्हणणें पडतें. पडत असेल कदाचित्; परंतु त्याला हिंदूंनीं काय करावें? याबद्दल हिंदूंस दोष देण्यापेक्षां मुसलमानांच्या घोर अज्ञानाबद्दल व दुराग्रहाबद्दल कींव करून त्यांची सुधारणा करण्याचे प्रयत्न करणें हेंच अधिक उपयोगी व शहाणपणाचें होईल. उद्यां जर मुसलमान म्हणूं लागले कीं, हिंदू लोक शेंडी ठेवतात, गंध लावतात, पागोटीं घालतात, याची आम्हांस चीड येते, तर हे आमचे इंग्रजी पत्रकर्ते हिंदूंस शेंडी काढण्याचा, गंध न लावण्याचा किंवा पागोटीं न वापरण्याचा उपदेश करणार काय? व असा उपदेश करणें हें जर मूर्खपणाचें आहे, तर हिंदूंनीं आपल्या जातभाईंच्या साह्याकरितां सभा भरवून जी वर्गणी गोळा केली आहे, ती परत करा असा उपदेश करणें तितकेंच मूर्खपणाचें नाहीं असें

कोण म्हणेल ? हिंदूंच्या गोरक्षणाच्या खटपटीपासून मुसलमानांस त्यांचा त्वेष आला हा कोटिक्रमही वरच्याच वर्गांतील आहे. या गोरक्षणासंबंधानें हल्लीं ज्या दिशेनें प्रयत्न होत आहेत ती दिशा आम्हांसही मान्य नाहीं. परंतु जोंपर्यंत या गोभक्तांकडून कोणत्याही प्रकारचें बेकायदेशीर वर्तन होत नाहीं, तोंपर्यंत त्यासंबंधानें कोणास त्यांस मनाई करतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून ख्रिस्ती धर्माचा रस्त्यावरून उपदेश व्हावा हें पुष्कळ हिंदूंस संमत नाहीं; पण त्यामुळें चिडून जाऊन कांहीं हिंदू जर ख्रिस्ती मिशनऱ्यांचीं डोकीं फोडूं लागतील तर हे अँग्लो इंडियन पत्रकर्ते ख्रिस्ती मिशनऱ्यांस रस्त्यावरून उपदेश करण्याची मनाई करण्याचा उपदेश करतील ? किंवा अशा माथेफिरू हिंदूंस चांगली दहशत पडेल अशा प्रकारें त्यांस शासन करण्याची सल्ला देतील ? अर्थात् ते दुसऱ्या मार्गाचा अवलंब करतील, व तोच मार्ग प्रशस्त होय असें आमचेंही मत आहे. वरील दोन्ही गोष्टी झालेल्या दंग्यास कारणीभूत होत्या असें गृहीत धरून त्यासंबंधानें जें कांहीं आम्हांस लिहावयाचें होतें तें आम्ही लिहिलें आहे. वास्तविक पहातां प्रभासपट्टणाहून जे हेर मुंबईस फिरत होते म्हणून बातमी आहे, व ज्यांपैकीं नगरास एक पकडल्याचेंही प्रसिद्ध झालें आहे ते या दंग्यांच्या मुळाशीं असावेत असा आमचा समज आहे. मग चौकशीअंतीं काय ठरतें तें पहावें.......

" इंग्लंडच्या कांहीं पत्रांनीं तर या दंग्याचा राष्ट्रीयसभेशींच संबंध जोडून दिला आहे ! व अशा प्रकारचे दंगे होऊं नयेत म्हणून हे कदाचित् राष्ट्रीयसभाही मोडून टाका म्हणून सूचना करण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत हें आम्हांस माहित आहे......अशा दंग्याचा बींमोड होण्यास वरच्या युक्त्यांपैकीं एकही उपयोगी नसून अशा प्रकारें शांतता मोडूं पहाणारांचा खरपूस समाचार घेणें हाच आमच्या मतें उत्तम उपाय होय. त्यास दुसरा सौम्य मार्ग नाहीं."*

हिंदु जी जी चळवळ करतील तिला हाणून पाडण्याच्या धोरणांत कित्येक अँग्लो-इंडियन पत्रकर्त्यांची पन्नास वर्षभर जी एकवाक्यता आहे तिचा चमत्कार वाटल्याशिवाय रहात नाहीं. आगरकरांच्या वेळीं त्यांचा कटाक्ष गोरक्षणावर होता, आतां ( १९२९ ) तो शुद्धिसंघटणावर आहे एवढाच काय तो भेद. मुसलमानांच्या अशाच प्रकारच्या चळवळीबद्दल मात्र ते अवाक्षरही विरुद्ध

* सुधारक, २१-८-९३.

लिहावयाचे नाहींत व त्या चळवळीमुळें हिंदूंना आत्मसंरक्षणार्थ तशा चळवळी कराव्या लागल्या ही गोष्ट त्यांच्या लक्षांत कधीं शिरावयाची नाहीं.

या दंग्यासंबंधानें विचार करतांना आगरकरांची दृष्टि जितकी न्यायनिष्ठुर व समतोलपणाची होती जितकीच ती राष्ट्रीय होती आणि म्हणून हिंदुमुसलमानांतील तेढ नाहींशी झाली पाहिजे अशा दिशेनेंच त्यांनीं खटपट केली. ते लिहितातः—"या दंग्याच्या अनुरोधानेंच मुसलमान पुढाऱ्यांस दोन विनंती-दाखल शब्द सांगण्याची आम्ही परवानगी घेतों. झालेल्या दंग्याशीं जसा समंजस हिंदूंचा संबंध नाहीं तसाच समंजस मुसलमानांचाही नाहीं याबद्दल कोणास संशय नाहीं. हा दंगा सुरू करण्यास मुसलमानांस काय कारणें झालीं याच्या निर्णयांत आम्ही सध्यां पडत नाहीं. कोणत्याही कारणानें या दोन जातींत वैमनस्य उत्पन्न झालें असो, तें तसेंच राहूं देणें कोणासही इष्ट वाटणार नाहीं. राजकीय दृष्टीनें पहातां हिंदु व मुसलमान या दोघांचीही स्थिति अगदीं सारखी असून ती सुधारणें असल्यास त्या कामीं उभय जातींतील पुढाऱ्यांत एकमत असलें पाहिजे. परंतु हल्लीं कित्येक मुसलमान पुढाऱ्यांचें जें वर्तन दिसून येतें त्यामध्यें आपल्या हातानें आपल्याच पायावर धोंडा मारून घेण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न होत आहे असें म्हटल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. उदाहरणार्थ, सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा हिंदुस्थान देशांत घेण्याचा ठराव अमलांत न येऊं देण्याबद्दल कित्येक पुढारी मुसलमानांकडून जो प्रयत्न होत आहे त्याच्या योगानें त्यांचा नफा नसून उलटें नुकसानच आहे, हें एखाद्या लहान पोरासही दिसून येण्यासारखें आहे. हिंदु लोक विद्येच्या कामीं मुसलमानांच्या पुढें गेलेले असल्यामुळें त्या परीक्षेपासून हिंदूंप्रमाणें आपला फायदा होण्याचा संभव नाहीं असें त्यांच्यापैकीं कदाचित् कित्येकांचें म्हणणें असेल; परंतु असला प्रकार असल्यास, विद्येच्या कामीं हिंदूंची बरोबरी करण्याचे प्रयत्न करणें हेंच ती परीक्षा येथें होऊं न देण्याबद्दल प्रयत्न करण्यापेक्षां परिणामीं अधिक हितकारक होईल हें त्यांस समजलें पाहिजे. या आपल्या दोघांच्या भांडणानें आपण तिन्हाइतांचा मात्र फायदा करून देत आहों ही गोष्ट या मुसलमान पुढाऱ्यांच्या कशी लक्षांत येत नाहीं न कळे! अशा त्यांच्या प्रयत्नाबद्दल इंग्रजी पत्रकारांकडून व प्रसंगविशेषीं क्षुद्रदृष्टि अधिकाऱ्यांकडून त्यांची खुशामत होते हें आम्हांस माहीत आहे, पण त्यास भुलून त्यांनीं आत्मघातास प्रवृत्त व्हावें हें आम्हांस विलक्षण दिसतें. हिंदु व मुसलमान हे दोघेही हिंदुस्थानचे स्थायिक

रहवासी आहेत; तेव्हां जेणेंकरून हिंदुस्थानचें हित होईल अशा कामीं दोघांनीं एकदिलानें वागणें उभयतांचें कर्तव्य आहे. मि. दादाभाई नौरोजी हे जातीनें पारशी असूनही आपली जात वगैरे कांहीं मनांत न आणतां जेणेंकरून एकंदर देशाचें हित होईल अशा कामीं मनोभावें झटतात, तर हिंदुमुसलमानांनींही असले इतर भेद एका बाजूस ठेवून राष्ट्रहितार्थ एक होऊन झटलें पाहिजे. राष्ट्रीय महत्वाच्या बाबतींतही हिंदूंशीं विरोधात्मक असें जें मुसलमान पुढाऱ्यांचें आचरण होतें त्याचा त्यांच्या अडाणी देशबांधवांवर काय परिणाम होत असेल हें आम्ही फोडून सांगितलें पाहिजे असें नाहीं. आपल्या पुढाऱ्यांचीं मनें हिंदूंविषयीं साशंक आहेत असें त्यांस दिसून आल्यावर त्यांच्या मनांत हिंदूंविषयीं स्नेह वसणें मुळींच शक्य नाहीं. तेव्हां उभयतांत सलोखा असणें किती महत्वाचें आहे व तो घडवून आणणें त्यांच्या वर्तनावर किती अंशानें अवलंबून आहे हें लक्षांत बाळगून ते आपल्या आचरणाची दिशा बदलतील अशी आम्ही आशा करतों." *

या हिंदुमुसलमानांच्या दंग्यासंबंधीं आगरकरांनीं स्वीकारलेलें धोरण किती समंजसपणाचें होतें हें वरील उताऱ्यांवरून समजतें. मुंबईंतील पुढारी मंडळींनींहि डोकीं शांत ठेवून दंग्यांत झालेल्या प्रकाराबद्दल निषेध व दंगे पुनः होऊं नयेत म्हणून उपाययोजना करण्यासाठीं सर्व नागरिकांची सभा भरविली व या सभेचे अध्यक्ष होण्याबद्दल गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांना विनंति केली व ती त्यांनीं मान्य केली. आपण मुंबईच्या पुढाऱ्यांपेक्षां शहाणे आहों व हिंदुसमाजाची आपणांला रानडे, आगरकर यांच्यापेक्षां अधिक काळजी आहे याचें प्रदर्शन करण्याचा मोह टिळकांना किंवा त्यांच्या 'मंडळीं'ना आवरला नाहीं व त्यांनीं पुण्यांत निव्वळ हिंदूंची सभा कांहींतरी दणदणीत भाषणें व ठराव करण्याच्या उद्देशानें भरविण्याचा बूट काढला. अशी एका जातीची सभा भरवून त्यांत केवळ दुसऱ्या जातीवर टीका करणें हा प्रकार दंग्यानंतरच्या परिस्थितींत रास्त नव्हता. पुण्यांत सभा भरवावयाची तर भरवा, पण ती सर्व नागरिकांची भरवा, केवळ हिंदूंची भरवूं नका असा पोक्त सल्ला थावेळीं सर फेरोजशहा मेहता यांनीं टिळकांना दिला होता. आगरकरांचें धोरण तर अथपासून जातिविषयक असें नव्हतेंच. फेरोजशहांना तोंडावर नाहीं म्हणणें टिळकांना शक्य

* सुधारक, २८–८–९३.

नव्हतें; पण टिळक बिचारे पडले आपल्या भक्तांच्या हातांत आणि त्यांना तर हिंदूंची सभा पाहिजे होती ! असली सभा करूं नका म्हणून पुण्यांतही टिळकांना सल्ला मिळाला होता. शेवटीं निव्वळ हिंदूंची सभा भरविली पण आश्चर्य हें कीं या सभेंत दणदणीत आणि सणसणीत असें कांहींच झालें नाहीं; उलट लॉर्ड हॅरिसचें अभिनंदन वगैरे अगदीं मवाळ ठराव या सभेंत पसार झाले. यावरून टिळकहि मुत्सद्दी होते ही गोष्ट आपोआप सिद्ध झाली. अर्थात् या मुत्सद्देगिरीमुळें त्यांची पुण्यांत थोडीशी फटफजिती उडाली. त्याचा वचपा त्यांनीं, गोपाळराव गोखले यांनीं मुंबईला जाऊन मेहतांना आपल्या चहाड्या सांगितल्या असा त्यांच्यावर सपशेल खोटा आरोप करून, काढला. हा आरोप अगदीं खोडसाळपणाचा होता हें गोखल्यांनीं सुधारकांत सविस्तर पत्र लिहून लोकांच्या निदर्शनाला आणलें. आणि अशा प्रकारें या प्रकरणांत टिळकांचें बरेंच हसें झालें. टिळकांनीं भरवलेल्या सभेची व त्यांच्या या वेळच्या धोरणाची मोठी मनोरंजक हकीकत आगरकरांनीं सुधारकांत सटीक दिली. त्यांतील मजकूर येथें देणें आवश्यक आहे. "पुण्यांतील लोकांच्या असामान्य भाग्योदयामुळें त्यांस अलीकडे जे दोन तीन नवीन अग्रणी प्राप्त झाले आहेत, व ज्यांच्या पराक्रमाचा डंका या घटकेस बहुधा महाराष्ट्राच्या सीमांतापर्यंत जाऊन पोंचला आहे, त्यांच्या गोटांतून जेव्हां अशी खबर बाहेर आली कीं "अलीकडे हिंदु-मुसलमान लोकांत जे दंगे होतात ते न होतां दोन्ही जातींत सख्यत्वाची वृद्धि होण्यास कोणते उपाय करावे, याविषयीं या शहरच्या हिंदु लोकांचें म्हणणें सरकारास कळविण्याकरितां हिंदूंची एक मोठी जंगी सभा भरविण्याचा त्यांचा विचार आहे;" तेव्हां संमतिबिलास विरोध करण्याकरितां भरलेल्या सभेनंतर कोणत्याही सभेंत दृष्टीस पडला नाहीं असा अविचारी वाचाळपणा व शुष्क देशाभिमान या सभेंत दृष्टीस पडेल असें पुष्कळांस वाटलें. तथापि प्रत्यक्ष भरलेल्या सभेंत तसला प्रकार त्याप्रमाणें दृष्टीस पडला नाहीं यावरून या साहजिक शूर लोकाग्रणींचा ऐन भरांत शौर्यपात होण्यासारखें कांहीं तरी बलवत्तर कारण घडलें असावें असें अनुमान करणें भाग पडतें. यांच्या पूर्व-पीठिकेवरून यांनीं गेल्या रविवारच्या सभेंत "लॉर्ड हॅरिस यांनीं मुंबईच्या दंग्याचे वेळीं जितकी कर्तव्यदक्षता दाखवायाला पाहिजे होती तितकी दाखविली नाहीं; म्हणून महाराणीनें त्यांवर आपली इतराजी आणि त्यासंबंधानें आपला खेद प्रदर्शित करून त्यांस ताबडतोब परत बोलवावें;" "व्हिन्सेंट व

आक्वर्थ यांस या दंग्याची कुणकुण तीन दिवस आधीं समजली असून त्यांनीं तो न होऊं देण्याबद्दल जितका बंदोबस्त करावयास पाहिजे होता तितका केला नाहीं, यासाठीं सरकारनें त्यांवर ठपका ठेवून त्यांना कमी पगारावर नेमावें;" "येथून पुढें हिंदु मुसलमानांचे जे दंगे होतील त्यांत हिंदूंचा वरचष्मा व्हावा म्हणून जागोजाग नेटिव्ह तालीमबाजांचे आखाडे अस्तित्वांत आणण्यासाठीं सर्व हिंदूंनीं निदान एकेक गंडा देऊन एक मोठा फंड उभा करावा, आणि या फंडापासून जातां जातां देशी व्यापारास व कामधंद्यास उत्तेजन देतां यावें म्हणून तो पेढी नाहीं अशा एखाद्या तांबें पितळेच्या किंवा सूतरेशमाच्या कारखान्यांत ठेऊन घ्यावा" असे ठराव पसार झाले असते तर कोणासही नवल वाटलें नसतें !! ज्यांच्या मेंदूस धनुर्वांत किंवा अर्धांगवायु झाला नाहीं; ज्यांचें भाषण, लेखन व आचरण पाहिलें असतां, विधात्यानें सर्व शहाणपण एकत्र करून त्याचे हे मूर्तिमंत पुतळे ओतले आहेत कीं काय असा भास होतो; ज्यांचा शब्ददुंदुभी वाजूं लागला कीं, सारा समाज ते सांगतील तसें नाचण्यास सज्ज होतो; सारांश, ज्यांना या महाराष्ट्रभूमीचे अनभिषिक्त राजे म्हणण्यास हरकत नाहीं त्यांनीं स्वल्प अडचण दिसल्याबरोबर ग्रामसिंहाप्रमाणें आपलीं शेंपटें खालीं घालावीं आणि आपल्या शीलास अगदीं उलट असें वर्तन करावें ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे बरें ! हिंदुमुसलमानांची सभा भरविणें, लॉर्ड हॅरिस यांनीं जी या प्रसंगीं उदार ऋजुता दाखविली त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें; महाराज्ञीनें जी कळकळ प्रकट केली तीबद्दल तिचे अंतःकरणपूर्वक आभार मानणें; अगोदरच झालेला बेबनाव अधिक न होईल अशा प्रकारचें भाषण, लेखन व आचरण करणें हें सामाजिक गोष्टींत सरकारची मदत मागणाऱ्या नामर्द सुधारकांचें व मोठमोठ्या जागा मिळविण्यासाठीं सरकारची हांजी हांजी करणाऱ्या रावबहादुरांचें काम आहे ! ज्यांनीं देशहितासाठीं स्वहितत्याग केला आहे व ज्यांना देशसेवेवांचून दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं, अशा अक्कलवान्, धैर्यवान्, विद्वान्, व देशाभिमानी स्वाभाविक लोकाग्रणींच्या हातून असलीं निंद्य कर्में कधींही व्हावयाचीं नाहींत !! पण व्याकरणांतील नियमाप्रमाणें असले पुढारीही अपवादाच्या झपाट्यांत सांपडल्यावांचून रहात नाहींत ! तथापि असल्या अपवादावरूनच यांच्या कर्तृत्वशक्तीची अटकळ केली पाहिजे. असल्या प्रसंगीं हे देशाभिमानाचें, धर्माभिमानाचें व परहितपरायणतेचें प्रचंड अवडंबर घालून ज्यांची पक्की नाचक्की झाली

आहे त्यांनीं आपली पत फिरून स्थापण्याचा; ज्यांचा धंदा खालावला आहे त्यांनीं त्याला फिरून तेजी आणण्याचा; ज्यांचा संसर्ग लोकांस महारोग्याच्या संसर्गाप्रमाणें वाटूं लागला आहे त्यांनीं त्यांशीं फिरून सलगी करण्याचा, व जे जात्या खुनशी, घमेंडखोर व अत्यंत नीच आहेत त्यांनीं वंद्य सज्जनावर निष्कारण तुटून पडण्याचा व त्यांवर भलतेच आरोप आणण्याचा अधमपणाचा प्रयत्न करूं नये तर केव्हां करावा? अलबत्, अशाच वेळीं केला पाहिजे. त्यांच्या या चेष्टा शुद्ध खासगी किंवा शुद्ध सामाजिक प्रकरणांत चालल्या आहेत, तोंपर्यंत उलट पक्षाच्या चांगुलपणामुळें त्यांना कशाचीहि भीति नाहीं. पण राज्यप्रकरणांत त्यांनीं प्रमुख सुधारकांचें अनुकरण केलें नाहीं व त्यांचें अनुयायीत्व पत्करलें नाहीं तर पहिल्याच मूर्खपणाबद्दल सर्व गर्व व हक्क एकीकडे ठेवून केवळ आत्मसंरक्षणासाठीं, ज्यांच्या हातीं पायीं पडण्याचा प्रसंग न यावा त्यांचे पायांवर लोटांगण घेण्याचा, ज्यांनीं एकवार "छीः थुः" केलें आहे त्यांशीं फिरून सलगी करण्याचा, व गाजलेली मर्दुमकी एकीकडे ठेवून भागूबाईसारखें वागण्याचा प्रसंग येईल; व तो टाळण्याचा प्रयत्न केल्यास आपल्या व दुसऱ्याच्या जिवावर उदार व्हावें लागेल हें त्यांनीं नित्य ध्यानांत ठेवावें."*

या झणझणीत लेखामुळें कित्येक लोकांत मोठा हाःहाःकार उडाला व त्यांपैकीं कित्येकांनीं पत्रद्वारें आगरकरांना तसें कळविलें. त्याला आगरकरांनीं दिलेलें उत्तर फार वाचनीय आहे. त्याच्या शेवटच्या भागांत आगरकर म्हणतातः—"आरंभापासून शेवटपर्यंत या जंगी सभेची हकीकत अत्यंत उद्वेगजनक व तिच्या प्रमुख पुरस्कर्त्यांस पराकाष्ठेची लाजिरवाणी आहे!...... लहरीसरशीं जें मनांत येईल तेंच चांगलें असा आग्रह धरून बसून त्याचें घोंगडें लोकांच्या गळ्यांत अडकविण्याचा प्रयत्न करणें हा देशाभिमान कीं हट्ट याचा शांत वाचकांनींच विचार करावा........अविचारानें आहाराबाहेरल्या किंवा संशयास्पद फायद्याच्या लौकिक कृत्यास एकदम हात घालून बसावयाचें, आणि तें अंगावर येतें असें दिसल्याबरोबर त्यांत भरपूर विसण घालून तें अगदीं सोमाळें करून टाकावयाचें किंवा लोकसमूहास त्यांत पातीदार करून आपल्या अंगावरील जबाबदारी वांटून द्यावयाची किंवा ती अजीबात टाकावयाची ही खऱ्या, शांत व उदात्त देशहितचिंतकाची वर्तनपद्धति नव्हे.

---

* सुधारक, १८-९-९३.

स्वोत्कर्षाची उद्दाम इच्छा आणि बेताल घमेंडी यांमुळें असल्या लोकांचा विवेक अगदीं अंध किंवा पंगु अथवा दोन्हीही होऊन गेला असल्यामुळें हे काय करतील आणि काय न करतील हें कोणाच्यानेंही सांगवणार नाहीं. संमतिबिलासारख्या बिलाचा वाद निघाला असतां सामान्य लोकांस खूप चिथवून देऊन त्यांनीं आरंभिलेल्या मारामाऱ्यांची गंमत पहात बसणें किंवा डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या सोसायटीस रसातळाला पोंचविण्याचा प्रयत्न करणें असलीं कामें करण्यास हे मनुष्यांचे अमानुष पुढारी सहज सिद्ध होतील इतकेंच नाहीं, तर आपला कोपाग्नि शमविण्यासाठीं ते तुमच्या प्रांतिक सभांची व सार्वजनिक सभांची, राष्ट्रसभांची व सामाजिक परिषदांची वाट लावण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत! वाचकहो, आज हें लिहिणें तुम्हांस अतिशयोक्तीचें किंवा फाजील तीव्रतेचें वाटत असल्यास तुम्ही आम्हांस सध्यां क्षमा करा; ज्याप्रमाणें पुण्याच्या बऱ्याच समंजस लोकांस त्याच्या अन्वर्थकतेचा प्रत्यय येऊन चुकला आहे त्याप्रमाणें थोड्या दिवसांत तो तुम्हांसही येईल अशी खात्रीपूर्वक आम्ही तुमची शहानिशा करितों."* दोन वर्षांनीं (१८९५) सालीं भरलेल्या पुण्याच्या राष्ट्रीयसभेंत व पुढें चौदा वर्षांनीं सुरतेच्या राष्ट्रीयसभेंत (१९०७) वरील लिहिण्याची अन्वर्थकता उभ्या हिंदुस्थानाला पटण्याचा कुयोग आला हें प्रसिद्ध आहे.

६. मुंबईच्या मोठ्या दंग्यानंतर कांहीं दिवसांनीं येवलें व नंतर खुद्द पुणें येथें कांहीं तरी कुरापत निघून हिंदुमुसलमानांचे दंगे झाले. त्यासंबंधींही सुधारकांत वेळोवेळीं परिणामकारक लेख आले. अशा दंग्याच्या वेळीं कधीं कधीं कांहीं कांहीं अधिकारी निष्पक्षपातीपणा दाखवीत नाहींत असें आढळून आलें. त्यावेळीं त्या त्या अधिकाऱ्यांचा समाचार सुधारकानें खरपूसपणें घेतला. १८९३ च्या कॉंग्रेसचे अध्यक्ष देशभक्तशिरोमणि दादाभाई नौरोजी व्हावयाचे होते. ते यासाठीं विलायतेहून मुद्दाम हिंदुस्थानांत आले. ही कॉंग्रेस लाहोर येथें भरली. तिच्यापूर्वीं कांहीं दिवस दादाभाईवर पुत्रशोकाचा भयंकर प्रसंग ओढवला. पण त्या थोर राष्ट्रसेवकानें अंगीकृत कार्यांत बिलकुल कसूर न करतां ठरल्याप्रमाणें राष्ट्रीयसभेचें काम उत्कृष्ट प्रकारें पार पाडलें. दादाभाई पार्लमेंटचे सभासद झाल्यावर हिंदुस्थानांत प्रथम आले होते म्हणून मुंबईंत

* सुधारक, २५-९-९३.

त्यांचा स्वागतसमारंभ फार थाटाचा झाला. या समारंभांत पुण्याच्याही मंडळीचा पुष्कळ भाग होता. दादाभाईविषयीं आगरकर लिहितात:—"दादाभाईंपेक्षां कांहीं गृहस्थ बुद्धीनें श्रेष्ठ असतील; कांहींची वाणी त्यांच्या वाणीपेक्षां रसाळ व गंभीर असेल; कदाचित् कांहीं गृहस्थांना हिंदु लोकांच्या खऱ्या स्थितीविषयीं अधिक माहितीहि असेल; पण त्यांच्या एकट्यांच्या आंगीं जेवढ्या गुणांचा समुच्चय आहे तेवढ्या दुसऱ्या कोणाच्याही आंगीं नाहीं हें निर्विवाद आहे." * दादाभाईनींही या प्रसंगीं पुण्यालाही भेट दिली (१७-१२-९३) आणि पुणेकरांनींही मोठ्या प्रेमानें त्यांचें स्वागत केलें. या स्वागतसमारंभांत आगरकर व गोखले यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला. दादाभाईंच्या आगमनाचे वेळींच पुण्यांत एक पुनर्विवाह झाला. हा प्रसंग लक्षांत घेऊन सामाजिक व राजकीय सुधारणेंतील मूलतत्वांतील ऐक्याविषयीं आगरकरांनीं फार सुंदर लेख यावेळीं लिहिला. दादाभाईंची पार्लमेंटांत निवडणूक झाली त्यामुळें "ईश्वरानें निर्मिलेले सर्व मानव प्राणी सारख्या योग्यतेचे आहेत व त्या सर्वांचे हक्क सारखे आहेत या श्रेष्ठ सुधारणातत्वाचा विजय झाला आहे. दादाभाईंच्या निवडणुकीचा आम्ही आजवर जो इतका गौरव केला त्याचें मुख्य कारण हेंच होय. आतां या निवडणुकींत जसा सुविचाराचा दुराग्रहावर जय झालेला दिसतो त्याप्रमाणें प्रस्तुत गोष्टींतही तो झालेला दिसतो. पुरुष तो पुरुष, व स्त्री ती स्त्री, या लहानशा वाक्यांत समाजाची जी पक्षपातवृत्ति दिसून येते ती इंग्रज तो इंग्रज व नेटिव्ह तो नेटिव्ह यांत दिसून येणाऱ्या वृत्तीहून भिन्न नाहीं. तेव्हां एकीचा ऱ्हास ज्या कारणाकरितां व जितका अभिनंदनकारक आहे त्याच कारणाकरितां व तितका दुसरीचाही ऱ्हास प्रत्येकास अभिनंदनकारक वाटला पाहिजे. सृष्टिनियमानुसार जसे अनेक पुरुष विधुर होतात, त्याप्रमाणें अनेक स्त्रियाही विधवा होणें अपरिहार्य आहे. परंतु विधुरानें फिरून लग्न केल्यास त्यांत आम्हांस कांहींच वावगें दिसत नसून विधवेचा विवाह झाला कीं लागलीच आमची चित्तवृत्ति बावरून जाते असा तर अनुभव आहे. यांतील अन्याय म्हणजे कोणास अद्यापि भासावयाचा राहिला आहे असें नाहीं. परंतु रूढीचें जूं फेकून देऊन न्याय्य व समता यांचें साम्राज्य स्थापण्यास अवश्य लागणाऱ्या धैर्याची अद्याप आमच्यांत उणीव

---

* सुधारक, ११-१२-९३.

आहे. तेव्हां अशा स्थितींत सौ. द्वारकाबाई व रा. शंकरराव हे आपल्या इष्ट-मित्रांसह रूढीशीं टक्कर देण्यास धैर्यानें पुढें आले ही गोष्ट सामान्य महत्वाची आहे असें आम्ही समजत नाहीं." *

असो. याच सुमारास आगरकरांनीं "आमचे दोष आम्हांस कधीं दिसूं लागतील ?" हा मोठा मननीय लेख सुधारकांत प्रसिद्ध केला. अंतर्मुख दृष्टि करून आत्मपरीक्षणाच्या कार्यांत "गुलामांचें राष्ट्र" या लेखाच्या खालोखाल वरील लेखाचें महत्व आहे. "आमच्या शोचनीय राष्ट्रस्थितींत गेल्या दोन हजार वर्षांत म्हणण्यासारखा फेरफार झाला आहे, असें बहुधा कोणाही विचारी पुरुषास म्हणतां येणार नाहीं." अशा लोकांनीं "परक्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या देशांत येऊं दिल्या आणि एकाच्या जुलमाचें जूं निघालें नाहीं तों दुसऱ्याच्या जुलमाचें जूं आपल्या मानेवर घेतलें आणि आपल्या बायकापोरांसह शतकेंच्या शतकें, हवे तसले हाल सोशीत, दीन दास्यावस्थेंत काढलीं यांत नवल तें काय ?" हा विषय या लेखांत प्रतिपादन केलेला आहे व आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त होण्यासाठीं ज्या अश्लाघ्य रूढींना आपण शतकेंच्या शतकें चिकटून राहिलों आहों त्या झुगारून दिल्या पाहिजेत, असा निष्कर्ष काढलेला आहे. याच वर्षीं फर्ग्युसन कॉलेजांत बी. एस्‌सीच्या पूर्ण अभ्यासाची सोय झाली हें वर आलेंच आहे. १८९४ च्या सुरवातीपासून न्यू इंग्लिश स्कूलचें बोर्डिंग प्रत्यक्ष अस्तित्वांत आलें व सुरवातीला त्यांत ३५ विद्यार्थ्यांची सोय झाली. बोर्डिंग निघून त्याच्या आनंदांत सोसायटीची मंडळी आहेत इतक्यांत एक सभासद प्रो. धारप हे मृत्युमुखीं पडले. प्रो. धारप हे संस्कृतचे अध्यापक होते व वामनराव आपट्यांनंतर त्या विषयाचा सर्व भार त्यांच्यावरच पडला होता. दुर्दैवानें १८९३ सालांत त्यांची प्रकृति फार बिघडली व ता. ४ जानेवारी रोजीं ते अकालीं मृत्युवश झाले. यावरून फर्ग्युसन कॉलेजच्या शिक्षक मंडळीवर मृत्यूनें जी करडी नजर केली होती तिचा अम्मल अद्यापि कायम होता असें म्हटलें पाहिजे. पुण्यांतील भांडणाचें स्वरूप यावेळीं थोडें सौम्य झालें होतें. सामाजिक व राजकीय सुधारणांच्या मूलतत्वांविषयीं सुधारकांत यावेळपर्यंत आगरकरांनीं जें लिहावयाचें तें लिहून टाकलें होतें. प्रसंग आल्यास प्रतिपक्षावर न्याय्य प्रहार करण्यांत आगरकरांची

* सुधारक, १८–१२–९३.

लेखणी पटाईत होती पण केवळ वाचकांच्या खुषीखातर कोणाचे तरी लचके तोडीत बसण्याची हीन वृत्ति अर्थात् तिच्यांत नव्हती. प्रतिपक्षांवर तीव्र प्रहार करण्याचे प्रसंग सुधारकावर त्याच्या सुरवातीपासून पुष्कळ आले पण कारणाशिवाय केव्हांही कोणावर प्रहार करावयाचा नाहीं हें आगरकरांचें तत्त्व होतें. ता. २२ जानेवारी १८९४ च्या सुधारकाच्या अंकांत "सुधारक बेचव होत चालला" या मथळ्याखालीं त्यांनीं एक मोठा चित्तवेधक पण उद्बोधक असा लेख लिहिला. आगरकरांची प्रकृति यावेळीं बरीच बिघडलेली होती त्याचा फायदा घेऊन त्यांच्या कित्येक थोर मित्रांनीं व त्यामुळें गांवगुंडांनीं "आतां सुधारकांत कांहीं दम राहिला नाहीं; त्यांत आगरकर आतां लिहीत नाहींत; त्याच्यांत पूर्वींचा जोर उरला नाहीं." अशा कंड्या उठविण्याला सुरवात केली व खुद्द आगरकरांच्यापर्यंत हीं विधानें जाऊं लागलीं. त्यांना उत्तरादाखल म्हणून हा लेख लिहिला असें दिसतें. प्रथम सर्व जगांतील होणाऱ्या वृत्तांताचा खल करणें आपल्या पत्रकारांना शक्य नाहीं, कारण त्याच्याशीं आपला प्रत्यक्ष संबंध नाहीं असें सांगून, ते म्हणतातः—"ज्या प्रकारच्या विषयांशीं युरोपांतील व अमेरिकेंतील स्वतंत्र व बलाढ्य लोकांचा निकट संबंध आहे, त्यांबद्दल तेथल्या वर्तमानपत्रांत बातम्या देणें आणि चर्चा करणें साहजिक व अवश्य आहे. आम्ही अशा प्रकारच्या विषयांस आमच्या शोचनीय देशस्थितीमुळें अगदीं मुकलों असल्यामुळें त्याबद्दल देशी पत्रांत वारंवार उल्लेख करून जागा अडविण्यांत बिलकूल अर्थ नाहीं. "वैवाहिक संबंधांतही लोकांची करमणूक होण्यासारखे खटले आपल्याकडे फारसे होत नाहींत तेव्हां तोही मार्ग रकाने भरण्याला इकडच्या वृत्तपत्रांना मोकळा नाहीं." शेवटीं आगरकर मोठ्या विनोदपूर्ण भाषेंत म्हणतातः—"या सर्व अडचणींचा जे कोणी शांतपणें विचार करतील त्यांना आम्हास आमचीं पत्रें एकसारखीं चवदार करतां येत नाहींत याबद्दल दोष द्यावासा वाटणार नाहीं. जुन्या लोकांवर किंवा उलट पक्षावर तोंड टाकणें, आपणास अप्रिय अशा संस्थांच्या हात धुवून पाठीस लागणें; प्रसंग साधून एखाद्या व्यक्तीवर तुटून पडणें; किंवा एकमेकांचे लचके घेणें यांवांचून देशी वर्तमानपत्रें मसालेदार करण्याचा दुसरा मार्ग आहे काय? आहे असें आम्हांस तर वाटत नाहीं. पण असले प्रसंग तरी वारंवार कोठें येतात? ते येतात तेव्हां आम्ही त्यांस सुने जाऊं देत नाहीं. पण ते फार येतच नाहींत याला आम्ही तरी काय करावें? शिवाय, जेव्हां ते येतात, आणि आम्ही आपला टांक चालवूं लागतों, तेव्हां

आमचेच वाचक आम्हांवर उलटून दोन तीन आठवडे गेले नाहींत तों "ही बाचाबाच पुरी करा; असल्या भांडाभांडीबद्दल आम्ही आपले पैसे खर्च करून तुमचीं पत्रें घेत नाहीं; लिहिण्यांत कांहीं ताळ ठेवा; ज्यांत राजकीय, सामाजिक व शास्त्रीय विषयांविषयीं चांगली माहिती आहे अशीं आर्टिकलें सोप्या व गंभीर भाषेंत लिहीत जा; त्याहून आम्हांस दुसऱ्या कशाचीही गरज नाहीं."—अशा प्रकारचा उपदेश करीत सुटतात ! गडसास्वडाच्या दरम्यान लडबडणाऱ्या द्राविडाप्रमाणें आम्ही तसें करण्यास आरंभ केला कीं—"अहो तुमचे लेख अगदीं मंदावत चालले; तुमच्या टांकांतील तरतरी नाहींशी झाली; तुमच्या पत्रांत अलीकडे खरपूस असें कांहीं येत नाहीं; तुमचें लिहिणें अगदीं निःसत्व लागतें"—अशी ओरड होऊं लागते. तात्पर्य, इष्ट वस्तु प्राप्त झाली म्हणजे ती नकोशी वाटावी, पण तिचा थोडा वेळ वियोग झाला कीं ती केव्हां दृष्टीस पडेल असें होऊन जावें अशी आमच्या वाचकांची प्रकृति होऊन गेली आहे. अशा स्थितींत आपण आपल्या धोरणाप्रमाणें चालावें आणि उगीच रहावें, यावांचून हीं देशीं वर्तमानपत्रें चालविण्याचा विशेष प्रशस्त मार्ग निदान आम्हांस तरी दिसत नाहीं." वर्तमानपत्रांना हे मंदाईचे मोसम असे वरचेवर येतात व त्यासंबंधीं आगरकरांनीं प्रकट केलेले विचार सदरहू धंद्याशीं संबंध असलेल्या पुष्कळांना मनोरंजक वाटल्यावांचून रहाणार नाहींत. १८९४ सालीं महाराष्ट्राच्या वातावरणांत फारशी उष्णता नव्हती यांत शंका नाहीं. तिचा प्रादुर्भाव पुढील वर्षीं होऊन ती दोन चार वर्षें चांगली वाढत रहावयाची होती. परंतु त्या गोष्टींचा संबंध आगरकरांच्या चरित्रांत येण्यापुरती आयुर्मर्यादा त्यांना लाभली नाहीं.

७. आपट्यांच्या मृत्यूनंतर आगरकर हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो नेमण्यांत आले. १८९४ च्या सुरवातीला रा. टिळक हेही युनिव्हर्सिटीचे फेलो निवडून आले व अशा प्रकारें विद्यादेवीच्या मंदिरांत हे जुने मित्र पुनश्च भेटण्याचा योग आला. यानंतर घडून आलेली महत्वाची गोष्ट म्हणजे डॉ. भांडारकर यांनीं व्हॉइस चॅन्सेलर या नात्यानें केलेलें भाषण होय. या सुमाराला बरीच विद्वान् तरुण मंडळी अकाल मृत्यु पावली होती. त्यासंबंधीं भांडारकरांनीं आपले विचार प्रकट केले. त्यांत त्यांनीं विशेष जोर "अप्रौढ मुलांचीं लग्नें करून त्यांना लहानपणींच विषयसुखाची चटक लावणें; मुलींची पुरी वाढ होण्यापूर्वीं त्यांवर आया होण्याचा प्रसंग येणें; खाण्याला

पुष्टिवर्धक अन्न न मिळणें व शरीरबलवर्धक व्यायाम करण्याची कोणालाही संवय नसणें" या गोष्टीवर दिला. त्यांतल्या त्यांत त्यांच्या भाषणाचा रोख "नैतिक" कारणांना विशेष महत्त्व देण्याकडे होता. त्यावर रावबहादुर रानडे यांनीं उत्तर देऊन सांपत्तिक दुःस्थिति हें तरुणांच्या अपमृत्यूचें विशेष महत्त्वाचें कारण आहे असा आपला अभिप्राय प्रकट केला. रानड्यांचा अभिप्राय त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें साधार असा होता व आगरकरांनींही त्याचेंच मंडण केलें; परंतु भांडारकरांनीं सांगितलेलीं कारणेंही लक्षांत ठेविलीं पाहिजेत असें त्यांनीं सुचविलें. शिवाय परकी भाषेंतून अभ्यास करावा लागतो त्यामुळें विद्यार्थ्यांच्या शक्तीवर भलता ताण पडतो हा मुद्दा त्यांनीं विशेष जोरानें पुढें आणला. १८९४ च्या पहिल्या चार महिन्यांत सुधारकांत धर्मकल्पनांच्या उत्पत्तीसंबंधीं माहितीनें भरलेले लेख प्रसिद्ध झाले. त्यांना आधार स्पेन्सरच्या त्या विषयावरील लेखांचा होता हें स्पष्ट दिसून येतें. भांडारकरांचें भाषण झाल्यानंतर थोड्या दिवसांनीं रा. ब. शंकर पांडुरंग पंडित हे स्वपराक्रमानें उदयाला आलेले विद्वान् गृहस्थ मृत्यु पावले. पंडितांचा आगरकरांना सामाजिक सुधारणेच्या कार्यांत मोठा पाठिंबा होता व आगरकरांच्या निर्भयतेबद्दल त्यांना फार कौतुक वाटे. त्यांच्या मृत्यूनें आगरकरांबद्दल सहानुभूति बाळगणारा तेलंगांप्रमाणें आणखी एक मोठा मनुष्य नाहींसा झाला. एका प्रकारें, विशेषें-करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतून उदयाला येण्याच्या बाबतींत, आगरकर आणि पंडित यांच्या चरित्रांत पुष्कळ साम्य आहे. आणि म्हणून या दोवां पुरुषांना परस्परांबद्दल आदर व कौतुक वाटे हें साहजिक होतें. १८९४ च्या एप्रील महिन्याच्या सुरवातीला कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींना मुखत्यारी मिळाली. या प्रसंगीं आनंदसमारंभ झाले त्यांत डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें भाग घेतला हें उचित होतें. कोल्हापूरच्या छत्रपतींच्या वडिलांच्यासाठीं टिळक आगरकर तुरुंगांत गेले ही गोष्ट या वेळीं लोकांच्या ध्यानांत आली होती आणि फर्गुसन कॉलेज काढण्याचे वेळीं कोणत्याही कारणानें असो कोल्हापूर संस्थानाकडून चांगली मदत मिळाली होती.

श्रीमंत शाहू छत्रपति हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आपल्या मृत्यूपर्यंत अध्यक्ष होते. त्यांना मुखत्यारी मिळाली तेव्हां देशी संस्थानिकांविषयीं लोकांत प्रेम होतें व ते विद्याभिवृद्धीला व लोकोपयोगी कार्यांना साहाय्य करतील अशी त्यांना अपेक्षा असावी हेंही साहजिक होतें. फर्ग्युसन कॉलेजच्या मंडळींना तर

आपला एक पुरस्कर्ता मुखत्यार झाला असें वाटलें. फर्ग्युसन कॉलेजवर जरी गेल्या चार वर्षांत अनेक संकटें कोसळलीं तरी त्यांतून तें निभावून त्याचें पाऊल सारखें पुढें पडत होतें. चतुःशृंगीच्या माळावर कॉलेजच्या इमारतीचें काम झपाट्यानें चाललें होतें. न्यू इंग्लिश स्कुलांत व कॉलेजांतही मागसलेल्या जातींतील विद्यार्थ्यांना विशेष साहाय्य करण्याचा उपक्रम आगरकरांनींच सुरू केला होता. ता. १३ फेब्रुवारी १८९५ रोजीं मुंबई माजी गव्हर्नर, ज्यांच्या कारकीर्दीत कॉलेज निघालें, ते सर जेम्स फर्ग्युसन यांनीं कॉलेजास भेट दिली व आपल्या नांवानें बीजारोपण झालेल्या संस्थेचा वाढता वृक्ष झालेला पाहून त्यांना समाधान वाटलें. या वर्षीं पुण्यांत चार पांच पुनर्विवाह घडून आले. त्यामुळेंही आगरकरांना सुधारणेसाठीं लागणारें धैर्य लोकांच्या आंगीं हळू हळू येऊं लागलें असें वाटण्याला कारण झालें. त्यांची प्रकृति अधिकाधिक क्षीण होत चालली होती. सुधारकाचें व कॉलेजचें काम त्यांनीं कांहीं दिवस आंगावेगळें करून विश्रांति घेतली पाहिजे असें त्यांच्या डाक्टरांनीं त्यांना बजाविलें होते. त्याप्रमाणें थोडे दिवस ते अकोल्यास आपले मामा आणि परम मित्र दत्तोपंत भागवत यांचेकडे जाऊन राहिले होते. पण कॉलेजची इमारत या वेळीं पुरी होत आलेली व ती उघडण्याच्या समारंभाची तयारी चाललेली. कॉलेजची टर्म संपल्यावर आपण विश्रांति घेऊं असा ते विचार करीत होते. फर्ग्युसन कॉलेजची इमारत उघडण्याचा समारंभ मुंबईचे गव्हर्नर लार्ड सॅन्डहर्स्ट यांच्या हस्तें ता. २७ मार्च १८९५ रोजीं मोठ्या थाटानें झाला. तो दिवस वर्षप्रतिपदेचा होता. सुरू केलेल्या कार्याला कायमचें स्वरूप आलें हें पाहून आगरकरांना अतिशय समाधान वाटलें. पंधरा वर्षांपूर्वीं ज्या कार्याला उमेदीनें सुरवात केली त्याला एवढें स्पृहणीय रूप इतक्या थोड्या अवधींत आलें आणि तें येतांना एवढीं जबरदस्त विघ्नें आलीं होतीं कीं संस्था राहते कीं मोडते असें भय वाटूं लागलें होतें. आपट्यांच्या मृत्यूनंतर कॉलेजची बहुतेक सर्व जबाबदारी आगरकरांवर पडली होती आणि आपली प्रकृति तर अधिकाधिक बिघडत चालली, आपल्या डोळ्यांदेखत तरी कॉलेजची इमारत उभी रहाते कीं नाहीं असें त्यांना वाटूं लागलें होतें. वामनराव आपटे मृत्युवश झाले तेव्हांपासून आगरकरांच्या चित्तांत एक प्रकारची उदासीनता आली होती. त्यांना इमारत उभी राहून खुली होण्याचा दिवस उजाडला तेव्हां मोठा आनंद झाला हें अगदीं साहजिक होतें.

८ समारंभाविषयीं सुधारकांत अग्रलेख आला तो सर्वप्रकारें वाचनीय व स्मरणीय असल्यामुळें येथें देणें इष्ट दिसतें. "होणार होणार म्हणून आज कित्येक महिने घांटत असलेला हा टोलेजंग समारंभ गेल्या बुधवारीं संध्या-काळीं वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर मोठ्या थाटानें झाला. असा प्रेक्षणीय समारंभ पुण्यास अलीकडे बरींच वर्षे पहाण्यांत आला नव्हता असें म्हणतात. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कोल्हापुरचे महाराज आणि उपाध्यक्ष कागल व मिरज येथील संस्थानिक या समारंभाकरतां येथें मुद्दाम आले होते. श्रीमंत छत्रपति शाहू महाराज यांचे सांगण्यावरून हें कॉलेज उघडण्याचा मान आपणांस मिळाला याबद्दल नेक नामदार लॉर्ड सँडर्स्ट यांनींही मोठा आनंद प्रदर्शित केला. ज्यांच्या चिंतनामुळें व परिश्रमामुळें न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, व फर्ग्युसन कॉलेज या संस्था अस्तित्वांत आल्या त्यांना हा समारंभ पाहून आपण कृतकृत्य झालों असें मनांतल्या मनांत वाटलें असेल यांत संशय नाहीं. १८८० चे जानेवारी महिन्यांत ज्या तिघांनीं मोरोबा दादांच्या वाड्यांत न्यू इंग्लिश स्कूल काढलें त्यांपैकीं निदान दोघांना तरी आज आपण जें बीं लावीत आहों त्यापासून पंधरा वर्षांनीं असा वृक्ष निपजेल अशी कल्पनाही कधीं आली नसेल; कारण कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर नोकरी सोडून घरीं बसले व खासगी शाळा काढण्याचा विचार करूं लागले तेव्हां महागांवकर, नातू, बाबा गोखले व भावे यांच्या खासगी शाळेहून विशेष निराळया तऱ्हेची खासगी शाळा काढण्याचा त्यांचा हेतु होता असें आम्हांस वाटत नाहीं. रा. नामजोशी यांना तर त्या वेळीं वर्तमानपत्र चालविणें, शाळा घालणें, अथवा चित्रशाळा काढणें या तिन्हींही गोष्टी बहुधा सारख्या महत्वाच्या वाटत. ज्ञानवृद्धीसारखें आणि ज्ञानप्रसारासारखें मनुष्यसुधारणेचें दुसरें प्रशस्त साधन नाहीं; हिंदुस्थान देशाला कधीं काळीं सुदशा प्राप्त झाली तर तीही ह्याच साधनामुळें होणार आहे; सरकारकडून लोकांस मिळत अस-लेलें शिक्षण अगदीं अपुरें व कांहीं अंशीं एकदेशीय आहे; तेव्हां ज्यांना आपल्या देशबंधूंच्या कल्याणाविषयीं खरी कळकळ असेल, व ज्यांना आपल्या देशाचें पाऊल उत्तरोत्तर पुढें पडत जाऊन अखेरीस त्याला पहिल्या प्रतीच्या देशांत स्थान मिळावें अशी उत्कट इच्छा असेल त्यांनीं मोठ्या कष्टानें संपा-दिलेल्या विद्येचा संकुचित स्वार्थसाधनाकडे व्यय न करतां आपणांकडून होईल तितकें लोकशिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्याकरतां निवतील

तितक्या खासगी शाळा व कॉलेजें काढून सरकारी विद्याखात्यासारखें खासगी विद्याखातें स्थापिलें पाहिजे, असे विचार ज्यांच्या मनांत घोळत होते, आणि ते तडीस जाण्यास चांगल्या रीतीनें चालविलेल्या एका चांगल्या खासगी शाळेपासून व कॉलेजापासून आरंभ केला पाहिजे असें ज्यांना पक्कें कळून चुकलें होतें त्यांना देखील पुरीं पंधरा वर्षें लोटलीं नाहींत तों चतुःशृंगीच्या रखरखीत मैदानांत डोंगराच्या पायथ्याशीं शुद्ध मुरमाड व काताळ जमिनीवर भव्य व रमणीय सरस्वतीमंदिर दिसूं लागून त्याच्या आसमंतात् तिच्या सेवेंत तत्पर असलेल्या विद्यार्थ्यांस आणि अध्यापकांस सुखानें रहातां येण्यासारख्या दुसऱ्या इमारती बांधल्या जातील असें वाटण्याचा संभव नव्हता. या प्रेक्षणीय इमारती आणि हा स्पृहणीय समारंभ पहाण्यास रा. वा. शि. आपटे जिवंत असते तर त्यांस पराकाष्ठेचा आनंद झाला असता यांत संशय नाहीं. पण दुर्दैवानें या संस्थांच्या चालकांत थोड्या वर्षांपूर्वी जो तीव्र मतभेद झाला तो होऊन जी फुटाफूट झाली ती झाली नसती तर राजश्री नामजोशी व रा. पाटणकर व विशेषतः रा. बा. गं. टिळक यांना या समारंभापासून रा. आपटे यांच्या इतकेंच समाधान वाटलें असतें, अशी आमची पक्की खातरी आहे.

"लाख दोन लाखांची खासगी किंवा सार्वजनिक इमारत पुण्यास वारंवार बांधली जात नाहीं हें खरें आहे; आणि म्हणूनच ती कोठें होऊं लागली म्हणजे ती पहाण्यासाठीं झुंडीच्या झुंडी पडूं लागतात. पण मुंबईची तशी गोष्ट नाहीं. तेथें लाखावरच्या दहा पांच इमारती प्रतिवर्षी उठत आहेत. असें असून मुंबईचे समंजस लोक देखील फर्ग्युसन कॉलेजची इतकी प्रशंसा कशाकरतां करितात ? आमच्या मतें फर्ग्युसन कॉलेजाची जी स्तुति करण्यांत येते ती मुख्यतः इमारतीच्या सुरेखपणासाठीं किंवा तिच्याकरतां खर्च केलेल्या रकमेसाठीं नव्हे, तर फर्ग्युसन कॉलेज ज्यांच्या परिश्रमामुळें अस्तित्वांत आलें, ज्या हेतूनें ही इमारत त्याकरतां बांधली गेली, व तींत चालणाऱ्या सांप्रत व भावी शिक्षणाचा महाराष्ट्र देशाच्या स्थितीवर जो सुपरिणाम होईल असें वाटत आहे त्यांसाठीं लोक दोन चांगले शब्द बोलत आहेत. कॉलेजांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोईच्या दृष्टीनें पाहिलें तर ही इमारत गांवाच्या बाहेर उघड्या मैदानांत झाली हें फार उत्तम झालें. पण फर्ग्युसन कॉलेज निराळें झाल्यामुळें न्यू इंग्लिश स्कुलाशीं आजपर्यंत त्याचें जें संघटन होतें त्यांत थोडें बहुत अंतर पडणें अपरिहार्य आहे. या अंतरामुळें लाईफ मेंबर्स यांच्या अंतःकरणांत एकमेकां-

विषयीं असलेलें प्रेम कमी न होऊं देण्याविषयीं काळजी घेतली पाहिजे. शाळेंतील शिक्षकांचा कॉलेजाशीं व कॉलेजांतील शिक्षकांचा शाळेशीं थोडा-बहुत संबंध नेहमीं कायम ठेविला पाहिजे असें आम्हांस वाटतें. तसें करणें कदाचित् थोड्या खर्चाचें व गैरसोईचें असेल. परंतु "युनियन इज् स्ट्रेंग्थ" हें वाक्य यथार्थ होण्यास तो खर्च व ती गैरसोय सोसणें जरूर आहे असें परिणामीं दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. तात्पर्य, जेणेंकरून कोणाच्याहि अंतः-करणांत कोणत्याही कृत्रिम विषमतेची शंका येणार नाहीं अशा प्रकारची व्यवस्था ठेवण्यास सर्वांनीं मनापासून झटलें पाहिजे. डेक्कन एज्युकेशन सोसाय-टीचे हेतु परिपूर्ण होण्यास येथें जें मॅनेजिंग बोर्ड आहे त्यांत व त्याप्रमाणें इतर ठिकाणीं जीं मॅनेजिंग बोर्डें स्थापण्यांत येतील त्यांत वर सांगितलेल्या रीतीनें व अन्य रीतीनें होईल तितकें बंधुप्रेम वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें उघडच आहे; कारण खलाशी आपआपसांत तंटा करूं लागतील तर त्यांच्या हातांत असलेलें तारूं कधींही नीट चालावयाचें नाहीं; पण त्यांच्यांत सख्य असूनहि त्या सर्वांची, विशेषतः त्यांतील तांडेलादि अधिकाऱ्यांची होक्यावर नीट नजर नसेल तर त्यावर येणाऱ्या दुर्घट संकटापासून त्याचा निभाव लाग-णार नाहीं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या जहाजावर नोकरीस रहाणारा प्रत्येक खलाशी व अधिकारी संसारदिशादर्शक होक्याच्या ज्ञान आणि नीति या दोन कांट्यांवर सारखी नजर ठेवून आपलें कर्तव्य करील तर त्याला हवें तसलें वादळ व खडक चुकवितां येऊन इष्ट बंदरीं आपलें तारूं सुखरूपपणें नेऊन लावतां येईल!"*

या प्रसंगीं गव्हर्नरापासून सर्वांचीं झालेलीं भाषणें आगरकरांना व त्यांच्या सहकाऱ्यांना फार समाधान वाटण्यासारखीं होतीं. संस्थेच्या मूळ स्थापकांपैकीं आगरकरच काय ते हा समारंभ पहाण्यास उरले आणि या समारंभानंतर त्यांचीही आयुर्मर्यादा फार दिवस टिकली नाहीं. पण हा समारंभ त्यांना पहावयास मिळाला ही गोष्ट अत्यंत आनंददायक झाली यांत शंका नाहीं. ज्या संस्थेचा आपण पाया घातला आणि जिच्याकरतां आपण आपलें तनुमनधन सर्वथा अर्पण केलें ती आतां उत्तम प्रकारें उभी राहिली हें पाहून कृतसाफल्य झाल्याप्रमाणें त्यांना वाटणें साहजिक होतें. या समारंभाचे वेळीं कोल्हापुरचे

---

* सुधारक, १-४-९५.

महाराज म्हणाले:—"प्रत्येक वर्षी या संस्थेमधून अनेक विद्यार्थी विश्वविद्यालयाच्या परीक्षेंत पास होत आहेत व मानदर्शक पदव्या व बक्षिसें मिळवीत आहेत. पण मी जी या सोसायटीची किंमत व योग्यता मानतों ती या नुसत्या परीक्षांवरून मानीत नाहीं. या मंडळीच्या प्रस्थापकांनीं त्यागाचें जें अनुकरणीय उदाहरण पुढील पिढीस घालून दिलें आहे व योग्य कामीं त्यांनीं जी स्तुत्य कळकळ व्यक्त केली आहे तीच माझ्या समजुतीनें विशेष प्रशंसार्ह आहे." नामदार गव्हर्नर साहेब आपल्या भाषणांत म्हणाले:—"ज्या कार्याकरितां मी हा प्रवास अंगिकारिला आहे त्याहून अधिक योग्यतेचें दुसरें एखादें कार्य शोधून काढतां येणें फार कठीण आहे. हें कॉलेज नेटिव्ह लोकांनीं केवळ आपल्या स्वतःच्या हिंमतीवर चालविलें आहे व तें उघडण्याचा मला प्रसंग आला ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय होय.........आपल्या फार दिवसांच्या अविश्रांत श्रमाचें चीज होण्याची ही सुसंधि प्राप्त झाली आहे, हें पाहून या कॉलेजाच्या उत्पादकांस मोठी धन्यता वाटावी हें केवळ साहजिक आहे. तथापि या मानवी संसारामध्यें दुःखच्छायेनें ग्रस्त झाला नाहीं असा आनंदसमय क्वचितच्च प्राप्त होत असतो. ही कॉलेजाची उभारलेली इमारत शेवटास नेण्याच्या कामीं ज्या गृहस्थांनीं आजपर्यंत श्रम केले आहेत व ज्यांचा त्या संस्थेशीं निकट संबंध आहे त्यांस आजच्या समयीं कै. चिपळूणकर, आपटे, धारप व तेलंग या गृहस्थांचें स्मरण झाल्यावांचून रहाणार नाहीं........." डॉ. सेल्बी यांनीं गव्हर्नर साहेबांचे आभार मानतांना कॉलेजासाठीं वर्गणी गोळा करण्याकरितां प्रो. गोपाळ कृष्ण गोखले यांनीं केलेल्या कामगिरीचा गौरवपर उल्लेख कॉलेजच्या व्यवस्थापकांच्या तर्फे केला. हा समारंभ झाल्यावर फर्ग्युसन कॉलेज अनेक संकटांतून निभावून स्थिर पायावर उभें राहिलें अशी सर्वांची खात्री झाली. मात्र गव्हर्नरांनीं म्हटल्याप्रमाणें संसारांत दुःखच्छायेनें ग्रस्त झाला नाहीं असा आनंदसमय नसतोच याची जाणीव मात्र महाराष्ट्राला लौकरच व्हावयाची होती. आगरकर कॉलेजचे प्रिन्सिपॉल आणि संस्थापक या दोनीही नात्यांनीं या समारंभांत प्रमुखत्वानें वावरले ही गोष्ट खरी, पण मृत्यूच्या भीषण ग्रहणाचा वेध त्यांना यापूर्वींच लागून राहिला होता. तथापि त्या समारंभाला हजर असलेल्या लोकांना कॉलेजची पुढची टर्म सुरू होण्याच्या वेळेला आगरकर पुनः या इमारतींत पहावयास मिळणार नाहीं असें वाटलें नाहीं. आगरकरांच्याहि पूर्वी थोडे दिवस सोसायटीचा दुसरा एक नामांकित

सभासद मृत्युवश व्हावयाचा होता आणि त्याचा मृत्युलेखहि आगरकरांच्या लेखणीची महाराष्ट्रीय वाचकांना शेवटची देणगी व्हावयाची होता.

८. या समारंभानंतर उन्हाळ्याची सुटी थोडे दिवसांनीं सुरू झाली. आगरकरांची प्रकृति दिवसेंदिवस अधिक क्षीण होत चालली होती. हवाफेर करावा असें त्यांच्या मनांत होतें पण त्यांच्या दम्याच्या विकाराला थंड हवा चालण्यासारखी नव्हती. त्यामुळें उन्हाळा संपेपर्यंत त्यांना कोठें जाणें शक्य झालें नाहीं. पावसाची सुरवात झाल्यावर मिरजेला जाऊन रहावयाचा विचार त्यांच्या मनांत घोळत होता. कॉलेजची इमारत खुली झाल्यावर त्यांना सुरू केलेलें कार्य तडीला गेलें असें समाधान वाटलें. प्रकृति इतकी वाईट होती म्हणून त्यांच्या आनंदी स्वभावांत बिलकूल अंतर पडलें नाहीं. स्नेही मंडळीशीं गप्पा गोष्टी करतांना त्यांच्या निर्मल पण आल्हाददायक विनोदाचा प्रवाह अप्रतिहतपणें चालत असे. दम्यासाठीं त्यांनीं अनेक औषधें घेऊन पाहिलीं. एकदां ते विनोदानें म्हणाले:—" या दम्यासाठीं इतकीं औषधें माझ्या पोटांत गेलीं आहेत कीं मी मेल्यावर जर माझें पोट एखाद्या वैद्यानें ठेऊन दिलें तर त्याच्या हातांत एक दवाखाना आल्यासारखें होईल." हा त्यांचा विनोद जरी त्या वेळीं हंशा उत्पन्न करी तरी त्यांच्या मित्रांच्या अंतःकरणांत कालवाकालव केल्याशिवाय रहात नसे. मृत्यूची गोष्ट निघाली म्हणजे ते म्हणत:—"आतां मी मरणाला तयार आहें. मला लोकांना जें सांगावयाचें होतें तें मी सांगून टाकलें आहे." याप्रमाणें दिवसामागून दिवस चालला होता. सुधारकाचें काम देवधर आणि गोखले—विशेषतः देवधर पहात असत. ते आगरकरांना शक्य तेवढें काम न पडावें अशी खबरदारी घेत. अशा स्थितींत फर्ग्युसन कॉलेजचे इंग्रजीचे प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर हे मे महिन्यांत मृत्युमुखीं पडले. फर्ग्युसन कॉलेजच्या शिक्षणसंबंधीं लौकिकाला ज्या व्यक्ति कारणीभूत झाल्या आहेत त्यांत केळकर हे फार वरती आहेत. त्यांची इंग्रजी शिकविण्याची हातोटी पाहून साहेब लोक सुद्धां आश्चर्य करीत. वामनराव आपट्यांच्या मृत्यूपासून आगरकरांचें अंतःकरण अतिशय विव्हल झालें होतें. त्या अंतःकरणाला केळकरांच्या मृत्यूनें शोकाचा अतिशय भर आला हें साहजिक आहे. आगरकरांच्यावर फर्ग्युसन कॉलेजांतील अध्यापकाचा मृत्युलेख लिहिण्याचा हा चौथा प्रसंग आला ! " कोणाही मनुष्याची मृत्युवार्ता प्रसिद्ध करणें ही मोठी अनिष्ट गोष्ट आहे. पण त्यांतल्या त्यांत जेव्हां अगदीं जवळच्या आप्ताच्या किंवा

मित्राच्या संबंधानें मृत्युलेख लिहिण्याचा प्रसंग येतो तेव्हां हा पत्रकर्तेपणा पत्करला नसता तर बरें झालें असतें असें वाटतें. ज्या शाळेशीं व कॉलेजाशीं आमचा निकट संबंध आहे त्या दोन संस्था स्थापित झाल्यापासून त्यासंबंधानें हा चवथा मृत्युलेख लिहिण्याचा प्रसंग आम्हांवर येऊन गुदरला आहे !"* केळकरांचा मृत्युलेख हा आगरकरांचा सुधारकांतील शेवटचा लेख असें म्हणतात. या वेळीं आपला मृत्यु फार दूर नाहीं हें त्यांनीं ओळखिलें होतें. पण त्यांनीं स्वतःच्या प्रकृतीसंबंधीं कोणाला त्रास म्हणून दिला नाहीं. रोज कांहीं वाचावें, थोडेंसें लिहावें, स्नेहीमंडळी घरीं येऊन बसत त्यांच्याशीं गप्पा गोष्टी कराव्यात अशा प्रकारें त्यांचा नित्यक्रम चालला होता. सुधारकांत जरी लिहिण्याचें त्यांनीं मंडळीच्या आग्रहामुळें बंद केलें होतें तरी पत्रांत मजकूर काय येणार वगैरे गोष्टींवर त्यांची नजर असे. ता. १५ जून शनिवार रोजीं सीतारामपंत देवधर त्यांना भेटण्यास गेले होते. त्या प्रसंगाचें वर्णन देवधरांनीं केलेलें आहे:—"त्या वेळीं त्यांनीं घेतलेल्या एका जालिम रेचकाच्या औषधामुळें ते (आगरकर) इतके निशक्त होऊन गेले होते कीं त्यांना बोलण्यापासूनही श्रम होत आहेत असें मला दिसून आलें. तेव्हां मी त्यांना म्हणालों कीं बोलण्यानें तुम्हांस अधिक त्रास होण्याचा संभव आहे. करितां तुम्ही आतां बोलण्याचे श्रम न करतां स्वस्थ पडून रहा म्हणजे तुम्हांस जरा बरें वाटेल. यावर त्यांच्या तोंडून जे उद्गार निघाले ते रा. केळकरकृत टिळकचरित्र, भाग ८ वा, पृष्ठ २०१, यांत केलेल्या एका विधानाशीं अत्यंत विसंगत असल्यामुळें त्या दोहोंत मेळ कसा घालावा हें एक कोडेंच होऊन बसतें ! रा. केळकर लिहितात:—"सार्वजनिक वादांत शिवीगाळी झाली असतांही अखेरच्या दुखण्यांत आगरकरांना टिळकांची आठवण होऊन त्यांनीं त्यांस मुद्दाम भेटीला बोलावून आपलें दुःख हलकें केलें." केळकरांचें हें विधान आणि मी त्यांना फार बोलण्यापासून परावृत्त करीत असतां त्यांच्या तोंडून निघालेले उद्गार यांच्यांत मेळ घालतां येणें मुळींच शक्य नाहीं. आगरकर मला म्हणाले:—"तुम्ही चुकतां. मनांत वास्तविक तेढ असून बाह्यात्कारीं मात्र प्रेमाचा आव आणूं पहाणाऱ्याच्या भाषणापासून तुम्ही म्हणतां तसा आजारी माणसाला त्रास होतो हें कांहीं खोटें नाहीं. कारण तुम्ही येण्यापूर्वी थोडा वेळ टिळक येथें येऊन नक्राश्रु

* सुधारक, २०-५-९५.

गाळीत बसले होते. त्यांना पहातांच त्यांच्या आमच्यांत घडून आलेल्या अनेक अनिष्ट प्रसंगांचें स्मरण होऊन माझें मन अस्वस्थ झालें व हे येथून केव्हां एकदांचे जातात असें मला होऊन गेलें होतें. तुमची गोष्ट तशी नाहीं. मी तुमच्याशीं कितीही वेळ बोलत बसलों तरी त्यापासून मला त्रास न होतां उलट थोडें बरेंच वाटेल. शिवाय मला तुमच्याशीं एका महत्वाच्या गोष्टीबद्दल बोलणें जरूरही आहे. आज दुपारपासून, आपल्यामागें सुधारकाचें कसें होणार हा एकच विचार माझ्या मनांत घोळत असून तुम्हांला बोलावणें पाठवून तुमच्याजवळ ही गोष्ट काढावी, असेंही एकदां मला वाटलें. परंतु तुम्ही आज सुधारकाच्याच कामांत गुंतलां असाल हें मनांत येऊन, काय करावें या विवंचनेंत मी होतों. तों अनायासें तुम्हीच वेळांत वेळ काढून मला भेटण्यासाठीं येथें आलांत हें पाहून माझी विवंचना आयतीच दूर झाली." हें त्यांचें बोलणें ऐकतांच त्यांना मध्येंच थांबवून मी म्हणालों—"तुम्हांला आपल्या स्वतः-संबंधानें इतकें निराश होण्यासारखी तुमच्या दुखण्याची स्थिति आहे असें मला वाटत नाहीं व सुधारकासंबंधानें काळजी करण्याचें तर तुम्हांला मुळींच कारण नाहीं. कांहीं झालें तरी सुधारक असाच पुढें चालू ठेवण्याबद्दल मी आपली पराकाष्ठा केल्यावांचून रहाणार नाहीं, याबद्दल तुम्ही अगदीं निर्धास्त असा." वरील आशयाचें आम्हां दोघांचें आणखी थोडा वेळ भाषण झाल्यावर मी त्यांचा निरोप घेऊन तेथून परत आलों." वर आल्याप्रमाणें शेवटीं त्यांना सुधारकासंबंधीं चिंता लागून राहिली होती. स्वतःच्या बायका-मुलांसंबंधीं त्यांना चिंता वाटत नव्हती असें नाहीं. पण त्यांचे मामा दत्तोपंत भागवत यांनीं त्यांना निक्षून सांगितलें होतें कीं "तुमच्यामागें तुमच्या कुटुंबाचा सर्व भार मजवर आहे. त्यांना मी अंतर देणार नाहीं. त्यांची तुम्ही काळजी करू नका." आणि मामाभाच्यांचें प्रेम एवढें निःसंदेह होतें कीं या आश्वासनानंतर तें कृतींत उतरेल याबद्दल त्यांना मुळींच शंका नव्हती. शनिवारीं आगरकरांनीं जें रेचक औषध घेतलें म्हणून देवधरांनीं उल्लेख केला आहे तें मोठें जबर होतें असें दिसतें. त्या औषधामुळें त्यांचा शक्तिपात झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंवा त्यांच्या क्षीण झालेल्या शरीराच्या अतिक्षीणतेला तें निमित्तकारण झालें असें म्हटलें तरी चालेल. रविवारीं ते अगदीं

* माझा जीवनवृत्तांत, पृष्ठ १३९.

अशक्त स्थितींत होते. रविवारीं रात्रीं ते उठले व स्वतः शौचाला जाऊन आले. आल्यावर हातपाय धुऊन ते आपल्या कुटुंबाला म्हणाले:—"आतां मला थोडें बरें वाटतें आहे. मी आतां निजतों. आणि तुम्हीही निजा." एवढ्या हुषारीनें जें माणूस बोलतें त्याच्यावर मृत्यूनें पाश टाकून त्याला हस्तगत केलें आहे असें त्यांच्याजवळच्या माणसांना तरी कसें वाटावें ? पण आगरकर जें बरें वाटतें म्हणून प्रसन्न चित्तानें बिछान्यांत जाऊन झोंपले ते कायमचे झोंपले. ता. १७ जून १८९५ सोमवारीं पहाटे ( ज्येष्ठ वद्य दशमी १८१७ रोजीं ) आगरकरांच्या रोगानें ग्रस्त झालेल्या शरीराला महानिद्रेनें शेवटची आणि कायमची विश्रांति दिली. तिकडे आर्यविजय छापखान्यांत सुधारकाच्या सातव्या वर्षाचा ३६ वा अंक छापून होत होता किंवा निघाला होता आणि इकडे फर्ग्युसन कॉलेजच्या त्या वेळीं फारशी लोकवस्ती नसलेल्या आवारांत सुधारकाच्या जनकाचा याप्रमाणें अंत झाला. पहाटे घरची मंडळी उठतात आणि पहातात तों घरचा धनी मृत्युवश झालेला. आपली तोशीस म्हणून आगरकरांनीं कधीं कोणाला पडूं दिली नाहीं आणि मृत्यूच्या दिवशींसुद्धां त्यांच्यामुळें कोणाला ती पडली असें झालें नाहीं. त्यांच्या मृत्यूची दुष्ट वार्ता पसरण्याला काय उशीर लागणार ? कॉलेजांतील शिक्षक आणि विद्यार्थी लागलीच गोळा झाले. गोपाळराव गोखले अतिशय घरोब्याचे. त्यांनीं आंत जाऊन आपल्या थोर सहकाऱ्याचें, पूज्य गुरूचें आणि प्रेमळ मित्राचें शेवटचें दर्शन घेतलें. शहरांतील मंडळीही जमा झाली. त्यांत रा. टिळक वगैरे त्यांचे पूर्वाश्रमांतील मित्रही हजर होते; आणि सोमवारीं ( १७ जून ) सकाळीं मुळामुठेच्या तीरावर त्यांचा भौतिक देह सर्वभक्षक अग्नीनें हजारों मित्रांच्या व शिष्यांच्या दुःखकल्होळांत भस्मसात् केला !

९. आगरकरांच्या मृत्यूनें महाराष्ट्रांत सर्वत्र उदासीनता पसरली व त्यांच्याशीं मतभेद असणाऱ्यांनाही पराकाष्ठेचें दुःख झालें. ता. २४ जूनच्या सुधारकांतील इंग्रजी अग्रलेख गोपाळराव गोखल्यांच्या हातचा आहे. लेखावर शेक्सपीयरचें प्रसिद्ध अवतरण दिलें आहे.—" सव गुण त्याच्या ठिकाणीं असे एकवटले होते कीं सृष्टिदेवतेनें उभें राहून सर्व दुनियेला जाहिर करावें कीं हा एक महापुरुष होऊन गेला !" या लेखांतील कांहीं भाग येथें देतों:—"एका थोर पुरुषानें शेवटची विश्रांति घेतली......त्यांच्या मृत्यूनें पुणें किंवा महाराष्ट्र येथेंच नव्हे तर सर्व देशाला दैन्य आलें आहे !......त्यांच्या मृत्यूमुळें सोसा-

यटींतील आजन्म सदस्यांचा लाडका मित्र, पूज्य सहकारी, अनुभवी मार्गदर्शक आणि ज्यावर त्यांचा विश्वास होता असा पुढारी नाहींसा झाला. स्वतंत्र शाळा आणि कॉलेज काढण्याची कल्पना पंधरा वर्षांपूर्वीं काढून ज्यांनीं लोकशिक्षणाला आपणाला सर्वस्वी वाहून घेतलें त्या थोर विभूतींपैकीं ते शेवटचे, त्यांपैकीं उरलेले एकटे, असें त्यांना वाटे......जन्मतःच मोठेपणा मिळणें हें एक मोठें भाग्य आहे, परंतु मोठेपणा संपादन करणें हें भाग्य त्याहून थोर होय. आगरकरांचा जन्म अगदीं गरीब आईबापांच्या पोटीं झाला होता. ते इतके गरीब होते कीं त्यांना आपल्या मुलाला शाळेंत धाडण्याची सुद्धां ऐपत नव्हती. असें असून सुद्धां उत्साह, सततोद्योग आणि त्यांच्या सर्व आयुष्यांत दिसून आलेला दृढ निश्चय या गुणांच्या बळावर त्यांनीं कालेंकरून या इलाख्यांतील शिक्षकांत आणि विद्वान् मंडळींत फार मोठा लौकिक मिळविला......आज सात वर्षें सुधारक पत्र त्यांनीं केवढ्या उत्तम प्रकारें व हिंमतीनें चालविलें याचा निर्णय करणें आम्ही आमच्या वाचकांवर सोंपवितों. परंतु चोहोंकडे निष्कारण निंदा व शिव्यांचा भडिमार चालला असतां लोकांना न आवडणारीं मतें दर आठवड्याला प्रसिद्ध करण्याच्या कामाला विलक्षण धैर्य व स्वतःच्या विचाराबद्दल निःसंदेहपणा असल्यावांचून चालणार नाहीं, एवढें मात्र म्हटल्यावांचून रहावत नाहीं. सुधारणेच्या कार्याची सेवा त्यांनीं जिवाभावानें केली. आणि त्या सेवेबद्दल लोकांना पुढें केव्हां तरी योग्य कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्यांच्या जिवंतपणीं मात्र त्यामुळें लोकांचा त्यांच्यावर मोठा रोष झाला. तो रोष त्यांनीं धिमेपणानेंच नव्हे तर आनंदानें सोसला. आगरकरांच्या मृत्यूमुळें आमच्या कार्यकर्त्या पुरुषांत जी जागा रिकामी झाली आहे ती भरून निघण्यास पुष्कळच काळ लागेल. त्यांच्याशीं तुलना करतां येण्यासारखा दुसरा पुरुष आज कोण आहे म्हणून आम्ही सर्वत्र पहातों पण कोणी दिसत नाहीं. विदग्ध पंडित, यशस्वी त्याचप्रमाणें कळकळीचा शिक्षक, निस्सीम देशभक्त, त्यांचें धैर्य अत्यंत निर्भय, त्यांच्या शीलाचा जोर विलक्षण, असे आगरकर होते. समोर मोठ्या उच्च कल्पना ठेवावयाच्या व शक्य तितकें त्यांना अनुसरून वर्तन ठेवावयाचें असा आगरकरांचा बाणा होता. त्यांची कर्तव्यनिष्ठा व सत्य आणि निग्रह याबद्दल भक्ति ही जशी कडकडीत होती त्याचप्रमाणें त्यांचें धैर्य अभंग होतें आणि त्यांची बुद्धि निश्चल होती. खासगी आयुष्यक्रमांत आगरकर अतिशय साधे आणि प्रेमळ होते. त्यांच्यासारखी

माणसें कित्येक वर्षांत एखादे वेळींच जन्माला येतात आणि त्यामुळें त्यांचा मृत्यु म्हणजे राष्ट्रीय आपत्ति होय."

त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला व डेक्कन एज्युकेशन सोसायटीला सहानुभूतिपर पत्रें मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सॅन्डहर्स्ट, कोल्हापूरचे महाराज शाहू छत्रपति, इंदूरचे महाराज शिवाजीराव होळकर यांजकडून व इतर अनेक पुढाऱ्यांकडून आलीं. त्यांत रा. ब. रानडे, प्रिन्सिपाल सेल्बी, मि. (पुढें सर) दिनशा वाच्छा, वगैरे मंडळी होती. त्यांच्या मृत्यूनंतर दुसरे दिवशीं केसरी निघाला (१८ जून) त्यांत रा. टिळक यांनीं लिहिलेला लेख प्रसिद्ध झाला. त्यांत लिहिलें होतें:—"हल्लीं चतुःशृंगीच्या मैदानावर जी भव्य इमारत उभारली आहे, व ज्या इमारतीच्या आवारांतच त्यांच्या फार दिवसांच्या इच्छेनुरूप गोपाळरावजींचें देहावसान झालें, ती इमारत आपल्या आयुष्यांत केव्हां तरी उभी करण्याच्या उद्योगास लागावें व त्याकरितां आपलें सर्व आयुष्य खर्च करावें असा ज्या थोड्या गृहस्थांनीं सन १८७९ सालीं पुष्कळ विचाराअंतीं निश्चय केला होता त्यांपैकींच प्रि. आगरकर हे एक होते व तेव्हांपासून त्यांचा व प्रस्तुतच्या केसरीच्या एडीटराचा जो निकट संबंध जडला होता त्यामुळें त्यांचा मृत्युलेख लिहिण्याचें दुर्घट काम आपल्या हातून कसें काय निभावेल याची केसरीस बरीच शंका वाटत आहे. गेल्या पांच सहा वर्षांत त्यांच्या व आमच्या दरम्यान् असलेला मतभेद बराच लोकांपुढें आलेला आहे. पण मृत्यूचें स्वरूप इतकें उग्र व भयंकर आहे कीं, त्यामुळें बारीक सारीक गोष्टी विसरून जाऊन प्रथमतः दृढनिश्चयानें त्यांनीं व आम्ही कांहीं विशिष्ट लोकोपयोगी कार्यें करण्याचें मनांत आणलें व त्यानंतर तीं कार्यें सिद्धीस नेण्याकरितां एकदिलानें घरीं, दारीं, कारागृहीं जे बेत व उद्योग केले त्यांचें तीव्र स्मरण पुनः पुनः जागृत होऊन आमची बुद्धि व लेखणी गोंधळून जाते!......विद्येनें आणि अंगच्या हुषारीनें आपण इतर लोकांचाच क्रम स्वीकारल्यास चांगलें यश संपादन करूं अशी बहुतेक खात्री वाटत असतां केवळ एक लोकोपयोगी हेतु मनांत धरून त्याकरितां आजन्म दारिद्र्य, विपत्ति, उपेक्षा अगर निंदा सहन करण्यास तयार होण्याचें ज्यांनीं धैर्य दाखविलें आहे असे महाराष्ट्रांत किंबहुना आमच्या या विपन्न देशांत सध्यां तरी थोडेच पुरुष निपजतात......डेक्कन आणि एल्फीन्स्टन कॉलेजांतून बी. ए. अगर एम्. ए. थोडे झाले आहेत असें नाहीं; पण गरिबीस न भितां अथवा सुखाची अगर संपत्तीची आशा न धरितां ज्या

लोकांच्या पैशानें—सरकार विद्याखात्यावर जो पैसा खर्च करितें तो लोकांचाच आहे—आपणास पाश्चिमात्य विद्येचा संस्कार घडला आहे त्याचें आपण हल्लींच्या देशकालानुरूप कोणत्या रीतीनें उतराई व्हावें याचा कोणी विचार केला व कोण करताहेत हें पाहिलें म्हणजे रा. आगरकर यांची योग्यता सहज कळून येईल......" ता. २४ जूनच्या सुधारकांत "एका विद्यार्थ्याचें" पत्र आलें आहे—आणि तें भाषेवरून कोणा तरी कॉलेजांतील विद्यार्थ्याचें आहे हें उघड होतें—त्यांत म्हटलें आहे:—"कै. प्रिन्सिपालसाहेब! ज्या अज्ञान देशबांधवांसाठीं आपल्या कुटुंबाची, मित्रांची, ज्ञातीची व प्रसंगीं त्या देशबंधूंची तुम्ही इतराजी आनंदानें, खुबीनें, दृढनिश्चयानें सहन केली, तथापि त्यांस म्हणून सोडलेंच नाहीं; शत्रूही बोलणार नाहीं असे शब्द आपल्या निकट मित्रांनीं सार्वजनिक रीत्या आपणांवर टाकिले तरी आपण डगमगलां नाहीं; पतित मनुष्याची जी अवस्था करूं नये ती आपल्या मूर्ख विद्यार्थ्यांनीं व दुराग्रही प्रतिपक्षीयांनीं पुण्यासारख्या शहरांत केली तरी त्या लोकांच्या हिताकडे किंचित्‌ही आपण दुर्लक्ष केलें नाहीं; ज्या स्वार्थबुद्धीचा आपणांस जन्मांतही स्पर्श झाला नाहीं तिचाच आरोप करण्यास जरी कोणी फारसे कचरले नाहींत तरी आपण त्यांस चिटकूनच राहिलां......दारिद्र्यावस्थेंत विद्याभ्यास करून तारुण्यावस्थेंतही निष्कांचनतेच्या पदरीं जो पडला आणि हजारों रुपये प्राप्तीची सुंदर आशा पुढें असतां तिला ज्यानें लाथडलें त्याची निरपेक्षता किती असेल? ज्यानें आपल्या विचाराची दिशा थोडीशी तरी बदलली असती तरी लोकप्रीतीनें मेहेर नजर दाखविली असती—अशा स्थितींतही ज्यानें मनाला चांगलें वाटेल तेंच लिहून व करून कांहीं काळ तरी समाजद्वेष संपादून सुखावर पाणी सोडलें त्याची लोकहितैकनिष्ठा किती तीव्र व दृढ असेल बरें? ........." याचप्रमाणें स्त्रिया, मागसलेल्या जातींतील लोक वगैरेचीं पत्रें त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीं होतीं. त्यावरून आगरकरांच्या मृत्यूनें सर्वत्र दुःख कसें झालें होतें हें निदर्शनास येतें. पण अर्थात् मागें राहिलेल्यांनी कितीही शोक केला तरी तो जो गेला तो गेला. ता. १७ जून १८९५ रोजीं जो महात्मा नाहींसा झाला त्याच्या तुलनेला पुरुष मिळणें कठीण होतें असें जें गोपाळराव गोखल्यांनीं म्हटलें आहे तें निःसंशय खरें आहे. आगरकरांच्या मृत्यूनंतर गोखल्यांना त्यांच्या घरची पुढची व्यवस्था करण्याचा प्रसंग आला. त्यांचे कागदपत्र वगैरे पहातां त्यांत कांहीं रुपये ठेविलेली एक

पुरचुंडी मिळाली. तिच्यावर एक चिठ्ठी मारली होती आणि तीवर लिहिलें होतें "माझ्या प्रेतदहनार्थ"! ती चिठ्ठी वाचून गोखल्यांना रडूं कोसळलें. आपण गरीब, वेळीं प्रसंगीं आपल्या प्रेतदहनार्थ देखील खर्चाची पंचाईत पडेल व आपल्या पत्नीवर अत्यंत दुःखदायक प्रसंग येईल या जाणिवेनें त्यांनीं ही रक्कम एकीकडे काढून ठेविली होती आणि हें त्यांचें कृत्य त्यांच्या एकंदर वर्तनक्रमाला अनुसरून होतें. गोपाळराव आगरकरांना लोकांचें देणें करावयाचें नव्हतें. त्यांना कोणाकडून कांहीं घ्यावयाचें नव्हतें. ते देण्याला या जगांत आले होते आणि त्यांनीं आपलें सर्वस्व अगदीं सढळ हातानें दिलें. ते हात आतां गार झाले. ज्या लेखणींतून सुधारणेचीं तत्वें त्यांनीं मनोहर भाषेंत प्रतिपादन केलीं ती लेखणी त्यांच्या हातून गळल्यानंतर तिला कोणी हातांत धरणारा दुसरा समर्थ पुरुष मिळाला नाहीं. आगरकरांच्यानंतर सुधारक पत्र कांहीं दिवस चाललें, कालांतरानें त्याचें एकदां अल्पकाळ पुनरुज्जीवनही झालें, पण सुधारक पत्राचा अवतार आगरकरांच्या बरोबर संपला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परशुरामाचें धनुष्य उचलण्याला रामचंद्र लागला. आगरकरांची लेखणी हातांत नाचविण्याला त्यांच्या तोडीचा महारथी महाराष्ट्रांत केव्हां निपजेल तेव्हां निपजो.

१०. महाराष्ट्रांतील सुधारणेची परंपरा लावावयाची असेल तर ती ज्ञानदेवापासून लाविली पाहिजे. ज्ञानेश्वरांनीं सर्व जातींना ज्याच्या दर्शनाला व भेटीला प्रतिबंध नाहीं असा पंढरीचा विठ्ठल नवा देव केला आणि स्त्री व शूद्र यांनासुद्धां ब्रह्मज्ञानाची लूट करण्यास मिळावी म्हणून गीतेचा भावार्थ मराठींत आणला. ज्ञानेश्वर आमचे पहिले संत आणि पहिले सुधारक होत. जातिभेदाची कोंडी ज्ञानदेवांनीं फोडली आणि भूतदयेचें दुकान त्यांनीं चालविलें. त्यांच्या मागून एकनाथ आणि नंतर तुकाराम यांनीं तें व्रत चालविलें. या परंपरेंतील चवथे पुरुष म्हणजे गोपाळ गणेश आगरकर होत. आजकालचे वारकरी पंथी कांहींही म्हणोत, भूतदयेचा पंथ, जनहिताचा पंथ, समतेचा पंथ, ज्ञानप्रसाराचा पंथ ज्ञानदेवांनीं काढला. त्याचे दुसरे आचार्य एकनाथ, तिसरे आचार्य तुकाराम आणि चौथे आचार्य आगरकर होत. आणि ज्ञानेश्वरीला ज्ञानदेवाच्या काळीं, एकनाथी भागवताला नाथांच्या वेळीं, आणि अखंडकीर्ति तुकोबाच्या अभंगांना तुकोबांच्या काळीं जें महत्व होतें तेंच महत्व आगरकरांच्या लेखांना प्रस्तुत काळीं आहे यांत मुळींच शंका नाहीं. आगरकरांचें कार्य

आतां कोठें लोकांना समजूं लागलें आहे. आपल्या नांवापेक्षां कार्याची आस्था त्यांना विशेष होती. जरी कधीं काळीं आगरकरांचें नांव लुप्त झालें तरी ज्या सुधारणापुष्पांच्या परिमलानें वातावरण सुगंधित होऊन जाईल त्यांच्या वेलींचें बीजारोपण करण्याचें श्रेय केव्हांहि आगरकरांनाच मिळेल! मराठी भाषेंत आगरकरांनीं लिहिलें हें खरें, तथापि 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' या प्रकारचे जे महात्मे होऊन गेले, आणि बौद्धिक दास्याचा नाश करून मनुष्याच्या उन्नतीला ज्यांनीं अत्यंत उदात्त केलें, अशा जगांतील सत्पुरुषांच्या मालिकेंत त्यांचें नांव चिरंतन झळकावयाचें आहे!* एकूण चाळीस वर्षांच्या आयुष्यांत आगरकरांना कार्य करण्याला अशीं पंधरा वर्षेंच मिळालीं पण त्या पंधरा वर्षांत त्यांनीं जो पराक्रम केला तो पाहिला म्हणजे आयुष्याची किंमत त्याच्या लांबीवर नसून कर्तबगारीवर आहे हें लक्षांत येतें आणि पंधरा वर्षांत ज्यानें एवढी कर्तबगारी केली त्याच्या आयुष्याची दोरी बळकट कां नव्हती म्हणून खिन्नता वाटते. परंतु या मर्त्य जगांत मृत्यूबद्दल तक्रार करून कांहीं फायदा होत नाहीं. जें मिळालें तें मिळालें म्हणून आनंद मानला पाहिजे आणि आगरकरांसारखा मोहरा ३९ वर्षें तरी लाभला म्हणून महाराष्ट्रानें धन्यता मानली पाहिजे. आगरकरांच्या सर्व चरित्राचा शांतपणें विचार केला म्हणजे महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांचा पुढील आर्यार्ध त्यांच्या बाबतींत अगदीं यथार्थ वाटतो.

झाले बहु, होतिल बहु,
आहेतहि बहु, परंतु यासम हा ॥

---

* मनोरंजन, आगरकर अंक, पृष्ठ १७.

# भाग अकरावा.

## भाषासरणी आणि वाङ्मयसेवा

गिरां देवी वीणागुणरणनहीनादरकरा
यदीयानां वाचाममृतमयमाचामति रसम् ।
वचस्तस्याकर्ण्य श्रवणसुभगं पंडितपते—
रधुन्वन्मूर्धानं नृपशुरथवायं पशुपतिः ॥

पंडितराजराजितिलक जगन्नाथराय यानें स्वतःच्या काव्याविषयीं काढलेले हे उद्गार आगरकरांच्या मराठी लेखनाला उत्कृष्टपणें लागू पडतात. त्यांचीं मतें ज्यांना सर्वथा अमान्य आणि त्यांनीं प्रतिपादिलेल्या विचारामुळें हिंदुसंस्कृतीवर मोठा अनर्थ कोसळला अशी ज्यांची समजुत अशांनींसुद्धां त्यांच्या भाषारमणीचें रमणीय तांडव पाहून आनंदानें धन्योद्गार काढलेले आहेत. त्यांचे मित्र आणि पुढें सार्वजनिक आयुष्यांत प्रतिपक्षी बळवंतराव टिळक यांच्या मतें तर मराठी वर्तमानपत्रांना जें महत्व व योग्यता प्राप्त झाली त्याचें बरेंचसें श्रेय आगरकरांना आहे. प्रस्तुत ग्रंथांत आतांपर्यंत विषयानुरोधानें आगरकरांच्या निरनिराळ्या निबंधांतील उतारे पुष्कळच आले आहेत तेवढ्यावरूनसुद्धां आगरकरांची वाणी केवढी रसवंती होती हें पटल्याशिवाय राहणार नाहीं. कोणताही रस सजविण्याची कला त्यांना फार उत्कृष्ट साधली होती आणि लेखणींतून उतरणारे शब्द हे अंतःकरणांत खळबळ करून सोडणाऱ्या विचारांचे दर्शक असल्यामुळें त्यांच्या वाणीला जिवंतपणा आला आहे. त्यांची सरसरमणीय भाषासरणी ही मराठी वाङ्मयाला अतिशय अलंकारभूत आहे ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे, पण भाषेची सरणी ही त्यांच्या मराठी भाषेच्या उत्कृष्ट सेवेची एक अल्प अशी पण ठळक खूण आहे. आधुनिक विचार निव्वळ मराठी वाचकांना समजतील अशा उत्तम मराठींत आणून व त्यासाठीं परभाषेंतील विचारांचे अन्वर्थक

असे मराठी शब्द योजून त्यांनीं केलेली सेवा अपूर्व तर आहेच पण मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त अशीही आहे. "विकारविलसित" नाटकाच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात:—"आपली महाराष्ट्रभाषा अद्यापि बाल्यावस्थेंत असल्यामुळें तींत नानातऱ्हेचे मनोधर्म, मनोव्यापार व तदनुरोधी बाह्य क्रिया व्यक्त करण्याजोगे शब्द नसल्यामुळें कित्येक ठिकाणीं साधारण शब्दांस विशिष्ट अर्थ घ्यावा लागला आहे व कित्येक ठिकाणीं त्यांचा अर्थ विस्तृत करावा लागला आहे." हे उद्गार आगरकरांनीं १८८३ च्या जून महिन्यांत काढले. त्यानंतर बरोबर बारा वर्षांनीं म्हणजे १८९५ च्या जून महिन्यांत आगरकरांची लेखणी विराम पावली. पण एका तपांत महाराष्ट्र भाषेप्रीत्यर्थ त्यांनीं केलेली तपश्चर्या एवढी जबर होती कीं त्यांचे निबंध ज्यांनीं वाचले आहेत ते महाराष्ट्रभाषेला बाल्यावस्थेंत ढकलण्याला किंवा तिच्यापाशीं नाना तऱ्हेचे मनोधर्म व मनोव्यापार यांना अनुरोधक शब्द नाहींत असें म्हणण्याला धजणार नाहींत. या गोष्टीचें सर्व श्रेय जरी एकट्या आगरकरांना देणें न्याय्य होणार नाहीं तरी तिचें पुष्कळसें श्रेय आगरकरांच्याकडे जातें हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. मराठी भाषेंत विचारप्रदर्शनाचें केवढें सामर्थ्य आहे हें ज्ञानेश्वर आणि मोरोपंत, यांच्याप्रमाणेंच आगरकरांनीं आधुनिक काळांत सिद्ध करून दिलें. ज्ञानेश्वर आणि मोरोपंत, एकनाथ आणि मुक्तेश्वर, नामदेव आणि तुकाराम यांनीं संस्कृत भाषेंतील कल्पना व कथा मराठींत आणल्या आणि तसें करतांना शब्दांची नड पडली कीं मूळचे संस्कृत किंवा त्यांचे अन्वर्थक असे प्राकृत शब्द जसेच्या तसे मराठींत आणण्याची त्यांना मुभा होती. आगरकरांना जें कार्य करावें लागलें तें त्याहून फार बिकट होतें. इंग्रजी अगर इतर युरोपीय भाषांतील विचारांना बेमालूम मराठी पेहराव देण्याचें काम संस्कृत विचारांना मराठी स्वरूप देण्यापेक्षां निःसंशय फार कठीण होतें. ट ला ट जोडणारे धीट कवि आणि इंग्रजी शब्दाला मराठी शब्द ठोकून देणारे जाडे भरडे लेखक यांच्यामुळें भाषेला कांहीं साह्य होत नसतें. हीं कामचलाऊ माणसें आलेली वेळ कशी तरी मारून नेतात. आगरकरांनीं इंग्रजींतील विचार शक्य तेवढ्या अस्सल मराठी पेहरावांत मराठी वाचकांपुढें मांडले. इंग्रजी येत नव्हतें त्यांनाही ते समजण्याला हरकत पडली नाहीं. हे विचार मराठींत आणतांना ही शब्दसंपत्ति त्यांनीं उत्पन्न केली नसली तरी प्रकाशांत आणली आहे तिचा उत्कृष्ट अभ्यास होईल तर अलीकडे मराठी भाषेला जें

गंगाजमनी किंवा आगरकरांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "गोळकी" स्वरूप आलें आहे व ज्यामुळें निव्वळ मराठी वाचकांना तिच्या शब्दांमागील अर्थाचा मागमूस लागणें कठीण होत चाललें आहे तें स्वरूप अस्तंगत होऊन तिला स्वाभाविक स्वरून प्राप्त होईल. "निःपक्षपातीपणा" ( impartiality ) या दांडगट शब्दापेक्षां "समीक्षता" हा शब्द कानाला किती तरी गोड लागतो. परिणामकारक ( effective ) या लांबलचक शब्दापेक्षां कार्यकर हा शब्द सुटसुटीत वाटतो. "सेवाकुल" हें विशेषण नोकऱ्या धुंडण्यासाठीं खिशांत सर्टिफिकिटें भरभरून रस्तोरस्तीं फिरणाऱ्या "पदवीधरांना" किती तंतोतंत लागू पडते. "साम आणि संग्राम," "स्थिति आणि प्रगति" ( order and progress ), विक्रेता आणि ग्राहक, बुद्धिबळ, बाहुबळ, नियामक आणि नियत, वगैरे शब्दांच्या जोड्या किती यथार्थ वाटतात. "दर्दुरानुकारी वैदिक," "गॅग्या लढवय्या," "गांवढळ अर्थशास्त्री," "नागरिक लोकसंख्या ( urban population )" आणि "जानपदीय लोकसंख्या (Rural population)" वगैरे वर्णनपर शब्द केवळ मराठी जाणणाऱ्यालासुद्धां आकर्षक वाटतात आणि समजतात. "पारधीवृत्ति, धनगरवृत्ति, शेतकरीवृत्ति आणि व्यापारीवृत्ति" या शब्दांचे अर्थ कळण्याला इंग्रजींतील अर्थशास्त्राच्या एखाद्या पुस्तकाचें अध्ययन प्रथम केलें असण्याची जरूर नाहीं. खुशामतखोरांच्या वागणुकीला "नर्मसाचिव्य" हा शब्द अस्सल स्वदेशी असून खुसखुशीत आहे व त्याचा प्राकृतांतील अर्थ इंग्रजींतील ( Butter ) या शब्दाचा अगदीं अन्वर्थक आहे. "मनोलाघव" हा अंतःकरणाच्या हलकटपणाला दर्शविणारा शब्द जसा प्रौढ तसा अर्थपूर्ण आहे. लोकप्रिय याच्या उलट अर्थाचा एक शब्द 'तशाच तऱ्हेचा' मराठींत नाहीं म्हटलें तरी चालेल. पण "अनभिमत" या शब्दाचा उपयोग आगरकरांनीं सुधारकांत अगदीं सुरवातीला केला आहे. ऋतूत्तरकन्याप्रदान ( post puberty marriage ), सुखावस्थेची परमावधि (maximum of happiness), श्रेष्ठायत्त कुटुंब ( patriarchal family ), स्खलनशील ( fallible, fallacious ), तारुण्यातीत ( past youth), लिंगविशिष्ट नीति ( sexual morality ), स्वप्रचोदित (spontaneous), परप्रचोदित (inspired), क्रियाप्रवृत्ति (incentive), सूक्ष्मवेदित्व ( Sensitiveness ), हतपुंस्त्व ( Sterile ), मृताक्षर (Dead letter), झगेदार बायका ( Gowned women ), सनदी

स्वेच्छाचारी ( licenced libertines ), वगैरे शब्दप्रयोग इंग्रजींतून आले असूनही त्यांच्या मराठीपणाबद्दल शंका उरत नाहीं. यांतील कांहीं शब्द मराठींत होतेंच; पण त्यांची यथास्थल आणि यथार्थ योजना करण्याला दोन्ही भाषांतील शब्दांच्या अर्थासंबंधीं जें हें सूक्ष्मवेदित्व लागतें तें आगरकरांच्या ठिकाणीं होतें आणि त्या दृष्टीनें त्यांच्या निबंधांचा अभ्यास होणें ही मराठी भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनें फार महत्वाची आणि आवश्यक अशी गोष्ट आहे.

२ "ज्याप्रमाणें ओबडधोबड हत्यारांनीं नकशीदार काम करितां येत नाहीं, त्याप्रमाणें चांगले विचार वाईट भाषेंत व्यक्त करितां येत नाहींत" असें आगरकरांचें एक वाक्य आहे. ( विकारविलसित, प्रस्तावना. ) यावरून भाषा चांगली असावी असा त्यांचा कटाक्ष होता हें उघड होतें. पण त्यांच्या भाषेचें सौंदर्य केवळ नकशीदार नाहीं तर नैसर्गिक आहे. अंतःकरणाची अपरंपार तळमळ आणि विचारांचा प्रचंड ओघ यामुळें त्यांच्या भाषेला रमणीयता प्राप्त झालेली आहे. खालील वर्णनाचा सळसळत आलेला ओघ पहाः—

"वनस्पतींत व मनुष्याशिवाय इतर प्राण्यांत स्त्रीपुरुष किंवा नरमादी यांच्या संयोगांचे नेमलेले काळ किंवा ऋतु आहेत. ते काळ किंवा ऋतु प्राप्त झाल्याशिवाय, त्यांत संयोग होऊं शकत नाहीं; व संयोग न झाल्यामुळें संतानोत्पत्तीही होऊं शकत नाहीं. मनुष्याप्रमाणें त्यांतही हा संयोगकाळ अत्यंत सुखावह असला पाहिजे, असें त्यांच्या त्यावेळच्या स्वरूपावरून व बाह्य वर्तनावरून स्पष्ट दिसतें. वसंत ऋतूच्या सुमारास बहुतेक झाडें किती मनोरम दिसूं लागतात हें पुष्कळांच्या पहाण्यांत असेलच; तसेंच पानांचा, फुलांचा व फळांचा बहार येऊन गेला म्हणजे तीं किती फिकट व निस्तेज दिसतात, हेंही पुष्कळांनीं पाहिलें असेल. कांहीं झाडें व किडे यांची संतानोत्पत्ति झाली म्हणजे त्यांचें चैतन्यसाफल्य होतें आणि त्यांच्या अस्तित्वाचा शेवट होतो. सारीं गवतें अशाच प्रकारचीं आहेत. जीं झाडें व जे प्राणी असे नाहींत त्यांत दुसऱ्याप्रकारचे धरबंध आहेत. आम्ही सुबुद्ध मनुष्यांनीं मात्र या कामीं अगदीं ताळ सोडिला आहे, व त्यांतल्या त्यांत आम्ही हिंदु लोकांनीं तर बेतालपणाची परमावधि केली आहे. सृष्टिनियम आपला अंमल थोडा बहुत आम्हां ज्ञानवान् मनुष्यजातीवरही चालवितात म्हणून बरें आहे, नाहीं तर आम्ही शहाण्या हिंदु लोकांनीं एक महिन्याची मुलगी आणि दीड

महिन्याचा मुलगा यांच्या गर्भधानाचा सोहळा पाहण्यास सोडलें नसतें किंवा नव्वद वर्षांच्या थेरड्याबरोबर नव्वद दिवसांच्या पोरींचीं लग्नें लावून देऊन त्यांच्या ‘ अशुभाची ’ आणि ‘ अमंगलाची ’ मोठ्या उत्कंठेनें किंवा ‘ सावधान ’ चित्तानें वाट पहात बसलों असतों ! पण काय करावें ? महिन्याच्या पोरीच्या डोहाळजेवणाचा समारंभ करण्यास सृष्टिनियम परवानगी देत नाहींत, त्यामुळें आमचा अगदीं नाइलाज होऊन गेला आहे ! तथापि त्यांचें निराकरण आमच्या हातून जितकें होईल तितकें करण्याची आम्ही आपल्याकडून होईल तितकी काळजी घेत आहों. कित्येक गृहस्थ व बायका आपणांस पुढें होणाऱ्या मुलांच्या व मुलींच्या लग्नाचे ठराव, आपणांस मुलें होणार आहेत किंवा नाहींत हें सिद्ध होऊं लागण्यापूर्वीच, करीत असतात ! कांहींजण गर्भांतल्या पोरीचे व गर्भांतल्या पोराचे वाङ्निश्चय करून ठेवतात ! व कांहींजण एक संवत्सराच्या आंत आपल्या संततीकडून पाणिग्रहण करवितात ! अशा रीतीनें तयार केलेलीं दादला-बायलें एके ठिकाणीं होतील केव्हां आणि आपल्याप्रमाणें त्यांनाही गर्भांतल्या आणि बाहेरल्या पोरांच्या लग्नाचे ठराव करण्याचा नाद लागेल केव्हां याविषयीं येथील स्त्रीपुरुषांस पराकाष्ठेची आतुरता उत्पन्न झालेली असते ! इतक्यांत सून किंवा कन्या ऋतुमती झाली म्हणजे मग त्या आनंदास काय पारावार ! मुलीच्या बाजूनें मुलगा होण्याच्या या शक्यतेस ‘ मुलगा झाला ’ असें मानून आप्तमित्रांस साखरेसह ही आनंदाची खबर द्यावयाची, आणि तावडतोब मखराच्या आणि गर्भाधानाच्या तयारीस लागावयाचें ! सोळा दिवसांच्या आंत मुहूर्त पाहण्याची गरज नाहीं असा शास्त्रार्थ आहे. मग लौकर लौकर सारी सिद्धता करून, व जमतील तेवढे उभय पक्षाकडील लोक गोळा करून, त्या अवकाशाच्या आंत भटांनीं, आईबापांनीं, लहानमोठ्या घरच्या व परघरच्या बायांनीं, समवयस्क मित्रांनीं व मैत्रिणींनीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत होमहवनांत, ओंट्याहळदकुंकवांत, व जेवणफराळांत दिवस व रात्रीचा पूर्वभाग घालवून दहा अकराच्या सुमारास ज्यांच्या अंगावरून कामवासनेची कधीं झुळुकही गेली नसेल, अशा दोन पोरांस रत्युपभोगासाठीं विशेष काळजीनें व खर्चानें शृंगारलेल्या अशा एका खोलींत जबरीनें ढकलून देऊन तिचीं दारें लावून द्यावयाचीं आणि जन्मास येऊन जें पहावयाचें तें पाहिलें व करावयाचें तें केलें अशा समाधानकारक विचारांत आपापल्या स्थळीं जावयाचें, आणि मन्मथकारागृहांत कोंडलेल्या त्या पोरांची

कशी स्थिति होईल, याच्या चिंतनांत अंथरुणावर अंग टाकून निद्राप्रियेची मर्जी सुप्रसन्न होण्यासाठीं, या अंगावरून त्या अंगावर लोळत रहावयाचें !"*

या उताऱ्यांत वर्णन केलेली स्थिति पंचवीस वर्षांपूर्वींपर्यंत निःसंशय अस्तित्वांत होती. तिचें यथातथ्य वर्णन येथें मिळतें. तुलनेसाठीं वनस्पतिशास्त्रांतील दिलेलीं उदाहरणें बिनचूक आहेत. वस्तुस्थितीचें वर्णन क्वचित् प्रसंगीं जरूर तेवढा रंग भरून केलेलें आहे त्यामुळें तें डोळ्यांत उतरतें. "मुलें होणार आहेत किंवा नाहींत हें सिद्ध होण्यापूर्वींच मुलामुलींचे विवाह ठरविणें" आणि "मन्मथकारागृहांत" पोरांना कोंडणें यांत अनुक्रमें विनोद व कारुण्य यांची छटा स्पष्ट दिसते. वर्णनाचा ओघ अप्रतिहत आहे आणि तें वर्णन वस्तुस्थितीचें ज्ञान, ध्येयात्मक कल्पना व विचार आणि अंतःकरणांतील ध्येयप्राप्तीची तळमळ यांच्यावर बसविलें असल्यामुळें आकर्षक उतरलें आहे. आणि शेवटीं "याहून स्त्रीपुरुषांच्या रतिसुखाचा भंडवडा आणि मातेरें करण्याची अधिक मूर्खपणाची रीत शक्य किंवा कल्पनीय असेल काय" असा प्रश्न विचारून वाचकाच्या विचारशक्तीला खडबडून हालविलें आहे.

आतां आवेशयुक्त असें पुढील वर्णन पहाः—"तथापि त्यांतल्या त्यांत मोठ्या आनंदाची ही गोष्ट कीं, जरी सर्व वस्तूंच्या संबंधानें हे अविचारी वाक्पटु स्वातंत्र्याची टिमकी पिटीत असतात, तरी सामाजिक गोष्टींशिवाय इतर गोष्टींत सरकारनें आपणांवर जुलूम करण्याबद्दल हे सरकारच्या घरीं खेटे घालण्यांत आपले जोडे नित्य फाडीत असतात. यांना जर लोकस्वातंत्र्याचें रहस्य इतकें समजलें आहे तर त्यांनीं असें नादान कर्म कां करावें? "हे सरकारा, आम्ही गचाळ लोक आपण होऊन आपल्या धेनु कसायांस विकतों, तेव्हां मेहरबान होऊन गाई विकणारांस व त्या घेणारांस दंड कर. हे दयानिधे इलाखाधिपते, आम्ही प्रतिदिवशीं मदिरापाशांत अधिकाधिक गुरफटत आहों, याकरितां दारू पिणारांचें व विकणारांचें शासन कर! हे सर्वश्रेष्ठा, राज्ञीप्रतिनिधे, आम्ही पामर लोक अज्ञानतिमिरांत ठेंचा खात आहों, व्यापारधंदा बुडाल्यामुळें उपाशीं मरत आहों, नीतीचा लय झाल्यामुळें पतित होत आहों, व धर्मभय सुटल्यामुळें पापनिधींत बुडतों आहों, याकरितां आमच्याकडून हवा तेवढा कर चोपून घे, व हवे तसले प्रखर कायदे कर, पण घातलेल्या शाळा

* निबंधसंग्रह, भाग १ ला, पृष्ठ १११–१३.

उठवूं नको इतकेंच नाहीं, तर त्यांवर जितका अधिक खर्च करवेल तितका कर; आम्हांस उद्योग करतां येण्यासाठीं यंत्रशिक्षणाच्या व धंदेशिक्षणाच्या शाळा काढ; आमची नीति सुधारण्यासाठीं नीतिशिक्षक लाव; व आमच्या नास्तिक्याचें निरसन होण्यासाठीं वेदप्रणीत धर्म क्रिया आम्हांकडून नित्य करव "— असलीं रडगाणीं आम्हांकडून सरकारकडे जात नाहींत, असा एक दिवस तरी लोटत आहे काय ? वाचाल मंद सुधारकांनो, या तुमच्या असंबद्ध वर्तनाचा विचार तुम्ही कधीं केला आहे काय? सामाजिक सुधारणांविषयीं इंग्रज सरकार परकीयत्वामुळें अत्यंत उदासीन आहे, म्हणूनच त्यासंबंधानें स्वातंत्र्याची तुम्ही एवढी ऐट मिरवितां, हें खरें नाहीं काय ? तसें नसेल व तुम्ही खरेच स्वातंत्र्यप्रिय असाल, तर मग इतर गोष्टींत सरकारची गुलामगिरी कां पतकरतां? "*

प्रतिपक्षाच्या विचारांतील व वर्तनांतील असंबद्धता ठळकपणें उघड करून त्याला चीत करणें व आपण प्रतिपादन करीत असलेल्या विचारांचें व आचारप्रकारांचें प्रस्थापन करणें ही गोष्ट आगरकरांना उत्तम साधली होती व तीमुळेंच त्यांचे लेख एवढे परिणामकारक झाले. वरील उतारा हें त्यांच्या पद्धतीचें उत्कृष्ट उदाहरण आहे. याचेंच दुसरें उदाहरण पुढें दिलें आहे:—" यावरून असें दिसतें कीं आपल्या तोंडांत मारणारा जबरदस्त इसम आम्हांला भेटला कीं, आम्ही आपला गाल निमूटपणें त्याच्यापुढें करतों. पण जर तोच इसम केवळ आमच्या कल्याणाकरितां अमुक गोष्ट करूं कीं नको, असें आम्हांस विचारील तर आम्ही आपल्या अधिकाराचा तोरा मिरविल्याशिवाय कधींही राहावयाचे नाहीं. भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनों, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठीं कोंकणपट्टींत तुमचे अनन्वित हाल केले, त्यावेळेस तुमचा धर्माभिमान कोठें गेला होता ? विषयलंपट निःशक्त वाचाळ बाबूंनों, जेव्हां महंमदीयांनीं हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत साऱ्या हिंदुलोकांस आपल्या धर्मवेडानें जर्जर करून सोडलें,व तुम्हां हिंदूंच्या मानांवर असिधारा ठेवून, तुम्हांकडून तुमच्या शेंड्या काढविल्या आणि तुम्हांस गोमांस चारिलें तेव्हां धर्मरक्षणासाठीं तुम्ही नुसता ओरडा तरी करावयाचा होता ! त्या मुसलमानांच्या भीतीनें तुम्ही अजून आपल्या बायका कुलुपांत घालून ठेविल्या आहेत, हें तुम्हांस कळत नाहीं काय ? आणि आतां दयावंत ब्रिटिश

* निबंधसंग्रह, भाग १ ला, पृष्ठ १३०

सरकार केवळ परोपकारबुद्धीनें आपल्या लहान पोरींवर जुलूम करूं नका, एवढें अदबीनें सांगत असतां त्यावर तुम्ही आपलें धर्मास्त्र सोडतां आणि कामाच्या झपाट्यांत निराश्रित कुमारिकांचीं अंगें विदारण्याचा हक्क आमच्या धर्मानं आम्हांस दिला आहे व जर सरकार तो काढून घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला आमच्या असंतोषाचें फळ भोगावें लागणार अशी धमकी घालतां? धिक्कार असो तुम्हांला, तुमच्या धर्माला आणि तुमच्या हक्काला!!! जर तुम्हांस तुमच्या धर्माची इतकी प्रतिष्ठा वाटत आहे, तर पूर्वी ज्यांनीं ज्यांनीं त्याचें उल्लंघन केलें त्यांचें तुम्ही शासन कां केलें नाहीं? रजपुतांनीं आपल्या बायका मुसलमानांच्या घरांत कशासाठीं नेऊन घातल्या? थेट शनिवारच्या वाड्यांत थोरल्या बाजीरावानें एका यवनीस आणून ठेवून तिच्याशीं राजरोस व्यवहार ठेविला तेव्हां त्याला वाळीत कां टाकलें नाहीं? शिवाजीनें प्रथम केवळ द्रव्यलोभानें व अधिकारलोभानं ब्राह्मणांचे व इतर जातींचे जे खून केले त्याबद्दल त्यास काय प्रायश्चित दिलेंत? पण तुमच्या सारख्या शेंदाड शिपायां-वर असले शब्दप्रहार तरी करण्यांत काय अर्थ आहे? हेंहि असो; ही तुमच्या पौरुषाभावाची कहाणी झाली. पण अलीकडे जे तुम्ही सहजगत्या किंवा जाणून बुजून धर्माच्या उलट जातां ते काय म्हणून? पोटांत कांटे भरतां येत नाहींत म्हणून? महार, धेड व मुसलमान यांना चाकरीस ठेवणाऱ्या साहेब लोकांचे बूट उचलण्यास नेहमीं एका पायावर तुम्ही उभे असतां, याबद्दल तुम्हांला जरी क्षमा केली, तरी तुम्ही जेव्हां बाजारांतून, आगगाड्यांतून, आगबोटींतून, हपीसांतून पाहिजे त्याशीं अंग घासून परत येतां, तेव्हां सचैल स्नान न कर-ण्यामुळें तुमच्या हातून धर्माचें जें उल्लंघन होतें त्याबद्दल तुम्हांस कां क्षमा करावी? पण हेंही असो; नित्याच्या व्यवहाराच्या अपरिहार्यत्वामुळें अशा प्रका-रच्या गोष्टींबद्दल आम्ही तुम्हांस फारसा दोष देत नाहीं. पण एवढ्यानें तुमची कर्मकथा संपली असें कोण समजेल? अलीकडे कांहीं कारण नसतां, तुम्ही आपण होऊन आपल्या धर्मरूप जीवाच्या कलीज्याचे जे प्रतिदिवशीं असंख्य खून पाडीत असतां ते कशासाठीं? कलालांचीं दुकानें सरकार काढतें म्हणून त्यांच्या नांवानें खडे फोडतां! पण झक् मारायला तुम्ही त्या दुकानांकडे जातां कां, आणि आपल्या धर्माची, प्रकृतीची, चित्ताची व अब्रूची खराबी करून घेतां कां? दारू पिणारांस, मांस खाणारांस, पार्शी, मुसलमान किंवा ख्रिस्ती यांचे वरीं अन्नोदक सेवन करणारांस, प्रसिद्धपणें घरांत अंगवस्त्रें बाळ-

गणारांस व गटारांत पडणारांस, आणि उघडपणें हॉटेलांत पुख्खे झोडणारांस अपंक्त कां करीत नाहीं ? पण तुमची अशी समजूत झाली आहे कीं, कोणी प्रतिवर्षीं पळीभर पंचगव्य आनंदानें घेईल; अंडीं, ब्रँडी व गरज पडल्यास गोमांसाचा अर्कदेखील केवळ औषधासाठीं घेतों असें म्हणेल; वर्षांतून एकदां किंवा दोनदां दहा पांच भटांस पुढील बोलावून चांगलीशी दक्षिणा देण्यास तयार असेल; विशिष्ट आप्त वारल्यास किंवा कोणत्याही कारणानें एखाद्या मोठ्या क्षेत्रीं गेल्यास क्षौर करून घेण्यास नाखुष नसेल; सारांश, जो धर्माचें ढोंग करण्यास आणि भिक्षुकांचीं तोंडें दाबण्यास कबूल असेल; त्यानें हवे ते अनाचार खुशाल करावे ! त्याला तुम्ही धर्मोल्लंघनाबद्दल दोष देणार नाहीं इतकेंच नाहीं, तर असल्या भोंदूस धर्मरक्षक समजून त्याच्या पायावर लोटांगणें घालाल; त्याचे स्तुतिपाठ व पवाडे सकाळ संध्याकाळ गाल; छबिना काढून त्याची मिरवणूक काढाल, व त्याचा स्वार्थ बाहेर न पडेल तर धर्माच्या नांवावर त्याला पाहिजे तें करूं द्याल; इतकेंच नाहीं, तर आंधळ्याप्रमाणें त्याचा हात धरून तो नेईल तिकडे जाण्यास किंवा खाड्यांत लोटून घेण्यासही राजी व्हाल ! धिक्कार असो अशा प्रकारच्या तुमच्या, व तुमच्या वाटाड्यांच्या धर्मनिष्ठेला आणि पापभीरुत्वाला ! तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा ! ! तुमचा धर्माभिमान त्याहून शतपट खोटा ! ! ! अशा प्रकारच्या धर्महीन कपटपटु लोकांनीं धर्माचा बागुलबोवा करून संमतीच्या बिलासारख्या बिलास विरोध करावा, याहून अधिक असंबद्ध, अधिक उपहासास्पद, अधिक लज्जास्पद व विशेष खेदजनक काय आहे हें आम्हांस कळत नाहीं ! ”*

या उताऱ्यांतील वर्णनाचा ओघ जोरानें चालला आहे व वीररस आणि तार्किक टीका यामुळें त्या ओघाखालीं प्रतिपक्षसिद्धांतरूप कड्यांचा चुराडा होत आहे असा भास होतो. त्यांत मधून मधून “ मन्मथकारागृह, ” “ कुमारिकांचीं अंगें विदारण्याचा हक्क, ” “ नर्मसाचिव्य, ” “ स्नानसंध्येचा प्रत्याहार ” वगैरेसारखे अर्थपूर्ण आणि बेमालूमपणें घटलेले शब्दप्रयोग आले कीं हे लिहिणारा लेखक शब्दसृष्टीचा ईश्वर आहे याबद्दल शंका उरत नाहीं; किंबहुना “ कवीनां पुनराद्यानां वाचमर्थोनुधावति” या भवभूतिवचनाचेंही स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं.

* निबंधसंग्रह, भाग १ ला, पृष्ठ १७३–७५

३. ज्यांत शृंगाराची छटा आहे अशा तऱ्हेच्या वर्णनाचा एक उतारा सामाजिक मतें या सदराखालीं येऊन गेला. नुकत्याच वर दिलेल्या उताऱ्यांत वीररसाचा उत्तम आविर्भाव झाला आहे. आर्थिक मतांची चर्चा करितांना जे उतारे दिले आहेत त्यांत हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधीं जीं वर्णनें आलीं आहेत त्यांपैकीं बहुतेकांत करुणरसाचा आविष्कार झाला आहे. आतां भयानक रसाचा किंवा बीभत्सयुक्त भयानक रसाचा मासला पहाः—

"प्रेत लहानाचें असो किंवा थोराचें असो; स्त्रीचें असो किंवा पुरुषाचें असो; निष्कारण त्रास म्हणून चुकावयाचा नाहीं. पोराच्या प्रेतास न्हाऊं घातलें पाहिजे; त्याची टाळू भरली पाहिजे; त्याला हळद लाविली पाहिजे; सवाष्ण स्त्रीला न्हाऊं घालून पातळ नेसविल्याशिवाय व मळवट भरून तिची ओंटी भरल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. याप्रमाणेंच कमी अधिक त्रासाची थोरल्या पुरुषांच्या व विधवांच्या प्रेताची प्राथमिक व्यवस्था. नंतर तिरडीवर बांधणें व स्मशानांत नेणें वगैरे गोष्टीही शास्त्रविहित मार्गानेंच झाल्या पाहिजेत. पण स्मशानांत आल्यावर ज्या तिरस्कारक व संतापजनक गोष्टी कराव्या लागतात, त्यांपुढें येथपर्यंत झालें तें कांहींच नाहीं, असें म्हणावें लागतें. चितेच्या गोवऱ्या रचावयास लावण्यापासून प्रेताची राख होईपर्यंत विधीच विधी! हे भीषण, बीभत्स, अमंगल हिंदुधर्मा, तुझ्या आज्ञेनें आज शेंकडों वर्षें स्मशानभूमींत आम्ही जीं क्षौरें केलीं, डोळ्यांतून पाणी गळत असतां कणकीचे गोळे करून जे प्रेताच्या अनेक भागांवर ठेविले; क्रव्यादाग्नीच्या भयाण ज्वालांभोंवतीं मातीच्या गळत्या घागरी डोक्यावर घेऊन ज्या प्रदक्षिणा घातल्या व उत्तरीनें गळ्यांत दगड बांधून व तोंडाला हात लावून तुझ्या नांवानें काढूं नये तसले ध्वनि जे काढले, त्या सर्वांबद्दल तूं आम्हांस काय दिलें आहेस ? निर्दय वंचका ! गाईचें दूध पिणें, नानाप्रकारचे जिन्नस यथेच्छ खाणें, पालखींत किंवा घोड्यावर बसणें, जोडा घालून सहल करणें, शवाबरोबर जाळलेल्या प्रिय पत्नीच्या केंसाच्या धुराच्या वासावरूनच जी आपणांस प्राप्त झाली आहे अशी कल्पना करून तिच्यासमवेत शय्येवर विहार करणें किंवा विश्रांति घेणें, मृत्युलोक सोडून वायुरूपानें पातालाकडे किंवा स्वर्गाकडे संचार करीत असतां कोणी शत्रु भेटला तर तरवारीनें किंवा सोडग्यानें त्याचा समाचार घेणें, व अनेक प्रकारच्या दुर्गंधि द्रव्यांच्या समुद्रांतून प्रवास करण्याचा प्रसंग आला असतां

दर्भाच्या होड्यांत बसणें, अथवा तहान लागली असतां मडक्यांत घालून दिलेल्या पाण्यानें ती भागविणें असल्या गोष्टी मेलेल्या मनुष्याच्या आत्म्याकडून किंवा जिवाकडून घडण्याचा संभव तरी आहे काय ? मुळींच नाहीं. पण जबरदस्त पंचाक्षऱ्याप्रमाणें आम्हां साऱ्यां अज्ञ लोकांस त्वां भारून टाकून केवळ गुलाम केलें असल्यामुळें, आज कित्येक युगें अगदीं अशक्य गोष्टी आम्ही शक्य मानीत आहों, व अत्यंत निंद्य कृत्यें वंद्य मानून तुझ्या संतोषाकरतां ती बेलाशक करीत आहों. पण ध्यानांत ठेव, या तुझ्या अश्लाघ्य व निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल अगदीं समीप येऊन ठेपला आहे ! आजपर्यंत त्वां आम्हांस ज्या असह्य यातना भोगण्यास लाविलें आहे, व जीं अनन्वित कर्में आम्हांकडून करविलीं आहेस त्या सर्वांबद्दल तुझीं पाळें मुळें खणून काढून विचारकुंडांत पेटलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्होळांत तुझी आहुति देणाऱ्या नवीन ऋत्विग्वर्गाचा अवतार नुकताच झाला आहे.” * या लेखांत प्रेतविधीचें दिलेलें वर्णन भयानक वाटतें, पण शेवटीं धार्मिक विधींच्या मूढपणावर लेखकानें जो धडाका उडविला आहे त्यामुळें भयानक रसाचें पर्यवसान वीररसांत झालें आहे !

आतां विनोदाच्या प्रखर अस्त्रानें प्रतिपक्षाची उडविलेली फटफजिती पहा:— “तुम्ही इतके गतानुगतिक कशासाठीं होऊन बसलां आहां ? मनुष्याच्या जन्माला येऊन असें मेषासारखें वर्तन कां करितां ? डोक्यांत जो थोडा बहुत मदूं असेल त्याच्याकडून कांहीं एक काम करून न घेतां त्याची माती किंवा राख कां होऊं देतां ? तुम्ही जे प्रेतविधि करतां त्यावरून जिवंत मनुष्य आणि मेलेला मनुष्य यांतला भेद तुम्हांला कळत नाहीं असें म्हणणें भाग पडतें. जिवंत मनुष्याच्या आहारोपभोगास लागणारे पदार्थ तुम्ही मेलेल्या मनुष्यास अर्पण करतां याचा अर्थ काय ? पहाणें, हुंगणें, खाणें, स्पर्श करणें, हिंडणें, फिरणें, बोलणें सवरणें, हे सारे शरीरनिबद्ध व्यापार आहेत. मृत शरीराला अग्निकाष्ठ देऊन त्याची राख झाल्यावर त्याच्या नांवानें जें अन्नपाणी तुम्ही देतां त्याचा उपभोग कोण घेतो ? मेलेल्यांच्या आत्म्याला डोळे, नाकें, तोंडें, त्वचा, हातपाय, व काळीज फुप्फुसें आहेत कीं काय ? जर नसतील तर तुम्ही दिलेल्या अन्नोदकापासून त्यांना काय फायदा होत असेल ? पण असतील तर त्यांच्या चैतन्यावस्थेंत आणि मृतावस्थेंत भेद काय ? नसेल तर वर्षांतून फक्त एकदां

* निबंधसंग्रह, भाग १ ला, पृष्ठ १८१-८२.

परामर्ष घेतल्यानें त्यांचा निभाव कसा लागेल ? शिवाय त्यांच्या रहाण्यासवरण्याची व्यवस्था काय ? जिवंतपणीं त्यांना जसलीं घरें लागत तसलींच मेल्यावरही बांधून देणें अवश्य नाहीं काय ? तसेंच, दर आठवड्यास न्हावी, परीट, वगैरे कारागीर त्यांच्या सेवेला हजर ठेवण्याची जरूर नाहीं काय ? हेंही असो; तुम्हांला हें ठाऊक आहे कीं, ज्याप्रमाणें जनन आणि मरण यांची गांठ बांधलेली आहे, त्याप्रमाणेंच अन्न खाणाराच्या पाठीमागें बहिर्दिशेला जाणें लागलें आहे. ही त्यांची अडचण दूर करण्यासाठीं तुमच्याकडून आजपर्यंत कांहींच योजना झाली नाहीं हें कसें ? पैशाचावस्थेंतील सॅनिटरी कमिशनराकडून (आरोग्यरक्षक अधिकाऱ्यांकडून) तुमच्या अनंत पूर्वजांस प्रतिदिवशीं खडाखड दंड होत नसतील काय ? पुनः इतक्यांनीं इतकीं वर्षें उकरलेल्या देहधर्मांमुळें उत्पन्न होणाऱ्या रोगजनक वायूंचें निर्दलन करण्यासारखे फेनिलांचे प्रवाह चोहोंकडे वहात नसतील, आणि गंधकाच्या व डांबराच्या होळया तेथें पेटलेल्या नसतील, तर सारें वातावरण रोगक्रमींनीं व्याप्त होऊन जाऊन, डेंग्यू, कॉलेरा, इन्फ्लुएन्झा वगैरे प्राणनाशक साथींनीं ते जर्जर होऊन गेले नसतील काय ? जर गेले असतील असें मानणें स्वाभाविक आहे तर होमोपाथिक, इलेक्ट्रो-होमोपाथिक किंवा ॲलोपाथिक रामबाण टिंक्चरें आणि ग्लोब्यूल्स अथवा आर्यवैद्यकांतील खाशा खाशा मात्रा आणि काढे त्यांस देण्याची व कै. बापू मेहेंदळयासारख्या बहुश्रुत वैद्याकडून त्यांची परीक्षा करविण्याची कांहीं सोय कधीं केली आहे काय ? अन्नवस्त्र तेवढें मधून मधून द्यावयाचें आणि बाकी सर्व गोष्टींविषयीं उदासीन रहावयाचें हें तुमच्यासारख्यांच्या पितृभक्तीस, धर्मबुद्धीस आणि विचारशीलतेस बिलकुल शोभत नाहीं.......शिवाय आणखी एक अशी शंका येते कीं, फार झालें तर तुम्ही आजापणजापर्यंत आपल्या पितरांचा समाचार घेतां; पण आजांच्या आजांची आणि पणजांच्या बापांची वाट काय ?''.......*

आतां आणखी एक उतारा स्त्रियांच्या केशवपनासंबंधीं त्यांनीं जे उद्गार काढलेले आहेत त्यांतील देतों. त्यांत ज्याप्रमाणें ठिकठिकाणीं करुणरस ओतप्रोत भरलेला आहे त्याचप्रमाणें तिरस्कारयुक्त हास्याचा आविष्कार कारणपरत्वें झालेला आहे. "......स्त्रियांचें वपनक्लेश पुरुषांच्या वपनक्लेशापेक्षां सहस्रपटीनें असह्य करून ठेवण्यांत आले आहेत. युरोपियन लोकांपेक्षां आमच्या

---

* निबंधसंग्रह, भाग १ ला, १८२-८३.

लोकांतील नवराबायकोचें प्रेम विशेष दृढ असतें असा कित्येक अर्वाच्य देशाभिमानी प्रलाप करीत असतात; आणि त्याचें प्रमाण काय तर बायको मेल्यावर नवरा क्षौर करून घेऊन आमरण अविवाहित राहतो हें नव्हे तर नवरा मेल्यावर त्याच्या बायकोला आम्ही हव्या त्या वयांत जुलमानें सोंवळी करून मरेतोंपर्यंत तिच्याकडून संन्यासवृत्तीचें आचरण करवितों ! हे दयार्द्र ब्राह्मणांनो, खासें तुमचें प्रेम! खाशी तुमची दया!! आणि खासा तुमचा न्याय!!! निर्घृण मंदधींनो, ज्याला तुम्ही प्रेम म्हणतां तें प्रेम नव्हे, तर तुमच्या हाडामांसांस खिळून गेलेला स्त्रीजातीविषयीं तो तुमचा प्रचंड मत्सर होय ! ज्या प्रेमाच्या तुम्ही एवढ्या वल्गना करतां तें प्रेम तुमच्या अंतःकरणांत खरोखरीच वसत असतें तर एका बायकोकरतां स्मशानांत पिंड देऊन आलां नाहीं तों दुसरीचा हात धरून बोहल्यावर चढतां काय? आणि अशी गोष्ट निर्लज्जपणानें पाहिजे त्या वयांत करण्यास राजी होतां काय? सर्वांगावर मृत्यूची दाट छाया पडली आहे असें स्पष्ट दिसत असून ज्या कन्येनें नातवंडाप्रमाणें मांडीवर लोळावें अशीशीं बहुधा अस्तास गेलेल्या कामवासनेची तृप्ति करण्यासाठीं लग्न लावण्यास प्रवृत्त होऊन तिला न्हाव्याच्या तावडींत देण्याची आणि तिचे सर्व प्रकारचे आशांकुर खुडून टाकण्याची खात्रीची तयारी करून ठेवतां हें तुमच्या स्त्रीप्रेमाचें स्तुत्य निदर्शनच असेल ! जे लोक नीतीच्या, धर्माच्या, सोईच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही मिषानें पतिमरणोत्तर स्त्रियांवर वपनासारखा जुलुम करतात त्यांनीं स्त्रीप्रेमाच्या केवढ्याही वल्गना केल्या तरी ते लोक स्त्रियांविषयीं अत्यंत निष्ठुर व मत्सरी आहेत असें मानिलें पाहिजे. जिवंतपणीं बायकोचें दुसऱ्याशीं बोलणें किंवा दुसऱ्याकडे पहाणें हेंदेखील ज्याला फारसें खपत नाहीं, त्याला आपल्या पाठीमागें आपल्या बायकोस आणि न्हाव्यास कोणी तरी एका खोलींत कोंडून घालून ती गाईप्रमाणें हंबरडा फोडीत असतां व आपणांकडून होईल तेवढा प्रतिकार करीत असतां तिच्या अंगास स्पर्श करून तिचे केस वस्तऱ्यानें उतरून द्यावे—यांत कांहींच वाटूं नये, हें खऱ्या स्त्रीप्रेमाचें चिन्ह नव्हे. आपल्या पाठीमागें आपल्या बायकोची अशी दशा होणार आहे, अशी कल्पना मनांत आल्याबरोबर ज्याचें पित्त खवळून जात असेल, डोक्यापासून पायांपर्यंत ज्याच्या अंगास ताप आल्यासारखा होत असेल, व असले राक्षसी प्रघात मोडून टाकण्यासाठीं आपणाकडून होण्यासारखें असेल तें केलेंच पाहिजे, अशी वृत्ति ज्याच्या अंतःकरणांत निदान त्या

वेळेपुरती तरी उत्पन्न होत असेल त्याच्या अंतःकरणांत स्त्रीजातीबद्दल खऱ्या प्रीतीचें कांहीं बीज आहे असें म्हटलें तर क्षणभर चालेल. पण दोन अथवा अधिक बायकांस एका शय्येवर घेऊन बसणाऱ्या, तोंडाचें बोळकें झालें तरी नऊ वर्षांच्या पोरीशीं लग्न लावणाऱ्या, पाहिजे त्या वयाच्या मुलीचें, सुनेचें किंवा भावजयीचें वपन करणाऱ्या लोकांच्या अंतःकरणांत खरें स्त्रीप्रेम असूं शकेल असें मानणें म्हणजे पृथ्वीच्या दक्षिण आणि उत्तरध्रुवाजवळच्या हिममय प्रदेशांत विषुववृत्तांत अनुभवास येणारी सूर्यरश्मीची उष्णता मिळूं शकेल असेंच मानण्यासारखें होय ! कांहीं लोक असें म्हणतात कीं, आम्ही शहाणे सुर्ते ब्राह्मण, स्त्रियांची जी अशी अकरुण विडंबना करतों ती त्यांच्या व आमच्या नीतीच्या रक्षणासाठीं ! स्त्रीपुरुषांच्या नीतीचा बचाव होण्यास विधवांचें नित्य क्षौर अपरिहार्य असेल तर ज्या लोकांत हा जुलुम रूढ नाहीं त्यांच्या साऱ्या विधवा जारिणी असून त्यांच्या संसर्गदोषामुळें बायका असलेले बहुतेक लोकही स्वस्त्रीपराङ्मुख होऊन जार बनत असतील असें मानावयाचें कीं काय ? अशीच कल्पना करणें वाजवी असेल तर नीतीचा प्रकाश काय तो विधवांचें मुंडण करविणाऱ्या आम्हां ब्राह्मण लोकांत झळकत आहे, आणि इतर लोकांत निबिड अनीतितम पसरलें आहे, असें मानणें जरूर नाहीं काय ? गतभर्तृकांचे केस काढून त्यांना कुरूप करण्यांत जर नीतीचें संरक्षण व संवर्धन होत असेल तर ज्या मानानें ही कुरूपता अधिक होईल त्या मानानें नीतीचा अधिकाधिक फैलाव झाला पाहिजे, व तो करणें हें प्रत्येक नीतिप्रसारेच्छूनें आपलें कर्तव्य मानिलें पाहिजे. गतभर्तृकांची कृत्रिम कुरूपता राष्ट्राच्या नीत्युन्नतीस अवश्य आहे असें ज्यांचें मत असेल, ते त्यांचें वपनच करून कां थांबतात कोण जाणे ! शरीरांत कुरूपता आणिल्यानें वयपरत्वें कमी अधिक जोरानें पेट घेणाऱ्या विकाराग्नीचा उपशम करणें जर शक्य असेल तर गतभर्तृकांचे पाय तोडावे म्हणजे त्या परक्याकडे जाणार नाहींत; डोळे काढावे म्हणजे त्या परपुरुषाकडे पाहूं शकणार नाहींत; हात तोडावे म्हणजे कोणतेंही दुष्कृत्य त्यांस करतां येणार नाहीं; त्यांच्या जीभा उतराव्या म्हणजे विषयवासनांविषयीं त्यास उद्गार काढतां येणार नाहींत; त्यांचीं नाकें कापावीं म्हणजे त्यांच्या हिडिस तोंडाकडे कोणी पहाणार नाहीं; त्यांना कांहीं खाऊं न घालतां कोंडून घालाव्या म्हणजे त्यांचे कामविकार प्रबळ होणार नाहींत, व त्यांना कोणाशीं संबंध ठेवतां येणार नाहीं; किंबहुना त्यांना अफूच्या लहानशा गोळ्या

किंवा सोमलाच्या पुड्या देण्याचा प्रचार पाडला अथवा पूर्वींच्या सतीच्या चालीचा जीर्णोद्धार केला तर त्यांच्या हातून अनीति घडण्याचा मुळींच संभव रहाणार नाहीं हें उघड आहे ! जर हें करणें अमानुष असेल तर नवऱ्याचा जीव गेला नाहीं तों आईबापांनीं सर्व अपत्यवात्सल्य एकीकडे गुंडाळून ठेवून स्वप्राणाहून प्रिय मानलेल्या तरुण मुलींचीं डोकीं न्हाव्याच्या स्वाधीन करण्यास तयार होणें हें त्यांच्या मनुष्यपणास शोभतें असें कसें म्हणतां येईल ?.............."*

हा उतारा आगरकरांच्या भाषासरणीच्या अत्युत्कृष्ट नमुन्यांपैकीं एक आहे. त्यांतील मराठी भाषेचा ओघ विषयवर्णनानुरूप शांत, गंभीर किंवा खळखळाटानें चालला आहे. प्रसंगपरत्वें उपमारूपकादिकांचा मार्मिक आणि अर्थपूर्ण उपयोग ठिकठिकाणीं झालेला आहे. विषयानुरूप रसाचा परिपोष यथायोग्य झालेला आहे. पण हे सगळे उत्कृष्ट गुण यांत आधिक्यानें वसतात एवढ्यामुळेंच मात्र आगरकरांच्या भाषासरणीचा मोठेपणा पुरा होत नाहीं. त्याचें रहस्य त्या भाषेच्या जिवंतपणांत आहे. त्यांतील प्रत्येक शब्द वाचतांना तो लेखकाच्या अंतःकरणांतून उमाळ्यानें वर निघाला आहे व बुद्धिरूप प्रदेशाच्या वळणावळणानें तो चालला आहे असें स्पष्ट दिसतें. आगरकरांच्या लेखांत सर्व रसांचा आविष्कार उत्तम प्रकारें झाला आहे. पण मधून मधून संस्कृतमय असूनसुद्धां त्यांच्या वाणींत स्वाभाविकता आहे. त्यांचा लेख वाचतांना वाचक--त्यांच्या मतांशीं व विचारांशीं सहानुभूति नसणारासुद्धां वाचक--भाषेच्या ओघाबरोबर समरस होतो आणि तिच्यांतील रसानुरूप उत्तेजित होतो किंवा हंसतो, भितो किंवा किळस येऊन तोंड आंबट करतो, रडतो किंवा त्वेषानें दांत ओंठ चावतो. त्यांच्या उपमा तर रसिक वाचकाला तल्लीन करतात. आतांपर्यंत या भागांत दिलेले व पूर्वी ग्रंथांत आलेले उतारे वाचले म्हणजे या गोष्टीबद्दल शंका रहात नाहीं. संस्कृतांत त्यांची तुलना करावयाची तर ती जगन्नाथ व भवभूति यांच्याबरोबर करतां येईल. डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांनीं त्यांच्या लेखांची तुलना व्हाल्टेर या प्रख्यात फ्रेंच ग्रंथकाराच्या लिखाणाशीं केली होती. व्हाल्टेर सुमारें ऐशीं वर्षें जगला व त्यामुळें त्याची ग्रंथसंपत्ति मोठी आहे. तथापि त्याच्या व आगरकरांच्या लेखनसरणींत पुष्कळ

* निबंधसंग्रह, भाग १, पृष्ठ १८७-९०.

साम्य आहे हें निर्विवाद आहे. व्हाल्टेरनेंही आपल्या लेखणीच्या तडाक्यानें धर्माचें ढोंग माजविणाऱ्या भोंदूंचें सिंहासन गदगदां हालविलें आणि बुद्धीच्या साम्राज्याला सुरवात केली; त्यामुळें त्याच्याशीं आगरकरांची तुलना करण्यांत विशेष औचित्य आहे हें उघड आहे.

४. आगरकरांच्या लेखांत आणखी एक आल्हाददायक विशेष आहे तो जातां जातां सुभाषितें फेंकित जाणें हा होय. हा गुण कालिदासांत आणि मोरोपंतांत विशेष आहे हें कवितेच्या भोक्त्यांना माहीत आहेच. दृष्टांत आणि अर्थांतरन्यास हे दोनही मोठे रमणीय अलंकार आहेत आणि त्यांचें भांडार कविकुलगुरु कालिदास आणि महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांकडे जसें अपरंपार आहे तसेंच ते आगरकरांच्याकडे आहे. "मनो हि जन्मांतर संगतिज्ञम्," "तेजसां हि न वयः समीक्ष्यते," "विषमप्यमृतं क्वचित् भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया" वगैरे ओळी वाचतांना किंवा "हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं" वगैरे ओळी वाचतांना अंतःकरण जसें खळबळून जातें तसे प्रसंग आगरकरांचे निबंध वाचतांना वरचेवर येतात. ही सुभाषितांची खैरात आगरकरांनीं आपल्या निबंधांतून भरपूर केली आहे, आणि सुंदर व अर्थपूर्ण वाक्यें म्हणून मराठी वाङ्मयांत त्यांना फार महत्व आहे. त्यांच्या "विविधविषयसंग्रहां"तील "वाचन" या निबंधांतील पुढील मनोरम वाक्यें पहाः—

वस्तऱ्याला जसा दगड तशा बुद्धीला अडचणी आहेत. अडचणीच्या दगडावर बुद्धि लावल्यानें ती अत्यंत तीव्र होते.

संतापजनक दुराग्रहाचा वाद होईल तितका टाळावा.

इंद्रियद्वारां प्राप्त झालेल्या अनुभवावरून कार्यकारणादिकांचा जो निश्चय त्याला विचार म्हणतात.

पुस्तकें ज्या प्रकारचीं असतील त्या प्रकारचा परिणाम तीं वाचणारांच्या मनावर होईल. वाईट पुस्तकें वाचण्यापेक्षां कांहीं न करणें ( वाचणें ) बरें; कारण कांहीं न करण्यानें मनाला निदान कोणताही वाईट नाद तरी लागत नाहीं.

विचारांना ग्रंथग्रथित करणें म्हणजे त्यांस जड स्वरूप देऊन अमरत्व आणण्यासारखें आहे.

महान् महान् तत्ववेत्ते, इतिहासकार, शास्त्रज्ञ, कवि आपापले विचार पुस्तकरूपी नौकेंत घालून न ठेवते तर ते कालमहार्णवांत कधींच बुडून जाते, व त्यांचा यत्किंचित् मागमूस आम्हांस न लागता. पण त्यांनीं तसें केलें नाहीं त्यामुळें विचाररूपी मालानें भरलेल्या या ग्रंथनौका पाहिजे त्याला हव्या त्या किनाऱ्यावर उतरून घेऊन त्यांतील मालास हात घालतां येतो.

या शेवटच्या वाक्यांतील रूपक फारच चित्ताकर्षक झालें आहे व त्यांत कोठें अडखळल्यासारखें होत नाहीं. अशाच रूपकाचा दुसरा मासला त्याच निबंधांत आहेः—

विद्यारूप दुर्बीण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे त्याच्या ज्ञानचक्षूंस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीनें न्याहाळतां आली नाहीं तरी तिच्या उन्नतीला सीमा नाहीं एवढें पक्कें दिसून येतें.

त्याच निबंधांतील आणखी एक वाक्य पहाः—

चाबकानें, काठीनें किंवा तरवारीनें अंमल चालविण्यांत मनुष्यास फारसें भूषण नाहीं. ज्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व साधुत्वानें जगास वश केलें तो खरा शहाणा.

पुढील अर्थपूर्ण सुभाषितें नमुन्यासाठीं म्हणून आगरकरांच्या निबंधांतून इतस्ततः वेंचून येथें दिलीं आहेत. प्रत्येकाच्या शेवटीं निबंधसंग्रहाचा भाग व पृष्ठ यांचा संदर्भासाठीं निर्देश केला आहे. आगरकरांच्या सर्व सूक्ति एकत्र करणें या ठिकाणीं अर्थात् शक्य नाहीं.

व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं, सामाजाचें हित साधलें म्हणजे झालें, असें बोलणें म्हणजे असंबद्ध प्रलाप करणें होय! कारण व्यक्तींच्या हिताहून निराळें असें समाजाचें हित नाहीं. ( १–४० )

आसमंतांतील वस्तुस्थितीच्या अधीन होऊन ती नेईल तिकडे जाणें यांत कोणताहि पुरुषार्थ नाहीं. ( १–५९ )

पृथ्वीवरील कोणत्याहि प्रकारच्या धार्मिकांस विश्वासाशिवाय त्राता नाहीं व थारा नाहीं. ( १–७० )

लोकांच्या आचारांत जेवढा अत्यंत क्रूरपणाचा व अविचाराचा भाव असेल तेवढा साधेल तर तीव्र उपायांनीं नाहींसा करण्यास हरकत नाहीं. ( १–९९ )

आम्हांस जें बरें दिसत आहे तें आम्हीं कां न बोलावें हें आम्हांस समजत नाहीं. ( १–१०३ )

राष्ट्राची खरी मजबुती कुटुंबाच्या आणि त्यांतील व्यक्तींच्या मजबुतीवर सर्वथैव अवलंबून आहे. ( १–१०७ )

ज्याच्या त्याच्या तोंडावाटे स्वातंत्र्याच्या वृथा वल्गनांचा अहोरात्र घोष चालला आहे. सत्क्रियेच्या नांवानें मात्र आंवळ्याएवढें पूज्य ! ( १–१२१ )

विचारवैचित्र्य व विचारस्वातंत्र्य यांशिवाय मनुष्याची उन्नति व्हावयाची नाहीं हें खरें, परंतु एवढ्याचकरितां मनुष्यानें बहकत सुटणें हें माणुसकीचें काम नव्हे. ( २–७१ )

बालविवाहाचें खंडण म्हणजे स्वयंवराचें मंडन. ( २–९४ )

व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें तथापि त्यानें तें करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समजाला अधिकार नाहीं. ( २–१०० )

सरकार नसल्यापासून जे परिणाम होतात तेच सरकारच्या फाजील सक्तीपासून होऊं लागतात. ( २–१३६ )

विशाल कल्पकता ही नैसर्गिक देणगी फार थोड्यांसच प्राप्त झालेली असते. ( २–१५३ )

ज्यांना स्वतःची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कांस धरून चलावें हेंच नीट आहे. ( २–१५३ )

ज्यांनीं सुधारक हें नांव धारण केलें आहे त्यांनीं लोकापवादभयानें लोकांच्या आचरणांतील दोष न दाखविणें व सुधारणेचे नवीन मार्ग न सुचविणें हें भित्रेपणाचें काम होय. ( २–१९२ )

फेर म्हणून कोणत्याही गोष्टींत फेरफार करावा असें आमचें म्हणणें नाहीं. ( २–१९२ )

पोषाख असा असावा कीं तो वापरणाराच्या ताब्यांत असावा ( २–२०० )

दागिने घालावयाचे नाहींत; चांगलीं वस्त्रें वापरावयाचीं नाहींत; सुग्रास अन्न खावयाचें नाहीं; सुरेख घरांत रहावयाचें नाहीं; तर करावयाचें तरी काय ? ( २–२०७ )

खऱ्या साध्वीच्या ईषत् वक्रदृष्टीनें मोठमोठ्या बलाढ्य कामांधांची गाळण उडून जाते. ( २–२४१ )

ज्ञान आणि सद्गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे हें अद्यापि चांगलेंसें ठरलेलें नाहीं. ( २–२७५ )

शिमग्याचा सण आम्हांस जितका तिरस्करणीय व त्याज्य वाटतो तितकाच दिवाळीचा सण अभिनंदनीय व रक्षणीय वाटतो. ( २–४१४ )

रूढ आचार किंवा विचार खरा असो किंवा खोटा असो, त्याचें जीवित्व पराकाष्ठेचें चिकट असतें. शेंकडों वर्षें टाळक्यांत व पेंकाटांत सोटे घालावे तेव्हां कोठें तो हळू हळू आपला पाय काढून घेतो. ( २-४६१ )

एकदां देशाभिमानशून्यता आमच्या विद्वानांत आली होती. आतां कित्येकांस देशाभिमानातिरेक घेरूं लागला आहे. आम्हांस हे दोनीही पंथ मान्य नाहींत. आमच्या मतें खरी वाट दोहोंच्या मधून जाते व याच वाटेनें चालत राहण्याचा आमचा इरादा आहे. ( २–४६९ )

उत्तम जोडा कसा असावा याचा निर्णय करण्यास आमच्या मतें जोड्यांचें प्रदर्शनच केलें पाहिजे. ( २–४८९ )

अमुक देशांत किंवा अमुक जातींत जन्म होणें हें कांहीं मनुष्याच्या हातचें नाहीं. परंतु सदाचारानें किंवा दुराचारानें वागणें हें मनुष्याच्या हातचें आहे. ( २–४९८ )

प्रजेची दारुण दैन्यावस्था कोणत्याही राज्यकर्त्यांस केव्हां तरी विघातक झाल्यावाचून रहात नाहीं. ( २–५०२ )

इंग्लिश लोकांनीं आपल्या बहादुरीनें आणि आमच्या कमकुवतपणानें हिंदुस्थानचें राज्य आपलेसें केलें; आमच्यांतील आपसांत तंट्यामुळें आणि त्यांच्या धूर्तपणामुळें तें दृढ झालें. ( २–५०३ )

जो बहुधा चैनीखातर येतो आणि ती यथेच्छ भोगून निघून जातो त्याला या देशाची खरी स्थिति कळावी कशी ? ( २–५१६ )

सध्यां जीं श्राद्धें व ज्या प्रेतक्रिया होत आहेत त्या एका बाजूनें गूढ अज्ञान आणि दुसऱ्या बाजूनें स्वार्थसिद्धीसाठीं अज्ञ लोकांस अज्ञानांतच राहूं देण्याची इच्छा यांची साक्ष देतात. ( २–५९० )

मनुष्याच्या सुखदुःखाचा बराच भाग नित्याच्या लहानसहान गोष्टी बऱ्यावाईट रीतीनें करतां येण्यावर अवलंबून आहे यांत शंका नाहीं ( ३–२३)

समाज आणि श्रमसंयोग यांचा अन्योन्यसंबंध तंतु व पट यांच्या नित्यसंबंधासारखा आहे. ( ३–२३ )*

अलीकडे लोकाग्रणी म्हणवून घेणाऱ्या कित्येक महत्त्वाकांक्षी लोकांनीं पोकळ वल्गना करून भल्या लोकांची इज्जत घेण्याचा आणि भाबड्या लोकांस भलभलत्या भुलथापा देऊन आडमार्गास नेण्याचा कारखानाच घातला आहे असें म्हटलें तरी चालेल. ( ३–१२३ )

खऱ्या वैद्यानें जसें पाहिजे तसलें घाण काम करण्यास तयार असलें पाहिजे तसें समाजहितचिंतक सुधारकानें पाहिजे त्या प्रकारचा विषय हातीं घेण्यास सिद्ध असलें पाहिजे. ( ३–१७१ )

आतां अमक्याच्या पोटीं अमक्याचा जन्म झाला म्हणून तो श्रेष्ठ ही कल्पना आर्ष मानली जाणार व बुद्धिबलानें जो पुढें सरेल तो श्रेष्ठ ठरेल. या जबरदस्त विचार-ओघाची गति अविचारबांधानें थांबू शकणार नाहीं. ( ३–१७६ )

प्रजा जशी ममतेनें वळते तशी धाकानें वळत नाहीं. ( ३–१८५ )

ब्रिटिश लोकांच्या शौर्याला ब्रिटिश लोकांच्या न्यायाचें पाठबळ असेल तरच त्यांचें राज्यवैभव अढळ व निष्कलंक राहणार आहे. ( ३–१८५ )

ज्याप्रमाणें पूर्व वैभवाचें स्मरण करून मुसलमानांनीं आज मितीस शेखी मिरविण्यांत अथवा हिंदूंनीं अरेरावी करण्यांत अर्थ नाहीं, त्याप्रमाणेंच मुसलमानांनीं पूर्वीं केलेलीं अनन्वित कृत्यें आज ध्यानांत आणून हिंदूंनीं त्यांचा द्वेष करण्यांत किंवा त्यांना खिजविण्यांत शहाणपण नाहीं. ( ३–१८६ )

त्या लोकांनीं हवीं तसलीं कमिशनें आपले हेतु सिद्धीस नेण्याकरितां बसवावीं आणि आम्ही झकत त्यांचा खर्च द्यावा अशी सांप्रतची वस्तुस्थिति आहे. ( ३–१९४ )

ज्ञान आणि क्रिया हीं एकमेकांना लागून नाहींत. त्यांच्या दरम्यान् प्रचंड गर्ता आहे. ( ३–२०८ )

आम्हांस आहों त्या जागचे हलावयास तर नको व कोणीं आम्हास नादानही म्हणतां उपयोगी नाहीं. ( ३–२१३ )

हिंदु हा जरी पराकाष्ठेचा कृतज्ञ, राजनिष्ठ व शांतिप्रिय प्राणी आहे तरी अन्यायाचा अतिरेक झाला असतां त्याचेंसुद्धां स्वस्वामित्व नाहींसें होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. ( ३–२२७ )

---

* दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्। ( वेणीसंहार नाटक ).

ज्ञान आणि सद्गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे हें अद्यापि चांगलेंसें ठरलेलें नाहीं. ( २–२७५ )

शिमग्याचा सण आम्हांस जितका तिरस्करणीय व त्याज्य वाटतो तितकाच दिवाळीचा सण अभिनंदनीय व रक्षणीय वाटतो. ( २–४१४ )

रूढ आचार किंवा विचार खरा असो किंवा खोटा असो, त्याचें जीवित्व पराकाष्ठेचें चिकट असतें. शेंकडों वर्षें टाळक्यांत व पेंकाटांत सोटे घालावे तेव्हां कोठें तो हळू हळू आपला पाय काढून घेतो. ( २-४६१ )

एकदां देशाभिमानशून्यता आमच्या विद्वानांत आली होती. आतां कित्ये-कांस देशाभिमानातिरेक घेरूं लागला आहे. आम्हांस हे दोनीही पंथ मान्य नाहींत. आमच्या मतें खरी वाट दोहोंच्या मधून जाते व याच वाटेनें चालत राहण्याचा आमचा इरादा आहे. ( २–४६९ )

उत्तम जोडा कसा असावा याचा निर्णय करण्यास आमच्या मतें जोड्यांचें प्रदर्शनच केलें पाहिजे. ( २–४८९ )

अमुक देशांत किंवा अमुक जातींत जन्म होणें हें कांहीं मनुष्याच्या हातचें नाहीं. परंतु सदाचारानें किंवा दुराचारानें वागणें हें मनुष्याच्या हातचें आहे. ( २–४९८ )

प्रजेची दारुण दैन्यावस्था कोणत्याही राज्यकर्त्यांस केव्हां तरी विघातक झाल्या-वाचून रहात नाहीं. ( २–५०२ )

इंग्लिश लोकांनीं आपल्या बहादुरीनें आणि आमच्या कमकुवतपणानें हिंदु-स्थानचें राज्य आपलेसें केलें; आमच्यांतील आपसांत तंट्यामुळें आणि त्यांच्या धूर्तपणामुळें तें दृढ झालें. ( २–५०३ )

जो बहुधा चैनीखातर येतो आणि ती यथेच्छ भोगून निघून जातो त्याला या देशाची खरी स्थिति कळावी कशी ? ( २–५१६ )

सध्यां जीं श्राद्धें व ज्या प्रेतक्रिया होत आहेत त्या एका बाजूनें गूढ अज्ञान आणि दुसऱ्या बाजूनें स्वार्थसिद्धीसाठीं अज्ञ लोकांस अज्ञानांतच राहूं देण्याची इच्छा यांची साक्ष देतात. ( २–५९० )

मनुष्याच्या सुखदुःखाचा बराच भाग नित्याच्या लहानसहान गोष्टी बऱ्या-वाईट रीतीनें करतां येण्यावर अवलंबून आहे यांत शंका नाहीं ( ३–२, )

समाज आणि श्रमसंयोग यांचा अन्योन्यसंबंध तंतु व पट यांच्या नित्यसंबंधासारखा आहे. ( ३–२३ )*

अलीकडे लोकाग्रणी म्हणवून घेणाऱ्या कित्येक महत्वाकांक्षी लोकांनीं पोकळ वल्गना करून भल्या लोकांची इज्जत घेण्याचा आणि भाबड्या लोकांस भलभलत्या भुलथापा देऊन आडमार्गास नेण्याचा कारखानाच घातला आहे असें म्हटलें तरी चालेल. ( ३–१२३ )

खऱ्या वैद्यानें जसें पाहिजे तसलें घाण काम करण्यास तयार असलें पाहिजे तसें समाजहितचिंतक सुधारकानें पाहिजे त्या प्रकारचा विषय हातीं घेण्यास सिद्ध असलें पाहिजे. ( ३–१७१ )

आतां अमक्याच्या पोटीं अमक्याचा जन्म झाला म्हणून तो श्रेष्ठ ही कल्पना आर्ष मानली जाणार व बुद्धिबलानें जो पुढें सरेल तो श्रेष्ठ ठरेल. या जबरदस्त विचार-ओघाची गति अविचारबांधानें थांबू शकणार नाहीं. ( ३–१७६ )

प्रजा जशी ममतेनें वळते तशी धाकानें वळत नाहीं. ( ३–१८५ )

ब्रिटिश लोकांच्या शौर्याला ब्रिटिश लोकांच्या न्यायाचें पाठबळ असेल तरच त्यांचें राज्यवैभव अढळ व निष्कलंक राहणार आहे. ( ३–१८५ )

ज्याप्रमाणें पूर्व वैभवाचें स्मरण करून मुसलमानांनीं आज मितीस शेखी मिरविण्यांत अथवा हिंदूंनीं अरेरावी करण्यांत अर्थ नाहीं, त्याप्रमाणेंच मुसलमानांनीं पूर्वीं केलेलीं अनन्वित कृत्यें आज ध्यानांत आणून हिंदूंनीं त्यांचा द्वेष करण्यांत किंवा त्यांना खिजविण्यांत शहाणपण नाहीं. ( ३–१८६ )

त्या लोकांनीं हवीं तसलीं कमिशनें आपले हेतु सिद्धीस नेण्याकरितां बसवावीं आणि आम्ही झकत त्यांचा खर्च द्यावा अशी सांप्रतची वस्तुस्थिति आहे. ( ३–१९४ )

ज्ञान आणि क्रिया हीं एकमेकांना लागून नाहींत. त्यांच्या दरम्यान् प्रचंड घर्ता आहे. ( ३–२०८ )

आम्हांस आहों त्या जागचे हलावयास तर नको व कोणीं आम्हास नादानही म्हणतां उपयोगी नाहीं. ( ३–२१३ )

हिंदु हा जरी पराकाष्ठेचा कृतज्ञ, राजनिष्ठ व शांतिप्रिय प्राणी आहे तरी अन्यायाचा अतिरेक झाला असतां त्याचेंसुद्धां स्वस्वामित्व नाहींसें होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. ( ३–२२७ )

---

* दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् । ( वेणीसंहार नाटक ).

विकारविलसित नाटकाच्या प्रस्तावनेंतील पुढील दोन तीन चुटके याच ठिकाणीं देणें इष्ट वाटतें:—

रानवट आणि गांवढळ बोलणें पुस्तकांत वारंवार घालणें म्हणजे व्याकरण आणि भाषाशुद्धि यांच्या सुधारणेला दृढ व्यत्यय आणण्यासारखें होय.

आम्ही आपले रीतिरिवाज सोडीत नाहीं असें म्हणणाऱ्यांपैकीं शेंकडा नव्याण्णव शुद्ध ढोंगी असतात व बाकीचे विचारशून्य असतात.

ज्याप्रमाणें ओबडधोबड हत्यारांनीं नकशीदार काम करितां येत नाहीं त्याप्रमाणें चांगले विचार वाईट भाषेंत व्यक्त करितां येत नाहींत.

५ असो. येथपर्यंत जे उतारे दिले व त्यांसंबंधीं जी चर्चा केली त्यावरून आगरकरांचें भाषाप्रभुत्व व त्यांच्या भाषासरणींतील प्रमुख गुण नजरेंत येण्यास हरकत नाहीं. वर जीं सुभाषितें दिलीं आहेत त्यांतील कित्येक परभाषेंतील सुभाषितांच्या छाया आहेत व त्यांत नवल करण्यासारखें कांहीं नाहीं. कित्येक सुभाषितें छायारूप असतात तर कित्येकांत अर्थसादृश्य असतें, व हा प्रकार सर्व ग्रंथकारांच्या लेखांत घडतो. परंतु तीं किती अर्थपूर्ण व सुंदर मराठींत दिलेलीं आहेत हें येथें पहावयाचें आहे. आगरकरांची भाषा मधून मधून संस्कृतप्रचुर आहे, पण कोणत्याही ठिकाणीं ती परभाषेच्या वळणाची बहुधा दिसत नाहीं व इंग्रजी न जाणणाऱ्याला ती समजण्यास हरकत पडत नाहीं. त्यांच्या भाषेचें स्वरूप शुद्ध स्वदेशी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी शब्दांचीं भाषांतरें बेमालूम मराठींत ते कशीं करीत हें वर दाखविलें आहे व तशा प्रकारचीं भाषांतरें न साधल्यामुळें किती तरी लेखक आज काल जें मराठी लिहितात तें इंग्रजी न जाणणाऱ्या मराठी वाचकांना समजण्याची मुष्कील पडते. आतां वाङ्मयात्मक गोष्टींविषयीं आगरकरांच्या मतांचा व विचारांचा उल्लेख करण्याकडे आपण वळूं. त्यांच्या मराठी वाङ्मयांतील स्थानाबद्दल मतभेद असा कोठेंही नाहीं. तें स्थान अत्यंत उन्नत आहे हें सर्वांना मान्य आहे आणि त्यांच्या वेळेपासून आजपर्यंत सर्वांनीं त्यांचा उत्कृष्ट गौरव केलेला आहे. मराठी भाषेसंबंधानें औपपत्तिक विचार त्यांच्या विकारविलसिताच्या प्रस्तावनेंत व वाक्यमीमांसा या ग्रंथांत प्रकट झाले आहेत. "वाक्यमीमांसा" या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत आगरकर लिहितात:—"मोठमोठ्या कवींचा व शास्त्रीय ग्रंथ रचणाऱ्यांचा व्यवसाय अडाणी लोकांचा ज्या प्रकारच्या भाषेंत

व्यवहार होत असतो, त्या प्रकारच्या भाषेनें नीट चालत नाहीं. विकार व विचार समजावितांना भाषा अपुरी पडूं लागली कीं, प्रासादिक कवि आणि बुद्धिवान् व बहुश्रुत शास्त्रज्ञ हे नवीन शब्द पाडण्याच्या टांकसाळी सुरू करितात, व आपापल्या गरजा भागवून घेतात. याप्रमाणें कवींकडून व शास्त्रज्ञांकडून नवीन शब्द-नाणीं प्रचारांत आलीं म्हणजे त्यांचे वर्ग बांधणें, ठिकठिकाणीं त्यांचे कसकसे अर्थ केले आहेत याचा तपास लावणें वगैरे दुसऱ्या प्रतीचीं कामें करणारे व्याकरणकार व कोशकार पुढें सरसावतात...मराठी भाषेंत अशा प्रकारचीं पुस्तकें रचण्यांत वेळ व बुद्धि प्रस्तुत कालीं तरी खर्चण्यांत हांशील नाहीं असें म्हणणारे पुष्कळ लोक आहेत. यांपैकीं कित्येकांच्या मतें हिंदुस्थानांतील अठरापगड जातीप्रमाणें अठरापगड भाषा नाहींशा होऊन सर्वत्र हिंदुस्थानीसारखी किंवा इंग्रजीसारखी एखादी सामान्य भाषा काशीपासून रामेश्वरपर्यंत स्थापित होईल तर फार बरें असें असल्यामुळें, कोणत्याही देशी भाषेच्या रचनेच्या वगैरे संबंधानें काथ्याकूट करणाऱ्यास ते वेडपीर समजत असतील हें उघडच आहे ! दुसऱ्या कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, आमच्या देशांत ग्रंथ लिहिणाऱ्यांची संख्या अत्यंत स्वल्प आहे, तेव्हां त्यांनीं शब्दवादप्रचुर शुष्क भाषाविषयांकडे आपली मर्यादित हिंमत खर्च न करतां जेणेंकरून लोकांस राज्यविषयक, नीतिविषयक व संपत्तिविषयक तत्त्वांचें ज्ञान होईल असे ग्रंथ उत्पन्न करण्यांत आपला काळ व उमेद खर्चावी ! आमच्या मतें वरील दोनही प्रकारच्या लोकांचें बोलण्यांत मुळींच अर्थ नाहीं असें जरी नाहीं तरी त्यांचा उपदेश सर्वांनीं ऐकून तदनुसार वर्तन करणें इष्ट व शक्य नाहीं असें वाटतें...........आमची अशी समजूत झाली आहे कीं, हिंदुस्थानांत सर्वत्र एक भाषा होण्यास ज्या अनुकूल गोष्टी आहेत त्यांहून प्रतिकूल गोष्टी फार व बलवत्तर असल्यामुळें त्यासंबंधानें केलेले श्रम व्यर्थ होणार आहेत. या देशांत इंग्रजी भाषेचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत गेला तर त्यापासून देशी भाषा मागें पडण्याचा संभव नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांस उलट उत्तेजन येणार आहे असा आमचा ग्रह झाला आहे. तेव्हां हिंदुस्थानांतील पुढें सरसावलेल्या इतर भाषांप्रमाणें मराठी भाषेसही उन्नतावस्था प्राप्त होऊन तींत उपयुक्त व मनोरंजक ग्रंथसंग्रह दिवसेंदिवस अधिकाधिक होत जाणार असें वाटूं लागलें आहे " म्हणजे हिंदुस्थानांत एक भाषा ( ती राजकर्त्यांची इंग्रजी असो अथवा राष्ट्रभाषा म्हणून हिंदी असो ) करण्याच्या खटपटींत देशी भाषांची आबाळ

व्हावी हें मत आगरकरांना बिलकुल मान्य नव्हतें. मराठी भाषेच्या व्याकरणाचें स्वरूप संस्कृत व इंग्रजी व्याकरण यांच्यावरून ठरणार हें तत्व आगरकरांना मान्य होतें आणि त्यांनीं वाक्यमीमांसा या ग्रंथांत बेन या सुप्रसिद्ध इंग्रजी व्याकरणकाराच्या ग्रंथाचा भरपूर उपयोग केलेला आहे, पण मराठी वाक्यरचनेचें स्वरूप मराठीच रहावें याबद्दल त्यांचा विशेष कटाक्ष आहे. मराठी लेखनपद्धतीला कायमचें व स्थिर स्वरूप देण्यास आगरकरांच्या अल्पायुष्यामुळें त्यांच्या विद्वत्तेचा व या बाबतींतील मननाचा उपयोग झाला नाहीं ही दुःखाची गोष्ट होय; पण त्यांचा " वाक्यमीमांसा " हा ग्रंथ त्यांच्या या बाबतींतलें विचारांचें प्रत्यक्ष स्वरूप होय.

इंग्रजी वगैरे परभाषांतील पुस्तकांचीं भाषांतरें मराठींत अवश्य करावींत, असा आगरकरांचा स्पष्ट अभिप्राय होता; मात्र तीं भाषांतरें असावींत, गंगाजमनी किंवा गोळकीं रूपांतरें नसावींत असें त्यांचें म्हणणें होतें. आगरकर लिहितातः— ( विकारविलसिताची प्रस्तावना ) " कितीही खबरदारी ठेविली तरी गोळकी भाषांतरांत केवढी असंबद्धता होऊन जाते हें शास्त्रीबुवांनीं " तारा " नाटकावरील आपल्या अभिप्रायांत स्पष्टपणें दाखविलें आहे...... ( निबंधमाला, अंक ६० ). " शिवाय परकी लोकांच्या रीतीभाती वगैरे कळण्यासाठीं त्यांच्या भाषेंतील ग्रंथांचीं रूपांतरें होण्यापेक्षां भाषांतरें होणेंच आवश्यक आहे हेंही आगरकरांचें मत सर्वांना मान्य होण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें नाटकांत पात्रानुरूप भाषा घालण्याच्या यातायातींत न पडतां नाटककारानें शुद्ध भाषा घालावी असें आगरकरांचें म्हणणें होतें. ज्यांना निरनिराळ्या स्थानिक किंवा जातिविषयक भाषा चांगल्या अवगत आहेत त्यांनीं त्या अवश्य घालाव्यात; पण तसें ज्यांना करतां येत नाहीं—आणि न येणारे पुष्कळ—त्यांनीं त्या भानगडींत न पडतां ग्रंथांत शुद्ध भाषा लिहून विवक्षित प्रकारच्या भाषेची प्रत्यक्ष योजना नटाच्या कर्तबगारीवर ठेवावी हें मत विचार करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. आमच्या बऱ्याचशा नाटक कादंबऱ्यांतून जी " कुळवाडी " वगैरे म्हणून भाषा घालतात ती बहुधा चुकलेली असते व वाचकांसही तिचा अर्थ कळण्याची मारामार पडते. तेव्हां ती शुद्ध स्वरूपांत ठेवावी, आणि नाटकांत बोलणाऱ्या पात्रानें आपल्या मगदुराप्रमाणें तिला आवश्यक तें स्वरूप द्यावें हें म्हणणें सोईचें दिसतें. आगरकरांनीं हॅम्लेट नाटकाचें मराठी भाषांतर केलें तें कोल्हापूर खटल्याच्या वेळीं चार पैसे

मिळावेत म्हणून केलें होतें. त्यांत भाषांतराचे चांगले नमुने पुष्कळ ठिकाणीं आहेत. उदाहरणार्थ—

More than kin and less than kind या king शब्दावरील कोटीचें भाषांतर,

" काका आहेस म्हणून एक कानाच अधिक; नाहींतर पक्का काक होतास " हें मोठें हृदयंगम झालें आहे व अशीं स्थळें विकारविलसितांत पुष्कळच आहेत; त्यावरून आगरकरांचें भाषांतरकौशल्य दिसून येतें. पण त्यांच्या भाषांतरांतही कित्येक स्थळें अशीं आहेत कीं, तेथें भाषेला कांटा बोंचल्या-सारखें वाटतें. या भाषांतरासंबंधीं त्या वेळीं " मनोरंजन व निबंधचंद्रिका" या मासिकांत रा. रा. हरि नारायण आपटे यांनीं विस्तृत लेख लिहून विकार-विलसितांतील असे कांहीं दोष काढून दाखविले होते. आपटे हे आगरकरांचे शिष्य व त्यांचे निस्सीम भक्त. त्यांचा लेख वाचून आगरकरांनीं मोठें समा-धान प्रदर्शित केलें आणि आपट्यांना मराठींत लिहिण्याबद्दल प्रोत्साहन दिलें. असो. विकारविलसिताच्या प्रस्तावनेंत शेक्सपीयरच्या नाटकांबद्दल आगर-करांनीं बरेच विचार प्रदर्शित केले आहेत त्यांवरून वाङ्मयात्मक विषयांचें त्यांचें इंग्रजी वाचन चांगलें होतें हें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. संस्कृत व मराठी ग्रंथांचेंही त्यांचें वाचन फार उत्तम व विस्तृत होतें. शेक्स-पीअरशीं तुलना करण्याला कालिदासापेक्षां भवभूति अधिक योग्य आहे असें त्यांनीं एका लेखांत प्रतिपादन केलें आहे. हें मत त्या वेळीं कित्येकांना चमत्का-रिक वाटलें पण तें तसें चमत्कारिक नाहीं हें पुष्कळांना माहीत आहे. मराठी भाषेंत स्वतंत्र ग्रंथरचना करण्याला वर्तमानपत्राच्या व्यवसायांमुळें व कॉलेजच्या वगैरे कामामुळें आगरकरांना फारसा वेळ मिळणें शक्य नव्हतें. खुद्द टिळकांचेंही ग्रंथकर्तृत्व बरेंचसें तुरुंगाच्या आवारांत झालें हें लक्षांत घेतलें म्हणजे या ग्रंथरचनेच्या अभावाबद्दल व्यक्तीला दोष न देतां परिस्थितीला दोष देणें रास्त ठरतें.

६ आगरकरांनीं केलेल्या मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या सेवेचें सविस्तर वर्णन करण्यास निराळा निबंध लिहिला पाहिजे. येथें तशा निबंधाची फक्त दिशा दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी भाषेच्या अर्वाचीन इतिहासांत आगर-करांचें नांव अगदीं उच्च स्थानीं आहे आणि त्यांच्या वेळच्या बऱ्याचशा अड-चणी जरी आतां दूर झाल्या आहेत तरी त्यांच्या भाषेला सौंदर्य देणाऱ्या

कारणांत अंतःकरणाची तळमळ, जुन्या मराठीचा अभ्यास आणि नवीन भाषांशीं सुबुद्ध परिचय यांचा अंतर्भाव जसा त्यांच्या काळीं होता तसाच तो आतांही असण्याची आवश्यकता कमी झालेली नाहीं. आगरकरांच्या वाणींतला जिवंतपणा हा त्या तळमळीचा परिणाम आहे; तिचें अस्सल मराठी व मधुर स्वरूप त्या अभ्यासाचा परिणाम आहे. अंतःकरणाची वृत्ति आगरकरांच्या भाषेंत इतकी बेमालूम व्यक्त झाली आहे कीं, मानस-शास्त्रवेत्त्यांला त्यांचे लेख वांचून त्यांच्या स्वभावाची पारख करण्यास कांहींच हरकत पडणार नाहीं. १८८१ सालापासून १८९५ च्या जूनपर्यंत सुमारें पंधरा वर्षें केसरी व सुधारक यांत आगरकर नियमानें लिहीत होते व या पंधरा वर्षांत सरासरीनें दर आठवड्याला एक लेख असें प्रमाण धरलें तर त्यांनीं ७००।८०० लेख लिहिले असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें संगतवार संपादन करून प्रकाशन करणें ही महत्वाची कामगिरी आगरकरांच्या व मराठी वाङ्मयाच्या भक्तांनीं केव्हां तरी अंगावर घेणें वाङ्मयोन्नतीच्या व जनहिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे. त्यांचे प्रसिद्ध झालेले असे लेख निबंधसंग्रहाच्या तीन भागांत आहेत. त्याशिवाय विविध विषयसंग्रह म्हणून एक लहानसा ग्रंथ त्यांनींच प्रसिद्ध केला होता. याशिवाय त्यांचे प्रसिद्ध झालेले ग्रंथ म्हणजे "वाक्यमीमांसा," "विकारविलसित नाटक" आणि "आमचे डोंगरीवरील १०१ दिवस" हे होत." केसरींतील निवडक निबंध भाग १ व २," हे आगकरांनींच प्रसिद्ध केले होते व त्यांतील सुमारें तीन चतुर्थांश निबंध खुद्द त्यांच्या लेखणींतून उतरलेले आहेत.

आगरकरांचें दारिद्र्य, त्यांच्या पाठीमागचीं कामें, त्यांची शरीरप्रकृति आणि त्यांचें अल्प आयुष्य या सर्वांचा विचार करतां त्यांनीं केलेली वाङ्मयसेवा संख्येच्या दृष्टीनेंसुद्धां कौतुकार्ह आहे. तिच्या गुणवत्तेबद्दल कोठें मतभेदच नाहीं. भाषेच्या आचार्यतेची पदवी त्यांना देण्याला कोणालाही आजपर्यंत संदेह वाटला नाहीं व पुढेंही तो वाटेल असें भय बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं.

# भाग बारावा

## समारोप

चंदनाचे हात पायही चंदन।
परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार।
सर्वांगें साखर अवघी गोड ॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासोन।
पाहतां अवगुण मिळेचिना ॥ तुकाराम ॥

गेल्या अकरा भागांत गोपाळ गणेश आगरकर यांच्या चरित्राविषयीं उपलब्ध असलेली माहिती देऊन तदनुषंगानें उपस्थित होणाऱ्या वृत्तांताचा आणि त्यांनीं प्रतिपादिलेल्या मतांचा व तत्त्वांचा विचार केला. त्यांच्या वाङ्मयात्मक कामगिरीचें स्वरूप पहिल्या दहा भागांत मधून मधून निर्दिष्ट झालें असल्यामुळें त्यासाठीं निराळ्या लिहिलेल्या म्हणजे अकराव्या भागांत तिचें तेथपर्यंत परिस्फुटित न झालेलें वर्णन केवळ दिलें. त्यांच्या सामाजिक, राजकीय वगैरे मतांचीही चर्चा निरनिराळ्या भागांत प्रसंगानुरोधानें झाली असल्यामुळें त्यासंबंधीं लिहिलेल्या स्वतंत्र म्हणजे नवव्या भागांत त्यांच्या विचारांचें तात्त्विक स्वरूप विस्तरशः देऊन त्यांतील विशिष्ट विषयांचें विवेचन संक्षेपानें केलें. एक दोन प्रसंगीं त्यांच्या स्वभावाचा परिचयही वाचकांना झाला. अवघ्या एकूणचाळीस वर्षांच्या आयुष्यांत दारिद्र्याशीं टक्कर मारतां मारतां आगरकरांचीं पहिलीं तेवीस चोवीस वर्षें निघून गेलीं. पण त्या वर्षांत मिळालेला अनुभव, झालेलें निरीक्षण आणि केलेलें मनन यांच्यामुळें त्यांच्या विचारांना स्थिरपणा आला. त्याबरोबरच त्या वर्षांत आगरकरांना जे भयंकर हालवनवास सोसावे लागले त्यांचा परिणाम त्यांच्या सुदृढ शरीरप्रकृतीवर होऊन

ती कायमची ढांसळली आणि दम्यासारख्या किचकट व त्रासदायक रोगानें तेथें कायमचें ठाणें केलें. पण शरीराची अशी प्रकृति झाली असतां आगरकरांनीं पंधरा वर्षें जीं मोठीं कामें मोठ्या उत्साहानें व उल्हसित वृत्तीनें केलीं त्यांवरून त्यांचा आनंदी स्वभाव आणि स्थितप्रज्ञत्व हीं दिसून येतात. आगरकरांचा स्वभाव मोकळा होता, पण त्यांना आंतल्या गांठीच्या, मुत्सद्दी किंवा वकिली स्वभावाच्या बऱ्याच माणसांशीं बरेच वेळां प्रसंग आला आणि त्यांच्याशीं झगडतांनाही त्यांच्या वृत्तींत कधीं फरक पडला नाहीं. अत्युत्कृष्ट आचरण, निगर्वी आणि द्वेषरहित वृत्ति, सद्गुणांचें कौतुक, दुर्गुणाविषयीं तिटकारा, व्यंगाविषयीं अनुकंपा, प्रचंड उद्योग, सत्यान्वेषणाची तळमळ, सत्याचरणाचा दृढनिश्चय, आणि आपल्या या अनेक शतकें हतभाग्य झालेल्या मातृभूमीवर अपरंपार प्रेम व तिचा सौभाग्यसूर्य उदय पावावा म्हणून तनुमनधन किंबहुना सर्वस्वाची पूर्णाहुति देण्याची पूर्ण तत्परता अशा अनेक गुणसमुच्चयामुळें आगरकरांचें चरित्र हें मोठें उद्बोधक आहे यांत शंका नाहीं. त्यांच्या चरित्रांतील विशेष म्हणजे त्यांची विवेकावरची श्रद्धा आणि सदाचरणावरील विश्वास हे होत. ते पराकाष्ठेचे प्रयत्नवादी होते. सुधारणा आपोआप होईल हें त्यांना मान्य नव्हतें. ती प्रयत्नानें घडवून आणिली पाहिजे, मग तिच्या ओघांत आपल्या प्रयत्नाचा ओघ मिळवून आपण खुषीनें आणि संतोषानें पुढें गेलें पाहिजे तरच आपला तरणोपाय आहे असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय होता. द्रव्याची त्यांनीं कधीं फिकीर केली नाहीं; परन्तु द्रव्यसंपादन व द्रव्योत्पादन हीं राष्ट्रोत्कर्षाचीं प्रमुख अंगें होत हें सांगण्यास ते कधीं विसरले नाहींत. स्वतः संन्यस्तवृत्तीनें राहून हिंदुस्थान देशाला कर्तृत्वशील व संपन्न करण्यांत त्यांनीं आयुष्य खर्चिलें. निर्भयपणा हा गुण स्वतःच्या आचरणानें त्यांनीं लोकांना शिकविला व असत्य तें त्याज्य, अन्याय्य तें त्याज्य, निर्दय तें त्याज्य हा महामंत्र त्यांनीं पुढील पिढ्यांना दिला आहे. स्वतः-साठीं कसल्याही फलाची आकांक्षा न धरतां आगरकरांनीं जन्मभर जनहितास्तव उद्योग केला. त्यांचा आनंदी आणि निर्द्वेषी स्वभाव हीच त्यांच्या ममत्वराहित्याची, निरभिमानाची, निरहंकाराची खरी खूण होती. त्यांचें अंतःकरण पहाडांतून धांवत येऊन हरिद्वाराला वाहणाऱ्या गंगाजलाप्रमाणें निर्मळ होतें. त्यांना खडतर टीका करावी लागली, दुर्जनांच्या वास्तविक स्वरूपाचें आविष्करण करावें लागलें, अन्याय आणि निर्दयता, अज्ञान आणि विषमता यांचा

उच्छेद करण्यासाठीं तीव्र शब्दांचे प्रहार करावे लागेल. पण ते शब्द, द्वेष किंवा मत्सर या दुर्गुणांपासून पूर्ण अलिप्त होते. विनोदाची महत्तर ठेव त्यांच्याजवळ येवढी मोठी होती कीं, प्रतिपक्षाचे मात्सर्ययुक्त वाग्बाण जसे त्यांच्यांत भय उत्पन्न करूं शकले नाहींत तसेंच त्यांच्या ठिकाणीं चिरडही उत्पन्न करूं शकले नाहींत. लढाईंत गुंतलेला योद्धा ज्याप्रमाणें शस्त्राघात हौसेनें सोसतो त्याप्रमाणें त्यांनीं जननिंदा सोसली. कधीं कधीं ती सोसणें दुर्धर होतें. ज्यांना खऱ्या गोष्टी माहीत होत्या अशा माणसांनींसुद्धां पूर्वीचा स्नेहसंबंध विसरून त्यांच्यावर खोट्या गोष्टी लादण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें त्यांच्या कोमल व प्रेमळ अंतःकरणाला दुःख झालें—पण तें त्यांनीं आनंदानें सोसलें. सत्यप्रतिपादन आणि सत्याचरण यांचें असिधाराव्रत ज्यानें घेतलें त्याला अशा अनिष्ट गोष्टी सोसल्याच पाहिजेत हे ते जाणून होते. त्याबद्दल त्यांनीं कधीं तक्रार केली नाहीं. धर्मयुद्धाच्या नियमांना ते कधीं विसरले नाहींत. नीतिमत्ता खासगी आचरणांत तशीच सार्वजनिक आचरणांत अत्यंत आवश्यक आहे हा त्यांचा ठाम सिद्धांत होता आणि त्याला अनुसरून ते सदोदित वागले. त्याहून दुसऱ्या प्रकारें वागल्याचा आरोप त्यांच्यावर त्यांच्या दुष्मानालासुद्धां कधीं करतां आला नाहीं.

२ ढोंगाचें कोणतेंही स्वरूप त्यांना अमान्य होतें. महाराष्ट्रांत किंबहुना हिंदुस्थानांत ढोंगाचा शत्रु आगरकरासारखा दुसरा कित्येक शतकांत झालेला नाहीं. त्यांच्या मोठेपणाचें बीज त्यांतच आहे. कांहीं कालपर्यंत हजारों लोकांचें शत्रुत्व त्यांना पतकरावें लागलें याचेंही बीज त्यांतच आहे. जेथें ढोंगाला लौकिक प्राप्त झाला आहे, आणि लौकिक गोष्टीला जपणारा दुष्ट किंवा नीच मनुष्यसुद्धां लोकादराला पात्र होतो असा पायंडा बसून गेला आहे तेथें ढोंगावर कोरडे ओढणारा, ढोंगी लोकांच्या वास्तविक स्वरूपाचें आविष्करण करणारा, जें शुद्ध तेंच शुद्ध, मग तें लोकमताला ग्राह्य असो वा अग्राह्य असो, असें प्रतिपादन करणारा असा धीरोदात्त पुरुष कांहीं काळपर्यंत सामान्य जनाला दूषणीय वाटावा हें क्रमप्राप्त आहे. पण तसें झालें म्हणून आगरकरांनीं कधीं लोकांचा द्वेष केला नाहीं. अज्ञान जनतेवर त्यांनीं कधीं आपली लेखणी उचलली नाहीं. सुबुद्ध अशा ढोंगी लोकांवर त्यांनीं तिचे प्रहार केले —आणि तें अगदीं योग्य केलें. स्वतःला सुधारक म्हणविणारे पण अनाचार करणारे असे जे लोक होते त्यांना आगरकरांनीं केव्हांही आसरा दिला नाहीं. जुन्या तऱ्हेच्या ढोंगावर जेवढ्या तीव्रतेनें त्यांनीं आपले कोरडे हाणले तितकेच

नव्या तऱ्हेच्या ढोंगावर हाणले. तथापि जेथें तेथें म्हणून त्यांना गुणोत्कर्ष दिसला तेथें त्यांनीं त्याचें अगदीं खुल्या दिलानें अभिनंदन केलें, कौतुक केलें. समत्वाचें तत्व त्यांच्या ठिकाणीं इतकें भिनलें होतें कीं, आपल्याहून लहान किंवा कमी अशा माणसांबरोबर ते कधींही अनादरानें किंवा आढ्यतेनें वागले नाहींत. आणि म्हणून बरोबरच्या माणसाशीं त्यांचें प्रेम अढळ राहिलें. आपल्याबरोबरचा किंवा वरिष्ठ कोणीही असणें शक्य नाहीं ही अहंकारबुद्धि त्यांच्यांत नव्हती; पण हृदयाला व बुद्धीला पटलेल्या तत्त्वांचा त्याग, रा. ब. महाजनींनीं म्हटल्याप्रमाणें, करण्याला ते गुरुगौरवार्थही कधीं तयार झाले नाहींत.

आपल्या काळीं आगरकर यांची थोर पुरुषांत गणना होती, पण ती पुढारी पुरुषांत होती असें म्हणवत नाहीं. चार जाणत्या लोकांबरोबर काम करण्याला लागणारे सर्व गुण त्यांच्यांत होते, हें न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज या संस्थांत त्यांनीं जीं कामें केलीं त्यावरून दिसून येतें. पण लोकप्रियता राखतो तो पुढारी अशी जी पुढारीपणाची एक आधुनिक व्याख्या आहे तिला अनुसरून वागणें हें त्यांना स्वभावतः अशक्य होतें, व तशा दृष्टीनेंच त्यांची पुढाऱ्यांत गणना नव्हती असें म्हटलें आहे. पण ते लोकांचे त्या अर्थानें पुढारी नसले तरी खरेखुरे मार्गदर्शक होते, गुरु होते, सदुपदेशक होते. केवळ सार्वजनिक संसारांत ज्या गुणांमुळें मोठेपणा येतो त्याहून उच्च प्रतीच्या गुणांचें वास्तव्य आगरकरांच्या ठिकाणीं होतें. त्यांच्यांत नुसतें थोरपण नव्हतें, तर तें थोरपण चांगुलपणाच्या पायावर उभारलेलें होतें. आपल्या उज्वल आचरणानें, उदात्त निर्भयतेनें, निर्मळ सत्यप्रियतेनें आणि निरलस जनहितबुद्धीनें जीं माणसें समाजाला वंद्य होतात तीं समाजांत नेहमीं प्रिय असतात असें नाहीं; पण केवळ लोकप्रिय माणसांपेक्षां त्यांची पायरी फार वरची असते व आगरकर हे त्या पायरीवरचे पुरुष होऊन गेले. उत्कृष्ट गुरु म्हणून त्यांचे आज हयात असलेले सर्व शिष्य त्यांची महती सांगतात. गोपाळराव गोखल्यांनीं उत्कृष्ट मित्र म्हणून त्यांची प्रशंसा केली आहे व ती त्यांच्या चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांवरून उचित आहे अशी खात्री वाटते. उत्कृष्ट विद्यार्थी ते होते याबद्दल शंकाच रहात नाहीं. वाचन, अवलोकन आणि मनन या सर्वांत त्यांचा व्याप फार मोठा होता. आणि वर सांगितल्याप्रमाणें भगवद्गीताप्रणीत कर्मयोगी संन्यासाचें ते एक मूर्तिमंत आणि मोठें उदात्त असें उदाहरण होऊन गेले.

सर्व थोर पुरुषांप्रमाणें त्यांची दृष्टि आपल्या काळाच्या फार पुढें होती. हिंदुस्थानच्या केवळ गतकालीन वैभवाच्या गप्पागोष्टी करून निरुद्योगी राहणें ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. या देशाचा भविष्यत्काल उज्वल झाला पाहिजे ही तळमळ त्यांना सारखी लागून राहिली होती. भरतभूमीवरचें त्यांचें प्रेम अपरंपार होतें. तिच्या सौंदर्याचें, साधनसंपत्तीचें, निसर्गसमृद्धीचें वर्णन करतां करतां त्यांच्या गद्य वर्णनाला बाणकवीच्या गद्याप्रमाणें काव्यस्वरूप येत असे. त्यांची स्वातंत्र्याची लालसा अत्यंत तीव्र होती. स्वदोषनिवारण करणें व परगुणग्रहण करणें हें त्या स्वातंत्र्यप्राप्तीचें प्रमुख साधन अशी त्यांची पूर्ण श्रद्धा होती. म्हणून तर सुधारणांचें प्रतिपादन त्यांनीं येवढ्या आवेशानें व सडेतोडपणानें केलें. अरण्यांत वावरणारा सिंह किंवा वाघ असावा त्याप्रमाणें त्यांची मुद्रा निर्भय व तेजस्वी दिसे असें त्यांचें वर्णन त्यांना पाहिलेल्या एका गृहस्थानें केलेलें आहे. धैर्य या गुणाचें अधिष्ठान त्यांच्या ठिकाणीं फार उत्कृष्ट प्रमाणांत होतें. भयग्रस्तता हें हीनतेचें मुख्य लक्षण होय. जो भितो, घाबरतो तो गुलाम; जो निर्भय तो स्वतंत्र; अशी व्याख्या करण्यास हरकत नाहीं. स्वार्थत्यागाच्या गुणांत आगरकरांची योग्यता आधुनिक कालांत फार श्रेष्ठ आहे. स्वार्थाचा यज्ञ हाच राष्ट्रोन्नतीचा स्वर्ग गांठून देणार ही त्यांची पुरेपूर खात्री होती आणि म्हणून तो करतांना त्यांनीं मागें पुढें बिलकुल पाहिलें नाहीं; असें असूनही निकट आप्तांवरचें त्यांचें प्रेम परिपूर्ण होतें. सुधारणातत्त्वांचें चिंतन करणाऱ्या आगरकरांना चिरंजिवाला पाठीवर घेऊन घोडा होण्याचें भाग्य भोगतांनाही आनंद होत होता अशा गोष्टी प्रसिद्ध आहेत.

ज्याबद्दल आगरकरांचें विशेष कौतुक वाटतें तो त्यांचा गुण म्हणजे विचारपूर्वक स्वीकृत अशा तत्त्वांपासून ते केव्हांही, कसल्याही प्रसंगीं ढळले नाहींत. सुधारणेच्या स्वरूपाचें—भविष्यकालीन स्वरूपाचें—भगवान् श्रीकृष्णाच्या विश्वरूपाप्रमाणें दर्शन झालें म्हणजे अर्जुनाप्रमाणेंच बहुतेक माणसें बावरतात, बावरतात, पळून जाणाच्या मार्गाला लागतात. उदात्ततेचें, सौंदर्यातिशयाचें, सुधारणेच्या अत्युच्च भागांचें, स्वातंत्र्याच्या पराकाष्ठेचें रूप कित्येक वेळां इतकें प्रखर असतें कीं, तें सहन होण्याला भगवान् शंकरासारखाच पराक्रमशाली ऋजुनेत्र महात्मा लागतो. सुधारणेच्या रूपाचें क्षणिक विपरीत वाटणारें, आपल्या संकुचित किंवा विकृत दृष्टीला अप्रशस्त भासणारें, आपल्या संशयात्मिकतेला भयप्रद दिसणारें अल्प स्वल्प दर्शन होतांच तिच्यापासून भयभीत होऊन पळून जाणाऱ्यांची

संख्या फार. आगरकरांची उदयोन्मुखदृष्टि कधीं माघारी वळलीच नाहीं; त्यांचें प्रगमनशील पाऊल कोठेंही आशंकेनें किंवा भयानें थबकलें नाहीं; त्यांच्या हातांतला सुधारणेचा, अभ्युन्नतीचा, स्वातंत्र्यसंपादनाचा जरीपटका केव्हांही ढळला नाहीं. दुसरे मोठे मोठे मागें सरले; कृतीची वेळ येतांच थबकले; संभावितपणा राखण्यासाठीं तत्त्वाला मुकले; लौकिक संभाळण्यासाठीं सत्यस्वरूप परमेश्वराला विसरले. पण आगरकर कधीं मागें सरले नाहींत; कोठें दचकले नाहींत; कोठें थबकले नाहींत; दीर्घ मननानें, वाचनानें, विचारानें, अनुभवानें तत्त्वाबद्दल निश्चित बुद्धि झाल्यामुळें क्षणिक संशयाच्या वादळामुळें त्यांची वृत्ति केव्हांही बावरली नाहीं. बुद्धीच्या वर्चस्वावरचा त्यांचा विश्वास केव्हांही ढळला नाहीं. सदाचरण हाच धर्माचा पाया हा सिद्धांत त्यांनीं केव्हांही सोडला नाहीं. आयुष्याच्या संग्रामांत खऱ्या लढवय्याप्रमाणें ते लढले. त्यांनीं पाठ म्हणून कधींच दाखविली नाहीं. माघार म्हणून कधीं घेतली नाहीं. जनहिताच्या इतिहासांत आगरकरांचें नांव अत्यंत उज्ज्वल असें नांदणार याबद्दल मुळींच शंका नाहीं.

३ आगरकरांचें चरित्र त्यांच्या लेखांत समाविष्ट झालेलें आहे. त्यांच्या लेखांचें मनन, त्यांतील तेजस्वी विचारांचें आचरण, त्यांत घालून दिलेल्या सुधारणांचें सक्रिय अभिनंदन हा राष्ट्रोद्धाराचा जरी कांहींसा अवघड तरी अत्यंत प्रशस्त व निश्चित फलदायक असा मार्ग आहे. आगरकरांनीं बीजरूपानें महाराष्ट्रभर पेरलेले विचार आतां फलद्रूप व्हावयास लागले आहेत; आणि म्हणून भविष्यत्कालाविषयीं प्रत्येकानें उल्हासवृत्ति ठेवण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. आगरकर आशावादी होते; स्वार्थत्याग आणि प्रयत्न यांची पराकाष्ठा करण्याला जो सदैव तत्पर असतो तो आशावादीच असतो. कारण स्वार्थत्याग आणि प्रयत्न—आणि त्यांना ज्ञानाची जोड—या शस्त्रांच्यापुढें टिकाव धरील अशी प्रतिकूल परिस्थिति असणेंच शक्य नाहीं. आगरकर ज्ञानाचें उपासक आणि प्रसारक होते; त्यांनीं अज्ञानाचा, अविद्येचा बींमोड करण्यांत आपली सर्व शक्ति खर्चिली. आगरकरांची भक्ति, त्यांचें प्रेम, त्यांची भूतदया हीं केवळ अपूर्व होती. आणि वैराग्ययुक्त कर्मयोगी, कर्मसंन्याशी या पदवीला अलीकडे शें दोनशें वर्षांत तर त्यांच्यासारखा पात्र असलेला मनुष्य मिळणें कठीण आहे. त्यांच्या स्मरणाचा उत्कृष्ट उपाय म्हणजे त्यांनीं प्रतिपादिलेल्या श्रेयस्कर तत्त्वांचा विचार, उच्चार व आचार करीत रहाणें आणि स्वतंत्र बुद्धीच्या बळावर जन-

कल्याणाचे नवीन नवीन मार्ग चोखाळणें आणि जुने मार्ग व्यवस्थित राखणें ह्याच होय. त्यांच्या चरित्रवाचनानें व विचारांच्या मननानें अज्ञानाचें तिमिर दूर होऊन उज्ज्वल चारित्र्यरूप सूर्याचा उदय व्हावा आणि त्याच्या ओजस्वी व पवित्र किरणांच्या सामर्थ्यानें भरतभूमीच्या अखिल अरिष्टांचें निवारण होऊन ही प्राचीन काळीं होती त्याप्रमाणें स्वर्गींच्या देवांनासुद्धां आतां आणि यापुढें वंदनीय भूमि व्हावी अशी इच्छा प्रकट करून आज तीन वर्षांहून अधिक दिवस प्रस्तुत लेखनकार्यांत गुंतलेल्या लेखणीला विश्रांति देतों.

समाप्त

# सूची

(आंकडे पृष्ठांचे आहेत.)


अस्पृश्यता ३४०, ३६३, ४०५, ४०६, ४१९.
अश्लीलता १२२, १२३.
अज्ञेयवाद ३३६.
आगरकर, गोविंदराव ३०, ३१.
आगरकर, गोपाळ गणेश
अशुद्ध विवाहाबद्दल अमान्यता ४२२–४२३.
कार्यांची विशिष्टता ३–८.
कोल्हापूर खटल्याशीं संबंध ८३, ८४–८७.
केसरींतील काम ६६–७१.
टिळकांशीं मतभेद १२५–१३०, १३७–१४०, १४२–१४६.
टिळकांचा स्नेह ५३, ५६.
तुरुंगवास ९३–१०३.
देशस्थितीचें निदान १५–१७.
फर्ग्युसन कॉलेज काढलें ११७–१२५.
बालपण आणि विद्यार्थिदशा २१–५०.
भाषासरणी आणि वाङ्मयसेवा ४६४–४८८.
मतें व विचार ३०२–४११.
महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र १९६–२०२.
योग्यता व कार्य ४८९–४९५.
राजकीय मतें ७३, ३४५–३६३.
लेखणीचा पराक्रम १९–२०.
वर्तमानपत्राची कल्पना ६४–६५.
विकारविलसित १०२–१०३.
विशेष शिकवण ११–१३.
व्यवहारज्ञान, १५०.
शिक्षक १२२-२३, ४९२.
शूद्र, आणि ब्राह्मणांच्या हौदांतील पाणी घेण्याचा प्रयत्न ४१९–४३०.
शेवटचे दिवस ४५५–४५८.
साधेपणा २०३–२०५.
सुधारकपत्र काढलें १५२–१५९–१६३.
स्वभाव, ३१, ४९०.
हिंदु-मुसलमान प्रश्न ४३६–४४६.
होळकर देणगी प्रकरण १८४–१९०
आगरकर, वामनराव २५, २७.
आगरकर, सरस्वतीबाई २१, २२.
आगरकर, श्री. यशोदाबाई ४६.
आर्थिकविचार ३६४-३८५.

आधारप्रामाण्य १२७, १२८.
आपटे, वामन शिवराम २, ३७, ४२, ४५–४७, ६१–६५, ७०, ७५, ७९, ८३, ८४, १०५, ११४, ११६, ११७, ११९, १२०, १२१, १३०, १३९, १४०, १४५, १४८, १७५, १७७, १८१–८३, १९०, १९५, २०३, २१२, २१४, २१६, २२६, २२७, २४२, २४३, २६८, २७२, ३००, ३०२, ४१२, ४४८–४५२, ४५४, ४५५.
आपटे, हरि नारायण, २५२, ४८७.
आंबेकर, बापूजी मार्तंड १८४, १८९, १९०, २८२.
आमचा देश ( पहा हिंदुस्थान ).
आशावादित्व ३०६, ३०८, ४९४.
इंग्रज ( जी ) ७, ८, १०, ११, ३४६, ३५०, ३५४–३५६, ३६१, ३६२, ३६८, ३६९, ३७३, ३७८, ३८७, ४८२, ४८३.
इंग्रजी राज्य ३३०, ३३१–३३, ३७६, ३८१.
उपासनी, रा. ब. श्रीधर बाळकृष्ण ४६.
उद्योग ( प्रयत्न ) ३१३, ३२०, ३२१, ३४१, ४९४.
एकनाथ २०.
" एकांतिक " मतें ( आगरकरांचीं ) १४७, १४८, १५१, २६७.
ऐहिक सुखवर्धन ( मनुष्यतेचें ) ३१०, ३४२-३४४.
कर्वे, प्रो. धोंडो केशव २७८, २९३, ४३०, ४३१, ४३३.
कानिटकर, रा. सा. गोविंद वासुदेव ४६, २५२, २५६.
कानिटकर, श्री. काशीताई. ४६.
कालिदास, ४७९, ४८७.
केशवपन, ४७५, ४७७.
केसरी, १, २, १३, ४२, ६४-६७, ७०, ७१, ७३, ७५, ७९, ८०, ८७, ८९, १०२, १०४, १०५, १०८-११०, ११३, १२५, १२८, १३३-१३५, १३७, १३८, १४२-१४६, १४८-१५४, १५६, १५८, १६४, १६५, १६७, १७०, १७४, १७९, १८०, १८३, १९०, १९३, १९५, १९६, २००, २०२, २०३, २१६, २२५, २५१, २५७, २६८, २७५, २९२-२९८, ३३९, ३४८, ३६४-३६८, ३७६, ४११, ४२९-४३१, ४३३, ४६०, ४८८.
केळकर, नरसिंह चिंतामण. २५३, २६०, २६५, २८०, २८१, २८३, ४५६.
केळकर, वासुदेव बाळकृष्ण. २, ६५, ११५, १२०, १४५, १४८, २०३, २१६, २२३-२२५, २३६, २४३, ४१३, ४५५, ४५६.
कोल्हापूर प्रकरण. ७४, ७८, ९२, ९३, ९८, १००-१०२, १०४, १०७, १०८, ११७, १९६, २१५, २१६, २८२, ३००.

कंपनी सरकार १.
खरे, दाजी आबाजी ५५, १४४, १४५.
गांधी, मोहनलाल करमचंद १७, ३६, १४७.
गोखले, गोपाळ कृष्ण २, ३, १८, ४२, ४७, ९०, १०६-१०८, ११९, १२१, १५०-१५२, १६६, १६८, १७०, १७३, १७४, १८१, १८३, १९५, २२५, २२६, २२९, २३५, २४२, २४३, २५१, २५२, २७२, २८७, २८९, ३६२, ३९१, ३९२, ४१२, ४१८, ४४१, ४४५, ४५४, ४५८, ४६१, ४६२, ४९२.
गोखले, हरि नारायण २२४, २२७.
गोरक्षण ४३८.
गोळे, महादेव शिवराम ६५, ११५, १२०, २१६, २२४, २३२, २४२.
चहाग्रामण्य प्रकरण २५२, २५३, २५६-२५९, २६४, २६५, २८०, २८७, २८९.
चळवळ ( सनदशीर ) ३४८.
चिपळूणकर, विष्णुशास्त्री ( शास्त्रीबुवा ) २, ८, १२-१५, ४१, ४६-४८, ५४, ५६-६७, ७०-७३, ७५, ७९, ९७, ९८, १०२, १०४, १०७, ११५, १३९, १४९, १६५, १८३, २१३, २१४, २१७, २७०, २७३, ३००, ४३३, ४५१, ४५४, ४८६.
चंदावरकर, सर नारायण गणेश १४५.
छत्रे, रा. ब. केरूनाना ३६, ४३-४५, १२१.
जातिभेद, १७, ७१, ७२, १९९, ३१२, ३६१, ४१९, ४२४-४२७, ४२९, ४३०.
जिन्सीवाले, प्रो. श्रीधर गणेश २८०, ४३३.
जेसूट लोक ११७.
जोशी, गणेश वासुदेव ( सार्वजनिक काका ) ३६४.
जोशी, गोपाळराव २०६, २५२-२५५, २८१, २८७, २९६
टिळक, बाळ गंगाधर २-४, १०, १३-१५, ३४, ३७, ३८, ४१, ४२, ४५, ४७, ४९, ५३-५८, ६१-६७, ७०, ७१, ७३-७५, ७७, ७९, ८३-९२, ९६, ९७, १०१, १०२, १०४, १०६, १०८-११७, १२०-१२६, १२९, १३०, १३२, १३४, १३५, १३७-१४८, १५०, १५१, १५५, १५६, १५८, १६४, १६५, १७२, १७६-१९०, १९२-२००, २०२, २०३, २०६-२०८, २५१, २५३-२५५, २६५, २६८, २७०, २७२, २७३, २७६, २८०-२८७, २८९-३००, ३०३, ३३४, ३३९, ४१२, ४१८, ४२९, ४३१, ४४०, ४४१, ४४८, ४४९, ४५२, ४५६, ४५८, ४६०, ४६४, ४८७.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी ३, १०६, ११९, १२२, १२५, १३१, १३४, १४३, १४७, १४८, १५३, १६४, १७५, १७६, १९६, २०८, २१८, २१९, २६८, २७०, ३४५, ४३०, ४३४, ४४४, ४४९, ४५१, ४५३, ४६०.

डेक्कन कॉलेज १३, ३४, ३५, ३७, ५१, ५३, ५७, ७४, ८६, ९८, १०७, ११९, १२६, १४८, १६५, २१२, २१३, २७०, ४३४, ४३६, ४६०.

ढोंग (ढोंगी लोक) ३२३-३२६, ३२९.

तुकाराम १, २०, ४६२, ४६५, ४८९.

तुरुंगवासाचें वर्णन ९४-९६, ९९, १००.

तेलंग, काशिनाथ त्रिंबक ९०, ९१, ११७, १४३-१४५, १८१, ३६०, ४३४-४३६, ४५४.

दारिद्र्य ( हिंदुस्तान देशाचें ) ३२९, ३७०, ३७२, ३७६, ३७७, ३७९, ३८०, ३८५, ४७३.

देशी भाषा ९८.

देवधर, गोपाळ कृष्ण १२२, २७८.

देवधर, सिताराम गणेश १५३, १५५, १६५, १६६, १६९, २०४, २५१-२५६, २८२, २८३, २८७, २९०-२९९, ४५६.

धंदेशिक्षण ४७०.

धर्म ( वृत्ति ) १९९, ३११, ३१२-३३६, ३४२, ३४३.

नामजोशी, महादेव बल्लाळ ६१, ६४, ६५, ७०, ७५, ७९, १२०, १२१, १४५, २१४, २१५, २२७, २३४-२३८, २४१, २७०, ४१२, ४५१.

निबंधमाला १४, ६०, ६६, ७१.

निर्भयपणा ३१०, ४९३.

नोकरशाही ३५६, ३५७.

नौरोजी, दादाभाई २६८, ३४८, ३५०, ३७०, ३७८, ३८४, ४२७, ४४०, ४४४, ४४५.

न्यू इंग्लिश स्कूल १, १४, ४२, ५९, ६०, ७५, ८३, ८४, ८६, ९३, १०४, १०७, १०९, ११६, ११८-१२२, १२४, १२५, १३२, १३९, १५३, १६५, १८३, १९५, १९६, २६८, २६९, ३०१, ३४५, ३९३, ४३३-४३५, ४४६, ४५०-४५२, ४९२.

पंचांग प्रकरण ११४.

परांजपे, डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम ४७८. ग्रंथाची प्रस्तावना.

परीक्षा ( समकालीन ) ३५१-३५६.

पळसे प्रकरण ११४.

पाध्ये, दामोदर गणेश २५७, २५९, २६०.

पुणें २, ३.

पुणेंवैभव २५३, २५५.

पुनर्विवाह ४१४, ४३०, ४३२, ४४५, ४५०.

पुराणमतवाद २.

पेशवाई ८, १४, ५१, ३६७.
प्रार्थनासमाज १२७, २६३.
फर्ग्युसन कॉलेज १, २, ३०, ४२, १०६, ११९, १२१-१२३, १२५, १३०, १३१, १३३, १३९, १५०, १५३, १५५, १९३, १९४, १९६, २०४, २४२, २६८, २६९, २७१, २८४, ३०१, ४१२, ४१३, ४३०, ४३३, ४३४, ४४६, ४४९-४५५, ४९२.
फर्ग्युसन, सर जेम्स ८२, १२०, १८०, २१८, ३००.
बंड (१८५७) १, ८, १४.
बर्वे, रा. ब. महादेव वासुदेव ७९, ८०, ८६, ८९, ९१, १०४, १०९, ११४.
बलात्कार ३१०, ३१४, ३१६.
बहिष्कार (परदेशी मालावर) ३८३.
बालविवाह ११२, १२२, १२८, १३१, १३३-१३६, १४२, १४४, १४५, १४९, ३१८, ३३९, ३५८, ३६१, ४८१.
ब्राह्मणेतर (वाद, पक्ष) ४२०, ४२९.
बुद्धिवाद (प्रामाण्य) ७१, ११७, १२६, १२८, १३४, ३०८, ३१०, ३३३-३४१, ४९३.
भरतखंड २, ७२, २६७, ३७५, ४९३, ४९५ (पहा, हिंदुस्थान)
भवभूति ४७२, ४८७.
भागवत, कऱ्हाडचे २१.
भागवत, रा. ब. दत्तात्रय विष्णु २३, २७, २८, ३१, ३२, ३४, ३५, ४५, ४९, ४५०.
भांडारकर, सर रामकृष्ण गोपाळ ३७, ४५, ११७, १२६, १२७, १४९, २२५, २६८, २७४, ४३६, ४४८.
भिडे, सदाशिव पांडुरंग ८१–८३, ८५, ८८, ८९, ९२, १०५.
भूतदया १९८, ४६२.
मंडलिक, विश्वनाथ नारायण ५५, ११७, १२०, १४४, १४५, ४३१.
मलबारी, मि. १२२, १२८, १३१, १३२, १३४, १४२, १४३.
मराठा (वर्तमानपत्र) ६४, ६५, ६७, ८०, ८४, ८९, १०२, १०४, १२५, १५०, १५३, १५४, १७०, १९६, २०२, २०३, २१४, २१६.
महाजनी, रा. ब. विष्णु मोरेश्वर २७, २९, ३२, ३४, ३५, ४७, ४८, ५०, ६०, १०६, १०७, १२७, ४९२.
महाराष्ट्र १–३, ८, १०, १२, ३२, ३७, ८०, ९१-९३, १०२, १०८, ११७, १२६, १२७, १२९-१३१, १५८, १६२, २०२, २०७, २९०, ३१८, ३३९, ३६३, ४०४, ४८९, ४९४.
महाराष्ट्र (मराठी) भाषा ४६५, ४६६, ४८५, ४८६.
मीठ (कर) ३७८

मिल, जॉन स्टुअर्ट ४६, ४८, ५९, ७०, ११६, १२६, १३२, १४८, १६६, ३८३.
मुसलमान ३४६, ३५४, ३६७, ३७५, ४०२, ४०५, ४२२, ४२८, ४३६-४४०, ४४२, ४४४, ४८३.
मेकॉले, लॉर्ड ५९, ६०.
मेहता, सर फेरोजशहा ८३, ९०, ९१, ४३४, ४४१.
मोर्ले, लॉर्ड ३१०, ३११.
मोरोपंत ४६५, ४७९,
रखमाबाई प्रकरण १५८.
रमाबाई, पंडिता २७४–२७९.
राजकीय सुधारणा ६, १५, १७.
राजसत्ता ३१७.
राजसंस्था ३१३.
राजाराम कॉलेज १०५, १०६.
राजीनामा ( टिळकांचा ) १७५, १७७–१७९, १८५, १९१–१९३, १९५, २०२, २५१, संपूर्ण भाषांतर २०८ ते २५०.
रानडे, महादेव गोविंद. २, ३, ५, १८, ३७, ४७, ५५, ८५–८९, ११७, ११८, १२६, १२९, १३२, १३३, १३६, १४३, १४६, १४९, १५१, १८१, २०६, २२५, २५१-२५७, २५९-२६५, २७४, २७६, २८०, २८१, २८३, २८६-२९१, ३००, ३०८, ३४८, ४१२, ४१३, ४१८, ४३५, ४३६, ४४०, ४४९, ४६०.
रानडे, वामनराव ८३, ८४, ८६, ८९, ९२, १०२, २५६.
राष्ट्रीयसभा ( कांग्रेस ) १, १४३, २४८, २६८, २९१, ३४८, ३४९, ३८७, ४१३, ४२२, ४२३, ४३८, ४४४.
लोकशिक्षण ८, ९८, १४९, १८९, १९९, ३५८, ३८६, ३८८, ३८९, ४११, ४५१.
लोकहितवादी ( गोपाळराव हरि देशमुख ) १४५, २७३.
वर्डस्वर्थ, प्रि. ११७, १२०.
वर्तमानपत्रें ६८, ६९.
वाक्यमीमांसा १८८, ४८८.
वाच्छा, सर दिनशा एदलजी ३७०, ४३४, ४६०.
विकारविलसित १०२–१०३, ४८४–४८८.
विचारकलह १९७, १९८.
विचार ( धार्मिक ) ३१४.
विचार ( राजकीय ) ३१४, ३४५–३६३.
विचार ( सामाजिक ) ३१४, ४०५–४०९.
वेडर्बर्न, सर विल्यम ११९.
व्यक्तिवाद ३१६.
व्यक्तिस्वातंत्र्य १७, १२४, ३४३, ४१९.
व्यापार (खुला) ३८३.
शब्दप्रामाण्य, ३३४.

शंकराचार्य, २५५, २५६, २६२, २६३, २८०, २८७, २८९, ३३५.

शारदासदन, २७४-२८०.

शास्त्रीबोवा (पहा, चिपळूणकर विष्णुशास्त्री)

शिवाजी महाराज, कोल्हापूरचे ८१-८३ ९२, १०८.

शिक्षण ११२, ११५, ११६, ११८, १२६, १३०, २७२.

(पाश्चिमात्य) (ज्ञान) ११, १६, १५९, १९८, १९९, ३०८, ४४०.

(प्राथमिक) ३८८, ३८९, ३९१-३९३, ३९६, ३९८, ४०३, ४३४.

(राष्ट्रीय) ६०, ३९४–३९६, ३९८, ४००, ४१७.

श्रद्धा (विश्वास) ३३८, ३३९, ३४१,

समता ३१०, ३१२, ३१३, ३१८, ३२०, ३४१, ४६२.

समाज (सामाजिक) सुधारणा २, ६, १७, ११३, १२८, १४६, १६५, १६६, २८९, ३०४, ३०५, ३०८, ३१७, ३२०, ३२६, ३४५, ३६०–३६३, ४१८, ४३०, ४४९, ४७०.

समाजसत्तावाद ३१६, ३१७.

सत्याग्रह ४०६.

सामाजिक परिषद् १, १४३, ४१३, ४१५, ४४४.

स्थित्यंतर, सामाजिक ३०७

सुधारक १, ३, ११, १४, १३१, १३४, १५३, १५५–१५९, १६२, १६३, १६५–१७२, १७४, १७५, १९५-१९६, १९८, २०४, २०६, २०७, २२५, २५१, २५२, २५६, २५७, २५९, २६०, २६५, २६७, २७२-२७४, २७६, २७८–२८६, २८८, २८९, २९३, ३००, ३०२, ३०३, ३४८, ३५२, ३६६, ३७६, ३७९, ४०७, ४११, ४१५, ४१६, ४४१, ४४४, ४४९, ४५१, ४५८, ४६२, ४६६, ४८८.

सुधारक (पहिल्या वर्षाचा हिशेब) १७०.

सुधारणा १२६, १२७, १५६, १६०, १९९, २०५, २५९, २६३, २८४, ३०७-३०९, ३१४, ३१७, ३१८, ३२७, ३४१, ३४४, ३८५, ४३१, ४४५, ४४६, ४६२, ४९०.

सुधारणा (राजकीय) ३०५, ३६०, ३६१.

सेल्बी प्रि. ४१, ४३, ४५, ११७, १२०, ४५४, ४६०.

संमति ३१०, ३१२, ३१३, ३१६, ३१८.

संमतिवयोवाद ३, १८, १२९, १४४, १५८, १९५, ३२३, ४४१, ४४४, ४७२.

संघटण ४२४, ४३२, ४३८.

संरक्षण (वाद) ३८३.

संस्थानें, देशी ७९.

स्पेन्सर, हर्बर्ट ४६, ७०, ८६, १२६, १४८, ४४९.

स्वतंत्रता, (स्वातंत्र्य) ११२, ११५, ११६, ११८, १२६, १३२, १६०, १९९, ३०८, ३१२-३१५, ३१८, ३२१, ३२६, ३४१, ३४६–३४८, ३५१, ३५८, ३६३, ३६९, ४३३, ४७०, ४८१.

स्वदेशी चळवळ ३६४.

हिंदीकरण (नोकऱ्यांचें) ३४९.

हिंदुधर्म १६, १३२, १५९, २५७, २५८, २६७, २७५, २८०, ४७३.

हिंदुस्थान (आमचा देश) २, ३, ६, ७, १०, १२, १५, १६, १९, ३४६, ३६४, ३६५, ३८१, ३८६, ३८७, ४२१ (पहा, भरतखंड).

होळकर, शिवाजीराव महाराज, १८५–१८९, १९१, २००, २१२, २८०.

हॅमलेट नाटक १०२, १०३.

ज्ञानप्रकाश ८२, ८५, २०६, २५१, २८७.

ज्ञानेश्वर २०, ४६२, ४६५.

REFBK-0004122